ज्ञानदीप लावू जगी

पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव	:	नारायणराव पेशवे यांचा खून कीं आत्महत्या? भाग २ रा
लेखक	:	पांडुरंग गोपाळ रानडे
प्रकाशक	:	पांडुरंग गोपाळ रानडे, बेळगांव
प्रकाशन वर्ष	:	१९४४
मूळ ग्रंथ प्रत	:	शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२३

नारायणराव पेशवे यांचा खून कीं आत्महत्या?



लेखक :— पांडुरंग गोपाळ रानडे.

॥ श्री ॥

नारायणराव पेशवे यांचा

खून कीं आत्महत्या ?

भाग २ रा.

लेखकः—पांडुरंग गोपाळ रानडे

सन १९४४ इ.

किंमत सात रुपये.

प्रकाशक :
पांडुरंग गोपाळ रानडे
मालक-महाराष्ट्र औषधी कारखाना,
१२२७ कोनवाळगल्ली-बेळगांव.

★

★

मुद्रक :
ए. पी. चौगुले,
वीर-भारत प्रेस, बेळगांव.

अनुक्रमणिका

(भाग २ रा)

प्रकरण १९ वें.

नाना फडनविसांची काळीकुट्ट पार्श्वभूमिका.

इ. स. १७७६ ते इ. स. १७७७.

१ वाईट गोष्टींना कशी निरनिराळीं तोंडें फुटतात ?—२. सखारामबापूंवर पेशवे-सरकारास कर्ज देणाऱ्या सावकारांचा विश्वास होता. त्यांचा नानांवर विश्वास नव्हता. त्यामुळें सखारामबापूंस पेशवे-सरकारच्या कारभारांत वडिलकीचा मान मिळाला. नाना दुय्यम कारभारी.—३ पेशव्यांच्या "देणें" यादीवर वडिलकी नात्यानें सखारामबापू 'द्यावें' असा शेरा मारीत. 'द्यावें' असा शेरा झाल्या-नंतर 'देववावें' असा नाना शेरा मारीत, व पुढें कामाची अंमलबजावणी होई. सर्व अंमलबजावणीचें काम नानांच्या मर्जीप्रमाणें होत असे.—४ राघोबादादांना नामशेष करण्यांत नानांनीं ज्या भेदनीतीचा उपयोग केला, त्याच तत्वानें ते बार-भाईंतील इतर मंडळींसही नामशेष करून स्वतः एकटेच सर्वाधिकारी होण्याचा खेळ खेळूं लागले.—५ सखारामबापूंच्या अधिकारांस अशी आगळीक करण्यास प्रथम नानांनीं सुरवात केली. पेशव्यांची मातोश्री गंगाबाई यांस नाना फडनविस वश करून घेतात.—६ नाना फडनविस सखारामबापूविरुद्ध आपल्या अधिकाराचें अतिक्रमण करतात. त्यामुळें पुण्यांतील सावकार मंडळी नानावर रुष्ट होते. त्यांचा नानांस मारण्याबद्दलचा कट. कट उघडकीस येऊन आत्मरक्षणाचा बंदोबस्त नाना करतात.—७ नाना फडनविस यांस मारून टाकण्याच्या कटाचे पुढारी सखारामबापूच असावेत असा तर्क. या मारण्याचा कटामागें 'अंदरकी बात' होती. ती अंदरकी बात कोणती ?—८ स्वतःच्या खुनाच्या कटाची चौकशी नानांनीं केली नाहीं, यांत 'तेरी चूप मेरी चूप' असें गूढ रहस्य होतें.—९ दामो-दर मंडळींनीं नानांच्या खुनाचा कट कां केला याची कारणमीमांसा.—१०. नानांना मारण्याचा कट उघडकीस आल्यानंतर एकच महिन्यानें पुरंदरीं गंगाबाई मरण पावते. गंगाबाईच्या मृत्युची वार्ता कळूनही नाना फडनविस पुण्याहून पुरंदरास जाण्याचें चारपांच दिवस लांबणीवर टाकतात.—११ मराठी इतिहासकार गंगाबाई नवज्वरानें मेली असें सांगतात. ती त्या विकारानें मेली नाहीं अशी जबर शंका. नाना व गंगाबाई यांच्या संबंधांविषयीं मराठी इतिहासकारांची मुग्धता.

—१२ पोपनें आपल्या मराठ्यांच्या इतिहासांत गंगाबाईनें विष खाऊन आत्महत्या केली असें दिलें आहे. गंगाबाईच्या मृत्यूची कारणमीमांसा नाना फडनविसांच्या तोंडाला काळिमा फांसते. या बाबतींत डफचें स्पष्ट मत. तसेंच मेजर मॅकडोनल्ड यांचें नानांच्या बखरींतील मत.—१३ नाना फडनविसांनीं निंद्य मार्गानें गंगाबाईस आपल्या लगामी कसे आणलें ?—१४ खरेशास्त्र्यांनीं नाना फडनविसांच्या समर्थनार्थ दिलेल्या मुद्यांस समर्पक उत्तर.—१५ नानांचें सदाचरण दाखविणारा पुरावा फोल टरफल कसा आहे याची चिकित्सा.—१६ गंगाबाई, पार्वतीबाई, गोपिकाबाई व आनंदीबाई या थोर पेशवेघराण्यांतील मानधनसंपन्न स्त्रियांचीं चित्रें नाना फडनविसांनीं कशीं रंगविलीं ?—१७ धारच्या किल्ल्यांतील आनंदीबाईंची असहाय्य स्थिति व तिची कर्तबगारी —१८ आनंदीबाईनें सखारामबापू यांस लिहिलेलें पत्र.—१९ नाना फडनविसांनीं असहाय्य आनंदीबाईबरोबर दीड वर्ष लढाई देऊन तिला कैद केलें, व आपला पुरुषार्थ जगजाहीर केला.—२० गंगाबाई, पार्वतीबाई गोपिकाबाई, व आनंदीबाई, या चार स्त्रियांच्या निरनिराळ्या प्रसंगांतील चित्रांना नाना फडनविसांच्या कुटिल स्वभावाची काळीकुट्ट पार्श्वभूमिका.

१. तोतयाच्या बंडाचा निकाल आपणाला जसा पाहिजे तसा नाना फडनविस यांनीं आपल्या बुद्धिचातुर्यानें लावून घेतला हें मागील प्रकरणांत आलेंच आहे. खऱ्या सदाशिवरावभाऊंच्या जागीं बाजी गोविंद नांवाच्या तोतयाला आणून उभें केलें व सर्वांच्या डोळ्यांत धूळ फेंकून नानांनीं आपलें कारस्थान यशस्वी केलें आणि बारभाईंच्या तोंडाला माखलें जाणारें काजळ त्यांनीं स्वतःच्या हिमतीवर लागूं दिलें नाहीं ही नानांच्या अफाट कीर्तीची, त्यांच्या अधिकाराच्या प्रभावाची व त्यांच्या विशाल बुद्धिमत्तेची एक बाजू झाली. परंतु वाईट व निंद्य गोष्टींना झपाट्यानें अनंत तोंडें फुटत असतात व तीं बंद करणें एखाद्या असामान्य बुद्धिमत्तेच्या माणसालाही कसें अशक्य होतें हें या प्रकरणापासून पहाणें आहे.

२. राघोबादादा पुतण्याचा खून करणारे आहेत, म्हणून ते राज्य करण्याला अपात्र आहेत असें ठरवून, सर्वांनुमतें सखारामबापूंना मुख्यत्व देऊन, बारभाईंच्या कारस्थानाची स्थापना झाली. कोणतेंही कारस्थान करावयाचें म्हणजे

त्याला पैशाचें पाठबळ पाहिजे. म्हणून बारभाईंनीं पुण्यातील " अवघ्या सावकारांस बलावून नेलें होतें. त्यांस धीर भरंवसा दिला. त्यांनीं सखारामबापूंचे नांवचीं खतें घ्यावीं व लागेल तितका पैका द्यावा असें कबूल ' केलें " सखारामबापूंच्या सहीचीं खतें पुण्याच्या सावकारांनीं घेतलीं व त्यांनीं बारभाईंच्या कारस्थानाला लागणारा पैसा पुरविला. नाना फडनविस यांच्यावर पुण्याच्या सावकारांचा विश्वास नव्हता. त्यांना सखारामबापूंचा विश्वास होता. म्हणूनच त्यांच्या एकट्याच्या नांवचीं खतें घेऊन ते मागतील तेवढा पैसा त्यांनीं दिला. पुण्याच्या सावकारांचा जर नानांवर विश्वास असतां, तर आपल्या पैशाला जास्त मजबुती येण्याकरतां त्यांनीं बापू व नाना अशा उभय कारभाऱ्यांच्या सहीनें खतें लिहून घेतलीं असतीं. परंतु तसें ज्याअर्थीं झालें नाहीं त्याअर्थीं पुण्याच्या सावकारांचा नानांवर विश्वास नव्हता, हेंच खरें ठरतें. सखारामबापूंवर ज्याप्रमाणें बारभाईंचा विश्वास होता, त्याचप्रमाणें सर्व सावकारांचा होता, म्हणूनच पेशव्यांच्या राज्याच्या मुख्य कारभारीपणाचा अधिकार बापूंना देण्यांत आला. हा अधिकार म्हणजे खुद्द पेशव्यांच्या वडीलकीचा अधिकार होता. ही जागा केवळ मानाची नव्हती. पेशव्यांच्या इभ्रतीची सर्व जबाबदारी या वेळीं मुख्यत्वेंकरून बापूंवर होती. सर्व सावकारांच्या कर्जफेडीचा बोजा या वेळीं बापूंच्या डोक्यावर होता. पेशव्यांच्या सर्व सरदारांना राज्यनियंत्रणाखालीं वागवून व पेशव्यांच्या शत्रूंना तोंड देऊन राज्यशकट चालविण्याचा सर्व भार प्रामुख्यानें बापूंच्या डोक्यावर होता. या सर्व गोष्टींची जबाबदारी ओळखून मुख्य कारभारी व दुय्यम कारभारी यांच्या अधिकारांची सीमा-मर्यादा ठरविण्यांत आली होती; व त्याच्याच पायावर बारभाईंच्या कारस्थानाची इमारत उभारण्यांत येत होती. उभय कारभाऱ्यांच्या अधिकारासंबंधानें खालीलप्रमाणें योजना झाली होती.

३. पेशवाईंत, पूर्वीं पेशवे सरकारच्या मालकीचा पैसा, इनाम, देणगी, जहागीर वगैरे स्थावर अगर जंगम मिळकत, कोणाला कांहीं देणें झाल्यास,

१. ऐ. ले. सं. पान २११५.

त्यासंबंधीं एक कागद तयार होत असे. त्याला ' देणें यादी ' ह्मणत असत. या यादीवर मालकानें ह्मणजे पेशव्यानें ' द्यावें ' असा शेरा करावा व नंतर त्याच्यावर कारभाऱ्यानें ' देवावें ' असा शेरा करावा असा प्रघात असे. बारभाईंनीं गंगाबाईची स्थापना केल्यापासून सखारामबापूकडे ' वडीलकी ' चा (the power of veto चा) ह्मणजे पर्यायानें मालकाचा दर्जा गेला. ' अखत्यारी ' चें (the power of executive चें) ह्मणजे कारभाऱ्याचें काम नानांकडे आलें. प्रत्येक ' देणें ' या यादीवर बापूंचा ' द्यावें ' असा शेरा व्हावा लागे. त्यामुळें पेशव्यांच्या तिजोरीवर बापूंचा ताबा बसला. पेशव्यांच्या कोणत्याही मालमत्तेची विल्हेवाट बापूंच्या सहीखेरीज होईनाशी झाली. सखारामबापू हे जर पेशव्यांच्या राज्याकरतां काढलेल्या कर्जाला जबाबदार होते, तर त्यांच्या तिजोरीवरही त्यांचें नियंत्रण असणें योग्यच होतें. या वेळीं बापूंचा अधिकार ह्मणजे खुद्द पेशव्यांचा अधिकार असल्यामुळें त्यांना प्रत्येक ' देणें ' या यादीवर पेशव्यांच्या पूर्वपरिपाठाप्रमाणें व राज्याच्या हिताच्या दृष्टीनें आणि निःपक्षपातानें ' द्यावें ' असा शेरा स्वतःची जबाबदारी ओळखून द्यावा लागे. नानांवर ही जबाबदारी नव्हती. बापूंचा ' द्यावें ' हा शेरा झाल्यावर ' देवावें ' असा शेरा मारून कामाची अंमलबजावणी करून चांगलेपणा नानांना पदोपदीं घेतां येई. पण ' द्यावें ' असा शेरा बापूंनीं दिला नाहीं, ह्मणजे ते केवळ वाईटाचे धनी मात्र होत असत. बापूंनीं ' द्यावें, असा शेरा मारल्यानंतर नानांच्या मनांत द्यावें असें जर नसेल, तर मात्र ते तें प्रकरण आपल्या अधिकारांत वाटेल तितके दिवस रेंगाळत टाकूं शकत होते, हें अधिकाराच्या फाळणीवरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

४. वरीलप्रमाणें राज्यकारभाराची फाळणी असल्यामुळें नाना फडनविस यांची स्वतःची व त्यांच्या लगामीं असलेल्या त्यांच्या पक्षांतील लोकांची कुचंबणा होऊं लागली. नाना हे फार धोरणी असल्यामुळें ते जरी बारभाईंच्या कारस्थानांत होते, तरी त्यांचें स्वतःचे धोरण निःसंशय निराळें होतें. राघोबादादांच्या सामर्थ्यवान पक्षाचे पंख तोडून त्यांना दुर्बल करण्यांत त्यांनीं जी बुद्धिमत्ता

व जी भेदनीति उपयोगांत आणली, तीच त्यांनीं बारभाईंनाही नष्ट करून आपण एकटेच पेशवाईचे धनी व्हावें, या आपल्या उद्दिष्टाकरतां खर्च केली. राज्याचा कारभार, त्याचें रक्षण किंवा त्याची कीर्ति हीं सर्वस्वी सैन्यबळावर आहे असा नानांचा सिद्धांत होता. त्यामुळें फौजबंद सरदार ते नेहमीं आपल्या लगामीं ठेवीत. पेशव्यांची बहुतेक फौज हरिपंत फडके व परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या आधिपत्याखालीं होती व हे उभयतां नानांच्या संपूर्णपणें लगामीं असल्यामुळें पर्यायानें ती नानांच्याच ताब्यांत होती. सातारा, रायगड, प्रतापगड, लोहगड व पुरंदर हे बळकट किल्लेही नानांच्याच ताब्यांत होते. "देवावें" यावर कलमबहादुरी करून निजाम, भोंसले व गायकवाड यांच्या बाबतींत नानांनीं चांगलेपणा मिळवून त्यांनाही आपल्या लगामीं आणलें होतें. पूर्वींपासून शिंदे व होळकर हे नानांच्या उपकाराच्या ओझ्याखालीं सांपडलेले होतेच. त्यांना आपल्या लगामीं ठेवण्याकरतां नानांच्या जवळ नाना प्रकारचे नवे नवे खेळ होते.

५. नानांचें धोरण कशा प्रकारचें आहे हें समजण्याइतके सखारामबापूही शहाणे होते. नानांच्या लगामीं सर्व सैन्य व सरदार आहेत हें ते जाणून असल्यामुळें त्यांचें नाक नेहमीं आपल्या हातीं असावें असें धोरण ठेऊन ते राज्यकारभार करीत होते. यामुळें कित्येक प्रसंगीं नानांना प्रिय व हितावह असलेली बाब बापूंना अनिष्ट वाटे, म्हणूनच ते 'देणे'च्या यादीवर 'द्यावें' असा शेरा मारीत नसत अगर तसें करणेस दिरंगाई करीत असत. अर्थात् बापूंचें हें करणें नानांना अनिष्ट वाटे. कारभारांत सखारामबापू असल्यामुळें नानांना एकतंत्री कारभार करावयास मिळत नव्हता. तो करतां यावा म्हणून नानांचे प्रयत्न सुरू झाले होते. 'देणे यादी' वर 'द्यावें' असा शेरा मारण्याचा अधिकार मालकाचा असे. या वेळीं सखारामबापूंना हा अधिकार मिळाला होता म्हणून ते मालक मात्र बनलेले नव्हते. नानाप्रमाणें तेही एक कारभारीच, अशी पेशव्यांच्या राज्यांतील प्रजेची भावना होती. सखारामबापूही आपणाला गादीचे चाकरच समजत होते. सवाईमाधवराव लहान आहेत तोंपर्यंत त्यांच्या जागीं सखारामबापूंना काम करावयाचें होतें, अशी सर्वांची भावना होती. गंगाबाईंचा

बारभाईच्या कारभारांत जरी प्रत्यक्ष हात नव्हता, तरी त्या मालक आहेत, धनी आहेत, ही जाणीव प्रत्येकाला होती. धन्याच्या विरुद्ध कांहीं बोलावयाचें नाहीं, त्याची आज्ञा मानावयाची, हें नैतिक दडपण जुन्या मुत्सद्यांच्याही मनावर होतेंच. 'देणें यादी' वर बापूंची ताबडतोब 'द्यावें' म्हणून सही होणार नाहीं असें नानांना ज्या वेळीं वाटे, त्या वेळीं आपल्या स्वतःच्या पक्षाला इष्ट व जरूरीची अशी ती यादी असेल तर तिची ताबडतोब अंमलबजावणी होणे-करतां, केवळ स्वतःच्या अधिकारांतील 'देवावें' या शेऱ्यानें काम चालावें, याला नानांच्या जवळ एकच तोड होती. सखारामबापूंचें तोंड बंद करावयास गंगा-बाईचें बुजगावणें पुढें करणें ही एकच रामबाण मात्रा नानांच्या जवळ होती. पुरंदर किल्ला नानांच्या ताब्यांत होता. त्यामुळें तेथील किल्लेदार व सर्व बंदो-बस्त नानांच्याच तंत्रानें चालत होता. सवाईमाधवराव व गंगाबाई या पर्यायानें नानांच्याच ताब्यांत होत्या. तेव्हां गंगाबाई या मनानें नानांच्या मुठींत आल्या म्हणजे सखारामबापूंचें अस्तित्व आपोआप नाहींसें होतें ही गुरुकिल्ली नानांना अवगत होती. गंगाबाई ही वयानें तरुण. पेशव्यांची मातोश्री म्हणून ऐश्वर्यांत तिची कालक्रमणा होत होती. बापू व नाना यांच्यांत कांहीं बेबनाव आल्यास त्यांनींच उभयतांत समजून काढावयाची होती. अशा स्थितींत नेहमींच गंगा-बाईनीं नानांचा पक्ष धरावा व बापूंचें ऐकूं नये अशी योजना नानांना करणें प्राप्त होतें. कारण स्त्रियांचा स्वभाव म्हणजे आज इकडे तर उद्यां तिकडे होणेचा असतो. तेव्हां आपल्याला इष्ट असलेलें भरींव राजकारण साधावयाला एकच दृष्टि राहील अशी तरतूद करण्यास गंगाबाईला मनानें वश करून घेणें हा एकच मार्ग राजकारणांतील डाव खेळणाऱ्या नानांच्या जवळ होता. राज-कारणाचे डाव साधण्याकरतां वाटेल तेवढी नीतिमत्तेची उधळपट्टी करण्यांत नाना तत्पर होते. नानांनीं वशीकरण विद्येचा मंत्र गंगाबाईवर फुंकला व तिला कायमची आपल्या पंजांत घेतली.

६. खुद्द पेशव्यांची मातोश्री नाना फडनविसांशीं आत्मसात् झाल्यामुळें त्यांच्या राजकारणाला दिवसेंदिवस पक्का रंग चढूं लागला. नाना कित्येक

'देणें' याद्यांची, बापूंचा 'द्यावें' हा शेरा त्यावर न घेतां केवळ आपल्या 'देवावें' या शेऱ्यावरच अंमलबजावणी करून त्या निकालांत आणूं लागले. ही गोष्ट बापूंच्या लक्षांत आली. 'ते जळफळूं लागले कीं, 'देवावें' या शेऱ्यावर जर लोकांचीं कामें चालूं लागलीं तर 'द्यावें' करून घेण्यासाठीं आम्हांकडे कोण येणार ! आणि असें जाहल्यावर मग आमची 'वडीलकी' ती कसली[1] !' नाना सर्व बाजूंनीं बलिष्ठ झाले होते. त्यांनीं आपल्या अधिकाराचें अतिक्रमण चालविलें होतें ह्मणून ते जरी गुन्हेगार होते, तरी त्यांना शासन करण्याचें सामर्थ्य सखारामबापूंमध्यें नव्हतें; ह्मणून ते जळफळत होते. नानांनीं 'देवावें' या शेऱ्यावर कामें चालविल्यामुळें बापूंचा पेशव्यांच्या तिजोरीवरील ताबा नष्ट झाला. ही बातमी पुण्याच्या सावकारांना समजली तेव्हां ते घाबरून गेले. पुण्याच्या सावकारांनीं बापूंच्या सहींवर वाटेल तेवढ्या रकमा कर्जाऊ दिल्या होत्या. पेशव्यांच्या तिजोरीवरील बापूंचा ताबा नाना अशा प्रकारानें हिरावून घेत आहेत तेव्हां आपल्या पैशाचें पुढें काय होईल या भीतीनें त्या सावकारांना नानांची चीड आली. कर्ज घेतलेला पैसा पुन्हां समाधानानें परत करण्याची नानांना संवय नाहीं हें पुण्याच्या सावकारांना माहीत होतें. यामुळें नानांच्या हातून आपला पैसा परत मिळणार नाहीं ह्मणून त्यांना नानांची चीड आली व ते त्यांचें पारिपत्य करण्याच्या उद्योगाला लागले. नानांचें उघड रीतीनें पारिपत्य करणें पुण्याच्या सावकार लोकांना शक्य नव्हतें. हे सावकार म्हणजे पुण्याचीं जरी मोठमोठीं वजनदार माणसें होती तरी नानांच्या विशाल सामर्थ्यापुढें त्यांचें कांहींच चालण्यासारखें नव्हतें. म्हणून त्यांनीं नानांस मारून टाकण्याचा कट निर्माण केला. त्यांनीं कांहीं गारद्यांना वश केलें व त्यांच्या करवीं नानांना मारण्याची तयारी केली. परंतु या कटाची नानांना त्यांच्या गुप्त हेरांकडून माहिती मिळाल्यामुळें ते सावध झाले व कटवाल्यांचा हा बेत फसला. "आपल्या[2] जीवित्वाचा बचाव होईल इतक्या बेताचा त्यांनीं गारद्यांचें पारिपत्य करून बंदोबस्त मात्र केला, पण हें कृत्य गारद्यांकडून कोणीं करविलें याचा सुगावा लागला असूनही त्यांस प्रसिद्धपणें चौकशी करतां येईना ! याचें कारण शिवाजीपंत असें लिहितो कीं,

---

१ अधिकारयोग पान ५३. २ अधिकारयोग पान ५४.

हें कर्म कोणी करविलें याचें ' ठिकाण लावावें, चौकशी करावी, तेव्हां त्याचा बंदोबस्त ज्यांनीं करविलें त्यासुद्धां करावा तेव्हां ठीक! ती गोष्ट या प्रसंगीं करितां येत नाहीं याकरतां बंदोबस्त मात्र करून तसाच मजकूर ठेविला आहे.' शिवाय मारेकरी घालणारांचीं नांवें कागदोपत्रीं लिहितां येत नाहींत, असें कळवून तो एवढा मात्र इशारा देतो कीं, ' या खेळांत बहुतेक ' दामोदर ' मंडळीच आहेत. " ही गोष्ट इ. स. १७७७ च्या जून महिन्यांत[1] घडून आली.

७. पटवर्धनांचा पुण्यांतील कारकून शिवाजीपंत हा वरील माहिती देतो. त्याला सुद्धां हें कृत्य कोणीं करविलें याची माहिती लागली. पण तो कागदोपत्रीं नांव लिहिणें धोक्याचें ह्मणून ' दामोदर मंडळी ' एवढेंच सांकेतिक लिहितो. दाम ह्मणजे पैसा व दामोदर ह्मणजे पैसेवाले. अर्थात् सराफ-सावकार असाच ' दामोदर मंडळी ' या सांकेतिक शब्दांचा अर्थ होतो. शिवाजीपंतानें आपल्या पत्रांत सांकेतिक भाषेंत कां होईना, बराचसा खुलासा केला आहे. तो लिहितो ' हें कर्म कोणीं करविलें याचें ठिकाण लावावें, चौकशी करावी, तेव्हां त्याचा बंदोबस्त ज्यांनीं करविलें त्यांसुद्धां करावा तेव्हां ठीक! ती गोष्ट या प्रसंगीं करतां येत नाहीं............या खेळांत बहुतेक ' दामोदर ' मंडळीच आहेत.' यावरून नानांना मारण्याचा कट पुण्याच्या सावकार लोकांनीं केला व त्यांना पाठबळ अशा व्यक्तीचें होतें कीं या वेळीं त्याचें पारिपत्य करणें नानांना शक्य नव्हतें. पुण्याच्या सावकार लोकांच्या कर्जाला सखारामबापू जबाबदार होते. अर्थात् बापूंचेंच पाठबळ सावकार लोकांना होतें. सखारामबापू हे या वेळीं मुख्य कारभारी असल्यामुळें नानांना त्यांचें ताबडतोब पारिपत्य करतां येण्यासारखें नव्हतें. यावरून इतिहासाच्या संगतीनें पहातां नानांना मारण्याच्या कटांत सखारामबापू होते असें ठरतें; तथापि त्यांचें नांव पत्रांतून लिहावयाला शिवाजीपंत भ्याले असले पाहिजेत यांत संशय नाहीं.

---

१. ऐ. ले. सं. पान २९५४.

'घावें' व 'देवावें' या प्रकरणाची मजल नानांचा खून करावा येथपर्यंत सखारामबापूंसह पुण्याच्या सावकार लोकांवर यावी यांतही कांहीं अंदरकी बात असावी असें अनुमान निघतें.

८. पटवर्धन सरदार हे नानांच्या खासगी पक्षापैकीं होते. शिवाजीपंत हा पटवर्धनांचा विश्वासू कारकून असल्यामुळें नानांकडील महत्वाच्या व गुप्त गोष्टी त्यांच्याच करवीं पटवर्धनांना समजत होत्या. अर्थात् नानांवर मारेकरी घालणारांचीं नांवें व त्यांतील मुख्य सूत्रधाराचें नांव नानांकडूनच त्यांना समजलें असले पाहिजे. शिवाय या कटांतील त्यांच्या नायकासुद्धां लोकांचें पारिपत्य, या प्रसंगीं करतां येत नाहीं, हाही खासगी स्वरूपाचा मनसुबा, नानांनींच त्यांना सांगितला असला पाहिजे. ह्मणूनच त्यांनीं त्या प्रमाणें पटवर्धनांना कळविलें. असें असतां या वेळेपासून नानांचा अंत होईपर्यंत सुमारें २३ वर्षांचा काळ लोटला. नारायणरावांचा वध करणारे आरोपी सुमेरसिंग वगैरे होते. त्यांना सुद्धां कित्येक वर्षांनीं धरून त्यांना शासन केलें. अपराध्यांना सांपडतील त्या वेळीं कडक शासन करण्याचा असा नानांचा स्वभावधर्म असतां, प्रत्यक्ष त्यांच्या जिवावर, ह्मणजे त्या काळीं समजल्या जाणाऱ्या पेशवाईच्या आत्म्यावर, खुनाचा प्रसंग आला असतां व तो करविणाऱ्या गुप्त कटांतील माणसांच्या नांवांचा पत्तामुद्दा लागला असतां, त्या प्रसंगीं त्या मंडळीचें पारिपत्य करतां येण्यासारखें नव्हतें, या सबबीवर त्याची चौकशी करून पारिपत्य करणें त्यांनीं लांबणीवर टाकलें. परंतु नानांच्या पुढील २३ वर्षांच्या कालांत नानांना जसा अनुकूल काळ आला पाहिजे होता तसा थोड्या दिवसांत तो आला असतांही त्यांनीं आपला खून करण्यास प्रवृत्त झालेल्या गुन्हेगारांची चौकशी केली नाहीं, किंवा त्यांना शासन केल्याचें इतिहासांत, कागदोपत्रीं अगर इतर कोठेंही नमूद नाहीं. तशी चौकशी होऊन त्यासंबंधीं एकाद्या बड्या मुत्सद्याला अगर त्याच्या कटांतील लोकांना शासन झालें असतें तर ही महत्वाची गोष्ट कोठेंच दडून राहिली नसती. परंतु ज्याअर्थीं पुढें त्याचा कोठेंच

कांहीं थांग लागत नाहीं, त्याअर्थी या कटाबद्दल पुढें केव्हांच चौकशी झाली नाहीं, व गुन्हेगारांचा पत्तामुद्दा व नांवें समजलीं असूनही त्यांचें पारिपत्य नानांनीं केलें नाहीं हेंच सिद्ध होतें. यावरून नानांनीं आपल्या स्वतःचा खून करविणाऱ्या गुन्हेगारांसंबंधीं 'तेरी चुप मेरी चुप' असें वर्तन कां केलें यांतही एका गुप्त रहस्याचें मर्म असावें असें ठरतें.

९. बारभाईंचें कारस्थान निर्माण करण्यांत नाना हे सूत्रधार होते. माधवराव पेशव्यांपासून त्यांनीं पेशवाईचा कारभार केला होता. त्यांच्याच करामतीनें तोतयाचें बंड मोडलें. त्यांच्याच सहकार्यानें राघोबादादा देशोधडीला लागले. त्यांच्याच बुद्धिचातुर्यानें शिंदे, होळकर, भोंसले, गायकवाड वगैरे सरदार बारभाईंच्या लगामी राहिले. त्यांच्याचमुळें निजामाचें सख्य टिकून बारभाईंचें अस्तित्व राहिलें. त्यांच्या पुण्याईच्या बळावर गंगाबाईंना पुत्र झाला व त्यामुळें बारभाईंच्या कारस्थानाचें बंडाचें स्वरूप जाऊन न्यायाचें पाठबळ मिळालें. आणि या सर्व गोष्टी नाना फडनविस होते म्हणून झाल्या, असें त्या वेळीं आबालवृद्धांस वाटत होतें. शिवाय पेशवाईच्या राज्यावर अद्यापि अनंत संकटें उपस्थित झालेलीं आहेत व पुढेंही पुष्कळ येणारीं आहेत, तेव्हां नानांची जरूरी अशा बिकट प्रसंगीं किती आहे, हें समजण्याइतके शहाणे लोकही त्या वेळीं पुण्यांत होते. नारायणराव पेशव्यांचा खून राघोबादादांनीं केला, याबद्दल त्यांना काय प्रायश्चित्त मिळालें ही गोष्ट त्यावेळीं अगदीं ताजी होती. नारायणराव कर्तबगार नव्हते, ते कित्येकांच्या अनादराला पात्र झाले होते, ते मेल्यानें पेशव्यांचें राज्य बुडण्यासारखें नव्हतें. असें असूनही त्यांच्या खुनामुळें चिडून जाऊन बारभाईंनीं राजक्रांति घडवून आणली. असें असतां नानासारख्या मुत्सद्यांच्या मेरुमण्यावर, किंबहुना पेशव्यांच्या राज्याच्या कलिजावर—त्याची प्रत्येक क्षणाला जरूरी भासत असतां साक्षात् पुण्यांत सखारामबापूसारख्या वयोवृद्ध, तपोवृद्ध, धर्मभीरू व पापभीरू मुत्सद्यांच्या नेतृत्वाखालीं बहुतेक 'दामोदर' मंडळी नानांना मारण्याचा कट करतात याचा अर्थ काय ?

नानांचा अधिकार मिळविण्याकरतां मोरोबादादा, चिंतो विठ्ठल किंवा बजाबा पुरंदरे यांनीं हा कट केला म्हणावें, तर त्यांना उजेडांत आणून त्यांचें पारिपत्य करणें नानांच्या हातचा मळ होता. ज्यांच्या कर्तबगारीवर तोतयाचें बंड नामशेष झालें, रामचंद्र नाईक, व्यंकटराव घोरपडे, नारो शंकरसारखे जबरदस्त सरदारही धुळीला मिळाले त्यांच्यापुढें या लुंग्यासुंग्या मुत्सद्यांची काय कथा होती ? असें असतां नानांनीं हें खून करण्याच्या कटाचें प्रकरण आंतल्या आंत कां दाबून ठेवलें ? आणि धर्मभीरू व पापभीरू अशी 'दामोदर' मंडळी खुनासारखें निंद्य कृत्य करण्यास व त्यांतून नानांच्या–एका ब्राम्हणाच्या–हत्येचें पातक डोक्यावर घेण्यास कशी व कां प्रवृत्त झाली ? याचें उत्तर एकच आहे. ब्रम्हहत्येच्या पातकापेक्षां नाना करीत असलेलें पाप अव्वल दर्जाचें आहे, याची खात्री लोकांना पटल्याशिवाय नानांचा खून करण्याचा कट पुण्यांत झालेला नाहीं. शिवाय या खुनाच्या कटाची जास्त चौकशी केल्यास आपलें पाप चव्हाट्यावर येईल या भीतीनें नानांनीं आरोपींचा पत्ता मुद्दाम लागूनही त्यांची चौकशी केली नाहीं हेंच उघड ठरतें. पेशव्यांच्या राज्याची धनीण, मराठ्यांच्या प्रजाजनांची माता जी गंगाबाई, तिच्याबरोबर नानांनीं व्यभिचार करणें हें ब्रम्हहत्येच्या पातकापेक्षां सहस्रपटीनें अधिक आहे, असें भावनाप्रधान प्रजेला वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. म्हणूनच नानांचा खून करण्याचा प्रयत्न 'दामोदर' मंडळींनीं केला असें ठाम अनुमान निघतें.

१०. नाना फडनविस यांचा खून करण्याचा प्रयत्न झाल्यापासून एकच महिन्यांत, म्हणजे तारीख १२ जुलै सन १७७७ रोजीं, सवाईमाधवरावांच्या मातोश्री श्रीमंत गंगाबाई यांस 'एकाएकींच परवां सप्तमी मंदवारीं देवाज्ञा'[1] झाली! दीड प्रहर दिवसास त्यांचें देहावसान झालें. त्यांचें दहन पुरंदर किल्ल्यावर झालें. त्या वेळीं नाना पुण्यास होते. त्यांनीं गंगाबाईच्या दहनप्रसंगीं पुरंदरास जाण्याची तसदी घेतली नाहीं. गंगाबाई

---

१. ऐ. ले. सं. पान २९६९.

एकाएकीं कां मृत्यू पावल्या हें पहाण्यासाठीं वरील बातमी समजतांच पाण्याचा एक घोंटही न घेतां त्यांना पुरंदरावर जाणें प्राप्त होतें. तथापि त्यांनीं तसें केलें नाहीं. गंगाबाईच्या मृत्यूबद्दल आपल्या मनांत कोणत्याही प्रकारची खळबळ उडूं न देतां किंवा गंगाबाईच्या जीवितावद्दल सर्वस्वी आपणावर जोखम व जबाबदारी आहे याची काळजी व तांतडी न दाखवितां, पुरंदरावर त्यांचें दहन वगैरे पार पडल्यानंतर, व तेथील दुःखाचें वातावरण शांत झाल्यानंतर, चार दिवसांनीं म्हणजे ता. १६ जुलै रोजीं, नाना फडनविस यांची स्वारी पुरंदरास जाण्याकरतां पुण्याहून निघाली. गंगाबाईंना नानांनीं शनिवारवाड्यांतून गर्दी करून जें एकदां बाहेर काढलें व पुरंदर किल्लयावर डांबून टाकलें, त्यानंतर त्यांना पुण्याच्या शनिवार वाड्याचें पुनर्दर्शन नानांनीं घडूं दिलें नाहीं. नानांच्या मगरमिठींत गंगाबाई जी एकदां सांपडली, ती कोणत्याही मानवी शक्तीला सोडवून नेतां येण्यासारखी नव्हती; म्हणून नाना पुण्यास आहेत अशी संधि पाहून मृत्यूनें गंगाबाईंची नानांच्या यमपाशांतून शनिवारींच मुक्तता केली व इहलोकच्या शनिवारवाड्याच्या पुनर्दर्शनापेक्षां तिला कैलासाचें दर्शन करून दिलें! बिचाऱ्या मृत्यूला शेवटीं गंगाबाईंची दया आली म्हणून ती अब्रूनें वांचली. नाहीं तर तिच्यावर नाना फडनविसांच्या संगतीनें आणखी कोणते कोणते प्रसंग गुदरले असते याची कल्पनाच न करणें बरें!

११. गंगाबाईंच्या मृत्यूसंबंधानें मराठी इतिहासकार तिला नवज्वर झाला होता असें म्हणतात. ती जर नवज्वरानें आजारी होती, व ही बातमी नानांना जर पुण्याला समजली होती, तर सर्व कामें तेथच्या तेथें तहकूब ठेऊन त्यांनीं पुरंदरास जाणें त्यांचें आद्य कर्तव्य होतें. पुण्यास नाना आजारी नव्हते. पूर्ण निरोगी स्थितींत होते. त्यांना पुरंदरची डाक प्रत्येक प्रहराला येत होती. शिवाय गंगाबाई ही कोणी सामान्य स्त्री नव्हती. ती पेशव्यांची मातोश्री—राज्याची धनीण होती. तिचें नवज्वराचें आजारीपण झांकून राहणारें नव्हतें. ती ज्वर आल्यापासून जर खरोखर आठव्या

दिवशीं मृत्यू पावली असती, तर तिला तारीख ५ जुलै रोजीं ज्वर आला पाहिजे होता. पुण्याहून नानांनीं पटवर्धनांचा कारकून शिवाजी बाबाजी यास पुरंदरास पाठविलें होतें. तो तारीख ५ रोजीं पुरंदरास होता. तारीख ६ रोजीं तो पुरंदराहून निघून रात्रौ पुण्यास आला. अर्थात् त्याला तारीख ६ चीही पुरंदरची हकीकत माहीत होती. शिवाजीपंतांच्या पत्रांतून गंगाबाई व सवाईमाधवराव यांचें कुशल पटवर्धनानां वेळोवेळीं समजत होतें. पुरंदरावर गेल्यानंतर ते गंगाबाईंची विचारपूस केल्याशिवाय राहिले नसते. निदान गंगाबाई या ज्वरानें आजारी असल्याबद्दल त्यांना खात्रीनें समजलें असतें व तसा त्यांनीं आपल्या ता. ५ [1] व ७ च्या [2] पत्रांत उल्लेखही केला असता. परंतु त्या पत्रांतून तसा कोठेंच उल्लेख नाहीं. यावरून गंगाबाई त्या वेळीं तरी आजारी नव्हत्या असेंच ठरतें. गंगाबाई एकाएकीं मेल्या हीच शिवाजीपंतांची गोष्ट सत्य ठरते. गंगाबाईंना नवज्वर झाला ही गोष्ट मागाहून उठविलेली आहे, व ती केवळ सारवासारव करण्याच्या दृष्टीनें उठविलेली आहे असें स्पष्ट दिसतें. दुसरी गोष्ट म्हणजे गंगाबाई व नाना फडनविस यांच्या निंद्य संबंधाविषयीं बहुतेक मराठी इतिहासकारांनीं मुग्धता स्वीकारली आहे. बरोबरच आहे कीं, ' आपलेच दांत आणि आपलेच ओंठ ' ! परंतु केवळ मुग्धता स्वीकारली म्हणून त्यायोगें नानांच्या पक्षाचें समर्थन होत नाहीं. उलट ती त्या पक्षाला बाधकच ठरते.

१२. आतां येथें इंग्रजी इतिहासकार काय ह्मणतात हें पहाणें जरूर आहे. पोपनें मराठयांचा इतिहास लिहिला आहे. त्यांत तो लिहितो, " Ganga Bai the mother of Peshwa, poisoned herself about this time, (in A. D. 1777) under circumstances which are fatal to the good name of Nana Farnavis.[3] " या वेळीं पेशव्यांची आई गंगाबाई हिनें विष खाऊन प्राण दिला. याची

१. ऐ. ले. सं. पान २९६२. २. ऐ. ले. सं. पान २९६४.

3 Pope's History of Maharatta page 202.

कारणमीमांसा पाहूं जातां नाना फडनविसांच्या कीर्तीला काळिमा लागल्याशिवाय राहत नाहीं. डफसाहेब आपल्या इतिहासांत गंगाबाई व नाना फडनविस यांच्या संबंधीं खालील प्रमाणें माहिती देतात. "नाना[1] फडनविसांनीं ज्या एका गोष्टीचा आपल्या महत्वाकांक्षेस उपयोग करून घेतला होता, ती गोष्ट पुष्कळांस माहीत नव्हती. ती हीच कीं, गंगाबाईचें मन नानांनीं स्वाधीन करून घेतलें होतें. ती तरुण विधवा नानाविषयीं फारच आतुर झाली होती, हें एक त्या वेळचें अत्यंत गूढ रहस्य होतें. त्या थेरड्या कारभाऱ्यास (सखारामबापू) वश्यविण्यास उत्तम उपाय कोणते हें नानांनींच गंगाबाईस शिकविलें होतें." "गंगाबाईस तिच्याच हातें मृत्यू आला, या गोष्टीच्या खरेपणाविषयीं त्या वेळच्या मुंबईच्या गव्हर्नरानें कांहीं शंका प्रदर्शित केली आहे. पण ती गोष्ट अगदीं खरी होती. गंगाबाईनें नाना फडनविसांशीं जारकर्म केलें व त्याचा परिणाम (गर्भ) लपवावा ह्मणून तिनें औषध घेतलें होतें. त्या औषधापासून तिला मृत्यू आला." मेजर म्याकडोनेल्ड यांनीं आपल्या 'नानांच्या बखरीं'त पुढीलप्रमाणें लिहिलें आहे. "नाना गंगाबाईशीं आसक्त होते असें जें लौकिकांत प्रसिद्ध आहे त्यास हें सबळ कारण[2] आहे."

१३. वरील उताऱ्यांवरून नानांचा खून करविण्याचा प्रयत्न करण्याइतका द्वेष व संताप पुण्याच्या 'दामोदर' मंडळीला कां आला व त्या मंडळींची नांवें व पत्तामुद्दा मिळूनही त्यांची नानांना उघड चौकशी कां करतां आली नाहीं, याचें मर्मही ध्यानांत येईल. वरील उतारे पहातां प्रत्येक इतिहासकाराची विचारसरणी भिन्न आहे; पण त्यांची मांडणी भिन्न असली तरी तत्वांत एकवाक्यता आहे. एक ह्मणतो गंगाबाई नानावर आसक्त होती, तर दुसरा ह्मणतो नानाच गंगाबाईवर आसक्त होते. कोणीही कोणावर आसक्त झालें तरी पेशव्यांच्या राज्याच्या धनिणीबरोबर-मात-

---

१ खरेशास्त्रीकृत नाना फडनविस यांचें चरित्र आवृत्ति ३ री पान १११.

२ मेजर म्याकडोनेल्ड यांची 'नानांची बखर' पान ३३.

समान असलेल्या मालकिणीबरोबर-जारकर्म केल्याच्या निंद्य गुन्ह्यांतून व महत्पापांतून नाना फडनविस निर्दोषी ह्मणून मुक्त होऊं शकत नाहींत. गंगाबाई ही तरुण विधवा होती, ह्मणून ती नानावर आसक्त झाली असें जरी गृहित धरून चाललें, तरी नाना हे कांहीं गद्धेपंचेविशीच्या अमदानींत नव्हते. ते चांगले पोक्त, पस्तीशीच्या घरांत होते. ते सर्व पेशव्यांच्या राज्याचा कारभार संभाळणारे, ज्ञानसंपन्न, अनुभवसंपन्न, चांगल्या वाईटांतील भेद समजणारे, दूरदर्शी, व्यवहारी असे शहाणे ते होते. गंगाबाईचें वय अवघें १७।१८ वर्षांचें होतें. ती अल्लड, विषयासक्त, अप्रबुद्ध, अविचारी असती व स्वयंस्फूर्तीनें जरी ती नानांवर आसक्त झाली असती, तरी आपल्या अंगच्या सौजन्यानें व शीलानें नानांना तिला सहज पापपराङ्मुख करतां आलें असतें. परंतु त्यांनीं ज्याअर्थी तसें केलें नाहीं, त्याअर्थी ते निःसंशय दोषीच आहेत. उलटपक्षीं पहातां सर्व साधारण मानानें कोणतीही स्त्री आपल्या वयाला, आपल्या सौंदर्याला व आपल्या गुणलक्षणांना अनुसरूनच एकाद्या पुरुषावर, समाजबंधन व धर्मबंधन तोडून आसक्त होऊं शकेल. नानांचें शरीर सुकलेलें, वाळलेलें, गालफडें बसलेलीं, छातीच्या हाडांचा सांपळा उठून दिसणारा, हास्य कधीं न दिसणारा आंबट व सुतकी चेहेरा! अशा हाडांच्या निव्वळ सांपळयावर कोणती सौंदर्यसंपन्न तरुणी आसक्त होऊं शकेल? या दृष्टीनें पहातां नानाच गंगाबाईचें तारुण्य व सौंदर्य पाहून तिच्यावर आसक्त झाले हें व्यवहार्य ठरतें. शिवाय याहीपेक्षां जास्त व्यवहार्य म्हणजे नाना हे फाजिल महत्वाकांक्षी होते; त्यांना सखारामबापूंचा अधिकार अल्पप्रयासानें बळकावयाचा होता, म्हणून हें राजकारण साधण्याकरतां एका असहाय्य गरीब गाईवर, एका अनाथ अबलेवर, बळजबरी करून व पेंचांत धरून त्यांनीं तिला वश करून घेतलें. 'विळा भोंपळा' नानांच्याच हातीं होता. बिचाऱ्या अल्पवयी गंगाबाईचा त्यांत कोणता दोष? सर्व दोषांना व गुन्ह्यांना नाना हे एकटेच जबाबदार आहेत.

१४. नाना फडनविस यांनीं गंगाबाईशीं व्यभिचार केला नाहीं, तिला ते मातेच्या किंवा कन्येच्या स्थानीं मानीत होते असें दाखविण्यास प्रत्यक्ष असा एकही पुरावा नाहीं. या बाबतींत नानांच्या वतीनें त्यांच्या समर्थनार्थ खरेशास्त्री पुढीलप्रमाणें पुरावा हजर करतात. पेशव्यांच्या घरांतील स्त्रियांविषयीं आपली किती पूज्यबुद्धि आहे हें नानांनींच प्रसंगवशात् एके ठिकाणीं लिहून ठेविलें आहे. कायगांवटोकें येथील थोरल्या बाजीरावांच्या श्राद्धाच्या दिवशींच्या भोजनाची हकीकत ते अशी देतात कीं,—" श्राद्धाचे[१] ब्राम्हण यांचीं भोजनें जाहलियावर खासा भोजनास बसले. एकीकडे श्री. माधवराव व एकीकडे मला बसविलें, आणि दुसरे स्वकिडून वाढविलें. तिला वाढण्याची शिक्षा दाखविली अर्थात् मातुश्रीकडून लेंकरास वाढविलें." खरेशास्त्र्यांनीं नानांची बाजू सांवरण्याकरतां हा जो पुरावा पुढें ठेवला तोही विचारांत घेणें योग्य आहे. खरेशास्त्री हे सरळ बुद्धीचे, सरळ नीतीचे व वाक्यांचा सरळ अर्थ लावणारे निःस्वार्थी खरेच शास्त्री होते. त्यांना डावपेंच माहीत नव्हते. नाना फडनविसांच्या बुद्धिमत्तेबद्दल व त्यांच्या कर्तबगारीबद्दल त्यांना अभिमान वाटत होता, हें त्यांनीं लिहिलेल्या नानांच्या चरित्रावरून सहज समजण्यासारखें आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, एका सरळ बुद्धीच्या खरेशास्त्र्यांच्या नशिबीं एका अट्टल पाताळयंत्री, पक्क्या कारस्थानी व निव्वळ स्वार्थी अशा पुरुषाचें चरित्र लिहिण्याचा प्रसंग आला. त्यामुळें त्यांची पदोपदीं दिशाभूल झाली. एकच वाक्य निरनिराळ्या व्यक्तींच्या तोंडून येऊं शकतें. परंतु त्यामुळें त्या वाक्याचा एकच अर्थ असूं शकेल असें मात्र नाहीं. कार्यकारणभाव व बोलणाऱ्या व्यक्तीचा स्वभाव ओळखूनच त्या वाक्याचा संदर्भानें अर्थ लावावा लागतो. नाना फडनविस असामान्य बुद्धिमत्तेचे, पक्के पाताळयंत्री, विलक्षण धोरणी व खंदे मुत्सद्दी होते, याबद्दल कोणाचेंच दुमत नाहीं. आतां एका सरळ सत्शील शास्त्र्यानें 'अर्थात् मातुश्रीकडून लेंकरास वाढविलें' असें ह्मटलें व तेंच वाक्य नानासारख्या पाताळयंत्र्यानें ह्मटलें तर त्याचे कसे

१. खरेकृत नाना फडनविस यांचें चरित्र पान ११३.

अर्थ होतात हें येथें दाखविणें भाग आहे. वरील वाक्य शास्त्रयानें ह्मटलें तर त्याचा सरळ अर्थ खरेशास्त्रयांनीं जो वर ध्वनित केला आहे तोच होतो. त्या वाक्यावरून पेशव्यांच्या बायका ह्मणजे मातेसमान वाटणें स्वाभाविक आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, तें वाक्य नानांच्या तोंडचें आहे. तेव्हां त्याच्या स्पष्टार्थावर अवलंबून राहतां येत नाहीं. त्यांतील गूढार्थाचाही ध्वनि ओळखला पाहिजे. नानासाहेब भोजनास बसले. एकीकडे श्री. माधवराव व एकीकडे नाना असे बसले. म्हणजे नानांस नारायणराव पेशव्यांच्या जागीं भोजनास बसविलें असा ध्वनि आहे. म्हणजे नानासाहेब पेशव्यांचे माधवरावांनंतर नानांनीं आपण त्यांचा मुलगा म्हणून वारसाहक्क दाखविला. दुसरे स्त्रीकडून वाढविलें. व तिला नानांनीं मातोश्री म्हटलें. या वेळीं गोपिकाबाईचा माधवराव हा वडील मुलगा ह्मणून तो नानासाहेबांच्या पश्चात् गादीचा मालक व त्यांचे पश्चात् दुसऱ्या बायकोचा वडील मुलगा, अर्थात् मानीव मुलगा नाना, हा मालक असा त्यांतील अर्थ निघतो. नारायणराव पेशव्यांचे जागीं नाना यांना मुलगा कल्पिल्यानंतर नारायणरावांची बायको गंगाबाई नानांची कोण होते, हें निराळें सांगणेची जरूरी नाहीं. नारायणरावांच्या गादीचे ते जसे मालक तसेंच त्यांच्या स्त्रीचेही ते मालक असाच पर्यायानें अर्थ निघतो.

१५. खरेशास्त्री नानांच्या नीतिमत्तेबद्दल कांहीं आधार देत नाहींत. नाना एकपत्नीव्रतानें वागणारे होते, त्यांना परस्त्री मातेसमान होती, त्यांचें आचरण शुद्ध होतें, ते जितेंद्रिय होते, वगैरे नानांच्या सदाचाराबद्दल त्यांचा कांहींच पुरावा नाहीं. उलट नानांचीच कबूली आहे कीं ते थोडे मोठे झाल्यावर 'दुर्विचारांचें' प्राबल्य त्यांच्या मनावर अतीशय होई. आणि प्रसंगविशेषीं तें इतकें जबर होई कीं, त्यापासून कधीं कधीं त्यांचा वर्तनक्रमही दूषित होत असे.' या नानांच्या स्वतःच्या कबूलीवरून त्यांचे मनोविकार त्यांच्या ताब्यांत राहत नव्हते अशी ते ग्वाही देतात. शिवाय घाशीराम कोतवालाची मुलगी ललितागौरी हिला आपलें प्रियपात्र म्हणून नानांनीं आपल्याच घरीं ठेऊन

१. देवकृत नाना फडनविस पान ५.

घेतलें होतें. हे सारे नानांच्या आचरणाबद्दल धडधडीत पुरावे असतां नानासाहेब पेशव्यांच्या कुटुंबाबद्दल त्यांनीं मातृस्थानाचा आदर दाखविला या पुराव्यावरून नानांनीं नारायणरावांच्या बायकोला मातोश्री समजल्याचें सिद्ध होत नाहीं. नाना शब्दाचे खरे होते असें म्हणावें, तर त्याला एकच आधार पुरेसा आहे. नारायणरावांचा वध झाल्यानंतर दहावे दिवशीं नदीवर तिळांजलीकरतां सर्व मंडळी जमली. 'त्या समयीं त्र्यंबकराव मामा पेठे, नाना फडनविस, सखारामबापू व हरिपंत फडके असे चौघे एकीकडे बसून, वाळवेचीं लिंगें करून, परस्परें चौघांच्या आणक्रिया लिंगावर हात ठेऊन झाल्या कीं, "नानासाहेब यांचा वंश चालवायाचा. त्या वंशाशिवाय कारभार चालवायाचा नाहीं. या वंशास (रघुनाथराव यांच्या वंशास) नमस्कार करावयाचा[1] नाहीं." अशी लिंगावर हात ठेऊन आणक्रिया झाली असतां, रघुनाथराव गादीवर बसले त्या वेळीं नानांनींच त्यांचा कारभार चालविला. त्यांना नमस्कारही केला. पुढें नानांनींच रघुनाथरावांचाच वंश शेवटचे बाजीराव यांस गादीवर बसवून त्यांचा कारभार चालविला व त्यांना नमस्कार केला. असे हे लिंगावर हात ठेऊन प्रत्यक्ष आणक्रिया करणारे नाना त्याच्या अगदीं विरुद्ध वागतात. अशा नीतिभ्रष्ट, दुष्ट, घातकी व कपटी नानांची नानासाहेबांच्या कुटुंबाला नानांनीं मातोश्री मानलें ह्मणून नारायणरावांच्या बायकोलाही ते मातोश्रीच मानीत असले पाहिजेत, अशी तरफदारी करण्याचें खरेशास्त्री धाडस करतात हें मोठें आश्चर्य आहे! नानांचें वर्तन शुद्ध दाखविण्याला त्यांचा हा पुरावा अगदीं फोल टरफलाप्रमाणें पोकळ-पुळचट आहे. नाना या बाबतींत पूर्ण दोषी, पूर्ण गुन्हेगार आहेत, हें आतां निराळें सिद्ध करून दाखविण्याची जरूरी नाहीं.

१६. राघोबादादांनीं पुतण्याचा खून करविला याबद्दल त्यांना शासन देण्याकरतां गंगाबाईंना हाताशीं धरून बारभाईनीं कारस्थान केलें. मारून मुटकून कां होईना, बारभाईंना गंगाबाई सहाय्यक झाल्या ह्मणून त्याचें प्रायश्चित्त नानांनीं त्यांना वर दाखविल्याप्रमाणें दिलें. हें एक पेशव्यांच्या घराण्यांतील एका स्त्रीचें

---

1 पेशव्यांची बखर आवृत्ति ५ वी पान ९५.

चित्र नानांनीं रंगविलें. दुसरी थोर स्त्री पार्वतीबाई. मोठी साध्वी व पतिव्रता. तिच्या पातिव्रत्याचें बक्षिस तोतयाच्या बंडांत दाखविल्याप्रमाणें खऱ्या सदाशिव-रावभाऊंना उपोषणें घालून त्यांना जिवें मारून दिलें, व बिचारीला नवऱ्या-करतां नानांनीं तळमळत ठेवलें. त्यामुळें ती झुरणीला लागून क्षयी बनली. हें थोर पेशव्यांच्या दुसऱ्या स्त्रीचें दुसरें चित्र नानांनीं रेंखाटलें. नानासाहेब पेशव्यांची पत्नी गोपिकाबाई हिला पहिल्यानें नानांनीं आपल्या पक्षांत ओढलें. भाऊबंदी तंट्याला तिच्याकडून नानांनीं तोंड फोंडलें व तिला गंगापूरचा मार्ग दाख-विला. नारायणरावांचे मरणानंतर ती गंगापूर येथील वाड्यांतून निघून, श्रीमंतीचे सर्व उपचार व वैभव टाकून देऊन, एका मठांत जाऊन राहिली व चार घरची भिक्षा आणून उदरनिर्वाह करूं लागली.[१] हें पेशव्यांच्या घराण्यांतील तिसऱ्या थोर स्त्रीचें चित्र नानांनीं काढलें. आतां राहून राहिली आनंदीबाई. तिचें चित्र नानांनीं कसें बनविलें हें येथें पाहणें जरूर आहे.

१७. मागें दर्शविल्याप्रमाणें राघोबादादांनीं आनंदीबाईंना धारच्या किल्यांत नेऊन ठेवलें, व तिच्या संरक्षणाची शक्य तेवढी तरतूद केली. हा किल्ला धारच्या पवारांच्या ताब्यांत होता. दादासाहेब नंतर बडोद्याकडे निघून गेल्या-मुळें आनंदीबाईंच्या संरक्षणाची जबाबदारी पवारांवर पडली. या वेळीं प्रसंगांत सांपडलेल्या आपल्या मालकाला पवारांनीं बारभाईंविरुद्ध मदत केली ह्मणून ते संतापले. तेव्हां बापू व नाना यांनीं हुकूम पाठवून धारच्या पवारांचा सरंजाम जप्त केला.[२] त्यामुळें आनंदीबाईंच्या खर्चाच्या नाड्या आंखडल्या. दादासाहेबही प्रसंगांत सांपडले असल्यामुळें त्यांनाही आनंदीबाईंना मदत करतां येईना. धारच्या किल्याला बारभाई केव्हां दगा करतील याचा नेम नव्हता. त्यांच्या संरक्षणाची व नवीन जन्माला आलेल्या बाजीरावाच्या जीविताची काळजी आनंदीबाईंना फार वाटत होती. बारभाईंना बाजीराव हा सवाई माधवरावांचा, अर्थात् आपलाच प्रतिस्पर्धी वाटत होता. अशा प्रसंगीं पैशाची मदत पहिल्यानें लागते. या वेळीं शिंदे व होळकर यांनीं आनंदीबाईंना

---

१ अधिकारयोग पा॰ १५ २ कानिटकरकृत सखारामबापूंचें चरित्र. पान १४०.

मदत केली असावी असें दिसतें. पण त्याचा विपर्यास बारभाईंनीं असा केला कीं, शिंदे–होळकर हे आनंदीबाईंना फितूर झाले. त्यामुळें त्यांनींहि खांका वर केल्या. बारभाईंच्या बंडाचा सोक्षमोक्ष होईपर्यंत आनंदीबाईंना आपलें, आपल्या मुलाचें व आपल्या लोकांचें, स्वतःच्या हिमतीवर रक्षण करून राहणें भाग पडलें. त्यांनीं भिल्ल व गारदी नोकरीस ठेवले. त्यांच्या जोरावर स्वतःच्या व सैन्याच्या खर्चाकरतां प्रांतोप्रांतीं रयतेपासून त्या महसूल वसूल करूं लागल्या. धारपेक्षां सुरक्षितपणाचे दृष्टीनें अशेरीचा किल्ला मजबूत होता, ह्मणून आनंदीबाईंनीं शिदोपंत पिंपळखरे यांच्याशीं संधान बांधून तो काबीज करण्याचा विचार चालविला. परंतु ही बातमी बाहेर फुटून जगन्नाथपंत यांनीं अशेरीचा बंदोबस्त केला व आनंदीबाईंस फितूर झालेल्या दहाबीस लोकांस ठार मारलें व पिंपळखरे यांस अटकेंत ठेवलें.[1] पुण्याच्या कारभाऱ्यांनीं आनंदीबाईंचा बंदोबस्त करण्याकरतां त्रिंबकराव शिवदेव यांचे दोन हजार स्वारांचें पथक तिकडे पाठविलें. आनंदीबाई या वेळीं जरी असहाय्य स्थितींत सांपडली होती, तरी ती राघोबादादासारख्या सिंहाची पत्नी होती. तिनें मोठ्या शौर्यानें धारचा किल्ला कित्येक महिने लढविला. धारच्या किल्यास बारभाईंच्या सैन्यानें वेढा घातला असतां आनंदीबाईंची सर्व बाजूंनीं तारांबळ उडाली. त्या प्रसंगीं तिनें सखारामबापूंस व नाना फडनविस यांस दोन पत्रें पाठविलीं. तीं जरी वेगवेगळीं असलीं तरी तीं एकाच मजकुराचीं होतीं. हें पत्र महत्वाचें असल्यामुळें येथें दिलें आहे.

१८.—पौछ १५ ॥ श्री शंकर ॥ (३–९–१७७६)

साबान सबा

सहश्रीय चिरंजीव राजश्री सखारामबापू यांसी प्रति सौ. आनंदीबाई आसिर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशळ लेखन करीत जाणे. बहुत दिवस जाहाले. तुह्मांकडून पत्र न आले याचे कारण काय? त्यास यैसे न करणें. सदैव पत्र पाठवून संतोषवीत जाणें. यानंतर इकडील मजकूर तर

---

१ ऐ. ले. सं पान २३०७.

राजश्री रंगराव महादेव व कोनेर शिवदेव येथें येऊन किल्ल्यासी खटपट करितात. नित्य उठोन गोळागोळी होत आहे. कही बंद केली आहे. तुमचें नांव घेतात कीं, आह्मांस त्यांनीं पाठविलें आहे कीं, किला घेऊन आपल्यास पुण्यास न्यावें. त्यास आह्मीं त्याजला उत्तर दिलें कीं आह्मांस पुण्यास त्यास नफा कोणता? हें त्याच्या चित्तांत असतें तरी सिंदे, होळकर व हरि बल्लाळ या कामास नामर्द नव्हते. तुह्मी येथें येऊन एक महिना होऊन चुकला. बंदुखा मारून लोक मात्र जखमी करता तिही रुपयाची गांवची माणसें ठेऊन धामधूम मात्र किल्याभोंवती करिता ही गोष्ट तुह्मास योग्य नाहीं. याप्रमाणें त्यांजकडे निरोप पाठविला. त्याजवरून त्यांणी दहा पांच कलमे लबाडीची लिहून पाठविली. त्याचें उत्तर कलमास योग्य केलें. येकीकडे वकील बोलावयास पाठवावे व येकीकडेस मोरच्यांचे बंदोबस्त करावें. याप्रमाणें करतात. लबाड्याही फार बोलतात. आह्मी त्यास बाहेर निरोप पाठविला कीं आह्मी व चिरंजीव येथें आलों आहों. तुह्मीं येऊन मोर्चे लाविलें. तुह्मांस किला न आला तरी तुमची आबरू मात्र गेली. बाइकावर तल्वार कोणीही धरली नाहीं ती तुह्मी धरलीत, येवढें मात्र तुमचें पदरीं पडलें. श्री सत्तेनें कदाचित् किला तुमशी मऊ बोलिला तरी आंत धणी मर्द नाहीं. बाइका मुलासी तरवार धरून पराक्रम काय विशेष जाइला. आह्मास तो हेंच मोठेपण कीं, तुह्मांकडील पांच-सात माणूस व हजार दीड हजार स्वार इतका अटंवर घेऊन येथें येऊन बसला. मोरचेही नवगांवांत आणिले. इतकें असोन आह्मी महिनाभर लढाई घेतली. आणि ही जर परियंत लढवेल तवपावेतों लढतच आहों हेंच आमचें थोरपण आहे. आह्मी बाइका होऊन आंतून लढतो. तुह्मीं पुरुष असोन बाहींरून लढता यांतच लहान मोठेपण शाहणे आहेत ते निवडीत असतील. याप्रमाणें त्यांचे आमचे बोलणें जालें. परंतु ते लहान माणूस त्यास शंका कांहींच नाहीं. तरी हेंच बोलणें तुह्मासी आहे. आणकीही घरगुती जावसाल कीं आह्मी येथें आलों कोणते समयास? कारण कोणतें. रुपयाचेंही त्या काळांत बळ कितीं? च्यार माणुसें चांगलीं, तेही तुह्माजवळ उठून आलीत. त्यापक्षीं

येथें चांगले माणूस काय असेल, आह्मीं कोणे तऱ्हेनें येथें आहो हे तुह्मास कळत नसेल कीं काय? तुह्मी तो दौलतीमध्यें शहाणे येक आहां.[१] असे असोन आह्मांवर तलवार धरोन उभे राहिला. या गोष्टीस तुह्मास वाईट कसे ह्मणावे? इतका उद्योग कोणते कारणासाठीं केला आहे हें कळत नाहीं. पुरुषाकडे केला तर असो. आह्मांकडे करून तुह्मांस नफा काय? तरी ही गोष्ट तुह्मांस योग्य नाहीं. तरी यासी मनाचि चिठ्ठी पाठवून अह्मांस येथें खर्चविचासाठीं दो चव लाखाचे परगण्याच्या यादी व शहाणा माणूस पाठवून देणें. कटकटीसी आह्मां तुह्मासीं प्रयोजन नाहीं. इतकें असोन तुमच्या थोरपणास जो योंग्य असेल तें करणें. श्री सत्ताप्रमाण आहे. शा. छ. ९ रजब बहुत काय लिहिणें हे विनंति.

१९. या पत्राचा त्या पाषाणहृदयीं मुत्सद्यांच्या हृदयावर कांहींच परिणाम झाला नाहीं. या वेळीं नानापुढें बापूंचेंहीं कांहीं चालण्यासारखें नव्हतें. सर्वसत्ताधीश नानाच बनले होते. राघोबादादा, आनंदीबाई, बाजीराव यांचे केव्हां बळी घेईन अशी आतुरता नानांना झाली होती. ‘ इतका उद्योग कोणते कारणासाठीं केला ? बाइकाबरोबर कटकटी करून तुह्मांस नफा काय ? बाइकावर तरवार धरणें पुरुषांना शोभतें काय ?’ वगैरे आनंदीबाईनें पत्रांतून जे जाबसाल केले त्याला नानांना उत्तर देतां झालें नाहीं. नानांनीं आपली अब्रू गुंडाळून जगाच्या वेशीवर त्याचें गाठोडें बांधून ती टांगली होती. त्यांना कशाची पर्वा होती! त्यांनीं सतत दिड वर्षपर्यंत धारच्या किल्ल्यांत कोंडलेल्या पेशव्यांच्या राज्याच्या मालकिणीशीं—आनंदीबाईशीं निकराची लढाई करून तिचा पराभव केला, व एका असहाय्य स्त्रीशीं लढून आपल्या कीर्तीचा डंका सर्व जगभर गाजविला! तिला पकडून इ. स. १७७७ च्या मार्च महिन्यांत नर्मदातीरीं मंडलेश्वर येथें मोठ्या बंदोबस्तानें तुरुंगांत ठेवलें. ज्या वेळीं आनंदीबाई अखे-

---

१ नाना फडनविसास पाठविलेल्या पत्रांत “फडणीस कारभारी आहां” असे शब्द आहेत.

रीस नाइलाजानें वेढा घालणाऱ्यांच्या स्वाधीन झाली, त्या वेळीं तिचें ह्मणणें होतें कीं मला इंदोरास साध्वी अहल्याबाईकडे पोंचती करा. तें अशक्य असल्यास निदान पुण्यास तरी घेऊन जा. परंतु तिची तीही विनंती मान्य न करतां त्यांनीं तिला सरळ मंडळेश्वर दाखविलें.

२०. नानांनीं पेशवे घराण्यांतील एका शूर वीर स्त्रीचें मंडळेश्वराच्या तुरुंगांत खितपत पडलेलें हें एक चित्र रंगविलें आहे. गंगाबाई, पार्वतीबाई, गोपिकाबाई आणि आनंदीबाई अशा चार स्त्रियांचीं निरनिराळीं चित्रें नानांनीं रंगविलीं. नानांच्या कुटिल कारस्थानांची काळीभोर अशी त्यांची पार्श्वभूमिका असल्यामुळें महाराष्ट्राच्या इतिहासांत तीं फारच खुलून दिसत असतील व त्यामुळें सर्व जगभर नानांची वाहवा होत असेल नाहीं ? असा प्रश्न एकाद्या जिज्ञासूनें विचारला तर त्याला उत्तर काय ?

प्रकरण २० वें.

नानांच्या सर्पदंशाचे तीन बळी.

इ. स. १७७८.

१. नाना व सखारामबापू यांच्या स्वभावधर्माची रूपरेखा.—२ शिंदे होळकरांशीं संगनमत करण्याकरतां नाना त्यांना पुण्यास बोलावितात. त्याप्रमाणें ते पुण्यास येतात.—३ होळकरांच्या मागणीची कारभाऱ्यांकडे लांबच लांब यादी. सखारामबापूंचें जशास तसें वागण्याबद्दलचें होळकरांस उत्तर.—४ सखारामबापूंच्या उत्तराचें स्पष्टीकरण.—५ राजकारणांत सखारामबापू हे जशास तसें वागत होते —६ आपल्या तंत्रानें कारभार चालेल तरच तो सखारामबापूंना पाहिजे होता.—७ सखारामबापूंच्या इच्छेप्रमाणें नवीन जहागीर न मागतां नवीन पेशव्यांचीं इमानानें नोकरी करण्यास शिंदेहोळकर तयार होतात.—८ सखारामबापूंविरुद्ध नानांचा स्वतंत्र पक्ष निर्माण होतो. नाना महादजी शिंद्यांस आपल्या पक्षांत सामील करून घेतात.—९ शिंद्यांचें नानांबरोबर झालेलें नवीन लेखी इमानप्रमाण.—१० नानांच्या स्वतंत्र पक्षाचा विस्तार.—११ नानांनीं शिंद्यांना जहागीर दिल्याबद्दल होळकरांचा रुसवा. त्यांचे पेशव्यांच्या राज्यकारभारांत खीळ घालण्याचे प्रयत्न.—१२ पेशव्यांचें राज्य बुडविण्याचे नाना फडनविसांचे प्रयत्न सखारामबापूंच्या लक्षांत येतात. नाना एकटेच पेशवाई गिळंकृत करणार अशी सखारामबापूंना शंका येते.—१३ राघोबादादांना पदच्युत केल्यामुळें पेशव्यांच्या राज्याचें कसें नुकसान झालें, याचा चित्रपट सखारामबापूंना दिसूं लागतो.—१४ मोरोबादादा फडनविस यांचे. राघोबादादांस गादीवर आणण्याचे प्रयत्न सुरू.—१५ मोरोबादादांस हातीं धरून कारभारांतून नानांचें उच्चाटन करण्याचें बापू ठरवितात.—१६ सखारामबापू व मोरोबादादा यांची गुप्त भेट. उभयतांतील करारमदाराचीं चार कलमें.—१७ या कलमांचें स्पष्टीकरण. राघोबादादांवरील पुतण्याच्या खुनाचा आरोप कलम २ प्रमाणें कसा दूर होतो.—१८ नाना फडनविसांचा पक्ष हाणून पाडण्याकरतां मोरोबादादांनीं सैन्याच्या जमवाजमवीसाठीं कोणते प्रयत्न केले ?—१९ मोरोबादादांच्या तयारीविरुद्ध नानांच्या सैन्याची

जमवाजमव. नाना निजामास आपल्या पक्षांत घेतात.—२० मोरोबादादा होळकरांच्या सहाय्यानें पुणें ताब्यांत घेतात. नाना पुरंदरास पळून जातात. मोरोबांची सैन्यासह पुरंदराकडे धांव.—२१ मोरोबादादा व नाना फडनविस यांच्या मधील समेटाबद्दल सखारामबापूंची मध्यस्थी.—२२ मोरोबादादा व नाना यांचेमधील तह आपल्या धोरणास अनुसरून बापू घडवून आणतात. या तहांतील चार कलमें.—२३ या तहामुळें पेशव्यांच्या राज्याची स्थीरस्थावरता घडवून आणल्याबद्दल सखारामबापूंची प्रशंसा होऊं लागाली.—२४ सखारामबापूंची मध्यस्थी पेशवाईच्या कल्याणाची कशी होती ?— २५ राघोबादादांनीं पुण्याच्या पेशवाई कारभारावर येण्याविषयीं सखारामबापू व मोरोबादादा यांच्याबरोबर ठरवावयाच्या त्यांच्या अटी.—२६ मोरोबा कारभारांत आल्यामुळें पेशव्यांच्या राज्याचा कारभार कसा सुरळीत चालूं लागला ?—२७ मोरोबादादांस अधिकारच्युत करण्याकरतां नानांचा नवीन कारस्थानी चक्रव्यूह.—२८ मोरोबा दादांनीं आपल्याविरुद्ध इंग्रजांची मदत पावसाळा सुरू होईतोंपर्यंत पुण्यास आणूं नये, ह्मणून नाना मोरोबादादांपुढें अत्यंत लीनता दाखवून त्यांस फसवितात. २९ मोरोबादादांविरुद्ध नानांनीं चालविलेल्या नवीन कारस्थानाचा हेतू आपल्या हातीं सर्वाधिकार यावा एवढाच केवळ स्वार्थमूलक होता. हें नानांचें कारस्थान अगदीं गुप्त होतें. या कारस्थानांतील पटवर्धनांना गेलेलें एक सांकेतिक पत्र. —३० या सांकेतिक पत्राचा मथितार्थ. नानांच्या संकेताप्रमाणें शिंदे पुण्याच्या रोंखानें कूच करतात. मोरोबादादांस नानांच्या कारस्थानाचा सुगावा लागतो. ते मदतीकरतां इंग्रजांकडे खटपट करतात. मोरोबादादांस या वेळीं अत्यंत जरूरी आहे, असें पाहून, इंग्रज आपल्या मागणीचें प्रमाण वाढवूं लागतात.—३१ इंग्रजांच्या मागणीचा मथितार्थ काय होता ? इंग्रजांच्या मागण्या सखारामबापूंस नापसंत पडतात. म्हणून मोरोबादादांचा त्यांचेबरोबरील मनसुबा बिघडतो. —३२ मोरोबादादा यांचा सखारामबापूबरोबर बिघाड. ते सखारामबापूंना कैद करण्याचा प्रयत्न करतात. सखारामबापूंचें पलायन. इंग्रजांपेक्षां नाना बरा म्हणून बापूंची नानापुढें शरणागती.—३३ नानांस शरण जाण्यांत सखारामबापूंचा अपूर्व स्वार्थत्याग. राजकारणातील बापूंचें ‘ समजाविशीचें ’ धोरण.—३४ हें कारस्थान निभावून नेण्याचा सर्व भार नानांनीं शिंद्यांवर टाकला होता.—३५ शिंद्यांच्या मध्यस्तीनें होळकर नानांना सामील होतात.—३६ मोरो-

बादादांची सर्व बाजूंनीं गळचेपी होते. शेवटीं मोरोबांस कैद करून नाना त्यांस नगरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवतात.—३७ मोरोबादादांच्या पक्षांतील म्हणून नानांनीं आपल्या विरुद्ध वाटणाऱ्या सर्व सरदारांस डोंगरी किल्ले दाखविले. पुण्याच्या दामोदर मंडळींचे खजिने लुटले. मोरोबादादांच्या पक्षांतील लोकांचा महादजी शिंद्यांच्या हस्तें निःपात केला.—३८ नानांनीं शिंद्यांकडून होळकरांची मानखंडणा केली.—३९ उपकाराची फेड अपकारानें करावयाचा नानांचा स्वभावधर्म.—४० या वेळीं सखारामबापूंना डोंगरी किल्ल्याची हवा नानांनीं दाखविली नाहीं. इंग्रजांबरोबरील पेशव्यांच्या तहाची पूर्तता होईपर्यंत नानांना सखारामबापूंची जरूरी होती. पंख तोडलेल्या राघूप्रमाणें बापूंची अवस्था या वेळीं नानांनीं करून ठेवली.—४१ मोरोबादादांनीं आपला अखत्यारीचा अधिकार काढून घेतला, म्हणून त्यांचा सूड उगविण्याकरतां हें कारस्थान करून, नाना पुण्यांत प्रलय करतात. या नानांच्या कारस्थानांची फलश्रुति.

१ मागील प्रकरणांत सखारामबापू व नाना फडनविस यांच्यामध्यें राजकीय, सामाजिक आणि धार्मिक दृष्टीनें वितुष्ट उत्पन्न होण्याचीं कारणें काय घडलीं, हें दाखविलें आहे. नाना फडनविस यांनीं आपली बाजू सांवरून धरण्याकरतां व आपल्या कृतीवर पांघरूण घालण्याकरतां आपली बुद्धिमत्ता खर्च केली. आपण जें करतो तें पेशव्यांच्या राज्याच्या हिताचें करतों असें आपल्या पक्षांतील लोकांमध्यें दाखविण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला. या वेळीं नानांना लोकमतापेक्षां लष्करी सामर्थ्याचें पाठबळ मुख्यत्वानें पाहिजे होतें. लोकमत वाटेल त्या वेळीं वाटेल त्या प्रकारांनीं बनवितां येतें, असा नानांचा सिद्धांत असल्यामुळें, त्यांनीं लोकमताची कधींच पर्वा केली नाहीं. सत्ता कायम राखणें यांतूनच लोकमताची उभारणी करतां येते असा त्यांचा अनुभव होता. यश व सत्ता ज्याच्या वांट्याला, त्याला बहुजनांचें पाठबळ आहे असें ठरतें. हीच विचारसरणी नानांनीं आपल्या कारस्थानाच्या मुळाशीं ठेवलेली स्पष्ट दिसतें. कुटिल कारस्थानें करून आपणाला पाहिजेत तसे निरनिराळे प्रसंग नाना उत्पन्न करीत असत. सखारामबापूही आलेल्या प्रसंगाला तोंड देण्याकरतां निरनिराळीं

कारस्थानें निर्माण करीत. बापूंचा स्वभाव "जशास तसें" वागविण्याचा होता. विरुद्धपक्षाचा जसा हल्ला येईल तसें त्याला तोंड देऊन आपलें कार्य साधावयाचें हा त्यांच्या स्वभावाचा हातखंडा होता. बापूंचें धोरण (Defensive policy) संरक्षक स्वरूपाचें होतें. नानांचें धोरण त्याच्या-विरुद्ध ह्मणजे (Offensive policy) चढाईचें होतें. चढाईच्या धोरणाला आगाऊ सिद्धतेची जरूरी असते. याकरतां नानांना आपला मार्ग व धोरण पहिल्यानें आंखून सिद्धता करून ठेवावी लागे. आपल्या धोरणाच्या विपरीत गोष्ट घडून आली ह्मणजे नाना गोंधळून जात होते. त्यांना त्या वेळीं कोणतीच युक्ति सुचत नसे. बापूंचें मात्र तसें नव्हतें. ऐन प्रसंगाच्या वेळींच त्यांच्या बुद्धीला अतर्क्य असे मुत्सद्दी डाव सुचत. त्यांच्या बुद्धीवर जसजसा ताण पडे, तसतसे ते नवे खेळ खेळत होते. सखारामबापू आपल्या अब्रूला फार सांभाळीत असत. आपल्या कीर्तीला काळिमा लागतो अशी भीति उत्पन्न झाली ह्मणजे ते कोणत्याही गोष्टींत माघार घेत. नीतीच्या पाठबळावर ते कोणतेंही साहस करीत. पण अनीतीच्या कोण-त्याही कार्याला धीरानें प्रवृत्त होण्याचा त्यांचा मनोधर्म नव्हता. हें त्यांच्या स्वभावाचें एक वैशिष्टय होतें. नानांचें तसें नव्हतें. एकदां एक गोष्ट ठरविली ह्मणजे त्यांत कशाचाच विचार करावयाचा नाहीं; 'शेंडी तुटो किंवा पारंबी तुटो' असें त्यांचें धोरण असे. मान, कीर्ति, पाप-पुण्य, हित-अनहित यांचा नंतर कांहींच विचार करावयाचा नाहीं असा एकमार्गी व एकधोरणी स्वभाव नानांचा होता. यामुळें सखारामबापू व नाना यांच्यांत मतभेद उत्पन्न झाल्यानंतर परस्परांच्या स्वभावानुरूप कारस्थानांच्या कसकशा दिशा बदलत चालल्या, हें या प्रकरणांत पहाणें आहे.

२ मागील प्रकरणांत नानांनीं आपल्या अधिकाराचें कसें अतिक्रमण चालविलें व बापूंना नामधारी करण्याचा कसा प्रयत्न चालविला हें आलेंच आहे. गंगाबाईला मुठींत ठेऊन नानांनीं महादजी शिंद्यांना सखाराम-बापूंच्या विरुद्ध आपल्या बगलेंत कसें घेतलें हें येथें पहाणें आहे. बार-भाईंनीं राघोबादादांना राज्याबाहेर काढल्यानंतर ते शिंदे व होळकर

यांच्याकडे मदत मागण्यासाठीं हिंदुस्थानांत गेले. दादासाहेबांना मदत न करण्याबद्दल पुण्याच्या कारभाऱ्यांचीं ताकीद-पत्रें उभयतांना गेलीं होतीं. या वेळीं शिंदे होळकर यांची परिस्थिति मोठी नाजूक झाली होती. एका बाजूला प्रत्यक्ष मालक दादासाहेब, व दुसऱ्या बाजूला कारभारी. त्यामुळें कोणत्याही एका पक्षाला मदत केली तरी दुसरा पक्ष आपल्यावर नाराज होणार हें त्यांना माहीत होतें. शिवाय तंट्यांत ज्या पक्षाला जय मिळेल त्याच्या हाताखालीं या उभयतांना सरदार ह्मणून वागावें लागणार होतें. ह्मणून जय कोणाला मिळणार याचा अंदाज घेऊन त्याप्रमाणें शिंदे होळकर हे तिकडे सामील होणार होते. दादासाहेबांचा पत्रव्यवहार त्या वेळीं मुंबईच्या गव्हर्नराबरोबर चालला होता. त्यामुळें खात्रीनें यशाचा वांटा कोणाच्या हातीं पडेल हें अनिश्चित होतें; ह्मणून या वेळीं शिंदे-होळकर यांना आपण दोन्ही पक्षाचे आहोंत असें दाखविण्यापलीकडे कांहींच करतां येण्यासारखें नव्हतें. दादासाहेब व कारभारी यांच्या दरम्यान त्यांनीं जी मध्यस्ती सुरू केली त्याचा अर्थही हाच होता. पुढें त्यांच्या मध्यस्तीचा उपयोग न होतां दादासाहेब व इंग्रजांच्या दरम्यान तारीख १ मार्च सन १७७६ रोजीं पुरंदरचा तह झाला. त्यामुळें बारभाईंचा पक्ष विजयी झाला हें पाहून व पुण्यास येण्याबद्दल वारंवार त्यांचीं पत्रें येऊं लागल्या-मुळें, तिकडे जाणें शिंदे-होळकरांस अवश्य होतें. ह्मणून उभयतां तिकडे जाण्यास निघाले. तुकोजी होळकर हे इ. स. १७७६ च्या जून महिन्यांत येऊन वाफगांवी राहिले. महादजी शिंदेही एका महिन्याच्या फरकानें येऊन दाखल झाले.

३. शिंदे होळकर यांचें सख्य होतें. त्यांना उत्तर हिंदुस्थानांत एक-मेकांच्या सहाय्यावर आपला अंमल कायम राखावयाचा होता. उभयतां पेशव्यांचे समान दर्जाचे सरदार. तेव्हां पेशवे दरबारशीं उभयतांचें राज-कारण एकाच स्वरूपाचें होतें. दादासाहेब व कारभारी यांच्यांत बेबनाव झाल्यामुळें दादांचें पारिपत्य करण्याकरतां पहिल्यानें कारभाऱ्यांनीं निजा-माचें सहाय्य घेतलें, त्यामुळें कारभाऱ्यांकडून त्याला तीस लाखांची

जहागीर मिळाली. दादासाहेबांचा पुरा बंदोबस्त होईपर्यंत पेशव्यांच्या राज्यांत अनंत बखेडे उत्पन्न होणार, व ते मोडण्याची कामगिरी आपल्या शिरावर येणार हें शिंदे होळकर जाणून होते. केवळ एकाद्या प्रसंगापुरतीच मदत करण्याकरतां जर निजामाला तीस लाखांची जहागीर मिळते, तर यापुढें आपल्याच सहाय्यावर कारभाऱ्यांचीं सर्व कामें होणार व दादा-साहेबांविरुद्ध आपणाला कायमचें लढत रहावें लागणार, तेव्हां आपल्या विशेष परिश्रमाबद्दल आपणाला नवीन जहागीर कां असूं नये, हा प्रश्न साहजिक त्यांच्यापुढें उत्पन्न झाला. या प्रसंगीं नवीन जहागिरींचा प्रश्न पहिल्यानें उत्पन्न करावयास शिंद्यांना तोंड नव्हतें. त्यांच्या सरंजामाचे मागचे हिशेब तपासून विल्हेस लावावयाचे होते.[1] ह्मणून त्यांनीं होळकरांस पुढें पाठविलें होतें. होळकर वाफगांवीं आल्यानंतर त्यांनीं आपल्या माग-ण्यांची लांबच लांब याद कारभाऱ्यांकडे पाठविली. त्या मागण्यांना सखारामबापूंनीं असें उत्तर पाठविलें कीं, " राज्याचा विचार या प्रकारचा झाला आहे. साऱ्यांनीं श्रीमंतांकडे पाहून निखालसपणें यांच्या पायांशीं वर्तावें. श्रीमंतानीं कोणांसही उणें केलें नाहीं. श्रीमंतांनीं आपल्याबरोबरीस आणलेले सरदार आहां. तुह्मींच बंदोबस्त करावा. आहे नाहीं पाहून जें करणें तें करावें. आपणास इच्छा कारभाराची नाहीं. समजोन ह्मणेल त्याशीं समजोन उत्तर करूं. न समजोन ह्मणेल त्याशीं उत्तर तसेंच केल्याखेरीज परिणाम नाहीं[2] !" सखा-रामबापूंनीं होळकरांस पाठविलेल्या या उत्तरानें बऱ्याच गोष्टींचा उलगडा होतो.

४. १ निजामाला प्रसंगविशेषीं मदत घेतल्यामुळें त्याच्या मोबदला जरी जहागीर दिली तरी तो नियम पेशव्यांच्या सरदारांना लागू नाहीं. होळकरांना पेशव्यांनीं लहानाचे मोठे वाढवून बरोबरीचे सरदार केले असल्यामुळें त्यांना नवीन कोणतीच जहागीर अगर दुसरी कोणती सवलत

---

१ अधिकार योग पा. ४६. २ अधिकारयोग पा. ३५.

मागण्याचा हक्क नाहीं. साऱ्यांनीं (पेशव्यांच्या नोकरांनीं) श्रीमंतांकडे पाहून मनामध्यें कोणतीच आढी न ठेवतां व कोणतीच स्वार्थाची इच्छा न बाळगतां, निखालसपणें त्यांच्या पायांशीं वर्तावें. (त्यांच्या राज्यरक्षणाची कामगिरी करावी.) एका सरदारानें आपल्या कामगिरीबद्दल नवीन जहागीर मागितली तर दुसराही तशीच मागेल. पेशव्यांचे सरदार अनंत आहेत. एकाला देऊन दुसऱ्याला दिलें नाहीं ह्मणजे त्याला वाईट वाटून तो उलट शत्रू बनेल. एवढ्याकरतां श्रीमंतांची नोकरी, त्यांना अडवून किंवा त्यांना प्रसंगांत धरून, नवीन जहागीर मागून करणें, हें राज्यव्यवस्थेच्या दृष्टीनें अन्यायाचें आहे, हें बापूंनीं या उत्तरांत स्पष्ट केलें आहे.

५. २ सखारामबापूंनीं या उत्तरांत आपल्या स्वभावाचाही स्पष्ट खुलासा केला आहे. 'समजोन ह्मणेल त्याशीं समजोन उत्तर करूं. न समजोन ह्मणेल त्याशीं उत्तर तसेंच केल्याखेरीज परिणाम नाहीं.' या उत्तरानें बापू हे राजकारणांतसुद्धां 'जशास तसें' वागत होते हें स्पष्ट होते.

६. ३ 'आपणास इच्छा कारभाराची नाहीं.' हें विधान काय दर्शवितें? आपल्या कारभाराच्या पद्धतीनें जर कारभार चालत असेल तरच बापू कारभार संभाळावयाला तयार होते. जर सरदार मंडळींनीं आपल्याच पोळीवर तूप ओढून घेण्याचा प्रयत्न चालविला, तर त्यांना कारभारीपणा नको होता, असें या विधानांत त्यांनीं स्पष्ट केलें आहे.

७. अशा प्रकारचें बापूंचें स्पष्ट, मुद्देसूद व करारीपणाचें उत्तर गेल्यामुळें होळकरांचे डोळे उघडले व ते बरेंच नरम आले. शिंद्यांचीही तीच स्थिति झाली. तारीख २७ जुलै रोजीं होळकरांनीं व तारीख १७ आगष्ट रोजीं शिंदे यांनीं श्रीमंत यांच्या भेटी घेतल्या. कारभाऱ्यांनीं उभयतां सरदारांशीं खलबतें करून त्यांचें इमानप्रमाण घेतलें. याप्रमाणें नवीन जहागीर न मागतां ठरल्याप्रमाणें पेशव्यांची नोकरी बजावयाला शिंदे व होळकर तयार झाले.

८. शिंदे-होळकर यांनीं सखारामबापूबरोबर मिळतें घेतलें हें नानांच्या स्वतःच्या स्वार्थी धोरणाला आड येऊं लागलें. नानांना बापूंची सत्ता नामशेष करावयाची होती. सत्ता नामशेष करावयाला लष्करी सामर्थ्य पूर्णपणें आपल्या हातीं पाहिजे ह्मणून शिंद्यांसारखा मातब्बर सरदार, मर्द माणूस आपल्या पूर्णपणें लगामीं आणण्याची नाना खटपट करूं लागले. त्यांनीं शिंदे-होळकरांची जोडी फोडून त्यांतून शिंद्यांना आपल्या टोळींत समाविष्ट करून घेण्याचा डाव टाकला. पूर्वींपासून नाना व शिंदे यांचें रहस्य होतेंच. शिंद्यांच्या मनांत सखारामबापूंविषयीं वितुष्ट होतें. त्याचप्रमाणें पटवर्धन सरदारही बापूंना पाण्यांत पहात होते. त्यांनीं आपल्या पत्रांतून सखारामबापूंना "त्या सकारनामक सोद्याला–'पाजी,' 'खाटीक,' 'चांडाल,' 'शकुनी,' 'दुष्ट,' 'नीच,' 'कळ-लाव्या,' 'घर बुडव्या,' 'कपि,' 'जांबुवंत,' वगैरे शेलक्या शेलक्या शद्बांची लाखोली वाहिलेली आहे."[1] पटवर्धन सरदार हे नानांच्या स्वतंत्र गटांतील एक प्रमुख होते. त्यांनाही शिंदे आपल्या पक्षांत सामील व्हावे असें वाटत होतें. ह्मणून मिरजेचे पांडुरंगपंत त्यांना वश करण्याचा प्रयत्न करीत होते. सखारामबापूंबरोबर उघड वैर करावयास शिंदे तयार होते पण त्यांना मलिदा पाहिजे होता. केलेलें कारस्थान यशस्वी झालें तर ठीक, नाहीं तर सर्व बाजू आंगलट यावयाची, ह्मणून असलें साहस करावयास बक्षीसही तसेंच जबर पाहिजे असें शिंद्यांचें ह्मणणें होतें. पहिल्यानें नानांनीं पांडुरंगपंतांची मध्यस्ती धुडकावून लाविली. परंतु शेवटीं नानांनीं पडती बाजू घेऊन त्यांच्या मागण्या मान्य केल्या. शिंद्यांच्या मागण्या अशा होत्या कीं, आपणां स्वतःकरतां नवीन दहा लाखांची जहागीर आणि अशीर-गडचा किल्ला नानांनीं द्यावा. अर्थात् सखारामबापू याच्या अगदीं विरुद्ध होतें. ह्मणून गंगाबाईच्या सहाय्यानें नानांनीं शिंद्यांची ही मागणी कबूल केली. 'तुह्मी जें जें मागतां तें तें सर्व मी तुह्मांस सोईसोईनें मिळवून देईन. आजच अडचाल तर सखाराम-

---

१ कानेटकरकृत सखारामबापूंचें चरित्र पा० ५१.

बापू ऐकणार नाहींत. थोडे दमानें घ्या.' याप्रमाणें सखारामबापूंविषयीं शिंद्यांच्या मनांत तेढ उत्पन्न करून आपण स्वतः तुमच्या मागण्या कबूल करून त्याची जबाबदारी घेतों असें निक्षून सांगून त्यांनीं शिंद्यांना होळकरांपासून अलग करून आपल्या पक्षांत घेतलें. या संबंधीं नानांनीं शिंद्यांकडून इमानप्रमाण लेखी घेतलें तें असें:—

९. " राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसी.

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य—स्नेहांकित महादजी शिंदे दंडवत विनंती उपरी. आम्हांकडील अर्थ, राजश्री रामचंद्र शिवदेव यांनीं आपणास सांगितल्यावरी आपण शपथपूर्वक खातरजमा करून श्रीवरील तुळशी देतों असें निश्चयपूर्वक बोलला आणि 'सरदारी माझी आणि फडणीसी त्यांची. बंधुत्वाप्रमाणें वर्तन करूं ज्यांत सरदारीचें कल्याण तें संधान चालवूं. जो अनिष्ट चिंतील त्याचें पारिपत्य करूं.' म्हणून बोलला तो मजकूर मशारनिल्हेनीं लिहिला तो सर्व समजोन चित्तास परम संतोष जाला. आम्हीं श्रीवरील बेलभंडार पाठविला आहे, व हें शपथपूर्वक लिहिलें आहे. आपण बंधुत्वाविषयीं संशय न मानावा. मा। निल्हे बोलतील ते आमचें बोलणें जाणावें. ही सरदारी आपली व फडणीशी आमची असा निश्चय जाहला. जेथें आपण आहां तेथें मी आहे हें शपथपूर्वक जाणावें. रवाना छ० २५ सफर बहुत काय लिहिणें ? लोभ कीजे हे विनंती[१] " या लेखी शपथक्रियेमुळें नाना व शिंदे याचें गुट्ट जमलें व त्यामुळें त्यांचा पक्ष बळावला.

१०. बारभाईंची स्थापना झाल्यानंतर एकतंत्री राज्यकारभार आपल्या हातीं यावा, याकरतां नानांनीं आपला स्वतःचा असा एक पक्ष निर्माण केला होता. अर्थात् त्या पक्षांत नाना मुख्य होते. स्वतः नाना, हरिपंत फडके, पटवर्धन सरदार व महादजी शिंदे अशा चौकडीचा तो पक्ष बनला होता. गंगाबाई ही नानांच्या वेसणींत अडकली असल्यानें नानांचा पक्ष म्हणजे

---

१. खरेकृत नानांचें चरित्र. आ. ३ री. पान ५०.

तोच राजपक्ष ही भूमिका नानांनीं कायम ठेवली होती. नानांच्या या स्वतंत्र पक्षानें बारभाईंचे हक्क क्रमाक्रमानें हिरावून घेण्याचा सपाटा सुरू केला. त्यांत मागें दर्शविल्याप्रमाणें बापूंचे वडीलकीचे हक्क नामशेष होऊं लागले. शिंद्यांना नानांचा आसरा व नानांना शिंद्यांचें अधिष्ठान मिळाल्या-बरोबर बापू हलके पडले. तोतयाच्या बंडाला रंग चढला असतां शिंद्यांनीं पुढाकार घेऊन नानांची सर्व मसलत पार पाडली. त्यामुळें शिंद्यांचा व नानांचा बोलबाला होऊन होळकर व बापू फिके पडले.

११. इ. स. १७७६ च्या जुलै महिन्यांत होळकर जे पुण्यांत आले ते स्वस्थच बसून होते. त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें कोणतीच कामगिरी मिळाली नाहीं. शिवाय शिंद्यांना दहा लाख रुपयांची नवीन जहागीर मिळाली. त्यामुळें ते रागावून बसले. "आम्हांलाही दहा लाखांची जहागीर व अशीरगडसारखा किल्ला मिळाला पाहिजे. कारण आम्हीं व शिंदे बरोबरीचे सरदार आहों." नानांनीं शिंद्यांना जहागीर कबूल केली, पण बापू त्याच्या अगदीं विरुद्ध. बापूंनीं होळकरांना अशीच आंतून जहागीर देण्याचें कबूल केलें असतें तर होळकर बापूंच्या लगामीं राहिले असते. परंतु बापूंनीं तसें केलें नाहीं. त्यांत राज्यनाश आहे हें ते जाणून होते. आपणाला जहागीर मिळत नाहीं हा कारभाऱ्यांचा धडधडीत पक्षपात आहे असें समजून होळकर क्रुद्ध झाले होते. शिवाय आपणाला सोडून एकट्या शिंद्यांनीं जहागीरीचा तुकडा मिळविला ह्मणून त्यांच्याबद्दलही त्यांचें मन कलुषित झालें होतें. होळकरांना वाटलें कीं, कारभाऱ्यांना चक्रांत धरलें ह्मणजे ते शिंद्यांप्रमाणें आपणालाही जहागीर देतील. ह्मणून त्या कल्पनेनें त्यांनीं पुण्यांत राहून कारभारांत ढवळाढवळ चालविली. कारभाऱ्यांनीं गोविंदराव गायकवाड यांच्या जागीं फत्तेसिंगास स्थापण्याकरतां अठरा लक्ष रुपये नजराणा घेण्याचें ठरविलें होतें. त्याचप्रमाणें नारो शंकर राजेबहादर यांच्या मुलांत त्यांच्या जहागीरीबद्दल तंटे चालले होते. नारो शंकरच्या त्र्यंबकराव व रघुनाथराव या दत्तक मुलांतील तंटा असा तोडला कीं, दोघांनीं मिळून सरकारांत दहा लक्ष नजराणा भरावा व निम्मे निम्मे जहागीर वाटून घ्यावी. वरील दोन्ही तंट्यांच्या

निकालप्रमाणें अठ्ठावीस लक्ष रुपयांच्या नजराणा सरकारांत यावयाचा होता. परंतु मध्यें होळकरांनीं ढवळाढवळ करून त्या रुपयांस खो बसविला. होळकरांनीं कारभाऱ्यांशीं हट्ट धरला कीं, गायकवाडांची सरदारी फत्तेसिंगाला न देतां ती गोविंदरावांकडेच चालावी. या जहागीरीच्या कामीं होळकर व कारभारी यांची घांसाघाशी चालल्यामुळें, फत्तेसिंग गायकवाड व राजेबहादुरांचे मुलगे यांनीं नजराणे भरण्याबाबत तात्काल खांका वर केल्या. कर्नाटकांत जाऊन हरिपंत फडके यांना होळकरांनीं मदत करावी असें नानांचें ह्मणणें होतें. परंतु कारभारी मंडळींत अधिकारासंबधीं घासाघीस सुरू आहे असें पाहून होळकरांनीं त्यावर बिनतोड असें उत्तर दिलें कीं, शिंदे येतील तर त्यांच्याबरोबर कर्नाटकाच्या स्वारीला आपण निघतों. ते येणार नाहींत तर आपण एकटे जाणार नाहीं. असें उत्तर देऊन ते पुण्याहून निघून वाफगांवीं जाऊन राहिले. त्यांची समजूत करण्याकरतां विसाजी कृष्ण बिनिवाले हें होळकरांकडे गेले. परंतु त्यांची समजूत पडली नाहीं. ही गोष्ट इ. स. १७७८ च्या जानेवारी महिन्यांत झाली.

१२. हरिपंत फडके व पटवर्धन सरदार या पेशव्यांच्या फौजबंद सरदारांप्रमाणें शिंद्यांचीही नानांबरोबर गट्टी जमली. नानांनीं प्रत्यक्ष मालकिणीबरोबर, गंगाबाईबरोबर व्यभिचार करून तिला आपल्या जाळ्यांत पकडलें, या गोष्टीमुळें 'तोंड दाबून बुक्याचा मार' याप्रमाणें सखारामबापूंची स्थिति झाली. नाना आपल्या अधिकाराचें अतिक्रमण याच जोरावर करूं लागले, हें त्यांना उघड दिसलें. पुतण्याचा खून करण्यापेक्षां मातेसमान असणाऱ्या गंगाबाईबरोबर जारकर्म करणें हें सहस्रपटीनें महापातक आहे अशी त्यांची मनोदेवता त्यांना सांगूं लागली असेल यांत संशय नाहीं. सरदारांना नवीन जहागिरीची लांच देऊन नानांनीं स्वपक्षसंवर्धनचा जो मार्ग स्वीकारला तो राज्य-बुडवेगिरीचा आहे हेंही बापूंना उघड दिसूं लागलें. त्यामुळें नानांच्या कारस्थानाची पुढील पायरी काय असावी हें त्यांनीं जाणलें व त्याला तोड काय करावी या विवंचनेला ते लागले. मध्यंतरीं नानांवर मारेकरी घालण्याचा प्रयत्न झाला. पुढें गंगाबाईनीं

आत्महत्या करून घेतली. त्यामुळें नानांच्या फाजील महत्वाकांक्षेला आळा बसून ते सरळपणानें राज्यकारभार करूं लागतील अशी बापूंची समजूत असावी असें दिसतें. कारण त्यांच्या हातून त्या अवधींत नानांना कोणताच महत्वाचा प्रतिकार झालेला दिसत नाहीं. बापूंनींच पुढाकार घेऊन बारभाईंचा वृक्ष लावला होता. ज्या राज्यांत प्रत्यक्ष राजाचा खून दिवसाढवळ्या होतो तें राज्य सुराज्य नव्हे अशी बापूंची धर्मभावना असल्यामुळें चार शहाण्या लोकांच्या शहाणपणावर पेशव्यांच्या राज्याचा लौकिक वाढावा व त्याचें श्रेय आपणाला मिळावें ही त्यांची इच्छा होती. परंतु राघोबादादामुळें लागलेला काळिमा धुण्याचा ते प्रयत्न करीत असतां त्याहीपेक्षां मोठा कलंक प्रत्यक्ष आपले सहकारी जे नाना, ते गंगाबाईबरोबर निंद्यकर्म-जारकर्म करून लावतात ही गोष्ट बापूंच्या अंतःकरणाला भोंवली. 'आपण करावयाला गेलों गणपती व झालें माकड' अशी त्यांची स्थिति झाली. इतकें होऊनही नाना गप्प बसते, तर कांहीं तरी पर्याय निघाला असता. परंतु बारभाईंच्या राज्याचे सर्व अधिकार आपल्या एकट्याच्या ताब्यांत घेऊन एकतंत्री राज्य करण्याची नानांच्या कृतीची दिशा ज्या वेळीं बापूंच्या लक्षांत आली, त्या वेळीं नानांच्या स्वभावाची त्यांना पूर्ण खात्री पटली. इतके दिवस बारभाईंच्या राजकारणापुढें त्यांनीं दादासाहेबांच्या हक्काकडे डोळेझांक केली होती. आपला 'वडीलकी' चा अधिकार काढून घेण्याबद्दल नानांनीं जशीं कारस्थानें केलीं व चालविलीं आहेत, तशी कारस्थानें त्यांनीं दादासाहेबांच्या बाबतींतही केलीं असलीं पाहिजेत, असा प्रकाश त्यांच्या डोक्यांत पडला व दादासाहेब निर्दोषी कीं दोषी यासंबंधीं त्यांच्यापुढें विचार पडला. इंग्रज न्यायी आहेत. ते दादासाहेबांना निर्दोषी ह्मणून आपल्या आश्रयाला ठेवतात. तेव्हां त्यांना दोषी ठरविण्यांत नानांनीं कारस्थान रचलें असलें पाहिजे अशी त्यांच्या मनाची नानांच्या कृतीवरून खात्री झाली. पेशवे घराण्यांतील पुरुषांना नामशेष करण्याचा नानांचा उपक्रम सुरू असून सदाशिवरावभाऊंना तोतया ठरविण्यांत त्यांनीं जें कारस्थान उभारलें व शेवटीं त्यांना मारून टाकलें त्यावरून पेशव्यांचें राज्य नानाच गिळंकृत करणार असें त्यांना स्पष्ट दिसूं लागलें. ह्मणून

नानांना अधिकारच्युत करून राघोबादादांना त्यांच्या पूर्वस्थळीं आणून बसवून कृतकर्माचें परिमार्जन करण्याचा त्यांनीं बेत चालविला.

१३. राघोबादादांना पदच्युत केल्यामुळें पेशव्यांच्या राज्याचें कसें कसें नुकसान झालें याचा चित्रपटही बापूंच्या डोळ्यांपुढून वरील विचारसरणीच्या ओघांत येऊन गेला असेल यांत संशय नाहीं. (१) दादासाहेबांनीं निजामाचा पराभव करून त्याला दांतीं तृण धरून तह करावयाला भाग पाडलें व आपल्या मर्जीनुरूप तह घडवून आणला. असें असतां त्यांच्याविरुद्ध लढण्याकरतां त्याच निजामाला उभें करण्यासाठीं पेशव्यांच्या राज्यांतील तीस लाखांच्या जहागीरीचा त्याला मालिदा चारावा लागला. (२) शिंद्यांनीं दहा लाखांची जहागीर मारली. 'म्हातारी मेल्याचें दुःख नाहीं पण काळ सोकावतो,' या म्हणीप्रमाणें पेशव्यांच्या दुसऱ्या सरदारांना पेशवाईचे लचके तोडण्याचें उदाहरण घालून देऊन नानांनीं राज्यकारभार नासून सोडला. (३) होळकरांस शिंद्याप्रमाणें नवीन जहागीर मिळाली नाहीं म्हणून त्यांना राग येऊन ते पेशवाईचे शत्रू बनले, आणि पेशवाईच्या कारभारांत ढवळाढवळ करून नुकसान करण्यास ते प्रवृत्त झाले. हेंही एक सरदार मंडळींत वाईट उदाहरण उत्पन्न झालें. (४) भोंसले सरदारांत व गायकवाड सरदारांत कलह माजवून त्यांचें सामर्थ्य नष्ट करण्याचें कार्य झालें. त्यामुळें पेशवाईचें सामर्थ्य कमी होऊन परराज्यांना बळकटी चढत चालली. (५) हैदर शत्रू बनला व त्याच्या पारिपत्याकरतां पेशव्यांच्या राज्यावर भलता खर्च बसला. (६) करवीरकर राजे पेशव्यांचे शत्रू बनून ते राज्याचा खराबा करूं लागले. (७) इंग्रज सरकाराला पेशव्यांच्या राज्यांत घुसण्याची संधि मिळाली. पुरंदरच्या तहानें साष्टी किल्ला आणि तीन लाख उत्पन्नाचा पेशव्यांचा मुलूख व बारा लक्ष रुपये त्यांना मिळूनसुद्धां ते नाराज झाले! वगैरे वगैरे अनंत गोष्टीमुळें पेशव्यांच्या राज्याचें भयंकर नुकसान झालें. आणि या नुकसानीला आपण पुढाकार घेतल्यानें कारणीभूत झालों म्हणून झालेली चूक निस्तरतां यावी व पुन्हां पेशव्यांच्या राज्याची स्थिरस्था-

वरता होऊन झालेलें नुकसान भरून काढतां यावें अशा धोरणाची योजना आंखण्याचा बापूंनीं विचार चालविला.

१४. सखारामबापूंनीं आपल्या कृतकर्माच्या शुद्धीकरतां जी योजना मनांत आंखली त्यांत मोरोबादादा फडनविस हें प्रमुख असल्यानें त्यांच्यासंबंधीं थोडी माहिती येथें देणें प्राप्त आहे. बारभाईंचें कारस्थान उभारतांना सखारामबापूंनीं ज्या कांहीं लोकांस आपल्या विचारांत घेतलें होतें त्यांपैकीं मोरोबादादा हे एक होते.[१] पुढें बापूंकडे वडीलकी व नानांकडे अखत्यारी असे अधिकार आल्यामुळें मोरोबादादांना कोणतीच महत्वाच्या अधिकाराची जागा मिळूं शकली नाहीं. त्यामुळें ते बारभाईंच्या कारभारांत उदासीन राहिले. मोरोबादादा हे सामान्य इसम नव्हते. त्यांनीं माधवराव पेशव्यांच्या वेळीं मुख्य कारभाऱ्याचें काम केलें होतें. मोरोबा बारभाईंच्या कारभारांतून मन काढून ज्या वेळीं शिवनेरीस जाऊन राहिले त्या वेळीं लोकमत असें होतें कीं, "दादास निराळें टाकलें हें वाईट केलें. हे उगीच राहणार नाहीं, जैसे बापू, नाना येक झाले त्याप्रमाणें यास मसलतींत घ्यावे."[२] परंतु नाना व बापू यांनीं त्यांना कोणत्याही मसलतींत घेतलें नाहीं. त्यामुळें मोरोबांस राग आला. त्यांनीं बारभाईंच्या कारभारास अडथळा आणण्याकरतां खटपट सुरू केली. मोरोबांच्या मनांत राघोबादादांविषयीं कांहीं किल्मिष नव्हतें. त्यांनीं बजाबा पुरंदरे व बापूजी नाईक यांचें सहाय्य घेतलें व त्यांच्या बळावर सखारामबापू, नाना फडनविस, गंगाबाई व सवाईमाधवराव यांना पकडून राघोबादादा यांना गादीवर आणण्याचा घाट घातला. पावसाळ्यांतील पुरंदर किल्ल्याच्या थंड हवेमुळें कारभारी वगैरे मंडळी सासवडास रहावयास आली असतांना त्या चौघांस एकदम कैद करण्याचा व्यूह मोरोबांनीं रचला. परंतु या कटाची बातमी नानांस थोडी आगाऊ समजल्यामुळें तारीख ३० जून इ. स. १७७४ रोजीं, रातोरात पाऊस पडत असतांनाही, सर्व मंडळी पुरंदर किल्ल्यावर निघून गेली.

१ कानेटकरकृत सखारामबापूंचें चरित्र पा. १७४. २ पेशवे दप्तर भाग ५ पा. १७.

त्यामुळें मोरोबांचा पहिला प्रयत्न फसला. त्याचप्रमाणें पुढें सप्टेंबर महिन्यांत पुरंदर किल्ल्यावरही फितूर करून या चौघांस कैद करण्याचा त्यांनीं दुसरा प्रयत्न केला. पण तोही साधला नाहीं.

१५. पुढें पुरंदर सोडून सखारामबापूंना साताऱ्यास जावयाचें होतें. तेव्हां मागें मोरोबा कांहीं तरी गडबड करतील म्हणून त्यांना साताऱ्यास आपल्याबरोबर नेण्याचा त्यांनीं विचार केला. "आपण आलियाखेरीज साताऱ्याकडे न जावें असें चित्तांत आहे. पहिल्या मुहूर्तानेंच यावें."[१] असें बापू मोरोबांस लिहितात. या त्यांच्या मुलाखतींत बापूंनीं मोरोबांची काय समजूत काढली तें समजत नाहीं. परंतु त्यानंतर मोरोबांनीं विशेष कांहीं हालचाल केलेली दिसत नाहीं. नानांनीं शिंद्यांना आपलेसें करून घेतल्यानंतर सखारामबापूंचें उच्चाटण करण्याच्या उद्देशानें त्यांनीं इ. स. १७७७ मध्यें मोरोबांना आपल्या पक्षांत घेण्याचा प्रयत्न केला. सैन्यखातें नवीन निर्माण करून त्यावर मोरोबांची योजना करावी व त्यांस साडेचार लक्षांचा सरंजाम द्यावा असें नानांनीं सुचविलें. परंतु त्यास बापूंनीं हरकत घेतली. पुढें इ. स. १७७८ च्या जानेवारींत बापूंनीं कबुली दिली. पण तें काम करण्यास मोरोबा स्वतःच तयार नव्हते. ते बापू व नाना यांना कारभारांतून हांकून देण्याचें उघड उघड बोलत होते. त्यांना बारभाईंचा चाललेला कारभार अगदीं पसंत नव्हता. त्यांना राघोबादादा पुन्हां गादीवर येणें पाहिजे होतें. दादासाहेब गादीवर आल्याखेरीज राज्याची घडी बसत नाहीं व सर्व राज्यांत उत्पन्न झालेले बखेडे थांबत नाहींत असें त्याचें ठाम मत झालें होतें. सखारामबापूंनीं मोरोबांना पुढाकार देऊन नानांचें उच्चाटन करावें व त्यांना त्यांच्या कृत्यांबद्दल शासन द्यावें असें ठरविलें.

१६. इ. स. १७७८ च्या मार्च महिन्याच्या प्रारंभीं, शिवरात्रीकरतां नाना मेणवलीस गेले असतां, "त्यांच्या गैरहजेरींत एका रात्रीं सखारामबापू सासवडाहून व मोरोबा जेजुरीहून येऊन एका स्थळीं गुप्तरूपें भेटले. त्या समयीं

---

१ पारसनीस संग्रह.

दोघांचे करारमदार व आणाशपथा झाल्या. [1]" त्यांच्या राजकारणाचें स्वरूप खालीलप्रमाणें होतें.

(१) राज्याची मालकी व पंतप्रधानाचें पद सवाईमाधवराव पेशवे यांजकडे हल्लीं आहे. त्याप्रमाणेंच पुढेंही असावें. त्यांत फेरफार करावयाचा नाहीं.

(२) पेशव्यांचें वय लहान, सबब ते प्रौढ दशेंत येतपर्यंत श्रीमंत दादासाहेबांस पेशव्यांच्या जागीं स्थापावें. 'वडीलकी' चा मान हल्लीं सखारामबापूंकडे आहे, तो दादासाहेबांकडे असावा.

(३) पेशवाईचे मुख्य कारभारी सखारामबापू आहेत. तोच अधिकार त्यांजकडे चालावा. त्यांजकडे सरंजामाचा मुलुख, तैनाना, इनामें व मानमरातब सरकारांतून जे जे चालत आहेत ते ते पुढेंही निर्बाध चालावे.

(४) अखत्यारीचा कारभार व दुय्यम कारभार नाना फडनविस यांजकडे आहे. तें काम मोरोबांकडे चालावें. नानाचा कारभाराशीं कांहींएक संबंध असूं नये.

१७. या चार कलमांवर सखारामबापू व मोरोबा यांच्या राजकारणाची उभारणी झाली होती. पहिल्या कलमानें, सवाईमाधवरावांसंबंधीं "गंगाबाई प्रसूत होऊन मूल झालें तें निवर्तलें असून त्याच्या जागीं दुसरें बनावट मूल ठेविलें; [2] पांच जणी गरोदर बायका मुद्दाम जवळ ठेविल्या होत्या." अशा ज्या कंड्या उठल्या होत्या त्या खोट्या ठरवून सवाईमाधवराव हे खरे आहेत, व ते पेशव्यांच्या राज्याचे खरे मालक आहेत हें दाखवून दिलें आहे. दुसऱ्या कलमानें राघोबादादांना सवाईमाधवरावांचे अज्ञानपालनकर्ते ह्मणून ठरविलें आहे. त्यामुळें, राघोबादादांवर पुतण्याचा खून करविला असा जो आरोप बारभाईंनीं केला होता, तो साफ धुतला गेला आहे. राघोबादादांनीं राज्यतृष्णेकरतां नारायणरावांचा जर खून करविला असतां, तर त्यांच्या लहान मुलाला—सवाईमाधवरावांना त्यांची आईही मृत्यू पावली असल्यानें तो अनाथ झालेल्या स्थितींत व राघोबादादांना बाजीराव हा औरस मुलगा जन्माला आला असतांना

१ अधिकारयोग पान ७०. २ मराठे व इंग्रज पा. ६४.

सवाईमाधवरावांचे त्यांना अज्ञानपालनकर्ते ठरविण्याची गोष्ट घडली नसती. पण ही गोष्ट घडली एवढेंच नव्हे तर या गोष्टीला फक्त नाना फडनविस व त्यांचे हस्तक यांखेरीज सर्वांची अनुमती मिळाली. यावरून दादासाहेब गुन्हेगार नव्हते हेंच सिद्ध होतें. इतके दिवस 'सोपटाला साप समजून' ज्या बारभाईंनीं दादासाहेबांना बडविलें, त्या बारभाईंच्या भयंकर चुकीचें परिमार्जन व्हावें या उद्देशानें पूर्वस्थानीं दादासाहेबांची स्थापना करण्याचें ठरविलें गेलें. दुसऱ्या कलमानें दादासाहेबांना पूर्ण निर्दोषी ठरविण्यांत आलें. सखारामबापू हे बारभाईंच्या कारस्थानाचे उत्पादक नेते ह्मणून ते गुन्हेगार ठरतात. परंतु त्यांची गैरसमजूत करून दिल्यामुळें त्यांनीं जरी राघोबादादांविरुद्ध बारभाईंचें बंड उभारलें होतें, तरी त्यांची राघोबादादा हे निर्दोषी आहेत अशी खात्री झाली त्या वेळीं कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन ते पुन्हां दादासाहेबांच्या स्थापनेला प्रवृत्त झाले, यावरून ते निर्मळ मनाचे व शुद्ध भावनेचेच ठरतात. एवढ्याकरतां त्यांचा गैरसमजुतीनें झालेला गुन्हां क्षम्य ठरविण्याकरतां तिसरें कलम घालण्यांत आलें आहे. तिसऱ्या कलमानें सखारामबापूंचें पूर्वस्थान अबाधित राखलें आहे. चवथ्या कलमानें नाना फडनविस, हे लुच्चे, लबाड, स्वार्थी, कपटी, दुराचारी, राज्यघातकी असल्यामुळें पेशव्यांच्या कारभारांतून त्यांची पूर्णपणें हाकलपट्टी केली आहे, व त्या जागीं फडनविसांच्या घराण्याचा आजपर्यंतचा नांवलौकिक कायम राखण्याकरतां अहर्निश झटणारे मोरोबादादा यांची योजना केली आहे. अर्थात् मोरोबादादा नानांच्या जागीं कारभारांत आल्यावर अखत्यारीचा व दुय्यम कारभाराचा अधिकार त्यांचा होता, ह्मणून नानांचा सरंजाम वगैरे त्यांना मिळून नाना निर्माल्यवत् होऊन, त्यांना त्यांच्या कृतकर्माचें प्रायश्चित्तही मिळणार होतें. एकंदरींत मोरोबादादा व सखारामबापू यांची हीं नवीन राजकारणांतील कलमें पेशवाईच्या सुव्यवस्थित पुनर्घटनेचीं व राज्याच्या हिताचींच होतीं हें शहाण्यांनासुद्धां मान्य करावें लागेल!

१८. वर दर्शविल्याप्रमाणें ही मसलत जरी फक्त नानांचा पक्ष खेरीज करून सर्वमान्य ठरण्यासारखी होती, तरी ती पार पाडण्याला सैन्याची

मदत पहिल्यानें पाहिजे होती. ह्मणून मोरोबांनीं कांहीं पठाण व गारदी चाकरीस ठेवले. होळकरांस पांच लक्ष रुपये देऊन त्यांजपासून मदतीचें अभिवचन घेतलें. इंग्रज वकील मॉस्टीन यानें मोरोबांपाशीं इंग्रजांच्या मदतीनें भडक चित्र रंगविलें होतें, तेव्हां इतकें झाल्यावर प्रसंग पडल्यास इंग्रजांची मदत असावी म्हणून मॉस्टीन यासही मोरोबांनीं आपल्या खलबतांत घेतलें. याच सुमारास राघोबांनीं मोरोबांकडे बाबूरावास पाठवून त्याच्यामार्फत सखारामबापूंशीं बोलणें लाविलें होतें. आपला वडीलकीचा मान कारभारी कबूल करीत असतील तर कारभारांतील बऱ्याच सवलती आपण कारभाऱ्यांना देण्यास तयार आहों व याची सत्यता पटण्याकरतां 'दहा शुचिर्भूत ब्राह्मणांसमोर आपण शपथ[1] घेऊं' असें राघोबांचें म्हणणें होतें. राघोबादादा हे मोरोबा, बजाबा व सखारामबापू यांच्या ह्मणण्यास तयार झाले. मोरोबांनीं त्याप्रमाणें मुंबईच्या गव्हर्नरास पत्र लिहून सखारामबापू, होळकर, बजाबा पुरंदरे यांच्यासारखी बडीबडी मंडळी राघोबास अनुकुल होतील; तेव्हां इंग्रजांनीं राघोबांस फौजेसह पुण्यास आणावें असें कळविलें. नानांनीं सेंट ल्यूबीन या फ्रेंच वकिलांस दरबारीं ठेवून घेतल्यामुळें इंग्रजांचाही रुसवा नानांवर झाला होता. तेव्हां त्यांनीं मोरोबांच्या मसलतीस मान्यता दिली व त्याप्रमाणें मुंबईच्या कौंसिलांत पुढील ठरावही करून घेतला. "सखारामबापूसारखा पहिल्या दर्जाचा अधिकारी व दिवाण व कर्नल अप्टननें ज्याच्याशीं तह केला व ज्याची तहावर पहिली सही आहे असा वडा मनुष्य आपणास सैन्याची मदत मागेल तर ती जरूर देण्यांत येईल. त्यामुळें मराठ्यांशीं मागें झालेल्या तहास यत्किंचितही बाध येऊं शकत नाहीं." इकडे मोरोबांनीं सांगितल्यावरून इंग्रजांचा वकील मॉस्टीन हा मुंबईस गेला व राघोबांस घेऊन पलटनासहित साष्टीस येऊन राहिला. सूचना मिळाल्यावर इंग्रजांनीं पुण्यास यावें असा मोरोबा व इंग्रज यांचा बेत ठरला. या मदतीबद्दल ३६ लक्ष रुपये मोरोबांनीं इंग्रजांस देण्याचें कबूल केलें.

---

१ कानिटकरकृत सखारामबापूंचें चरित्र पा० १८२.

१९. नाना मेणवलीहून परत आल्यावर आपल्याविरुद्ध कांहीं राजकारणें घाटत आहेत, असा त्यांना संशय आला. त्यांचा व निजामाचा स्नेह असल्यामुळें त्यांनीं त्यांचेकडे फौजेची मागणी केली. निजामानें फौजेची सिद्धता करून डेरेही दिले. हरिपंत व परशुरामभाऊ हैदरवरील आपली मोहीम अर्धवट टाकून मिरज प्रांतीं महादजीस मिळवून घेण्यासाठीं परत येऊं लागले. शिद्यांनीं करवीरकरांशीं कसाबसा तह उरकून घेतला. बाजीपंत व अप्पा बळवंत हेही कृष्णातीराहून घाईघाईनें पुण्याकडे यावयास निघाले. या सर्व गोष्टीवरून नाना आपली फौज पुण्यास एकत्रित करण्याच्या विचारांत आहेत हें बापूंना स्पष्ट दिसूं लागलें. एवढ्यांत एके दिवशीं मोरोबांचे शिद्दी फराद व आठशें पठाण नोकरी पहाण्याच्या निमित्तानें पुण्यांत आले. नानांच्या शिपायांच्या व त्यांच्या कांहीं कारणावरून चकमकी झाल्या. चौकशींत हे लोक मोरोबांच्या पक्षाचे आहेत एवढी गोष्ट जाहीर झाली. नानांनीं पकडलेल्या कांहीं लोकांस फांशीं दिलें व कांहींना कैदेंत ठेवलें. हा प्रकार झाल्यामुळें सखारामबापूंनीं मोरोबांस निरोप पाठविला कीं, " मंत्र फुटला त्वरा करा. "

२०. याप्रमाणें सखारामबापूंकडून मोरोबांस इषारत मिळतांच, ते आपल्या मंडळीसह बारामतीस गेले. तेथें आपलीं मुलेंमाणसें बारामतीकरांच्या रक्षणाखालीं ठेऊन दादासाहेबांचे जांवई पांडुरंगपंत यांस बरोबर घेऊन ते वाफगांवीं आले. तेथें राजेबहादुरांचा मुलगा रघुनाथराव आपल्या पथकासह आला होता. चिंतो विठ्ठल, बजाबा पुरंदरे, गोपाळ नाईक, बाळाजीपंत दामले, व सदाशिवराव रामचंद्र हे सारे होळकरांस येऊन मिळाले होते. या वेळीं होळकरांच्या फौजेसुद्धां सुमारें सोळा सत्रा हजार फौज गोळा झाली. तेव्हां मोरोबा ही फौज घेऊन पुण्यावर चाल करून आले. त्यांनीं पुणें ताब्यांत घेतलें. शहराभोंवतीं चौकीपहारे बसविले. नानांस या वेळीं कांहीं सुचेनासें झालें. तेव्हां ते एकदम पुरंदरास निघून गेले. मोरोबांनीं शनिवारवाडा ताब्यांत घेतला. वाड्यांत पार्वतीबाई होती.

तिच्याकडून दिवाणगिरीचीं वस्त्रें, मुतालिकीची शिक्केकटयार, जरीपटका व नौबत हीं घेतलीं. नंतर ते होळकरांसह पुरंदरावर चाल करून येऊं लागले.

२१. नाना त्याच वेळीं पुण्याहून पळून गेले म्हणून वांचले. "पुरंदरच्या किल्लेदारांनीं नानांस आंत घेण्याचें साफ नाकारलें.[1] म्हणून ते खालीं नारायणाचें देऊळ होतें तेथें येऊन राहिले. त्यांनीं त्यांतल्या त्यांत पांचसहा हजार फौज गोळा केली. पण त्यांत त्यांचें हजार स्वारांचें पथक व प्रतिनिधींचें पांचशें स्वारांचें पथक एवढीच काय ती त्यांच्या विश्वासाची फौज होती. नंतर नानांनीं सखारामबापूंस बोलावून आणलें. तेव्हां बापूंनीं नानांस या आणीबाणीच्या प्रसंगीं मोरोबादादा यांच्या बरोबर समेट करण्याची सूचना केली. तेव्हां नाना प्रसंगांत सांपडल्यामुळें त्यांनीं ती गोष्ट कबूल केली व त्या प्रकरणीं मध्यस्ती करण्याकरतां नानांनीं बापूंस विनंति केली. बापूंनीं ही गोष्ट मान्य केली व ते नानातर्फे मोरोबांकडे वकिली करण्याकरतां सासवडास निघून गेले. नाना मात्र पुरंदराखालीं देवळांत राहिले. सखारामबापूंनीं मोरोबांस सांगून पाठविलें कीं, तुम्हीं फौजेसह पुरंदरावर चालून येऊं नये. मीच तुमच्या भेटीकरतां कवडी येथें येतों व सर्व गोष्टी तुमच्या मनःप्रमाणें करून देतों.

२२. सखारामबापू व मोरोबा यांच्या या राजकारणांतील मनसुब्यांत फक्त एकाच गोष्टीविषयीं परस्परात मतभिन्नता होती. उभयतांचे मनांत राघोबादादांनीं पुन्हां गादीवर यावें हें प्रामुख्यानें होतें. परंतु दादासाहेबांनीं एकट्यानेंच पुण्यास यावें असें बापूंच्या मनांत होतें. या कामीं दादासाहेबांसह इंग्रजांचा संबंध बापूंना नको होता. मोरोबांचें तसें नव्हतें. नानांची कारभारांतून पूर्णपणें हांकालपट्टी करण्याकरतां इंग्रजांची त्यांना मदत पाहिजे होती. नानांच्या पक्षाचे शिंदे होते. त्यांना तोंड देण्याकरतां होळकर सिद्ध झाले होते. हरिपंत फडके व पटवर्धन यांच्याबरोबर सामना देण्याला, सखारामबापूंचें पथक स्वतः मोरोबाची फौज, चिंतो विठ्ठल, बजाबा, बारामतीकर, रघुनाथ नारायण, सदाशिव

---

१. पार्शियन कॅलेंडर ५ पान १६२.

रामचंद्र वगैरे सरदारांची फौज होतीच. शिवाय दादासाहेबांच्या पक्षांतील सरदार मोरोबांना वश होऊन तेही उपयोगीं पडणार होते. यामुळें हरिपंत फडके व पटवर्धन यांचा बंदोबस्त सहज होऊं शकला असता. शिवाय ते कर्नाटकांत गेल्यापासून त्यांच्या फौजेची फार दुर्दशा झाली असल्यामुळें त्यांची विशेष भीति बाळगण्याचें कारण नव्हतें. शिवाय पटवर्धनांना शह देण्याकरतां करवीरकर व हैदर हे होतेच. परंतु नानांच्या पक्षाला निजाम असल्यामुळें त्याच्या पारिपत्याला इंग्रजांच्या मदतीखेरीज तरुणोपाय नाहीं असें मोरोबांचें मत होतें. क्रांति करावयाची तर ती बीमोड होईतोंपर्यंत करावी हा नानांच्या स्वभावांतील गुण मोरोबांमध्येंही होता. ह्मणून काय वाटेल तें नुकसान झालें तरी इंग्रजांना आपल्या मदतीस घ्यावें असें मोरोबांस वाटत होतें. दादासाहेब पुण्यास आले पाहिजेत व त्यांच्याबरोबर इंग्रजांचीही पूर्णपणें मदत पाहिजे, या दोन्ही गोष्टी मोरोबांना साधावयाच्या होत्या. सखारामबापूंना इंग्रजांचें लोढणें अडकवून न घेतां नानांना राज्यकारभारांतून कमी करून राघोबांना आणावयाचें होतें. त्यांत त्यांचें धोरण हें होतें कीं, या वेळीं इंग्रजांची मदत घेतली ह्मणजे पुरंदरचा तह उरावर कायमचा बसला. इंग्रजांस ते मागतील त्या व्यापाराच्या सवलती देणें प्राप्त होईल. सध्यां त्यांना फ्रेंच वकील प्रतिस्पर्धी उभा केला आहे, त्याची हाकालपट्टी होईल. इतके दिवस त्यांनीं दादासाहेबांना आश्रय दिला आहे, तेव्हां दादासाहेबांचें लक्षही इंग्रजांकडे राहून त्यांच्यामार्फत ते क्रमाक्रमानें पेशव्यांच्या राज्यांत हलके हलके पाय पसरूं लागतील. तेव्हां हें इंग्रजांचें हत्तीचें पिलूं सध्यां जरी लहान असलें, तरी तें पुढें पेशवाईला डोईजड होईल. म्हणून इंग्रजांचा संबंध न येतां अगर आला तरी त्यांच्याशीं आपला संबंध आणू न देतां, जें होईल तें करावें, व पुढें प्रसंग येईल त्याप्रमाणें वागावें असें मत बापूंचें होतें. त्या दृष्टीनें नानांच्यातर्फे वकिली करतांना बापूंना आपलें राजकारण पेशवाईच्या राज्याला हितपरिणामीं होईल असें साधावयाचें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं मोरोबांशीं समेटाची भाषा चालविली. मोरोबा व सखारामबापू यांच्या कवडी येथील मुला-

खतीचा सारांश असा होता कीं, " अखत्यारीचा कारभार नानांकडे आहे तो ते तुमच्या हवालीं करण्यास कबूल आहेत. नानांचें ह्मणणें एवढेंच आहे कीं, आपणाकडे किल्ले कोट, सरंजाम व पुरंदरचा बंदोबस्त वगैरे जें जें चालत आहे तें तें मोरोबांनीं आपणाकडे चालवावें. त्यांत ढवळाढवळ करूं नये. मोरोबांनीं अखत्यारीचा जो कारभार करणें असेल तो आपल्या सल्लयाखेरीज करूं नये. या दोन गोष्टीवर नाना समेटास तयार आहेत. केवळ वळजबरीनें पुरंदर व पेशवे हातीं घेऊं असें ह्मणून तुमचें चालणार नाहीं. प्राण गेला तरी बेहत्तर, पण पेशव्यांस तुमच्या हातीं लागूं द्यावयाचें नाहीं हा नानांचा निश्चय आहे. लढाईच्या भरीस पडाल तर तुह्मांस जड जाईलसें वाटेंत. पेशवे व छत्रपती नानांच्या हातीं आहेत. ते पाहिजे तें करूं शकतील. आज मितीस किल्ले, पैका, फौज, सरदार हे सर्व त्यांच्या लगामीं आहेत. निजाम अल्ली, भोंसले यांच्याबरोबर त्यांचीं राजकारणें पक्कीं आहेत. अखत्यारी एकदां तुमच्या हातीं आली ह्मणजे आस्ते, आस्ते, नानांचें सामर्थ्य कमी करतां येईल. हें न साधलें तर दादासाहेब व इंग्रज यांना आणण्याचें तुमचें निर्वाणीचें शस्त्र आहेच. समय पाहून त्याची योजना करतां येईल.[1]" याप्रमाणें वाटाघाट होऊन त्याबद्दल उभयतांत याद ठरली. तिचीं चार कलमें होतीं तीं अशीं.

(१) " सखारामबापूंनीं ' देणें ' करावें. ' वडीलपण ' आहे तसेंच त्यांजकडे असावें. त्यांस पुसल्याशिवाय कामकारभार करूं नये.

(२) अखत्यारी राजश्री मोरोबादादांनीं करावी. नानांस संमतांत घ्यावें. ' देविणें ' नानांनीं करूं नये.

(३) सर्वत्रांचें (सरंजाम, तैनाता, इनामें वगैरे) यथापूर्व चालवावें. कोंकणस्थ, देशस्थ हें चित्तीं आणूं नये.

(४) दादासाहेबांस तूर्त आणूं नये. पुढें आणिलें तर आणावें. "

२३. याप्रमाणें ही चार कलमांची याद ठरल्यावर बापू व मोरोबादादा पुरंदरास आले. तेथें बापूंनीं मोरोबांची व नानांची भेट करून दिली.

---

1 अधिकारयोग पान ७४.

लगेच बजाबा व चिंतो विठ्ठल आले. मग पांचही इसमांनीं श्रीमंतांस भेटून नजरा केल्या. मागाहून होळकर आले. त्यांची भेट किल्याखालीं नानांनीं श्रीमंतांस आणून उभाउभी करविली. तूर्त तरी चोहोंकडे स्वस्थ झालें. मोरोबांचें राजकारण जें दूरवर फैलावणार होतें तें सखारामबापूंच्या मध्यस्तीनें थोडक्यांत शांत झालें. याबद्दल सखारामबापूंच्या शहाणपणाची चोहोंकडे फारच वाहवा झाली. ही गोष्ट तारीख ३ एप्रिल स. १७७९ रोजीं घडली.

२४. पेशवाईच्या कल्याणाच्या दृष्टीनें बापूंचें या वेळेचें वर्तन खरोखरच मोठें स्पृहणीय आहे. बापूंना नाना जरी नको होते, तरी पेशवाईचें अकल्याण होऊन त्यांनीं कारभारांतून जाणें त्यांना पसंत नव्हतें. पेशवाईचें अकल्याण न होतां ते कारभारांतून गेले पाहिजेत असें त्यांना वाटत होतें, त्याचप्रमाणें दादासाहेबांना पुण्यास आणून त्यांची स्थापना पुन्हां करावी हें त्यांना प्रिय होतें. परंतु तेंही काम पेशवाईचें नुकसान न होतां व्हावें, अशी त्यांची इच्छा होती. राज्याचे जे खरे हितचिंतक असतात, त्यांची दृष्टि अशीच असावी लागते. या सनेटामध्यें बापूंनीं मोरोबातर्फे इंग्रजांस आणण्याचें टाळलें व दुसरीकडे नानांच्यातर्फे निजामाच्या सहाय्याचेंही बंद पाडलें. एकूण बापूंची मध्यस्थी राज्याच्या हिताची अशीच झाली. फक्त दादासाहेबांना पुण्यास आणण्याचें काम मात्र थोडें लांबणीवर पडलें. त्याला इलाज नव्हता. दादासाहेब या वेळीं एकटे नव्हते. ते इंग्रजांचे पाहुणे होते, इंग्रजांच्याच तंत्रानें त्याना वागणें प्राप्त होतें.

२५. राघोबादादा या वेळेस इंग्रजांची मदत न घेतां एकटे पुण्यास आले असते, तर कारभाऱ्यांनीं त्याचें स्वागत केलें असतें, असा एक उल्लेख पर्शियन कॅलेंडर्स मध्यें[1] मिळतो. परंतु राघोबादादा एकटे पुण्यास येणें शक्य नव्हतें. कारण पुण्याच्या कारभाऱ्यांनींच बंड उभारलें असल्यामुळें व तेच आपणाला बोलावीत आहेत, तेव्हां दादासाहेब त्यांच्यावर किती प्रमाणा-

१. प. कॅ. ५ पान १७५.

वर विश्वास ठेवावयाला तयार होतील हा एक प्रश्न होताच. दुसरी गोष्ट ह्मणजे आनंदीबाईच्या पत्रांतून राघोबांस पकडून कैदेंत ठेवण्याचा कारभाऱ्यांचा उद्देश होता हें स्पष्ट दिसतें.[१] राघोबांनीं मोरोबा, बापू, नाना व होळकर यांना असें कळविलें कीं, सवाईमाधवरावांच्या नांवें राज्य चालावें. दिवाणी आपला मुलगा बाजीराव यास द्यावी व मोरोबास अखत्यारी द्यावी; सवाईमाधवराव व बाजीराव वयांत येईपर्यंत राघोबांनीं वडिलपण करावें, म्हातारपणामुळें बापू काम करणार नाहींतच; तेव्हां ते पुण्यांत असेपर्यंत त्यांची सल्ला मसलत घ्यावी,[२] इत्यादि अटी मान्य करण्यास आपण तयार आहों. दादासाहेबांच्या अटी अशा होत्या, त्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, त्यांना पेशव्यांचें राज्य नको होतें. तर वडिलोपार्जित चालत आलेला त्यांचा दिवाणीचा हक्क त्यांना पाहिजे होता. ते आपल्या सनदशीर हक्काकरतां भांडत होते, व त्यांच्या वंशांत तो चालावा म्हणून त्यांची खटपट होती. परंतु सखारामबापूंच्या मध्यस्तीनें मोरोबा व नाना यांच्यांत वर दर्शविल्याप्रमाणें समेट झाल्यामुळें दादासाहेबांच्या अटी मान्य करून त्यांना पुण्यास आणण्याचें काम तूर्त तरी लांबणीवर पडलें. तथापि इंग्रजांचा वकील मोस्टीन यानें मात्र मोरोबांच्या मागें दादासाहेबांस बोलावण्याची सारखी निकड लाविली होती. "राजकारण ठरल्याप्रमाणें लांबणीवर टाकूं नये."[३] अशा अर्थाचीं पत्रें मोरोबांस जात होतीं.[४]

२६. मोरोबांकडे अखत्यारीचें काम आल्याबरोबर जे कारकून नानांकडे होते ते सर्व आपापलीं दप्तरें घेऊन मोरोबांकडे येऊन बसले. प्रांतोप्रांतींच्या फिर्यादी घेणें व तेथील अंमलदारांस ताकीदपत्रें लिहिणें, सर्व खात्यांच्या वर्धा घेणें व नवीन हुकूम देणें, तंट्याचे निकाल लावण्यासाठीं पंचायती नेमणें, हरएक प्रकारचा मुलकी व फौजदारी खात्यांकडील बंदोबस्त राखणें,

१. प क्र. ५ पान १३०; ऐतिहासिक टिपणें १ पान २९. २. प. क्र. ५ पा. १६९–७०. ३ पा. सं. मॉस्टिन पत्रें १–४. ४ कानिटकरकृत सखारामबापूंचें चरित्र पा. १८९.

अशीं एक ना दोन, जीं जीं कामें नानांकडे होतीं तीं सारीं आतां मोरोबा करूं लागले. होळकरांच्या दपटशामुळें असा कडेकोट बंदोबस्त होऊन गेला कीं, मोरोबांच्या हुकमाखेरीज राज्यांतलें पानसुद्धां हालूं नये. मोरोबांच्या घरीं दररोज दरबार भरत, त्यांत राज्यांतले तमाम सरदार व सुभेदार यांचे व परकी राजेरजवाडे यांचे वकील हजर राहून आपापल्या कामाविषयीं विनंति करीत. प्रत्येक काम अखेर निकालाकरतां नानाप्रमाणेंच मोरोबाही सखारामाकडे नेत. याप्रमाणें पेशव्यांचा राज्याचा कारभार सुरळीत चालू झाला.

२७. मोरोबा अखत्यारीचें काम पाहूं लागले, ही गोष्ट नानांस मानहानीची वाटली. आपल्या एकट्याच्या हातीं सर्व पेशवाईचीं सूत्रें असावीं व आपण एकटेच पेशवाईच्या कारभाराचे मालक व्हावें अशी फाजील महत्वाकांक्षा नानांची होती. परंतु मोरोबांनीं राजकारण लढवून त्याला खो घातला हें नानांना रुचणें शक्य नव्हतें. त्यांनीं मोरोबांच्या पक्षांतील सर्व लोकांना कसें अडकवितां येईल याचा चक्रव्यूह तयार करण्यास सुरवात केली. त्यांनीं करवीरहून महादजी शिंद्यांस परत बोलाविलें. बाजीपंत व आपा बळवंत यांस वाटेंतच मुक्काम करून राहण्यास सांगितलें. नागपूरकर भोंसल्यांची फौज माहूरच्या सुमारें आणून ठेवली. पटवर्धन सरदार व हरिपंत फडके हे शिंद्यांना येऊन मिळण्याच्या तयारींत राहिले. अशा प्रकारें सर्व सैन्याची जुळवाजुळव नानांनीं केली. व आपला इषारा मिळतांच त्यांनीं पुण्यावर चाल करून यावें असा घाट घातला. याप्रमाणें चोहोंकडची स्थिति लक्षांत घेऊन नानांनीं जी मसलत ठरविली तिचा नकाशा पुढें दिल्याप्रमाणें होता.

२८. "मोरोबा[१] व सखारामबापू या दोघांच्याही मनांतून दादासाहेब व इंग्रज यांस आणावयाचें नाहीं. आपण जरब दाखवून यांस भाग पाडूं तर मात्र ते त्यांस आणतील. याकरतां त्यांशी वागण्यांत हल्लीं आपण

---

१ अधिकारयोग पान ८०.

लीनता धरली आहे ही अशीच आणखी कांहीं दिवसपर्यंत कायम ठेवावी. आपण दुर्बल झालों, हारीस आलों, तुह्मांपुढें आमचें कांहीं चालत नाहीं, तुमचा अधिकार आह्मीं शिरसामान्य केला, असेंच सोंग आणावें. तेणें-करून सखारामबापू निर्धास्त राहतील आणि इंग्रज व दादासाहेब यांस आणण्याचें त्यांस तादृश अगत्य भासणार नाहीं. पुण्यावर स्वारी करण्यास एप्रिल व मे एवढेच काय ते दोन महिने आतां इंग्रजांस सोईचे राहिले आहेत. एवढे कसे तरी काढले ह्मणजे राज्य निभावलें. पुढें जूनपासून पावसाळा सुरू झाल्यावर तोफा वगैरे अवघड सामान व लष्कराचें अनिवार लटांबर घेऊन इंग्रजांच्यानें घांट चढून पुण्यावर चालून येणें होत नाहीं खास. पुढें त्यांची ती ममलत आक्टोबर नोव्हेंबरवर जाणार. तेथपर्यंत शिंदे, फडके व पटवर्धन यांच्या फौजा आणून आपण मोरोबाचें बंड मोडून टाकूं. याप्रमाणें राज्यांत शांतता होऊन घरभेद्यांचा नायनाट झाल्या-वर मग इंग्रजांशीं वर्षानुवर्ष लढावें लागलें तरी तें काम तितकें कठिण नाहीं!"

२९. या नानांच्या विचारसरणीप्रमाणें एक गोष्ट अगदीं स्पष्ट होते, ती ही कीं, नानांना पेशव्यांच्या राज्याचा पूर्णपणें ताबा पाहिजे होता. त्यांना आपणाखेरीज दुसरा कोणीही कारभारांत नको होता. आपण ह्मणजे पेशवा, आपण ह्मणजे राज्य अशी त्यांची भावना झाली होती. आपण पेशवाईचे मालक व दुसरे सर्व बंडखोर ही त्यांची झालेली कल्पना वरील त्यांच्या विचारांतून स्पष्ट होते. मोरोबा व नाना यांच्यांत बापूंनीं समेट घडवून आणला व मोरोबांना कारभारांत घेतलें यामुळें पेशव्यांच्या राज्याला बळकटी आली व त्यामुळें सखारामबापूंची लोकांनीं वाहवा केली. सखारामबापू व मोरोबादादा यांच्या मनांत इंग्रज व दादासाहेब यांना पुण्यास आणवयाचें नाहीं असें स्पष्ट धोरण नानांना कळलें असतां, पाव-साळ्यांत त्यांचें बंड मोडण्याचें जें नानांनीं कारस्थान चालविलें याचा अर्थच असा कीं, इतर सर्व लोकांचे हक्क बुडवून आपण एकटेच त्या हक्कांचे

मालक बनावें, यासाठींच नानांनीं आपल्या कारस्थाची उभारणी चालविली, हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. मोरोबादादा व सखारामबापू यांना आपले अधिकार व अस्तित्व टिकवावयाचें होतें व नानांना त्यांचें सर्वस्व अपहार करावयाचें होतें. मोरोबा व बापू यांचें धोरण संरक्षणाच्या स्वरूपाचें होतें तर नानांचें केवळ चढाईचें ह्मणजे स्वार्थी व फाजील महत्त्वाकांक्षेचें होतें. हल्ल्याच्या प्रसंगीं वाघ ज्याप्रमाणें जमिनीला चिकटून कोणत्याच प्रकारें हालचाल न करतां, सावज आटोक्यांत येईपर्यंत तीक्ष्ण दृष्टि लावून बसत असतो, त्याप्रमाणें नाना लीन होऊन दबा धरून बसले होते. त्यांची शिंद्यांबरोबर व फडके-पटवर्धन यांच्याबरोबर अगदीं गुप्त अशीं राजकारणें घाटत होतीं. या कारस्थानाचा सुगावा मोरोबांस लागूं नये अगर चिट्ठी-चपाटी त्यांच्या हातीं लागूं नये, ह्मणून नाना आपलीं सर्व मसलतीचीं कामें मनुष्य पाठवून तोंडीच करीत होते. नानांची कोणी चिठी मागितल्यास ते ह्मणत 'लेख द्यावयाचा नाहीं.' यावरून त्यांचें कारस्थान किती गुप्त स्वरूपाचें होतें हें लक्षांत येईल. नानाखेरीज त्यांच्या पक्षांतील इतर सरदारांचा जो पत्रव्यवहार होई, तोही पूर्ण सांकेतिक भाषेंत होत असे. पुरंदराहून शिवाजीपंतानें मिरजेस गंगाधरराव पटवर्धन यांस लिहिलेला मजकूर पुढील-प्रमाणें आहे. "आपण लग्नाचा प्रकार दर्शविला, त्यास अवकाश थोडा राहिला. वऱ्हाडी जमा झाले पाहिजेत. समारंभ चांगला लौकिकाप्रमाणें झाला पाहिजे. येथें लग्नाच्या साहित्यांत आहेत. येथील साहित्यास गुंता नाहीं. तिकडून लग्न आलें ह्मणजे कार्यसिद्धि होईल. साहित्य करून गृहस्थ वाट पाहतात. पहिलेंच नाहीं ह्मटलें असतें ह्मणजे निश्चित राहते. निश्चयाचें सांगोन आतां अडचणी सांगों लागले, तथापि यांनीं वचन बळकट धरून बसले आहेत. त्यांचें येणें न झाल्यास आणखीकडे जसा मिळेल तसा (वर)[1] पहातील." याची तारीख २ मे सन १७७८ इ० अशी आहे.

---

१ अधिकारयोग पान ९१.

३०. या सांकेतिक भाषेंतील पत्राचा स्पष्टार्थ पुढीलप्रमाणें आहे. "शिंद्यांची फौज इकडे येणार ह्मणून लिहिलेंत, पण आतां मोहिमेचे दिवस थोडके राहिले. तितक्यांत मोरोबांचें खूळ मोडण्याची तजवीज झाली तर बरें. नाहीं तर मृगसाल सुरूं झालें ह्मणजे मोरोबा राज्यांतील मामलतींची घालमेल करणार आणि रसदेच्या रूपानें निम्मा वसूल मामलेदारांपासून घेणार. मग शिंदे येऊन काय उपयोग? दुसरे सरदारही जमा झाले पाहिजेत. बंदोबस्त चांगला झाला पाहिजे. नाना येथें मसलतीची तयारी करीत आहेत. येथल्या तयारीची काळजी नको. तिकडून फौज आली ह्मणजे कामच होईल. नाना तयारी करून वाट पहातात. शिंदे प्रथमच येत नाहीं ह्मणते, तरी हरकत नव्हती. येतों असें खात्रीनें सांगून आंता त्यांनीं तक्रारी सांगितल्या तरी त्यांच्या पहिल्या वचनावर विश्वास ठेऊन नाना स्वस्थ आहेत. ते येत नाहींत असें झाल्यास नाना अन्यत्र राजकारण करतील." याप्रमाणें त्या सांकेतिक पत्राचा अर्थ आहे. मोरोबा कारभारांत आल्यामुळें स्थिरस्थावरता झाली. पण मध्येंच नानांनीं नवीन मनसुबा सुरूं केला ह्मणून शिंद्यांनीं अळम्-टळम् चालविली होती. शिंद्यांनीं जर हातपाय गाळले असते तर नाना निजामाशीं राजकारण करून आपला इष्टहेतू साधणार होते. सध्यांच्या लग्नांत शिंदे हे वर होते. ते न आले तर त्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें 'आणखीकडे जसा मिळेल तसा' ह्मणजे निजामासारखा कार्य निभावून नेणारा ते पहाणार होते, हें स्पष्ट आहे. परंतु नानांचा हा बेत ओळखून शिंद्यानें कबूल केलें व त्याप्रमाणें पुण्याकडे येण्याकरतां त्यांच्या सैन्याच्या हालचाली होऊं लागल्या. 'मे[1] महिन्यांत शिंदे व हरिपंत यांच्या फौजा एकत्र होऊन नानांस मदत करण्यासाठीं पुण्याकडे यावयास निघाल्या,' असें मोरोबांस समजलें. नानाही फौज आणून अस्मानी सुलतानी करणार हें मोरोबांस नक्की समजल्यावर या प्रसंगांतून पार पडण्यास राघोबादादा

---

१ कानिटकरकृत सखारामबापूंचें चरित्र पान १८९.

व इंग्रज यांना आणल्याखेरीज गत्यंतर नाहीं, असा ठाम विचार करून मोरोबांनीं त्यांना आणणेकरतां गोपाळ नाईक तांबवेकर यांस मुंबईस पाठविलें. इंग्रजही मोरोबांच्या निमंत्रणाची वाट पहात होते. हें निमंत्रण जातांच व मोरोबाला आतां आपल्याखेरीज गत नाहीं असें पाहून इंग्रजांनीं पाय पसरण्यास सुरवात केली. त्यांनीं अशा अटी घातल्या कीं, "श्रीमंतांस पुण्यास आणून अधिकारावर स्थापण्याच्या कामगिरीबद्दल वसईचा किल्ला व परगणा आह्मांस बक्षिस मिळावा. मागच्या तहांत पेशवे सरकारांतून गुजराथेंत मुलुख देऊं केला आहे तो आह्मांस नको. त्याच्या मोबदला वसई परगण्यास लागून तितक्याच आकाराचा मुलुख आह्मांस द्यावा. शिवाय स्वारीच्या खर्चाबद्दल छत्तीस लाख रुपये द्यावे. या सर्व शर्ती कबूल करून सखारामबापूंनीं मुख्य कारभारी या नात्यानें सही शिक्यानिशीं आह्मांस लिहून द्यावें कीं, आमच्या बोलावण्यावरून तुह्मी श्रीमंत दादासाहेबांस घेऊन येत आहां ! [1] "

३१. यावरून पर्यायानें इंग्रजांस खालीलप्रमाणें गोष्टी व्हावयाला पाहिजे होत्या :—

(१) कारभारांतून नाना फडनविस निघावयाला पाहिजेत. (२) फ्रेंचांचें उच्चाटन होऊन त्यांस पुनः आसरा न मिळण्याचा बंदोबस्त झाला पाहिजे. (३) आपल्या गळ्यांत दादासाहेबांचें लोढणें अडकलें आहे तें निघून शिवाय त्यांची अशा अधिकारावर योजना झाली पाहिजे कीं, जेणेंकरून पुढें त्यांपासून आपणास अनेक फायदे करून घेतां येतील. (४) या तिन्ही गोष्टी पेशवे सरकाराच्या खर्चानें होऊन त्यांतही आपणास चार पैसे किफायत होईल अशी सोय असली पाहिजे. (५) शिवाय बक्षिस व मोबदला मिळून अशा सोईचा मुलुख मिळावा कीं, जेणेंकरून खुशाल घांटापर्यंत पाय पसरतां यावे. (६) आणि सर्वांत ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं,

---

१ अधिकारयोग पान ९०.

सखारामबापूंनीं लेखी आमंत्रण द्यावें. ही लेखी आमंत्रणाची शर्त ठरवि-ण्यांत बाहेरून दाखविण्याचा हेतू हा कीं, पुरंदरच्या तहावर बापूंची मुख्य कारभारी ह्मणून पहिली सही होती. याकरतां त्यांनीं आमंत्रण केलें ह्मणजे पूर्वीचा तह कायम राहून हा नवीन तह त्याची पुरवणी मानितां येईल व तह मोडल्याचें अपयश न घेतां साफसुरतपणें येण्यास आपणांस ठीक पडेल. पण पोटांतील मतलब असा होता कीं, बापूंनीं निमंत्रण दिलें ह्मणजे छत्तीस लाखांना योग्य जामीन मिळाला! इंग्रजांची ही मागणी अर्थात् पेशव्यांच्या राज्यनाशाची होती, ह्मणून सखारामबापू या मागणीस तयार झाले नाहींत. इंग्रजांऐवजीं आपलेच हितशत्रू नाना यांनीं सर्वस्व गिळंकृत केलें तरी चालेल; पण दुसरे घरांत घुसावयाला नकोत असा संकल्प करून बापूंनीं इंग्रजांना लेखी निमंत्रण करण्याचें नाकारलें. त्यामुळें इंग्रजांचा व मोरोबांचा मनसुबा बिघडला.

३२. सखारामबापूंनीं इंग्रजांस निमंत्रण देऊन त्यांस पुण्यास बोलवावयाचें नाकारलें, म्हणून मोरोबांस राग आला. त्यांनीं सखारामबापूंस कैद करण्याचाही घाट घातला. तेव्हां स्वसंरक्षणार्थ बापूंना नानाबरोबर मिळतें घेण्याचा प्रसंग आला. त्यांनीं आपल्यातर्फें भिमराव पानशे यांस नानाबरोबर सलोख्याचें बोलणें करण्याकरतां पाठविलें. नानांनाही तेंच पाहिजे होतें. मोरोबांचा कांटा काढण्याकरतां तूर्त तरी बापूंच्याबरोबर त्यांना मिळतें घेणें प्राप्त होतें. त्या प्रमाणें बापू व नाना यांचा पुन्हां सलोखा झाला. करवीरकरांबरोबर तह करून तारीख १५ मे रोजीं करवीरहून निघून तारीख ३१ मे रोजीं लोणंद येथें शिंदे येऊन पोंचले. तेथून ते मोरगांवास आले. त्या ठिकाणीं हरिपंत फडके व पटवर्धन यांच्या फौजा त्यांना येऊन मिळाल्या. त्या ठिकाणीं सखारामबापू व शिंदे यांची भेट झाली. बापूंनीं सर्व बाजूंनीं पडतें घेतलें. "हा दोष मजकडे. आमचेविषयीं क्षमा करावी. हा दोष मजकडे खरा पण राखावें. मोरोबा आपल्यास कैद करीत होता, म्हणून (तुम्हांकडे) निघून आलों. या उपरी नाना व तुम्हीं सांगाल तें ऐकूं. राजश्री हरिपंतांच्या व परशुरामपंतांच्या मनांत येविशीं वांकडें फार आलें आहे, त्यांची खातरजमा होत नाहीं, ती करावी."

याप्रमाणें त्यांचें म्हणणें शिंद्यांनीं ऐकून घेतल्यानंतर मोरोबांच्या पक्षांत सामील झाल्याबद्दल सखारामबापूंस त्यांचा गुन्हा माफ केला. यावरून एक गोष्ट सिद्ध होते कीं, इंग्रज आल्यामुळें पेशव्यांच्या राज्याचा नाश होतो, तो न व्हावा म्हणून बापूंनीं सर्व बाजूंनीं पड खाल्ली. या वेळीं फक्त बापूंच्या चिट्ठीची आवश्यकता होती. ती जर इंग्रजांना गेली असती, तर नाना, शिंदे, फडके, पटवर्धन वगैरे लोक कोणत्या डोंगरी किल्ल्याची हवा खाण्याकरतां गेले असते हें सांगतां येत नाहीं. पण या वेळीं बापूंनीं सर्व बाजूंनीं पड घेतली व नानांच्या पक्षाला जिवंत ठेवण्याचें पुण्य पदरीं बांधून घेतलें. इंग्रजांपेक्षां नाना बरा, या एका गोष्टीवर बापू नानांच्या पक्षाला आले. पण त्या वेळीं 'घरचा चोर जिवानिशीं मारी' याची कल्पना त्यांना आली नाहीं.

२३. बापूंनीं शिंद्यांची भेट घेतली त्या वेळीं सख्यांचा बखेडा शांत करण्याकरतां त्यांना त्यांनीं एक गुरुमंत्र दिला. तो असा "पुढील मसलतीविषयीं बापू म्हणाले कीं, लढाई केल्यानें दुतर्फा नुकसान होऊन राज्याचें वाटोळें होईल. याकरितां प्रस्तुतच्या बखेड्याचा कांहीं तडजोड करूनच निकाल काढिला[१] पाहिजे." हें बापूंचें म्हणणें शिंद्यांनीं मान्य केलें. यावरूनही पेशव्यांच्या राज्याची संघशक्ति नष्ट होऊं नये हेंच सखारामबापूंचें धोरण होतें व त्याच धोरणामुळें त्यांनीं सर्व बाजूंनीं नमतें घेतलें व आपल्या सर्व स्वार्थावर आणि अधिकारावरही त्यांनीं आपण होऊन लाथ मारली हें स्पष्टपणें दिसून येतें. या वेळीं नानांनीं जरी त्यांची नामधारी वडीलकी कायम ठेवली असली, तरी थोड्याच दिवसांत बापूंना डोंगरी किल्ल्याची हवा मिळणार होती हें भविष्य बापूंना माहीत नव्हतें असें नाहीं. असें असतांही त्यांनीं जाणूनबुजूनच, केवळ तत्त्वाकरतां, आपल्याला खड्ड्यांत पाडून घेण्याचीसुद्धां तयारी दाखविली. बापूंना दुटप्पी म्हणतात, पण ती गोष्ट खरी नाहीं. त्यांनीं आपलें राजकारणाचें धोरण शेवटपर्यंत 'समजाविशीचें' ठेवलें होतें. त्यांतच राज्यहित होतें, यांत संशय नाहीं.

---

१. अधिकारयोग पान १००.

३४. शिंद्यांनीं सखारामबापूंच्या सल्ल्याप्रमाणें धोरण ठरविलें. त्यांनीं बापूंची व नाना, हरिपंत, पटवर्धन यांची शक्य तेवढी दिलसफाई करून दिली. पुढें त्यांनीं होळकरांस आपल्या पक्षांत घेण्याचा मनसुबा चालविला. या बाबतींत पटवर्धन सरदार अगदीं विरुद्ध होते. 'मोरोबांच्या पंधरा सोळा हजार फौजेची आपल्या चाळीस हजार फौजेपुढें काय बिशाद आहे? त्यांना आह्मी हां हां ह्मणतां चिरडून टाकूं' अशा वल्गना ते करूं लागले. पण त्या वेळीं होळकरांची फौज ती आपलीच व आपली ती आपलीच हा पेशव्यांच्या राज्याचा आपुलकी भाव त्यांना येणें शक्य नव्हतें. त्यांना त्यांचा फक्त स्वार्थ दिसत होता. नानाही त्याच विचाराचे होते. पण ते संधि साधेल त्या वेळीं त्याचा फायदा घेणारे होते. 'उतावळा नवरा व गुढघ्याला बाशिंग' या ह्मणीप्रमाणें ते पटवर्धनां-प्रमाणें उतावीळ नव्हते. त्यांचा या वेळीं सर्व भार शिंद्यांवर होता व ते करतील ती पूर्व दिशा असें धोरण त्यांनीं या वेळीं ठेवलें होतें. शिंदे आपल्या हिताविरुद्ध कांहीं करणार नाहींत, हा भरवंसा त्यांना होता. 'फडणिशी शिंद्यांची व सरदारी नानांची' असा परस्परांच्या आणक्रियांनीं ताजा संबंध जोडला होता ह्मणून ते निर्धास्त होते.

३५. होळकरांची समजूत काढण्याकरतां स्वतः शिंदे दोन तीन वेळां त्यांच्या गोटांत गेले. त्या वेळीं होळकरांचें ह्मणणें खालीलप्रमाणें पडलें. "वृद्धांनीं (सखारामबापूंनीं) आह्मांस फसविलें. अब्रूस खत्ता पावलों. जें तुह्मीं केलें तें आह्मीं केलें. आह्मीं केलें तें तुह्मीं केलें. तुह्मी आह्मी भाऊ, त्यापक्षीं तुह्मीं केलें तेंच आह्मांस मान्य. राजश्री मोरोबादादांचेंही ठीक करून द्यावें. नाहीं तर (त्यांस) काशीस पोंचवून द्यावें. अथवा त्रिवर्गांस एक करून द्यावें." यावरून शिंद्यांनीं होळकरांकडे सांगून पाठविलें कीं, "मोरोबांचा विचार निराळा होईल. तुह्मी त्याचा अभिमान धरून सरकारांत गैररुजू राहिल्यानें परिणाम लागणार नाहीं. याकरतां मोरोबांस सोडून तुह्मीं लवकर आह्मांस येऊन मिळावें. नानाशीं व इकडील सर्व मंडळींशीं तुमचें पूर्वींप्रमाणें सख्य करून देतों." याप्रमाणें निरोप पाठवून व स्वतः एक दोन वेळां त्यांच्या

लष्करांत जाऊन त्यांना त्यांनीं आपल्या पक्षाकडे वळविलें व त्यांना मोरोबांचा पक्ष सोडून द्यावयास लावून तेथून कूच करावयास भाग पाडलें. नंतर होळकर आपल्या फौजेनिशीं सासवडास जाऊन उतरले. होळकरांबरोबर विसाजीपंत बिनीवाले व आनंदराव गोपाळ हेही निघून गेले. शिंद्यांनीं होळकरांबरोबर नाना वगैरे मंडळींची दिलसफाई करून दिली. त्यामुळें मोरोबांच्या पारिपत्याचा एकच सरळ मार्ग राहिला. त्यांचा बींमोड करण्याचा नानांनीं संकल्प केला.

३६. होळकर निघून गेल्यावर मोरोबांच्या तळावर बजाबा पुरंदरे, पांडुरंगराव बारामतीकर, रघुनाथ नारायण एवढेच शिल्लक राहिले. आतां तीन फौजांचे निरनिराळे तीन तळ झाले. शिंदे-होळकर मिळून पसतीस हजार फौजेचा तळ सासवडास होता. नाना फडनाविस, हरिपंत फडके, परशुराम भाऊ, आपा बळवंत, व हुजरातचे घोरपडे, पाटणकर, दरेकर, निंबाळकर वगैरे मोठमोठे मानकरी मिळून वीस हजार फौज पुरंदरच्या पायथ्यास तळ करून बसली होती. मोरोबादादा यांची चार हजार फौज पुरंदरापासून दोन कोसांवर करा नदीच्या पाण्यावर तळ देऊन राहिली होती. होळकर नानांस येऊन मिळाल्यामुळें मोरोबांचा पक्ष सर्वस्वी हलका झाला. त्याला दुसरें कोणतेंच कारस्थान करण्यास अवधि राहिला नाहीं. मोरोबांच्या शब्दावर इंग्रज विश्वास ठेवण्यास तयार नाहींत; अशी मोरोबांची स्थिति झाली. शिंद्यांनीं मोरोबांची चारी बाजूंनीं नाकेबंदी केली. नाना मोरोबाबरोबर कोणत्याही-प्रकारें मिळतें घ्यावयास तयार झाले नाहींत. मोरोबांनीं पुष्कळ धडपड केली, आर्जवें केलीं, परंतु नानांनीं त्यांचें कांहींएक ऐकिलें नाहीं. शेवटीं निरुपाय होऊन मोरोबांनीं तारीख २० जून रोजीं जरीपटका, शिक्के कट्यार नानांच्या हवालीं करून आपल्या फौजेस रजा दिली. नानांनीं मोरोबांस कैद करून लगेच नगरच्या किल्यावर बंदोबस्तानें पाठविलें. ते मरेपर्यंत बावीस वर्षे नानांच्या कैदेंतच होते.

३७. मोरोबांस किल्ल्यावर पाठविल्यानंतर त्यांच्या पक्षांतील लोकांचें व ज्यांचें पारिपत्य व्हावें असें नानांना वाटत होतें, ते लोक मोरोबांच्या पक्षाचे आहेत असें गृहीत धरून त्यांचें यथाविधि पारिपत्य करण्याचें सत्र चालू झालें. होळकरांचा दिवाण नारो गणेश, गोपाळ नाईक तांबवेकर, आपाजीपंत गोंधळेकर, कचोबा पाळंदे, बाळाजीपंत दामले, दादोपंत वाघोलकर, व बाबाजी जामदार निंबाळकर यांना होळकरांच्या फौजेंतून धरून आणलें. सर्वांकडून भरभक्कम भूर्दंड चोपून वसूल केला. विसाजी कृष्ण बिनीवाले व नरसिंगराव धायगुडे यांच्या घरांवर चौक्या बसवून त्यांना कैद करून शिंद्यांनीं आपल्या गोटास आणलें. त्यांना मारहाण करून 'बोला' म्हणून तसदी लावली. बोला याचा अर्थ पैसे किती देता? त्यांच्या खजिन्यांत किती माया आहे हें विचारून व कबूल करून ते घेत होते. बिनीवाले हे १७७१ ते ७३ सालीं मराठ्यांच्या रोहिलखंडावर ज्या स्वाऱ्या झाल्या त्यांत सर्व सेनेवरचे मुख्य अधिकारी होते. हेच शिंदे होळकर त्या वेळीं यांच्या हाताखालीं काम करीत होते. त्या वेळीं बिनीवाले व शिंदे यांचीं भांडणें झालीं होतीं. त्याचें उट्टें काढण्याकरतां शिंद्यांनीं एखाद्या दरवडेखोराला मारहाण करावी, त्याप्रमाणें बिनीवाले यांना मारहाण केली. त्यांचेंही सर्व वित्त हरण केलें. त्याचप्रमाणें आनंदराव, बळवंतराव व खासगीवाले, सदाशिव रामचंद्र, बाळाजीपंत सप्रे, बजाबा पुरंदरे, या सर्वांस शिंद्यांनीं धरून कैदेंत टाकलें. ही सर्व मंडळी द्रव्यवान् होती. यांच्याकडून फार मोठे दंड घेतले. त्यामुळें त्यांना एवढें मूर्तिमंत दारिद्र्य आलें कीं, त्यांच्या पुत्रपौत्रांना सुद्धां डोकें वर काढण्यास सवड मिळाली नाहीं. या प्रसंगीं गोपाळ नाईकापासून पांच लक्ष रुपये, बिनीवाल्यांपासून पांच लक्ष, नारो गणेशकडून दहा लक्ष, रघुनाथ नारायण यांचा जहागिरीवरील हक्क उडवून त्याचा हिस्सा त्रिंबकरावानें उपभोगावा व त्याबद्दल दहा लक्ष रुपये नजराणा द्यावे असें ठरवून ते दहा लक्ष, होळकरांच्या दिवाणगिरीवरून नारो गणेश यांची हांकालपट्टी होऊन गंगाधर यशवंत यास ती दिली म्हणून त्यांचेकडून दहा लक्ष रुपये नजराणा घेतला. एकंदरींत पुण्याच्या दामोदर मंडळींना चरकांत धरून त्यांची पाठ

सोलली व 'पुष्कळ द्रव्य जमा करून फौजेचें चार वर्षें तुंबलेलें देणें' फेडण्याकरतां व पुढील मोहिमेच्या तयारीकरतां याप्रकारें सर्वांना हिरण्यश्राद्ध करावयास लावून द्रव्य उभें केलें. "गेल्या पांच चार वर्षांच्या अनुभवावरून पुण्यांत बखेड करणारे लोक कोण आहेत हें नानांस माहीत झालें होतें. ते सर्व लोक मोरोबांच्या बंडाच्या जाळ्यांत आयते एकदांच सांपडल्यामुळें त्यांस द्रव्यहीन करून व कैदेंत टाकून पुण्यांत बखेडा होऊंच नये असा बंदोबस्त करण्यास ही त्यांस उत्तम संधि सांपडली"[१] एकंदरींत चोरांना चोरी करण्यास संधि मिळूं नये ह्मणून लोकांच्या घरांत द्रव्यच शिल्लक ठेवावयाचें नाहीं अशी या वेळीं पुण्याच्या सावकार लोकांची नानांनीं अवस्था केली. शिवाय पुण्यांत बंड होण्याची भीति राहूं नये ह्मणून सरदार मंडळींना डोंगरी किल्ल्याची हवा दाखविली. एकंदरींत नानांनीं महादजी शिंद्यांकडून आपल्याच लोकांचें द्रव्य, पराक्रम आणि बुद्धि हिरावून घेववून पुण्यास निःसत्व केलें.

३८. महादजी शिंद्यांनीं तुकोजीराव होळकर यांची समजाविशी केली, त्यांत होळकरांनीं मोरोबादादासंबंधीं पारिपत्याचे तीन मार्ग सुचविले होते. (१) मोरोबांचें ठीक करून द्यावें. ह्मणजे मोरोबांचा सरंजाम जहागीर वगैरे चालवावी. (२) तसें होणें अशक्य झाल्यास त्यांस काशीस पोंचवून द्यावें. (३) अथवा त्रिवर्गांस एक करून द्यावें. ह्मणजे नाना, बापू व मोरोबा या तिघांची पूर्ववत् कारभारांत एकी करून द्यावी. तथापि नाना व शिंदे यांनीं होळकरांचें कांहींही न ऐकतां मोरोबांस जन्मठेपेची शिक्षा दिली. एवढेंच नव्हे तर त्यांच्या प्रत्यक्ष दिवाणावर व दुसऱ्या सरदारांवर फितुरीचा गुन्हा लादून त्यांनाही दंड व कैद या शिक्षा दिल्या. आणि या सर्व गोष्टी महादजी शिंदे यांनीं तुकोजीरावांच्या गोटांत येऊन त्यांच्या समोर फितुरांना पकडून देऊन केल्या! यामुळें तुकोजीराव होळकरांना अतिशय वाईट वाटलें व त्यांना शिंद्यांचा रागही आला. शिंद्यांना आपण भाऊ ह्मणून मानतों पण त्यांनीं या वेळीं आपली मानखंडना केली असें त्यांना वाटलें.

---

१. अधिकारयोग पान १११.

३९. मोरोबांच्या बाबतींत होळकरांचें जें सांगणें होतें तेंच बापूंचेंही होतें. मोरोबा कारभारांत नकोत एवढेंच बापू ह्मणत होते. पण त्यांची समजाविशी व्हावी असें त्यांचें ह्मणणें होतें. परंतु तशी कोणतीच गोष्ट न करतां, एक घाव व दोन तुकडे हा जो आपला स्वभाव त्याचप्रमाणें नानांनीं मोरोबांची स्थिति केली. मोरोबा ज्या वेळीं होळकरांना घेऊन पुरंदरावर चाल करून यावयास निघाले, त्या वेळीं नाना घाबरले. त्यांच्या डोळ्यापुढें हिरव्या पिवळ्या रेषा दिसूं लागल्या. ते त्या वेळीं बापूंच्या पाठीमागें दडले, आणि मोरोबांना शरण आले. त्या वेळीं नानांवर मोरोबांनीं दया दाखविली नसती आणि पुरंदर किल्ला लढवून, तो हस्तगत करून, व नाना पळून जात असले तरी त्यांचा पाठलाग करून, त्यांना कैद करून, ते राजद्रोही आहेत असें ठरवून, त्यांना मेखसूंखालीं अगर हत्तीच्या पायाखालीं त्यांनीं दिलें असतें तरी तें त्या वेळीं सहज झालें असतें. परंतु मोरोबांनीं त्या वेळीं तसा अविचार केला नाहीं. त्यांनीं माणुसकी संभाळली व नानांबद्दल पूर्वींचा द्वेष विसरून जाऊन त्यांना राज्यकारभारांत ठेवलें, एवढेंच नव्हे तर त्यांची जहागीर, किल्ले, सरंजाम हाही त्यांनीं ठेवला. मोरोबांनीं नानांवर प्रसंग आणला त्या वेळीं ते माणसुकीला जागले. परंतु नानांनीं मोरोबांवर ज्या वेळीं प्रसंग आणला त्या वेळीं नानांनीं माणसुकी तर दाखविली नाहींच, उलट पूर्वींचा हाता नव्हता तेवढा सर्व द्वेष मोरोबांवर व त्यांच्या पक्षाच्या लोकांवर उगवून घेऊन, आपली पूर्ण सैतानी वृत्ति महाराष्ट्राच्या इतिहासांत वज्रलेप करून ठेवली. सर्पाच्या मनोधर्माचीं माणसें उपकार कधींच स्मरत नाहींत. त्यांना माणुसकीची चाड नसते. प्रसंग येईल तेव्हां दंश करून सत्यानाश करावयाचा एवढाच त्यांचा धर्म असतो. नानांचें स्वभाव-चित्र हें असेंच आहे.

४०. मोरोबांना फितूर असणारे सखारामबापू हे एकटेच या वेळीं नानांच्या पारिपत्यांतून कसे सुटले याबद्दल सहज आश्चर्य वाटेल. परंतु तसें तें वाटण्याचें कारण नाहीं. इंग्रजांबरोबर जो पुरंदरचा तह झाला, त्या तहावर बापूंची पहिली सही होती. ह्मणून इंग्रजांचा व पेशव्यांचा कलह राघोबादादांच्या बाबतींत जो पुढें होऊं पहात होता, त्याचा निकाल लागेपर्यंत बापूंना मोकळें ठेवणें नानांना प्राप्त होतें. फक्त या वेळीं पंख तोडलेल्या

पिंजऱ्यांतील राघूप्रमाणें बापूंची नानांनीं अवस्था केली होती. त्यांचें काम आटोपतांच त्यांच्याकरतां डोंगरी किल्लयावरील जन्मठेपीचा कैदखाना मोकळा होताच.

४१. मोरोबादादांच्या या एकंदर प्रकरणाचा शांतपणें विचार केला ह्मणजे असें दिसून येतें कीं, नानांनीं हें गुप्त कारस्थान उभारून पुण्यांत जो हा प्रळय करून सोडला त्याच्या मुळाशीं नानांचा अखत्यारीचा कारभार मोरोबादादांनीं काढून घेतला एवढेंच त्याचें मूळ आहे. मोरोबांनीं पेशव्यांचें राज्य गिळंकृत करण्याचा प्रयत्न केला नाहीं किंवा सवाईमाधवरावांची गादी उपटण्याचे खेळ केले नाहींत. मोरोबा कारभारांत आल्यामुळें फक्त नानांची अखत्यारी गेली. तेवढयाकरतां नानांनीं हा प्रळय घडवून आणला. यावरून नाना फडनविस यांना अमर्याद अधिकारलालसा होती व त्याच्या प्राप्तीकरतां ते वाटेल तें निंद्य कर्म करण्यास तयार असत असेंच ठरतें. खरें पाहिलें तर नाना, बापू व मोरोबा यांचे दरम्यान जी चार कलमांची यादी झाली त्यावर नानांची सही होती. त्याप्रमाणें राज्यकारभार सुरू झाला. त्रिवर्ग कारभारांत येऊन त्यांनीं कारभार चालविला ह्मणून बापूंची प्रशंसा झाली. त्यानंतर नानांनींच आपला अधिकार गेला म्हणून खूळ माजविलें. असें असतां व बारभाई चालू झाल्यानंतर नानांचा हा तिसरा संपूर्ण गुन्हा असतां 'हें मोरोबानें खूळ माजविलें' अशीं जे इतिहासकार त्यांना दूषणें देतात तीं कां? त्यांना जय मिळाला नाहीं ह्मणून? हा न्याय होणार नाहीं. मोरोबादादा व बापू यांचा या वेळीं पूर्णपणें सत्पक्ष होता. त्याविरुद्ध नानांनीं बंड केलें व नीतीला सोडून केवळ अन्यायानें तें केलें. दरवडेखोरानें दरवडा घालून तो त्यानें पचविला म्हणून न्यायदेवतेपुढें त्याचा गुन्हा नीतीचा व न्यायाचा ठरणार नाहीं. नानांचें हें कृत्य निंद्य व सूडाचें होतें. मागें नारायणरावांनीं नानांची पगडी पाडून आपला अपमान केला म्हणून त्यांच्या खुनाचा कट करून त्याचा सूड नानांनीं घेतला. या वेळीं मोरोबांनीं त्यांचा अधिकार घेतल्यानें आपला अपमान झाला म्हणून मोरोबांसह त्यांच्या पक्षांतील सर्व लोकांना, त्यांचें सर्वस्व हरण करून मृतवत् करून टाकलें. सर्पानें दावा धरला म्हणजे त्याच्याजवळ मृत्यूशिवाय दुसरी शिक्षा नाहीं.

प्रकरण २१ वें.

राघोबादादांचें दिव्य तेंच नानांचें हव्य.

इ. स. १७७८ ते इ. स. १७८१.

१ मोरोबादादांच्या पारिपत्यामुळें इंग्रजांचा नाना फडनविसांवर रोष. उभयपक्षीं लढाईची पूर्वतयारी.—२ हरिपंत फडके व पटवर्धन सरदार यांचें सैन्य मोरोबादादांच्या पारिपत्याकरतां पुण्यास गेलेलें पाहून हैदरास कर्नाटकचें रान मोकळें झालें. तो कर्नाटकांत धुमाकूळ घालतो.—३ पुण्याच्या भोंवतालच्या प्रांतांत मोरोबादादांच्या फितुरांचा सुळसुळाट. नाना सर्व फितूर मोडतात.—४ नानांच्या पक्षांतील लोकांतही स्वतःच्या पोळीवर तूप ओढून घेण्याचा प्रयत्न. त्यामुळें परस्परांत असंतोष. पुण्यासभोंवतालचा प्रदेश सैन्यांतील लूटमारीमुळें उजाड होतो.—५ हैदरावर पटवर्धनांची रवानगी. महादजी शिंद्यांस मलिदा चारून नाना त्याचा रुसवा काढतात.—६ सखारामबापूंच्या पुढील राजकारणाचा ओघ.—७ मुंबई सरकारचा पुण्यावर स्वारी करण्याचा निश्चय. राघोबादादांस सवाईमाधवरावांचा पालक बनवून त्यांनीं कारभार करावा यांस नाना फडनविसांशिवाय इतर मुत्सद्यांचें पाठबळ मिळण्याचा संभव.—८ इंग्रजांस न तोडतां आपला मनसुबा साधून घेण्याचें सखारामबापूंचें धोरण.—९ इंग्रजांनीं राघोबादादांस पुण्यास आणावें म्हणून सखारामबापूंनीं शिंदे, होळकर, हैदरअल्ली यांच्यांत नानांविरुद्ध केलेला फितूर. राघोबादादांस पोर्तुगीज लोकांची मदत न मिळाल्यामुळें नाइलाजास्तव ते इंग्रजांच्या मदतीनें पुण्यावरील स्वारीस निघाले.—१० नानांच्या फौजेच्या व इंग्रजांच्या फौजेच्या डावपेची लढाया. राघोबादादा तळेगांव सर करतात.—११ नानांच्या फौजेची रचना कशी होती? राघोबादादांचें थोडेसें सैन्य नानांच्या विशाल सैन्यांवर तळेगांव जिंकून मात करतें. यामुळें नानांस आपल्या सैन्यांतील फितुरीचा संशय. आपल्याकडील फितुर सरदार व राघोबादादा यांचेवर मात करण्याचा नानांचा बिनतोड नवीन डाव.—१२ राघोबादादांचे पाय पुण्यास लागण्याचे अगोदर पुणें शहर, शनिवारवाडा व त्याच्या भोंवतालचा प्रदेश भस्मसात् करून टाकण्याची नानांची घोषणा. त्याप्रमाणें

शनिवारवाडा, पुणें शहर व पुण्याजवळील इतर सर्व गांवें कडबा भरून जाळण्याकरतां नानांनीं जय्यत तयार ठेवली. या नानांच्या भावी आसुरी कृत्यामुळें राघोबादादा हतबुद्ध होतात. बंडखोरांच्या हातीं पुणें शहर राहिलेलें परवडलें पण त्याचा नाश नको असा राघोबादादांचा संकल्प. ते अधिकारसंन्यास घेण्यास तयार होतात.—१३ नानांचे पक्षांतील फितूर सरदारांत नानांच्या घोषणेनें उत्पन्न झालेलें चैतन्य. नानांचा ‘ किसका फांटे और किसका तूटे ’ असा स्वभावधर्म. —१४ राघोबादादा पुण्याच्या रक्षणाकरतां स्वतःचा संपूर्णपणें नाश करून घेऊन शिंद्यांच्या स्वाधीन होतात. नाना महादजी शिंद्यांच्या मध्यस्तीनें राघोबादादांकडून पेशवाईच्या हितसंबंधाबद्दल बेदावा पत्र घेतात.—१५. राघोबादादा शिंद्यांच्या स्वाधीन झाल्यामुळें इंग्रज पेंचांत सांपडून नानाबरोबर तह करतात. या तहांतील कलमें —१६ राघोबादादांच्या पक्षांतील लोकांची निरवानिरव.—१७ राघोबादादांना सालिना पांच सहा लक्ष रुपये देऊन शिंद्यांच्या देखरेखीखालीं झांशीस ठेवण्याचें ठरविलें. या त्यांच्या संरक्षणाच्या कामगिरीबद्दल नानांनीं शिंद्यांस झांशीप्रांतीं पांच लक्ष उत्पन्नाची जहागीर दिली. शिंद्यांनीं राघोबादादांस आपला सरदार हरी बाबाजी याजबरोबर झांशीकडे रवाना केलें.—१८ सखाराम-बापू राघोबादादांच्या फितुरांत असल्याबद्दल त्यांचेवर राजद्रोहाचें कलम लागू करून त्यांस सिंहगडावर नेऊन कैदेंत टाकलें.—१९ सखारामबापू वगैरे मुत्सद्यांवर जो राजद्रोहाचा शिक्का मारण्यांत आला त्याचा अर्थ नानाविरुद्ध त्यांनीं खटपट केली असाच होतो. राघोबादादांवर या वेळीं नानांनीं जय मिळविल्यामुळें नाना दख्खनचे राजे व शिंदे दख्खनचे दिवाण असा बोलबाला होतो. —२० बापूंच्या अलोट संपत्तीवर व मिळकतीवर नानांचा नांगर फिरतो.—२१ सखारामबापू कैदेंत असतां नानांनीं त्यांची केलेलीं स्थलांतरें. नगरच्या किल्ल्यांत सखारामबापू असतां त्यांनीं नानांस देण्याकरतां लिहून ठेवलेली एक भविष्यसूचक चिठी. कैदेंतील त्यांचे नानांनीं केलेले हाल व मृत्यु—२२ सखारामबापूंच्या बाबतींत ग्रँट डफचें मत.—२३ सखारामबापूंची घरगुती हकीकत.—२४ सखारामबापूंच्या धर्मभावना. त्यांचा परिवार.—२५ सखारामबापूंची वस्तुसंग्रहाची आवड.—२६ सखारामबापूंची राजकारणकुशलता.—२७ नानांच्या कारस्थानी होमकुंडांत सखारामबापूंचा बळी.

१ नानांचा पक्ष मोडण्यास मोरोबांना आपल्याशिवाय सत ना गत असें इंग्रजांस वाटत होतें. परंतु पावसाळ्याचा फायदा घेऊन नानांनीं अखेर जिंकली हें इंग्रजांस समजतांच त्यांना मोठें वैषम्य वाटलें. मुंबई सरकारच्या सिलेक्ट कमिटीची गुप्त बैठक भरून पावसाळा संपतांच पुण्यावर चालून जाण्याची योजना मुक्रर करण्यांत आली. मुंबईस घडणारी प्रत्येक गोष्ट—मग ती कितीही गुप्त असो—नानांस गुप्त हेरांमार्फत तत्काल समजत असे,[१] त्यामुळें इंग्रजांच्या पारिपत्याची नानांनींही गुप्तपणानें तयारी चालविली. नानांनीं चालविलेली सैन्याची तयारी इंग्रजांकरतां नसून ती हैदरावर स्वारी करण्याकरतां आहे असें बाह्योपचारी दाखविण्यांत येत होतें. मोरोबांच्या पक्षाचें पारिपत्य करण्यामध्यें नानांचा खजिना पूर्ण भरल्यामुळें व पावसाळ्याची संधि मिळाल्यामुळें फौज जमा करून लढाईची तयारी करण्यास नानांना चांगला अवधि मिळाला.

२. मोरोबादादांचें पारिपत्य करण्याकरतां नानांनीं हैदरावरील मोहीम अर्धवट टाकून परत येण्याबद्दल फडके व पटवर्धन यांना इषारा दिला होता. त्याप्रमाणें ते परत आले हें मागील प्रकरणांत आलेंच आहे. फडके, पटवर्धन यांची पाठ मागें फिरल्याबरोबर हैदरास बळ चढून तो त्यांच्या मागून तुंगभद्रेच्या तीरापर्यंत आला. त्याला आतां कर्नाटकाचा मुलूख मोकळा झालेला दिसला. त्यामुळें त्या मुलुखांत वाटेल तसा धिंगाणा घालण्यास त्याला सवड मिळाली. कडपकर नबाब आणि चित्रदुर्गाचे संस्थानिक यांचीं राज्यें हैदरानें बळकाविलीं. त्याचप्रमाणें कर्नूळ, सावनूर, अदवानी येथील नबाबांकडून व डंबळ, रायदुर्ग, हरपनहळ्ळी येथील संस्थानिकांकडून त्यानें लक्षावधि रुपये खंडणी वसूल केली. पेशव्यांच्या राज्यांतील कोप्पळ, बदामी व धारवाड हे प्रसिद्ध किल्ले त्यानें हस्तगत केले. त्यानें मलप्रभानदीच्या पलीकडील सर्व मुलूख जिंकून घेतला. त्यानें पटवर्धनांचीं यादवाड, तेरदाळ, जमखंडी, हीं ठाणींसुद्धां जिंकलीं. त्यानें लूटमार व जाळपोळ व मारहाण अशी सुरू केली कीं,

---

१ खरेकृत नाना फ. यांचें चरित्र पा. ८७ आवृत्ति ३ री.

त्याच्या दहशतीमुळें मिरज प्रांतांतील रयत घरेंदारें सोडून सैरांवैरां पळूं लागली. पूर्वी हैदराच्या राज्याची सीमा जी तुंगभद्रा नदी होती ती आतां कृष्णानदी होऊन बसली.

३. पुणें शहर व त्या भोंवतालचा प्रांत हा पुणें दरबारच्या ताब्यांत होता. परंतु तेथेंही उघडपणें फितुर चालू होते. चिंतो विठ्ठल यांचीं मुलें माणसें नानांनीं पुण्यास अटकेंत ठेविली होतीं, तीं एके रात्रीं सर्वांची नजर चुकवून मुंबईस पळून गेलीं. शिवनेरी किल्यावर मोरोबांचा कारकून होता. त्यानें फौज जमा करून पुण्याभोंवतालचा प्रदेश मारण्यास बेधडक सुरवात केली. नगरच्या किल्यावर फितुर करून मुंबईस पळून जाण्याचा मोरोबानें प्रयत्न केला. परंतु किल्लेदार वेळींच सावध झाल्यामुळें त्याचा तो प्रयत्न फसला. किल्लेदारानें फितुर लोकांची कत्तल करून बंदोबस्त केला. पुरंदर किल्यावरही मोरोबांनीं फितुर केल्याची अफवा होती. नानांनीं बंडखोरांना देहांत शिक्षा देऊन त्यांचें बंड मोडलें.

४. नानांनीं मोरोबादादाचें पारिपत्य, सखारामबापू व होळकर यांच्या मताविरुद्ध व त्यांची मानहानि करून केल्यामुळें त्यांना नानांचें वैषम्य वाटत होतें. होळकरांनीं इंग्रजांस विश्वासानें आश्वासन दिलें होतें[1] कीं, तुह्मी बोरघांट चढून वर आल्याबरोबर आपण तुह्मांस फौजेसह सामील होतो. महादजी शिंदे नानाबरोबर अद्यापी रुसव्यानेंच वागत होते. अशीरगड हातीं आल्याखेरीज आपण फौजेला निरोप देत नाहीं असा त्यांनीं नानांशीं हट्ट धरिला. शिंदे फौजेला निरोप देईनात ह्मणून होळकरही देईनात. आणि हे दोघे सरदार फौजबंद राहिल्यामुळें हरिपंतासही आपली फौज दूर करतां येईना. याप्रमाणें या बड्या सरदारांचीं राजकारणें चाललीं होतीं; परंतु त्यांच्या लष्करांच्या हालचाली चालल्यामुळें पुणें प्रांत ओस पडत चालला. त्याकडे कोणाचेंच लक्ष जाईना. रयतेचें चिरगुटपांघरून तर प्रत्यहीं चोरीला जात होतें. शिवाय मिळेल तेथून वैरण लुटून आणावी आणि लाकूडफाट्याकरतां

---

१. खरेकृत नाना फ. ति. आ. पान ९०

रयतेचीं खुशाल घरें मोडून आणावीं हा शिंदे-होळकर यांच्या फौजेचा चार सहा महिने अव्याहात क्रम चालला होता.

५. नानांनीं हैदराच्या पारिपत्याकरतां परशुरामभाऊबरोबर आठ दहा हजार फौज देऊन त्यांना कर्नाटकांत रवाना केलें. ते पुण्याहून तिकडे जाण्याकरतां इ. स. १७७८ च्या सप्टेंबर महिन्यांत निघाले. नानांनीं शिंद्यांची मर्जी सुप्रसन्न करण्याकरतां त्यांना नवीन नैवेद्य दाखविला. नवीन मुलुख मिळाल्याशिवाय कारभाऱ्यांचें कोणतेंही नवीन काम करावयाचें नाहीं असा जणुं शिंद्यांनीं निश्चयच केला होता. त्याला अनुसरून नानांनीं शिंद्यांना ब्ऱ्हाणपुर शहर व अशीरगड दिल्यामुळें[1] ते प्रसन्न झाले व त्यांनीं इंग्रजांचें पारिपत्य करण्याचें मनांत आणलें. आतां इंग्रजांवरील मोहिमेचीं सर्व सूत्रें शिंद्यांच्या मार्फत हालूं लागलीं.

६. वरून दिसण्याला इंग्रज व पुणें दरबार यांच्या युद्धाची तयारी दिसूं लागली. परंतु आंतून एका निराळ्याच राज्यकारणाचा ओघ वाहत होता. सखारामबापू व मोरोबा या उभयतांच्या मनांत राघोबादादा यांनीं पुन्हां पुण्यास यावें असें होतें. परंतु नानांचा कांटा कायमचा काढून टाकण्याकरतां इंग्रजांची मदत घ्यावी असें मोरोबांचें मत होतें. त्यामुळें इंग्रजांना भाव चढला व ते पाय पसरूं लागले. त्यांनीं सखारामबापूकडून मोहिमेच्या लेखी आमंत्रणाचा हट्ट धरला. बापूंनीं ती गोष्ट अमान्य केल्यामुळें मोरोबांचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले व शेवटीं त्यांना कारागृहवास प्राप्त झाला ही गोष्ट मागील प्रकरणीं आलीच आहे. मोरोबांचें पारिपत्य करण्यांत नानांनीं जें धोरण दाखविलें, तें निव्वळ पेशवाई गिळंकृत करण्याचें होतें असें बापूंना पुरतेपणीं दिसून आलें व पुढें अशीच परिस्थिति कायम राहिल्यास पेशवाई बुडवून नाना दक्षिणचे राजे होणार व शिंदे त्यांचे दिवाण बनणार हीं स्पष्ट चिन्हें त्यांना दिसूं लागलीं. तेव्हां त्यांनीं इंग्रजांची विशेष प्रकारें मदत न घेतां राघोबादादा यांना पुण्यास आणविण्याची खटपट सुरू केली. मोरोबा, नाना व सखारामबापू यांच्यामध्यें

---

१. नातूकृत महादजी शिंदे यांचें चरित्र, पान १३२.

जे करारमदार झाले होते त्यांत 'दादासाहेबांस तूर्त आणूं नये, पुढें आणलें तर आणावें.' असें कलम होतें. तेव्हां त्या गोष्टीला नानांना उघड विरोध करतां येण्यासारखा नव्हता. तेव्हां इंग्रजांच्या मदतीखेरीज अगर इंग्रजांबरोबर आपण कोणत्याही प्रकारें करारमदारांनीं बांधलें न जातां राघोबांना पुण्यास आणण्याचे प्रयत्न बापूंच्या या वेळेच्या मनसुब्यांत होते. नानांना जेवढे इंग्रज नको होते, तेवढेच बापूंनाही ते नको होते. बापूंना राघोबादादा पाहिजे होते, पण नानांना ते अंतर्यामापासून नको होते. त्यांना या वेळीं फक्त तसें उघड ह्मणतां येत नव्हतें. कारण ते करारमदारानें बांधले गेले होते. या उभयतां कारभाऱ्यांमध्यें हा एवढाच फरक होता. त्याचप्रमाणें शिंदे व होळकर यांच्या मध्येंही हाच एवढा फरक होता. होळकर हे सखारामबापूंच्या मताचे होते व शिंदे हे नानांच्या मताप्रमाणें वागणारे होते. पण त्यांत सूक्ष्म भेद एवढाच होता कीं, शिंदे हे होळकरांना घेऊन काम करणारे होते. ज्या बाजूला यश मिळेल व जिंकून आपला फायदा होऊन आपलें आसन स्थिर राहील, तिकडे त्यांच्या मसलतीचा कांटा झुकला जाई. त्यामुळें शेवटपर्यंत त्यांच्या मताचा थांग कोणाला लागत नसे. तेव्हां या अशा राजकारणांतील व्यक्तींच्या स्वभाव-ओघांतून सखारामबापूंना आपल्या कर्तव्य कर्तबगारीची नौका हांकावयाची होती.

७. मोरोबादादांना नाना फडनविस यांनीं कैदेंत टाकल्यानंतर सहज चालून आलेली संधि आपण गमावली असें मुंबईच्या गव्हर्नरास व त्याच्या कौन्सिलला वाटलें. नानांच्या हातीं पूर्ववत् पेशवाईची सत्ता गेली व त्यामुळें आपला होणारा थोडाबहुत फायदा बुडाला असें त्यांना वाटून, दुसरें एखादें राजकारण उभारावें असें त्यांच्या मनानें घेतलें. चिंतो विठ्ठल हे पुण्याहून मुंबईस दादासाहेबांच्याकडे गेलेच होते. त्यांच्याकडून पुणें दरबाराची सांप्रतची परिस्थिति इंग्रजांना समजलीच होती. होळकरांनीं नानांशीं सख्य केलें होतें पण ते मनांतून नानांवर रुष्ट होते. सखारामबापूंचें व नाना आणि शिंदे यांचें मनांतून वैमनस्य होतेंच. शिंद्यांचा नानांवर रुसवा चालू होताच. त्यामुळें कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी पुणें दरबारची परिस्थिति

होती. दक्षिणप्रांतीं हैदराचा धिंगाणा सुरूच होता. निजामअलीही अद्यापि नाखुषच होता. ही सर्व परिस्थिति इंग्रजांस पुण्यावर स्वारी करावयास योग्य अशीच होती. हें पाहून त्यांनीं असें ठरविलें कीं, दादासाहेबांस घेऊन पुण्यास जावें, व सवाईमाधवराव यांचे त्यांना पालक बनवून राज्यकारभार त्यांच्या हातीं द्यावा; नाना फडनविस यांना मात्र कारभारांतून अजिबात बाहेर काढावें. ही इंग्रजांची मसलत, पूर्वी मोरोबादादा व सखारामबापू यांच्यामधील करारा़शीं पूर्णपणें जुळती असल्यामुळें या प्रकरणीं आपणांला यश मिळेल असें इंग्रजांना वाटलें व त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या मोहिमेची तयारी चालविली. या मोहिमे-करतां राघोबादादा यांचेबरोबर सुमारें सहाशे गोरे लोक व बावीसशे पलटणी लोक तोफखान्यासहित देण्यासारखे मुंबई सरकाराजवळ होते.[१] परंतु तेवढ्या-वर ही मोहीम जिंकतां येणार नाहीं असें मुंबई सरकारास वाटल्यामुळें त्यांनीं गव्हर्नरजनरल वॉरन् हेस्टिंग्स् यांचेकडे सैन्याच्या मदतीची मागणी केली. त्याप्रमाणें बंगालखात्याचीं सहा पलटणें यांच्या मदतीकरतां मुंबईस येण्यास निघालीं व तीं काल्पीपर्यंत येऊन पोंचलीं.

८. दादासाहेब एकटेच पुणें दरबारच्या कारभारांत यावे असें सखाराम-बापूंना वाटत होतें. मुंबई सरकारचें लोढणें तें पेशवाईच्या गळ्यांत अडकवि-ण्याला मुळींच तयार नव्हते. तारीख २९ माहे आगष्ट सन १७७८ रोजीं सखारामबापूंनीं नागपूरकर भोंसल्यांच्या दरबारांतील लक्ष्मणरावजींस पत्र पाठ-वून असें कळविलें होतें कीं, ‘गोड बोलावें, विकाल सत्ता दाखवावी आणि राज्यच घ्यावें हें इंग्रजांस सवे (संवय) लागली आहे.’[२] या एका वाक्यांत इंग्रजांविषयीं बापूंचें मत काय होतें हें स्पष्ट दिसतें. इंग्रजांनीं दादासाहेबांस पुण्यास आणण्याची तयारी चालविली हें पाहून इंग्रजांच्या मदतीशिवाय दादा-साहेब पुण्यास कसे येतील याबद्दल त्यांची मसलत सुरू झाली. एक तर दादासाहेब इंग्रजांच्या तावडींत सांपडले होते. त्यांना ते सहसा हाताबेगळे

---

१ डफकृत मराठ्यांची बखर पान २६१ (६ वी आवृत्ति.) २ सखारामबापूंचें चरित्र, कानेटकरकृत, पान २०१.

करण्यास तयार होणें शक्य नव्हतें. इंग्रजांच्या पुण्यावरील स्वारीची मदार सर्वस्वी दादासाहेबांवर होती. दादासाहेबांचें बाहुलें पुढें करून त्यांना आपलें राजकारण साधावयाचें होतें. दादासाहेबांना मोकळें सोडलें तर त्यांचे सर्वच डाव फसणार होते. ह्मणून दादासाहेबांचें पुण्यास एकटें येणें अशक्य कोटींतलें होतें. अर्थात् सखारामबापूंना इंग्रजांस न तोडतां आपला मनसुबा साधून घ्यावयाचा होता. त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या राजकारणाची उभारणी सुरू केली.

९. सखारामबापू यांनीं राघोबादादांना कारभारांत आणण्याची भाषा शिंदे व होळकर यांच्याबरोबर सुरू केली. होळकर हे पूर्वीपासून बापूंच्या लगामीं होतेच. या वेळीं शिंदे व नाना यांचीं मनें परस्परांविषयीं कलुषित झालीं होतीं. तेव्हां शिंदेही आपल्या मंत्रांत येतील असा विश्वास बापूंना वाटत होता. इतर सरदारही त्यांना सामील होणार होते. बापूंनीं नवीन राजकारणाची उभारणी करून सुमारें वीस हजार सैन्य आपल्या पक्षाला मिळवून घेतलें. या बाबतींत परशुरामभाऊ पटवर्धन मिरजेस बाळासाहेब यांस आपल्या तारीख २३ सप्टेंबर सन १७७८ च्या पत्रांत लिहितात,[1] 'शिंदे अशेरी किल्ला स्वाधीन जाहला नाहीं म्हणोन खट्टे आहेत असें बोलतात. होळकर तर खट्टे आहेतच. हिंदुस्थानांतून इंग्रज येतात. मुंबईहून श्रीमंत (राघोबादादा) निघणार; उभयतां सरदारांचें (शिंदे व होळकर यांचें) लक्ष त्यांचे ठायीं आहे; वृद्धही (सखारामबापू) त्यांत आहे; असें बोलतात.' यावरून सखारामबापूंनीं राघोबादादांस पुण्यास आणण्याचा मनसुबा तयार केला व त्यांत शिंदे व होळकर यांना सामील करून घेतलें असें दिसतें. पुढें बापूंनीं राघोबादादा व चिंतो विठ्ठल यांस पत्रें पाठवून असें कळविलें कीं,[2] "दक्षिणेकडे (हैदर अलीकडे) सूचना केली आहे. आह्मीं पाय पसरून बसलों आहों. अशांत जलदी कराल तितकी उपयोगी आहे." याप्रमाणें सखारामबापूंनीं आपल्या राजकारणाची

१. ऐ. ले. सं. नं. २४२५. २ अधिकारयोग पा. १२८.

सिद्धता केली व राघोबादादांच्या येण्याची ते मार्गप्रतीक्षा करीत बसले होते. चिंतो विठ्ठल यानें मुंबई सरकारास असें सांगितलें कीं, ' दादासाहेबांसह इंग्रजांची फौज घाट चढून वर आल्याबरोबर मी तुह्मांस मिळेन असें तुकोजीराव होळकर यानें दादासाहेबांस आश्वासन दिलें आहे. आणखीही कांहीं सरदार दादासाहेबांस व इंग्रजांस आयते वेळीं येऊन मिळणार आहेत. एकूण घाटमाथा चढल्याबरोबर वीस हजार फौज आपल्या मदतीस येईल.[1] याप्रमाणें चिंतो विठ्ठल यानें मुंबई सरकारची खात्री केली व ताबतोब पुण्यावर मोहीम करण्याची निकड लाविली. मुंबईस त्या वेळीं घाटमाथ्यांतील पेशव्यांच्या कोंड्या फोडून जाण्यासारखें सैन्य होतें, ह्मणून हिंदुस्थानांतून मदतीस येणाऱ्या सैन्याची वाट न पहातां इ. स. १७७८ च्या नोव्हेंबर महिन्यांत इंग्रजांनीं राघोबादाबरोबर सैन्य देऊन त्यांची पुण्याच्या मोहिमेवर रवानगी केली. या इंग्रजी फौजेचें आधिपत्य एका कमिटीकडे असून जनरल कर्नाक हा त्यावर मुख्य अधिकारी होता. त्यांत कर्नल इगर्टन, क्याप्टन स्टुअर्ट (इष्टुर फांकडा), कोबर्न हेही इंग्रजी प्रमुख सरदार होते. मॉस्टीनसाहेबही त्यांच्याबरोबर होता. सखारामबापूंच्या विचाराप्रमाणें इंग्रजांची मदत न घेतां राघोबादादांनीं घाटमाथा चढून यावें असें होतें. ह्मणून दादासाहेबांनीं गोंव्याचा पोर्तूगीज[2] गव्हर्नर जनरल डॉम जोसे यांजकडे आपला वकील पाठवून मदतीची विनंति केली होती. परंतु ती त्यांनीं न दिल्यामुळें नाइलाजानें दादासाहेब इंग्रजांची मदत घेऊन पुण्याच्या मोहिमेला निघाले.

१०. इकडे नाना फडनविस यांना इंग्रजांच्या मोहिमेची बातमी समजतांच त्यांनींही युद्धाची तयारी केली. त्यांनीं आपल्या सैन्याच्या कित्येक तुकड्या करून त्या निरनिराळ्या घाटांनीं कोंकणांत पाठविल्या. त्या टोळ्यांवर भिमराव पानशे, बाजीपंत जोशी व गणेशपंत बेहेरे हे सरदार होते. या फौजेंत नुसते स्वारच दहा हजार होते. ह्यांनीं तळेगांवनजीक

---

१. अधिकारयोग पा. १२४ २. कानेटकरकृत सखारामबापूंचें चरित्र पान २०६

वडगांव येथें आपल्या फौजेचें मुख्य ठाणें केलें. ही बातमी इंग्रजांना समजतांच त्यांनीं गणेशपंत बेहेऱ्यांवर हल्ला करून त्यांचा मोड केला. त्यांत बेहेऱ्यांस दोन जखमा झाल्या. दुसरीकडे इंग्रज व हरिपंत लढत होते. तेथेंही इंग्रजांचा पराभव झाला नाहीं. इंग्रजांनीं पारनेर किल्ल्यास वेढा देऊन तोही घेतला. शिवाय इंग्रजांच्या मदतीस मद्रासहून तीन हजार आणि सुरतेहून दोन हजार शिपाई आले.[१] यामुळें इंग्रजांस जोर आला. पेशव्यांच्या सैन्यास कसें तोंड द्यावें ही कला राघोबादादांना पूर्ण अवगत असल्यामुळें दिवसेंदिवस इंग्रजांना यश मिळत गेलें व ते तारीख २३ डिसेंबर सन १७७८ रोजीं बोरघाट चढून वर आले. हरिपंत फडके व पानशे यांच्या फौजेबरोबर लढाया देत देत इंग्रजी फौज पुढें सरकूं लागली. खंडाळ्याच्या लढाईंत लेफ्टनंट कर्नल के बाण लागून जाया झाला. ही लढाई तारीख ३१ डिसेंबर रोजीं झाली. तारीख ४ जानेवारी सन १७७९ रोजीं कारल्याची मोठी लढाई झाली. त्यांत इष्टूर फांकडा तोफेचा गोळा लागून मरण पावला. मॉस्टीनसाहेब बरोबर होता, तोही मार्गांत दुखण्यानें मेला. तरी राघोबादादांच्या युद्धकलाकुशलतेपुढें हरिपंत, पानशे वगैरे लोकांचें कांहीं चाललें नाहीं. त्यांना मागें परतावें लागलें. मागें हरतांना तळेगांव दादासाहेबांच्या हातीं लागणार ह्मणून त्यांनीं तळेगांवास आग लाविली व तें भस्मसात् करून टाकलें. राघोबादादांनीं तारीख ९ जानेवारी रोजीं तळेगांव सर केलें.

११. इंग्रजांबरोबर तळेगांवची लढाई देण्याकरतां नाना फडनविस यांनीं आपले चाळीस[२] हजार सैन्य आणलें होतें. त्याची रचना अशी केली होतीः— आघाडीस शिंदे; या वेळीं नानांना शिंद्यांबद्दल विश्वास उत्पन्न झाला होता. त्यांना अशीरगड वगैरे देऊन नानांनीं त्यांची समजूत काढली होती. ह्मणून त्यांस आघाडीवर ठेवलें होतें. होळकर हे केव्हां राघोबादादांना जाऊन मिळतील याचा विश्वास नसल्यानें त्यांना मध्यें ठेवलें होतें.

---

१. जिवबादादा बक्षी यांचें चरित्र पा॰ ८४ २. अधिकारयोग पा॰ १२१.

पिछाडीस हुजुरातसुद्धां नाना फडनविस, सखारामबापू व हरिपंत फडके होते. आपल्या सैन्यांत फंदफितुर होतील ह्मणून नानांनीं पूर्ण दक्षता घेतली होती. बापूंचा व होळकरांचा कल दादासाहेबांकडे आहे हेंही त्यांना अवगत होतें; ह्मणून त्याही दृष्टीनें त्यांनीं काळजी घेतली असेल यांत शंका नाहीं. शिवाय राघोबादादा यांच्याबरोबर अवघे चार पांच हजार सैन्य होतें, हेंही त्यांना माहीत होतें. असें असतां राघोबादादा पेशव्यांच्या सैन्याचा पराभव करून त्यांना मागें रेटीत रेटीत तळेगांव सर करतात हें पाहून नानांची छाती फाटली. त्यांना असें वाटलें कीं, आपली फौज दादासाहेबांना फितुर झाली आहे. त्यांनीं आज तळेगांव सर केलें; दोन चार दिवसांत ते पुणें सर करणार अशी त्यांना भीति उत्पन्न झाली व त्याप्रमाणें त्यांनीं नवीन डाव खेळण्याला सुरवात केली. हा नानांचा डाव एका बाजूस राघोबादादा व दुसऱ्या बाजूस शिंदे, होळकर, फडके, पानशे सखारामबापू वगैरे पेशव्यांच्या बाजूच्या सर्व सरदारांना लागू होण्यासारखा, बिनतोड होता. या डावामुळेंच नानांनीं शेवटीं अखेरी जिंकली.

१२. नाना फडनविस यांना राघोबादादांच्या स्वभावाची पूर्ण पारख होती. शिंदे, होळकर, सखारामबापू व इतर सरदार मंडळी यांच्या मनोभावनेचा धर्महो त्यांना पूर्ण अवगत होता. म्हणून सर्वांच्याच काळजाला एका भयंकर योजनेनें हात घालण्याचा त्यांनीं स्वतःच्या हुकमतीनें चक्रव्यूह रचिला. त्यांनीं पुण्यास जनार्दन आपाजीस असा हुकूम पाठविला कीं, पुणें शहरांतील तमाम लोकांस बाहेर काढून सर्व शहर रिकामें करावें, व सर्व शहरभर कडबा भरावा. त्याचप्रमाणें शनिवारवाड्यांतही कडबा भरावा. इकडून आज्ञा येतांच पुणें शहरास अग्नि लावावा. अशा प्रकारें पुण्याची नानांनीं व्यवस्था लावली. त्याचप्रमाणें तळेगांवापासून पुण्यापर्यंत जीं गावें होतीं तींही जाळून फस्त करण्याची नानांनीं तजवीज केली; आणि त्यांनीं आपला निर्धार राघोबादादा व शिंदे-होळकर वगैरे सरदारांना जाहीर केलाः "इंग्रजांच्या जोरावर श्रीमंत पुण्यास येणार तर येवोत; पण नांदती राजधानी मी त्यांच्या हातास लागूं

देणार नाहीं. पुण्याची राखरांगोळी करीन. मग राखेच्या पुंजीवर बसून श्रीमंतांनीं खुशाल राज्य[१] करावें" राघोबादादांनीं तळेगांवाहून पुढें कूच केलेलें समजतांच पुण्यास अग्नि देण्याचें नानांनीं ठरविलें होतें. राघोबादादांस ही वर्दी मिळाल्यानंतर त्या वीर पुरुषाच्या काळजाचें पाणी झालें असेल यांत शंका नाहीं. थोरल्या बाजीरावांपासून पुणें राजधानी झाली होती. नानासाहेबांच्या कारकीर्दींत पुण्याचें वैभव जग-जाहीर झालें. माधवरावांच्या कारकीर्दीनें त्यांत विलक्षण भर पडली. पुणें शहर म्हणजे सर्व पेशव्यांचा आत्मा होता. पुण्याचें वैभव वाढावें म्हणून राघोबादादांनीं इतके दिवस हाडाचीं काडें केलीं होतीं, हालअपेष्टा सोसल्या होत्या. असें असतांना या वेळीं नाना ती पुण्यभूमि जाळून भस्म करणार आणि तेंही आपले पाय पुण्यास लागतील व तेथें आपण पुन्हां राज्य करूं या कारणाकरतां करणार, ही गोष्ट राघोबादादांसारख्या भावना-प्रधान पुरुषाच्या अंतःकरणावर वज्राप्रमाणें आदळली असेल यांत संशय नाहीं. ज्या पेशव्यांच्या राज्याकरतां व ज्या पेशव्यांच्या पुणें–राजधानीकरतां आपण-इतके दिवस हालअपेष्टा सोसल्या, त्या पुण्याची राखरांगोळी नाना करणार व ती आपण डोळे उघडे ठेऊन पहाणार, त्यापेक्षां बंडखोर कारभाऱ्यांच्याच हातीं ती सुरक्षित राहणें चांगलें, असा दादासाहेबांनीं विचार केला. दादासाहेब आपल्या अधिकाराकरतां जेवढे शौर्यानें झगडणारे होते, तेवढेच ते त्यागीही होते. आपल्याकरतां पेशव्यांच्या राजधानीचा नाश व्हावयाला नको म्हणून त्यांनीं अधिकारसंन्यास घेण्याचा विचार ठरविला. त्याप्रमाणें त्यांनीं तळेगांवा-हून पुढें कूच करण्याचें रहित केलें व तारीख १० जानेवारी सन १७७९ रोजीं शिंदे-होळकरांस अखेरचें पत्र पाठविलें. त्यांतील मजकूर असा होता कीं, "पुण्यांतील मुत्सद्दी मंडळी बंड करून पेशव्यांचे राज्याचा नाश करीत आहेत, त्यांना तुम्हीं पुरातन सरदारांनीं तरी मदत देणें इष्ट नाहीं, यासाठीं तुम्हां उभयतांबरोबर स्नेह करावा अशी माझी इच्छा[२] आहे." शिंदे–होळकर हे पुणें जाळण्याच्या अगदीं विरुद्ध होते.[३] याकरतां दादासाहेबांनीं त्यांना पत्र लिहिलें होतें.

---

१. अधिकारयोग पान १२५. २. नातुकृत महादजी शिंदे यांचें चरित्र पा० १३३
३. ऐ. ले. सं. नं. २४६०.

१३. तळेगांवापासून पुण्यापर्यंतचीं सर्व गांवें व शनिवारवाड्यासहीत सर्व पुणें शहर जाळून भस्मसात् करण्याचा नानांचा निर्धार व त्याप्रमाणें त्यांनीं केलेली तरतूद हीं पाहून शिंदे-होळकर इत्यादि सर्व सरदार व सखारामबापू यांचीही पांचावर धारण बसली. पुणें हें शहर सर्व पिढीजात सरदारांचें भूषण होतें. नानांनीं केलेली ही योजना राघोबादादांनीं तळेगांव सोडून पुढें कूच केल्याबरोबर खात्रीनें अमलांत येणार अशी सर्वांना धास्ती पडली. सर्व सरदारांचा मोठेपणा आणि इभ्रत पुणें या राजधानीवर अवलंबून होती. पुणें शहर जळून खाक होण्याला फक्त एका ठिणगीचीच आवश्यकता यापुढें राहिली होती. आणि दैवयोगानें तसें जर झालें असतें, तर राघोबादादाबरोबर पेशवाईच्या सर्व पिढीजात सरदारांच्या तोंडाला कायमचा काळिमा फांसला गेला असता. नानांनीं पेशवाई कांहीं कमाविलेली नव्हती. त्यांना आपल्या हातांत पेशवाई असेपर्यंत पेशवाई व त्याबरोबर पुणें शहर पाहिजे होतें. 'आप मरे और दुनिया डुबे' या म्हणीप्रमाणें आपण अधिकारांतून गेल्यावर त्यांना पेशवे व त्यांचें राज्य याची पर्वा करण्याचें कारण नव्हतें. "किसका फाटे और किसका तूटे" अशी नानांची वृत्ति असल्यामुळें त्यांनीं पुणें राजधानी भस्मसात् करण्याचा निर्धार केला होता.

१४. शिंदे-होळकर वगैरे सरदार याप्रमाणें विवंचनेंत पडले असतां राघोबादादांकडून वरीलप्रमाणें पत्र त्यांना आलें. त्या पत्राला अनुसरून महादजी शिंदे यांनीं आपलीं दोन माणसें गुप्तवेषानें राघोबादादांकडे पाठविलीं.[१] त्यांचे मार्फत दादासाहेबांनीं आपण शिंद्यांच्या स्वाधीन होण्यास कबूल आहोंत असा निरोप पाठविला. या वेळीं दादासाहेबांनीं पुणें शहराचा नाश न होऊं देण्याकरतां एक भयंकर दिव्य केलें. दादासाहेबांनीं आपला सर्वनाश करून घेऊन पुणें राजधानी नानांच्या प्रळयांतून वांचविली. त्याचप्रमाणें आपल्या आत्मनाशानें पेशवाईच्या सर्व सरदारांचीं

---

१ नातुकृत म. शिंदे यांचें चरित्र पान १३३.

तोंडें त्यांनीं उजळ ठेवलीं. ठरल्याप्रमाणें राघोबादादा हे [1] तारीख १४ जानेवारी सन १७७९ रोजीं आपल्या समागमें तीनशे राऊत, तेरा तोफा, बारा तेराशे गारदी व शागीर्दपेशा वगैरे दोनशें माणूस यांसह शिंद्यांच्या गोटांत येऊन दाखल झाले. [2] नानांनीं शिंद्यांच्या विद्यमानें तेथें राघोबादादांकडून पेशव्यांच्या राज्याच्या मालकीशीं आपला इतउत्तर कांहींएक संबंध राहिला नाहीं अशा अर्थाचें बेदावापत्र लिहून घेतलें. [3]

१५. राघोबादादांनीं अकल्पित रीतीनें शिंद्यांच्या स्वाधीन होण्याचें ठरविल्यामुळें इंग्रजांची त्रेधा उडाली. ते तळेगांवाहून मागें फिरले व त्यांनीं वडगांव गांठलें. त्यांचे मागोमाग पेशव्यांच्या फौजेचें चारी बाजूंनीं दडपण आल्यामुळें त्यांना मुंबईस सुखरूपपणें परत जाणें कठीण झालें. तेव्हां त्यांच्यातर्फे मि. फार्मरसाहेबांनीं मुत्सद्यांकडे तहाचें बोलणें लाविलें. तेव्हां शिंद्यांच्या वतीनें इंग्लिशांशीं पेशव्यांचा तह झाला. त्या तहांतील कलमें अशीं होतीं:– (१) इ. स. १७७३ पासून जो इंग्रजांनीं हिंदूंचा मुलुख घेतला होता तो माघारा द्यावा. (२) कलकत्त्याहून जें इंग्रजी लष्कर मुंबईस येत आहे तें परत जावें. (३) इंग्रजांनीं आपला भडोच शहराचा भाग शिंद्यांस द्यावा; आणि शिंद्यांचे कारभारी लोकांना मुत्सद्दीखर्चाबद्दल म्हणून एकेचाळीस हजार रुपये द्यावे. (४) या गोष्टी अंमलांत येईपर्यंत दोन इंग्लिश कामगार ओलीस द्यावे. याप्रमाणें तह ठरल्यावर मि. फार्मर व चार्लस स्टुअर्ट हे दोघे साहेब ओलीस राहिले. इतकें झाल्यावर पेशव्यांनीं इंग्रजांची फौज परत जाऊं दिली. पूर्वीं कैद केलेले गोरे लोकही त्यांनीं सोडून दिले. हा तह तारीख १६ जानेवारी सन १७७९ रोजीं तळेगांवनजीक वडगांव मुक्कामीं झाला.

१६. शिंद्यांच्या गोटांत दादासाहेब आल्यानंतर त्यांच्या भेटीस उभय कारभारी आले नाहींत. सखारामबापूंना आपले सर्व प्रयत्न हरल्यामुळें व शेवटीं दादासाहेबांना आपल्या पेशवाईचा अधिकारसंन्यास घ्यावा लागल्यामुळें त्यांना तोंड दाखविण्याची लाज वाटूं लागली, म्हणून ते आपल्या मुलीच्या

---

१ नातुकृत म. शिं. च. पान १३४. २ ऐ. ले. सं. २४६४. ३ अधिकारयोग पान १२७.

लग्नाचें निमित्त दाखवून वांईस निघून गेले. नाना तर दादासाहेबांचा द्वेषच करीत होते. त्यांनाही दादासाहेबांची आतां भेट घेण्याचें कारण उरलें नव्हतें. दादासाहेबांच्या पोटापाण्याची व्यवस्था जी शिंदे करतील ती आपणास कबूल असें नानांनीं सांगितलें होतें. दादासाहेब शिंद्यांकडे आले, त्या वेळीं त्यांच्याबरोबर चिंतो विठ्ठल, खरकसिंग व सदाशिव रामचंद्र हे इसम होते. चिंतो विठ्ठल व सदाशिव रामचंद्र हे मोरोबादादांच्या कारस्थानापासून नानांचे गुन्हेगार होते. तसेंच खरकसिंग हा नारायणरावांच्या खुनाच्या कटांत सामील असल्याच्या आरोपावरून नानांचा गुन्हेगार होता. त्यांना आपल्या ताब्यांत देण्याबद्दल नानांनीं शिंद्यांस तसदी लाविली. शिंद्यांनीं खरकसिंगास ताबडतोब नानांच्या हवालीं केलें. त्याला नानांनीं देहांतशासन दिलें. चिंतो विठ्ठल व सदाशिव रामचंद्र यांना मात्र शिंद्यांनीं या वेळीं नानांच्या स्वाधीन केलें नाहीं. यांना स्वाधीन करण्याची वाटाघाट पुढें दोन वर्षेंपर्यंत चालली होती. हे नानांचे गुन्हेगार नानांच्या कबजांत येईपर्यंत नानांनीं शिंद्यांस अशीरगडाचा कबजा दिला नाहीं. हे गुन्हेगार हातीं पडल्यावरच शिंद्यांना अशीरगडाचा ताबा देण्यांत आला. नानांची कैद आपल्या नशिबीची चुकावी ह्मणून चिंतो विठ्ठलानें संन्यास घेतला. तरी त्याच स्थितींत नानांनीं त्याला मरेपर्यंत कैदेंत डांबून टाकलें होतें. चिंतो विठ्ठलास गुन्हेगार ह्मणून आपल्या स्वाधीन करावें अशी ज्या वेळीं नानांनीं शिंद्यांकडे मागणी केली, त्या वेळीं चिंतो विठ्ठलानें शिंद्यांस सांगितलें कीं, ‘मी दादासाहेबांस फितूर ह्मणून मी जर नानांचा गुन्हेगार, तर सखारामबापू गुन्हेगार कसे नव्हत ? तेही माझ्याप्रमाणें गुन्हेगार असल्याबद्दल माझ्याजवळ पुरावा आहे.’ त्यावेळीं सखारामबापूंची त्यांना आलेली एक चिठ्ठी त्यांनीं शिंद्यांस दाखविली, ती अशी होती; “विनंति उपरी. दक्षिणेकडे सूचना केली आहे. आह्मीं पाय पसरून बसलों आहों. अशांत जलदी कराल तितकी उपयोगी आहे !” ही चिठ्ठी शिंद्यांनीं आपल्याकडे ठेऊन घेतली. त्याचप्रमाणें राघोबादादांनाही अशाच मजकुराची आलेली चिठ्ठी शिंद्यांनीं आपल्याकडे मागून घेतली. शिंद्यांनीं हें प्रकरण चोहींकडे स्थिरस्थावरता होईपर्यंत दाबून ठेवलें होतें.

१७. इंग्रज मुंबईला निघून गेल्यानंतर पेशव्यांच्या लष्कराचा मुक्काम तळेगांवाला एक महिनाभर होता. तेथें दादासाहेबांचें पुढें काय करावयाचें ही चर्चा झाली व शेवटीं असें ठरलें कीं, त्यांस सालिना पांच सात लक्ष रुपये खर्चास देऊन त्यांस झांशी मुक्कामीं ठेवावें. तेथें त्यांचा बंदोबस्त शिंद्यांनीं ठेवावा व पुन्हां त्यांच्याबद्दल बोभाटा पुणें दरबारांत येऊं नये. हें काम शिंद्यांनीं पतकरिलें. पण शिंद्यांनीं या बाबतींत आपली अडचण अशी पुढें मांडली कीं, दादासाहेबांचा झांशीस बंदोबस्त ठेवण्याकरतां आपणास दोन हजार स्वार बाळगावे लागतील. त्यांचा खर्च त्यांनीं कोठून द्यावा? त्या खर्चाची सोय लावल्यास आपण ही जबाबदारी घेतो. तेव्हां शिंद्यांच्या इच्छेप्रमाणें नानांनीं झांशी प्रांतीं भांडर ह्मणून चार पांच लक्ष उत्पन्नाचा तालुका त्यांस जहागीर ह्मणून देऊं केला. नंतर शिंद्यांनीं आपल्या हरी बाबाजी नांवाच्या सरदाराबरोबर दोन हजार स्वार देऊन त्याच्या बंदोबस्ताखालीं राघोबादादांस त्यांच्या लवाजम्यानिशीं झांशीकडे रवाना केलें.

१८. आतां दक्षिणाचा राजा बनण्याला नानांना एकच शत्रू राहिलेला होता. तो शत्रू ह्मणजे सखारामबापू हे होत. त्यांची एकदां वासलात लाविली ह्मणजे एकछत्री पेशव्यांचें राज्य झालें. तेव्हां नानांना सखारामबापूंचें भिजत ठेवलेलें प्रकरण हातीं घ्यावें लागलें. यापूर्वी राघोबादादांना कारभारांत घ्यावें या मताची जेवढी मंडळी होती त्यांना गुन्हेगार ठरवून नाना व शिंदे या जोडगोळीनें त्या सर्वांना त्यांच्या त्यांच्या दर्जाप्रमाणें प्रायश्चित्तें दिलीं होतीं. आतां त्यांना सखारामबापूंचा अखेरचा बळी घ्यावयाचा होता. सखारामबापू आपल्या मुलीच्या लग्नाकरतां जानेवारी महिन्यांत जे वांईला गेले, ते राघोबादादांची झांशीला रवानगी झाल्यानंतर तळेगांवीं आले. तेथून लष्कराचा मुक्काम हालल्यानंतर नाना, बापू, शिंदे ही सर्व मंडळी पुरंदर किल्ल्यावर आली. तेथें आल्यानंतर एके दिवशीं शिंद्यांनीं बापूंची एकांतीं गांठ घेतली व त्यांना विचारलें कीं, ज्या इसमांनीं फितुर केला असेल त्यांना काय शिक्षा करावी? यावर बापूंनीं उत्तर दिलें कीं, अशा इसमांना कैद करून किल्ल्यावर पोंचवावें. त्या वेळीं

शिद्यांनीं सखारामबापूंच्या फितुराच्या चिठ्या त्यांच्यापुढें टाकल्या. राघोबादादांना कारभारांत आणण्याच्या फितुरांत ते सामील होते हा गुन्हा त्यांच्या पदरीं त्यांनीं बांधला, व तेथेंच त्यांना कैद केलें आणि त्यांची सिंहगडावर रवानगी केली. सखारामबापूंवर लादण्यांत आलेला गुन्हा राजद्रोहाचा होता.[१]

१९. सखारामबापूंवर व त्याचप्रमाणें मोरोबा, चिंतो विठ्ठल, सदाशिव रामचंद्र वगैरे वगैरे मंडळीवर जो राजद्रोहाचा गुन्हा लादण्यांत आला तो खरोखर राजद्रोह होता किंवा तो एकाद्या व्यक्तीचा द्रोह होता हें येथें पहाणें जरूर आहे. मोरोबांनीं सखारामबापूंबरोबर पूर्वीं जो मनसुबा केला त्यांतील त्यांचें धोरण स्पष्ट होतें. सवाईमाधवराव यांचें पेशवेपद त्यांनीं मान्य केलें होतें व फक्त नाना फडनविस यांना कारभारांतून काढून राघोबादादा यांना अज्ञान पेशव्यांचे पालक म्हणून ते कारभारांत घेणार होते. त्या वेळीं नाना हे पेशव्यांच्या गादीचे अधिपती किंवा राजे असें मानलें जात नव्हतें. सवाईमाधवराव हेच मालक, हेच राजे असें समजलें जात होतें. नाना फडनविस हे बारभाईंचे एक घटकावयव होते. ते पेशव्यांच्या राज्यांतील सखारामबापू, हरिपंत फडके वगैरे नोकरांप्रमाणेंच एक नोकर होते. असें असतां कारभारांतील एकाद्या नोकराला त्याची कारभार चालविण्याची पद्धत राज्यनाशाची आहे असें वाटून त्याला कामावरून कमी करण्याची खटपट करणें हें राजद्रोहाचें खात्रीनें ठरत नाहीं. या प्रसंगींही चिंतो विठ्ठल आणि सखारामबापू यांनीं राघोबादादांना इंग्रजांच्या मदतीनें पुण्यास आणण्याचा जो प्रयत्न केला, त्यांतील उद्देशही स्पष्ट होता. हे मुत्सद्दी व इंग्रज मिळून सवाईमाधवराव वयांत येईपर्यंत दादासाहेबांना त्यांचे पालकच करून त्यांना कारभारांत घेणार होते. अर्थात् याही त्यांच्या प्रयत्नांत राजद्रोहाचा कोठेंच संबंध नव्हता. नानांना कारभारांतून कमी करणें व राघोबादादांच्या बाबतींत जो सर्वस्वी अन्याय झाला होता, त्याचें अंशतः परिमार्जन करणें हाच त्यांचा हेतु होता. असें असतां या इसमांवर जी राजद्रोहाची गुन्हेगारी लादली त्याचा अर्थ काय, असा सहज प्रश्न उत्पन्न होतो.

---

१ कानेटकरकृत सखारामबापूंचें चरित्र पा. २०९.

त्याचा खुलासा येथें एवढाच होऊं शकतो कीं, नाना व नानांचा पक्ष हा सवाईमाधवरावांच्या ठिकाणीं इतका आत्मसात् झाला होता कीं, नाना म्हणजे खुद्द पेशवे. नाना म्हणजे खुद्द सवाईमाधवराव. नाना म्हणजे पेशव्यांच्या राज्याचे मालक व राजे. ही भावना खुद्द नानांची व त्यांच्या पक्षाची झाल्यामुळें नानांचा द्रोह करणें म्हणजे राजद्रोह करणें होतें हेंच खरें ठरतें. या तत्वावरच वरील लोकांना राजद्रोही ठरवून त्यांना मरेपर्यंत डोंगरी किल्ल्यावर कैदखान्यांत कुजत ठेवण्यांत आले. नाना हे पेशव्यांच्या राज्याचे राजे होते हें कैदखान्याची सक्त शिक्षा उपभोगीत असतांना या सर्व लहानथोर गुन्हेगारांना समजून आलें असेल यांत शंका वाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. पेशव्यांच्या राज्यांतून सखारामबापूंचा शेवटचा कांटा काढून टाकल्यामुळें नाना फडनविस यांचें राज्य निष्कंटक झालें. नाना दख्खनचे राजे व शिंदे त्यांचे सेनापती असा त्यांचा व त्यांच्याबरोबर पेशवाईचा हिंदुस्थानभर नांवलौकिक झाला.

२०. बापूंना कैद केल्यावर त्यांचें सर्व उत्पन्न, फौजेचा व जातीचा सरंजाम जप्त करण्यांत आला. घर, पागा, कोठी व दाणा वगैरेची चौकशी बाळाजीपंत ठोसर व पांडुरंगराव गोडबोले यांना सांगितली. कसबे सासवड येथील वटेश्वरानजीकचा वाडा व लष्करचा गोट बाळाजीपंत ठोसर यांनीं जप्त केला.[1] माचीच्या वाडयांतून मिळतील तेवढे दागिने जप्त करून आणिले. याशिवाय बापूंकडे फौजेच्या व स्वतःच्या सरंजामाकरतां गुजराथ, खानदेश वगैरे प्रांत होते, तेही सरकारांत घेण्यांत आले. मुळामुठा नदीच्या संगमाजवळचा सुंदरबाग व पाषाणचा बागही नानांनीं घेतला. हिरवें व सासवड येथील वाडयांतून एकंदर ५० लक्षांचें द्रव्य निघालें. सखाराम-बापू यांचें म्हातारपणचें द्रव्य २० लक्ष साहुकारी यांतून व घरांतून सोनें मोहोरा ३० लाखांचें निघालें. तें सर्व सरकारजमा करण्यांत आलें. अशा प्रकारें बापूंच्या सर्व इस्टेटीची विल्हेवाट नानांनीं लाविली. हें प्रायश्चित्त बापूंस त्यांच्या फितुरीबद्दल देण्यांत आलें हें सांगणें नकोच.[2]

---

१ पेशवे दप्तर ४५·७ २ कानेटकरकृत सखारामबापूंचें चरित्र पा. २१५.

२१. कैदेंत असतांना हरिपंतांनीं बापूंची गांठ घेऊन " शिंद्यांनीं निव्वळ दगाबाजीनें तुह्मांस कैद केलें. तरी सुटण्याचा प्रयत्न करून पुन्हां राज्यकारभार करण्यास तयार असल्यास सर्वजण येऊन मिळतील" असें त्यांना सुचविलें. परंतु 'आतां आपलें म्हातारपण झाल्यामुळें उपाधीचा आपणांस वीट आला आहे; यदाकदाचित् नानांनीं मुक्त केल्यास काशीस जाऊन राहूं; परंतु कारभाराची दगदग नको' असें बापूंनीं त्यांना उत्तर दिलें.[1] पेशवे, नाना व शिंदे यांना निजामानें पत्रें पाठवून बापूंच्या कैदेबद्दल चौकशी केली होती, व त्यांचीं सुटका केव्हां करणार याचीही माहिती विचारली होती. त्याला नाना व शिंदे यांनीं अशीं उत्तरें पाठविलीं कीं, " सखारामबापूंनीं अविचारानें कांहीं राजकीय स्वरूपाचा गुन्हा केल्यामुळें त्यांना प्रतिबंधांत ठेवलें आहे. त्यांस मुक्त करण्याचा तूर्त सरकारचा विचार नाहीं. कारण तसें झाल्यास राज्यांत विनाकारण बखेडे उपस्थित होतील" (२० सप्टेंबर १७७९). शिवाजीपंत या नांवाचा बापूंचा एक आप्त होता. त्यानें बापूंस सोडविण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यासही नानांच्या कैदेंत पडावें लागलें,[2] बापूंच्या सुटकेबद्दल कांहीं उपद्व्यापी लोक बंड करतील या भीतीमुळें नानांनीं बापूंना सिंहगडावरून काढून प्रतापगडावर जयरामपंत बापट यांच्या स्वाधीन केलें. या ठिकाणची डोंगरी थंड हवा बापूंच्या प्रकृतीस मानवेना ह्मणून तेथून काढून त्यांची रवानगी अहमदनगरच्या किल्ल्यावर केली. या ठिकाणीं कालांतरानें नाना कैद होऊन येतील त्या वेळीं त्यांस देण्याकरतां एक भविष्यसूचक चिठ्ठी बापूंनीं तेथील किल्लेदाराच्या स्वाधीन केली होती. " शिंद्यांकरवीं तुह्मीं माझा जसा शेवट केलात तसाच शिंदे तुमचा शेवट करतील." अशा अर्थाचा मजकूर या चिठ्ठीवर लिहिला होता. पुढें सन १७९८ मध्यें नानांस शिंद्यांच्या कैदेंत पडावें लागून ते नगरच्या किल्ल्यावर आले. त्यावेळीं किल्लेदारानें बापूंची वरील चिठ्ठी नानांस दिली. ती वाचून नानांस

---

१ पर्शियन कॅलेंडर ५·३४९. २ प. कॅ. ५-३६२.

रहूं कोसळलें. ही हकीकत पात्रगीकृत ग्रंथांत दिली आहे. नगरहून बापूंस रायगडावर नेण्यांत आलें. तेथें ते अतिसाराच्या विकारानें तारीख २ आगष्ट सन १७८१ रोजीं मरण पावले. बापूंना या नानांच्या कैदेंत भयंकर हाल सोसावे लागले. अशा प्रकारें या थोर, वयोवृद्ध, अनुभविक व मराठी सम्राट-दरबारांतील प्रमुख ह्मणून नांवाजलेल्या [1] मुत्सद्याचा अंत झाला. त्या वेळीं बापूंचें वय अजमासें ६५ वर्षांचें होतें.

22. " This Venerable old man, the once great Sakharam Bapu perished miserably in Raigad after sharing every vicissitude of privation & grandeur, of toil and triumph, which a leader in the Camps & Courts of a great empire must experience. " [2].

२३. बापूंच्या मरणसमयीं त्यांच्या तीन बायका काशीबाई, राजूबाई व जिऊबाई या हयात होत्या. बापूंनीं एकंदर पांच लग्नें केलीं. त्यांचें पहिलें लग्न इ. स. १७३२ च्या सुमारास झालें असावें. ह्या बाईस जो मुलगा झाला त्याचें नांव आकोपंत होतें. त्याचें लग्न थोरल्या माधवरावांच्या कर्नाटकच्या स्वारीनंतर ता. १ जानेवारी सन १७६७ रोजीं रघुनाथ चिमणाजीपंत सचीव यांची मुलगी गोदूबाई इच्याशीं सासवड मुक्कामीं झालें. हा लग्नसोहाळा जवळजवळ दोन महिने चालला होता व तोंपर्यंत सचिवांची मंडळी सासवडासच होती. हा आकोपंत इ. स. १७७५ च्या मे महिन्यांत वारला. त्यामुळें ह्मातारपणीं बापूंस अतिशय दुःख झालें. या वेळीं बारभाईचें कारस्थान बापूंनीं हातीं घेतलें होतें. पुत्रवियोगाचें सर्व दुःख गिळून तें कारस्थान यशस्वी करण्यासाठीं त्यांनीं आपलें तनमनधन अर्पण केलें. एकाद्या सामान्य मनुष्यानें अशा प्रसंगीं सर्वसंगपरित्याग केला असता. यासंबंधीं एका पत्रांत खालीलप्रमाणें उल्लेख सांपडतो. "विनंति उपरी, श्रीमंत राजेश्री सखारामबापूचा पुत्र आकोपंत

---

१ कानेटकरकृत सखारामबापूंचें चरित्र पा. २१६.

2 Duff Vol. II 165-6.

बाबा याचा काल जाहला तो मजकूर........मोठा घात झाला. याजमुळें सौ ताईस मोठें दुःख झालें तें लिहावयासी हात न चले........श्रीमंतास श्रम जाले तो प्रकार काये ल्याहावा. तथापि मसलत भारी पडली त्याजमुळें उपाय नाहीं........नाहीं तरी येकादे तीर्थी जाऊन बसते. कोण्हाचे हातीं न लागते........त्या सारिखा ज्ञानी विवेकी कोण्ही नाहीं. त्याचे तेच येक. यैसा पुरुष पुढें होणें कठीण. आह्मां सर्वत्रांचीं आवसानें झाडून गेलीं. तथापि त्यांनीं अवसान धरून मसलत जैसी आरंभिली तैसी सिधीस न्यावी यैसा निश्चये." [1] पहिल्या कुटुंबापासून बापूंस आकोपंताशिवाय एक मुलगी होती. ती अंताजी माणकेश्वराचा मुलगा बहिरोपंत यांस दिली होती. बापूंचें दुसरें लग्न इ. स. १७६५ च्या एप्रिल महिन्यांत लक्ष्मेश्वरीं झालें. गदग परगण्यांत राहणारा व सावनूरच्या नबाबाच्या दिवाणगिरीवर असलेला गिरिधरराव ह्मणून होता त्याची ही मुलगी. या स्त्रीपासून बापूंस एक कन्या झाली. ती भोरच्या सचिवांचा मुलगा शंकरराव यांस दिली. हें लग्न ता. २४ जानेवारी सन १७७९ च्या सुमारास वांईस झालें. या लग्नाप्रीत्यर्थ बापूंनीं ४० हजार रुपये खर्च केले. आकोपंताच्या मृत्यूनंतर पुत्रसंततीच्या इच्छेनें बापूंनीं आणखीं तीन लग्नें केलीं. तिसरें इ स. १७७६ मध्यें. चौथें इ. स. १७७७ मध्यें व पांचवें इ. स. १७७८ च्या मे महिन्यांत झालें. शेवटच्या लग्नाची बायको चांगली थोर होती. अखेरच्या या लग्नाबद्दल सौ० आनंदीबाईनीं बापूंस पत्र पाठवून एक नाजुक चिमटा घेतला आहे. "नवी भावजय लाडकी केली तिचें नांव काय ठेविलें? दुसरी कधीं करावयाची?" वगैरे. या तीन बायकांपैकीं राजूबाईस एक मुलगा झाला होता, पण तो फार दिवस जगला नाहीं. बापूंच्या मरणानंतर या तीन बायकांस मिळून सालीना आठ हजार रुपयांची नेमणूक नानांनीं करून दिली होती. या नेमणुकींत आकोपंताची बायको गोदूबाई हिचाही समावेश होता. कोट्यवधि किंमतीची बापूंची मिळकत

१ का. इ. सं. त्रै.

जप्त करून त्यांच्या तीन बायकांना व सुनेला दारोदार भिक्षा मागण्यास न लावतां प्रत्येकीला महिना दीडशे पावणेदोनशे रुपये पोटापाण्याला मिळतील अशा नानांनीं मोठ्या उदार बुद्धीनें नेमणुका करून दिल्या. बापूंच्या दोन स्त्रिया त्यांच्या मृत्यूनंतर लवकरच वारल्या. शेवटची स्त्री जिऊबाई ही १८२५ मध्यें गंगास्नानास गेली होती. परत येतांना घाटणगांवचे मुक्कामीं जरीमरीचा वाखा होऊन मरण पावली. पुढें बापूंच्या सुनेनें त्यावेळचे कलेक्टर मि० चॅपलेन यांच्यामार्फत कंपनी सरकारची परवानगी घेऊन बापूंचे चुलते धोंडो महादेव यांचे चिरंजीव यांस दत्तक घेऊन त्यांचें नांव यशवंतराव असें ठेवलें. पेशवाई बुडून इंग्रजी राज्य झाल्यावर जुन्या प्रतिष्ठित घराण्याच्या कैफियती सरकारनें मागविल्या होत्या. त्यांत बोकील घराण्याची कैफियत बापूंच्या नातवानें ह्मणजे यशवंतरावानें सादर केली होती. त्यावरून बापूंच्या वंशजांस इ. स. १८३२ सालीं हिवरें गांवीं सालीना फक्त एक हजार रुपयांचें उत्पन्न होतें असें दिसतें. बापूंना कैद केलें त्या वेळीं नानांनीं त्यांची संपत्ति व कीर्ति हीही जप्त केली असें ह्मणावयास हरकत नाहीं.

२४. सखारामबापूंचा आचार शुद्ध ब्राह्मणाचा होता.[1] संध्यादि नित्यनैमित्तिक कर्में ते ठराविक वेळीं करीत असत. त्यांचें मुख्य दैवत ह्मणजे शंकर. हिवऱ्यास चारणावती नदीवर त्र्यंबकेश्वराचें देवालय बापूंनीं पुष्कळ पैसे खर्च करून बांधिलें. त्याचप्रमाणें सासवडास कऱ्हा नदीला बरीच रक्कम खर्च करून घाट बांधला. बापूंचे धर्मादायाकडे अजमासे वार्षिक १२ हजार रुपये खर्च होत. कोणीही भिक्षुक त्यांचेपासून विन्मुख गेला नाहीं. इ. स. १७५९ मध्यें बापूंनीं सासवडापासून कांहीं कोसांवर असलेल्या सिद्धेश्वराजवळ महारुद्र केले. वैदिक, शास्त्री, पुराणिक इत्यादि विद्वान व नटनर्तकादि कुशलकलाभिज्ञ लोकांची बापूंच्या घरीं चांगली संभावना होई. बापूंचा गोतावळा फार मोठा होता; व त्यांपैकीं पुष्कळ

1 कानेटकरकृत सखारामबापूंचें चरित्र पान २१९–२०.

जणांस त्यांनीं आश्रय दिला होता. बापूंकडे नोकरचाकर पुष्कळ असत. २१ मोलकरणी घरगुती कामावर असून प्रत्येकीस ३ रु. ७ आणे पगार देण्यांत येई. इ. स. १७७३ मध्यें बापूंच्या कीर्दीस २०३३०४ रुपये जमा असून १९१२४६ रुपये खर्च आहे.

२५ बापूंस शेलके शेलके परदेशी, स्वदेशी जिन्नस विकत घेऊन घरीं व्यवस्थेनें त्यांचा संग्रह करण्याचा नाद होता. कांहीं वेळेस असे जिन्नस त्यांना सरदारांकडून किंवा मुत्सद्यांकडून भेट ह्मणून येत असत. पेशवाईंत बिलोरी पेले, गालिचे, मेणबत्त्या यांचा वापर सर्वसाधारण श्रीमंत माणसांच्या घरीं असे. बापूंकडे हे जिन्नस वापरीत असत हें सांगावयास नकोच. बापूंच्या खोलींत सुवर्ण-वर्ख व नारायण तेल या दोन वस्तू असावयाच्या; कारण त्यांना वात-विकाराचा उपद्रव होता. बापूंना वडिलकीचा मान असल्यामुळें सरकारी दस्तकान्वयें त्यांनीं खरेदी केलेल्या किंवा त्यांना नजर ह्मणून मिळालेल्या मालावर जकात माफ असे. अशा मालामध्यें उत्तम तांदूळ, उंचीं वस्त्रें, कस्तुरी, लांकडी सामान वगैरे हजारो रुपये किंमतीचे जिन्नस असत. निजाम, हैदर, भोंसले, कोल्हापूरकर छत्रपती यांच्या दरबारांत बापूंचें चांगलें वजन होतें; व त्यांच्याकडून पुष्कळ नजराणे बापूंस येत. निजामाकडून बापूंस 'मदारुलमहाम' हा किताब मिळाला होता.

२६. सामान्य लोकांशीं वागतांना बापू परोपकारी, दयाळु व धार्मिक वृत्तीचे होते. सर्वांशीं गोड बोलून तडजोडीच्या वृत्तीनें वागून आपलें काम हलक्या हातानें हातोहात साधण्याची खुबी जशी त्यांना साधली होती तशी पेशवाईंतील कोणाही मुत्सद्यांस साधली नाहीं. शत्रूची खुमखुमी जिरवून पुन्हां त्यांच्याशीं सामोपचारानें वागण्यास ते तयार असत. पटवर्धनासारख्या हाडवैऱ्याबरोबरही समेट करून खांद्यास खांदा भिडवून कामकाज करण्याची त्यांची तयारी होती. सर्व कामांत कमालीची सावधगिरी ते ठेवीत असत. शत्रूस बोलण्यांत किंवा लिहिण्यांत थांगपत्ता लागूं द्यावयाचा नाहीं

किंवा मित्रांसही अंगीकृत कार्य कळावयाचें नाहीं. सर्व मसलतींत ते अत्यंत खोलपणा, गुप्तपणा, ठेवीत असत. 'आधीं केलें मग सांगितलें,' असेंच त्यांचें धोरण असे. पण कोणासही तोडावयाचें नाहीं, सर्व लोक राजी राखावयाचे अशी त्यांची वृत्ति असे. स्वीकृत कार्यांत धडाडी तर त्यांची विलक्षण असे. त्यांत पराकाष्ठेची मेहनत, त्रास पडला तरी ते त्याची कसलीही फिकीर बाळगीत नसत. बारभाईंचें कारस्थान उभारल्यानंतर एकुलत्या एक मुलाचा मृत्यू घडून आला तरी त्यांनीं अवसान सोडलें नाहीं. जशी मसलत आरंभिली तशी ती सिद्धीस नेली. एकादा मनसुबा भारी पडला, व त्यांत त्यांस माघार घ्यावी लागली तरी डोकें शांत ठेऊन उत्पन्न झालेल्या बिकट परिस्थितींतून अशा खुबीनें मार्ग काढावयाचा कीं, प्रतिस्पर्ध्याची अकल गुंग व्हावी व त्यानें यांच्यापुढें साष्टांग नमस्कार घालावा. चोहोंकडे संदर्भ लावून ठेवावयाचा आणि आपणास जेथें परिस्थितीची अनुकूलता दिसेल तेथलें मोहरें इरेस घालावयाचें. बापूंच्या कर्तबगारीबद्दल कोणाचेंच दुमत नाहीं. 'तुह्मी कालचक्रही फिरवाल' अशीच पुष्कळांची खात्री असल्यानें नानासाहेब, माधवराव व राघोबादादा या पेशव्यांना असें वाटत होतें कीं, सखारामबापू आपल्याच लगामीं असावेत.

२७. अशा थोर, राजकारणकुशल, लोकांच्या आदराला व विश्वासाला पात्र असलेल्या मुत्सद्याची आहुती नानांच्या अधिकारलालसेच्या अग्निकुंडास मिळाली. यामुळें पेशव्यांच्या राज्याचा कसा नाश झाला याचें चित्र पुढें दिसेल. परंतु या सर्व आहुती मिळावयाला नानांनीं पुणें जाळण्याचा जो डाव सर्वांवर टाकला तो बिनतोड ठरल्यामुळें नाना या चौरंगी सामन्यांत यशस्वी झाले. नानांच्या अकलेचें हें चित्र पाहून त्यांची बुद्धिमत्ता कमालीची होती असें कोण ह्मणणार नाहीं? नानांच्या बुद्धिप्रभावांत सखारामबापूंसारखे थोर, धोरणी व खंदे मुत्सद्दी दीपपतंगाप्रमाणें होरपळून गेले, हें दृश्य पाहून त्यांच्या बुद्धिचातुर्याची कोण कीर्ति गाणार नाहीं !!!

प्रकरण २२ वें.

अतशिहाणा त्याचा बैल रिकामा.

इ. स. १७८१ ते इ. स. १७८३.

१ नानांची कारभारांतील नवीन व्यवस्था. सखारामबापूंच्या जागीं नाना येतात व नानांचें काम हरिपंत फडके पहातात. परशुरामभाऊ पटवर्धनांचा कर्नाटकांतील पराक्रम.—२ शिंद्यांचा सरदार हरी बाबाजी हा राघोबादादांस झांशीस नेत असतां तो मार्गांत राघोबादादांचा अपमान करतो. राघोबादादांना शिंदे आपणांस झांशीस नेऊन कैदेंत ठेवणार असा संशय येतो. आनंदीबाई मंडळेश्वराहून कैदेंतून सुटून राघोबादादांना ब्रह्मणपुरी येऊन मिळते. राघोबादादा हरी बाबाजीच्या कैदेंतून मुक्तता करून घेण्याकरतां त्याच्याबरोबर चोळीमहेश्वर गांवीं लढाई देतात. हरी बाबाजीचा पूर्ण मोड होऊन तो मृत्यु पावतो. राघोबादादा पुन्हां सुरतेस इंग्रजांच्या आश्रयास येतात.—३ इंग्रजांचे व पेशवे सरकारचें फाटतें. इंग्रज राघोबादादांना महिना पन्नास हजारांची नेमणूक करून देतात. राघोबादादांना शिंदे फितूर असावे असा नानांना संशय येतो. आपल्यावरील आरोप घालविण्याकरतां शिंदे इंग्रजांबरोबर लढाई देण्याची तयारी करतात.—४ परशुरामभाऊंचा करवीरकरांवर मोहीम करण्याचा विचार.—५ नानांनीं शिंद्यांस देऊं केलेल्या झांशीजवळील जहागिरीबाबत व हरिपंत फडक्यांच्या कारभाराबाबत नाना व शिंदे यांच्यामध्यें पुन्हां घासाघीस सुरू झाली. परस्परांत समजाविशी होऊन शिंदे इंग्रजांबरोबर लढाई देण्यास उद्युक्त होतात.—६ हैदरअल्लीबरोबर सर्व बाजूंनीं नुकसान सोसून नाना तह करतात इंग्रजांचें पारिपत्य करण्याकरतां पेशवे, हैदर, निजाम व भोंसले यांचा एक नवीन मनसुबा तयार होतो.—७ परशुरामभाऊंची करवीरकरांबरोबर लढाई सुरू होते. परशुरामभाऊ शिरोळ काबीज करतात.—८ करवीरकरांबरोबरील लढाईंतील इतर कांहीं गोष्टी.—९ परशुरामभाऊ कित्तूरच्या देसायाचें बंड मोडतात व त्यास मिरजेस कैदेंत ठेवतात.—१० परशुरामभाऊ कित्तूरच्या देसायाचे बंड मोडण्यांत गुंतले असतां करवीरकरांच्या सरदारांचा मोड करण्याकरतां ते आपला मुलगा रामचंद्रपंत यांस पाठवितात. तो वाघापूर मुक्कामीं त्यांचा मोड करतो. नानांचा

व करवीरकरांचा तह.—११ जनरल गॉडर्ड डभई घेतो. त्याचा फत्तेसिंग गायकवाडाबरोबर तह. तो अहमदाबादही काबीज करतो. जनरल गॉडर्ड व शिंदे, होळकर यांची लढाई जुंपते. वसईचा किल्ला व उत्तर कोंकण काबीज करण्याकरतां कर्नल हार्टलीची योजना मुंबई सरकारकडून होते.—१२ पेशवे व इंग्रज यांच्या उत्तर कोंकणांतील कांहीं चकमकी.—१३ जनरल गॉडर्ड वसई घेतो.—१४ परशुरामभाऊंची आई जानकीबाई मरण पावते.—१५ खानदेशांत गुलजारखानाचें बंड व त्याचा मोड.—१६ जनरल गॉडर्ड पेशव्यांच्या सैन्याचा मोड करून बोरघाट चढून वर येतो. इंग्रज पुणें घेणार अशी धास्ती उत्पन्न होते.—१७ पेशव्यांचें सैन्य जनरल गॉडर्डची तळ-कोंकणाकडील रसद तोडतें म्हणून तो परत घाट उतरून मुंबईकडे जातो.—१८ इंग्रज व शिंदे यांची माळव्यांतील रेंगाळत असलेली लढाई.—१९ पेशवे, हैदर, निजाम व भोंसले यांच्या इंग्रजांविरुद्ध मनसुब्याप्रमाणें भोंसल्यांनीं बंगालवर स्वारी केली. परंतु कलकत्तेकरांकडून सोळा लाखांचा लांच मिळतांच ते परत नागपुरास आले. निजाम इंग्रजांबरोबर लढाईला सुरवात न करतां त्यांचेकडून आपला कांहीं फायदा होतो कीं काय हें पहात भागानगरास स्वस्थ बसला. हैदरनें मात्र आपली कामगिरी उत्तम बजावली. मद्रासवर स्वारी करून इंग्रजांचा धुव्वा उडविला.—२० इंग्रज व मराठे यांचेमध्यें सालबाईचा तह शिंद्यांचे मध्यस्तीनें ठरतो. सालबाईच्या तहाचीं कलमें.—२१ सालबाईच्या तहावर मखलाशी करण्याकरतां नानांच्या दिरंगाईची कारणें.—२२ सालबाईच्या तहावर नाना फडनविसांची शेवटीं मखलाशी होते.—२३ सालबाईच्या तहामुळें नानांची 'अतीशहाणा त्याचा बैल रिकामा' अशी स्थिति झाली. पेशव्यांच्या राज्याला व इभ्रतीला लागलेला सालबाईच्या तहाचा क्षयरोग.—२४ सालबाईच्या तहामुळें राघोबादादा नानांच्या स्वाधीन होतात. त्यांस कोपरगांवीं नेऊन ठेवण्यांत येते. ते तेथें थोडक्याच दिवसांत मरण पावतात.—२५ राघोबादादांचा स्वभाव व औदार्य.—२६ राघोबादादांचें आयुष्य विविध प्रसंगांतून कसें गेलें?—२७ राघोबादादा प्रासादिक कवीही होते. त्यांनीं केलेलें त्यांच्या भजनांतील एक पद. सद्भक्तांचे पाठीराखे सद्भक्तच असतात.

१. सखारामबापूंना कैद केल्यानंतर आपल्यावरील एक गंडांतर गेलें, आतां आपणाला कोणी घरभेद्या शत्रू उरला नाहीं, असें नानांना वाटून त्यांनीं एकतंत्री राज्याची घडी बसविण्यास सुरवात केली. सखारामबापूंकडे

वडीलकी होती, ती आतां नानाकडे आली. नानांच्या पहिल्या जागेवर हरिपंत फडके काम पाहूं लागले. या प्रमाणें नाना, हरिपंत फडके व शिंदे यांचें पुण्याकडील राजकारणाचें काम चालू असतां दक्षिणेकडील बंदोबस्ताचें काम परशुरामभाऊ पटवर्धन करीत होते. त्यांनीं नरसो गोविंद व सुरापुरकर बेरड संस्थानिक यांच्या फौजांची दाणादाण उडवून दिली आणि सुरापुरकरांकडे खंडणीची बाकी थकली होती ती वसूल करून, शिवाय वीस हजार रुपये गुन्हेगारी घेतली. नंतर इंडी, तांबे, आलमेलें वगैरे ठिकाणीं मोंगलाई तालुक्यांतून घांसदाणा घेत घेत, भाऊंची स्वारी विजापूर प्रांतांतून कर्नाटकांत उतरली. हैदरानें मलप्रभेपलीकडील सर्व मराठी राज्य काबीज केलें होतें; परंतु परशुरामभाऊंनीं सक्त मेहनत करून हणमसागर, होनगुंदे, केळूर, बसरगी, मुदलावी वगैरे नामांकित ठाणीं हल्ला करून घेतलीं आणि बदामीच्या किल्ल्याखेरीज त्या बाजूनें सर्व मराठी राज्य हैदराच्या तावडींतून सोडविलें. नंतर तेथून ते मिरज प्रांताकडे वळले. वाटेंत येतांना कित्तुरकरांचें त्यांनीं पारिपत्य केलें व तेथील देसायास त्यांनीं कैद केलें. तेथून त्यांनीं करवीरकरांच्या राज्यांत धामधूम चालविली. करवीरकरांचीं शिरोड, अकीवाट, हुकेरी व सेंडूर हीं बळकट ठाणीं परशुरामभाऊंनीं हस्तगत केलीं व वाघापूरच्या लढाईंत त्यांनीं करवीरकरांचा एवढा फडशा उडविला कीं, त्यांना पुढें दोन चार वर्षें तरी डोकें वर करण्याची शक्तीच राहूं नये. ही हकीकत इ. स. १७८० च्या जून महिन्यांत झाली.

२. इंग्रजांनीं शिंद्यांच्या मध्यस्तीनें पेशव्यांबरोबर वडगांवचा तह केला. परंतु तो त्यांना अपमानास्पद वाटून त्यांनीं चिडून जाऊन हिंदुस्थानांतील सर्व इंग्रज सैन्य एकत्रित करून पेशव्यांबरोबर लढाई देण्याचा घाट घातला. या प्रसंगीं इंग्रजांना उत्तेजन मिळण्यासारखी जी एक गोष्ट घडून आली ती अशी:— हरी बाबाजी या शिंद्यांच्या सरदाराबरोबर फौज देऊन त्याच्या बंदोबस्ताखालीं राघोबादादांची झांशीस रवानगी झाली ही हकीकत मागें आलीच आहे. ते ब-हाणपुरापर्यंत जाऊन पोंचले. मंडलेश्वरास आनंदीबाई होती.

ती तेथून निघून ब्ऱ्हाणपुरच्या मुक्कामीं दादासाहेबांस येऊन मिळाली. दादासाहेब, आनंदीबाई, अमृतराव व बाजीराव हें सारें एकत्र कुटुंब पांच वर्षांनीं पुन्हां एकत्र झालें. या वेळीं दादासाहेबांबरोबर १५०० गारदी, पंधरावीस तोफा व पांचसातशे स्वार इतका सरंजाम स्वतःचा होता. दादासाहेबांस पोंचविण्याकरतां हरी बाबाजीबरोबर पांच हजार फौज देण्यांत आली होती. ती शिंदे, होळकर व पेशवे या त्रिवर्गांची मिळून होती. [1] पेशव्यांच्या राज्याचा सत्यानाश होऊं नये ह्मणून पेशवाईवरील आपल्या हक्कावर दादासाहेबांनीं पाणी सोडलें होतें व दूरवर झांशीसारख्या ठिकाणीं आपला तुटपुंजा सरंजाम घेऊन व शिंदे देतील ती पांच दहा लाखांची जहागीर घेऊन ते स्वस्थ बसणार होते. परंतु नाना व शिंदे यांचा डाव दादासाहेब झांशीला गेल्याबरोबर त्यांना तेथील किल्ल्यांत कैद करून ठेवावयाचा होता ही बातमी दादासाहेबांना वाटेंत जात असतांना समजली. या बातमीनें दादासाहेबांना असें झालें कीं, इकडे पेशवाईवरील आपला हक्कही गेला व मरेपर्यंत आतां आपल्याला कैदेंत रहावें लागणार. मुत्सद्यांच्या या कुटिल कारस्थानाची त्यांना चीड येऊन आपली सुटका करून घेण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला. राघोबादादा हे राघूप्रमाणें सोन्याच्या पिंजऱ्यांत अडकून पडणारे नव्हते. ते खरे शूर, लढवय्ये व स्वतःच्या हिंमतीवर शत्रूच्या बलाढ्य सैन्यालाही ईर्षेनें तोंड देणारे होते. शिंदे आपणाला कैदेंत ठेवणार ही बातमी खरी किंवा खोटी याच्या चौकशींत ते असतां, एकेदिवशीं शिंद्यांचा सरदार हरी बाबाजी यानें खुद्द दादासाहेबांचा कांहीं अपमान [2] केला. त्यामुळें आपणास शिंदे कैदेंत ठेवणार ह्या त्यांना मिळालेल्या बातमीला दुजोरा आला. कारण कसें झालें तरी दादासाहेब हे पेशवे घराण्यांतील पुरुष होते. प्रत्यक्ष महादजी शिंद्यांची त्यांचा अपमान करण्याची लायकी नव्हती. असें असतां त्यांच्या एकाद्या सामान्य सरदारानें ज्याअर्थी त्यांचा धडधडीत अपमान केला, त्या अर्थीं शिंद्यांचे आपण आतांपासून कैदीच आहोंत अशी

---

१ ऐ. ले. सं. पान ३४६. २ नातूकृत महादजी शिंदे पान १४२.

त्यांच्या सरदारांची कल्पना झाल्यामुळें ते आपला उघड अपमान करतात हें दादासाहेबांना स्पष्ट दिसून आलें. पेशव्यांच्या राज्याचा नाश होतो आहे असें पाहून, दादासाहेब आपलें वैभव व सत्ता गमवावयाला तयार झाले; पण आपलें स्वातंत्र्य मात्र ते बंडखोरांना हरण करूं द्यावयाला तयार नव्हते. स्वातंत्र्य हरण होण्यापेक्षां लढाईंत मेलेलें बरें असा संकल्प करून त्यांनीं हरी बाबाजीबरोबर लढाई देण्याचें ठरविलें. हरी बाबाजीबरोबर पांच हजार फौज होती. दादासाहेबांच्या जवळ अवघी दोन हजार होती. हरी बाबाजी दादासाहेबांना अशा बंदोबस्तानें नेत असतांनाही सर्व फौज नर्मदानदीच्या कांठीं चोळीमहेश्वराजवळ आली. त्या ठिकाणीं दादासाहेबांच्या सैन्यानें हरी बाबाजीच्या पांच हजार सैन्यावर हल्ला केला. दादासाहेबांनीं तोफांचा भडिमार सुरू केला व बंदुकांच्या फैरांवर फैरा झाडल्या. त्यामुळें हरी बाबाजींचे शेंकडों लोक प्राणांस मुकले व बाकीचें सैन्य आपलें सामान टाकून दशदिशा उधळून गेलें! खुद्द हरी बाबाजीही मोठ्या शौर्यानें लढला. परंतु दादासाहेबांच्या पुढें त्याचा कांहींच इलाज चालला नाहीं. हरी बाबाजीला या लढाईंत दहा जखमा झाल्या व तो तेथेंच ठार झाला. अशा प्रकारें दादासाहेबांनीं मोठ्या शौर्यानें व त्वेषानें लढून चोळीमहेश्वरची लढाई जिंकली व लगेंच लांब लांबच्या मजली करून ते सुरतेस, इंग्रजांची फौज जमा होत होती तेथें, जाऊन त्यांना मिळाले.

३. ही सुरतेची फौज ह्मणजे कलकत्त्याहून वॉरन् हेस्टिंग्स् यांनीं मुंबई सरकारच्या मदतीकरतां पाठविलेलीं सहा पल्टणें होत. त्या फौजेवर जनरल गॉडर्ड हा मुख्य सरदार होता. तळेगांवच्या पराभवामुळें झालेला दुर्लौकिक घालविण्याकरतां इंग्रजांस, आतां मराठ्यांबरोबर लढणें प्राप्तच होतें. या वेळीं दादासाहेबांस जनरल गॉडर्ड साहेबानें आश्रय दिला. दादासाहेबांचा पराक्रम पाहून जनरल गॉडर्डला समाधान झालें व त्यानें दादासाहेबांना मोठ्या सन्मानानें ठेऊन घेतलें. या प्रसंगीं दादासाहेबांचा पराक्रम पाहून त्यांच्या पेनशनींत इंग्रजांनीं बढती केली. पूर्वीं इंग्रजांकडून दादासाहेबांना फक्त दरमहा दहा हजार रुपये मिळत होते. ते आतांपासून पन्नास हजार रुपये मिळूं

लागले. दादासाहेबांच्या जवळ जी फौज शिल्लक राहिलेली होती ती दादासाहेबां-प्रमाणें शूर असल्याचें दिसून आल्यामुळें दादासाहेबांची पेनशन इंग्रजांनीं वाढविली असें दिसतें. दादासाहेब हरी बाबाजीच्या बंदोबस्तांतून, त्याच्या सैन्याचा धुव्वा उडवून, निघून गेले यामुळें शिंदे खजील झाले. त्यांच्यावर पुणें दरबारकडून दादासाहेबांना फितुर असल्याचे आरोपही होऊं लागले. तेव्हां आपला दुर्लौकिक होतो ह्मणून शिंदे मोठ्या त्वेषानें इंग्रजांबरोबर लढाई देण्या-करतां आपल्या सैन्याची जमवाजमव करूं लागले.

४. इ. स. १७७९ चा पावसाळा संपतांच परशुरामभाऊ पुनः करवीर-करांवर मोहीम करण्याच्या उद्योगाला लागले. मिरज, तासगांव व कुरुंदवाड येथील पथकें तयार होऊन आलीं होतीं, तेवढींच बरोबर देऊन त्यांनीं चिकोडी परगण्याच्या संरक्षणाकरतां रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस रवाना केलें. त्या-प्रमाणें ते भोज येथें तळ देऊन राहिले. मोहिमेस आणखी फौज लागणार होती. तिची व तिच्या खर्चाची तजवीज पुणें दरबारकडून अद्याप निश्चित झाली नव्हती. ती करून घेण्याकरतां परशुरामभाऊ पुण्यास गेले.

५. या वेळीं पुण्यास नाना व शिंदे यांच्यामध्यें कलह उत्पन्न झाला होता. शिंद्यांचें असें ह्मणणें होतें कीं, " नानांनीं सांगितल्याप्रमाणें आह्मी दादासाहेब व इंग्रज यांचें पारिपत्य करण्याकरतां स्वारीस निघतों. परंतु आह्मी ह्मणतों त्या-प्रमाणें आमच्या दोन गोष्टी नानांनीं अगोदर केल्या पाहिजेत. गेल्या वर्षी दादासाहेबांस झांशीस नेऊन ठेवण्याचें आह्मीं कबूल केलें तेव्हां श्रीमंतांच्या खर्चाकरतां सरकारांतून आह्मांस जहागीर देऊं केली होती. आमच्या ताब्यांतून श्रीमंत जरी निघून गेले असेल तरी ती आह्मांस देण्यांत द्यावी. कारण दादासाहेब ज्या इंग्रजांच्या आश्रयाला गेले आहेत त्यांसुद्धां पारिपत्य करण्याचें आह्मीं ठरविलें आहे. शिवाय आमची दुसरी गोष्ट अशी आहे कीं, तुह्मां-जवळ हरिपंत फडके आहेत. त्यांचें आमचें वांकडें आहे. ते नाना प्रकारें तुह्मांस आमचेविषयीं कुबुद्धि शिकवितात. याकरितां त्यांस दरबारच्या कामां-तुन तुह्मीं काढून टाकावें." या दोन गोष्टींविषयीं उत्तरें प्रतिउत्तरें होऊन

उभयपक्षीं जिकीर वाढत चालली व कुतर्क उत्पन्न होऊं लागले. शिंद्यांचा मुक्काम त्या वेळीं जामगांवास होता. त्यांच्या लष्करांत एक दिवस अशी हूल उठली कीं, हरिपंत व परशुरामभाऊ हे लष्कर लुटण्याकरतां येत आहेत. ही बातमी पसरतांच मोठी गडबड होऊन शिंद्यांचें सारें लष्कर त्यांच्या हल्ल्याची वाट पहात बसलें. परंतु ही निव्वळ हूल असल्यानें कांहीं वेळानें आपोआप शांतता झाली. हरिपंत आपल्यावर केव्हां हल्ला करतील या भीतीनें शिंदे आपलें सैन्य वाढवीत होते. त्यामुळें नानांनींही हुजुरातीच्या पथकांस बोलावून घेतलें होतें. याप्रमाणें नाना व शिंदे या उभयतांमध्यें संशयपिशाच्चानें बरीच धांदल माजविली होती. अशा स्थितींत नानांनीं शिंद्यांची अशी समजूत काढली कीं, आपण पूर्वीं ठरविल्याप्रमाणें शिंद्यांस जहागीर देऊं; पण शिंद्यांनीं हरिपंतांस कारभारांतून काढून टाकण्याचा आपला आग्रह मात्र सोडावा. याप्रमाणें उभयतांची समजूत झाली व शिंदे होळकरांसह पंचवीस हजार फौज घेऊन इंग्रजांबरोबर लढाई देण्याकरतां गुजराथेंत निघून गेले. ही गोष्ट इ. स. १७७९ च्या डिसेंबर महिन्यांत घडली.

६. पेशव्यांबरोबर लढाई देण्याचा मुंबई, मद्रास व बंगाल येथील इंग्रजांनीं निश्चय केला, तेव्हां ही लढाई बरेच दिवस चालेल व जें युद्ध होईल तें मोठ्या निकराचें होईल असें धोरण नानांनीं बांधलेंच होतें. या वेळीं हैदरअल्लीनें दक्षिणमहाराष्ट्र जिंकला असल्यामुळें दोन्ही शत्रूंना एकदम तोंड देणें पेशव्यांना शक्य नव्हतें. शिवाय दादासाहेब पुनः इंग्रजांकडे जाऊन मिळाल्यामुळें हैदरअल्लीस महाराष्ट्रांत धिंगाणा घालवयास नवीन संधि आली होती. तेव्हां या पेंचप्रसंगांतून मुक्त होण्याची खटपट नानांनीं चालविली. त्यांनीं हैदरअल्लीबरोबर तो म्हणेल त्याप्रमाणें तह केला. हा तह इ. स. १७८० च्या प्रारंभीं झाला. या तहांत असें ठरलें कीं, तुंगभद्रा व मलप्रभा या दोन नद्यांमधील हैदरानें जेवढा मुलूख घेतला होता तो सर्व मुलूख पेशव्यांनीं हैदरास द्यावा. या तहामुळें आज अनेक वर्षें पेशवे व हैदर यांच्यामध्यें जो युद्धप्रसंग चालू होता, तो नानांनीं सर्व बाजूंनीं नुकसान करून घेऊन या वेळीं बंद पाडला. निजाम व नाना यांचें सूत पूर्वीपासून होतेंच. पेशवे व हैदरअल्ली यांचा

तह झाला हें पाहून इंग्रजांना हिंदुस्थानाबाहेर हांकलून लावण्याचा नवीन मनसुबा निजामअल्लीनें रचला. त्याचें स्वरूप असें होतें कीं, पेशवे, हैदर, निजाम व भोंसले यांनीं एकविचारें इंग्रजांवर हल्ले चढवावे. त्यांत पेशव्यानें मुंबई, गुजराथ, व अंतर्वेदी येथील इंग्रजांना पादाक्रांत करावें. भोंसल्यांनीं बंगाल्यावर स्वारी करावी. निजामअल्लीनें सिकाकोल, राजमहेंद्रीकडे जाऊन तो प्रदेश जिंकावा; आणि हैदरानें आपलें सर्व बळ खर्चीं घालून मद्रासवर स्वारी करावी व तिकडील प्रांत जिंकावा. या प्रमाणें चौघांनीं आपआपल्या स्वारीच्या दिशा व जिंकल्या जावयाच्या प्रदेशाची वांटणी कशी करून घ्यावयाची हें ठरवून घेऊन, इंग्रजांविरुद्ध लढण्याची तयारी चालविली.

७. परशुरामभाऊ पुण्यास आले होते. त्यांच्या मनांत फौजेच्या मागील देण्याघेण्यांत कांहीं लढे होते ते पुणें दरबाराकडून उरकून घ्यावे व चालू सालच्या मोहिमेकरतां खर्चाची तरतूद सरकारांतून करावी म्हणून त्यांनीं फारच प्रयत्न केले. परंतु नानांकडून या वेळीं मिष्ट[1] भाषणाखेरीज त्यांस विशेष कांहीं प्राप्त झालें नाहीं. मागच्या देण्याघेण्याचें तर राहोच, पण चालू सालच्या मोहिमेस खर्च लागेल ह्यापैकीं एक लाख रुपये मात्र आपण देऊं, बाकी खर्चाचें स्वारींतल्या स्वारींत भाऊंनीं भागवून घ्यावें असें नानांचें म्हणणें होतें. त्यामुळें भाऊ रुसवा करून पुण्याहून कातरजेस आले. मागाहून हरिपंततात्यांनीं जाऊन हातापायां पडून समजूत करून भाऊंस परत नेलें, हें सारें झालें. पण नानाकडून कांहीं द्रव्य निघण्याचा योग मात्र दिसेना. पुण्यास तीन महिने राहिल्यावर कंटाळून भाऊ मिरजेस आले व करवीरच्या मोहिमेवर पुन्हां रुजू झाले. नंतर भाऊंनीं एप्रिल महिन्यांत शिरोळास वेढा घातला. ठाण्यांतील लोक सुमारें तीन आठवडेपर्यंत मोठ्या मर्दुमकीनें लढले. या सुमारास मानाजी फांकडे हैदराच्या कैदेंतून सुटून करवीरकरांच्या आश्रयास येऊन राहिले होते. हे मानाजी फांकडे, सटवोजी भोंसले व राजमंडळचे येसाजी शिंदे वगैरे करवीरकरांकडील सरदार पराक्रमांत कांहीं कमी नव्हते. परंतु भाऊंना समोरासमोर

---

१. ऐ. ले. सं. पा. ३४७२.

सामना द्यावयाला त्यांच्याजवळ तयार अशी फौज नव्हती. त्यामुळें शिरोळास कुमक पोंचविणें त्यांचे हातून झालें नाहीं. भाऊंनीं तोफांच्या माऱ्यानें ठाण्याची तटबंदी जागोजाग ढांसळून पाडली; व तारीख १ मे रोजीं ठाणें हस्तगत करण्याचा संकल्प केला. अमुक गोष्ट घडली म्हणजे फौजेनें हल्ला करावा असा संकेत ठरला होता. हल्ला झाला तेव्हां भाऊ देवपूजा करीत बसले होते. हल्ला झाल्याची वर्दी येतांच ते देवपूजा तितकीच टाकून पळत जाऊन हल्ला करणारांच्या पुढच्या रांगेंत निशाण होतें त्यापाशीं जाऊन उभे राहिले. हल्ला चालू झाला. घटकाभर वीरश्रीची उभयपक्षीं खडाजंगी होऊन शेंकडों माणसें मारलीं गेलीं. ठाण्यावर पेशवे सरकारचें निशाण फडकूं लागलें. नंतर परत येऊन भाऊंनीं स्वस्थपणें देवपूजा वगैरे ब्रम्हकर्म समाप्त केलें. ब्राम्हणांनीं आपला धर्म सोडून क्षात्रधर्माचा अवलंब केला होता, त्याअर्थी भाऊंचें हें कर्म क्षात्रधर्मास अनुसरून झालें यांत शंका नाहीं. परशुरामभाऊ हे तेजसंपन्न क्षात्रवीर होते यांत संशय नाहीं. ठाण्यांतील लोक घुमटांत कोंडले गेले होते. त्यांनीं तिसऱ्या दिवशीं कौल मागितल्यामुळें त्यांस भाऊंनीं सोडून दिलें. शिरोळचे मामलेदार अंताजी जनार्दन व सरनोबत विठोजी सूर्वंशी यांस मात्र भाऊंनीं मिरजेच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवलें.

८. शिरोळ घेतल्यावर भाऊंनीं हुकेरी व सेंडूर हीं ठाणीं घेतली. मिरज, कुरुंदवाड, चिकोडी व निपाणी या हद्दींतील अनुक्रमें शिरोळ, अकीवाट, हुकेरी व सेंडूर हीं करवीरकरांचीं ठाणीं फार त्रासदायक झाली होतीं व तीं घेणें प्राप्त झालें होतें म्हणून गतवर्षी व यंदा मिळून हीं चार ठाणीं भाऊंनीं घेऊन पेशव्यांच्या राज्यापैकीं हा प्रांत करवीरकरांच्या उपद्रवापासून निर्वेध केला. नंतर भाऊंनीं सामानगडाच्या रोखें चाल केली. तिकडे जातांना इचलकरंजीकर व्यंकटराव घोरपडे यांस त्यांनीं करवीरकरांजवळ ठेवलें. करवीरकरांकडे नेहमीं पेशव्यांच्या मुलखांतून रसद जाते ती बंद करावी; कोडोली, अळतें, शिरोळ वगैरे ठाणीं राखावीं आणि करवीरकर येसाजी शिंदे वगैरे सरदारांस जरबेंत

ठेवावें, हीं कामें व्यंकटरावांकडे सोंपविलीं होतीं. सामानगडाच्या घेऱ्यांत कापशीकर सेनापतीचे कांहीं गांव होते. ते सामानगडकऱ्यांनीं घेतले होते. ते गांव परत घेऊन सेनापतींच्या हवालीं करण्यांत भाऊंचे पंधरा दिवस गेले. त्या अवधींत कित्तुरकरांशीं तहाचें बोलणें घाटत होतें. परंतु त्यांचें बोलणें उडवाउडवीचें असल्यामुळें कोणताच ठराव होण्याचा रंग दिसून आला नाहीं.

९. परशुरामभाऊंना कित्तुरचा देसाई गोकाकच्या ठाण्यांत आहे असें समजतांच त्यांनीं तिकडे आपल्या सैन्याचा मोर्चा वळविला. रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस भाऊंनीं पुढें पाठविलेंच होतें. ते तेथें जाऊन पोंचतात तोंच कित्तुरकरांचे दोन तीनशे स्वार व पांच सातशें पायदळ घटप्रभेच्या दक्षिणतीरीं होतें, त्याच्याशीं गांठ पडून लढाई झाली. त्यांत देसायाच्या सैन्याचा मोड झाला. नंतर गोकाकेस चौक्या देऊन रघुनाथराव उभे होते तोंच त्यांना भाऊ येऊन मिळाले. तेथें दहा पंधरा दिवस लढाई झाल्यानंतर देसाई निरुपाय होऊन भाऊंच्या स्वाधीन झाला. भाऊंनीं गोकाकमध्यें आपलें ठाणें बसवून कित्तुरच्या देसायास मिरजेच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें.

१०. करवीरकरांनीं रास्त्यांच्या विद्यमानें परशुरामभाऊंशीं तहाचें बोलणें लाविलें होतें. सात लक्ष रुपये खंडणी आपण देऊं असें त्यांचें ह्मणणें होतें. भाऊंनीं तें मान्य केलें होतें, परंतु इतर कित्येक बाबींचा अद्यापि ठराव व्हावयाचा होता. खरोखर करवीरकरांच्या मनांत तह करावयाचा असतां तर आजवर तह होऊनहीं गेला असता. परंतु येसाजी शिंदे, मानाजी फांकडे व सटवाजी भोंसले हे पराक्रमी सरदार असल्यामुळें त्यांनीं करवीरकरांस तह करूं दिला नाहीं. परशुरामभाऊ गोकाकच्या लढाईंत गुंतले आहेत असें पाहून ते कोल्हापुरांतून बाहेर पडले व त्यांनीं वाळवें, इस्लामपूर, कऱ्हाडपर्यंत स्वाऱ्या करून गांवें लुटण्याचा व जाळण्याचा सपाटा सुरूं केला. त्याचा बोभाटा रोज पुणें दरबारास जाऊं लागला. भाऊंनीं व्यंकटरावांस पत्रें पाठवून त्यांचा बंदोबस्त करण्यास लिहिलें. परंतु त्यांच्या हातून त्यांचा कांहींच बंदोबस्त झाला नाहीं. त्यामुळें या तिघांस तो प्रांत उध्वस्त कर-

ण्यास सहज फावलें. व्यंकटरावांकडून हें बंदोबस्ताचें काम आटोपत नाहीं असें पाहून भाऊंनीं आपला जेष्ठ पुत्र ह्मणजे रामचंद्रराव यांजबरोबर चार हजार फौज देऊन त्यांस त्यांचेवर रवाना केलें. रामचंद्ररावांची ही पहिली स्वारी होती. त्यांनीं लांब लांबच्या मजला करून वाघापूरचे मुक्कामीं या शिव- गांस गांठलें, व त्यांचा पूर्ण पराजय केला. या वेळीं रामचंद्रपंतांस पुष्कळ लूट मिळाली. या वेळीं करवीरकरांची एवढी दाणादाण झाली कीं, येसाजी शिंद्यांस दहा स्वारांनिशीं करवीरास पळून जावें लागलें. ही लढाई झाल्यानंतर करवीरकरांचा दंगा थांबला. पेशव्यांच्या आग्रहावरून करवीरकरांनीं मानाजी फांकडे व सटवाजी भोंसले यांस निरोप देण्याचें कबूल केलें. ' मानाजीनें पूर्वीप्रमाणें चाकरी करून श्रीमंतांच्या पदरीं रहावें, त्याचा सरंजाम सरकारांत जप्त झाला आहे तो आपण सोडितों ' असें नानांचें ह्मणणें होतें. परंतु माना- जींस नानांचा विश्वास नसल्यामुळें तो करवीरास राहिला. त्याच प्रमाणें सटवाजी भोंसलेही पुणें दरबारचा विश्वास न वाटल्यामुळें करवीरास राहिला. ही गोष्ट इ. स. १७८० च्या आक्टोबर महिन्यांत झाली.

११. इ. स. १७८० च्या जानेवारी महिन्याच्या सुरवातीला मराठ्यां- बरोबर लढाई देण्याच्या हेतूनें गॉडर्ड यानें सैन्याची सिद्धता करून डभ- ईवर चाल केली, व तें ठाणें त्यानें दोन दिवसांत घेतलें. नंतर फत्तेसिंगराव गायकवाड यास अनुकूल करून घेऊन त्याच्याबरोबर गुजराथची वांटणी करून घेण्याचा तह केला. नंतर त्यानें अहमदाबादेवर चाल करून ती गुजराथची राजधानी तारीख १५ रोजीं घेतली. इतक्यांत त्या प्रांताचा बचाव करण्याकरतां व इंग्रजांबरोबर युद्ध करण्याकरतां महादजी शिंदे व तुकोजीराव होळकर आले. त्यांचेबरोबर पंचवीस हजार फौज होती. त्यांचे बरोबर इंग्रजांचें युद्ध जुंपलें तें मे महिन्याच्या अखेरपर्यंत चाललें. महादजी शिंदे हे गनिमी काव्याच्या लढाईंत फार पटाईत असल्या- मुळें त्यांनीं या युद्धापासून इंग्रजांस विशेषसा फायदा होऊं दिला नाहीं. इकडे जनरल गॉडर्ड साहेबास मुंबई सरकारचा तगादा लागला कीं, तुम्हीं

गुजराथेंत शिंद्यांबरोबर लढाई करण्याच्या भरीस न पडतां इकडे निघून यावें आणि वसईचा किल्ला व उत्तर कोंकणापैकीं घाट्यापर्यंतचा प्रदेश काबीज करावा. परंतु पावसाळा डोक्यावर आल्यामुळें यंदा वसई घेणें होणार नाहीं असा गॉडर्ड साहेबाचा अभिप्राय पडला. सबब तो स्वतः मुंबईकडे आला नाहीं. तथापि मुंबई सरकारची फौज त्याच्या कुमकेस गेली होती ती कर्नल हार्टली याजबरोबर त्यानें उत्तर कोंकण सर करण्याकरितां परत पाठवून दिली.

१२. ही फौज येण्यापूर्वींच मुंबई सरकारानें कल्याणचें ठाणें घेऊन बोरघाटापर्यंत चौक्या बसविल्या होत्या. त्या चौक्या उठविण्यासाठीं व कल्याण परत घेण्यासाठीं नानांनीं बाजीपंत अण्णा याजबरोबर फौज पाठविली. त्या फौजेनें बोरघाटांतील चौक्या कापून काढून त्यांच्या दोन तोफा हस्तगत केल्या. तेव्हां इतर चौक्या भीतीनें उठून गेल्या. नंतर ही फौज कल्याणच्या ठाण्यास वेढा घालण्यास तयार झाली, तोंच कर्नल हार्टली गुजराथेंतून तेथें आला. त्यानें तारीख २४ मे च्या दिवशीं बाजीपंताच्या फौजेवर हल्ला करून ती पिटाळून लाविली. गणेशपंत बेहरे सुरतेस अठ्ठाविशींत लुटालुट करीत होते. त्यांवर एप्रिलच्या २३ व्या तारखेस जनरल गॉडर्ड याच्या सैन्यांपैकीं एका तुकडीनें छापा घालून त्यांच्या तोफा व बुनगे लुटून घेऊन त्यांस पिटाळून लावलें.

१३. उत्तर हिंदुस्थानांत गोहदच्या राण्याला अनुकूल करून घेऊन त्याच्या माहितीनें यमुना उतरून एक इंग्रजी फौज अलीकडे आली होती. तिनें आगष्ट महिन्यांत ग्वाल्हेरीचा किल्ला घेतला. तो किल्ला परत घेण्यासाठीं व त्या प्रांतांतून इंग्रजांस घालवून लावण्यासाठीं महादजी शिंदे पावसाळ्यांतच उज्जनीहून निघाले. पावसाळा संपतो न संपतो तोंच जनरल गॉडर्ड गुजराथेंतून सैन्यासह मुंबईकडे आला. तो वसईस वेढा घालणार ही बातमी नाना फडनविस यांस कळल्यावरून त्यांनीं रामचंद्र गणेश व बाजीपंत अण्णा यास घाईघाईनें वसईच्या कुमकेस पाठविलें. परंतु त्या

फौजेस अडवून धरण्याच्या कामावर कर्नल हार्टली याची योजना करून जनरल गॉडर्ड यानें तारीख १३ नोव्हेंबर रोजीं वसईस वेढा घातला. सुमारें एक महिना युद्ध झाल्यावर तारीख ११ डिसेंबर रोजीं जनरल गॉडर्ड यानें वसईचा किल्ला काबीज केला. त्या अवधींत रामचंद्र गणेश व बाजीपंत अण्णा फौज घेऊन पुण्याहून आले. त्यांच्याशीं लढण्याची सर्व जोखीम कर्नल हार्टली याच्या शिरावर पडली. सर्व नोव्हेंबर महिनाभर त्याच्या फौजेच्या व मराठ्यांच्या फौजेच्या लढाया दररोज होत होत्या. तारीख १२ डिसेंबर रोजीं मोठें युद्ध झालें, त्यांत रामचंद्र गणेश मारले जाऊन मराठी फौज मागें हटली. पण त्यामुळें कर्नल हार्टली यास विश्रांति मिळाली असें नाहीं. कारण दसरा झाल्याबरोबर हरिपंत फडके घाटाखालीं जाऊन पोंहोचले. आणि पुन्हां इंग्रजांशीं जोरानें युद्ध सुरू झालें.

१४. दसरा होतांच नानांनीं परशुरामभाऊंस सर्व फौजेनिशीं पुण्यास जलदीनें येण्याविषयीं पत्रें पाठविलीं होतीं. त्या पत्रांस अनुसरून भाऊंनीं फौज गोळा केली. पण स्वारीस निघावें तों भाऊंची मातोश्री जानकीबाई आजारी पडली ह्मणून भाऊ लष्करांतून निघून तासगांवला आले. जानकीबाईचें दुखणें दिवसेंदिवस जास्त विकोपास जाऊन तारीख २९ डिसेंबर रोजीं तिचें देहावसान झालें. त्यामुळें भाऊंनीं स्वारीस जाण्याचा आपला बेत रहित करून रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचेबरोबर फौज देऊन त्यांस पुण्यास रवाना केलें. तसेंच आपला जेष्ठ पुत्र रामचंद्रपंत यास खंडणी वसूल करण्याकरतां कित्तुर संस्थानांत रवाना केलें.

१५. या सुमारास खानदेशांत गुलजारखानाचें स्तोम माजलें होतें. गुलजारखान व दादासाहेबांचा कारकून केसो कृष्ण या उभयतांनीं रनाळ्याच्या किल्ल्याचा आसरा धरून मोठी फौज जमवून दंगा सुरू केला होता. त्यांचें स्तोम मोडण्याकरतां नानांनीं गणेशपंत बेहरे यांस फौज देऊन तिकडे पाठविलें. त्यांच्या मदतीस वाघ व लांबहाते हे होळकरांचे सर-

दार गेले होते. या सर्वांनीं मिळून गुलजारखान व केसोपंत यांच्याबरोबर लढाई करून त्यांचा पराजय केला व त्यांचें बंड मोडून टाकलें.

१६. कर्नल हार्टली याच्याशीं लढण्याकरतां पुण्याहून मोठी फौज घेऊन हरिपंततात्या गेल्याचें वर्तमान जनरल गॉडर्ड यास समजतांच तो वसईहून तळ हालवून हार्टलीच्या मदतीस धांवून आला. त्या वेळीं सर्व इंग्रजी फौजेचा तळ वज्रेयोगिणीवर होता. हरिपंततात्या दहिवलीस राहिले होते. बाजीपंत अण्णा तोफा, गारदी वगैरे सरंजामानिशीं बदलापुरावर राहिले होते. मराठ्यांची इतकी फौज आल्यावर इंग्रज पुण्यावर जाण्याचें धाडस करणार नाहींत, ते समुद्रकिनाऱ्याचीं ठाणीं घेण्याचा प्रयत्न करतील किंवा परत सुरतेस जाण्याचा घाट घालतील असें सर्वांस वाटत होते. मराठयांच्या एवढ्या मोठ्या सैन्याला तोंड देऊन पुण्याच्या रोंखानें चाल करणें मोठ्या धाडसाचें काम होतें. परंतु तें पतकरून जनरल गॉडर्ड यानें मराठ्यांच्या फौजेला हटवीत हटवीत बोरघाटाच्या पायथ्यापर्यंत त्यानें चाल केली. ही हकीकत नानांस समजतांच त्यांनीं तुकोजी होळकर यांची रवानगी घाटाखालीं केली. त्या वेळीं होळकरांजवळ पांच हजार फौज व पांच हजार पेंढार होतें. या वेळीं हरिपंततात्या, बाजीपंत व होळकर यांचें सैन्य इंग्रजी सैन्यापेक्षां चौपटीनें अधिक असूनसुद्धां तें जनरल गॉडर्ड यानें आपल्या पराक्रमानें धुडकावून लाविलें, व तो बोरघाट चढून वर आला. त्या वेळीं नानांनीं हरिपंततात्या व होळकर यांस पत्रें पाठवून असा जबाब विचारला कीं, ‘ तीस हजार स्वार व चार साडेचार हजार पायदळ तुह्मांबरोबर असतां तुह्मीं इंग्रजांस घाटावर कसें येऊं दिलें ?’ त्या पत्रास हरिपंतांनीं उत्तर लिहिलें व आपली चूक झाली असें त्यांनीं प्रांजलपणें कबूल केलें. आतां इंग्रज पुण्यावर स्वारी करणार असें समजून पुण्याचे राहिवासी लोक आपलीं घरेंदारें सोडून पळून जाऊं लागले. पुण्यास दोन दिवस मोठी तारांबळ उडाली होती. श्रीमंत पेशवे पुरंदरास निघून गेले होते. चार कोसांवर ओझें नेण्याकरतां भाड्याचा बैल दहा रुपये भाडें देऊं करूनही मिळेनासा झाला होता.

१७. बोरघाटाच्या माथ्यावर खंडाळें येथें इंग्रजी सैन्याचा मुक्काम झाला होता. त्यांच्या तोंडावर हरिपंत व होळकर हे राहिले होते, ते कारल्याच्या मुक्कामीं होते. घाटाखालीं बदलापुरास बाजीपंत अण्णा होते. इंग्रज घाट चढूं लागले तेव्हां त्यांच्या पिछाडीवर बाजीपंत हल्ला करून त्यांची शक्य तेवढी नासधूस व लूटमार करीत होते. तरी त्यास दाद न देतां इंग्रज घाटावर निघून गेले. दररोज हरिपंत इंग्रजांच्या छावणीवर तोफांचा भडिमार करीत होते. तोफांच्या टप्याबाहेर इंग्रज असल्यानें त्यांचें फारसें नुकसान होऊं शकलें नाहीं. इंग्रज पुण्यावर चाल करून येणार म्हणून नानांनीं घाटाखालील फौज वर आणविली होती. इंग्रजांचा जोर आहे असें पाहून नानांनीं परशुरामभाऊंस तांतडीनें बोलावून घेतलें. तळकोंकणांतून इंग्रजांना जी रसद पोंचत होती ती बंद करण्याच्या कामावर परशुरामभाऊंची योजना झाली. त्याप्रमाणें तळकोंकणांत खोपवलीपर्यंत त्यांनीं इंग्रजांची रसद लुटली. याप्रमाणें भाऊंनीं मुंबईच्या बाजूनें मिळणारी कुमक बंद पाडल्यामुळें जनरल गाडर्डच्या तोंडचें पाणी पळालें. त्यानें पुण्यावर हल्ला करण्याचा विचार सोडून दिला व तो बोरघाट उतरून मुंबईकडे निघाला. त्यानें दोन तीन दिवसांतच पनवेल गांठली. ही गोष्ट तारीख २३ एप्रिल सन १७८१ रोजीं घडली.

१८. गोहदच्या राण्यास अनुकूल करून घेऊन एका इंग्रजी तुकडीनें ग्वाल्हेरचा किल्ला हस्तगत केला व त्यामुळें भर पावसाळ्यांत शिंद्यांना तिकडे जावें लागलें ही हकीकत मागें आलीच आहे. भर पावसाळ्यांतच शिंद्यांची व इंग्रजांची गांठ पडली. कर्नल क्यामॅक हा शिंद्यांशीं लढत लढत दक्षिणेकडे चाल करीत माळवा प्रांतांत आला आणि एप्रिल महिन्यांत कर्नल मूर याची फौजही त्याला सामील झाली. नंतर त्यांनीं भोपाळच्या नबाबाला अनुकूल करून घेतलें व शिंदे आणि होळकर यांच्या जहागिरींत दंगा सुरू केला. शिंदे व इंग्रज यांचें युद्ध त्या प्रांतांत सतत पांच सहा महिने सुरू होतें. इंग्रजांनीं शिंद्यांच्या फौजेवर छापे घालून त्यांचें पुष्कळ

नुकसान केलें. परंतु शिंद्यांनीं मोठ्या चिकाटीनें दम धरला. रेंगाळत पडलेल्या लढाईमुळें इंग्रजही मोठ्या टेंकिला आले. त्यामुळें परस्परांची तहाविषयीं भाषा सुरू झाली. शिंदे व कर्नल मूर पुढें पावसाळ्यानिमित्त माळवा प्रांतांत छावणी करून राहिले.

१९. पेशवे, हैदर, निजाम व भोंसले यांनीं संगनमत करून इंग्रजांना हिंदुस्थानाबाहेर घालवून लावण्याचा मनसुबा केला होता हें मागें आलेंच आहे. या चौघांपैकीं भोंसले व निजाम हे आयत्या वेळीं इंग्रजांस सामील झाले. मुधोजी भोंसल्यांनीं नानांच्या समजुतीकरतां आपले चिरंजीव चिमणाराजे यांना जंगी सरंजाम देऊन बंगाल प्रांतावर पाठविलें. परंतु कलकत्त्याच्या लाटसाहेबांकडून सोळा लक्ष रुपयांचा लांच[1] मिळतांच ही भोंसल्यांची फौज मुकाट्यानें नागपुरास परत आली. भोंसल्यांनीं लढाईची हालचाल तरी नानांस दाखविली; परंतु निजामानें तेवढेंही केलें नाहीं. निजाम बाकीच्याबरोबर चाललेली मजा पहात भागानगरास आपले जागीं स्वस्थ बसून राहिला इतकेंच नव्हे, तर मद्रासकर इंग्रजांशीं कांहीं फायदेशीर तह ठरवून घेण्याकरतां त्याचा उद्योग याच वेळीं गुप्तपणानें सुरू होता. हैदरानें मात्र आपलें काम चोखपणानें बजावलें. त्यानें नव्वद हजार फौज गोळा करून मद्रास प्रांतावर स्वारी केली, आणि तो प्रांत जाळून लुटून फस्त केला. वाटेंत कर्नल मनरो व कर्नल बेली यांच्या फौजा त्याच्या तावडींत सांपडल्या. त्यांपैकीं पहिल्या फौजेची त्यानें दाणादाण उडविली आणि दुसऱ्या फौजेंतील सर्वच शिपाई त्यानें ठार मारिले.

२०. याप्रमाणें उभयपक्षांच्या लढाईचा धुमधडाका चालला असतां इंग्रजांना वाटलें कीं, मराठे व हैदर हे जोंपर्यंत एकत्र राहतील तोंपर्यंत त्या उभयतांबरोबर आपण एकट्यानें लढणें फायद्याचें होणार नाहीं. म्हणून इंग्रजांनीं नानाबरोबर तहाच्या वाटाघाटी करण्याला प्रारंभ केला.

---

1 खरेकृत नाना फडनविस यांचें चरित्र पान १०५.

ही बाटाघाट इंग्रज व पेशवेसरकार यांच्यामध्यें महादजी शिंदे यांच्या मध्यस्थीनें सुरू झाली. त्यामुळें इ. स. १७८२ च्या सुरवातीपासून इंग्रज व मराठे यांचें युद्ध तहकूब झालें. तारीख १७ मे सन १७८२ रोजीं साल्बाई येथें इंग्रज व मराठे यांच्या दरम्यान तहाच्या अटी ठरल्या त्या अशा :–(१) इंग्रजांनीं पुरंदरच्या तहानंतर मराठ्यांपासून घेतलेला सर्व मुलुख सार्ष्टीबेट खेरीज करून त्यांचा त्यांस परत द्यावा. (२) हैदर अल्लीनें इंग्रजांचा काबीज केलेला मुलुख त्यानें इंग्रजांस परत करावा. (३) इंग्रज आणि पोर्तुगीज यांच्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राच्या युरोपियन लोकांस मराठ्यांनीं आपल्या मुलखांत राहूं देऊं नये. (४) शिंद्यांच्या कामगिरीबद्दल व तह पाळण्याच्या जामिनकीबद्दल त्यांना भडोच देण्यांत यावें. (५) इंग्रजांनीं राघोबांचा पक्ष कायमचा सोडावा व राघोबांनीं दरमहा फक्त पंचवीस हजार रुपये नक्त नेमणूक घेऊन गोदातीरीं त्यांच्या इच्छेस येईल त्या ठिकाणीं रहावें. अशीं या तहाचीं मुख्य कलमें होतीं.

२१. या तहाच्या अटी जरी ठरल्या तरी त्यावर नानांनीं ताबडतोब सही केली नाहीं. या तहांतील अटी शिंद्यांनींच ठरविल्या होत्या. अर्थात् त्या त्यांना मान्यच होत्या. त्या नानांना मान्य नसल्यामुळें ते तहावर सही करण्यास अळमटळम् करीत होते. त्यांतील महत्वाचीं कारणें अशीं होतीं :–(१) या तहामुळें शिंद्यांचें महत्व इंग्रजांच्या दरबारीं हिशोबापेक्षां जास्त वाढतें. शिंद्यांच्या मनांत दिल्लीस पुनरपि आपलें वर्चस्व स्थापून बादशहा व त्याची दौलत आपल्या हातीं रहावी व बादशहाचें नांव पुढें करून त्या बळावर दुसरीं मोठमोठीं कामें करून घ्यावीं असें होतें. बादशहाचा वजीर नबाबखान जेथपर्यंत जिवंत होता तेथपर्यंत मराठ्यांचा दिल्लीच्या राजकारणांत प्रवेश होण्याचा संभव नव्हता; परंतु तो इमानी व पराक्रमी वजीर सन १७८२ च्या एप्रिल महिन्यांत मृत्यु पावला. त्यामुळें दिल्ली दरबारांत घुसण्याचा आपला फार

दिवसांचा हेतु आतां सिद्ध होण्यास त्रास पडणार नाहीं असें शिंद्यांस वाटत होतें. हा त्यांचा हेतु हाणून पाडण्याचा जर इंग्रजांनीं प्रयत्न केला असतां, तर त्यांना तो सहज साध्य झाला असता. कारण हा दिल्लीचा बादशहा पूर्वी पुष्कळ वर्षे इंग्रजांचें पेन्शन खाऊन त्यांच्या आश्रयास राहिला होता. शिवाय बंगाल, बहार, अयोध्या, रोहिलखंड, या सर्व प्रांतात इंग्रजांचीच सत्ता प्रस्थापित झालेली होती. परंतु हल्लीं वॉरन् हेस्टिंग्ज यानें महादजी शिंद्यांस स्पष्टपणें सुचविलें कीं, तुह्मीं पुणें दरबाराशीं आमचा तह ठरवून द्या आणि दिल्लीस जाऊन वाटेल तसा बादशहाच्या दौलतीचा बंदोबस्त करा. आपण कांहीं त्यास आड येणार नाहीं. शिवाय या तहाच्या मध्यस्थीकरतां इंग्रजांकडून शिंद्यांना भडोच मिळणार होतें. यामुळें शिंद्यांचें पारडें जास्त जड होणें नानांना बरें वाटत नव्हतें. (२) नानांच्या मनांत राघोबादादा पहिल्यानें आपल्या ताब्यांत आल्याखेरीज इंग्रजांबरोबर तहाच्या वाटाघाटी करूं नयेत असें होतें. त्याचप्रमाणें साष्टी बेट व त्याच्या सभोंवतीचा प्रदेश नाना इंग्रजांना सोडावयाला तयार नव्हते. परंतु ज्याच्या बळावर ते इंग्रजांबरोबर लढणार, तेच शिंदे सालबाईच्या तहांत नाना व इंग्रजांच्यातर्फे मध्यस्थ असल्यामुळें नानांना तह मोडण्याचें सामर्थ्य राहिलें नव्हतें. या बाबतींत इंग्रजांचें ह्मणणें असें होतें कीं, साष्टीशिवाय पेशव्यांचा बाकीचा सर्व मुलुख आह्मीं परत करूं. आमच्या मुंबईच्या वसाहतीला साष्टीच्या बेटाची अत्यंत जरूरी आहे. सबब आह्मीं ती परत देणार नाहीं. दुसरें दादासाहेबांना आह्मीं आश्रय दिला आहे. त्यांना धरून आतां तुमच्या हवालीं करावें तर आमच्या इभ्रतीस बट्टा येतो. आह्मीं त्यांना या तहानंतर सहाय्य देणार नाहीं. आणि ते आपखुषीनें तुह्मांकडे येतील तर त्यास आह्मी हरकत करणार नाहीं. या दोन्ही गोष्टींवर शिंद्यांचें असें ह्मणणें पडलें कीं, आपली दिल्लीची मसलत साधते तर साष्टीबद्दल नानांनीं हेका धरूं नये व

त्याचप्रमाणें दादासाहेबांस स्वाधीन करण्याविषयीं इंग्रजांशीं नानांनीं आग्रह धरूं नये. (३) हैदरानें इंग्रजांचा जिंकलेला मुलुख त्यांना परत देण्यांत यावा, या अटीमुळें तो प्रांत परत देण्याबद्दलची जबाबदारी नानांवर पडत होती. नानांनींच हैदराला इंग्रजांविरुद्ध उठविलें होतें. शिवाय हैदराचा व नानांचा पूर्वी सलोख्याचा तह झाला होता. अशा स्थितींत हैदराला त्यानें जिंकलेला इंग्रजांचा मुलुख परत इंग्रजांस द्यावा असें नानांनीं हैदराला सांगणें व त्याप्रमाणें त्याला करावयाला भाग पाडणें ह्मणजे आपण होऊनच तहाच्या अटी मोडून हैदराला पुनरपि आपला शत्रू बनविण्यासारखें होतें.

२२. या तीन गोष्टींमुळें नाना पेंचप्रसंगांत आले होते. यासंबंधीं सुमारें सहा महिनेपर्यंत नाना व शिंदे यांचा पत्रव्यवहार चालू होता; परंतु नानांच्या ह्मणण्याप्रमाणें शिंद्यांकडून कोणतीच गोष्ट घडत नव्हती. उलट ते इंग्रजांच्या वतीनें नानांची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत होते. नाना हे पेशवाईचा सर्व अधिकार आपल्या हातीं येण्याकरतां महाराष्ट्रांतील कांहीं सरदारखेरीज करून प्रत्येकाबरोबर वांकडे झाले होते. तेव्हां यापुढें कोणतीही मसलत शिंद्यांखेरीज पार पाडण्याचें त्यांना सामर्थ्य नव्हतें. त्यांच्याच ओंजळीनें त्यांना या पुढें सर्व प्रसंगीं पाणी पिणें भाग होतें. यामुळें हें सालबाईच्या तहाचें घोंगडें बरेच दिवस भिजत पडलें. अशा स्थितींत तारीख ७ डिसेंबर सन १७८२ रोजीं हैदरअल्ली मृत्यु पावला. त्यामुळें त्याच्याबरोबर केलेल्या तहांतून पळवाट काढण्यास नानांना फुरसत मिळाली. कारण हैदरबरोबर केलेला तह त्याचा मुलगा टिपू याच्याबरोबर तसाच चालवावा हा निर्बंध त्या तहाच्या अटींत नव्हता. त्यामुळें शेवटीं नानांनीं सालबाईच्या तहनाम्यावर तारीख २४ फेब्रुवारी सन १७८३ रोजीं पेशव्यांची मखलाशी करून शिक्केमोर्तब करून तो कागद इंग्रजांच्या हवालीं केला.

२३. ‘अती शहाणा त्याचा बैल रिकामा’ या म्हणीप्रमाणें नानांनीं इंग्रजांबरोबर जो पेशव्यांच्या वतीनें तह केला त्यामुळें त्यांनीं पेशव्यांच्या राज्याची

कशी हानि केली हें येथें पहाणें आवश्यक आहे. (१) इंग्रजांनीं महादजी शिंद्यांस मध्यस्थी घालून व त्यांना भडोच व दिल्लीच्या राजकारणाची लालूच दाखवून त्यांना आपल्या लगामीं ओढलें. त्यामुळें पेशवे मालक व शिंदे सरदार—नोकर ही नैतिक भावना शिंद्यांच्या मनांतून जाऊन आपण एक स्वतंत्र राज्यकर्ते आहों अशी त्यांची भावना झाली. (२) शिंद्यांचें वळण नागपूरकर भोंसले यांनाही लागलें. पुढें तेंच वळण होळकर व गायकवाड यांनींही गिरविलें. या सालबाईच्या तहामुळें पेशव्यांच्या राज्याचीं शकलें नानांनीं आपण होऊन पाडलीं. (३) या तहामुळें टिपू हा पेशव्यांचा शत्रू बनला. त्याच्या पारिपत्याकडे पेशव्यांना आपलें सामर्थ्य खर्च करावें लागल्यामुळें दुसरें कोणतेंच भरींव राजकारण त्यांना पुढें साधतां आलें नाहीं. पेशव्यांना दिवसोंदिवस शिंदे जे जड वाटूं लागले त्याचें हें एक कारण होतें. यापुढें पेशव्यांचें सर्व लक्ष दक्षिणेकडे गुंतल्यामुळें उत्तरेकडे पेशव्यांच्या सत्तेचा कबजा सहजा सहजीं शिंद्यांच्या ताब्यांत गेला. (४) इंग्रजांकडे साष्टी राहिल्यामुळें पेशव्यांची आरमारी सत्ता लयाला जाऊं लागली. इंग्रजांच्या आरमाराचा पेशव्यांना कायमचा शह बसला. (५) शिंदे व टिपू यांचे दुवे अलग झाल्यानें इंग्रजांपुढें ब्र काढण्याचें सामर्थ्य पेशव्यांत यानंतर राहिलें नाहीं. (६) इंग्रज व पोर्तुगीज यांखेरीज दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रांतील युरोपियनांना पेशव्यांच्या राज्यांत आश्रय मिळणारा नसल्यामुळें इंग्रजांना आतां फ्रेंचांची अगर दुसऱ्या कोणत्याही युरोपियनांची भीति राहिली नाहीं. त्यामुळें इंग्रजांविरुद्ध कोणतेंही कारस्थान करण्याचे कामीं पेशवे दरबारचे हातपाय लुले झाले. एकंदरींत सालबाईच्या तहानें पेशव्यांच्या राज्यांत जें एकीचें थोडेंबहुत भांडवल शिल्लक राहिलें होतें, त्याचे विलग विलग भाग झाले. शिंद्यांचें प्रस्थ प्रमाणापेक्षां जास्त इंग्रजांनीं वाढविल्याबरोबर त्यांच्या बरोबरीच्या भोंसले, होळकर वगैरे सरदारांना त्यांचें वैषम्य वाटून इंग्रजांची स्वतंत्र मैत्री संपादन करण्याची त्यांना इच्छा होऊं लागली. त्यामुळें पेशव्यांचें राज्य अलग आहे असें त्यांना वाटून त्याप्रमाणें ते आपला संबंध ठेऊं लागले. एकंदरींत हा नानांनीं केलेला सालबाईचा तह म्हणजे इंग्रजांच्या नांवानें नानांनीं

करून ठेवलेलें पेशवाईच्या राज्याचें मृत्युपत्रच होय, असें म्हणावयास हरकत नाहीं. आणि हें सारें कां ? तर नानांना पेशवाईचा सर्वाधिकार उपभोगावयाचा होता म्हणून. राघोबादादा नानांच्या पूर्ण कैदेंत पडेतोंपर्यंत त्यांना तो उपभोगतां येण्यासारखा नव्हता. याकरतांच राघोबादादांना ताब्यांत घेण्याकरतां सालबाईसारखे तह नानांनीं इंग्रजांबरोबर केले. पेशव्यांची राजधानी पुणें जाळणें किंवा सालबाईचा तह करणें या दोन्हीं गोष्टी सारख्याच आहेत. पुणें जाळलें जाऊं नये म्हणून राघोबादादांनीं माघार घेतली पण पेशव्यांचें राज्य भस्म होऊं नये म्हणून शिंद्यांनीं माघार घेतली नाहीं. शिंद्यांना जो स्वार्थाचा उमाळा फुटला तो नानांनींच त्यांना शिकवला असल्यामुळें त्यांत शिंद्यांच्याकडे कांहींच दोष नाहीं. नानांनींच शिंद्यांना लालूच दाखविण्याची प्रथा पाडली. शिंद्यांना ती गोड लागली. पुढें त्याचेंच अनुकरण त्यांनीं चालविलें, यांत शिंद्यांचा काय दोष ! ही प्रथा सखारामबापूंना नको होती. त्या वेळीं नानांनींच ती पाडली. आतां त्यांचीच शिकवणुक नानांना व त्याबरोबर पेशव्यांच्या राज्याला या सालबाईच्या तहाच्या वेळीं नडली व त्यामुळेंच पेशव्यांच्या राज्याला सालबाईच्या तहाचा क्षयरोग कायमचा लागला.

२४. या वेळीं दादासाहेब सुरतेस होते. सालबाईच्या तहांतील अटीप्रमाणें पुढें इंग्रजांनीं दादासाहेबांस खर्चास देण्याचें नाकारलें व पुणें दरबारबरोबर समेट करून घेऊन त्यांचे राज्यांत जाऊन राहण्याबद्दल त्यांनीं त्यांस सल्ला दिला. तेव्हां दादासाहेबांनीं इंग्रजांचा आश्रय सोडून देण्याचा निश्चय केला. महादजी शिंदे हे दादासाहेबांना आपणाकडे बोलावीत होते. पण त्यांना त्यांचा विश्वास वाटला नाहीं, म्हणून तिकडे जाण्याचें त्यांनीं रहित केलें. गोदावरीतीरीं जाऊन रहावें असें त्यांच्या मनांत होतें व नानांनीं तशीं पत्रेंही पाठविलीं होतीं. नानांचाही त्यांना शिंद्यांप्रमाणें विश्वास नव्हता; म्हणून दादासाहेबांनीं केवळ एकट्या नानांवर न विसंबतां त्यांनीं परशुरामभाऊ, हरिपंत फडके व तुकोजी होळकर या तिघांस पृथक् पृथक् पत्रें पाठविलीं. त्यांचेकडून

इमानपत्रें व बेलभंडार आल्यानंतर ते सुरतेहून निघाले व सन १७८३ च्या जुलै महिन्यांत कोंडाईबारी चढून खानदेशांत आले. दादासाहेबांना नेण्या-करतां हरिपंततात्या, रास्ते व तुकोजी होळकर असे तिथे गेले होते. त्यांची व दादासाहेबांची भेट धोडपेनजीक झाली. तेथून ते गोदावरीतीरीं कोपरगांव येथें रहावयास गेले. सालबाईच्या तहांत ठरल्याप्रमाणें त्यांना पुणें दरबारकडून पंचेवीस हजार रुपयांची नक्त नेमणूक झाली. कोपरगांवीं येऊन राहिल्यानंतर थोडक्याच दिवसांत म्हणजे नोव्हेंबर महिन्यांत त्यांची प्रकृति बिघडली. त्यांस ज्वर येऊं लागला होता. थोड्या दिवसांनीं ज्वर उतरला म्हणून त्यांनीं स्नान वगैरे करण्यास सुरवात केली. स्नान करून चार घटका ध्यान धरून ते बसत होते. त्यामुळें ज्वर पुन्हां उलटला, व मार्गशीर्ष वद्य ३ रोज गुरुवार शके १७०५ तारीख ११ डिसेंबर सन १७८३ रोजीं रात्रीं सहा घटिकेस श्रीमंत राघोबादादांस कैलासवास झाला. या वेळीं त्यांचें वय ५४ वर्षांचें होतें.

२५. राघोबादादांबरोबरच पेशवेघराण्याचा अभिमान, शौर्य, प्रतिष्ठा व कीर्ति या गोष्टी लय पावल्या. राघोबादादा यांची नेमणूक नानासाहेब पेश-व्यांनीं मुलुखगिरीवर केली असल्यामुळें त्यांचें बहुतेक आयुष्य मुलुखगिरी-वरच गेलें. त्यांनीं मोठमोठ्या लढायांत विजय संपादन केले. त्यांनीं शत्रू बरोबर लढण्यांत कधीं माघार घेतली नाहीं. त्यांचा स्वभाव अस्सल क्षत्रिय वृत्तीचा होता. ते जसे लढवय्ये, शूर, लढाईच्या सर्व कौशल्यांत प्रवीण व विलक्षण धाडसी होते, तसेच ते वीरवृत्तीला शोभेल असे उदारही पण होते. त्यांचें औदार्य लोकविश्रुतच आहे. त्यांना पैशाची पर्वा नसे. आपल्या हाता-खालचे सरदार व सैनिक यांना ते नेहमीं खूष ठेवीत असत. आपल्या फौजेंतील लोकांवर लष्करी शिस्तीचा दरारा ठेवण्याची हातोटी त्यांना चांगलीच साधली होती. लढाईंत पराक्रम गाजविलेल्या सरदारांस व शिपायांस ते सढळ हातानें इनामें देत. प्रत्यक्ष शत्रूबरोबरही ते उदार बुद्धीनें नेहमीं वागत होते. त्यांच्या स्वभावांत आंत एक व बाहेर एक असा दुटप्पीपणा नसून खऱ्या शिपाईगिरीला साजेल असा दिलदारपणाही होता. त्यांनीं शत्रूचा पराभव

केल्यानंतर तो शत्रू शरण आला तर त्याला पिळून काढण्याची दुष्ट बुद्धि त्यांच्या ठिकाणीं नव्हती. यामुळें शत्रूवर सुद्धां त्यांची चांगली छाप होती. राघोबादादा कधींही शत्रूला शरण गेले नाहींत. राघोबादादांनीं पंजाबमध्यें स्वारी करून लाहोर काबीज केलें व अटकेवर मराठी राज्याचा झेंडा नेऊन रोंवला. शत्रूवर स्वारी करण्याची त्यांची एवढी मोठी धडाडी व एवढी जलद गती होती कीं त्यांना ' राघु भरारी ' असें लोक संबोधित होते. त्यांना कपट माहीत नव्हतें. त्यांची वृत्ति बिलकुल स्वार्थी नव्हती म्हणून लोक त्यांना ' भोळे दादा ' म्हणत. राघोबादादांचे सरदारही त्यांच्यावर जिवापेक्षां जास्त असें आदरयुक्त प्रेम करीत. सखाराम हरी गुप्ते या नांवाचे एक मोठे शूर परभु सरदार दादासाहेबांच्या नोकरींत होते. त्यांनाही नाना फडनविस यांनीं मोरोबादादा, बगोबा पुरंदरे, चिंतो विठ्ठल, सखारामबापू यांच्याप्रमाणेंच डोंगरी किल्ल्यावर सक्त कैदेंत ठेवलें होतें. त्या वेळीं सखाराम हरीनें राघोबादादांचा पक्ष सोडून आपल्या पक्षांत सामील व्हावें असे नानांचे प्रयत्न चालू होते. त्या वेळीं सखाराम हरीनें नानांस असें स्पष्ट उत्तर दिलें कीं, ' मोठा शूर आणि प्रामाणिक व भोळा असा जो रघुनाथराव त्याचा पक्ष सोडून मी कदापि कृत्रिमी व भित्रा असा जो नाना फडनविस त्याचा पक्ष धरणार नाहीं. ' सखाराम हरी राघोबाचा मोठा अभिमानी आणि विश्वासू असा सेवक होता. यास्तव त्याचे पायांत अशी जड बेडी घातली कीं, तो पुरुष बलाढ्य असतांही त्याला ती उचलेना आणि त्याचे खाण्या-पिण्याचे असे हाल केले कीं, चौदा महिन्यांत त्याला उठावयाला शक्ति राहिली नाहीं. तरी तो आपल्या धन्याचा अभिमान धरून बोलत असे कीं, ' माझे बळ गेलें, आणि प्राणही लवकरच जातील. परंतु मी मेल्यावर माझीं निर्मांस हाडेंही रघुनाथरावांच्या कल्याणाचे शब्द करीत राहतील.[१] ' एका थोर व रणवीर सरदाराचे आंतड्याला पीळ पाडण्यासारखे वरील बोल वाचले म्हणजे राघोबा-दादांच्या स्वभावाबद्दल व त्यांच्या पुरुषार्थाबद्दल जास्त लिहावयाचें निराळें कारण उरत नाहीं. शूरांचीं अंतःकरणें वीर पुरुषांनाच चांगलीं माहीत

---

१. डफकृत मराठ्यांची बखर (६ वी आवृत्ति) पा. २५९.

असतात. राघोबादादांच्या मृत्यूनें बृहन्महाराष्ट्र निर्वीर झाला एवढी मात्र गोष्ट खरी !

२६. शूर व पराक्रमी पुरुषाला जीं संकटें व जे क्लेश भोगावे लागतात, ते सर्व प्रसंग राघोबादादांवर येऊन गेले. त्यांच्या शत्रूंनीं त्यांच्यावर सर्व प्रकारचे आरोप केले. त्यांना कैदेंत पडावें लागलें. त्यांना राज्यत्याग करून वनवासाचेही हाल सोसावे लागले. त्यांतूनही त्यांनीं मार्ग काढले व वेळोवेळीं आपलें पेशवेघराण्याचें तेज प्रकट केलें. पेशवाईचा नाश होतो व पेशवाईचा अलंकार जें पुणें तें नष्ट होतें असें पाहिल्याबरोबर त्यांनीं स्वार्थावर लाथ मारून अधिकारसंन्यास घेतला. तरीही त्यांच्या शत्रूंचें समाधान झालें नाहीं. त्यांनीं त्यांना झांशीस नेऊन कैदेंत टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु सिंह मरेल पण स्वातंत्र्य हरण करूं देणार नाहीं अशा वीरवृत्तीनें त्यांतून ते पार पडले. पुढें त्यांनीं ज्यांचा आश्रय घेतला त्यांनींच त्यांना जाण्याचा सल्ला दिल्यामुळें ते कोपरगांवीं आले. तेथें आल्यावर त्यांचें स्वातंत्र्य नष्ट होऊन ते मृतप्राय झालेच होते. थोड्याच दिवसांत मानभंगानें दुभंगलेला त्यांचा प्राण शेवटीं देहत्याग करून निघून गेला. दादासाहेबांना परमेश्वरभक्तीची मोठी आवड होती. त्यांनीं निरनिराळ्या वेळीं मोठमोठीं अनुष्ठानें केलीं. स्नानसंध्येंत त्यांच्या मनाला समाधान वाटे. दादासाहेब पुण्यशील असल्याबद्दलचेही ठिकठिकाणीं उल्लेख सांपडतात.

२७. राघोबादादा नित्य भजन करीत. ते प्रासादिक कवीही होते. आपल्या भजनांत ते स्वतः रचलेलीं पदें ह्मणत. त्यांनीं रचलेल्या पदापैकीं एक पद खालीलप्रमाणें आहे.

श्रीमंत रघुनाथराव पेशवे यांनीं रचलेलें पद.

(**राग**–जंगलापिलु. **ताल**–भजनी ठेका.)

मन शिव-पद-कमळींचें भृंग ॥ धृ ॥
यज्ञ याग तप ध्यान धारणा । करि शिव पार्थिव-लिंग ॥ १ ॥

नमक चमक मुखीं गाती वाजती। भस्मोद्धूलित अंग ॥ २ ॥
सा रि ग म प ध नी सा गंधर्व गायन । वाजे ताल मृदंग ॥ ३ ॥
भृंगी नाचे थय थय थय थय । चरण–कमल–मन–भृंग ॥ ४ ॥
चरणीं शरण रघुनाथ निरंतर । राहे हाचि अभंग[१] ॥ ५ ॥

राघोबादादा हे शिवभक्त होते. वरील पद मननपूर्वक अभ्यासिलें असतां ते उच्च कोटींतील एक सद्भक्त कवि होते असेंच ह्मणावें लागेल. वरील पदांत भक्तिरस किती ओथंबलेला आहे हें अमदीं सामान्य वाचकासही दिसून येईल. पंधराव्या प्रकरणांत दाखविल्याप्रमाणें पंढरपुरच्या 'बडीबया' या महाभगवद्भक्त संतिणीची कृपा राघोबादादांवर कां होती हें आतां निराळें सांगणेची गरज राहिली नाहीं. सद्भक्तांचे पाठीराखे सद्भक्तच असतात. दुर्जनांच्या राजवटींत महात्मेसुद्धां गुन्हेगार ठरतात, मग राघोबादादा गुन्हेगार ठरले तर त्यांत नवल कोणतें?

---

१ सदर पद केसरी वर्तमानपत्रांत "एक ऐतिहासिक पद्य" या शीर्षकाखालीं प्रसिद्ध झालेलें आहे. हें पद निमगांवच्या भिकाजी हरी फाटक यांचें बाडांतील आहे.

प्रकरण २३ वें.

सखाराम हरी शूर व नाना क्रूर.

इ. स. १७३५ ते इ. स. १७९५.

१. राघोबादादांच्या प्रभावळींतील एक प्रमुख सरदार सखाराम हरी यांचा संक्षिप्त प्रभावशाली पूर्वेतिहास.—२ राघोबादादांनीं अटकेपार अबदल्लीस हुसकून लाविलें त्या वेळीं सखाराम हरी आघाडीवर होते. त्यांच्या प्रभावशाली पराक्रमाबद्दल दिल्लीच्या बादशहाकडून त्यांना आंबेगांव हें गांव इनाम मिळतें.—३ राक्षसभुवनच्या लढाईंत राघोबादादांचे खरे पाठीराखे सखाराम हरी हेच होते. माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीतही सखाराम हरींचे अनेक पराक्रम. सखाराम हरींचें शौर्य व धाडस शिवाजी महाराजांच्या तोडीचें होतें. हैदरासही सखाराम हरींनीं खडे चारले. सखाराम हरींचा पराक्रम दाखविणारें पत्र. सखाराम हरी हा जरी राघोबादादांचा सरदार होता, तरी माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दींत त्यांनीं त्यांची इमानें इतबारें नोकरी केली.—४ बडोद्याच्या गादीबद्दल गोविंदराव गायकवाड व फत्तेसिंग गायकवाड यांचा कलह. गोविंदरावांचा न्याय्य हक्क असतां तो फत्तेसिंग लुबाडतो. सखाराम हरी असहाय्य गोविंदरावांचा पक्ष घेतो. फत्तेसिंग सखाराम हरींस द्रव्याची व जहागिरीची लांचलुचपत दाखवितो. ते न्यायनीतीला अनुसरून ती नाकारतात. सखाराम हरी गोविंदरावांसच बडोद्याची सरदारी देववितात. गोविंदरावांवर सखाराम हरींचे पर्वतप्राय उपकार.—५ हैदरच्या दरबारींही सखाराम हरींचा दरारा.—६ सखाराम हरींची प्रभावळ विश्वासू, पराक्रमी व प्रामाणिक अशीच असल्यामुळें त्यांच्यातर्फे रावजी आपाजी हा गोविंदराव गायकवाडांचे कारभारांत जातो.—७ बाबुराव हरी व सखाराम हरी यांचेवरील माधवराव पेशव्यांचा लोभ.—८ सखाराम हरींचा कांसेगांवच्या लढाईतील पराक्रम. ते या लढाईंत जखमी होऊन आजारी असतां त्यांना धारेहून गेलेलें आनंदीबाईचें पत्र. राघोबादादांचे सरदार म्हणून सखाराम हरींना व त्यांच्या परिवारांस नाना शिंद्यांकडून कैद करवितात. सखाराम हरींचा नगरच्या किल्ल्यावरील बंदिवास. त्यांच्या कैदेंतील व्यवस्थेसंबंधीं किल्लेदारांस नानांचा सक्त हुकूम.—९ सखाराम हरींच्या मरणसमयींच्या भेटीकरतां

बराच दंड देण्याचें कबूल करून त्यांच्या पत्नीनें नानांची परवानगी मिळविली. परंतु ती परवानगी सखाराम हरी मेल्यावर तिच्या हातीं पडते ! त्या बाबतींत भेट न झाल्यामुळें दंड वसूल न करण्याची तिची नानांस विनंति. दंड वसुली बावत नानांचा आग्रह.—१० त्याबाबत शिंद्यांच्या मध्यस्थीचें नानांस पत्र.—११ नानांनी सखाराम हरींच्या बाबतींत दाखवलेली आसुरी व क्रूर वृत्ति.—१२ तुकोजीरावांना दत्तक न घेतां आपल्या घराण्यांतील एखादा लहान मुलगा दत्तक घेण्याबद्दल अहिल्याबाईला राघोबादादा व गंगोबातात्या यांनीं दिलेला सल्ला कसा योग्य होता.—१३ होळकर घराण्याचा व अहिल्याबाईचा त्रोटक वृत्तांत. अहिल्याबाईचा मुलगा मालेराव यांचा समंधबाधेनें झालेला मृत्यु. अहिल्याबाईनें तुकोजीरावांस मांडीवर दत्तक घेतलें नव्हतें. अहिल्याबाईचें परमेश्वराकडे लक्ष लागण्याचें कारण.—१४ राघोबादादांचा योग्य सल्ला न ऐकतां तिनें तुकोजीस नानांच्या सल्ल्याप्रमाणें दत्तक म्हणून मानिलें यामुळें तिला शेवटीं झालेला पश्चात्ताप. अहिल्याबाईची परमेश्वरभक्ति, तिचें शुद्धाचरण व औदार्य; मृत्यु.

१. गेल्या प्रकरणांत सखाराम हरींचे राघोबादादांविषयीं काय उद्गार होते ते दिले आहेत; परंतु सखाराम हरी हे काय दर्जाचे व कशा स्वभावाचे होते याची कल्पना तेवढ्यावरून पुरी येण्यासारखी नाहीं. या करितां सखाराम हरींविषयीं येथें थोडी हकीकत देणें जरूरीचें आहे.[१] "सखाराम हरी हा चांद्रसेनीय कायस्थ प्रभु. याचें आडनांव गुप्ते हें होय. हा शूर, करारी व बाणेदार पुरुष होता. याचा वडील भाऊ बाबूराव हरी हा पहिल्या बाजीरावाच्या पदरीं होता. सखाराम हरींचा जन्म इ. सन १७२० च्या सुमारास आहे. इ. स. १७३५ मध्यें बाजीरावानें जंजिऱ्यावर स्वारी केली तेव्हां बाबूराव हरी व सखाराम हरी असे उभयतां बंधु आपापल्या सरंजामांसह सैन्याबरोबर होते. या वेळीं सखाराम हरींचें वय पंधरा सोळा वर्षांचें होतें. या स्वारींत त्याचें शौर्य बाजीरावाच्या नजरेस आलें. कारण त्यानें सीद्दीचे फौजेवर जोराचा हल्ला करून सीद्दी रहेमान ज्या हत्तीवर बसला होता तोच हत्ती हस्तगत करून

---

१ वाकसकरकृत अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रें पान १४३ ते १५६.

वळवून आणला. अशा लहान वयांत एवढा पराक्रम केलेला पाहून बाजीरावानें खूष होऊन तो जिंकून आणलेलाच हत्ती सखाराम हरीस बक्षीस दिला. व त्यास बाराशें स्वारांचें पथक नेमून दिलें. याप्रमाणें सखाराम हरी स्वतः स्वतंत्र सरंजामी सरदार झाल्यामुळें पुढील बहुतेक मुलुखगिरींत त्याचा पराक्रम आढळतो. इ. स. १७३८ सालीं बाजीरावानें निजामावर केलेल्या स्वारींत सखाराम हरी हजर होता व गनिमी काव्यानें त्यानें निजामास जेरीस आणलें. या वेळीं सखाराम हरीनें दाखविलेल्या युद्धकौशल्यानें बाजीरावास फार समाधान वाटलें व त्यानें त्यास फौजेची बक्षीगिरी, सरदारीच्या बंदोबस्ताचा सरंजाम व कारभार असे तीन अधिकार करून दिले. या वेळेपासूनच सखाराम हरीचा व रघुनाथरावदादांचा स्नेह जमला. किंबहुना सखाराम हरी ह्मणजे राघोबाचाच सरदार असें सर्व समजूं लागले. बाजीरावाच्या पश्चात् नानासाहेबास पेशवेपद प्राप्त झालें. नानासाहेबाच्या कारकीर्दीतही सखाराम हरीनें राघोबादादाबरोबर सर्व स्वाऱ्यांत हजर राहून पराक्रम गाजविलेला आहे. सखाराम हरीच्या चढत्या पराक्रमावर नानासाहेबही खूष झाले व त्यांनीं त्यास इ. स. १७४५ मध्यें खर्चाच्या नेमणुकीसह खासगी सरंजामसुद्धां सालीना तीन लक्ष रुपये रोकड व सहा लक्षांच्या वराती देण्याचा ठराव केला. सरंजाम हा सरदाराच्या फौजेसाठीं असून वराती या सरकारी फौज सरदाराच्या हाताखालीं देऊन तिच्या खर्चासाठीं दिलेल्या असतात. इ. १७४५ पासून ज्या अर्थीं दरसाल सहा लक्षांच्या वराती होण्याचा हुकूम आहे त्या अर्थीं लहानशा फौजेचा सखाराम हरी हा सेनापती म्हणूनच नेमला गेला असें दिसतें.

२. इ. स. १७४९ पासून अहमदशहा अबदल्लीच्या स्वाऱ्या हिंदुस्थानवर होऊं लागल्या. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं नानासाहेबानें राघोबास इ. स. १७५८ मध्यें अबदल्लीवर पाठविलें. या वेळीं सखाराम हरी राघोबाबरोबर होता. राघोबा फौजेची जमवाजमव करून आपल्यावर चालून येत आहे असें कळतांच अबदल्ली स्वदेशास परत निघून गेला; परंतु त्यानें जिंकलेल्या मुल-

त्याच्या बंदोबस्तासाठीं मोठी फौज मागें ठेविली होती. राघोबानें या फौजेवर चाल करून तिचा पार धुव्वा उडवून दिला व अटकेपार मराठ्यांचा झेंडा रोंवला. या वेळीं बिनीवर म्हणजे आघाडीवर बाबूराव हरी व सखाराम हरी स्वतः आपल्या फौजेसह असून त्यांनींच अवदलीच्या फौजेचा अटकेपार पाठलाग केला होता. हें त्यांचें शौर्य पाहून दिल्लीच्या बादशहानें त्यांस पुण्याजवळील मुशेखोऱ्यांतील आंबेगांव वंशपरंपरेनें इनाम करून दिलें. तेव्हांपासूनच सखाराम हरीचें आंबेगांवकर हें नांव प्रसिद्ध झालें. ही आंबेगांवची सनद या उभयतां बंधूंच्या नांवची आहे. इ. स. १७६० मध्यें सदाशिवरावभाऊ मोठ्या फौजेसह अवदलीवर चाल करून जाण्याकरतां निघाले. त्या वेळीं रावोबादादा व सदाशिवरावभाऊ यांच्यामध्यें कांहीं बेबनाव झाला होता. स्वारीवर जातांना सदाशिवरावभाऊंनीं राघोबादादाजवळ सखाराम हरीची मागणी केली होती पण ती त्या वेळीं राघोबादादांनीं मान्य केली नाहीं.

३. थोरल्या माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीच्या आरंभीं इ. स. १७६३ मध्यें मोरोबा फडनविस, सदाशिव रामचंद्र, भवानराव प्रतिनिधि आणि गोपाळराव पटवर्धन अशी सर्व मंडळी रघुनाथरावदादा यांचेविरुद्ध हैदराबादेच्या निजामास जाऊन मिळाली. तथापि दादासाहेब यांनीं सखाराम हरी वगैरे आपले प्रामाणिक सरदारांवर पूर्ण भरंवसा ठेऊन निजामावर स्वारी केली. त्या वेळीं दादासाहेबांनीं निजामाच्या सैन्याचा पुष्कळ वेळां मोड केला. परंतु एका प्रसंगीं दादासाहेबांवर असा प्रसंग गुदरला कीं, ते आपल्या सैन्यापासून अगदीं वेगळे पडले आणि शत्रूनें त्यांस एकाएकीं घेरून घेतलें. अशा भयंकर प्रसंगांतून ते मोठ्या सुदैवानेंच (थोरल्या माधवरावांच्या चातुर्यानें) सुटले. त्या वेळीं त्यांचेजवळ मात्र त्यांचे शूर, विश्वासू व जीवप्रिय सखाराम हरी हे होते. या वेळीं दादासाहेबांनीं सखाराम हरीचे फारच उपकार मानले; आणि त्यांची पूर्वीची नेमणूक खेरीज करून पांच हजार फौजे चानवीन बंदोबस्त त्यांचे स्वतःचे अंमलांत करून दिला. सखाराम हरीवर दादासाहेबांची मेहेरबानी दिवसेंदिवस अशी वाढत चालली. तरी थोरल्या माधवरावांनीं पेशवाईचीं सूत्रें हातीं

घेतल्यावरही सखाराम हरीनें त्यांच्या नेतृत्वाखालीं मोठ्या बहादुरीच्या स्वाऱ्याशिकाऱ्या केल्याचा उल्लेख आहे. हैदराच्या अचाट पराक्रमामुळें त्याचा सर्वत्र दरारा बसला होता. कवाईती कंपु व गनिमी कावा या दोन्ही युद्धपद्धतींत तो मोठा निष्णात होता. त्याचें शौर्य व धाडस शिवाजी महाराजाप्रमाणें अद्वितीय होतें. त्याची कल्पकता व दूरदृष्टि त्या वेळच्या इंग्रजांसही चकित करीत असे. सारांश अशा पराक्रमी हैदर नाईकाची खोड माधवरावानें गोपाळराव पटवर्धन, त्रिंबकरावमामा, सखाराम हरी, मुरारराव घोरपडे अशा अत्यंत शूर सरदारांच्या सहाय्यानें पूर्णपणें मोडली. हैदरावरील मोहीम सुरू असतांनाच गोपाळराव पटवर्धन जलोदराच्या विकारानें मृत्यू पावला. परशुरामभाऊही छावणीस कंटाळून पळून येण्याचा विचार करीत होता. अशा भयंकर हैदखानाची बिनी पहिल्या धडाक्याला सखाराम हरीनें लुटली. हैदरखानजवळ चाळीस पन्नास हजार स्वार, शें दोनशें तोफा व पांच सात कवाईती कंपु असें साहित्य नेहमीं जय्यत असे. रात्रींच्या वेळीं मोठमोठ्या मजला मारून पहांटेच्या सुमारास तो मराठ्यांच्या गोटावर अचानक येऊन घाला घालीत असे. सारांश हैदराच्या स्वारीला सर्व मराठें लष्कर कंटाळून गेलें होतें. परंतु सखाराम हरीनें अशाही स्थितींत हैदरावर छापे घालण्यास व त्यास जर्जर करण्यास कमी केलें नाहीं. त्या वेळचें एक पत्र सुंदर असल्यानें तें येथें दिलें आहे. हें पत्र ता० ३ मार्च सन १७७१ सालचें ह्मणजें हैदरावरील तिसऱ्या स्वारीच्या वेळेचें आहे. "राजेश्री सखाराम हरी बातमीस मेलकोटेकडे गेले होते. (त्यांनीं) थेट हैदरखानाच्या लष्करापर्यंत जाऊन कही लुटली. उंटे व तट्टे व पांच सात हजार बकरीं पळवून गोटाच्या आसपास कोसाच्या अंतरे झाल्यास पासोड्या बांधून मातबर फौज आली अशी दिखाई देऊन आनंदराव तोफखाने व भवानजी जाधव यांस वाटतीट पहाण्यास पाठविलें. चैतागिरी आघाडीस, पश्चिमेस मेलकोटा येणेंप्रमाणें हैदर उतरला आहे. तोंडाशीं झाडी मात्र थोडी थोडी आहे. डावे उजवे बाजूस मैदान मातबर आहे. सखाराम हरी याजबरोबर फौज मातबर असती तर काम पोक्तें झालें

असतें. बातमीस तीन राऊतासहित गेल्यासारखें त्यांनीं काम असल्यांत करून माघारे नागमंगलास येऊन गांव मारून तलफ करून मनस्वी लुटलें. हैदरखानाच्या गोटांत नगारे होऊन गडबड झाली. एक दोनी तोफांचे बार झाले. तेथें राहिल्यास निभाव नाहींसा पाहून माघारे चार पांच कोस वेरुळास आले." यांत अवघ्या तीनशें स्वारानिशीं सखाराम हरीनें हैदराचा गोट लुटल्याची हकीकत आहे. ती त्याच्या अत्यंत शूरत्वाची निदर्शक आहे. सखाराम हरी जरी रघुनाथरावाचा सरदार होता तरी थोरल्या माधवरावांच्या अंतापर्यंत स्वराज्याच्या नोकरींत अगर मुलुखगिरींत त्यानें यत्किंचितही दुर्लक्ष केलेलें दिसत नाहीं, हें यावरून व सखाराम हरीच्या या वेळच्या इतर पराक्रमावरून दिसतें.

४. गुजराथ प्रांतीं बडोद्याचे गादीबद्दल गोविंदराव गायकवाड व फत्तेसिंगराव गायकवाड या उभयतांचा बखेडा चालत होता. त्याबद्दल या उभयतांपैकीं गादीचा अधिकार कोणास मिळावा याविषयीं पुणें मुक्कामीं पेशवे सरकारांत विचार चालला होता. तेथें विचारांतीं असें समजलें कीं, दमाजीराव गायकवाड यांचे थोरले चिरंजीव सयाजीराव यांस दमाजीचे पश्चात् गादीचा अधिकार मिळाला; आणि फत्तेसिंगराव यास मुतालिकेचा अधिकार मिळाला. पुढें सयाजीराव वारल्यानंतर त्याचे पश्चात् फत्तेसिंगराव गादी बळकावून बसले. अशाप्रकारें व्यवस्था चालत असतां दरम्यान गोविंदराव गायकवाड हे पुणें मुक्कामीं आपण स्वतः श्रीमंतांचें साधन ठेऊन राहत असत. तेथें सखाराम हरी यांचें राज्यांत तेज जास्ती पाहून त्यांची भेट घेऊन त्यांशीं त्यांहीं स्नेह केला. एका प्रसंगीं गोविंदराव गायकवाड सखाराम हरीस ह्मणाले कीं, आपला व माझा स्नेह फारच व या राज्यांत आपलें तेज व मान्यता विशेष. म्हणून आपणास सांगण्याचें कीं, आम्हीं त्रिवर्ग बंधु. यांत माझी मातोश्री श्रेष्ठ आणि सयाजीराव व फत्तेसिंगराव यांची मातोश्री कनिष्ठ. तेव्हां गादीचा अधिकार कोणाचा हें उघडच दिसतें. आतां सयाजीराव यास गादीचा अधिकार मिळाला होता त्याचें कारण एवढेंच कीं, त्या वेळीं मी फार अल्पवयी व अज्ञान होतों. परंतु

आतां फत्तेसिंगराव यास म्हणजे कनिष्ठेच्या वंशास गादीचा. अधिकार असणें हें कसें? या प्रसंगीं तुम्हांशिवाय दुसऱ्या कोणाचाचा वशिला नाहीं. तर ह्याजबद्दल सरकारांत यथार्थ न्याय होण्यासाठीं आपण श्रम घेऊन तजवीज करावी. तेव्हां सखाराम हरी यांनीं उत्तर दिलें कीं, माझ्याकडून होईल तितका प्रयत्न मी करतों. या गोष्टीस बरेच दिवस लोटल्यावर सखाराम हरी श्रीमंताजवळ सहज बोलत बसले असतां म्हणाले कीं, एक पुरुषास दोन स्त्रिया. त्यांत प्रथम स्त्रीचा मुलगा वयानें लहान. व दुसरीचा मोठा. तेव्हां विशेष अधिकार कोणाचा? याप्रमाणें विनंती केल्यावरून श्रीमंत पेशवे सरकार व दादासाहेब पेशवे या उभयतांहीं सखाराम हरीस विचारलें कीं, असा प्रकार कोठें आहे? त्यावर सखाराम हरी यांनीं गोविंदराव गायकवाड व फत्तेसिंगराव गायकवाड या उभयतांची हकीकत निवेदन केली. तेव्हां श्रीमंतांनीं रामशास्त्रीप्रभृति विद्वान मंडळींना बोलावून सभा जमविली. तींत सर्वांनुमतें असें ठरलें कीं, प्रथम स्त्रीचे पुत्रास अधिकार असावा. हें वर्तमान फत्तेसिंगराव याचे वकीलास कळल्यावरून त्यानें बडोद्यास लिहून कळविलें कीं, गोविंदरावबाबास पदाधिकारी करून श्रीमंत माधवरावसाहेब यांनीं त्यांस वस्त्रें देण्याचें ठरविलें. या कामांत सखाराम हरी यांची बहुत प्रकारें मदत आहे. तशांत श्रीमंतांची त्याजवर पूर्ण कृपा असून त्यांचा भरंवसाही सरकारास विशेष आहे. तेव्हां त्यांचें बोलणें न फिरतां त्यांनीं केलेलें काम निःसंशय सिद्धीस जाईल असें पूर्णपणें दिसलें. अशा प्रकारचें पत्र पाहून फत्तेसिंगराव गायकवाड यांनीं सखाराम हरीस मोठ्या आदरानें पत्र लिहिलें कीं, "जसा आपला व गोविंदरावबाबा यांचा स्नेह त्याचप्रमाणें माझा व आपला असें मीं समजतों. मी आपणास अगदीं अंतर देणार नाहीं. आपल्यास दरबार खर्चाबद्दल दोन लक्ष रुपये व स्नेहाचे नात्यानें पांच लक्षांची चिठ्ठी व सिनोर महाल वंशपरंपरे करून देतों. परंतु गोविंदरावबाबांचा पक्ष स्वीकारून आमचे अगदींच विरुद्ध होईल असें करूं नये" अशा मज-

कुराचें पत्र बडोद्याहून त्यांचे पुण्यांतील वकीलास आलें. तें त्यानें सखाराम हरीस वाचून दाखविलें. पत्रांतील सर्व मजकूर एकाग्रतेनें ऐकून सखाराम हरी वकीलास ह्मणाले "मी द्रव्यलोभी नाहीं. मजला न्यायावर लक्ष देऊन चाललें पाहिजे. सरकारांत मी कधींही अप्रामाणिकपणें वागण्याचा व बोलण्याचा मार्ग ठेविला नाहीं. गोविंदरावबाबा हे जेष्ठ स्त्रीचे पुत्र होत. तेव्हां त्यांचा गादीचा अधिकार यथार्थ आहे. तशांत तुह्मीं माझें काय बिघडविलें? अथवा तुमचा व माझा कांहीं कारणावरून द्वेष आहे असेंही नाहीं. मीही तुह्मांस स्नेह्याप्रमाणेंच मानतों. परंतु मी श्रीमंतांस विनंती करून रामशास्त्री वगैरे विद्वान मंडळींची सभा भरविली, तींत जो शास्त्रार्थ ठरला त्यांत माझा निरुपाय आहे." असें बोलल्यावर वकील मुकाट्यानें घरीं जाऊन फत्तेसिंगराव गायकवाड यांस सदरहु मजकुराचें पत्र लिहिलें. त्याचें उत्तर आलें कीं, आपले दरबारची व सर्व संस्थानिकांची प्रसिद्ध चाल आहे कीं, सरकारास नजराणा देऊन आपला अर्थ साध्य करून घ्यावा. त्याप्रमाणें श्रीमंतांस नवसरी महाल नजराणा कबूल करून रोकडही पांच पन्नास लक्ष रुपये कबूल करावेत आणि सखाराम हरीसही सीनोर व तलाडी महालांची जहागिरी देण्याचें कबूल करावें. अशा मजकुराचें पत्र पुणें मुक्कामीं वकीलास पावतांच त्यानें तें घेऊन सखाराम हरीकडे नेऊन त्यास त्यांतील इत्थंभूत मजकूर विदित केला. तो ऐकिल्यानंतर सखाराम हरी त्यास रागावून ह्मणाले कीं, 'द्रव्यलोभानें मीं तुमचें ऐकेन असें कधींही होणार नाहीं. गोविंदराव जेष्ठ स्त्रीचे पुत्र, तेव्हां त्यांचाच अधिकार हाच न्याय. बाकी त्याजपासून मजला मोठा अर्थ प्राप्त होणें असें मुळींच नाहीं. त्यांचा अधिकार यथार्थ असून त्यांचें वय अल्प व ते द्रव्यहीन असल्याकारणानें ते सर्वथैव संकटांत आहेत. ह्मणूनच मजला त्याचा कळवळा येऊन त्याजविषयीं मी श्रीमंताजवळ विनंती केली. आणि सरकारनीं योग्य न्यायाकडे लक्ष देऊन त्यांस अधिकार देण्याचें ठरविलें.' अशा प्रकारें निःपक्षपाताचें व

योग्य उत्तर मिळाल्यामुळें त्या वकीलाचा निरुपाय झाला व तो निमूटपणें आपल्या मुक्कामास परत गेला. इकडे गोविंदराव गायकवाड व सखाराम हरी या उभयतांचा दिवसेंदिवस इतका स्नेह जडत चालला कीं, केव्हां केव्हां गोविंदराव गायकवाड कांहीं संकटांत आहे असें पाहून सखाराम हरी हे सावकार लोकांची खात्री करून त्यांजकडून गोविंदरावास खर्चासही कर्जाऊ पैसा देववीत असत. सखाराम हरी व गोविंदराव गायकवाड यांचे वाडे फार जवळ व समोरा समोर असल्यामुळें दोघांच्या परस्परांशीं वारंवार भेटी होत असत. अशाप्रकारें त्या उभयतांचा स्नेह वाढत चालला. कांहीं पदार्थ भोजनांत गोड लागला कीं, सखाराम हरीनें तो गोविंदराव यांजकडे पाठवावा. याप्रमाणें कांहीं दिवस लोटल्यावर गोविंदराव सखाराम हरीस ह्मणाले कीं, मी आतां कोठपर्यंत अशा तऱ्हेचे दिवस काढावेत ! तेव्हां सखाराम हरी यांनीं पुनः श्रीमंतांस विनंती करून गोविंदराव गायकवाड यास गादीचीं वस्त्रें देवविलीं. आणि श्रीमंतांच्या आज्ञेनें आपण स्वतः आपला सरंजाम व सरकारी हुजुरातींतले पांच सात हजार लोक बरोबर घेऊन मोठ्या थाटानें गोविंदराव गायकवाड याजबरोबर बडोद्यास आले. इकडे फत्तेसिंगरावही बडोद्याची गादी बळकावून बसलेले होत. त्यास सखाराम हरी यांनीं सांगून पाठविलें कीं, गोविंदराव गायकवाड यास गादीचा अधिकार सोंपवून तुह्मीं मुतालिकेचा कारभार पहावा, अशी सरकार-आज्ञा आहे. ही गोष्ट फत्तेसिंगराव यांनीं जुमानिली नाहीं. त्यास वाटलें कीं, आपण प्रत्यक्ष अधिकारसंपन्न आहोंत, हें सर्व देशांत प्रसिद्ध आहेच. असें असतां अधिकार घालवून प्रस्तुत मृततुल्य होणें त्यापेक्षां सामना करणें बरें. असा निश्चय करून त्यानें सखाराम हरीस सामना करण्याचा निरोप पाठविला. हा निरोप सखाराम हरीस कळतांच त्यांनीं लढाईची तयारी केली. पुढें त्या उभयतांचें मोठें युद्ध झालें. त्या युद्धांत सखाराम हरी सर्वांचे पुढारी असल्याकारणानें त्यांस बऱ्याच जखमा झाल्या. परंतु शेवटीं त्यांचा जय होऊन गोविंदराव गायकवाड

यास गादीचा अधिकार देण्यांत आला. आणि श्रीमंतांची आज्ञा शेवटास नेली. याप्रमाणें सखाराम हरींचे आपणावर उपकार फार झाले याबद्दल त्यास स्नेहाच्या नात्यानें तरी कांहीं द्यावें असें जाणून त्यांनीं त्याच वेळेस ह्मणजे सन १७७२ सालीं वीस हजाराचीं पांच गावें जहागीर करून दिलीं. आणि ह्मणाले कीं, एवढयानेंच मी तुमचे उपकार फेडले असें नाहीं. आपण मजवर जे जे उपकार केले व अनेक प्रसंगीं मदत केली त्याजकडे पहातां हें देणें तर कांहींच नाहीं. एवढेंच काय परंतु मी माझे शरीरांतील प्राण जरी तुह्मांस दिले तरी तेही थोडेच. परंतु एवढेंच कीं, मजकडून आदरस्मरणार्थ तुह्मांस कांहीं तरी असावें असें ह्मणून वीस हजारांच्या उत्पन्नाच्या पांच गांवांची सनद करून दिली आणि श्रीमंतांस फौजेच्या खर्चाबद्दल व नजराण्याबद्दल दोन लक्ष रुपये पाठविले. बडोद्यास चोहोंकडे शांतता झाल्यावर व अशा प्रकारची व्यवस्था झाल्यानंतर सखाराम हरी पुण्यास गेले. तेथें श्रीमंतांची भेट घेऊन त्यांनीं बडोद्याकडील सर्व हकीकत श्रीमंतांस निवेदन केली. पुढें सुमारें दोन वर्षेंपर्यंत गोविंदराव गायकवाड यांचा अधिकार सुरळीतपणें चालला. उपरांत फत्तेसिंगराव यांनीं फौज फितुर करून गोविंदराव यांचा अधिकार हिसकावून घेतला. हें वर्तमान गोविंदराव यांनीं पुण्याचे दरबारांत जाहीर केलें.

५. इ. स. १७७४ चे सालीं रघुनाथरावदादासाहेब हैदरअल्लीवर चढाई करून गेले. त्यांचेबरोबर सखाराम हरी होते. उभय सैन्याची गांठ कर्नाटक प्रांतीं पडली. हैदराचा मुलगा टिपू सुलतान हा या वेळीं शत्रू-सैन्याचा अधिकारी होता. टिपू जरी स्वतः शूर-वीर होता, तथापि दादासाहेबांचे बरोबर त्यांचे महाशूर सरदार सखाराम हरी आहेत असें जाणून त्यांनीं आपलेकडील झंगीसखान या नांवाच्या एका सरदारास पेशव्यांचे छावणींत तहाचें बोलणें करण्याकरतां पाठविलें. त्या वेळेस सायंकाळचा समय असल्यामुळें दादासाहेब आपले जिवलग सरदार सखाराम हरी यास बरोबर घेऊन आपल्या सैन्याची खबर घेण्याकरतां बाहेर

निघाले होते. त्या समयीं कितीएक चाकर व शिपाई लोक आपल्या धन्याच्या व त्यांचे महशूर व प्रतापी सरदार सखाराम हरी यांच्या शूरत्वाच्या गोष्टी करीत बसले होते. कितीएक मोठ्या आनंदानें श्रीमंतांवर केलेल्या पोवड्यांत त्यांचे गुण गात होते. कितीएक जवळ येऊन पोंचलेल्या युद्धाच्या गोष्टी करीत होते. अशा समयीं झंगीसखान समोरून भरधांव घोडा फेंकीत श्रीमंतांपुढें येऊन ठेपला. उभयतांचा परस्पर आदर-सत्कार होऊन भेटीही झाल्या. प्रथमतः त्यानें श्रीमंतांपुढें सखाराम हरीची बरीच प्रशंसा केली. त्यांत तो ह्मणाला कीं, "सखाराम हरी शूरोंके शेकी." याप्रमाणें कांहीं वेळपर्यंत भाषण झाल्या-नंतर त्यानें हैदरअल्लीकडील तहाची सूचना दादासाहेबांस प्रदर्शित केली. दादासाहेबांनीं मागितलेल्या सर्व अटी त्यांनीं कबूल केल्यानंतर तो परत आपल्या छावणींत गेला व पुढें थोडक्याच वेळानंतर दादासा-हेबही आपल्या छावणींत आले. अशा रीतीनें तहाची व्यवस्था झाल्यावर दादासाहेब लवकरच पुण्यास गेले.

६. इ. स. १७७६ मध्यें गोविंदराव गायकवाड यांचा बडोद्याचे गादीवरील अधिकार गेल्या कारणानें तो पुन्हां प्राप्त होण्याविषयीं पुणें मुक्कामीं पेशव्यांचे दरबारांत ते खटपट करीत असतां त्यांचेजवळ खंडो जिवाजी तांबेकर हे कामकाज करीत होते. खंडो जिवाजी यांची वर्त-णुक सखाराम हरी यांचे लक्षांत बरोबर आल्यावरून त्यांनीं गोविंदराव गायकवाड यांजपासून खंडो जिवाजीस दूर केलें व त्यांचे जागीं आपले मंडळींतील भरंवशाचे रावजी आपाजी फणशे प्रभु यांची गोविंदराव यांजपाशीं नेमणूक करविली. त्या दिवसापासून रावजी आपाजी हे गोविंदराव यांचे राज्यासंबंधीं पेशवे सरकारचे दरबारांत श्रमसाहस करीत असत. पुढें हे रावजी आपाजी, गोविंदराव गायकवाड बडोद्याचे गादीवर आले तेव्हां त्यांचे दिवाण झाले.

७. पेशव्यांचे मुजुमदार नारायण निळकंठ हे मृत्यु पावल्यानंतर दादा-साहेबांनीं बाबूराव हरीस मुजुमदारी इ. स. १७६२ मध्यें दिली होती. व ही तुजकडून काढणार नाहीं अशी शपथही दिली होती. परंतु पुढें इ. स. १७६३ मध्यें इतर मुत्सद्यांच्या आग्रहामुळें माधवरावानें जुन्या मुजुमदारास मुजुमदारी

दिली व बाबूराव हरी यास वाईट वाटूं नये म्हणून अहमदाबादचा सुभा त्यास सांगण्याचें ठरविलें. याप्रमाणें सखाराम हरी व बाबूराव हरी या उभयतां भावांवर पेशव्यांची फारच मर्जी असे व त्यांतल्यात्यांत दादासाहेबांची विशेष असे. पुण्याची एक पेठ बाबूराव हरीनें वसविली आहे.

८. नारायणराव पेशव्यांच्या कारकीर्दींत सर्वच प्रभूंना फार त्रास झाला. या पेशव्यानें प्रभुपासून एक नऊ कलमी याद बळजबरीनें लिहून घेतली होती. त्या यादी खालीं, १ रामराव जिवाजी २ विठ्ठलराव यशवंत ३ रामाजी मल्हार ४ मुरारराव दौलत ५ बाजीराव साबाजी ६ सोयरो वामन ७ बच्याजी खंडेराव ८ आपाजी भिकाजी ९ खंडेराव बापूजी १० त्रिंबक महिपतराव ११ बळवंतराव शंकर १२ सखाराम हरी १३ निळकंठ रामचंद्र १४ नारायणराव हरी १५ बाळाजी गणेश १६ त्रिंबक सूर्याजी अशा त्या वेळच्या प्रमुख सोळा प्रभूंच्या सह्या आहेत. पुढें नारायणरावांचा खून झाल्यावर पुण्यास उघड दोन पक्ष झाले. त्यांत सखाराम हरीनें रघुनाथरावाचा पक्ष घेतला. कारभारी पक्षाशीं जी पहिली लढाई राघोबानें दिली व जींत त्रिंबकरावमामा मारला गेला त्या लढाईंत सखाराम हरीस मोठीच जखम लागली होती असें पुढील आनंदीबाईच्या पत्रावरून दिसतें. हें पत्र तारीख ९ जून सन १७७५ रोजा लिहिलें आहे. तें पत्र खालीं दिल्याप्रमाणें: “ तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान सर्व कळलें. तुमची निष्ठा उत्तम आहे हे अनुभवास आली. त्यास ही गोष्ट उत्तम आहे. तुम्हांस हें योग्य आहे. ये निष्ठेनें तुमचें ईश्वर ऊर्जित करील. चिंता नाहीं. तुम्हांस जखम झाली होती ती बरी जहाली कीं नाहीं तें लिहिणें. पथ्य उत्तम प्रमाणें करीत जाणें. बहुत रक्षित जाणें. चिरंजीव राजश्री बाजीराव सुखरूप आहेत. फितुरीयांचे (कारभारी-पक्षाचे) पारपत्य होऊन हुजुरची (राघोबांची) व चिरंजिवाची भेट कधीं होईल तें लिहिणें. ” हें पत्र आनंदीबाईनें धारेच्या किल्ल्यांतून लिहिलेलें आहे. पुढें प्रसिद्ध पुरंदरच्या तहानंतर दादासाहेबांचें बंड मोडलें व त्यांच्याकडील सर्व सरदार पुण्यास येऊन राहिले. त्याबरोबरच सखाराम हरीही पुण्यास

चाकरीस येऊन राहिले. यापूर्वी सवाईमाधवराव यांच्या भेटीचा दरबार झाला होता. पण सखाराम हरीस त्या दरबारास नानानें मनाई केली होती. याचें कारण नाना फडनविसांच्या मनांत सखाराम हरीबद्दल फार मोठी तेढ होती हें होय. तथापि त्यांचा सरंजाम वगैरे पूर्ववत् चालत होता. असें असतां तारीख २५ सप्टेंबर १७७६ रोजीं त्यांना पुरंदरावर शिपायांनीं एकदम कैद केलें. त्यांचा गोट पुरंदर किल्ल्याखालीं होता तेथें चौक्या पाठविल्या. पुतण्या खालीं होता त्याला धरून आणून कैद केला. बाबूराव हरीकडील माणसें धरावयासही जनार्दन राम वगैरे सात आठशें राऊत मावळांत गेले होते. याप्रमाणें व्यवस्था करून नानांनीं सखाराम हरीस नगरच्या किल्ल्यावर; बाबूराव हरीस सिंह-गडावर; व बाबूराव हरीचा मोठा मुलगा दौलत बाबूराव यास चाकणच्या किल्ल्यावर आणि धाकटा मुलगा महिपत बाबूराव यास त्रिंबकच्या किल्ल्यावर बंदोबस्तानें कैदेंत ठेवलें. या वेळचा किल्लेदारास दिलेला हुकूम वाचनीय असल्यानें तो पुढें दिला आहे. " (सखाराम हरी) यास पक्या बंदो-बस्तानें किल्ले मजकुरीं अटकेंत ठेऊन भोजन घालीत जाणें. परभु कारकून त्याजवळ जाऊं न देणें. चौकीस माणसें ठेवाल तीं वरचेवर बदलीत जाणें. मराठा एक माणुस खिजमतगारीस ठेऊन देणें. तो पंधरा दिवसा बदलीत जाणें. धोतरें अगर शेला पागोटें लागल्यास देणें. जेवणाची व वस्त्रपात्राची आबाळ न करणें. बेडी नेहमीं अस्तें देणें. सखाराम हरी खळ्या राजकारणी आहे. कोणे गोष्टीस चुकणार नाहीं. याजकरितां एक कोठडी करून त्यांत घालून बाहे-रून कुलुप घालीत जाणें. एकास त्या जवळ जाऊं न देणें. याचे गुण तुम्हांस ठाऊकच आहेत. याकरितां फार चांगला बंदोबस्त करणें."

९. पुढें धनगड किल्ल्यावर सखाराम हरी असतां त्यांच्या छळाला जास्त सुरवात झाली. त्यांतच इ. स. १७७९ मध्यें त्यांचा अंत झाला. आपल्या पतीची भेट घेण्याकरतां सखाराम हरीच्या पत्नीनें बराचसा दंड देऊन भेटीची परवानगी मिळविली होती. परंतु या पतिपत्नींची भेट होण्यापूर्वीच सखाराम हरी मृत्यु पावला. तथापि त्याच्या पत्नीकडून दंड वसूल करण्याची तजवीज

मात्र जोरानें चालू होती. अखेर ही हृदयद्रावक बातमी महादजी शिंद्यांस समजल्यावर त्यांनीं पुढील पत्र नाना फडनविसांस लिहिलें व दंड माफ करविला. तें पत्र तारीख १६ नोव्हेंबर सन १७७९ चें आहे. तें पत्र खालीलप्रमाणें आहे:—

श्री.

१०. राजेश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांस. दंडवत विनंति उपरी. सखाराम हरी कैदेंत धनगडीं होते. त्यास बेडी मातबर. व भोजनाचेंही यथास्थित नव्हतें. याजमुळें प्राणांतिक अवस्था झाली होती. त्यावरून त्यांचे स्त्रीनें सरकारांत रदबदली केली कीं, बेडी हलकी करून अन्नपाण्याची व व औषधें उपाय करण्याची मोकळीक करून मजला किल्ल्यावर जावयाची परवानगी द्यावी. त्याजवरून उत्तर झालें कीं, बारा हजार रुपये द्यावे. म्हणजे सदरहुप्रमाणें परवानगी दिली जाईल. तेव्हां त्यांनीं मोल भीक मागोन घरोघर फिरोन बारा हजार रुपये द्यावयाचा करार करून किल्लयावरी जाऊन पोहोचेन अशी सनद द्यावी, म्हणजे कराराप्रमाणें एका महिन्याचे मुदतीनें ऐवजाचा हमीदार घेतला. त्यास सनद तिच्या हातास पोहोंचोन ती किल्लयावरी न जातां सखाराम हरी मृत्यू पावला. हल्लीं हमीदारास ऐवजाकरतां सरकारचा तगादा लागला आहे. हमीदार तिजला तगादा करतो. ऐशियास जो अन्यायी तो मृत्यू पावला व बायकोची त्याची भेटही न झाली. यास्तव बायकोस तगादा, ऐवजाचा हमीदाराचा नसावा व हमीदारासी सरकारांतून न व्हावा. ज्यापक्षीं अपराधी मरण पावला त्यापक्षीं सरकारांतून माफ करून ऐवज न घ्यावा. यांचे मुलांमाणसांचें चालवून आजात करावें. बरकड बारा हजारांनीं सरकारकिफायत होती ऐसें नाहीं. तशांत त्याजवळ ऐवज आहे नाहीं हें कळलेंच आहे. मोल मागून ऐवज जमा करणार! तोही सखाराम हरी यांचे मरणामुळें कोणी ऐवज देईल हेंही नाहीं! सारांश मुलांमाणसांची मुक्तता होय तें करावें. हमीदारास सरकारांतून तगादा जाहल्यास हमीदार बायकामुलांस तगादा करील. घरचें सर्व जप्तींत आलें असतां त्यांस

ऐवज मिळणें कळतच आहे. याकरतां लिहिलें असे. रवाना चंद्र ७ जिल्काद हे विनंती. "

११. सखाराम हरी याला नानांनीं ज्यावेळीं कैदेंत टाकलें त्या वेळीं त्याच्या दौलतीची, मालमत्तेची, व इतर कांहीं जी चीजवस्त होती त्याची जप्ती करून ती सरकारजमा केली होती. भाऊ, पुतणें वगैरे आप्त मंडळी कैदेंतच पडली होती. बायकोला घर ना दार अशी. तिची अवस्था झाली होती. सखाराम हरीला तापलेल्या तव्यावर उभें करावें त्याप्रमाणें त्याचे कैदेंत हाल चालले होते. सरळ अन्नपाणी नाहीं कोंडलेल्या खोलीबाहेर येण्याची परवानगी नाहीं. त्याच्या पायांत न हालण्यासारखी जड बेडी ठोकलेली. आजारी पडला तर औषध नाहीं. कोणाची भेट होणें नाहीं. अशी त्याची अवस्था करून ठेवली होती. त्या स्थितींत सखाराम हरी अन्नपाण्याच्या व तुरुंगांतील इतर अनास्थेमुळें आजारी पडला. त्याला औषधोपचार झाले नसल्यामुळे तो मरणाचे दारीं पडला. त्या वेळीं ही हकीकत त्याच्या दारोदार फिरणाऱ्या बायकोला समजली. तेव्हां तिनें नवऱ्याची भेट घेऊन त्याला औषधोपचार करण्याची परवानगी नानाकडे मागितली असतां केवळ भेटीकरतां ह्मणून बारा हजार रुपयांचा नानांनीं दंड मागितला. त्या बारा हजार रुपयांकरतां ती बिचारी बायको दारोदार फिरली, व रुपये भरण्याचें कबूल करून जामीन दिला. त्यामुळें भेटीचा परवाना तिच्या हातीं पडला; पण ती किल्ल्यावर जाण्यापूर्वींच सखाराम हरी मृत्यू पावला. अशी हकीकत घडली तरी बारा हजार रुपयांबद्दल नानांचा शशिमिरा तिच्या मागें लागला. तो टळावा ह्मणून त्या बाईनें महादजी शिंद्यांस पत्र पाठवून दयेची भिक्षा त्याच्या-जवळ मागितली. हा सर्व प्रकार वाचला ह्मणजे नाना फडनविसाच्या क्रूर वृत्तीची चांगलीच कल्पना येते. नानांच्या कारकीर्दीला कोणत्या शाहीची उपमा द्यावी हेंच समजेनासें होतें. नानांची ही स्वतंत्र अशी आसुरीशाही होती असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. औरंगझेब बादशहा आपल्या शत्रूच्या ठिकाणीं अत्यंत निर्दय होता अशी बोलवा होती. परंतु नानांची कृत्यें वाचलीं ह्मणजे औरंगझेबसुद्धां फिका पडतो, असेंच ह्मणावें

लागतें. ज्या सखाराम हरीसारख्या शूर व थोर पुरुषांनीं थोरल्या बाजीरावापासून हिंदपदपादशाहीची प्रामाणिकपणानें सेवा केली व शेवटीं अटकेपलीकडे मराठी साम्राज्याचा ध्वज उभारण्यांत आपलें पुण्य कर्तव्य केलें, त्या महाराष्ट्र–शूर–पुत्राला नानासारख्या क्रूर माणसानें असें छळावें हें कृत्य हिंस्र पशूंनासुद्धां लाजविणारें आहे यांत शंका नाहीं. नानांचा हा क्रूर स्वभाव खात्रीनें मनुष्य जातीचा नव्हता असेंच म्हणणें जास्त प्रामाणिकपणाचें ठरेल. अशा प्रकारें एका थोर, शूर, धाडसी, न्यायप्रिय आणि धर्मशील अशा पुरुषाचा अंत झाला. सखाराम हरी हा राघोबादादांचा जिवाचा दोस्त, प्रामाणिक सेवक आणि आज्ञाधारक शिष्य होता. थोर माणसांचे अभिमानी थोरच असतात व त्यांचे अनुयायीही त्यांच्याच दर्जाचे त्यांना मिळतात. व ते तसे खरे असतील तरच ते शेवटपर्यंत तसे टिकत असतात !

१२. राघोबादादांवर त्यांच्या शत्रुपक्षानें जे जे अनंत आरोप केले त्यांस यथायोग्य उत्तरें मागें ठिकठिकाणीं देण्यांत आलीं आहेत. राघोदादांच्या मनांत होळकरांचें राज्य गिळंकृत करावयाचें होतें हाही एक आरोप दादासाहेबांच्या विरुद्धपक्षाचा होता. त्याचा परामर्ष मागील आठव्या प्रकरणांत घेतला गेला आहे. राघोबादादा व होळकरांचे दिवाण गंगोबातात्या चंद्रचूड या उभयतांच्या मनांत अस्सल होळकर घराण्यांतील एकादा लहान मुलगा अहिल्याबाईच्या मांडीवर दत्तक देऊन ती गादी चालवावयाची असें होतें. तुकोजीराव हे केवळ आडनांवाचे होळकर होते. मल्हाररावांच्या होळकरशाखेचा व त्यांच्या शाखेचा कोठेंच संबंध नव्हता. शिवाय होळकरांच्या राज्यांत तुकोजीरावानें नोकरपेशानें दिवस काढले होते. तेव्हां अशा नोकरमाणसाला राज्याचा धनी करणें हें योग्य नाहीं, असा अनुभवी सल्ला गंगोबातात्या व राघोबादादा यांचा अहिल्याबाईला मिळाला होता. हा असा सल्ला आपणाला कां देत आहेत याचा विचार दुःखानें गांगरून गेल्यामुळें व राघोबादादांबद्दल तिचें मन

कलुषित केलें गेल्यामुळें अहिल्याबाईला आला नाहीं. अधिकार व ऐश्वर्य अकल्पित प्राप्त झालें असतां तें बुद्धीला तोललें जावयाला जातिवंतच मनुष्य लागतें. त्याच्या मनावर व कृतीवर बालपणापासून तसे संस्कार व्हावे लागतात. तरच तें माणूस तो अधिकार व तें ऐश्वर्य तोलूं शकतें. नाहींतर इतर माणसें अधिकार हातीं आल्यावर उन्मत्त होतात. त्यांच्या ठिकाणीं घरंदाजपणाचीं लक्षणें उन्मादाच्या भरांत राहत नाहींत. याकरतां मोठमोठ्या राज्यावर दत्तकाची स्थापना करण्याकरतां मोठ्या चातुर्यानें दत्तकाची निवड करावी लागते. दत्तक घेणें सोपें असतें पण दत्तक घेतल्यानंतर दत्तकाचें नातें कायम राहील असें वर्तन ठेवणें व राहणें कठीण असतें. अहिल्याबाईच्या दुःखाकुल मनाला दत्तकापासून थोडें तरी समाधान होईल या कल्पनेनें दादासाहेबांनीं व गंगोबातात्यांनीं एक लहान मुलगा दत्तक घेण्याचा त्यांना सल्ला दिला होता. परंतु तो त्यांनीं न ऐकल्यामुळें अहिल्याबाईचें आयुष्य कसें गेलें याची कल्पना येण्याकरतां त्याचा थोडासा इतिहास येथें देणें प्राप्त आहे.

१३. होळकरांच्या गादीचे संस्थापक मल्हारराव होळकर हे होत. हे थोरल्या बाजीरावांच्या कारकीर्दींत उदयास आले. त्यांचा जन्म तारीख ४ एप्रिल सन १६९७ रोजीं झाला. मल्हाररावास तारीख २८ सप्टेंबर सन १७२३ रोजीं खंडेराव हा पुत्र झाला. माणकोजी शिंदे या नांवाचा एक धनगर जातीचा गृहस्थ औरंगाबाद जिल्ह्यांतील बीड तालुक्यांत चोंढे गांवीं पाटिलकी करून रहात असे. त्याची मुलगी अहिल्याबाई ही सन १७२५ मध्यें जन्माला आली. खंडेरावाचें अहिल्याबाईबरोबर तारीख १४ मे सन १७३८ रोजीं लग्न झालें. अहिल्याबाईस सन १७४५ मध्यें मालेराव या नांवाचा मुलगा झाला. व सन १७४८ मध्यें मुक्ताबाई या नांवाची मुलगी झाली, दोनच अपत्यें अहिल्याबाईला झालीं. पुढें खंडेराव तारीख १७ मार्च सन १७५४ रोजीं कुंभेरीच्या वेढ्यांत गोळा लागून मरण पावला. अहिल्याबाई जात्याच बुद्धिमान्, चौकस व धोरणी

असल्यानें मल्हारराव होळकर यांचेवर तिचें मोठें वजन बसलें. मल्हाररावांच्या हयातींतच बहुतेक कारभार तीच करीत असे. अहिल्याबाईवर सर्व व्यवहार सोंपवून मल्हारराव निर्धास्तपणें मुलुखगिरींत गुंतलेले असत. मल्हारराव तारीख २० मे सन १७६६ रोजीं मृत्यु पावले; त्यामुळें होळकरशाहीची सर्व जबाबदारी अहिल्याबाईवर आली. तिचा मुलगा मालेराव हा पुढें सुमारें एका वर्षाचे आंतच तारीख २७ मार्च सन १७६७ रोजीं मृत्यु पावला. त्याच्याबरोबर त्याच्या दोन स्त्रिया सती गेल्या. मालेराव हा लहरी व वेडसर होता. त्याचे मृत्युसंबंधीं अशी हकीकत आहे कीं, मालेरावाच्या वाड्यांत एका कुणबिणीशीं गांवांतील एका शिंप्याचा कांहीं वाईट संबंध आहे अशा नुसत्या संशयावरून त्या शिंप्यास मालेरावानें एके दिवशीं ठार मारून टाकले. पण पुढें हें कृत्य फार वाईट झालें असें त्यास वाटून तो आजारी पडला, व वायूच्या लहरींत मोठमोठ्यानें आरोळ्या मारूं लागला व म्हणूं लागला, 'मी तुझा भयंकर रीतीनें सूड घेईन.' हे शब्द त्या मारलेल्या शिंप्याचा तोंडचेच असावेत व तो शिंपी समंध होऊन आपल्या पुत्रास छळतो, असें वाटून बाईनें त्यास परोपरीनें समजाविलें. पण तो स्पष्ट म्हणेः "मी निरपराधी असतांना मला तुझ्या मुलानें कां मारिलें ? मला आतां दुसरें कांहीं एक नको; मी जिवास जीव बळी घेईन तेव्हां तृप्त होईन.[१]" अशा समंधानें पछाडलेल्या स्थितींत मालेरावाचा अंत झाला. मालेरावाच्या मृत्युमुळें अहिल्याबाईस फार दुःख झालें. अहिल्याबाईचें पुढें देवधर्माकडे जें लक्ष लागलें त्याचें मुख्य कारण मालेरावाचा समंधबाधेनें अंत झाला हें असावें. मालेरावाच्या मृत्यूनंतर राज्याचा अधिकारी कोणी तरी केला पाहिजे ही जबाबदारी गंगोजीतात्या दिवाण यांचेवर आल्यामुळें त्यांनीं राघोबादादांस येण्याविषयीं कळविलें. ही हकीकत मागें आठव्या प्रकरणांत आली आहे. त्याप्रमाणें गंगोजीतात्या व राघोबादादा यांच्या सल्ल्याविरुद्ध अहिल्याबाईचा दत्तक म्हणून तुकोजीस महादजी व नाना यांनीं गादीचा अधिकारी बनविलें. पण अहिल्याबाईनें

---

१. वाकसकरकृत अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रें पान २६.

तुकोजीस मांडीवर दत्तक घेतलें नव्हतें. त्या वेळीं तुकोजीनें मुलुखगिरी करावी व अहिल्याबाईनें राज्यव्यवस्था पहावी असें ठरलें होतें.

१४. कांहीं दिवसांनीं तुकोजीला अहिल्याबाईच्या पारतंत्र्यांत राहणें खपेनासें झालें. त्यानें तिला जहागीर (पोटगीवजा) देऊन स्वस्थ बसविण्याचा प्रयत्न केला. परंतु अहिल्याबाईनें त्याला दाद दिली नाहीं. तिनें इंदोर हें शहर सोडून देऊन आपलें कायमचें राहण्याचें ठिकाण महेश्वर हें केलें. तिनें महेश्वरचा किल्ला दुरुस्त केला व त्यावर दारूगोळ्याची तजवीज करून ती मोठ्या बंदोबस्तानें राहूं लागली. तुकोजीराव होळकराला राघोबादादा व गंगोबातात्या यांच्या सल्ल्याविरुद्ध तिनें राज्याचा धनी केलें त्यामुळें शेवटीं तिला स्वतःच्या रक्षणाकरतां महेश्वरीं किल्ल्यामध्यें जाऊन राहण्याचा प्रसंग आला हें पाहून तिला खात्रीनें पश्चात्ताप झाला असेल यांत संशय नाहीं. पण अविचारानें गोष्ट घडून गेल्यानंतर तिला काय करतां येण्यासारखें होतें? तिनें आपल्या हातीं जेवढे प्रयत्न करतां येण्यासारखे होते तेवढे तिनें केले. महेश्वरच्या किल्ल्याचा बंदोबस्त केल्यामुळें तिला आत्मरक्षणाचा विश्वास उत्पन्न झाला, व तिनें तुकोजीराव होळकर व त्याचे मदतगार महादजी शिंदे या दोघांनाही युद्धास आव्हान केलें. ‘ उभयतां चालून आले तरी आपण कांहीं बांगड्या भरल्या नाहींत ’ असे वीरस्त्रीला शोभणारे उद्गार तिनें काढले. थोरल्या माधवरावानंतरचा ह्मणजे नाना फडनविस यांचा राज्यकारभार तिला फारसा पसंत नव्हता. इ. स. १७७४ मध्यें राघोबादादांनीं आनंदीबाईस धारच्या किल्ल्यांत नेऊन बंदोबस्तानें ठेविलें त्या वेळीं तिला अहिल्याबाईनें शक्य ती मदत केली. पुढें तुकोजीरावांचें व अहिल्याबाईचें फारच बिनसलें. तेव्हां इ. स. १७७९ मध्यें तिनें पेशव्यांस पंचवीस लक्ष रुपये नजराणा देण्याचें कबूल करून आपल्या मुलीचा मुलगा नथ्याबा यास दत्तक घेण्याची परवानगी घेऊन ठेविली होती. पुढें नथ्याबा इ. स. १७९० मध्यें निवर्तला. इ. स. १७९२ मध्यें अहिल्याबाईचा जांवई मृत्यू पावला व त्याचेबरोबर तिची मुलगी मुक्ताबाई सती गेली. त्यामुळें अहिल्याबाईला स्वतःच्या जिव्हाळ्याचें असें कोणीच राहिलें नाहीं. नंतर

तुकोजीचा मुलगा आज्ञेंत राहून सन्मार्गानें वागेल या कल्पनेनें तिनें त्याला आपल्या जवळ आणून ठेविलें व त्याचें लग्न वगैरे केलें. पण तो तर दुर्व्यसनांत 'बापसे बेटा सवाई' असा निघाला. या सर्व गोष्टींमुळें अहिल्याबाईस किती व कशा प्रकारचें दुःख झालें असेल याची कल्पनाच करणें बरें. राघोबादादा व गंगोबातात्या यांच्या सल्ल्याप्रमाणें जर अहिल्याबाई वागली असती तर तिच्यावर असे दुर्धर प्रसंग ओढवले नसते, असें ह्मटल्यास तें अयोग्य ठरणार नाहीं. या सर्व दुःखामुळें अहिल्याबाईचें लक्ष परमार्थाकडे विशेष लागलें. तिनें आपल्या कारकीर्दींत आपल्या प्रजेला मुलांप्रमाणें वागविलें. धर्मराजाप्रमाणें सर्वांस सारखा न्याय दिला. अनंतफंदीस सन्मार्गाला लाविलें. प्रभासपट्टण येथें इ. स. १०२४ मध्यें नाश पावलेल्या सोमनाथाच्या मूर्तीची तिनें पुनः स्थापना केली. तिनें काशी विश्वेश्वराचें मंदिर व गया येथील विष्णुपदाचें मंदिर यांचे जीर्णोद्धार केले. कलकत्त्यापासून तों काशीपर्यंत भला थोरला रस्ता बांधला. प्रवासी लोकांच्या सोईसाठीं तिनें जागोजाग अन्नछत्रें, धर्मशाळा, तळीं, विहिरी व रस्ते बांधले. अहिल्याबाईच्या औदार्याचा मासला केवळ तिच्या राज्यापुरताच पहावयास मिळतो असें नाहीं, तर तो सर्व हिंदुस्थानभर मिळतो. या सर्व ठिकाणीं प्रतिवर्षी धर्मादायाबद्दल पैसा पाठविला जातो. त्यांपैकीं पुष्कळ ठिकाणीं अद्यापी तिचीं अन्नछत्रें चालू आहेत. तिनें बांधलेल्या देवळांपैकीं कांहीं कांहीं तर फारच प्रेक्षणीय आहेत. हर्दा-इंडिया जवळ नेमावरांत तिनें जें एक देऊळ बांधिलें आहे, त्याची रचना अत्यंत नेत्रमनोहर आहे. अहिल्याबाईचें स्वतःचें आचरण जाज्वल्य होतें. देवभोळेपणाबद्दल तिची शिकस्त झाली होती. अलीकडे हिंदुस्थानांत ज्या पुण्यशालिनी स्त्रिया झाल्या त्यांत अहिल्याबाईचें नांव अग्रस्थानीं दिसून येतें. अशा देवीच्या सहवासांत आपण जाऊन रहातों असें आनंदीबाई ह्मणत असतां व त्याला अहिल्याबाईची अनुमती असतां, नाना फडनविस यांनीं आनंदीबाईला तिकडे जाऊं न देतां मंडळेश्वरास नेऊन ठेवलें होतें. अहिल्याबाई तारीख १३ आगष्ट सन १७९५ रोजीं आपल्या वयाच्या ७० व्या वर्षीं कैलासवासी झाल्या.

प्रकरण २४ वें.

गुरूची विद्या गुरूलाच फळली.

इ. स. १७८१ ते इ. स. १७९२.

१ नानांना शिंदे डोईजड वाटूं लागले. गुरूचा मंत्र गुरूवरच उलटतो. —२ इंग्रज व शिंदे यांचा स्वतंत्र तह. इंग्रजांच्या दरबारीं महादजींचें विशेष वजन पाहून नानांना वैषम्य वाटतें. सालबाईचा तह घडवून आणण्याबाबत इंग्रजांकडून शिंद्यांना मिळालेली दलाली. नाना व इंग्रज यांचेकडून सालबाईच्या तहामुळें आपण स्वतंत्र असल्याबद्दल शिंद्यांनीं मिळवून घेतलेली मान्यता.—३ इंग्रज व पेशवे सरकार यांच्यामधील कोणताही व्यवहार इतउत्तर शिंद्यांच्याच द्वारें व्हावा असें वजन शिंदे उभय पक्षांवर ठेवतात.—४ महादजी शिंदे गोहदच्या जाटाचा कांटा काढून टाकतात.—५ दिल्लीच्या बादशहाचे सरदार व उमराव खुद्द बादशहाला डोईजड होतात. त्यांच्याविरुद्ध ते बंडाळी करतात. बादशहा शिंद्यांची मदत मागतात. शिंदे त्यांचें बंड मोडतात. शिंद्यांवर बादशहा खूष होऊन ते आपलें दिवाणपद त्यांना देतात.—६ सालबाईच्या तहामुळें पेशवे सरकार व टिपू यांच्यांत वितुष्ट उत्पन्न होतें. इंग्रज टिपूबरोबर स्वतंत्र तह करून पेशवे सरकारचें त्रिकूट फोडतात.—७ स्वतःची महत्वाकांक्षा पुरी करण्याकरतां नानांनीं सालबाईचा तह इंग्रजाबरोबर केला व त्यामुळें त्यांनीं मराठी राज्याची चिरफाड केली. या चिरफाडीस ते एकटेच जबाबदार आहेत.—८ टिपूवरील स्वारीकरतां नाना निजामाबरोबर नवा तह करून त्याला आपल्या पक्षांत घेतात. त्या तहांतील कलमें नानांनींच मराठी राज्याची चिरफाड केली हें विशद करतात.—९ नानांचा मनसुबा टिपूला कळतांच 'कंटकेनैव कंटकम्' या न्यायानें तो नानांशीं वागतो.—१० आपणाविरुद्ध नानांनीं कपटकारस्थान केलें ह्मणून त्याला प्रत्युत्तर देण्याकरतां टिपू नरगुंदच्या ब्राह्मणी राज्यावर स्वारी करतो.--११ नरगुंदकरांस सहाय्य करावयास आलेल्या पटवर्धन व बेहरे यांच्या फौजेच्या टिपूच्या फौजेशीं झटापटी.—१२ नरगुंदकरांच्या मदतीस पुण्याहून होळकरही येतात असें पाहून टिपूनें निजामाच्या मध्यस्थीनें नानांकडे तहाचें बोलणें लावलें. तहाची

कलमें अंमलांत येण्यापूर्वीच पटवर्धन व बेहरे यांना नाना परत बोलावितात. —१३ टिपूबरोबर नानांनीं जो तह केला त्याला परशुरामभाऊ पटवर्धनांचा विरोध. नरगुंदकरांकडील दोन वर्षांच्या खंडणीच्या मोहाला बळी पडून नानांनीं परशुरामभाऊंचा योग्य सल्ला ऐकिला नाहीं. परशुरामभाऊ हताश होऊन व नरगुंदकरांना असहाय सोडून टिपूवरील मोहिमेवरून परत फिरतात.—१४ परशुरामभाऊंच्या सल्ल्याविरुद्ध नानांनीं टिपूबरोबर तह केला, या चुकीमुळें टिपूनें नरगुंदकरांच्या राज्याचा व त्यांच्या घराण्यातील स्त्रीपुरुषांचा कसा नाश केला ही हकीकत. त्याचप्रमाणें कृष्णा नदीपर्यंतच्या पेशव्यांच्या मुलुखांतील प्रजाजनांवर त्यानें पाशवी जुलूम कसा केला?—१५ नाना आपल्या एकतंत्री अधिकारामुळें या वेळीं गर्विष्ठ व घमेंडखोर झाले होते. त्यामुळें टिपूनें केलेल्या प्रलयास ते एकटेच जबाबदार होते.—१६ टिपूनें कित्तूर संस्थानही बुडविलें.—१७. नाना प्रचंड फौजेची तयारी करून टिपूवर स्वारी करतात. ते बदामीचा किल्ला घेतात.—१८ बदामीचा किल्ला सर केल्यानंतर नाना पुण्यास गेले व नरगुंद प्रकरणामुळें उदासीन झालेले परशुरामभाऊही तासगांवास गेले. —१९ नाना परत पुण्याला गेल्यानंतर मराठ्यांच्या सैन्याचें आधिपत्य हरिपंत फडके यांचेकडे आलें. हरिपंतांचे व टिपूचे निरनिराळ्या लढाईंतील सामने. टिपूची सरशी.—२० टिपू व नाना यांचेमधील तह व त्यांतील कलमें.—२१ टिपूचें पारिपत्य नानांच्या इच्छेनुरूप न झाल्यानें त्यासंबंधींची त्यांची पुन्हां खटपट सुरू होते. ते इंग्रज व निजाम यांचेबरोबर त्यासंबंधीं नवा तह करतात. त्या तहांतील कलमें. हा तह करण्यांत इंग्रजांनीं लढविलेलें चातुर्य.—२२ टिपूची एका मागून एक ठाणीं घेण्याचा परशुरामभाऊ सपाटा सुरू करतात.—२३ पटवर्धन सरदारांकडून श्रृंगेरीचा मठ लुटला जातो. प्रत्यक्ष स्वामी या अन्यायाची दाद मागण्याकरतां पुण्यास जातात. स्वामींच्या न्यायास पटवर्धन सरदारांविरुद्ध नाना भीक घालीत नाहींत.—२४ श्रृंगेरीचा मठ लुटून तेथें अनर्थ घडवून आणल्याबद्दल रघुनाथराव पटवर्धन, परशुरामभाऊ पटवर्धन व नाना हे तिघे ब्राम्हणच कसे जबाबदार होते?—२५ या निंद्य कृत्याबद्दल खरे शास्त्र्यांची वकिली विचारसरणी निष्फळ ठरते.—२६ यावर प्रकाश पाडणारें पटवर्धनांचें एक पत्र.—२७ सदरप्रमाणें दुसरें पत्र.—२८ या दोन्हीं पत्रांवरून पटवर्धन सरदार गुन्हेगार कसे होते व नानांचें त्यांस कसें पाठबळ होतें याचें स्पष्टीकरण.

—२९ नानांच्या पक्षानें हिंदुधर्मावर निरनिराळ्या वेळीं जो वरवंटा फिरविला त्याच्या मुळाशीं काय होतें?—३० मेलकोट्याचें पवित्र रामानुजाचार्यांचें देवस्थान नानांचे ब्राम्हण सरदार पेठे व पटवर्धन हे लुटतात व अनन्वित निंद्य कृत्यें करतात. हा एक मासला.—३१ दुसरा मासलाः हरिपंत फडके व पटवर्धन द्वारकेचा मठ लुटतात.—३२ पटवर्धन सरदार करवीरचा मठ लुटतात. —३३ परशुरामभाऊ कुडलगीचाही मठ लुटतात.—३४ शंकराचार्यांचे मठ लुटून हिंदुधर्माचा अपमान करण्याचें कंकण पटवर्धनांनीं आपल्या हातीं बांधून घेतलें त्याचें खरें कारण काय असावें?—३५ टिपूच्या पारिपत्यास निघालेल्या पेशव्यांच्या सैन्याच्या पुढील हालचाली.—३६ इंग्रज, निजाम व पेशवे या सर्वांचा टिपूस कोंडींत पकडण्याचा प्रयत्न.—३७ पेशवे, इंग्रज व निजाम या त्रिवर्गाबरोबर टिपूचा तह. तहांतील कलमें. टिपूकडून मिळालेल्या पैशाची व प्रदेशाची तिघांतील वांटणी. इंग्रजांस देशाबाहेर घालवून लावण्याच्या कटांतील आपल्या पूर्वीच्या दोस्ताला आपल्याच हातांनीं नाना जमीनदोस्त करतात.

१. सर्वसाधारण मनुष्याचा मनोधर्म स्वार्थ आणि स्वातंत्र्य याकडे अनुक्रमें वळत असतो. महादजी शिंद्यांनीं पेशवाईंतील चालू राजकारणाचा चांगला अभ्यास केला होता. नानांची महत्वाकांक्षा फलदायी करून देण्यामध्यें महादजींनीं आपले दोन हेतु साध्य करून घेतले. राजकारणाच्या दृष्टीनें हे दोनही हेतु अत्यंत महत्वाचे होते. तोतयाचें बंड, मोरोबाचें बंड, राघोबादादांचें बंड, हीं बंडें मोडण्याचे कामगिरीबद्दल महादजींनीं आपला कसा फायदा करून घेतला, हें त्या त्या प्रसंगीं आलेंच आहे. हीं बंडें मोडण्याची जशी महादजींनीं मोठी कामगिरी बजावली, तशीच पेशव्यांच्या राज्यांतील पेशवाईचा अभिमान असलेले मुत्सद्दी, तसेच शूर सरदार यांचींही निरनिराळ्या बंडांत सामील असल्याच्या गुन्ह्यांवरून त्यांनीं पाळेंमुळें खणून काढलीं होतीं. मुत्सद्यांपैकीं अखेरचा बळी सखारामबापूंचा पडल्यामुळें नानांना जसें पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त झालें, तितकेच शिंदेही स्वस्थ झाले. त्यांच्यावर मात करणारें दुसरें मनुष्य आतां पुणें दरबारांत राहिलें नाहीं. पुणें दरबारीं फक्त नानांचा

पक्ष जिवंत राहिल्यामुळें फडके व पटवर्धन एवढेच नांव घेण्यासारखे सरदार राहिले. परंतु त्यांच्यामागें हैदर व करवीरकर यांचें जन्माचें लफडें लागल्यामुळें त्यांच्या पराक्रमाचा उपयोग नानांना शिंद्यांविरुद्ध करून घेतां येण्यासारखा नव्हता. मध्यंतरीं हरिपंत फडके यांना राज्यकारभारांतून उडवून लावण्याचा घाट शिंद्यांनीं घातला होता. पण तो त्यांना तेवढासा साधला नाहीं. एकंदरींत पहातां शिंद्यांनीं आपल्या स्वार्थाबरोबर पेशव्यांची लष्करी सत्ता आपल्या हातीं घेतली व आपल्याला विरोधी अशी लष्करी सत्ता जेवढी होती तेवढी नामशेष करून टाकली. होळकरांना आपल्याविरुद्ध जातां येणार नाहीं असें वजन शिंद्यांनीं त्यांचेवर ठेवलें. भोंसल्यांनीं शिंद्यांप्रमाणेंच स्वार्थाचें अनुकरण केलें व इंग्रजांकडून भरपूर पैसा घेऊन कलकत्त्यावरील मोहीम सोडून देऊन ते परत स्वस्थानीं आले. त्यामुळें नानांचा तोही आधार तुटला. गायकवाडही गृहकलहानें बेजार झाल्यानें त्यांच्यांत त्राण उरला नव्हता. या सर्व परिस्थितीमुळें महादजी शिंदे स्वार्थ साधून प्रबल झाले व आतां त्यांना स्वातंत्र्याची दिशा दिसूं लागली. हैदर, निजाम, इंग्रज या राजसत्ता जशा स्वतंत्र आहेत, तशी आपलीही सत्ता स्वतंत्र असावी व त्याला विरोध करणारी पेशवाई सत्ता आतां आपलें कांहीं वांकडें करूं शकणार नाहीं या आत्मविश्वासावर शिंद्यांनीं स्वातंत्र्याच्या क्षेत्रांत पाऊल टाकण्याचें धारिष्ट केलें. हें धारिष्ट म्हणजे शिंद्यांनीं इंग्रजांबरोबर पुणें दरबाराला सोडून स्वतंत्रपणें तारीख १३ आक्टोबर सन १७८१ रोजीं वेगळा तह केला हें होय. या तहामुळें इंग्रजांनीं शिंद्यांची आपल्याप्रमाणेंच स्वतंत्र राजसत्ता मानली असें ठरतें. शिंद्यांनीं नानांना ज्याप्रमाणें सदाशिवरावभाऊ, राघोबादादा व बाकीची मुत्सद्दी मंडळी आणि सरदार मंडळी यांच्या पारतंत्र्यांतून सोडवून स्वतंत्र केलें, त्याचप्रमाणें त्यांनीं स्वतःला पेशवाईच्या पारतंत्र्यांतून मुक्त करून घेऊन आपलें स्वतंत्र राज्य आहे असें प्रसिद्ध करण्याचा या वेळेपासून पाया घातला. शिंद्यांनीं आपणास सोडून इंग्रजांबरोबर स्वतंत्र तह केला ही गोष्ट अर्थात् नानांना आवडणें शक्य

नव्हतें. पण करतात काय ? मनांतल्या मनांत मूग गिळून त्यांना गप बसावें लागलें. गुरूचा मंत्र गुरूच्याच अंगावर उलटला अशी नानांची अवस्था झाली.

२. बाविसाव्या प्रकरणांत शिंदे व कर्नल मूर पावसाळ्यामुळें माळव्यांत छावणी करून राहिले येथपर्यंत हकीकत आली आहे. पुढें कर्नल मूर यानें शिंद्यांबरोबर तहाच्या वाटाघाटी सुरू केल्यामुळें इंग्रज व शिंदे यांच्यामधील लढाई बंद पडली.[1] तारीख १३ आक्टोबर सन १७८१ रोजीं या उभयतांत जो वेगळा तह झाला त्यांतील कलमें :–(१) इंग्रजी फौजेनें यमुनेच्या पार जावें, व महादजीनें उज्जनीस परतावें (२) इंग्रजांनीं यमुनेच्या पश्चिमेकडील घेतलेला एकंदर मुलुख शिंद्यांस परत द्यावा. (३) ग्वाल्हेर गोहदच्या राण्याकडे द्यावी. या तहामुळें इंग्रजांचें व शिंद्यांचें रहस्य जमलें. मद्रास इलाख्यांत इंग्रजांबरोबर लढण्याची हैदरानें फार मोठी तयारी केली होती. इंग्रजांस या वेळीं मद्रासचें राजकारण अगोदर साधावयाचें होतें व तें साधण्याकरतां मराठ्यांबरोबर चाललेलें युद्ध थांबविणें इंग्रजांस प्राप्त झालें. मराठे व हैदर या उभयतांबरोबर एकाच वेळीं लढाई चालू ठेऊन यश मिळण्याची आशा इंग्रजांना दिसली नाहीं, ह्मणून त्यांनीं पुणें दरबाराबरोबर चाललेलें युद्ध बंद करावें व त्यांच्याबरोबर आपणाला सोईस्कर बसेल असा तह घडवून आणावा या उद्देशानें मुंबईहून मि० वेदरस्टन यास पुण्यास नाना फडनविस यांच्याबरोबर तहाच्या वाटाघाटी करण्यास पाठविलें. महादजी शिंदे हे आतां पुण्याच्या दरबारीं आपल्या लष्करी सामर्थ्यामुळें नानांचा उजवा हात बनले होते व तेच प्रस्तुतच्या इंग्रजांबरोबरील लढाईंत मुख्य होते, हें इंग्रजांना पूर्णपणें कळून चुकलें होतें. ह्मणूनच शिंद्यांना फोडण्याचा त्यांनीं त्यांच्याशीं पहिल्यानें तह करून प्रयत्न केला होता. शिंदे हे आपल्या वर्तीचे झाले ह्मणून पुण्यास नानाकडे मि० वेदरस्टन यास तहाची भाषा

---

१ नातुकृत म. शि. च. पा. १५८.

करण्याकरतां पाठविला असतांनाच इकडे शिंद्यांकडे गव्हर्नर-जनरल हेस्टिंग्स्साहेबानें कलकत्त्याहून मिस्टर अंडरसनसाहेबाला पुणें दरबाराबरोबर तह घडवून आणण्याकरतां सर्व अधिकार देऊन पाठविलें होतें. पुण्यास नानांकडे गोदर्द साहेबानें मि० वेदरस्टन यास तहाचें बोलणें करण्याकरतां पाठविलें तर गव्हर्नर-जनरलनें मि० अंडरसन यास शिंद्यांकडे पाठविलें. यामुळें इंग्रजांकडून पुणें दरबारबरोबर तह करण्याचा बहुमान शिंदे यांना दिला गेला. त्यामुळें सहजच नानांना इंग्रजांनीं कमी कोटींतलें लेखल्याप्रमाणें झालें. हा अपमान नानांना समजला नसेल असें कोणालाच वाटण्यासारखें नव्हतें. पण करतात काय ? सर्व अधिकार ते महादजीला देऊन बसले होते. तेव्हां त्यांना कांहीं करतां येण्यासारखें नव्हतें. आपल्यापेक्षां आतां महादजींचें वजन इंग्रजांवर जास्त आहे असें पाहून मि० वेदरस्टन यास नानांनीं 'शिंद्यांच्या मध्यस्थीनें तहाची वाटाघाट सुरू आहे, तेव्हां तुम्ही परत जा' असें सांगितलें. त्याप्रमाणें तो परत गेला. पुढें शिंद्यांच्या वतीनें सालबाईचा तह झाला. त्यांतील कलमें मागें आलींच आहेत. त्या कलमांत महादजींनीं आपण स्वतः पेशव्यांच्या राज्यापासून अलग आहोंत, आपल्या राज्याचे हितसंबंध पेशव्यांच्या राज्यापासून अगदीं निराळे आहेत, असें दाखविण्याकरतां एका कलमाची पाचर मारून ठेवली. ती म्हणजे पुणें दरबार व इंग्रज यांच्यामध्यें त्रयस्थ म्हणून तह घडवून आणण्याची शिंद्यांनीं खटपट केली व त्याबद्दल इंग्रजांकडून महादजी शिंदे यांस भडोच शहराची दलाली मिळाली. वर वर पहाणारास शिंद्यांनीं ही दलाली घेतली असें वाटतें. परंतु तें खरें नसून पेशव्यांच्या राज्यापासून शिंद्यांचें राज्य अलग व स्वतंत्र आहे हें नाना व इंग्रज या उभयतांकडून शिंद्यांना मान्य करून घ्यावयाचें होतें. हें काम सालबाईच्या तहावर नानांची सही झाल्यावर फत्ते झालें. या तहनाम्यावर नानांचा शिक्कामोर्तब होईपर्यंत त्यांनीं अनंत आढेवेढे व पुष्कळ दिरंगाई लाविली. परंतु त्यांना शिंद्यांच्या मगरमिठींतून सुटतां आलें नाहीं.

हा तह तारीख २४ फेब्रुवारी सन १७८३ रोजीं नानांच्या शिक्कामोर्त-बानें पुरा झाला हें मागें आलेंच आहे. इंग्रज व पेशवे यांमधील तहाच्या अटी प्रत्येकाकडून पुऱ्या पार पाडून देण्याची जबाबदारी शिंद्यांनीं आप-ल्यावर घेतली होती. यावरून इंग्रज व नाना या उभयतांवर महादजी शिंद्यांनीं आपलें केवढें वजन ठेवलें होतें हें दिसून येईल.

३. सालबाईचा तह आपले हातून झाला यामुळें शिंद्यांना मोठा आनंद झाला. हा तह होण्याचे अगोदर निजाम व भोंसळे यांनीं नानांना लिहिलें होतें कीं, इंग्रजांचा तह आमचे विद्यमानें झाल्यास सर्व मुलूख व घेतलेला वसूलसुद्धां इंग्रजांस परत देण्यास आह्मीं भाग पाडूं व तसें इंग्रजांनीं न केल्यास आपण तिघे मिळून इंग्रजांचें पारिपत्य करूं.[1] पण भोंसले व निजाम यांच्या या ह्मणण्याप्रमाणें करण्यास नानांची छाती होईना. याचें कारण शिंद्यांएवढा भोंसले व निजाम यांचा विश्वास नानांना नव्हता. दुसरें तसें केलें असतें तर शिंदे नानांचे शत्रू बनले असते. शिंदे हे नानांच्या कटांतील घरचे भेदी देऊन बसल्यामुळें ते केव्हां व कसें आपणास जिवानिशीं मारतील याचा धाक नानांना होता. ह्मणून शिंद्यांविरुद्ध कोणतेंही नवीन राजकारण करावयाला ते तयार नव्हते. त्या-मुळें भोंसले व निजाम यांचा डाव फसला. तारीख २५ फेब्रुवारी सन १७८३ रोजीं इंग्रजांचा वकील मि० अंडरसन व शिंदे यांची दरबारांत भेट होऊन परस्परांनीं तहाचे दस्त मोबदला केले. त्या प्रसंगीं महादजींनीं भोंसले व निजाम यांबद्दल आपला तिरस्कार प्रदर्शित करून, 'इंग्रजांनीं इतउत्तर मराठ्यांच्या संबंधानें जें कांहीं बोलणेंचालणें करणें, तें आपल्या मार्फत करावें; आपण इंग्रजांचा खरा दोस्त; सालबाईचा तह करण्यांत निजाम व भोंसले आडकाठी घालीत होते; पुण्याचे मुत्सद्दी परस्परांत भांडत असून, त्यांपैकीं हरिपंत व होळकर आपला द्वेष करतात; आणि पेशवे तर अल्पवयी असल्यामुळें पुण्यास सर्व घोंटाळेच होणार,' असे

१ पत्रें व याद्या पा. १९१.

उद्गार काढिले. आपल्या सूत्रानें इंग्रज वागल्यानें परस्परांचें त्यांत हित आहे व प्रसंग पडल्यास पुनः जर पुण्यामध्यें कांहीं घोंटाळा झाला तर आपणां उभयतांस दक्षिणेवर जावें लागेल असेही त्यांचे उद्गार निघाले. पुण्यास मुत्सद्यांनीं गैरशिस्त प्रकार कांहीं केल्यास इंग्रजांनींही शिंद्यांस मदत करण्याचें कबूल केलें. मि० अंडरसनचें ह्मणणें असें होतें कीं, या सर्व भाषणांत महादजींचा मुख्य मुद्दा सर्व स्वार्थपर असून त्यांच्या मध्यस्थीशिवाय मराठ्यांचा व इंग्रजांचा कांहीं व्यवहार होऊं नये असा होता. या सर्व प्रकरणांत इंग्रजांवर महादजींनीं इतकी छाप ठेवली होती कीं, त्यांच्याशिवाय महाराष्ट्र-राज्यांत दुसरा कोणीच भला माणूस नव्हता, असा त्यांचा पक्का ग्रह झाला होता. [१]

४. महादजींचा इंग्रजांबरोबर स्नेह जमल्यानंतर त्यांनीं गोहदच्या जाटाचा समाचार घेण्याचा विचार चालविला. जाटानें इंग्रजांबरोबर मैत्री संपादून महादजी बरोबर लढाई केली होती व त्या सहाय्याबद्दल जाटाला इंग्रजांकडून ग्वाल्हेरचा किल्ला तहामध्यें मिळाला होता. ही गोष्ट महादजींच्या मनांत सलत होती. ग्वाल्हेर जाटाकडे रहावें असा इंग्रजांनीं करार करून घेतला असतां, महादजीनें तो बाजूला ठेऊन जाटाबरोबर लढाई सुरू केली. जाटाचीं सालबी, आंत्री, गोहद, व ग्वाल्हेर वगैरे ठाणीं महादजींनीं काबीज केलीं व जाटाला जेरीला आणलें. ग्वाल्हेर विंचुरकरांच्या सरंजामापैकीं असल्यामुळें तें महादजींना त्यांना द्यावें लागलें. याप्रमाणें इंग्रजांच्या स्नेहाचा फायदा घेऊन महादजींनीं गोहदच्या जाटाचा कांटा काढून टाकला. यानंतर महादजींचें लक्ष दिल्लीच्या बादशहाच्या कारभारांत घुसण्याकडे लागलें.

५. या वेळीं दिल्लीच्या तक्तावर शहालम बादशहा होता. त्याच्या उमरावांनीं त्याला नामधारी बादशहा करून ठेवलें होतें. त्या वेळीं नबाब नजबखान, आगाशफी, अबदुल हयातखान नबाब, हमदानी नबाब, इस्माल बेग नबाब, गुलाम कादर, अफराशा नबाब, नजब कुलीखान नबाब, खान दौराखां नबाब

१ नातुकृत म. शि. च पा. १६८,

सरनाम, अशा उमरावांचा समुदाय दिल्लीच्या पातशाहींत होता. हे उमराव पातशहांचा हुकूम मानेनासे झाल्यामुळें शहालम बादशहानें त्यांचें पारिपत्य करण्याकरतां महादजी शिंद्यांची कुमक मागितली. हें वर्तमान त्या उमरावांना समजतांच कांहीं उमराव आपापल्या जागीं स्वस्थ राहिले. परंतु गुलाम कादर, नबाब इस्माल बेग व हमदानी यांनीं बादशहास कैद करून आपण राज्य करावें अशी मसलत केली. तेव्हां बादशहाच्या विनंतीवरून महादजी उमरावांचें बंड मोडण्याकरतां फौजेसह दिल्लीवर चालून गेले. त्यांनीं बादशहाच्या इच्छेप्रमाणें सर्व उमरावांचें बंड मोडलें. तें पाहून बादशहा खूष झाले व त्यांनीं महादजींस आपला सर्व कारभार सांगितला. त्यांनीं शिंद्यांस आपला सेनापती नेमलें व दिल्ली आणि आग्रा हीं दोन्हीं शहरें त्यांचे स्वाधीन केलीं. अशा प्रकारें महादजी शिंदे मुख्यत्वें दिल्लीचा कारभार करूं लागले. असा शिंद्यांचा उत्कर्ष झाल्याचें वर्तमान पुण्यास येऊन पेशवे व नाना फडनविस वगैरे कारभारी यांस विस्मययुक्त आनंद झाला.[1] ही हकीकत १७८४ मध्यें घडली.

६. सालबाईच्या तहांत हैदरानें इंग्रज व अर्काटचा नबाब यांचा मुलूख घेतला होता, तो त्यांना सोडून देण्याविषयीं मराठ्यांनीं त्याला सांगावें असें एक कलम होतें. कारण कीं, हैदर हा मराठ्यांचा मांडलिक होता. मराठ्यांच्या सांगण्याप्रमाणें मुलूख सोडून देण्यास तो तयार झाला नाहीं तर इंग्रज, मराठे व मोंगल यांनीं एकत्र होऊन हैदराचें पारिपत्य करावें व त्यास तसें करण्यास भाग पाडावें असें ठरलें होतें. हैदरासंबंधींचें हें कलम त्याच्या पश्चात त्याचा मुलगा टिपू यासही तें लागू होतें. सालबाईच्या तहांतील अटी पार पाडण्याची जबाबदारी पेशव्यांच्या वतीनें शिंद्यांवर होती. त्याप्रमाणें इंग्रजांनीं टिपूकडून आपला गेलेला मुलूख परत मिळण्यासंबंधीं शिंद्यांना निकड लाविली. तेव्हां नाना व शिंदे यांनीं टिपूला इंग्रजांबरोबर त्याचें चाललेलें युद्ध बंद ठेऊन त्यांचा घेतलेला मुलूख परत करण्याबद्दल तगादा लाविला. परंतु टिपूनें त्यांच्या म्हणण्या-

---

[1] जिवबादादाचें चरित्र पा. ११५.

कडे दुर्लक्ष केलें व आपल्याबरोबर एक लक्ष फौज घेऊन त्यानें मद्रास व मलबारांतील इंग्रजी मुलखावर स्वारी केली. त्यानें तो प्रांत जाळून व लुटून उध्वस्त केला. आणि एक दोन लढायांत इंग्रजी फौजेचा धुव्वा उडवून दोन तीन हजार इंग्रज कैद केले. टिपूचा हा पराक्रम पाहून मद्रासचे इंग्रज भयभीत झाले व त्यांनीं स्वतंत्रपणें त्याच्याबरोबर तह केला. याप्रमाणें सालबाईच्या तहामुळें टिपूविरुद्ध पेशवे, मोंगल व इंग्रज यांचें जें त्रिकुट जमलें होतें तें टिपूनें फोडून टाकलें.

७. मागें २२ वे प्रकरणांत, इंग्रजांची हिंदुस्थानाबाहेर हांकालपट्टी करण्याच्या नानांच्या मनसुब्याची हकीकत आली आहे. त्यावेळीं राघोबादादा हे इंग्रजांच्या आश्रयाला गेल्यामुळें त्यांचें पारिपत्य करून दादासाहेबांना आपल्या ताब्यांत घेणें ही एकच गोष्ट नानांना साधावयाची होती. इंग्रजांनीं दादासाहेबांना नानांच्या स्वाधीन केलें असतें तर नानांना इंग्रजांबरोबर लढण्याचें कारण नव्हतें. उलट ते इंग्रजांबरोबर दोस्तीचा पूर्वीचा तह अव्याहत चालावावयाला तयार असून आणखीही कांहीं वरदक्षणाही देण्यास तयार होते. परंतु त्या वेळीं इंग्रजांनीं दादांचा पक्ष धरल्यामुळें नानांना ते दादाइतकेच शत्रू वाटूं लागले होते. इंग्रजांनीं दादासाहेबांचा केवळ पक्ष धरला या द्वेषामुळें नानांनीं इंग्रजांना हिंदुस्थानाबाहेर घालवून लावण्याचा मनसुबा तयार केला. याशिवाय इंग्रजांना घालवून लावण्याचें दुसरें कांहीं कारण नव्हतें. इंग्रजांची हांकालपट्टी करण्याचे बाबतींत नाना, भोंसले, हैदर व निजाम यांची चौकडी निर्माण झाली व तिनें इंग्रजांविरुद्ध शस्त्र उपसलें. या चौकडीपुढें आपला निभाव लागणार नाहीं असें इंग्रजांना वाटलें. त्यामुळें त्यांनीं पेशव्यांबरोबर सालबाईचा तह केला. हा तह करतांना नानांनीं भोंसले, हैदर व निजाम यांना तहाच्या वेळीं मसलतींत घेऊन त्यांच्या विचारें तो तह घडवून आणणें प्राप्त होतें. त्यामुळें या चौकडीचे परस्परांविषयींचे मित्रत्वाचे संबंध कायम राहून इंग्रज कायमचे यांच्या पुढें नमते राहिले असते. सालबाईचा तह शिंद्यांच्या मध्यस्थीनें झाला ही गोष्ट जरी सत्य असली तरी त्यावर नानांची ज्याअर्थीं मखलाशी झालेली आहे

त्याअर्थी तो तह अविचारानें झाला असें कोणालाच म्हणतां येणार नाहीं. नाना हे राजकारणांत निर्ढावलेले मुत्सदी होते. लढण्याचे वेळीं सर्वजण पण तहांतील प्राप्तीचा मलिदा खाण्याचे वेळीं मात्र आपण एकटेच अशी ही राजकारण खेळणारी बुद्धि आत्मघाताची आहे हें समजण्याइतके नाना खात्रीनें शहाणे होते. असें असतां नानांनीं ज्याअर्थी इंग्रजांबरोबर स्वतंत्रपणें तह केला, एवढेंच नव्हे तर निजाम व भोंसले यांच्याप्रमाणें वरोपांगीं इंग्रजांचे शत्रू न होतां मोठया धडाडीनें ज्यानें इंग्रजांबरोबर युद्ध करून त्यांना सळो का पळो करून सोडलें, अशा प्रकारच्या प्रामाणिकपणानें मदत केलेल्या हैदराच्या हितसंबंधांविरुद्ध आपणच स्वतः त्याचा शत्रू बनून, नानांनीं सालबाईचा तह केला, त्याअर्थी नानांना कोणतें तरी एक मोठें साध्य साधावयाचें होतें व त्याकरतां त्यांनीं हा आत्मघातकी सालबाईचा तह घडवून आणला हें उघड दिसतें. हें साध्य म्हणजे राघोबादादांना इंग्रजांच्या आश्रयांतून कायमचें बाहेर काढून आपल्या ताब्यांत ठेवणें हें होय. राघोबा-दादांच्याबद्दल नानांच्या मनांत जो द्वेष उत्पन्न झालेला होता त्याची अंमलबजावणी करण्याकरतां हा सालबाईचा तह झाला. नानांच्या मनांत राघोबादादा यांच्या विषयीं द्वेष कां होता याचें एकच कारण होतें. तें म्हणजे दादासाहेब नानांचे कायमचे बांदिवान् झाल्याशिवाय पेशवाईवरील निष्कंटक सत्ता नानांना उपभोगतां येत नव्हती हें होय. या एकाच महत्वाकांक्षेमुळें नानांनीं सालबाईचा तह करून पेशवाईला कायमचा क्षयरोग जडवून घेतला. या तहामुळेंच इंग्रजांचें हिंदुस्थानांतील आसन स्थिरावलें व पेशव्यांच्या राज्याची चिरफाड झाली. या चिरफाडीबद्दल नाना एकटेच जबाबदार आहेत.

८. सालबाईच्या तहामुळें हैदराचा पराक्रमी मुलगा टिपू अर्थात् चिडून गेला. त्यानें इंग्रजांचा पराभव केला. तेव्हां इंग्रजांनीं नानांचेंच अनुकरण करून त्याच्याबरोबर स्वतंत्रपणें तह केला ही हकीकत मागें आलीच आहे. या तहामुळें पेशवे व इंग्रज यांच्याप्रमाणें आतां टिपू व इंग्रज एक झाले, पण पेशवे आणि टिपू यांचें मात्र जास्त वैमनस्य

वाढलें. या पुढील नानांचें राजकारण दक्षिणेच्या दिशेनें वाहूं लागलें व त्याची उभारणी पुण्यास जारीनें सुरू झाली. टिपूचें पारिपत्य निजामाच्या मदतीशिवाय होणार नाहीं असें नानांना दिसून आल्यावर त्यांनीं त्याची समक्ष भेट घेण्याचें ठरविलें. नानांनीं आपल्याबरोबर हरिपंत फडके, तुकोजी होळकर, परशुरामभाऊ पटवर्धन हे सरदार व वीस हजार फौज घेतली. निजामही नानांच्या भेटीकरतां अशाच मोठ्या लवाजम्यानिशीं निघाला. उभयतांची भेट इ. स. १७८४ च्या एप्रिल महिन्यांत कृष्णा व भीमा यांच्या संगमावर यादगीर येथें झाली. त्यांच्या भेटींत बरींच खलबतें होऊन पुढील गोष्टी उभयपक्षीं मान्य करण्यांत आल्या.[1] (१) निजामाकडे चौथसरदेशमुखीची बाकी बरेच वर्षांची तुंबली होती. त्या बाकीपैकीं दोन वर्षांची रकम निजामानें रोखीनें तत्काल पेशव्यांस द्यावी. त्या पूर्वींच्या हिशोबांत थोडे बहुत लढे होते, सबब त्याची आकारणी स्वस्थपणानें मागील दाखले पाहून करावी. जेथें शंका येईल तेथें माधवराव बल्लाळ पेशवे किंवा निजाम उल्मुल्ख यांच्या वेळेची वहिवाट पहावी. ही वहिवाट उभय पक्षांनीं मान्य करावी. (२) निजामाच्या राज्यांत मराठ्यांचीं ठाणीं होतीं तीं अलीकडे निजामानें उठवून लाविली होतीं. निजामानें तीं ठाणीं पुनः मराठ्यांच्या स्वाधीन करावीं. (३) मराठे व मोंगल या दोघांनीं मिळून टिपूवर स्वारी करावी. टिपूकडून खंडणी व मुलूख मिळेल त्याचे तीन समसमान हिस्से करावे. एक हिस्सा निजामाचा, एक हिस्सा पेशव्यांचा व एक हिस्सा शिंदे–होळकरांचा, या प्रमाणें यादी झाली. या यादींत एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, शिंदे व होळकर यांना निजाम व पेशवे यांच्याप्रमाणेंच व त्यांच्याबरोबरीनेंच प्राप्तीचा वांटा देण्याचें ठरलें. यावरून निजाम व पेशवे यांनीं शिंदे व होळकर यांना स्वतंत्र राजसत्ता ह्मणून मानलें हें स्पष्ट होतें. शिंद्यांनीं सालबाईच्या तहाच्या वेळीं पेश-

---

१ खरेकृत ना. फ. च. पान ११९.

त्यांची मांडलिक सरदारकी झुगारून दिली व त्याचेंच अनुकरण या वेळीं तुकोजी होळकर यांनीं केलें. नानांचे पक्षपाती लोक या बाबतींत असें ह्मणण्याचा प्रयत्न करतील कीं, शिंदे-होळकरांचा हिस्सा टिपूच्या मोहिमेंत स्वतंत्रपणें ठेवण्यांत नानांचें खोल कारस्थान होतें. तें हें कीं, शिंद्यांचा हिस्सा दक्षिणेच्या मोहिमेंत ठेवला ह्मणजे शिंद्यांनीं उत्तरेच्या बाजूला दिल्लीच्या बादशहाकडून जो मुलुख घेतला त्यांत आपणाला हिस्सा मागतां येईल. पण ही सारी भाषा केवळ दिशाभूल करणारी आहे. त्याला उत्तर एवढेंच आहे कीं, शिंद्यांकडे प्राप्तीचा वांटा मागतां येईल. पण आज होळकरांनाही मोहिमेंत हिस्सेरशीप्रमाणें पेशव्यांकडून प्राप्तीचा वांटा मिळण्याचा हक्क मिळाला याची वाट काय ! एकंदरींत राघोबादादांना पदच्युत करण्याच्या नानांच्या आसुरी लालसेनें पेशवाईचे दुवे नाना आपल्या हातानेंच अलग करूं लागले हें स्पष्ट आहे. ही यादी तयार झालेवर पावसाळा जवळ आल्यानें टिपूवर स्वारी करतां येणें शक्य न झाल्यामुळें या मोहिमेचें कार्य पुढील सालावर ढकलण्यांत आलें.

९. टिपूच्या पारिपत्याकरतां नानांनीं रचलेला मनसुबा त्याला समजतांच नानांनीं आपला कपटानें विश्वासघात केला असें टिपूला वाटणें स्वाभाविक होतें. त्याला अनुसरून नानांच्या कपटनीतीला कपटनीतीनेंच उत्तर देण्याचा विडा टिपूनें उचलला. त्यानें आपला एक वकील नानाबरोबर समेट करण्याकरतां पुण्यास पाठविला. आणि लगेच थोड्या दिवसांत आपला मेहुणा बुराणउद्दीन या सरदारास पंचेवीस हजार फौज देऊन नरगुंद संस्थानावर त्यानें पाठविलें.'

१०. कर्नाटकांत नरगुंद हें एक लहानसें ब्राम्हणी संस्थान होतें. तेथील संस्थानिक भावे हे पेशव्यांचे अंकित असून पटवर्धन सरदारांचे ते आप्त होते. इ. स. १७८० मध्यें नानांनीं हैदराबरोबर जो तह केला त्या तहामुळें तुंगभद्रा व मलप्रभा या दोन नद्यांमधील हैदरानें जिंकलेला सर्व मुलूख त्याला मिळाला होता. हैदरनें नरगुंद जिंकल्यामुळें तें तेव्हांपासून हैदराच्या अंमलाखालीं गेलें होतें.

खरेकृत ना. च. पा. ११९.

त्या वेळेपासून नरगुंदकर हे पूर्वी पेशव्यांस जी खंडणी देत असत तीच ते हैदरास देऊं लागले. हैदर मरण पावल्यावर टिपूला राज्यपद मिळालें. परंतु नानांनीं त्याच्याशीं वेबनाव सुरू केल्यामुळें त्याचा वचपा काढण्याकरतां पहिल्यानें ब्राम्हणी संस्थानावर टिपूची वक्र दृष्टि फिरली. त्यानें नरगुंदकरांकडे पूर्वीपेक्षां खंडणीची भरमसाट अधिक मागणी केली. ती मागणी अमान्य करण्याची त्यांना ताकद नव्हती शिवाय ती एकदां दिली म्हणजे कायमची आपल्या मानेवर बसेल असेंही नरगुंदकरांना वाटत होतें. न दिली तर खात्रीनें युद्धावर प्रसंग येणार हेंही ते जाणून होते. म्हणून त्यांनीं टिपूला त्या बाबतींत स्पष्ट असें कांहींच कळविलें नाहीं. पण आपल्याला फौजेची मदत लागणार म्हणून त्यांनीं गुप्तपणें मुंबई सरकाराकडे मदतीची मागणी केली. मद्रास सरकारचा व टिपूचा तह झाला असल्यामुळें मुंबई सरकारानें नरगुंदकरांना मदत करण्याचें नाकारलें. तेव्हां त्यांनीं पुण्यास नानांकडे मदतीची विनंति केली. टिपूवर स्वारी करण्याचा नानांचा निश्चय पूर्वी झालाच असल्यामुळें ही संधि बरी आहे असें पाहून नानांनीं नरगुंदकरांचा पक्ष स्वीकारला. नानांनीं टिपूस लिहिलें कीं, " जहागिरदारांचीं संस्थानें एका राज्यांतून दुसऱ्या राज्यांत गेलीं असतां, त्यांजकडून खंडणी मामूल ठरावापेक्षां जास्त घ्यावी अशी वहिवाट नाहीं. जे जहागिरदार आपल्या सरकारपाशीं राजनिष्ठेनें वागतात त्यांचे सर्व हक्क पाळले जाण्याची आजपावेतों एकसारखी वहिवाट आहे. " या नानांच्या पत्राचें टिपूनें उत्तर पाठविलें त्याचा असा आशय होता कीं, आपल्या राज्यांत पाहिजे तितकी खंडणी घेण्यास आपण मुक्त्यार आहों. असा जबाब पाठविल्यावर नानांच्या मध्यस्थीचा उपहास करण्याकरतां टिपूनें मागें दर्शित केल्याप्रमाणें आपला मेहुणा बुराणउद्दीन यास फौजेसह नरगुंदवर रवाना केलें. त्यानें येऊन नरगुंदास वेढा घातला.

११. ही हकीकत नानांस समजतांच त्यांनीं परशुरामभाऊ व गणेशपंत बेहरे यांच्याबरोबर फौज देऊन त्यांना तिकडे रवाना केलें. हे उभयतां सरदार नरगुंदाजवळ येऊन पोंचले. तेव्हां बुराणउद्दीन यानें लढाई न देतां वेढा

उठविला आणि दूर अंतरावर जाऊन तळ दिला. तेथून त्यांनीं भाऊ व बेहरे यांस निरोप पाठविला कीं, ' आम्हीं नरगुंद सोडून येथें सैन्याचा तळ दिला हा आपले सरकार पेशवे यांची अदब ठेवण्याकरतां. ' या थट्टास्पद व धिटाईच्या निरोपानें भाऊ व बेहरे हे उभयतां क्रुद्ध झाले; आणि त्यांनीं एकदम टिपूच्या गोटावर छापा घालून त्याच्या सैन्यावर ते तुटून पडले, व त्यांनीं त्यास मागें हटविलें. इतक्यांत टिपूचीं दोन पलटणें व स्वार ताज्या दमानें त्यांच्या सैन्यावर चालून आले तेव्हां त्यांस मागें पाय घ्यावा लागला.[1]

१२. भाऊ व बेहरे यांच्याबरोबर असलेलें सैन्य थोडें होतें म्हणून नानांनीं तुकोजीराव होळकर यांच्याबरोबर मोठी फौज देऊन त्यांच्या मदतीस त्यांस रवाना केलें. मराठ्यांची मोठी फौज लढाईकरतां येत आहे असें टिपूला समजतांच त्यानें पेशव्यांच्या दरबारीं निजामाच्या मार्फत तहाचें बोलणें लाविलें. त्यांत त्याचें असें म्हणणें होतें कीं, नरगुंदकरांनीं आपलें स्वामित्व कबूल करावें म्हणजे आपलें दुसरें कांहीं म्हणणें नाहीं व नरगुंदकरांकडून आपली यावयाची दोन वर्षांची खंडणीही आपण पेशवे सरकारास देण्यास कबूल आहों. निजामाच्या मध्यस्थीनें नानांनीं टिपूचें हें म्हणणें मान्य केलें व त्याप्रमाणें परशुरामभाऊ व बेहरे या सरदारांस सैन्यासह परत येण्याविषयीं आज्ञा केली.

१३. नानांनीं परशुरामभाऊ व बेहरे यांना सैन्यासह परत बोलाविलें याबद्दल परशुरामभाऊ व नाना यांच्यामध्यें मोठाच मतभेद उत्पन्न झाला. यासंबंधीं नानांचें म्हणणें असें होतें कीं, ' टिपूशीं युद्ध सुरूं करण्याची पेशवे व निजाम या दोनी सरकारांची तूर्त तयारी नाहीं. टिपूचें सामर्थ्य मोठें आहे. त्याच्याशीं युद्ध सुरूं करावयाचें तें बहुत तरतुदीनें आणि मोठ्या तयारीनें केलें पाहिजे. नरगुंदचा बचाव जरूर केलाच पाहिजे. परंतु त्या कामीं होतां होईतों युद्धापर्यंत मजल आणूं नये. फौजेचा बागुलबावा दाखवून जेवढें काम होईल तेवढेंच करावें. शत्रूची फौज चालून आली

---

[1] परशुरामभाऊ यांचें चरित्र पान ४९.

तरी सुद्धां मराठी फौजेनें पीछेहाट करावी, परंतु युद्धप्रसंग करूं नये. टिपूचा वकील तह ठरविण्याकरितां पुण्यास आला आहे. अशा वेळीं एखाद्या मारामारीची कागाळी त्याच्या कानीं पडेल तर तो तत्काल बिथरून बसेल आणि तहाला हिसका बसेल.' या बाबतींत परशुरामभाऊंचें असें ह्मणणें होतें कीं, 'टिपूला कारभारी इतके कां भितात? मराठी राज्याच्या सामर्थ्यापुढें त्याचा काय पाड आहे? तूर्त आह्मांजवळ वीस हजार फौज जमली आहे. निजामाचीही दहा पंधरा हजार फौज कायम उल्मुल्ख या सरदाराबरोबर विजापूर प्रांतांत आली आहे. ती फौज इकडे आणवून घ्यावी आणि शत्रूशीं बेजरब लढाई द्यावी. लढाईंत शत्रूचा रेंच मोडल्याशिवाय त्याची गुर्मी जिरावयाची नाहीं.' याप्रमाणें भाऊंचें मत होतें. परंतु या वेळीं नानांची दृष्टि टिपूकडून मिळणाऱ्या नरगुंदकरांच्या दोन वर्षांच्या खंडणीच्या मलिद्याकडे गेल्यामुळें परशुराम-भाऊंचा योग्य सल्ला त्यांना आवडला नाहीं. उलट ते जर कां टिपूच्या सैन्यावर हल्ला करून कांहीं कलागत करतील, तर तह करण्यास आलेला वकील त्यामुळें बिथरून जाऊन नानांच्या घरांत घुसणाऱ्या लक्ष्मीला अडविल्याचें महापातक परशुरामभाऊंच्या माथीं मारण्यांत येईल व त्याबद्दल पूर्णपणें ते जबाबदार धरले जातील, असा भाऊंना लिहिलेल्या नानांच्या लेखनाचा अर्थ होता. नानांच्या आज्ञेप्रमाणें बिचारे परशुराम-भाऊ हुकुमाचे ताबेदार असल्यामुळें, आपला झालेला मानभंग मनांतल्या मनांत गिळून व नरगुंदकरांच्या प्राक्तनाचा भार परमेश्वरावर टाकून आपल्या सर्व फौजेनिशीं परत फिरले.

१४. परशुरामभाऊ व बेहरे या सरदारांची फौज कृष्णेच्या पार होते न होते, तोंच टिपूच्या फौजेनें नरगुंदावर हल्ला करून तें शहर काबीज केलें. त्यामुळें नरगुंदकरांना शरण जावें लागलें. नरगुंदकरांना व त्यांच्या कुटुंबांतील मंडळींना टिपूनें कैद करून श्रीरंगपट्टणास नेलें. टिपूनें नरगुंदकरांच्या कन्येस आपल्या जनानखान्यांत

ओढलें, व बाकीच्या माणसांना अक्षय्य बंदींत ठेविलें. टिपूनें नानांचा सूड घेण्याकरतां नरगुंदकरांचा सर्वनाश केला. एवढ्यानें त्याचें समाधान झालें नाहीं. त्यानें पेशव्यांच्या मुलखांतही दंगे करण्यास सुरवात केली. त्यानें हिंदूवर शस्त्र धरलें. अनेक प्रकारें तो त्यांस छळूं लागला. कृष्णेच्या दक्षिण भागाच्या पुष्कळ हिंदूंना त्यानें धरलें व बलात्कारानें त्यानें त्यांच्या सुंता करवून त्यांस मुसलमान केलें. या भागांतील सुंदर सुंदर स्त्रिया पकडून नेऊन त्यांना टिपूनें आपला जनानखाना दाखविला. ब्राम्हणांवर जो कहर गुदरला तो तर सांगतांच येत नाहीं. असें सांगतात कीं, त्याच्या राक्षसी यातनांपासून मुक्त होण्याकरतां दोन हजार ब्राम्हणांनीं प्राणत्याग केला. [१]

१५. नानांच्या जिभेला खंडणीच्या डबोल्याच्या आमिषानें जर पाणी सुटलें नसतें, तर नरगुंदकर व इतर हिंदु जनता यांच्यावर एवढा प्रळय खास ओढवला नसता. याला नाना एकटेच जबाबदार आहेत. राघोबादादांचा नानांनीं सर्वस्वी नाश केल्यानंतर त्यांना दोनच बोटें स्वर्ग उरला होता. पेशवाईच्या सर्वाधिकारानें ते धुंद झाले होते. त्यांची दूरदृष्टि आंधळी झाली होती. बुराणउद्दीन यांचें सैन्य स्वस्थानीं परत जाईपर्यंत तरी नानांनीं परशुरामभाऊ यांस परत बोलवावयाचें नव्हतें. परंतु हा सामान्य व्यवहारही या वेळीं नानांनीं पाळला नाहीं. भाऊंचा सल्लाही त्यांनीं फोल टरपलाप्रमाणें उडवून लाविला. याचें एकच कारण कीं, या वेळीं नानांचा गर्व आणि त्यांच्या शहाणपणाची घमेंड पराकोटीला गेलेली होती. ह्मणूनच लोकांना वरील टिपूच्या प्रळयाला बळी पडावें लागलें.

१६. यानंतर टिपूनें कित्तुर संस्थानही बुडविलें. दोडवाड, खानापूर वगैरे मराठ्यांचीं नामांकित ठाणीं काबीज केलीं. बेळगांवच्या किल्ल्याखेरीज त्या प्रांतांतला सर्व मराठी मुलूख आतां टिपूच्या ताब्यांत

---

१ परशुरामभाऊंचें चरित्र पा ५०.

गेला. हा दंगा असाच वाढूं दिला तर शत्रूच्या आघाडीची फौज कृष्णा तीराकडे वळून मिरज प्रांतांतही तो उपद्रव सुरू करणार असा रंग दिसूं लागला. इतकें होईतों इ. स. १७८५ सालचा डिसेंबर महिना संपत आला.

१७. कर्नाटकांत अशा प्रकारें टिपूचा दंगा सुरू असतां, पुण्यास त्याच्या पारिपत्याची तजवीज नानांना करणें प्राप्त झालें होतें. नानांनीं होळकर, पटवर्धन, रास्ते वगैरे सरदारांस फौजा तयार करण्याबद्दल हुकूम सोडले होते. त्याप्रमाणें सर्व महाराष्ट्रभर फौजा तयार होऊं लागल्या होत्या. गणेशपंत बेहरे हे दहा हजार फौजेसह कृष्णातीरावर येऊन दाखल झाले. हरिपंत फडके व तुकोजी होळकर आपल्या आघाडीच्या दहा हजार फौजेनिशीं पंढरपुरावरून विजापुरास निघाले. नाना फडनविस पेशव्यांची मुख्य फौज घेऊन कर्नाटकाकडे निघाले. मुधोजी भोंसले आपल्या पंधरा हजार फौजेसह व पटवर्धन सरदार आपल्या पथकांसह येऊन नानांस मिळाले. निजाम आपल्या फौजेसह नानांस यादागिरी येथें भेटला. निजामानें आपली पंचेवीस हजार फौज हरिपंतांच्या हाताखालीं दिली. याप्रमाणें फौजेची जमवाजमव होतांच बदामी किल्लयाकडे यांचा मोर्चा वळला. नानांनीं इंग्रजांकडेही कुमक मिळण्याबद्दल पुष्कळ प्रयत्न करून पाहिला. परंतु टिपूचा व आपला तह झाला आहे, ह्मणून मदत देतां येत नाहीं असें त्यांचेकडून नानांना उत्तर मिळालें. अर्थात् त्यामुळें नानांचा नाइलाज झाला. पेशव्यांकडील या अफाट सेनासागरानें बदामीचा किल्ला वेढा देऊन लढविण्यास तारीख १ मे १७८६ रोजीं सुरवात केली, व तारीख २० मे रोजीं बदामीचा किल्ला काबीज केला. या लढाईंत मराठ्यांचें अतोनात नुकसान झालें. प्राणहानीही प्रचंड स्वरूपाची झाली. डोंगर पोंखरून उंदीर मिळविल्याचें श्रेय नानांना लाभलें.

१८. बदामीच्या लढाईची विजयमाळ नानांच्या गळ्यांत पडल्याबरोबर ते पुण्यास जाण्याकरतां निघाले. या टिपूवरील मोहिमेंत परशुरामभाऊंनीं प्रथमपासून उदासीनता धरली होती. नरगुंद प्रकरणांत नानांनीं आपणाला

तोंडघशीं पाडलें आणि त्यामुळें नरगुंदकरांचा नाश झाला ही गोष्ट त्यांच्या मनांत डांचत होती. [1] 'बुंदसे गया तो हौदसे नही आता' या म्हणी-प्रमाणें नरगुंद–प्रकरणाबद्दल नानांनीं आतां टिपूचा कितीही सूड घेण्याचा प्रयत्न केला तरी तो व्यर्थ आहे असें भाऊंना वाटत होतें. नाना व हरिपंत फडके यांनीं लष्करांत राहण्याबद्दल परशुरामभाऊंची परोपरीनें समजूत घातली. परंतु त्यांनीं आपला हट्ट सोडला नाहीं. ते लष्कर सोडून तासगां-वास निघून गेले. नाना पुण्यास गेले.

१९. नाना पुण्यास गेल्यावर मराठी फौजेचें सैनापत्य हरिपंत फडके यांचेकडे आलें. तुकोजी होळकर यांचें हरिपंतांस पूर्ण सहाय्य होतें. तुकोजी होळकर व गणेशपंत बेहरे हे चाळीस हजार फौजेनिशीं कित्तुर प्रांतांत सय्यद बुराण याच्या तोंडावर होते. त्यांनीं एक दोन महिने खटपट करून टिपूची धारवाड व सावनूर या प्रांतांतील ठाणीं उठवून लाविलीं. त्याचप्रमाणें हरिपंत फडक्यांनीं गजेंद्रगड व बहादुरबिंडा हे शत्रूचे किल्ले हस्तगत केले. टिपूनें अदवानीला वेढा घातला होता, परंतु तात्यांनीं तिकडे फौज पाठवून तो वेढा उठविला व तेथील नबाबाला सुरक्षितपणें बाहेर काढलें. पुढें पावसाळा अगदीं डोक्यावर आल्यामुळें तुंगभद्रेच्या पलीकडे आपला निभाव लागणार नाहीं, असें समजून मराठ्यांच्या फौजेनें आपला तळ हाल-विला व ते नदी उतरून अलीकडे आले. तेव्हां टिपूनें पुन्हां अदवानीला वेढा दिला व तें ठाणें काबीज केलें. या वेढ्याचें काम चालू असतांनाच टिपू ऐंशीं हजार फौज आपल्याबरोबर घेऊन एकाएकीं तुंगभद्रा नदी ओलांडून अली-कडे गलगनाथाजवळ आला; आणि त्यानें थेट सावनूरावर चाल केली. ही बातमी हरिपंतांस समजतांच ते नबाबाच्या रक्षणाकरतां तिकडे गेले. साव-नूरच्या आसपास टिपू व हरिपंत यांच्या सैन्यांचीं युद्धें पांच सहा महिन्यां-पर्यंत चालू होतीं. त्या अवधींत महत्वाचा असा कोणताच विजय हरिपंतांना मिळवितां आला नाहीं. उलट रणमैदानावर एकंदरींत टिपूच जास्त सामर्थ्यवान्

[1] खरेकृत ना. फ. च. पा. १२३.

ठरला. त्यानें मराठ्यांवर वेळोवेळीं छापे घालून त्यांचें फार नुकसान केलें. शिवाय हरिपंतांची एक लक्ष फौज जवळ असतां टिपूनें पहातां पहातां सावनूर काबीज केलें. नंतर त्यानें मराठ्यांपासून बहादुरबिंडाही हस्तगत केला.

२०. याप्रमाणें या लढाईंत टिपूची सरशी झाली असतां तो गर्वानें चढून मात्र गेला नाहीं. या वेळीं त्याच्याविरुद्ध इंग्रजी फौजेंत कांहीं हालचाली होऊं लागल्याचें त्याला समजल्यामुळें व पेशवे, निजाम आणि भोंसले यांचे-बरोबर युद्ध चालू ठेवणें त्याला थोडें जड वाटल्यामुळें, कांहीं देऊं व कांहीं घेऊं करून त्यानें मराठ्यांबरोबर तह करण्याचें ठरविलें. हा तह १७८७ च्या एप्रिल महिन्यांत झाला. त्यांतील कलमें अशीं होतीं:–(१) टिपूनें पंचेचाळीस लक्ष रुपये खंडणी पेशव्यांस द्यावी. (२) गजेंद्रगड, बदामी, नरगुंद व कित्तुर हीं संस्थानें व किल्ले मराठयांस द्यावे. आणि अदवानीचें संस्थान निजामास द्यावें. (३) सावनूरचें संस्थान त्या नबाबाला परत करावें (४) नरगुंद व कित्तुर येथील बंदिवानांची मुक्तता करावी. याप्रमाणें नाना फडन-विस यांची टिपूवरील पहिली मोहीम समाप्त झाली.

२१. या टिपूवरील मोहिमेंत नानांच्या मनाप्रमाणें त्याचें पारिपत्य झालें नाहीं. इंग्रजांच्या मदतीशिवाय तें होणें शक्य नाहीं असें आतां नानांना वाटूं लागलें होतें; म्हणून ते इंग्रजांच्या सहाय्याची वाट पहात होते. इ. स. १७९० च्या आरंभापासून याच्या चर्चेला पुणें, हैदराबाद व कलकत्ता या तिन्हीं ठिकाणीं सुरवात झाली. इंग्रजांना मिळवून घेण्याकरतां नाना उत्सुक झाले होते आणि त्यांनींच प्रथम हें बोलणें इंग्रजांबरोबर सुरू केलें. निजाम व पेशवे यांच्यातर्फे नाना व इंग्रजांतर्फे मिस्टर म्यालेट यांनीं पुणें दरबारीं टिपूवरील नवीन मोहिमेसंबंधीं करारमदार ठरविले ते असे–(१) मराठे, मोंगल व इंग्रज यांनीं एकसूत्रानें टिपूवर स्वारी करावी. (२) टिपूकडून खंडणी व मुलूख मिळेल तो तिघांनीं सारखा वांटून घ्यावा. (३) इंग्रजांना जरूर पडेल तेव्हां पेशवे व निजाम यांनीं त्यांस प्रत्येकीं दहा दहा हजार स्वारांची कुमक द्यावी.

---

१ खरेकृत ना. फ. च. पा. १२५.

या वीस हजार स्वारांचा खर्च इंग्रज सोसतील. पेशवे व निजाम यांपैकीं प्रत्येकाच्या दिमतीस इंग्रज आपलीं दोन पल्टणें देतील. पेशवे, व निजाम यांनीं आपापल्या दिमतीच्या पलटणांचा खर्च सोसावा. (४) टिपूशीं तह झाल्यानंतर पुनः कधीं काळीं तो सदरहु तीन सरकारांपैकीं कोणास उपद्रव देऊं लागेल तर तिघांनीं एकत्र होऊन त्याचें पारिपत्य करावें. याप्रमाणें तहाचीं कलमें ठरलीं. इ. स. १७८० मध्यें पेशवे, निजाम, हैदर व भोंसले यांचा इंग्रजांना हिंदुस्थानाबाहेर घालवून लावण्याबदलचा जो तह झाला त्याचीच ही सुधारून वाढविलेली आवृत्ति होती. फरक एवढाच कीं, त्या वेळीं इंग्रजांना हांकलून द्यावयाचें होतें आणि या प्रसंगीं टिपूचा नाश करून इंग्रजांची सत्ता वाढवावयाची होती व ती चिरकाल टिकूं द्यावयाची होती. या तहांतील चवथें कलम त्याच स्वरूपाचें आहे. शिवाय इंग्रजांना प्राप्तीचा वांटा हिस्सेरशीनें बरोबर मिळावयाचा असूनही पेशवे व निजाम यांच्या दिमतीला जीं इंग्रजी पलटणें येणार होतीं, त्याचा खर्चही परभारें पेशवे व निजाम यांच्यावर कलम तीनप्रमाणें पडणार होता, हें या तहांत विशेष होतें. इंग्रज, पेशवे व निजाम अशा त्रिवर्गांनीं एकचित्तानें टिपूवर स्वारी करण्याचें ठरलें असतां, पेशवे व निजाम यांच्या दिमतीला स्वतंत्रपणें दोन दोन पलटणें देऊन त्यांच्यावर त्याच्या खर्चाचा बोजा लादण्याचें कारण नव्हतें. परंतु त्यांत इंग्रजांचें एक स्वतंत्र राजकारण होतें. पुढच्या मनुष्याला ठेंच लागली म्हणजे मागचा शहाणा होतो, त्याप्रमाणें इंग्रज शहाणे झाले होते. मागें इ. स. १७८० मध्यें इंग्रजांना हांकलून देण्याचा जो पेशवे, निजाम, हैदर व भोंसले यांचा तह झाला व त्याप्रमाणें इंग्रजांबरोबर त्यांनीं लढाया दिल्या, त्यांत पेशव्यांनीं स्वतंत्रपणें सालबाईचा तह इंग्रजांबरोबर करून हैदराला जसें तोंडघशीं पाडलें, तसा प्रसंग आपल्यावर न यावा म्हणून व टिपूबरोबर होणाऱ्या लढाईंत यांचेकडून अंगचोरपणा न व्हावा ह्मणून, त्यांच्यावर नजर ठेवणेकरतां, त्यांच्याच खर्चानें हीं दोन दोन इंग्रजी पलटणें पेशवे व निजाम यांचेकडे देण्याचा करार झाला होता. या तहांत इंग्रजांनीं आपली बाजू पूर्ण दक्षतेनें

सुरक्षित करून घेतली होती, हें त्यांच्या चाणाक्षपणाचें लक्षण आहे. उलट पक्षीं इंग्रजांचें बूड मजबूत बसविण्याच्या दृष्टीनें नानांनीं पेशवे व निजाम अशा उभयतांच्या वर्तानें हीं तहाचीं कलमें मान्य केलीं, यावरून नानांचें भरींव राजकारण व पेशवे सरकार व निजाम सरकार यांची इभ्रत संभाळण्याचें त्यांचें शहाणपण किती विशाल होतें हें स्पष्ट दिसल्याशिवाय रहात नाहीं !

२२. टिपूवरील या मोहिमेकरतां फौजेची जमवाजमव करण्यासाठीं परशुरामभाऊ तासगांवास आले. कराराप्रमाणें इंग्रजांचीं दोन पलटणें सन १७९० च्या जून महिन्यांतच त्यांना त्या मुक्कामीं येऊन मिळालीं. या पलटणांवर कॅप्टन लिटल या नांवाचा अंमलदार होता. त्याच्या हाताखालीं सार्टोरियस, मॅकडोनेल, फ्रेडरिक, थॉमसन वगैरे दुसरे अधिकारी होते. नंतर पुण्याहून भाऊंना इषारा येतांच ते आपल्या व इंग्रजांच्या फौजेसह कृष्णा उतरून टिपूच्या मुलखांत घुसले. त्यांनीं जाडरहेबळी, नवी व जुनी हुबळी, मिश्रीकोट, दोडवाड वगैरे ठाणीं काबीज केलीं. नंतर त्यांनीं धारवाडच्या किल्ल्यास वेढा दिला. त्या किल्ल्यांत टिपूचा सरदार बद्री जमालखान हा पंधरा वीस हजार फौजेनिशीं राहिला होता. त्यानें सात महिनेपर्यंत किल्ल्याचा मोठ्या प्रयत्नानें बचाव केला. भाऊंनीं या किल्ल्याची चोहोंकडून नाकेबंदी केल्यामुळें शेवटीं तो किल्ला त्यांना सर करतां आला. या धारवाडच्या वेढ्याचें काम सुरू असतां भाऊंनीं तुंगभद्रेच्या अलीकडील सर्व मुलूख शत्रूपासून सोडवून घेतला. धारवाड घेतल्यानंतर दुसरेच दिवशीं भाऊ तुंगभद्रा नदी ओलांडून पलीकडे गेले. महिना पंधरा दिवसांत त्यांनीं संताबिदनूर, मायकोंडा, हुपेगिरी, चेनगिरी वगैरे ठाणीं काबीज केलीं. याप्रमाणें भाऊंनीं एकामागून एक शत्रूचीं ठाणीं घेण्याचा सपाटा सुरू केला.

२३. या वेळीं हिंदुधर्माचे बाबतींत परशुरामभाऊ यांचेकडून अत्यंत निंद्य अशी एक गोष्ट घडून आली. तुंगभद्रा नदीचे कांठीं शृंगेरी या नांवाचें एक पुण्यक्षेत्र असून त्या ठिकाणीं आद्य–शंकराचार्यांनीं स्थापन केलेला हिंदुधर्मपीठाचा मठ आहे. या परशुरामभाऊंच्या स्वारींत रघुनाथराव पटवर्धन कुरुंद-

वाडकर हे होते. यांच्या फौजेंत लमाण व पेंढारी हे लोक होते. त्यांनीं या वेळीं शंकराचार्य स्वामींचा श्रृंगेरी हा गांव लुटला. " स्वामींचा दंड कमंडलु आदिकरून लुटला. कांहीं बाकी राहिली नाहीं. बायका सुद्धां बाटविल्या. स्वामींच्या मूर्ति, देव, लिंग आदिकरून लुटलें. हत्ती, पागा झाडून लमाणांनीं आणली. " ती बातमी परशुरामभाऊंस कळतांच त्यांनीं पागा पाठवून लुटारू धरून आणिले. त्यांची चौकशी करून त्यांस शिक्षा करावी व लुटीचा माल स्वामींचा स्वामीकडे पोंचता करावा अशा प्रयत्नांत भाऊ होते. परंतु हे लुटारू लमाणी लोक रघुनाथरावांच्या फौजेपैकीं असल्यानें त्यांच्या गुन्ह्याची चौकशी आपण करणार म्हणून त्या लोकांना परशुरामभाऊंच्या ताब्यांतून रघुनाथराव यांनीं मागवून घेतलें. परंतु गुन्हेगारांस त्यांनीं चौकशी करून शिक्षा केली नाहीं. श्रीशंकराचार्य स्वामींनीं पटवर्धन ब्राम्हणांकडून झालेल्या या हिंदुधर्मबाह्य निंद्य-कर्माबद्दल उपोषणें केलीं. तथापि या रणशूर पटवर्धन सरदारांचे मनावर त्याचा कोणत्याही प्रकारचा परिणाम झाला नाहीं. स्वामींचा कोणताही माल त्यांना पटवर्धनांकडून परत मिळाला नाहीं. पटवर्धन सरदारांकडे आपली कोणतीच दाद लागत नाहीं असें पाहून शंकराचार्यांनीं पुण्यास पेशव्यांकडे आपली लूट भरून मिळावी म्हणून वारंवार पत्रें लिहिलीं. नानांनीं परशुरामभाऊ यांना असें कळविलें कीं, रघुनाथराव यांनीं आपल्या पदरचे लाख पन्नास हजार रुपये भरावे लागले तरी भरून व लुटारू लोकांचें पारिपत्य करून स्वामींची मर्जी प्रसन्न करावी. " स्वामींचा मठ लुटला याजमुळें स्वामी उपोषणें करितात, हें राज्यास बहुत वाईट. स्वामींचा रोष ठीक नाहीं. याजकरितां लिहविलें व कारकूनही सरकारचे गेले आहेत. तरी दादांनीं (रघुनाथराव कुरुंदवाडकर यांनीं) येविसीं जिकडे तिकडे पत्ता लागेल तो भाऊंस सांगावा. बेमुरवत होऊन स्वामींचा फडशा होऊन स्वामींचा संतोष होई आणि रोष जाई तें करावें. " यावर कुरुंदवाडकर यांनीं असें उत्तर लिहिलें कीं " केवळ आम-च्याच लोकांनीं मठ लुटला असें नाहीं. स्वामी आमचेंच नांव कां घेतात

हें कळत नाहीं. इतर चार सरदारांकडचे लुटारू गेले होते, त्यांत आमचेही होते. इतरांनीं फडशा केला म्हणजे आम्हीही करूं." याप्रमाणें रघुनाथराव यांनीं श्रृंगेरी मठ लुटल्याचें आपल्या अंगाबाहेर बहुतेक काढून टाकलें. या बाबतींत पत्रोपत्रीं पेशव्यांकडून कांहीं दाद मिळत नाहीं असें पाहून, श्रीशंकराचार्यस्वामी स्वतः पुण्यास गेले. त्यांनीं नाना फडनविस व पेशवे यांच्या दारीं पुष्कळ त्रागा केला, परंतु त्यांची दाद लागली नाहीं.'[1]

२४. या वेळीं श्रृंगेरीचा मठ लुटून, शंकराचार्यांच्या मूर्ति, देव, लिंग दंड, कमंडलुसहीत सर्वस्वाची लूटमार केली, बायका बाटविल्या, ब्राह्मणांना जखमी केलें हें हिंदुधर्माला, हिंदूलोकांना व त्यांतल्या त्यांत ब्राह्मण वर्गाला लांछन आणणारें कृत्य झालें. याला प्रामुख्यानें रघुनाथराव, परशुरामभाऊ व नाना हे तीन ब्राह्मण उघड उघड जबाबदार आहेत. हे तिघे या बाबतींत कसे गुन्हेगार ठरतात हें येथें पहाणें जरूर आहे.

२५. या बाबतींत पटवर्धन सरदारांचे वकील या नात्यानें खरेशास्त्री हे त्यांची बाजू अशी मांडतात कीं, "पूर्वींच्या काळच्या लष्कराबरोबर लुटारू लोक अनिवार असत. या लुटारू लोकांच्या झुंडींनीं केलेल्या अन्यायाबद्दल त्या त्या सैन्याच्या मुख्य सरदारास जबाबदार धरणें सर्वांशीं योग्य नाहीं." म्हणजे थोड्या अंशीं तरी पटवर्धन सरदार जबाबदार आहेत असें खरे शास्त्र्यांनाही मान्य आहे. आतां या प्रकरणीं पटवर्धन सरदार हे जबाबदार अर्थात् गुन्हेगार खरे; पण ते किती अंशांनीं आहेत एवढेंच येथें ठरवावयाचें आहे. या बाबतींत प्रत्यक्ष असा लेखी पुरावा आहे. तो खरेशास्त्र्यांना माहीत असूनही त्यांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. या बाबतींत पटवर्धनांचींच दोन पत्रें आहेत; व तीं पटवर्धन दप्तरांतूनच बाहेर निघालीं आहेत. या पत्रांवरून श्रृंगेरीमठासंबंधीं खरी हकीकत काय होती हें कळून येतें. तें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं.

---

१ खरेकृत ना. च. पा. १२९.

पत्र पहिलें.

२६. चैत्र वद्य ५ तारीख २३ माहे एप्रिल सन १७९१. हें पत्र निळकंठ आप्पाजीनें परशुरामभाऊंचे लष्करांतून मौजे लोकिकेरे, तालुका चित्रदुर्ग, येथून मिरजेस बाळासाहेब पटवर्धन यांस लिहिलें आहे.[1]

"लमाण व पेंढारी यांणीं श्रीमंत राजश्री दादासाहेब (रघुनाथराव कुरुंदवाडकर) यांच्या लष्करांतून जाऊन श्रृंगेरीकर स्वामींचा मठ लुटून हत्ती वगैरे माल लाखों रुपयांचा आणिला तो काल येथील मुक्कामापासून एका कोसाच्या अंतऱ्यानें नेला. तो कोणी कोणी पाहून आले. त्याज-वरून त्याचे जप्तीविशीं दादांस पत्र पाठविलें आहे."

पत्र दुसरें.

२७. चैत्र वद्य १२ तारीख २९ माहे एप्रिल सन १७९१. हेंही पत्र निलकंठ आप्पाजीनें लष्करांतून मिरजेस बाळासाहेबांस पाठ-विलेलें आहे.

"श्रृंगेरीचा मठ लुटारी यांणीं लुटून आणिला त्याचा मजकूर पेशजी लिहिलाच आहे. त्यास लुटारी यांस चौकी देऊन त्यांजवळ हत्ती व जंबुरा मठांतील होता तो व लुटारी यांतील प्रमुख दहा वीस असाम्या धरून आणिल्या. पुढें चौकशी व्हावी-इतक्यांत श्रीमंत राजश्री दादा-साहेब यांची चिठ्ठी आली जे, लुटारी आमचे आह्मांकडे सामानसुद्धां पाठवून द्यावे. त्याजवरून हत्ती वगैरे आणिले ते त्यांजकडे लावून दिले. व चौकी उठविली. मठाधिकारी कोणी आल्यास त्याचा जावसाल करून देवावा लागेल असें उत्तर लिहून दिलें. हत्तीवरील महाताच्या सांगण्यांत बायकांचा नाश फार जाहला व देव-देवतार्चन वगैरे माल बहुत आला. ब्राम्हण बहुत जायां जखमी झाले असें आहे. तिकडून (मठांतून) अद्यापि कोणी आलें नाहीं."

---

१ ऐ. ले. सं पान ४४७४, पत्र नं. ३३३६.

२८. याप्रमाणें हीं दोन पत्रें पटवर्धनांचींच आहेत. यांतील मजकूर पहातां रघुनाथराव यांच्याच लोकांनीं श्रृंगेरी हा मठ लुटला व दुसऱ्या कोणत्याही सरदारांच्या लोकांनीं तो लुटला नाहीं हें सिद्ध होतें. शिवाय ते लुटारू लोक व त्यांनीं आणलेली सर्व लूटही परशुरामभाऊ यांच्या लोकांनीं पकडून आपल्या ताब्यांतही घेतली होती. पण रघुनाथराव यांच्या पत्रावरून कोणी मठाधिकारी आल्यास त्यास तें परत द्यावें लागेल अशी ताकीद देऊन परशुरामभाऊंनीं लुटून आणलेली सर्व मालमत्ता व लुटारू लोक त्यांच्या स्वाधीन केले होते अशी सर्व हकीकत खरी असतां नानांच्या पत्रास रघुनाथराव यांनीं "केवळ आमच्याच लोकांनीं मठ लुटला असें नाहीं. स्वामी आमचेंच नांव कां घेतात हें कळत नाहीं. इतर चार सरदारांकडचे लुटारू गेले होते, त्यांत आमचेही होते. इतरांनीं फडशा केला म्हणजे आम्हींही करूं." अशा प्रकारचें निव्वळ खोटें व उडवाउडवीचें उत्तर पाठविलें हें खरें ठरतें. शेवटीं नानांच्या कोर्टांत सत्य भाषणाचा व सदाचरणाचा उपदेश करणारे श्री शंकराचार्य खोटे ठरून रघुनाथराव व परशुरामभाऊ हे सत्याचे पुतळे ठरतात व श्रीशंकराचार्य यांची फिर्याद हिंदुधर्माभिमानी समजल्या जाणाऱ्या नानांच्या कोर्टांतून खर्चासह काढून टाकण्यांत येतें हें गौड-बंगाल काय असावें ?

२९. पटवर्धनांनीं हिंदुधर्माविरुद्ध आचरण करून, धर्मगुरूंना सर्वस्वी नागवून, त्यांच्या फिर्यादीअर्जाचा असा जो धुव्वा उडविला आणि श्री शंकराचार्यांच्या आद्यपीठावरील धर्मगुरूंची जी अशी जाणून बुजून मान-खंडना व अवहेलना केली, त्यांत कांहीं तरी पटवर्धन सरदारांची सूडाची बुद्धि होती असेंच अनुमान निघतें. पेशवाईंत नानांची चलती सुरू झाल्यापासून नाना व घाशीराम कोतवाल हे जसे एकरूप बनले होते तसेच कांहीं कालपर्यंत नाना, त्रिंबकरावमामा, हरिपंत फडके व पटवर्धन सरदार हेही एका आत्म्याचीं चार शकलें याप्रमाणें झाले

होते. राघोबादादांची सत्ता लोपूं लागल्यानंतर व नानांच्या सत्तेचा उदय झाल्यापासून वेदशास्त्रसंपन्न ब्राम्हण, शास्त्री, पंडित व ठिकठिकाणच्या हिंदुधर्म–पीठावरील आचार्य व मठ यांच्यावर ब्राम्हण सेनापतींकडून व ब्राम्हणशासित राजदंडाकडून वरचेवर निरनिराळ्या प्रकारांनीं वरवंटा फिरला आहे. त्याचे थोडे मासले स्मरणाकरतां देणें भाग आहे.

३०. (१) इ. स. १७७१ ज्या मार्च महिन्यांत हैदरवरील तिसऱ्या मोहिमेंत त्रिंबकरावमामा यांच्या हाताखालीं निळकंठराव, परशुरामभाऊ व वामनराव हे पटवर्धन सरदार होते. मोती तलावाच्या लढाईंत पटवर्धन सरदारांनीं आपल्या पराक्रमाची कमाल केली होती. दुसऱ्या दिवशीं मेलकोट्यावर हल्ला झाला व तें ठाणें मराठ्यांनीं घेतलें. त्यावेळीं तेथें लूट व जाळपोळ होण्याची पराकाष्ठा झाली. मेलकोटा हें गांव विशिष्टाद्वैत मताचें आदिस्थान असून त्या मताचे प्रवर्तक रामानुजाचार्य पूर्वीं तेथें रहात होते. अर्थात् त्या मताचे सर्व हिंदू लोक हें गांव अत्यंत पवित्र क्षेत्र आहे असें मानतात. तेथें विष्णूचें एक पुरातन देवस्थान आहे. त्यास त्या प्रांतीं चिलपिल्लराय असें नांव आहे. मराठ्यांनीं याप्रसंगीं तेथील मनुष्यांची निर्दयपणें कत्तल केली. ब्राम्हण असो कीं, मुसलमान असो, लुटण्यांत, प्राण घेण्यांत किंवा नासधूस करण्यांत मराठ्यांनीं धर्माचा किंवा जातीचा कांहींएक भेद ठेवला नाहीं. देवाचे रथ मोठमोठे होते. ते जाळून त्याचे खिळे-मोळे देखील काढून लष्कराच्या लोकांनीं नेले. रथांस आग लागतांच ती भडकून चिलपिल्लरायाचे देवालयही जळून राखरांगोळी झाली. एकंदरींत त्रिंबकरावमामा पेठे व वामनराव आणि परशुरामभाऊ पटवर्धन–सरदार यांच्या नेतृत्वाखालीं-मेलकोट्याच्या रामानुजाचार्यांचा मठ लुटला जाऊन त्या गांवाची, तेथील प्रजाजनांची व तेथील पवित्र देवालयाची वरीलप्रमाणें अवस्था झाली.

३१. (२) इ. स. १७७५ मध्यें हरिपंत फडक्यांच्या लष्करानें (त्यांत पटवर्धन सरदार यांचेंही लष्कर होतें.) द्वारकेचा मठ लुटला.

३२. (३) इ. स १७७६ च्या मार्च महिन्यांत कोन्हेरराव व पांडुरंगराव पटवर्धन यांनीं करवीरच्या श्रीशंकराचार्यांचा मठ लुटला. त्या मठांत हजारों ब्राह्मण आपापलें वित्त घेऊन येऊन राहिले होते. त्या सर्वांस दरोबस्त लुटलें. कित्येक ब्राम्हण, बायका, गुरें वगैरे गोळयांच्या वर्षावाला बळी पडलीं. अशा प्रकारें करवीरच्या श्रीशंकराचार्यांच्या मठावर पटवर्धन ब्राह्मण सरदारांनीं आपलें शौर्य गाजविलें.

३३. (४) इ. स. १७९१ मध्यें श्रृंगेरीमठाबरोबर कुडलगी येथीलही मठ परशुरामभाऊंनीं लुटून त्याचा विध्वंस केला. सैन्यावरचे मुख्य अधिकारी ब्राम्हण आहेत, ते स्वामींच्या मठाला तरी उपद्रव लागूं देणार नाहींत; तेथें जाऊन आसरा घेतल्यास आपल्या वित्ताचा व प्राणाचा बचाव होईल, अशा आशेनें भोंवतालच्या प्रांतांतल्या धनिकांनीं आपापलें वित्त व कुटुंब घेऊन स्वामींच्या मठांत यावें; स्वामींनींही सैन्याधिकारी ब्राह्मण आहेत, पेशव्यांच्या ब्राम्हणी राज्यांतले आहेत, या भरंवशावर त्या लोकांना छातीला हात लावून अभय द्यावें व शेवटीं श्रीशंकराचार्यांसह त्या लोकांनीं आपल्या मान-धन-प्राणांस मुकावें असा प्रकार प्रत्येक वेळीं झाला. पेशवाईच्या नानांच्या कारभारांतील हिंदुधर्मासंबंधींचा हा इतिहास निरंतर चिरंजीव राहील यांत संशय नाहीं. स्वामींचे मठ लुटून त्यांना ‘ त्राहि भगवन् ’ करून सोडण्याचें पटवर्धन सरदारांनीं हातांत जें कंकण बांधलें होतें, त्याचें कारण तरी काय असावें हें पहाणें प्रस्तुत विषयाला सोडून होणार नाहीं.

३४. परशुरामभाऊ यांना बयाबाई या नांवाची मुलगी होती. तिचा जन्म इ. स. १७६१ मध्यें झाला. तिचें लग्न इ. स. १७६८ मध्यें बाबूजी नाईक बारामतीकर यांच्या मुलाबरोबर झालें. परंतु तिचा नवरा त्याच वर्षीं मरण पावला. त्या वेळीं बयाबाईचें वय अवघें आठ वर्षांचें

होतें. पटवर्धन सरदारांच्या मनांत तिचा पुनर्विवाह करावयाचा होता. परंतु त्या वेळीं पुनर्विवाहाची रूढि नव्हती. अर्थात् ठिकठिकाणच्या शंकराचार्यांकडून बयाबाईच्या पुनर्विवाहाला पटवर्धन सरदारांनीं धर्माची संमति विचारली असेल. परंतु त्यांनीं ती दिली नसावी असें दिसतें. शेवटीं काशीहून शास्त्रार्थ आणवून रामशास्त्री यांनीं बयाबाईच्या पुनर्विवाहास संमति दिली. परंतु या गोष्टीला बराच काल लोटला. इ. स. १७९० च्या सुमारास या पुनर्विवाहास रामशास्त्र्यांची संमति मिळाली असें कांहीं जणांचें मत आहे. परंतु या वेळीं बयाबाईचें लग्न होऊन बावीस वर्षें लोटलीं होतीं. शंकराचार्यांनीं बयाबाईच्या पुनर्विवाहास संमति न दिल्यामुळें तिच्या जीविताचा त्यांनीं नाश केला असा अपत्यप्रेमाच्या कळवळयाचा पीळ पराक्रमी अशा पटवर्धन–सरदारांच्या अंतःकरणाला पडला असावा व त्यामुळें या धर्मगुरू ह्मणविणाऱ्या मठाधिपती स्वामींबद्दल त्यांच्या मनांत सूडाची भावना उत्पन्न झाली असावी असें दिसतें. त्या सूडाच्या वृत्तींत पटवर्धन सरदार असल्यामुळें त्यांना आपण हिंदुधर्माची विटंबना करतों आहों याची जाणीव राहिली नसावी असें दिसतें. कांहींही कारण असो. पण ब्राम्हणी राज्यांत वेदशास्त्रसंपन्न अशा ब्राम्हणांचें जीवित कांहीं वर्षेंपर्यंत धोक्याचें होतें एवढी मात्र गोष्ट सत्य दिसते. असलीं उदाहरणें हिंदुधर्माला व त्यांतल्यात्यांत ब्राम्हण राज्यकर्त्यांना खात्रीनें कालिमा लावणारीं आहेत.

३५. परशुरामभाऊ टिपूच्या मुलखांत श्रृंगेरीवरून पुढें लूटमार करीत चालले. इकडे हरिपंत फडके पुण्याहून दहा पंधरा हजार फौज घेऊन निघाले ते विजापूरमार्गें कर्नाटकांत चालले असतां वाटेंत पानगल येथें निजामाची व त्यांची भेट झाली. नंतर ते उभयतां कर्नुळावरून श्रीरंगपट्टणाकडे निघाले. श्रीरंगपट्टणापासून आठ दहा मैलांवर मेलकोट्याजवळ हरिपंत व परशुरामभाऊ यांचीं लष्करें एकत्र झालीं. याप्रमाणें जमिनीवरून पेशव्यांच्या सैन्याच्या हालचाली सुरू असतां पेशव्यांचें आरमार

विजयदुर्गाहून निघून कारवार प्रांतावर टिपूच्या हद्दींत घुसून त्यांनीं त्या प्रांतांतील समुद्रावरील टिपूचा अंमल उठवून लाविला.

३६. इकडे पेशवे आपल्या परीनें प्रगती करीत चालले होते. तिकडे मोंगल व इंग्रज यांनींही बरीच आघाडी मारली. मोंगलांनीं कोप्पळ व बहादुरबिंडा हे किल्ले घेतले आणि नंतर ते इंग्रजांना येऊन सामील झाले. बिदनूर, बंगलोर व श्रीरंगपट्टण हीं स्थळें अजिंक्य आहेत, तेव्हां तीं जिंकण्याला निदान वर्ष सहा महिने तरी लागतील, असा पेशवे व मोंगल यांचा अंदाज होता, परंतु इंग्रजांनीं टिपूचा पराभव करून बिदनूर काबीज केलें, एवढेंच नव्हे तर टिपूचें ऐंशी हजार सैन्य असतां, इंग्रजांनीं पहातां पहातां बंगलोरही हस्तगत केलें व ते श्रीरंगपट्टणाकडे वळले. ही इंग्रजांची धडाडी पाहून पुणें व हैदराबाद येथील दरबार आश्चर्यचकित झाले. पुढें मोंगल व इंग्रज पट्टणावर चालून गेले. परंतु टिपूनें पट्टणासभोंवतीचा मुलुख ओस पाडला, पाणी खराब करून टाकलें आणि धान्य व वैरण यांचा नाश करून टाकला. शिवाय झाडें तोडून रस्त्यावर आडवीं तिडवीं टाकून शक्य तेवढे अडथळे उत्पन्न केले. तेव्हां लॉर्ड कॉर्नवॉलीस यानें श्रीरंगपट्टणास वेढा घालण्याचा आपला विचार सोडून दिला व ते परत फिरले. त्यांच्या फौजेस परत बंगलोरास येईपर्यंत फार हाल सोसावे लागले. तेथें इंग्रज, निजाम व हरिपंत फडके हे पावसाळ्यामुळें तळ देऊन राहिले. परशुरामभाऊ चित्रदुर्गास छावणीस राहिले.

३७. इ. स. १७९२ चे फेब्रुवारी महिन्यांत इंग्रज, निजाम व पेशवे यांच्या फौजेनें श्रीरंगपट्टणास चारी बाजूंनीं वेढा दिला. तेव्हां या तीन सरकारांपुढें आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून, टिपू तहास तयार झाला. त्या तहाचीं कलमें खालीं दिल्याप्रमाणें होतीं. (१) टिपूबरोबरच्या या युद्धप्रसंगाच्या अगोदर टिपूचा जेवढा मुलूख होता त्याचा अर्धा हिस्सा टिपूनें इंग्रज, निजाम व पेशवे या सरकारांस द्यावा. (२) लढाईच्या खर्चाबद्दल एक कोटी पासष्ट लक्ष

रुपये तूर्त रोकड द्यावे. याप्रमाणें तह झाल्यावर टिपूकडून आलेला पैसा तिघांनीं वाटून घेतला. टिपूच्या अर्ध्या राज्याची वांटणी करून घेतल्यानंतर प्रत्येकाच्या वांट्याला चाळीस चाळीस लक्ष उत्पन्नाचा विभाग आला. पेशव्यांस वर्धा नदी व कृष्णा या दोन नद्यांमधील बहुतेक मुलुख आणि बिलारीपाशीं सोंडूर नामें खेडें आहे तो मुलुख मिळाला. निजामास घुटी व खरपा या दोन जागा व त्यांच्यामधील मुलुख आला. त्याची पश्चिम मर्यादा मुद्गल व कनकगिरी व कोप्पळ ही होती. इंग्रजांस दिंडिगाळ, बारा महाल, कुर्ग व मलबार हा मुलुख मिळाला. याप्रमाणें मुलुखाची व पैशाची वांटणी झाल्यानंतर तीनही सरकारें स्व-स्व-स्थानीं निघून गेलीं. नानांनीं सालबाईच्या तहाच्या अगोदर इंग्रजांना हिंदुस्थानाबाहेर घालविण्याविषयींच्या केलेल्या मसलतींतील आपला एक दोस्त अशा प्रकारें जमीनदोस्त करून इंग्रजांचें राज्य वाढविण्यास हातभार लावला. हें मित्रनाशाचें दिव्य कृत्य करून नानांनीं फारच मोठें पुण्य आपल्या पदरीं बांधून घेतलें असें कोणताही त्रयस्थ इतिहासवाचक म्हटल्यावांचून राहणार नाहीं!

प्रकरण २५ वें.

नानांचें प्रियपात्र घाशीराम.

इ. स. १७७९ ते इ. स. १७९१.

१ सवाईमाधवराव पेशवे हे साक्षात् विष्णूचे अवतार असून ते राघोबादादा आदिकरून पेशव्यांच्या राज्यांतील सर्व राक्षसांचें निर्मूलन करण्याकरतां अवतरले, असें नानांच्या प्रसिद्धी-खात्याचे अध्वर्यू पुरुषोत्तम दाजी हे जगजाहीर करतात.—२ राघोबादादा, सखारामबापू आदिकरून सर्व राक्षसांचा संहार होऊन पुणें नगरी निष्कंटक झाल्यानंतर विष्णूचे अवतार सवाईमाधवराव यांचें आगमन पुरंदराहून पुण्य नगरींतील शनिवारवाड्यांत होतें. त्यांचें उपनयन व विवाह हे सोहाळे नाना मोठ्या थाटानें व उत्साहानें करतात.—३ सवाईमाधवरावांच्या अवताराची कृष्ण अवताराशीं तुलना. अवतारी सवाईमाधवरावांच्या संरक्षणाचा बंदोबस्त नाना किती कडेकोट पद्धतीनें करतात याचें दिग्दर्शन.—४ मानीव कृष्ण अवतार सवाईमाधवराव यांच्या बाललीलांचे कोड पुरविण्याकरतां नानाविध पशुपक्ष्यांदि साधनांचा नाना संग्रह करतात. सवाईमाधवरावांस नाना स्वर्गतुल्य सुखांत वाढवितात.—५ घाशीराम कोतवाल कोण होता ? त्याची सुंदर मुलगी ललितागौरी व नाना फडनविस यांचा संबंध कशा प्रकारचा होता, याविषयीं इतिहाससंग्रह पुस्तक १ लें व पुणें ग्याझीटियर यांतील माहिती.—६ पुण्यांतील कोतवालीसंबंधीं घाशीराम कोतवालपर्यंतची माहिती.—७ कोतवालाच्या अधिकाराची रूपरेषा.—८ घाशीराम कोतवालाच्या खात्याचा सरकारी खर्च व त्याची शिबंदी याची माहिती.—९ घाशीरामाचें अधिष्ठान नाना हे होतें. पुण्यांत घाशीरामानें भयंकर जुलूम केला म्हणून 'घाशीरामी जुलूम' म्हणण्याची प्रथा; नाना मात्र त्याच्या बहुमोल कामगिरीबद्दल वेळोवेळीं त्याला बक्षिशी देतात.—१० घाशीरामाच्या आसुरी स्वभावाचें वर्णन.—११ श्रावण मासांतील सवाईमाधवरावांचा दानधर्म.—१२ श्रावण महिन्याची दक्षिणा घेऊन स्वदेशीं परत जाणाऱ्या तेलंगी ब्राह्मणांस घाशीराम लुटतो व त्यांस एका खोलींत कोंडून घालून त्यांची हत्या करतो. हें कृत्य मानाजी फाकडे यांस समजतें व ते या अघोर कृत्याची बातमी सवा-

माधवरावांस देतात.—१३ सवाईमाधवरावांच्या आज्ञेप्रमाणें या प्रकरणाची चौकशी करण्याकरतां नाना घाशीरामास बोलावितात. घाशीरामाचें कृत्य छपविण्याकरतां प्रेतें जाळून पुरावा नष्ट करण्याचा हुकूम नाना घाशीरामास देतात. त्यास मानाजी विरोध करतात.—१४ शनिवारवाड्याभोंवतीं पुण्यांतील लहान मोठ्या हजारों ब्राम्हणांचा सत्याग्रह. घाशीराम नानांच्या पाठीशीं दडतो. सवाई-माधवरावांची मर्जी जात चालली व ते अगदीं निकराला आलेले पाहून नाना घाशीरामास त्यांचे स्वाधीन करतात.—१५ घाशीरामाच्या निंद्य कृत्याबद्दल सवाई-माधवराव चौकशी करतात. त्यांना नानांच्या मंत्राप्रमाणें घाशीराम उत्तरें देतो. पुण्याच्या ब्राम्हणांकडून नानांची व त्यांचे हस्तक अय्याशास्त्री यांची विटंबना. नानांच्या वाड्यास ब्राम्हणांचा गराडा.—१६ सवाईमाधवरावांच्या आज्ञेप्रमाणें शनिवारवाड्यास गराडा देऊन रात्रभर सर्व ब्राम्हण राहिले.—१७ सवाई-माधवराव घाशीरामास गुन्हेगार ठरवितात. त्याची सर्व पुणें शहरांत उंटावरून धिंड निघते. सवाईमाधवरावांच्या आज्ञेप्रमाणें अखेरच्या पारिपत्याकरतां गुल-टेंकडीवर घाशीरामास ब्राम्हण-समुदायाच्या स्वाधीन केलें जातें. घाशीरामास दगडांखालीं चेंचून ब्राम्हण त्यास ठार मारतात. घाशीरामाच्या कटांतील लोकां-सही निरनिराळीं शासनें मिळतात.—१८ घाशीराम-प्रहसनांतील पात्रांच्या भूमिका.—१९ राघोबादादांचे एक सरदार मानाजीराव फाकडे यांची दिव्य धर्म-भावना व त्यांचा प्रताप.—२० घाशीराम कोतवालाच्या बाबतींत पुण्याच्या ब्रम्ह-वृंदाची सूडातिरेकाची भावना कां होती?—२१ खानदानीवर प्रकाश पाडणारा सवाईमाधवरावांचा स्वभाव.—२२ सवाईमाधवरावांच्या ठिकाणीं पेशवे घरा-ण्यांतील रक्ताचा दिसून येणारा प्रभाव.—२३ घाशीराम कोतवाल नानांचें प्रिय पात्र. घाशीरामाच्या दुष्कृत्यांस नाना जबाबदार नाहींत, अशी खरेशास्त्र्यांची नानांचे तर्फे वकीली. त्यांच्या वकीलींतील मुद्दे.—२४ खरेशास्त्र्यांचा नाना निर्दोषी असल्याबद्दलचा मुद्दा खोटा कसा याचें स्पष्टीकरण.—२५ घाशीराम कोतवालाइतकेच नाना फडनविस या बाबतींत गुन्हेगार कसे होते याचा खुलासा.—२६ नाना घाशीरामी कसे बनले होते?—२७ नाना फडनविस नवकोट नारायण कसे झाले? घाशीरामाच्या वधांतून पेशवाईच्या नाशाचा उगम.

१. पेशवाईचा काळ विशेष भावनाप्रधान होता. जसा काळ असेल त्याप्रमाणें त्याचा फायदा घेणें हेंच मुत्सद्देगिरीचें लक्षण असतें. बारभाई हें एक मुत्सद्यांचें मंडळ होतें. पेशवाईंतील प्रजाजनांचें चित्त आपल्याकडे ओढलें जावें याकरतां या मंडळाला योजना केलीच पाहिजे होती. त्याकरतां गंगाबाईला पुरंदरावर नेऊन ठेवल्यानंतर तिच्या पोटीं शत्रूच्या निर्दलनाकरितां साक्षात् विष्णु अवतार घेणार आहेत, अशा अफवा उठविण्यास सुरवात झाली. या जाहीर खात्याचे प्रवर्तक नानांचे हस्तक, पुरुषोत्तम दाजी हे होते. त्यांनीं कागदोपत्रीं लिहून विष्णूचा अवतार म्हणून सवाईमाधवरावांची पेशव्यांच्या राज्यांत ख्याति पसरविली. श्रीमंतांच्या पुण्यप्रभावामुळें गर्भपाताचीं औषधें निरुपयोगी ठरलीं, मारेकऱ्यांच्या तरवारी बोथट झाल्या, देशांत अनेक बंडें व दंगे उद्भवले होते, परंतु त्या सर्वांचा बींमोड झाला; हे सर्व चमत्कार सवाईमाधवराव हे अवतारी पुरुष असल्यामुळें घडून आले व त्यांच्या जन्मानंतर त्यांची तुलना 'श्रीकृष्ण' परमात्म्याबरोबर होऊं लागली. सवाईमाधवराव हे 'श्रीकृष्ण' बनल्याबरोबर राघोबादादांना 'कंस' मामाची भूमिका मिळाली, व त्या दृष्टीनें प्रजाजनांच्या भावनेचा ओघ पुरंदर गडावरून वाहूं लागला आणि तो गंगेप्रमाणें सर्वत्र पेशव्यांच्या राज्यांत पसरला. पुरुषोत्तम दाजीच्या भगीरथ प्रयत्नांची ही भागीरथी होती.

२. इ. स. १७७९ च्या मे महिन्यांत (शके १७०१ वैशाख शु० ५ रोजीं) पुण्यास पर्वतीवर श्रीमंत सवाईमाधवराव यांचा व्रतबंध मोठ्या थाटानें करण्यांत आला. श्रीमंतांना पुरंदराहून पुण्यांत आणण्याचे अगोदर, इंग्रजांबरोबर वडगांवचा तह होऊन राघोबादादांची शरणागती व पेशवाईचा राजीनामा मिळून त्यांची झांशीस रवानगी झाली होती. अर्थात् कंसमामाचा श्रीकृष्णानें वध केल्याप्रमाणें झालेंच होतें. सखारामबापूंनाही कैद करून डोंगरी किल्ल्यावर नेऊन टाकल्यामुळें सर्व राक्षसांचा आतां निःपात झाला असें वाटून निष्कंटक अशा पुणें नगरींत अवतारी

सवाईमाधवरात्र यांचें आगमन होऊन, तेथें त्यांचा व्रतबंध व्हावा असें नानांना वाटणें स्वाभाविक होतें. त्याप्रमाणें मोठ्या उत्साहानें तो समारंभ साजरा झाला. पुढें इ. स. १७८३ च्या फेब्रुवारी महिन्यांत त्यांचें लग्नही करण्यांत आलें. हाही समारंभ अतर्क्य असाच झाला. नानांची पुणें नगरी म्हणजे श्रीकृष्णाचें गोकुळच झालें होतें. प्रत्यक्ष श्रीकृष्ण अवतार-रूपानें पुण्यांत वावरूं लागल्यामुळें तेथें वाण कोणतीच पडणारी नव्हती. शिवाय नानांना श्रीकृष्णाच्या पालक-बापाचा म्हणजे नंदाचा मान मिळाला होता. मग पुणें नगरींत आनंदाला कोठून वाण पडणार?

३. लोकांना[1] श्रीमंतांच्या जन्माचें कृष्णावताराशीं साम्य दिसूं लागल्यामुळें त्यांना पुण्यास आणल्यावर त्यांचें संरक्षणही तशाच डौलानें झालें पाहिजे, म्हणून नानांनीं त्यांच्या रक्षणाचा कडेकोट बंदोबस्त केला. "तीस[2] हजार स्वार हुजरातेचा, खेरीज मानकरी, एकांडे व शिलेदार, खेरीज सरंजामी, मिळून पन्नास हजार स्वार नेहमीं पुणें मुक्कामीं राहिले. शिवाय आरब, रोहिले, पठाण, शिद्दी, दक्षणी लोक, मुसलमान, रजपूत, रांगडे व परदेशी असे पन्नास हजार पायदळ पुणें मुक्कामीं ठेवले. शहरांत जागोजाग चौक्या नाकेबंदीच्या ठेवल्या. त्या हशमी (पादचारी शिपाई) लोकांच्या शहराच्या गिर्दीला (घेऱ्याला) रामोशी लोक यांचे पहारे चौक्या पाठविल्या. सरकार-वाड्याभोंवतीं तटबंदीच्या बाहेर गिर्दीला झाडून सभोंवतीं छपरबंदी करून हशमी लोक ठेवले. वाड्यांत सदर बारगीर हजार बाराशे ठेविले. त्यांणीं रात्रंदिवस दोनशें असामींनीं कंबरबस्ता करून तोडे शिलकावून पहाऱ्या पहाऱ्यानें नेहमीं उभें असावें. दिल्ली-दरवाजा व गणेश-दरवाजा येथें दोन-दोनशें स्वारांचा छबीना (पहारा) तयार होऊन घोड्यावर स्वार कंबरबस्ता करून बसलेले, असे छबिने उभे रात्रंदिवस असावे. त्याच-प्रमाणें श्रीमंतांपाशीं नेहमीं चार असामी ब्राह्मण मंडळींपैकीं, दाजीबा आपटे, मोरोपंत भावे, व बाळाजीपंत केळकर यांणीं नेहमीं रात्रंदिवस

---

१ खरेकृत ना. च. पा. ११४. २ पेशव्यांची बखर पांचवी आवृत्ति पान. ११२.

श्रीमंतांपाशीं असावें. रात्रौ जेथें श्रीमंत निजतील तेथें पलंगाभोंवती यांणीं निजावें. याप्रमाणें जवळ शागिर्द, खिजमतगार, आचारी, व खटपटे अशी सारी मंडळी विश्वासू, वतनदार असे पाहून ठेवले. इतक्यांवर चौकशी नित्य नानांची. याप्रमाणें बंदोबस्त केला. शिवाय खासगीवाले, वाकनीस, व वाड्यांतील मंडळी झाडून यांस अवघ्यांस ताकीद कीं, "श्रीमंतांस जपत जावें." या प्रमाणें नानांनीं सर्व बंदोबस्त केला. श्रीकृष्ण गोकुळांत आल्यावर त्याला एकादा मायावी राक्षस येऊन पळवून नेईल म्हणून नंदानें सुद्धां जी खबरदारी घेतली नाहीं, ती या वेळीं नानांनीं घेतली. यावरून या अवतारी सवाईमाधवरावांवर नानांचें केवढें कळवळ्याचें प्रेम होतें, हें निराळें सांगावयास नको."

४. हे सवाईमाधवराव ऊर्फ नानांचे अवतारी श्रीकृष्ण, लग्न झाल्यानंतर नऊ वर्षांचे[1] झाले. तेव्हां श्रीमंतांच्या मनांत आलें कीं, नाना तऱ्हेचे खेळ खेळावे, शिकारखाने बाळगावे, असा मजकूर जवळच्या मंडळीनें नानांच्या कानांवर घातला. त्याजवरून नानांनीं तऱ्हेतऱ्हेचीं श्वापदें व पक्षी मिळविले. सातआठ मैना बंगाली बोलणाऱ्या, तसेच बोलणारे पोपट, यांचे पिंजरे चांगले मिळविले. तसेच चंडोल पक्षी यांचे पिंजरे सातआठ आणले. तशींच बदकें, (त्या वेळीं राजहंस पक्षी मिळाले नाहींत असें दिसतें. ते मिळाले असते तर नानांनीं या अवतारी पुरुषाकरतां काय वाटेल ती किंमत देऊन ते खरेदी केले असते.) पाणकोंबडीं, मोरांच्या जोड्या दहापांच आणून ठेविल्या. तशींच हरणें शें दोनशें, काळवीट सुद्धां वाड्यांत आणून ठेवलीं. चित्ते दोन चार आणून बांधले. पांचसातशे ससे काळे, पिवळे, अबलक असे पर्वतीच्या वाटेवर बागेंत तळ्याचे कांठीं खोली बांधून तींत ठेविले. तसेच दहावीस वाघ पर्वतीवर मोठा सोपा बांधून त्यामध्यें साखळदंडानें बांधून ठेविले. तसेंच वज्रमुष्टी यांच्या जोड्या सरकारांत पांचसात

१. खरेकृत ना. च. पा. ११५.

चाकरीस ठेवल्या. छडी-खेळणेवाले, व दांडपट्टा-खेळणेवाले असे नेहमीं हुजूर ठेविले. तिरंदाजी खेळणारेही असामी दोनचार श्रीमंतांपाशीं हुजूर ठेविले. याप्रमाणें नानांनीं आपल्या अवतारी श्रीकृष्णाच्या करमणुकीची साधनसामुग्री तयार करून दिली. "या 'अवतार' कल्पनेमुळें नानांना मोठेंच नैतिक पाठबळ मिळालें असेल यांत शंका नाहीं."[१] अशी आधुनिक इतिहासकार खरेशास्त्री यांचीही प्रामाणिक समजूत झाली होती. परंतु स्वार्थी, कारस्थानी व कपटी पुरुष, भावनेला कधींच बळी पडत नसतात. ते दुसऱ्यांना बळी पाडीत असतात, हें सत्‌शील व सरळ वृत्तीच्या खरेशास्त्रयांच्या लक्षांत कोठून येणार ! धर्मराजाला जगांतील सर्वच माणसें सदाचरणी दिसत होतीं. असो. या अशा स्वर्गतुल्य सुखांत सवाईमाधवराव वाढत होते. ते जसजसे मोठे होऊं लागले, तसतशी त्यांना पेशवे ह्मणजे काय याची कल्पना येऊं लागली. न्याय व अन्याय यांतील भेदही त्यांना समजूं लागला. चांगल्या-वाईटाची निवड त्यांना करतां येऊं लागली. त्यांना सत्रावें वर्ष लागलें तेव्हां त्यांची बुद्धि स्वतंत्र तऱ्हेनें विकास पावूं लागली. सारासार विचारधर्म त्यांच्या अंगीं बाणूं लागला.

५. पुण्यांत या वेळीं शहरकोतवालाच्या जागेवर घाशीराम या नांवाचा एक कनोजा ब्राम्हण होता. तो औरंगाबादचा राहणारा होता. मराठ्यांची राजसत्ता सर्व हिंदुस्थानभर पसरल्यामुळें पुणें हें तिचें केंद्रस्थान बनून तेथें हिंदुस्थानांतील सर्व जातीचे व सर्व धर्मांचे लोक राजकारणनिमित्तानें, लष्करीपेशानें, व्यापार-धंद्याच्या निमित्तानें किंवा रोजगाराच्या नांवानें येत असत. अशाच निमित्तानें घाशीराम हा पहिल्यानें पुण्यास आला. त्याच्या बापाचें नांव सावळदास असें होतें. तो मोठा गोड बोलणारा असून दुसऱ्यावर आपली छाप कशी बसवावी ही कला त्याला चांगली अवगत होती. त्यानें पुण्यास राहून आपल्या

१ खरेकृत ना. च. पा. ११४

मधुरवाणीनें व नम्र वर्तनानें पेशव्यांचे मुख्य कारभारी नाना फडनविस यांचेकडे प्रवेश केला, आणि त्यांची मर्जी संपादन करून कोतवालीचा हुद्दा मिळविला. कोणी असेंही ह्मणतात कीं, त्यास सुस्वरूप व मनोहर अशी एक मुलगी होती. तिचें नांव ललितागौरी असें होतें. नानांनीं तिच्यावर सुप्रसन्न होऊन घाशीराम यास इ. स. १७८१ मध्यें पुण्याचा कोतवाल नेमलें. यासंबंधीं इतिहाससंग्रह पुस्तक १ लें यांत सन १९०८ च्या सप्टेंबर महिन्याच्या अंकांत पुढीलप्रमाणें माहिती आहे. "घाशीराम कोतवालाला एक सुंदर, रूपवान, मनोहर अशी ललितागौरी नांवाची मुलगी होती. तिच्या नेत्र कटाक्षांच्या तीव्र आघातानें नानांचें अंतःकरण प्रेमपाशांत बद्ध होऊन त्यांनीं पुण्य नगरीचा सर्व बंदोबस्त त्याच्या स्वाधीन केला." त्याचप्रमाणें 'पुणें ग्याझेटियर' भाग ३ रा पान ३६९ वरही पुढीलप्रमाणें माहिती आहे. "Ghashiram was a Kanoj Brahman of Aurangabad, who rose to be the head of the Poona Police, by giving his daughter to be the mistress of Nana Fadanis." याप्रमाणें घाशीराम कोतवाल व नाना फडनविस यांचा सासरा व जांवई असा आप्तसंबंध होता.

६. पेशवाईंत पुण्याची कोतवाली हा मोठ्या अधिकाराचा व महत्वाचा असा हुद्दा होता. हा हुद्दा थोरल्या माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत पहिल्यानें अस्तित्वांत आला. माधवरावांनीं पुणें शहराची लोकवस्ती अधिक वाढलेली पाहून इ. स. १७६४ मध्यें पोलीस-खातें स्वतंत्र करून स्वतंत्र कोतवाल नेमला. ह्या पहिल्या कोतवालाचें नांव बाळाजी नारायण लोणकर असें होतें. याचेनंतर धोंडो बाबाजी व आनंदराव काशी असे कोतवाल झाले. आनंदराव काशीची कारकीर्द इ. स. १७७५ पासून १७७८ पर्यंत झाली. नंतर घाशीराम पुढें आला. त्यास इ. स. १७८१ मध्यें कोतवालीचा पूर्ण अधिकार मिळाला.

७. कोतवालाचा अधिकार फार मोठा असे. तो फक्त पुणें शहरापुरताच होता. त्याजकडे फौजदारी व दिवाणी असे बहुतेक सर्व अधिकार होते. त्या

मुळें त्याचा दरारा फार असे. कोतवालापुढें विशेषें करून चोरी, बदफैली, जारकर्म, मद्यपान, वगैरे मुख्य गुन्हे येत असत. कोतवालामार्फत या सर्व खटल्यांचा निकाल होत असे. कोतवालीच्या उत्पन्नाच्या हरकी, व खंडगुन्हेगारी, पाटदाम, कर्ज चौथाई, बैतनमाल, कबले, वटछपाई, नजर, जुव्याबद्दल दंड, वगैरे मुख्य उत्पन्नाच्या बाबी असत. कोतवालीचें उत्पन्न तीस हजारांचें असे. अर्थात् हें उत्पन्न सरकारी असे. त्याशिवाय अंतस्थ व कारकुनी ही वेगळी.

८. घाशीरामाचा पगार दिवट्यासुद्धां, सालाचा ६२१ रुपये होता. त्याच्या हाताखालीं मुजुमदार, फडनविस, व दप्तरदार असे तीन अधिकारी होते. त्या सर्वांचा मिळून सालीना पगार ६४० रुपये होता. पुणें शहराच्या मुख्य चावड्या पांच होत्या. १ सोमवार २ वेताळ ३ आदितवार ४ नारायणपेठ व ५ शनिवार, अशा त्या होत. या पांच चावड्यांवर मिळून कोतवालाची शिबंदी ७८ लोकांची होती. तेवढ्यानें भागेना म्हणून इ. स. १७८८ मध्यें आणखी २५ लोक वाढविले. या सर्वांचा खर्च सालीना तीन साडेतीन हजार रुपयांचा होता. नंतर पुन्हां प्रत्येक चावडीवर दोन दोन असे दहा लोक वाढविण्यांत आले, तेव्हां घाशीरामाची एकंदर शिबंदी ११३ लोकांची झाली.

९. घाशीराम कोतवालाच्या दहा वर्षांच्या कारकीर्दींत त्यानें पुण्याच्या लोकांवर अतोनात जुलूम केला. नाना फडनविस यांची त्याच्यावर मर्जी असल्यामुळें गरीब लोकांची दाद लागेना. घाशीरामाच्या जुलूमाच्या गोष्टी अनेक आहेत. त्यावरून "घाशीरामी जुलूम" ही म्हण मराठी भाषेंत पडली. नानांच्या दप्तरांत उत्तम कामगिरीबद्दल त्यास हजारों रुपयांचीं बक्षिसें मिळालेले दाखले सांपडतात. त्याच्या मुलाच्या लग्नाप्रीत्यर्थ १५०० रुपयांचे सोन्या रुप्याचे दागिने, १२०० रुपये धर्मादाय, देणगीखर्च व अन्नखर्च आणि ७०० रुपयांचें कापड असे ३४०० रुपये दिल्याचा उल्लेख आहे.

१०. नानांच्या कारकीर्दींत कोतवालाच्या वहिवाटीचे जे नियम होते, त्यांत राजद्रोही, फंदफितुरी वगैरे लोकांवर सक्त नजर ठेऊन त्यांची चौकशी करून सरकारांत वरचेवर समजावीत जावें हा पहिला नियम होता. घाशीराम हा

नजरबाज (डिटेक्टिव्ह) लोकांवरील मुख्य होता. घाशीरामाच्या साधनानें नानांना सर्व फंदफितुर समजत. एकंदरींत नानांच्या मर्जींतला व विश्वासांतला तो असल्यामुळें नानांच्या कारकीर्दीत घाशीराम कोतवाल हें मोठेंच प्रस्थ माजून राहिलें होतें. तो नानांचें प्रियपात्र होता.[१] त्यामुळें तो कोणास मोजीत नसे. तो लोभी व क्रूरकर्मी होता.

११. सवाईमाधवराव यांच्या कारकीर्दीत इ. स. १७९१ मधील श्रावण महिन्याचा दानधर्म फार मोठ्या प्रमाणांत झाला. या वेळीं ठिकठिकाणचे शास्त्री, पंडीत, वैदिक ब्राह्मण, हरिदास वगैरे पुण्यास आले होते. त्यांत द्राविडी, तेलंगी ब्राह्मणही अनेक होते. पेशव्यांकडून श्रावणमासानिमित्त जी दक्षिणा वांटली जात असे, ती घेण्याकरतां ३५,१५८ ब्राम्हण जमले होते. त्यांस ९९००० नव्याणव हजार रुपये दक्षिणा वांटण्यांत आली. दशग्रंथी ब्राम्हणांस प्रत्येकी आठ नऊ रुपये, पंचग्रंथी ब्राम्हणांस पांच सहा, शाखापाठी यास चार रुपये, पंडितास सहा रुपये, पुराणिकास चार रुपये, गृहस्थास दोन रुपये, पुर्व्यास ह्मणजे पुरभय्ये अथवा रांगडे ब्राम्हण यास एक एक रुपया, याप्रमाणें दक्षिणा वांटली. ही दक्षिणा देण्याचे बाबतींत कोणी कोणाची रदबदली किंवा शिफारस करूं नये अशी ताकीद होती. या शिवाय वाड्यांत पंडित, वैदिक यांस पन्नास हजार रुपये निराळे वांटण्यांत आले.[२] याप्रमाणें या श्रावण महिन्यांत सवाईमाधवरावांनीं पुष्कळ दान-धर्म केला.

१२. श्रावण वद्य १४, रविवार रोजीं, पुण्याहून तीस पसतीस द्राविडी ब्राम्हण दक्षिणेचा ऐवज आपापल्या जवळ घेऊन देशास जाण्याकरतां पुण्याहून निघाले. वाटेंत चोरांनीं आपलें द्रव्य लुबाडूं नये ह्मणून परदेशाचे ब्राम्हण अशाच जमावानें जात असत. त्याप्रमाणें हे तेलंगण देशाकडील ब्राम्हण, एका टोळीनें निघाले. ते सायंकाळीं प्रहर दिवसास घाशीराम कोतवाल याच्या बागेंत जाऊन उतरले. हा बाग लष्करांत घाशीरामाचा तलाव होता त्याच्या आसपास असावा. ही बातमी घाशीराम कोतवाल

१ देवकृत नाना फडनविस पान ८२. २ ऐ. ले. सं. पा. ४५३३ पत्र नं. ३३७०.

यास समजतांच त्यानें आपले शिपाई पाठवून साऱ्या ब्राम्हणांस लुटलें व त्या बागेंत एक लहानशी खोली होती तींत नेऊन त्यांना कोंडलें, आणि बाहेरून दरवाजा बंद करून कुलूप लावून टाकलें. ती खोली अगदीं लहान होती. त्यामुळें त्या ब्राम्हणांस इकडे तिकडे हालचाल करण्यासही जागा नव्हती. आंत हवाही नाहीं. दोन दिवसपर्यंत ते ब्राम्हण कोंडले गेल्यामुळें व अन्नपाणी न मिळाल्यामुळें त्यांचे जीव तडफडून त्यांतील बहुतेकजण तेथेंच प्राणांस मुकले. त्या खोलीला एक गवाक्ष होतें. त्या गवाक्षाला तोंड लावून जे ब्राम्हण उभे होते, ते मात्र प्राण धरून जिवंत राहिले. तिसरे दिवशीं मानाजी फाकडे हे घोड्यावरून त्याच बागेच्या रस्त्यानें चालले होते. त्यांना या गवाक्षापाशीं असलेल्या ब्राम्हणांनीं पाहिलें व त्यांस हांका मारिल्या. त्या ऐकून मानाजीराव तेथें आले व त्यांस सर्व मजकूर त्या ब्राम्हणांनीं सांगितला. तेव्हां त्यांनीं आपल्याबरोबरीच्या शिपायांकडून त्या खोलीचें कुलूप तोडलें व आंतील सर्व ब्राम्हणांचीं प्रेतें बाहेर काढलीं. त्यांत फक्त दोनच ब्रम्हण जिवंत होते. त्यांस मानाजीरावांनीं साखरपाणी देऊन हुशार केलें. नंतर त्यांनीं त्या ब्राम्हणांजवळ चार शिपाई रखवालीला ठेऊन ते स्वतः शहरांत आले. येतांना पुण्यांतील रस्त्यावरील ब्राम्हणांना हांका मारून त्यांनीं हें वर्तमान सर्वांस जाहीर केलें, आणि सर्वांस सांगितलें कीं, " ब्राम्हण असेल त्यानें वाड्यापाशीं यावें. " असें सांगत मानाजीराव वाड्यापाशीं आले. ही हकीकत होईपर्यंत दुपारचे तीन वाजले. मानाजीराव फाकड्यांनीं हा सर्व वृत्तांत सवाईमाधवराव यांना सांगितला. त्यांनीं याची चौकशी करण्याबद्दल नानांस सांगून पाठविलें.

१३. नानांनीं घाशीराम कोतवाल यास आपल्या वाड्यांत बोलावून घेतलें. त्या वेळीं घाशीराम यानें नानांस असें समजावून सांगितलें कीं, ' कोमटी वगैरे जातीचे फितव्यामध्यें कांहीं होते व चोरीही करीत होते, ते बातमी पक्की लावून त्यांजला पेठेंत ठेविलें. त्यांणीं कांहीं जणांनीं अफू व सोमल खाऊन मेले. '[१] नानांचा पूर्ण विश्वास घाशीरामावर असल्यामुळें त्यांना या बाबतींत जास्त चौकशी करण्याचें कारण वाटलें नाहीं. त्यांनीं

१ ऐ. ले. सं. पान ४५३८.

घाशीराम यास मेलेल्या ब्राम्हणांच्या मुर्दांस जाळण्याची परवानगी दिली. घाशीरामानें मुर्दे जाळावयास कारकुनास पाठविलें. तो त्या ठिकाणीं जातो तों तेथें मानाजीराव परत आले होते. त्यांनीं मुर्दे जाळावयास हरकत घेतली. " रावसाहेबांची (सवाईमाधवरावांची) परवानगी आल्याशिवाय जाळूं देत नाहीं. कोतवालाचें ऐकत नाहीं, " असें त्यांनीं साफ सांगितलें व त्या कारकुनास परत पाठविलें. नाना व घाशीराम यांच्या मनांत मुर्दे जाळून पुरावा नष्ट करावयाचा होता. परंतु मानाजीराव यांनीं मोठ्या हिम्मतीनें तसें करूं दिलें नाहीं. त्यांनीं आपल्या एका कारकुनाकडून रावसाहेबांकडे सांगून पाठविलें कीं, " एकवीस ब्राम्हण मृत्यु पावले. कोतवाल जाळावयास नेतो, त्यास तूर्त मीं नेऊं दिलें नाहीं. याची चवकशी करावी. " या वेळीं घाशीराम नानांच्या वाड्यांत त्यांचा आश्रय घेऊन बसला होता.

१४. या वेळीं शनिवारवाड्याभोंवतीं पांचसात हजार ब्राह्मण जमले होते. कचेरीच्या कामाकरतां जो कोणी पालकींत बसून वाडयाकडे येई तो ब्राह्मण आहे असें पाहून ते त्याला तेथेंच उतरवून आपल्या जमातींत सामील करून घेत. अशा मोठमोठ्या ब्राम्हणांच्या जेवढ्या पालक्या तेथें आल्या, त्या सर्वांना तेथें उतरून घेण्यांत आलें. असें होतां होतां सायंकाळ झाली. श्रीमंतांनीं घाशीराम यास वाडयांत बोलावून आणण्याकरतां शिपाई पाठविला. दोन घटका रात्र झाली तरी घाशीराम नानांच्या घरांतून बाहेर पडून वाडयांत येईना. तेव्हां श्रीमंतांनीं दुसरा चोपदार नानांच्या वाड्यांत त्यास बोलावण्याकरतां पाठविला. तरी तो त्याप्रमाणें श्रीमंतांकडे गेला नाहीं. नंतर श्रीमंतांनीं चार ढालाईत (सशस्त्र शिपाई) घाशीराम यास पकडून आणण्याकरतां पाठविले. त्यांनीं नानांस सांगितलें कीं, " सरकारची मर्जी फार जात राहिली आहे. तर घाशीराम यास लवकर आम्हांबरोबर पाठवावें. " ढालाईत पाहून नानांनीं घाशीराम यास सांगितलें कीं, " तुझें कपाळ फुटलें. आतां आमचा उपाय नाहीं. "

१५. नंतर त्या ढालाईतांनीं घाशीरामास धरून वाडयांत नेऊन श्रीमंतांपुढें उभें केलें. मग त्यांनीं समक्ष मजकूर त्यास विचारला. परंतु त्यानें नानांना सांगितलेलाच मजकूर श्रीमंतांना सांगितला. तेव्हां त्यांनीं ढालाईतांस हुकूम दिला कीं, "पागोटें फाडून, मुसक्या बांधून छड्या माराव्या." हा श्रीमंतांचा हुकूम होईपर्यंत घाशीरामास वाटत होतें कीं, नाना मला वांचव-वतील. पण आतां त्याची आशा नष्ट झाली. ढालाईतांनीं त्याचें पागोटें फाडून, त्याच्या मुसक्याा बांधल्या व छडया मारावयास सुरवात केली. त्या वेळीं सहा घटिका रात्र झाली होती. नानांच्या वाडयापुढें हजारो तेलंगी ब्राम्हण येऊन गर्दी करूं लागले. तेव्हां नानांनीं आपल्या वाडयाचा दरवाजा लावून घेतला. व घाशीराम यास वांचविण्याचा कांहीं पर्याय निघतो काय म्हणून त्यांनीं वे॥ राजश्री अय्याशास्त्री यांस बोलावून आणलें. ते नानांचे एक हस्तक आहेत असें त्या जमलेल्या ब्राम्हणांस माहीत असल्यामुळें ते नानांच्या वाड्यापुढें येतांच ब्राह्मणांनीं मारामार करून शास्त्रीबावांची शालजोडी, पागोटें फाडलें. नंतर ते नानांच्या वाड्यांत शिरले. नानांचें व त्यांचें बोलणें झालें. ब्राम्हणांचा कट बहुत आहे असें शास्त्रीबुवांनीं पाहून घाशीरामास देहांत प्रायश्चित्त द्यावें असें सांगितलें. त्यामुळें नानांचा नाइलाज झाला. ब्राम्हण लोक त्या वेळीं इतके संतापले होते कीं, नाना आपल्या वाडयांतून बाहेर पडूं शकले नसते. नानांना घाशीरामाबद्दल श्रीमंतांचे जवळ रदबदली करण्यास मार्गच राहिला नव्हता.

१६. श्रीमंतांनीं घाशीरामास छडया मारवून फोडून काढल्यानंतर त्याच्या पायांत बिडी ठोकून तोफखान्यांत पानशे यांजकडे त्यास पाठवून दिलें. आणि ब्राम्हण जमा झाले त्यांजकडेस श्रीमंतांनीं बाळाजीपंत केळकर यांच्या हस्ते सांगून पाठविलें कीं, " आतां रात्र झाली आहे. आतां तुम्हीं सर्वांनीं असेंच असावें. प्रातःकाळीं घाशीराम याची शहरांत धिंड फिरवून तुमचे स्वाधीन करूं. मग त्याला तुम्हीं मारा किंवा ठेवा." असा निरोप बाळाजीपंत यांनीं सांगि-तल्यानंतर सर्व ब्राह्मण बरें आहे असें ह्मणून तसेच जमावानें तेथें रात्रभर राहिले.

१७. प्रातःकाळ[1] झाल्यानंतर शहरांत दवंडी पिटली कीं, "आज घाशीराम याचें पारिपत्य होत आहे. त्याचें पारिपत्य झाल्याशिवाय कोणीं शहरांत जेवूं नये." अशी ताकीद होतांच शहरांत कोणी जेवला खाल्ला नाहीं. चार घटका दिवसास घाशीराम यास वाड्यांत आणलें. वाड्यांत आणून फिरून श्रीमंत यांनीं समक्ष विचारलें "ते भामटे किंवा कोमटी होते तें सांग." घाशीराम यानें उत्तर केलें नाहीं. मग वाड्यांतून बाहेर काढून चावडीपाशीं झेंड्याखालीं आणून, मुसक्या बांधून, उंटावर उलटें तोंड करून बांधला; आणि डोकीचे पांच पाट काढून, तेल शेंदुर वरती घालून, दवंडी पुढें देऊन सोळा पेठा शहराच्या फिरून, शेवटीं चावडीपाशीं आणला. मग श्रीमंतांची आज्ञा झाली कीं, "तसाच उंटासुद्धां घाशीराम यास गुल्टेंकडीकडे न्यावें. आणि तेथें ब्राह्मण जमा होतील त्यांचे स्वाधीन करावें." इकडे ब्राह्मणांस आज्ञा झाली कीं, "साऱ्यांनीं तुम्हीं आतां गुल्टेंकडीपाशीं जावें. तेथें तुमचे स्वाधीन घाशीराम यास करतील." त्या समयीं दहा पंधरा हजार ब्राह्मण गुल्टेंकडीकडे गेले. इतक्या कर्मास सायंकाळ झाला. तेव्हां घाशीराम यास गुल्टेंकडीस नेऊन, उंटावरून सोडून ब्राम्हणांचे स्वाधीन केला. तेव्हां त्या ब्राह्मणांनीं घाशीराम यास दगडाखालीं ठेंचून ठार केला. आणि त्याचा मुर्दा झाडास उलटा टांगून ठेविला. याप्रमाणें घाशीराम याचें पारिपत्य झालें. नंतर ब्राम्हणांचे मुर्दे नेऊन जाळण्यांत आले.[2] नंतर कोतवालीकडील फडनविस व मुजुमदार खेरीज सर्व कारकुनांस बिड्या घातल्या. घाशीराम याच्या दोन मुलांसही बिड्या घातल्या. त्याच्या घराची जप्ती केली. कोतवाल यानें कुंटणी ठेवल्या होत्या. त्यांचे व कोतवालीकडील माणसांचे हात, पाय, कान काढावे अशी बोलवा झाली.

१८. याप्रमाणें घाशीराम कोतवालाचा अखेर लागला. परंतु त्याच्या चरित्रसमाप्तीमुळें ज्या कांहीं गोष्टी प्रकाशांत आल्या, त्या मात्र चिरंजीव होऊन बसल्या आहेत. घाशीरामाच्या पारिपत्याचे बाबतींत मानाजीराव फाकडे,

---

१. पे. ब. पा. १३८. आवृत्ति ५ वी. २ ऐ. ले. सं. पा. ४५३९.

पुण्याचा ब्रह्मवृंद, सवाईमाधवराव व नाना फडनविस यांची कृती प्रामुख्यानें डोळ्याला दिसते. तेव्हां या घाशीरामी प्रहसनांतील या पात्रांच्या भूमिका कशा प्रकारच्या होत्या हें येथें पहाणें अवश्य आहे.

१८. मानाजीराव फाकडे हे राघोबादादांचे इनामी सरदार होते. सखाराम हरीच्या तोडीची कामगिरी यांनीं लढायांमधून बजावलेली आहे. ज्याची शौर्याबद्दल विशेष ख्याति असेल त्यालाच फाकडा ही पदवी मिळत असे. पेशवाईंत तीन फाकडे होऊन गेले. कोन्हेर त्रिंबक एकबोटे यांना कोन्हेर फाकडा, मानाजी शिंदे यांना मानाजी फांकडा व इंग्रजांकडील ले. स्टुअर्ट याला इस्टुर फाकडा असें ह्मणत. मानाजीराव हा शूर योद्धा असल्यामुळें राघोबादादांच्या विश्वासांतला तो एक सरदार होता. राघोबादादांची वाताहात या मुत्सद्यांनीं केल्यानंतर मानाजीरावांना दुसऱ्या सरदारांची ताबेदारी पतकरावी लागली. ते करवीरकरांकडून निघून अलीकडे पुण्यास येऊन राहिले होते. नाना फडनविस यांच्याकडून सर्व बाजूंनीं हात-पाय बांधून टाकलेल्या स्थितींत ते सध्यां पुण्यांत कालक्षेप करीत होते. या वेळीं नाना ह्मणजे कर्तुमकर्तुम् सामर्थ्याचे पेशव्यांच्या राज्यांतील मेरुमणी होते. व त्यांच्या गळ्यांतील मौल्यवान् ताईत घाशीराम कोतवाल होता हें सर्वश्रुत होतें. घाशीरामाविरुद्ध कोणतेंही काम केल्यास त्यांत आपली आहुति खात्रीनें पडणार अशी परिस्थिति असतांनासुद्धां मानाजीराव फाकड्यांनीं घाशीरामाविरुद्ध ह्मणजे पर्यायानें नानाविरुद्ध आणि नानांविरुद्ध ह्मणजे पर्यायानें मृत्यूच्या जबड्याविरुद्ध सवाईमाधवराव यांच्याकडे न्याय मागण्याचें धाडस किंबहुना साहस केलें. अर्थाअर्थीं त्या द्राविडी किंवा तेलंगी ब्राह्मणांचा व मानाजीरावांचा कांहीं संबंध नव्हता. घाशीरामाविरुद्ध कांहीं तरी बालंट उत्पन्न करून आपला नवीन पुरुषार्थ लोकांच्या नजरेला आणण्याचेंही त्यांचें वय आतां राहिलेलें नव्हतें. असें असतां घोड्यावरून सहज सहल करावयाला निघालेले मानाजी फाकडे भिकारी तेलंगी भटांच्या विनवणीला मान देऊन

घाशीरामाच्या बागेंत शिरून, खोलीचें कुलूप तोडवून, स्वतःच्या जबाबदारीवर मुर्दे बाहेर काढतात काय, व थेट सवाईमाधवराव यांच्याकडे फिर्याद नेतात काय, याबद्दल कोणासही सहज आश्चर्य वाटेल. पण त्यांत आश्चर्य असें कांहींच नाहीं. जीं अस्सल जातिवंत माणसें असतात तीं बाल, तरुण किंवा वृद्ध असोत, धर्माविरुद्ध, अन्यायाचें अगर दुष्कर्माचें कृत्य त्यांच्या नजरेला पडलें, ह्मणजे त्यांच्या अंगांत वीरश्री उत्पन्न होऊन ते आपल्या कर्तव्याला जागतात. मानाजीराव याच जातीपैकीं एक अस्सल मराठे होते, एक अस्सल हिंदु होते. प्रत्यक्ष ब्राम्हणी राज्याच्या राजधानींत ब्रम्हहत्या झालेल्या मानाजीरावांना पाहवल्या नाहींत. त्या ब्रम्हहत्यांचें दृश्य पाहिल्याबरोबर त्यांचें अस्सल क्षात्र रक्त उसळलें व ते स्वतःसंबंधीं मागचा पुढचा विचार न करतां कार्यक्षम झाले. नानांची आज्ञा घेऊन घाशीरामाचा कारकून ब्राम्हणांचीं प्रेतें जाळण्याकरतां आला असतांही त्यांनीं तीं जाळूं दिलीं नाहींत. त्यामुळें प्रत्यक्ष नानांचा आज्ञाभंग मानाजीरावांनीं केला हें सामान्य साहस नव्हे. राघोबादादांच्या आवडत्या सरदारांपैकीं मानाजीराव हें एक हिंदुधर्माभिमानी नररत्न घाशीरामाच्या पारिपत्यामुळें पेशव्यांच्या इतिहासांत विशेष चमकलें.

२०. पुण्यांतील दहा-पंधरा हजार ब्राम्हण घाशीरामाच्या पारिपत्याकरतां गुलटेंकडीवर जमा झाले होते व त्यांनीं त्यास दगडाखालीं, सर्पाला ठेंचून मारतात, त्याप्रमाणें ठेंचून मारलें ही गोष्ट सामान्य नाहीं. ब्राम्हणांच्या मनांत घाशीरामाबद्दल भयंकर द्वेष, चीड व सूड उत्पन्न झाल्याशिवाय दगडाखालीं ठेंचून मारण्याचा हा आसुरी मार्ग त्यांनीं स्वीकारला नसता. एवढयावरच त्यांच्या मनाचें समाधान झालें नाहीं. तर त्याचें प्रेत त्यांनीं झाडाला उलटें टांगून ठेवलें. कावळे, गिधाडें यांच्या भक्ष्यस्थानीं घाशीराम पडल्यावर पुण्याच्या ब्रम्हवृंदाचें समाधान झालें, इतकी सूडाच्या अतिरेकाची भावना त्यांची बनलेली होती. त्याचें

कारण त्या पूर्वी घाशीरामानें कित्येक निरपराधी ब्राम्हणांना छळलें असेल. कित्येकांचें द्रव्य लुबाडलें असेल. कित्येकांचे हाल हाल करून त्यांचे प्राण घेतले असतील, कित्येकांची अब्रू घेतली असेल. कित्येकांच्या बायका पळविल्या असतील, तर कित्येक बायकांना भ्रष्ट केलें व करविलें असेल. अशा सर्व नराधमपणाच्या कृत्यामुळें पुण्याच्या ब्रम्हवृंदाच्या मनांत त्याच्या बद्दल इतका द्वेष उत्पन्न झाला होता. परंतु इतके दिवस त्याला नाना फडनविस यांचें पाठबळ होतें. त्यामुळें गरीब ब्राम्हणांच्या फिर्यादीची दाद लागली नाहीं. ' कोतवाल यानें कुंटणी ठेवल्या होत्या. ' अर्थात् अब्रुदार गृहस्थांच्या बायका अनीतीला प्रवृत्त करण्याची शाळा-कुंटणखाने आपल्या वाड्यांत घाशीरामानें घातले होते व तेथें तो आपल्या प्रिय दोस्तांच्या चैनी व हौसा पुरवीत होता हें उघड दिसतें. घाशीरामाच्या या सर्व अधमपणाच्या कृत्यामुळें पुण्याचा सर्व ब्रम्हवृंद मनांतल्या मनांत चिडलेला होता, व त्याला योग्य संधि मिळतांच त्याच्या सूडातिरेकाची भावना घाशीरामाच्या पारिपत्याच्या वेळीं लोकनिदर्शनाला आली. अनीति व दुष्कर्म यामुळें सोसाव्या लागणाऱ्या हालांचें परिमार्जन सूड घेण्यानेंच होत असतें. मग तो वेदशास्त्रसंपन्न कर्मठ ब्राम्हण असो किंवा नसो. मनोवृत्ति ही सर्वांची सारखीच असते.

२१. सवाईमाधवराव हे पेशव्यांच्या राज्याचे कागदोपत्रीं मालक होते. त्यांच्या वयाच्या चाळीसाव्या दिवशीं त्यांना पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. वयाच्या तिसऱ्याच वर्षी त्यांची मातोश्रीही परलोकवासी झाली. तेव्हांपासून हें मूल पराधीन स्थितींत वाढलें. त्याची वाढ, त्याचें शिक्षण, त्याचें कोड—कौतुक, त्याची मुंज, त्याचें लग्न, त्याचा राज्यकारभार, त्याची आवड सर्व कांहीं नानांच्या खुद्द देखरेखीखालीं व नानांच्याच पसंतीनें झाली होती. सवाईमाधवराव म्हणजे नाना आणि नाना म्हणजे पेशव्यांचें राज्य एवढी आत्मसात् भावना निर्माण झालेली दिसत होती. सवाईमाधवराव हे अवतारी पुरुष म्हणून देव्हाऱ्यांत जोंपर्यंत कोंडलेले होते, तोंपर्यंत नानासारख्या पुजाऱ्यापलीकडे

त्यांची दृष्टि गेलेली नव्हती. परंतु या वेळीं त्यांचें वय सतरा वर्षांचें झालें होतें. त्यांचें लग्न होऊन नानांव्यतिरिक्त आपलें असें एक नवीन माणूस त्यांना लाभलें होतें. त्यामुळें शनिवारवाड्याव्यतिरिक्त आपलें राज्य आहे, आपली प्रजा आहे, आपलें वैभव आहे, अशी आपुलकीची त्यांना भावना झाली होती व न्याय-अन्याय, नीति-अनीति वगैरे व्यावहारिक गोष्टी त्यांना समजूं लागल्या होत्या. आम्रवृक्ष जरी कसायाच्या परसांत वाढला तरी त्याला मधुर अशीं आंब्याचींच फळें लागणार ! काजऱ्याचीं कडू फळें लागणार नाहींत.

२२. सवाईमाधवराव यांच्या अंगांत वाढणारें रक्त अस्सल पेशव्यांचें होतें. त्यांच्या अंगीं वाढणारें तेज पेशवे घराण्यांतील पराक्रमी पुरुषांचें होतें. असें असल्यामुळें मानाजीराव फाकडेसारख्या हिंदुधर्मरक्षक तेजस्वी सरदारानें घाशीरामाविरुद्ध ज्या वेळीं नानांची कचेरी उल्लंघून थेट श्रीमंतांपुढें फिर्याद आणली, त्या वेळीं त्यांच्या मनाला पेशवे घराण्यांतील स्वतंत्र विचारांची चालना मिळाली असें स्पष्ट दिसतें. त्यांनीं राज्यकारभाराच्या पद्धतीप्रमाणें पहिल्यानें घाशीरामाची चौकशी करण्याचें काम नानांना सांगितलें. नानांनीं श्रीमंतांच्या आज्ञेप्रमाणें चौकशी न करतां ब्राम्हणांचीं प्रेतें जाळण्याचा हुकूम दिला. तेव्हां त्याला हरकत करून मानाजीरावांनीं श्रीमंतांकडे तशी फिर्याद केली. त्या वेळीं घाशीराम व नाना हे दोघेही कोठें तरी अन्याय करीत असावे असें त्यांना वाटलें. म्हणून घाशीरामाला प्रत्यक्ष आपल्या समोर, वाड्यांत बोलावण्याकरतां त्यांनीं चोपदार पाठविला. नानांनीं त्या वेळीं आपल्या छत्राखालीं घाशीरामास आश्रय दिला व त्यास पेशव्यांकडे पाठविलें नाहीं. सवाईमाधवराव यांना हा अपमान वाटला. ' आज्ञाभंगो नरेंद्राणाम् ' या उक्तीप्रमाणें नाना व घाशीराम यांनीं ज्याअर्थी आपला आज्ञाभंग केला, त्याअर्थीं घाशीराम हा खात्रीनें गुन्हेगार आहे, अशी त्यांची खात्री झाली व त्याप्रमाणें त्याला पकडून आणून आपल्या

स्वतःच्या अधिकारांत व प्रत्यक्ष नानांच्या इच्छेविरुद्ध त्यांनीं त्याला शासन केलें. या वेळीं प्रत्यक्ष नाना आडवे आले असतां त्यांनीं आपल्या रक्षणकर्त्या नानांची पर्वा केली नाहीं. आज्ञाभंग व अन्याय सहन न करण्याचे धर्म जे पेशवेघराण्यांत होते, ते या वेळीं सवाईमाधवरावांनीं नानांच्या अगदीं मगरमिठींत असतांनासुद्धां दाखविले, हीहि सवाई-माधवरावांची असामान्य कर्तबगारी या वेळीं लोकांच्या नजरेला आली.

२३. घाशीराम कोतवाल नानांचें प्रियपात्र होतें. नानांचें त्याला पूर्ण पाठबळ होतें. वेळोंवेळीं घाशीरामाच्या कामगिरीबद्दल नाना त्याला देणगी देत असत. घाशीरामाला नानांचा वशिला असल्यामुळें घाशीरामी जुलमाची दाद पेशवाईंत लागत नसे. पुण्यांतील लोकांच्या अब्रूवर व पैशावर घाशी-रामाची गदा केव्हां येईल याचा नेम नव्हता, वगैरे विधानें करून दुष्ट, अधम, पापी अशा घाशीरामाला नानांनीं आपलें प्रियपात्र बनविलें म्हणून नानांना बहुतेक इतिहासकार दूषण देतात. परंतु नानांचे वकील खरे-शास्त्री, हे त्या दूषणाला अन्यायाचें ठरवितात. तेव्हां या बाबतींत त्यांचें म्हणणें काय आहे, हें पहिल्यानें पहाणें योग्य होणार आहे. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, घाशीराम कोतवाल हा नानांच्या विश्वासाला पात्र झाल्यामुळें नानांस बहुत लोकापवाद सहन करावा लागला. "घाशीराम प्रकरणांत नानांच्या शिरावर कोणताच दोष येऊं शकत नाहीं.[१] घाशी-राम सावळादास याला सन १७८२ सालीं पुणें शहरची कोतवाली मक्त्यानें मिळाली. घाशीरामाचें पुणें-दरबारकडे कर्ज येणें होतें. शिवाय त्यानें त्या दरबारच्या दुसऱ्या एका सावकाराचा हवाला घेतला, त्यामुळें त्याला हा हुद्दा देण्यांत आला होता. एरवीं घाशीरामाचा नानांकडे दुसरा कोणताच वशिला नव्हता. पांडुरंग कृष्ण सरअमीन याला विचारल्याशिवाय कोणताहि कारभार करूं नये अशी नानांची सक्त ताकीद होती. असें असतां घाशीरामानें आपलें

---

१ खरेकृत ना. च. आवृत्ति ३ री. पा. १४८.

कृत्य इतक्या गुप्तपणें केलें कीं, त्याचा सुगावा खुद्द सरअमीनालाही लागला नाहीं; मग नानांस कोठून लागणार ? या बाबतींत हलगर्जी-पणाचा कांहीं दोष देतां येण्यासारखा असेल, तर तो घाशीरामाचा जोडीदार पांडुरंग कृष्ण सरअमीन यालाच देणें वाजवी आहे. असें असतां स्वकीय अज्ञ जनांनीं व परकीय तज्ज्ञ इतिहासकारांनीं या घाशी-राम प्रकरणाचें सर्व खापर नानांच्याच माथीं फोडलें आहे. त्यांचें ह्मणणें कीं, दिल्ली, कलकत्ता अशा दूरदूरच्या सूक्ष्म बातम्या मिळविणाऱ्या नानांना पुणें प्रांतांतल्या किंवा खुद्द पुण्यांतल्या बातम्या कशा कळल्या नाहींत ? नानांची संमति असल्याशिवाय पुण्यांत दिवसाढवळ्या असले गुन्हे घडतील कीं काय ? यावरून त्यांचा कारभार सैल व जुलमी होता हें निर्विवाद सिद्ध होतें. परंतु हा युक्तिवाद चुकीचा आहे. नानांना अतींद्रिय दृष्टि नव्हती. त्यामुळें हाताखालील लोकांची दुष्कृत्यें त्यांना एखादे वेळीं ओळखतां आलीं नाहींत तर तो त्यांचा दोष मानतां येत नाहीं. शिवाय अशा एक दोन उदाहरणांवरून त्यांचा सर्वच कारभार जुलमी होता असें अनुमान काढणें हा धड-धडीत सत्यविपर्यास होय ! " याप्रमाणें इतिहासकारांनीं नानांवर लादलेले दोष अन्यायाचे आहेत असें शास्त्रीबुवांचें स्पष्ट ह्मणणें आहे.

२४. याप्रमाणें खरेशास्त्रयांनीं सद्भावनापूर्वक नानांच्या गुन्ह्यांवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न केला आहे. पांघरूण घातलें असतां गुन्हे दडतात ही गोष्ट खरी; परंतु तें पांघरूण घट्ट व फाटकें मात्र नसावें. खरेशास्त्र्यांच्या विधानांचें पांघरूण अगदीं फाटकें, पुरीं लक्तरें झालेलें असल्यामुळें तें नानांचे गुन्हे झांकूं शकलें नाहीं ही गोष्ट मात्र खरी आहे. खरेशास्त्रयांनीं नानांची बाजू पुढें मांडतांना घाशीराम हा दोषी आहे, गुन्हेगार आहे असें कबूल केलें आहे. तेव्हां त्या बाबतींत विचार करण्याचें कारण उरलें नाहीं. नाना दोषी नाहींत हें दाख-

विण्याकरतां मात्र त्यांनीं एकच मुद्दा पुढें मांडला. तो ह्मणजे “ घाशीरामानें हें कृत्य इतक्या गुप्तपणानें केलें, कीं त्याचा सुगावा खुद्द सरअमी-नालाही लागला नाहीं. मग नानांना कोठून लागणार? ” खरेशास्त्रयांच्या ह्मणण्याप्रमाणें घाशीरामाकडून घडणारा हा गुन्हा नानांना समजला नाहीं असें गृहीत धरून चालूं. पण गुन्हा घडण्याच्या पूर्वीं नानांनीं बंदोबस्त करावयाला पाहिजे होता असें कोणत्याच इतिहासकाराचें ह्मणणें नाहीं. या प्रकारचा आरोप नारायणराव यांच्या वधाच्या बाबतींत आहे. परंतु त्याचीं कारणे व परिस्थिति फार वेगळी होती. त्याचा संबंध घाशीरामाच्या प्रकरणाशीं मुळींच नाहीं. या प्रकरणीं इतिहासकारांचा नानांवर स्पष्ट आरोप आहे. घाशीरामानें ब्रह्महत्येचा भयंकर गुन्हा केल्या-मुळें व तो नानांपुढें चौकशीकरतां आणिला गेला असतांही, या गुन्हेगाराला नानांनीं पाठीशीं घातलें, एवढेंच नव्हे तर, गुन्हेगारास गुन्ह्याचा पुरावा नष्ट करण्याच्या प्रयत्नास जातीनें मदत केली; म्हणून नाना घाशीरामाइतकेच किंबहुना जास्त गुन्हेगार आहेत. खरेशास्त्री नानांची वडेजावी दाखविण्याकरतां नानांना हा गुन्हा समजलाच नाहीं अशी जनतेची दिशाभूल करून नाना निर्दोषी आहेत असें विधान ठोकून मोकळे झाले. पण तें विधान वस्तु-स्थितीस सोडून आहे. खरेशास्त्री यांनीं लिहिलेल्या नानांच्या चरित्रांत पुढीलप्रमाणें मजकूर आहे. “ त्यांणीं (मानाजी फाकडे यांनीं) तेथें जाऊन (ब्राम्हणांस कोंडलेल्या खोलीकडे) जबरदस्तीनें कुलपें तोडून भुयार उघडून ब्राम्हण ओढून बाहेर काढले. त्यांत अठरा ब्राम्हण मेलेले ! तीन ब्राम्हणांस जिव मात्र होता. तेही वरती काढल्यावर सायंकाळीं मेले. सहा ब्राम्हण मात्र वांचले. हें वर्तमान फाकडे यांणीं श्री. राजश्री राव-साहेब (पेशवे) यांस सांगोन पाठविलें, रावसाहेबांनीं (सवाईमाधवरावांनीं) नानांकडे सांगोन पाठविलें. त्याजवरून (नानांनीं) कोतवाल याजला बोलावून आणून पुसिलें. त्याणें सांगितलें कीं, कोमटी वगैरे जातीचे फितव्यामध्यें कांहीं होते व चोरीही करीत होते. ते बातमी पक्की लावून

त्याजला पेठेंत ठेविलें. त्यांणीं कांहीं जणांनीं अफू व सोमल खाऊन मेले. असें कोतवाल यानें नानांस समजाविलें. नानांनीं मेलेल्यांस जाळण्याची परवानगी दिली." ही हकीकत खरेशास्त्रयांनीं लिहिलेल्या पुस्तकांतच आहे. यावरून घाशीरामानें केलेला गुन्हा नानांना माहीत झाला नाहीं हें खरेशास्त्रयांचें विधान साफ खोटें आहे. आतां खुद्द पेशव्यांनीं या गुन्ह्याच्या बाबतींत चौकशी करण्याचें काम नानांवर सोंपिवलें असतां नानांनीं कोणती चौकशी केली, हेंही पाहणें जरूर आहे. नानांनीं फक्त घाशीराम यास बोलावून घेतलें. त्याच्या सांगण्यावर पूर्ण विश्वास ठेवला व प्रेतें जाळण्याचा त्याला हुकूम देऊन त्याच्या कारकुनास हुकुमाची अंमलबजावणी करण्याकरतां पाठविलें. वीस पंचेवीस ब्राम्हणांच्या झालेल्या हत्येबद्दल नानांची ही चौकशी अशी संपली.

२५. पेशव्यांनीं करावयास सांगितलेल्या चौकशीच्या कामांत नानांनीं कसलेंही अगत्य दाखविलें नाहीं हें स्पष्ट होत नाहीं काय? खरेशास्त्रयांच्या ह्मणण्याप्रमाणें घाशीरामावर जर सरअमीन हा अंमलदार होता, तर त्याला या चौकशीच्या बाबतींत नानांनीं बोलावून घेणें अगदीं जरूरीचें होतें. तें नानांनीं केलें नाहीं. शिवाय मेलेल्या ब्राम्हणांनीं अफू व सोमल खाल्लें असें घाशीराम स्पष्ट सांगत असतांना, ते खरोखर अफूनें अगर सोमलानें मेले किंवा हवा न मिळाल्यामुळें गुदमरून मेले याची तरी चौकशी नानांना करणें प्राप्त होतें. त्या वेळीं पुण्यांत नामांकित वैद्य होते. सामान्य वैद्यासही विषप्रयोगानें मृत्यू झाला किंवा हवा न मिळाल्यानें गुदमरून मृत्यू झाला, हें कळण्यासारखें असतें. असें असतां नानासारख्या सुतानें स्वर्ग गांठणाऱ्या शहाण्या मनुष्यानें तशी कांहींच चौकशी न करतां गुन्हा शाबीत करण्याचा मूळ पुरावाच नाश करण्याचा हुकूम सोडला, त्याअर्थी या गुन्ह्यांत नानाच प्रामुख्यानें गुन्हेगार ठरत नाहींत काय? अर्थात् खरेशास्त्रयांनीं नानांची मांडलेली बाजू पूर्णपणें लंगडी आहे व

ती वस्तुस्थितीशीं ताडून पहातां फोल टरफलाप्रमाणें सहज उडून जाणारी आहे असें दिसून येईल.

२६. घाशीराम प्रकरणीं नानांच्या एकंदर वर्तनाचा जर विचार केला, तर नानांना धर्माधर्माची किंवा पापपुण्याची अगर नीतिअनीतीची चाड होती असें मुळींच म्हणतां येत नाहीं. ब्रम्हहत्या करणाराला त्या वेळीं तरी महापातकी मानण्यांत येत होतें. असें असतां निरपराधी वैदिक ब्राम्हणांचे वीस पंचेवीस मुर्दे पुण्यांत पडले असतां त्याची नाना चौकशी करीत नाहींत, उलट आपल्या वाड्यांत चैनींत बसून गुन्हेगाराला ते मुर्दे जाळून टाकण्याचा हुकूम फर्मावतात, यांतच नानांच्या अंतःकरणाचें व भावनेचें खरें दृश्य दिसून येतें. पुण्याच्या पांचसात हजार ब्राम्हणांचीं मनें या ब्रम्हहत्येमुळें चिडून गेलीं होतीं, त्यांनीं अन्नपाणी व झोंप याला घाशीरामाचें पारिपत्य होईपर्यंत रजा दिली होती, पालखीपदस्थ पुण्यांतील इतर सरदार ब्राम्हणही या जमावांत सर्रास सामील झाले होते, प्रत्यक्ष पेशव्यांच्या मनाचाही भडका उडाला होता; अशी पुण्यांतील सर्व ब्राम्हणांच्या मनांची वृत्ति वादळी झाली होती. परंतु स्वतःला ब्राम्हण म्हणवून घेणारा पुण्यांतील एकटा नानाच तेवढा या वेळीं घाशीरामाला पाठीशीं घालून, त्याच्या रक्षणाच्या खटपटींत होता. यावरून नानांच्या अंतःकरणाची सहज परीक्षा होते. पेशव्यांकडून एका हातानें श्रावण महिन्याचें पुण्यदान जे नाना ब्राम्हणांना देववितात व दुसऱ्या हातानें आपल्या प्रियपात्राकडून त्याच ब्राम्हणांना लुटून व त्यांना जिवें मारून तेंच दान जे परत घेववितात त्या नानांना कोणत्या कोटींत ढकलतां येईल? या पूर्वी घाशीरामानें पुण्यांत किती दरवडे घातले असतील, किती लोकांचें द्रव्य लुबाडलें असेल हें एका घाशीरामाला किंवा नानाला अगर परमेश्वरालाच माहीत. 'नानांचें पाठबळ कोतवालास असल्यामुळें लोकांचें कांहीं चालेना.'[१] याचाही अर्थ असाच आहे कीं, उगाच कोणी कोणाची पाठ राखीत

१ पे. ब. आवृत्ति ५ वी पा. १३८ टीप ९०.

नाहीं. त्याला तसेच निगडित संबंध असावे लागतात. नाना नवकोट नारायण होते असें ह्मणतात. "नानांची असंख्य दौलत होती, ती नाना कारभार करीत होते तेव्हां पेशव्यांच्या दौलतींतूनच घेतली असावी. नानांचें द्रव्य निरनिराळ्या ठिकाणीं व निरनिराळ्या कारभाऱ्यांचे हाताखालीं ठेवलें होतें, कारण कीं, गरज लागली असतां त्यांजपासून तें जलद मिळावें. नानांनीं जो पैका पुरून ठेवला होता, व त्यांचा जो व्यवहार चालला होता तो गुप्त होता. तो लोकांचे समजण्यांत आला नाहीं."[1] यावरून नानांच्या जवळ असंख्य द्रव्य होतें एवढी मात्र गोष्ट खरी. पेशव्यांच्या तिजोरीवर त्यांनीं छापा घातला ह्मणावें तर पेशवे हे सदा कर्जबाजारीच राहिले. असें असतां नाना कारभार करीत असतां ते नवकोट नारायण कसे बनले? नानांनीं लांच खाऊन पैसा मिळविला. त्यांनीं अन्यायाचीं कामें करून पैसा खाल्ला, लुटीचा पैसा स्वतःच्या घरांत भरला. घाशीरामासारखे रामोशी पोसून, त्यांनीं दरवडे घालावे व नानांनीं ते पचवावे, असें करून द्रव्य मिळविलें. तात्पर्यार्थ एवढाच कीं, सन्मार्गानें नानांना एवढी असंख्य दौलत मिळवितां येणें शक्य नव्हतें. मालक कर्जबाजारी आणि कारभारी नवकोटनारायण असें नानाखेरीज दुसरे उदाहरण इतिहासांत सांपडत नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, नानांनीं संपादन केलेला पैसा जर सन्मार्गानें मिळविलेला असतां, तर तो त्यांना गुप्त रीतीनें ठिकठिकाणीं पेरून ठेवण्याचें कारण नव्हतें. त्यांच्या पैशावर घाशीराम दरवडा घालणार नव्हता अगर पेशवे त्यांचा पैसा जप्त करणार नव्हते. नानाच पूर्ण मुखत्यार असतां त्यांचा अलोट पैसा ज्याअर्थी चोरीच्या द्रव्याप्रमाणें पुरलेला किंवा गुप्तऱ्हेनें लांब लांबच्या पेढ्यांवर पाठविलेला होता, त्याअर्थीं तो अनाचारानेंच मिळविलेला होता याबद्दल शंका वाटण्याचें कारण नाहीं.

---

१ नाना फडनविस, कॅ. मॅकडोनाल्डकृत, पान १२७.

२७. आपल्या हिमतीवर कोणतेंही राजकारस्थान पार पाडावयाचें म्हणजे त्याला पैसा पाहिजे हें नाना आजपर्यंत स्वतःच्या अनुभवावरून शिकले होते. त्यामुळें त्यांच्या डोळ्याला पैसा दिसत होता. सध्यां त्यांच्या ताब्यांत अज्ञान सवाईमाधवराव पेशवे यांची दौलत सांपडलेली होती. तेव्हां अज्ञानाच्या मिळकतीचा त्यांना फायदा मिळतच होता. शिवाय फडके, पटवर्धन हे स्वारीवरील सरदार त्यांचेच होते. श्रीशंकराचार्यांचे मठही लुटून जी संपत्ति आली, त्यांतही-'त्वयार्धं मयार्धम्' असाच प्रकार झालेला असला पाहिज. कारण शृंगेरीचे शंकराचार्य पुण्यास आले असतांही, त्यांना नानांचेकडून योग्य ती दाद मिळाली नाहीं, याचा अर्थ तसाच होतो. एकंदरींत नानांची संपत्ति अशाच निंद्य मार्गानें मिळवलेली होती व त्यामुळेंच तिचा संचय मोठ्या गुप्त तऱ्हेनें करण्यांत आलेला होता. या गोष्टींतून नानांची आणखीही एक कृति उजेडांत येते. कसें झालें तरी नाना हे माणूस होते. त्यांना मानवी हृदय असण्याचा संभव होता. असें असतां संन्याशाचें द्रव्य, गरीब ब्राम्हणांचें द्रव्य, चोरीचें द्रव्य, लांचलुचपतीचें द्रव्य संपादन करून त्यांनीं जें आपलें घर भरलें, तें त्यांच्या मुलांना भिक्षा मागण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून का होतें ? असा प्रश्न येतो. त्यांच्या कुटुंबाची तशी गोष्टच नव्हती. असें असतां लोकांच्या मुंड्या त्यांनीं पैशाकरतां का मुरगळल्या हा प्रश्न शिल्लक राहतो. त्याला एकच उत्तर आहे आणि तें हें कीं, "आपला अधिकार व सत्ता कायम राहण्याकरतां, आपणाला भयंकर दिव्य अशीं कारस्थानें लढवावीं लागणार व असंख्य पैसा खर्च होणार" अशीं स्वप्नें नानांना खात्रीनें पडलेलीं होतीं." याकरतांच नानांनीं पैसा संपादन करण्याचा हा मार्ग स्वीकारला होता हें स्पष्ट दिसतें. एकंदरींत घाशीरामाचें पारिपत्य झालें हें जरी लोकांच्या दृष्टीनें योग्य झालें असें वाटत असेल, तरी त्याचे परिणाम मात्र पुढें अनिष्ट घडून आले यांत शंका नाहीं. नानासारख्या सत्ताधारी श्रीमान् कारस्थानी पुरुषानें त्यामुळें मन दुखविलें गेलें, त्यांची नाचक्की झाली, ही गोष्ट

नानांच्या वृत्तीला तोलण्यासारखी नव्हती. त्यामुळें त्यांची सूडाची भावना जागृत झाली व त्या दृष्टीनें त्यांचें राजकारण हाल्वूं लागल्यामुळें शेवटीं त्यांनीं खेळलेले डाव त्यांनाच सांवरतां आले नाहींत. पेशवाई बुडण्याला जीं कारणें घडलीं त्यांत घाशीराम कोतवालाच्या प्रकरणाचा खात्रीनें समावेश होतो. घाशीरामाला देहांत शासन तारीख ३० माहे आगष्ट सन १७९१ इ. रोजीं मिळालें. या प्रसंगीं लौकिक दृष्टीनें पहातां सवाईमाधवरावांची ही कामगिरी, पेशवेघराण्याला शोभेल अशी अलौकिक होती यांत शंका नाहीं. परंतु त्यामुळें त्यांनीं आपला मृत्यू जवळ ओढून घेण्याला सुरवात केली ही गोष्ट मात्र त्या वेळीं त्यांच्या लक्षांत आली नाहीं.

प्रकरण २६ वें.

शिंद्यांना घरचे दुष्मन नाना.

इ. स. १७८५ ते इ. स. १७९२.

१. नाना व महादजी शिंदे यांचे संबंध.—२ दिल्लीच्या बादशहांनीं शिंद्यांस दिवाण नेमल्यामुळें त्यांचेवर आलेली संकटपरंपरा. शिंद्यांना उत्पन्न झालेल्या संकटांत नाना त्यांना मदत करीत नाहींत.—३ आपण संकटांत सांपडलों असतां व मदतीकरतां नानांना कित्येक वेळां लिहिलें असतां, ते मदत पाठवीत नाहींत म्हणून शिंद्यांचें नानांस निर्वाणीचें पत्र.—४ या पत्रांत शिंद्यांनीं नानांस घेतलेला पहिला चिमटा.—५ सदरप्रमाणें दुसरा चिमटा.—६ सदरप्रमाणें तिसरा चिमटा.—७ सदरप्रमाणें चवथा चिमटा.—८ प्रसंगाच्या वेळीं नाना आपल्याशीं कसें वागतात, हें कसाला लावून पाहण्याचा शिंद्यांचा प्रयत्न.—९ शिंद्यांच्या निर्वाणीच्या पत्राप्रमाणें होळकर व अलीबहाद्दर यांचेबरोबर सैन्य देऊन, त्यांस नाना शिंद्यांच्या मदतीकरतां पाठवितात. शिंद्यांस नानांची ही मदत होणारी नसून, उलट त्यांना जास्त पेंचांत आणण्याचा नानांचा हा गुप्त प्रयत्न होता.—१० नानांनीं शिंद्यांना पाठविलेल्या मदतीच्या माकडचेष्टा.—११ शिंदे राजपुतान्यांतील लढायांत गुंतल्यामुळें बादशहाच्या सरदारांनीं बादशहावर दिल्लीस उडवलेला हाहाःकार.—१२ बादशहाचा सरदार इस्माइलबेग बादशहाचे डोळे फोडतो. त्याचे दुसरे अत्याचार.—१३ शिंद्यांना ही हकीकत समजतांच ते बादशहाच्या मदतीकरतां धांवून येतात. गुलाम कादर किल्ल्यास आग लावून पळून जातो.—१४ गुलाम कादरचा शिंदे पराभव करतात. त्याच्या कर्माबद्दल त्याला यथायोग्य देहांत प्रायश्चित्त शिंदे देतात.—१५ शिंद्यांच्या या पराक्रमाबद्दल बादशहास मोठा संतोष होतो. बादशहा शिंद्यास 'मदार उल्‌म-हाम् आलिजाबहाद्दर' असा किताब देतात, व त्याचप्रमाणें शिंद्यांचे मालक पेशवे यांसही बादशहा 'वकील-इ-मुतलक' हा किताब देतात. शिंदे बाद-शहाकडून गोवधबंदीची सनद मिळवितात.—१६ दिल्ली दरबारांतील शिंद्यांच्या गौरवाच्या बातमीमुळें नाना विस्मयचकित होतात.—१७ नानांच्या कारवाईमुळें

होळकर व अलीबहाद्दर, शिंद्यांशीं बद्चाल धरतात असा शिंद्यांना संशय.—१८ सवाईमाधवरावांकडे नानाविरुद्ध फिर्याद करून न्याय मिळवून घेण्याकरतां शिंदे पुण्यास जाण्याची तयारी करतात.—१९ इस्माईल बेगच्या पारिपत्याकरतां शिंद्यांच्या सरदारांची तयारी.—२० शिंद्यांचे सरदार जिवबादादा बक्षी हे इस्माईल बेगचें बंड मोडतात व त्यास कैद करतात.—२१ होळकर व अलीबहाद्दर यांनीं आपणाविरुद्ध चालविलेल्या कटकटींचा बंदोबस्त करण्याकरतां, शिंदे पुण्यास जाण्याचें ठरवितात.—२२ शिंदे पुण्यास येतात याबद्दल निरनिराळे तर्कवितर्क. ते पुण्यास येऊन पोंचतात.

१. नानांनीं आजपर्यंत पुण्याचीं जीं महत्त्वाचीं राजकारणें लढविलीं, तीं प्रामुख्यानें महादजी शिंदे यांच्या बळावर लढविलीं होतीं. महादजींनीं पहिल्यापासून नानांचा पक्ष धरला. न्याय अगर अन्याय याचा स्वतंत्र तऱ्हेनें विचार न करतां नानांच्या सल्ल्याप्रमाणें त्यांनीं प्रत्येक गोष्ट घडवून आणली. नंतर दक्षिणेंत स्थिरस्थावरता झाल्यामुळें ते परत उत्तर हिंदुस्थानांत स्वस्थानीं गेले. नंतर थोड्याच दिवसांत नानांना टिपूच्या पारिपत्याची आस्था उत्पन्न झाली. त्यामुळें त्यांनीं आपलें सर्व लक्ष तिकडे दिलें. टिपूच्या पारिपत्याचें काम सुमारें सात आठ वर्षे चाललें होतें. या अवधींत नानांनीं प्रामुख्यानें इंग्रजांची मदत घेतली. निजामही त्यांच्याच मदतीकरतां पहिल्यापासून झटत होता. नागपूरकर भोंसले, होळकर हेही सरदार नानांच्या सेवेंत सारखे राबत होते. हें सर्व बळ एकवटून टिपूला वठणीवर आणावयाला १७९२ इसवीचें तोंड नानांना पहावें लागलें. त्याचप्रमाणें महादजी हिंदुस्थानांत गेल्यावर त्यांच्यामागें दिल्लीचें पादशाही प्रकरण लागलें. मराठ्यांचा उत्तर हिंदुस्थानांत अंमल चालविणें ही गोष्ट कांहीं सामान्य नव्हती. इंग्रजांनीं दिल्लीच्या राजकारणांत आपण पडत नाहीं, असें जरी महादजींस सांगितलें होतें, तरी त्याबद्दल त्यांना अभिलाष नव्हता असें मात्र नाहीं. दिल्लीच्या पादशाही सत्तेचा लोण्याचा गोळा या वेळीं इंग्रजांना, त्यांच्या मागें इतर कुलंगडीं बरींच असल्यामुळें,

पचण्यासारखा नव्हता, म्हणून दिल्लीच्या राजकारणाकडे त्यांनीं परिस्थितीमुळें दुर्लक्ष केलें होतें एवढेंच. दिल्लीच्या पादशाहींतील सरदार दिल्लीपतीच्याच डोक्यावर चढून बसूं लागल्यामुळें त्यांच्या बंदोबस्ताकरतां दिल्लीपती शहाअलम पादशहानें शिंद्यांच्या मदतीची याचना केली. त्याप्रमाणें महादजींनीं त्यांना सहाय्य करून दिल्लीचे सर्व बखेडे मोडले. त्यामुळें पादशहा महादजींवर खूष होऊन त्यानें महादजींस आपला कारभारी व सेनापती नेमून त्यांचे ताब्यांत दिल्ली व आग्रा हीं शहरें दिलीं, हा इतिहास मागें आलाच आहे.

२. इ. स. १७८५ च्या मे महिन्याच्या पहिल्या तारखेस बादशहानें मोठा दरबार भरवून पेशव्यांस 'वकील-मुतलखीचें' पद आणि शिंद्यांस त्या पदाचीं नायबगिरीचीं वस्त्रें दिलीं. दिल्लीपतीनें पेशवे व शिंदे यांचा केलेला गौरव, महमदबेग हमदानी वगैरे पठाण सरदार, जयपूर, जोधपूर येथील रजपूत राजे, राघोगड, रामगड येथील गिराशिये यांना बिलकूल सहन झाला नाहीं. त्यांनीं सर्वांनीं मिळून शिंद्यांवर हत्यार उपसलें. तारीख २९ जुलै स. १७८७ इ. रोजीं जयपुराजवळ लालसोट येथें शिंद्यांचें रजपूत व पठाण यांच्याशीं तुंबळ युद्ध झालें. या युद्धांत महमदबेग ठार झाला आणि रजपूत व पठाण यांचा मोड झाला. परंतु लढाईनंतर शिंद्यांचें बहुतेक सैन्य शत्रूला फितूर झालें. त्यामुळें महादजींना ग्वाल्हेरीपर्यंत मागें पाय घ्यावा लागला. या वेळीं शिंद्यांच्या सैन्यांत हिंदुस्थानी परदेशी लोकांची बरीच भरती होती. त्यामुळें ते शत्रूला फितूर झाले. शिवाय एकट्या शिंद्यांवर एकाच वेळीं रजपूत राजे, पठाण सरदार, गिराशिये वगैरेंनीं एकदम हल्ला चालविला, त्यामुळें त्यांना माघार घ्यावी लागली. महादजी खंदा लढवय्या होता म्हणूनच या प्रसंगीं तो शीरसलामत वांचला. दुसरा कोणाताही कमदर्जाचा मराठा सरदार अशा प्रसंगाला टिकला नसता. या प्रसंगीं महादजींस कोणाचीच मदत झाली नाहीं; उलट 'रजपुतांस महादजी-

विरुद्ध उठण्यास आंतुन पुणें दरबारची फूस होती.' तसेंच 'या वेळीं (उत्तर-हिंदुस्थानांत) पेशव्यांची कांहीं फौज शिवाजी विठ्ठल याचे हाताखालीं होती, तीही महादजीच्या मदतीस न जातां अलग रहात असे.'[१] यावरून दिल्लीच्या प्रकरणीं महादजींस तोंडघशीं पाडण्याचा नानांचा डाव चालला होता असें दिसून येतें. शिंद्यांनीं या प्रसंगीं नानांकडे मदतीची याचना केली होती. त्याप्रमाणें 'नानांनीं अली बहादूर याच्या हाताखालीं कांहीं फौज तयार केली होती, परंतु नानांचे मनांतून आपले प्रतिस्पर्धी शिंदे, महान लोभी यास रजपूताच्या प्रांतीं सत्ता व अधिकार दृढ करूं न देतां मराठ्यांचा अंमल वाढवावा असें होतें, ह्मणून पेशव्यांचे नांवानें रजपूत लोकांशीं कांहीं निराळा ठराव करण्याकरतां ही फौज नेमिली होती.'[२] पुढें नानांकडून शिंद्यांस मदत न गेल्यामुळें त्यांना ग्वाल्हेरीस परत यावें लागलें.

३. लालसोटच्या पीछेहाटीमुळें दिल्ली दरबारांतले मोंगलिये, रजपूत, जाठ, गिराशिये आणि पंजाबांतले शीख यांना मोठेंच अवसान चढलें, आणि मराठी गव्हारांना चमेलीपार ढुसकून लावावें अशा त्यांच्या वल्गना सुरू झाल्या.[३] अशा चारी बाजूंनीं आलेल्या संकटांत शिंदे सांपडले असतां आणि अनेक वेळां मदत करण्याविषयीं पुण्यास नानांना त्यांचीं पत्रें जाऊन नानांकडून मदत आली नसतांही, फिरून एक पत्र महादजींनीं नानांस लिहिलें. हें पत्र निर्वाणीचें होतें. या पत्रानें नानांच्या डोळ्यांत अंजन घालण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे. तें पत्र असें:—[४]

"या समयीं मी नाईलाज झालों आहे, असें नाहीं. परंतु इंग्लिश लोक दिल्लीचे बादशहाशीं व रजपूत लोकांशीं दोस्ती करणार आहेत. ती झाली असतां बादशहानें त्यांस सहाय्य दिल्ह्यानें हिंदुस्थानामध्यें जो

---

१ नातूकृत महादजी शिंदे यांचें चरित्र पा. २०३. २ ना. फ. यांची बखर, कॅ. मॅकडोनाल्ड कृत, पा. ९०. ३ खरेकृत ना. फ. च. पा. ११८. ४ कॅ. मॅकडोनाल्डकृत ना. फ. याची बखर, पा. ८८.

अधिकार त्यांस प्राप्त होईल, तो त्यांस प्राप्त होऊं दिला तर मराठ्यांचें राज्यास धक्का बसेल, याविषयीं आपण विचार करावा. माझ्या मनांत आपणाविषयीं मत्सरभाव नाहीं, व आपल्या मनांत मजविषयीं कांहीं असल्यास तो सोडून द्यावा. होळकर, हरिपंत, व परशुरामभाऊ यांस विचारा कीं, मी कधीं त्यांचे कामामध्यें **लांडा कारभार केला होता कीं काय?** आणि मी नेहमी राज्य वृद्धिंगत होण्याकरतां श्रम केला नाहीं? **आपण सर्व एका धन्याचे चाकर** यास्तव मराठ्यांचे कल्याणार्थ आपण यत्न करावा. जर तुमचे मनांत मजविषयीं संशय असला तर तुम्हीं आपल्या मनांत विचार करून पहा, कीं मोरोबाचे बंडापासून तुमचें रक्षण कोणी केलें? तुमचे शत्रू सखारामबापू यांस तुमचे ताब्यांत कोणी आणून दिलें? **सदाशीवरावभाऊ**[1] **यानें राज्यावर माझा वारसा आहे** असे बोलणें घालून बंड केलें होतें तें कोणीं मोडलें? व इंग्लिश लोकांस तळेगांव येथें जिंकून स्वारी खर्चाबद्दल मोठे खंड त्याजवर बसवून आपला नफा होईल असा सल्ला कोणीं केला? हे सर्व केलेले उपकार आपण स्मरून मनांत संशय असेल तो सोडून द्यावा. व दोघांस एकमेकांच्या चहाड्या सांगणारे जे शत्रू त्यांचीं तोंडें बंद करावीं. हिंदुस्थानांतील सर्व मराठे लोकांनीं धैर्य धरून आपलें राज्य दुसऱ्या लोकांस न घेऊं देतां बचावावें." या प्रमाणें शिंद्यांनीं नानांना पत्र पाठविलें. यांत दोन चार ठिकाणीं नानांना चांगलेच चिमटे काढले आहेत.

४. (१) 'आपण सर्व एका धन्याचे चाकर' या वाक्यप्रयोगानें नानाही आपल्याप्रमाणें सवाईमाधवराव पेशव्यांचे एक नोकर आहेत, याची त्यांना जाणीव दिली आहे. नाना हे पेशव्यांचे अज्ञानपालनकर्ते झाल्यापासून, त्यांना आपण चाकर आहेत याचा विसर पडला असावा अशी शंका महादजी यांना येऊं लागली होती. म्हणून त्यांनीं नानांना 'यास्तव मराठ्यांचे कल्याणार्थ आपण प्रयत्न करावा' अशी सूचना केली आहे. याचा भावार्थ एवढाच कीं आपल्याप्रमाणेंच नाना हे पेश-

---

१ या मजकुरावरून शिंदेही सदाशिवरावभाऊंस तोतया समजत नव्हते हें स्पष्ट होतें.

त्यांचे चाकर आहेत. आपण सर्वांनीं मिळून एक विचारानें धन्याचे राज्याचा विस्तार केला पाहिजे. केवळ आपलीच बडेजाव मिरविल्यानें धन्याचें कल्याण होत नाहीं. सध्यां नानांची अशी दृष्टि नाहीं म्हणून महादजींनीं त्यांना वरीलप्रमाणें समज दिली आहे. हेतु एवढाच कीं, आतां तरी नानांनीं आपल्या वर्तणुकींत फरक करावा.

५. (२) 'होळकर, हरीपंत व परशुरामभाऊ यांस विचारा कीं, मी कधीं त्यांचे कामामध्यें लांडा कारभार केला होता कीं काय!' या वाक्यांत 'लेकी बोले आणि सुने लागे' अशा प्रकारचा गर्भित अर्थ आहे. आपल्याप्रमाणेंच होळकर, हरिपंत फडके व परशुरामभाऊ हेही चाकरच आहेत. पेशव्यांकडून एकदां एकाला चाकरी नेमून दिली म्हणजे त्यांत दुसऱ्या चाकराला लांडा कारभार करण्याची जरूरी नाहीं. याप्रमाणें शिंदे पेशव्यांच्या इतर चाकरांबरोबर वागत आले. असें असतां व हिंदुस्थानचें राजकारण एकदां नानांच्याच विचारानें शिंद्यांनीं हातीं घेतलें असतां त्यांत पुन्हां नानाच लांडा कारभार करीत आहेत हें दर्शविण्याकरतां शिंद्यांनीं नानांना तसें लिहिलें आहे. शिंद्यांविरुद्ध रजपुतांस फूस देणें, विंचूरकर यांनीं अंगचोरपणा करणें, वगैरे नानांच्या संकेतानें गोष्टी घडत आहेत अशी महादजींची समजूत होती. तेव्हां नानांनीं आपल्या व्यवहारांत लांडा कारभार करूं नये याच हेतूनें शिंद्यांनीं ही सूचना दिली आहे.

६. (३) 'सदाशिवरावभाऊ यानें राज्यावर माझा वारसा आहे असें बोलणें घालून बंड केलें होतें तें कोणी मोडलें?' या वाक्यप्रयोगानें नानांना फारच मोठा चिमटा घेतला आहे. यांत त्यांनीं 'तोतया सदाशिवरावभाऊ' असें म्हटलें नाहीं. खऱ्या सदाशिवरावभाऊंना तोतया ठरवून नानांनीं कारस्थान केलें त्यालाही शिंद्यांनीं मदत केली. खोट्या व अन्यायाच्या कामींही शिंद्यांनीं नानांची पाठ राखून त्यांना वांचविलें आहे. हे शिंद्यांचें नानांवर उपकाराचें ओझें आहे याचीही यांत ओळख करून दिली आहे.

७. (४) 'मोरोबाचे बंडापासून तुमचें कोणी रक्षण केलें? तुमचे शत्रू सखारामबापू यांस तुमचे ताब्यांत कोणी आणून दिलें?' या दोन प्रसंगाचें पुन्हां नानांना स्मरण करून देण्यांतही अंतःस्थ हेतू होता. मोरोबा व सखारामबापू हेही पेशव्यांचे आपल्याप्रमाणेंच चाकर होते. त्यांनीं नानांना घरीं बसविलें म्हणून कांहीं पेशवाई बुडत नव्हती. असें असतां केवळ नाना या व्यक्तीकरतां महादजी यांनीं त्यांचा पक्ष धरला. या दोघांचे पारिपत्य शिंद्यांनीं केलें तें, केवळ नाना या व्यक्तीवर उपकार करण्याकरतां होतें. असें वरील दोन वाक्यांमध्यें महादजींनीं नानांना ध्वनित केलें आहे.

८. याप्रमाणें शिंद्यांनीं आपल्या पत्रांत नानांना चिमटे घेऊन मदत पाठविण्याबद्दल लिहिलें. चिमटे घेऊन मदतीची याचना करणें ही पद्धत वर वर पहाणाराला विचित्र वाटेल; परंतु ती तशी नाहीं. नानांचें सत्व पहाण्याकरतांच हें पत्र होतें. महादजी हे नानांच्या मदतीवर बिलकुल अवलंबून नव्हते. त्यांनीं या पत्राच्या सुरवातीलाच " या समयीं मी नाईलाज झालों आहे, असें नाहीं." असें स्पष्ट म्हटलें आहे. यावरूनच असें दिसतें कीं, या वेळीं नाना आपल्या कर्तव्याला कितपत जागतात तें पाहून नंतर आपण पुढें त्यांच्याबरोबर कसें वागावें हें महादजी ठरविणार होते.

९. महादजींच्या या निर्वाणीच्या पत्राप्रमाणें नानांनीं तुकोजी होळकर व अली बहादर यांस त्यांच्या मदतीकरतां रवाना केलें. नानांनीं शिंद्यांना या वेळीं ही जी मदत पाठविली ती त्यांच्या संकट प्रसंगीं खरोखरच उपयोगी पडावी म्हणून पाठविली कीं, केवळ वर वर मदत दिसावी व आंतून महादजींना सपशेल खालीं पाडावें, म्हणून नवीन कारस्थान करण्याकरतां पाठविली होती, हें पुढील हकीकतीवरून दिसून येईल. तुकोजी होळकर व समशेर बहादराचा मुलगा अली बहादर, हे शिंद्यांना सहाय्य करण्याकरतां पुण्याहून निघाले. ते माळवा प्रांतांत

गेले; परंतु तेथून पुढें दिल्लीकडे जाण्याविषयीं होळकर टाळाटाळ करूं लागले.[१] त्यांच्या मनांत शिंद्यांच्या हाताखालीं काम करण्याचें बिलकुल नव्हतें. त्यांचेमध्यें व शिंद्यांचें मध्यें अलीकडे बरेंच वैमनस्य उत्पन्न झालें होतें. ते माळव्यांतून दिल्लीकडे कां येत नाहींत, त्यांच्या मनांत आपल्या विषयीं कांहीं किंतु राहिला असेल, तर तो साफ व्हावा म्हणून त्यांना घेण्याकरतां महादजींनीं आपला सरदार अंबोजी इंगळे यास तिकडे पाठविलें. तो माळव्यांत जाऊन त्यांना नेण्याकरतां धरणें धरून बसला. तेव्हां बापू होळकर व अलीबहादर हे मात्र निघून दिल्लीकडे जाऊन शिंद्यांना मिळालें. तुकोजी होळकर यांनीं शिंद्यांचीं आर्जवें जुमानलीं नाहींत व ते राजपुतान्यांतच खंडण्या वसूल करीत स्वस्थ राहिले. नानांच्या राजकारणाचा हातखंडा असा होता कीं, त्यांचें लिहिणें एक, तर आंतून फूस निराळीच असून, करणें भलतेंच होतें.

१०. अलीबहादर शिंद्यांना मदत करण्याकरतां त्यांना जाऊन मिळाला, पण त्यानेंही शिंद्यांबरोबर चुरस सुरू केली. शिंद्यांनीं एकादी गोष्ट करावी आणि प्रत्येक वेळीं अलीबहादरानें त्याला मोडता घालावा, असें प्रत्यहीं होऊं लागलें. होळकरांनीं राजपुतान्यांत जाऊन शिंद्यांविरुद्ध रजपुतांशीं मिलाफ केला, एवढेंच नव्हे तर शिंद्यांचा कट्टा शत्रू इस्माईल बेग यालाही त्यांनीं गुप्तपणें आश्रय दिला. अलीबहादरानें तर शिंद्यांविरुद्ध फितूर करणाऱ्या अनुपगीर हिंमतबहादर नांवाच्या सरदाराला उघडपणें आपल्या लष्करांतच हट्टानें आश्रय देऊन ठेवून घेतलें.[२] यावरून शिंद्यांना नानांनीं जी मदत पाठविली ती कशा प्रकारची होती हें दिसून येईल. शिंद्यांना मात्र हे घरचेच जळते निखारे पदरांत बांधून घेतल्याप्रमाणें झालें.

११. ‘ घरचा चोर जिवानिशीं मारी ’ या म्हणीप्रमाणें शिंद्यांना नानांनीं पाठविलेल्या मदतीची अवस्था झाली. तरी अशा स्थितींतही त्यांनीं धीर सोडला

---

१ खरेकृत ना. फ. च. पा. १३९. २ खरेकृत ना. फ. च. पा. १४१.

नाहीं. त्यांनीं आपल्याच पायावर उभें राहून सर्व बंडाळी मोडण्याचा निश्चय केला. या वेळीं इस्माईलबेग हा गुलाम कादर यास दिल्लीला जाऊन मिळाला होता. या दोघांनीं दिल्लींत मोठा कहर उडविला. गुलाम कादरानें पदभ्रष्ट झालेल्या वृद्ध बादशहास व त्याच्या मुलांस वस्त्रहीन करून, त्यांच्याकडील एकंदर मौल्यवान चीजवस्त घेऊन त्यांस कारागृहांत कोंडलें व त्यांना अन्नपाणी न देण्याविषयीं ताकीद दिली. नंतर तेथून उठून बेदरबस्ताचे सहाय्यानें त्यानें झनानखाना व राजपुत्रांचे महाल सर्व लुटून फस्त करून एकंदर भांडीं, वस्त्रें, हत्यारेंसुद्धां लुबाडून घेतलीं. शहा अलम बादशहास गुलाम कादरनें मोती महालांत कोंडलें होतें. त्याच्या समक्ष त्यानें शहाजादे अकबर व सेखो यांना प्रखर उन्हांत उभें करून बेदम मार दिला. तरी पैसा मिळेना. पुढें झनानखान्यांतील दासींनाही मरे मरेपर्यंत मारून आपल्या लोकांकडून त्यांची अत्यंत अमर्यादा केली. अखेरीस जेव्हां मुबलक पैसा मिळण्याविषयीं त्याची इच्छा सफल होईना, तेव्हां त्याला असें सुचलें कीं, द्रव्य पुरलेलें असेल व तें कोठें आहे तें बादशहासच माहीत असलें पाहिजे. तेव्हां त्यानें बादशहाला दिवाण-इ-खासांत ओढून आणून त्याला चाबकानें मारलें. तेव्हां त्या बादशहानें काकुळतीस येऊन सांगितलें कीं, " बाबारे मजपाशीं द्रव्य मुळींच नाहीं व कोठें पुरलेलेंही नाहीं. आतां मला छळूं नकोस. एकदां माझीं आंतडीं तरी फाडून घे; पण या यातनेंतून सोडीव!" परंतु तिकडे त्या राक्षसानें लक्ष दिलें नाहीं. बादशहा बेहोष होऊन पडल्यावर गुलामानें झनानखान्यांतल्या खाशा स्त्रियांस आणून त्यांचेही नानाप्रकारें छळ केले. हें चाललें असतां कोंडून ठेवलेल्या माणसांपैकीं लहान लहान कोमल मुलें पाण्यावांचून व्याकूळ होऊन मरण पावलीं. तरीही त्या दुष्ट, महानीच, अधमाधम पठाणास दयेचा पाझर फुटला नाहीं. तीं जेथें मेलीं तेथेंच त्यांस गाडण्याचा त्यानें हुकूम दिला!

१२. गुलाम कादरचा साथीदार इस्माईल बेग हा शहराबाहेर होता. गुलाम कादरानें सुमारें पांच लाख रुपये त्याचेकडे पाठवून जास्त भरती-

साठीं शहर लुटावें ह्मणून त्यास निरोप पाठविला. नंतर एके दिवशीं त्यानें बादशहास आपलेपुढें आणून उभें केलें व त्याला पुन्हां त्याचा खजिना कोठें आहे ह्मणून विचारलें. त्यांनीं आपणास माहीत नाहीं असें ह्मट-ल्याबरोबर, गुलाम कादरानें तख्तावर बसल्या ठिकाणाहून खालीं उडी टाकली व वृद्ध शहा अलम बादशहास खालीं पाडून तो त्याच्या छातीवर बसला. आणि ह्मणाला "ठेवा कोठें आहे तो दाखवितोस कीं डोळे काढूं ?" तेव्हां बादशहा ह्मणाला 'माझ्या डोळ्यांनीं थोडेंच सुख आतां पहाण्याचें आहे, परंतु मला कुराण वाचण्यास त्यांचा उपयोग होतो, तेवढ्याकरतां तरी ते कायम ठेव.' परंतु त्या दुष्टानें तिकडेही दुर्लक्ष करून पेषकबजानें त्याचे दोन्ही डोळे फोडले. हें अधमपणाचें कृत्य पाहून जिकडे तिकडे हाहाःकार उडाला. त्यानें जनानखान्यांतील तरुण व सुंदर स्त्रियांस आणून त्यांस बेदम मार दिला, आणि ज्यांचें नखही परपुरुषाचे दृष्टीस पडलें नव्हतें, त्यांना विवस्त्र करून, आपल्या लोकांकडून त्यांची विटंबना करविली.

१३. इ. सन. १७८८ च्या आगष्ट महिन्याच्या १४ तारखेस शिंद्यांची फौज दिल्लीजवळ येऊन पोंचली. त्यांनीं गुलाम कादराला घोसगडाहून रसद येत होती, तिजवर छापा घालून, शेंकडों पठाण कापून काढले व शत्रूकडे अन्नाचा तुटवडा पाडला. असें महिना दोन महिने काम चालविल्यावर, आपला येथें कांहीं निभाव लागत नाहीं असें पाहून, एके दिवशीं गुलाम कादरानें, राजघराण्यांतील लोकांची जळून राख व्हावी व आपणालाही पळून जाण्याला अवधी मिळावा, ह्मणून किल्ल्यांतील लाल बुरुजांत दारू भरून तिला बत्ती दिली. त्यामुळें भयंकर मोठा आवाज होऊन सर्व दिल्ली दणाणून गेली व लोक भयभीत झाले. या गडबडींत गुलाम कादर आपल्या लोकांसह पळून गेला. नंतर शिंद्यांची फौज आंत घुसली. त्यांनीं सर्व आग शांत केली व वाड्यांतील सर्व राजकैद्यांची मुक्तता करून त्यांची पहिल्यानें अन्नवस्त्राची व्यवस्था केली.

१४. गुलाम कादर दिल्लीहून पळाला तो, थेट मिरतच्या किल्ल्याचा आश्रय घेऊन राहिला. त्याचेमागें शिंद्यांची फौज लागली. त्याबरोबर तो निकरानें लढला. पुढें किल्ल्यांतलीही धान्याची बेगमी संपली, तेव्हां तो तारीख २१ डिसेंबर सन १७८८ रोजीं आपल्याबरोबर निवडक पांचशें स्वार घेऊन शिंद्यांच्या फौजेची फळी फोडून निघाला. शिंद्यांची फौज त्याच्यामागें लागलीच होती. पुढें तो घोड्यावरून पडून जखमी झाला, तेव्हां त्याला कैद करून मथुरेला आणलें. महादजींनीं त्याची मथुरेमध्यें गाढवावर उलटें बसवून धिंड काढली व नंतर त्याचे डोळे काढले. पुढें तो शिव्या देऊं लागला ह्मणून त्याची जीभ तोडली व अखेरीस त्याचें नाक, कान, हात, पाय तोडून तसा तो गोळा बादशहाचें सांत्वन करण्यासाठीं दिल्लीस पाठविला. परंतु तेथें पोंचण्याचे अगोदरच ता. ३ मार्च सन १७८९ रोजीं तो मरण पावला.[१]

१५. नंतर शिंद्यांनीं गुलाम कादर याची जहागीर व बहुतेक प्रांत व दिल्ली आग्रा हे दोन परगणे घेतले. त्यामुळें पुन्हां त्यांचा अंमल चोहोंकडे बसला. नंतर थोडक्याच दिवसांनीं महादजी मथुरेहून दिल्लीला गेले व त्यांनीं बादशहाची भेट घेतली, तेव्हां त्यांना फार संतोष झाला. त्या वृद्ध शहा अलम बादशहानें महादजींस आपला मुलगा असें मानलें व त्यांचा फार मोठा गौरव केला. महादजींनीं बादशहास गादीवर बसविलें व त्याच्या खर्चासाठीं सालीना नऊ लाख रुपये देण्याचा ठराव केला. हा वेळपर्यंत महादजी हे पेशव्यांचे सरदार केवळ पाटीलबुवा होते. त्यांस बादशहानें त्यांच्या कर्तबगारीबद्दल "मदारउल्महाम, अलिजाबहादुर" असा बहुमानाचा किताब देऊन त्यांचा मोठा लौकिक वाढविला. त्याचप्रमाणें शिंदे हे ज्या पेशव्यांचे चाकर, त्या सवाईमाधवरावांचाही गौरव करण्यास बादशहा विसरले नाहींत. त्यांनीं पेशव्यांस 'वकील-इ-मुतलक' हा किताब दिला. याच वेळीं दिल्ली व आग्रा वगैरे प्रांत महादजींनीं खालसा करून

१ नातुकृत महादजी च. पा. २२०.

आपल्या राज्यांत सामील केले व आपल्या राज्यांत गोवध बंद करण्यासाठीं बादशहाची सनद मिळविली.

१६. दिल्लीच्या बादशहाकडून नामधारी पेशव्यांना व शिंद्यांना पदव्यांचीं खैरात वांटण्यांत आली. पण त्या वेळीं पेशवाई चालविणारे सवाईमाधवरावांचें अज्ञानपालक नाना फडनविस, यांची बादशहाला आठवण झाली नाहीं किंवा महादजींनीं ती केली नाहीं. त्यामुळें मानी नानांना किती वाईट वाटलें असेल याची खरी कल्पना दुसऱ्यांना येणें शक्य नाहीं. नानांच्या साथीदारांना काय थोडीबहुत आली असेल ती असेल! शिंद्यांच्या या गौरवाबद्दल पुण्यास नानांच्या वाड्यांत काय भडका उडाला असेल तो असो! पण याविषयीं कोणाला बरें वाटलेलें मात्र दिसलें नाहीं. असो. महादजींना हिंदुस्थानांत हा मोठा विजय मिळाल्यानंतर ते स्वस्थ न बसतां त्यांनीं आपल्या राज्यांतील बंदोबस्ताकडे पहिल्यानें लक्ष दिलें.

१७. पुण्याहून महादजींना मदत करण्याकरतां आलेले होळकर व अलीबहादर हे सरदार त्यांना सरळ मदत न करतां शिंद्यांच्या कारभारांत मात्र वाटेल ती ढवळाढवळ करूं लागले. त्यामुळें दिवसेंदिवस हें प्रकरण चिघळूं लागलें. होळकर अंगचोरपणा करून आणि शत्रूला सामील होऊन आपला नाश करूं पहातात अशी शिंद्यांची तक्रार होती. शिंदे अरेरावीनें वागतात व पूर्वपरंपरा न पाहतां मनमानेल तसा कारभार करतात, अशी होळकरांची तक्रार होती. शिंदे व होळकर हे दोघेही सरदार चोर आहेत; ते आपणाला न विचारतां परभारें संस्थानिकांच्या खंडण्या घेऊन गिळंकृत करतात आणि सरकारांत एक पैसा देखील जमा करीत नाहींत अशी अलीबहादराची तक्रार होती. अशा प्रकारें तिघांच्या तीन प्रकारच्या तक्रारी होत्या. तरी त्यांत विशेष हा होता कीं, शिंद्यांविरुद्ध एकादी गोष्ट करावयाची झाली तर मात्र होळकर व अलीबहादर हे दोघे तत्काळ एक होत होते. यावरून महादजींची ठाम समजूत झाली कीं, नानांची फूस मिळाल्यावरूनच हे दोघे अशी बदचाल धरतात. "इतके[१] केलें नानानीं.

---

१. भा. इ. सं. मं. सप्तम संमेलन वृत्त पृ. ४४.

अल्लीबहादर याचें सामर्थ्य किती ? नानांनीं असें करावें असा ऋणानुबंध नानांचा माझा नव्हता. परंतु गोसाव्याच्या (अनुपगीर) योगें करून अल्लीबहादर यांणीं करविला. याचे सावसाल पुण्यास गेल्यावर नानांचे माझे रुबरू (समक्ष) होतील."

१८. महादजी शिंदे यांच्या कानावर पुण्याचें घाशीरामप्रकरण गेलेंच होतें. त्यामुळें आपले धनी सवाईमाधवराव, पेशवाईचे मालक, आतां जाणते झाले आहेत व ते न्यायनिवाडा करण्याइतके प्रबुद्धही झाले आहेत असें त्यांना वाटलें व आपली फिर्याद आतां त्यांच्यापुढें मांडली असतां आपल्याला न्याय मिळेल अशी त्यांना आशा वाटूं लागली. कारण शिंद्यांची फिर्याद प्रत्यक्ष नानांबद्दलची होती. महादजी हे स्वामीनिष्ठ असल्यामुळें धन्याच्या तोंडचा जो निकाल मिळेल तो त्यांना मान्यच होता. महादजींनीं आपल्या मनाशीं असा विचार करून व आपल्या जहागिरीच्या कारभाराचा बंदोबस्त करून पुण्यास जाण्याचें निश्चित केलें. या वेळीं शिंद्यांचे अजमीर प्रांताचे सरसुभे शिवबा नाना होते. ग्वाल्हेर व रजपुतस्थानचे सरसुभे गोपाळरावभाऊ यांस शिंद्यांनीं नेमलें. माळवे प्रांताचे सरसुभे विश्राम नरहर केरकर हे होते. मेवाड प्रांतांत अंबाजी इंगळे हे सरसुभे होते. या सर्वांवर जिवाबादादा बक्षी हे होते. याप्रमाणें आपल्या जहागिरीची व्यवस्था त्यांचेकडे सोंपवून व दिल्लीची मसलत होळकर व अल्लीबहादर यांच्यावर सोंपवून ते पुण्याकडे निघाले.

१९. होळकरांनीं शिंद्यांचा कट्टा शत्रू इस्माईल बेग यास आश्रय दिला होता हें मागें आलेंच आहे. शिंदे पुण्यास जाण्याच्या तयारींत असतां त्यानें बंड उभें केलें होतें. इस्माईल बेगचें बंड मोडून त्याला जिवंत धरण्याबद्दल शिंद्यांनीं निघते वेळीं सांगितलें होतें. जिवबादादांनीं त्याच्या पारिपत्याकरतां जगोबाबापू, लखबादादा, व पेरण हे सरदार पाठविले. मेवाड प्रांतीं नजब कुलीखान म्हणून एक मुसलमान सरदार होता. त्याला गुलाम कादर याची बहीण दिली होती. नजब कुलीखान

मेल्यावर त्याची बायको नवऱ्याप्रमाणेंच फौज बाळगून आपला अधिकार वहिवाटून होती. ती बाई आपला भाऊ गुलाम कादर याच्या प्रमाणेंच क्रूर, धाडशी व शूर होती. या बेगमेनें शिंद्यांचा हुकूम न मानतां इस्माईल बेगास मदत देऊन, कानोड येथें किल्ल्याच्या आश्रयानें राहून बंडाचा झेंडा उभारला. इस्माईल बेग आपली वीस हजार फौज व तीस तोफा यासह तिच्या मदतीस आला.

२०. शिंद्यांच्या सरदारांनीं इस्माईल बेगच्या फौजेवर हल्ला करून एकाच हल्ल्यांत त्याचे दोन हजार लोक ठार केले. त्यामुळें किल्ल्याबाहेर राहून आपला निभाव लागत नाहीं असें पाहून तो कानोड किल्ल्यांत गेला. हा किल्ला मजबूत होता. त्यांत पुष्कळ सैन्य व सामुग्री भरपूर असल्यामुळें वाटेल तितके दिवस लढाई चालवितां येईल अशी त्याची समजूत होती. त्यानें किल्ल्यावर नाक्यानाक्याशीं तोफा रोंखून शिंद्यांच्या फौजेवर मोठी मारगिरी सुरू केली. शिंद्यांच्या सरदारांनींही उलट मोठा मारा सुरूं केला. यामुळें उभयपक्षीं सैन्याची खराबी होऊं लागली. याप्रमाणें ही लढाई कांहीं दिवस चालली. नंतर शिंद्यांच्या सरदारांस जिवबादादा आपल्या फौजेसह येऊन मिळाले. नंतर त्यांनीं निकराचे हल्ले किल्ल्यावर केले. तोफेच्या गोळ्यांची आग एवढी भयंकर होती कीं, त्यामुळें किल्ल्यांतील लोक पटापट मरूं लागले. बेगमला एके दिवशीं गोळा लागून ती मेली. नंतर इस्माईल बेग किल्ल्यांतून बाहेर पडला व किल्ल्याबाहेरील आपल्या फौजेंत मिळाला. नंतर इस्माईलबेगच्या व शिंद्यांच्या फौजेची मोठी लढाई होऊन त्यांत इस्माईलबेगचा पूर्ण पराजय झाला. त्यास जिवबादादा यांनीं कैद केलें, व कनौदचा किल्लाही हस्तगत केला. याप्रमाणें शिंद्यांचा शत्रू इस्माईलबेग हा तारीख १६ एप्रिल सन १७९२ रोजीं शिंद्यांचा बंदिवान झाला.[१]

---

१ जिवबादादाचें चरित्र पा. १६०.

२१. शिंदे, होळकर व अलीबहादर यांच्यामध्यें कलहाचें निमित्त जें उत्पन्न झालें त्याचें कारण असें होतें कीं, शिंद्यांनीं रजपूत, शीख व मुसलमान या लोकांचा पराभव करून जें यश मिळविलें त्यांत होळकर व अलीबहादर यांचा ह्मणण्यासारखा उपयोग झाला नाहीं. उलट ते जिंकलेल्या मुलखांत आपापल्या वांटणीचा हक्क मात्र सांगूं लागले. तरी याबद्दल विशेष भानगड नव्हती. वांटणीचा हिशेब सवडीप्रमाणें करतां येईल असें ह्मणून शिंदे स्वस्थ राहिले. तेव्हां होळकरांनीं शिंद्यांचें वजन कमी करण्याकरतां एक नवीन कारस्थान निर्माण केलें. त्यामुळें उभयपक्षांत कलहाग्नि पेटला.[१] "अलीबहादर आलियावर त्याचा बस न बसे तेव्हां सुभेदार (तुकोजीराव होळकर) याणीं हिंमतबहादर (शिंद्यांच्या गोसावी फौजेचा मुख्य सरदार) याजला हामराई करून शिंदे शुद्र सरदार ठेऊन मुखत्यारी अलीबहादराकडे आणावी या राजकारणास आग्रसर केला.[२] ही गोष्ट शिंद्यांना समजली तेव्हां हिंमतबहादर गोसावी हा उघड रीतीनें शिंद्यांचें लष्कर सोडून अलीबहादरास मिळाला. पुढें अशाच फितुरीनें यशवंतराव निंबाळकर अकळूजकर (हा शिंद्यांकडे आठशें स्वारांचा सरदार होता) तोही "आपण पेशव्यांच्या मुलखांतले रहाणारे, तेव्हां त्यांचाच पक्ष घेऊन आह्मांस चालावयाचें आहे," असें ह्मणून नगारा करून अलीबहादरास जाऊन मिळाला."[३] आमचे सरदार आपल्याकडे गेले आहेत, त्यांस आमचे स्वाधीन करावें असा महादजींनीं त्यांस सामोपचाराचा निरोप पाठविला. परंतु होळकर व अलीबहादर यांनीं तो मान्य केला नाहीं. तेव्हां या कारस्थानाचें मूळ नाना हे आहेत. तेव्हां पुण्यास गेल्याशिवाय याचा बंदोबस्त होणार नाहीं ह्मणून शिंदे पुण्यास जाण्याकरतां निघाले होते.

---

१ "शिंद्याच्या यशोवैभवाचा मत्सर करणारे हेही शिंद्यांविरुद्ध कारस्थानें करूं लागले व त्यांनीं अलीबहादरास सामील करून घेऊन राष्ट्रीय कार्यास विघातक असें वर्तन केलें." केसरी वर्ष पहिलें ता. २० मार्च १९००. २। ३ होळकर यांची कैफियत पा. ५२-५३.

२२. महादजी शिंदे पुण्यास जाण्याकरतां निघाले ही वार्ता पसरतांच हिंदुस्थानांत चहुंकडे तर्कवितर्क उत्पन्न होऊं लागले. टिपू, निजाम व इंग्रज यांपैकीं प्रत्येकाला असा संशय वाटूं लागला कीं, आपल्याविरुद्ध मोहिमेची वाटाघाट करण्याकरतांच शिंदे पुण्यास जात आहेत. खुद्द महाराष्ट्रांत असा तर्क पसरला कीं, पेशवे व नाना यांची गठडी वळण्याकरतांच शिंदे येत आहेत. स्वतः शिंद्यांनीं दक्षिणेंत येण्याचें कारण असें जाहीर केलें होतें कीं, पातशहाकडून वकीलमुतलखीचीं वस्त्रें मिळालीं आहेत तीं पेशव्यांना जाहीर दरबारांत अर्पण करण्याकरतांच आपण पुण्यास जात आहोंत. याप्रमाणें तारीख ११ जून सन १७९२ इ. रोजीं महादजी शिंदे पुण्यास येऊन पोंचले. त्यांनीं संगमावर आपला तळ दिला होता.

प्रकरण २७ वें.

नानांच्या स्वार्थकुंडांत शिंद्यांची आहुती.

इ. स. १७९२ ते इ. स. १७९४.

१. नानांनीं शिंद्यांच्या विरुद्ध महाराष्ट्रांतील लोकांचीं मनें ते पुण्यास येण्या-पूर्वीच कशी कलुषित करून ठेविलीं होतीं याबद्दलची माहिती.—२ शिंदे पुण्यास येतांना आपल्याबरोबर एक लक्ष फौज आणीत आहेत तेव्हां त्यांच्याविरुद्ध त्यांना तोंड देण्याकरतां नानांची निरनिराळ्या तऱ्हेनें फौजेची तयारी चालते.—३ पुण्यास संगमावर नाना व शिंदे यांची भेट. पेशव्यांस बादशहांनीं दिलेली पदवी अर्पण करण्यासंबंधीं समारंभ करूं देण्याबद्दल शिंद्यांची नानांस विनंति. त्यास नानांचा विरोध. नानांच्या विरोधाचीं कारणें.—४ पेशव्यांच्या पदवीदान समारंभास नानांनीं हरकत घेतली याच्यांत नानांचा कोणता खरा हेतु होता?—५ पेशव्यांच्या पदवीदान समारंभास छत्रपतींनीं आपली संमती दिल्यामुळें नानांचा विरोध विरघळून जातो. शिंद्यांची नानांवर मात होते.—६ सवाईमाधवरावांस बादशहांनीं दिलेल्या पदव्यांचा शिंद्यांकडून टोलेजंग समारंभ. या समारंभाची हकीकत देणारें पटवर्धनांचा वकील विसाजी नारायण वाडेकर यांचें पत्र.—७ शनिवारवाड्यांत सवाईमाधवरावांनीं बादशहाकडून मिळालेली पदवी आपल्या हस्तें समारंभानें शिंद्यांस दिली.—८ शिंदे दक्षिणेंत येऊन नानांची व सवाई-माधवरावांची गठडी वळणार अशी नानांच्या पक्षाकडून जी कंडी पिकविण्यांत आली होती, ती या समारंभामुळें आपोआप खोटी ठरली. शिंद्यांची अलोट स्वामीभक्ति.—९ सवाईमाधवरावांस शिंद्यांनीं आपल्या सैन्याकडून जेव्हां सलामी दिली त्यावेळीं पेशवे कशा थाटानें निघाले याचें वर्णन.—१० शिंद्यांनीं पेशव्यांस दिलेल्या सलामीचें वर्णन.—११ नानांची हजेरी घेण्यास शिंद्यांनीं सुरवात केली.—१२ नानांनीं पटवर्धन सरदारांस पुण्यास कां ठेऊन घेतलें होतें? पटवर्धन सरदारांच्या हिशोबाचा फडशा नाना करतात—१३ शिंदे नानांच्या कार-भारांत उघडपणें ढवळाढवळ करूं लागले. गोविंदराव गायकवाड यांची बडो-द्याच्या सरदारीच्या जागीं शिंदे, नानाविरुद्ध मदत करून, पुन्हां स्थापना कर-

तात —१४ नानांच्या फडणिशी हक्कांवर गदा आणण्याकरतां मोरोबादादांस बंधमुक्त करण्याविषयीं पेशव्यांजवळ शिंद्यांची मध्यस्थी. 'मूले कुठारः' हें तत्व अंमलांत आणिलेलें पाहून नाना गडबडतात. पेशवे नानांचा पक्ष धरतात. नानांवरील गंडांतर टळतें.—१५ गेल्या नऊ वर्षांचा हिशोब फडशा करून घेण्याकरतां सवाईमाधवरावांपुढें शिंद्यांचें प्रकरण निघतें. शिंदे त्याप्रमाणें हिशोब दाखवितात. शिंद्यांचें पेशव्यांवर सात कोटी रुपयांचें कर्ज निघतें. शिंद्यांनीं त्या मुदतींत कोट दीड कोट रुपये उत्पन्नाचा मुलुख संपादन केला. आम्हीं संपादन केलेल्या मुलुखापैकीं पेशवे सरकारचा हिस्सा आमचेकडे राहूं दिल्यास आम्ही कर्ज मागत नाहीं असें शिंद्यांचें म्हणणें होतें. यास नानांचा पूर्ण विरोध होता. पटवर्धनांच्या बाबतींत नानांनीं जसा न्याय दिला होता, त्याचेंच अनुकरण या वेळीं सवाईमाधवरावांनीं करून शिंद्यांप्रमाणें न्याय दिला. त्यामुळें नानांना मनांतल्या मनांत चुरमुरे खावे लागले.—१६ शिंदे पुण्यास आल्यामुळें नानांकडून अन्याय झालेल्या लोकांना पेशव्यांकडे दाद मागण्याचा शिंदे हा मार्ग झाला. शिंद्यांच्या मध्यस्थीनें सातारच्या छत्रपतींची सक्त कैद बऱ्याच सवलती मिळून कमी होते. यामुळें नानांच्या मनास चटका बसतो.—१७ सचीव प्रकरणांतील, घाशीरामाप्रमाणें नानांचा हस्तक बाजीराव मोरेश्वर याचा अनाचार व अत्याचार. घाशीरामाप्रमाणें बाजीराव मोरेश्वराची नाना पाठ राखतात. शिंदे सवाईमाधवरावांच्या आज्ञेनें बाजीराव मोरेश्वर याचें बंड मोडतात व त्याच्या पक्षांतील लोकांचींही पारिपत्यें करतात.—१८ सचीव-प्रकरणामुळें शिंद्यांनीं नानांची कुटिल कारस्थानें चव्हाट्यावर आणलीं.—१९ शिंदे नानांच्या कारभारांत ढवळाढवळ करतात म्हणून त्यानीं देशी परत जावें यासाठीं हिंदुस्थानांत कारस्थान सुरू करतात.—२० शिंदे व होळकर यांची लढाई जुंपवून देऊन नाना आपल्या कारस्थानास सुरवात करतात.—२१ शिंदे व होळकर यांची लाखेरीची जंगी लढाई. शिंद्यांचा सरदार जिवबादादा होळकरांचा पूर्ण मोड करतो.—२२ लाखेरीच्या लढाईंत होळकरांचा पूर्णपणें मोड झाल्याचें ऐकून आपला कारस्थानी मंत्र आपल्यावरच उलटला असें वाटून नानांस धक्का बसतो. नाना शिंद्यांविरुद्ध निरनिराळ्या कंड्या उठवितात.—२३ नानांच्या कंड्यांमुळें शिंद्यांविषयीं सवाईमाधवरावांचें मन कलुषित झालें नाहीं. शिंदे व होळकर यांचेमध्यें नानांनीं उत्पन्न केलेला वैरभाव पेशवे मध्यस्थी करून काढून टाक-

तात. त्यामुळें झालेली नानांची मानहानि. नानांच्या मनांत शिंद्यांबद्दल दिवसें-दिवस द्वेष उत्पन्न होत जातो.—२४ सवाईमाधवराव आपले गुप्त शत्रू व शिंदे हे उघड शत्रू असें नानांना वाटूं लागतें.—२५ सवाईमाधवरावांचे जवळ पेशव्यांच्या कारभारीपदाची शिंद्यांची मागणी. त्यास सवाईमाधवरावांचें समर्पक उत्तर.—२६ शिंद्यांच्या मागणीमुळें हताश होऊन आपलें कारभारीपद कायम ठेवण्याकरतां पेशव्यांपुढें नाना त्रागा करून रडतात. त्यामुळें सवाईमाधवराव दयेची भिक्षा घालतात.—२७ नाना हरिपंत फडक्यास शिंद्याबरोबर मध्यस्थी करावयास पाठवितात. नाना ठिकाणावर आलेले पाहून परस्परांनीं पूर्ववत् चालावें असें शिंदे कबूल करतात. त्यासंबंधीं हरिपंत फडके व शिंदे यांच्या आणाशपथा.—२८ शनिवारवाड्यांत शिंदे, नाना, हरिपंत फडके व खुद्द पेशवे यांच्या एकत्र भेटी होऊन शिंद्यांचें नानाबद्दल मन शुद्ध होतें.—२९ शिंद्यांनीं पेशव्यांजवळ कारभारीपणाची केलेली मागणी केवळ नानांना शह देण्यापुरतीच कशी होती?—३० नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाहीं हा मार्ग नानांच्या बाबतींत शिंद्यांना कां पत्करावा लागला? नाना शिंद्यांस शरण आल्यामुळें त्यांचें समाधान होतें. पण मानखंडनेंमुळें नानांच्या मनांत शिंद्यांबद्दल द्वेषाग्नि जास्त पेट घेतो.—३१ सवाईमाधवरावांनीं नाना व शिंदे यांचेमध्यें समेट घडवून आणला म्हणून जिकडे तिकडे आनंद. फक्त नानांची संमिश्र स्थिति. या आनंदोत्सवांत दिवाळीचा उत्सव करण्याचा निश्चय.—३२ पर्वतीवरील 'न भूतो न भविष्यति' अशा दारूकामाचा उत्सव शिंदे पार पाडतात.—३३ तसाच दुसरा रंग खेळण्याचा समारंभ शिंदे घडवून आणतात.—३४ रंग खेळण्याकरतां पेशव्यांची स्वारी वानवडीस कशा थाटानें जाते?—३५ हा रंग खेळण्याचा समारंभ पूर्वी द्वापारांत कृष्ण-अवतारीं झाला व कलीयुगीं शिंद्यांनीं पेशवे सरकारकरतां केला. यास दुसरी जोड नाहीं.—३६ वानवडीहून परत येतेवेळचा पुण्यांतील प्रचंड दीपोत्सव. पुण्यांतील लोकांचा उत्साह व आनंद. फक्त नाना तेवढेच अंतर्यामी दुःखी.—३७ फ्रान्स देशाच्या बादशहाला प्रजाजनांनीं मारून क्रांति घडवून आणली ही हकीकत पुण्यास समजते.—३८ पुण्यास या सालीं श्रावण मासाची दक्षिणा शिंदे स्वहस्तानें वांटतात. शिंद्यांची ब्राम्हणांवरील पराकाष्ठेची निष्ठा.—३९ पुण्यास आल्यानंतर शिंद्यांनीं केलेल्या इतर मोठमोठ्या न्यायीपणाच्या कामगिऱ्या.—४० नानांच्या अत्यंत कडक व करड्या वागणुकीनें उत्साह•

भं॰ पावलेले सवाईमाधवराव शिंयांच्या सहवासानें फार संतोषित होतात.—४१ महादजी शिंयांचा अकल्पित मृत्यु. त्यांच्या मृत्युसंबंधीं निरनिराळ्या शंका व त्यासंबंधीं शास्त्रीय आधारविवेचन.—४२ नानांनीं शिंयांस विष-प्रयोग करून ठार मारलें असें अनुमान कांहीं इतिहासकार कां काढतात, त्याची मीमांसा.—४३ नानांनीं शिंयांवर मारेकरी घालून त्यांस ठार मारलें याबद्दलचें कांहीं इतिहासकारांचें म्हणणें.—४४ शिंयांच्या मरणाच्या बाबतींत डफ साहेबांचें साशंकित मत.—४५ नाना निर्दोषी असल्याबद्दल खरेशास्त्र्यांची वकिली. त्यांचे वकिली मुद्दे खोटे असल्याबद्दलचीं प्रमाणें.

१. महादजी शिंदे पुण्यास येण्याकरतां ज्या वेळीं निघाले, त्या वेळीं त्यांनीं आपला हेतु, श्रीमंतांस बादशहानें दिलेल्या पदवीचा समारंभ, दरबार भरवून जाहीर रीतीनें घडवून आणण्याचा आहे असें जरी एक कारण दाखविलें होतें, तरी त्याच्याबरोबर दुसरींही आणखीं कारणें होतींच. नाना हे महादजींच्या व्यवहारांत लांडा कारभार करूं लागले होते व त्या बाबतींत त्यांचे समक्ष जाबसाल होणार होते. नानांना ही गोष्ट पुरी माहित होती. महादजी पुण्यास आल्यावर ते आपलीं सर्व बिंगें बाहेर काढतील अशी त्यांना धास्ती उत्पन्न झाली. शिवाय हिंदुस्थानांत महादजींचा जो उत्कर्ष झाला तो नानांना सहन झाला नाहीं व त्यांनीं होळकर आणि अलीबहादर यांच्या करवीं त्यांचा अपकर्ष करण्याचे जे प्रयत्न चालविले होते त्यांचें महादजी आपल्या कृतीनें उत्तर दिल्याशिवाय राहणार नाहींत हेंही नाना जाणून होते. महादजी आपल्याबरोबर सुमारें एक लक्ष फौज घेऊन येत आहेत हेंही नानांना समजलें होतें. तेव्हां सर्व बाजूंनीं महादजींचा प्रतिकार करता येईल असा बंदोबस्त या वेळीं नानांना करणें प्राप्त झालें होतें. या नानांच्या बंदोबस्ताचा पाया एका विलक्षण गोष्टीनें भरलेला होता. "खुद्द महाराष्ट्रांत असा तर्क पसरला होता कीं, पेशवे व नाना यांची गठडी वळण्याकरतांच शिंदे येत आहेत.[१]" पुण्यास शिंयांच्या

१ खरेकृत ना. फ. च. पा. १४३.

येण्यासंबंधीं असें वर्णन केलेलें आढळतें, यावरून असें दिसून येतें कीं, महादजी हे पुण्यास येऊन पेशव्यांना व नानांना तुरुंगांत डांबून स्वतः पेशवाई गिळंकृत करणार आहेत अशी सर्व महाराष्ट्राची समजूत करून देण्यांत आली होती. ही हूल महाराष्ट्रांत जी पसरली ती केवळ नानांपुरती जर असती तर त्याला एवढें महत्व आलें नसतें. पण त्यांत सवाईमाधवरावांचा निर्देश असल्यामुळें व नुकतेंच घाशीरामाचें प्रकरण होऊन पेशवे लोकप्रिय होऊं लागलेल्या स्थितींत महादजी त्यांची गठडी वळणार या कल्पनेनेंच शिंद्यांविरुद्ध सर्व महाराष्ट्र उठेल अशी खात्री वाटल्यामुळें वरील हूल महाराष्ट्रांत उठवून शिंद्यांबद्दल सर्व महाराष्ट्रांतील प्रजेचें मन कलुषित करून ठेवण्यांत आलें होतें.

२. ही महाराष्ट्राची मनोभूमिका तयार केल्यानंतर नानांनीं लॉर्ड कॉर्नवालीस यांच्याबरोबर बोलणें चालविलें. टिपूवरील मोहिमेंत इंग्रजांची कॅप्टन लिटल यांच्या हाताखालीं जीं दोन पलटणें पेशव्यांच्या दिमतीला दिलीं होतीं तीं दक्षिणेंतून महादजी शिंदे निघून जाईपर्यंत तशींच पेशव्यांच्या दिमतीला पुण्यास रहावीं अशी त्यांनीं खटपट चालविली. या खटपटीमुळें नाना एका दगडानें दोन पक्षी पाडणार होते. उत्तरेंत शिंद्यांविरुद्ध नानांनीं होळकरांना घरचा जबरदस्त शत्रू निर्माण करून ठेवलाच होता. अलीबहादर फौजेसहित त्यांच्या मदतीस होताच. शिंद्यांच्या फौजेंतील महाराष्ट्रांतील सरदार त्यांनीं फोडलेच होते, रजपुतांना शिंद्यांविरुद्ध त्यांनीं उठावणी दिलीच होती. अशा प्रकारें नानांनीं आंतून शिंद्यांची शक्ति पोंखरण्याचा प्रयत्न केलाच होता. टिपूच्या बाबतींत इंग्रजांची मदत मिळाल्यामुळेंच नानांच्या तोंडांत लोण्याचा गोळा पडला होता. तेव्हां तोच स्नेहसंबंध इंग्रजांनीं शिंद्यांविरुद्ध पेशव्यांशीं चालवावा असा नानांचा हेतु होता. इंग्रजांनीं हीं पलटणें नानांस त्यांचे विनंतीप्रमाणें दिलीं असतीं तर

त्या पलटणांचा उपयोग त्यांनीं शिंद्यांविरुद्ध करून, इंग्रजांनाही शिंद्यांचे शत्रू बनविलें असतें. परंतु नानांचा हा डाव इंग्रजांनीं ओळखिला व त्यांनीं आपलीं पलटणें पेशव्यांच्या दिमतीला ठेवण्याचें साफ नाकारलें. त्याचप्रमाणें नानांनीं हरिपंत फडके व परशुरामभाऊ यांस कांहीं फौज घेऊन पुण्यास येण्याकरतां लिहिलें होतें. शिंदे पुण्यास येतात, तोंच आपणही तुमच्या साह्याकरतां दक्षिणेंत येतों असें होळकरांचेंही नानांस पत्र आलें होतें. पेशव्यांची खाशी सर्व फौज पुण्यास होतीच. अशा प्रकारें नाना आपली लष्करी तयारी करून आपल्या जागीं सुसज्ज होऊन बसले होते.

३. महाराष्ट्रांत नानांनीं आपल्याबद्दल कशा प्रकारची हूल उठवून ठेविली आहे, हें महादजींना समजलें होतें व आपण पेशव्यांशीं कसें वागावयाचें हेंही त्यांनीं ठरविलें होतें. शिंदे ता. ११ जून सन १७९२ रोजीं पुण्यास संगमावर येऊन उतरले. ते तेथें आल्यानंतर नववे दिवशीं शिंद्यांस भेटण्याकरतां नाना फडनविस गेले. शिंद्यांचा रागरंग काय आहे हें सर्व निश्चितपणें नानांना समजण्याला नऊ दिवसांचा अवधी लागला असावा. नाना शिंद्यांच्या भेटीस गेले त्या वेळीं नानांचें महादजींनीं उत्तम-प्रकारें स्वागत केलें आणि त्यांच्याबरोबर फारच मर्यादेनें वर्तणुक केली. त्यांनीं नानांपुढें इतकी लीनता दाखविली कीं ते नानांसमोर गादीवर सुद्धां बसले नाहींत. नानांनीं मात्र शिंद्यांचा कोणत्याही प्रकारें बडेजाव वाढेल अशी गोष्ट त्यांना करूं न देण्याचा संकल्प केला होता. शिंदे पुण्यास आल्यानंतर त्यांनीं पुणें दरबारशीं बोलणें सुरू केलें होतें, कीं, श्रीमंतांकरितां 'वकील-ई-मुतलखी'चा व 'मीर बक्षीगिरी'चा अधिकार व बहुमान मीं दिल्लीच्या बादशहाकडून मिळविला आहे तो श्रीमंतांनीं दरबारांत प्रसिद्धपणें स्वीकारावा. त्यावर नाना फडनविस यांनीं हरकत घेतली कीं, दिल्लीश्वराकडून या अधिकाराचीं फर्मानें आलीं आहेत. त्यांत श्रीमंतांस 'महाराजाधिराज' ही पदवी लाविली आहे. वास्तविक ही पदवी छत्रपतींसच

लावणें योग्य आहे, पेशवे हे छत्रपतींचे नोकर असल्यामुळें त्यांस ही पदवी कशी घेतां येईल? नानांनीं याप्रमाणें या पदवी-समारंभाला हरकत घेतली.

४. नानांची हरकत वरवर पहाणाराला किती महत्वाची वाटेल! नानांची छत्रपतींचे ठिकाणीं केवढी श्रद्धा आहे, केवढा आदर आहे असें कोणत्याही वाचकास वाटेल. परंतु मागील इतिहास पाहिला म्हणजे या वेळीं नानांनीं छत्रपतींबद्दल दाखविलेला आदर केवळ कपटबुद्धीचा होता असेंच ठरतें. मागें माधवराव पेशव्यांना गादीवर बसविण्याचे वेळीं सातार्‍याहून पेशवाईचीं वस्त्रें आणण्याचें राघोबादादा यांनीं ठरविलें. त्या वेळीं हीं वस्त्रें छत्रपतींकडून आणण्याच्या विरुद्ध नाना होते; त्या वेळीं आमचा व छत्रपतींचा आतां काय संबंध राहिला आहे अशी भाषा नानांची होती. यावेळीं मात्र पेशवे हे छत्रपतींचे नोकर आहेत या गोष्टीची नानांना आठवण झाली. पेशवे जर छत्रपतींचे नोकर आहेत अशी जर नानांची प्रामाणिक समजूत असती तर छत्रपतींना पेशव्यांनीं सातार्‍याच्या किल्ल्यांत कोंडून ठेवलें नसतें. छत्रपतींच्या अंतःकरणाला दुःख होईल अशी जर नानांच्या मनाला तिळमात्र कल्पना शिवली असती तर धनी व नोकर या पेशांना शोभेल असा त्यांनीं छत्रपतींचा इतमाम ठेवला असता. छत्रपतींना धनी म्हणावयाचें व त्यांच्या नोकरांनीं त्यांना किल्ल्याबाहेरचीही हवा घेऊं द्यावयाची नाहीं हा सेव्यसेवकभाव नानांच्या नीतीलाच साजेल असा होता. एकंदरींत यावेळीं छत्रपती हे पेशव्यांच्या ताटाखालचें मांजर बनलें असतांही नानांनीं ज्याअर्थीं बादशहानें पाठविलेल्या पदव्यांबाबत छत्रपतींचें कारण दाखवून हरकत घेतली, त्याअर्थीं महादजी शिंद्यांच्या पराक्रमामुळें बादशहाकडून पेशव्यांना पदव्या मिळाल्या असा शिंद्यांचा बोलबाला होऊं नये, एवढाच यांत नानांचा दुष्ट हेतु होता हें यावेळीं त्यांनीं घेतलेल्या हरकतीवरून स्पष्ट होतें. पेशव्यांच्या पदवीबरोबर नानांना जर तशीच एकादी मोठी पदवी शिंद्यांनीं आणली असती, तर कदाचित यावेळीं नानांनीं हरकत घेतली नसती, असें कोणीं म्हटल्यास तें वावगें ठरणार नाहीं.

५. महादजी शिंदे हे नानांच्याच शाळेंत शिकलेले होते. या पद-व्यांच्या बाबतींत नाना सर्वसाधारण कोणत्या हरकती घेतील, याचा त्यांनीं अंदाज बांधलाच होता. नानांची समजूत अशी होती कीं, सातारचे महाराज, या पदवींतील पेशव्यांना संबोधिलेल्या 'महाराजाधिराज' या शब्दप्रयोगाला हरकत घेतील. त्यांनीं ती हरकत घेतली, म्हणजे हा पद-वीसमारंभ आपोआप जेथच्या तेथें थंड होईल. पण शिंदे कसले वस्ताद ! त्यांनीं नानांकडून हा प्रश्न उपस्थित होण्याच्या अगोदरच, छत्रपतींकडे आपलें वळण बांधून ठेवलें होतें. त्याप्रमाणें शिंद्यांनीं छत्रपतींकडून परवा-नगी मिळविली कीं, बादशहाकडून मिळालेली राजाधिराज ही पदवी पेशव्यांनीं घेण्यास आपली हरकत नाहीं. या छत्रपतींच्या परवानगीमुळें नानांचा विरोध आपोआप विरघळून गेला व पेशव्यांनीं पदवीदान समारं-भाला शिंद्यांस परवानगी दिली.

६. हा समारंभ पुण्यास गारपिराजवळ झाला. तेथें पेशव्यांचे अठरा-गजी मोठे डेरे होते ते उभारण्यांत आले. दुसरेही दोनतीन डेरे दिले. सभोंवारची मैदानावरील जागा उत्तम प्रकारें साफसूफ करून त्यावर एक भव्य मंडप उभारला होता. हा समारंभ शुक्रवार तारीख २२ जून सन १७९२ इ. रोजीं झाला. यासंबंधीं पटवर्धनांचे पुण्याचे वकील विसाजी नारायण वाडेकर हे आपल्या पत्रांत पुढील प्रमाणें वर्णन करतात[1] "थोरल्या डेऱ्यांत बैठक करून तेथें मसनद घालून त्याजवर पादशाह यांणीं पोषाख दिला तो व मोर्चेल व रवाज ठेऊन अगोदर शिंदे तेथें येऊन तयारी करून नंतर श्रीमंतांची स्वारी प्रहर दिवस सायंकाळचा राहतांना निघोन तेथें गेले. समागमें सरदार व मुत्सद्दी मंडळी झाडून गेले. सर्वांस बोला-वणीं चोपदार पाठवून नेले. तेथें गेल्यावर स्वारी अंबारींतून उतरून आंत गेले. मुत्सद्दी मंडळी व कारभारी वगैरे समागमें गेले. समागमें मानकरी वगैरे सरदार फार करून घोड्यावरच होते. श्रीमंत उभेच होते. एक

१ ऐ. ले. सं. नं॰ ३४८२.

घटकाभर उभे होते. एक पारशी पत्र वाचून दाखविलें. नंतर मसनदीस कुरनिशान करून उभेच होते. नंतर पोषाख घ्यावयास मागें दुसरा डेरा दिला होता त्यांत चिचोत्रा होता त्यांत जाऊन पोषाख करून बाहेर आले. ते समयीं एक मोर्चेल शिंदे वारीत होते, व एक मोर्चेल राजश्री हरिपंत तात्या वारीत होते. नंतर मसनदीजवळ येऊन फिरोन कुरनिसात करून मसनदीपासोन अंतऱ्यानें बसले. मोर्चेल शिंदे यानीं आपा बळवंत यांजवळ दिलें व तात्यांनीं बाबा फडके यांजवळ दिलें. त्यांनीं अर्धघटका धरून नंतर सखोपंत साने यांजवळ आप्रांनीं दिलें. नंतर फर्मान पारसनीस यांनीं वाचलें." त्यांतील मजकूर असा होता.[१] "गुलामकादर याणें बेअदबी केली त्याचें पारिपत्य पादशाही नोकर बहुत होते परंतु कोणीं केलें नाहीं. तें श्रीमंतांचे सरदार महादजीराव शिंदे याणीं करून बंदोबस्त केला. याकरितां हें पदपुस्त दरपुस्त दिलें असे." अशीं फरमानें पांच होतीं तींही वाचलीं. श्रीमंतांस पदवस्त्रें दिलेलीं व बहुमान दिला त्याची नांवनिशी:—पोषाख मोंगलाई तऱ्हेचा :— १ दस्ता सरहस्त बांधलेलें पागोटें. १ जेमा १ निमअस्तनी १ चारकुब्रा निमअस्तनीवर गेंद. १ चीरा १ हकबंदी पागोट्यावरील १ कमरबंद १ दुपेटा १ दुशाल. याप्रमाणें नऊ वस्त्रें. जवाहीर :—१ मोत्याची माळ पदकसुद्धां. १ शिरपेंच १ जेगा १ कलगी परगिरीची. याप्रमाणें चार दागिने. ढाल तरवार २, कलमदान १, हत्ती नग १, नालकी रोगणाची सोनेरी कामाची सायवानदार १, पालखी भरजरी झालरसुद्धां १, मोर्चेल २, घोडा, रास, निशाण तिगटीदार हत्तीसुद्धां; १ माही १ मरातब १ तोगा, १ अलम झेंडा. १ तुमन. येणेंप्रमाणें बहुमान वगैरे दिले. "वकील मुतलख, अमीर उल उमरा मुख्त्यारुल् मुमालिक, मदारुलमहाम, मसलत लजत उमेद आरा किने खास, फात फार वफादार, शींर्द साकार सादत मंद बजया दे बम फर्जंद खासूल खास, वालाजा, महाराजा-

---

१ ऐ. ले. सं नं ३४८१.

धिराज राव पंडित प्रधान सवाईमाधवराव नारायण बहादुर " या प्रमाणें किताब दिला. या पदास इनामगांव करून दिले. १ मथुरा १ वृंदावन १ नंदगांव १ हरसोल. याप्रमाणें चार गांव इनाम दिले."

७. नंतर "डेऱ्याहून नालकींत बसून स्वारी आली. थोरल्या रस्त्यानें दोन घटका रात्रीस वाड्यांत दाखल झाली. समागमें शिंदे वाड्यांत आले. चार घटकापर्यंत मुबारिकीच्या नजरा झाल्या. प्रथम नानांनीं तात्यांनीं केल्या. मराठे मंडळी मात्र कोणी नजरा करावयास आले नाहींत. शिंदे यांनीं व त्यांजकडील लोकांनीं नजरा डेऱ्यांतच केल्या. वाड्यांत लोकांच्या नजरा जाहल्या नंतर मग महादजी शिंदे यांस—पादशहा यांनीं (श्रीमंतांस) पद दिलें त्याच्या मुतालिकीचीं वस्त्रें व शिरपेंच, कंठी, जेगा, ढालतरवार, घोडा व हत्ती दिला. नालकी शिंद्यांनीं दुसरी आणली होती ती दिली. याप्रमाणें घेऊन (शिंदे) आपल्या डेऱ्यास गेले."

८. याप्रमाणें हा पदवीदान समारंभ मोठ्या थाटानें पार पडला. शिंदे पुण्यास येऊन पेशवे व नाना यांची गठडी वळणार आहेत, अशी जी हूल महाराष्ट्रभर पसरविण्यांत आली होती, ती या समारंभामुळें सपशेल खोटी ठरली, एवढेंच नसून केवळ महादजी शिंद्यांच्या पराक्रमामुळें पेशव्यांना हा पादशहाकडून आजपर्यंत न मिळालेला असा सन्मान मिळाला, हें महाराष्ट्राला पुरतेपणीं कळून चुकलें. शिवाय यांत एक गोष्ट मुख्यतः लक्षांत ठेवण्यासारखी होती, ती ही कीं, पादशहानें शिंद्यांचा गौरव मुतालिकीचीं वस्त्रें देऊन केला होता. परंतु त्यांनीं केलेला सन्मान शिंद्यांनीं या वेळपर्यंत स्वीकारला नव्हता. शिंदे हे आपणाला पेशव्यांचे नोकर समजत होते. म्हणून दुसऱ्या दरबारकडून झालेला सन्मान जोंपर्यंत खुद्द आपल्या धन्याकडून मान्यता मिळून त्यांच्या करवीं तो होत नाहीं, तोंपर्यंत त्या सन्मानाचें शिंद्यांना भूषण वाटत नव्हतें, हें स्वामीभक्तीचें लक्षण या वेळीं शिंद्यांनीं सर्वांच्या नजरेला

आणून दिलें. सवाईमाधवरावांनीं आपल्या वाड्यांत शिंद्यांचा गौरव केला. त्यामुळें त्यांना आपल्या पराक्रमाचें सार्थक झालें असें वाटलें असेल, यांत संशय नाहीं.

९. महादजी शिंदे पुण्यास आले त्या वेळीं सवाईमाधवराव यांस त्यांनीं आपल्या फौजेची सलामी घेण्याबद्दल विनंति केल्यावरून ते सलामी घेण्याकरतां निघाले. त्या वेळचा थाट कल्पनातीत ऐश्वर्याचा होता. त्याचें वर्णन पेशव्यांचे बखरींत दिलें आहे तें असें. "त्या[1] समयीं सरकारची स्वारी हत्तीवर बसावयाची म्हणून विनायक गज हत्ती आणून रुप्याचे अंबारींत खांसा स्वारी बसली. पुढें बाबा माहात हातीं अंकुश धरून बसला. तो हत्ती बिनझोल चालत असतां माणसाला वर डोलावें लागत नसे. या साठीं खांसा स्वारीस तो हत्ती नेमिला होता. जरी-बादली मस्तकीं सारी, पाठीवर मखमाली गाशा, सभोंवतीं झालर कलाबतूची, गाशावर वेलबुट्टी काढलेली, गळ्यांत घांगुरमाला रुप्याच्या व घंटा रुप्याच्या व दांत सोन्याचे मढविलेले, मस्तकीं सडका व सोन्याचीं पिंपळपानें, पायांत रुप्याचे तोडे, सोंड रंगविलेली, अशा हत्तीवर सरकारची स्वारी बसलेली. खवासखान्यांत आपा बळवंत व अमृतराव पेठे हातीं चवरी घेऊन श्रीमंतांवर उडवितात व हातीं रुमाल घेऊन आपा बळवंत वारीत बसले आहेत. सरकारची स्वारी हत्तीवर बसून उभी राहिली त्या समयीं सरकारचे मुत्सद्दी व कारभारी आपले वाहनारूढ होऊन उभे राहिले. जरीपटक्याचे हत्ती, खेरीज जिलबेचा हत्ती असे चौघे सजविलेले; शिवाय कोतवाल घोडे चारशें, सोन्याचे गंडेपट्टे घातलेले, गळ्यांत मोहनमाळा, पायीं पैंजण, पाठीवर भरगच्ची झुला, त्याजवर कलग्या असा कोतवाल घोड्यांचा समाज उभा; त्यांच्या पाठीमागें हत्ती उभे; जेथें श्रीमंतांचा हत्ती उभा, त्या पुढें खास जिलबेचे लोक बोथाटीबारदार, विटेबारदार, व खासबारदार, व बाणदार व लगी, अशी खाशी जिलीब उभी, व जरीपटक्याचा हत्ती उभा,

1. पे. ब. पा. १२९ आवृत्ति पांचवी.

तेथें सरकारची हुजरात, पागे, मानकरी, व शिलेदार उभे; श्रीमंतांच्या मागें झाडून सरंजामी उभे. पटवर्धन, विंचुरकर, दरेकर, पाटणकर, घोरपडे, निंबाळकर, जाधव व पुरंदरे, अक्कलकोटवाले, असा समुदाय सरकारचे स्वारीचा उभा राहिला आहे. चौघडे वाजतात. साहेब नौबतीचे बाजे होतात. खेरीज घोड्यावरील नगारे व उंटावरील नौबती वाजतात. असा सरकारचे स्वारीचा थाट उभा राहिला आहे व चोपदार, भालदार, छडीदार व नकीब असे ललकारत आहेत.

१०. त्या समयीं महादजी शिंदे यांणीं आपली फौज दुरस्ता फऱ्यानें (ओळीनें) उभी सरकारचे मुजऱ्यासाठीं केली. एकतर्फेनें घोडदळ उभें राहिलें. त्यांत पागे व शिलेदार व पठाण हुजरात शिंदे यांची उभी राहिली. दुसऱ्या तर्फेनें चार कंपू उभे केले. त्यामध्यें तोफा उभ्या राहिल्या, बैल तोफेस जुंपलेले. असा सरंजाम सरकारचे सला-मासाठीं उभा केला. त्या वेळेस शिंदे यांचे दौलतीची वर्णना काय करावी ! कीं रावणासारखी ज्यास दौलत अशी उपमा !! घोडेस्वार घोड्यांवर स्वार झालेले. त्यांचे डोकीस मंदील, आंगांत झगा, आंगावर शालजोड्या, हातांत शालनाम्याचा रुमाल, पायांत किनखापी विजारा, असे साज बंदुका बांधून मुजऱ्यासाठीं उभे राहिले. हातांत सोन्याचीं कडीं, गळ्यांत कंठीं, कानांत चौकडे, असे स्वार, भालेकरी व आड-हत्यारी व करोल, उभे राहिले. तसेच हत्ती उभे. वरतीं अंबाऱ्या ठेविलेल्या. याप्रमाणें कोतवाल घोड्यांचा सरकारचे मुजऱ्यासाठीं फरा उभा राहिला आहे. दुसरे तर्फेनें कंपू साहा दोन कोसपर्यंत तोफासुद्धां उभे केले आहेत. तेव्हां सरकारची स्वारी मुजरे घेत चालली. दुतर्फा मुजरे होऊं लागले. भालदार नांवें घेऊन बोलतात. याप्रमाणें दोन कोसपर्यंत स्वारी सरकारची मुजरे घेत आली. शेवट झाला तेथें स्वारी उभी राहिली. आणि तोफा सोडावयाची कवाईत करण्याची आज्ञा सरकारची झाली. त्या वेळेस कंपूची कवाईत व तोफेचे आवाज एकदम होऊं लागले. तेव्हां तोफांच्या

धुराची दाटी झाली. माणसाला माणून दिसेनासें झालें. बाराशें तोफांचा आवाज सुटला. त्या समयीं श्रीमंतांची मर्जी प्रसन्न होऊन स्वारी वाड्यांत जावयास फिरली. " याप्रमाणें शिंद्यांनीं आपल्या फौजेच्या मुजऱ्याचा थाट पार पाडला.

११. महादजी ज्या कामाकरितां पुण्यास आले होते तें त्यांचें काम पार पडलें. आतां त्यांनीं आपलें उद्दिष्ट कार्य हातीं घेण्याचें ठरविलें. आजपर्यंत त्यांनीं नानांच्या कारभारांत ढवळाढवळ कधींच केली नव्हती. असें असतां आपल्या दौलतींत नानांनीं ज्याअर्थी लांडाकारभार करून आपलें वजन कमी करण्याची कारवाई सुरू केली, त्याअर्थी तोच प्रयोग उलट नानांवर केल्याशिवाय ते वठणीवर येणार नाहींत, अशी शिंद्यांची समजूत असल्यामुळें त्यांनीं नानांच्या कारभारांत ढवळाढवळ करून नानांचीं बिंगें बाहेर काढण्याचें ठरविलें. पेशवे आतां सज्ञान झाल्यामुळें नानांचीं अन्यायाचीं कृत्यें त्यांना सहज दिसून येण्यासारखीं होतीं. म्हणून ते नानांच्या कारभारांतील गोष्टींकडे विशेष लक्ष पुरवूं लागले.

१२. पटवर्धन सरदार हे नानांच्या अगदीं अंतस्थ मंडळांतील एक सभासद होते. परशुरामभाऊंना नानांनीं पुण्यास बोलावून घेतलें होतें. त्याचा हेतु एवढाच होता कीं, शिंदे परत जाईपर्यंत नानांच्या पक्षांतील एक जोरदार सरदार पुण्यास नानांच्या जवळ रहावा. परंतु त्याला उघड असें कांहीं निमित्त दाखवावयास पाहिजे म्हणून पटवर्धनांचे मागील हिशेबांचा फडशा करण्याकरतां भाऊंना ठेऊन घेतलें आहे, असें दाखविण्यांत आलें. भाऊंचे हिशेबासंबंधीं बरेच दिवस घासाघीस सुरू होती. भाऊंना केव्हां एकदां हिशेबाचा निकाल होईल असें झालें होतें. पण नानांना घाई नव्हती. शेवटीं भाऊंची जिकीर जास्त वाढल्यामुळें त्यांचे हिशेब पाहण्यांत आले. भाऊंचें या हिशेबाच्या बाबतींत असें ह्मणणें होतें कीं, गेल्या मोहिमेंत आपणास कर्ज झालें आहे. त्याची फेड करण्याकरतां नवीन जिंकलेला सर्व मुलुख सरकारांतून आपल्या ताब्यांत मिळावा. शेवटीं नाना व परशुरामभाऊ यांच्यांत असें ठरलें कीं, टिपूकडून ताब्यांत आलेल्या मुलखापैकीं, धारवाडचा सुभा

सरकारांत ठेवावा आणि पंधरा लक्ष रुपये उत्पन्नाचा सावनूर प्रांत भाऊंच्या कर्जाची फेड होईपर्यंत त्यांचेकडे रहावा. याप्रमाणें मोहिमेंत पटवर्धनांना जें कर्ज झालें त्याच्या फेडीचा निकाल करण्यांत आला.

१३. महादजी शिंदे यांनीं आतां नानांच्या कारभारांत उघडपणें ढवळाढवळ करण्याचा उपक्रम सुरूं केला. दमाजी गायकवाडांच्या मुलांपैकीं गोविंदराव व सयाजीराव हे दोघे सावत्र भाऊ गायकवाडांच्या सरदारीचे वारस होते. सयाजीस फत्तेसिंगराव व मानाजीराव असे दोघे सख्खे भाऊ होते. सयाजीराव वेडसर असल्यामुळें त्याच्या नांवानें दौलतीचा कारभार फत्तेसिंगराव करीत असत. गोविंदराव गायकवाड हे राघोबादादांचे पक्षपाती असल्यामुळें नानांच्या मर्जीतून उतरलेले होते. ते फक्त पोटापुरती रक्कम घेऊन पुण्यानजिक दावडी–निंबगांव येथें बरींच वर्षें राहत असत. मध्यें एकदां स. १७७७ त तुकोजी होळकरांनीं गायकवाडांची सरदारी फत्तेसिंगराव यांजकडून काढून गोविंदराव यांसच द्यावी असा कारभाऱ्यांच्या जवळ हट्ट धरला होता. त्या वेळीं फत्तेसिंगराव यांनीं पुणें दरबारास अठरा लक्ष रुपये नजराणा भरून आपले बंधु सयाजीराव यांच्याच नांवें सरदारी कायम करून घेतली. गोविंदराव अधिक रक्कम देते तर होळकरांच्या रदबदलीमुळें त्यांस सरदारी मिळाली असती. परंतु तसें न झाल्यामुळें गोविंदरावांस, ते गायकवाडांच्या सरदारीचे खरे वारस असूनही, दावडी मुक्कामीं दारिद्र्यांत दिवस काढीत राहणें भाग पडलें. स. १७८९ मध्यें फत्तेसिंगराव वारले. तेव्हां गोविंदरावांस पुनः सरदारी प्राप्त होण्याचा संभव उत्पन्न झाला. नानांच्या कारकीर्दीत वारसाहक्काची विशेष किंमत नव्हती. जो जास्त पैसे देईल त्याला सरदारी मिळत असे. त्या वेळीं गोविंदराव हे सरळ वारसदार खरे, पण ते दरिद्री असल्यामुळें, त्यांजकडून पैसे मिळाले नाहींत म्हणून, नानांनीं त्यांना सरदारी दिली नाहीं. फत्तेसिंगाचे धाकटे भाऊ मानाजीराव यांनीं पुणें दरबारास पाऊण कोट रुपये नजराणा देण्याचें कबूल केलें व त्यापैकीं छत्तीस लक्ष रुपये रोख भरले. त्यामुळें सयाजी-

रावांचीच सरदारी कायम राहिली, व तिचा कारभार मानाजीराव करूं लागले. महादजी पुण्यास आले तेव्हां गोविंदराव यांस पुन्हां न्याय मिळण्याची आशा वाटूं लागली. त्यांनीं शिंद्यांचे कारभारी आबा चिटणीस यांचेकडे वशिला बांधून, त्यांच्या द्वारें त्यांनीं महादजींचें मन वळविलें. त्याप्रमाणें शिंद्यांनीं पुणें दरबाराशीं बोलणें सुरू केलें कीं, सयाजीरावाची सरदारी काढून ती गोविंदराव यांस देण्यांत यावी. मानाजीरावानें पाऊण कोट रुपये नजराणा कबूल केला आहे. पण गोविंदराव एक कोट रुपये नजराणा देऊन शिवाय गायकवाडांची छप्पन लक्षांची जहागीर आहे, त्यापैकीं चौथाई म्हणजे चौदा लक्षांचा मुलुख पेशवे सरकारांत द्यावयास कबूल आहेत. याप्रमाणें शिंदेच बोलूं लागले तेव्हां श्रीमंतांनीं ती गोष्ट मान्य केली, व गोविंदराव गायकवाड यांस ता. ३ डिसेंबर स. १७९३ रोजीं महादजी शिंद्यांच्या आग्रहावरून सरदारीचीं वस्त्रें दिलीं. व ते ता. १९ डिसेंबर स. १७९३ रोजीं पुण्याहून बडोद्यास रवाना झाले. शेवटीं गोविंदराव गायकवाड यांस शिंद्यांमार्फत सवाईमाधवराव यांचेकडून न्याय मिळाला. याप्रमाणें महादजींनीं नानांच्या विरुद्ध पक्ष घेऊन पेशव्यांच्या कारभारांत यश मिळविलें. यामुळें नानांना फार दुःख झालें. या व्यवहारांत गोविंदरावांना न्याय मिळाला व पुणें दरबारचा फायदा झाला. शिंद्यांच्या या कामगिरीला कोणालाच नांव ठेवतां येण्यासारखें नव्हतें.

१४. हिंदुस्थानांत शिंद्यांचें महत्व कमी करण्याकरतां नानांनीं होळकरांकरवीं अलीबहादराला मुख्यत्व देण्याचें जसें कारस्थान सुरू केलें होतें, तसाच डाव नानांवर करण्याचा शिंद्यांनीं दुसरा प्रयत्न सुरू केला. नानांचा जसा फडनविशीवर हक्क होता तसाच मोरोबादादांचा होता. परंतु नानांनीं मोरोबादादांस तुरुंगांत डांबून टाकलें व आपण एकटेच फडनविशीचा उपभोग घेऊं लागले. तेव्हां शिंद्यांनीं पेशव्यांजवळ बोलणें सुरू केलें कीं, मोरोबादादांस कैदेंतून मुक्त करून पुनः त्यांस अधिकार द्यावा. या कामांतही पुणें दरबारचा फायदाच होता. मोरोबादादा स. १७७८ त कैद झाले. तेव्हां-

पासून चौदा वर्षें नाना एकटेच फडनविशीचें काम करीत होते. फडनविशीच्या दरकाला कारकुनीची किफायत फार मोठी होती. ‘ दरबार खर्च ’ म्हणून जी रक्कम राज्यांतून अगर परराज्यांतून पुण्याच्या दरबारीं जमा होत असे, तींतही त्यांची वांटणी मोठी होती. या सर्व उत्पन्नाचा निम्मा हिस्सा मोरोबादादांचा होता व त्या हिशेबानें त्यांच्या वांट्याची चौदा वर्षांची रक्कम बरीच मोटी होत असली पाहिजे. मोरोबांस मुक्त करून कारभारांत घेतलें असतें तर ती सर्व रक्कम नानांकडून वसूल करून पेशव्यांच्या खजिन्यांत जमा झाली असती. परंतु मोरोबांस मुक्त करणें म्हणजे नानांच्या प्रत्यक्ष काळजाला हात घालणें असें होत असल्यामुळें, ती गोष्ट फायद्याची असूनही सवाईमाधवरावांना करतां आली नाहीं. हा महादजींनीं टाकलेला डाव नानांच्या मर्मस्थानींच बसला होता. दुसऱ्यांवर डाव खेळतांना नानांना मजा वाटत होती, परंतु आतां महादजींचे डाव प्रत्यक्ष त्यांच्यावरच होऊं लागल्यामुळें त्याचें सुखदुःख त्यांना अनुभवाला येऊं लागलें. सवाईमाधवरावांनीं ही शिंद्यांची गोष्ट न ऐकल्यामुळें नानांवरील एक गंडांतर टळलें.

१५. शिंदे पुण्यास येतांना त्यांनीं सन १७८३ पासून स. १७९१ अखेरपर्यंतचे नऊ वर्षांचे हिशेब दरबारांत रुजूं करण्याकरतां आणले होते. या नऊ वर्षांच्या अवधींत त्यांनीं दिल्लीस आपला अंमल बसविला, मोठमोठीं युद्धें करून इस्माईलबेग, गुलाम कादर यांसारख्या बलिष्ठ शत्रूंचा पराभव करून त्यांचें पारिपत्य केलें, रजपूत राजेरजवाड्यांस पादाक्रांत केलें, व शीख लुटारू लोकांचा पराभव करून त्यांस दिल्ली प्रांतांतून पिटाळून लावलें. या सर्व मोठमोठ्या मसलती करण्यास त्यांस सालोसाल पुष्कळ फौज चाकरीस ठेवावी लागली, व कर्जही पुष्कळ झालें. त्या मानानें त्यांस लाभही मोठाच झाला होता. सुमारें एक कोटी दीड कोटी उत्पन्नाचा मुलुख गेल्या नऊ वर्षांत त्यांनीं नवीन संपादन केला होता. त्या मुलखांत शिंदे, होळकर व पेशवे यांच्या वांटण्या होत्या. शिंद्यांनीं ज्या मसलती केल्या, त्यांत स्वतः तुकोजी होळकर हजर होते, व पेशव्यांच्या तर्फेनें अल्लीबहादर, विंचुरकर, पवार वगैरे कित्येक सरदार

प्रत्येक मोहिमेंत असत. शिंद्यांनीं नऊ वर्षांचा हिशेब दाखविला, त्यांत पेशवे सरकारावर सात कोटी रुपये कर्ज काढलें होतें. 'कर्ज कांहीं आपण मागत नाहीं. पण सरकारच्या हिश्याचा मुलुख आहे तो मजकडे रहावा म्हणजे मी त्यांत सारें कर्ज समजून घेतों.' असें शिंद्यांचें म्हणणें होतें. परंतु नानांनीं शिंद्यांविरुद्ध श्रीमंतांस असें समजाविलें कीं, शिंद्यांनीं आणलेले हे हिशेब पोकळ असून सरकारवर इतकें कर्ज मुळींच निघत नाहीं. याकरितां नवीन मिळालेला मुलुख सरकारांत ठेऊन शिंद्यांचें कर्ज सोईसोईनें वारून टाकावें. नानांचें शिंद्यांविरुद्ध जरी असें मत होतें तरी नाना हे आतां कुलमुखत्यार नव्हते. सवाईमाधवराव आतां वयांत आल्यामुळें त्यांच्या निकालाकडे नानांना आतां वाट पहात बसणें भाग होतें. श्रीमंतांस नानांनीं सुचविलेला मार्ग अन्यायाचा वाटला व त्यांनीं पटवर्धनाचे बाबतींत जो निकाल दिला त्याचप्रमाणें शिंद्यांनाही श्रीमंतांकडून न्याय मिळाला. त्यामुळें नाना मनांतल्या मनांत चुरमुरे खात बसले.

१६. महादजी शिंदे पुण्यास आल्यावर त्यांचें वजन सवाईमाधवराव यांच्यावर चांगलें बसलें. नानांनीं केलेले अन्याय श्रीमंतांच्या कानावर इतके दिवस येत नसत. परंतु शिंदे आल्यामुळें अन्याय झालेल्या लोकांना आतां वशिला लावण्याचा शिंदे हा एक मार्ग झाला. इतके दिवस नानांच्या अमदानींत साताऱ्च्या छत्रपतींना किल्ल्यावर बंदींत ठेवलें होतें. किल्ल्याच्या बाहेर त्यांना पडण्यास मज्जाव होता. हा छत्रपतींच्या बाबतींत पेशव्यांकडून फार मोठा अन्याय झाला होता. तेव्हां त्या बाबतींत छत्रपतींनीं शिंद्यांचा वशिला लाविला. शिंद्यांनीं श्रीमंतांकडे त्यांची तावडतोब दाद लाविली. छत्रपतींच्या बंदीच्या बाबतींत फार मोठा अन्याय झालेला आहे, ही गोष्ट नजरेस आणून त्यांस किल्ल्यांतून माहुलीसंगमापर्यंत फिरण्याची पेशव्यांकडून त्यांनीं परवानगी देवविली. याप्रमाणें शिंद्यांनीं छत्रपतींच्या बाबतींत श्रीमंतांजवळ नानांविरुद्ध रदबदली करून त्यांस किल्ल्याबाहेर फिरण्याची मोकळीक देववून मोठेंच पुण्य आपल्या पदरीं बांधून घेतलें. शिंद्यांच्या या कामगिरीबद्दल छत्रपतींच्या गादीविषयीं आदर

असणाऱ्या लोकांना खात्रीनें समाधान वाटलें असेल यांत शंका नाहीं. नानांच्या मताविरुद्ध छत्रपतींना शिंद्यांनीं मोकळीक देवविली, त्यामुळें पूर्वी कुलमुखत्यार बनलेल्या नानांच्या मानी मनाला शिंद्यांबद्दल व पेशव्यांबद्दल काय वाटलें असेल बरें ?

१७. इ. स. १७९१ मध्यें रघुनाथराव चिमणाजी सचीव हे मृत्यु पावले. तेव्हां त्यांचे जागीं त्यांचे पुत्र शंकरराव यांची स्थापना झाली. हे शंकरराव सखारामबापू बोकील यांचे जामात होते. ते वयानें लहान असल्यामुळें पेशवे सरकारांतून नानांच्या पूर्ण खात्रीच्या व वशिल्याच्या बाजीराव मोरेश्वर या नांवाच्या इसमास सचीवाचे कारभारी नेमण्यांत आलें. सखारामबापू हे नानांचे वैरी व शंकरराव सचीव हे सखारामबापूंचे जांवई, तेव्हां त्यांचा जो कारभारी नेमावयाचा, तो नानांच्या पूर्ण विश्वासाचाच असला पाहिजे होता यांत शंका नाहीं. शंकरराव यांना एक सावत्र आई होती. तिचें व त्यांचें बरें नव्हतें. नवरा मेल्यावर ही बाई तशीच सकेशा राहिली आणि लवकरच तिचें व या बाजीराव दिवाणाचें रहस्य जमलें. शंकररावांना या गोष्टीचा राग येऊन त्यांनीं एके दिवशीं आपल्या सापत्न मातेला अर्ज केला कीं, "वडिलांचा काळ होऊन फार दिवस झाले. अतःपर केंस ठवणें हें लोकाविरुद्ध आहे." परंतु शंकररावांच्या अर्जाचा त्या बाईनें कांहींच विचार न केल्यामुळें तिचे त्यांनीं बलात्कारानें केंस काढविले.[१] यामुळें कलह पेटून सचीवांच्या दौलतींत एकीकडे पंतसचीव व दुसरीकडे त्यांची सावत्र आई व बाजीराव दिवाण याप्रमाणें दोन पक्ष झाले. बाजीराव हा नानांच्या नेमणुकीचा होता व त्या भिस्तीवर आपण पाहिजे तें कर्म केलें तरी खपेल, असा तो मनांत भ्रम बाळगीत होता. एके दिवशीं शंकररावांच्या स्वयंपाकांत आचाऱ्याकडून कोणीं विष घालविलें असें उघडकीस आलें. त्या क्षणीं पंतसचीव घरांतून बाहेर पडून, जुजबी लवाजमा बरोबर घेऊन, जेजुरीस येऊन राहिले. बाजीराव यानें नानांस कळविलें कीं, पंतांनीं सरकारची कैद

१ खरेकृत नानाचें चरित्र पा. १४७.

मोडून बंड केलें आहे; त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं सरकारांतून स्वार-शिबंदी मिळावी. नानांजवळ शंकर जोशी ह्मणून एक तैलंग शास्त्री होते. ते नानांच्या विश्वासांतले होते. त्याला चाळीस[1] हजार रुपये लांच देऊन त्याच्या मार्फत नानांस समजाविलें कीं, पंतांनीं सरकारची कैद मोडून बंड केलें आहे. त्यावरून शामराव बल्लाळ हिवरेकर यांचे दिमतीस सरकारचे गारदी, व स्वार मिळून पांच सातशें जमाव होता तो नानांनीं हें सचीवांचें बंड मोडण्याकरतां बाजीरावाच्या हवालीं केला. तो जमाव घेऊन बाजीरावानें राजगडास वेढा घातला. परंतु तेथील किल्लेकऱ्यांनीं त्याची डाळ शिजूं दिली नाहीं. मग खुद्द शंकररावांनाच धरावें व साधेल तर मारून टाकावें, असा बेत करून बाजीरावानें शामराव हिवरेकर यांस पांच हजार रुपये व त्याचे टोळींतील कारकून व जमातदार होते त्यांस सोन्याचीं कडीं वगैरे बक्षिसें देऊं केलीं, आणि त्यांस आपल्या दुष्ट मसलतींत मिळवून घेतलें. मग शामरावाचे लोक बरोबर घेऊन बाजीराव जेजुरीस चैत्र शु. १३ स ह्मणजे ता. २५ मार्च सन १७९३ रोजीं अचानक गेला, व शंकरराव सचीव सोंवळ्यानें देवतार्चन करीत असतां त्यांवर त्यानें छापा घातला. सचीवांजवळ त्या वेळीं दहावीस हत्यारबंद माणूस मात्र होतें. प्रथम गारद्यांनीं खाशांवर पांच सात गोळ्या घातल्या, परंतु सुदैवानें त्यांस एकही लागली नाहीं. मग ते गारदी जवळ येऊन धरूं लागले तेव्हां सचीवांनीं व त्यांचे लोकांनीं गारद्यांशीं लढाई दिली. त्या प्रसंगीं सचीवांकडील दहा पांच शिपाई व कांहीं ब्राम्हण मारले गेले,[2] मूर्तिच्छेद झाला, व खुद्द सचीव यांस तरवारीच्या दोन जखमा झाल्या. त्यांची स्त्री सखारामबापूंची मुलगी हिलाही जखम झाली. याप्रमाणें झाल्यावर बाजीरावानें सचीवांस जेजुरी मुक्कामींच कैदेंत ठेविलें, व त्यांची सर्व मालमत्ता लुटून घेतली. दुसरे दिवशीं ह्मणजे चतुर्दशीस तें वर्तमान

---

१ खरेकृत ना. फ. च. पा. १४७. २ ऐ. ले. सं. नं. ३५०९ पा. ४६४६.

शिंद्यांना समजतांच त्यांनीं सरकार-वाड्यांत जाऊन भर कचेरींत नाना फडनविस यांची बहुत निर्भत्सना केली व श्रीमंतांस सांगितलें कीं, "असें होऊं नये. चाकरानें धन्याची अब्रु घ्यावी हें चांगलें नव्हे. याविशींचा बंदोबस्त स्वामींनीं करावा अथवा मला आज्ञा झालिया मी करीन." त्या नंतर सचीवांस आणण्याकरतां श्रीमंतांनीं बाबूराव केशव व राघोपंत गोडबोले यांस सरंजाम देऊन पाठविलें. तों शिंद्यांनीं घाई करून जेजुरीस पलटण पाठवून पंतसचीव यांस पुण्यास आपले गोटांत आणिलें आणि दोन कोस सामोरें जाऊन व वस्त्रें, जवाहीर देऊन बहुत सन्मानानें त्यांस आपणाजवळ ठेऊन घेतलें. शिंद्यांनीं याप्रमाणें नेट धरल्यामुळें नानांचा नाइलाज झाला. नानांचे बगलबच्चे घाशीराम कोतवाल याच्या अनाचाराच्या व अत्याचाराच्या बाबतींत मानाजीराव शिंदे उर्फ फाकडे यांनीं जसा नेट धरला, तसाच महादजींनीं बाजीरावाच्या पारिपत्याकरतां धरला. 'ज्या शागिर्दानें वपनाचे समयीं बाईस स्पर्श केला त्याचे हात तोडावे, ज्या आचाऱ्यानें स्वयंपाकांत विष घातलें त्याचा वध करावा व जेजुरीच्या दंग्यांत सामील झालेले कारकून व गारदी वगैरे जे लोक होते त्यांस व बाजीराव मोरेश्वर व शामराव हिवरेकर यांस कडक शासनें करावीं.' याप्रमाणें शिंद्यांच्या उठावणीस श्रीमंतांनीं मान्यता दिली व चौकशी करून सर्व गुन्हेगारांस यथायोग्य शासनें दिलीं. लुटींत गेलेली सचीवांची दौलत त्यांस परत केली व त्यांचें श्रीमंतांनीं सांत्वन केलें.

१८. याप्रमाणें सचीव प्रकरणाचा पुणें दरबारकडून निकाल लागला. पण त्यामुळें नानांचीं कुटिल कारस्थानें मात्र सहज चवाठ्यावर आलीं. घाशीरामाच्या बाबतींत ज्याप्रमाणें ब्रह्महत्या, चोऱ्या, कुंटणखाने वगैरे गोष्टींचा समावेश होता, त्याचप्रमाणें या सचीव प्रकरणांत नानांचा बगलबच्चा, बाजी मोरेश्वर याचें सचीवांच्या सकेशा विधवेशीं असलेलें रहस्य, विषप्रयोग करण्याची साधनसामुग्री व कटांतील आचारी, ब्रह्महत्या, देवांच्या मूर्ति भ्रष्ट करण्याची मनाची प्रवृत्ति, प्रसंग आल्यास धन्यालाही मारून टाकण्याची तयारी, वगैरे बऱ्याच गोष्टी लोकांच्या नजरेला आल्या. नानांच्या विश्वासांत जसे घाशीराम व बाजी-

राव मोरेश्वर यांच्यासारखे दुष्कर्मी लोक होते, तसेच त्यांच्या सान्निध्यांत शंकर जोशी या नांवाचा एक तेलंग शास्त्री होता. ज्या अय्याशास्त्रयांचा शास्त्रार्थ नानांना नेहमीं आवडे व ज्या शास्त्रयांची संभावाना घाशीराम-प्रकरणीं पुण्याच्या ब्राह्मणांनीं, त्यांचें पागोटें व शालजोडी फाडून केली होती, त्याच तेलंग शास्त्रयांनीं या सचीव प्रकरणीं चाळीस हजार रुपयांचा लांच खाऊन धन्यास मारून टाकण्याचा शास्त्रार्थ नानांना काढून दिला होता. नानांचे बगलबच्चे या स्वरूपाचे होते. नाना जो पैशाचा संचय करीत होते, त्याचा प्रवाह अशा पापी व दुष्कर्मी लोकांकडून होत होता, हें आतां महाराष्ट्राच्या निदर्शनास येऊन चुकलें होतें. नानांच्या बगलबच्चयांना यवनांप्रमाणें देवांच्या मूर्ति फोडण्याचें पाप वाटत नव्हतें, ब्रह्महत्येची पर्वा नव्हती, स्त्रियांच्या शीलाची कदर नव्हती, विषप्रयोगानें खून करण्याची मनाला खंत नव्हती. अशा आचाराचे व विचाराचे नानांचे विश्वासू हस्तक होते, यावरून त्यांचे नेते नाना, हे कसे होते याचें चित्र रेंखाटण्याची जरूरी नाहीं. तें पुढील इतिहासावरून ओघानें कळून येणारच आहे. एकंदरींत महादजी शिंद्यांनीं नानांचीं कृष्णकृत्यें चवाट्यावर आणण्याचा सपाटा सुरू केला ही गोष्ट मात्र खरी!

१९. शिंदे पुण्यास येऊन तळ ठोकून बसले यामुळें नानांच्या कारभारांत पदोपदीं व्यत्यय येऊं लागला. तेव्हां त्यांना हिंदुस्थानांत ताबडतोब परत जाणें भाग पडेल असें त्यांनीं एक कारस्थान उत्पन्न केलें. शिंद्यांचें व होळकरांचें हिंदुस्थानांत युद्ध जुंपलें ह्मणजे महादजी आपोआप पुणें सोडून जातील असें नानांना वाटत होतें. होळकरांनीं शिंदे दरबाराबरोबर कांहीं कलगात उत्पन्न करावी ह्मणून नानांच्या होळकरांकडे नेहमीं डांका वोळत. त्यामुळें नानांना शिंद्यांविरुद्ध तिकडे नवीन कारस्थान उत्पन्न करावयाला संधि मिळाली.

२०. "पुढें कांहीं दिवसांनीं होळकरांचा खुशाल कुंवर या नांवाचा सरदार शिंद्यांच्या मुलखांत उपद्रव करूं लागला. तेव्हां त्याजवर लख-

बादादा लाड यांची रवानगी झाली. त्या उभयतांची लढाई होऊन, तींत खुशाल कुंवर गोळी लागून ठार झाला. तरी त्याचे लोक लढतच होते. परंतु लखबादादांच्या जबरदस्त माऱ्यापुढें त्यांचा नाइलाज होऊन, ते होळकरांच्या मोठ्या लष्करास जाऊन मिळाले. आपल्या सरदाराचा मोड झालेला पाहतांच आपलें सर्व सैन्य एकत्र करून तुकोजीराव होळकर शिंद्यांच्या फौजेबरोबर लढण्यासाठीं बनास नदीच्या तीरावर आले, आणि तेथें त्यांनीं तळ दिला. त्यामुळें जिवबादादांसही अर्थात् होळकरांशीं सामना देण्यासाठीं त्यांच्या तोंडावर यावें लागलें. त्या स्वारींत शिंद्यांकडील गोपाळराव, लखबादादा वगैरे सर्व सरदार होते. पुढें लढाईस सुरुवात झाली. तेव्हां खुद्द तुकोजी होळकरांवर जिवबादादांनीं छापा घालून त्यांचा मोड केला. शिंद्यांच्या सामर्थ्यापुढें त्यांचे कांहीं चाललें नाहीं."[1]

२१. 'या पराभवामुळें होळकरांस पराकाष्ठेचा त्वेष उत्पन्न होऊन, त्यांनीं मोठ्या तांतडीनें अहल्याबाईस मदत पाठविण्याविषयीं लिहिलें. त्या मानी व रागीट स्त्रीनें डुजरनेक नामक फ्रेंच सरदारास, बरोबर मोठी फौज देऊन त्यांच्या मदतीस पाठविलें. त्याजबरोबर खुद्द त्या सरदाराच्या ताब्यांतील चार कवायती पलटणें व एक जंगी तोफखाना होता. शिवाय इतर फौज होती. मिळून सर्व लोक तीस हजार होते. होळकरांचा पराभव झाला तरी त्यांशीं लगट करून पाठलाग करावा आणि दीर्घद्वेष वाढवावा असा जिवबादादांचा विचार नव्हता. त्यांच्या मनांत त्यांच्या थोड्या बहुत मागण्या कबूल करून, कसे तरी हे भाऊबंदींतील कलह मिटवावे असें होतें. ह्मणून ते व गोपाळरावभाऊ ह्यांनीं पुष्कळ प्रयत्न केले. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.[2] या

१ जिवबादादा बक्षी यांचें चरित्र पा. १६१.

२ "पुढें होळकरांच्या स्वारांनीं दोन तीन महिने शिंद्यांचे फौजेस कोट्याचे आसपास फिरवून जेरीस आणिल्यामुळें अंतर्वेदींतील वसुलाचा हिस्सा देण्याचें कबूल करून गोपाळराव वगैरे मंडळीनें तंटा मिटविला होता. परंतु मल्हारराव होळकर या तरुण सरदारानें अखेरीस लढाईचा प्रसंग आणिला." नातूकृत मा. च. पा. २५७.

प्रसंगीं मल्हारराव होळकरांस इतका कांहीं युद्धावेश आला होता कीं, लढाई करून जिवबादादा वगैरे सरदारांची पुरी खोड मोडीन तेव्हांच हा तंटा मिटेल, असें निर्वाणीचें उत्तर सांगून त्यांनीं जंगी तयारी चालविली. अर्थात् जिवबादादांसही तशाच बेतानें लढाई चालविणें भाग पडलें. या प्रसंगीं जिवबादादांकडे गोपाळराव, लखबादादा, जगोबा बापू, डी बॉइन इत्यादि मुख्य मुख्य सरदारांच्या हाताखालीं मिळून सुमारें वीस हजार स्वार, नऊ हजार कवायती शिपाई व ऐंशीं तोफा इतकी सामुग्री होती. प्रतिपक्षांकडेही वर लिहिल्याप्रमाणें अशीच कडेकोट तयारी होती. या दोनही दळांची गांठ अजमिरानजीक लाखेरीच्या बारींत पडली. ही लढाईची जागा फार बिकट असून सर्व फौज उभी राहण्यास देखील ती पुरण्यासारखी नव्हती. होळकरांकडे मल्हारराव, काशीराव होळकर, डुंजरनेक वगैरे सरदार होते. उभय दळें रणभूमीवर तयार असतां, अकस्मात् शिंद्यांच्या लष्करांतील दारूच्या कोठीस आग लागून ती पेटली. त्यामुळें अर्थातच लष्करांत गडबड उडून गेली. ही संधि मिळतांच होळकरांच्या सरदारांनीं त्यांजवर एकदम चाल केली. तेव्हां जिवबादादांनीं लागलेंच सर्व लोक एकत्र करून त्यांस तोंड दिलें. आणि तो हल्ला मागें परतविला. त्यामुळें पुढें आलेले स्वार पळून गेले. पण डुंजरनेक यांजकडील कवायती फौजेस पळून जातां येईना. तेव्हां उभयतांकडील लष्कराची लगट होऊन मोठी लढाई सुरू झाली. ती सकाळपासून तिसरे प्रहरपर्यंत चालू होती. इतक्यांत मल्हारराव होळकर गोळी लागून जखमी होऊन पडला. त्यामुळें त्यास हत्तीवर घालून नेलें. इकडे शिंद्यांच्या लष्करांत डी बॉयनासही मोठी जखम लागली. ही लढाई मोठ्या निकराची झाली. या प्रसंगीं होळकरांकडील डुंजरनेकाचीं तीस हजार लोकांची चार पलटणें प्राण जात तोंपर्यंत शौर्यानें लढलीं. परंतु शिंद्यांच्या पराक्रमी लोकांपुढें त्यांचें कांहीं न चालतां ते सर्व लोक लढाईंत पडले. अशा प्रकारें या लढाईंत होळकरांचा फारच नाश होऊन, त्यास पळ काढावा[१] लागला." ही लढाई ता. ५ जून सन १७९३ इ. रोजीं झाली. तींत होळकरांचा पूर्ण पराजय झाला.[२]

---

१ जिवबादादा यांचें चरित्र पा. १६३।६४. २ ऐ. ले. सं. पा. ४६०५.

२२. या लाखेरीच्या लढाईची वार्ता पुण्यास येतांच नानांच्या मनास मोठाच धक्का बसला [१]. तुकोजी होळकरांस पूर्वीपासून नानांचें पाठबळ होतें [२]. आपल्या पक्षांतील होळकरांची शिंद्यांनीं अशी दुर्दशा केली हें पाहून आपलें कारस्थान आपल्याच अंगावर आलें अशी नानांचीं खात्री झाली. शिंद्यांनीं नानांचें दांत नानांच्याच घशांत घातले त्यामुळें आपलें कसें होणार हा पेंच नानांवर येऊन पडला. नानांचें शिंद्याविरुद्ध नवीन नवीन कंडया उठविणारें प्रसिद्धी—खातें तयारच होतें. त्यांनीं शिंद्यांविरुद्ध निरनिराळ्या कंड्या पिकविण्यास सुरवात केली होती. **कंडी नं. १**—शिंद्यांनीं होळकरांची जशी दुर्दशा केली तशी ते आतां नानांची गठडी वळणार आणि दिल्लीच्या बादशहाप्रमाणेंच पेशवेही शिंद्यांच्या हातचें मेणाचें बाहुलें बनणार अशी नानांना भीति उत्पन्न झाली. [३] या कंडीमुळें सवाईमाधवराव यांच्या मनांत भीति उत्पन्न करून शिंद्यांच्या मनांत पेशव्यांना नामधारी बनवावयाचें आहे व पेशवाई अपहार करावयाची आहे, अशा दुष्ट कल्पनेचें विष सवाईमाधवराव यांच्या हृदयांत ओतण्याचा नानांनीं प्रयत्न केला. **कंडी नं० २**—नाना [४] व शिंदे यांच्यामधील राजकारणें घाटत असतां निजामाचा दिवाण मैनुद्दौला ऊर्फ मशीरउल्मुलुख यानें हरिपंत फडक्यांशीं हळूंच बोलणें काढलें कीं, ‘ शिंद्यांचें व नानांचें वांकडें आहे. शिंदे पुण्यास आल्यावर कांहींतरी कुरापत काढून नानांच्या जिवास अपाय करतील असें आह्मांस भय वाटतें. नानांची व आमची पुरातन दोस्ती. आह्मीं या प्रसंगीं वाटेल ती कुमक द्यावयास तयार आहों. फक्त बेदर सुभ्याच्या चौथाईवरील आपला हक्क मराठ्यांनीं सोडावा एवढेंच आमचें ह्मणणें आहे. नानांनीं आमचें हें मागणें मंजूर केलें तर शिंद्यांकडून त्यांना आह्मीं कोणताही उपसर्ग लागूं देणार नाहीं. ’ अशा मदतीकरतां बेदरच्या चौथाई हक्काच्या सूटीबाबत निजामानें केलेली मागणी नानांना महाग पडली. इंग्रजांची दोन पलटणें मराठ्यांच्या दिमतीला होतीं तीं जास्त दिवस नानांना ठेऊन घेतां आलीं असतीं. त्याबाबत पेशव्यांना काय वाटेल ती थाप त्यांना मारतां

---

१ व ३ खरेकृत नानांचें चरित्र पा. १५२. २. ऐ. ले. सं. पान ४३०५.
४. खरेकृत नाना फडनविसांचें चरित्र पा. १५०.

आली असती. कारण त्या बाबतींत नवीन प्रश्न उत्पन्न होत नव्हता. परंतु त्या पलटणांच्या बाबतींत इंग्रजांनीं साफ नकार दिल्यामुळें नानांना शिंद्यां-विरुद्ध निजामाच्या मदतीची मागणी करावी लागली. परंतु या वेळीं आजपर्यंतच्या नानांच्या दोस्तीचा निजामानें विचार न करतां नानाकडे मदतीच्या मोबदल्याकरतां बेदरवरील पेशव्यांचा चौथाई हक्क सोडावा अशी त्यांनीं मागणी केली. हा चौथाई हक्क सोडण्याचें कबूल करावें तर त्याला सवाईमाधवराव यांची संमति पाहिजे होती व ती गोष्ट करून महादजी-विरुद्ध मदत घेण्यास पेशवे तयार होणार नाहींत हें नाना जाणून होते. ह्मणून निजामाला मदतीला बोलावण्याचें नानांना रहित करावें लागलें. परंतु त्यांनीं आपणावर आलेल्या प्रसंगीं आपणास बिनशर्त मदत न केल्या-मुळें नानांच्या मनांत निजामाबद्दलही द्वेष उत्पन्न झाला असेल यांत शंका नाहीं. पुढें शिंदे पुण्यास आल्यावर निजामाकडील या आपल्या कारस्था-नाला नानांनीं कलाटणी दिली, व 'चोराच्या उलट्या बोंबा' या ह्मणी-प्रमाणें शिंदेच नानांविरुद्ध निजामाशीं मदत मागतात अशी त्यांनीं कंडी उठविली. या बाबतींत नानांचेच स्वतःचे शब्द असे आहेत कीं, "शिंदे येथें आहेत. त्यांची चाल सुधी नाहीं. नबाबाकडे त्याचें राजकारण आहे. बेदर सरकारच्या चौथेचा अंमल स्वराज्याचा आहे तो (शिंद्यांनीं) नबा-बास द्यावा. नबाबांनीं शिंद्यांस बीड परगणा अगदीं द्यावा आणि आमचा बंदोबस्त करावा. आपण श्रीमंतांजवळ राहून दौलतीचा कारभार करावा असाही डौल आहे. याच्या पोटांत जें पाहिजे तें आहे. याचें कसें करावें? श्रीमंत कांहीं मनास आणीत नाहीं. (त्यांच्या) मनांत येत नाहीं तेव्हां पुढें कसें [१]" या खुद्द नानांच्या बोलण्यावरून नाना शिंद्यांविरुद्ध पेश-व्यांना निरनिराळ्या गोष्टी समजावीत होते, पण शिंद्यांचा कोणताच अपराध त्यांच्या नजरेला येत नव्हता ह्मणून नानांचें ते ऐकत नव्हते हें सिद्ध होतें. शिवाय शिंदे पुण्यास असल्यामुळें खुद्द पेशव्यांच्या विरुद्ध

---

१ ऐ. ले. सं. नं. ३६३२, पान ४७५७.

वागण्यासही त्यांना धैर्य होत नव्हतें. त्यामुळें राजकारणास कशी पलट द्यावी याचाही त्यांचा विचार नक्की झालेला नव्हता व ते बुचकळ्यांत व विचारांत होते, हें "तेव्हां पुढें कसें!' या उद्गारावरून स्पष्ट होतें. शिंद्यांनीं नबाबाकडून छत्तीस लाख रुपये खाल्ले आहेत अशीही कंडी त्या वेळीं पुण्यांत पिकविण्यांत आली होती.

२३. अशा कंड्या जरी पिकविण्यांत येत होत्या व त्याचा संबंध प्रत्यक्ष सवाईमाधवराव यांच्याशीं जरी होता तरी त्यांपासून त्यांच्या मनावर कांहींच वाईट परिणाम झाला नाहीं. महादजी शिंदे यांच्याबद्दल त्यांचें मन शुद्ध होतें. लाखेरीच्या लढाईमुळें नानांचा पक्ष लंगडा पडला व होळकरांकडून शिंद्यांना वठणीवर आणण्याचा नानांचा मनसुबा फोल ठरला. सवाईमाधवराव यांनीं, आपलीं दोन मोहरीं विनाकारण झरेला पडून पेशवाईचा नाश होतो असें पाहून, त्यांची तडजोड करण्याचें ठरविलें. होळकरांचा शह सोडून शिंद्यांच्या फौजेनें दूर जावें, होळकरांनीं लढाईची तयारी बंद करावी व उभय पक्षांची तडजोड सरकारांतून होईल ती उभयतांनीं मान्य करावी असा श्रीमंतांनीं ठराव केला. तो महादजी शिंद्यांनीं तात्काळ मान्य केला. या प्रसंगीं होळकरांवर म्हणजे पर्यायानें नानांवर शिंद्यांनीं मात केली असतांही श्रीमंतांच्या शब्दाबाहेर ते बिलकुल वागले नाहींत. उलट श्रीमंतांचा शब्द त्यांनीं वरच्यावर झेलून धरला, यावरून शिंद्यांची स्वामीनिष्ठा खात्रीनें वाखाणण्यासारखी होती, असें उघड दिसून येतें. होळकरांची समजूत घालून त्यांची मान्यता मिळविण्याकरतां, श्रीमंतांनीं पुण्याहून बळवंतराव काशी कात्रे व नंतर देवराव हिंगणे यांची हिंदुस्थानांत रवानगी केली. शिंद्यांचें वजन कमी करण्याकरतां द्वेषबुद्धीनें जो डाव नानांनीं टाकला होता तो उलट त्यांनाच मानहानिकारक झाला. नानांच्या या अपमान-परंपरेनें महादजी शिंद्यांचा जरी क्रमाक्रमानें राग शांत होत होता, तरी नानांचा राग आंतून पदोपदीं वाढत होता, हें मात्र कोणाच्या लक्षांत आलें नाहीं.

२४. इतकें झालें तरी महादजींबद्दल नानांचें मन शुद्ध न होतां दिवसेंदिवस तें द्वेषाग्नीनें जास्त पेट घेऊं लागलें. नाना जरी भेटाकुटीला आले होते, तरी ते महादजीपुढें नमतें घेण्यास तयार नव्हते. या वेळीं नानांच्या आजपर्यंतच्या कुलमुखत्यारीला त्यांना दोन शत्रू झाले होते महादजी हे उघड शत्रू व सवाईमाधवराव आतां वयांत आल्यामुळें व त्यांचा महादजींवर लोभ जडल्यामुळें, नाना मनांत आणतील ती गोष्ट घडवून आणण्याला नानांना त्यांची परवानगी मिळत नसे म्हणून सवाईमाधवराव हे नानांचे गुप्त शत्रू अशी परिस्थिति निर्माण झाली. नानांची राजकारणाची दृष्टि निराळी व सवाईमाधवरावांची निराळी होती. पेशव्यांना आपण धनी व बाकीचे आपले नोकर या दृष्टीनें पहावयाचें होतें, ह्मणून त्यांना पेशवाईचा व्यापक दृष्टीनें विचार करावा लागत असे. नानांचें राजकारण आपण व आपला पक्ष यापलीकडे गेलें नाहीं. म्हणून नाना व सवाईमाधवराव यांचें कारभारांत एकमत होत नाहींसें झालें. त्यामुळें ते नानांना मनांतून शत्रूप्रमाणें वाटूं लागले "श्रीमंत कांहीं मनास आणीत नाहींत. त्यांच्या मनांत येत नाहीं तेव्हां पुढें कसें !" असे जे नानांचे निराशेचे उद्गार आहेत त्याचें मूळ हेंच होतें. त्यामुळें अशी परिस्थिति उत्पन्न झाली कीं एका म्यानांत दोन तरवारी राहणें शक्य नाहीं असें उघड दिसूं लागलें. पेशव्यांच्या साम्राज्यांत यापुढें महादजींनीं तरी रहावें अगर नानांनीं तरी रहावें असें झालें. त्यांचे उघड उघड विरुद्धपक्ष दिसूं लागले. त्यामुळें सवाईमाधवरावांची मात्र त्रेधा उडूं लागली. शिंद्यांच्या हिशेबासंबंधीं ज्या वेळीं दरबारांत वादविवाद सुरू झाला, त्या वेळीं शिंदे भर दरबारांत उघड उघड बोलले होते: 'इतके दिवस स्वाऱ्या व मुलुखगिऱ्या करून देश जिंकले व वजिरात वगैरे मिळवून श्रीमंतांचा लौकिक अटकेपर्यंत केला. तर आतां शेवटली इच्छा हुजुरच्या जवळ राहून दौलतीचा कारभार करण्याविषयीं आहे. त्यासाठीं माझे दौलतीचा हिशेब आपण घ्यावा व सरकारचे दौलतीचा हिशेब मला द्यावा.' असें बोलण्यांत शिंद्यांचा एकच

हेतु होता. शिंद्यांचे हिशेब पोकळ आहेत असें नानांनीं श्रीमंतांस समजाविलें होतें. तेव्हां सरकारचे हिशेब नाना जे ठेवतात ते जर शिंद्यांना पहावयाला मिळाले असते तर सरकारी हिशेबांत केवढीं मोठमोठीं बिलें अगर खिंडारें होतीं हें शिंद्यांनीं नानांच्या हिशेबावरून पेशव्यांच्या नजरेला आणून दाखविलें असतें. परंतु श्रीमंत हे नाना व शिंदे कसे आहेत हें धनी या दृष्टीनें ओळखीत होते. म्हणून त्यांनीं हिशेबाच्या बाबतींत पटवर्धनाप्रमाणें शिंद्यांना न्याय दिला होता. त्यामुळें हिशेबासंबंधींचें नानांचें पाप झांकलें गेलें. तरी सुद्धां नाना ठिकाणावर येईनात. म्हणून नानांवर मात करण्याकरतां शिंद्यांनीं पेशवाईचा कारभार आपणाला मिळावा अशी श्रीमंतांच्या जवळ मागणी सुरू केली.

२५. या बाबतींत श्रीमंतांच्या बरोबर भाषा करावयाला शिंद्यांना एकांत असा मिळाला नाहीं. एके दिवशीं श्रीमंत पर्वतीस दर्शनाकरतां गेले होते. त्या वेळीं त्यांच्या समागमें शिंदे होते. श्रीमंत दर्शन करून पर्वतीच्या खालीं आले व हिराबागेपाशीं हत्ती उभा करून पर्वतीच्या तळ्यांत नावेंत बसून फिरावें म्हणून शिंद्यांचा हात धरून तिकडे गेले; आणि नावेंत बसून नांव खेळूं लागले. त्या वेळीं नावेंत श्रीमंत, शिंदे व एक नावाडी एवढीच मंडळी होती. ही संधि पाहून शिंद्यांनीं श्रीमंतांच्या जवळ भाषा काढली कीं, हिंदुस्थानांतून आलों तो हेतु महाराजांनीं पूर्ण केला पाहिजे. पुणें मुक्कामीं सरकारची दिवाणगिरी करावी व सर्व राज्याचा कारभार करावा, याप्रमाणें माझा हेतु आहे. सरकारांनीं शेवटास नेला पाहिजे. नाना जो कारभार करतात तो मजकडे सांगावा." हें शिंद्यांचें बोलणें ऐकून श्रीमंत म्हणाले, "तुम्हीं बोललां ही गोष्ट बरी आहे, परंतु माझा मनोदय असा आहे. हा तुम्हांस सांगतों. माझा उजवा हात नाना फडनविस व डावा हात महादजी शिंदे. हे दोन्ही हात कायम आहेत, तेथपर्यंत मी राज्यकारभाराविषयीं बेफिकीर आहे. म्हणून राज्य करितांना खेळ खेळतों! नाना तऱ्हेचे खेळ, वाघांच्या लढाया, व जेठी मल्ल

यांच्या कुस्त्या, वज्रमुष्टींच्या लढाया, शिकारखाने, नाना तऱ्हेचे खेळतों. असे किती प्रकारेच खेळ खेळतों. तेव्हां या दोन्हीं हातांतील एखादा हात मोडला तर सारें खटलें माझे गळ्यांत येऊन खेळ खेळावयास रिकामपण होणार नाहीं. यासाठीं जें चाललें आहे तें चांगलें आहे. याला तुम्हीं कांहीं फांटा फोडूं[१] नये." याप्रमाणें उभयतांचें संभाषण झाल्यानंतर श्रीमंत वाड्यांत आले व शिंदे आपल्या लष्करांत निघून गेले.

२६. शिंद्यांनीं पेशव्यांच्या जवळ कारभारीपणाची जी मागणी केली ती केवळ नानांवर मात करण्यापुरतीच होती. शिंद्यांच्या मनांत आपणाला नानांनीं शरण यावें एवढेंच होतें. कारण शिंद्यांचें महत्व कमी करण्याची आगळीक नानांनीं सुरू केली होती. अर्थात् ती त्यांच्याकडूनच माघारीं घेतली गेली तर मिटणार होती. परंतु इतके दिवस तसा प्रकार घडून आला नाहीं. याकरतां अखेरची मात्रा म्हणून शिंद्यांनीं हा डाव टाकला होता. श्रीमंतांजवळ शिंद्यांनीं एकांतांत कारभारीपणाची मागणी केली हें वर्तमान नानांना समजलें. तेव्हां एके दिवशीं नानांनीं श्रीमंतांची एकांतांत गांठ घेतली. श्रीमंतांच्या बाळपणापासून त्यांच्यावर आपण कोणकोणते उपकार केले याचा नानांनीं पाढा वाचला. श्रीमंतांना गादीचा लाभ व्हावा म्हणून राघोबादादांचें बंड कसें मोडलें, पेशव्यांचें राज्य कसें वाढविलें, शिंद्यांचा ब्राम्हणशाही मोडण्याचा कसा डाव आहे, या गोष्टींचें त्यांनीं श्रीमंतांपुढें पुराण वाचलें. आपली स्वतःची स्वामीभक्ति, राज्यभक्ति, कर्तबगारी वगैरे आजपर्यंतच्या सर्व गोष्टींचें त्यांनीं श्रीमंतांपुढें चऱ्हाट वळलें. या सर्व गोष्टी सांगत असतांना नानांच्या डोळ्यांतून सारखे अश्रु वाहत होते. शेवटीं नाना श्रीमंतांना म्हणाले कीं, माझ्या मसलतीनें वागावयाचें असल्यास तशी आज्ञा व्हावी, नाहीं तर मला काशीस जाण्याचा निरोप द्यावा. नानांच्या या हृदयस्पर्शी भाषणानें श्रीमंतांच्या अंतःकरणाला दयेचा पाझर फुटला व त्यांनीं नानांस आश्वासन देऊन त्यांना निरोप दिला. याप्रमाणें

१. पे. ब. पा. १४६ आवृत्ति ५ वी.

शिंद्यांच्या डावामुळें नाना रडकुंडीपलीकडे जाऊन प्रत्यक्ष रडले व हताश होऊन बसले. या वेळीं त्यांना फक्त पेशव्यांच्या आश्वासनाचा आधार राहिला होता.

२७. पुढें दोन चार दिवसांचे अंत "हरीपंततात्या[1] फडके दोन प्रहरच्या समयांत जेऊन खावून स्वारीच्या खिजमतगारास समागमें घेऊन पालखींत बसून शिंदे यांचे लष्करांत गेले. त्या वेळेस पाटीलबोवा जेवून निजावयाचे डेऱ्यांत गेले होते. त्या संधींत तात्या जाऊन तेथें पोंचले. ती बातमी पाटीलबोवा यांस चोपदार याणें जाऊन सांगितली कीं, "बाहेर हरीपंततात्या आले आहेत." असें एकतांच पाटीलबोवांस मोठें आश्चर्य वाटून चोपदारास बोलतात, "हें तूं काय बोलतोस?" तेव्हां चोपदार म्हणाला "महाराज, खरेंच तात्या आले." असें ऐकून पाटीलबोवा डोकीस पागोटें घालून बिचोब्याबाहेर (लहान तंबू) आले. तात्या डेऱ्यांत दाखल झाले. मग महादजी शिंदे यांणीं तात्यांचा हात धरून, उभयतां येऊन लोडाशीं बसले. मग महादजी शिंदे तात्यांस ह्मणतात "असे उन्हाचे सडी स्वारी, कोणी बरोबर नाहीं, असें यावयाचें कारण कोणतें?" हें ऐकून तात्या ह्मणतात, "अहो बोवा! यावयाचें कारण तुम्हीं सरकारचा कारभार करणार, नानांनीं व मी कारभारांत नसावें, आम्ही उभयतां सरकारचे अपराधी, ह्मणोन तुम्हांजवळ आलों. काय पारिपत्य करावयाचें असेल तें करावें. कोणीकडून श्रीमंतांचें राज्य निर्विघ्न चालावें हा संकल्प आमचा आहे." असें बोलणें तात्यांचें ऐकून महादजी शिंदे तात्यांस ह्मणतात, "शाबास! तुम्हांपुढें आमची पराकाष्ठा झाली! बोलावयास कोणते गोष्टीनें जागा राहिली नाहीं!! आतां जशी तुमची मर्जी असेल तसेच चालूं. आमचे मनांत कारभार करावा हा हेतू धरून होतों. परंतु खावंदांचे मर्जीपुढें आमचें कांहीं चालत नाहीं. एक दोन वेळां विनंती करून पाहिली व एकांतीं बोलणें केलें. परंतु सरकारचे

---

१. पे. ब. पा. १४७।४८.

मर्जीचा कल या बोलण्यावर रुकार येत नाहीं, असें पाहून मीही बोलणें सोडून दिलें. त्यांत सर्वांचा मनोदय चालत आहे तसें चालवावें. तेव्हां माझा एकट्याचा आग्रह कसा निभावतो? त्यापेक्षां तुम्ही ह्मणतां तसें चालूं." असें बोलणें तात्यांनीं ऐकल्यावर तात्या ह्मणतात, "हें बोलणें खाचित आहे, आतां मनामध्यें कांहीं किंतू राहिला नाहीं, असें मला स्वच्छ मन करून उत्तर सांगावें." हें ऐकून पाटीलबोवा तात्यांस म्हणतात, "इतकें बोलणें मीं बोललों यांत कांहीं संशययुक्त बोललों असा तुमच्या मनांत संशय वाटत असल्यास मला सांगावें." असें ऐकून तात्या ह्मणतात, "कांहीं बोलण्याचा संशय राहिला नाहीं. परंतु खचीत याप्रमाणें झालें ह्मणजे ठीक." असें तात्यांचें बोलणें ऐकून पाटीलबोवा यांनीं शपथपुरःसर सांगितलें. तेव्हां तात्या व शिंदे या उभयतांची श्रीमंतांचे पाय स्मरून परस्पर शपथ झाली. त्या वेळेस दोघांचे चित्तांतील दहन गेला. मग पानसुपारी, अत्तरगुलाब होऊन तात्यांस पोषाग जवाहीर देऊन मार्गस्थ केलें. उभयतांचीं बोलणीं राज्य प्रकरणीं बहुत झालीं. त्या बोलण्यांत महादजी शिंदे यांची खातरजमा हरिपंत तात्या यांणीं केली. तेव्हां उभयतां निःसंशय झाले. मग तात्या निरोप घेऊन आपले डेऱ्यांत येऊन, लष्करांत शिंद्यापाशीं ठरला जो सर्व मजकूर तात्यांनीं नानांपाशीं सांगितला. मग परस्परें खातरजमा नानांची झाली."

२८. "त्याजवर महादजी शिंदे दोहों चोहों दिवशीं वाड्यांत सरकारचे भेटीस आले. त्या दिवशीं वाड्यांत तात्या व नाना व पाटीलबोवा हे एके जागीं एकांतांत बसून सर्व बोलण्याचे खुलासे झाले. त्या बैठकींत त्रिवर्गांचीं बोलणीं परस्पर होऊन तिघांचे चित्तांची प्रांजळता झाली. कोणाचे चित्तास कारभाराविषयीं कांहीं एक किंतू राहिला नाहीं. असें झाल्यानंतर तिघे उठून श्रीमंत आरसे महालांत बसले होते तेथें जाऊन पाटीलबोवा येऊन मुजेरे करून बसले. नाना व तात्या बसले. त्या दिवशीं सारा दरबार आरसे महालांत झाला."

२९. ही हकीकत पेशव्यांच्या बखरीमध्यें दिली आहे. इतकी खुलासेवार माहिती इतरत्र कोठें मिळत नाहीं. या माहितींतून पुष्कळशा गोष्टींचा खुलासा होतो. नाना व हरिपंत फडके हे पेशव्यांचे अनुक्रमें मुख्य व दुय्यम कारभारी होते. हरिपंतांचें व शिंद्यांचें बरेच दिवसांपासून वैमनस्य होतें. ते कारभारांत नकोत असें शिंद्यांचें म्हणणें असतां नानांनीं ती गोष्ट ऐकिली नाहीं व त्यांना कारभारांत ठेऊन घेतलें. फडके व पटवर्धन एकचित्त आहेत व ते शिंद्यांबद्दल नानांचें मन कलुषित करतात असा शिंद्यांचा त्यांच्यावर आरोप होता. शिवाय पुण्यास शिंदे येत आहेत असें समजतांच नानांनीं फडके व पटवर्धन यांस पुण्यास तांतडीनें बोलावून घेतलें होतें यांतील हेतु हाच होता कीं, प्रसंग पडल्यास नानांना शिंद्यांची गठडी वळतां यावी. नानांची तीच तयारी चालली होती. या गोष्टीला फक्त पेशवे अनुकूल नव्हते. नानांच्या शब्दाप्रमाणें पेशवे जर नाचले असते तर परिणाम काय झाला असतां, हें विचारवंतांना सांगण्याची जरूरीच नाहीं. कांहीं तरी एक भयंकर दिव्य झालें असतें, एवढी मात्र गोष्ट सत्य होती. शिंद्यांचा जोर जास्त पडल्यामुळें व खुद्द पेशवे त्यांच्या तंत्रानें वागूं लागल्यामुळें नाना, फडके, पटवर्धन वगैरे मंडळींवर परमेश्वरी कोप झाल्याप्रमाणें प्रसंग गुजरला. शिवाय सवाईमाधवराव हे परमेश्वरी अवतार आहेत अशी महाराष्ट्रांतील जनतेची त्यांनींच खात्री पटवून दिली होती. तेव्हां त्यांच्या अंगाची देवकळा तावडतोब काढून घेण्यासही त्यांना सवड नव्हती. शिवाय महादजी शिंदे हे पेशव्यांचे मोठे भक्त तेथें आल्यामुळें, पेशव्यांची देवकळा दुणावली होती. याकरतां आपला देवच शिंद्यांचा पाठीराखा झाल्यामुळें नाना, फडके व पटवर्धन या त्रयींचे हातपाय गळले. शिंद्यांना शरण गेल्याशिवाय आपला अधिकार क़ायम राहत नाहीं हें त्यांना नक्की कळून चुकलें. पेशव्यांना दुखवितां येत नाहीं व त्यामुळें शिंद्यांच्या पारिपत्याचा मार्ग निघत नाहीं अशी कोंडी पडल्यामुळें शिंद्यांपुढें नमतें घेतल्याशिवाय तरणोपाय नाहीं एवढाच एक मार्ग आतां या त्रयील शिल्लक राहिला होता. आपला अधिकार कायम राहिला

तर कालांतरानें योग्य संधि पाहून शिंद्यांचें पारिपत्य होईल असें कोणतेंही कारस्थान निर्माण करण्याची बुद्धिमत्ता नानांजवळ आहे असा फडके व पटवर्धन यांना विश्वास वाटत होता. याकरतां आपल्या मानखंडनेचें दुःख पोटांत ठेऊन शिंद्यांना शरण जाणेचा या त्रयीचा मनसुबा ठरला. त्याचप्रमाणें हरिपंतांस पुढाकार देऊन त्यांना शिंद्यांच्या भेटीस पाठविण्यांत आलें होतें. शिंद्यांचा या त्रयीवर विश्वास नव्हता. कोणत्या वेळीं ते काय मसलत करतील याचा नेम नव्हता. शिवाय या वेळीं कारभारीपदाची मागणी केल्यामुळें, 'मूले कुठारः' अशी स्थिति उत्पन्न होऊन पूर्वीच्या द्वेषांत जास्त भरती पडल्यामुळें हरिपंतांच्या बोलण्यावर शिंदे खात्रीनें विश्वास ठेवण्यास तयार झाले नसते. ह्मणून आपल्या बोलण्यावर शिंद्यांचा विश्वास बसावा व आपण घेणाऱ्या शिंद्याच्या भेटीस श्रीमंतांची आज्ञा व संमति आहे असें शिंद्यांना सकृत्दर्शनीं दिसावें ह्मणून हरिपंतांनीं आपल्याबरोबर श्रीमंतांच्या खिजमतगारास घेतलें; आणि सडेच शिंद्यांच्या भेटीस गेले. "नानांनीं व मीं कारभारांत नसावें, आह्मीं उभयतां सरकारचे अपराधी, ह्मणोन तुह्मांजवळ आलों. काय पारिपत्य करावयाचें असेल तें करावें," अशी हरिपंतांनीं शिंद्यांजवळ आपली शरणागति प्रकट केली. शिंद्यांना एवढीच गोष्ट व्हावयाला पाहिजे होती. त्यांना पेशवाईच्या कारभाराची महत्वाकांक्षा नव्हती. त्यांनीं एक लक्ष फौज आपल्याबरोबर घेऊन व कोट्यवधि पैसा खर्च करून, दक्षिणेंत येण्याचा जो इतका त्रास घेतला, त्याच्या मुळाशीं जर कारभारीपणाच्या अधिकाराची महत्वाकांक्षा असती, तर त्यांनीं हरिपंताजवळ अनेक प्रकारें आढेवेढे घेतले असते. परंतु तसे आढेवेढे कोणत्याही प्रकारें न घेतां "तुह्मीं ह्मणतां तसें चालूं," असें एका वाक्यांत त्यांनीं आपलें ह्मद्गत फडक्यांना सांगितलें. यावरून शिंद्यांनीं श्रीमंतांजवळ पेशवाईच्या कारभाराची केलेली विनंति केवळ नानांना शह देण्यापुरतीच होती हें स्पष्ट होतें.

३०. शिंद्यांचा पुण्यास येण्याचा हेतु स्पष्ट होता. मागील प्रकरणांत दाखविल्याप्रमाणें नाना हे शिंद्यांच्या दौलतींत लांडा कारभार करूं लागले

तेव्हां त्यांनीं तो न करावा एवढाच शिंद्यांचा हेतु होता, व त्याकरतां नानांना ‘ रुबरू ’ विचारावें ह्मणून ते आले होते. नाना कोणतीही गोष्ट सहजासहजीं मान्य करणार नाहींत ह्मणून त्यांच्या कारभारांत लांडा कारभार केल्यानें कशी आपत्ति ओढवते याची कल्पना त्यांना आल्यावर ते आपल्या दौलतींतील लांडा कारभार करण्याचें सोडतील अशी खात्री शिंद्यांना असल्यामुळें, त्यांनीं आपल्या मसलतीला असें वळण दिलें होतें. ‘ नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाहीं, ’ एवढ्यापुरतीच शिंद्यांची ही मसलत होती. त्यांना पेशव्यांच्या कारभाराची महत्वाकांक्षा नव्हती हें आतां निराळें सांगण्याची जरूरी राहिली नाहीं. नानांनीं नमतें घेतल्यानंतर त्यांचें ह्मणजे नाना, हरिपंत व शिंदे यांचें जें एकांतांत भाषण झालें व त्यांच्या भाषणांत जे ‘ रुबरू ’ खुलासे झाले, त्यामुळें सर्वांचें समाधान झालें, याचा अर्थ एवढाच कीं, शिंद्यांनीं इतःपर नानांच्या बाबतींत लांडा कारभार करूं नये व नानांनीं शिंद्यांच्या बाबतींत लांडा कारभार करूं नये असें ठरलें. या बाबतींत श्रीमंतांची त्रिवर्गांनीं भेट घेऊन झालेल्या या तडजोडीस त्यांची संमति मिळविली. अशा प्रकारें नाना करीत असलेला लांडा कारभार शिंद्यांनीं हाणून पाडला. शिंद्यांस व श्रीमंतांस या समेटामुळें समाधान झालें. नानांचा अधिकार कायम झाला तरी या सर्व प्रकारामुळें त्यांची जी मानखंडना झाली ती मात्र भरून निघण्यासारखी नव्हती. मानखंडनेचें खरें सांत्वन सूड घेण्यानें होत असतें, अशी कपटी व खुनशी मनुष्याची प्रवृत्ति असतें. व्यावहारिक मनुष्य आपल्या स्वभावधर्माच्या कक्षेबाहेर जाऊं शकत नाहीं.

३१. सवाईमाधवराव यांच्या दृष्टीनें नाना हे त्यांचे उजवे हात व महादजी शिंदे हे डावे हात असल्यानें उभय हातांमध्यें पुन्हां सहकार्य उत्पन्न झाल्यामुळें त्यांना समाधान वाटलें. महादजींच्या बाबतींत नानांचा लांडा कारभार बंद पडल्यामुळें त्यांनाही समाधानच झालें. हरिपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या पक्षालाही नानांचें बूड स्थिरावल्यामुळें समाधान झालें

असेल. प्रत्यक्ष नानांची मात्र स्वतःचें आसन स्थिरावलें तरी एका डोळ्यांतून आनंदाश्रु व स्वतःची मानखंडना झाल्याबद्दल दुसऱ्या डोळ्यांतून दुःखाश्रु अशी संमिश्र मनःस्थिति झाली असेल यांत शंका नाहीं. नाना ही एक व्यक्ति सोडली तर या समेटामुळें सर्व महाराष्ट्राला व पेशव्यांच्या इतर हितचिंतकांना समाधान व आनंद झाल्याशिवाय राहिला नाहीं. या वेळीं शिंद्यांच्या पराक्रमामुळें मराठ्यांच्या यशाचा झेंडा अटकेपर्यंत लागला होता. दिल्लीचा पादशहा मराठ्यांच्या रक्षणाखालीं होता. शिवाय इंग्रज, निजाम, टिपू वगैरे सर्व परकीय दरबार शांत होते. त्यामुळें पुण्यास पेशव्यांचा भाग्यरवि पूर्ण मध्याला आल्याप्रमाणें सर्व प्रजेची भावना आनंदमय झाली होती. अशा वेळीं आनंदाच्या दिवाळीची पुण्यास जमलेल्या लोकांना आठवण होणें अगदीं साहजिक होतें. आनंद झाल्यावर आनंदसंवर्धक गोष्टी घडून याव्यात यांत नवल नाहीं. महादजी शिंदे यांना या वेळीं फार मोठें समाधान झालें होतें. त्यासाठीं हा दिवाळीचाच सण आहे असें वाटून त्यांनीं पुण्यास दिवाळी साजरी करण्याचें ठरविलें. शिवाय दिवाळी साजरी करण्याचें दुसरेंही एक कारण घडलें होतें. सवाईमाधवराव यांचें पहिलें कुटुंब सौ. रमाबाई या ता. ३१ जानेवारी सन १७९३ रोजीं निवर्तल्या होत्या. त्यानंतर श्रीमंतांचें दुसरें लग्न कोंकणांतील विजयदुर्ग तालुक्यांत धालवली ह्मणून एक गांव आहे, तेथील गणेशपंत गोखले यांच्या मुलीशीं ता. ६ मार्च सन १७९३ रोजीं झालें होतें. त्यांचें नांव यशोदाबाई होतें. हें नवीन लग्न झाल्यामुळेंही सर्वांचीं मनें आनंदांत होतीं. त्याकरतां दिवाळीच्या दारूबाजीचें काम करण्यांत आलें. तें खातें महादजी शिंदे यांच्याकडे सोंपविलें होतें.

३२. हें दारूकाम पर्वतीच्या डोंगरावर झालें. त्याचें वर्णन पुढीलप्रमाणें आहे. "[1] सर्व पुण्याचे अलम (जग-लोक) तमाशा (दारूकाम) पाहावयास निघाले. ते पर्वतीस जाऊन जागोजाग बसले. जिकडे तिकडे मशाली, दुशाके लाविले आहेत. तेव्हां सारा पर्वतीचा डोंगर फुलून निघाला. सरकारची

१ पे. ब. पा. १४८

स्वारी येऊन बसली. नंतर महादजी शिंदे यांस दारू सोडण्याची आज्ञा झाली. मग पाटीलबोवा ह्यांनीं दारू सोडण्यास आरंभ केला. ते प्रहर रात्रीपासून दोन प्रहर रात्रपर्यंत दारू लंका सुटत होती. नाना तऱ्हेचीं झाडें, त्यामध्यें तारे तुटूं लागले, हनुमंत दारूचा केला होता, तो उडून जागजागीं बसूं लागला, तेव्हां दारू सुटत चालली. असा मोठा समारंभ दारूचा झाला. सारी दारू सुटल्यानंतर मग पाठीमागून तोफेची धडेबाजी करून दाखविली. असा तीन प्रहर रात्रपावेतों दारूचा समारंभ झाला." महादजींच्या मनांत खरोखर पेशव्यांच्या कारभारीपणाचें काम करावयाचें जर असतें, व तेवढ्याकरतांच जर ते दिल्लीहून पुण्याला आले असते, आणि त्यांच्या मनांत खरोखर द्वेषबुद्धीनें नानांची कारभारांतून हांकलपट्टी करावयाची असती, तर त्यांच्या मनाविरुद्ध नाना जे कारभारांत राहिले, त्यामुळें त्यांचें मन प्रसन्न राहणें शक्य नव्हतें. या प्रसंगीं नानांबरोबर त्यांचा समेट झाल्यामुळें त्यांना प्रसन्नता वाटली व आपल्या मनाला झालेला खरोखरीचा आनंद प्रकट करण्याकरतांच त्यांनीं हा दारू कामाचा समारंभ घडवून आणला. यावरून महादजी शिंदे यांची पेशव्यांचा कारभार करावा अशी तिळमात्र महत्वाकांक्षा नव्हती हें स्पष्ट दिसतें. त्यांची कारभारीपणाची मागणी ही केवळ राजकारणांतला त्यांचा एक डाव होता, हेंच खरें आहे.

३३. शिंद्यांनीं या दारूच्या समारंभाला पोषक असा दुसरा एक 'न भूतो न भविष्यति' असा समारंभ घडवून आणला. तो समारंभ म्हणजे रंग खेळण्याचा होय. याचें वर्णन पुढील प्रमाणें आहे.[१] "पाटीलबोवांस आज्ञा झाली कीं, रंगाची तयारी करावी. वाड्यांत रंग करावयाची आज्ञा खासगीवाले यांस झाली. खेरीज ज्या रस्त्यानें स्वारी जावयाची त्या रस्त्यानें कारभारी व मुत्सद्दी व सरदार व पागे होते, तितक्यांस सरकारची आज्ञा झाली कीं, इतक्या मंडळीनें रंगाची तयारी आपापले ठिकाणीं करावी. त्यांत हरिपंत

---

१. पे. ब. पा. १५१-५२-५३.

तात्या फडके व माधवराव रास्ते यांस आज्ञा झाली कीं, तुम्हीं दोहों ठिकाणीं रंग मोठा करावा. मग शिंदे यांनीं तयारी आपले लष्करांत केली. तसेंच ज्या ज्या रस्त्याचे लोकांस आज्ञा झाली त्यांनींही आपले ठिकाणीं रंगाची तयारी दुरुस्ता केली. तसेंच शिंदे यांचे लष्करांत रंगाची तयारी केली. खेरीज जागोजागीं वाटेनें सरकारचे व शिंदे यांजकडील हौद भरून ठेवले. गुलालाची तयारी झाली. सरदार व मानकरी व पागे, पथकें, शिलेदार, एकांडे, मुत्सद्दी व मानकरी व कारकून मंडळी असे तमाम तयार होऊन वाड्यापाशीं आले. तशीच सर्व फौज व हत्ती व सांडणीस्वार असे तयार होऊन उभे राहिले. सरकारचीही निघण्याची तयारी झाली. निघावयाचे वेळेस वाड्यांत थोरल्या चौकांत बिछायत करून सरकारची स्वारी येऊन तेथें बसली. त्या वेळेस नाना व तात्या व आपा बळवंत, पेठे, त्रिंबकराव परचुरे, नारोपंत चक्रदेव, असे सर्व लहान थोर, खेरीज ब्राह्मण सरदार—रास्ते, विंचुरकर, ओढेकर, बहिरो अनंत, राजेबहाद्दर, पानशे, पुरंदरे, माधवराव रामचंद्र, मराठे मंडळ-घोरपडे, निंबाळकर, पाटणकर, मोहिते, दरेकर, मानाजी फाकडे, जोत्याजी जाधव, पाठीमागोन पटवर्धन, माधवराव रामचंद्र बिनीवाले, व बेहरे—असे सर्व येऊन नाचास बसले. तमाम पागे धायबर, निकम, भोईटे थोरात, बाबूराव अनंत, भास्कर जगन्नाथ, निलकंठराव रामचंद्र, अवधूतराव यशवंत असे बावन पागे बैठकेस येऊन दाखल झाले. वानवडीहून महादजी शिंदे तयार होऊन सरकारची स्वारी न्यावयास आले. असे समाज वाड्यांत मिळाले. तेथें रंग खेळावयास प्रारंभ झाला. त्या रंगाची वर्णना किती करावी ? हजारों गुलाल गोटे उडूं लागले. रंगाचे बंब चालूं लागले. तसाच गुलाल खंड्याचे खंड्या वाड्यांत उडाला.

३४. असा रंग खेळून सरकारची स्वारी सायंकाळचे दहा घटका दिवसास वानवडीस जाण्यास अंबारींत बसून खवासखान्यांत महादजी शिंदे व आपा बळवंत पाठीमागें बसले. वाडा डावा घालून सरकारची स्वारी बुधवारांतून, कापड आळीनें आदितवारांत हरीपंत तात्यांचे वाड्यापाशीं येई

पर्यंत वाटेनें सरकारचे लोकांनीं रंग करून ठेवलाच होता, त्यांनीं एकच गर्दी रंगाची केली. तसेंच हरिपंत तात्यांचे वाड्यापाशीं स्वारी आल्यानंतर तेथें दोन घटकापर्यंत रंगाचा मार झाला. त्या रंगाच्या योगानें रस्त्यानें चिखल पडला. व शेंकडों पल्ले गुलाल उधळला. असा दोन घटका येथें रंग खेळून सरकारची स्वारी पुढें रंग खेळत चलली. शेंकडों पल्ले गुलाल हत्तीवर ठेविला होता तो रस्त्यांत उधळीत चालले. असे नाकझरी उतरून रास्ते यांचे पेठेंतून चालले असतां, तसे खेळत रास्ते यांचे वाड्यापाशीं आले. तेथें रास्ते यांनीं रंगाचा समारंभ केला. गच्च्यां-वरून रंगाचे बंब उडूं लागले. तेव्हां स्वारीमध्यें जसा पर्जन्य पडतो असा रंग पडूं लागला. दोन घटका तेथें रंग खेळून वानवडीस स्वारी दाखल झाली.

३५. मग जेथें श्रीमंत बसावयाची जागा केली होती तेथें ते जाऊन बसले. तेव्हां झाडून सरदार व मानकरी व पागे व मुत्सदी व कारकून त्या कचेरीस येऊन बसले. बसल्यानंतर दोन घटिकापर्यंत नाच व गाणें झालें. नंतर रंग खेळावयास प्रारंभ झाला. रंग खेळतां खेळतां रंगाचे पाट नदीस मिळाले. असा रंग द्वापारयुगीं श्रीकृष्ण भगवान खेळले. तसा कलियुगीं श्रीमंत सवाईमाधवराव खेळले. असा कोणी पुढें खेळावयाचा नाहीं व मागेंही कोणी खेळला नाहीं! रस्त्यामध्यें गुलालाचा पेर व रंगाचा चिखल झाला तो किती गणतीस धरावा? असा रंग खेळल्यानंतर सर-कारची स्वारी स्नानास उठली. त्या समयीं शिंदे यांनीं शेंकडों कढया पाण्याच्या तापत ठेविलेल्या होत्या. शेंकडों ब्राम्हण पाणक्ये (हातांत) घंगाळघागरी घेऊन उभे. असा बंदोबस्त स्नानाचा ब्राम्हण मंडळींचा झाला. तसाच मराठे सरदार, मानकरी यांचा केला होता. मग अवघ्यांनीं स्नानें झाल्यानंतर ज्या कचेरीस रंग खेळले त्याच मखमाली डेऱ्यांत फरास यानें येऊन, ती बिछायत काढून, नवी बिछायत घालून तयार केली. सर्व मंडळी लहान थोर स्नानें करून, नवीन वस्त्रें घेऊन येऊन कचेरीस

बसलीं. मग नाचास प्रारंभ झाला. मग महादजी शिंदे यांनीं श्रीमंतांस सर्व पोषाग जवाहीर, शिरपेंच व तुरा वगैरे गळ्यांत मोत्यांच्या माळा असा दिला. तसेंच सर्व कारभारी, मुत्सद्दी व कारकून मंडळी व शिले-दार लोक व मानकरी व हुजरातचे लोक व पागे, पथकें असे सर्वांस शिंदे ह्यांनीं पोषाग वांटून नंतर पानसुपारी, अत्तरगुलाब, हार तुरे, गजरे दिले. इतका समारंभ होईतों तीन घटिका रात्र झाली.

३६. मग सरकारची स्वारी पुण्यास यावयास निघाली. तेव्हां हजार पांचशें दुशाका हत्तीवर लाऊन मोठ्या थाटानें स्वारी मोठ्या डौलानें चालली. ज्या समयीं स्वारी माघारी आली त्या समयीं शहरांत दुरस्ता चिराकदानें करून, लोक आपापल्या माड्यांवरून दिवे लावून तमाशा पहावयास उभे राहिले. त्यांनीं त्या दिवशीं सोन्यारुप्याचीं फुलें श्रीमंतांचे अंबारीवर उडविलीं. अशा थाटानें स्वारी वाड्यांत दहा घटका रात्रीचे अंमलांत दाखल होऊन श्रीमंत मसनदीवर बसले. सर्व मंडळीस पानसुपारी, अत्तरगुलाब देऊन घरीं जाण्याची आज्ञा सर्वांस झाली. त्या समयीं नजर-नजराणे करून आपले ठिकाणीं सर्व लहान थोर गेले. असा रंगाचा समारंभ झाला." ही हकीकत वाचल्यानंतर असें दिसून येईल कीं, या समारंभांत नानांचें कोठेंच प्रामुख्यानें नांव नाहीं. एवढेंच नव्हे तर शिंदे, हरिपंत फडके वगैरे लोकांनीं रंगांत जसा प्रत्यक्ष भाग घेतला तसा रंगाचा समारंभ नानांच्या वाड्यांत व्हावयास पाहिजे होता. परंतु तो ज्या अर्थी झाला नाहीं त्याअर्थी नानांचें मन आंतून आनं-दित नव्हतें असें ठरतें. सर्व पुणें शहरानें आनंदी आनंद केला पण नानांचा मात्र आनंद कोठें स्पष्ट दिसला नाहीं. त्यांनीं या समारंभास विरोध केला नाहीं एवढें मात्र खरें. श्रीमंत पेशवे, महादजी शिंदे, फडके वगैरे मंडळी मात्र मनापासून आनंदांत होती, ह्मणूनच असा अलौकिक रंगाचा समारंभ पुण्यास घडून आला. या समारंभानें कोणाचें अंतःकरण कसें होतें हें दिस-ण्यासारखें आहे. ह्मणून वरील रंगाच्या समारंभाची सांद्यंत हकीकत देणें प्राप्त झालें.

३७. पटवर्धनांचे पुण्याचे वकील वाडेकर हे परदेशांतून पुण्यास आलेलीं वर्तमानेंही परशुरामभाऊ यांस लिहून कळवीत असत. पुणें दरबारीं किंवा पुण्यांतील मुत्सद्दीमंडळींत ज्या विषयाची विशेष चर्चा होत असे अशाच त्या गोष्टी असल्या पाहिजेत. ते आगष्ट सन १७९३ च्या आपल्या पत्रांत लिहितात " फरांचीस बादशहा रयतानीं बैदा करून मारिला ! " ही गोष्ट सन १७९३ च्या जानेवारी महिन्यांत घडली; व तें वर्तमान पुण्यास येऊन पोंचावयास सात महिने लागले. फ्रान्स देशाचा बादशहा रयतांनीं ठार मारून राज्यक्रांति घडवून आणली हे वर्तमान पुण्यास आलें त्या वेळीं पुण्याच्या मुत्सद्यांच्या मनांत निरनिराळ्या विचार तरंगांनीं काहूर माजविलें असेल यांत शंका नाहीं. नाना फडनविस हें पुण्याचे लोकनायक व शहाणे मुत्सद्दी असल्यामुळें त्यांनीं या परदेशाच्या वर्तमानापासून काय बोध घेतला असेल तो असो, पण त्यामुळें मात्र एक क्षणभर तरी सवाईमाधवराव पेशवे यांच्या अंत:करणाला विजेचा धक्का बसल्याप्रमाणें झालें असेल यांत शंका नाहीं.

३८. सालाबादप्रमाणें श्रावण महिन्याचा समारंभ शिंदे पुण्यास असल्यामुळें या वर्षी सुरळीत पार पडला. ब्राम्हणांचे मनावरील घाशीराम कोतवालाच्या अमानुष कृत्याचा परिणाम निघून जावा ह्मणून, शिंद्यांनीं स्वत: या वर्षाच्या दक्षिणा वांटण्यांत भाग घेतला होता. दक्षिणा द्यावयास "शिंदे येऊन बसले होते. ते समयीं तपस्वी ब्राम्हण पुण्यांतील नेले होते त्यांस (शिंद्यांनीं) वोंजळीनीं रुपये दिले ! दहा बारा असामींस कोणास आठशें, कोणास चारशें, कोणास दीडशें, कोणास दोनशें याप्रमाणें दक्षिणा झाली. रमण्यांत ब्राम्हण एकंदर चार दरवाजे मिळोन बत्तीस हजार दोनशें एकतीस (३२२३१). एकूण रुपये ११३२८१ याप्रमाणें झाली."[१] यावरून शिंद्यांचीं ब्राम्हणाविषयीं केवढी श्रद्धा व निष्ठा होती हें दिसून येतें. नाना फडनविस यांचे पक्षांतील प्रत्यक्ष ब्राम्हण लोक संन्याशांचे मठ

---

१ ऐ. ले. सं. नं. ३५२३.

लुटतात आणि ब्राम्हणांना दिलेल्या दक्षिणा लुटून त्यांना मारून टाकतात. शिंद्यांसारख्या धर्मशील सरदाराला नाना व नानांचे हस्तक ब्राम्हणद्वेष्टे ह्मणून संबोधितात. असें असतां शिंदे तपस्वी ब्राम्हणांना बोलावून आणून त्यांना ओंजळीओंजळीनें रुपये दान करतात. यावरून ब्राम्हणद्वेष्टे कोण याचें निराळें उत्तर देण्याची जरूरी नाहीं. हिंदुधर्माच्या दृष्टीनें नानांचें चित्र पहा व महादजी शिंद्यांचें चित्र पहा !

३९. महादजी शिंदे पुण्यास आल्यानंतर बऱ्याच सरदारांनीं व संस्थानिकांनीं त्यांच्या मोठेपणाचा व वशिल्याचा फायदा घेऊन आपापलीं कामें करून घेतलीं. (१) वाडीसरकार सावंत देसाई हे समुद्रांत चांचेपणा करीत. त्यांनीं इंग्रजांचीं गलबतें लुटलीं होतीं. त्यामुळें त्यांचेवर मुंबईकरांचा राग झाला होता. शेवटीं महादजी शिंदे यांच्या मध्यस्थीनें त्याचा निकाल लागला.[१] कित्तुर संस्थानचे अधिकारी मलपगौडा ह्या नांवाचे असून, ते अल्पवयी होते. त्यांच्याशीं संगनमत करून कांहीं दुष्ट लोकांनीं त्या संस्थानचे कारभारी राळप्पा खासनीस ह्यांस ठार मारल्यामुळें, त्या संस्थानांत अव्यवस्था माजली होती. ही गोष्ट नारायणराव बक्षी यांनीं शिंद्यांच्या नजरेस आणल्यावर त्यांनीं राळप्पाचा बंधु भिकप्पा यास कारभार देऊन तेथील बंदोबस्त केला.[२] (३) बावडेकर पंत अमात्य यांचे संस्थानास सातारकर पंत अमात्यांचा त्रास पोहोंचूं लागला. त्यांत नाना फडनविसांचें अंग होतें. तेंही प्रकरण केरकरांमार्फत शिंद्यांकडे आलें. तेव्हां त्यांनीं त्याही गोष्टीचा बंदोबस्त केला.[३] (४) गोंवेकर फिरंगी यांजकडून केरकर वगैरे शिंद्यांच्या मुत्सद्यांचीं इनामें निर्वेधपणें चालण्यास हरकत येऊं लागली. त्यासंबंधीं पूर्वी शिंद्यांनीं पेशव्यांमार्फत प्रकरण सुरू ठेवलें होतें. त्या गोष्टीचाही त्यांनीं या प्रसंगीं बंदोबस्त केला.[४] (५) बागणीकर मंत्री यांस कोल्हापुरकरांकडून दरसाल खंडणीसंबंधानें त्रास पोहोंचत असे. वस्तुतः कोल्हापुरकरांचा त्यांच्याशीं कांहीं संबंध नव्हता. ह्मणून शिंद्यांनीं या प्रकरणांत मन घालून कोल्हापुरकरांनीं मंत्र्यांकडून खंडणी

---

१ नातूकृत महादजीचें चरित्र पान २६१.

घेऊं नये असें ठरविलें.[५] (६) बुधकर घाटगे यांस पेशव्यांकडून त्रास पोंचत असे. तो शिंद्यांनीं बंद करविला.[६] (७) सौंदे संस्थानातील सदाशिवगड हा किल्ला फिरंग्यांचा असून, तो पेशव्यांनीं घेतला होता. तो त्यांजकडून लढून घेतां येणें दुरापास्त जाणून, फिरंग्यांनीं जिवबादादा व लखबादादा यांच्या वतीनें शिंद्यांकडे संधान बांधलें. शिंद्यांनीं पेशव्यांस तो किल्ला बळकावणें नीट नाहीं असें समजावून फिरंग्यास तो किल्ला परत देण्यासंबंधानें छकड लाविली.[७] (८) [८] वाडी सरकारास दिल्लीच्या बादशहाकडून राजे बहादर किताब व मोर्चेलें सन १७८५ सालीं शिंद्यांनीं देवविलीं होतीं. सावंतवाडीच्या थोरल्या खेमसावंतास जयाप्पा शिंदे याची मुलगी लक्ष्मीबाई दिली होती. ह्मणून शिंद्यांनीं हा त्यांचा पादशहाकडून गौरव करविला होता. त्यामुळें नाना फडनविस व हरिपंत फडके यांस फार वाईट वाटलें. याबद्दल वाडीकरांचें गाऱ्हाणें जिवबादादांकडे आलें कीं, "आपण सर्व प्रकारें अभिमान धरीत गेला. पुढां पाछाई मरातबही पाठविली. सर्वांमध्यें आनंद होऊन हर्ष जाहला. परंतु राजश्री हरिपंततात्या यांची चित्तशुद्धता श्रीमंत राजश्री पाटिलबोवा यांकडेस नाहीं. याकरतां करवीरास साहित्य देऊन फौज रवाना करून प्रांतांत उपद्रव केला! ठाणीं व कांहीं प्रांत घेतला." याबद्दल वाडीकरांकडून जिवबादादांस पुष्कळ वेळां लिहून आलें होतें. प्रत्येक खेपेस जिवबादादांनीं पाटीलबोवांस प्रांत सोडून देण्याचे तजविजीबद्दल सांगत असावें, व त्यांनीं नाना फडनविसांस पत्रें देऊन हें काम करण्याविषयीं लिहावें, असें पुष्कळ वर्षें चाललें होतें. कांकीं, पाटीलबावा व जिवबादादा यांस उत्तरेकडील महत्वाच्या कामामुळें या बाबतींत विशेष लक्ष घालावयास वेळ नव्हता. या परिस्थितीचा फायदा घेऊन या गोष्टीचा उगम आपल्यापासूनच असल्यामुळें, नानांनीं आलेलें प्रकरण दाबून ठेवावें, असें चाललें होतें. हा इंगितार्थ शिंद्यांचे वकील रामजी पाटील यांजकडून

२।३।४।५।६।७।८ जिवबादादा बक्षीचें चरित्र पा. १७०-७१.

बाळोबा तात्यांस सविस्तर समजल्यामुळें त्यांनीं 'स्वतः पुण्यास जाऊन हें काम केल्याशिवाय याचा निकाल लागत नाहीं,' असें पाटीलबावांस सांगितलें. हा पत्रव्यवहार सात आठ वर्षें सारखा चालला होता. पाटील-बावा पुण्यांत आल्यावर ह्या संबंधाच्या कोल्हापुरकरांच्या व पेशव्यांच्या हरकती तत्काळ नाहींशा झाल्या! आणि त्यांनीं वाडीसरकारकडे मोर्चेलें चालण्यास कोणती हरकत नाहीं असें पेशव्यांकडून लिहून घेतलें. व वाडीकरांचे प्रांत कोल्हापुरकरांकडून सोडवून दिले."

४०. याप्रमाणें महादजी शिंदे पुण्यांत राहून पेशव्यांच्या राज्य कारभारांत उलाढाली करीत होते. शिंद्यांच्या वजनापुढें नानांचें कांहीं चालेनासें झालें शिंद्यांचा उत्साह, पाणीदारपणा, थोर कर्तबगारी व बुद्धिमत्ता, या गुणांमुळें ते सवाईमाधवरावांस फार प्रिय झाले होते. तेव्हां नाना फडनविसांस याविषयीं मोठी काळजी लागून राहिली. महादजींशीं नानांचें वागणें शुद्ध अंतःकरणाचें नव्हतें. व हरएक कामांत नानांकडून त्यांस त्रास पोहोंचत होता. शिंदे पुण्यास आल्यापासून त्यांनीं श्रीमंतांच्या मनोरंजनाचे नवनवे प्रकार सुरू करून नानांच्या कडक सासुरवासानें त्यांचें जें मन अप्रसन्न होतें, तें विकसित व उत्साहपूर्ण केलें. तेणेंकरून श्रीमंतांस पाटीलबोवा फार आवडूं लागले. मनुष्याचें मन स्वतंत्रताप्रिय असतें. त्याला लहानपणापासून सुशिक्षण व नियमितपणा ह्यांची जशी आवश्यकता आहे, तशीच त्याला योग्य स्वतंत्रतेचा उपभोग घेऊं देणें, हीही गोष्ट इष्ट व हित-परिणामी असते. नानांच्या करारी, कडक व एक प्रकारच्या कैदबाज वागणुकींमुळें निरुत्साह व विमनस्क होत चाललेल्या सवाईमाधवरावांचें मन शिंद्यांच्या मोकळ्या वागणुकीमुळें व त्यांच्या आनंदी सहवासामुळें सुप्रसन्न व उत्साहपूर्ण होत चाललें. पेशव्यांस शिंद्यांचा सहवास दिवसें दिवस जास्त प्रिय होत चालला, तर नानांस शिंद्यांचा पुण्यांतील एक एक दिवस वर्षाप्रमाणें भासूं लागला व दुःसह होऊं लागला.

४१. असें चाललें असतां 'इ. स. १७९४ च्या फेब्रुवारी महिन्यांत पाटीलबावांस एकाएकीं ताप येऊन तो [1] नवज्वरावर गेला. त्यांचा या दुखण्यांत शेवट होईल असें कोणाच्या ध्यानीं मनींही नसतां त्यांस तारीख १२ फेब्रुवारी, शके १७१५ प्रमादी संवत्सरांत माघ शुद्ध १३ बुधवारीं पांच घटिका रात्रीं वानवडी येथें देवाज्ञा झाली.' मरण—समयीं त्यांचें वय ६७ वर्षांचें होतें. महादजी शिंदे यांच्या मृत्यूसंबंधीं निरनिराळ्या इतिहासांतून निरनिराळीं कारणें दाखविलीं जातात. १ महादजी शिंदे नवज्वरानें मृत्यु पावले. २ महादजी शिंद्यांना नानांनीं विषप्रयोग करून ठार मारलें. ३ नानांनीं महादजी शिंद्यांवर मारेकरी घालून त्यांस ठार मारिलें. याप्रमाणें तीन निरनिराळीं विधानें शिंद्यांच्या मृत्यूच्या बाबतींत दिसून येतात. तेव्हां त्यासंबंधीं कोणाचें ह्मणणें खरें आहे, हें येथें पहाणें जरूर आहे. नाना व नानांच्या पक्षांतील लोक महादजी शिंदे नवज्वरानें मृत्यु पावले असें ह्मणतात. त्या बाबतींत तारीख १५ फेब्रुवारी सन १७९४ रोजीं परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं बाळासाहेबांस चिठी पाठविली होती ती अशी—"महादजी [2] शिंदे बुधवारीं त्रयोदशीस त्रिदोष होऊन देवाज्ञा जाली ह्मणोन पुण्याहून पत्र आलें त्याजवरून लिहिलें तें कळलें." यावेळीं पटवर्धन सरदार व नाना हे एका आत्म्याच्या दोन शकलाप्रमाणें होते. पुण्याहून पटवर्धनांना पत्रें लिहिणारा त्यांचा कारकून नानांच्या पूर्ण विश्वासांतील होता. अर्थात् नानांनीं प्रत्यक्ष त्याला दिलेली बातमी त्यानें आपल्या धन्याला मिरजेस कळविली होती. यावरून महादजी शिंदे हे नवज्वरांत त्रिदोष होऊन मरण पावले असें प्रत्यक्ष नानांचें ह्मणणें होतें असें गृहित धरून चालण्यास कोणतीच हरकत नाहीं. महादजी शिंदे यांना नानांच्या ह्मणण्याप्रमाणें नवज्वरानेंच मृत्यु आला ही गोष्ट सत्य वा असत्य आहे हें ठरविण्यास प्रत्यक्ष असा दुसरा पुरावा कोणताच उपलब्ध नाहीं. तेव्हां सत्य कोणतें याची निवड करणें फारच कठीण

---

१ नातुकृत महादजी शिंदे यांचें चरित्र पा. २६६. पेशव्यांची बखर पा. १५६ नाना फडनविस यांचें खरेकृत चरित्र पा. १५२. २ ऐ. ले. सं. पत्र नं. ३५२६.

आहे. तथापि नवज्वरानें मृत्यु येणें हा विषय आयुर्वेदशास्त्राचा असल्यामुळें त्या दृष्टीनें महादजी शिंदे यांना नवज्वरानें त्यावेळीं मृत्यु येणें शक्य होतें कीं काय हें येथें पहाणें जरूरीचें आहे. महादजी शिंदे हे इ. स. १७९३ च्या जून महिन्यांत ह्मणजे मरणापूर्वी सुमारें आठच महिने नवज्वरानें आजारी होते. त्यांच्या या वेळेच्या आजारीपणाबद्दल बराच गाजावाजा झालेला होता. याबाबत धोंडो बापूजी यांचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेब पटवर्धन यांस पाठविलेलें पत्र पुढीलप्रमाणें आहे. "राजेश्री' महादजी शिंदे यांस आज आठ दिवस ज्वर येतो. श्रीमंत राजश्री पंतप्रधान एक वेळ समाचारास गेले होते. श्रीमंत राजश्री नानाही एक वेळ गेले होते. राजश्री हरीपंत तात्या एक दोन दिवसा आड करून नेहमीं जात असतात." याप्रमाणें मरणापूर्वी आठच महिने ज्वराच्या विकारानें शिंदे आजारी होते याबद्दल कोणाचेंच दुमत नाहीं. हा त्यांचा ज्वर नवज्वर अगर विषमज्वरच ठरतो. या ज्वरांतून ते बरें झाल्यानंतर त्यांनीं सुमारें सात महिने पुण्यास नानांच्या विविध कारस्थानी मनसुब्यांस आपल्या चातुर्यानें तोंड देऊन त्यांना 'त्राहि भगवन्' करून सोडण्याइतकी पाळी आणली. अर्थात् पूर्वीच्या नवज्वर अगर विषमज्वर या आजारांतून ते शरीरानें व मनानें पूर्णपणें बरे होऊन आरोग्यसंपन्न झाले होते यांत संशय नाहीं. अशा स्थितींत सात आठ महिन्यांच्या अवधींत नवज्वरासारखा अगर विषमज्वरासारखा आजार पुनः होऊं शकतो किंवा नाहीं हा मुद्याचा प्रश्न आहे. नूतनज्वर, आमज्वर किंवा अपक्वज्वर यालाच नवज्वर असें ह्मणतात. याचें लक्षण श्रीचरक[2] संहितेंत पुढीलप्रमाणें दिलें आहे.

आरुचिश्चाविपाकश्च गुरुत्वमुदरस्यच ।
हृदयस्याविशुद्धिश्च तन्द्राचालस्यमेव च ॥
ज्वरोऽविसर्गी बलवान्दोषाणामप्रवर्तनम् ।
लालाप्रसेको हृल्लासो क्षुन्नाशोऽविशदं मुखम् ॥

---

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ३५१४. २. श्रीचरकसंहिता चिकित्सास्थान अध्याय ३ रा. श्लोक १३० ते १३२.

स्तब्धसुप्तगुरुत्वं च गात्राणां बहुमूत्रता ।
न विड्जीर्णा न च ग्लानिर्ज्वरस्यामस्य लक्षणम् ॥

अर्थ :—अन्नावर अरुचि, अपचन, पोट जड होणें, छाती दाटणें, झांपड, आळस, ताप जोराचा असून एकसारखा ह्मणजे न उतरतां अंगांत राहणें, मलमूत्रादि दोषांची अप्रवृत्ति, लाळ गळणें, मळमळ, भूक न लागणें, तोंड बुळबुळीत असणें, सर्व इंद्रियें निष्क्रिय, बधिर व जड होणें, लघ्वी फार होणें, अपचन झालेला अर्थात् कच्चा मळ पडणें, आणि ग्लानि नसणें, हीं सर्व आम (कच्चा = नव) ज्वराचीं लक्षणें समजावींत.

वरीलप्रमाणें नवज्वराचीं लक्षणें असल्यामुळें रोग्यास औषध देतां येत नाहीं. कारण अपक्व दोषांत औषध दिलें तर ज्वर वाढतो. शोधन किंवा शमन औषध दिलें तर विषमज्वरावर जातें. आणि अपक्वज्वर वाढल्यास मृत्यूच येतो यांत शंका नाहीं. [1] 'जीर्णतामविपर्यासात्सप्तरात्रं च लंघनात्' [2] या शास्त्राधाराप्रमाणें नवज्वरांत शोधन किंवा शमन करणारें असें लंघन केलें असतां नवज्वर निराम ह्मणजे पक्वज्वरावर अर्थात् विषमज्वरावर (Typhoid) जातो. 'प्रायशः सन्निपातेन भूयसा तूपदिश्यते ।' हा विषमज्वर प्रायः सान्निपातिकच असतो. नवज्वरांतुन विषमज्वराची उत्पत्ति होत असल्यामुळें नवज्वरांत सन्निपाताचीं सर्व लक्षणें असतात. वरीलप्रमाणें नवज्वरांत शोधनशमनाचे उपचार केले तर तो विषमज्वरावर जात असल्यामुळें ज्वर कमी करण्याकरतां औषधोपचार करतां येत नाहींत. फक्त त्रिदोषांचा जोर वाढूं नये एवढेच उपचार चालू ठेवावे लागतात. अशा स्थितींत रोग्याच्या स्वाभाविक जीवनशक्तीवर (Vitality) अवलंबून रहावें लागतें.' ही रोग्याची जीवनशक्ति त्याच्या रक्ताच्या गुणधर्मावर अवलंबून असते. नवज्वर हा सात रात्री गेल्यावर आठव्या दिवशीं पक्व होतो, अर्थात् हलका

---

१ चिकित्सा-प्रभाकर पान २२३. २ वाग्भट, निदानस्थान अध्याय २ रा श्लोक ५६ व ५७.

पडतो. ह्मणून आठवा दिवस हें पक्कज्वराचें ह्मणजे विषमज्वराचें सामान्य लक्षण शास्त्रकारांनीं सांगितलें आहे. या आठ दिवसांच्या मुदतींत ह्मणजे ज्वर पक्क दशेला येईपर्यंत रोग्याच्या रक्तांतील श्वेतपेशींचें (White Corpuscles) व अपक्क दोषांमुळें शरीरांत उत्पन्न होणाऱ्या जंतूंशीं अगर ह्या जंतूंनीं शरीरांत उत्पन्न केलेल्या विषाशी (Toxin) द्वंद्व युद्ध चालू असतें. शरीराच्या संरक्षणाचें काम श्वेतपेशींकडे असल्यामुळें त्यांस शरीरसंरक्षक ह्मणण्यास हरकत नाहीं. श्वेतपेशी जंतूंना मारण्यासाठीं रक्तांत एक प्रकारचें विशिष्ट प्रतिविष (Anti-Toxin) तयार करतात. नवज्वरांत शरीरांतील जंतूंनीं निर्माण केलेलें विष पेशींनीं उत्पन्न केलेल्या प्रतिविषानें खाऊन टाकलें तर रोगी बरा होतो. त्याच्या उलट जंतूंनीं निर्माण केलेल्या विषानें रक्तातील श्वेतपेशींना व त्यांनीं उत्पन्न केलेल्या प्रतिविषाला खाऊन टाकलें तर रोगी मरण पावतो. एकंदरींत नवज्वर हा रोग ठराविक मुदतींत एकतर रोगी मारून टाकील अगर मुदतीनंतर तो स्वतः तरी मरून जाईल. नवज्वर अगर विषमज्वर यासारखे काळज्वर येणें हें मनुष्याच्या आयुष्यांतील एक क्रांतीचें लक्षण आहे. या ज्वरांतून रोगी बरा झाला ह्मणजे त्याचा पुनर्जन्म झाला असें ह्मणतात. मनुष्याच्या आयुष्यांत असे पुनर्जन्माचे अगर क्रांतीचे प्रसंग फार विरळा येतात. देवी, कॉलरा, नवज्वर, विषमज्वर, प्लेग वगैरे सान्निपातज्वर हे क्रांतिकारक रोग आहेत, हे वरचेवर मनुष्याला होऊं शकत नाहींत. यदाकदाचित् कधीं काळीं पुन्हां झाले तरी त्या रोगांचें प्रमाण फारच सौम्य असतें. त्यामुळें रोगी तडकाफडकीं दगावत नाहीं. वरीलप्रमाणें क्रांतिकारक रोग एकदां रोग्यानें जिंकल्यानंतर, त्याच्या रक्तांत त्या विकाराचें प्रतिविष उत्पन्न होऊन तो रोगी निसर्गसिद्ध रोगाभेद्य बनलेला असतो. अलीकडे कृत्रिम रोगाभेद्यता मनुष्याच्या शरीरांत उत्पन्न करतां येतें. रोगप्रतिबंधक लस शरीरांत टोचून ती निर्माण होते. परंतु कृत्रिम रोगाभेद्यतेचा काळ निसर्गसिद्ध रोगाभेद्यतेच्या काळापेक्षां फारच अल्प असतो. हा कृत्रिम

रोगाभेद्यतेचा काळ निरनिराळ्या रोगांचे बाबतींत निरनिराळा असतो. प्लेग, विषमज्वर, पटकी, देवी, अँथ्रॅक्स यासारख्या कित्येक रोगांवर प्रतिबंधक लस टोंचल्यानें हे रोग कांहीं काळपर्यंत जडत नाहींत.[१] नैसर्गिक रोगाभेद्यता फार वर्षें टिकणारी असते. एकंदरींत महादजी शिंदे यांना आठ महिन्यांपूर्वी नवज्वर अगर विषमज्वर येऊन ते त्यांतून बरे झाले असतां पुनः त्यांना नवज्वर झाला व त्यांत ते एकाएकीं मरण पावले हें नानांचें म्हणणें शास्त्राला सोडून आहे. शास्त्र हें अबाधित असतें. म्हणून महादजी शिंदे नवज्वरानें मेले हें नानांचें म्हणणें सत्याला धरून नाहीं असेंच ठरतें. पुरंदर किल्ल्यावर सवाईमाधवराव पेशवे यांच्या मातोश्री गंगाबाई नवज्वरानें मरण पावल्या ही जशी कंडी पूर्वी नानांनीं उठविली होती, तशीच ही एक कंडी त्यांनीं आपल्या उद्दिष्टसाधनाकरतां महादजी शिंद्यांच्या बाबतींत उठविली असावी असें स्पष्ट दिसतें.

४२. दुसरें एक म्हणणें असें आहे कीं महादजी शिंदे हे नवज्वरानें मेले नसून नानांनीं त्यांना विषप्रयोग करून मारलें. या बाबतींत पुरावा कांहीं नाहीं. आणि तसा पुरावा मिळणेंही अशक्य आहे. कारण विषप्रयोग करणारा मनुष्य ' मी शिंद्यांना विषप्रयोग केला; मी त्यांना औषधांतून किंवा पिण्याच्या पाण्यांतून विष दिलें. त्याबद्दल नानांनीं मला अमुक बक्षीस दिलें ' वगैरे प्रत्यक्ष माहिती देणारा पत्रव्यवहार मिळणें शक्य नाहीं. आणि त्या वेळीं जरी तशी चौकशी झाली असती तरी त्यांतून प्रत्यक्ष असें कांहींच निष्पन्न झालें नसतें. कारण असले प्रयोग हे फार सावधगिरीनें केले जात असतात आणि या बाबतींत ज्यांचा संशय कोणी घेणार नाहीं अशींच माणसें असले प्रयोग करतात व ते त्यांना साधतात. नाना शिंद्यांना विषप्रयोग करून ठार मारतील अशी कोणालाच शंका येण्यासारखी नव्हती. नाना व शिंदे हे एका काळीं एका आत्म्याचीं दोन शकलें असल्याप्रमाणें होते. मध्यंतरीं त्यांच्यांत जरी बेबनाव झाला होता तरी महादजींना मारून टाकण्याइतकें नानांचें हृदय पापी

---

१ भाटकृत शारीर व आरोग्यविज्ञान पान २४७.

असेल असें कोणास वाटण्यासारखें नव्हतें. नानांचा परिचय शिंद्यांच्या अगदीं खासगी नोकरांपासून तों त्यांच्या स्त्रियांपर्यंत होता त्यामुळें शिंद्यांना विषप्रयोग करण्याचें नानांनीं जर ठरविलें असतें तर तें अशक्य होतें असें मात्र नाहीं. शिवाय विषप्रयोगाची साधनसामुग्री नानांजवळ नव्हती, असेंही कोणी ह्मणूं शकणार नाहीं. नानांच्या संग्रहाला सर्व प्रकारचीं फंदी माणसें होतीं, यांतही शंका नाहीं. कारण सचीवांवर विषप्रयोग करण्याचा प्रयत्न करणारा नानांच्या विश्वासाचा बाजीराव मोरेश्वर हा सचीवांचा प्रत्यक्ष दिवाण होता. घाशीरामासारखे क्रूरकर्मे नानांचीं प्रियपात्रें होते. यावरून शिंद्यांना विषप्रयोग करून मारून टाकण्यास नानांचें मन कचरेल असें वाटण्याचें कांहीं कारण नव्हतें. या एकंदर अनुकूल परिस्थितीवरून नानांनीं शिंद्यांवर विषप्रयोग करून त्यांना मारलें असें अनुमान करावयाला कांहीं इतिहासकारांना वाव मिळाला. दुसरी गोष्ट अशी कीं, नानांना वावडे वाटणारे शिंदे पुण्यास आल्यानंतर त्यांचें पेशव्यांबरोबर सख्य झाल्यामुळें नानांच्या कारभारांत त्यांच्या मनाविरुद्ध निरनिराळ्या गोष्टी घडून येऊन ढवळाढवळ होऊं लागली. त्यामुळें नानांना त्रागा करून 'काशीला जातों' असें ह्मणण्यापर्यंत प्रसंग आला. इतके दिवस नाना करतील तें प्रमाण व बांधतील तें तोरण, म्हणतील ती पूर्व; असा त्यांनीं आपला अंमल गाजविलेला होता. तेव्हां पूर्ण अखत्यारी चालविण्यास सोकावलेल्या मानी नानांवर त्यांच्या मनाविरुद्ध घडून येत असलेले प्रसंग पहाण्याचें संकट आलें होतें, हेंही सत्य आहे. यामुळें नानांचा एकसूत्री अधिकाराचा भंग करणारे अव्वल दर्जाचे गुन्हेगार शिंदे हे होते. व त्यांना साथ देणारे दुसरे गुन्हेगार सवाईमाधवराव हे होते. या सर्व गोष्टी पेशवे दरबारापासून सामान्य लोकांपर्यंत सर्वांना अवगत झाल्या होत्या. पुणें दरबार सोडून शिंदे जाईनात. त्यांच्याविरुद्ध आपण होळकरांना उठविलें व उत्तरेस लढाई सुरू करविली तरीही शिंदे पुणें सोडून जाईनात, असें ज्या वेळीं नानांस दिसून आलें, त्या वेळीं शिंद्यांचा कांटा दूर करण्यास त्यांना दुसरा मार्ग सुचेना, म्हणून त्यांच्या आजारीपणाचा फायदा घेऊन नानांनीं शिंद्यांवर

विषप्रयोग करून त्यांना ठार मारलें असलें पाहिजे असें अनुमान कांहीं इतिहासकारांनीं काढलें असावें असें दिसतें. असें अनुमान काढण्यांत फ्रेजर[१] साहेबांनीं पुढाकार घेतला आहे. त्याचप्रमाणें 'माधवराव शिंदे व नाना फडनविस' याचे लेखक नवल्कर यांचेंही म्हणणें असेंच आहे. नवल्कर म्हणतात "इतक्यांत महादजीस ज्वर आला. ही संधी विषप्रयोग करण्यास उत्तम आहे असें जाणून त्या दुष्ट व कृतघ्न नानानें आपला फार दिवसांचा दुष्ट हेतु शेवटास नेला. महादजीस विषप्रयोग करून नानानें त्याला स्वर्ग दाखविला. अशा रीतीनें त्या थोर व राजकारणकुशल व दूरदर्शी मुत्सद्याचा अंत झाला.[२]" याप्रमाणें नानांनीं शिंद्यांस विष प्रयोगानें ठार मारलें असें म्हणणारांचें अनुमान आहे असें दिसतें.

४३. नानांनीं शिंद्यांवर मारेकरी घालून त्यांस ठार मारलें असें म्हणण्याचा पुढाकार 'तारीख इ. मुझफरि' या मुसलमानी पुस्तककारानें घेतला आहे. त्याचाच जवळ जवळ अनुवाद 'Madhava Rao Sindhia' By H. G. Keene, C. I. E., M. Ag. या पुस्तकांत केला आहे. तो पुढीलप्रमाणें आहे.[३] 'On the 12th of February 1794, it was announced that Sindhia has died of fever at a suburb of Poona called Wanaoli. The cause was said to be this; but there is no record of previous illness. The usually well-informed and contemporaneous author of the 'Tarikh-i-Muzafari' gives a detailed account, according to which the Patel had been way-laid the evening before by an armed gang employed for the purpose by the Nana—who had certainly good reason to wish for his removal. It is stated, further, that Sindhia and his attendants made such a stout defence that

१ नानांचें खरेकृत चरित्र पान १५४. २ मा. व ना. पान ४१, ३ पान १८६.

the assailants were driven off; but the Chief sustained wounds of such severity as to cause his death next day.' याप्रमाणें नानांनीं शिंद्यांवर मारेकरी घालून त्यांना ठार मारलें असाही इतिहास सांपडतो.

४४. या बाबतींत ग्रँट डफ साहेबानें स्पष्ट असें कांहीं म्हटलेलें नाहीं. त्याचा शिंद्यांच्या मरणाच्या बाबतींत असा शेरा आहे कीं, 'The death of Madhoji was an event of great political importance, as he was inimical to the overgrown ascendency of the Brahmins' या शेऱ्यावरून शिंद्यांच्या मरणाच्या बाबतींत ब्राम्हणांचें कांहीं गुप्त कारस्थान असावें असा डफ साहेबांना संशय आल्याप्रमाणें दिसतो.

४५. नानांचे पक्षपाती इतिहासकार नानावरील कलंक झाडून टाकण्याकरतां इंग्रजी इतिहासकारांस दूषणें देतात. 'नाना व शिंदे यांमधील स्पर्धेला जास्त भडक रंग देण्यांत तत्कालीन इंग्रज मुत्सद्यांनीं व इंग्रज इतिहासकारांनीं बराच पुढाकार घेतला आहे. मराठा मंडळांत नवीन फाटाफूट उत्पन्न करणें किंवा असलेली फाटाफूट जास्त विस्तृत करणें हें इंग्रजांच्या राजनीतिचें प्रधान अंगच होतें. त्याच्या पुढची पायरी ह्मणजे आपल्याला इष्ट असलेली गोष्ट आगाऊच घडून आलेली आहे असा चहूंकडे डांगोरा पिटणें ही[1] होय." याप्रमाणें खरे शास्त्री यांनीं इंग्रज इतिहासकारांनीं 'तारीख इ. मुझफरि' या मुसलमानी पुस्तककाराचा आधार दिला आहे. अर्थात् नानांनीं शिंद्यांना मारेकरी घालून मारलें असें ह्मणणारा इतिहासकार मुसलमान आहे. खरे शास्त्र्यांनीं याच पुस्तकाचा आधार घेतला असता तर त्यांनाही तेंच ह्मणावें लागलें असतें.

---

१ नानाचें चरित्र. खरेकृत पा. १५३.

एकंदरींत इंग्रज इतिहासकारांना दूषण दिल्यानें नाना फडनविस यांची बाजू सावरूं शकत नाहीं. त्यांचें ह्मणणें खोटें ठरण्यासारखा खरें शास्त्रयांनीं कोणताच योग्य पुरावा पुढें आणलेला नाहीं. एकंदरींत या संबंधीं सर्व इतिहासकारांचीं अनुमानेंच आहेत. या बाबतींत लेखी असा विश्वसनीय पुरावाच मिळणें अशक्य आहे. नानांच्या चारित्र्यावरूनच तीं अनुमानें खरीं किंवा खोटीं ठरविण्याव्यतिरिक्त दुसरा मार्ग नाहीं. तेव्हां शिंदे हे नानांचे शत्रू होते ह्मणून त्यांनीं त्यांना मारून टाकलें हें विधान नक्की ठरविण्यापूर्वीं नानांचे दुसरे शत्रू सवाईमाधराव यांचें त्यांनीं काय केलें हें पाहिलें पाहिजे. हें पाहिल्याशिवाय नानांवर तसा उघड आरोप करणें येथें बरोबर होणार नाहीं. शिंद्यांप्रमाणेंच नानांनीं जर सवाईमाधवरावांची स्थिति ती केली असेल तर आपला अधिकार अव्याहत चालण्याकरतां त्यांनीं शिंद्यांस मारविलें असें नक्की अनुमान काढण्यास ठीक पडेल !

प्रकरण २८ वें.

नानांच्या कैदखान्यांतील आनंदीबाईचा अंत.

इ. स. १७९४.

१ शिंद्यांचा कुटुंब-विस्तार महादजींच्या पश्चात् दौलतराव शिंदे सरदारीचे धनी. त्यांस सरदारीची वस्त्रें देण्याबद्दल नानांच्या भरमसाट नजराण्याच्या मागण्या. त्या मागण्या शिंद्यांचे कारभारी अमान्य करतात. त्यामुळें सरदारीच्या वस्त्रांचा प्रश्न लांबणीवर पडतो.—२ पुण्यास गणेश खिंडींतील गव्हर्नर साहेबांच्या बंगल्यांतील एका दिवाणखान्यांतील सवाईमाधवराव, नाना व शिंदे अशा त्रिवर्गाचें चित्र. महादजी शिंद्यांचा स्वभाव. त्यांची धर्मभावना—३ महादजींच्या स्वभावांतील विशेष धर्म.—४ नाना व महादजी यांच्या स्वभावांतील फरक.—५ हरिपंत फडक्यांचा सिद्धटेकास मृत्यु.—६ राघोबादादांची पत्नी आनंदीबाई यांचा मृत्यु. त्यांच्या कुटुंबांतील माणसें व पूर्व वृत्तांत.—७ नानांच्या देखरेखी खालील आनंदीबाईची नजरकैद. नानांनीं त्यांच्या तैनातीस दिलेलीं माणसें नोकर नसून पहारेकरी होतीं.—८ पेशव्यांतील गृहकलहाची प्रवर्तक गोपिकाबाई, आनंदीबाई नव्हे.—९ नारायणरावांच्या खुनाचा आरोप आनंदीबाईवर लादण्यांत येतो. तो धादांत खोटा कसा आहे याचें विवरण.—१० पेशवे घराण्यांत आनंदीबाई-सारखी तेजस्वी, धीरवान, स्वाभिमानी व राज्यकारणकुशल स्त्री कां झाली नाहीं याचीं प्रमाणें.—११ आनंदीबाईस नानांच्या खडतर कैदखान्यांत मिळालेली हीन व नीचवृत्तीची वागणूक.—१२ बाजीरावानें व्यसनी व दुराचारी बनावें अशी नानांची खटपट आहे असा आनंदीबाईचा आरोप. आनंदीबाईचें मातृहृदय कसें होतें?—१३ नानांचा पक्ष प्रतिपक्षावर वाटेल ते आरोप करण्यांत प्रवीण होता. आनंदीबाईची धर्मश्रद्धा व त्यांची ग्रंथ वाचनाची आवड.—१४ आनंदीबाई-जवळ दत्तक मुलगा व औरस मुलगा असा भेदभाव नव्हता. आनंदीबाई या एक महाराष्ट्रांतील स्त्रीरत्न.

१. महादजी शिंद्यांचें वय मरणसमयीं ६७ वर्षांचें होतें. त्यांना पुत्रसंतान नव्हतें. पुत्र व्हावा अशी त्यांची फार इच्छा होती ह्मणून त्यांनीं उतार वयांतही लग्नें करून घेतलीं. त्यांचीं एकंदर नऊ लग्नें झालीं. (१) अन्नपूर्णाबाई—जयसिंगराव घोरपडे यांची मुलगी. हिच्या पोटीं यमाबाई ही मुलगी झाली. (२) भवानीबाई—सिदोजी घाटगे यांची मुलगी. (३) पार्वतीबाई—नरसिंगराव घाटगे यांची बहीण. हिला बाळाबाई ही मुलगी झाली. तिला शितोळे यांचे घरीं दिली. (४) भवानीबाई—संगमकर देशमुखांचे घराण्यांतील. (५) गंगाबाई—पलवेकर जाधव यांची मुलगी. (६) राधाबाई—राउळाची मुलगी. पदमसिंग राउळाची बहीण. (७) लक्ष्मीबाई—तुळजापुरकर भोपे कदम यांची कन्या. (८) भागीरथीबाई—कर्डेकराची कन्या. (९) यमुनाबाई—रामसिंग राउळ देवडाईकर याची बहीण. या प्रमाणें महादजींच्या नऊ बायका झाल्या. तुकोजी हा महादजी शिंद्यांचा धाकटा भाऊ होता. तो पानिपतच्या लढाईंत मेला. त्याला केदारजी, खळोजी, व आनंदराव असे तीन पुत्र होते. केदारजीला संतती न होतांच तो मेला. खळोजीला दोन पुत्र होते. व आनंदराव यास दौलतराव या नांवाचा पुत्र होता. महादजींचें प्रेम दौलतरावावर होतें. ह्मणून त्यास दत्तक घेण्याबद्दल त्यांचे मनांत फार होतें. त्याप्रमाणें त्यांनीं तसें अनेक वेळां बोलूनही दाखविलें होतें. शिंद्यांच्या अंतकाळीं दौलतराव तुळजापुरास होते. शिंदे मरण पावले त्याच दिवशीं दौलतरावांस बोलवण्याकरतां पाठविलें. ते त्यांच्या मरणाच्या तिसऱ्या दिवशीं पुण्यास येऊन दाखल झाले. महादजींचें दिवस-कार्य आटोपल्यानंतर दौलतराव यांस सरदारीचीं वस्त्रें देण्याबद्दल शिंद्यांचे वकील रामजी पाटील व रायाजी पाटील यांनीं पेशवे सरकारांत बोलणें सुरू केलें. महादजी शिंदे यांची बायको लक्ष्मीबाई हिला नाना फडनविस यांचें सहाय्य होतें [१] ह्मणून तिनें दौलतराव यास गादीवर बसविण्याचे कामीं आडकाठी घातली. त्याच-

१ मराठ्यांचा पत्रपद्धति इतिहास पृ. १२०.

प्रमाणें नाना फडनविस यांनीं स्वतः दौलतराव यांस पेशव्यांकडून शिंद्यांचे अधिकाराचीं वहिवाटीप्रमाणें मिळावयाचीं वस्त्रें देण्यास हरकत घेतली. लक्ष्मीबाईकडून दौलतरावाबद्दल आडकाठी घालावयास लावण्यांत व स्वतः हरकत घेण्यांत नानांचा हेतु असा होता कीं, दौलतरावांकडून पेशव्यांस दोन कोट रुपये नजराणा मिळावा; व शिंद्यांच्या जवाहिरखान्यांत दोन अमोलिक जिनसा होत्या त्या घ्याव्या. त्या ह्मणजे "एकेक मोतीं जांभळा एवढालें, अशा शंभर मोत्यांची माळ एक, व तशाच शंभर चांफेकळ्यांची माळ एक, अशा दोन माळा" मिळाव्या. एवढें मिळाल्यानंतर शिंद्यांच्या सरदारी प्रकरणीं काय बोलणें असेल तें बोलावें असें नानांचें ह्मणणें होतें. याप्रमाणें नानांची भरमसाट मागणी ऐकून शिंद्यांच्या वकिलांनीं नानांस कळविलें कीं, "पाटीलबोवांच्या मागें जिवबादादा बक्षी हे सर्व राज्यकारभारचे मुखत्यार आहेत. तेव्हां त्यांस लिहून पाठवून त्यांचें उत्तर आलें ह्मणजे काय विनंती करणें ती करूं. असें बोलणें जिवबादादा यांस पत्रीं लिहून त्याचा जाब नजर घावी असा आल्यास सरकारांत विनंती करूं."[1] या प्रमाणें बोलणीं झालेनंतर पेशव्यांकडून दौलतराव यांस दुखोटा करावयास कारभारी आले. त्यांनीं दुखोटा मात्र केला. त्यांनीं त्यांस सरदारीचीं वस्त्रें दिलीं नाहींत. पुढें ही हकीकत रामजी पाटील यांनीं जिवबादादांस कळविली. तेव्हां त्यांनीं विचार केला कीं, 'पेशव्यांकडून वस्त्रें मिळालीं नाहींत, ह्मणून शिंद्यांची सरदारी कोठें जात नाहीं. वेळ येईल त्या वेळीं याचा हवा तसा निकाल करून घेतां येईल,' असा विचार करून पुढें प्रसंगानुसार पेशव्यांकडून वस्त्रें मिळाविण्याची खात्री असल्यामुळें त्यांनीं तें प्रकरण तसेंच ठेविलें.

२. सध्यां पुण्याच्या गणेशखिंडींत गव्हर्नर साहेबांच्या बंगल्यांतील एका दिवाणखान्यांत भिंतीवर एक मोठी हातानें काढलेली जुनी तसबीर

---

१ पे. ब. पा. १५७.

आहे. त्यांत पाटीलबोवा, नाना व सवाईमाधवराव हे तिघे एके ठिकाणीं बसलेले काढलेले आहेत. त्या चित्रावरून पाटीलबोवांच्या स्वरूपाचें चांगलें ज्ञान होण्यासारखें आहे. महादजी शिंदे अलीकडे शरीरानें बरेच स्थूल झाले होते. त्यांची उंची मध्यम असून, शरीर बांधेसूद होतें. त्यांचा वर्ण चांगला काळासांवळा होता. त्यांची मुद्रा प्रसन्न, निष्कपटी व उदार होती. ते कृष्णभक्त होते ह्मणून मुद्रा लावीत असत. त्यांच्या हातांत स्मरणी असे. त्यांना साधेपणा फार आवडे. त्यांना पोकळ छानछोकीचा तिरस्कार होता. पाटीलबोवा मोठे धार्मिक बुद्धीचे असून ते आपल्या उतार वयांत ईश्वर भजनांत पुष्कळ काल खर्च करीत; त्याचप्रमाणें नित्य स्नान, पूजादि त्यांची पुष्कळ नित्य नैमित्तिकें होतीं असें सांगतात. त्यांची धर्मावर पूर्ण श्रद्धा होती. त्यांनीं मथुरा, गोकुळ, वृंदावन, पुष्कर वगैरे ठिकाणीं धर्मकृत्याकडे पुष्कळ पैसा खर्च केला होता, आणि बादशहाकडून गोवधाची मनाई करविली होती. पाटीलबोवा मुसलमानांचे पीर, साधु, संत यांसही मान देत व त्यांचा मुख्य गुरू तर एक मुसलमान फकीर होता.[१] धर्मासंबंधानेंही त्यांची समबुद्धि होणें साहजिकच होतें. कारण शाहू महाराजापासून पुढें मराठ्यांचा धर्मासंबंधानें मुसलमानांविषयींचा द्वेष कमी होत आला होता. त्या काळांतील सामान्य सुशिक्षित मनुष्याप्रमाणें पाटीलबोवांचाही मुहूर्त–शकुनादिकांवर फार भरंवसा होता. इ. स. १७८४ सालीं पाटीलबोवांची स्वारी आग्र्यास जाण्यास निघाली. तेव्हां त्यांच्या पदरचा एक हत्ती मरण पावला. तेवढ्या अपशकुनावरून त्यांनीं पुढें गेलेली सारी फौज परत आणिली. चितोडगडची स्थापना श्रीरामचंद्राचा पुत्र कुश यानें केली अशी दंतकथा आहे. त्यावरून त्याच वंशांतील उदेपूरच्या राजानें किल्ल्यावर तोफ सुरू करीपर्यंत पाटीलबोवांनीं तोफा चालविल्या नाहींत असें सांगतात.

---

१ वानवडी येथें त्यांच्या छत्रीजवळ दरसाल भंडारा होतो, त्यांत प्रथम फकीरांस अन्न देतात, मग इतर हिंदूंस देतात. सरंजामे २९.

३. पाटीलबोवांचा स्वभाव मोठा मिठा होता. त्यांचें बोलणें ऐकून व विशेषतः त्यांचें मोकळें मन पाहून सर्वांस ते प्रिय होत. मोठें ऐश्वर्य व बोलण्याचालण्यांत साधेपणा हीं एकत्र मिळणें दुर्मिळ, परंतु तीं पाटील-बोवांत वास करीत होतीं. ज्यानें हिंदुस्थान पादाक्रांत केलें व रजपुतांस जिंकलें, आणि ज्याच्या पदरीं तीस हजार कवायती पायदळ, पांचशें तोफा व लाख घोडा एवढी फौज; त्यानें पेशव्यांचे जोडे उचलावे व दरबारांत पेशव्यांच्या इतर मानकऱ्यांच्या खालीं बसण्याविषयीं इच्छा दाखवावी, इतक्या साधेपणाचीं उदाहरणें जगाच्या इतिहासांतही दुर्मिळ आहेत. त्यांना किलेक वेळां फार राग येत असे; रागाच्या आवेशांत केव्हां केव्हां ते कडक वागत व रागाच्या सपाट्यांत ते आपल्या मनांतील गुप्त गोष्टीसुद्धां पटकन बोलून जात.[1] लढाईंतून पळून येणाऱ्या भित्र्या शिपायांस ते फार शिक्षा देत. ज्यांना ज्यांना पाटीलबोवांशीं भेटण्याचा प्रसंग आला त्यांच्या मनावर पाटीलबोवांविषयीं चांगला ठसा उमटे व पूज्यबुद्धि उत्पन्न होई. मॉलेट, अंडरसन, पामर, डी बॉइन वगैरे प्रसिद्ध युरोपियनांनीं असेच उद्गार काढिले आहेत. पाटीलबोवांचें पूर्व वय लढायांतच गेलें आणि त्यांचे बंधु जिवंत असेपर्यंत त्यांचें नांव फारसें पुढें आलें नाहीं. परंतु ते मोठे शूर शिपाई होते अशी ख्याति होती. ते पागेंत बारगीर असतां त्यांनीं निजामावर हल्ला करून शौर्य व शिपायगिरी ह्यांबद्दल ख्याति मिळविली होती. पानिपतनंतर ते पंगु झाल्यामुळें ते स्वतः शिपायगिरी फारशी करीत नसत. तथापि तोही प्रसंग त्यांना इंग्रजांबरोबर लढाई करण्याचे वेळीं आला होता. त्यांच्या शिपायगिरीपेक्षां अनुभवानें त्यांची सरदारींत प्रवीणता झाली होती. सरदारी ह्मणजे काय व शिपायगिरी ह्मणजे काय यांचा भेद नानासाहेब पेशव्यांप्रमाणें त्यांना समजत होता. त्यांचा बंधु दत्ताजी हा शूर शिपाई व महायोद्धा होता; परंतु फौजांची हालचाल धोरणानें व शत्रूंचे डांवपेंच पाहून कशी करावी, हें त्याला चांगलें समजत नव्हतें. त्याचप्रमाणें परा-

---

१ नातूकृत म. शि. च. पान २७०.

न्मुखतेपेक्षां धारातीर्थी देह अर्पण करणें बरें, अशी दत्ताजीची समजूत होती. परंतु ती नानासाहेबांस पसंत नव्हती. महादजींनाहीं आपलें सर्वस्व नाश होईपर्यंत लढावें हें आवडत नसे. पराभव झाला तर ते मागें फिरत आणि शत्रूची खोड मोडण्यापुरती आपली तयारी झाल्याखेरीज धाडस करीत नसत. गॉडर्डसाहेबाचा जोर पाहून त्यांनीं फौज दूर नेली, परंतु क्यामॉकवर सपाटून हल्ला केला. लालसोटचा पराभव झाला तेव्हां न डगमगतां व एकदम जिवावर उदार न होतां, आपली पराभव पावलेली फौज गोळा करून ते मागें फिरले व जास्त तयारी करून नंतर त्यांनीं रजपुतांची खोड मोडली. एकदम सर्वांशीं विरोध न करतां एकाशीं स्नेह तर एकाशीं बिघाड करावा आणि तोंडानें गोड बोलून 'राज्यकारभार अष्टपैलुपणास' उचित असें मुत्सद्दीपणाचें वर्तन ठेवावें, असा जो बाळाजीपंत पेशव्यांचा उपदेश होता, तो महादजींचे मनावर चांगला ठसला होता. गुलाम कादरचे पारिपत्याचे वेळीं इस्माईल बेगाशीं स्नेह व रजपुतांशीं लढतांना जाटांशी स्नेह, अशा प्रकारची अनेक उदाहरणें आहेत. कसाही बिकट प्रसंग आला तरी न डगमगतां 'चित्ताचें समाधान करून' प्रसंगोचित आचरण करण्यांत त्यांची बरोबरी खुद्द शिवाजीशींही करितां येईल व त्यांच्या त्या गुणाबद्दल युरोपियन लोकही त्यांची वाखाणणी करीत होते.

४. पाटीलबोवांची कारकीर्द म्हणजे मराठेशाहींतील पेशवाईचा सगळा इतिहास म्हटला तरी चालेल. त्यांच्याइतके वयोवृद्ध होऊन मरण पावलेले मुत्सद्दी व सरदार मराठेशाहींत थोडेच झाले. त्यांच्या मृत्युनंतर पोक्त व धोरणी विचारांचे अनुभविक मुत्सद्दी फारच थोडे राहिले होते. नानांवर सुद्धां यांची कडी होती. नाना केवळ मुत्सद्दी कारकून व पुण्यांत वाढलेला; परंतु पाटीलबोवा शिपाई, सरदार व मुत्सद्दी असून हिंदुस्थानभर स्वारींत हिंडलेला फिरलेला होता. त्यामुळें पाटीलबोवांचे विचार जास्त विस्तृत व थोर बुद्धीचे असत. परंतु नानाची मसलत कोती व मत्सरी असे. यांचे स्वभावांत हे फरक पुढें पुढें जास्तच दिसूं लागले.[१] जो इसम स्वभावतः मनोधर्माचा चांगला असतो

१ नातूकृत महादजी च. पा. २७२.

त्याचे हातून राजकारणांत ज्ञात अगर अज्ञात पापें अगर अन्याय घडतच नाहींत असें होत नाहीं. परंतु तो योग्य काळीं त्याची सुधारणा करून घेतो. माधवराव पेशव्यांना त्यांच्या मरणकालीं राघोबादादा व सखारामबापू यांच्या विषयीं होत असलेला अन्याय असह्य झाल्यानें त्या उभयतांची बंधमुक्तता करून त्यांनीं तो सुधारून घेतला. नानांचा राज्यकारभार कपटी व स्वार्थी दिसून आल्यामुळें त्यांनीं पुनः राघोबादादा व सखारामबापू यांच्यावर पेशवाईचा कारभार सोंपविला, म्हणून माधवराव पेशवे थोर व चांगल्या मनोधर्माचे ठरले. त्याचप्रमाणें महादजी शिंदेही थोर व चांगल्या मनोधर्माचे होते यांत तिळमात्र शंका नाहीं. नानांचीं कारस्थानें इतकीं गूढ स्वरूपाचीं होतीं कीं त्यांचें आकलन सहसा कोणास होत नसे. त्या वेळेच्या राजकीय परिस्थितीप्रमाणें शिंद्यांना नानांचा पक्ष स्वीकारणें भाग पडलें. नानांनीं राघोबादादांचें पारिपत्य करण्यांत व तोतयाचें बंड मोडण्यांत महादजी शिंद्यांचें सहाय्य घेतलें. या दोन्हीं कारस्थानांचें गूढ साध्य काय होतें हें महादजींना समजलेंच होतें असें सांगतां येणार नाहीं. परंतु या कारस्थानांच्या परिसमाप्तीनंतर नानांनीं जे प्रत्यक्ष अनर्थ घडवून आणले, ते केवळ अन्यायाचे होते अशी खात्री शिंद्यांची झाली, म्हणूनच पुण्यास आल्यानंतर त्यांनीं नानांशीं शेवटीं सत्याचा सामना दिला, नानांचीं कारस्थानें चवाठ्यावर आणलीं व नानांच्या अन्यायी कारभाराचा डांगोरा जगजाहीर केला. यामुळेंच महादजी शिंदे हे थोर व सर्वमान्य असे राष्ट्रपुरुष ठरले यांत संशय नाहीं. असो. याप्रमाणें महादजी शिंद्यांचा पराक्रमरवी अस्त पावला.

५. महादजी शिंदे यांच्या मरणापूर्वीं सुमारें महिना दोन महिने हरिपंत फडके पोटदुखीच्या आजारानें बेचैन होऊन सिद्धटेकास श्रीगणपतीसन्निध मरावयाकरितां जाऊन राहिले होते. हरिपंततात्या सिद्धटेकास गेल्यामुळें नानांना आपला उजवा हात गेल्याप्रमाणें झालें होतें. पुढें ज्येष्ठ वद्य ७ शके १७१६ तारीख २० जून सन १७९४ रोजीं हरिपंतांस सिद्धटेकास देवाज्ञा झाली. याप्रमाणें मराठी साम्राज्याचे दोन पराक्रमी पुरुष थोड्याशा कालांतरानेंच कालवश झाले.

६. महादजी शिंदे मेल्यानंतर सुमारें दोन महिन्यांनीं राघोबादादा पेशवे यांची पत्नी आनंदीबाई या सन १७९४ च्या एप्रिल महिन्यांत[1] आनंदीवल्ली मुक्कामीं मरण पावल्या. मरणसमयीं यांचें वय ४७ वर्षांचें होतें. यांचा जन्म ओक घराण्यांत इ. स. १७४७ सालीं झाला. त्यांच्या आठव्या वर्षी ता. १७ डिसेंबर सन १७५५ रोजीं त्यांचें लग्न रघुनाथरावदादा यांच्याबरोबर झालें. रघुनाथराव यांचें हें दुसरें लग्न होतें. त्या वेळीं त्यांचें वय २६ वर्षांचें होतें. आनंदीबाईला एकंदर पांच मुलें झालीं. चार मुलगे व एक मुलगी. मुलीचें नांव दुर्गाबाई. हिला पांडुरंगराव नाईक बारामतीकर यांस दिलें होतें. ही राघोबादादा यांचे हयातींत इ. स. १७८३ मध्यें वारली. पहिला मुलगा बाजीराव याचा जन्म धारच्या किल्ल्यांत ता. १० जानेवारी सन १७७५ रोजीं झाला. त्यानंतर आनंदीबाईस आणखी दोन मुलगे झाले, परंतु ते राघोबादादा यांच्या हयातींतच वारले. शेवटचा मुलगा चिमणाजी. राघोबादादा वारले त्या वेळीं आनंदीबाई चिमणाजीच्या वेळीं गरोदर होती, शिवाय अमृतराव हा दत्तक मुलगा आनंदीबाईजवळच होता.

७. आनंदीबाईचीं शेवटचीं वीस वर्षे भयंकर त्रासाचीं गेलीं. पहिलीं दहा वर्षे जवळ जवळ अज्ञातवासांत गेलीं तर पुढचीं दहा वर्षे नाना फडनविसांच्या जबरदस्त नजरकैदेंत गेलीं. कोंपरगांवीं राघोबादादांना आणून ठेवल्यानंतर, त्यांच्या बंदोबस्ताला नानांनीं जे कारभारी नेमले होते ते कारभारी नसून पहारेकरी होते.[2] राघोबादादांच्या मरणानंतर पिंजऱ्यांत कोंडलेल्या वाघिणीप्रमाणें आनंदीबाईची स्थिति झाली. दोन वेळेस जेवून किंवा नक्तें उपोषणें करण्यांत वेळ घालविण्याव्यतिरिक्त त्यांना दुसरा मार्ग राहिला नव्हता. बरें, कोठें जातील तर तेथें नानांनीं तैनातीस दिलेले कारभारी हजर असत. हे कारभारी आनंदीबाईच्या खरोखर तैनातीस नसून पहारेकऱ्यांचें मुख्यतः काम करीत असत.

---

१ मॅकडोनॉल्डकृत नाना फडनविस यांची बखर पान १२२. २ आनंदीबाईची दिनचर्या.

८ पेशवाईंत भाऊबंदी तंटे आनंदीबाईनें उत्पन्न केले असा त्यांच्यावर आरोप करण्यांत येतो. परंतु हा आरोप खुद्द आनंदीबाईंना कबूल नव्हता. त्यांचें ह्मणणें असें होतें कीं, "भाऊसाहेबांस हिंदुस्थानास जावयास कारण व सर्व बराबर व्हावयास कारण थोरलीबाई (गोपिकाबाई)............... थोरलीबाई माधवरावास बुद्धिवाद बहुत सांगत. त्यांतहि घर फोडावयाच्या गोष्टी सांगत. सराफी बुद्धि होती. [१]" हें आनंदीबाईचें ह्मणणें कोणीं खोटें ठरवूं शकलें नाहीं. गोपिकाबाई सदाशिवरावभाऊंना किती पाण्यांत पहात असे याचा उल्लेख पूर्वीं आलाच आहे. पानिपतसारख्या प्रचंड मोहिमेवर समशेरबहाद्दर राघोबादादाला न पाठवितां कलमबहाद्दर भाऊंची योजना झाल्यामुळें सर्वनाश झाला हें आनंदीबाईचें ह्मणणें कोणालाच नाकबूल करतां येणार नाहीं. माधवराव पेशव्यांच्या वेळीं गोपिकाबाईंच्या चिथावणीनें राघोबादादांना कारागृहवास पतकरावा लागला, हाही इतिहास मागें आला आहे. आनंदीबाई ही जर गृहकलहाची सूत्रधार असती, तर आपल्या मरणकालीं माधवराव पेशव्यांनीं राघोबादादा व आनंदीबाई यांची कारागृहांतून मुक्तता न करतां व भाऊबंदीचें पुढील होणारें कारण जें नारायणराव पेशवे यांना त्यांच्या रक्षणाखालीं न देतां, त्यांची कैदच जास्त सक्त केली असती. परंतु तसें माधवरावांनीं ज्याअर्थी केलें नाहीं, त्याअर्थी आनंदीबाई ही भाऊबंदी तंटे उत्पन्न करणारी होती, असें ह्मणणें खोटें ठरतें. गोपिकाबाई ही नानासाहेबासारख्या सत्ताधीशाची पत्नी होती. वडील होती. तिच्या अपराधांवर पांघरूण पडणें अगदीं स्वाभाविक होतें. आनंदीबाई लहान व नानासाहेबांच्या आज्ञांकित असलेल्या अनधिकारी राघोबादादाची बायको असल्यामुळें, गोपिकाबाईंच्या तोंडाच्या तोफखान्याला तिनें प्रत्युत्तर देणें अमर्यादेचें ठरलें असतें. त्यामुळें अशा स्थितींत मूग गिळून स्वस्थ बसणारीं निर्दोषी माणसें जशीं लोकनिंदेला कारणीभूत होतात, तशीच आनंदीबाई झाली यांत नवल नाहीं.

---

१ आनंदीबाईची दिनचर्या पत्र नं. ९३.

९ आनंदीबाईवर भाऊबंदी तंटे उत्पन्न केल्याचा आरोप ज्याप्रमाणें करण्यांत आला त्याचप्रमाणें नारायणरावांच्या वधासंबंधींचा आरोप तिचेवर करण्यांत आलेला आहे. हा आरोप पूर्वींच्या आरोपापेक्षां विशेष गंभीर स्वरूपाचा आहे. प्रतिपक्षाला आरोप करण्याचें वरदानच असतें; परंतु निःपक्षपातबुद्धीनें उभय पक्षांतील पुरावे पाहून त्याप्रमाणें आरोपीस गुन्हेगार ठरविणें अगर दोषमुक्त करणें हें काम इतिहासकारांचें आहे. आनंदीबाईला दोषी ठरविण्यांत इतिहासकारांनींही मोठी घोडचूक केली आहे. नारायणरावांचा खून करण्याचा प्रयत्न कोणाकडून झाला, त्यांचा मृत्यु कसा झाला, किंवा 'ध' चा 'मा' कोणी केला याचा इतिहास पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत यावयाचा असल्यामुळें आनंदीबाईवरील हा आरोप त्यावेळीं आपोआप धुवून निघेल. परंतु या ठिकाणीं कांहीं महत्वाच्या गोष्टी पुढील इतिहासाची संगती लागण्याकरतां नमूद करून ठेवणें जरूरीचें आहे. नारायणरावांचा नादानपणा सर्वांना कसा सारखा भोंवला ही हकीकत मागें आलीच आहे. नारायणरावांना धरण्याचा जो कट झाला त्यांत सखारामबापू[१] वगैरे मुत्सद्दी-सरदार मंडळी होती. पुढें नारायणरावांच्या मृत्युनंतर बारभाईंनीं जें कारस्थान उभें केलें, त्याचे अध्वर्यू सखारामबापूच असल्यानें, त्यांचा नारायणरावांच्या खुनाशीं कांहींही संबंध नाहीं अशी लोकांची समजूत होणें अगदीं स्वाभाविक होते. धरण्याच्या कटांतील सखारामबापू व त्यांची सहकारी सरदारमंडळी, खुनाच्या कटांतून वगळल्यानंतर राहिले राघोबादादा, आनंदीबाई व गारदी. गारदी यांची मारण्याच्या कटांतील भूमिका केवळ हुकुमाची तामिली करणें एवढीच होती. राघोबादादा हे नारायणरावांचे चुलते. रक्ताचा अगदीं जवळ संबंध असल्यामुळें खुनासारखें घोर कर्म करण्याला ते प्रवृत्त होणार नाहीं. मग राहतां राहिली एक आनंदीबाई. ती दुसऱ्या घरा-

---

१ काव्येतिहाससंग्रह, पत्रें यादी वगैरे नं. ४८९.

ण्यांतली. पेशवे घराण्याशीं तिचा कांहीं रक्ताचा संबंध नाहीं. शिवाय पेशव्यांच्या घरांत थोरली बाई आणि धाकटीबाई हा भेदभाव. गोपिकाबाई आनंदीबाईला पाण्यांत पहात होती. त्यामुळें नारायणरावांच्या वधाचा आरोप करावयाला आनंदीबाई सहजासहजीं गोपिकाबाईच्या पक्षाला सांपडली. त्या वेळीं पुण्यांत उघडपणानें आनंदीबाईवर आरोप करण्यास कोणीं धजलें नाहीं. घरोघरीं मात्र तशी कुजबुज सुरू होती. फक्त या एकपक्षीय कुजबुजीमुळें आनंदीबाई या आरोपाला पात्र ठरत नाहीं. 'ध' चा 'मा' कोणी केला याबाबत बारभाईंच्या कारभारांत चौकशी झालेली नाहीं. त्याबाबत बारभाईंच्या कोर्टापुढें कोणताच पुरावा आलेला नाहीं. राघोबादादा, आनंदीबाई ही मंडळी बारभाईंचे वैदी बनून कोपरगांवीं आल्यानंतरही त्यांना त्यांनीं न्याय-कोर्टापुढें खेंचलें नाहीं. बारभाईंच्या क्रोधाला व त्वेषाला कारणीभूत झालेले राघोबादादा व आनंदीबाई बंदिवान झाले असतां, नारायणरावांच्या वधासंबंधीं परा एवढा जरी पुरावा नाना फडनविस यांना मिळाला असतां, तरी याचा कावळा करून राघोबादादा व आनंदीबाई यांचें पूर्णपणें नैतिक अधः पतन करण्याची सुवर्ण संधि त्यांनीं दवडूं दिली नसती. उलट या बाबतींत आनंदीबाईनें नाना फडनविस यांना आव्हान दिलें होतें. "यादीचीं अक्षरें 'ध' चा 'मा' कोणी केला याची चौकशी किमर्थ न केली ! माझा दस्तऐवज किंवा निरोप कांहीं तरी निवडावयाचें होतें. कांहींच न करतां उगाच पेचांत ठेवलें.[1]" अशा तऱ्हेनें प्रत्यक्ष नानांवर ते पूर्णपणें अन्याय करीत असून सोपटाला साप म्हणून बड-वीत आहेत असा उलट आनंदीबाई आरोप करते व कोणाची टिचकी-सुद्धां सहन न करणारे अभिमानी नाना पूर्णपणें मूग गिळून गप बसतात, यांतच आनंदीबाईची निर्दोषी आणि निष्कलंकपणानें बेडर बनलेली वृत्ति स्पष्ट दिसून येते. आरोपाचा शिक्का मोर्तब करावयाचा,

१ आनंदीबाईचीदिनचर्या पत्र नं. ७१.

पण पुरावा मात्र नाहीं ही अन्यायी व खोडसाळ वृत्ति नानांची होती, हें आनंदीबाईनें आव्हान दिल्यानंतर नानांनीं मूग गिळून गप्प बसणें यावरूनच सिद्ध होतें. एकंदरींत नारायणरावांच्या वधाच्या बाबतींत आनंदीबाई पूर्ण निर्दोषी होती असेंच ठरतें. याशिवाय नारायणरावांवर आनंदीबाईची विशेष ममता होती असेच लेख सांपडतात. "माझी ममता विशेष ह्मणून नारायणरायाची गर्दीचा मजकूर मला सांगत नव्हते. ' " एकंदरींत बारभाईंना आपलें राजकारण साधून घेण्याकरतां राघोबादादा व आनंदीबाई यांचें नैतिक अधःपतन व्हावें ह्मणून ते हा वधाचा आरोप करण्याचा डाव खेळले असेंच ठरतें.

१०. नानासाहेब पेशवे मेल्यानंतर मुत्सद्यांच्या राजकारणाला मन मानेल तसें विस्तीर्ण क्षेत्र निर्माण झालें. नानांनीं गोपिकाबाईचा पक्ष धरला व सखारामबापूंनीं राघोबादादांचा पक्ष धरला. माधवरावांच्या हातांत पेशवाईची सत्ता आल्यामुळें नानांचा पक्ष जोरावला. त्या अवधींत त्यांनीं शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले वगैरे मोठमोठ्या फौजबंद सरदारांस आपल्या पंखाखालीं ओढलें. माधवराव यांच्या कारकीर्दींत राघोबादादा व सखारामबापू नजरकैदेंत पडल्यामुळें नानांस आपल्या कारस्थानांचें जाळें पसरविण्यास मुबलक अवधी मिळाला. माधवरावांच्या मरणानंतर नारायण-रावांना गादीवर बसविल्यावर कारभाराचा अधिकार जरी राघोबादादांच्या व सखारामबापूंच्या हातीं आला, तरी पेशव्याच्या राज्याचे अंमलबजावणी करणारे फौजबंद सरदार नानांच्याच विश्वासांत राहिल्यामुळें, नारायणरावांच्या वधाचें कारस्थान रचून राघोबादादांचा पक्ष नानांनीं दुबळा केला व सखाराम-बापूंस त्यांचे पक्षांतून फोडून नानांनीं त्यांना आपल्या पक्षांत सामील करून घेतलें. हीच राजाविरुद्ध मुत्सद्यांच्या राज्यक्रांतीची पहिली पायरी झाली. क्रांतीची कल्पना लोकांना आणूं न देतां जे क्रांति घडवून आणतात, तेच खरे मुत्सद्दी असतात. नाना त्याचपैकीं एक होते. दिसावयाला पेशवाईचे मालक सवाईमाधवराव, पण असावयाला मात्र नाना मालक होते हें मागील

१ आनंदीबाईची दिनचर्या. पत्र नं. ७१.

इतिहासावरून दिसून येईल. सवाईमाधवराव हे अज्ञान बालक असल्यामुळें पेशवेघराण्याच्या इभ्रतीचा भार राघोबादादांच्या डोक्यावरच होता. त्याकरतां पेशवे घराण्याच्या इभ्रतीवर धाड घालणारी नाना आदिकरून मुत्सद्दी मंडळी बंड आहेत असें ठरवून, त्यांचें पारिपत्य करण्याकरतां राघोबादादांना नाइलाजानें इंग्रजांचा आश्रय घ्यावा लागला. यावेळीं आनंदीबाई धारच्या किल्ल्यावर कैदेंत होती. राघोबादादांनीं इंग्रजांच्या जबरदस्त व आत्मनाशाच्या अटी कबूल केल्या हें तिला आवडलें नाहीं. यामुळें पेशवे घराणें नामशेष होणार असें तिला वाटलें. नाना व सखारामबापू यांना पेशवेघराण्याचा अभिमान आहे असें तिला वाटत होतें, ह्मणून तिनें हें प्रकरण विकोपाला न जातां आपसातींत व्हावें या कल्पनेनें नाना व बापू यांस पृथक् पृथक् पत्रें पाठविलीं. त्यांतील मजकूर असा होता. "इंग्रज घरांत येऊं पाहतात. तमाम अंमल उठवून आपला बसवितात. आमचें निमित्त करून सर्व दौलतेसे गिव्हाईक होतील. सुजादौले व महमदअल्ली यांच्या घरांतून प्रथम चाकरीस येतों ह्मणून नम्रतेनें पायरव करून घेतली; आणि आतां उभयतांस पोटापुरतें देऊन सर्व दौलतीचे धनी झाले आहेत. या सर्व गोष्टी तुह्मांस ठाऊक आहेत. तसेंच आमच्या घरांत होईल." [1] अशा प्रकारें तिनें नानांस व बापूंस पत्रें लिहिलीं होतीं. परंतु त्यांना स्वार्थापुढें पेशवाई अगर पेशवे घराणें याची पर्वा वाटली नाहीं ह्मणून आनंदीबाईची ही सूचना त्यांना पसंत पडली नाहीं. हें पत्र व आनंदीबाईचीं दुसरीं कित्येक पत्रें चाळलीं असतां आनंदीबाई ही एक मोठी राजकारणी स्त्री होती असेंच ह्मणावें लागतें. परंतु तिच्या दुर्दैवानें आणि मुत्सद्यांच्या कुटिल कारस्थानानें तिच्या राजकारणाचा प्रभाव दिसावयाला संधि मिळाली नाहीं एवढें मात्र खरें. पेशवेघराण्यांत आनंदीबाईसारखी तेजस्वी, धीरवान्, स्वाभिमानी आणि राजकारणकुशल अशी दुसरी स्त्री झाली नाहीं.

११ राघोबादादांच्या मृत्यूनंतर सुमारें अकरा वर्षें आनंदीबाई जिवंत होती. हीं तिचीं अकरा वर्षें नानांच्या खडतर नजरकैदेंत गेलीं.

---

१ इतिहाससंग्रह-ऐतिहासिक टिपणें नं. १९ पान २८.

त्यांपैकीं तिचीं नऊ वर्षे कोपरगांवीं व शेवटचीं दोन वर्षे आनंदवल्लीस गेलीं. नानांनीं तिचेवर जे कारभारी नेमले होते, ते नानांच्या पूर्ण विश्वासांतील होते. त्यांनीं आनंदीबाईला एकादी सिंहीण समजून पिंजऱ्यांत कोंडल्याप्रमाणें ठेवली होती. राघोबादादा मेल्यानंतर तिचा आशावृक्ष पूर्णपणें करपून गेला. इतर राजकैद्यांप्रमाणेंच आनंदीबाईला शक्य तेवढया वाईट प्रकारानें नानांनीं वागविलें. आनंदीबाईच्या मानीं मनाला सतत चटके बसत राहतील इतक्या हीनबुद्धीची व नीचवृत्तीची वागणूक तिला मिळत गेली. राघोबादादांचा मेल्यावरही नानांनीं सूड घेतला. त्यांच्या अस्थि गंगेंत विसर्जन कराव्या अशी आनंदीबाईची फार इच्छा होती. परंतु नानांच्या कारभाऱ्यांनीं तसें केलें नाहीं. त्या कालीं सामान्य सरदारांच्याही अस्थि गंगेंत विसर्जन केल्या जात, पण तेवढासुद्धां मान किंवा आनंदीबाईच्या शब्दाला किंमत, नानांनीं दिली नाहीं. राघोबादादांच्या अस्थींचा मुद्दाम नानांकडून झालेला हा अपमान आनंदीबाईच्या अंतःकरणाला कायमचा झोंबला.

१२. सवाईमाधवराव हे जसे अल्पवयी, तसेच बाजीरावही अल्पवयी होते. दोघेही वयानें जवळ जवळ सारखेच होते. सवाईमाधवराव, राज्याचे मालक म्हणून व बाजीराव राजकैदी म्हणून दोघेही नानांच्याच देखरेखीखालीं होते. सवाईमाधवरावांच्या शिक्षणाकरतां, त्यांच्या करमणुकीकरतां, नानांनीं कशा डामडौलाची व्यवस्था केली होती, हें मागें आलेंच आहे. बाजीरावाच्या शिक्षणाबद्दल नानांनीं जाणून बुजून दुर्लक्ष केलें, एवढेंच नव्हे तर तो बालपणापासून दुर्गुणी, अशिक्षित कसा बनेल याबद्दलच त्यांनीं विशेष काळजी घेतल्याप्रमाणें दिसतें. बाजीरावाच्या शिक्षणाकरतां राघोपंत ठोसर यांची नेमणूक झाली होती. त्याचा दाब बाजीरावावर चांगला होता. त्याला नानांनींच नेमलें होतें. परंतु तो थोड्याच दिवसांत रजेवर पुण्यास गेला, तो पुन्हां परत आला नाहीं. त्याला पाठविण्याबद्दल आनंदीबाईनीं नानांना पुष्कळ वेळां लिहिलें.

परंतु त्यांनीं त्याची बिलकुल दाद घेतली नाहीं.[१] आनंदीबाईच्या कुणबिणी-मोलकरणी याही नानांच्या तंत्रानेंच नेमल्या जात. ठोसर पुण्यास गेल्यानंतर बाजीरावाच्या शिक्षणाचा विषय कुणबिणी-मोलकरणी हाच होता. त्यांचीही करमणुक बाजीरावामुळेंच होत असे. याचा परिणाम, बाजीरावाचें वय अवघें बारा वर्षांचे असून सुद्धां, त्याला गर्मी सारखा अत्यंत दुष्ट रोग लागण्यांत झाला. कृष्णाजी जनार्दन हा नानांचा आनंदीबाईकडील खास बातमीदार होता. तो नानांना लिहितो—"बाजीराव यास गर्मी झाली आहे. बायको थोर नाहीं हेच बाधा फार आहे, असें बाई (आनंदीबाई) बोलली."[१] आनंदीबाईनें बाजीरावाचा हा अर्वाच्यपणा बंद होण्याबद्दल प्रयत्न चालविला, त्या वेळीं आईची कोणत्याही प्रकारची भीड मुर्वत न ठेवतां तो तिला ह्मणाला "ती तुमची सवत आहे काय?" बारा वर्षांच्या वयांत बाजीराव एवढा धीट व एवढा बेमुर्वत बनतो याचा अर्थ 'बोलविता धनी वेगळाची' असाच होतो. बाजीरावाचें शिक्षण बंद करून ठोसर यांना पुण्यास नेणें, व कुणबिणी-मोलकरणी यांच्यासारख्या हीन वृत्तीच्या तरुण बायकांच्या पंजांत सांपडण्याची बाजीरावाला मोकळीक देणें, व प्रत्यक्ष नानांचा बातमीदार ही सर्व बातमी नानांना देत असूनही नानांनीं त्याचा कोणताच बंदोबस्त न करणें, यावरून बाजीरावानें दुर्व्यसनी-दुराचारी बनावें, अशीच नानांची खटपट चालू होती, असें विधान केल्यास तें अयोग्य ठरणार नाहीं. या बाबतींत प्रत्यक्ष आनंदीबाई या सर्वांचें खापर नानांच्याच डोक्यावर फोडते. ती ह्मणते 'मूल शहाणें होऊं नये असेंच साऱ्यांना वाटतें.' एकंदरींत ज्या मुलाच्या भावी उत्कर्षावर व कीर्तीवर नजर ठेऊन, आपलें दुःखमय जीवन कंठावयाचें, त्याच मुलाच्या तोंडचे अभद्र व उपमर्दकारक शब्द ऐकून कोणत्या मानी स्त्रीला जगावेंसें वाटेल? अशा प्रकारें गतवैभवाच्या दुःखाची कारागृहवासाच्या कष्टाची, सतत मानखंडणेच्या टोंचणीची आणि भावी आशा निर्मूलन करणाऱ्या पडताळ्याची वागणूक नानांकडून आनंदीबाईला पदोपदीं

१ आनंदीबाईची दिनचर्या पत्र नं ४१.

मिळत होती. ' तिच्याशीं अशा तऱ्हेनें वागण्यांतला नानांचा हेतु तिला कळत होता; आणि या सर्वांचा शेवट काय होणार याचीही तिला कल्पना [१] होती.' तरीही पण या संकटपरंपरेंतून मुलांना योग्य वळण व योग्य शिक्षण देण्याचें कर्तव्य आनंदीबाईनें केल्याशिवाय सोडलें नाहीं. कसें झालें तरी तें मातृ-हृदय होतें.

१३. आनंदीबाईची देवावर निष्ठा आणि धर्मावर श्रद्धा होती. कारागृहांत असतांना नेहमीं दानधर्म, व्रतें-वैकल्यें, मौन, उपोषणें, गोप्रदानें यांतच तिचा बहुतेक वेळ जाई. तिच्याजवळ धार्मिक ग्रंथांचा मोठा संग्रह होता. जी पोथी आपल्याजवळ नसेल त्याची प्रत त्या उतरून घेत असत. तिच्याजवळ महाभारताची व भागवताची पोथी संकलित असल्यामुळें पुण्याहून दुसरी मागावून त्याची प्रत करून घेण्याची इच्छा तिनें दर्शविली होती. [२] हीं आनंदीबाईचीं व्रत—वैकल्य, अनुष्ठानें वगैरे पाहून, ती चेटुक करीत असली पाहिजे असाही तिच्यावर राघोबादादाप्रमाणें आरोप करण्यांत येत होता या बाबतींत आनंदीबाई एकदां असें म्हणाली होती, ' कैदविमोचनाचा मंत्र आम्हांस ठाऊक आहे....पण करते कोण ? भावी चुकत नाहीं. [३] ' या तिच्या बोलण्यावरून नानांच्या पक्षाच्या लोकांनीं ती चेटुक करीत असली पाहिजे अशी चेतावणी लोकांस देण्यास सुरवात केली. याचा मुख्य उद्देश सवाईमाधवरावांस विशेषतः घाबरून सोडण्याचा होता. कधीं काळीं सवाई-माधवरावांवर जर जादुटोणा झाला तर तो आनंदीबाईकडून झाला असें दाखविण्याची ही पूर्व तयारी होती. नानांचा पक्ष पूर्वतयारी करण्यांत व त्याचा योग्य प्रसंगीं फायदा घेण्यांत पूर्ण पटाईत होता. आनंदीबाईच्या म्हणण्याचा भावार्थ स्पष्ट होता. ती कारागृहवासाला व तेथील सर्व प्रतिकूल परिस्थितीला इतकी कंटाळली होती कीं, 'कैदविमोचनाचा मंत्र ' म्हणजे त्या वेळीं तिला फक्त आत्महत्या करून घेणें एवढाच राहिला होता. परंतु या आत्महत्येनें

---

१ सह्याद्रि आगष्ट १९३८. आनंदीबाई पेशवे, पा. ६१५. २ आनंदीबाईची दिनचर्या पत्र नं. १८. ३ आनंदीबाईची दिनचर्या पत्र नं. ५५.

'भावी टळत नाहीं' या विवेकानें तिनें तो मंत्र जपला नाहीं. प्रतिपक्षाला आनंदीबाईच्या भावनेची काय कल्पना? तिच्या ह्मणण्याचा अर्थ नानांच्या पक्षाला जो फायदेशीर बनेल तोच लावण्यांत त्यांचें खरें पौरुष होतें. दुर्जनाच्या वाक्साम्राज्यांतील आरोपांतून आजपर्यंत कोणतीं सज्जन माणसें शीरसलामत सुटलीं आहेत?

१४. राघोबादादांनीं अमृतरावाला दत्तक घेतल्यानंतर आनंदीबाईला बाजीराव व चिमणाजी हे दोन मुलगे झाले. सामान्यतः औरस मुलगे झाल्या-नंतर दत्तक मुलावरील स्त्रियांची माया कमी होते. परंतु आनंदीबाईच्या बाबतींत तसें कोठेंच झालेलें दिसून येत नाहीं. ती पोटच्या मुलाप्रमाणेंच अमृतरावावर माया करीत होती. ही आनंदीबाईच्या मनाची थोर वृत्ति दृष्टिआड होण्यासारखी नाहीं. आनंदीबाईच्या निधनानें एकंदरींत एका हुशार, चाणाक्ष, राजकारणकुशल, सदाचारी, बाणेदार आणि वीरवृत्ति असलेल्या स्त्रीरत्नाला अखिल महाराष्ट्र पारखा झाला यांत संशय नाहीं.

प्रकरण २९ वें.

नानांचा खड्याच्या लढाईंतील अद्भूत पराक्रम ?

इ. स. १७९५.

१. खड्यांच्या लढाईची माहिती देण्यास सुरवात.—२ निजाम व पेशवे यांचे संबंध दाखविणारी पूर्व माहिती.—३ राघोबादादा व निजाम यांचे स्नेहसंबंध.—४ पेशवे व निजाम यांचेमधील राक्षसभुवनची लढाई व तह. —५ सखारामबापू व नाना हे राघोबादादांच्या विरुद्ध निजामाशीं स्नेह करतात. राघोबादादा निजामाचा पराभव करतात. उभयतांचा स्नेहभावाचा नवा तह होतो.—६ राघोबादादाबरोबर निजामानें केलेला नवीन तह खुंटीस टांगून तो नाना व बापू यांच्या बारभाई कारस्थानांत राघोबादादाविरुद्ध सामील होतो. —७ शिंद्यांच्या विरुद्ध नानांनीं निजामाकडे मदत मागितली, त्यावेळीं त्यानें बिनशर्त मदत केली नाहीं, हा निजामाबद्दलचा रोष नानांचे मनांत डांचत राहिला.—८ निजामावरील नानांच्या नवीन मोहिमेच्या कारणांची मीमांसा. —९ नानांच्या सैन्याची जमवाजमव कशी होती त्याचा तक्ता.—१० निजामावरील मोहिमेकरतां परशुरामभाऊ पटवर्धन यांस मुख्य सेनापती नेमण्यांत आलें. त्यास इतर पेशव्यांच्या सरदारांची कुरकुर.—११ या मोहिमेवर सवाईमाधवराव व नाना जातात. यांच्या सैन्याची रचना आघाडीस मुख्य सेनापती परशुरामभाऊ व पिछाडीस नाना फडनविस अशी विचित्र कां होती ? या मोहिमेचे खरे सूत्रधार नानाच होते.—१२ निजामाच्या सैन्याची तयारी कशी होती ? निजाम व पेशवे यांची पहिली सलामी.—१३ निजामाची व पेशव्यांची अनिर्णयात्मक चकमक. यांत पेशव्यांचे सेनापती परशुरामभाऊ जखमी होतात. निजामाचा लालखान पठाण सरदार मारला जातो. जिवबादादा बक्षी व भोंसले यांचे पराक्रम.—१४ निजामाचा जबरदस्त प्रतिकार. रात्रीच्या अंधारांत भुलभुलाईचे प्रकारामुळें निजामाचे सैन्यांत उडालेला गोंधळ व त्याची खड्यापर्यंतची पिछेहाट.—१५ निजाम खड्यांच्या किल्ल्यांत आश्रयाकरतां जातो. पेशव्यांची फौज किल्ल्यास वेढा देते. निजाम मेटाकुटीला येऊन तह करतो. निजाम व पेशवे यांचेमधील तहाचीं कलमें.—१६ तहाच्या कलमाप्रमाणें निजामाचा दिवाण मशीर उलमुलुख

पेशव्यांच्या स्वाधीन होतो.—१७ सवाईमाधवराव व मशीर उल्मुल्ख यांची भेट. या भेटीमुळें सवाईमाधवराव श्रमी होतात. श्रमी होण्याचें कारण काय असा प्रश्न नानांनीं विचारला असतां त्यांच्या अंत:करणावर वज्राघात होईल असें सवाईमाधवरावांचें उत्तर.—१८ खर्ड्याच्या लढाईंत जय मिळाला म्हणून पुण्यास केलेला विजयोत्सव. मशीर उल्मुल्खास पुण्यालाच बंदींत ठेवतात.—१९ खर्ड्याच्या लढाईत पराक्रम गाजविलेल्या सरदारांची नानांकडून संभावना. परशुरामभाऊ पटवर्धनांचा नानांच्याकडून विशेष सन्मान.—२० खर्ड्यांच्या लढाईच्या विजयामुळें सवाईमाधवराव दु:खी कां व नाना आनंदित कां यांतील गूढ रहस्य.

१. सवाईमाधवरावांच्या कारकीर्दींत आणि नानांच्या पेशवाईंतील एकसूत्री अमलाच्या अंमलदारींत, पेशवाईचें वैभव ज्या लढाईमुळें पराकोटीला गेलें, ती अद्भुतप्राय लढाई ह्मणजे खर्ड्याची लढाई होय. ही लढाई पुणें दरबाराचे अधिपती नाना फडनविस व निजाम यांच्यामध्यें इ. स. १७९५ मध्यें झाली. ही उभयतांमध्यें लढाई कां झाली याचीं कारणें निरनिराळें इतिहासकार निरनिराळीं देतात. तरी सत्य कशांत आहे हें येथें पहाणें जरूर आहे. तरी तें सत्य निवडण्याकरतां पेशवे व निजाम यांचे संबंध कसे कसे घडत आले, याचा त्रोटक वृत्तांत येथें देणें क्रमप्राप्त होत आहे.

२. बाळाजी विश्वनाथ पेशवे यांनीं पूर्वीं दिल्लीच्या बादशहांकडून दक्षिणच्या सहा सुभ्यांच्या चौथ सरदेशमुखीच्या सनदा मिळविल्या होत्या व त्या सनदांच्या जोरावर मराठे निजामाच्या राज्यांतून या हक्कांचा वसूल घेत आलेले होते. हे हक्क देण्याला निजाम नेहमींच नाखूष होता; परंतु मराठे आपल्या सामर्थ्याच्या जोरावर ते सक्तीनें वसूल करीत आले. पुढें अशाच कारणांकरतां सदाशिवरावभाऊ यांना इ. स. १७६० मध्यें निजामाबरोबर उदगीरचा संग्राम करावा लागला व त्यांत भाऊंनीं निजामाचा पूर्ण मोड केला. त्या वेळीं पेशवे व निजाम यांच्यांत तह झाला. या तहामुळें पेशव्यांना बऱ्हाणपूर, सालेर, मालेर, दौलताबाद, अहमदनगर वगैरे सहा किल्ले व बासष्ट लक्ष उत्पन्नाचा मुलुख निजामाकडून मिळाला.

३. इ. स. १७६२ मध्यें राघोबादादा व माधवराव पेशवे यांच्यामध्यें बेबनाव उत्पन्न झाला. त्या वेळीं दादासाहेब औरंगाबादेस आले. त्या ठिकाणीं निजामाचा सरदार मुरादखान हा अधिकारी होता. त्यानें त्यांचा मोठा सन्मान करून त्यांच्या मदतीस आपली फौज दिली. स्वतः निजामही माधवराव पेशव्यांविरुद्ध दादासाहेबांस मदत करण्याकरतां आपली फौज घेऊन निघाला. या निजामाच्या मदतीवर राघोबादादांनीं माधवराव पेशवे यांचा घोडनदीच्या लढाईंत पराभव केला. या मदतीमुळें माधवराव पेशवे दादांच्या इस्तगत झाले.

४. इ. स. १७६३ मध्यें पेशवे व निजाम यांच्यामध्यें राक्षसभुवनाची लढाई झाली. घोडनदीच्या लढाईंतील माधवरावांचे पक्षाचे सरदार गोपाळराव पटवर्धन, धनाजी जाधवाचा नातू रामचंद्र जाधव वगैरे सरदार निजामाकडे जाऊन त्याची नोकरी पतकरून राहिले होते. निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर हा मोठा राजकारणी मुत्सद्दी होता. पेशव्यांचे मोठमोठे सरदार आपसातींत दुफळी होऊन आपल्या नोकरींत आल्यामुळें, उदगीरच्या लढाईंत निजामाच्या झालेल्या पराभवाचें उलटें काढण्याचा त्यानें संकल्प केला. त्याप्रमाणें अखेर राक्षसभुवनाची लढाई झाली. पण त्यांत विठ्ठल सुंदर मारला गेला व निजामाचा पूर्ण मोड झाला. रीतीप्रमाणें निजामानें खंडणी व मुलूख देऊन पेशव्यांशीं नवा तह केला.

५. या तहानंतर नारायणरावांच्या मृत्यूपर्यंत निजामानें कांहीं गडबड केली नाहीं. पुढें बारभाईच्या कारस्थानाला सुरवात झाली. त्या वेळीं राघोबादादांचा पक्ष मोडून काढण्याकरतां नाना व बापू यांनीं निजामास आपल्या पक्षाकडे ओढून घेण्याचा प्रयत्न चालविला. त्या वेळीं मुधोजी भोंसले व साबाजी भोंसले यांच्यामध्यें संग्राम चालू होता. मुधोजीस राघोबादादांचें पाठबळ होतें आणि साबाजीस नाना, बापू वगैरे बारभाईंची मदत होती. त्याकरतां नाना व बापू यांनीं आपलें वजन खर्च करून निजामास साबाजीला मदत करण्यास भाग पाडलें. त्यामुळें निजामास दादासाहेबांचा

पक्ष सोडून बारभाईंचा पक्ष धरावा लागला. पुढें बारभाईंचें कारस्थान राघोबादादा पुण्यास असेपर्यंत रंगारूपाला येणार नाहीं ह्मणून, त्यांना कोणत्या तरी मोहिमेवर काढण्याचा बारभाईंनीं मनसुबा चालविला. त्यांच्या संकेताप्रमाणें निजामानें आपल्या राज्यांत पेशव्यांचा अंमल असलेलीं जीं ठाणीं होतीं, तीं तावडतोब उठवून लावलीं. हें दादासाहेबांस समजतांच ते निजामाचें पारिपत्य करण्याकरतां स्वारीस निघाले. त्यांनीं बेदरच्या लढाईंत निजामाचा पूर्णपणें मोड केला. त्या वेळीं निजामाचा रुकनुद्दौला हा दिवाण होता; त्यास निजामानें तह करण्याकरतां त्यांचेकडे पाठविलें. दिवाणानें आपला शिक्का मोर्तब दादासाहेबांच्यापुढें ठेविला, आणि सांगितलें कीं, तहाच्या वाटतील त्या अटी घाला, तुह्मांला पाहिजे तेवढ्या मुलखाच्या सनदा घ्या, त्या आह्मांला मान्य आहेत. राघोबादादांनीं निजाम एवढा मेटाकुटीला येऊन शरण आला असतां, नवीन तहामुळें पूर्वीचे स्नेहसंबंध दुरावूं नयेत या दृष्टीनें आपल्या वीरवृत्तीला साजेल असाच तह केला. निजामानें स्वतः दादासाहेबांच्या भेटीस यावें, व साबाजी भोंसले यास आश्रय देऊं नये एवढींच कलमें त्यांत मुख्य होतीं.

६. अशा प्रकारें स्नेहभावानें निजामाबरोबर तह करून दादासाहेब कर्नाटकाच्या स्वारीवर गेले. जातांना त्यांनीं साबाजीचा बंदोबस्त करण्याकरतां त्रिंबकरावमामा यांस रवाना केलें. पुढें बारभाईंच्या कारस्थानाला जोर चढला. गंगाबाई गरोदर असल्याचें निश्चित समजलें. त्यामुळें बारभाईंच्या कारस्थानाला बरेच सरदार दादासाहेबांविरुद्ध अनुकूल होऊं लागले. त्यांतच निजामाला नाना व बापू यांनीं ओढलें. राघोबादादांबरोबर नुकताच झालेला स्नेहभावाचा तह निजामानें खुंटीला टांगला आणि आपल्या नीतिमत्तेला व आपल्या थोरपणाला लाथ मारून केवळ नाना व बापू यांच्या स्नेहाकरतां बारभाईंच्या कारस्थानांत त्यानें प्रवेश केला. त्रिंबकरावमामाही बारभाईंच्या कटांत सामील झाल्यामुळें साबाजीचा बंदोबस्त न होतां साबाजी, त्रिंबकरावमामा व निजाम एकत्र होऊन राघोबादादांच्या पारिपत्याकरतां युद्धाच्या आखाड्यांत उतरले. निजा-

माला आपल्या लगामीं आणण्याकरतां बारभाईंना अनंत प्रयत्न करावे लागले. पहिल्या खेपेस तेरा लक्ष उत्पन्नाचा मुलूख द्यावा लागला. दुसऱ्या खेपेस अठरा लक्ष उत्पन्नाचा मुलुख व दरकूच एक लक्ष रुपये याप्रमाणें देऊन शिवाय हरिपंतासारख्या सेनापतीला त्याचें सतत लांगूलचालन करीत रहावें लागलें. याप्रमाणें नानांनीं निजामास आपल्या पक्षांत ओढून घेतल्या-मुळें रावेबादादांचा पक्ष हलका झाला व अखेर त्यांची गठडी बळण्यास नानांना त्याची मदत झाली. ही हकीकत इ. स. १७७४ मध्यें झाली.

७. याप्रमाणें निजाम व नाना यांचें पुढें सुमारें वीस वर्षें गुण्यागोविं-दानें राजकारणांतील संबंध चालले. पुढें इ. स. १७९३ मध्यें महादजी शिंदे ज्या वेळीं पुण्यास फौजबंद आले, त्या वेळीं त्यांस तोंड देण्याची नानांनीं तयारी चालविली. निजामासही पाचारण करण्याकरतां हरिपंतास पाठविलें. त्यावेळीं निजामाचा दिवाण मशीर उल्मुल्ख यानें नानांस शिंद्यांविरुद्ध मदत करण्याचें कबूल केलें. परंतु नानांनीं या मदतीदाखल बेदर सुभ्याचा चौथाईवरील मराठ्यांचा हक्क सोडावा अशी त्यानें मागणी केली. नानांनीं ही मागणी मान्य केली नाहीं. अर्थात् निजामानें नानांस मदत केली नाहीं. या वेळीं निजामानें नानांस जर बिनशर्त मदत केली असती, तर पुण्यास येण्याचे अगोदरच शिंद्यांची गठडी वळली असती. परंतु निजामानें मदत न केल्यामुळें महादजी शिंदे पुण्यास आले व त्यामुळें नानांचीच गठडी वळते कीं काय असा प्रसंग नानांवर आला. शिंदे पुण्यास आल्यामुळें नानांचीं अनेक कारस्थानें बाहेर पडलीं. त्यांना कित्येक वेळां स्वतःची मान-खंडणा सोसावी लागली व स्वतःची पगडी शीरसलामत ठेवण्याकरतां अनंत कारस्थानें रचून परिश्रम करावे लागले. या सर्व गोष्टींना जर कोणी जबाब-दार असेल तर तो निजाम आहे, असेंच नानांना वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. नानांचा स्वभाव, कोणतीही गोष्ट बोलून दाखवावयाची नाहीं, ती पोटांत ठेवून योग्य वेळीं त्याचा सूड घ्यावयाचा, असा असल्यामुळें निजा-मानें बिनशर्त मदत न केल्याबद्दल सूड उगवण्याकरतां निजामावर स्वारी

करण्याचा नानांनीं घाट घातला. या वेळीं नानांचे प्रतिस्पर्धी महादजी शिंदे मरण पावले होते. त्यामुळें नाना हेच एकटे पेशवाईचे कुलमुखत्यार झाल्यामुळें त्यांना या वेळीं निजामाची कोणत्याच मदतीची जरूरी नव्हती. 'गरज सरो आणि वैद्य मरो' ही म्हण स्वानुभवानें नानांना पूर्णपणें आवडलेली होती.

८. नानांना निजामावर स्वारी करण्याचीं काय काय कारणें घडलीं हें पहातां चौथ व सरदेशमुखीच्या हक्काबाबत आज बरींच वर्षें बाकी तुंबून ती दोन कोटी साठ लक्ष झाली तरी निजाम निरनिराळीं कारणें सांगून चालढकल करूं लागला होता. म्हणून या बाकी वसूलीकरतां ही स्वारीची तयारी होती असें दिसून येतें. परंतु हेंच जर एक कारण असतें तर तेवढ्याकरतां आजपर्यंतचा स्नेह तोडून पेशव्यांबरोबर शत्रुत्व जोडण्याला निजाम तयार झाला नसता. त्यांत कांहीं तरी उभयपक्षीं तडजोड निघूं शकली असती. परंतु त्यांत कांहीं गोम होती म्हणूनच परस्परांतील तहाच्या वाटाघाटी फिसकटल्या असें दिसतें. या बाबतींत दिवाण मशीर उल्मुल्ख यानें निजामास असें सांगितलें कीं, 'मराठे तीस लक्षांची जहागीर व तीन कोट रुपये मागतात. एवढी रक्कम देऊन त्यांची मर्जी संपादन करण्यापेक्षां त्या पैशाच्या जोरावर फौज उभी करून नशीबाची परीक्षा कां पाहूं नये?'[1] यावरून दुसरा पक्ष असा दिसतो कीं, नानांची फक्त चौथ सरदेशमुखीच्या हक्काच्या बाकीपुरतीच मागणी नसून राघोबादादांचें पारिपत्य करण्याबाबत निजामाची जी मदत घेतली व त्या मदतीकरतां नानाकडून निजामानें जो तीस लक्ष उत्पन्नाचा मुलूख मिळविला होता तो त्याला नाना या वेळीं ओकावयाला लावणार होते. महादजी शिंद्यांच्या प्रकरणीं निजामानें नानांना मदत केली नाहीं त्याचा सूड उगविण्याकरतां लढाई देण्याला कांहीं तरी निमित्त दाखवावें म्हणून नानांनीं हा बाकी वसूलीच्या निमित्ताचा केवळ फार्स केला होता, हे स्पष्ट दिसून येतें. या वेळीं टिपूवरील मोहीम संपली होती. इंग्रज निजामाचा पक्ष धरणार नाहींत, ही नानांना उमेद आली होती. अशा-

---

१ नाना फडनविस यांचें चरित्र पा. १५६.

वेळीं एकट्या निजामाला कोंडींत धरण्याला योग्य संधि पाहून नानांनीं त्याच्यावरील मोहिमेची जय्यत तयारी चालविली.

९. या लढाईकरतां कोण कोण सरदार होते व कोणाजवळ किती सैन्य होतें याची कल्पना खालील तक्त्यावरून येईल.[१]

सरदार	स्वार	पायदळ	तोफा	पेंढारी.
शिंदे	३००००	१२०००	९८	१००००
पेशव्यांची पागा व खास पागा	९०००	१५०००	४४	०
,, नवीन फौज.	८०००	०	०	०
होळकर	५०००	३०००	३५	०
नागपूरकर भोंसले.	१२०००	६०००	१५	०
पटवर्धन सरदार	३०००	२०००	०	०
बाबा फडके	१०००	०	०	०
हुजुरातीची फौज	५०००	०	०	०
नाना फडनविस	२०००	०	०	०
गायकवाड, पाटणकर घाटगे, निंबाळकर, थोरात, डफळे, पवार जाधवराव, दरेकर इ०	८०००	०	०	०
	८३०००	३८०००	१९२	१००००

१० याप्रमाणें निजामावरील स्वारीकरतां सैन्याची जमवाजमव झाली. परंतु या सेनेचे मुख्य सेनापती कोणाला नेमावें या बाबतींत बरीच भवति न भवति होऊन शेवटीं नानांनीं आपल्या पसंतीप्रमाणें परशुरामभाऊ पटवर्धन यांस मुख्य सेनापतीचे अधिकार दिले. परशुरामभाऊ यांस हें पद दिल्याबद्दल मोठमोठ्या फौजबंद सरदारांत कुरकुर माजली. परंतु स्वतः

१ जिवबादादा बक्षी यांचें चरित्र पा. १८७.

नानांनीं सर्वांची समजाविशी केली. या मोहिमेवर स्वतः सवाईमाधवराव व नाना हेही जाणेचें निश्चित झालें.

११. याप्रमाणें तयारी झाल्यानंतर श्रीमंत सवाईमाधवराव पेशवे या मोहिमेकरतां शहराबाहेर गारपिरानजीक मार्गशीर्ष शुद्ध ८ शके १७१६ रविवारीं प्रातःकाळचे दहा घटिकांचे सुमारास सुमुहूर्तावर येऊन डेऱ्यांत दाखल झाले. नंतर तेथून थेऊर, कोलवडी, दाहिठण, पारगांव, मांडवगण, घोडनदी, आडळगांव, सांगवी, फकिराबाद धानोरे वगैरे ठिकाणीं स्वारी मुक्काम करीत करीत चालली. या स्वारीबरोबर फार मोठें सैन्य असल्यामुळें परशुरामभाऊंनीं त्याच्या निरनिराळ्या तुकड्या केल्या. या निरनिराळ्या तुकड्या करण्याचें कारण असें होतें कीं एकत्रित सैन्य मेल्यामुळें मार्गांत धान्य, घासदाणा वगैरेचा तुटवडा पडतो तो पडूं नये. या तुकड्या दोन चार कोसांच्या अंतरानें जात होत्या. आघाडीस परशुरामभाऊ व होळकर आणि पिछाडीस बाबा फडके याच्या हाताखालील हुजुरातीच्या सैन्यासह सवाईमाधवराव व नाना फडनविस व मध्य भागीं बाकीचे सैन्य अशी सैन्याची रचना करण्यांत आली होती. कोणत्याही लढाईंत आघाडी व पिछाडी विश्वासाच्या सैन्याची व सरदारांची असावी लागते. तेवढी दक्षता या लढाईंत नानांनीं घेण्यास लावली होती. ही दक्षता नानांची होती असें ह्मणण्याचें कारण एवढेंच कीं मुख्य सेनापती परशुरामभाऊ हे आघाडीस होते, यावरून दिसून येतें. सैन्याची रचना चालविणारा सेनापती पिछाडीस राहून लढाईंचीं सूत्रें हालवितो. परंतु या लढाईंत ज्या अर्थीं परशुरामभाऊ आघाडीस होते, त्याअर्थीं सैन्य रचनेचे खरे सूत्रचालक नानाच होते असें स्पष्ट दिसतें.

१२. मराठ्यांचें लष्कर पुण्याहून निघण्यापूर्वींच निजाम आपल्या सैन्यासह बेदराहून निघाला होता. मराठ्यांचें सैन्य निघाल्याचें वर्तमान त्याला समजल्याबरोबर त्यानें आपल्या स्वारीचा रोख मांजरा नदीच्या कांठाकांठानें हळूं हळूं मराठ्यांच्या मुलुखाकडे चालविला. खर्ड्यास यावें या उद्देशानें

फौजेसह मोहरीच्या घाटांतून उतरून खर नदीच्या कांठीं तळसंगी गांवीं मराठ्यांच्या लष्करापासून सुमोरें तीन कोसांवर त्यानें येऊन तेथें तळ दिला. यावेळीं निजामाच्या सैन्यांत रावरंभा, सादतखान, लालखान, सुभानखान इत्यादि नामांकित हिंदु-मुसलमान सरदार होते. त्या शिवाय मॉसे रेमांड नांवाच्या फ्रेंच सरदाराकडून निजामानें बरीच कवायती फौज तयारी केली होती तीही त्यानें बरोबर घेतली होती. या वेळीं निजामाबरोबर तोफखानाही चांगल्या प्रतीचा होता. यावेळीं निजामाचें सैन्य पेशव्यांचे सैन्याइतकेंच सुमोरें दीड लाख होतें. निजामाचा मुक्काम नजीक आल्याचें समजल्यावरून परशुरामभाऊंनीं दौलतराव शिंदे, व दुसरे कित्येक सरदार व शिलेदार यांस फौज व बुणगेसुद्धां श्रीमंताजवळ ठेविलें व बाबा फडके, जिवबादादा बक्षी, होळकर, भोंसले, चिंतामणराव आपा पटवर्धन यांस समागमें घेऊन निवडक सड्या सैन्यासह ते स्वतः निजामाच्या तोंडावर गेले. नंतर उभयपक्षीं पहिल्यानें गोळागोळी सुरू झाली. त्या प्रसंगीं पेशव्यांच्या हुजुरातीचे अधिकारी बाबा फडके यांनीं शत्रूवर एकाएकीं हल्ला केला. पण घाई फारच केल्यामुळें त्यांचा इरादा सफल न होतां त्यांना माघार घ्यावी लागली. ही पहिल्या दिवसाची झटापट झाल्यानंतर उभयपक्षाच्या फौजा मुक्कामीं परत गेल्या. त्या रात्रीं जिवबादादा बक्षी पिंपळगांवीं; परशुरामभाऊ, बाबा फडके व चिंतामणराव आप्पा घोडेगांवीं, आणि होळकर व भोंसले वाघेगांवीं असे चार चार कोसांच्या टप्यानें मुक्कामास जाऊन राहिले.

१३. पुढें निजाम आपला तळसंगीचा तळ सोडून वाकीगांव येथें गेल्याची बातमी भाऊंना लागली. त्यामुळें ते कांही फौज व सरदार घेऊन त्यांचेवर चालून गेले. त्यांनीं निजामाच्या बुणग्यांवर गोळीबार केला. परंतु त्यापासून निजामाची विशेष अशी कांहीं नुकसानी झाली नाहीं. पुढें निजाम मराठ्यांच्या रोखानें कूच करून जाऊं लागल्याची बातमी आली. तेव्हां अशा प्रकारें निजाम बगल देऊन मागें हटूं लाग-

त्यास लढाई लांबेल अशी भीति भाऊंना उत्पन्न झाली, ह्मणून ती टाळण्याकरतां भाऊंनीं प्रयत्न चालविले. त्याप्रमाणें तरडगांव रानांत टेकडी आहे व ती शत्रूवर मारा करण्यास सोईस्कर आहे असें पाहून, भाऊंनीं आपल्या सैन्याची तांतडीनें तेथें आघाडी तयार केली. निजाम आपल्या सैन्यासह मराठ्यांकडे जात असतांना, त्याला ही मराठ्यांची आघाडी दिसून आली. तेव्हां निजामअल्लीनें आपला हत्ती तेथेंच उभा केला व त्यानें आसतखान नांवाच्या आपल्या सरदाराच्या हाताखालीं सत्रा हजार पल्टणी फौज देऊन त्याला तात्काळ मराठ्यांवर हल्ला करावयास सांगितलें. भाऊंनीं आपल्या नवीन आघाडीची व्यवस्था लाविली व टेंकडी उतरून ते उजव्या अंगास आपल्या सैन्याकडे आले व शत्रू कोणत्या दिशेनें चालला आहे याचें निरीक्षण करतात तोंच निजामाकडील लालखान नांवाचा पठाण सरदार आपल्या सात हजार पठाण सैन्यासह आपल्यावर चालून येत असलेला त्यांना दिसला. लगेच टेंकडीच्या उजव्या अंगास पठाणांचें व भाऊंचे युद्ध जुंपलें. लालखान मोठा शूर योद्धा होता. तो भाऊंच्या सैन्यावर तुटून पडला. त्यानें भाऊंचे पुष्कळ लोक ठार केले. नंतर त्याची व भाऊंची चकमक सुरू झाली. खानानें भाऊंच्या कपाळावर दोन सपाट्यानें वार केले. त्यामुळें भाऊ घोड्यावरून खालीं पडले. लालखान भाऊंवर तिसरा वार करणार, इतक्यांत भाऊंचा द्वितीय पुत्र हरिपंतबाबा यांनीं त्याच्यावर चाल करून एका सपाट्यासरशीं खानाचें शीर उडविलें. लालखान जरी मरून पडला तरी त्याचे शूर शिपाई लढतच होते. या झटापटींत भाऊंच्या चुलतभावाचे पुत्र विठलराव हे गोळी लागून तेथेंच ठार झाले. या लालखानाच्या सैन्यांत कर्नूलच्या नबाबाचा मुलगा व इलिचपूरच्या नबाबाचा मुलगा हे दोघे तरुण सरदार होते. त्यांनीं या संग्रामांत शौर्याची शिकस्त केली. परशुरामभाऊ जखमी झाले तरी मराठ्यांचें सैन्य त्वेषानें लढतच होतें. इतक्यांत निजामाची पठाणांना जास्त कुमक येऊन पोंचली. त्यामुळें मराठ्यांचें पाऊल मागें पडूं लागलें. त्या समयीं पेशव्यांच्या हुजुरातीचा अधिकारी बाबा फडके

हाही जरीपटका घेऊन परत फिरण्याच्या बेतांत होता. इतक्यांत जिवबादादा बक्षी तेथें आले. त्यांनीं त्यांस धीर दिला. थोड्याच वेळांत पेशव्यांचें दुसरें सैन्य येऊन लढाईंत सामील झालें. निजामाचें सैन्य तरडगांवचे रानांत रणटेंकडीवर दबा धरून बसलें होतें. त्यावर जिवबादादा बक्षी यांचे सैन्यानें तोफखाना चालविला. त्यामुळें लढाईला पुन्हां जोर चढला. निजामानें आपल्या स्वारांची तुकडी मराठ्यांवर पाठविली. त्या घोडेस्वार तुकडीनें मराठयांवर निकराचा हल्ला चढविला. परंतु त्या प्रसंगीं एका बाजूनें नागपूरकर भोंसले यांच्या सैन्यांतील तिरंदाज पलटणीनें या घोडेस्वारांवर बाणांचा वर्षाव सुरू केला. भाऊंच्या सैन्यांतून दुसऱ्या बाजूनें बंदूकीच्या गोळ्यांचा पाऊस पडूं लागला. तिसऱ्या बाजूनें जिवबादादा बक्षी यांच्या तोफेचे गोळे यांचेवर येऊन पडूं लागले. त्यामुळें या निजामाच्या घोडेस्वारांतील कित्येक लोक जेथच्या तेथेंच मेले. कित्येक जखमी झाले व बाकीचे तोंड फिरवून मागें पळूं लागले. निजामाचा तोफखाना ज्या ठिकाणीं होता, त्या ठिकाणीं पानशे यांनीं आपली गोलंदाजी सुरू केली. त्यामुळें निजामाचा तोफखाना बंद पडला. निजामाच्या सैन्याचा मागें पाय पडूं लागला, असें पाहून मराठयांस अधिकच स्फुरण चढलें. ते शत्रूच्या आंगावर चढून जाऊन निकराचा सामना देऊं लागले. इतक्यांत निजामाकडील रावरंभा, भारमल्ल, सुभानखां असे मोठमोठे नामांकित सरदार व रेमंडच्या हाताखालीं कवाईत शिकून तयार झालेलीं पलटणें पुढें सरसावलीं व त्यांनीं मराठयांच्या सेनेबरोबर दोन तासपर्यंत निकराची लढाई दिली. ही लढाई उभयपक्षीं शिकस्तीची अशी झाली. पुढें अंधार पडूं लागल्यामुळें व उभय पक्षांतील लोक सर्व दिवसाच्या लढाईमुळें थकले असल्यामुळें जागोजागीं तळ ठोकून विश्रांतीकरतां राहिले. या दिवसाच्या लढाईमुळें यशाचें पारडें कोणाकडे झुकणार याचा कोणालाच कांहीं अंदाज करतां येण्यासारखा नव्हता.

१४. वरीलप्रमाणें लढाई बंद होऊन जिकडे तिकडे स्वस्थता झाल्यानंतर मराठयांच्या सैन्यापैकीं एक घोडेस्वारांची टोळी घोड्यांना पाणी पाज-

विण्याकरतां नाल्याचा शोध करीत फिरत होती. ती फिरतां फिरतां एका नाल्याच्या जवळ आली. त्याच ठिकाणीं कर्मधर्मसंयोगानें निजामाच्या सैन्यांतील एक टोळी विश्रांतीकरतां उतरली होती. रात्रीची वेळ असल्यामुळें कोण कोणत्या उद्देशानें येत आहे याची कोणालाच कांहीं कल्पना करतां आली नाहीं. त्यामुळें निजामाच्या लोकांनीं त्यांच्यावर बार काढले. निजामाचे लोक जवळपास ठिकठिकाणीं तळ देऊन विश्रांति घेत पडले असतां त्या लोकांना हे बंदुकीचे बार ऐकूं आले. ते बार ऐकून पलटणीचे पहारेकरी ठिकठिकाणीं पहाऱ्यावर होते त्यांनीं बार काढण्यास सुरवात केली. त्याबरोबर पलटणींतील लोक जागे झाले आणि घाबऱ्या घाबऱ्या त्यांनींही बंदुकांचा भडिमार सुरू केला. रात्रीची वेळ असल्यामुळें व अचानक ही शत्रूच्या सैन्याची हूल उठल्यामुळें शत्रू कोण व मित्र कोण याची कोणालाच स्मृति राहिली नाहीं. ही भुलभुलाईची लढाई आपसांत सुरू झाल्यामुळें खरा प्रकार काय आहे हें समजून न घेतां निजामाचे लोक रस्ता सांपडेल तिकडे सैरावैरां पळून गेले. नंतर चंद्रोदय झाला तेव्हां आपल्या सैन्याची कशा प्रकारें वाताहत झाली हें निजामाला दिसून आलें. त्याच्या अफाट सैन्यापैकीं त्या वेळीं सुमारें दहावा हिस्सा सैन्य जागेवर राहिलेलें पाहून तो निराश झाला. त्यानें राहिलेल्या सैन्यासह खर्ड्याच्या किल्ल्याकडे आपला मोर्चा वळविला. व त्यानें त्या किल्ल्याजवळ येऊन आपला तळ दिला.

१५. सूर्योदयानंतर मराठ्यांचें सैन्य निजामाबरोबर सामना देण्याकरतां युद्ध क्षेत्राकडे जाऊं लागलें. परंतु निजामाच्या तळावर जिकडे तिकडे तोफा पडलेल्या व नाना प्रकारचें युद्ध साहित्य इतस्ततः अस्ताव्यस्त पडलेलें त्यांच्या नजरेला पडलें. हें पाहून सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें. निजाम आपल्या सैन्यासह रातोरात कोठें तरी निघून गेला असावा असें त्यांनीं अनुमान केलें. पुढें पेशव्यांचें सैन्य खर्ड्याच्या दिशेनें चाललें, त्यावेळीं निजामाचें थोडेसें सैन्य त्यांच्या दृष्टीला पडलें व

निजामही खर्ड्याच्या किल्ल्याचा आश्रय धरून बसल्याचें वर्तमान समजलें. तेव्हां पेशव्यांच्या सैन्यानें खर्ड्यास वेढा घालण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें त्यांनीं लगेच आपल्या सैन्याची रचना केली. जिवबादादा बक्षी घोडेगांवांत, नागपूरकर भोंसले आणि होळकर चिंचपुरांत; परशुराम-भाऊ, चिंतामणराव आप्पा, बाबा फडके व पागे पथकें बोरलेगांवांत, नाना फडनविस व सवाई माधवराव हे रत्नापुरांत अशा प्रकारें खर्ड्यास वेढा घालून पुढील सामना देण्याच्या तयारीला लागले. खर्ड्यास अशा प्रकारें वेढा पडल्यानंतर निजामाची रसद बंद झाली. सैन्यास लागणाऱ्या बाहेरच्या पाण्याचा तुटवडा पडला. जागोजागीं मराठ्यांनीं मोर्चे उभे करून व तोफा लावून किल्ल्यावर व किल्ल्याभोंवतीं मारगिरी सुरू केली. याप्रमाणें निजामास त्राहि भगवन् करून सोडल्यामुळें दोन तीन दिवसांतच तो मेटाकुटीला आला व त्यानें पेशव्यांबरोबर तहाचें बोलणें लाविलें. ही हकीकत ता. १५ मार्च सन १७९५ रोजीं घडली.[१] निजाम शरण आल्यानें पेशव्यांनीं त्याच्याबरोबर तह केला. त्यांतील प्रमुख कलमें खालीं दिल्याप्रमाणें होतीं—

(१) पूर्वी सदाशिवरावभाऊसाहेबांनीं उदगीरच्या लढाईत मुलूख जिंकला होता, त्यापैकीं परांड्यापासून तहत तापीपर्यंतचा जितका मुलूख गेल्या पस्तीस वर्षांत निजामास परत देण्यांत आला असेल, तो सर्व त्यानें पेशव्यांस परत द्यावा.

(२) गंगथडीमध्यें घासदाण्याचा भोंसल्यांचा हक्क आहे, त्याबद्दल भोंसल्यांस निजामानें तीन लक्ष अठरा हजार रुपये उत्पन्नाचा मुलूख निराळा तोडून द्यावा. भोंसल्यांची वऱ्हाडच्या वांटणीपैकीं बाकी तुंबली आहे, तीबद्दल निजामानें त्यांस एकोणतीस लक्ष रुपये द्यावे; व पुढें वऱ्हाडांत भोंसल्यांचा अंमल मामूल वहिवाटीप्रमाणें सुरळीत चालूं द्यावा.

---

१ परशुरामपंतभाऊ पटवर्धन यांचें चरित्र पा. ९१.

(३) चौथ सरदेशमुखीच्या बाकीबद्दल निजामानें पेशव्यांस तीन कोट रुपये द्यावे.

(४) निजामानें आपला दिवाण मशीर उलमुल्ख यास पेशव्यांच्या हवालीं करावें.

१६. या तहाच्या अटीपैकीं पहिल्या तीन अटी निजामानें मान्य केल्या परंतु आपल्या दिवाणास मराठयांच्या स्वाधीन करण्याचें त्याच्या जिवावर आलें. तेव्हां अशा संकटसमयीं मशीर उल्मुल्ख निजामास ह्मणाला कीं, 'मला मराठयांच्या स्वाधीन करण्यांत अगदीं श्रमी होऊं नये, मी त्यास राजी आहे.' याप्रमाणें पेशवे व निजाम यांमध्यें तह झाला.

१७. अशा प्रकारें तह झाल्यावर मशीरउल्मुल्खास नेण्याकरतां पेशव्यांकडून दोनशें स्वार पाठविण्यांत आले. तेव्हां त्यांच्या स्वाधीन निजामानें त्यास केलें. मशीरउल्मुल्ख ज्या वेळीं पेशव्यांच्या लष्करांत आला, तेव्हां सवाईमाधवराव मोठया समारंभानें त्याला सामोरें गेले व त्याचा बहुमानानें सत्कार केला. सवाईमाधवरावांची व मशीरउल्मुल्खाची ज्या वेळीं भेट झाली, त्या वेळीं त्यांचें मुख म्लान झालें होतें. तें पाहून नानांनीं श्रीमंतांस विचारलें 'आपणास त्याचे (मशीरउल्मुल्खाचे) भेटीसमयीं श्रम होण्याचें कारण काय?' त्यावर त्यांनीं उत्तर दिलें, 'मोंगलांनीं भित्रेपणानें आपली एवढी अमर्यादा करून घेतली, आणि आमचे लोक यत्नांवांचून जय पावले असतां आपणांस आपणच विजयी असें मानितात, तस्मात् या समयीं उभयपक्षींचे पुरुष अप्रयोजक पाहून माझें मन फार खिन्न झालें.'[१] हें खुद्द पेशव्यांचें उत्तर ऐकून त्या विजयोत्सवाच्या आनंदाच्या भरांत भरारी मारीत असलेल्या नानांच्या मनावर वज्राघात झाला किंवा सूडाचे वज्र निर्माण झालें, याची कल्पना कल्पनेनेंच केलली बरी. कांहींही असो! पेशवे जरी खिन्न, श्रमी होते, तरी पेशव्यांच्या लष्करांत जिकडे तिकडे आनंदाचा महोत्सव

१ इफकृत मराठ्यांची बखर पान ३१५.

चालू होता. ज्याला वाटेल त्याप्रमाणें तो आपल्याबद्दल आपली पाठ थोपटून घेऊन आपले गोडवे गाऊं लागला.

१८. खर्ड्याच्या लढाईंतील विजयोत्सवाच्या आनंदांत पेशव्यांचें सैन्य रमत रमत व मौजेची मजल दर मजल घेत घेत पुण्यास येऊन दाखल झालें. पेशवे सरकार विजयी होऊन पुण्यास आलें ह्मणून त्यांचा नगरप्रवेश मोठया समारंभानें करणेचा ठरला. नगरप्रवेशाचा सुमुहूर्त वैशाख शु॥ १३ भृगुवारीं तारीख २ मे सन १७७५ रोजीं पूर्व रात्रीचा ठरविण्यांत आला. 'त्या दिवशीं सर्व पुणें शहर महानंदांत दंग होऊन गेलें होतें. सर्व शहर श्रृंगारलें होतें. जागेजागीं गुढ्या उभ्या केल्या होत्या. व तोरणें बांधलीं होतीं. सर्व मार्ग स्वच्छ करून त्यांवर चंदनाचे व कुंकुमाचे सडे घातले होते. व त्यांवर सुशोभित चित्रविचित्र रांगोळी घातल्या होत्या. शहरभर चिराकदान केलें होतें. नगरवासी स्त्रिया उत्तम अलंकार घालून पंचार्ती घेऊन दुमजल्यावर व तिमजल्यावर उभ्या होत्या. आणि आबालवृद्ध सर्व लोक स्वारीचा थाट व शोभा पहाण्याकरतां स्वारी जाण्याच्या मार्गावर लोटले होते. भवानीपेठेच्या मार्गानें श्रीमंतांची स्वारी शहरांत आली आणि शुक्रवारांतून खासगीवाल्यांच्या वाड्याच्या पूर्वेस, बुधवारच्या रस्त्यास मिळून, नानांच्या वाड्यावरून सरकारवाडा उजवा घालून दिल्ली दरवाजानें वाड्यांत दाखल झाली. स्वारी मार्गांतून जात असतांना लोकांनीं सोन्या रुप्याचीं फुलें उधळलीं. वाड्यांत जातांच खुषीच्या तोफांची सुरवात झाली व दरबार होऊन सरदार, मानकरी व मुत्सद्दी यांनीं नजराणा दिला. असा हा मोठा अपूर्व समारंभ झाला.[1] मशीरउल्मुल्कखाला पुण्यासच बंदोबस्तानें कैदेंत ठेविलें.

१९. 'पेशवे सरकारची स्वारी पुण्यास आल्यानंतर, ज्यांनीं या स्वारींत पराक्रमाचीं कृत्यें केलीं त्यांस त्यांच्या गुणाप्रमाणें पोषाख व

---

१ परशुरामपंतभाऊ पटवर्धन यांचें चरित्र, पान ९३.

मानाप्रमाणें बक्षिसें देऊन त्यांचा सन्मान करण्याकरतां नानांनीं प्रधान, सरदार, मानकरी आदिकरून मंडळीचा सरकारवाड्याच्या भव्य दिवाणखान्यांत मोठ्या थाटाचा दरबार केला. शिंदे, भोंसले, होळकर, गाइकवाड इत्यादि स्वारीस गेलेले सर्व सरदार व मानकरी या दरबारास आले होते. सर्व सरदारांची त्यांच्या साह्याबद्दल, पराक्रमाबद्दल, आणि एकनिष्ठतेबद्दल नानांनीं दरबारांत स्तुति केली आणि या स्वारीच्या आपल्या यशाचें सर्व श्रेय परशुरामभाऊंकडे आहे, असें सांगून त्यांचें शौर्य, धैर्य, पराक्रम, स्वामिकार्यनिष्ठा, सहनशीलता आणि मनमिळाऊपणा इत्यादि गुणांविषयीं फारच प्रशंसा केली. त्यांस बहुमोलाचा पोषाख, मोत्यांची कंठी, शिरपेंच व तुरा हीं सरकारांतून बक्षीस देवविलीं, आणि नगारखान्याची नेमणूक करून दिली. त्यांची जातीची तैनात वीस हजार रुपये होती, ती चाळीस हजार केली. आणि त्यांचें कायमचें पथक चोवीसशें स्वारांचें होतें, तें वाढवून आणखीं १५०० स्वार त्यांनीं अधिक ठेवावे असें ठरलें. या नवीन स्वारांच्या खर्चाबद्दल व तैनातीबद्दल चार लक्ष सत्तर हजार रुपये वसुलाचा नवीन सरंजाम लावून देण्याच्या याद्याही ठरल्या. भाऊबरोबर त्यांचे पुत्र, पुतणे, भाऊबंद वगैरे स्वारीस होते, त्यांनींही चांगला पराक्रम केला, म्हणून त्यांच्या योग्यतेनुरूप त्यांस पोषाख व बक्षिसें देऊन त्यांचाही सरकारनें बहुमान केला.[1]''

२०. याप्रमाणें खर्ड्याच्या लढाईंत विजय मिळण्याकरतां ज्या ज्या लोकांनीं आपलें शौर्य खर्च केलें, त्या त्या लोकांची संभावना त्यांच्या त्यांच्या मानाप्रमाणें व कामगिरीप्रमाणें पेशवे सरकारतर्फे नानांनीं केली. ही संभावना करण्यांत सवाईमाधवरावांचा मनःपूर्वक किती संबंध होता हें त्यांनीं मशीरउल्मुल्कखाच्या पहिल्या भेटीच्या वेळीं नानांनीं विचारलेल्या प्रश्नाचें जें उत्तर दिलें तें लक्षांत घेतां सहज कळून येण्यासारखें आहे.

१ परशुरामपंतभाऊ पटवर्धन यांचें चरित्र पा. ७४ व ७५.

सवाईमाधवरावांना या खर्ड्याच्या लढाईंतील विजयामुळें जर मनापासून आनंद झाला असतां व त्यांनीं आपल्या अंतःस्फूर्तीनें जर या सरदार, मानकरी वगैरे लोकांचा सत्कारसमारंभ केला असतां तर त्या समारंभांत नानांचाही सत्कारसमारंभ सवाईमाधवरावांनीं केला असता. परंतु यावेळीं नानांचा सत्कार झाल्याबद्दलचा कोठेंच उल्लेख नाहीं. शिवाय या लढाईच्या मुळाशीं पूर्वीपासून नानाच होते. नानांनींच सर्व सरदारांची एकजूट केली. त्यांच्याच प्रयत्नावर व त्यांच्याच धोरणावर व जबाबदारीवर या लढाईचा विजय मिळाला. या विजयामुळें मराठ्यांचें गतवैभव पुन्हां उदयाला आलें आणि हे सारे परिश्रम केवळ एकट्या नानाचे होते हें समजण्याइतके व्यवहारज्ञानी सवाईमाधवराव आतां झाले होते. परंतु तसें ज्याअर्थी झालें नाहीं किंवा आपल्या कामगिरीची कदर सवाईमाधवरावांनीं केली नाहीं म्हणून ज्या अर्थीं अपमान वाटून नाना रुसून बसले नाहींत, उलट आनंदांत व समाधानांत होते, त्या अर्थी नानांना या विजयापासून जें पारितोषिक मिळावयास पाहिजे होतें तें मिळालें असेंच अनुमान निघतें. उलटपक्षीं सवाईमाधवराव हे पेशव्यांच्या राज्याचे खरेखुरे मालक असून खर्ड्याच्या लढाईंतील विजय व त्यांतील तहाच्या अटी पेशव्यांच्या राज्याचा विस्तार होण्याच्या दृष्टीनें व पेशव्यांच्या राज्याच्या सुसंघटणेच्याही दृष्टीनें जर खरोखर विजयप्रद झाल्या असल्या, तर त्यांचें मुख म्लान होण्याचें कांहींच कारण नव्हतें. एकंदरींत ज्यांचें समाधान व्हावयास नको त्यांचें समाधान झालें होतें व ज्यांचें खरोखर व्हावयाला पाहिजे होतें त्यांचें समाधान झालें नाहीं. यांतच खर्ड्याच्या लढाईपासून कोणाचा खरोखर विजय झाला याचें रहस्य दडून बसलेलें आहे.

प्रकरण ३० वें.

सवाईमाधवरावांच्या प्रतापसूर्यास नानांचें खग्रास ग्रहण.

इ. स. १७९५.

१ खडर्याच्या विजयामुळें पेशव्यांच्या पदरांत काय पडलें याची मीमांसा. —२ निजाम व भोंसले यांची तहांतील दुसऱ्या कलमाप्रमाणें कायमची फाळणी कशी झाली ?—३ पेशव्यांबद्दल निजामाच्या मनांत जास्त अविश्वास उत्पन्न होण्याचें कारण.—४ नानांनीं निजामाची बुद्धि व कीर्ति कशी हिरावून घेतली. —५ नानांच्या महत्वाकांक्षेची पूर्तता.—६ नानांचे फोड व जोड हें तत्व. —७ शिंदेसरदार नानांच्या लगामीं कसे आले.—८ होळकरसरदार नानांच्या टांटाखालील मांजर बनतात.—९ नागपूरकर भोंसले नानांच्या गळीं कायमचे कां अडकले? —१० गायकवाड नानांचे मिंधे कां झाले? —११ नानांनीं मुत्सद्यांच्या बाबतींत लढवलेल्या कारस्थानांचा आढावा.—१२ नानांस निरुपयोगी वाटणाऱ्या बारभाईंतील एक भाई मोरोबादादा यांचा नानाकडून कायमचा कैदेचा बंदोबस्त.—१३ बारभाईंतील मुख्य भाई सखारामबापू यांस नाना कायमचे कैदेंत टाकतात.—१४ पेशवाईच्या कारभारावरील हक्कदार सदाशिवरावभाऊ यांचा नानाकडून वध.—१५ इंग्रज नानांच्या तंत्रांत कसे आले ?—१६ टिपूची कुतरओढ करावयाला लावून आपल्या विरुद्ध तो कधींही शत्रू उत्पन्न होणार नाहीं असा नानांचा बंदोबस्त.—१७ शिंदे-होळकरांची दुक्कल नानांनीं कशी फोडली ?—१८ सवाईमाधवरावांचें स्वत्व नानांनीं कसें काढून घेतलें ? व त्यामुळें ते पेशव्यांच्या राजकारणांत प्रेतवत् कसे झाले ?—१९ शिंदे, होळकर, भोंसळे व पटवर्धन यांच्याबद्दल निजामास वाटणारी सहानुभूति खडर्याच्या लढाईमुळें नानांनीं नष्ट केली.—२० खडर्याच्या लढाईत इतर मोठमोठ्या सरदारांना मागें टाकून परशुरामभाऊंना सेनापती केलें, त्यामुळें परशुरामभाऊ व इतर सरदार यांच्यांत नानांनीं कायमची दुफळी उत्पन्न केली.—२१ पेशव्यांच्या गादीवरील आपण एक राजाचें बाहुलें आहों अशी जाणीव खडर्याच्या लढाईमुळें नाना सवाईमाधवरावांना करून देतात.—२२ पेशवाई-राज्याच्या भव्य कमानीच्या चाव्रीचा दगड इतके दिवस पेशवे होते. पण तो खडर्याच्या

लढाईपासून नाना स्वतःच कसे बनले?—२३ पेशवाई भाऊबंदी तंट्यामुळें बुडाली नाहीं; ती दुसऱ्याच कारणानें बुडाली हें त्रिवार सत्य.—२४ सवाई-माधवराव वयांत येतात. पेशवे घराण्यांतील थोर वृत्ति त्यांच्या ठिकाणीं येते. न्याय अन्यायाची जाणीव त्यांना होऊन पेशवेपद चालविण्यास ते पूर्ण लायक होतात.—२५ आदमखोरी स्वभाव नानांमध्यें कसा होता याचीं कारणें.—२६ बाजीरावास विशेष बंदोबस्तानें केंदेंत नाना कां ठेवीत होतें यांतील रहस्य.—२७ पेशवाईचे दिवाण नाना यांच्याविरुद्ध सवाईमाधवराव यांचें ' राजाचें बंड.'—२८ नाना स्वपराक्रमानें व कडक बंदोबस्तानें सवाईमाधवराव व बाजीराव यांची मुस्कटदाबी करतात.—२९ सवाईमाधवराव बाजीरावाच्या भेटीची इच्छा दर्शवितात, या एका कारणामुळें नानांच्या अंगाचा तिळपापड होतो. नाना सवाई-माधवरावांचे भोंवतीं हेरांचें जाळें पसरतात. " तुम्हीं जेवण करून स्वस्थ बसा, कांहीं गडबड केल्यास इतरांप्रमाणें जिवाला मुकाल " अशी नानांची सवाई-माधवरावांस धमकी.—३० नानांच्या गारुडी मंत्रानें विष्णूचा अवतार बनलेले सवाईमाधवराव नानांनीं मंत्र काढून घेतांच त्यांच्या नजरकैदेंत गुन्हेगारांप्रमाणें कसे पडतात?—३१ नानांनीं केलेल्या मानभंगामुळें सवाईमाधवरावांच्या मनाची वादळी वृत्ति.—३२ सवाईमाधवरावांच्या मृत्यूचा आरोप बाजीरावावर कसा जाईल या संबंधींची नानांची क्लृप्ति.—३३ बाजीरावानें सवाईमाधवरावांस मारून टाकण्याकरतां जादूटोणा केला असा त्याचेवर नानांचा आरोप.—३४ सवाईमाधवरावांनीं दसऱ्याच्या स्वारीस निघालें पाहिजे अशी नानांची त्यांचेवर सक्ति. अंबारींतून उडी टाकून आत्महत्या करून घेण्याचा सवाईमाधवरावांचा प्रयत्न. नानांच्या अमानुष जाचांस सवाईमाधवराव कायमचे कंटाळतात.—३५ सवाईमाधवराव आत्महत्या करून घेण्याकरतां कारंजावर उडी टाकतात.—३६ आपल्या पश्चात् बाजीरावास गादीवर बसवावें असा शेवटचा संदेश देऊन सवाई-माधवरावांनीं आत्महत्येनें आपला शेवट करून घेतला.—३७ नानांच्या कृती-मुळेंच सवाईमाधवरावांना आत्महत्या करून घेण्याची संधि मिळाली.—३८ सवाईमाधवरावांच्या रक्षणाची सर्व जबाबदारी नानांवर असतां, सवाईमाधवराव आत्महत्या करून घेतात, याला नानाच कारणीभूत आहेत. नानांचा हा गुन्हा कोणालाच दृष्टिआड करतां येणार नाहीं.—३९ सवाईमाधवरावांच्या प्रताप-सूर्याला नाना खग्रास ग्रहण लावतात.

१. पेशवे व निजाम यांच्यामध्यें जो खर्ड्याचा तह झाला, त्यांतील मागील प्रकरणीं निर्दिष्ट केलेल्या पहिल्या कलमाप्रमाणें विचार केला असतां असें दिसून येईल कीं, नानांना राघोबादादांचें शासन करावयाचें होतें व त्याकरतां निजामाची मदत त्यांना पाहिजे होती. ती मिळविण्याकरतां निजामाला वेळोवेळीं पेशव्यांचा जो मुलूख द्यावा लागला, तो सर्व या पहिल्या कलमाप्रमाणें परत मिळाला. याचा अर्थ असा कीं, बारभाईंच्या कारस्थानामुळें पेशव्यांच्या राज्यांतील जो मुलूख निजामाच्या घरांत गेला होता, तो या वेळीं परत मिळाला. ह्मणजे निजामानें राघोबादादांच्या पारिपत्याकरतां जी पेशव्यांना मदत केली ती सर्व बारभाईंना फुकटांत पडली. हें राजकारणाच्या दृष्टीनें जरी भलेंबुरें असलें, तरी पेशव्यांच्या इभ्रतीच्या व राजकारणाच्या दृष्टीनें तें गौणच आहे. याचें असें कारण आहे कीं गेलीं वीस वर्षें पेशवाईचा राज्यकारभार नानांनीं केला होता. नाना हे पेशवाईचे मालक नसून नोकर आहेत अशीच सर्वांची भावना होती. नाना कारभार करतात तो पेशव्यांकरतां, पेशव्यांच्या सर्वस्वी कल्याणाकरतां करतात, त्यांत त्यांचा व्यक्तिविषयक संबंध नाहीं, असें लोकांना वाटत होतें. नाना आज कारभारी आहेत उद्यां दुसरा कोणी येईल, पण पेशवे सरकार मात्र कायम राहील असाच विश्वास पेशव्यांच्या मांडलिकांना व इतर स्वतंत्र राज्यकर्त्यांना वाटत होता. त्यामुळें नानांनीं कोणतीही गोष्ट केली तरी त्याला पेशवे सरकारच जबाबदार समजण्यांत येत होतें. पेशवे अज्ञान होते, त्यावेळीं नाना व्यक्तिशः कांहीं अंशीं जबाबदार होते. पण सवाईमाधवराव वयांत आल्यावर ती जबाबदारी त्यांच्या डोक्यावरून पार गेली. त्यामुळें वाईटाचे अधिकारी तेवढे सवाई-माधवराव व चांगल्या गोष्टीचे मात्र नाना वतनदार होऊं लागले. या दृष्टीनें पहातां 'दिलें दान व घेतलें दान' या ह्मणीप्रमाणें पहिल्या कलमाची अवस्था झाली. या कलमामुळें निजामाच्या मनांत पूर्वीचा पेशव्यांबद्दलचा स्नेहभाव नष्ट होऊन त्यांच्याबद्दल कायमची तेढ मात्र उत्पन्न झाली. नाना मात्र यापासून अलिप्त राहिले.

२. दुसऱ्या कलमाप्रमाणें अशी गोष्ट घडून आली कीं, पूर्वी भोंसले व निजाम यांचा परस्पर स्नेहसंबंध जोडला गेला होता. भोंसले व निजाम एकत्र होऊन त्यांनीं कदाचित् पुण्यावर धाड घातली, तर तें एक मोठें गंडांतरच होईल. हें, भावी गंडांतर टाळण्याच्या हेतूनें निजाम व भोंसले यांना कायमचें अलग करावें म्हणून नानांनीं भोंसल्यांस त्यांच्या मागणी-प्रमाणें निजामाकडून हक्क देवविले. यामुळें भोंसले व निजाम यांची कायमची फाळणी केली गेली.

३. तिसऱ्या कलमाप्रमाणें चौथ व सरदेशमुखीच्या हक्काची बाकी दोन कोटी साठ लक्ष रुपये निघत होती, त्या ऐवजीं तीन कोटी रुपये लादले. एकंदरींत याही कलमानें पेशव्यांबद्दल जास्त अविश्वास निजामाच्या मनांत उत्पन्न केला.

४. नानांनीं चवथें कलम घालून निजामाकडील बुद्धिवान् व राज-कारणकुशल असा त्याचा दिवाण आपल्या कैदेंत ठेविल्यामुळें निजामाची कीर्ति व बुद्धि हीं हिरावून घेतलीं.

५. एकंदरींत ज्या गोष्टी आपल्या भावी महत्त्वाकांक्षेच्या पूर्ततेला पाहिजे होत्या त्या सर्व खर्ड्याच्या लढाईतील विजयामुळें आपल्याला लाभल्या व त्यामुळें आपल्या कीर्तीची व विजयाची परमावधी झाली असें नानांना वाटून आनंद झाला. नानांच्या महत्त्वाकांक्षेची पूर्तता कशांत होती हें आतां आपण पाहूं.

६. माधवराव पेशव्यांच्या अमदानीपासून खर्ड्याच्या लढाईपर्यंत नानांनीं स्वतंत्र राज्यकर्ते, पेशव्यांचे मांडलिक व पेशव्यांच्या राज्याचे घटक सरदार वगैरे यांना क्रमाक्रमानें एकमेकांच्या जुटींतून फोडून पेशवाईच्या नांवावर पण स्वतंत्रपणें आपल्या लगामीं कसकसें आणलें हें खालीं नमूद केलेल्या गोष्टीवरून लक्षांत येईल.

७. (१) शिंद्यांचे बाबतींत राणोजी शिंद्यांची एवढी मोठी दौलत दासी-पुत्राकडे (महादजी शिंद्याकडे) जाणें पेशव्यांच्या इभ्रतीला योग्य नाहीं

असें ठरवून राणोजी शिंद्यांचा जवळचा भाऊबंद सरदार मानाजीराव शिंदे उर्फ फाकडे यांना राघोबादादांनीं शिंद्यांचा गादीचा वारसाहक्क दिला. परंतु नाना फडनविस यांनीं महादजी शिंद्यांचा पक्ष धरून व माधवराव पेशवे यांच्याजवळ आपलें व आपल्या पक्षाचें वजन खर्च करून, मानाजीराव यांचा हक्क उडवून महादजींस शिंद्यांच्या गादीचा वारसाहक्क प्राप्त करून दिला. त्यामुळें महादजींचें शिंदे घराणें संपूर्णपणें नानांच्या लगामीं आलें. [१]

८. (२) होळकरांच्या गादीसंबंधानें अशीच हकीकत आहे. मल्हारराव दिवंगत झाल्यानंतर मालोजीराव गादीचे मालक झाले, पण ते अवघ्या दहा महिन्यांतच मृत्यु पावले. त्यांना संतान नव्हतें. त्यांची विधवा स्त्री अहिल्याबाई यांनीं मल्हाररावांच्या जवळच्या भाऊबंदाचा एकादा मुलगा पसंत करून तोच दत्तक घ्यावा, या विचाराचे राघोबादादा व होळकरांचें दिवाण गंगोबा तात्या हे होते. परंतु नाना व त्यांचे पूर्णपणें सहकारी बनलेले महादजी शिंदे यांनीं माधवराव पेशव्यांजवळ वशिला व वजन खर्च करून, मल्हारराव होळकर यांच्या आप्तसंबंधांतील नसलेले पण होळकर या आडनांवाचे व त्यांच्या सैन्यांत शिलेदारीच्या नोकरीवर असलेले तुकोजी होळकर यास, ते जरी वयानें मोठे होते तरी, त्यांनाच अहिल्याबाईनें दत्तक घेऊन गादीचा वारस करावें, असा प्रयत्न केला. त्याप्रमाणें तुकोजी हा होळकरांच्या गादीचा वारस झाला. या गोष्टीमुळें महादजी व तुकोजी या दोन फौजबंद सरदारांची एकजूट झाली व ते दोघे पूर्णपणें नानांच्या ताटाखालील मांजरें होऊन बसले. [२]

९. (३) नागपूरच्या भोंसले घराण्यांत दुसरे रघोजी अज्ञानावस्थेंत गादीवर असतांना त्याचा जनक बाप मुधोजी हा त्याचा कारभार पहात होता. हा मुधोजी राघोबादादांच्या पक्षाचा होता. तेव्हां त्यांनीं मुधोजीचा भाऊ साबाजी यास मुधोजीच्या विरुद्ध उठविलें व मुधोजीचा अधिकार

---

१ प्रकरण ८ वें. २ प्रकरण ८ वें.

माधवराव पेशव्यांकडून काढून घ्यावयास लावून साबाजीस अधिकारावर चढविलें. याप्रमाणें साबाजी भोंसले अनधिकारानें अधिकारपदावर चढल्यामुळें व त्याला नानाच कारणीभूत झाल्यामुळें नागपूरकर भोंसलेही नानांच्या गळ्यांत कायमचे अडकले. [१]

१०. (४) बडोद्याच्या गायकवाड घराण्यांत गादीचे न्यायानें वारसदार गोविंदराव असतांना, नानांनीं बेकायदेशीर वारस फत्तेसिंग यास गोविंदरावांविरुद्ध उठविलें. गोविंदराव राघोबादादांच्या पक्षाचा होता. नानांनीं माधवराव पेशव्यांकडून गोविंदरावांस गादीवरून काढून फत्तेसिंगास बसविलें. नानांच्या या हिमालयन उपकाराबद्दल फत्तेसिंग नानांचा जन्मभर मिंधा राहिला. [२]

११. (५) पेशव्यांचे दरबारीं मुख्य मुत्सद्दी-कारभारी ह्मणजे सखारामबापू व नाना हे होते. सखारामबापू हे राघोबादादांच्या पक्षाचे व नाना हे माधवरावांच्या पक्षाचे समजले जात. सखारामबापू हे देशस्थ व नाना हे कोंकणस्थ होते. सखारामबापूंचें दरबारांतील वजन कमी करण्याकरतां नानांनीं देशस्थ कोंकणस्थ वादाला चालना दिली. राज्यकर्ते माधवराव पेशवे हे खुद्द कोंकणस्थ असल्यामुळें, पुण्याच्या कोंकणस्थ सरदार मंडळींची अर्थात् कोंकणस्थ मुत्सद्दी नानांनाच उठावणी मिळाली. त्यांत पटवर्धन, रास्ते, फडके, मेहेंदळे वगैरे अनेक कोंकणस्थ सरदार होते. नानांनीं हा देशस्थ कोंकणस्थ वाद उत्पन्न केल्यामुळें सहजच सखारामबापूंचें पेशव्यांच्या दरबारांतील वजन कमी झालें खरें. तरी त्यांचें बुद्धिचातुर्याचें वजन कमी होण्यासारखें नव्हतें. सखारामबापूंचें वजन इंग्रज, निजाम, हैदर, करवीकर, सातारकर वगैरेंच्या दरबारीं उत्तमच होतें. राघोबादादांची तरवार व सखारामबापूंचें डोकें हीं जोंपर्यंत एकत्रित आहेत, तोंपर्यंत आपलें कांहीं चालत नाहीं हें नाना जाणून होते. पुढें माधवराव पेशव्यांनीं नारायणरावाचे नांवें राघोबादादा व सखारामबापू यांनीं कारभार करून राज्य चालवावें अशी

१ प्रकरण ११ वें. २ प्रकरण १६ वें.

व्यवस्था केली व ते कालवश झाले. या योजनेनें नानांचा पक्ष कांहीं दिवस उणा झाला. परंतु नानांनीं पुन्हां भाऊबंदी तंट्याची गुरुकिल्ली फिरविली व राघोबादादांना कैदेंत पडावें लागलें. नारायणराव नंतर प्रत्यक्ष नानांच्या देखरेखीखालीं गेल्यामुळें नानांच्या चिथावणीमुळें म्हणा किंवा त्यांच्या नादानपणामुळें म्हणा, पेशव्यांच्या राज्यांतील मुत्सद्दी, सरदार व मानकरी यांच्यामध्यें बेबनाव व अनास्था माजली. तेव्हां नारायणरावांस कैदेंत टाकून राघोबादादांस कारभारांत आणण्याच्या खटपटींत बरीच मंडळींची एकवाक्यता झाली व त्याचा पुढाकार सखारामबापूंनीं घेतला. या कारस्थानाला नानांनीं विरोध केला नाहीं. पण स्वतंत्र कारस्थानांत नवें कारस्थान निर्माण करून त्यांनीं एका दगडानें अनंत फळें पाडलीं. यामुळें नारायणराव मेले, राघोबादादा खुनी गुन्हेगार ठरले व सखारामबापूसारखा खंदा मुत्सद्दी नानांच्या पक्षांत सामील झाला. नानांच्या पक्षांत फौजबंद सरदार व मुत्सद्दी यांचा मिलाफ झाल्यानें बारभाई मंडळ जन्मास आलें. ही बारभाई राघोबादादांचें पारिपत्य करण्याकरतां होती. नानांनीं या बारभाईकडून राघोबादादांचा समूळ नाश करविला. राघोबादादांचा नाश करण्याकरतां पहिल्यानें गंगाबाईचें व नंतर सवाईमाधवराव यांचें बुजगावणें बारभाईंना दाखविण्यासाठीं नानांच्या लगामीं होतेंच.

१२. (६) सुरवातीस बारभाईंच्या कारस्थानांत मोरोबादादा यांस घेण्यांत आलें. मोरोबा हे नानांचे चुलतभाऊ पण प्रतिस्पर्धी होते. मोरोबांचा या कारस्थानांत प्रामुख्यानें जरी भाग नव्हता, तरी त्यांस या कारस्थानांत घेतल्यामुळें नानांना त्यांचा विरोध झाला नाहीं. पुढें राघोबादादांना खुनी ठरवून व त्यांची पेशव्यांच्या राज्याबाहेर हाकलपट्टी होऊन ते इंग्रजांचे आश्रित बनल्यावर मोरोबादादा नानांस जड वाटूं लागले. तेव्हां बारभाईंतील इतर सभासदांना आपल्या कक्षेंत घेऊन मोरोबांना नानांनीं कायमचें प्रायश्चित्त दिलें. त्यांची सर्व धनदौलत जप्त करून त्यांना कैदेंत जन्माचें डांबून टाकलें.

१३. (७) बारभाईंच्या कारस्थानाला प्रामुख्यानें सखारामबापूंची मदत होती. त्यांच्याच परिश्रमानें हें सारें कारस्थान इतकें रंगलें व यशस्वी झालें. राघोबादादा हा पुतण्याचा खून करणारा आहे असें त्यांच्याच पक्षांतील सखारामबापू जाहीरपणानें सांगतात, तेव्हां राघोबादादांचा पक्ष खोटा असें जगजाहीर झाल्यानंतर व पेशवे सरकाराबरोबर इंग्रजसरकारचा पुरंदरचा सलोख्याचा तह झाल्यानंतर, सखारामबापूंची जरूरी संपली. नानांना ते जड वाटूं लागले. तेव्हां बारभाईंतील राहिलेले सभासद आपल्याकडे वळवून नानांनीं सखारामबापूंचें पारिपत्य केलें. त्यांची धनदौलत जप्त करून त्यांना मरेपर्यंत सक्त कारागृहवास दिला.

१४. (८) राघोबादादांशिवाय पेशव्यांच्या गादीवर अगर कारभारावर हक्क सांगणारे सदाशिवरावभाऊ तोतया ठरून डोंगरी किल्ल्यावर कैदेंत होते. परंतु मध्यंतरीं त्यांच्या नशीबानें उचल खाल्ली व ते खरे म्हणून प्रसिद्धीला आले. आपल्या अधिकाराच्या व कारस्थानाच्या आड भाऊ येतात म्हणून कारस्थान रचून त्यांना जिवें मारण्यांत आलें. पेशव्यांच्या गादीवरील एका हक्कदार शाखेची अशा प्रकारें खच्ची केली गेली. [१]

१५. (९) राघोबादादांना इंग्रजांनीं आश्रय दिला, या अपराधाबद्दल त्यांचें पारिपत्य करण्याकरतां निजाम, हैदर, नागपूरकर भोंसले व पेशवे अशा चार सरकारांनीं एक गट्टी सरकार निर्माण केलें, व त्यानें इंग्रज सरकारास हिंदुस्थानाबाहेर घालवून लावण्याचा मनसुबा तयार केला. त्याप्रमाणें उत्तरेस शिंदे व दक्षिणेस हैदर अशीं लढाईचीं दोन तोंडें जुंपलीं व या शिवाय मराठे किती ठिकाणीं आघाड्या तयार करून इंग्रजांबरोबर लढतील याचा नेम राहिला नव्हता. शिवाय हैदरानें इंग्रजांच्या मुलखावर ज्या धाडी घातल्या, त्या पाहून इंग्रज घाबरले व एकाच वेळीं मराठे व हैदर या दोन शत्रूंबरोबर सामना देण्याची कुंवत आपणाजवळ नाहीं म्हणून त्यांनीं पेशव्यांबरोबर शिंद्यांच्या मध्यस्थीनें

---

१. प्रकरण १८ वें.

सालबाईचा तह केला. या तहामुळें नाना व इंग्रज यांचा मिलाफ झाला; व पूर्वींचा सर्व मतभेद जाऊन इंग्रज नानांच्या तंत्रांत सांपडले.

१६ (१०) हैदर मेल्यानंतर त्याचा मुलगा टिपू गादीवर आला. तोही मोठा शूर होता. पेशव्यांनीं इंग्रजांविरुद्ध आपल्या बापाला उठाविलें व त्याच्या संमतीशिवाय सालाबाईचा तह घडवून आणून इंग्रज व पेशवे एक झाले व आपणाला शत्रुपक्षांत कायम ठेवलें, याबद्दल त्याला चीड आली व त्यानें एक लक्ष सैन्य गोळा केलें व मद्रास आणि मलबार प्रांतांतील इंग्रजी मुलुखावर स्वारी केली. त्यानें एकदोन लढायांतच इंग्रजांचा धुव्वा उडविला. त्यामुळें इंग्रज भयभीत होऊन त्यांनीं स्वतंत्रपणें टिपूबरोबर तह केला. यामुळें इंग्रज, पेशवे व निजाम यांचें जें त्रिकुट झालें होतें तें टिपूनें फोडलें. तव्हां नानांनीं टिपूचा बंदोबस्त करण्याचें ठरविलें. टिपूच्या पारिपत्याकरतां नानांनीं नवीन चौकडी निर्माण केली. निजाम, पेशवे, शिंदे व होळकर अशी ती चौकडी होती. या चौकडीनें टिपूचें पारिपत्य करावयाचें व त्याचेकडून जो मुलुख व जी खंडणी मिळेल त्याचे तीन हिस्से करून निजामानें एक, पेशव्यांनीं एक व शिंदे होळकर यांनीं मिळून एक असे घ्यावयाचे असें ठरविलें. मराठ्यांबरोबर इंग्रजांचा स्वतंत्र तह झाल्यामुळें, टिपूच्या मदतीस इंग्रज धावून जाईल ही स्थिति नव्हतीच. त्यामुळें या चौकडीला टिपूचा पराभव करतां आला व प्राप्तीचा वांटा सर्वांनीं ठरल्याप्रमाणें वांटून घेतला. या टिपूच्या पारिपत्यामुळें शिंदे, होळकर व निजाम हे टिपूचे शत्रू बनले व पुढें मागें नानाविरुद्ध ते एक होण्याची आशा राहिली नाहीं.

१७. (११) सालबाईच्या तहानें महादजी शिंद्यांची प्रतिष्ठा इंग्रजांच्या दरबारांत वाढली. शिवाय दिल्लीच्या पातशाहींत शिंदे शिरल्यामुळें, त्यांच्या पराक्रमाचा मोठाच बोलबाला झाला. महादजी जसा युद्धकलाकुशल होता तसाच तो मुत्सद्दीही होता. शिंदे व होळकर यांचें सख्य होतें तें सख्य तसेंच राहिलें, व महादजींचा उत्कर्ष दिवसेंदिवस असाच होत

राहिला, तर तो आपणाला डोईजड हें धोरण पाहून नानांनीं शिंद्यांविरुद्ध होळकरांना उठविलें. त्यामुळें शिंदे व होळकर यांचा संग्राम सुरू झाला व त्याचा शेवट लाखेरीच्या लढाईंत झाला. शिंद्यांनीं होळकरांचा पूर्ण पराभव केला. त्यामुळें शिंदे व होळकर यांच्या मध्यें असलेले बऱ्याच दिवसाचे मैत्रीचे दुवे अगदीं अलग झाले. शिंदे होळकरांची इतके दिवसांची दुक्कड नानांनीं ही अशा तऱ्हेनें फोडली.

१८. (१२) नानांच्या या भेदनीतीमुळें महादजी शिंदे हलके न पडतां त्यांची प्रतिष्ठा जास्त वाढली. ते पुण्यास येत आहेत असें पाहून त्यांच्या पारिपत्याकरितां एकादा सामर्थ्यवान गट निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनीं केला, पण तो साधला नाहीं. उलट त्यांनीं उठविलेल्या सर्व कंड्या खोट्या होत्या हें खुद्द पेशव्यांच्या नजरेला आल्यामुळें, पेशव्यांची सहानुभूति नानांपेक्षां महादजींकडेच जास्त वळली. त्यामुळें इतके दिवस पेशव्यांचे बुजगावणें पुढें करून नानांनीं ज्या आपल्या महत्वाकांक्षेच्या पिकाचें रक्षण केलें तेंच बुजगावणें शिंदे बगलेंत मारणार अशी धास्ती नानांना उत्पन्न झाली. तेव्हां नानांनीं आपल्या कारस्थान–कुशलतेनें महादजी शिंद्यांचा कांटा कायमचा काढून टाकला व त्यामुळें सवाईमाधवरावांचें बुजगावणें जें सजीव आणि तेजसंपन्न दिसत होतें तें प्राणरहित प्रेताप्रमाणें बनलें. या प्रकारामुळें खुद्द पेशव्यांशीं संबंध ठेवणाऱ्या सरदारांची काय वाट होते हें इतर सरदारांना समजलें व त्यामुळें पेशवे व इतर सरदार यांचे संबंध दूरावले.

१९. (१३) नागपूरकर भोंसले व निजाम यांचें सख्य बारभाईंनींच करून दिलें होतें. तें सख्य खर्ड्याच्या लढाईमुळें नानांनीं नष्ट करून टाकलें. शिवाय निजामाच्या मनांत शिंदे, होळकर, पटवर्धन वगैरे सरदारांबद्दल जी स्नेहभावाची तोंपर्यंत बुद्धि होती, तीही खर्ड्याच्या लढाईमुळें नानांनीं नष्ट करून टाकली.

२०. (१४) पेशव्यांच्या सरदारांपैकीं उत्तरेला जसे शिंदे नांवलौकिकाला चढले व शेवटीं ते जसे नानांना डोईजड झाले, तसे दक्षिणेस

परशुरामभाऊंचा बोलबोला झाल्यामुळें ते जर पेशव्यांना मिळतील तर तेंही एक गंडांतरच ठरेल या कल्पनेनें परशुरामभाऊबद्दल इतर सरदारांत मत्सर व शत्रुत्व उत्पन्न व्हावें या उद्देशानें खर्ड्याच्या लढाईंत, मोठमोठ्या सरदारांस मागें टाकून, मुद्दाम त्यास मुख्य सेनापतीपद दिलें. त्यामुळें परशुरामभाऊ हुरळून गेले, व त्यामुळें इतर सरदारांत त्यांच्याबद्दल द्वेष माजला. भाऊंकडे दिसावयाला सेनापतीपद पण नाना स्वतःच या लढाईचे मुख्य सूत्रचालक होते. नानांनीं मुद्दाम परशुरामभाऊ यांस आघाडीवर शत्रूच्या तोंडाशीं दिलें होतें. परशुरामभाऊंच्या आयुष्याची दोरी बळकट म्हणूनच ते खर्ड्याच्या लढाईंतून वांचले. त्यांना पहिल्यानें बळी देण्याकरतांच नानांनीं आघाडीला ढकललें होतें मोहिमेच्या मुख्य सेनापतीनें आघाडी सांभाळावी ही अजब युक्ति या वेळीं नानांनीं योजली होती. लढाईनंतर पुण्यास जो दरबार झाला, त्यांत नानांनीं परशुरामभाऊंची वाहावा केली व त्यांचा मोठा सन्मान केला. त्यामुळें इतर सरदार व भाऊ यांच्यांत कायमचें नानांनीं वैर उत्पन्न करून ठेवलें.

२१ (१५) खर्ड्याच्या लढाईंतील विजयामुळें सवाईमाधवराव यांचे मुख म्लान होऊन ते उदासीन असतां, नानांनीं जो विजयोत्सव साजरा केला, त्यामुळें आपण कोणी नाहीं, आहेत ते फक्त नाना एकटेच आहेत, ही नानांनीं सवाईमाधवरावांना जाणीव उत्पन्न करून दिली. सर्व पेशव्यांचे सरदार नानांचा शब्द झेलून धरतात, नानाकरतांच ते पेशव्यांना मानतात, हेंही पर्यायानें सवाईमाधवरावांच्या निदर्शनास या खर्ड्याच्या लढाईंतील विजयानें नानांनीं आणून दिलें.

२२. एकंदरींत नानांच्या राजकारस्थानांतील पायऱ्या क्रमाक्रमानें कशा चढत गेल्या याचें सिंहावलोकन येथपर्यंत झालें. आतां या त्यांच्या कारस्थानामुळें व खर्ड्याच्या लढाईंतील विजयामुळें त्यांच्या महत्वाकांक्षेची पूर्तता कशा तऱ्हेनें झाली हें पाहूं. कुटिल राजकारस्थानांतील पहिलें सूत्र म्हणजे ‘ फोडा व झोडा ’ हें आहे. नानांनीं पहिल्यापासून या सूत्राचाच

अंगिकार केला होता व त्यामुळेंच आतांपर्यंत त्यांना यश मिळत गेलें. बारभाईंच्या कारस्थानाला सुरवात झाल्यापासून पेशवे सरकारच्या राजमंदिराची भव्य कमान सवाईमाधवराव या चावीच्या दगडावर उभी राहिली होती. खडर्याच्या लढाईमुळें पेशव्यांच्या राज्यकमानींतील पेशवेरूपी चावीचा दगड नानांनीं उपटून काढून त्या ठिकाणीं ते स्वतः जाऊन बसले व कमानीखालीं देव्हाऱ्यांत पेशव्यांना बसविलें. यामुळें पेशव्यांच्या राज्यांतील देव जरी गेला तरी राज्यमंदिराला धोका पोंचणार नाहीं, तें जशाच्या तसें कायम राहील, नानांची चावी हयात असें तोंपर्यंत राहील, असें झालें. इतकें दिवस नानांनीं कारभार केला त्यांत त्यांनीं जुन्या सर्व सरदारांत, मुत्सद्यांत व इतर स्वतंत्र राज्यकर्त्यांत निरनिराळ्या प्रकारांनीं फूट पाडली. ही फूट पाडण्याची कामगिरी खडर्याच्या लढाईमुळें संपली ह्मणून नानांस परमानंद झाला. खडर्याच्या लढाईंतील नानांच्या विशेष विजयाचें रहस्य हेंच आहे.

२३. या खर्ड्याच्या लढाईंतील विजयामुळें बाकीच्या सर्व गोष्टी बाजूला ठेवल्या असतां एक गोष्ट मात्र प्रामुख्यानें दिसून येते. ती ही कीं, माधवराव पेशव्यांच्या मरणकाळीं पेशवे सरकारच्या राज्याचा जेवढा विस्तार होता व जेवढ्या उत्पन्नाचा मुलूख त्यांच्या राज्यांत समाविष्ट होत होता, तेवढा या लढाईमुळें पुन्हां पेशव्यांच्या ताब्यांत आला होता. शिवाय त्या वेळीं शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले, पटवर्धन वगैरे सरदार व पेशव्यांच्या राज्याचे आधारस्तंभ जसे माधवरावांच्या आज्ञेंत वागत होते तसेच त्या वेळीं ते नानांच्या आज्ञेंत वागूं लागले होते. इंग्रज, टिपू, हैदर वगैरे परकीय सरकारांशीं तह होऊन तेही या वेळीं आपापल्या मर्यादेंत वागूं लागले होते. एकंदरींत नानांनीं थोरल्या माधवरावांचा एकदां जो पक्ष धरला व त्याला अनुसरून त्यांनीं जीं कारस्थानें केलीं त्यामुळें त्यांनीं पेशवे घराण्यांतील भाऊबंदी तंट्याचें पूर्णपणें निर्मूलन केलें; आणि सर्व संकटांना तोंड देऊन पेशव्यांच्या राज्याचा विस्तार व त्यांचे वैभव खर्ड्याच्या लढा-

ईतील विजयामुळें कायम केलें. त्या वेळीं पेशव्यांच्या भाऊबंदांपैकीं अव-शेष असे राघोबादादांचे जरी मुलगे राहिले होते तरी ते शिवनेरी किल्ल्यांत नानांच्या कडक बंदोबस्तांत असल्यामुळें, इत:पर भाऊबंदी तंट्याला कोठेंच वाव मिळण्याचें कारण उरलेलें नव्हतें. यावरून पेशवाई भाऊबंदी तंट्या-मुळें बुडाली अशीं जीं विधानें करण्यांत येतात, तीं साफ खोटीं असून, भाऊबंदी तंट्यामुळें पेशवाई बुडाली नाहीं, तर ती दुसऱ्याच कारणांनीं बुडाली हें त्रिवार सत्य लक्षांत ठेऊन पुढील इतिहासाचें परिशीलन करणें इष्ट आहे.

२४. या वेळीं सवाईमाधवरावांचें वय एकवीस वर्षांचें होतें. लग्नाच्या एकाच नव्हे तर दोन मंडपांतून ते गेले होते. नानांच्या कडक शासन पद्धतीचा मार्ग लहानपणापासून ते चोखाळीत होते. नानांच्या कारस्थानी वातावरणांत त्यांची वाढ होत होती. नानांनीं कोणत्याच राजकारणाचा वास सवाईमाधवरावांना जरी येऊं न देण्याचा प्रयत्न केला होता, तरी मनुष्यमात्राच्या वाढत्या चिकित्सकमनोधर्माच्या स्वयंभू निरीक्षणधर्माला, त्यांना आळा घालतां येण्यासारखा नव्हता. नानांचा वाडा व पेशवे सर-कारांचा वाडा हे त्या वेळीं कारस्थानी डावपेंचांच्या, कारस्थानी हालचा-लींच्या, कारस्थानी संभाषणें-पत्रव्यवहार वगैरेच्या, कारस्थानी वागणूक-व्यवहार पाळणें, वगैरेंच्या सशब्द वा नि:शब्द प्रतिध्वनींनें इतके घुमत होते कीं, त्या वातावरणांत एकादा आंधळा किंवा बहिरासुद्धां आपोआप आपल्या बुद्धीप्रमाणें मुत्सद्दी बनूं शकला असता. सवाईमाधवराव यांच्या अंगांत अस्सल पेशव्यांचें रक्त खेळत होतें. पेशवे घराणें सिंहाच्या जातीचें होतें. सिंहाच्या पोराला मांजर म्हणून लहानपणापासून कडक धाकांत वाढविलें तरी त्याच्या अंगांतील रक्त सिंहाच्या मनोधर्माचें असल्यामुळें तें वयांत आल्यावर प्रसंगविशेषीं आपल्या रक्ताच्या धर्माकडेच वळणार हा सृष्टिधर्मच आहे. सरकशींत रिंगमास्तर वाघ, सिंह इत्यादि हिंस्र-पशूंवर आपली हुकमत चालवून त्यांच्याकडूनही आपल्याला जे

पाहिजेत ते खेळ करून घेतो. पण त्या वेळीं तो त्यांच्या जातिविशिष्ट धर्माला न दुखवितां युक्तीनें काम करून घेतो. सिंहाच्या ठिकाणीं मांजराचा धर्म आहे, असें तो कधींच मानीत नाहीं. रिंग मास्तरानें वाघ अगर सिंह यांच्या जातिविशिष्ट धर्माला दुखवून आपला कार्यभाग साधण्याचा क्वचित् प्रसंगीं जर प्रयत्न केला, तर ते त्याच्यावर, आजपर्यंत खाऊं घातलेलें अगर रक्षण केलेलें विसरून जाऊन उलटून पडतात. त्या प्रसंगीं रिंगमास्तर तरी मृत्युमुखांत पडतो किंवा रिंगमास्तराला तरी पिस्तुलानें वाघ, सिंहाची पारध करावी लागते. हे अनुभव सरकशींत मधून मधून घडून आलेले दिसून येतात. भावार्थ एवढाच कीं, तुह्मी त्याला राजकारण ह्मणा, कुटिल कारस्थान ह्मणा, अगर सामान्य व्यवहार ह्मणा, या तत्वाप्रमाणें ज्याला ज्याला कार्य साधून घ्यावयाचें असतें, त्याला त्याला जातिविशिष्ट धर्माच्या चाकोरींतून जावें लागतें. सवाईमाधवराव साधारणपणें वयांत आले, त्यांना राजा आणि प्रजा यांच्या नात्याची त्यांच्या बुद्धीच्या मगदुराप्रमाणें जाणीव आली, न्याय अन्याय यांतील भेद कळूं लागला; इभ्रत, मानखंडना यांतील फरक त्यांना कळूं लागला; मालक व नोकर यांचे संबंध कसे असावे याची कल्पना येऊं लागली, स्वतःचा फायदा व नुकसान कशांत आहे याचाही बोध त्यांच्या मनाला होऊं लागला. त्या वेळीं त्यांनीं नानांचीही पर्वा न करतां घाशीरामाचें पारिपत्य केलें. ब्राम्हणांना पूज्य मानणारे महादजी शिंदे ब्राम्हणशाही अपहार करण्याकरतां पुण्यास येत आहेत, अशा खोडसाळ कंड्या उठवून नानांनीं जे प्रयत्न केले ते शिंद्याच्या प्रत्यक्ष वर्तनानें खोटे ठरल्यामुळें, नानापेक्षां शिंदे किती तरी थोर मनाचे, उघड अंतःकरणाचे व पराकाष्ठेच्या स्वामिभक्तीचा हृदयांत ओलावा असलेले आहेत असें प्रत्यक्ष त्यांच्या अनुभवाला आलें. त्यामुळें पेशव्यांच्या जातिविशिष्ट रक्तधर्माप्रमाणें आजपर्यंतच्या पालनकर्त्या व संरक्षणकर्त्या नानांचा सहवास व वागणूक सवाईमाधवरावांना अप्रिय व अन्यायाची वाटूं लागली. त्यांना महादजी प्रिय व हितकर्ते वाटूं लागले. महादजी शिंद्यांनीं नानांचीं बरींच कुलंगडीं बाहेर काढल्यामुळें नानांच्या स्वभावधर्माची त्यांना ओळख

पटून, नारायणरावांचा वध, राघोबादादांची उचलबांगडी, आनंदीबाईंचा छळ, त्यांच्या मातोश्री गंगाबाई यांचा मृत्यु, मोरोबा व सखारामबापू यांचा कडक कारागृहवास, राघोबादादांच्या मुलांच्या शिक्षणाची आबाळ व कडक कैद, खऱ्या सदाशिवरावभाऊंना तोतया ठरवून त्यांना दिलेलें शासन, स्वतः त्यांना प्रिय झालेल्या महादजी शिंद्यांचा अकल्पित मृत्यू व नानांची राज्यसूत्रें हालविण्याची एकसूत्री पद्धति, या ठळक ठळक गोष्टींतून साशंक मनानें व चिकित्सक बुद्धीनें घुसण्याचा त्यांनीं प्रयत्न केला नसेल असें म्हणतां येत नाहीं. उलट महादजी शिंद्यांच्या मृत्यूनंतर नानासंबंधीं त्यांचें मन प्रशस्त नव्हतें व खर्ड्याच्या लढाईनंतर तें जास्त उदास झालें एवढें मात्र निर्विवाद आहे.

२५. पेशवाईंत पेशवेपद व पेशव्यांचा कारभार एकाच घराण्यांत चालत आले होते. मुख्य शाखेकडे पेशवेपद व दुय्यम शाखेकडे कारभार अशी वांटणी शाहुमहाराजांनींच केली होती. त्याप्रमाणें तो कारभार दुय्यम शाखेकडे नारायणराव पेशव्यांपर्यंत चालला. केवळ फडनविशीच्या पदापेक्षां बहुमानाच्या पेशव्यांच्या कारभारीपदाची चट माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत नानांना लागली होती. पुढें माधवरावांनीं मरणसमयीं पेशवाईचा कारभार पुन्हां राघोबादादा यांच्यावर सोंपविला. त्यामुळें नानांना परत आपल्या फडनविशीच्या पदावर मागें यावें लागलें. त्यामुळें कारभारीपदाची चट लागलेल्या महत्वाकांक्षी नानांना तें बरें वाटलें नाहीं. म्हणून त्यांनीं नानाविध कारस्थानें करून पुन्हां कारभारीपद हस्तगत केलें आणि ह्या कारभारीपदाचे अधिकारी जे राघोबादादा व सदाशिवरावभाऊ यांचा क्रमाक्रमानें कांटा काढून टाकल्यामुळें कारभारीपदावर हक्क सांगणारा पक्ष त्यांनीं तात्पुरता तरी मोडून काढला होता. तात्पुरता म्हणण्याचें कारण एवढेंच कीं, या कारभारीपदावर आपला कायदेशीर हक्क सांगणारा राघोबादादांचा मुलगा बाजीराव हा होता. पण तो अल्पवयी असल्यामुळें राघोबादादांच्या मरणानंतर बरेच दिवसपर्यंत तरी नानांना आपणाला कोणी प्रतिस्पर्धी होत नाहीं असें वाटूं लागलें होतें. पुढें बाजीराव जसजसा मोठा होऊं लागला तसतशी नानांना काळजी वाटूं

लागली. परंतु या मधल्या काळांत सवाईमाधवरावही अज्ञानावस्थेंत असल्यामुळें पेशवेपदाच्या अधिकाराचाही मासला नानांना चाखावयास मिळाला. अर्थात् कारभारीपदापेक्षांही पेशवेपदांत जास्त माधुर्य आहे असें त्यांच्या अनुभवास आलें. ज्यांची विशिष्ट महत्वाकांक्षा अगर हिंस्रवृत्ति असते त्यांना वरच्या दर्जाचें खाद्य मिळालें ह्मणजे पहिल्या खाद्यानें त्याचें समाधान होत नाहीं. वाघाची अशीच वृत्ति आहे. वाघ जंगलांत जनावरें मारून आपला निर्वाह करतो. परंतु त्याला एकदा मनुष्याच्या रक्त-मांसाची चट लागली ह्मणजे त्याला जनावरांच्या मांस-रक्तानें समाधान होत नाहीं. मनुष्यच खावयाला मिळालें पाहिजे, अशी त्याची धडपड चालू असते. अशा वाघाला 'आदमखोरा'[१] असें ह्मणतात. ही आदमखोरवृत्ति नानांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली होती. ह्मणून पेशवे जरी वयांत आले असले तरी त्यांच्या हातीं कोणताच अधिकार अगर कारभार आपण होऊन त्यांनीं दिला नाहीं. त्यांना यावज्जीव अज्ञान अवस्थेंत ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. पेशवेपदाचे अधिकार जोंपर्यंत नानांच्या हातीं आहेत, तोंपर्यंत कारभारीपद कायम आहे अशी विचारसरणी नानांनीं अनुभवानें बसविली होती.

२६. आनंदीबाईचा अंतकाळ आनंदवल्लीस झाला. त्यावेळीं अमृतराव, बाजीराव व चिमणाजी हे तिघेही तेथेंच होते. पुढें निजामावर स्वारी करण्याचा मनसुबा जसजसा रंगूं लागला, व नाना आणि सवाईमाधवराव स्वारीवर निघण्याचें घाटूं लागलें, त्यावेळीं मागील बंदोबस्त करण्याची नानांनीं जी सावधगिरी घेतली त्यांत या तीन्हीं मुलांचा बंदोबस्त झाला. या वेळीं या मुलांना आनंदवल्लीहून काढून शिवनेरी किल्ल्यांत मोठ्या कडक बंदोबस्तानें नेऊन ठेवण्यांत आलें. 'चोराच्या मनांत चांदणें' या ह्मणीप्रमाणें नानांविरुद्ध बाजीरावाला कोणत्याच प्रकारें हातपाय हालवितां येण्यासारखी परिस्थिति नसतां बाजीरावाबद्दल नाना हे ज्याअर्थी विशेष खबरदारी घेत होते, त्याअर्थी त्यांच्या मनांत बाजीरावाबद्दल धास्ती वाटत असली पाहिजे

---

१ श्री. राजे लक्ष्मणराव भोंसले यांचें चरित्र पान १७४.

यांत शंका नाहीं. या धास्तीचें मूळ असें होतें कीं या वेळीं पेशवे ज्याप्रमाणें वयांत आले होते त्याचप्रमाणें बाजीरावही वयांत आले होते. पेशव्यांच्या कारभारीपदाचा खरा हक्क पेशवे घराण्यांतील पुरुषाचाच होता. तेव्हां सवाई-माधवरावांच्या मनांत आल्यास बाजीरावास कारभारीपद मिळेल व त्यामुळें नानांचा अधिकार संपुष्टांत येईल. एवढ्याकरतां बाजीरावाबद्दल पेशव्यांचें मन नेहमीं साशंकित ठेवण्याचा नानांनीं प्रयत्न केला. शिवाय तो कोठेंतरी पळून जाऊन आपल्या कारभारीपदाचा हक्क मिळविण्याकरतां प्रयत्न करील, ह्मणून त्यानें तो न करावा व तशी संधीच त्याला न मिळावी या-करतां नानांनीं त्याचा विशेष सावधगिरीनें शिवनेरी किल्ल्यांत बंदोबस्त केला होता.

२७. खर्ड्याच्या लढाईनंतर नाना व सवाईमाधवराव पेशवे यांच्या-मध्यें अधिकारासंबंधीं बेबनाव होऊं लागला. ‘ पेशव्यांस नांवाचे मात्र धनी करून, पेशवाईचा सर्व अधिकार आपल्याच हातीं ठेवावा असा नानांचा हट्ट होता; व त्यामुळेंच त्यांनीं लहानपणापासून पेशव्यांस आपल्या जरबेंत ठेवलें, ते वयांत आल्यावर देखील त्यांच्या हातीं तिळप्राय सत्ता दिली' नाहीं ' असे आरोप नानांवर उघडपणें समाजांत होऊं लागले. यावरून नाना व पेशवे यांच्यामध्यें यासंबंधीं खासगी रीतीनें वाटाघाटी सुरू होत्या व त्याचा प्रतिध्वनि समाजामध्यें उमटत होता हेंच खरें. नाना सर्व अधिकार आपल्या हातीं ठेऊन पेशव्यांना नामधारी बनवीत आहेत याचा अनुभव खुद्द पेशव्यांनाच अनुभवानें येत चालला होता. महादजी शिंद्यांबाबत उठलेल्या कंड्या खोटया ठरल्या, पण कंड्या उठविणारेच लोक पेशव्यांच्या मुळावर येत आहेत असें दिसून आलें, तेव्हां त्याला तोड म्हणजे या वेळीं बाजीराव वयांत आल्यामुळें त्याचा अधिकार त्याला देऊन टाकणें ही एकच होती व ती घडवून आणण्याचा सवाईमाधवराव जातीनें प्रयत्न करीत होते. हा प्रयत्न खुद्द पेशव्यांचा म्हणजे प्रत्यक्ष राजाचा आपल्या सर्वाधिकारी कारभाऱ्या

---

१. खरेकृत नाना फडनविसांचें चरित्र पा. १६४.

विरुद्ध होता. अर्थात् हें नानांच्या एकतंत्री राज्यकारभारांतील एक नवीनच 'राजाचें बंड' होतें' असेंच ह्मणावें लागेल. या राजाच्या बंडाला सुरवात झाल्यानंतर दोन पक्ष निर्माण झाले. सवाईमाधवरावांचा राजपक्ष व नानांचा नोकरशाहीपक्ष असा त्याला रंग उत्पन्न झाला. राजपक्षांतील लोकांना नोकरशाहीविरुद्ध इतर समाजाचें पाठबळ मिळण्याकरतां जी चळवळ करावी लागली, त्याचा भावार्थ असा होता कीं, 'पेशवाईपद आणि पेशवाईराज्याचा कारभार हीं दोन्हीं आजपर्यंत एकाच घराण्यांत चालत आलीं आहेत. पेशवाईचा कारभार करण्याचा अधिकार वस्तुतः बाजीरावसाहेबांचा आहे. ते वयानें लहान होते तोंपर्यंत नानांनीं कारभार केला, हें ठीकच झालें. परंतु ते आतां प्रौढ वयाचे झाले असूनही त्यांचा अधिकार त्यांजकडे अजून दिला जात नाहीं हा नानांचा केवढा हावरेपणा! बाजीरावसाहेब मोठे धर्मपरायण, अत्यंत कुशाग्र बुद्धीचे, सच्छील वर्तनाचे आणि सिंहाप्रमाणें महापराक्रमी आहेत! त्यांच्या तोडीचा सद्गुणसंपन्न पुरुष आजपर्यंत झाला नाहीं व पुढेंही होणार नाहीं! अशा नरशार्दूलाला प्रतिबंधांत ठेविलें जात आहे हा नानांचा केवढा अन्याय! बाजीरावाच्या हातीं अधिकार देऊन नानांनीं फडनिशीचें काम संभाळून हरी हरी ह्मणत स्वस्थ कां बसूं नये?'[1]' यावरून पाहतां नोकरशाहीपक्षाकडे राजपक्षाची मागणी पूर्ण न्यायाचीच होती असेंच कोणीही ह्मणेल. राजाच्या अगर कारभाऱ्याच्या अज्ञानावस्थेंत दिवाणानें अगर कारभाऱ्यानें राज्यव्यवस्था पहाणें व्यवहार्य होतें. परंतु राजा अगर कारभारी वयांत आल्यावर व ते आपले अधिकार मागूं लागल्यावर कोणतीं तरी कारणें दाखवून त्यांना ते अधिकार न देणें ही आदमखोरी व्याघ्रवृत्ति आहे यांत संशय नाहीं. या वेळीं नानांच्या वयाला त्रेपन्नावें वर्ष संपून चोपन्नावें वर्ष लागलें होतें. गेलीं वीस वर्षें त्यांनीं पेशवाईचा संपूर्ण कारभार चालवून आपली महत्वाकांक्षा पुरी करून

---

१ खरेकृत नाना फडनविस यांचें चरित्र पा. १६३.

घेतली होती. वयपरत्वें त्यांच्या स्वभावतः अशक्त शरीरावर वार्धक्याची कळा चावरूं लागली होती. अशा वेळीं पेशवाईचें गतवैभव ऊर्जितावस्थेला आणल्याचें श्रेय त्यांना कसेंबसें मिळालें होतें. तेव्हां अशा सुवर्ण संधीचा फायदा घेऊन पेशवेपद व पेशव्यांचें कारभारीपद सवाईमाधवराव व बाजीराव यांच्या योग्य मागणीप्रमाणें त्यांच्या स्वाधीन करून स्वतः आपण सेवा-निवृत्त होणें हें सज्जन माणसाचें कर्तव्य होतें. हें कर्तव्य नानांनीं जर या सुवर्ण संधीच्या वेळीं बजावलें असतें तर नाना हे पेशवाईच्या हक्काकरतां, ब्राह्मणी राज्याकरतां झगडणारे होते ह्मणून त्यांची जगद्वंद्य ख्याति झाली असती. परंतु महत्वाकांक्षेच्या अतिरेकाला जाऊन भिडलेल्या नानांना ही सद्बुद्धि कोठून होणार ! आदमखोर वाघ जखमी होऊन मृत्यूच्या जबड्यांत सांपडला असतांही जो मनुष्य दिसेल त्याच्यावर झडप घालून तो जसा त्याचा प्राण घेतो, तसेंच वयपरत्वें नाना मृत्यूच्या दरवाजाला स्वतः जाऊन भिडले तरी त्यांनीं आपली आदमखोरवृत्ति सोडली नाहीं, यांतच नानांच्या स्वभावधर्माचें रहस्य सांठवलेलें आहे. जाति-वंत दुर्जन मनुष्याला मरणाचे वेळींही चुकूनसुद्धां सद्बुद्धि होत नाहीं हेंच खरें !

२८. सवाईमाधवराव पेशवे व बाजीराव पेशवे यांच्या मागणीप्रमाणें त्यांना त्या त्या पदाचे अधिकार सोंपवून व आपण बहुमानानें सेवा-निवृत्त होऊन, त्यांना योग्य वेळीं योग्य सल्ला देऊन पेशव्यांच्या राज्यव्यवस्थेसंबंधीं धोरण व राजकारण यांचें नानांनीं त्यांना शिक्षण दिलें असतें, तर पेशवाईचें पुनरुज्जीवन केल्याचें पुण्य त्यांच्या पदरांत खात्रीनें पडलें असतें. परंतु महाराष्ट्राच्या दुर्दैवानें त्यांना तसें करूं दिलें नाहीं. नानांनीं आपल्या नोकरशाहीपक्षाला निराळें वळण दिलें, व सवाईमाधवरात्र आणि बाजीराव यांची मुस्कुटदाबी जास्त कडक रीतीनें करण्याचें त्यांनीं ठरविलें व तसे प्रयत्न सुरू केले. यामुळें पेशवाईच्या राज्यक्षितिजावर सवाईमाधवराव व बाजीराव यांच्यासारखे उदय पावणारे तेजःपुंज दोन तारे नानांनीं

अनुक्रमें नष्ट व तेजोहीन करून टाकले. नानांची ही दुष्ट व सर्वनाश करणारी कृति महाराष्ट्र युगांतरींही विसरणार नाहीं.

२९. बाजीराव वगैरे त्रिवर्ग बंधूंना नानांनीं शिवनेरी किल्ल्यावर सक्त कैदेंत ठेविलें, त्या वेळीं त्यांच्यावर राघोपंत गोडबोले व बळवंतराव नागनाथ या आपल्या विश्वासू कामगारांची योजना केली होती.[१] बाजीरावाच्या शिक्षणाबद्दल नानांनीं सर्व बाजूंनीं जरी आबाळ केली होती, तरी आनंदीबाईचें मातृहृदय गप्प बसलें नव्हतें. त्याही परिस्थितींत बाजीरावाला धाकदपटशा दाखवून योग्य शिक्षण देण्याची त्यांनीं पराकाष्ठा केली. त्यामुळें घोड्यावर बसणें, तरवार धरणें, व तिरंदाजी करणें या कामांत बाजीराव फार कुशल झाला. भाला फिरविण्यांत तो इतका तरबेज झाला कीं, साऱ्या गंगथडींत त्या वेळीं त्याच्यासारखा दुसरा कोणी नव्हता. याशिवाय तो शास्त्रनिपुण होता व याज्ञिक कर्मांतही फार सूज्ञ होता. बाजीराव या वेळीं तारुण्याच्या अगदीं भरांत होता. त्याचा अंगलोट अगदीं नीटस असे. त्याच्या मुखचर्येवर एवढें दिव्य तेज फांकलेलें होतें कीं, त्याच्याकडे पाहतांच सहज मन आकर्षण केलें जाई. त्याच्या भाषणांत इतकें माधुर्य होतें कीं, ऐकणारा ताबडतोब मोहित होई.[२] बाजीरावाची ही कीर्ति सवाईमाधवरावांच्या कानीं पडल्यानंतर त्याला एकदां तरी भेटावें असें सवाईमाधवरावांना वाटे. बाजीराव हा सवाईमाधवरावांचा चुलत चुलता होता. बाजीरावाला भेटण्याची जरी सवाईमाधवरावांना इच्छा झाली व ते जरी या वेळीं जगाच्या दृष्टीनें सज्ञान झाले होते, तरी त्यांची ती इच्छा पुरी होणें अगर न होणें सर्वस्वी नानांच्या हातीं होतें. ह्मणून त्यांनीं याबद्दल नानांच्याजवळ प्रश्न उपस्थित केला. त्या वेळीं नाना ह्मणाले 'तो किती जरी चांगला असला, तरी तो तुमचा शत्रु आहे असें समजा; त्याचा बाप

---

१. नाना फडनाविस यांची बखर पा. १२३. २. डफकृत मराठ्यांची बखर पा. ३१८.

रघुनाथराव व आनंदीबाई त्याची आई, हें स्मरण धरून असावें.' याप्रमाणें नाना सवाईमाधवरावांची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत होते; परंतु अशा प्रकारानें सवाईमाधवराव यांची समजूत पडली नाहीं. उलट जसजसे बाजीरावाच्या भेटीकरतां नाना अडथळे उत्पन्न करीत तसतशी त्याच्या भेटीबद्दल सवाईमाधवरावांची इच्छा दुणावत होती. सवाई-माधवरावांच्या मनांत आपल्याबद्दल दया व प्रीति आहे, हें बाजीरावाला कळतांच, त्यानें बळवंतराव नागनाथ नांवाच्या शिवनेरीच्या नानाच्या कामदारास अनुकूल करून घेतलें व त्याच्या करवीं त्यानें सवाईमाधवराव यांच्याकडे निरोप पाठविला. 'सांप्रत मी शिवनेरी किल्ल्यांत नानांचे बंदींत आहे. आणि आपण आपल्या गादीवर असून त्यांच्या (नानांच्या) बंदोबस्तामुळें हल्लीं मजसारखेच आहांत. नानांचा बंदोबस्त आपल्या देहापुरताच आहे. आपल्या मनावर बंदोबस्त ठेवणें त्यांच्या हातीं नाहीं. तेव्हां तुमचा व आमचा स्नेह मात्र असावा. उभयतांचे वडील पूर्वीं जसे नामांकित झाले तसेच आपणही याही परिस्थितींतून निघून समयविशेषीं होऊं.' या बाजीरावाच्या निरोपानंतर सवाईमाधवराव व बाजीराव यांचा पत्रव्यवहार बळवंतराव नागनाथ याचे करवीं सुरू झाला. हें वर्तमान कांहीं दिवसांनीं नानांना समजलें. सवाईमाधवरावांचें लक्ष बाजीरावाकडे आहे असें नानांना दिसून आल्यानंतर सवाईमाधवरावांचे भोंवतीं त्यांनीं गुप्त हेरांचें जाळें पसरून ठेवलें होतें. नानांनीं बळवंतराव नागनाथ याच्या पायांत बिडी घालून त्याला किल्ल्यावर नेऊन टाकलें व शिवनेरी किल्ल्यावर बाजीरावाभोंवतीं पहिल्यापेक्षां विशेष कडक बंदोबस्त केला. या वेळीं नानांना सवाईमाधवरावांचा एवढा राग आला कीं, तो पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. या रागाच्या भरांत नानांनीं सवाईमाधवरावांची अत्यंत[१] निर्भत्सना केली; व त्यांना चांगला दमही दिला. सवाईमाधवराव हे पेशव्यांच्या राज्याचे मालक असून ते सज्ञान होऊन गादीवर असतांना नानांनीं त्यांना जो दम

---

१. नाना फडनविस यांची बखर पा. १२५

दिला तो त्यांची अधिकारधुंदी पराकोटीला गेली होती ह्मणूनच दिला असें स्पष्ट दिसतें. याबाबत प्रभाकर कवीनें सवाईमाधवरावांच्या मृत्यूवर जो पोवाडा[1] रचला आहे त्यांतील माहिती खालीलप्रमाणें आहे.

"नये नानाचे मनास जाहलें विपरित इतरांस ॥
झिडकारुनि एकांतीं वदती नित्य सरकारास ।
स्वस्थ बसावें आपण जेवुन पंचामृत सुग्रास ॥
बहुत हट्ट जरि कराल तरि तुह्मी मुकाल प्राणांस ।
त्यांची अवस्था तीच तुमची पुढें येईल आकारास ॥
॥चाल॥ शब्दशरें ताडितां लोचनीं जळबिंदु वाहाती ।
दसऱ्याचे दिशिं अंबारींतुन उडी घालूं पाहती ॥"

या पोवाड्यावरून जास्तकमी कराल तर इतराप्रमाणें तुमचाही प्राण घेतला जाईल अशी नानांनीं सवाईमाधवरावांना धमकी दिली होती हें स्पष्ट होतें.

३०. नानांच्या कारस्थानाला पोषक व त्यांच्या महात्वाकांक्षेला मदतगार असा जेव्हां सवाईमाधवरावांचा जन्म झाला, तेव्हां नानांनीं त्यांना विष्णूचा अवतार बनविलें. सवाईमाधवराव यांचेमधील ही अवतारकळा नानांना जोंपर्यंत त्यांची गरज होती तोंपर्यंत, ह्मणजे खर्ड्याच्या लढाईपर्यंत राहिली. सध्यां पेशव्यांच्या राज्याचीं सर्व सूत्रें नाना या एकट्या व्यक्तीच्या हातीं आल्यामुळें त्यांना आपल्या महत्वाकांक्षेच्या पूर्ततेकरतां सवाईमाधवरावांची जरूरी राहिली नाहीं. शिवाय नानांची शासनपद्धति अशी होती कीं, आपल्या प्राणप्रिय असलेल्या अधिकाराच्या आड जो कोणी येईल, त्याला दयामाया, न्यायनीति, वगैरे कशाचेंही बंधन न पाळतां व ठेवतां 'आडवें आलें तर कापून काढा' हें एकच

१ ॲकवर्थसाहेब पो. पु. पृ. ८१.

धोरण त्याच्या बाबतींत नानांनीं ठेवलें होतें. त्या वेळपर्यंत नानांच्या अधिकाराच्या आड येणारे प्रत्यक्ष पेशवे नव्हते. आतां विष्णूचा अवतार ठरविलेले सवाईमाधवराव नानांच्या अधिकाराच्या मुळावर आल्यामुळें, त्यांची देवकळा त्यांना काढून ध्यावी लागली व भंग पावलेल्या देवाच्या मूर्तिप्रमाणें देवघरांतून काढून ती उकीरड्यावर नेऊन टाकावी लागली. या वेळेपासून नानांच्या गारुडी मंत्रानें देवकळा असलेले विष्णूचे अवतार, सवाईमाधवराव, हे पेशव्यांच्या गादीवरून घसरून जाऊन शनिवारवाड्यांत नानांच्या कडक शिस्तीच्या नजरकैदेंत जाऊन पडले.

३१. सांगू तें करावें, देऊं तें नेसावें व घालूं तें खावें, या मर्यादेंत वागून पाहिजे तर जगावें नाहीं तर प्राणाला मुकावें लागेल, असा रोख ठोक हुकूम नानांनीं ज्या वेळीं पेशव्यांना फर्माविला, त्या वेळीं आपण कोण याची जाणीव त्यांना झाली. आपण अवतारी पुरुष नाहीं, आपण अधिकारी पेशवे नाहीं, आपल्या हातांत सामान्य मनुष्याप्रमाणें स्वतःची सत्ता अगर मत्ताही पण नाहीं. आपण नानांच्या सोन्याच्या पिंजऱ्यांत कोंडलेला राघु आहों, यापेक्षां आपणाला दुसरें कोणतेंच अस्तित्व नाहीं, ही नानांनीं केलेली आपली दुर्दशा ज्या वेळीं सवाईमाधवरावांच्या अनुभवाला आली, त्या वेळीं 'पेशव्यांना नामधारी करून सर्व पेशवाईची सत्ता नाना अपहार करण्याच्या प्रयत्नांत आहेत' याचा पडताळा त्यांना मिळाला. पण सवाईमाधवरावांना हें फार उशिरां समजलें. नानांनीं त्यांच्या सर्व बाजूंनीं नाड्या आंखडून टाकल्यानंतर त्यांच्या हें लक्षांत आलें. नानांच्या या कैदेंतून सुटण्याचा एकच विचार त्यांच्या मनांत थैमान घालूं लागला. सवाईमाधवराव नानांच्या सूत्रानें वागण्यास आधींच कंटाळलेले होते. त्यांत आपला हितकर्ता बाजीराव यास नानांकडून अधिक उपद्रव होऊं लागल्याचें ऐकून त्यांच्या मनाला अधिक दुःख झालें. आपल्या झालेल्या मानभंगामुळें लोकांना आपलें दर्शन देणें त्यांच्या जिवावर येऊं लागलें.

त्यांनीं लोकांच्या भेटी घेण्याचें बंद केलें, आपला बसण्याचा दिवाणखाना सोडून ते कोठेंही बाहेर पडत नाहींसे झाले. त्यांनीं दरबारांत जाण्याचें सोडलें. यामुळें त्यांना ज्वर[१] येत असल्यानें ते आजारी आहेत अशी कंडी उठविण्यांत आली.

३२. सवाईमाधवराव यांचा बालपणापासूनचा स्वभाव नानांच्या पूर्ण परिचयाचा होता. नानांच्याच सहवासांत ते लहानाचे मोठे झाले होते. त्यामुळें त्यांची निर्भत्सना व मानभंग केल्यामुळें ही गोष्ट पुढें कोणत्या थराला जाईल हें ते पक्कें जाणून होते. शिवाय सवाईमाधवरावांचें काय केलें असतां आपल्या महत्वाकांक्षेची पूर्तता होईल हेंही त्यांनीं ठरविलें असलें पाहिजे. याकरतां त्यांनीं पूर्व तयारी करून ठेविली. नारायणरावांचा खून राघोबादादांवर घालून ज्याप्रमाणें त्यानीं आपल्या कारस्थानाचा डाव जिंकला, त्याचप्रमाणें सवाईमाधवरावांच्या बाबतींतही त्यांनीं पूर्व तयारी करून ठेविली होती. नारायणरावांचा खून राघोबादादांच्या अंगीं चिकटविण्याला निदान ते त्या वेळीं शनिवारवाड्यांत तरी राहत होते. परंतु सवाईमाधवरावांचा खून बाजीरावाच्या अंगीं चिकटवावा तर ते शिवनेरी किल्ल्यांत कैदेंत होते. तेव्हां हा संबंध जोडून ठेवण्याची एक अतर्क्य शक्कल नानांनीं काढली व त्याचप्रमाणें एक अद्भुत कंडी पुण्यांत पसरविण्यांत आली.

३३. आनंदीबाई चेटुक करते, ती मांत्रिक-चेटकी आहे, अशी भूमिका पूर्वीच तयार झाली होती. राघोबादादांसंबंधींही अशीच कंडी पिकविण्यांत आली होती. बाजीराव हा त्यांचाच मुलगा. तेव्हां त्यांच्या वळणावरच तो जाणार हा उपदेश नाना सवाईमाधवरावांना वरचेवर देतच होते. अर्थात् त्यांच्या दृष्टीनें बाजीरावही मांत्रिक व चेटकी असणें शक्य होतें. त्याकरतां बाजीरावानें सवाईमाधवरावांवर जादुटोणा केला अशी कंडी त्यांनीं उठविली. 'बाजीराव कैदेंत होते. त्यांनीं प्रयोग रावसाहेब (सवाईमाधवराव) यांजवर केला. प्रयोग सिद्ध झाल्यावर त्या प्रयोगवाले ब्राम्हणांनीं ताईत भारून दिले, आणि सांगितलें

१ डफकृत मराठ्यांची बखर पा. ३१९.

कीं, " या ताईतांस श्रीमंतांचा स्पर्श झाला म्हणजे त्यांचे मतीस भ्रंश होईल. " असें सांगितल्यावर तेथें विचार पडला कीं, " हे ताईत नेऊन श्रीमंतांस दाखवितो कोण ? आणि त्यांचा ताईतास स्पर्श होतो कसा ? " तेव्हां बळवंतराव नागनाथ वामोरीकर हे पागे सरकारांतून बाजीरावसाहेब यांचे रखवालीस पागे सुद्धां होते. तेव्हां बळवंतराव नागनाथ यांची लगत बाजीरावसाहेब यांजपाशीं पडली होती. त्यामुळें बळवंतराव नागनाथ हे फितुरांत वश झाले. दरबारांत नागनाथांची श्रीमंतांपावेतों जाण्यायेण्याची चाल पूर्वीपासून होती, या योगानें बळवंतराव ताईत घेऊन, पुण्यास येऊन आठ पंधरा दिवस राहून, नेहमीं जाण्यायेण्याचा पाठ चालवून, श्रीमंत रावसाहेब एकटे आहेत अशी संधि पाहून, त्या समयास ताईत काढून, श्रीमंतांपुढें ठेविला. तेव्हां श्रीमंतांनीं त्यास हात लाविला आणि ताईत नागनाथ यांनीं उचलिला. इतक्यानें प्रकृति बिघडली, तथपर्यंत नागनाथ पुण्यास [1] होते. " याप्रमाणें ही कंडी उठवून सवाईमाधवरावांच्या मृत्यूसंबंधींच्या आरोपाचा बोजा बाजीरावावर लादून पेशवेपद व कारभारीपद हीं दोन्हीं पदें मगरीप्रमाणें गिळलीं असतां तीं कायमचीं पचवून टाकण्याचें नवीन कारस्थान उत्पन्न करण्याचा नानांनीं हा प्रयत्न चालविला होता. या कंडीमुळें मुद्देमालाचा प्रश्न सुद्धां पुढें उपस्थित होऊं नये म्हणून सवाईमाधवरावांनीं ताईतास स्पर्श करतांच तो नागनाथ यांनीं उचलून घेतला त्यामुळें मुद्देमाल मिळूं शकला नाहीं, अशी वकिली कसरत पुढें करतां यावी, एवढें दूरदर्शी धोरणही या कंडींत ठेवण्यांत आलें होतें हें विशेष आहे. त्या वेळीं ईश्वरी अवतार वगैरे संबंधीं बहुजन समाजांत जशी भावना जागृत होती, त्याचप्रमाणें भूतपिशाच्च, जादू टोणे, मंत्रतंत्र, विषप्रयोग वगैरेसारख्यासंबंधींही होती. नानांनीं या गोष्टींचा आपल्या कारस्थानांत पुरेपूर फायदा घेतला हें मागील इतिहासावरून दिसून येईल.

३४. नानांनीं सवाईमाधवरावांची स्वतंत्रता पूर्ण काढून घेतल्यानंतर, सवाईमाधवराव उदासीनपणानें आपले सर्व व्यवहार बंद करून ' अशा पार-

---

१ पेशव्यांची बखर आवृत्ति पांचवी पान १८०.

तंत्र्यांत जगण्यापेक्षां मरणें बरें ' असें ठरवून मरणाची वाट पहात बसले. त्यांनीं दरबारचीं कामें सोडलीं, लोकांच्या भेटी बंद केल्या. तरी त्यांच्या आजारीपणाचें निमित्त पुढें करून नाना सर्व कामें आपणच सांभाळून नेत होते. असें चाललें असतां दसरा आला. हा दसरा खर्ड्याच्या विजयानंतरचा पहिलाच होता. अर्थात् पूर्वीपेक्षां हा दसरा मोठ्या थाटानें नानांना साजरा करावासा वाटणें साहजिक होतें. आजपर्यंत दसऱ्याचे कुलाचार व लौकिकाचार खुद्द पेशव्यांकडून साजरे केले जात होते. पेशवे नसतील तर दसऱ्याची स्वारी निघत नसे. पेशव्यांशिवाय जर ही स्वारी निघण्याची रूढि असती तर पेशव्यांच्या आजारीपणाचें निमित्त पुढें करून नाना स्वतः पेशव्यांच्या जागीं अंबारींत बसून दसऱ्याच्या स्वारीचा समारंभ मोठ्या थाटांत पार पाडून नेऊं शकले असते, व दरबार भरवून सरदार मानकरी यांच्याकडून नजराणेही त्यांनीं मिळविले असते. परंतु तशी रूढि नसल्यामुळें नानांचा नाइलाज झाला. शेवटीं दसऱ्याच्या स्वारीला निघण्याबद्दल नानांनीं सवाईमाधवराव यांचेवर सक्ति केली व परतंत्र मनुष्याला मान—अपमान, राग—लोभ, कीर्ति—अपकीर्ति, सुख—दुःख कांहीं असूं शकत नाहीं याची पुन्हां एकदां त्यांना जाणीव दिली. या वर्षीचा दसरा तारीख २२ आक्टोबर सन १७९५ रोजीं आला. नानांनीं आपल्या अधिकारामुळें सवाईमाधवराव यांच्या देहावर सक्ति केली पण त्यामुळें त्यांचें मन मात्र दुःखातिरेकानें बेफाम झालें. त्यांचा नानाविषयींचा संताप मस्तकाला जाऊन भिडला. सीमोल्लंघनाकरतां ते हत्तीवर अंबारींत बसले. त्यांच्या जवळ आपा बळवंत होते. स्वारी चालली असतां सवाईमाधवरावांनीं अंबारींतून खालीं उडी घेऊन प्राणत्याग करण्याचा प्रयत्न केला. परंतु आपा बळवंत यांनीं त्यांचा हात धरून बसविलें.[१] सवाईमाधवरावांच्या या भडकलेल्या मनःस्थितीमुळें या वर्षीं ही दसऱ्याची स्वारी संध्याकाळचे चार घटिका दिवसास

---

१ पेशव्यांची बखर आ. ५ वी, पा. १८१.

वाड्यांत परत आली. सालाबादप्रमाणें मशाली लावून रात्रीं वाड्यांत आली नाहीं.

३५. ‘दुसरे दिवशीं एकादशी झाल्यानंतर द्वादशीस आश्विन आदितवार ह्मणून सरकारची स्वारी खालीं येऊन स्नानास बसली. इतक्यांत खिजमतगार यानें जाऊन विनंती केली कीं, “वैद्य प्रकृति पहावयास आले आहेत.” ह्मणून श्रीमंत उठून वरतीं दिवाणखान्यांत आले. वैद्य प्रकृति पाहून गेले. तों इतक्यांत ताई साठे, ही श्रीमंतांची आजी, येऊन श्रीमंतांपाशीं बसली. तिशीं बोलत बसले. दोन घटका दिवस आला. ताई उठून गेल्यानंतर, खिजमतगार व चोपदार व शागिर्द व जवळची मंडळी नेहमीं वागणारी कोणी नाहीं अशी गोष्ट झाली. माशी जाण्यास फरक (अवकाश) नाहीं असा बंदोबस्त असतां तो समय येऊन ठेपला. तेव्हां कोणी जवळ नाहीं! प्रातःकाळच्या तीन घटका दिवसास गणपतीचे दिवाणखान्यांतून उडी टाकली. खालीं कारंजें होतें. त्यावर जाऊन उडी पडली. कारंज्याची तोटी मांडींत शिरली. त्यानें मांडी मोडली व तोंड वांकडें झालें. बेशुद्ध झाले. त्या समयास कामाठी तेथें झाडीत होता. तो काय वाजलें ह्मणून जवळ पहावयास गेला. तों श्रीमंतास पाहिलें. त्याच्यानें हात लाववतो कीं काय? तेव्हां त्यानें पांचजन्य केला. तें ऐकून वाड्यांतील लोक धांवून येऊन जमा झाले. त्या वेळेस दाजीबा आपटे व मोरोपंत भावे जवळ येऊन श्रीमंतांस उचलून (त्यांनीं) दिवाणखान्याच्या खालच्या मजल्यांत आणिलें.’[1]

३६. नंतर वाड्यांत नाना, आपा बळवंत, महादजीपंत गुरूजी, बिनीवाले, पानशे, पोतनीस, चिटणीस, मुजुमदार वगैरे अनेक लोक जमले. तबीबांस आणून श्रीमंतांची मांडी मोडली होती ती नीट करून शिवली व तोंडही वांकडें झालें होतें तें नीट केलें. याप्रमाणें उपचार केले तरी ते शुद्धींत आले नाहींत. याप्रमाणें रविवार व सोमवार असे दोन दिवस गेले.

---

१ पेशव्यांची बखर पा. १८२.

मंगळवारीं आश्विन शु॥ पौर्णिमेस सायंकाळीं दोन घटका दिवस पावेतों कांहीं वेळ शुद्धींत तर कांहीं वेळ बेशुद्धींत सवाईमाधवराव होते. हरिपंत फडके यांचा मुलगा बाबूराव फडके हा श्रीमंतांचा परममित्र होता. तो त्यांच्या सुश्रुषेकरतां त्यांच्याजवळ होता. आतां आपला इहलोकावरील कारभार लवकरच आटोपणार असें सवाईमाधवराव यांना वाटलें. तेव्हां त्यांनीं बाबूराव फडके यास मोठ्या आग्रहानें सांगितलें कीं, ' माझे पाठीमागें गादीवर बाजीरावाची स्थापना करा. ' याप्रमाणें सवाईमाधवरावांनीं आपली मरणकालची उत्कट इच्छा प्रकट केली व ते तसेच बाबूरावाच्या अंगावर पडले. बाबूराव यांनीं श्रीमंतांना धरून बसविलें असतां त्यांच्याच अंगावर मान टाकून सवाईमाधवरावांनीं नानांच्या दुष्ट, कपटी व घातुक अशा कैदेंतून आपली कायमची मुक्तता करून घेतली. अशा प्रकारें तारीख २७ माहे आक्टोबर सन १७९५ रोज मंगळवारीं (आश्विन शु॥ पौर्णिमा शके १७१७) सूर्यास्ताबरोबरच सवाईमाधवरावांनींही आपला अस्त करून घेतला.

३७. सवाईमाधवरावांच्या मृत्यूबद्दल पेशव्यांच्या बखरींत जितकी माहिती सांपडते, तितकी इतरत्र कोठें सांपडत नाहीं. ती माहिती वाचून मनन केलें असतां मनांत अनंत विचारांचें काहूर माजूं लागतें. सवाई-माधवराव हे पूर्णपणें नानांच्या खास देखरेखीखालीं होते. एवढेंच नव्हे तर त्यांचा बाजीरावाबरोबर पत्रव्यवहार सुरू आहे असें नानांच्या नजरेस आल्यापासून सवाईमाधवरावांवर त्यांची पक्कया बंदोबस्ताची व्यवस्था होती. कोणास सवाईमाधवरावांची भेट घेणें असेल तर नानांच्या परवानगीखेरीज कोणाची भेट होत नव्हती. शनिवारवाड्यांत नानांच्या परवानगीखेरीज माशीला सुद्धां फिरकतां येत नव्हतें. एवढा नानांचा कडक बंदोबस्त होता. सवाईमाधवरावांची प्रकृति पहाण्याकरतां वैद्य जरी येत होता तरी तो नानांच्या विश्वासांतलाच होता. दसऱ्याच्या दिवशीं अंबारींतून सवाईमाधवरावांनीं उडी टाकून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पण

तो आपा बळवंत असल्यानें फसला ही गोष्ट नानांस माहीत होती. सवाईमाधवरावांचें मस्तक कशानें भणाणून गेलें आहे हें नानांना माहीत होतें. आत्महत्येचा प्रयत्न करणारा मनुष्य कशा प्रकारानें आत्महत्या करील याची कल्पना जगाचें राजकारण करणाऱ्या नानांना खात्रीनें असली पाहिजे. हा आत्महत्येचा प्रसंग सवाईमाधवराव यांच्यावर ओढवूं नये म्हणून त्यांच्यावर सतत पाहारा ठेवण्याकरतां दसऱ्यानंतर नानांनीं विशेष खबरदारी घेतली असेल यांत शंका नाहीं. सवाईमाधवरावांनीं आत्महत्या करून घेण्याकरतां ज्या दिवशीं उडी टाकली ती वेळ सकाळची होती. त्यावेळीं सूर्योदय होऊन तीन घटका झाल्या होत्या. ही वेळ म्हणजे शनिवारवाडा माणसांनीं गजबजलेला असावयाचा. अशा वेळीं वैद्य पेशव्यांची प्रकृति पाहून गेले. ताई साठे याही श्रीमंतांच्या भेटीस आल्या. त्या श्रीमंतांस भेटून गेल्याबरोबर वाड्यांत एकदम सामसूम होतें ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. जेथें माशी जाण्यास मार्ग नाहीं अशा ठिकाणीं खात्रीचीं माणसें सवाईमाधवरावांच्या तैनातीला व देखरेखीला ठेवलीं असतां त्याच वेळीं तीं एकदम गुप्त कोठें, कशीं व कां झालीं, हा मुख्य मुद्याचा प्रश्न आहे. ती वेळ जर अपरात्रीची असती तर प्रश्न निराळा होता. परंतु तशी वेळ नसतां सवाईमाधवरावांचे सर्व खिजमतगार, सर्व चोपदार, सर्व शागिर्द, नानांच्या गुप्त हेरांचा तांडा, रखवालदार, कामदार हे सर्व भूतचेष्टा झाल्याप्रमाणें एकाएकीं गुप्त झाले कसे व सवाईमाधवराव नानांच्या म्हणण्याप्रमाणें आजारी असतांना अगर त्यांना उन्मादवायु झाला असतांना, ते आपल्या दिवाणखान्यांत एकटेच राहिले कसे, ही जशी आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे, तशीच ती नानांच्या कारस्थानाचें माहेरघर आहे यांत शंका नाहीं. त्या वेळीं शनिवारवाडा म्हणजे स्मशान झालें नव्हतें. स्मशानांत प्रेतसंस्काराकरतां मंडळी गेली म्हणजे स्मशान गजबजलेलें दिसतें व ती निघून गेली म्हणजे पूर्ववत् निर्जन होतें, अशी शनिवारवाड्याची स्थिति नव्हती. असें असतां ताई साठे निघून गेल्यावर सुमारें एक घटकापर्यंत सवाईमाधवरावांसभोंवारचा सर्व नोकरगण एकदम

जो गुप्त झाला तो स्वेच्छेनें गुप्त झाला असें निदान नानांच्या करड्या अंमलांत तरी होणें अशक्य होतें. अर्थात् तो नानांच्या अनुज्ञेनेंच झाला असला पाहिजे. शिवाय सवाईमाधवरावांच्या मृत्यूनंतर त्यांच्या संरक्षणाची, जबाबदारी ज्या कामदारांवर किंवा नोकरांवर होती त्या त्या लोकांना न्याय कोर्टापुढें नानांनीं खेचलेलें कोठें आढळत नाहीं. यःकश्चित् एकादा कैदी तुरुंगांत मेला तर त्याबद्दल तुरुंगावरील अंमलदाराला जबाबदार धरण्यांत येतें. येथें तर पेशव्यांच्या राज्याचे मालक प्रत्यक्ष आपल्या शनिवारवाड्यांत आत्महत्या करून घेतात व त्याबद्दल नाना कोणतीच चौकशी करीत नाहींत. यावरून ज्या गोष्टी घडल्या त्या केवळ नानांच्या प्रेरणेनेंच होत्या असेंच ह्मणावें लागतें.

३८. नाना हे प्रत्येक मनुष्याचा स्वभावधर्म पूर्णपणें ओळखणारे होते, असाच त्यांचा नांवलौकिक होता. सवाईमाधवरावांना त्यांनीं अगदीं बाळपणापासून वाढविल्यानें त्यांच्या स्वभावधर्माची त्यांना सर्वांपेक्षां जास्त माहिती होती. दसऱ्याचे दिवशीं सवाईमाधवराव अंबारींतून उडी टाकून आत्महत्या करणार होते, हेंही त्यांना कळून चुकलें होतें. त्यामुळें सवाईमाधवरावांचा अखेरचा प्रयत्न काय होईल हें त्यांना समजलें होतें. घोड्याला टोंचलें असतां तो दुगाणी झाडतो, कुत्रा चावण्याकरतां अंगावर येतो किंवा ससा घाबरून जाऊन वाट दिसेल तिकडे पळत सुटतो, हा जसा त्या त्या जनावराचा स्वभावधर्म, तसाच मनुष्याचाही आहे. कोणत्या मनुष्याला कशा प्रकारें छेडलें असतां तो काय करील हें स्वभावधर्म जाणणारा मनुष्य ओळखूं शकतो. नाना त्या दर्जाचे होते. साऊंच्या ताई वृद्ध होत्या. त्या सरळ भावनेच्या व निष्कपट वृत्तीच्या होत्या. आपला नातु सवाईमाधवराव दुःखांत नसावा असें त्यांना वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. नानांच्या परवानगीशिवाय सवाईमाधवरावांची त्यांना भेट होणें शक्य नव्हतें. अर्थात् ताईंनीं

पहिल्यानें नानांची भेट घेतली यांत संशय नाहीं. सवाईमाधवरावांना उपदेश करण्याचा अधिकार ताईंचा आहे हे जाणून सवाईमाधवरावांना 'तूं नानांच्या तंत्रानें वागत जा. नानाच तुझे हितकर्ते आहेत, नानांनींच तुला वाढवलें आहे, नानांच्या आज्ञेंत वागल्यानें तुझें कल्याण आहे. त्यांच्या अवकृपेनें तुझा नाश आहे.' वगैरे वगैरे गोष्टी ताईंनीं सांगून उपदेश करावा असें नानांनीं त्यांना पढविलें असलें पाहिजे व त्या भोळ्या बाईनें त्यांच्या भेटींत हें सर्व केलें असलें पाहिजे. अशा उपदेशानें आपण दुःखावर डागण्या देतों याची मात्र कल्पना त्या बाईला खात्रीनें नसावी. आधींच नानांच्या वागणुकीमुळें संतप्त झालेल्या मनावर नानांच्याच तंत्रानें वागण्याचा आजीबाईंचा मिळालेला सल्ला, यामुळें सवाईमाधवरावांना आपल्या बाजूचें जगांत कोणी नाहीं असें वाटून त्या भरांत पुन्हां एकदां प्राणत्यागाची कल्पना त्यांचे मनांत आली. साऱ्यांच्या ताई निघून जातांच एकदम सर्व बाजूंस सामसूम झालें व नोकर चाकर गुप्त झाले. त्यामुळें सवाईमाधवराव यांस आपले प्राणत्यागाचे विचार आचारांत आणण्यास संधि मिळाली. ही संधि नानांच्याच इषाऱ्यानें मिळाली असेल यांत शंका नाहीं. कसेंही असो. सवाईमाधवराव यांच्या संरक्षणाची जबाबदारी प्रत्यक्ष नानांवर असतां ती जबाबदारी त्यांचे हातून पार पडली गेली नाहीं. नारायणराव पेशवे यांच्या बाबतींतही नानांवर जबाबदारी असतां ती त्यांनीं पार पाडली नाहीं. त्यामुळें दोन पेशव्यांचे बळी गेले. अशा स्थितींत प्रथमतः नानांनाच कोर्टमार्शलपुढें उभें करावयास पाहिजे होतें. पण चोरच मालक झाल्यावर खरा मालक अपराधी—गुन्हेगार ठरणार यांत नवल नाहीं. प्राणत्याग करून खरे मालक सवाईमाधवराव मूर्ख ठरले व चोर नाना मात्र साव ठरले.

३९. सवाईमाधवरावांच्या या आत्महत्येनें सज्जन लोकांच्या अंतःकरणाला फार मोठा धक्का बसला असेल यांत शंका नाहीं. ते वयांत आल्यावर

त्यांनीं स्वतःच्या जबाबदारीवर नानांच्या प्रियपात्रास—घाशीरामास जें शासन केलें त्याची विस्मृति पुण्याच्या सज्जन लोकांना कधींही होण्यासारखी नाहीं. दुष्ट, दुर्जन व कपटी अशा लोकांना कडक शासन करण्याची सवाई-माधवरावांची न्यायबुद्धि पाहून व त्यांची तरतरी, त्यांचें प्रजावात्सल्य वगैरे गुण दिसूं लागल्यामुळें पेशव्यांचें गतवैभव पुन्हां पूर्ववत् उदयाला हे आणतील अशी सज्जन लोकांना आशा वाटत होती. परंतु पेशवाईला व पेशव्यांच्या कारभारीपदाला नानांचा कायमचा क्षयरोग लागल्यानें ती आशा निष्फल ठरली. एकंदरींत पेशव्यांच्या घराण्यांतील सवाईमाधवरावांसारख्या दैदिप्यमान् सूर्याला नानांचें खग्रासग्रहण लागलें हें मात्र सत्य आहे. महाराष्ट्राचें दुर्दैव ! दुसरें काय ?

प्रकरण ३१ वें.

राघोबांचीं मुलें म्हणजे दरवेशी नानांचीं अस्वलें.

इ. स. १७९५. ते. इ. स. १७९६.

१ सवाईमाधवरावांच्या मृत्यूनंतर नानांनीं पुणें शहराची नाकेबंदी करून पेशव्यांच्या मृत्यूची वार्ता बाहेर फुटूं न देतां तेरा दिवस पार पाडले.—२ सवाईमाधवरावांच्या पश्चात् बाजीरावास गादीचा धनी न करतां एकाद्या गोत्रजास यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन स्वतः कारभार करण्याची नानांची योजना.—३ नाना पुण्यास सरदारांची सभा बोलावितात. त्या सभेंतील बाजीरावास गादीवर न आणण्याबद्दलचें नानांचें वक्तृत्व.-४ नानांच्या वक्तव्याचा मथितार्थ.-५ यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन राज्यकारभार चालविण्यांत नानांचा दुसरा स्वार्थ कोणता निगडित होता ?—६ दत्तकास सरदारांकडून नाना संमति घेतात. गोत्रज मुलाची निवड करण्याला नानांची सुरवात.—७ नानांनीं दत्तकाचें खूळ माजविलें, पण त्याला बहुजन समाजाचें मनापासून पाठबळ नव्हतें.—८ शिंद्यांचे दुय्यम कारभारी बाळोबा तात्या हे बाजीरावास गादीवर बसविण्याच्या मताचे होते. जिवबादादांचें आजारीपण. त्यांनीं आपल्या मरणसमयीं दौलतराव शिंदे यांस सवाईमाधवरावांचे इच्छेनुरूप बाजीरावालाच गादीवर बसविण्याबद्दल स्पष्ट सांगितलें.—९ जिवबादादांच्या सांगण्याप्रमाणें बाजीरावास गादीवर आणण्याबद्दल शिंद्यांनीं नानांस निक्षून सांगितलें. तुमचे हातून होत नसल्यास आम्ही बाजीरावास आणतों असा शिंद्यांचा नानास रोखठोक जबाब. नाना पेंच प्रसंगांत सांपडून शिंद्यांबद्दल भलभलत्या कंड्या उठवितात.—१० या कंडया मुळें प्रथमतः समाजाची होणारी दिशाभूल. शिंद्यांविरुद्ध लढण्याबद्दल नाना फौजेची तयारी करण्याच्या मार्गाला लागतात. पण त्यांना तितकीशी ती साध्य होत नाहीं. म्हणून ते आपलें राजकारण साधण्याकरतां चिमाजीआपास दत्तक देऊन लोकांची दिशाभूल करण्याची क्लृप्ति काढतात.-११ चिमाजीआपास दत्तक देण्याच्या नानांच्या क्लृप्तीपासून नाना काय साधणार होते ?—१२ भाऊबंदी तंट्याचे जनक नाना कसे होते ?—१३ नानांना नीति व धर्म यांचा गंध कसा नव्हता ? चिमाजीआपाच्या दत्तक प्रकरणीं नाना व परशुरामभाऊ

यांनीं धर्मशास्त्र कसें पायाखालीं तुडविलें ?—१४ यशोदाबाईच्या मांडीवर चिमाजीआपा धर्मशास्त्रप्रमाणें दत्तक जाऊं शकत नाहीं.—१५ यास मनुस्मृतीचा आधार.—१६ नाना बाजीरावास व चिमाजीआपास कैदेंतून मुक्त करून खडकीस आणून ठेवतात. बाजीरावाची इच्छा शिंदे व नाना अशा उभयतांनीं मिळून आपणास गादीवर बसवावें अशी होती. नाना बाजीरावाबरोबर त्यास गादीवर बसविण्यासंबंधीं करारमदार करतात. व त्याचे नांवें पेशवाईचीं वस्त्रें आणण्याकरतां सातार्‍यास जातात.—१७ नाना लगबगीनें सातार्‍यास गेले यांत त्यांचें शिंदे व बाजीराव यांच्याविरुद्ध नवें पाताळयंत्री कारस्थान कोणतें होतें ? —१८ नाक मुठींत धरून शिंदे आपसातीला तयार होतील असा नानांचा नवीन डाव.—१९ शिंदे बाजीरावास पुण्यास आणून गादीवर बसवितात. त्यांच्या नांवाची द्वाही फिरवितात. छत्रपतीकडून पेशवाईचीं वस्त्रें येत नाहींत असें पाहून शिंदे बाजीरावास घेऊन सातार्‍याकडे रवाना होतात. छत्रपती पेशव्यांच्या गादीवर वारसा सांगतात. शिंद्यांपुढें पेंच प्रसंग. नानांशीं समेट करण्याची शिंद्यांची तयारी. परशुरामभाऊंच्या मध्यस्थीनें उभयतांमध्यें समेट.—२० समेटाची कलमें. नाना स्वत:चें स्थान मजबूत करून घेतात.—२१ नानांच्या इच्छेप्रमाणें बाजीरावास अटकेंत ठेऊन चिमाजीआपास दत्तक देण्याचें ठरल्यामुळें नानांनीं शिंद्यांवर मात केली.—२२ नानांच्या निरोपाप्रमाणें परशुरामभाऊंना बाजीरावास कैद करणें अशक्य होतें. म्हणून ती कामगिरी त्यांनीं बाळोबातात्यावर सोंपविली व चिमाजीस घेऊन येऊन दत्तविधान करवून गादीवर बसविण्याची कामगिरी आपल्या शिरावर घेतली.—२३ शिंद्यांच्या कैदेंत बाजीराव पडतो. परशुरामभाऊ जबरदस्तीनें चिमाजीचें दत्तविधान उरकतो.—२४ नाना छत्रपतीकडून चिमाजीच्या नांवें पेशवाईचीं वस्त्रें घेतात. छत्रपतीबरोबर सांगोल्याच्या तहाप्रमाणें सवलती देण्याचा नानांचा नवीन करार. आपल्या इच्छेविरुद्ध बाजीराव शिंद्यांच्या कैदेंत राहिले, त्यामुळें परशुरामभाऊ व बाळोबा तात्या यांनीं आपल्या विरुद्ध कट केला असा नानांना संशय.—२५ परशुरामभाऊ व बाळोबातात्या हे आपणांस कैद करणार आहेत अशी नानांस जबर शंका येण्याचें दुसरें कारण.—२६ वांईहून नाना चिमाजीआपाच्या नांवची पेशवाईचीं वस्त्रें पुण्यास पाठवून देतात व आपण मेणवलीस जातात. चिमाजीआपास रीतसर गादीवर बसवून परशुरामभाऊ कारभार पाहूं लागतात.

१. नाना फडनविस यांना आपली आज्ञा सर्वत्र मानली जावी अशी महत्वाकांक्षा होती. त्याच्या आड येणारे महादजी शिंदे व नंतर सवाई-माधवराव यांचा, मागील प्रकरणांतून उल्लेख केल्याप्रमाणें नानांनीं निकाल लावला. सवाईमाधवरावांचे मृत्यूमुळें नानांस दुःखी अगर कष्टी होण्याचें कारण नव्हतें. कारण ही गोष्ट त्यांच्या इच्छेनेंच घडलेली होती. पेशव्यांचें देहावसान झाल्यानंतर 'त्या वेळेस वाड्यांत कारकून मंडळी होती ती घरोघर आली. शहराची नाकेबंदी सारी झाली. माणूस फिरेनासें झालें. शहरचें माणूस बाहेर जाण्याचें बंद केलें व बाहेरील आंत येण्याचें बंद केलें. नंतर श्रीमंतांस नदीवर नेलें. ही खबर कोणास नाहीं. असें दहा दिवस झाल्यानंतर क्रियाकर्मांतर तेरा दिवस झालें.'[१] याप्रमाणें नानांनीं आपला अंमल बसवून गुप्तपणानें पेशव्यांचे तेरा दिवस पार पाडले.

२. सवाईमाधवराव यांना संतान नसल्यामुळें किंवा त्यांचें कुटुंब यशोदाबाई या गरोदर असल्याचें कोणतेंच चिन्ह दाखवितां येण्यासारखें नसल्यामुळें पुढें गादीच्या वारसासंबंधीं प्रश्न उत्पन्न होणार हें नाना जाणून होते. वाजवी रीतीनें पेशव्यांच्या गादीचा वारसा सवाईमाधव-रावानंतर राघोबादादांचा मुलगा बाजीराव याजकडेच येत होता व त्याला अनुसरूनच सवाईमाधवरावांनीं आपल्या मरणसमयीं त्यालाच गादीवर बसविण्याची आपली इच्छा प्रकट केली होती. परंतु बाजीरावाचें वावडें नाना, पटवर्धन, रास्ते वगैरे मंडळींना होतें. नानांची तर अशी प्रतिज्ञा होती कीं राघोबादादांच्या वंशाचा पेशव्यांच्या गादीला विटाळही होऊं द्यावयाचा नाहीं. तेव्हां अशा परिस्थितींत यशोदाबाईच्या मांडीवर कोणी गोत्रजापैकीं दत्तक देऊन त्यास गादीचा धनी करावें असा नानांनीं आपल्या मनाशीं विचार ठरविला.

---

१. पेशव्यांची बखर आ. ५ वी पा. १८३.

३. नानांचा हा विचार पेशव्यांच्या गादीच्या धन्याबाबत असल्यामुळें एकट्या नानांच्या विचारावर ती गोष्ट अवलंबून नव्हती. त्याला इतर सरदार, मानकरी वगैरे लोकांचेंही पाठबळ पाहिजे होतें. तेव्हां त्यांनीं आपणास अनुकूल असलेल्या व थोड्याशा प्रयासानें अनुकूल होणाऱ्या सरदार लोकांना चिठ्या लिहिल्या. त्याप्रमाणें परशुरामभाऊ आपल्या सैन्यासह पुण्यास येऊन दाखल झाले. भोंसल्यांचा मुक्काम पुण्याच्या आसपासच होता. शिंदे जांबगांवास होते. त्यांनीं आपले कारभारी जिवबादादा बक्षी व बाळोबातात्या पागनीस यांस पुढें पाठविलें. भोंसल्यांनीं आपला वकील पाठविला. अशा प्रकारें मंडळींची जमवाजमव केल्यानंतर नानांनीं सरदार व मुत्सद्दी यांचा दरबार भरविला व पेशवाईच्या गादीबद्दल पुढें काय तजवीज करावयाची याचा विचार दरबारांत काढला. विषय चर्चेला निघाल्यानंतर शिंद्यांचा कारभारी बाळोबातात्या यांनीं बाजीरावास गादीवर बसविण्याचा प्रश्न पुढें मांडला. त्यावर नानांनीं सरदार व मुत्सद्दी यांचें हृदय थरारून जाईल असें भाषण केलें. त्याचा सारांश पुढीलप्रमाणें होता. " आतां अशा स्थितींत राघोबाचा पुत्र बाजीराव यास गादीवर बसवावा असें म्हणतां, तर आपलें सर्वांचें राघोबाशीं मोठें हाडवैर. त्याचे पाय जमिनीस न लागावे म्हणून आपणां सर्वांचे प्रयत्न. हें सर्व त्याचा पुत्र विसरला नसेल. त्याच्या आईनें सरदारांचा नाश करण्याविषयीं लहानपणापासूनच त्याला बाळकडू पाजलें आहे. त्याच्यापासून सरदारांस, प्रधानांस, आणि मराठी राज्यास सुखप्राप्ति होण्याची आशा कितीशी आहे ! राघोबानें इंग्रजांचा स्नेह संपादिला आहेच. तोच वृद्धिंगत करून मुलगा त्यांच्या आश्रयानें सरदारांच्या माना मुरगळील आणि अनेक प्राणांच्या आहुति युद्धकुंडांत समर्पून, मोठ्या कष्टानें प्राप्त केलेलें हें मराठ्यांचें राज्य परकीयांच्या घरांत घालील, याचा पूर्वीं विचार झाला पाहिजे. राज्यप्रकरणीं फार दूरदृष्टि ठेविली पाहिजे. आपणांस एव्हां दया येऊन एखादी गोष्ट आपण करूं. तसें करणें प्रस्तुत आपल्या स्वाधीन आहे. पण एकदां आपल्या

हातून एखादी गोष्ट घडून गेली, म्हणजे मग ती फिरविणें आपल्या स्वाधीन नाहीं. यास्तव याचा पूर्वीच विचार होणें योग्य[1] आहे ''

४. नानांच्या या भाषणाचें तात्पर्य लक्षांत घेतां असें दिसून येईल कीं, सध्यांचें हें जें मराठी राज्य आहे तें पेशव्यांच्या नोकरशाहीनें मोठ्या कष्टानें राघोबादादांच्या हातून प्राप्त करून घेतलेलें आहे. माधवराव पेशवे मेल्यानंतर राजशाहीचा विध्वंस करून नोकरशाही अधिकारारूढ करावयाला वीस बावीस वर्षे नानांना व त्यांच्या पक्षांतील लोकांना खस्त खावी लागली. ते सर्व कष्ट सोसून पेशव्यांना नाममात्र करून नोकरशाहीच्या अमलाचीं सध्यां आपण सुंदर फळें चाखीत असतां पुन्हां बाजीरावाला गादीवर बसवून नोकरशाहीनें राजशाहीचे दास बनावें ही केवढी तात्विक दृष्टीनें हानि होत आहे याचा इषारा नानांनीं आपल्या भाषणांत सरदार वगैरे मंडळींना दिला. एकंदरींत '' बाजीरावाला गादीवर आणणें ह्मणजे नोकरशाहीच्या तत्वांत क्रांति घडवून आणणें, क्रांति होणें ह्मणजे रणसंग्राम माजणें, रणसंग्राम होणें ह्मणजे मनुष्यहानि, द्रव्यहानि, कालहानि होऊन जयापजयाचा वांटा कोणाच्या पदरांत पडतो याची नशीबाची परीक्षा पहाणें. या सर्व भानगडी करण्यापेक्षां सध्यां नाना स्वतः चालवीत असलेलें मराठ्यांचें राज्य, न्याय-नीति, शांतता, सुखप्राप्ति वगैरे गोष्टींनीं सुसमृद्ध आहे तेव्हां गादीला नामधारी पेशवा करून पूर्ववत् राज्यकारभार चालविण्यांत सर्वांचें हित आहे. या योजनेनें सरदारांच्या माना मुरगळल्या जाण्याचा संभव नाहीं. अर्थात् चालू राज्यव्यवस्था कायम राहिली ह्मणजे नानांनीं मोठ्या कष्टानें प्राप्त करून घेतलेलें त्यांचें पद कायम राहील व त्यामुळें सरदार लोकांना व मराठी राज्याला सुखप्राप्ति होईल. तसें जर होणार नाहीं, तर मात्र सरदार व मराठी राज्य यांवर संकटपरंपरा ओढवेल, हें सर्वांनीं लक्षांत ठेवावें. नाना व त्यांचा सध्यां असलेला अधिकार

---

१. परशुरामपंतभाऊ यांचें चरित्र पा. ९८.

म्हणजे पेशवे-मराठयांचें राज्य " एवढाच त्यांच्या भाषणाचा थोडक्यांत गोषवारा होता. नानांचें हें भाषण केवळ नोकरशाहीच्या हिताच्या दृष्टीनेंच झालें. बाजीरावाचें पेशव्याच्या गादीवर येणें नोकरशाहीच्या मोठया हानीचें आहे एवढेंच त्यांनीं आपल्या भाषणांत स्पष्ट केलें. पण याखेरीज नानांचा त्यामध्यें आणखीही एक मुद्दा होता.

५. सवाईमाधवराव यांच्या कारकीर्दींत त्यांच्या नांवावर सावकारांकडून कोट्यवधि रुपयाचें नानांनीं कर्ज काढलें होतें, व त्या पेशव्यांच्या नांवानें सनदा लिहून देऊन पुष्कळांस जहागिरी, तैनाती व इनामें दिलीं होतीं. एकट्या परशुरामभाऊंचेंच म्हैसूरच्या व इतर स्वाऱ्यासंबंधीं पेशव्यांकडे चाळीस लक्ष रुपये कर्ज तुंबलें होतें.[1] अशा स्थितींत बाजीराव पेशवे हे आपल्या जन्मजात हक्कानें पेशव्यांच्या गादीचे वारस म्हणून गादीवर आले तर नानांनीं पेशव्यांच्या नांवावर काढलेलें कर्ज किंवा दिलेली जहागीर अगर तैनात बाजीरावांनीं मानलीच पाहिजे असा कोणताच त्यांना प्रतिबंध नव्हता. परंतु कोणता तरी गोत्रज यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक दिला असतां, तरमात्र त्याला सवाईमाधवराव यांच्या नांवानें नानांनी केलेले व्यवहार मानणें भाग होतें. शिवाय सवाईमाधवराव यांच्या कारकीर्दींत नानांनीं जो कारभार केला, त्यांत त्यांनीं पेशव्यांच्या डोक्यावर डोईजड कर्ज करून ठेवलें व आपला स्वत:चा खजिना मात्र एवढा बेसुमार भरला कीं त्या पैशानें प्रसंगविशेषीं पेशवाईचें राज्य सुद्धां विकत घेतां यावें. बाजीराव गादीवर आले असते तर पेशवे सरकारांचे वीस वर्षांचे हिशेब नानांना दाखवावे लागले असते, व त्यांतील सर्व अंडीं पिल्लें बाहेर निघून नानांनीं भरलेला आपला खजिना व निजाम, शिंदे वगैरेकडून दलालीनें मिळविलेली जाहागीर वगैरे सर्व कांहीं त्यांना ओकावें लागलें असतें. याकरतां नानांनीं असा हिशोब घातला होता कीं, आपल्या अपहारित द्रव्याच्या व जहागिरीच्या रक्षणाकरतां आपल्या हातीं सत्ता पाहिजे. आणि ती सत्ता जोंपर्यंत पेशव्यांच्या गादीवर अल्पवयी व अज्ञान पेशवा असेल तोंपर्यंतच आपल्या हातीं

१ नाना फडनविसांचें चरित्र पा. १७०.

कायम राहूं शकेल. या त्यांच्या स्वतःच्या मुख्य कारणाकरतां नाना हे यशोदाबाईंच्या मांडीवर सवाईमाधवरावांच्या इच्छेविरुद्ध गोत्रज दत्तक देण्याच्या खटपटींत होते. यावरून हें दत्तकाचें कारस्थान किती गूढ स्वरूपाचें होतें हें लक्षांत येईल.

६. नोकरशाहीच्या कल्याणविषयक नानांच्या भाषणानें बाळोबातात्या यांनीं बाजीरावाला बंधमुक्त करून गादीवर बसवावें हा जो विषय आणला होता, तो मागें पडला व त्या वेळीं जमलेल्या सरदार, मुत्सद्दी मंडळींस नानांचें म्हणणें मान्य होऊन त्यांनीं यशोदाबाईच्या मांडीवर कोणी तरी गोत्रज दत्तक देऊन गादीस धनी करावें अशी आपली संमति दिली. त्याप्रमाणें नानांनीं सर्वांकडून यशोदाबाईच्या नांवचीं संमति-पत्रें लिहून घेतलीं. नानांनीं या प्रकरणीं निजामअलीकडे पत्रव्यवहार करून त्याचेकडूनही अशा प्रकारच्या दत्तकाला संमति मिळविली होती. याप्रमाणें नानांची पूर्वसिद्धता झाल्यानंतर दत्तकासाठीं मुलाची निवड करण्याच्या उद्योगाला नाना लागले.

७. नानांनीं सरदार व मुत्सद्दी यांचा जो दरबार भरविला व त्यांत त्यांचें जें दत्तकासंबंधीं भाषण झालें त्या भाषणांत एक महत्वाची गोष्ट त्यांनीं लपवून ठेविली होती. सवाईमाधवरावांचे मरणसमयीं त्यांनीं बाजीरावाला गादीवर बसवून राज्य चालवावें ही आपली अखेरची इच्छा जी प्रकट केली होती, तेवढीच नानांनीं चोरून ठेविली होती. पुण्याच्या बहुतेक सर्व मोठमोठ्या लोकांना ही गोष्ट माहीत होती, म्हणून दत्तकाच्या नांवें राज्य चालविण्याची नानांची मसलत पुण्याच्या लोकांस बिलकुल पसंत नव्हती. पुण्याबाहेर राहणाऱ्या व राज्यांतील प्रमुख लोकांसही ही दत्तकाची कल्पना फारशी आवडत नव्हती. सरदार लोकांनीं नानांच्या भिडेखातर त्यांनीं सांगितल्याप्रमाणें पत्रें लिहून दिलीं हें खरें. पण औरसाचा वाजवी हक्क बुडवून व सवाईमाधवरावांची शेवटची इच्छा पायाखालीं तुडवून कोठला तरी दत्तक आणून त्याला गादीचा धनी करावें हें त्यांच्या मनाला प्रशस्त वाटत नव्हतें. पटवर्धन, रास्ते व खुद्द नाना हे राघोबादादांचे पक्के हाडवैरी म्हणून त्यांना स्वतःच्या सुरक्षितपणासाठीं

दत्तकाचीच उभारणी करणें प्राप्त होतें. पण बाकीच्या बहुजनसमाजाचें त्यांना या कामीं पाठबळ मिळण्यासारखें नव्हतें. बारभाईंच्या कारस्थानाला राघोबादादा हे नारायणरावांचा खून करणारे खुनी होते या गोष्टीवर भर दिल्यामुळें बहुजनसमाजाचें पाठबळ मिळवितां आलें, परंतु हें दत्तकाचें खूळ माजविण्याला एकादें भडक कारण नानांना न मिळाल्यामुळें त्यांना या बाबतींत लोकमताचा पाठिंबा मिळवितां आला नाहीं व त्यामुळें हें नानांचें दत्तक प्रकरण डळमळूं लागलें.

८. बाजीराव या वेळीं शिवनेरी किल्ल्यांत नानांच्या अगदीं पक्क्या बंदोबस्तांत असल्यामुळें नानांच्या कारस्थानाचा गंध त्याला लागणें अगदीं अशक्य होतें. शिंद्यांचा कारभारी बाळोबातात्या याचा मानस मात्र बाजीरावासच गादीवर बसविण्याचा होता. परंतु त्या वेळीं जिवबादादांनींच नानांना दत्तकाबद्दल संमतिपत्र दिल्यामुळें बाळोबातात्यांचें कांहीं चाललें नाहीं. पुढें जिवबादादा यांना मोठा ज्वर आला, त्यामुळें आपण आतां जगत नाहीं असें त्यांना वाटलें; तेव्हां त्यांनीं आपले मालक दौलतराव शिंदे यांस बोलावून आपल्याजवळ पलंगावर बसवून घेतलें व त्यांना सांगितलें कीं, "दत्तक देऊन पेशवाई चालवावी म्हणून नांवास उगाच जें संमतिपत्र नानांनीं करून घेतलें, तेंच खरें धरून आम्हीं दत्तकास अनुकूल आहों असें समजून ते दत्तकाच्या खटपटींत आहेत. परंतु मनापासून या गोष्टीस बहुमत अनुकूल नाहीं. व माझा शब्द सवाईमाधवरावांकडे गुंतला आहे हें लक्षांत ठेऊन, तुम्ही बाजीरावास गादीवर बसविण्याची तजवीज[१] ठेवा." असें सांगून जिवबादादा हे तारीख ६ जानेवारी सन १७९६ रोजीं मार्गशीर्ष वद्य १२ शके १७१७ रोज बुधवारीं जांबगांवीं मृत्यू पावले.

९. जिवबादादांच्या मरणकालपर्यंत नानांचा दत्तक पहाण्यामध्यें काल गेला. जिवबादादा दिवंगत झाल्यावर त्यांच्या अखेरीच्या इच्छेप्रमाणें

१ जिवबादादा बक्षी यांचें चरित्र पा. २१४.

बाजीरावास गादीवर आणण्याचा संकल्प दौलतराव व बाळोबातात्या यांनीं केला. त्याप्रमाणें पौषमासीं ते उभयतां पुण्यास आले. शिंद्यांनीं नानांस ' दोन खासे औरस असतां बाहेरचा आणून गादीवर बसवावा, हें आमचे मतें चांगलें नाहीं. ' असें स्पष्ट सांगितलें. आणि असेंही बजावलें कीं, ' तुह्मीं आणीत असला तर उत्तम, नाहीं तर आह्मीं फौज पाठवून त्यांस (बाजीराव यांस) घेऊन येतों. [१] ' या शिंद्यांच्या रोखठोक भाषणानें नाना पेंचांत सांपडले. आपल्या दत्तकाच्या कारस्थानाला शिंद्यांची मदत न होतां उलट विरोध उत्पन्न होऊन शत्रुत्व येणार व त्याला तोंड दिलें पाहिजे ह्मणून नानांनीं खटपट सुरू केली. निरनिराळ्या कंड्यांचें साम्राज्य सुरू झालें. ' बाजीरावांनीं बहुत प्रयत्न करून या शेणवी सरदारांस (शिंद्यांच्या बाळोबातात्या वगैरे) पूर्णपणें वश करून घेतलें आणि त्यांच्या मार्फत शिंद्यांशीं एक करार ठरविला. तो करार असा कीं, शिंद्यांनीं बाजीरावास पेशवाईची गादी मिळवून द्यावी, व त्याबद्दल श्रीमंतांनीं शिंद्यांस एक कोट रुपये रोख व पंचेवीस लाखांची जहागीर द्यावी. याप्रमाणें उभयपक्षीं करार ठरून इमानप्रमाण व बेलभंडार झाला. [२] ' याप्रमाणें कंड्या उठविण्यास सुरवात झाली.

१०. कंड्या या समाजाची तात्पुरती दिशाभूल करण्यापुरत्याच असतात. खऱ्या खोट्याचा निर्णय लागेपर्यंत कारस्थानी लोक आपला हेतु साध्य करून घेत असतात. पहिल्या प्रथम कंड्या ज्या वेळीं कानांवर येतात, त्यावेळीं त्यांच्या खरेखोटेपणाबद्दल बहुजनसमाज चिकित्सा करीत नाहीं. व दुसरी बाजू पुढें येईपर्यंत उठलेल्या कंड्या खऱ्याच आहेत असें गृहीत धरून चालतो. तोच प्रकार या प्रस्तुतच्या कंडीबद्दल होता. या वेळीं बाजीराव शिवनेरी किल्ल्यांत नानांच्या पूर्ण कडक कैदेंत होते. बाजीराव जन्मल्यापासून या वेळेपर्यंत त्यांचें आयुष्य कैदेंतच

१ पेशव्यांची बखर पान १८३. २ नाना फडनविसांचें चरित्र पा. १६८

गेलें होतें. त्याच्या शिक्षणांत नानांनीं किती गोंधळ माजविला होता हें पूर्वींच आलें आहे. अर्थात् बाजीरावाला राजकारणाचा गंधही नव्हता. शिवाय त्याला जें राजकारण खेळावयाचें होतें, त्या राजकारणाला नाना हे प्रतिस्पर्धी होते. नाना हे सर्व हिंदुस्थानांत त्या वेळीं एकमेव मुत्सद्दी होते हें निर्विवाद आहे. शिवाय नाना हे अधिकारानें व पैशानें सुसमृद्ध होते तर बाजीराव कवडीला महाग, अधिकारशून्य कैदी व राजकारणपंगु असें असतां नानाप्रमाणें एखाद्या निढावलेल्या मुत्सद्यास जें साधावयाचें नाहीं तें राजकारण शिवनेरीच्या कडक कैदेंत बाजीरावानें शिंद्यांबरोबर केलें, बेलभंडार उचलले वगैरे म्हणणें अगदीं हास्यास्पद आहे. या कंड्या नानांनींच उठविल्या. या उठविण्यांत 'भिक्षुको भिक्षुकं दृष्ट्वा, श्वानवत् गुर्गुरायते' ही उक्ति त्यांनीं सार्थ केली होती. शिंद्यांचा एवढा मोठा फायदा होता तर आपला कां होऊं नये असा कलह शिंदे व इतर सरदार यांच्यांत उत्पन्न व्हावा एवढाच त्या कंडीचा हेतु होता. याला अनुसरूनच नानांनीं शिंद्यांविरुद्ध इतरांना उठविण्याचा प्रयत्न केला. नाना आपल्याविरुद्ध शस्त्र उपसणार आहेत ही बातमी शिंद्यांस लागली व त्यामुळें त्यांनीं आपली फौज परत पुण्यास बोलावली. शिंद्यांची फौज पुण्याच्या रोंखानें येऊं लागली हें नानांना समजतांच त्यांच्यावर पुन्हां पेंचप्रसंग आला. शिंद्यांचा बंदोबस्त करण्याकरतां नानांनीं नबाब, भोंसले व इंग्रज यांच्याकडे मदत मागितली होती, व याशिवाय पुण्यांत नानांची होळकरसुद्धां पंचवीस हजार फौज होती. परंतु 'किती तांतडीनें बोलावणें गेलें तरी नबाब, भोंसले किंवा इंग्रज यांजकडून वेळेवर कुमक येण्याचा संभव दिसेना. पुण्यांत होळकरसुद्धां पंचवीस हजार फौज होती, पण तींतही शिंद्यांच्या कारभाऱ्यांनीं जागोजाग फितुर केल्याचें याच वेळीं नानांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. तेव्हां त्यांची छाती दडपून गेली व पुढें काय करावें हें त्यांस सुचेनासें' झालें.'

१ व २ ना. फ. च. पा. १६९-१७०.

शिंदे बाजीरावाला आणून गादीवर बसविणार व या त्यांच्या कामगिरी-मुळें आपलें राज्यकारभारांतील वजन व अधिकार यांना धोका पोंचणार, तेव्हां त्याला कांहींतरी तोड केली पाहिजे असें नानांनीं ठरविलें व त्याकरतां एक स्वतंत्र गट तयार करून शिंद्यांच्या मनसुब्याला पलटणी देण्याचा हिय्या धरला. 'अशा स्थितींत रास्ते व पटवर्धन यांचा सल्ला घेऊन नानांनीं अशी योजना ठरविली कीं, पूर्वी ठरल्याप्रमाणें यशोदा-बाईंनीं दत्तक हा घ्यावयाचाच, परंतु तो इतर कोणी न घेतां बाजी-रावाचा धाकटा भाऊ चिमाजीआपा हाच दत्तक घ्यावा ह्मणजे तंटाच मिटला! बाजीरावाला पुढें करण्यांत औरसाच्या बाजवी हक्काचें नैतिक पाठबळ शिंद्यांना मिळण्यासारखें आहे. आपण चिमाजीला गादीवर बसविलें तर आपणालाही हें नैतिक पाठबळ आपोआपच मिळेल. कारण बाजीरावाप्रमाणें चिमाजी हा गादीचा वारस आहेच. शिंद्यांनीं थोरल्या भावाला हाताशीं धरलें आहे तर आपण धाकट्या भावाला हाताशीं धरून शिंदे पुण्यास येण्यापूर्वींच त्याची पेशवेपदावर स्थापना करूं या. इतक्याही उप्पर शिंद्यांनीं नेट धरल्यामुळें बाजीराव व चिमाजी या दोन वारसांचा तंटा लागलाच तर तो मजकूर पुढें पाहून घेतां येईल[२]!' या नानांच्या कारस्थानामुळें त्यांच्या पुढील गोष्टी साधणार होत्या.

११. (१) या कारस्थानानें शिंद्यांचें नाक कापल्याप्रमाणें होऊन नानांचें वजन व अधिकार कायम हाणार होता. (२) चिमाजी अज्ञान असून त्याला यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक दिल्यामुळें औरसास नानांनीं वारसा हक्क दिला म्हणून समाजाचे नैतिक पाठबळ मिळून, सवाईमाधवरावांच्या कार-कीर्दीत नानांनीं जें कर्ज काढलें होतें व ज्या जहागिरी व वतनें दिलीं होतीं त्याला बाध येत नव्हता. नानांच्याकडेच सर्व अधिकार राहणार होते. (३) चिमाजीला दत्तक करून त्याला गादीवर बसविल्यामुळें पुन्हां सख्या दोन भावांत भाऊबंदी माजविण्याचें पुण्य नानांच्या पदरांत पडत

होतें व या पुढेंही भाऊबंदीच्या मोकळ्या रानांत चरण्यास नानांना मुभा मिळणार होती. शिवाय गंगाबाईप्रमाणें सवाईमाधवराव यांची विधवा यशोदाबाई हीही राज्यकारभाराच्या निमित्तानें नानांच्या पकडींत सांपडणार होती.

१२. एकंदरींत नानांचें हें कारस्थान चौरंगी सामन्याप्रमाणें रंगणार होतें. येथें या कारस्थानासंबंधीं एकच गोष्ट नमूद करून ठेवणें इष्ट आहे. ती ही कीं, नाना हे पूर्वींपासून पेशवाईंत भाऊबंदी तंटे उत्पन्न करणारे होते. त्यांची ती खोड ह्मातारपणीं सुद्धां गेली नाहीं. भाऊबंदी तंट्याशिवाय आपल्या पोळीवर तूप ओढतां येत नाहीं, हा त्यांचा सिद्धांत होता. या वेळीं सवाईमाधवराव संततिहीन मेल्यामुळें भाऊबंदी तंटा निकालांत आला होता, तरी या कारस्थानानें नाना हे नवीन भाऊबंदी जाणूनबुजून उत्पन्न करीत होते, हें स्पष्ट होतें. यावरून पेशवे घराण्यांतील भाऊबंदीकलहाचे जनक कोण होते हें निराळें सांगणेचें कारण नाहीं.

१३. नानांच्या कारस्थानाला नीति आणि धर्म यांचा गंध सुद्धां नव्हता. नानांच्या मनाला जी गोष्ट येईल तीच नीति व तोच धर्म होता. तोतयाचे बंडाचे वेळीं ब्राह्मण मस्तीला आले ह्मणून त्यांची चरबी आटविण्याकरतां धर्मशास्त्राच्या नांवाखालीं पतिताचे संसर्गी, संसर्ग्यांचे संसर्गी असें करीत करीत महाराष्ट्रांतील सरसकट ब्राह्मणांना त्यांनीं प्रायश्चित्ताच्या यमयातना दिल्या. त्या वेळच्या त्याच नानांनीं व त्याच परशुरामभाऊंनीं आपल्या कारस्थानाच्या धुंदींत व अधिकाराच्या गुर्मींत हिंदुधर्मशास्त्र कसें पायाखालीं तुडविलें हें या दत्तक प्रकरणावरून लक्षांत येईल.

१४. 'चिमाजीआपा हा यशोदाबाईचा (दत्तक घेणाऱ्या विधवेचा) चुलत सासरा होत होता. कोणतेंही धर्मशास्त्र झालें तरी सासऱ्यास सुनेचा दत्तक मुलगा करूं शकत नाहीं.[१]' दुसरी गोष्ट अशी कीं, आईबाप नसलेल्या पोरक्या मुलाला दत्तक घेतां येत नाहीं. या वेळीं

१. ना. फ. च. पा. १७०.

चिमाजीआपाचे वडील राघोबादादा व आई आनंदीबाई दोघेंही मयत होतीं. आईबाप यांनीं आपला मुलगा दत्तक द्यावयाचा असतो. दत्तक देण्याचा अधिकार दुसऱ्या कोणासही धर्मशास्त्रानें दिलेला नाहीं. या बाबतींत मनुस्मृतीनें स्पष्ट उलगडा केला आहे.

१५. माता पिता वा दद्यातां यमद्भिः पुत्रमापदि ॥
सदृशं प्रीतिसंयुक्तं स ज्ञेयो दत्रिमः सुतः ॥

मनुस्मृति अध्याय नववा श्लोक १६८.

अर्थः—" मातेनें, किंवा पित्यानें, अथवा उभयतांनीं, परस्परांच्या संमतीनें आपत्कालीं प्रीतीनें उदकदानपूर्वक जो सदृश (समान जातीचा) पुत्र ज्यास दिला जातो तो त्याचा दत्तक पुत्र जाणावा." एकंदरींत नानांनीं आपल्या कारस्थानपूर्ततेकरतां कोणतींच बंधनें पाळलीं नाहींत हें स्पष्ट होतें. नानांच्या कारस्थानाला भरीव राजकारण ह्मणतां येणार नाहीं, पण भरीव महत्वाकांक्षा ह्मटलें तर तें मात्र सार्थ ठरेल.

१६. चिमाजीला दत्तक देऊन गादीवर बसविण्याचें कारस्थान नक्की ठरावयाला पौष महिना निघून गेला. शिंद्यांचा नानांच्या मागें बाजीरावाला आणण्याबद्दलचा तगादा सुरू होता. तेव्हां आपल्या कारस्थानाचा सुगावा शिंद्यांना न लागतां कार्यभाग उरकला जावा ह्मणून व शिंद्यांनीं आपल्या मनाप्रमाणें होत आहे असें समजून गप्प बसावें ह्मणून बाजीरावाला आणण्याकरतां त्यांनीं 'माघ[1] शुद्धपक्षीं परशुरामभाऊ पटवर्धन व आपा बळवंत यांच्या समागमें दहा हजार फौज देऊन जुन्नरास श्रीमंतांस आणावयास त्यांची रवानगी केली. हें पाहून शिंदे आपली फौज रवाना करीत होते ती (त्यांनीं) तहकूब केली. परशुरामभाऊ व आपा बळवंत हे जुन्नरास (ता. १५ फेब्रुवारी[2] सन १७९६ रोजीं) जाऊन पोंचले.' नानांच्या सूचनेप्रमाणें परशुरामभाऊ, बाजीराव व

१ पेशव्यांची बखर पान. १८४. २ ना. फ. च. पा. १७१.

चिमाजीआपा या दोघांस बरोबर घेऊन निघाले. त्यांनीं दरकूच कव-डीचे मुक्कामीं येऊन मुक्काम केला. तेथून कूच करून पुण्यापाशीं खड-कीच्या मुक्कामीं तारीख ३ मार्च रोजीं येऊन तेथें तळ दिला. खडकीस आल्यानंतर बाजीरावास भेटण्याकरतां पुण्याची मंडळी येणार होती. परंतु त्यांची बायको निवर्तल्याचें त्यांना तेथें समजलें. त्यामुळें अशौच आलें. तेव्हां तेरा दिवसपर्यंत त्यांनीं कोणाचीही गांठभेट घेतली नाहीं. अशौच संपल्यानंतर बाजीरावास भेटण्याकरतां मंडळी येऊं लागली. जो तो आपापल्या परीनें बाजीरावास सल्ला देऊं लागला. या वेळीं त्याला कोण काय ह्मणतें एवढें ऐकून घेण्याव्यतिरिक्त कांहींच करतां येण्यासारखें नव्हतें. त्याला राजकारण माहीत नव्हतें. आपणाला गादीवर बसण्याकरतां कोणत्या तरी एका बलिष्ठ शक्तीचा पाठिंबा पाहिजे एवढें मात्र त्याला वाटत होतें. त्या वेळीं शिंद्यांचा पक्ष व नानांचा पक्ष असे दोन पक्ष त्यांना दिसून आले. दोन्हींही पक्षांनीं एकत्र होऊन आपणाला गादीवर बसवावें असें बाजीरावाच्या मनांत होतें ह्मणून तो दोन्ही पक्षांतील मंडळीबरोबर वाटाघाट करीत होता. बाजीरावाची व शिंद्यांची भेट झाली त्या वेळीं शिंद्यांनीं नाना कारभारांत नसावें असें स्पष्ट बाजीरावास यांस सांगितलें. 'नानांनींच राज्यकारभार करावा असें शास्त्र कोठें आहे? आजपर्यंतचा सरकारचा सर्व पैसा नानांनीं बुडाखालीं दाबून ठेवला आहे. नानांना द्रव्यमदानें मस्ती आली आहे. त्यामुळेंच त्यांनीं बाळोबातात्यांवर मारेकरी घालण्याचें दुष्ट कर्म केलें.' वगैरे वगैरे नानांविरुद्ध सर्व विधानें त्यांनीं केलीं. हीही बाजू बाजीराव यास ऐकून घ्यावी लागली. नाना कारभारांत नकोत हें शिंद्यांचें ह्मणणें अर्थात् नानांना समजल्यानंतर त्यांनीं बाजीरावाची फाल्गुन शु॥ १४ स भेट घेतली. नानांनीं चिमाजीस दत्तक देऊन गादीला वारस करण्याचें नक्की केल्यानें बाजीरावाशीं झालेलें नानांचें भाषण हें केवळ औपचारिक व आपलें कारस्थान पुरें होण्याला योग्य वेळ मिळेल एवढ्याच स्वरूपाचें होतें.

नानांनीं शिंद्यांची मसलत हाणून पाडण्याकरतां बाजीरावाकडे मायावी भाषण करून बाजीरावास गादीवर बसविण्याचें ठरवून त्याच्याबरोबर लेखी करारमदार करून घेतले. त्यांत 'पूर्वीच्या[1] सर्व गोष्टी विसरून नानांनीं इमानानें कारभार करावा आणि श्रीमंतांनीं नानांचे यथापूर्व चालवावें' असें ठरलें. हें ठरल्यानंतर साताऱ्याहून पेशवाईचीं वस्त्रें आणावयास जाण्याकरतां नानांनीं बाजीरावाची परवानगी मागितली. त्याप्रमाणें त्यांनीं परवानगी दिल्यावर नाना-साताऱ्यास जाण्याकरतां निघाले. ते तारीख २२ मार्च सन १७९६ रोजीं साताऱ्यास पोंचले.

१७. नाना पुण्याहून पेशवाईचीं वस्त्रें बाजीरावाकरतां आणण्यासाठीं निघाले व त्यांना बाजीरावानें परवानगी दिली, ही वरवर दिसावयाला मोठ्या साळसूदपणाची गोष्ट घडली. परंतु यांत नानांचें केवढें पाताळयंत्री कारस्थान शिजूं घातलें होतें, याची कोणालाच कल्पना आली नाहीं. नानांना आपलें कारस्थान साध्य करून घेण्याकरतां शिंद्यांचें कारस्थान हाणून पाडावयाचें होतें. शिंद्यांना बाजीराव गादीवर यावयास पाहिजे होते, पण नाना कारभारांत नको होते. नानांना आपला कारभार आपल्या हातांत राहण्याकरतां चिमाजीआपा गादीवर पाहिजे होते. बाजीरावाला दोन्ही पक्ष आपल्या बाजूनें असावयाला पाहिजे होते. अशा स्थितींत नानांनीं मोठ्या नमतेपणानें राजकारण साधलें. त्यांनीं शिंद्यांच्या पक्षाला त्यांच्या राजकारणांतून दोन पावलें माघार घ्यावयास लावली व आपल्या पक्षानें दोन पावलें माघार घेतल्याचें दाखविलें. शिंद्यांच्या राजकारणाप्रमाणें बाजीरावास गादीवर बसविण्याचें नानांनीं दोन पावलें माघार घेऊन मान्य केलें. तसेंच नाना कारभारांत नसावे असा जो आग्रह होता तो नानांनीं एका गोष्टींत माघार घेतल्यामुळें त्यांनीं सोडला व ते राजी झाले. बाजीरावालाही उभयपक्ष अनुकूल झाल्यामुळें समाधान वाटलें. पण नानांना ही वरवर स्थिरस्थावरता करावयाची होती. त्यांना आपलेंच कारस्थान साधावयाचें होतें. तें साधण्याकरतां त्या वेळेपुरती त्यांनीं अनुकूल परिस्थिति निर्माण

---

१. ना. फ. च. पा. १७२.

करून घेतली. साताऱ्यास गेल्यावर त्यांच्या कारस्थानाचा सुगावा शिंद्यांना लागणार होता. म्हणून त्यांनीं स्वतःच्या बचावाची सिद्धता केली. साताऱ्यास बाजीरावाकरतां पेशवाईचीं वस्त्रें आणण्याचा बहाणा केला व आंतून पुढील कारस्थानाला तोंड देण्याची तयारी केली. त्यांनीं परशुरामभाऊ व इतर आपल्या पक्षांतील लोकांकडून 'आपलीं[1] मुलेंमाणसें व वित्तविषय पुण्याहून काढून दूर पोंचविण्याविषयीं सूचना केली. आपल्या स्त्रीची रायगडास रवानगी केली. नानांबरोबर त्यांचें स्वतःचें पथक व रास्ते व प्रतिनिधि यांची तीन हजार फौज व आणखी किरकोळ पागा मिळून एकूण पांच सहा हजार स्वार होते.' नानांनीं याशिवाय आपल्या बरोबर दुसरेंही सैन्य घेण्याचा प्रयत्न केला. पण इतर शिलेदार नानांस वश झाले नाहींत. गारद्यांनींही नानांबरोबर जाण्याचें साफच नाकारलें. 'पांच सहा हजार फौज नानांबरोबर गेली हें केवळ परशुरामभाऊंच्या खटपटीचें फळ होय!' याप्रमाणें नाना तयारी करून बाजीरावाकरतां जरी पेशवाईचीं वस्त्रें आणण्याकरतां साताऱ्यास निघाले, तरी दत्तक देऊन राज्यकारभार करण्याचें आपलें कारस्थान ते परशुरामभाऊंच्या सहाय्यानें पार पाडण्याकरतां जात होते, हें लक्षांत येईल.

१८. नानांना आपल्या कारस्थानपूर्ततेकरतां व शिंद्यांचें राजकारण हाणून पाडण्यासाठीं बाजीरावाला कैद करून दत्तक चिमाजीची गादीवर स्थापना करणें एवढेंच साताऱ्याहून कारस्थान करावयाचें होतें. त्याकरतां नानांनीं साताऱ्याच्या महाराजांची भेट घेतली. 'तुम्हास[2] कोट रुपये खर्चास देतों, फौज जमा करा, व राज्यांत आपला अंमल बसवा' वगैरे त्यांस सांगितलें. या नानांच्या कारस्थानाचा हेतु एवढाच होता कीं, बाजीराव व चिमाजीआपा यांच्यामध्यें गादीवर कोणास बसवावें याबद्दल कलह उत्पन्न झाला आहे तेव्हां साताराचे महाराज आपणच वारसदार म्हणून पुढें आले म्हणजे शिंद्यांना नाक मुठींत धरून गप्प बसावें लागेल व बाजीरावाला गादीवर बसविण्याचा आपला हट्ट सोडून देऊन ते नानाबरोबर कांहीं अटीवर

---

१ व २ ना. फ. च. पा. १७३.

आपसांतीत करण्यास आपण होऊन पुढें येतील. अशा प्रकारें नानांनीं आपल्या राजकारणाचा डाव टाकला.

१९. इकडे नाना सातार्‍यास रवाना झाल्यानंतर शिंद्यांनीं दुसर्‍याच दिवशीं बाजीरावास मोठ्या समारंभानें पुणें शहरांत आणलें. त्यांनीं बाजीरावाच्या नांवाची द्वाही सर्व पुणें शहरांत फिरविली. आणि त्यांना गादीवर बसवून त्यांच्या हातीं सर्व राज्यकारभार दिला. दुसर्‍याच दिवशीं शिंद्यांनींही आपला मुक्काम पुण्यास आणला. शिंद्यांनीं बाजीरावाला गादीवर बसविलें, त्यांच्या नांवाची द्वाही फिरविली, वगैरे सर्व गोष्टी शिंद्यानीं केल्या. परंतु सातारच्या महाराजांकडून पेशवाईचीं वस्त्रें नाना अद्यापि घेऊन आले नाहींत ह्मणून त्यांना शंका येऊं लागली. इतक्यांत नानांनीं कारस्थान करून सातारच्या महाराजांना एक कोट रुपये देऊं करून ते फौजेची जमवाजमव करूं लागले आहेत व ते येऊन आपला अंमल सर्व मराठी राज्यांत बसविणार हीही वार्ता पुण्यास येऊन पोंचली. तेव्हां नानांचा सूड घेऊन बाजीरावास पेशवाईचीं वस्त्रें सातारच्या महाराजांकडून घेववून देण्याकरतां शिंदे बाजीरावास घेऊन सातार्‍यास निघाले. त्याप्रमाणें त्यांचा मुक्काम थेऊरास येऊन पडला. सातारचे महाराज मराठी राज्याचे वारसदार म्हणून पुढें आले तर आपलें राजकारण ढिलें पडतें ही शिंद्यांना पूर्ण जाणीव होती. नानांच्या कारस्थानानें तो प्रसंग न यावा असें शिंद्यांना वाटत होतें, म्हणून या पेंचप्रसंगांतून सुटण्याकरतां ते नानाबरोबर वाटाघाटी करण्यास तयार झाले. नानांचा मुख्य मुद्दा बाजीरावास कैद करून चिमाजीआपास दत्तक देऊन गादीवर बसवावें असा होता. शिंद्यांना औरस दोन मुलांपैकीं कोणीही गादीवर बसलें तरी त्याचें शुभाशुभ नव्हतें. त्यांना मुख्यतः नाना कारभारांत नको होते. नाना कारभारांत न येतां सातारचे महाराजांचें बंड मोडून चिमाजीआपा गादीवर येत असेल तर ती गोष्ट कबूल करण्यास शिंद्यांना कांहीं अवघड वाटण्यासारखें नव्हतें. या दृष्टीनें नानातर्फे परशुरामभाऊंनीं शिंद्यांबरोबर वाटाघाट सुरू केली. या वाटघाटी होऊन शिंदे या गोष्टीस कबूल

व्हावयाला दीड महिना[१] लागला. बाजीराव यांचा मुक्काम थेऊरास आल्यावर 'दौलतराव शिंदे, सदाशिव मल्हार दिवाण, बाळोबातात्या पागनीस, आणि परशुरामभाऊ पटवर्धन या चौघांचें खलबत होऊन सर्वांनुमतें विचार ठरला कीं, बाजीरावांस कैदेंत ठेऊन पूर्वी ठरल्याप्रमाणें चिमाजीआपास यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक द्यावें आणि त्यांच्या नांवें सर्व राज्यकारभार परशुरामभाऊंनीं चालवावा.[२]' अशा प्रकारें नानांच्या अनुमतीनें परशुरामभाऊंनीं आपल्या पक्षाच्या कारस्थानाची दुसरी पायरी ओलांडली. या सलोख्यांत परशुरामभाऊ कारभारी झाले तरी ते सर्वस्वी नानांचेच असल्यामुळें नानांनीं आपलें कारस्थान पार पाडून शिंद्यांना खालीं पहावयास लावलें, हा मोठेपणा नानांना मिळाला यांत संशय नाहीं. दत्तकाचें प्रकरण शिंद्यांनीं कबूल केल्यामुळें सवाईमाधवरावांचे वेळीं नानांनीं केलेला सर्व कारभार त्यांत कबूल झाला, एवढा विश्वास नानांना येऊन, त्या आपत्तींतून ते शीरसलामत सुटले; एवढेंच नव्हे तर त्यांनीं आपल्या स्वतःचीही या वाटाघाटींत मोकळीक करून घेतली ती खालीं दिल्याप्रमाणें होती.

२०. (१) नानांच्या फडणिशीचा दरक त्यांचेकडेच चालला पाहिजे.

(२) त्यांच्या अब्रूस किंवा पैशास धक्का लागतां उपयोगी नाहीं.

(३) मर्जीस येईल तेथें स्नानसंध्या करून ते सुखरूप राहतील.

(४) त्यांनीं याउप्पर कोणत्याही राजकारणांत न पडतां सातारा सोडून दूर कोठें तरी स्वस्थ रहावें, आणि त्यांच्या ताब्यांत किल्ले व सरंजामाचा मुलूख आहे त्याच्या सोडचिठ्या त्यांनीं बिनतक्रार सरकारच्या हवालीं कराव्या.

२१. या साताराच्या कारस्थानामुळें बाजीरावाला बंदींत ठेऊन चिमाजीला दत्तक देऊन त्याला पेशव्यांच्या गादीला वारस करण्याचा नानांच्या कारस्थानाचा पहिला भाग त्यांच्या पदरांत पडला. दुसरा भाग ह्मणजे पेशव्यांचा कारभार जर नानांच्या हातीं असेल तरच त्यांचें जीवित, धनदौलत व इभ्रत कायम राहील

१ पे. ब. पा. १८५. २ ना. फ. च. पा. १७५.

अशीच परिस्थिति निर्माण झाली होती. पण वरील अटी शिंद्यांनीं मान्य-केल्यामुळें तीही गोष्ट सफल झाली. आतां अधिकाराच्या दृष्टीनें विचार करावयाचा तर नानाऐवजीं त्यांच्या पूर्ण विश्वासांतील त्यांच्या आत्म्याच्या शकलांपैकीं एक, जे परशुरामभाऊ, त्यांचींच नानांच्या जागीं योजना झाल्या-मुळें नानांनींच शिंद्यांवर आपला डाव जिंकला, असेंच स्पष्ट चित्र या साता-ऱ्याच्या कारस्थानांतून रंगून निघालें.

२२. वरीलप्रमाणें सर्व गोष्टी नानांच्या सल्ल्यावरून परशुरामभाऊंनीं घडवून आणल्या. यामुळें शिंदे आणि नाना यांमधील बेबनाव दूर होऊन चिमाजीआपाला गादीवर बसविण्याची खटपट सुरू झाली. त्या वेळीं नाना फडनविसांकडून परशुरामभाऊंना असा निरोप आला कीं, "बाळोबांच्या सहाय्यानें तुह्मी कारभारांत शिरत आहां, यांतही मला आनंदच आहे. पण, तुम्हीं बाळोबांवर आंधळेपणानें विश्वास ठेऊन बसूं नका. आधीं बाजी-रावांस आपल्या ताब्यांत घेऊन पक्का बंदोबस्त ठेवावा. आणि मग चिमाजीआपास गादीवर बसवावा.[१]" याप्रमाणें नानांचा भाऊंना निरोप आला खरा. पण त्यांतील बाजीराव यास कैद करण्याची नानांची योजना त्यांना रुचली नाहीं. याचें कारण असें होतें कीं, बाजीरावास आणण्याकरतां भाऊ ज्यावेळीं जुन्नरास गेले होते, त्यावेळीं त्या उभयतांच्या सात आठ दिवस वाटाघाटी सुरू होत्या. बाजीराव कैदेंत असल्यामुळें त्याच्या हिताकडे पहाणारें असें त्याच्या कळकळीचें दुसरें कोणी माणूस नव्हतें. त्यामुळें पेशव्यांच्या गादीवरील आपला न्याय्य हक्क निःस्वार्थ बुद्धीनें प्राप्त करून देण्यास भाऊ समर्थ आहेत अशी बाजीरावाची कल्पना झाली होती. त्याकरतां 'एके दिवशीं परशुरामभाऊंना एकांतीं नेऊन श्रीमंतांनीं (बाजीरावानें) त्यांच्या पायांवर डोकें ठेविलें आणि डोळ्यांस अश्रु आणून आपल्याला गादीवर बसविण्याविषयीं त्यांचें मन वळविलें, इतकेंच नव्हे, तर तशी त्यांजकडून शपथही घेववली.[२]'

---

१ जिवबादादा ब. च. पा. २२०. २ ना. फ. च. पा. १७१.

बाजीराव हे पेशव्यांच्या गादीचे खरे धनी जरी होते, तरी ते नानांच्या कडक कारागृहवासांत असल्यामुळें 'दोन हस्तक व एक मस्तक' याशिवाय त्यांच्या जवळ स्वतःचें असें दुसरें कोणतें साधन असणार! भावी पेशवे इतक्या लीनतेनें थोड्याच दिवसांपूर्वीं परशुरामभाऊ-सारख्या पराक्रमी शूर पुरुषाला शरण आले होते. परंतु सध्यां राजकारणाचा रंग बदलल्यामुळें कां होईना पण त्यांना कारागृहवासाचें आपणच मरण देणें भाऊंच्या न्याय बुद्धीला रुचलें नाहीं, ह्मणून त्यांनीं नानांच्या निरोपांत थोडा पर्याय काढून अंमलबजावणी करण्याचें ठरविलें. त्यांनीं बाजीरावास कैद करण्याची कामगिरी बाळोबातात्यांवर सोंपविली व चिमाजीआपास घेऊन येण्याची कामगिरी आपले शिरावर घेतली. कारण बाजीरावास कैद केल्याशिवाय चिमाजीचें दत्तविधान अगर त्याची गादीवर स्थापना करणें या गोष्टी अशक्य होत्या. ह्मणून भाऊंना अशा प्रकारचा पर्याय काढून कार्यभाग उरकून घ्यावा लागणार होता.

२३. वरील योजनेनुसार कार्यभाग उरकून घेण्याला प्रारंभ झाला. 'वैशाख मासीं श्रीमंतांचा (बाजीरावाचा) मुक्काम (थेऊरास) झाला होता. तेथें शिंद्याकडून पलटणें श्रीमंतांभोंवतीं येऊन उतरलीं. त्या समयांत पुण्यामध्यें परशुरामभाऊ पटवर्धन व बाबा फडके व त्रिंबकराव परचुरे व गोविंदराव पिंगळे (व काळे) हे उभयतां, बहिरोपंत मेहेंदळे, नारोपंत चक्रदेव, आपा बळवंत असे सर्वत्र लहान थोर सरदार मंडळी वगैरे नानांच्या मसलतीस अनुसरली. तेव्हां परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं मुख्यत्वें लष्करांत जाऊन चिमाजीआपा यांस उचलिलें. त्या वेळेस तेथें मोठा घोळ झाला. परंतु मोठ्या जबरदस्तीनें आपासाहेब यांस कडेवर घेऊन निघाले, ते लागलेच पालखींत घालून पुण्यास आणिलें. तिकडे बाजीराव यास शिंदे आपले लष्करांत घेऊन गेले. लष्करांत घेऊन, डेऱ्यांत ठेवून सभोंवतीं पलटणें बसविलीं. आपासाहेब यांस पुण्यास आणल्यावर शके

१७१८ नलनाम संवत्सरे सन सीत तिस्सैन मय्या व अल्लफ (११९६) वैशाख शुद्ध १० त्या दिवशीं चिमाजीआपा यांचें दत्तविधान[१] झालें' याप्रमाणें परशुरामभाऊंनीं योजिल्याप्रमाणें कार्यभाग घडवून आणला. चिमाजीआपाच्या मनांत सवाईमाधवरावांची बायको यशोदाबाई हिचे मांडीवर दत्तक जावयाचें किंवा पेशव्यांच्या गादीचें धनी व्हावयाचे नव्हतें. त्यावेळीं चिमाजीचें वय अवघें बारा वर्षांचें असतांनासुद्धां, आपला वडील भाऊ बाजीराव याचा खरा हक्क बुडवून आपण धनी बनावें हें त्याला आवडलें नाहीं. ह्मणून तो आपल्या भावाला सोडून परशुरामभाऊबरोबर येण्याला नाकबूल होता. परंतु त्या मुलाची धडपड परशुरामभाऊसारख्या योद्ध्याबरोबर कशी चालणार! त्यांनीं त्याला त्याच्या मर्जीविरुद्ध उचलून आणलें आणि त्याच्या मर्जीविरुद्धच बलात्कारानें त्याला दत्तक[२] होण्यास भाग पाडलें. ही हकीकत ता. २६ माहे मे सन १७९६ रोजीं घडली.

२४. चिमाजीआपाच्या नांवानें पेशवाईचीं वस्त्रें मागण्याकरितां नाना सातान्याच्या महाराजांकडे गेले. व त्यांचेकडून त्यांनीं रीतसर पेशवाईचीं वस्त्रें चिमाजीआप्पाच्या नांवानें घेतलीं. नंतर "नानांनीं शाहुराजास (सातारचे महाराज) वचन दिल्हें कीं, जर संधी सांपडली, तर बाळाजी बाजीराव यांचे कारकीर्दीत रामराजाशीं जो करार झाला आहे त्याप्रमाणें तुह्मांस सांगोलचे तहनाम्यांत लिहून दिलेला परगणा देऊन तो करार सिद्धीस[३] नेईन." याप्रमाणें चिमाजीआपा यांच्या नांवानें पेशवाईचीं वस्त्रें घेण्याकरतां नानांनीं सातारच्या महाराजांना पूर्वीं सांगोलें मुक्कामीं झालेल्या तहनाम्याच्या अटी पुऱ्या करण्याचें वचन दिलें व तीं पेशवाईचीं वस्त्रें घेऊन पुण्यास येण्याकरतां जे साताऱ्याहून निघाले ते वांईस येऊन तेथें त्यांनीं मुक्काम केला. वांईहून पुण्यास येण्याकरतां नाना निघण्याचे वेळीं त्यांना अशी बातमी समजली कीं, परशुरामभाऊंना बाजीरावाला कैद करून पूर्ण बंदोबस्तानें आपल्या ताब्यांत ठेवण्याबद्दल सांगितलें असतां, बाजीरावास शिंद्यांच्या कैदेंत बाळोबातात्यांनीं नेऊन ठेवलें आहे. या गोष्टीमुळें बाळोबा

---

१ पेशव्यांची बखर पा. १८६. २. मराठ्यांची बखर पा. ३२३; नाना फ. यांची बखर पा. १३४. ३ नाना फ. बखर पा. १३३.

व परशुरामभाऊ एक होऊन आपल्याविरुद्ध कांहीं कारस्थान ते रचीत असावेत अशी नानांना शंका आली.

२५. दुसरी गोष्ट अशी घडून आली, कीं चिमाजीआपाचें दत्तविधान झाल्याच्या दुसऱ्या दिवशीं भाऊंनीं नानांना पत्र लिहिलें होतें. 'नानांनीं पुण्यास येऊन कारभार करावा; बाळोबाचें व नानांचें पुनः सख्य व्हावें; व आपणाकडे (भाऊंकडे) फौजेसंबंधीं काम[1] द्यावें;' अशा मजकुराचें तें पत्र होतें. या पत्राचें उत्तर नानांनीं पाठविलें. त्यांत 'यासंबंधीं पूर्वीं कांहीं बोलणें आहे तर आपले पुत्र हरिपंत यास वांईस मजकडे पाठवून द्यावें' असा मजकूर होता. त्याप्रमाणें भाऊंनीं हरिपंताबरोबर चार हजार स्वार देऊन त्याची नानांकडे रवानगी केली. हरिपंताबरोबर चार हजार स्वार देण्यांत भाऊंचा एवढाच हेतु होता कीं, नाना पुण्यास येण्याला बाळोबातात्यांमुळें घाबरत असतील तर त्यांना या फौजेमुळें धीर यावा व त्यांनीं पुण्याला येण्याविषयीं अळंटळं करूं नये. परंतु या परशुरामभाऊंच्या सावधगिरीचा अर्थ शंकाखोर नानांनीं भलताच केला. आपल्या भेटीस हरिपंत एकटाच न येतां ज्याअर्थीं चार हजार स्वारांनिशीं येत आहे त्याअर्थीं बाळोबा व परशुरामभाऊ यांचें संगनमत होऊन आपणाला कैद करण्याचा त्यांचा हा डाव दिसतो अशी शंका नानांना उत्पन्न झाली.

२६. या दोन शंकांमुळें नानांनीं पुण्यास जाण्याचा आपला बेत रहित केला व त्यांनीं 'नव्या[2] पेशव्याचीं वस्त्रें आपल्याजवळ घेऊन ठेवलीं होतीं तीं पुण्यास पाठवून दिलीं;' आणि आपण वांई सोडून मेणवलीस जाऊन राहिले. इकडे पुण्यास नानांनीं पाठविलेलीं पेशवाईचीं वस्त्रें चिमाजीआपांस देण्यांत आलीं व त्यांची रीतसर गादीवर स्थापना होऊन त्यांच्या नांवानें परशुरामभाऊ पेशवाईचा कारभार करूं लागले.

---

१ परशुरामपंतभाऊ यांचें चरित्र पा. १०३. २ मराठ्यांची बखर पा. ३२१.

प्रकरण ३२ वें.

नाना हे एकटेच कलिपुरुष.

इ. स. १७९६.

१. नानांच्या इच्छेप्रमाणें बाजीराव परशुरामभाऊंच्या कैदेंत न पडतां तो शिंद्यांच्या कैदेंत गेला, या एकाच गोष्टीवरून नानांनीं आपल्या कारस्थानाला पलट देऊन नवीन कारस्थान करण्याचें आरंभिलें. यांतून कोणते मुद्दे निघतात.—२ पेशवेघराण्यांत भाऊबंदी तंटे कायम ठेवून एक वारसदार गादीवर तर दुसरा नानांच्या कैदेंत असे ठेऊन राज्यकारभार चालविण्याची आजपर्यंतची नानांची हातोटी. त्यांत परशुरामभाऊंनीं बदल केल्यामुळें त्यांचेवर नानांचा रोष. परशुरामभाऊंचे हातीं कारभारीपणाचा गेलेला हक्क परत आपल्याकडे काढून घेणें एवढ्याचकरतां नानांचें नवीन कारस्थान होतें.—३ नानांच्या नवीन कारस्थानांतील त्यांचीं तीन धोरणें. नानांचें निजाम व भोंसले यांच्याशीं संगनमत. परशुरामभाऊ व बाळोबाताल्या यांस नानांच्या कारस्थानाची बातमी लागते. त्यांचें पारिपत्य करण्याच्या तयारीस ते लागतात. नाना मेणवलीहून रायगडास पळून जातात.—४ नाना रायगडाहून महाडास जाऊन तेथें आपला कायमचा मुक्काम करतात. पावसाळा संपेतोंपर्यंत आपल्यावर पेशव्यांचें सैन्य येऊं नये म्हणून ते सर्व घांटरस्ते खणून टाकतात. महाडास आपल्या पूर्ण संरक्षणाची ते तयारी करतात.—५ निजामाच्या भरमसाट मागण्या कबूल करून नाना त्याची मदत मिळवितात.—६ त्याचप्रमाणें भोंसल्यांचीही ते मदत मिळवितात.—७ नानांच्या नवीन कारस्थानांतील त्यांचे मुख्य शत्रू शिंदे हे होते. नानांची शिंद्यांच्या पारिपत्याकरतां साम, दाम, दंड, भेदादि उपाययोजना. नाना इंग्रजांस वश करून घेतात. शिंद्यांविरुद्ध इंग्रजांच्या हालचाली सुरू. शिंदे घाबरतात.—८ शिंद्यांस फोडण्याकरतां नानांचें भेदनीतीचें अस्त्र—९ शिंद्यांवरील नानांची वशीकरण विद्या. नाना व शिंदे यांचा तह.—१० बाजीरावाबरोबर आपल्या इच्छेनुरूप नाना करार करतात. —११ मानाजी फाकडे या सरदारास बाजीरावांतर्फे नाना आपल्या पक्षांत घेतात.—१२ परशुरामभाऊंस मेटाकुटीस आणण्याकरतां त्यांच्या जहागिरीवर

स्वारी करण्यास करवीरकरांस नाना पेशाची मदत करून उठावणी देतात. तसेंच ते पटवर्धन सरदारांत परशुरामभाऊविरुद्ध भाऊबंदी तंटे उत्पन्न करतात. —१३ परशुरामभाऊविरुद्ध पुण्यास नानांचें फितुरी जाळें.—१४ परशुरामभाऊ व बाळोबातात्या यांस नानांच्या कारस्थानाची माहिती लागते. ते नानांच्या पारिपत्याकरतां आपल्या बुद्ध्यनुरूप नानांची जहागीर व वाडा जप्त करतात. —१५ नानाकरितां मशीरउल्मुलुख परशुरामभाऊंचा विश्वासघात करतो. —१६ परशुरामभाऊंच्या विरुद्ध पुण्यास नानांनीं एक कट केला. तो उघडकीस येऊन परशुरामभाऊ कटवाल्यांचें पारिपत्य करतात. —१७ परशुरामभाऊ व बाळोबातात्या हे बाजीरावास उत्तरहिंदुस्थानांत पाठविण्याचें ठरवितात. ती कामगिरी सखाराम घाडगे याचेकडे देतात. तो नानांस फितुर असल्यामुळें 'चोराच्या हातीं जामदारखान्याच्या किल्ल्या' असा प्रकार घडतो.—१८ नानांनीं फाकडेच्या पारिपत्याकरतां मशीरउल्मुलुखांस परशुरामभाऊ रवाना करतात.—१९ परशुरामभाऊ व बाळोबातात्या यांच्या पारिपत्याकरतां नानांची कोंडी तयार झाली.—२० शिंदे बाळोबातात्या वगैरेंना अकस्मित कैद करतात. परशुरामभाऊंना पकडण्याबद्दलची चिठी चुकून भाऊंच्याच हातीं येते. नानांचें कारस्थान परशुरामभाऊंस समजतें.—२१ परशुरामभाऊ चिमाजीआपास आपल्या घोड्यावर बसवून घेऊन शिवनेरी किल्ल्याकडे पलायन करतात. त्यांच्यामागें नानांच्या सरदारांची फौज लागते. परशुरामभाऊंस कैद करून मांडवगणीं ठेविलें.—२२ परशुरामभाऊंच्या पक्षांतील सरदार मंडळींचें नानांनीं केलेलें पारिपत्य-सत्र. परशुरामभाऊंच्या चित्पावन गटास चित्पावन नानाकडून नूठमाती.—२३ आपला विश्वासघात कोणी करणार नाहीं अशी सर्व बाजूंनीं आपली खात्री करून घेतल्यानंतर नाना पुण्यास येतात.—२४ चिमाजीआपांचें दत्तविधान ज्या नानांनीं शास्त्रसंमत ठरवून करविलें होतें, त्याच नानांनीं तें अशास्त्र ठरवून व त्यास पदच्युत करून बाजीरावास पेशव्यांचे गादीवर बसविलें व आपण स्वतः कारभार करूं लागले.

१. मागील प्रकरणीं दिग्दर्शित केल्याप्रमाणें बाजीराव यास परशुरामभाऊ यांनीं आपल्या कैदेंत न ठेवतां त्याला शिंद्यांच्या कैदेंत जाऊं दिलें या एकाच मुख्य गोष्टीमुळें नानांनीं पुण्यास जाण्याचा मार्ग सोडला व ते दुसऱ्या दिशेनें मेणवलीस निघून गेले. आपल्या इच्छेप्रमाणें बाजीरावाला जर भाऊंनीं

स्वतःच्या कैदेंत बंदोबस्तानें ठेविलेले नानांना समजलें असतें, तर सातारच्या महाराजांकडून घेतलेलीं पेशवाईचीं वस्त्रें ते आपल्याबरोबर घेऊन पुण्यास गेले असते व चिमाजी माधवराव यांच्या वस्त्रधारण समारंभांत मोठ्या उत्साहानें सामील झाले असते, ही गोष्ट निर्विवाद होती. पण तसें न होतां त्यांनीं एकदम पलट खाल्ली व ते मेणवलीस निघून गेले यांतच नानांच्या कारस्थानाचा मुख्य प्रवाह आहे हें स्पष्ट दिसतें. नानांच्या या नवीन कारस्थानाचा उगम कशाकरतां होता, हें येथें पहाणें अगदीं जरूरीचें आहे. त्या दृष्टीनें पाहतां खालील गोष्टी प्रामुख्यानें पुढें येतात.

(१) पेशव्यांच्या राज्यरक्षणासाठीं नानांचें हें भावी कारस्थान होतें कीं काय?

(२) केवळ व्यक्तिविषयक नानांचा त्यांत स्वार्थ होता कीं काय?

२. वरील दोनच गोष्टींचा येथें विचार केला म्हणजे नानांच्या भावी कारस्थानाची रूपरेखा सहज लक्षांत येईल. खर्ड्याच्या लढाईनंतर पेशव्यांच्या राज्याची जी स्थिरस्थावरता, भरभराट, उत्कर्ष व कीर्ति झाली, त्यांत सवाई माधवराव यांच्या मृत्यूखेरीज या वेळीं कोणत्याही प्रकारचा बदल अगर राजकीय स्वरूपाची उलाढाल झालेली नव्हती. इंग्रज, टिपू, निजाम यांचे झालेले तहनामे कायम होते. शिंदे, होळकर, भोंसले, गायकवाड, पटवर्धन, रास्ते, सातारकर छत्रपती, करवीरकर वगैरेही सर्व पेशव्यांचे मांडलिक, सरदार, मानकरी मुत्सद्दी वगैरे यांच्यांत कोणताही नवीन कलह उत्पन्न झालेला नव्हता; अगर उत्पन्न होऊं घातलेलाही नव्हता. सवाईमाधरावांच्या पश्चात् गादीचा धनी कोणाला करावें याबद्दल जरी दोन पक्ष निर्माण झाले होते, तरी परशुरामभाऊंच्या मध्यस्थीनें व परिश्रमानें उभयपक्षांचा समेट होऊन त्याप्रमाणें चिमाजीआपांना गादीवर बसविण्यांत आलें होतें. या एकंदर परिस्थितीमुळें पेशव्यांच्या राज्यावर कोणत्याच प्रकारचें संकट अगर गंडांतर आलेलें नव्हतें हें कोणासही कबूल करावें लागेल. यावरून या वेळीं पेशवाई बुडत होती, ती तारण्याकरतां नानांना नवीन कारस्थान करावें लागणार होतें, असें कोणीच म्हणूं शकणार नाहीं. असें असतां नानांनीं आपल्या आंखलेल्या धोरणांत माघार घेऊन जो मेणवलीचा

मार्ग सुधारला व निराळ्या भावी कारस्थानाला सुरवात केली, त्याच्या मुळाशीं काय होतें तें आतां पहाणें अवश्य आहे. नानांनीं इतके दिवस माधवराव पेशव्यांपासून जो पेशवाईचा कारभार केला, तो केवळ आपल्या हातांत भाऊबंदी तंट्याचें अखंड शस्त्र धरून केला असें दिसून येईल. माधवराव, नारायणराव व सवाईमाधवराव यांच्यापुढें नानांनीं राघोबादादा व आनंदीबाई यांचीं भाऊबंदी तंट्यांचीं पिशाच्चें उभीं केलीं. राघोबादादा व आनंदीबाई स्वर्गवासी झाल्यानंतर सवाईमाधवरावांपुढें बाजीरावाचा भाऊबंदी तंट्याचा काळपुरूषही त्यांनींच उभा केला. एकंदरींत नानांनीं भाऊबंदी तंटे अखंड चालू ठेवण्याच्या आपल्या शस्त्राखालीं तीनही पेशव्यांस शेळ्या मेंढ्या बनवून मनसोक्त पेशवाईचा कारभार केला, खुद्द पेशव्यांचा अधिकार गाजविला व पेशव्यांच्या राज्याचा उपभोग घेतला. पुढें सवाईमाधवराव मृत्यु पावले. त्यामुळें भाऊबंदींतील एक पक्ष कायमचा नष्ट झाला. तेव्हां कोणी तरी एक गोतज उभा करून त्यास यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन गादी चालवावी असा नानांनीं पहिला प्रयत्न केला. हा नानांचा प्रयत्न सफल झाला असता, तर गादीवरील दत्तक पुत्र व बाजीराव यांमधील भाऊबंदी कायम ठेऊन नानांना आपला अधिकार अखंड चालवितां आला असता. परंतु दुर्दैवानें राघोबाचे दोन औरस पुत्र जिवंत असल्यानें नानांचा तो प्रयत्न लंगडा पडला. अशा स्थितींत शिंद्यांच्या प्रयत्नाप्रमाणें बाजीराव जर गादीवर बसला असतां, तर भाऊबंदी तंट्याचें कारणच उरत नव्हतें. चिमाजीआपा हा पूर्णपणें बाजीरावाचे वचनांत वागणारा होता; तेव्हां असें झालें असतें तर नानांनीं धारण केलेलें कलहाचें शस्त्र आपोआप भंग पावून त्याबरोबर त्यांचेंही अस्तित्व नष्ट झालें असतें. याकरतां चिमाजीची इच्छा नसतांना व त्याचें दत्तविधान हिंदुधर्मबाह्य असूनही तें अन्यायानें व बळजबरीनें घडवून आणून पुन्हां भाऊबंदी तंट्याचें शस्त्र नाना पाजळणार होते. भाऊबंदी तंट्यांपैकीं एक पक्ष गादीवर तर दुसरा पक्ष आपल्याच कडक कारागृहवासांत ठेवणें असा नानांच्या कारभाराचा हिशोब होता. असा हिशोब असेल तरच नानांचा अधिकार कायम राहणार होता.

परंतु या नानांच्या हिशोबांत परशुरामभाऊंनीं बदल केल्यामुळें नानांना अशा परिस्थितींत पुन्हां चांगुलपणानें कारभार हातीं येण्याची आशा उरली नाहीं. म्हणून 'आडवें आलें तर कापून काढणें' या आपल्या कारस्थानी तत्वा-प्रमाणें परशुरामभाऊसारख्या आपल्या उजव्या हाताला छाट देऊन नवीन कारस्थान करण्यास नाना तयार झाले. या वेळीं शिंदे व नाना यांचा जो समेट भाऊंनीं घडवून आणला, त्यांत मागें दर्शविल्याप्रमाणें फक्त कारभारी-पणाचा तेवढा नानांचा हक्क गेला. बाकी सर्व त्यांचें पूर्ववत् चालणार होतें. परंतु स्वस्थ हरि हरि म्हणत नानांना बसावयाचें नव्हतें. त्यांना अखेरपर्यंत आपला अधिकार सोडावयाचा नव्हता. नानांना केवळ व्यक्तिविषयक स्वार्थ साधावयाचा होता, हें नानांच्या पुढील कारस्थानावरून दिसून येईल. नानांना हिंदुपदपादशाहीचा, सुराज्याचा, स्वधर्माचा, स्वपक्षाचा किंवा स्वजातीचा, कशाचाच काडीमात्र अभिमान नव्हता. त्यांना जो अभिमान किंवा जी आसुरी महत्वाकांक्षा होती, ती केवळ आपला स्वार्थ व आपला अधिकार कायम राखण्याकरतां होती, हें पुढील इतिहासावरून लक्षांत येईल. नाना केवळ स्वतःचा स्वार्थ साधणारे कलिपुरुष होते, हें पुढील त्यांच्या कारस्थानां-वरून सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट होईल.

३. नानांच्या या नवीन कारस्थानाचें स्वरूप कोणीकडून तरी आपल्या हातीं पेशवाईचा कारभार पुन्हां यावा एवढेंच होतें. याकरतां नानांना बरीच उलटापालट करावी लागणार होती; (१) चिमाजीआपाला गादीवरून काढून टाकून दत्तकामुळें प्राप्त झालेला पेशव्यांचे गादीवरील त्याचा हक्क नष्ट करून टाकणें. (२) आपल्यामुळें बाजीरावाला पेशव्यांच्या गादीचा गेलेला वारसा हक्क पुन्हां प्राप्त झाला या नानांच्या उपकारांच्या ओझ्याखालीं बाजीरावानें त्यांचे ताटाखालील मांजर होऊन रहावें व नानांकडे पूर्ववत् कारभारीपद चालावें. (३) नानांचें कारभारीपद हिरावून घेणारे परशुरामभाऊ व बाळोबा-तात्या यांना कडक शासन मिळावें. या मुख्य तीन गोष्टी नानांना आपल्या नवीन कारस्थानामुळें साधावयाच्या होत्या. त्याप्रमाणें ते मेणवलीस गेल्यानंतर

कार्याला लागले. पेशव्यांच्या राज्यकारभारांत नानांनीं खर्ड्याच्या लढाईंतील विजयामुळें आपलें स्थान कमानीच्या चावीच्या दगडाप्रमाणें कसें मजबूत करून ठेवलें होतें हें मागें आलेंच आहे. त्यामुळें कारभाराचीं सर्व सूत्रें नाना हालवितील त्याप्रमाणें सहज हालणारीं होतीं. कारस्थानाला लागणारा पैसा नानांजवळ विपुल भरलेला होता. नानांच्या कारभाराचा अधिकार तेवढाच भाऊंच्या हातीं आला, पण अधिकार राखणारा पेशव्यांचा खजिना मात्र कोरडा ठंठणीत हातीं घेण्याचें भाऊंच्या नशिबीं आलें. त्यामुळें कोणतेंही नानांचें कारस्थान भाऊंच्यावर मात करणारें होतें. मेणवलीहून 'चिमाजीस गादीवरून काढून त्या जागीं बाजीरावाची स्थापना करावी अशाबद्दल त्यांनीं (नानांनीं) निजाम व भोंसले यांशीं राजकारण सुरू ठेवलें.[1]' ही हकीकत पुण्यास परशुरामभाऊ व बाळोबातात्या यांस समजतांच त्यांना नानांचा भयंकर राग आला. शिंद्यांबरोबर भाऊंच्या मध्यस्थीनें नानांनीं स्वतः ठरविलेल्या अटी अल्प काळांतच झुगारून देऊन ते पुन्हां राजकारणांत ढवळाढवळ करूं लागले व आपल्या ताब्यांतील किल्ले व मुलूख यांच्या सोडचिठ्या सरकारांत न देतां उलट चिमाजीआपाच्या नांवानें त्यांच्याच सल्ल्याप्रमाणें राज्यकारभार चालू असतां परशुरामभाऊ व बाळोबातात्या यांना तोंडघशीं पाडून त्याला खीळ घालण्याच्या उद्योगाला ते प्रवृत्त झाले, यामुळें नानांचा मेंदु आतां सडला-कुजला आहे असें या उभयतांस वाटलें असेल यांत शंका नाहीं. भाऊ व तात्या यांनीं या कारणाकरतां असें ठरविलें कीं, नानांनीं इतःपर दक्षिणेंत राहणें मोठ्या धोक्याचें आहे. तूर्त त्यांनीं टोक्यास जाऊन रहावें व चातुर्मास संपल्यानंतर काशीस जावें. असें ठरवून भाऊंनीं चिंतोपंत लिमये व विसाजीपंत वाडदेकर या दोघांबरोबर नानांस निरोप पाठविला कीं, 'तुह्मीं तूर्त टोक्यास जाऊन रहावें. तुह्मांस आणण्याकरतां आमचे चिरंजीव महादजीपंत दाजी यांची सहा हजार फौजेसह रवानगी केली आहे; ते तुह्मांस टोक्यास पोंचवून देतील

---

१ व २ ना. फ. च. पान १७६—१७७.

व पुढेंही तुह्मीं सांगाल तितके दिवस ते तुम्हांजवळच राहतील. तुमचें वित्त, जीवित आणि अब्रू यांना कोणाकडून धक्का लागणार नाहीं, याबद्दल आम्ही जामीन आहों. तुम्ही खुशाल आमच्या फौजेच्या स्वाधीन व्हावें.'[२] याप्रमाणें नानांच्या सल्ल्याप्रमाणें शिंद्यांशीं केलेल्या कराराच्या पूर्ततेच्या दृष्टीनें व नानांना त्यांच्या अखेरच्या आयुष्यांत पुण्यमय असा काशीवास घडून त्यांना सुख, समाधान व शांति लाभावी या हेतूनें आपुलकीनें त्यांची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन भाऊंनीं आपला मुलगा फौजेसह त्यांच्याकडे रवाना केला. पण हा सर्वांनाच हितप्रद असलेला मार्ग नानांना चोखाळावयाचा नव्हता. काशींत 'हरि, हरि,' ह्मणत बसून पुण्याचा संचय करण्यापेक्षां पेशवाईच्या कारभारांतील अधिकारांत व पेशवाईच्या संपत्तीची आपल्या स्वतःच्या खजिन्यांत भर टाकण्यांत त्यांना जास्त आनंद व समाधान वाटत होतें, याकरतां महादजीपंत दाजी हा सातारा जिल्ह्यांत खंडाळ्यापर्यंत आला अशी बातमी लागतांच, नानांनीं ता. ४ जून सन १७९६ रोजीं रात्रीस मेणवलीहून निघून चारपांच हजार फौजेसह रायगडाकडे पलायन केलें.

४. नानांचा रायगडास एक दोन दिवसच मुक्काम झाला. पावसाळी सर्द हवा त्यांच्या प्रकृतीला मानवेना ह्मणून तेथून ते महाडास जाऊन राहिले. येथें त्यांचा मुक्काम कायम झाला. त्यांनीं पहिल्यानें पुण्याहून आपल्यावर फौज येऊं नये व पावसाळा संपेपर्यंत आपल्याला महाडला राहतां यावें असा बंदोबस्त केला. पुण्याहून सह्याद्रीपर्यंत उतरून महाडाकडे येणारे मढा, शेवता वगैरे जे पांचसहा घांट आहेत, ते नानांनीं माणसें लावून खणून टाकले. आणि मोठमोठे वृक्ष तोडून ते घांटांतून आडवे तिडवे टाकून घांटाचे रस्ते होते कीं नव्हते असें करून टाकलें. यामुळें निदान चार महिने तरी पुण्याची फौज घांटाखालीं उतरूं शकणार नाहीं असा पक्का बंदोबस्त झाल्यावर त्यांनीं हजार पंधराशें गारदी व शेंदोनशें स्वार एवढेंच सैन्य आपल्याजवळ ठेवून बाकीच्या सैन्यास रजा दिली. याप्रमाणें

सुटसुटीत पण पूर्ण बंदोबस्ताची व्यवस्था करून, नाना पुढील कारस्थान रंगविण्याच्या खटपटीला निर्धास्तपणें लागले. परशुरामभाऊ व बाळोबा-तात्या यांच्याविरुद्ध नानांनी उभारलेल्या या नवीन कारस्थानाकरतां त्यांनी आपलें सर्व वजन, संपत्ति, दरारा, बुद्धि वगैरे जें सर्व कांहीं होतें, तें पणाला लावून हें कारस्थान यशस्वी करण्याचा संकल्प केला होता.

५. आपल्या या कारस्थानाला नानांनीं निजाम व भोंसले यांना अगो-दरच वश करून घेऊन त्यांचा रुकार मिळविला होता. त्याप्रमाणें पुढील राजकारण निश्चित करण्याकरतां भोंसल्यांचा कारकून गोविंद भगवंत या नावाचा पुण्यांत होता, तो नानांच्या विश्वासांतील असल्यामुळें त्याच्या करवीं निजामाचें राजकारण नक्की करण्याची त्यांनीं पहिल्यानें खटपट केली. निजामाचा दिवाण मशीरउल्मुलुख हा खर्ड्याच्या लढाईनंतर पेशव्यांच्या कैदेंत पुण्यांत राहत होता. त्याच्याशीं गोविंद भगवंत यांनीं संधान बांधून व भेटी गांठी घेऊन नानांचा इरादा त्यास कळविला. खर्ड्याच्या तहाच्या अटींवर नानांची मखलाशी झाली असल्यामुळें परशुरामभाऊपेक्षां नानांचें कारस्थान भरीव व फायद्याचें आहे असें मशीरउल्मुलुखास वाटून आल्यामुळें त्यांनीं नानास चिमाजीआपाविरुद्ध मदत करण्याचें ठरविलें. या मदतीबद्दल [१] खर्ड्याच्या तहान्वयें निजामाकडून जो साडेबत्तीस लक्ष उत्पन्नाचा मुलुख पेशव्यांना मिळाला होता तो नानांनीं परत निजामास द्यावा व देणें राहि-लेली खंडणी माफ करावी, ही मशीरउल्मुलूखाची मागणी गोविंदराव यांनीं नानांस महाडास कळविली. त्याप्रमाणें नानांचे व निजामाचें करार होऊन निजामाची संपूर्ण मदत नानांनीं मिळविली.

६. खर्ड्याच्या तहामुळें नानांनीं भोंसल्यांवर पर्वतप्राय उपकार केल्या-मुळें ते सर्वस्वी नानांच्या लगामींच होते. 'त्यांना [२] पंधरा लक्ष रुपये व गढेमंडळ प्रांत देण्याचें ठरविलें. शिवाय त्यांच्या कारभारी मंडळीस खूष ठेविल्याशिवाय हें कारस्थान गुप्तपणानें सिद्धीस जाणार नाहीं, हें नाना

---

१ व ३ नागपूरकर भों. बखर पा. १५०. २. ना. फ. च. पा. १८०.

जाणून होते. हें कारस्थान सिद्धीस जावयाला फौजेसह भोंसले पुण्यास येणें अगदीं अवश्य होतें. त्याशिवाय शिंद्यांना प्रत्यक्ष शह बसणार नव्हता. भोंसले आपल्या कारभाऱ्यांच्या सल्ल्याखेरीज त्वरित पुण्यास येणार नाहींत, ह्मणून भोंसल्यांचे कारभारी श्रीधर लक्ष्मण, कृष्णराव माधवराव चिटनवीस, व्यंकटराव काशी यांच्याबरोबर गोविंद भगवंत यांचे करवीं बोलणें करवून नानांनीं असा करार केला कीं, ' ही मसलत सिद्धीस नेल्यास जहागीर तुमचे जातीस त्रिवर्गांस देण्यांत येईल.[३] ' याप्रमाणें करार ठरून या वचनप्रमाणाकरतां नानांनीं तुळशी पाठविल्या. याप्रमाणें भोंसल्यांस फौजेसुद्धां पुण्यास निघून येण्याबद्दल कारभाऱ्यांनीं लिहून पाठविलें. अशा प्रकारें या कारस्थानांत भोंसल्यांचा नानांनीं पक्का प्रवेश करून घेतला.

७. नानांच्या कारस्थानांतील दिसून येणारी क्रांति ह्मणजे चिमाजीआपाला गादीवरून काढून टाकून बाजीरावाला गादीवर बसविणें ही होती. परंतु बाजीराव हा शिंद्यांच्या कैदेंत असल्यामुळें नानांच्या कारस्थानाचा सर्व जोर शिंद्यांवर खर्ची पडणार होता. याकरतां शिंद्यांना नामोहरम करण्यासाठीं नानांनीं साम, दाम, दंड, भेद या चारी अस्त्रांचा मारा करण्याचें ठरविलें. या कारस्थानांतील साध्यांत बाळोबातात्यांचें पारिपत्य व्हावें हाही हेतु असल्यामुळें व शिंदे या मसलतींत सामोपचारानें सामील होणें अगदींच अशक्य असल्यामुळें, नानांना सामोपचाराची पहिली पायरी सोडणें भाग पडलें. या पायरींपैकीं दंडाची पायरी फार महत्वाची होती. त्याकरतां नानांनीं पहिल्यानें इंग्रजांबरोबर संधान बांधलें. सालबाईच्या तहनाम्यावर नानांची मखलाशी असल्यामुळें इंग्रजांना नानांचाच पक्ष घेणें उचित होतें. नानांची इंग्रजांना सूचना जातांच त्यांना राहण्याकरतां इंग्रजांनीं साष्टीचा किल्ला आपला माल काढून रिकामा करून दिला. पावसाळा संपण्याच्या आंत आपल्या कारस्थानाचा जम न बसल्यास महाड हें ठिकाण

आपल्यास संरक्षणाच्या दृष्टीनें कमी दर्जाचें होईल यासाठीं पूर्ण संरक्षणाची जागा ह्मणून साष्टीचा किल्ला अगोदरपासून गुंतवून ठेवण्याचें धोरण नानांनीं ठेवलें. त्यानंतर शिंद्यांना शह देण्याकरतां इंग्रजी पलटणें मुंबई, कलकत्ता व लखनौ येथें जमूं लागलीं. त्याविषयीं मराठी राज्यांत अशा कंड्या पिकूं लागल्या कीं, 'इंग्रज दिल्लीवर स्वारी करून त्या दरबारांतून शिंद्यांचें उच्चाटण करणार.' इंग्रजी लष्कराच्या या हालचाली पाहून शिंद्यांचा मुख्य सेनापती डी बॉईन हा घाईघाईनें दिल्लीकडे निघाला. याप्रमाणें शिंद्यांना भीति दाखविण्याचें काम सुरू असतां इंग्रजांच्या पुण्याच्या वकिलानें शिंद्यांबरोबर बोलणें लाविलें कीं, 'तुह्मीं नानांस उपद्रव करणार नाहीं, याबद्दल आमची कशी खात्री करणार ती करा, म्हणजे कारभारांत ढवळाढवळ न करतां नानाही स्वस्थ राहतील याबद्दलची हमी आह्मीं घेतो.' याप्रमाणें नानांच्या वर्तानें इंग्रज दंड थोपटून उभे राहिले हे पाहून शिंदे भयभीत झाले.

८. महादजी शिंद्यांच्या वेळचे जुने मुत्सद्दी रामजी पाटील व रायाजी पाटील असे दोघे होते. ते पूर्णपणें नानांच्या वळणांतले होते. त्यांचें व बाळोबा-तात्यांचें नीट[1] नव्हतें. त्यांना नानांनीं अशी चिथावणी दिली कीं, शिंद्यांच्या राज्यासारखें मराठ्यांचें राज्य असून त्यांत शेणवी मुत्सद्यांचें वर्चस्व असावें व तुम्ही जुने नाणावलेले मराठे मुत्सद्दी असतांना, तुमची दरबारांत कांहीं प्रतिष्ठा नसावी हें बरें नाहीं. असे त्यांचे नानांनीं कान फुंकले व बाळोबाच्याविरुद्ध शिंद्यांना नानांच्या पक्षाला सामील करून घेण्याच्या कामगिरीवर त्यांना सोडलें. या उभयतां पाटलांनीं दौलतरावांची भेट घेतली व त्यांना असा सल्ला दिला कीं, 'तुम्हीं शेणव्यांच्या नादानें भलतीकडेच वाहवत चालला. नानांस इंग्रज, मोंगल, व भोंसले यांचें पाठबळ आहे. एकीकडून मोंगल, दुसरीकडून इंग्रज आणि तिसरीकडून नाना, असा तिहेरी शह लागल्यास आपल्या सरदारीची दशा काय होईल? याकरतां आतां शेणव्यांचा नाद सोडून देऊन नानांशीं मिलाफ

---

१ परशुरामपंतभाऊ यांचें चरित्र पा० १०६

करून घ्यावा.' त्याचप्रमाणें महादजी शिंद्यांची एक रखेली केशरी या नांवाची होती. तिच्याकडे नानांचें वळण होतें. ती त्या वेळीं उज्जनीस राहत असे. तिच्याकडूनही दौलतरावांस नानांबरोबर सख्य करून घेण्याविषयीं टोंचणी लावली.

९. सखाराम घाटगे या नांवाचा एक मराठा शिंद्यांच्या चाकरींत यावेळीं होता. तो पूर्वींचा कोल्हापुराजवळील कागल गांवचा रहिवासी होता. तो कागल संस्थानिकांचा दूरचा भाऊबंद होता. त्यानें कागलचें संस्थान आपणास मिळावें ह्मणून पूर्वीं बरीच खटपट केली. परंतु ती व्यर्थ गेली होती. नंतर त्याला कागल गांवीं राहणेंसुद्धां अशक्य झालें ह्मणून तो तें गांव सोडून परशुरामभाऊकडे आला. भाऊंनीं त्याला आपल्या चाकरींत ठेवलें. नंतर भाऊंच्याच आश्रयानें तो पुढें नानांच्या चाकरींत गेला. नुकताच तो नानांची नोकरी सोडून शिंद्यांकडे चाकरीस राहिला. तो मोठा चतुर व उमेदवार होता. त्याच्यावर रायाजी पाटील यांचीही मर्जी[१] होती. या सखाराम घाटगेला एक अत्यंत सुस्वरूप अशी कन्या होती. तिच्या सौंदर्यानें दौलतराव शिंदे मोहित झाले होते व ती प्राप्त करून घेण्याच्या खटपटींत ते होते. त्यामुळें घाटगे यांचा शब्द शिंदे झेलीत होते. ही गोष्ट नानांना माहीत होती. तेव्हां नानांनीं सखाराम घाटगेकडून शिंद्यांना वश करून घेण्याचा डाव टाकला. हें स्त्रीचें मोहिनी अस्त्र शिंद्यांवर जाऊन आदळल्याबरोबर त्यांनीं बाळोबातात्यावरील आपला विश्वास व लोभ झुगारून दिला व ते नानाबरोबर सख्य करण्यास तयार झाले. त्याप्रमाणें शिंदे व नाना यामधील करार रामजी पाटील यांच्या मध्यस्थीनें ठरला. तो असा—'शिंद्यांनीं[२] बाळोबा व भाऊ यांचें पारिपत्य करावें, आणि बाजीरावास गादीवर बसविण्याविषयीं व नानांच्या हातीं पूर्वीप्रमाणें राज्यकारभार सोंपविला जाण्याविषयीं, जितका प्रयत्न करतां येईल तितका झटून करावा. श्रीमंत गादीवर बसले व नाना कारभार करूं लागले, ह्मणजे शिंद्यांनीं कूच करून हिंदुस्थानांत जावें. ते जांबगांवास गेले ह्मणजे नानांनीं त्यांस पन्नास लक्ष रुपये द्यावे, व गोदावरी उतरून गेल्यावर आणखीं पन्नास लक्ष रुपये द्यावे. शिवाय नानांनीं श्रीमंतांकडून

---

१ डफकृत म. ब. पा. ३२४. २ ना. फ. च. पा. १८०.

शिंद्यांस अहमदनगरचा किल्ला व दहा लक्षांची जहागीर ' आणि ' परशुरामभाऊंची[1] सर्व जहागीर ' देववावी. याप्रमाणें नानांनीं शिंद्यांना आपल्या कारस्थानाच्या जाळ्यांत पकडलें.

१० आपल्या कारस्थानांत सामील करून घेण्याकरतां सर्वांच्या भरमसाट मागण्या नानांनीं मान्य केल्या व तसे करारमदारही झाले. ते करार पाळण्याची जबाबदारी नानांवर होती. उद्यां बाजीराव गादीवर बसल्यानंतर त्यांच्या मखलाशीशिवाय या जहागिरी वगैरे देतां येणार नाहींत म्हणून नानांनीं बाजीरावाबरोबर गुप्त प्रकारें पत्रव्यवहार सुरू केला. बाजीरावास आपण गादीला मुकलों असेंच वाटत होतें. आपल्या नशीबीं बंदिवासच आहे असें जाणून त्यांची निराशाच झाली होती. अशा स्थितींत बाळोजी कुंजर याचेमार्फत नानांनीं बाजीरावाबरोबर बोलणें सुरू केलें. हा बाळोजी कुंजर बाजीरावाकडे बारगीर[2] होता. नाना आपणाला गादीवर बसविण्याची खटपट करीत आहेत हें पाहून बाजीरावाला आनंद झाला व नाना ज्या अटी घालतील त्या मान्य करण्यास ते कबूल झाले. त्याप्रमाणें बाळोजी कुंजर याच्या मध्यस्थीनें बाजीरावांनीं नानांस ते म्हणतील त्याप्रमाणें करारपत्र लिहून दिलें. तें असें:–' तुम्हीं आम्हांस गादीवर बसवाल तर आम्हीं यापुढें सर्व राज्यकारभार तुमच्या सल्लयानेंच करीत जाऊं. शिवाय आमची स्थापना करण्याकरितां तुम्हीं शिंदे, भोंसले, निजाम, इंग्रज, वगैरेशीं जे जे करार ठरवाल ते ते सर्व आम्हीं इमानानें पाळूं आणि त्या करारांचा अंमल तुमच्या म्हणण्याप्रमाणेंच शब्दशः करण्यांत येईल.' याप्रमाणें बाजीरावाला नानांनीं चांगलेंच बांधून घेतलें. आतां नानांना वाटेल ते करार, वाटेल ती जहागीर, वाटेल तें सर्व कांहीं बाजीरावाला गादीवर बसविण्याकरतां पणास लावावयास मोकळीक झाली.

११. राघोबादादांचा पूर्ण पक्षपाती व अभिमानी असा मानाजीराव शिंदे ऊर्फ फाकडे या वेळीं शिंद्यांच्या लष्करांत होता. त्याचा बाजीरावाकडे

---

१ परशु. भा. च. पा. १०७. २. जिवबादादा बक्षी च. पा. २२२.

सर्व बाजूनें ओढा होता. हा मोठा पराक्रमी व बाणेदार सरदार असल्या-बद्दल पूर्वी माहिती आलीच आहे. बाजीरावास गादीवर बसविण्याची स्वतः नाना खटपट करीत आहेत, यामुळें त्यालाही आनंद होणें स्वाभाविक होतें. नानांना तो सामील होणें अशक्य होतें. तेव्हां नानांनीं बाजीरावाकडे गुप्त प्रकारें पैसा[1] पाठवून दिला व त्यांच्याकरतां म्हणून मानाजीरावाला फौज तयार करण्याचें काम देवविलें. मानाजीराव ह्यानें आपल्या धन्याच्या कामाकरतां आपली नवी फौज तयार करण्याचें काम सुरू केलें. त्यानें शिंद्यांच्या गोटांतच पांच सहा हजार फौज तयार केली.

१२. नानांचे परमभक्त व उजवा हात समजले जाणारे आणि परंपरागत स्नेही असे जे परशुरामभाऊ पटवर्धन, त्यांच्याकरतां नानांनीं स्वतंत्रच फांस 'घरचा चोर जिवानिशीं मारी' या म्हणीप्रमाणें तयार केला. परशुरामभाऊंच्या प्रत्यक्ष जहागिरीच्या मुलुखांवर स्वारी झाली असतां ते मेटाकुटीला येतील असा डाव नानांनीं टाकला. नानांनीं करवीरच्या महाराजांशीं राजकारण करून त्यांस सांगितलें कीं, 'भाऊंच्या[2] सरंजामी मुलुखावर स्वारी करून तुम्ही तो प्रांत खुशाल ताब्यांत घ्यावा. पेशवाई मुलुखास मात्र तुह्मी काडीमात्र उपद्रव देऊं नये. यावर महाराज ह्मणाले कीं, आज भाऊंत व तुह्मांत वांकडें आहे ह्मणून तुह्मी आह्मांस असें करावयास सांगतां. पण उद्यां तुह्मीं व भाऊ एक झालांत आणि भाऊंनीं आह्मांवर स्वारी केली, तर आमची काय वाट ? यावर नानांनीं त्यांस आश्वासन दिलें कीं, भाऊंची तुह्मांवर स्वारी होईल तर आम्ही तुमचा बचाव करूं.' करवीरच्या महाराजांनीं फौज ठेवून भाऊंचे मुलु-खावर स्वारी करण्याच्या तयारीकरतां नानांजवळ दोन लक्ष रुपयांची मागणी केली. नानांनीं तात्काळ त्यांस ते उसनवार ह्मणून दिले. त्याच-प्रमाणें भाऊंचें भाऊबंदी तंट्यानें घर फोडण्याचें कृत्य नानांनीं केलें. पटवर्धनांचें अवाढव्य भाऊबंद घराणें होतें. इतके दिवस तें घराणें एक-त्रित असून सर्वांचें सलोख्याचें वर्तन होतें. नानांनीं या त्यांच्या सलो-

---

१. प. भा. पटवर्धन यांचें च. पां. १०७. २. ना. फ. च. पा. १८२.

ह्यांत वीष ओतून त्यांच्यांत वैमनस्य उत्पन्न केलें. नानांनीं परशुरामभाऊंशीं मिरजकर पटवर्धन व कुरुंदवाडकर पटवर्धन या उभय पटवर्धन भाऊबंदांना प्रतिस्पर्धी उत्पन्न केले. हे दोघे परशुरामभाऊंच्या विरुद्ध नानांना मदत करूं लागले. त्यामुळें परशुरामभाऊंचा पक्ष बराच कमजोर झाला.

१३. नानांचे स्नेही बाबा फडके, नारोपंत चक्रदेव, धोंडोपंत निसुरे वगैरे पुण्यांतच राहिले होते. त्यांनीं पुण्यांत आणि पुण्याच्या बाहेर फितुर उत्पन्न करण्याचा क्रम नेटानें चालविला. त्रिंबकराव परचुरे, गोविंदराव मामा वगैरे मंडळी भाऊंच्या कारभारांतून निरनिराळीं कारणें दाखवून अलग झाली. त्यामुळें भाऊंच्या कारभारालाही नाना तऱ्हेनें व्यत्यय येऊं लागला. एकंदरींत भाऊंच्या कारभाऱ्याच्या गाड्याला जितक्या तऱ्हेनें खीळ घालतां येईल तेवढे सर्व प्रयत्न नानांनीं सुरू केले.

१४. याप्रमाणें परशुरामभाऊ व बाळोबातात्या या उभयतांकरतां कपटी व कारस्थानी जाळें विणण्याचें काम नाना महाडास राहून करीत होते. हें जाळें बरेंच गुप्त स्वरूपाचें असल्यामुळें बरेच दिवसपर्यंत त्याचा सुगावा भाऊ व बाळोबा यांना लागला नाहीं. पुढें बाबा फडके व मानाजी फाकडे यांच्या हालचाली ज्या वेळीं होऊं लागल्या, त्या वेळीं एक एक गोष्ट बाहेर येऊं लागली, व तिच्या मुळाशीं नाना असल्याबद्दल भाऊंची खात्री होऊं लागली. नाना आपल्याविरुद्ध कोणतेंही राजकारण करणार नाहींत, अशी भाऊंना जशी खात्री होती, तशीच शिंदे आपल्याविरुद्ध कोणतीही गोष्ट करणार नाहींत अशी बाळोबालाही खात्री होती. याकरतां नानांच्या कारस्थानाचा उत्कर्ष दिवसेंदिवस, जरी होऊं लागला, तरी भाऊ व बाळोबा निर्धास्त होते. परंतु नानांच्या कारस्थानाची मजल जेव्हां हिशोबाचे बाहेर गेलेली या उभयतांना दिसली, तेव्हां नानांच्या पारिपत्याबद्दल त्यांना प्रयत्न करणें प्राप्त झालें. नानांचें खास पथक दीड हजार स्वारांचें होतें. त्याच्या सरंजामाचा मुलुख जो होता तो भाऊ व बाळोबा

यांनीं जप्त केला. खर्ड्याच्या लढाईंत नानांची संभावना म्हणून नानांना निजामाकडून जी तीस हजारांची जहागीर मिळाली होती, ती व इनामगांवही जप्त केले. पुण्यांतील नानांचा वाडा जप्त करण्यांत आला. तेव्हां त्यांत जवाहीर व रोकड फारशी सांपडली नाहीं. परंतु कापड मात्र सुमारें तीस चाळीस लाखांचें सांपडलें. तें परशुरामभाऊंनीं दसऱ्यानिमित्त सालाबादप्रमाणें आपल्या लष्करांत वांटून दिलें.

१५. निजामाचा दिवाण मशीरउल्मुलुख हा खर्ड्याच्या लढाईपासून पेशव्यांच्या कैदेंत पुण्यास होता. निजामाचें व नानांचें कारस्थान सिद्ध झाल्यावर आपली सुटका करण्याकरतां त्यानें भाऊ व बाळोबा यांच्याशीं बोलणें लाविलें. त्या वेळीं शिंद्यांस लष्करी खर्चाकरतां पैशाचा फार तोटा पडला होता. यासाठीं परशुरामभाऊंनीं पैशाची सोय करतों म्हणून शिंद्यांना अभिवचन दिलें होतें. मशीरउल्मुलुख याचें आपल्या सुटकेबद्दल बोलणें सुरू झालें तेव्हां निजामाकडून तीन कोट रुपये पेशव्यांस यावयाचे होते. त्यापैकीं कांहीं ऐवज हातीं येईल म्हणून त्यांनीं बोलणें सुरू केलें. मशीराचें बोलणें असें होतें कीं, 'माझें व नानांचें वांकडें आहे, ही गोष्ट तुम्हांस माहीत आहे. खर्ड्याचा तह ठरतांना नानांनीं आकसानें माझी हुरमत घेतली आहे आणि मला कैदेंत ठेविलें आहे. मला नानांचा सूड जरूर घ्यावयाचा आहे. आणि तुम्हांलाही तेंच करावयाचें आहे. तुमचें व माझें सख्य जमण्यास कांहींच हरकत दिसत नाहीं. माझी कैदेंतून मुक्तता कराल तर मी तुमचा व नबाबाचा स्नेह जमवून देतो. आणि खर्ड्याच्या तहाप्रमाणें नबाबाकडून खंडणी व मुलूख यावयाचा आहे, त्याचा फडशाही मी तुमच्या म्हणण्याप्रमाणेंच करून देतों.' शिवाय नानांच्या पारिपत्याकरतां तुम्हीं सांगाल तेवढी फौज मी स्वतःच्या खर्चानें उभी करतों. तुम्हीं व मी मिळून नानांना झोडपून काढूं या !'[1] हा मशीराचा सल्ला भाऊ व बाळोबा यांना पूर्ण पटला व त्यांनीं त्याच्यावर

---

१ ना. फ. च. पा. १८३.

विश्वास ठेऊन त्याची मुक्तता केली. त्यानें पुण्याजवळ गुलटेंकडी-वर आपला गोट तयार केला व महिना दीड महिन्याच्या आंत तेथें सात आठ हजार फौज तयार केली. ही फौज तयार करण्याकरतां अर्थात् नानांनींच मशीरास पैशाची मदत केली होती. मशीर हा नानांच्या कपट-कारस्थानांत असेल असा वास सुद्धां भाऊ व बाळोबा यांना आला नव्हता.

१६. भाऊ व बाळोबा यांनीं मशीरास आपल्या पक्षांत घेतल्या-मुळें त्यांना थोडें समाधान झालें. इतक्यांत ता. २६ आगष्ट सन १७९६ रोजीं त्यांच्याविरुद्ध एक कट झालेला त्यांच्या नजरेस आला. हा कट होण्यास नानांचा पैसाच कारणीभूत होता. बाबा फडके व नारोपंत चक्रदेव यांनीं नानांकडून पैसा आणविला व तो हुजुरातीच्या लोकांस व कांहीं होळकरांसही दिला, आणि हुजुरात व होळकर यांचा एकोपा करून असें ठरविलें कीं, परशुरामभाऊंस कैद करावें आणि चिमाजीआपास पदच्युत करून त्या जागीं बाजीरावास बसवावें. हा कट भाऊंच्या कानांवर आल्यामुळें भाऊंनीं त्याचा ताबडतोब बंदोबस्त केला. फितुरी लोकांपैकीं मालोजीराजे घोरपडे व नीळकंठराव प्रभु हे मारामार करीत वांईकडे पळाले. आणि नारोपंत चक्रदेव हे मशीराच्या गोटांत लपले. बाबा फडके यास भाऊंनीं कैद केलें व त्यास चाक-णच्या किल्ल्यावर नेऊन ठेवलें. या वेळीं नानांचे इतर पक्षपाती पुण्यांत बापू लेले वगैरे जे होते ते सर्व भाऊंनीं या वेळीं कैद केले.

१७. याप्रमाणें पुण्यांत जागोजागीं फितुरी होऊं लागली असें पाहून व याला बाजीराव हा मुख्यतः कारणीभूत होत आहे असें जाणून, त्यास पुण्याहून काढून दूर हिंदुस्थानांत नेऊन टाकावें असें भाऊंनीं व बाळोबांनीं ठरविलें. त्याप्रमाणें बाळोबांनीं बाजीरावाची हिंदु-स्थानाकडे रवानगी केली. श्रीमंतांच्या बंदोबस्ताकरतां बाळोबांनीं सखा-राम घाटगे या आपल्या विश्वासू सरदाराबरोबर पांच सहा हजार

फौज देऊन त्याची रवानगी केली. सखाराम घाटगे हा नानांना पूर्वीच वश झाला होता.[१] शिंद्यांचें मन घाटगे यांचे मुलीवर होतें पण घाटगे आपली मुलगी शिंद्यांस द्यावयास तयार नव्हता. शिंदे हे मालक व घाटगे हा सामान्य चाकर अशी जरी या वेळीं परिस्थिति होती, तरी उभयतांत जातीच्या दृष्टीनें मोठें अंतर होतें. घाटगे हे आपणांस उच्च कुळींतले समजत होते. महादजी शिंदे लेकावळ्यापैकीं म्हणून त्यांच्या वंशजांची जातकुळी आपल्यापेक्षां हीन असें समजून त्याकरतां ही सोयरीक करण्यास घाटगे तयार नव्हते. घाटगे यांची मुलगी बायजाबाई ही फारच सुंदर व उपवर असल्यानें शिंद्यांना तिचा मोह आवरेनासा झाला होता. नानांनीं या बाबतींत मध्यस्थी करून घाटग्यांस जहागीर, सर्जेराव हा किताब व बाळोबाच्या जागीं शिंद्यांची दिवाणगिरी देण्याचें शिंद्यांकडून कबूल करून घेऊन हें लग्न त्यांनीं जमवून दिलें होतें. अशा प्रकारें घाटगे हा नानांच्या पूर्ण कटांतला होता. भाऊ व बाळोबातात्या यानीं त्याच्याजवळ बाजीरावास देऊन हिंदुस्थानांत त्याची रवानगी केल्यामुळें 'चोराच्या हातीं जामदारखान्याच्या किल्ल्या दिल्याप्रमाणें' स्थिति झाली.

१८. बाजीरावास बाळोबानें पुण्याहून हिंदुस्थानांत रवाना केल्यानंतर शिंद्यांच्या छावणींतून मानाजी फाकडेही निघून चांभारगोंद्यास गेले, व तेथें पूर्व संकेताप्रमाणें फौज जमा करण्यास त्यांनीं सुरवात केली. ही बातमी पुण्यास समजतांच मानाजी फाकड्यांच्या पारिपत्याकरतां कोणास पाठवावें या विवंचनेंत बाळोबा व भाऊ पडले. कारण होळकर व हुजुरातीचीं पथकें पूर्वीच बिथरलेलीं असल्यामुळें त्यांस पाठवावे तर ते नानाच्या पक्षाला केव्हां मिळतील याचा अगदीं नेम नव्हता. मशीर उल्मुल्खावर मात्र या उभयतांचा पूर्ण विश्वास होता. म्हणून मानाजीचें पारिपत्य करण्याकरतां बाळोबा व भाऊ यांनीं मशीराची

---

१ मराठ्यांची बखर पान ३२५.

योजना केली व त्यास तिकडे रवाना केलें. मशीरास तेंच पाहिजे होतें. तो नानांच्या पक्षाला मिळालेला आहे याची गंधवार्ता शेवटपर्यंत बाळोबा व भाऊ यांना लागली नव्हती. निजामाच्या राज्यांत मशीर हा जवळ जवळ नानाच होता. मशीराची फौज जवळ जवळ आली असें फाकडे यांना समजतांच ते दूर दूर मजला घेऊन वांईस गेले. तेथें त्यांना मालोजी घोरपडे व निळकंठराव प्रभु हे सरदार मिळाले. नंतर त्यांनीं नानांकडून पैसा आणून तेथें सात आठ हजार फौज जमा केली. नव्या फौजेवर नानांनीं बजाबा शिरोळकर यांस मुख्य सरदार नेमलें.

१९. बाळोबातात्या व परशुरामभाऊ हे खंदे वीर होते, तरी त्यांना पैशाचा जोर नसल्यामुळें त्यांच्या कर्तृत्वास वाव मिळाला नाहीं. इकडे पेशव्यांच्या राज्याच्या कारभाराचा बोजा त्यांचेवर पडलेला होता. त्यांत पदोपदीं नवीन संकटें व फितुर होऊं लागल्यामुळें त्यांच्या कारभारांत सारखा व्यत्यय येत होता. त्यांच्या लष्करास अलीकडे एकही पैसा न मिळाल्यामुळें त्यांचीही फौज थोडीबहुत बिथरलेलीच होती. त्यामुळें तीही काळजी त्यांना उत्पन्न झाली. सर्व कांहीं करतां येतें, पण पैशापुढें कोणाची मात्रा चालत नाहीं. अशा स्थितींत दसरा उजाडला. या बरोबर नानांच्या कारस्थानाच्या रंगी तालमी होऊं लागल्या. निजामाची फौज मोंगलाई हद्दीवर ठिकठिकाणीं जमूं लागली. व त्यापैकीं एक टोळी घेऊन इसामिय्या नांवाचा सरदार पुण्याच्या रोखानें येऊं लागला. नागपूरकर भोंसले नागपुराहून निघून वऱ्हाडांत आले व तेथून ते पुण्याच्या दिशेनें पुढें येऊं लागले. होळकर व हुजरात व इतर नानांच्या पक्षाचे सरदार, त्याचप्रमाणें मशीर व मानाजी फाकडे वगैरे मंडळी पुण्यावर चालून जाण्याकरतां नानांच्या संकेताची वाट पाहूं लागले. याप्रमाणें बाळोबा व भाऊ यांच्या पारिपत्याकरतां नानांनीं चारी बाजूंनीं फांस तयार करून त्यांना कोंडींत पकडलें.

२०. याप्रमाणें नानांच्या कारस्थानाची पूर्ण सिद्धता झाल्यानंतर तारीख २६ आक्टोबर सन १७९६ रोजीं रात्रीं दौलतराव शिंद्यांनीं नानांच्या संकेताप्रमाणें

बाळोबातात्या, सदाशिव मल्हार व धोंडो रामचंद्र या त्रिवर्ग कारभाऱ्यांस एकाएकीं कैद केलें. दौलतराव शिंद्यांचें हें विश्वासघाताचें कृत्य पुण्यास परशुरामभाऊ यांस अकल्पित रीतीनें समजलें. बाळोबातात्याप्रमाणेंच पुण्यास परशुरामभाऊंस कैद करण्याविषयीं दोन जासूद दोन चिठ्या घेऊन पुण्यास आले. एक चिट्टी आपा बळवंत यांचे नांवची व दुसरी परशुरामभाऊ वैद्य यांचे नांवची होती. या चिट्टया घेऊन ते पुण्यास आपा बळवंत यांच्या वाड्यांत चार घटका रात्रीस आले. त्या वेळीं आपा बळवंत यांनीं आपल्या नांवची चिट्टी घेतली व दुसरी 'परशुरामभाऊ' यांजकडे नेऊन देण्यास त्यांनीं जासुदांस सांगितलें. त्यावेळीं आदितराव पेठेंत परशुरामभाऊ वैद्य व परशुरामभाऊ पटवर्धन शेजारीं शेजारींच राहत होते. तेव्हां जासुदांनीं परशुरामभाऊ वैद्य यांचा वाडा सोडून परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या वाड्यांत जाऊन चिट्टी दिली. ती चिट्टी वाचून नानांचेंच हें सर्व कारस्थान आहे असें परशुरामभाऊंना कळून आलें व लगेंच ते आपला व चिमाजीआपाचा बचाव कसा होईल या मार्गाला लागले. त्यांनीं लगेंच पोषाक केला व घोड्यावर स्वार होऊन ते वाड्यांत गेले.

२१. भाऊंचें पांचशें स्वारांचें पथक पुण्यास श्रीमंतांच्या दिमतीस होतें. त्यांना भाऊंनीं तयार केलें. वाड्यांत श्रीमंतांच्या रक्षणाकरतां भाऊंनीं आपले दोन मुलगे बाबा व दाजिबा यांस ठेवलें होतें. त्यांसही तयार करून श्रीमंत चिमाजीआपा यांस झोंपेंतून जागें करून उठविलें. ही सर्व तयारी होईपर्यंत सर्व रात्र गेली. सूर्योदयाचे वेळीं परशुरामभाऊ चिमाजीआपास आपल्या घोड्यावर आपल्यापुढें बसवून घेऊन व आपल्या कमरेस शेल्यानें त्यांस घट्ट बांधून घेऊन आणि आपल्या हातांत पट्टे चढवून ते बुधवारांतून चालले. त्यांच्याबरोबर त्यांचे दोन पुत्र बाबा व दाजिबा हे असून त्यांच्यामागें त्यांचे पांचशें घोडेस्वार होते. अशा रीतीनें भाऊ वाड्यांतून बाहेर पडले. तोंच मशीरउल्मुल्ख व नारोपंत चक्रदेव हे पन्नास हजार फौजेनिशीं पुण्यांत शिरले. त्यांस भाऊ निघून गेल्याची बातमी लागली. तेव्हां आपा बळवंत,

नारोपंत चक्रदेव, सरकारी हुजुरात व मानकरी आणि निजामाची फौज एकत्रित होऊन ती भाऊंच्या मागें लागली. भाऊ जे पुण्यांतून निघाले ते पर्वतीखालीं त्यांचा गोट होता तेथें जाऊन आपल्याबरोबर तेथील स्वार घेऊन ते पुढें दौड करीत चालले. त्यांच्यामागें ही संयुक्त फौज लागली. सर्व दिवसभर सारखा हा पाठलाग सुरू होता. त्या दिवशीं कोणास अन्न व पाणी नाहीं. श्रीमंत चिमाजीआपा या लेंकरासही सर्व दिवसभर उपासमार पडली. रात्र झाल्यानंतर वाटेंत आपासाहेबांस भात शिजवून भाऊंनीं खावयास घातलें. नंतर पुन्हां ते पळत सुटले व शेवटीं पळतां पळतां त्यांनीं शिवनेरी किल्ला गांठला. रात्रीं शिवनेरीच्या किल्लेदारानें फक्त चिमाजीआपास किल्ल्यावर घेतलें. परशुरामभाऊसुद्धां सर्व मंडळी किल्ल्याखालीं राहिली. त्यांच्यामागें लागलेली फौज लागलीच तेथें येऊन पोंचली. त्यांनीं भाऊंच्या फौजेस वेढा दिला. आणि भाऊंस तेथेंच कैद केलें. तेथून भाऊंस आणून मांडव [1] गणास ठेविलें.

२२. याप्रमाणें भाऊंना कैद केल्यावर त्यांच्या पक्षांतील जे जे लोक पुण्यास होते, त्यांचे त्यांचे बळी घेण्याचा सपाटा सुरू झाला. बहिरोपंत मेहेंदळे, अन्याबा मेहेंदळे, राघोपंत थत्ते, गणपतराव करमरकर, चिंतोपंत आठवले, बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे, वगैरे पंचेचाळीस असामी धरून, पायांत बिड्या ठोकिल्या. हा सर्व पराक्रम करण्यांत मुख्यत्वें परशुरामभाऊ वैद्य त्रिंबकराव परचुरे व बापू लेले हे होते. यांनीं इतक्या लोकांस कैद करून, त्याप्रमाणें महाडास नानांस कळविलें. त्याप्रमाणें नानांकडून असें उत्तर आलें कीं, "सगळे मंडळींस किल्लोकिल्लीं पाववावें. त्यांत बहिरोपंत मेहेंदळे यांस रायगडास रवाना करावें. विसाजीपंत वाडदेकर यांस त्यांचे घरीं ठेऊन त्यांचे दरवाजावर शिपाई ठेवावा. [2] " याप्रमाणें सर्वांची किल्लोकिल्लीं रवानगी झाली. परंतु परशुरामभाऊंचें पारिपत्य करण्यांत नानांनीं आपल्या कारस्थानाची एक नवीनच प्रथा अंमलांत आणली. ती प्रथा ह्मणजे चित्पावन सरदारांविरुद्ध

१ पे. ब. पा. १९०. २ पे. ब. पा. १९१.

चित्पावन सरदार उभे करून त्यांच्याचकडून या चित्पावन सरदारांची अब्रू घेवविली. या नानांच्या प्रयत्नामुळें पटवर्धन सरदारांनीं इतके दिवस जो चित्पावन सरदारांचा एक गट तयार केला होता त्याला, नाना या चित्पावन इसमानेंच शेवटची मूठमाती दिली.

२३. शिंद्यांनीं बाळोबा वगैरे कारभाऱ्यांस कैद केल्यानंतर बाजीरावास जांबगांवाहून परत पुण्यास आणण्याकरतां सर्जेराव घाटग्यास पत्र लिहिलें. त्याचप्रमाणें नानांस असें पत्र लिहिलें कीं, "तुमचें आमचें अकृत्रिम सख्य असतां आमच्या कारभाऱ्यांनीं वांकडी नजर धरून भलभलत्या गोष्टी केल्या. सबब त्या कारभाऱ्यांस कैद करून आह्मीं तुह्मांस हें पत्र लिहीत आहों. तुह्मी कांहीं एक संशय न धरतां सत्वर पुण्यास येऊन राज्यकारभार हातीं घ्यावा व पेशवाईच्या गादीवर बाजीरावाची स्थापना करावी.[१]" याप्रमाणें शिंद्यांचें नानास पत्र गेल्यावर मशीर व भोंसले यांचींही नानास पत्रें गेलीं. हीं पत्रें पोहोंचल्यावर व पुण्यास घडलेल्या सर्व गोष्टी नानांना समजल्यानंतर ते महाडाहून निघून मेणवलीस आले. तेथें थोडे दिवस राहून नंतर सासवडास आले. तोंपर्यंत भोंसले व इसामिय्या यांच्या फौजाही पुण्याजवळ येऊन पोंचल्या. आतां मात्र पुण्यास जाण्यास कोणतीच हरकत नाहीं असा नानांस विश्वास आला. नानांच्या शब्दकोशांत 'विश्वास' हा शब्द नसून त्याच्याऐवजीं 'विश्वासघात' हाच शब्द होता. त्यामुळें एकदम पुण्यास निघून आलें असतां कोणी आपला विश्वासघात करील कीं काय या संशयानें ते थोडा थोडा मुक्काम करीत करीत व पुण्याच्या व आपल्या इतर साथीदारांच्या हालचालींचा सुगावा काढीत काढीत मोठ्या धूर्तपणानें येत होते. त्यांना सर्व बाजूनें आपल्या तर्फेचें वातावरण असल्याची खात्री पटल्यानंतर ते पुण्यास आले व आपल्या वाड्यांत न उतरतां ते गांवाबाहेर आपल्या बागेंत उतरले.

२४. नंतर तारीख २५ माहे नव्हंबर सन १७९६ रोजीं नाना पुण्यांत जाऊन आपलें कारभारीपद स्वीकारून कारभार पाहूं लागले. नंतर त्यांनीं

---

१ ना. फ. च. पा. १८८.

सातान्याहून बाजीराव याचे नांवचीं पेशवाईचीं वस्त्रें आणवून तारीख ४ डिसें-
बर सन १७९६ रोजीं बाजीराव याची पेशव्यांच्या गादीवर स्थापना केली. ही स्थापना करण्याचे पूर्वी सवाईमाधवराव यांच्या पत्नीच्या मांडीवर चिमाजी-आपास दत्तक देऊन गादीचा धनी बनविलें होतें. त्याला पदच्युत केल्याशिवाय बाजीरावाची स्थापना होण्यासारखी नव्हती. एवढ्याकरतां तोही फार्स नानांना करावा लागला. नानांनीं त्या वेळीं मोठमोठ्या पंडितांस सभेस बोलावून चिमाजी-आपाचें दत्तविधान अशास्त्र झालें ह्मणून त्यांचेकडून निर्णय घेतला. आणि त्या निर्णयाप्रमाणें चिमाजीआपास पदच्युत करून त्यास प्रायश्चित्त[1] देवविलें. नंतर बाजीरावाची गादीवर स्थापना केली. याप्रमाणें नानांनीं आपले परम स्नेही परशुरामभाऊ पटवर्धन व शिंद्यांच्या गळ्यांतील ताईत बाळोबातात्या, यांस चारीमुंडे चीत करून आपलें कारस्थान यशस्वी केलें व आपला एकतंत्री कारभारीपणाचा अधिकार पुन्हां प्राप्त करून घेतला.

---

१ मराठ्यांची बखर पा. ३२६.

प्रकरण ३३ वें.

नाना चोरावर मोर कसे झाले ?

इ. स. १७९६ ते इ. स. १७९७.

१. नानांनीं महाडचें कारस्थान करून काय संपादन केलें ?—२ शिंदे व मशीर यांना नानांनीं विश्वासघाताचा आपला गुरुमंत्र दिला.—३ महाडचें कारस्थान म्हणजे नानांच्या सर्कशींतील हिंस्रपशूंची सभा.—४ स्वतः अलिप्त राहून 'पाहुण्याकडून साप मारविण्याची' नानांची कला महाडच्या कारस्थानामुळें जगजाहीर होते.—५ महाडचें नानांचें कपटनाटक पहिल्यानें सुंदर दिसतें, पण तेंच पुढें सर्वस्वाच्या नाशाला कसें कारणीभूत होतें ?—६ चोर स्वतः नानाच असतात, पण चोरी मात्र संन्याशावर लादून ते आपला कार्यभाग करून घेतात, हाच नानांच्या स्वभावांतील विशेष धर्म कशावरून होता ?—७ पुढील इतिहासाची संगत लागण्याची योजना.—८ बाजीराव गादीवर आले त्या वेळीं त्यांचा राजकारणांतील ज्ञानाचा दर्जा काय होता ?—९ बाजीराव गादीवर आले, त्यावेळीं त्यांच्यामागें पूर्वकीर्तीचें अधिष्ठान नसून सर्व प्रकारच्या दुष्कीर्तीच्या गांठोड्याचें जबरदस्त ओझें मात्र त्यांच्या डोक्यावर होतें.—१० करीन ती पूर्व असाच या वेळीं नानांचा अधिकार होता.—११ दरवेशी नाना.—१२ महाडच्या कारस्थानामुळें बाजीराव फक्त पेशवाईच्या कुंकवाचे धनी झाले होते.—१३ 'गरज सरो आणि वैद्य' मरो असें शिंद्यांबरोबर नानांचें वर्तन. नाना व शिंदे यांच्या मध्यें सख्य घडवून आणण्याबद्दल बाजीरावाची मध्यस्थी.—१४ शिंदे, भोंसले व निजाम यांचें स्वार्थाकरतां परस्परांवर गुरगुरणें. नाना व बाजीराव यांचेमधील सराफी भांडण.—१५ नानांचें नवीन कपट नाटक.—१६ आपण सेवानिवृत्त होणार म्हणून नानांनीं बाजीरावाकडे पाठविलेली कराराची यादी. त्यांतील तेरा कलमें.—१७ नानांच्या करारांतील तेरा कलमांची झडती.—१८ आपण सेवानिवृत्त न होतां लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकून नानांनीं आपला कार्यभाग कसा साधून घेतला.—१९ महाडच्या कारस्थानाविषयीं नानांची तरफदारी करणारी खरे-शास्त्र्यांची मल्लिनाथी कशी खोटी होती ?—२० संशय-पिशाचाची बाधा झाली म्हणजे मोठमोठे विद्वान मुद्धां कसे भागले जातात ?—२१ शिंदे, भोंसले, निजाम व पन्हाळेकर हे आपसांत नानाबरोबर तोड करण्यास कां तयार झाले ?—२२ महाडच्या कारस्थानांतील नानांनीं केलेल्या करारांची सारवासारव.

१. मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें नाना आपल्या विशाल बुद्धिमत्तेच्या जोरावर पुन्हां पेशवाईच्या सर्वाधिकारी कारभारावर कायम झाले. हें पद प्राप्त करून घेण्याकरतां नानांनीं आपला पैसा, बुद्धि, चातुर्य, वजन, आजपर्यंतचा अनुभव आपली कारस्थानकुशलता, साम, दाम, दंड, भेद, वगैरे सर्व साधनें यांचा सर्रास उपयोग केला; आणि महाडचें हें कारस्थान यशस्वी केलें. या कारस्थानानें नानांनीं मिळविलें काय ? बाजीरावाला गादी मिळाली व नानांचे हातीं कारभारीपद पडलें, एवढेंच ढोबळ मानानें दिसून येतें. या गोष्टी सवाईमाधवरावांचे मृत्यूनंतर लगेंच होऊं शकल्या असत्या. त्यांच्या इच्छेप्रमाणें बाजीरावाला गादीवर बसविण्याची इच्छा शिंद्यांची होती. नानांनीं त्या वेळीं हरकत घेतली नसती, तर हेंच साध्य झालें असतें. परंतु त्या वेळीं नानांनीं हा प्रकार घडवून आणला असतां तर बाजीराव नानांच्या उपकाराच्या ओझ्याखालीं दबले गेले नसते व नानांच्या हातांत सर्वाधिकारी कारभारीपद राहिलें नसतें, व तें टिकूंही शकलें नसतें. शिवाय शिंद्यांना जो जोर चढला होता, तो दोन गोष्टींनीं चढला होता. एक तर ते मोठे फौजबंद सरदार होते व दुसरें त्यांच्याकडे शेणवी कारभारी मंडळी जी होती, ती तितकीच मुत्सद्दी व राजकारणकुशल असून शिंदे व कारभारी यांच्यांत पूर्णपणें सहकार्य व एकोपा नांदत होता. हा एकोपा जर असाच कायम राहिला असता, तर ते प्रसंग विशेषीं नानांची सुद्धां हाकलपट्टी करूं शकले असते, अशी नानांना भीति होती. बाळोबातात्या नानांना प्रतिस्पर्धी वाटत होते याचें कारण हेंच होतें. बाळोबा व बाजीराव एक झाले, तर नाना नाहींत असेंच नानांचें गणित होतें. म्हणून पहिल्यानें बाजीरावाला गादिवर न आणण्याचा नानांचा प्रयत्न होता. दुसरा डाव नाना खेळले. त्यांत बाजीराव गादीवरून गेला, पण नानांना स्वतःचें कारभारीपद गमावून घ्यावें लागलें. शिवाय त्यांचा प्रतिस्पर्धी बाळोबातात्या हा पेशव्यांच्या कारभारांत लुडबुड करूं लागला. तेव्हां नानांना हें तिसरें महाडचें कारस्थान करावें लागलें. या कारस्थानामुळें

शिंदे व त्यांचे कारभारी यांत फूट पडली. मुत्सद्देगिरीचें पाठबळ शिंद्यांचें गेलें, त्यामुळें शिंदे दुर्बल झाले. इतक्या दिवसांच्या प्रामाणिक कारभाऱ्यांना शिंद्यांनीं विश्वासघातानें पकडलें, त्यामुळें ते नैतिक दृष्टीनेंही कसाला कमी झाले. शिंद्यांच्याकडून नानांना " तुमचें आमचें अकृत्रिम सख्य असतां कारभाऱ्यांनीं वांकडी नजर धरून भलभलत्या गोष्टी केल्या, " वगैरे मजकुराचें माफीपत्र मिळालें. त्यामुळें ते शरण आल्याप्रमाणें होऊन पुन्हां नानांच्या मुठींत आले. त्याचप्रमाणें परशुरामभाऊ यांना विस्तृत अशा पटवर्धन सरदार घराण्याचें व चित्पावन सरदारांचें पाठबळ असल्यामुळें तेही नानांना डोईजड झाले होते. या महाडच्या कारस्थानामुळें भाऊंच्या घराण्यांत नानांना भाऊबंदीचा वणवा पेटवितां आला. भाऊंचे शेजारचे शत्रू करवीरकर,यांना त्यांच्याविरुद्ध उठवितां आलें. चित्पावन सरदारांचा गट फोडतां आला, व भाऊंची जहागीर शिंद्यांच्या घरांत भरतां आली व शिंद्यांचें व भाऊंचें जन्माचें वैर निर्माण करतां आलें. इतकें करून भाऊ व बाळोबा यांना त्यांच्या कृत्याबद्दल डोंगरी हवेचा मासला दाखवितां आला. या एकंदर गोष्टी महाडचें कारस्थान नानांनीं केलें नसतें, तर घडून आल्या नसत्या व 'फोड आणि झोड' ही नानांची कारस्थानपद्धति व त्यांचा स्वभावधर्म प्रामुख्यानें लोकांच्या नजरेस आला नसता.

२. महाडच्या नानांच्या कारस्थानांतून, त्यांच्या आजपर्यंत अंगीं खिळलेल्या एका मोठ्या स्वभावधर्माचा मासला बाहेर पडला. त्यांनीं या प्रसंगीं शिंद्यांना व मशीरउल्मुलुख यांना विश्वासघात कसा करावा याचे पाठ दिले. विश्वासघात करणें हें अनीतीचें नसून राजकारण खेळविण्याचा हा हातखंडा व बिनतोड डाव आहे, अशी नानांनीं आपल्या आजपर्यंतच्या अनुभवाची आपल्या या दोन शिष्यांना प्रचीति देऊन गुरुमंत्र दिला.

३. नानांच्या या महाडच्या कारस्थानाचा विचार करतांना सर्कशींतील जनावरांच्या संमेलनाची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं.

सर्कशींत पटाईत वाघ, चित्ते, हत्ती, अस्वल, सिंह, वगैरे जंगली जनावरें जशीं आपापल्या सामर्थ्याच्या बडेजावींत राहून दुसऱ्याशीं स्पर्धा करणारीं असतात, त्याप्रमाणें नानांच्या या कारस्थानाच्या सर्कशींत, इंग्रज, शिंदे, होळकर, भोंसले, निजाम वगैरे सत्ताधारी होते. त्याचप्रमाणें घोडे, तट्टें, उंटें, कुत्रीं, माकडें, शेळ्या वगैरेही असतात, त्याप्रमाणें फडके, चंद्रचूड, मशीर, मानाजी फाकडे, सर्जेराव घाटगे, बाजीराव पेशवे ही मंडळी होती. या सर्वांचें संमेलन भरवून त्यांच्याकडून योग्य काम करवून घेणारे नाना हे रिंगमास्तर होते. सर्कशीच्या कामाच्या वेळीं आपापसांतील स्पर्धा विसरून जाऊन रिंगमास्तराच्या आज्ञेप्रमाणें जनावरें आपापलें काम जसें चोख करतात, त्याप्रमाणें नानांच्या आज्ञेनुसार या सर्व मंडळींनीं आपापलीं कामें चोख बजावून नानांच्या कारस्थानी सर्कशीचा तमाशा सर्व जगाला उत्तम प्रकारें दाखवून दिला. खर्ड्याच्या लढाईमुळें नाना हे कसे रिंगमास्तर (King-maker) बनले होते याचें प्रात्यक्षिक ह्मणजे हें महाडचें कारस्थान होतें.

४. या महाडच्या कारस्थानामुळें नानांचा एक महत्वाचा स्वभावधर्म प्रकाशांत आला. तो ह्मणजे आपण स्वतःच प्रत्येक कारस्थानाचे मुख्य सूत्रधार असावयाचें, पण तें लोकनिदर्शनाला न येऊं देतां, आपण अगदीं अलिप्त असल्याचें दाखवून, आपला कार्यभाग मात्र साधून घ्यावयाचा. हा नानांच्या हाडींमासीं खिळलेला गुण या महाडच्या कारस्थानांत जगजाहीर झाला. नानांनीं पुणें सोडलें व राज्यकारभारांत कोणतीच ढवळाढवळ करावयाची नाहीं, असें भाऊ व बाळोबातात्या यांच्याशीं ठरवून ‘ हरि हरि ’ ह्मणण्याकरतां महाडसारख्या दूरच्या एकांत स्थळीं जाऊन ते स्वस्थ बसले. त्यामुळें भावी कारस्थानाचे सूत्रचालक नाना आहेत याची गंधवार्ताही कोणाला लागली नाहीं. ‘ इंग्रजांनीं शिंद्यांस भेडसावलें, मशीरानें भाऊ व बाळोबा यांस फसविलें, फडक्यांनीं फितूर उत्पन्न केले,

फाकड्यांनीं फौज जमा केली, निजाम व भोंसले यांनीं पुण्यावर चाल करून तें घेतलें, आणि शिंद्यांनीं भाऊ व बाळोबा यांचें (विश्वासघातानें) पारिपत्य केलें. या सर्व गोष्टी जो तो आपापल्याच इच्छेनें व सत्तेनें करीत आहे असाच सर्वत्र देखावा दिसत होता. या सर्वांचे प्रेरक नाना फडनविस आहेत ही गोष्ट सामान्य लोकांसच काय, पण खुद्द परशुरामभाऊ व बाळोबातात्या यांस शेवटपर्यंत कळलीच नाहीं.'[१] यावरून नाना बक-ध्यान-वृत्तीचे, पाताळयंत्री होते व त्यांनीं आपलीं कारस्थानें स्वतः अगदीं निर्लेप आहों असें दाखवून व दुसऱ्यांना मोठेपणा देऊन त्यांना पुढें करून त्यांच्या नांवावर पार पाडून घेतलीं. नानांचा हा गुप्त स्वभाव या महाडच्या कारस्थानामुळें उघड झाला.

५. एकंदरींत महाडच्या कारस्थानाच्या रंगभूमीवर नानांनीं आपलीं सर्व पात्रें आणलीं. या नानांच्या कपट-नाटकांतील पात्रांच्या भूमिका, विश्वासघातकी स्वभावाला उठावणी देऊन रंगविलेल्या आहेत. त्यामुळें नानांचें हें नाटक नाटकाच्या प्रयोगापुरतेंच रंगदार झालें. पण पुढें तें सर्वांच्याच नाशाला कसें कारणीभूत झालें हें पुढील इतिहासावरून दिसून येईल. सत्याला निरनिराळीं तोंडें फुटत नाहींत, पण असत्य, कपट, विश्वासघात यांना इतकीं तोंडें फुटतात कीं तीं आवरतां येत नाहींत व अखेर सर्वांचाच नाश होतो. हें कपट-नाटक यशस्वी करण्याकरतां नानांना हलकीं पात्रें हाताशीं धरून कामें करून घ्यावीं लागलीं. हींच हलकीं माणसें नानांच्या कृपेनें मोठीं बनल्यावर तींच नानांच्या व त्यांच्या-सकट सर्वांच्या नाशाला कारणीभूत झालीं.

या महाडच्या कारस्थानांतून नानांची हिंदुधर्माविषयीं काय कल्पना होती याचा दाखला मिळतो. नानांनींच चिमाजीआपाला यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देण्याचें ठरविलें. हिंदुधर्म-शास्त्र-पद्धतीनें यशोदाबाईचा चिमाजी-आपा हा चुलत सासरा होत असल्यानें, सासऱ्यास सुनेच्या मांडीवर

१. ना. फ. च. पा. १८९.

दत्तक जाणें धर्मबाह्य होतें. शिवाय दत्तक देण्याला आईबाप अगर आई किंवा बाप जिवंत असावे लागतात. त्याही दृष्टीनें चिमाजीआपाचें दत्तविधान अशास्त्र देतों शिवाय दत्तक जाणारा मुलगा चिमाजीआपा हाही या गोष्टीस अज्ञान असून सुद्धां विरुद्ध होता. अशा स्थितींत दत्तक जाणाऱ्या मुलावर व हिंदुधर्मशास्त्रावर बळजबरी करून हें दत्तविधान नानांच्या संकल्पाप्रमाणें पार पाडण्यांत आलें; नंतर रीतसर नानांकडून साताऱच्या महाराजांनीं दिलेलीं पेशवाईचीं वस्त्रें आल्यानंतर चिमाजीआपाची पेशव्यांच्या गादीवर स्थापना झाली. चिमाजीआपाचें दत्तविधान अशास्त्र ठरविण्याकरतां नानांनीं मोठमोठ्या पंडितांची जशी सभा भरविली होती, तशीच दत्तविधानाचे वेळींही नानांच्या खासगी व विश्वासांतल्या पंडितांची खासगी सभा भरली असेल यांत शंका नाहीं. कारण चिमाजीआपाच्या दत्तविधानाच्या वेळीं, पुण्याच्या कोणत्याच पंडितांनीं खुद्द पेशव्यांच्या वाड्यांत अशास्त्र दत्तविधान होत असल्याबद्दल चळवळ अगर प्रामण्य उत्पन्न केल्याचें इतिहास सांगत नाहीं. त्या वेळेचे धर्मविधि, होमहवन वगैरे ब्राम्हणांनींच केलें यांत संदेह नाहीं. हिंदुधर्मशास्त्र—पद्धतीनें अगर इतर न्यायशास्त्र—पद्धतीनें विचार केला, तर गुन्हा करणारे लोक गुन्हेगार म्हणजे पतित असतात. ज्याच्यावर गुन्हा घडतो तो इसम गुन्हेगार होऊं शकत नाहीं. तो संसर्गदोषाला पात्र ठरेल, परंतु कोणत्याही प्रकारें गुन्हेगार ठरणार नाहीं. या दत्तविधानाच्या प्रकरणांत हिंदुधर्माच्या नांवाखालीं नानांनीं 'चोरांना सोडून संन्याशाला मात्र सुळावर दिलें' हें उघड होतें. चिमाजीला दत्तक देऊन गुन्हा करणारे खरे चोर नाना, परशुरामभाऊ, बाळोबातात्या, तसेंच दत्तविधान करणारे भिक्षुक ब्राम्हण व पंडीत, खुद्द यशोदाबाई व दत्तविधान मान्य करून पेशवाईचीं वस्त्रें देऊन मदत करणारे साताऱचे महाराज, हे पहिल्या दर्जाचे गुन्हेगार आहेत. आतां या गुन्हेगारांच्या मालिकेंतील नानाखेरीज इतर गुन्हेगारांच्या वतीनें अशी वकिली शक्कल लढविली जाईल कीं, या मंडळीनें जो अशास्त्र दत्तविधानांत समभागी होण्याचा गुन्हा केला, तो केवळ नानांच्या हुकुमाप्रमाणें होता. नाना हे पेशवाईचे कारभारी असल्यामुळें

त्यांच्या हुकुमाप्रमाणें अंमलबजावणी करणें हें त्यांचें कर्तव्य होतें. या मुद्या-प्रमाणें नानाखेरीज इतर गुन्हेगार लोकांवरील गुन्ह्याचा दोष बराच कमी होतो. नानांचे बाबतींतही अशी वकिली शक्कल लढविली जाईल कीं दत्त-विधानाचे वेळीं नाना हजर नव्हते. म्हणून ते गुन्हेगार ठरत नाहींत. या वकिली मुद्यांत अर्थात् अगदीं तथ्य नाहीं. हुकूम देणारा सत्ताधारी इसम त्या वेळीं हजर असो अगर तेथून शंभर मैलांवर साताऱ्यास असो, अगर दोन हजार मैलांवर परदेशीं असो, हुकूम दिल्यावर त्या हुकुमान्वयें होणाऱ्या परि-णामाला तोच न्यायाप्रमाणें जबाबदार आहे. तेव्हां या अशास्त्र दत्तविधानाचे प्रकरणीं नाना हे अव्वल दर्जाचे गुन्हेगार व अंमलबजावणी करणारे दुय्यम प्रतीचे गुन्हेगार धर्मशास्त्राप्रमाणें ठरतात. असें असतां हें दत्तविधान अशास्त्र ठरवून सर्व बाजूंनीं निर्दोषी असलेल्या चिमाजीआप्पास प्रायश्चित्ताचा धर्मदंड होतो व अव्वल दर्जाचे गुन्हेगार साव ठरतात हा कशाचा प्रभाव ? हा प्रभाव नानांच्या अधिकाराचा, कीं पंडिताच्या पांडित्याचा, कीं नानांच्या धर्मभावनेचा होता हें कोडें ज्याचें त्यानें आपल्या मनाशीं उलगडून घ्यावें. येथें तें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. एकंदरींत नानांच्या कारस्थानांतील विशेष असा असतो कीं, चोर स्वतः नानाच असतात, पण चोरी मात्र संन्याशावर लादून त्याला सुळावर दिल्याशिवाय ते कधींही राहत नाहींत. महाडच्या कारस्थाना-वरून हा त्यांच्या अंगचा विशेष गुण प्रकट झाला आहे.

७. आतां पुढील इतिहास पहावयास सुरवात करण्यापूर्वीं तो इतिहास घडवून आणणारीं पात्रें कोणकोण होतीं, ती कशा स्वभावाचीं होतीं, काय काय दर्जाचीं होतीं, कशा कशा स्थितींत कशीं कशीं करारानें अगर नैतिक दृष्टीनें बांधलीं गेलीं होतीं, हें येथें पहाणें जरूर आहे. कारण ती स्थिति पुढें ठेवल्या-शिवाय पुढील इतिहासाची संगत लागणार नाहीं. पुढील इतिहास निवेदन करणारे जे पत्रव्यवहार सध्यां उपलब्ध आहेत, ते सर्व निरनिराळ्या पक्षांतील कारस्थानी डावपेंचाच्या अनुसंधानानें झाले असल्यामुळें खरा इतिहास कोणता हें दाखविणें मोठ्या कष्टाचें झालेलें आहे. पत्रव्यवहारांतील केवळ स्पष्टार्थानें

इतिहासाची संगत बसवितां येणार नाहीं. ज्या व्यक्तीनें तो पत्रव्यवहार ज्या पक्षांतील लोकांकरतां केला असेल, त्या व्यक्तीच्या कारस्थानकुशलतेच्या दर्जा-प्रमाणें त्यांतील गूढार्थ पहावा लागेल. एकंदरींत पुढील इतिहासाच्या सागरांत आपली संशोधनाची नौका सोडण्याच्या अगोदर कोणकोणत्या ऐतिहासिक व्यक्ति कशा कशा स्थानीं होत्या हें पाहूं.

८. पेशव्यांच्या राज्याचे धनी बनलेले बाजीराव, चिमाजीआपा व राघोबा-दादांचे दत्तक चिरंजीव अमृतराव हे एकत्रच राहत होते. हे राघोबादादांचे तिघे मुलगे जरी जातीचे सिंह होते, तरी नानांनीं त्यांना अगदीं बालपणा-पासून कडक अशा करागृहवासांत डांबून टाकल्यामुळें आपण पेशवाईचे धनी आहोंत या कल्पनेखेरीज त्यांना पेशव्यांच्या संबंधीं कांहींएक माहिती नव्हती. पेशव्यांचें राज्य कोठून कोठपर्यंत पसरलें आहे; कोणकोणते सरदार कसे कसे आहेत, कोणा कोणाबरोबर काय काय तहनामे झाले आहेत, कोणा कोणाच्या अंमलाखालीं कोणता कोणता मुलूख येतो, कोणा कोणाच्या दरबारीं कोण कोण मुत्सद्दी आहेत व कोणत्या कोणत्या दरबारचें कोणा कोणाबरोबर सख्य व वैमनस्य आहे, खुद्द पेशव्यांच्या राज्याचें उत्पन्न काय, कोणा कोणाकडून कसकशी खंडणी येते, कोणाकडे किती बाकी आहे व कोणाचें किती कर्ज देणें आहे, पेशव्यांच्या खजिन्यांत किती शिल्लक आहे अगर प्रसंग पडला तर पेशव्यांना कोणते सावकार पैसा देत आले, पेशव्यांच्या गादीचे अभिमानी कोण, अगर पेशवाई गिळंकृत करणारे शत्रू कोण, सवाईमाधवरावांच्या कारकीर्दींत पेशवाई दरबारानें मित्र कोणते उत्पन्न केले व कोणाबरोबर कशाकरतां शत्रुत्व संपादन केलें; पेशवाईंतील प्रजा गादीच्या धन्याकडे ‘ राजा ’ या शुद्ध भावनेनें पहाते किंवा धनी म्हणजे उघड लूटमार करणारा दरवडेखोर असें समजते; राघोबादादांच्या मुलांबद्दल पेशव्यांच्या राज्यांतील अगर दुसऱ्या राज्यांतील सत्ताधारी लोकांत, सरदारांत मुत्सद्यांत, मानकरी लोकांत, प्रजाजनांत आदरबुद्धि आहे किंवा द्वेष, मत्सर आहे, वगैरे, वगैरेसंबंधीं, त्यांना तिळमात्रही माहिती असणें अगदीं अस-

भाव्य होतें. बाजीरावाचा जन्म धारच्या किल्ल्यांत बंदिवासांतच झाला. तेव्हां-पासून गादीवर येईपर्यंत त्यांचा अखंड बंदिवास होता. या बंदिवासांत त्यांची वयाचीं पहिलीं १२ ते १४ वर्षे बालपणाच्या हूडपणांत गेलीं. बारेकरणी व मोलकरणी यांच्या सहवासांतच त्यांचा काल गेला. आनंदीबाईच्या कडक शासना-मुळें, स्नान, संध्या, पूजा, वगैरे धार्मिक कर्मे करण्यापलीकडे त्यांना कांहीं माहीत नव्हतें. त्यानंतर घोड्यावर बसणें, नेमबाजी करणें, भाला फिरविणें किंवा किंवा न्यायतर्कादि शास्त्रांचा शास्त्रीबुवा किंवा पुराणिकबुवा यांच्या हाताखालीं अभ्यास करणें, यापलीकडे बाजीरावास राज्यकारभारा-विषयीं कोणतीच माहिती नव्हती. त्याचप्रमाणें पेशव्यांच्या राज्यांतील जे मुख्य घटक सरदार, मुत्सद्दी व मानकरी वगैरे होते, त्यांना देखील बाजी-रावाचें या नानांच्या कडक बंदिवासांत दर्शन होणें अगदीं अशक्य होतें. प्रत्यक्ष सवाईमाधवराव हे पेशव्यांच्या गादीवर असून व ते सज्ञान झाले असून सुद्धां त्यांना बाजीरावाची भेट घेतां आली नाहीं, मग दुसऱ्यांचा तेथें पाड काय ? एकंदरींत पेशव्यांच्या राज्यकारभाराविषयीं व पेशव्यांच्या राज्यविस्तारा-विषयीं बाजीराव पूर्ण अज्ञानी होते, हें आतां निराळें सांगण्याचें कारण नाहीं. कूपमंडुकाला जसें बाह्य-सृष्टीचें ज्ञान असूं शकत नाहीं, तद्वत् बाजीराव व त्यांचेबरोबर कमीजास्त प्रमाणांत चिमाजीआपा व अमृतराव यांची स्थिति होती. शाहुमहाराजांच्या मरणानंतर रामराजांना तुळजापूरच्या भोप्यांच्या मेळ्यांतून काढून आणून, साताऱ्याच्या गादीवर छत्रपती म्हणून बसविणें, आणि बाजीरावास शिवनेरीच्या कैदखान्यांतून काढून आणून, पेशव्यांच्या गादीवर बसविणें या दोन्हीही गोष्टी उभयतांचे ठिकाणीं, राजकारण व राजकारस्थान यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा पूर्णपणें अभाव असणें या दृष्टीनें, अगदीं सारख्या आहेत. सवाईमाधवराव गादीवर असूनही त्यांना शनिवार-वाड्याच्या बाहेरचें राजकारण, त्यांच्या वयाच्या सत्राव्या वर्षापर्यंत माहीत नव्हतें. मानाजी फाकडे भेटल्यानंतर नानांच्या विरुद्ध पक्ष जगांत आहे व नाना अन्याय करीत असतात, अशी त्यांची खात्री झाली. महादजी शिंद्यांचा सवाई-

माधवरावांना सहवास झाल्यानंतरच, त्यांना राजकारण व राजकारस्थान हलकें हलकें समजूं लागलें. तोंपर्यंत तेऱ्हां त्या दृष्टीनें अज्ञानीच होते. या सर्व गोष्टीवरून केवळ गादीवर बसल्याबरोबर बाजीरावाच्या अंगांत राजकारण व राजकारस्थान यांच्या ज्ञानानें व अनुभवानें एकदम संचार केला असला पाहिजे, असें म्हणणें अगर बाजीरावाबद्दल तशीच कल्पना करून चालणें पूर्णपणें अज्ञानाचें ठरेल.

९. नानांनीं बाजीरावाला गादीवर बसवून पेशवाईचे धनी केलें, त्या वेळीं बाजीरावाच्या पूर्वजांच्या कीर्तीचें अधिष्ठान बाजीरावाला होतें, कीं त्यांच्या दुष्कीर्तीचें पिशाच्च त्यांच्या मानेवर बसलें होतें, हेंही पहाणें येथें जरूर आहे. बाजीराव गादीवर येण्यापूर्वी त्यांची व्यक्तिविषयक कीर्ति सवाईमाधवरावांच्या वेळीं जी जगापुढें थोडीबहुत आली, त्यावरून ते देखणे आहेत, त्यांच्या चेहेऱ्यावर तारुण्याचें तेज आहे; भाल्याच्या उत्तम फेका ते करतात, शास्त्र पढलेले आहेत, वेद म्हणणारे आहेत, मिष्टभाषणी आहेत असें दिसून येते. याशिवाय त्यांची दुसरी कोणतीच कीर्ति बाहेर आलेली नव्हती. उलट नानांच्या जगत्‌–व्यापी प्रसिद्धाखात्यांतून बाजीरावांसंबंधीं जी माहिती प्रसिद्ध झाली होती, ती मात्र सर्वांच्या ठिकाणीं भीति व चिंता उत्पन्न करणारी अशीच होती. "बाजीराव हे पुतण्याच्या रक्तानें हात माखलेल्या राघोबाचे पुत्र आहेत; राघोबा हे पेशवाई गिळंकृत करणारे बंडखोर होते. त्यांनीं भाऊबंदी तंटा माजविला व पेशवाईवर अजस्त्र गंडांतरें आणिलीं; राघोबा व राघोबांचा वंश हा लोकांनीं नमस्कारसुद्धां करण्याच्या लायकीचा नाहीं; नाना, सखारामबापू वगैरेसारख्या थोरथोर मंडळींनीं राघोबांच्या वंशाला नमस्कार सुद्धां करावयाचा नाहीं अशा, लिंगावर पाणी सोडून शपथा घेतल्या आहेत. यावरून बाजीराव किती नीच, अधम, पापी असेल याची कल्पना होईल; शिवाय त्याची आई आनंदीबाई ही शुद्ध राक्षसीण होती. ती पेशवे घरांतली शुद्ध अवदसा होती. ती चेटकी होती. तिनें अनेकांवर अनेक वेळां विषप्रयोग केले. तिनें खुद

सवाईमाधवरावांवर व गंगाबाई, पार्वतीबाई यांच्यावर मारेकरी घातले. अशा दुष्ट, कृतघ्न, पापी, चांडाळ दंपत्याचा बाजीराव हा मुलगा. आईबापांच्या सर्व दुर्गुणांची खाण म्हणजे बाजीराव आहे. बाजीरावसुद्धां स्वतः मोठा चेटकी आहे. त्याच्या भोंवतीं मोठमोठे मांत्रिक, जादुगार वगैरे जमलेले आहेत. त्यानें केलेल्या जादुटोण्यामुळें सवाईमाधवराव मतिभ्रष्ट होऊन मरण पावले," वगैरे वगैरे विधानांनीं बाजीरावाबद्दल लोकांच्या मनांत जितका दुष्ट भाव, जितकी भीति व जितका गैरसमज पसरवितां येण्यासारखा होता, तेवढा सर्व नानांनीं केला होता. एकंदरींत बाजीराव गादीवर आले त्यावेळीं, त्यांच्या मागें पूर्वकीर्तीचें अधिष्ठान नसून, सर्व प्रकारच्या दुष्कीर्तींच्या गांटोड्याचें जबरदस्त ओझें मात्र त्यांच्या डोक्यावर नानांनीं कायमचें लादलेलें होतें. शिवाय नानांनीं बाजीरावास गादीवर बसविण्यासंबंधींचा जो करार लिहून घेतला होता, त्या ठरावांतील पहिलें कलम 'तुह्मीं आह्मांस गादीवर बसवाल तर आह्मीं यापुढें सर्व राज्यकारभार तुमच्या सल्लयानेंच करीत जाऊं' असें होतें. तें पहातां बाजीराव हे केवळ नामधारी होते असें स्पष्ट ठरतें. नानांच्या सल्लयानेंच सर्व राज्यकारभार चालणें ह्मणजे बाजीराव नामधारी नव्हते असें कोणालाच ह्मणतां येणार नाहीं. एकंदरींत नानांनीं या करारनाम्याप्रमाणें बाजीरावाच्या नाकांत वेंसण अडकवून ते स्वतः दरवेशी बनले होते. चिमाजीआपा आपल्या बालपणांतच आईबापाला अंतरून परदेशी झाले होते. आतां तेही दरवेशी नानांच्याच हातांतील खेळणें बनले. अमृतरावांचीही तीच दशा होती.

१०. नाना फडनविस यांना राज्यकारभारांत घुसून या वेळीं तीस वर्षांपेक्षां जास्त वर्षें लोटलीं होतीं. या कालांत त्यांनीं अनंत कारस्थानें केलीं. त्यांनीं आपल्या बुद्धिमत्तेची छाप सर्वांवर पाडली. थोरल्या माधवराव पेशव्यांसारख्या तापट पेशव्याला आपल्या मुठींत ठेवलें. इंग्रज, शिंदे, भोंसले गायकवाड, होळ्कर, निजाम, हैदर, टिपू वगैरेंना आपल्या कारस्थान-

कुशलतेनें मेणापेक्षां मऊ करून टाकलें. सखारामबापू, मोरोबादादा, विठ्ठल सुंदर वगैरे शहाण्या मुत्सद्यांना कायमचें पाणी पाजलें. महादजी शिंदे, परशुरामभाऊ पटवर्धनांसारख्या शूर व फौजबंद व मुत्सद्दी अशांनासुद्धां हातोहात चकविलें. तोतयाचें बंड, मोरोबादादाचें बंड, वगैरे गंडांतरें आणणारीं बंडेंसुद्धां नानांनीं आपल्या कौशल्यानें जिंकलीं. अशा प्रकारें निरनिराळ्या राजकारणांतून व राजकारस्थानांतून यशस्वी होऊन, महाडच्या कारस्थानांत दिसून आल्याप्रमाणें ते सर्व हिंदुस्थानच्या सत्ताधारी मंडळींच्या सर्कशीचे रिंगमास्तर बनले होते. या वेळीं नानांच्याजवळ करतलमलवत् पैसा खेळत होता, सर्वाधिकारी अधिकार त्यांच्या घरीं पाणी भरीत होते, नानांचा शब्द चारी दिशेला झेलला जात होता, 'नाना बोले आणि दळ हाले' अशी लष्करी सत्ता नानांच्या मागें हात जोडून उभी होती. एकंदरींत, थोडक्यांत पण पुष्कळ सांगावयाचें ह्मणजे, 'करीन ती पूर्व' हें सामर्थ्य या वेळीं एकट्या नानांत एकवटलें होतें असें ह्मटल्यास तें सार्थ होईल.

११. पेशवे बाजीराव व सर्वाधिकारी कारभारी नाना, यांचीं वरीलप्रमाणें दिसणारीं चित्रें आस्वल व दरवेशी यांच्या चित्रांपेक्षां निराळीं असतील असें कोणालाच मानण्याचें कारण नाहीं. आस्वलाची भीति लोकांना दाखवून दरवेशी आपला कार्यभाग साधून घेतो. आस्वलाच्या भीतिजनक स्थितींतूनच तो लोकांची करमणूकही करतो. भीति अगर करमणूक या दोन्ही अवस्था दरवेशाच्याच केवळ प्रेरणेनें होत असतात. भीति उत्पन्न होण्याकरतां आस्वलाकडून जी कृति घडविली जाते ती आस्वलाच्या उन्मत्तपणानें घडली असें दरवेशी सांगतो. पण आस्वलाच्या विविध लीलांनीं जें जनमनरंजन होतें तें मात्र आपण करतों, अशी तो फुशारकी मारीत असतो. याचा भावार्थ एवढाच कीं या वेळेपासून नाना हे दरवेशाच्या जागीं असल्यामुळें जी चांगली गोष्ट केली जाईल त्याचे जनक नाना, व जी गोष्ट वाईट ठरेल त्याचे अधिकारी पेशवे

होणार असेंच कोष्टक पुढील इतिहासांत घातलेलें दिसून येणार आहे. तेवढ्याकरतां दोन्हीही गोष्टींचे प्रेरक दरवेशी नाना हे आहेत अशी मनाशीं पूर्ण गांठ बांधून पुढील इतिहासाची संगत लावणें योग्य ठरणार आहे.

१२. नानांनीं महाडचें जें कारस्थान केलें, त्या कारस्थानांत त्यांनीं इंग्रज व निजाम या स्वतंत्र सरकारांचीं जशी मदत घेतली, त्याचप्रमाणें त्यांनीं शिंदे, होळकर, भोंसले, पन्हाळेकर, वगैरे मांडलिक सरदार व मांडलिक संस्थानिक यांचीही मदत घेतली. तसेंच बाबा फडके, आबाजी कृष्ण शेलुकर, दादा गद्रे, बजाबा शिरवळकर, धोंडोपंत नित्सुरे राघो विश्वनाथ गोडबोले, नारोपंत चक्रदेव, गोविंदराव पिंगळे वगैरे सरदारांचीही नानांनीं मदत घेतली होती. या सर्वांना नानांनीं जहागिरी, सरंजाम, रोकड पैसा, वगैरे देण्याचे करार केलेले होते. त्याचप्रमाणें सातारचे महाराज, मानाजी फाकडे, सर्जेराव घाटगे, बाळोजी कुंजर वगैरे, ज्यांची ज्यांची जरूरी लागली त्यांना त्यांना रोकड पैसा देण्यांत आलेला होता. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां महाडच्या कारस्थानामुळें नानांनीं इंग्रज, निजाम यासारख्या स्वतंत्र सरकाराबरोबर शिंदे होळकरांपासून तों थेट सर्जेराव घाटगे, बाळोजी कुंजरपर्यंत सरास सर्वांना एका मालिकेंत तात्विक दृष्टीनें आणून बसविलें. याचा अर्थ एवढाच कीं चिमाजीआपाला गादीवरून काढून बाजीरावाला गादीवर बसविण्याकरतां व परशुरामभाऊ व बाळोबातात्या यांना कारभारांतून काढून त्या ठिकाणीं नानांची स्थापना करण्याकरतां, या सर्वांस कामगिरीच्या श्रमाच्या मानानें कमीजास्त प्रमाणांत कां होईना पण मलिदा चारण्यांत आला होता. खुद्द पेशव्यांच्या व त्यांच्या कारभाऱ्याच्या कामाकरतां म्हणजे पेशवे सरकारच्या प्रत्यक्ष कामाकरितां नोकर लोकांस व स्नेही सरकारांस मलिदा देऊन काम करून घ्यावें लागलें. याचा स्पष्ट अर्थ असा होतो कीं, पेशवे बाजीराव, कारभारी नाना व पेशवे-सरकार यांबद्दल कोणाचाच आत्मीय भावनेचा या वेळीं संबंध राहिलेला नव्हता.

एकादें मोठें कुटुंब स्थावर जंगम मिळकतीची वांटणी होऊन विभक्त झाल्यानंतर त्या कुटुंबांत पुढें ज्याप्रमाणें व्यवहार चालतात तसेच व्यवहार या महाडच्या कारस्थानापासून पेशव्यांच्या राज्यांत नानांनीं सुरू केले असें स्पष्ट दिसून येतें. विभक्त झालेल्या कुटुंबांतील वडील माणसें ज्याप्रमाणें विभक्त झालीं तरी आपला विभक्तपणा जगाला न दाखविण्याचा प्रयत्न कांहीं कालपर्यंत करीत असतात व त्यांच्या कुटुंबांतील एकाद्या मंगलकार्याचे वेळीं सर्वजण एकत्र जमून तें कार्य आपण विभक्त झालों नाहीं असें लोकांना भासवून मोठ्या समारंभानें पार पाडतात. पण परस्परांच्या हितसंबंधांना मात्र कोणी धक्का पोंचूं देत नाहीं. खर्चाचा बोजा मात्र ज्याच्या घरीं कार्य असेल त्याच्या एकट्यावरच ते घालतात. तोच नमुना या महाडच्या कारस्थानांत दिसतो. तसेंच, कुटुंब विभक्त होतांना मिळकतीची वांटणी जरी झाली, तरी वडिलकीचा मान, कुलाचार वगैरे जो असतो तो मात्र ज्याचा त्याच्याकडेच अधिकारपरत्वें चालत असतो. यावेळीं पेशव्यांच्या राज्याचे जे आधारस्तंभ होते, त्यांचें विभक्तीकरण होऊन परस्परांचे हितसंबंध अलग अलग झाल्यामुळें, राजा व प्रजा, धनी व नोकर ही पेशव्यांच्या राज्यांतील परंपरागत भावना नष्ट होऊन त्यांच्यामध्यें आपापल्या हितसंबंधापुरताच दृष्टिकोन उत्पन्न झाला. त्यामुळें बाजीराव हे केवळ पेशवाईच्या इतर हिस्सेदारांपैकींच एक हिस्सेदार व पेशव्यांच्या गादीच्या कुंकवाचे धनी, एवढीच त्यांची अधिकारमर्यादा होऊन बसली. याप्रमाणें महाडच्या नानांच्या कारस्थानाचा इतिहास आहे असें दिसून येतें.

१३. ‘ याचको याचकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते ’ ही नेहमींच्या व्यवहारांत अनुभवाला येणारी म्हण, बाजीरावाची गादीवर स्थापना होतांच त्यांनाही अनुभवावयाला मिळाली. बाजीरावांना गादीवर बसविण्यांत शिंद्यांची अव्वल दर्जाची कामगिरी झाली होती. शिवाय त्यांच्या फौजेचा अवाढव्य खर्च असल्यामुळें, ते पुण्यास आल्यापासून सारखे खर्चाच्या ओढाताणींत होते. फौजेच्या खर्चाकरतां मागें बाळोबातात्यांनींही परशुरामभाऊंकडे पैशाची

मागणी केली होती व त्यांनींही ते पैसे देण्याचें कबूल केलें होतें. परंतु मध्यंतरीं या महाडच्या कारस्थानामुळें सर्वच उलटापालट झाली व शिंद्यांनाही पैशाची मागणी करतां येण्यासारखी परिस्थिति नव्हती. आतां बाजीरावाची गादीवर स्थापना होऊन नानांनीं कारभार सुरू केला. त्यामुळें आतां पैशाची मागणी करण्यास हरकत नाहीं असें पाहून, शिंद्यांनीं पैशाची मागणी करण्याचे आपलें घोडें पहिल्यानें पुढें ढकललें. त्यांचें नानांकडे असें म्हणणें पडलें कीं, 'श्रीमंतांस[१] गादीवर बसविण्याकरतां तुम्ही आम्हांस एक कोट रुपये देऊं केलें आहेत. त्यापैकीं जांबगांवच्या मुक्कामीं पन्नास लक्ष आणि गोदावरी उतरल्यावर पन्नास लक्ष असे त्या रकमेचे दोन हप्ते ठरलेले आहेत. आह्मांस रकमेची तूर्त नड आहे. सबब जांबगांवचा पहिला हप्ता आह्मांला पुणें मुक्कामींच द्या.' यावर नानांचें असें स्पष्ट म्हणणें पडलें कीं, 'तुमचा पुण्याहून मुक्काम हालल्याखेरीज तुह्मांला एक कवडीही मिळणार नाहीं.' या नानांच्या उत्तरानें शिंद्यांना आपला अपमान झाला असें वाटलें व त्यांना नानांचा मोठा राग आला. शिंद्यांना असा राग येणें स्वाभाविक होतें. कारण महाडच्या कारस्थानाच्या वेळीं शिंद्यांची नानांना जरूरी होती त्या वेळची नानांची भाषा, व ती जरूरी संपल्यानंतर आतांची त्यांची भाषा, यांत शिंद्यांना फार अंतर दिसूं लागलें. आजपर्यंतचा नानांच्या स्वभावाचा अनुभव त्यांना थोडाबहुत होताच. 'गरज सरो व वैद्य मरो' या म्हणीप्रमाणें अलीकडील राजकारणांतला अनुभव त्यांना येतच होता. शिवाय शिंद्यांनीं आपल्या स्वतःच्या इच्छेविरुद्ध व नानांच्या हट्टाकरतां बाळोबातात्या वगैरे कारभाऱ्यांना विश्वासघातानें पकडल्यामुळें शिंद्यांच्या फौजेंत व जुन्या सरदार-मुत्सद्दी मंडळींत त्यांच्याबद्दल असंतोष उत्पन्न झाला होता. सर्व खेळ खेळतां येतात. पण पैशाचा खेळ मोठा बिकट असतो. इतके दिवस हा सर्व खेळ बाळोबातात्या करीत आले. त्याची जबाबदारी शिंद्यांवर पडली नव्हती. सध्यां ते कैदेंत पडल्यामुळें व बाळोबांचे

---

१. नानांचें चरित्र पा. १९१.

पक्षपाती असंतुष्ट झालेले असल्यामुळें ही पैशाची जबाबदारी खुद्द शिंद्यांवर पडली. त्यामुळें त्यांनीं आपली नड भागविण्याकरतां नानांकडे पैसे मागितले. या मागणींत नानांचे उपकार येवढेच होणार होते कीं जी रक्कम जांब-गांवीं द्यावयाची होती, ती पुण्यास द्यावी लागणार होती. या नानांच्या उप-कारापेक्षां नानांच्या महाडच्या कारस्थानांत त्यांच्यावर आपण जास्त उपकार केले आहेत असें शिंद्यांना वाटत होतें. म्हणूनच ते नानांच्या वरील उत्तरामुळें त्यांच्यावर भयंकर रागावले. नानांच्या उत्तरानें शिंद्यांना असेंही वाटलें कीं, नाना कपटी आहेत, कपट-कारस्थानें करणारे व करविणारे आहेत. तेव्हां आपण जांब-गांवाला गेल्यानंतर तरी नाना रक्कम देतीलच याचा कोणी विश्वास धरावा ? आपलें कोणतेंच बोलणें नाना ऐकावयाला तयार नाहींत, तेव्हां ठरल्याप्रमाणें एक कोट रुपये द्यावयाचे नानांच्या मनांत नाहीं अशी शिंद्यांना शंका आली. म्हणून ठरल्याप्रमाणें एक कोट रुपये पुण्यासच हातीं पडल्याशिवाय आपण पुणें सोडावयाचें नाहीं असें त्यांनीं ठरविलें. नानांना शिंद्यांबद्दल अशी भीति वाटत होती कीं, शिंदे आपल्याकडून एक कोट रुपये घेतील व पुणें सोडून जाणार नाहींत. शिंदे पुण्यास राहिले तर ते खात्रीनें आपल्या कारभारांत ढवळाढवळ करून बाजीरावास आपल्या सल्ल्यांत ओढतील व आपली कारभारांतून हांकलपट्टी करतील. याच उद्देशानें नाना शिंद्यांस पैसे देण्यास तयार नव्हते. याप्रमाणें शिंदे व नाना यांच्या परस्परविरुद्ध धोरणामुळें त्यांच्यांत थोडक्याच दिवसांत रणें माजण्यापर्यंत प्रसंग आला. 'आपणांवर शिंद्यांचा केव्हां घाला येईल याचा नेम नाहीं, असें समजून नाना फडनविस घोड्यावर जिने ठेऊन आरब वगैरे पायदळ सज्ज करून हुशारीनें राहूं लागले.[१]' अशा तऱ्हेनें नाना व शिंदे यांच्यामध्यें तेढ उत्पन्न होऊन रणें माजूं लागणार अशीं दोन चार दिवसांच्या अवधींतच स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. बाजीराव गादीवर आले, पण त्यांच्या हातांत कोणतीच गोष्ट नव्हती. ते केवळ नामधारीच

---

१ व २ ना. च. पा. १९२.

होते. परंतु आपलें पेशवेपद टिकणें अगर तें जाणें हें नाना व शिंदे यांच्या हातीं आहे, एवढें समजण्याइतकें तारतम्यज्ञान त्यांना होतें. त्यांना शिंदे व नाना हे दोघेही पाहिजे होते. तेव्हां या दोघांत बाजीराव यांनीं नानांच्या प्रेरणेवरून मध्यस्थी केली. बाजीरावाच्या मध्यस्थीमुळें शिंदे थोडे ठिकाणावर आले व त्यांनीं तूर्त नानांकडून वीस लाख रुपये घेऊन कलह मिटता घेतला.

१४. शिंद्यांनीं नानांकडे पैशाची ज्या वेळीं मागणी सुरू केली त्या वेळीं नानांनीं बाजीरावाकडे निजाम व भोंसले यांच्याबरोबर आपण केलेले करार पुरे करून देण्याबद्दल निकड लाविली. निजाम व भोंसले यांच्या मागणीचीं घोडीं नाना आपल्या घोड्यापुढें दामटींत आहेत असें शिंद्यांना समजल्याबरोबर तीं हाणून पाडण्याकरतां त्यांनीं बाजीरावाला सांगितलें कीं, ' नानांनीं लांच खाऊन नबाब व भोंसले यांशीं भलभलते करार ठरविले आहेत. भोंसल्यांस गढेमंडळ प्रांत व पंधरा लक्ष रुपये द्यावयाचा करार आहे. त्यापैकीं रुपये परभारें नानांकडून देववावयाचे असल्यामुळें त्या गोष्टीस हरकत नाहीं. परंतु भोंसल्यांस गढेमंडळ प्रांत कां म्हणून द्यावयाचा ? आम्हीं सरकारचे एकनिष्ठ सेवक आहोंत. सबब तो प्रांत आम्हांलाच मिळाला पाहिजे. नबाबास खंडणी व मुलुख माफ करावयाची गोष्ट तर बोलावयासच नको ! कारण खर्ड्याच्या स्वारीस निघतांना त्या दोन्हीं कलमांत पेशवे सरकारची व आमची वांटणी ठरलेली आहे. पेशवेसरकारच्या वांटणीवर तुळशीपत्र ठेवावयाला नाना तयार झाले हा मजकूर ठीकच आहे ! परंतु आम्हीं आमची वांटणी कां बुडवावी ? नबाबाला ठोक देऊन मुलुख व खंडणी वसूल करण्याचें आमच्या मनगटांत अजून सामर्थ्य आहे. सबब नानांनीं ठरविलेले हे दोन्ही करार रद्द करण्यांत यावेत.[२] ' याप्रमाणें शिंदे, निजाम व भोंसले या तिघांचें एकमेकांवर आपापल्या प्राप्तीकरतां गुरगुरणें सुरू झालें. नानांच्या मनांत या तिघांपैकीं कोणालाच कांहीं द्यावयाचें नव्हतें. त्यांच्या तोंडाला पानें

पुसूनच त्यांची रवानगी करण्याच्या बेतांत नाना होते व त्याच हेतूनें या तीन मोठ्या प्रश्नांत त्यांनीं कलहाची प्रेरणा उत्पन्न केली होती. निजामानें आपला हट्ट सोडला ह्मणजे भोंसल्यांना आपला हट्ट सोडावा लागेल व भोंसल्यांनीं आपला हट्ट सोडला ह्मणजे शिंद्यांना आपला हट्ट सोडावा लागेल, आणि मग कोणालाच कांहीं द्यावयाला नको असा डाव नानांचा होता. बाजीरावांची मात्र अशा परिस्थितींत कुतरओढ होऊं लागली. त्यांना सर्वच माणसें पाहिजे होतीं. एकाला खूष करणें व दुसऱ्याला नाखूष करणें हें त्यांना बरें दिसेना. सर्वांचें समाधान व्हावें व कोणी आपल्या अन्यायाच्या मागणीकरतां दुराग्रह धरूं नये; सर्व गोष्टी समाधानानें पार पाडाव्या असें त्यांना वाटत होतें. ह्मणून शिंद्यांच्या मताविरुद्ध निजाम व भोंसले यांच्या जशाच्या तशा मागण्या मान्य करण्याचें बाजीराव यांच्या मनाला पटेना. तेव्हां नानांना बाजीरावानें असें सांगितलें कीं, भोंसले व नबाब यांच्या शर्ती फार जबर असून त्या नानांनीं आपल्या स्वार्थावर नजर देऊन ठरविलेल्या आहेत ! त्या मान्य करण्याचें पूर्वी आह्मीं वचन दिलें असलें तरी आतां तें वचन आम्हीं पाळणार नाहीं !' या वेळीं नानांनीं निजाम व भोंसले यांचा पक्ष धरला होता व बाजीरावानें शिंद्यांचा पक्ष धरला होता. नाना व बाजीराव यांना या प्रसंगीं एक होणें प्राप्त होतें. कारण इतर लोकांच्या मागण्या भागविण्याची खरी जबाबदारी बाजीराव हे धनी व नाना हे त्यांचे कारभारी या नात्यानें या उभयतांवर होती. त्याकरतां नानांनीं एक मजेशीर डाव टाकला. नानांनीं व बाजीरावांनीं जे दोन निरनिराळे पक्ष धरले ते केवळ बाहेर दाखविण्यापुरते होते. हें नानांचें व बाजीरावांचें निव्वळ सराफी भांडण होतें. दोघा भावांच्या मालकीचें एक सराफी दुकान असतें. दुकानाचें हित दोघांना सारखें पहावयाचें असतें. गिऱ्हाईक आलें म्हणजे एक भाऊ गिऱ्हाईकाच्या वतीनें बोलतो. दुसरा त्याच्या विरुद्ध बोलतो. माल चांगला आहे असें एक म्हणतो व दुसरा तो माल वाईट असल्याबद्दल कुरकुर करतो. त्याकरतां दोघे भाऊ आप-

सांत भांडूं लागतात. गिऱ्हाईकास वाटतें कीं, आपल्या बाजूनें जो भाऊ भांडतो तो आपलें हित करणारा आहे. तेव्हां त्याच्या सल्ल्याप्रमाणें तो शेवटीं आपला व्यवहार करून जातो. त्यानें केलेला व्यवहार दुकानाच्याच फायद्याचा होतो. एकंदरींत दोन सराफांचें भांडण केवळ दाखवण्यापुरतेंच असतें. तसेंच भांडण या वेळीं नानांचें होतें. शिंद्यांचा पक्ष बाजीरावांनीं घेतला व नाना त्याला विरुद्ध गेले. बाजीरावांनीं नानाजवळ शिंद्यांची वकिली केली तेव्हां शिंदे एक कोटी रुपयांच्या मागणीवरून वीस लाख रुपयेपर्यंत खालीं उतरले. आतां नाना, निजाम व भोंसले यांच्यातर्फे वकिली करूं लागले. त्या प्रसंगीं बाजीरावांनीं आपण विरुद्ध असल्याचें दाखविलें. खुद्द बाजीराव निजामाच्या विरुद्ध आहेत, हें दाखविण्याकरतां ता. २० डिसेंबर सन १७९६ च्या सुमारास नाना मशीरउल्मुल्कखास आपल्याबरोबर घेऊन बाजीरावाच्या भेटीला आले. उभयतांच्या भेटींत बाजीरावांनीं मशीरपुढें नन्नाचा पाढा वाचला.[१] त्यामुळें अर्थात् मशीर खट्टू झाले व परत गेले. हें प्रकरण सामोपचारानें मिटेल असें त्यांना दिसून आलें नाहीं, म्हणून त्यांनीं भागानगरहून तीस चाळीस हजार फौज व मुसारेमूचीं पलटणें व पन्नास तोफा असा सरंजाम मागविला. त्याचप्रमाणें भोंसल्यांनींही वीस हजार फौज नागपुराहून मागविली.

१५. या वेळीं नानांनीं एका निराळ्याच कपटनाटकाचा प्रयोग केला. त्यामुळें शिंदे, भोंसले व निजाम हे तिघेही नानांच्या कह्यांत कसे आले हें दिसून येईल. नाना कारभारांत आहेत तरच पैसा आहे, हें तिघांनाही पूर्ण माहीत होतें. त्या दृष्टीनें नाना या तिघांनाही पाहिजे होते. नाना तर या सर्वांचें चांगलेंच अंतर्गत जाणत होते. त्यांनीं निजाम व भोंसले यांच्या पक्षाचे आपण पूर्णपणें आहोंत असें दाखविण्याकरतां आपल्या कपटनाटकाच्या प्रयोगाला सुरवात केली. त्यांनीं असें सोंग केलें कीं, बाजीराव आपलें ऐकत नाहींत. त्याकरतां

---

१. ऐ. ले. सं. भाग १० पान ५०५०.

आपण सर्वसंग परित्याग करून काशीस जाणार. नानांच्या प्रसिद्धी खात्यांतून ते काशीस जाणार ही ताजी बातमी बाहेर पडल्याबरोबर कित्येक लोक गडबडून गेले. बाजीरावाचा भाऊ अमृतराव, शिंद्यांचा कारभारी रायाजी पाटील, त्याचप्रमाणें नानांचे पक्षपाती आबा शेळूकर व दादा गद्रे वगैरे लोकांची नानांच्या भेटीकरतां गर्दी सुरू झाली. परंतु काशीस जाण्याच्या बाबतींत नानांनीं कोणाचीच भीड पडूं दिली नाहीं. त्यांनीं काशीस जाण्याकरतां आपल्या व्यवहाराची निरवानिरव करीत असल्याचें दाखविण्यास सुरवात केली. राज्यकारभारांतून सेवानिवृत्त होण्याचे पूर्वी आपल्या अंगावरील सर्व जबाबदारी पार पाडून घेण्याचे निमित्तानें त्यांनीं श्रीमंत बाजीराव यांच्या मखलाशीकरतां एक यादी तयार केली, व ती तारीख १ जानेवारी सन १७९७ रोजीं बाजीराव पेशवे यांच्याकडे सादर केली. ती यादी खालीं दिल्याप्रमाणें होती.

१६. सेवेशीं[1] विज्ञापना ऐसीजे, स्वामींची कृपा मजवर. माझें लक्ष स्वामीपाशीं, हें कित्येकांस असह्य होऊन त्यांनीं राज्यांत बखेडा करून आचरूं नये, तें कर्म स्वामीशीं अमर्यादेचें आचरिलें. मी महाडास राहून राजकारणें वगैरे करून राजश्री दौलतराव शिंदे व सेवकानें करावयाचें तें करून, स्वामींचें पुण्य मदत होऊन, सर्व गोष्टी मनोदयानुरूप घडल्या; येणेंकरून सेवकास कृतकृत्यता झाली. पुढें सेवा करावी अशी शरीरांत ताकद व शक्ति राहिली नाहीं. यास्तव मागणें हेंच कीं, कृपा करून स्वस्थ स्नानसंध्या करून स्वामींस अभीष्ट चिंतून राहण्याविषयीं आज्ञा व येविषयीं करार करून देण्याचीं कलमें—

१ दत्तपुत्र घेणेची आज्ञा आहे, त्याप्रमाणें घेणेंत येईल. त्याचे हातून पूर्ववत्प्रमाणें फडनिशीचें दरकाचें वगैरे काम घेऊन लोभानें सरं-

---

१. ना. च. पा. १९३-९४-९५.

जाम वगैरे चालत आल्याप्रमाणें चालवावा. किल्ले लोहगड सरकारांतून व किल्ले केळंजा पंतसचिवांकडून आहे, त्याप्रमाणें असावें. माझेविषयीं चित्तांत संशय नसावा. कोणी घालूं लागल्यास ठेवूं नये.

(श्रीमंतांची मखलाशी)—येणेंप्रमाणें करार.

२. पहिला सरंजाम स्वारांचा आहे. हल्लीं हजार गाडदी यांचा जाजती देऊन जेथें राहणें होईल, तेथें त्यांनीं चौकी पहाऱ्यास असावें, याची परवानगी.

(मखलाशी)—येणेंप्रमाणें करार.

३. परभारां गांवजहागीर मिळविली त्यापैकीं सरकारांत घेऊन सरकारांतून पंचवीस हजारांचे गांव सोईचे इनाम करून द्यावे. कै. राव यांनीं कृपा करून सर्फराज केलें तसें चालावें.

(मखलाशी)—येणेंप्रमाणें करार.

४. श्रीकाशीस जावयाचा बेत आहे. यास्तव इंग्रजांस सरकारचीं पत्रें व दौलतराव शिंदे यांचीं पत्रें द्यावीं कीं, संतोषानें निरोप दिला. संतोषानें तेथें राहतील. दरएकविशीं साहित्य करीत जावें.

(या कलमावर श्रीमंतांची मखलाशीच नाहीं.)

५. राजकारण संबंधें शिंदे, नबाब व भोंसले व पन्हाळेकर वगैरे जागां करार व वचनें गुंतलीं त्याच्या तोडी व्हाव्या. राजकारणांत ज्याचा जसा उपयोग पडला असेल त्याप्रमाणें तोड पडावी.

(मखलाशी)—येणेंप्रमाणें करार.

६. सरकारचे कामांत मसलत करून कारणसंबंधें खर्च झाला. तो सरकारांतून उगवे असें व्हावें.

(मखलाशी)—येणेंप्रमाणें करार.

७. हरीपंत फडके यांणीं राज्यांत सेवा केली. त्यांचे पुत्रांचें चालवावें.

(मखलाशी)—चालविलें जाईल येणेंप्रमाणें करार.

८. महाडास सोबत दिली. ते समयीं त्यांस वचनें दिलीं आहेत. आबाजी कृष्ण शेलूकर, दादा गद्रे, बजाबा शिरवळकर, धोंडोपंत नित्सुरे मिळून चार. सदरहू मिळोन दोन हजार स्वारांचा सरंजाम सरकारांतून देऊन सेवा घ्यावी.

(मखलाशी)—येणेंप्रमाणें करार.

९. दादा गद्रे व आबाजी कृष्ण शेलूकर यांजकडे वसई सरसुभा व किल्ले रायगड व अहमदाबादचा सुभा व पागा सरकारांतून आहे. त्याप्रमाणें कृपा करून चालवावें. तेही एकनिष्ठपणें सेवा करतील.

(मखलाशी)—येणेंप्रमाणें करार.

१०. धोंडोपंत नित्सुरे यांनीं सेवा चांगली केली. यास्तव विसापूरचें काम त्यांस सांगावें.

(मखलाशी)—येणेंप्रमाणें करार.

११. राघो विश्वनाथ गोडबोले यांजकडे सरकारांतून तोफखाना व चार हजार गाडदी यांचें काम होतें. त्यास हल्लीं हजार गाड्यांचा रिसाला सांगून बंदोबस्त करून देणेची आज्ञा व्हावी.

(मखलाशी)—येणेंप्रमाणें करार.

१२. स्वराज्य व परराज्य यांशीं करार व तहनामे आहेत त्याप्रमाणें चाल असावी. मोठी मसलत पडेल त्यास बरोबरीचे सरदार शिंदे, होळकर वगैरे यांचे सल्ल्यानें चांगलें तें होत असावें.

(मखलाशी)—येणेंप्रमाणें करार.

१३. नारोपंत चक्रदेव व गोविंदराव पिंगळे यांनीं श्रमसाहस करून सेवा केली. त्यांस सर्फराज करून पुढें बंदोबस्त स्वरूप वाढवून व्हावा.

(मखलाशी)—श्रमानुरूप स्वरूप होईल. येणेंप्रमाणें करार.

१७. नानांनीं पेशवाईच्या कारभारांतून सेवानिवृत्त होऊन काशीक्षेत्राचे ठिकाणीं स्वस्थ स्नानसंध्या करून राहण्याकरतां वरील तेरा कलमांची यादी तयार केली व ती बाजीरावाकडे सादर करून त्यावरील

प्रत्येक कलमावर त्यांची मखलाशीही ताबडतोब करून घेतली. या यादीं-तील कलमांच्या मथळ्यावरील मजकूर पहातां पेशवाईचा कारभार करण्याइतकी ताकद व शक्ति नानांना राहिली नव्हती, ह्मणून ते सेवानिवृत्त होणार होते. अर्थात सेवानिवृत्त होण्याचे पूर्वी आपल्या डोक्यावरील जबाबदारी पार पाडण्यापुरतीच या यादींतील कलमांची जरूरी होती. परंतु हीं तेरा कलमें पाहिलीं असतां, नानांचा सेवानिवृत्त होण्याचा हेतुच त्यांतुन निघत नाहीं. पहिल्या कलमांत नानांनीं आपल्या दत्तकाबद्दल व सरंजाम फडनिशीच्या दरकाचें काम वगैरेबद्दल, नवीन पेशव्यांकडून मान्यता घेऊन आपलें स्थान पूर्णपणें अढळ केलें. पहिल्या कलमांतील सरंजाम, अधिकार याच्या मजबुतीबरोबर स्वतःच्या देहाच्या रक्षणाची जास्त मजबुती करण्याकरतां दुसरें कलम घालून चौकी देण्याकरतां एक हजार गारद्यांच्या नव्या पथकाची मंजुरी घेण्यांत आली व त्याचा सर्व खर्च पेशवे दरबारावर लादण्यांत आला. तिसऱ्या कलमाप्रमाणें नानांना निजामाकडून वगैरे जी नवीन जहागीर दलालीदाखल मिळाली होती ती पेशव्यांच्या राज्यांत सामील करून घेऊन त्याऐवजीं पेशव्यांच्या राज्यांतील नानांना सोईस्कर वाटणारी पंचेवीस हजारांची जहागीर त्यांनीं आपल्या नांवानें करून घेण्याचा करार पेशव्यांकडून मंजूर करून घेतला. या करारामुळें नानांनीं बेकायदा कमावलेली दलालीदाखल जहागीर सनदशीर ठरली व ती परराज्यांत असल्यामुळें निजामाच्या रोषानें जाण्याची भीति होती, ती भीति जाऊन तिच्या ऐवजीं पेशव्यांच्या राज्यांत नानांना सोईस्कर अशी जहागीर मिळाली. या तिसऱ्या कलमाप्रमाणें नानांनीं आपली सोईस्कर अशी नवीन जहागीर वाढवून आपलें स्थान पेशव्यांच्या मंजुरीनें जास्त बळकट करून घेतलें. चवथें कलम काशीस जाण्याबद्दलचें होतें. पण तें केवळ लोकांची दिशाभूल करण्यापुरतेंच असल्यामुळें त्यावर पेशव्यांची मखलाशी होण्याचें कारण नव्हतें; ह्मणूनच त्यावर ती झालेली नाहीं. नानांनीं महाडचें कारस्थान केलें व त्या बाबतींत त्यांनीं शिंदे, नबाब, भोंसले व पन्हाळेकर

यांच्याबरोबर करारमदार केले. ते करारमदार जशाचे तसे पुरे करण्याचें नानांचे मनांत नव्हतें. याकरतां नानांना ज्याचा जसा उपयोग झाला असेल तशी ते तोड करणार होते. हा तोड करण्याचा अधिकार सर्वस्वी नानांना एकट्याला मिळावा व त्यांत पेशव्यांनीं कोणत्याही प्रकारची ढवळाढवळ करूं नये ह्मणून पांचवें कलम घालण्यांत आलें होतें. या कलमाप्रमाणें शिंदे, निजाम, भोंसले व पन्हाळेकर हे नानांच्या मुठींत सांपडले. हें राजकारण घडवून आणण्याकरतां नानांना स्वतःच्या खजिन्यांतला बराच पैसा ओतावा लागला. त्याची पेशवे दरबारांतून भरपाई होण्याकरतां सहावें कलम आहे. हें खर्चाचें कलम मोघम आहे. या कलमाप्रमाणें नाना जो खर्च सांगतील तो सर्व पेशवे सरकारांतून त्यांना उगवून घेण्याचा अधिकार मिळाला. याशिवाय कलम सात, आठ, नऊ, दहा-अकरा व तेरा हीं कलमें केवळ नानांच्या लोभांतील व विश्वासांतील सरदारांची संभावना करण्याकरतां आहेत. ही त्यांची यथायोग्य संभावना केल्यामुळें नानांचा पक्ष सर्व बाजूंनीं मजबूत व संघटित असा झाला. या कलमाप्रमाणें खर्च पेशवे सरकारचा झाला आणि नानांचा पक्ष बळावला.

१८. वरील कलमें जीं नानांनीं मंजूर करून घेतलीं, तीं केवळ आपल्या मिळकतीसंबंधीं व महाडच्या कारस्थानांतील त्यांच्यावर असलेल्या जबाबदारी-संबंधींचीं होतीं. निदान वरवर दिसावयाला तरी तशीं तीं होतीं असें ह्मणावयास हरकत नाहीं. परंतु नानांनीं बारावें कलम जें पेशव्यांच्याकडून मखलाशी करून घेतलें त्याचें या वेळीं काय प्रयोजन होतें, हें समजत नाहीं. नाना सेवानिवृत्त होऊन या वेळीं काशीस जाणार होते. त्यांच्या पश्चात् बाजीराव पेशवे पेशव्यांच्या राज्यांतील लोकांशीं व परराज्यांतील दरबाराशीं आपले संबंध कसेही ठेवोत, त्याबद्दल नानांना काळजी करण्याचें कारण नव्हतें. असें असतां हें बारावें कलम ज्याअर्थीं नानांनीं यांत घातलें आहे, त्याअर्थीं त्यांचे मनांत काशीस जाण्याचे बिलकूल नव्हतें, तें केवळ ढोंग होतें व तें नानांनीं वरील करार पेशव्यांकडून

मंजूर करून घेण्याकरतांच केलें होतें असें स्पष्ट दिसतें. या बाबतींत कोणी असें ह्मणेल कीं, नानांच्या परिश्रमानें इतके दिवस पेशवाई टिकली ती ते सेवानिवृत्त झाल्यानंतर लयाला जाईल, ह्मणून नानांनीं एवढी काळजी घेतली. पण त्याला असें रोखठोक उत्तर आहे कीं, नानांना जर पेशवाईची एवढी कदर व काळजी होती तर ते स्वतः काशीला निघते वेळीं पेशव्यांच्या कारभाराची जोखीम ते कोणत्यातरी योग्य इसमाच्या स्वाधीन करून गेले असते. पण याबद्दलचें मुख्य व महत्वाचें कलमच या यादींत नाहीं. नानांच्या मनांत आपलें कारभारीपद सोडून काशीस जाण्याचें होतें असें ह्मणणें व समजणें अगदीं अज्ञानाचें ठरेल. वरील यादींतील बारावें कलम कारण नसतां घातलें गेलें व ज्याचें मुख्य कारण होतें असें कारभारीपदाचें कलम वगळलें गेलें, यांतच नानांचें कपटकौशल्य दिसून येतें. पेशव्यांच्या सर्वाधिकारी कारभारीपदावर नानांचें एवढें प्रेम, एवढा जिव्हाळा व एवढी अमर्याद लालसा गुंतली होती कीं, सर्वस्वी मद्याधीन झालेल्या एकाद्या मद्यप्याचीसुद्धां मद्यावर इतकी गुंतली नसती. नानांनीं काशीस जातों असें ढोंग केलें व ही तेरा कलमी यादी, काशीचें कलम वगळून बाजीरावाकडून मखलाशी करून घेतली आणि आपला अधिकार, आपली जहागीर, आपली धनदौलत, आपल्या पक्षाचें बलवृद्धीकरण, वगैरे साधून घेतलें. हें आपलें उद्दिष्ट साध्य करून घेण्यांत व बाजीरावांचे सर्व बाजूंनीं हात कलम करून घेण्यांत या वेळीं नानांनीं आपली अलोट बुद्धिमत्ता दाखविली.

१९. लोकांची दिशाभूल करून आपला स्वार्थ साधून घ्यावयाचा हा बिनतोड डाव कपटकारस्थानी मुत्सद्याचा असतो. नानांचा तोच डाव हातखंडा होता. नानांच्या या दिशाभूल करणाऱ्या हातखंड्या डावामुळें केवळ त्याच वेळेचे लोक फसले नाहींत, तर आज तारखेपर्यंतचे मोठमोठे इतिहासकारही त्यांच्या या डावाला बळी पडले आहेत. महाडचें कारस्थान नानांनीं स्वार्थाकरतां केलें नसून तें केवळ पेशवाईच्या रक्षणाकरतां केलें

असें ह्मणण्यांत सर्वमान्य इतिहासपंडित खरेशास्त्री हे अग्रगण्य आहेत. "मराठी राज्य काबीज करण्यासाठीं इंग्रज लोक अगदीं टपून बसले आहेत. राज्यांत दंगेधोपे माजून राहिले तर तें इंग्रजांच्या घशाखालीं उतरण्यास फार अवधि लागणार नाहीं, या गोष्टी नानाखेरीज इतर कोणास त्या काळीं दिसत होत्या असें वाटत नाहीं. राज्याचा कारभार आपल्या हातीं राहिला तरच राज्यांत स्वस्थता नांदून त्याचा उत्कर्ष होणें शक्य आहे, अशी जी नानांची समजूत होती, ती केवळ स्वार्थमूलक होती असेंही ह्मणवत नाहीं. इंग्रजांच्या वर्चस्वाची आपत्ति टळावी व मराठी राज्याचें स्वातंत्र्य कायम रहावें ह्मणून मागच्या प्रकरणांत वर्णिलेलें महाडचें कारस्थान नानांनीं रचिलें, आणि त्यांत त्यांचें अपूर्व बुद्धिकौशल्य दिसून आलें, हें निर्विवाद[1] आहे." महाडच्या कारस्थानाबद्दल खरेशास्त्रयांचा वरीलप्रमाणें अभिप्राय आहे. या अभिप्रायाप्रमाणें इंग्रजांच्या वर्चस्वाची आपत्ति टळावी व मराठी राज्याचें स्वातंत्र्य कायम रहावें अशी जर नानांची प्रामाणिक इच्छा असती तर ती तारीख ४ डिसेंबर सन १७९६ रोजीं फलद्रूप झाल्यानंतर अवघ्या सत्तावीस दिवसांतच म्हणजे तारीख १ जानेवारी सन १७९७ रोजीं पेशव्यांच्या कारभारांतून सेवानिवृत्त होऊन काशीस जाण्याबद्दलची तेरा कलमाची त्यांची यादी पेशव्यांच्या मखलाशीकरतां पुढें आली नसती. या सत्तावीस दिवसांत मराठी राज्य इंग्रजांच्या घशांत घालण्याचा बाजीरावानें कोणताच प्रयत्न केलेला नव्हता. असें असतां मराठी राज्याचें स्वातंत्र्य टिकविण्याकरतां महाडचें दिव्य कारस्थान करणारे वीर नाना, केवळ सत्तावीस दिवसांच्या अवधींत आपल्या आजपर्यंतच्या (पेशवाईचें स्वातंत्र्य टिकविण्याच्या) तपश्चर्येवर पाणी सोडण्यास तयार होतील ही गोष्ट अगदींच असंभाव्य अशी आहे. खरेशास्त्रयांच्या विचारसरणीप्रमाणें इंग्रजांविरुद्ध मराठी राज्याचें स्वातंत्र्य टिकविणारे फक्त नाना हे एकटेच त्या वेळीं योग्य असे महापुरुष होते. असें असतां ते कारभारांतून सेवानिवृत्त होऊन काशीस जाऊन स्नानसंध्या

---

१ नानांचें चरित्र पा. १८९.

करीत बसल्यानंतर इंग्रजांविरुद्ध मराठी राज्याचें स्वातंत्र्य ते कसें टिकविणार होते याबद्दल खरेशास्त्रयांनीं कोणताच पुरावा सादर केलेला नाहीं. नाना आपल्या दिव्य मंत्रसामर्थ्यावर काशीस राहून इंग्रजांना नेस्तनाबूत करणार होते असें कोणी ह्मणेल तर तशी दिव्य मांत्रिकशक्ति नानांच्या अंगीं असल्याबद्दल ऐतिहासिक पुरावा नाहीं. एकंदरींत स्वातंत्र्य टिकविणें व काशीस प्रयाण करणें या दोन गोष्टी परस्परांशीं अगदीं भिन्न अशा आहेत. ह्मणून या दोन गोष्टींपैकीं निदान त्यांतील एक तरी गोष्ट निव्वळ खोटी असलीच पाहिजे यांत शंका नाहीं. ज्या अर्थी या दोन गोष्टींपैकीं एक गोष्ट अगदीं खोटी असल्याचें स्पष्ट दिसतें, त्याअर्थीं एक खोटी गोष्ट करणारा इसम दोन्हींही गोष्टी खोट्या करूं शकेल, हें निराळें सिद्ध करीत बसण्याचें कारण नाहीं.

२०. आजपर्यंतच्या बऱ्याचशा इतिहासकारांनीं व चरित्रकारांनीं नानांची स्तुति व परपक्षाची निंदा करण्याचें व्रतच अंगिकारलें आहे, असें दिसते. निंदकांना वूड नसतें. खरेशास्त्रयांच्या ह्मणण्याप्रमाणें मराठी राज्याचें स्वातंत्र्य टिकविण्याकरतां नानांनीं महाडचें कारस्थान केलें, व आपल्या हातीं कारभारीपदाचीं सूत्रें घेऊन ते पेशवाईचा कारभार हांकूं लागले. असें असतां नानांच्या मनांत एकाएकीं राज्यकारभारांतून अंग काढून काशीला जाण्याची इच्छा उत्पन्न झाली. नाना असतील तरच पेशव्यांचें राज्य टिकेल असें समजणारी त्या वेळीं बरीच मंडळी होती. त्यामध्यें स्वतः बाजीराव पेशवे व शिंदे हे होते. ह्मणून बाजीरावांनीं नानांच्या तेरा कलमी यादींतील काशीच्या कलमावर मखलाशी केली नाहीं. अशी वस्तुस्थिति असतां खरेशास्त्रयांनीं भलताच बादरायणी संबंध जोडून बाजीराव व शिंदे यांच्यावर भलभलते आरोप आणून नानांची तरफदारी करण्याचें पुण्य आपल्या पदरांत बांधून घेण्याचा प्रयत्न केला आहे. "काशीयात्रेच्या परवानगीची मुख्य मागणी मात्र, श्रीमंत (बाजीराव) व शिंदे यांनीं सपशेल नाका-

रली! कारण त्यांच्या मनांत नानांचा सर्वस्वीं नाश करावा असें होतें.[1]" संशय–पिशाच्चाची एकदां बाधा झाली ह्मणजे मोठमोठे विद्वानसुद्धां कसे भारले जातात याचें हें एक उत्तम उदाहरण आहे.

२१. नानांनीं काशीयात्रेस जातों ह्मणून ढोंग करून, बाजीराव पेशवे यांच्याकडून कशीं कशीं कलमें मखलाशी करून घेतलीं हें वर आलेंच आहे. नानांच्या हातांत त्या कलमांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार आल्यामुळें ते त्या मार्गाला लागले. त्यांतील पांचवें कलम शिंदे, नबाब, भोंसले व पन्हाळेकर यांच्याबरोबर झालेल्या कराराची तोड करण्याचें होतें. महाडच्या कारस्थानाच्या वेळीं जसजसे करार केले तसतसे ते पुरे करून देणें सरळपणाचें व न्यायाचें होतें. परंतु नानांच्या मनांत तशी सरळ गोष्ट करावयाची नव्हती. त्याला दुसरें कारण असें होतें कीं, शिंद्यांबरोबर झालेला करार अक्षरशः पाळला तर निजाम व भोंसले यांना वाईट वाटणार होतें. निजाम व भोंसले यांच्याबरोबर झालेले करार रीतसर पुरे केले तर शिंद्यांना राग येणार होता. एकंदरींत सर्वांचे करार समाधानानें पार पाडतां येण्यासारखे नव्हते. ह्मणूनच तो अधिकार नानांनीं आपल्या हातीं घेतला. 'राजकारणांत ज्याचा जसा उपयोग पडला असेल त्याप्रमाणें तोड पडावी.' अर्थात् नाना जो न्याय देतील तो त्यांनीं मान्य करावा असा नानांचा पेशव्यांकडून मिळालेला तो अधिकार होता. या अधिकाराचा फायदा नानांनीं आपल्या पक्षांतील इसमांना देऊन इतरांचें नुकसान केलें असेल, हा प्रश्न निराळा. पण त्याबद्दल या चौघांना पेशव्यांकडे दाद मागण्याचा मार्ग मात्र मोकळा राहिलेला नव्हता. याप्रमाणें न्यायाचा कांटा नानांच्या एकट्याच्या हातीं आल्यामुळें शिंदे, नबाब, भोंसले व पन्हाळेकर या चौघांचे उपाय थकले व भांडण करून आतां उपयोग होणार नाहीं, उलट तें जाचेल असें पाहून, ते आपापले करार नानांच्या इच्छेप्रमाणें पुरे करून घेण्यास तयार झाले.

---

१ नानांचें चरित्र पा. १९५.

२२. नानांनीं भोंसल्यांबरोबर झालेला करार जशाचा तसा पार पाडून देण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें भोंसल्यांच्या यादीवर बाजीरावानें मखलाशी करून दिली. नानांनीं निजामास चोवीस लाखांचा मुलूख परत देण्याचें व दीड कोट खंडणी माफ करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें निजामाच्या यादीवरही बाजीरावानें मखलाशी केली. शिंद्यांच्याबरोबर झालेल्या कराराप्रमाणें नानांनीं शिंद्यांना दहा लाखांची जहागीर व नगरचा किल्ला देण्याचें ठरवून त्या यादीवरही बाजीरावाची मखलाशी झाली. शिंद्यांना नानांनीं वीस लाख रुपये दिले होते. बाकीचे एक कोटी ऐंशी लक्ष रुपये मात्र देण्याचे बाकी राहिले होते. भोंसले व निजाम यांच्या देणग्या पदरांत पडल्याबरोबर ते आपापल्या फौजा बरोबर घेऊन आपापल्या मुलुखाकडे रवाना झाले. पण शिंद्यांची देणगी प्रत्यक्ष हातीं न पडल्यामुळें ते मात्र पुण्यास राहिले. नानांच्या काशीस जाण्याच्या यादींतील बाकीचीं कलमें प्रत्यक्ष नानांचीं स्वतःचीं व त्यांच्या लोकांतील इतर माणसांचीं असल्यामुळें तीं ताबडतोब अंमलांत आलीं असतील हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. या प्रसंगीं शिंदे हे नानांना प्रतिस्पर्धी आहेत असें वाटत होतें. म्हणूनच त्यांची देणगी त्यांच्या प्रत्यक्ष पदरांत पडण्याचें कामीं नाना त्यांना गोते देत होते. याप्रमाणें महाडच्या कारस्थानांतील करार पुरे करण्याचें काम जून १७९७ मध्यें आटोपलें.

प्रकरण ३४ वें.

बाजीरावांची लाचारी व नानांची गुन्हेगारी.

इ. स. १७९७.

१. बाजीराव पेशवे हे पेशवाईच्या सौभाग्यापुरतेच कसे होते ?—२ शिंद्यांच्या संरक्षणाखालीं बाजीराव शनिवारवाड्यांत येऊन राहतात.—३ नानाफडनविस अरब लोकांच्या संरक्षणाखालीं आपल्या वाड्यांत येऊन राहतात.—४ पेशव्यांच्या राज्यांत नाना व शिंदे हे तराजूची दोन पारडीं व बाजीराव हे तराजूचा कांटा याप्रमाणें कसे होते. सातारचे छत्रपती व बाजीराव पेशवे यांच्या परिस्थितीची तुलना.—५ नानांच्या हलक्या व अनुदार मनोधर्माचें एक लक्षण. —६ बाजीरावांचें दुसरें लग्न.—७ महाडच्या कारस्थानामुळें नानांचा अंशतः रिकामा झालेला खजीना ते प्रजाजनांवर निरनिराळ्या सात पट्ट्या बसवून भरून काढतात. संतोषपट्टीची नानांची अजब कल्पना.—८ बाजीराव पेशवे यांच्या कर्मठपणामुळें पेशव्यांचा खजीना कोरडा पडला व तो भरून काढण्याकरतां प्रजाजनांवर निष्कारण सात पट्ट्या बसविण्यांत आल्या, असा खरेशास्त्र्यांनीं बाजीरावांवर केलेला आरोप खोटा कसा आहे ?—९ खरेशास्त्र्यांनीं बाजीराव यांचेवर केलेला आरोप धादांत कसा खोटा आहे याचीं प्रमाणें.—१० दानधर्माच्या बाबतींत खरेशास्त्र्यांनीं बाजीरावांवर केलेला दुसरा आरोपही कसा खोटा आहे याचा पुरावा.—११ पुण्यांतील पेशवे सरकारच्या श्रावण महिन्याच्या दक्षिणेसंबंधींचा पूर्वेतिहास.—१२ माधवराव पेशव्यांपासून बाजीरावांपर्यंत श्रावण महिन्याच्या दक्षिणेसंबंधींची माहिती.—१३ श्रावण महिन्याच्या दक्षिणेचा व दक्षिणेस आलेल्या ब्राम्हणांचा मागील कांहीं वर्षांचा आढावा. इ. स. १७९७ च्या श्रावण महिन्याच्या दक्षिणेकरतां बाजीरावांनीं उधळपट्टी केली नाहीं याचें प्रमाण.—१४ इ. स. १७९७ मध्यें पुणें प्रांतांत भयंकर दुष्काळ पडला. टोळधाड आली. महागाई परमावधीस गेली. म्हणून श्रावण महिन्याच्या उत्सवास नेहमींपेक्षां जास्त ब्राम्हण आले. त्यामुळें श्रावण महिन्याच्या दक्षिणेस जास्त पैसा लागला. यासंबंधीं खरेशास्त्र्यांचा बाजीरावां-

वरील आरोप खोटा कसा आहे. बाजीरावांनीं पेशवेपदाचे अधिकारी म्हणून कर्तव्य कसें केलें ?—१५ शनिवारवाड्यांतील पांचही दरवाजांवर दक्षिणा कशी व कोण कोण वांटीत असत ? नानांचे हस्तक हे दक्षिणा वांटण्याचे कामांत होते. आबा शेलूकर व मोरोबादादा फडके या नानांच्या हस्तकांस बाजीरावांनीं दक्षिणा वांटण्याचे बाबतींत गुन्हेगार कसें ठरविलें ? नाना फडनविस नवकोट नारायण कोणत्या कारणांनीं बनले ? नानांची भिक्षुकवृत्ति.—१६ बाजीरावांवर खरेशास्त्र्यांनीं दांभिक कर्मठपणाचा केलेला दुसरा आरोप. तोही आरोप कसा खोटा आहे याचीं प्रमाणें.—१७ बाजीरावांवर खरेशास्त्र्यांनीं केलेले आरोप कसे खोटे आहेत याचें मोजमाप. संतोषपट्टीचा गळफांस कसा होता ?—१८ खुशालपट्टीमुळें बाजीराव पेशव्यांच्या कीर्तीचें नानांनीं केलेलें विडंबन.—१९ खरेशास्त्री यांस बाजीरावांच्या डोळ्यांतलें कुसळ दिसतें पण नानांच्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं.—२० नानांच्या वचनपालनत्वाची खरेशास्त्र्यांनीं मिरविलेली प्रौढी.—२१ नानांच्या बाबतींत खरेशास्त्र्यांनीं ' न वितथं परिहासकथास्वपि ' हें केलेलें विधान कसें हास्यास्पद आहे ?—२२ नाना मेणवलीस गर्भाधान विधि आटोपून घेण्याकरतांच खरोखरी जाणार होते कीं काय ?—२३ नाना फडनविस यांच्या नऊ स्त्रिया व त्यांची थोडी माहिती.—२४ नानांनीं गर्भाधान विधि आटोपून घेण्याकरतां मेणवलीस जाण्याची बाजीरावाकडे ज्या वेळीं परवानगी मागितली, त्या वेळीं नानांच्या जिवंत असलेल्या कोणत्याही स्त्रीस रजोदर्शन प्राप्त झालें नव्हतें, याचा पुरावा.—२५ नानांची वैषयिक सुखाची अभिरुचि कशी होती ? नाना नहाण न आलेल्या स्त्रीस पुण्यास आणून गर्भाधान विधि आटोपून घेतात.—२६ नाना विषपुत्र कसे होते ? नानांनीं आपल्या घरीं स्वस्त्रियांचा खाटिकखाना कसा उघडला होता ? नाना अंतःकरणशून्य कां ?—२७ थोडयाशा फरकानें आपला हेतू साध्य करून घेण्याचा हुकमी डाव या गर्भाधान विधि-प्रसंगींही नानांनीं कसा यशस्वी करून घेतला ?—२८ बाजीराव पेशव्यांचा कर्मठपणा दांभिक कसा नव्हता ? नानांच्या लक्ष भोजनाच्या नवसाचीं कारणें; त्याप्रीत्यर्थ दाखवावयाचा खर्च नानांच्या गर्भाधान विधिकरतां कसा होणार होता; नाना खरे कारकूनवच्चे कसे होते, यमैरेबद्दलचीं अनुमानें.

१. बाजीराव पेशव्यांच्या गादीवर बसले; नाना, शिंदे, भोंसले, निजाम वगैरे मोठमोठ्या मुत्सद्यांनीं, व स्वतंत्र राज्यकर्त्यांनीं त्यांना मोठ्या प्रयासानें पेशव्यांच्या गादीवर बसविलें; त्यांना छत्रपतींनीं आपली रीतसर मान्यता दिली; इतर स्वतंत्र राज्यकर्त्यांनीं व सरदारांनीं आपली अनुमति दिली व पेशव्यांच्या राज्यांतील प्रजाजनांनींही बाजीरावांना पेशवे म्हणून कबूल केलें. बाजीरावांनीं पेशवाईचीं वस्त्रें धारण करण्याचे वेळीं त्यांना कोणी पेशवेपदाला नालायक म्हणून संबोधिलें नाहीं किंवा त्या वेळीं तशी कोणी हरकतही घेतलेली नाहीं. नानांनीं बाजीरावांना गादीवर बसविण्यापूर्वीं त्यांच्याकडून ज्या गोष्टी कराररूपानें कबूल करून घेतल्या होत्या, त्यांतील मुख्य अट म्हणजे पेशव्यांचा कारभार नानांनीं करावा अशी होती. ही अट बाजीरावांस बंधनकारक असल्यामुळें ते गादीवर बसल्यानंतर नाना ज्या वेळीं कारभार करूं लागले त्या वेळीं त्यांच्या कारभाराला कायदेशीर महत्व येण्याकरतां बाजीरावांनीं 'मम' म्हणणें अगर नानांनीं आपल्या बुद्धिचातुर्यानें लिहून तयार केलेल्या कागदांवर सही शिक्का करणें, एवढेंच त्यांचें काम होतें. बाजीराव हे पेशवेपदावर आल्यानंतर त्यांच्या हातीं कांहीं विशेष अधिकार आला या समजुतीनें त्यांची भेट घेऊन आपलें काम करून घ्यावें, अशा कल्पनेनें त्यांच्या दर्शनाकरतां लोक येत असत. त्यावेळीं अशा लोकांपैकीं त्यांना आपल्या कांहीं कामाकरितां कोणी विनंति केली असतां "नानाकडे[१] जावें. आम्हांकडे काय आहे? जुन्नरास आम्ही आहों, ऐसेंच समजोन (गादीवर येण्यापूर्वी जुन्नरास जसे कैदेंत होतों त्याचप्रमाणें) नानांकडून जाबसाल करोन घ्यावे," असें उत्तर ते देत असत. यावरून आपला अधिकार पेशव्यांच्या गादीच्या सौभाग्यापुरताच आहे हें बाजीराव जाणत होते व त्याप्रमाणें ते वागतही होते असें दिसून येईल.

२. मनुष्याला जगांतील इतर कोणतेही व्यवहार जरी समजत नसले तरी आहार, निद्रा, भय आदिकरून सामान्य धर्मांचें ज्ञान त्याला उपजतच असतें. त्यामुळें आपणाला भय कोणापासून होईल हें बाजीराव पूर्णपणें जाणत होते.

---

१. ऐ. ले. सं. भाग १० वा. पान ५१९८, पत्र नं. ४०१०

सवाईमाधवराव यांचा ताजा इतिहास त्यांच्या डोळ्यांपुढें खेळत असल्यामुळें नाना आपल्या जिवाला केव्हां दगाफटका करतील याचा नेम नाहीं असें त्यांना वाटत होतें. यामुळें ते नानांना भीत असत. सवाईमाधवरावांना जसा महादजी शिंद्यांचा विश्वास उत्पन्न झाला, त्याचप्रमाणें आपलेंही रक्षण दौलतराव शिंदे करतील असा विश्वास स्वाभाविकपणें बाजीराव यांस वाटत होता. बाजीराव यांनीं कारभाराचा विषय जसा नानांवर सोंपविला, तसाच त्यांनीं आपल्या रक्षणाचा शिंद्यांवर सोंपविला होता व त्याप्रमाणें त्यांच्यामध्यें करारही झाले होते. सवाईमाधवरावांप्रमाणें बाजीराव आपल्या ताब्यांत असावे व ते शिंद्यांच्या रक्षणाखालीं नसावे असें नानांच्या मनास वाटत होतें. याकरतां त्यांनीं पहिल्यानें बाजीरावांस सांगून पाठविलें कीं, 'इतर[1] पेशव्यांप्रमाणें (तुम्हीं) बाजीरावांनींही आपल्या हुजरातीच्या फौजेंत येऊन रहावें आणि सर्व राज्यकारभार स्वतः पहावा.' परंतु बाजीराव यांना नानांचा विश्वास वाटला नाहीं. ते या बाबतींत बाजीरावांना जसा जसा जास्त आग्रह करूं लागले, तसा तसा बाजीराव यांना नानांचा जास्तच संशय येऊं लागला. नानांच्या मनांत आपणाला सवाईमाधवरावांप्रमाणें नजरकैदेंत ठेवावयाचें आहे असें त्यांना पुरतेपणीं समजलें. तेव्हां त्यांनीं आपल्या रक्षणाची व्यवस्था शनिवारवाड्यांत केली. त्यांनीं शनिवारवाड्यावरील नानांचे पूर्वींचे पहारेकरी काढून टाकविले व त्यांच्या जागीं शिंद्यांच्या कंपूंतले लोक नेमले. त्याचप्रमाणें वाडयांतील नानांची पूर्वींची वाकनीस वगैरे मंडळी काढून टाकण्यांत आली व त्यांचे जागीं बाजीरावांच्या विश्वासांतील मंडळींची भरती करण्यांत आली. आपाजी राम सहस्रबुद्धे यांस गारद्यांच्या रिसाल्याचें काम दिलें. सदाशिवपंत उगले यांजकडे वाडयांतील वाकनिशीचें काम सांगितलें. बाळाजीपंत पटवर्धन व गोविंदपंत गोडबोले यांस बाजीरावांनीं आपल्याजवळ कामगार मंडळींत ठेविलें. याप्रमाणें शनिवारवाडयांत बाजीराव यांच्या इच्छेनुरूप दौलतराव शिंद्यांनीं त्यांच्या संरक्षणाची योग्य व्यवस्था केली.

---

१. ना. च. पा. १९०.

३. आपल्या सांगण्याप्रमाणें आपल्या ताब्यांत बाजीराव न येतां ते शिंद्यांच्या संरक्षणाखालीं शनिवारवाड्यांत येऊन राहिले, यामुळें 'चोराच्या मनांत चांदणें' अशी नानांची स्थिति झाली. त्यांनाही आपल्या जीविताची धास्ती वाटूं लागली. नानांना पहिल्यानें स्वतःचें संरक्षण करून घ्यावयाचें होतें. घाशीराम कोतवालाचा वध झाल्यानंतर त्यांच्या विश्वासाचें असें कोणींच माणूस त्यांच्याजवळ उरलें नव्हतें. त्यांचा हिंदुलोकांवरील विश्वास कायमचा उडाला होता. या वेळीं त्यांच्या स्वतःच्या रक्षणाचाच त्यांच्यावर बांका प्रसंग आल्यामुळें, त्यांनीं आपल्या रक्षणाकरतां आपल्या वाड्या-भोंवतीं चार पांच हजार अरबांचा[१] पहारा बसविला. त्या वेळेस बुधवारांत नानांच्या वाड्यापासून चावडीपावेतों अरब छपरबंदी[२] करून राहिले. या वेळेपासून नानांनीं आपल्या रक्षणाची जबाबदारी हिंदूंना अपात्र ठरवून अरबांवर टाकली. याप्रमाणें त्यांनीं स्वतःच्या रक्षणाचा बंदोबस्त करून घेतला.

४. बाजीराव गादीवर बसल्यानंतर नानांनीं आपल्या हातीं कारभार घेण्याचेपूर्वी बाजीरावाकडून 'आपल्या जिवास व जिनगीस तिळमात्र धक्का लावणार नाहीं' असा एक करार लिहून घेतला होता; व त्याला पुष्टि येण्या-करतां शिंदे व निजाम यांच्याकडून 'बाजीरावसाहेबांस गादीवर बसवि-ण्यांत येईल आणि नाना फडनविस यांच्या हातीं राज्याचा सर्व कारभार राहील' असा दुसरा लेखी करार करून घेऊन त्यांचेकडूनही नानांनीं हमी घेतली होती. याशिवाय बाजीराव व शिंदे यांचेकडून नानांनीं दुसरे कोणतेच करार करून घेतले नव्हते. या करारांत बाजीराव यांनीं गादीवर बसल्यानंतर नानांच्या ताब्यांतच राहिलें पाहिजे असा कांहीं करार नव्हता. अथवा बाजी-राव यांना गादीवर बसविल्यानंतर शिंद्यांनीं त्यांच्या रक्षणाकरतां त्यांना मदत करूं नये असेंही ठरलें नव्हतें. यामुळें बाजीरावांनीं आपल्या अधिकार-मर्या-देंत नानांवर आपल्या राज्याच्या कारभाराचा भार सोंपविला व शिंद्यांवर

---

१. ना. च. पा. १९१. २. पे. ब. पा. १९२.

आपल्या रक्षणाचा भार टाकला. या स्वाभाविक घडून आलेल्या गोष्टीमुळें नाना, बाजीराव व शिंदे यांची तराजूप्रमाणें स्थिति झाली. कोणत्याही कामांत नानांचें पारडें जड झालें म्हणजे ते तराजूच्या दांडीबरोबर बाजीराव पेशव्यांचा कांटा, आपल्या बाजूस झुकवून घेत होते, आणि कोणत्या गोष्टींत शिंद्यांचें पारडें जर जड झालें तर ते बाजीरावांचा कांटा आपल्या बाजूस खेंचून घेत होते. याप्रमाणें बाजीरावांना पेशव्यांच्या गादीवर बसविल्यानंतर पेशव्यांच्या राज्याच्या तराजूचीं नाना व शिंदे हीं दोन पारडीं व बाजीराव हे तराजूचा कांटा अशी स्थिति प्राप्त झाली. पेशव्यांनीं रामराजांकडून छत्रपतीपदाचा राजीनामा घेतल्यानंतर जशी त्यांची अवस्था झाली, तीच या वेळीं बाजीराव यांची झाली. नारायणराव पेशव्यांच्या वधानंतर राघोबादादा पेशव्यांचीं वस्त्रें मागण्याकरतां आले, त्या वेळीं त्यांना छत्रपतींनीं वस्त्रें दिलीं. राघोबादादांना पदच्यूत करून बारभाईंनीं गंगाबाईच्या नांवानें वस्त्रें मागितलीं त्यालाही छत्रपती कबूल झाले. गंगाबाईला सवाईमाधवराव हा मुलगा झाला त्यालाही चाळीसावें दिवशीं वस्त्रें द्यावयास छत्रपती तयारच झाले. यशोदाबाईच्या मांडीवर शास्त्रसंमत नसतां चिमाजीआपाला दत्तक देऊन गादीवर बसविलें तेव्हां त्याचे नांवानेंही छत्रपतींनीं पेशव्यांचीं वस्त्रें दिलीं. एकंदरींत स्वतःचें वजन नष्ट झालें म्हणजे ज्या पारड्याचें वजन जास्त होईल तिकडेच झुकावें लागतें, ही झालेली छत्रपतींची स्थिति या वेळीं बाजीराव अनुभवीत होते. नाना व शिंदे यांच्यामधील स्पर्धा, राज्यकारणें व राजकारभार यांची जशीं जशीं आंदोलनें होणार होतीं, तसा तसा बाजीरावांचा कांटा हेलकावे खाणार होता, हें ठरल्याप्रमाणेंच होतें.

५. परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं नानांचा वाडा ज्या वेळीं जप्त केला त्यावेळीं त्यांत सुमारें तीस चाळीस लाखांचें कापड सांपडलें होतें. तें परशुरामभाऊंनीं दसऱ्याचे दिवशीं आपल्या फौजेंतील लोकांना सालाबाद-

प्रमाणें वांटलें होतें, हें बत्तिसाव्या प्रकरणांत आलेंच आहे. या वेळीं नाना पुन्हां कारभारांत आले असें पाहून परशुरामभाऊंच्या फौजेंतील लोक भयभीत झाले आणि त्यांनीं आपणास मिळालेल्या कपड्यांच्या घड्या पूर्ववत् घालून त्या नानांच्या जामदारखान्यांत परत केल्या. फौजेंतील लोकांनीं कांहीं दिवस वापरलेलीं तीं वस्त्रें पुन्हां घड्या करून जरी परत केलीं, तरी तीं नानांनीं मोठया संतोषानें परत घेतलीं. इनाम दिलेलीं वस्त्रेंही नानांनीं परत घेतलीं, यांतच नानांचा मनोधर्म स्पष्ट दिसण्यासारखा आहे. दिलेलें वस्त्रदान परत घेणें हें सामान्य मनोवृत्तीच्या मनुष्याचें लक्षण खास नाहीं. . त्याला असामान्य व्यक्तीच असावी लागते ! नानांच्या जागीं जर दुसरा एकादा राघोबादादांप्रमाणें थोर मनाचा इसम असतां, तर त्यानें तीं परत केलेलीं वस्त्रें पुन्हां त्यांनाच बक्षिस देऊन त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांचा खाबीनें गौरव केला असता. परंतु या वेळीं नानांना ही सद्बुद्धि होण्याचें कारण नव्हतें. सध्यां ते अरबलोकांच्या संरक्षणाखालीं होते. हिंदु लोकांना वस्त्रें-भूषणें देण्यापेक्षां अरबांना त्याच वस्त्रभूषणांनीं संतोषविल्यास तेच नानांच्या संरक्षणाच्या उपयोगी पडणार होते.

६. पूर्वीं जुन्नर मुक्कामीं बाजीराव कैदेंत असतांना धोंडोपंत मंडलिक यांच्या कन्येशीं त्यांचें पहिलें लग्न झालें होतें. परंतु त्यांची ती बायको बाजीराव यांस पुण्यास आणल्यानंतर निवर्तली. सबब दुसरें लग्न करणें प्राप्त झाल्यामुळें, बाजीराव यांनीं नानांस वडीलपणा देऊन, वधूची योजना करण्याविषयीं सांगितलें. नानांनीं नवऱ्या पहाण्याकरतां पालख्या व कारकून कोंकणांत पाठविले व तिकडून आलेल्या मुलींपैकीं दोन मुलीं पसंत करून त्या श्रीमंतांकडे पहावयास पाठविल्या;परंतु तितक्यांत हरिपंततात्यांचे चिरंजीव दाजीबा फडके यांनीं आपली कन्या बाजीराव यांस दाखविल्यामुळें त्यांनीं तीच वधू निश्चित केली. हें लग्न ता. १७ फेब्रुवारी सन १७९७ रोजीं पुण्यास शनिवारवाड्यांत झालें. हें लग्न नाना व शिंदे यांच्या समश्रम विभागानें पार पडलें.

७. मागील प्रकरणांत सांगितलेप्रमाणें नानांनीं बाजीरावांच्या मखलाशी-करतां काशीस जाण्याच्या निरवानिरवीची आपली यादी जी पुढें आणली त्यांतील ६ व्या कलमामध्यें महाडच्या कारस्थानांत झालेला आपला सर्व खर्च नानांनीं मंजूर करून घेतला होता. हा खर्च मंजूर झाला खरा, परंतु तो वसूल कशावर करून घ्यावा हा प्रश्न नानांचे पुढें होताच. नाना हे निर्ढावलेले मुत्सद्दी असलेमुळें प्रजाजनांवर नवीन निरनिराळे कर बसवून त्यांनीं पैसा उकळण्यास सुरवात केली. नानांनीं लोकांवर बसविलेल्या पट्ट्या पुढीलप्रमाणें होत्या. १ कर्जपट्टी २ सरंजाम पट्टी ३ वेतन पट्टी ४ सावकार पट्टी ५ उंबरे पट्टी ६ भाडे पट्टी ७ संतोष पट्टी. अशा सात प्रकारच्या पट्ट्या नानांनीं बसविल्या. या वेळीं नानांस आपल्या स्वतःच्या खजिन्यांतून महाडच्या कारस्थानाकरतां खर्च झालेले पैसे कोणत्याही तऱ्हेनें वसूल करावयाचे होते. म्हणून नानांच्या कारभारांतील पहिला आत्मीय भावनेचा कारभार म्हणजे पैसावसूली हा होता. अर्थात् त्यांच्या बुद्धिमत्तेला अनुसरून पैसे वसूलीकरितां ही सात प्रकारची पट्टी अस्तित्वांत आली. या पट्ट्यांना अर्थात् संमति देणें अगर न देणें, बाजीरावांच्या हातीं नव्हतें. पण पट्ट्यावसूलीचे हुकूम मात्र बाजीरावांच्या आज्ञेखाली रीतसर निघत होते. या पट्ट्यांच्या जात्यांत एकजात सर्व प्रजाजन भरडले जात होते व त्यामुळें बाजीरावाविषयीं एकजात असंतोष सर्वांत उत्पन्न झाला होता. नाना मात्र बाजीरावांस तोंडाशीं देऊन या नवीन पट्ट्यामुळें आपला अंशतः रिकामा झालेला खजिना भरून काढीत होते. या पट्ट्यांतील शेवटची संतोष पट्टी याची कल्पना मात्र मोठी मार्मिक व सर्वव्यापी अशी होती. श्रीमंत बाजीराव हे गादीवर बसले म्हणून सर्वांस संतोष झाला असला पाहिजे असें गृहीत धरूनच सर्वांवर ही संतोष पट्टी बसविण्यांत आली होती. इतर सहा पट्ट्या ज्या बसविल्या गेल्या होत्या त्यांना स्थावर अगर जंगम मिळकतीची जरूरी होती, परंतु या संतोष पट्टीला मात्र कशाचेंच बूड नव्हतें. श्रीमंतापासून गरीबापर्यंत पेशव्यांच्या राज्यांतील कोणत्याही धर्माच्या इसमावर ही संतोष पट्टी जारी करतां येण्यासारखी होती.

एकंदरींत नानांनीं स्वतःच्या कल्पनेप्रमाणें व स्वतःच्या कारभाराच्या अनुरोधानें आपलें मड्डाडचें कारस्थान आपल्या कडोसरीस खार न लावूं देतां व त्याचें सर्व खापर पेशवे सरकाराच्या माथीं मारून पार पाडलें. या नानांच्या कृत्यावर पांघरूण घालण्याचा नानांचे चरित्रकार प्रयत्न करतात, परंतु तो कसा निष्फळ आहे हें पुढील माहितीवरून दिसून येईल.

८. खरेशास्त्रयांनीं नाना फडनविसांचें जें चरित्र लिहिलें आहे त्यांत ते असें लिहितात[१] कीं, 'धार्मिक कर्मठपणा मिरविण्याचीही त्यांना (बाजीरावांस) मोठी हौस होती. ते स्वतः मोठमोठीं अनुष्ठानें करीत आणि त्या प्रीत्यर्थ ब्राम्हणांचीं लक्ष भोजनें घालीत! सन १७९७ सालच्या श्रावण मासच्या दक्षिणेंत तर मोहरा, पुतळ्या, मोतीं, पाच व माणकें अशी पंचमेळ खिचडी करून तिची खैरात श्रीमंतांनीं ओंजळी भरभरून ब्राम्हणांस वांटली! या भरमसाट वागणुकीमुळें श्रीमंतांचा खजीना अर्थात् लवकरच रिकामा पडला. परंतु या गोष्टीची त्यांना कांहींच फिकीर वाटली नाहीं. पैशाची नड दूर करण्याकरतां त्यांनीं आतां पुण्यांत पट्टयांची झोड उठविली.' याप्रमाणें बाजीराव पेशव्यांवर खरेशास्त्री यांनीं पट्टयांची झोड उठविल्याबद्दल उघड उघड असे दोन आरोप केले आहेत. पेशव्यांनीं (१) मोठमोठीं अनुष्ठानें करून लक्ष ब्राम्हणभोजनें घातलीं. (२) श्रावणमासांत पंचमेळ खिचडी ओंजळी भरभरून ब्राम्हणांस खैरात वांटली. या दोन कारणांनीं पेशवेसरकाराचा खजीना कोरडा पडला व तो भरून काढण्याकरतां वरील सात पट्टया बाजीरावांनीं लोकांवर लादून त्यांना पिळून काढलें. खरेशास्त्री यांची हीं दोन विधानें पुराव्याला कितपत टिकतात हें पहाणें येथें जरूर आहे. श्रावण महिन्याच्या वगैरे भरमसाट खर्चानें पेशवे सरकाराचा खजीना कोरडा पडला म्हणून प्रजेवर सात प्रकारच्या पट्टया बसविण्यांत आल्या हें खरेशास्त्री यांचें विधान मूलतःच खोटें आहे. इ. स. १७९७ मधील श्रावण महिना ता. २५ जुलैपासून सुरू

---

१. ना. फ. च. पा. १९८.

होत होता व तो ता. २२ आगष्ट रोजीं संपत होता. अर्थात् त्या वेळीं ह्मणजे आगष्ट महिन्याच्या अखेरीस पेशवे सरकारचा खजीना कोरडा पडला व व त्या नंतर सात प्रकारच्या पट्टया प्रजेवर बसवून त्या वसूल करण्यांत आल्या असें खरेशास्त्री यांचें स्पष्ट विधान आहे. परंतु खरेशास्त्रयांच्या दुर्दैवानें वरील सात पट्टया सन १७९७ च्या आगष्ट महिन्यानंतर बसवून त्या वसूल केल्या गेल्या नाहींत. या पट्टया सन १७९७ च्या मार्च महिन्यापासून एप्रिलअखेरपर्यंतच वसूल करून घेण्यांत आल्या आहेत. त्यासंबंधींचा पुरावा खालीं दिला आहे.

९. खरेशास्त्री यांनीं ऐतिहासिक लेखसंग्रह प्रसिद्ध केले आहेत. त्यांतील भाग दहावा यांतील हे उतारे आहेत. (१) पान नं. ५११०, पत्र नं. ३९३३, तारीख १८ मार्च १७९७ इ. चें. यामध्यें........दुकानें बंद करावयाचें कारण पट्टयांचा तगादा चालला आहे भारी. ह्मणोन बंद केलीं आहेत........(२) पान नं. ५१११, पत्र नं. ३९३४, तारीख २० मार्च सन १७९७ चें यामध्यें........भाडेपट्टीचा तगादा सरकारांतून लाविला........ (३) पान नं. ५१२०, पत्र नं. ३९४५, तारीख ४ एप्रिल १७९७ चें. यामध्यें........सावकारपट्टीसाठीं भिड्यांचे घरीं आज दोन रोज आरबांची निकड जाहली आहे ती कोठवर लिहावी! (४) पान ५१३३, पत्र नं. ३९५९, तारीख २३ एप्रिल स. १७९७ चें. यामध्यें........सरकार खुशाल-पट्टी मागतात कीं श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब यांस वस्त्रें जाहलीं. त्याची खुशालपट्टी देणें ह्मणून सांगतात. आणि कोणीकडून तरी सावकार हलके व्हावे ह्या सरकारच्या व कारभाऱ्यांच्या बुद्धि आहेत!........(५) पान ५१३५, पत्र नं. ३९६१, तारीख २८ एप्रिल सन १७९७ इ. चें. यामध्यें........गावांत संतोषपट्टीचा मोठा कडाड जाहला आहे. बेमुरवत पैका घेतात. कालदेश वर्तमान पट्टीचा वगैरे सुमार पाहून गोरगरीब मातबरही त्यांणीं देखील कुटुंबाची रवानगी करून कोंकणांत पाठवूं लागले........ याप्रमाणें खरेशास्त्री ह्मणत असलेल्या भाडेपट्टया, सावकारपट्टया, संतोषपट्टया

वगैरे सात पट्ट्या सन १७९७ च्या मार्च एप्रिल महिन्यांतच वसूल करण्यांत आल्या आहेत; आणि खरेशास्त्रयांच्या विशेष दुर्दैवाची गोष्ट ह्मणजे हे पुरावे त्यांनींच छापलेल्या ऐतिहासिक लेख संग्रहांतील आहेत. तेव्हां त्यांना ते माहीत नव्हते असें ह्मणतांच येणार नाहीं. एकंदरींत श्रावण महिन्यांतील बाजीरावांचा भरमसाट खर्च भरून काढण्याकरतां, निरनिराळ्या पट्ट्या बसविण्यांत आल्या, हें खरेशास्त्री यांचें विधान धादांत खोटें आहे असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें.

१०. या वर्षाच्या श्रावण मासाचा खर्च भरमसाट होता हें दाखविण्याकरतां ' श्रावणमासाच्या दक्षिणेंत तर मोहरा, पुतळ्या, मोतीं, पाच व माणकें अशी पंचभेळ खिचडी करून तिची खैरात श्रीमंतांनीं ओंजळी भरभरून ब्राह्मणांस वांटली ! ' असें खोटें विधान करून वाचकांची दिशाभूल केली आहे. ओंजळी भरभरून पंचभेळ खिचडी जर खरोखर वांटली असती तर बाजीराव यांस अब्जावधीही रुपये पुरले नसते. या बाबतींत वस्तुस्थितिनिदर्शक माहिती पुढीलप्रमाणें आहे. ' श्रावणमासचा [1] समारंभ रमण्यांत चांगला जाहला. श्रीमंतांनीं आपले हातीं ब्राह्मणांस दक्षिणा फार दिली ! दोनशें, चारशें हजार बाराशें चवदाशें दोन हजारपर्यंत दिली. ब्राह्मण चांगला, वगभारी, त्यांस फार दिली. ज्यांस वग नाहीं (पण) ब्राह्मण चांगला त्यास चाळीस, पंचवीस तीस पन्नास शंभर दोनशेंपर्यंत दिली. वरकड दरवाजांवर तीन, चार, पांच वैदिकांस सात, आठ, दहापर्यंत जाहली. (आजपर्यंत) पांचवा दरवाजा श्रीमंत कैलासवासी दादासाहेब यांचा होता. तो चालत नव्हता. हल्लीं यंदा चालता केला. श्रीमंत सायंकाळीं त्याच दरवाजावर बसून मोहरा, होन, पुतळ्या, रुपये, मोतीं वगैरे मिळून खिचडी, करून वांटली ! दैवानुसार कोणास मोहोर, कोणास दोन मोहरा तीन मोहरा, येगेंप्रमाणें आल्या. ' खरेशास्त्रयांनींच प्रसिद्ध केलेल्या या पत्राचे उताऱ्यावरून पहातां बाजीरावांनीं ब्राह्मणांस ओंजळी भरभरून पंचभेळ खिचडी दिली नाहीं, तर प्रत्येकास त्याचे प्राक्तनानुसार एक, दोन अगर तीन मोहरापर्यंत ऐवज मिळाला हें स्पष्ट होतें.

१. ऐ. ले. सं. पान ५२२४ पत्र नं. ४०३९.

११. पुण्यास श्रावण महिन्याचा उत्सव प्रतिवर्षी कुळाचाराप्रमाणें साजरा होण्यास श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्यापासून सुरवात झाली होती. नानासाहेबांनीं ' पर्वतीच्या खालील मैदानांत पुढें श्रावणमास दक्षिणा देण्यासाठीं एक तटबंदी रमणा तयार केला. दक्षिणेचे सर्व ब्राम्हण—कित्येक हजार असत ते—या ठिकाणीं दोन दिवस आधीं कोंडीत असत. नंतर एका एकास बाहेर काढून दरवाजावर दक्षिणा देत. येणेंकरून एकाच ब्राह्मणास दोनदां दक्षिणा उपटण्यास सांपडणें अशक्य होई. नानासाहेबांच्या कारकीर्दीत दक्षिणेची रक्कम सालिना अठरा लक्षांइतकी वाढली. तत्कालीन समजुतीप्रमाणें हें विद्येस उत्तेजन असें समजलें जात असे. दक्षिणेसाठीं हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणांहून ब्राह्मण येत असल्यामुळें पेशव्यांची कीर्ति आसेतुहिमाचल पसरली.'[१] यावरून नानासाहेब पेशवे यांच्या कारकीर्दींत श्रावणमासाची दक्षिणा अठरा लक्ष रुपयेपर्यंत गेली होती हें दिसून येईल.

१२. पुढें माधवराव पेशव्यांची कारकीर्द विशेष धामधुमीची गेल्यामुळें ही श्रावण महिन्याची दक्षिणा शनिवारवाड्यांत वांटण्यास सुरवात झाली. त्या वेळीं शनिवारवाड्याचे पांच दरवाजे ब्राम्हणांस दक्षिणा देण्याचे उपयोगीं आणण्यांत येत होते. परंतु पुढें ज्या दरवाजावर राघोबादादा दक्षिणा वांटीत असत, तो दरवाजा, राघोबादादांस बारभाईंनीं पदच्यूत केल्यानंतर चिणून बंद करण्यांत आला होता. बाजीराव गादीवर बसल्यानंतर त्यांनीं तो चालू श्रावण महिन्यांत पुन्हां सुरू केला व त्याच दरवाजावर स्वतः बसून श्रावण माहिन्याची दक्षिणा त्यांनीं ब्राम्हणांस दिली. यावरून बाजीरावांची आपल्या वडिलांचे ठिकाणीं केवढी भक्ति होती हें दिसून येतें.

१३. सवाईमाधवराव यांचे कारकीर्दींत इ. स. १७९१ च्या श्रावण महिन्यांत दक्षिणेकरतां ब्राम्हण ३५१५८ जमले होते. त्यांस नव्याणव हजार (९९,०००) रुपये दक्षिणा वांटण्यांत आली. त्याचप्रमाणें इ. सन १७९३ च्या श्रावण महिन्यांत ३२,२३१ ब्राम्हण जमले होते. त्यांस

१. नानासाहेब पेशवे यांचें चरित्र. सरदेसाईकृत पा. २१८.

१,१३,२८१ रुपये दक्षिणा वांटण्यांत आली. इ. स. १७९६ च्या श्रावण महिन्यांत ३६२१२ ब्राम्हण जमले होते, व त्यांस[1] १,४०,१४३ रुपये दक्षिणा देण्यांत आली. चालू श्रावण महिन्यांत ४९,९६६ ब्राम्हण जमले होते व त्यांस २,९२,२८५॥ रुपये दक्षिणा वांटण्यांत आली. यावरून नानासाहेब पेशव्यांच्यावेळीं जी श्रावणमासाची दक्षिणा अठरा लक्षांपर्यंत गेली होती ती कमी कमी होतां होतां बाजीरावांच्या कारकीर्दीपर्यंत सुमारें तीन लक्ष रुपयेपर्यंत येऊन पोंचली होती. इ. स. १७९६ च्या श्रावण महिन्यापेक्षां इ. स. १७९७ च्या श्रावण महिन्यास १३,७५४ ब्राम्हण जास्त कां आले व १,५२,१४२॥ रुपये जास्त खर्च कां झाले याचीं कारणें स्वतंत्र आहेत. या जास्ती येणाऱ्या ब्राम्हणांस बाजीराव स्वतः बोलावावयास गेले नव्हते. ब्राम्हण एकदां जमल्यानंतर त्यांच्याविषयीं पंक्तिप्रपंच अगर भेदभाव दाखविण्याची पेशवे घराण्यांत चाल नव्हती. ब्राम्हणांना विन्मुख पाठविण्याचेंही कृत्य त्यांचे घराण्यांत घडलें नव्हतें. अशा स्थितींत इ. स. १७९७ मध्यें जास्त ब्राम्हण जमले तेव्हां त्यांची सर्वांची संभावना करणें हें बाजीरावांचें कर्तव्य पेशवे घराण्याला अनुलक्षूनच होतें.

१४. इ. स. १७९७ सालच्या श्रावण महिन्याच्या दक्षिणेकरतां सुमारें चौदा हजार जास्ती ब्राम्हण जमण्याचें एक विशेष कारण घडून आलें. हें मुख्य कारण ह्मणजे त्या वर्षीं पुणें व त्या सभोंवारच्या प्रदेशांत भयंकर दुष्काळ पडला होता. त्या दुष्काळाचें स्वरूप किती भयंकर होतें हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल. तारीख २० मेपासून 'पुणें गांवांमध्यें तांबडे टोळ दोन तीन रोज आले. काल भारी होते. [2] कौलांवर बसले तेथें मिरच्या वाळत घातल्यासारखें दिसे. कौल खालीं दिसें नये याजप्रमाणें बसले. झाडेंही कोठें कोठें गांवांतील खाल्लीं. टोळ आले सबब सरकारांत शांत करणार आहेत. रोहिणी नक्षत्राचे पांच रोज जाले. अद्याप पर्जन्याचा कांही

---

१ ऐ. ले. सं. पा. ५२२१, पत्र नं. ४०३४. २ ऐ. ले. सं पा. ५१४४ पत्र नं. ३९७३ तारीख २४ मे.

सुमार दिसत नाहीं. अभ्रेंही येत नाहींत. नदीचें पाणी सरलें. आंत विहिरे लोकांनीं खणले आहेत. संगमाचें पाणी लोक आणितात. नळास पाणी कार्याकारण माफकच आहे.' याप्रमाणें टोळधाड आली व पाण्याचाही दुष्काळ पुण्यास मे महिन्यांत भासूं लागला होता. पुणें 'शहराभोंवतीं लष्करें जमलीं होतीं. त्या आगंतुक माणसांची संख्या निदान दोन लक्षपर्यंत असावी. आणि निरनिराळ्या लष्कराचीं गुरें व घोडीं मिळून संख्या त्या संख्येच्या एकतृतीयांश तरी निदान खचित असेल. इतक्या प्राण्यांचें पोट चालवितां चालवितां पुण्याभोंवतालचा प्रदेश उजाड होत चालला होता. खुद्द पुण्यांत दाणावैरणीची टंचाई पराकाष्ठेची भासत होती. एक वेळीं चांगल्या कडब्याची धारण रुपयास पंधरा पेंढ्या झाली होती. जळाऊ लाकडाचा दर सतरा अठरा रुपयांनीं खंडी होता. जोरी रुपयास सव्वादोन पायली मापटें. हरभरे सव्वादोन पायली तीन चिपटीं; बाजरी सव्वादोन पायली, तुरीची डाळ पावणे दोन पायली, हरभऱ्याची डाळ दीड पायली, तांदूळ आंबेमोहोर सव्वापायली मापटें, काळे साळींचे पावणेदोन पायली, तूप रुपयास सव्वाशेर,'[1] याप्रमाणें धारणी पुण्यास तारीख २० जूनला ह्मणजे ज्येष्ठ वद्य ११ ला होत्या. या धारणी त्या-वेळीं भयंकर महागाईच्या मानल्या जात होत्या. या महागाईचा परिणाम गरीब ब्राह्मणांवर झाल्यामुळें श्रावण महिन्यांत पुण्यास पोटाला अन्न मिळून दोन पैसे दक्षिणा मिळेल म्हणून दुष्काळाच्या फेऱ्यांत सांपडलेले बरेच ब्राम्हण या वर्षी श्रावणांत पुण्यास गोळा झाले होते. व त्या सर्वांस भोजन आणि दक्षिणा देणें बाजीराव यांचें कर्तव्य होतें व त्यांनीं तें बजावलें आहे. यावरून श्रावण महिन्याचा अवास्तव खर्च बाजीराव यांनीं केला असा जो आरोप खरेशास्त्री यांनीं त्यांचेवर लादला आहे तो किती खोटा व आधार-शून्य आहे हें दिसून येईल. श्रावणमासाचा खर्च हा बाजीराव या व्यक्तीचा नसून तो पेशवेसरकारचा पूर्वापार चालत आलेला खर्च आहे, हें खरेशास्त्री बाजीरावांवर टीका करण्याचे भरांत विसरले हें उघड होतें.

---

१. ऐ. ले. सं. पा. १०६२-६३.

१५. या वर्षी दुष्काळ पडल्यामुळें श्रावणमासाच्या दक्षिणेकरतां ब्राम्हण जास्त आले व त्यामुळें जास्त खर्च झाला हें जसें एक कारण आहे, तसेंच दुसरें एक महत्वाचें कारण घडून आलें होतें. शनिवारवाड्यांत श्रावणमासानिमित्त ब्राम्हणांना जी दक्षिणा वांटली जाई, त्याबद्दल ब्राम्हणांकडून पावत्या वगैरे घेण्याची प्रथा त्या वेळीं नव्हती. शनिवारवाड्याच्या प्रत्येक दरवाजावर दक्षिणा वांटण्याकरतां पूर्ण विश्वासाचे असे मोठमोठे अधिकारी नेमले जात व तेही दक्षिणा आपल्या हातांनीं ब्राम्हणांस देत असत. प्रत्येक दरवाजावर खजिन्यांतून रुपयांचे बदरे मोजून येत असत व दक्षिणा देणेंचें काम संपलें ह्मणजे प्रत्येक दरवाजावर किती दक्षिणा दिली, याचा हिशेब होत असे. कोणत्या दरवाजावर कोणाची नेमणूक झाली, हें पूर्वीच ठरत असल्यानें दाक्षिणा देण्याचे बाबतींत घालमेल करणाऱ्या इसमास चांगलीच संधि मिळून पैशाची वाटेल तेवढी अफरातफर होण्याचा फार मोठा संभव होता; ह्मणून पूर्ण विश्वासाचींच माणसें या पवित्र दानकार्याकरतां नेमलीं जात. राघोबादादांची बारभाईंनीं हाकलपट्टी केल्यापासून, व नाना पूर्णत्वानें कारभार पाहूं लागल्यापासून, नानांच्या विश्वासांतील माणसें हें दक्षिणा देण्याचें काम करीत असत. या वर्षी शनिवारवाड्याचे पांचही दरवाजे दक्षिणा देण्याचें कामीं उघडे होते. प्रत्येक दरवाजावर पांच पांच इसम दक्षिणा देण्याकरतां नेमण्यांत आले होते. चवथ्या दरवाजावर हरिपंत फडक्यांचे तिघे मुलगे व भटांकडील दोघे असे पांच इसम होते. त्या दरवाजावर तेरा हजार ब्राम्हण आले व त्यांस सत्तावन हजार सहाशें त्रेसष्ट (५७६६३) रुपये दक्षिणा देण्यांत आली. पांचव्या दरवाजावर शेळूकर बंधु दोघे, गोविंदराव काळे, वैजनाथभट भागवत व सायंकाळीं स्वतः बाजीराव असे होते. या दरवाजावर ५४५० ब्राम्हण आले व त्यांस ५९७०२॥ इतकी दक्षिणा देण्यांत आली.[1] या दक्षिणा देण्याच्या बाबतींत बाजीराव यांचे नजरेला दोन गुन्हेगार आले. त्यांच्यावर बाजीरावांनीं ‘ आपल्या निसबतीच्या ब्राम्हणांस भारी दक्षणा दिली ’ असा आरोप

१ ऐ. ले. सं. भाग १० वा, पान ५२२२ व ५२२५.

ठेवला होता. हे दोघे इसम ह्मणजे आबा शेलूकर व मोरोबादादा फडके हे होते. आबा शेलूकर हे नानांच्या पक्षाला आत्मसात् झालेले त्यांचे परम मित्र होते. महाडच्या कारस्थानांत त्यांनीं नानांना सोबत देऊन तनमनधनेंकरून मदत केल्यामुळें बाजीरावांकडून पांचशें स्वारांचा सरंजाम नानांनीं आबा शेलूकर यांना सरकारांतून देवविला होवा. शिवाय त्यांचेकडे वसईचा सरसुभा व रायगड किल्ला आणि अहमदाबादचा सुभा व पागा सरकारांतून होती. ही सर्व देणगी एकनिष्ठपणें पेशव्यांच्या गादीची पुढें त्यांनीं सेवा करावी ह्मणून नानांनीं बाजीरावांकडून त्यांना कायम करून देवविली होती. त्याचप्रमाणें हरिपंत फडके यांच्या पुत्रांचें पूर्ववत् चालविण्याचेंही बाजीरावांकडून मखलाशी करून घेऊन नानांनीं कायम करून घेतलें होतें.[१] यावरून शेलूकर व फडके हे नानांच्या अगदीं विश्वासांतले, त्यांना सामील असलेले होते, हें निराळें सांगणेची जरूरी नाहीं. याच नानांच्या पक्षांतील व विश्वासांतील दोघां इसमांवर बाजीराव गुन्हेगारी लादतात, यावरून नानांच्या पक्षांतील लोक कशा वर्तनाचे व कशा शीलाचे होते हें निराळें सांगणेची जरूरी नाहीं. ' आबा शेलूकर व मोरोबादादा फडके यांनीं आपले निसबतीचे ब्राम्हणांस भारी दक्षणा दिली, सबब पन्नास हजार रुपये दर असामीस (श्रीमंत) मागतात.[२] ' याप्रमाणें नानांच्या साथीदारांचें पाप चव्हाट्यावर येऊन बाजीरावांनीं त्यांचेवर पन्नास पन्नास हजार रुपयांच्या दंडाचीं गुन्हेगारी लादली. ' यावरून नानांच्या पक्षांतील लोकांचें वैशिष्ठ्य कशांत होतें, हें दिसून येतें. श्रावणमासाच्या दक्षिणेवर नानांचा पूर्वीपासून डोळा होता. घाशीराम प्रकरणीं दाखविल्याप्रमाणें ब्राम्हणांस दिलेली दक्षिणा हरप्रयत्नानें ब्राम्हणांचे अमानुष वध करूनही लुबाडून घ्यावी अशी परवानगी नानांकडून घाशीरामाला होती असें दिसतें. ब्राम्हणांच्या दक्षिणेवर

१. ना. फ. यांचें खरेकृत चरित्र पान १९४. २. ऐ. ले. सं. भाग १० वा पान ५२३१.

नानांची एवढी वक्र दृष्टि कां होती याचें कारण पाहूं जातां नाना हेही एक भिक्षुक ब्राम्हण होते. तोतयाच्या बंडांतही नानांनीं असंख्य ब्राम्हण-भिक्षुकांची चामडी लोळविली होती. ' भिक्षुको भिक्षुकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते ' या म्हणीप्रमाणें नाना इतर ब्राम्हणांवर गुर्गुरत होते असें दिसतें. श्रावण मासाच्या दक्षिणेचा खर्च सरकारी खजिन्यांत खर्ची पडून तो पैसा नानांच्या स्वतःच्या खजिन्यांत जर भरला गेला असतां तर त्यामुळें नानांना आनंद झाला असता. परंतु त्याला पेशवे अनुकूल नसल्यामुळें नानांना हा वाममार्ग धरावा लागला होता. सरकारी खजीना नानांच्या ताब्यांत होता. नानांच्याकडून दक्षिणेकरतां शनिवारवाड्यांत रक्कम येत होती. दरवाजावर दक्षिणा देणारे नानांचेच साथीदार लोक होते. एकंदरींत नाना दाखवितील तो खर्च पेशवे सरकारच्या खजिन्यांत खर्च पडत होता. प्रत्यक्ष दक्षिणेकरतां किती रुपये खर्च होत होते व त्यांत नानांची व त्यांच्या साथीदारांची किती दलाली होती, हें नानांना व परमेश्वरालाच माहीत ! तें गूढ इतरांना सुटण्यासारखें नाहीं. श्रावणमासाच्या दक्षिणेची जास्तींत जास्त रक्कम आपल्यासारख्या पवित्र ब्राम्हणाच्या पदरांत पाडून घेण्याइतकें कुटिल कारस्थानी डोकें परमेश्वरानें नानांना दिलेंच होतें. याच कारस्थानामुळें नाना नवकोट नारायण बनले होते. श्रावण मासाच्या दक्षिणेमुळें नानांचे तीन मुख्य हेतु साधले जात होते. (१) आपला स्वतःचा खजीना मनमुराद भरावयाला त्यांना सुवर्ण संधि मिळत होती. (२) श्रावणमासाच्या दक्षिणेकरतां पेशवे भरमसाट पैसा खर्च करून खजिना रिकामा करतात अशी आरडा ओरड करून पेशव्यांबद्दल सरदार लोकांत व इतर प्रजाजनांत नानांना वैषम्य उत्पन्न करवितां येत होतें. (३) आपल्या लगामीं असलेल्या ब्राह्मणांचीं घरें भरून त्यांना उपकृत करितां येत होतें. एकंदरींत श्रावण महिन्याच्या दक्षिणेमुळें नाना आपला सर्व बाजूंनीं फायदा करून घेत होते, पण गादीवरील पेशवे हे त्या वेळेच्या लोकांच्या व पुढील इतिहासकारांच्या निंदेला पात्र ठरत होते एवढीमात्र गोष्ट सत्य आहे.

या वर्षी ब्राम्हणांना श्रावणमासाची दक्षिणा भरमसाट देऊन पेशव्यांचा खजीना रिकामा केल्याबद्दलच्या दोषांचें खापर नानांनीं बाजीरावांच्या डोक्यावर फोडलें व भावी इतिहासकारांना 'मूर्ख, नालायक, दिवटा, कर्तव्यशून्य, राज्यबुडव्या वगैरे' शेलक्या शेलक्या विशेषणांनीं त्यांना संबोधावयास भाग पाडलें.

१६. पिंजऱ्यांत सांपडलेल्या सिंहाला वाटेल त्यानें टोंचावें! या वेळीं बाजीराव हे नानांच्या कारभाराच्या पिंजऱ्यांत अडकलेले होते. खरेशास्त्री हे नानांचे चरित्रलेखक म्हणून त्यांचे पूर्ण कैवारी बनले होते. अशा वेळीं असहाय्य बाजीरावांवर विपर्यस्त व मनसोक्त टीकाप्रहार करण्याची सुवर्णसंधि खरेशास्त्री कशी दवडूं शकतील? 'धार्मिक कर्मठपणा मिरवण्याचीही त्यांना (बाजीरावांना) मोठी हौस होती. ते स्वतः मोठमोठीं अनुष्ठानें करीत आणि त्याप्रीत्यर्थ ब्राम्हणांचीं लक्ष भोजनें घालीत.' याप्रमाणें बाजीरावांवर खरेशास्त्री यांनीं दांभिकपणाच्या गुन्ह्याचा टीका-प्रहार केला आहे. परंतु खरेशास्त्री यांच्या दुर्दैवानें हाही टीकाप्रहार खोटा व अवास्तव आहे असें ठरतें. बाजीरावांनीं जें अनुष्ठान केलें व जीं लक्ष ब्राम्हणभोजनें घातलीं असें खरेशास्त्री ह्मणतात, तें अनुष्ठान व तीं भोजनें बाजीरावांचीं व्यक्तिविषयक नव्हतीं. तें अनुष्ठान सामुदायिक शांतीकरतां[1] करण्यांत आलें होतें. तें पेशवेसरकारतर्फे होणारें होतें. शनिवारवाड्यांत टोळधाडीच्या शांतीप्रीत्यर्थ कोटि-होम अनुष्ठान चाललें होतें. मे महिन्यांत टोळ येऊन गेल्यानंतर अशुभदोषनिवारणाकरितां हें कोटि-होम[2] अनुष्ठान जून महिन्यापासून करण्यांत आलें होतें. हें सामुदायिक पद्धतीचें, लोककल्याणाचें व अशुभनिवारणार्थ आचरलेलें असें अनुष्ठान होतें. आपला कर्मठपणा जगजाहीर करण्याकरतां बाजीरावांनीं व्यक्तिविषयक तें अनुष्ठान केलें नव्हतें.

---

१. ऐ. ले. सं. पान ५१४४. पत्र नं. ३९७३. २ ऐ. ले. सं. पा. ५१७१ पत्र नं० ४००४.

१७. एकंदरींत खरेशास्त्री यांनीं पट्टया वसूल करण्याबाबत बाजीरावांवर जीं खोटीं विधानें केलीं, त्याचें मोजमाप पुराव्यासहित वरीलप्रमाणें त्यांचे पदरांत पडलें आहे. नानांनीं ज्या सात पट्टया लोकांवर बसविल्या त्या केवळ त्यांचा स्वतःचा खजीना, जो महाडच्या कारस्थानांत रिकामा झाला होता, तो भरून काढण्याकरतांच होत्या, हें आतां निराळें सांगणेची जरूरी नाहीं. नानांच्या बुद्धिप्रभावाला दिपून खरेशास्त्र्यांप्रमाणें मोठमोठे विद्वान इतिहासकार जर सोपटाला साप समजून सारखे बडवत सुटतात तर इतरांची काय कथा! लोकांकडून भरमसाट पैसा उकळण्याकरतां या पट्टयांची ज्या डोक्यांतून कल्पना निघाली, तें डोकें सामान्य बुद्धिमत्तेचें नव्हतें. संतोषपट्टी अथवा खुशालीपट्टी ही एक अजब डोक्यांतून निघालेली अजबपट्टी आहे. याचा विस्तार डोईपट्टीइतकाच व्यापक आहे. पेशव्यांच्या प्रत्येक प्रजाजनानें ही पट्टी दिलीच पाहिजे इतका त्यांत भरीव अर्थ आहे. ज्या नानांनीं राघोबादादांच्या वंशाला नमस्कारही करावयाचा नाहीं, अशा शपथा वाळूच्या लिंगावर हात ठेऊन घेतल्या, त्याच शूरप्रतिज्ञ नानांच्या महत् प्रयासानें व दिव्य कारस्थानानें बाजीराव पेशवे यांना पेशवेपद मिळालें व नानांच्या हातीं सर्व पेशव्यांच्या राज्याचा कारभार आला. ही अद्भुत घटना नानांनींच घडवून आणली. या अलौकिक घटनेमुळें सर्वांना संतोष व आनंद झालाच असला पाहिजे असें गृहित धरून ही संतोषपट्टी बसविण्यांत आली. प्रत्येक प्रजाजनानें ही संतोषपट्टी दिली तर त्याला संतोष झाला असें समजून त्याला राजनिष्ठ मानावयाचें व त्यानें ती दिली नाहीं ह्मणजे त्याला असंतोष झाला असें ठरवून त्याच्यावर राजद्रोहाची गुन्हेगारी लादावयाची अशी ही बिनतोड संतोषपट्टीची क्लृप्ति होती. संतोषपट्टी दे नाहीं तर, त्याच्या दसपट गुन्हेगारी वसूल करतों, असाच सवाल या संतोषपट्टीच्या मुळाशीं होता! देणें व दुखणें कोणालाही नको असतें. नाक दाबल्याशिवाय तोंड उघडणार नाहीं ह्मणून आपला आर्थिक पेचप्रसंग सोड-

विण्याकरतां नानांच्या डोक्यांतून या संतोषपट्टीच्या कल्पनेचा जन्म झाला होता. या पट्टीची वसूली एका हातांत संतोषपट्टीची भिक्षा घेण्याकरतां कटोरा तर दुसऱ्या हातांत ती न मिळाल्यास गुन्हेगारीचा टोला मारण्याकरतां जंगी लोखंडी चिमटा अशा फकिरी स्वरूपांत झाली असेल यांत शंका नाहीं.

१८. या संतोषपट्टीला खुशालीपट्टी असेंही त्या वेळीं संबोधिलें होतें. राजाला पुत्र झाला ह्मणजे राजवाड्यांतील हुजरे, बारीदार, चोपदार वगैरे हलके नोकर राजाच्या आश्रितजनांकडे जाऊन खुशाली मागत असत. सध्याच्या काळांतही, शिमगा, दिवाळी, दसरा, मोहरम वगैरे सणांतही हलके कामकरी लोक खुशाली मागण्याकरतां येतात. ही खुशाली मागण्याची प्रथा हलक्या लोकांकरतां इतके दिवस पडली होती. परंतु या वेळीं नानांनीं तिला राजभिक्षेचा मान देऊन तिचा उद्धार केला. या खुशाली पट्टीच्या बोहणीवर बाजीराव यांस पेशवेपदाच्या रथांत बसवून नाना कारभार हांकूं लागले हा त्यांनीं बाजीराव यांच्या कारकीर्दीस शकूनच करून दिला, असे कोणी उद्गार काढल्यास त्याला दूषण देतां येईल काय?

१९. 'आपल्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं पण दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ दिसतें' अशी एक म्हण आहे. खरेशास्त्री नानांच्या बुद्धिचातुर्याच्या प्रभाव मंत्रानें एवढे भारून गेले होते कीं, वरीलप्रमाणें बाजीरावांच्या स्वभावांत दांभिकपणाचीं अजिबात नसलेलीं कुसळें त्यांना दिसत होतीं. पण नानांच्या स्वभावांतील मोठमोठ्या दोषांचीं मुसळेंमात्र त्यांना अजिबात दिसलीं नाहींत. नाना हे वाळूचीं लिंगें करून त्यावर हात ठेऊन शपथा घेतात आणि त्या शपथा आपणच स्वयंस्फूर्तीनें मोडतात या एकाच गोष्टीनें त्यांची देवावर तिळमात्र श्रद्धा नव्हती असें ठरतें. असें असतां गंगाबाईच्या गरोदरपणाच्या वेळीं त्यांनीं 'बहुत ब्राह्मण अनुष्ठानास बसविले होते. कारण पुत्र व्हावा अशी आराधना करीत

होते. नवसही बहूत ईश्वरास[1] केले.' नाना हे बारभाईंचे मेरूमणी असून ते गंगाबाईला पुत्र व्हावा या एकाच गोष्टीशीं त्या वेळीं तन्मय झालेल्या स्थितींत होते. त्या वेळीं त्यांनीं या अनुष्ठानाकरतां व नवसांकरतां जो पैसा खर्च केला तो त्यांच्या कर्मठपणाचा केवळ डांगोरा पिटविण्याकरतां होता असेंच ठरतें. नानांनीं ही दांभिक वृत्ति आपलें कारस्थान साधण्याकरतां धारण केली होती. अशी दांभिक वृत्ति दाखवून बाजीरावांना कोणाला फसवावयाचें नव्हतें. देवाबद्दल भक्ति, श्रद्धा व कर्मठपणा हे गुण वडिलोपार्जितच बाजीरावांच्या ठिकाणीं वसत होते. इ. स. १७९७ च्या मार्च व एप्रिल महिन्यांत नाना व शिंदे यांच्यामध्यें एक मोठें राजकारण घाटत होतें. तें कशा प्रकारचें होतें हें पुढें क्रमानें येईलच. तें राजकारण शिंद्यांविरुद्ध या वेळीं नानांनीं जरी जिंकले होतें, तरी त्याची प्रतिक्रिया कशी होईल याचा अंदाज मात्र नानांना येण्यासारखा नव्हता. तेव्हां अशा वेळीं कोणत्या तरी निमित्तानें पुण्याहून निघून दूर कोठें तरी सुरक्षित स्थळीं कांहीं दिवस जावें असें नानांच्या मनांत होतें. परंतु तसें करण्यास शिंदे व बाजीराव यांच्या संमतीची त्यांना जरूरी होती, ह्मणून मेणवलीस जाण्याकरतां त्यांनीं दोन कारणें पुढें आणलीं.[2] (१) आपल्या स्त्रीस रजोदर्शन प्राप्त झालें ह्मणून मेणवलीस जाण्याची परवानगी असावी. (२) मेणवलीस लक्ष भोजन घालण्याचा नवस आहे, तो फेडण्याकरतां जाण्याची मोकळीक असावी. या दोन कारणांकरतां नाना तांतडीनें महाडास जाणार होते.

२०. खरेशास्त्री यांच्या शब्दांत सांगावयाचें ह्मणजे नाना "सचोटीनें वागणारे गृहस्थ होते; त्यांच्या तोंडून एकदां शब्द गेला आणि पुढें तो खोटा पडला असें कधीं झालेंच नाहीं. त्यांची धर्मावर कडक निष्ठा होती. नानांचें सत्यभाषणाचें व्रत असें कडक होतें कीं 'न वितथं परिहासकथास्वपि' या वचनाप्रमाणें थट्टेंत देखील खोटें बोलणें त्यांस

---

१. पे. ब. पा. ९९.   २ ऐ. ले. सं. पा. ५१२२ पत्र नं. ३९४८.

आवडत नसे! एकदां सवाईरावसाहेब कांहीं मंडळी घेऊन सोंगट्यांनीं खेळत बसले होते. तेथें नाना फडनविसही सहज बसले होते. डाव चालतां चालतां अमुक एक दान पडलें तर डाव आपला होईल असें पेशव्यांस कळलें. परंतु तें दान त्यांस किंवा त्यांच्या बाजूस जी मंडळी होती त्यांपैकीं कोणास पडेना. तेव्हां खेळण्याच्या भरांत पेशवे बोलले कीं, जो हें दान घेईल त्यास मी तुरा बक्षिस देईन. त्या वेळीं रघुनाथदादा कुरुंदवाडकर यांस सुदैवानें तें दान पडून डाव झाला. पुढें दुसऱ्या डावास प्रारंभ होऊन खेळ पुढें चालला, पण तुऱ्याची गोष्ट पेशव्यांच्या स्मरणांत देखील नाहीं, असें पाहून, नाना फडनविस कांहीं निमित्त करून बाहेर उठून गेले व एका तबकांत मोत्याचा तुरा घालून तो घेऊन येण्याविषयीं जामदारास ताकीद करून पुनः आंत येऊन बसले. हुकुमाप्रमाणें जामदारानें तबकांत तुरा ठेऊन त्यावर सरपोस घालून ते श्रीमंतांजवळ आणून ठेवलें. खेळ संपल्यावर नानांनीं रघुनाथरावदादांस श्रीमंतांकडून तुरा बक्षिस देववून त्यांजकडून आपला शब्द खरा करविला '[1]!"

२१. नानांचें सत्य भाषणाचें व्रत किती कडक व केवढें जहाल होतें, हें वरील प्रसंगाचें उदाहरण देऊन आपल्या वाचकांचें समाधान करण्याचा खरेशास्त्री यांनीं प्रयत्न केला आहे. या प्रसंगाखेरीज नानांचें कडक सत्यपालनाचें व्रत दाखविण्यास खरेशास्त्रयांच्या ऐतिहासिक बाडांत दुसरा पुरावा नाहीं. वरील प्रसंगाचा पुरावा पुढें आणून नानांच्या सत्यपालन व्रताचें खरेशास्त्री उघड समर्थन करतात हेंच मोठें नवल आहे. अमुक दान पडलें तर तुरा बक्षिस देईन असें सवाईमाधवराव बोलले होते. नाना बोलले नव्हते. नाना फक्त खेळाची मजा पहात बसले होते. या प्रसंगीं रघुनाथराव कुरुंदवाडकरास सवाईमाधवरावांकडून तुरा बक्षिस द्यावयास लावून त्यांना त्यांचा शब्द

१ खरेकृत ना. फ. च. पा. २२०.

खरा करावयास नानांनीं भाग पाडलें एवढीच कामगिरी त्यांनीं बजावली. दुसऱ्यानें बोललेला शब्द खरा करावयास जे भाग पाडतात ते स्वतःचा शब्द खरा करीत असतात असा सिद्धांत मांडणें भयंकर धोक्याचें आहे. सावकाराच्या घरांत चोर शिरून द्रव्य कोठें ठेवलें आहे तें खरें सांगण्याला त्याला भाग पाडतात, म्हणून ते चोर स्वतःखरें बोलत असतात, किंवा सुंदर सुंदर तरुण स्त्रिया कोठें लपवून ठेवल्या आहेत अगर घरची संपत्ति कोठें दडवून ठेवली आहे, हें खरें खरें बोलावयाला भाग पाडणारे घाशीरामासारखे कोतवाल स्वतः खरेंच बोलत असले पाहिजेत अथवा त्यांनीं सत्यपालनाचें कडक व्रत चालविलें असलेंच पाहिजे, अशाच अर्थाचा सिद्धांत नानांच्या बाबतींत खरेशास्त्र्यांनीं बसविला असावा हें उघड होतें. वाळूचीं लिंगें करून त्यावर हात ठेऊन राघोबांच्या वंशाला नमस्कारही करावयाचा नाहीं अशा शपथा जे नाना घेतात तेच नाना स्वतः कारस्थान करून बाजीरावाला—राघोबाच्या मुलाला—आणून गादीवर बसवितात या एकाच हिमालयन पुराव्यानें नानांचें सत्यपालनाचें व्रत किती कडक होतें हें जगजाहीर झालेलें आहे. आपण लिहिलेल्या चरित्रनायकाचे अंगीं सत्यपालनाचें कडक व्रत दाखविल्याशिवाय त्याचें नायकत्व शाबीत होत नाहीं अशा कविकल्पनेनें ‘ न वितथं परिहासकथास्वपि ’ या वचनाची शास्त्रीबुवांना आठवण होऊन त्यांनीं नानांवर हा त्यांचे अंगीं अगदींच नसलेला गुण बादरायणी संबंधानें लादला आहे. इ. स. १७९७ च्या एप्रिल महिन्यांत नानांनीं मेणवलीस जाण्याकरतां जीं दोन कारणें बाजीराव यांस दाखविलीं, त्यांत दुसरें कारण ‘ मेणवलीस लक्ष भोजन घालण्याचा नवस आहे ’ हें होतें. याबद्दल खरेशास्त्री असें म्हणतात कीं ‘ श्रीमंतांस हुलकावणी देण्याकरतां नानांनीं लक्ष भोजनाची सबब सांगितलीच नसेल, असें म्हणवत नाहीं.'[1] ’ या ठिकाणीं नानांच्या कडक सत्यपालनव्रताबद्दल खुद्द खरेशास्त्री यांनींच शंका घेतली आहे. ‘ न वितथं परिहासकथास्वपि ’ असें छातीला हात लावून नानाबद्दल खरेशास्त्री सांगतात व

---

१ खरेकृत ऐ. ले. सं. भाग दहावा पा. ५०६५.

'श्रीमंतांना (म्हणजे खुद आपल्या अन्नदात्या मालकाला) हुलकावणी देण्याकरतां लक्ष भोजनाची सबब सांगितली नसेल असें म्हणवत नाहीं' अशी शंका तेच घेतात. दोन्ही गोष्टी खरेशास्त्री एकाच टांकानें लिहितात. अर्थात् ही त्यांची विचारसरणी पेशवाईंतील रामशास्त्र्यांच्या परंपरेला अनुसरूनच असावी असें दिसतें. रामशास्त्री निस्पृही होते, ह्मणून ते न्यायीच असले पाहिजेत हा सिद्धांत मांडण्यांत आला. पण त्यांच्या दुर्दैवानें राघोबादादांच्या बाबतींत 'आधीं देहांत शिक्षा व नंतर पुरावा' या हिमालयन चुकीमुळें त्यांच्या न्यायप्रियतेचे जसे धिंडवडे निघाले तशीच जवळ जवळ स्थिति नानांच्या कडक सत्यपालनव्रताच्या बाबतींत खरेशास्त्र्यांनीं आपल्या अंगावर ओढवून घेतली आहे.

२२. नानांनीं पुण्याहून मेणवलीस जाण्याबद्दल बाजीराव यांस जीं दोन महत्वाचीं व अत्यंत निकडीचीं कारणें सांगितलीं, त्यांतील मुख्य व विशेष निकडीचें असें कारण ह्मणजे त्यांच्या स्त्रीस मेणवली येथें रजोदर्शन प्राप्त झालें होतें, ह्मणून ते गर्भाधान विधि आटोपून घेण्याकरतां तिकडे तांतडीनें जाणार होते. हें नानांचें कारण खरें होतें कीं तें खोटें अथवा बनावट होतें हें येथें पहाणें जरूर आहे. या बाबतींत खरेशास्त्री असें ह्मणतात कीं, नानांच्या स्त्रीस रजोदर्शन प्राप्त झालें ही 'बातमी कदाचित् पुण्यांतल्या टवाळखोरांनीं उठविली असेल.[1]' परंतु या बाबतींतील खरेशास्त्री यांचें हें अनुमान साफ चुकीचें आहे. या वेळीं नानांचा दरारा पुणें शहर व पेशव्यांचें साम्राज्य यांत एवढा जबरदस्त बसला होता, कीं नानाविरुद्ध ब्र काढण्याची कोणाचीही प्राज्ञा नव्हती. त्यांतून ही बातमी नानांच्या स्त्रीबद्दल ह्मणजे पूर्णपणें त्यांच्या खासगी गोष्टीबद्दल असल्यामुळें ती खोटी उठविण्याचा प्रमाद पुण्यांतील कोणत्याही भयंकर टवाळखोरानें खात्रीनें केला नसता. आजपर्यंतच्या नानांच्या नानाविध क्रूर शासनपद्धतीमुळें नानांची दहशत

---

१ ऐ. ले. सं. पान ५०६५.

निधड्या छातीच्या सैनिकांचेही मनांत एवढें जबरदस्त ठाण मांडून बसली होती कीं, महाडचे कारस्थानानंतर नाना ज्या वेळीं पुन्हां कारभारांत आले त्यावेळीं परशुरामभाऊ पटवर्धनांनीं सालाबादप्रमाणें दसऱ्याचे दिवशीं नानांच्या वाड्यांतील सुमारें चाळीस लक्षांचा कपडा पूर्वीं आपल्या सैनिकांना बक्षीस ह्मणून वांटला होता तो त्यांनीं परत घड्या घालून नानांच्या जामदार खान्यांत आणून हजर केला. यावरून नानांच्या दहशतीची सहज कल्पना येईल. पेशव्यांच्या सैनिकांची जर ही स्थिती होती तर सामान्य लोक नानांच्या खासगी गोष्टींत अशी टवाळी करण्यास उद्युक्त होतील असें ह्मणणें अगदींच असंभाव्य ठरतें. असें असतां ज्या अर्थीं नानांच्या स्त्रीस रजोदर्शन प्राप्त झालें अशी बातमी उठते व नाना मेणवलीस गर्भाधान विधि आटोपून घेण्याकरतां जाण्याची बाजीरावांकडे परवानगी मागतात; परंतु बाजीराव त्यांना मेणवलीस जाण्याची परवानगी देत नाहींत; पुण्यासच आपल्या स्त्रीस बोलावून घेण्याचा त्यांना ते सल्ला देतात आणि त्याप्रमाणें नानाहि वागतात; त्याअर्थीं त्यांतील खरें रहस्य काय आहे हें येथें पहाणें जरूर आहे.

२३. नानांनीं आपल्या मरणकालपर्यंत एकंदर लग्नाच्या नऊ बायका केल्या. या वेळीं ह्मणजे इ. स. १७९७ सालीं नानांच्या वयाच्या ५६ व्या वर्षापर्यंत त्यांच्या आठ बायका झाल्या. (१) पहिल्या बायकोचें नांव यशोदाबाई. ही पुण्यांतील सदाशिव रघुनाथ गद्रे ह्मणून मोठे नामांकित सावकार होते त्यांची मुलगी होती. तिला एक पुत्र झाला तो बाल्यावस्थेंतच मृत्यु पावला. (२) दुसरी बायको लक्ष्मीबाई धाराबडोहो ह्मणून शिवनदुर्ग किल्ल्यामध्यें सरकारी कामावर होते त्यांची कन्या. तीस कांहीं मूल झालें नाहीं. (३) तिसरी स्त्री अन्नपूर्णाबाई गाडगीळ ह्मणून संपत्तिवान गृहस्थ वांईचे राहाणार त्यांची मुलगी. तिला एक कन्या झाली होती. तीहि बाल्यदशेंत मृत्यु पावली. (४) चौथी स्त्री राधाबाई. ही बिडार ह्मणून पुण्यांतील मोठे सावकार यांची मुलगी होती. तिला कांहीं

अपत्य झालें नाहीं. (५) पांचवी स्त्री आनंदीबाई, वैद्य ह्मणून पेशवे सरकारांत कारकुनीचे कामावर होते त्यांची मुलगी, तिला कांहीं अपत्य झालें नाहीं. (६) सहावी स्त्री यशोदाबाई, पेंडसे ह्मणून पेशवे सरकारांत कामावर होते त्यांची मुलगी, हीस एक कन्या झाली होती. ती लहानपणीं मृत्यु पावली. (७) सातवी स्त्री अन्नपूर्णाबाई, परांजपे ह्मणून विजयदुर्ग एथील कारकून यांची मुलगी होती. इजला कांहीं अपत्य झालें नाहीं. (८) आठवी स्त्री बगाबाई, सुतार ह्मणून रत्नागिरींतील कारकून यांची मुलगी होती, ही नाना मेल्यानंतर चौदा दिवसांनीं चौदा वर्षांचे वयाची असतां मृत्यु पावली. तिला मूल झालें नव्हतें. (९) नववी स्त्री जिऊबाई, गोपाळभट वैशंपायन ह्मणून मुरुड तालुक्यांत शिवनदुर्ग एथील राहाणारे यांची मुलगी, स्वरूपानें फार सुंदर. तीस नानां मृत्यु पावले तेव्हां यौवन दशाही प्राप्त झाली नव्हती.[1] त्या वेळीं तिचें वय फक्त नऊ वर्षांचें होतें.[2]

२४. इ. स. १७९७ च्या एप्रिल महिन्यापर्यंत नानांचीं आठच लग्नें झालीं होतीं. त्या पैकीं सातवी बायको व आठवी बायको या दोघींसही त्या वेळीं रजोदर्शन प्राप्त व्हावयाचें होतें. रत्नागिरीस सुतार या आडनांवाचे कोंकणस्थ ब्राम्हण होते, त्यांची मुलगी बगाबाई हिचें लग्न १७९५ सालीं झालें होतें. ती लग्नांत नऊ वर्षांची होती. विजयदुर्गाचे परांजपे यांची मुलगी अन्नपूर्णाबाई हिचें लग्न १७९६ सालीं झालें होतें. इ. स. १७९७ च्या एप्रिल महिन्यांत या दोघी स्त्रियांसही रजोदर्शन प्राप्त झालें नव्हतें. सुताराच्या मुलीचें लग्न जरी एक वर्ष अगोदर झालें होतें तरी ती परांजपे यांच्या मुलीपेक्षां वयानें लहान होती. सुताराची मुलगी बगाबाई हिचें वय या वेळीं अकरा वर्षांचें होतें. नाना गर्भाधानविधि आटोपून घेण्याकरतां मेणवलीस जाणार होते,

---

१ म्याकडोनल्डकृत नाना फडनविस यांची बखर पा. ३१४. २ खरेकृत नानांचें चरित्र पान ३६८.

त्या वेळीं त्यांच्या या दोघी बायकांपैकीं कोणासही रजोदर्शन प्राप्त झालें नव्हतें. या नंतर सुमारें पांच महिन्यांनीं ह्मणजे सप्टेंबर महिन्यांत अन्नपूर्णाबाई हिला रजोदर्शन प्राप्त झाल्याबद्दल उल्लेख आहे. तो असा- 'श्रीमंत राजश्री नाना यांचे स्त्रीस रजोदर्शन प्राप्त जाहलें. सालगुदस्तां लग्न झालें तिला नहाण आलें. गर्भाधान करावयाचें याजकरितां सुताराची मूल तिगस्तां लग्न जाहलें तिला मेणवलीहून आणविली आहे. तिला अद्याप नहाण आलें नाहीं.' [१] हें पत्र रा. बाळाजी गणेश जोशी या मिरजकर पटवर्धनाचे पुण्याचे कारकुनानें आपल्या धन्यास मिरजेस लिहिलें आहे. या वेळीं परशुरामभाऊ पटवर्धन यांचे विरुद्ध मिरजकर पटवर्धन नानांस सामील झालेले होते. हे नानांचे पक्षाचे पूर्ण असल्यामुळें व त्यांच्या जोशी कारकुनाचा प्रवेश नानांच्या अगदीं खासगी बैठकीपर्यंत होत असल्यामुळें त्यांनीं आपल्या धन्यास लिहिलेली बातमी पूर्ण विश्वासाची व सत्यच असली पाहिजे यांत शंका नाहीं. या पत्रावरून नानांच्या चारित्र्यावर पूर्णपणें प्रकाश पडतो. हें पत्र तारीख ३ माहे सप्टेंबर सन १७९७ रोजीं लिहिलेलें आहे. यांतील मजकुरावरून परांजपे यांची मुलगी अन्नपूर्णाबाई हिला या वेळीं नहाण आलें. १७९७ च्या एप्रिल महिन्यांत तिला नहाण आलें नव्हतें. सुतार यांची मुलगी बगाबाई हिला अद्यापिही नहाण आलें नव्हतें. या वरून गेल्या एप्रिल महिन्यांत नाना मेणवलीस आपल्या स्त्रीस रजोदर्शन प्राप्त झालें ह्मणून गर्भाधानविधि आटोपून घेण्याकरतां जे जाणार होते तें त्यांचें कारण साफ खोटें होतें असेंच ठरतें. बाजीराव पेशव्यांनीं नानांस गर्भाधानविधिकरतां आपल्या ऋतुस्नात स्त्रीला पुण्यास बोलावून घेण्याबद्दल आज्ञा केली होती; [२] परंतु त्या वेळीं नानांनीं आपल्या स्त्रीस पुण्यास बोलाविलें नाहीं. या वरून त्यांच्या स्त्रीस रजोदर्शन प्राप्त झालें नसतां

---

१ ऐ. ले. सं. पान ५२५१ ले. नं. ४०६५. २ ऐ. ले. सं. पा. ५१२२ ले. नं. ३९४८.

तिला पुण्यास आणून गर्भाधानविधि उरकून घेण्याचें धाडस त्या वेळीं नानांना झालें नाहीं असें स्पष्ट ठरतें.

२५. वरील पत्रावरून सप्टेंबर महिन्यांत अन्नपूर्णाबाई हिला रजोदर्शन प्राप्त झालें; परंतु नहाण आलेल्या अन्नपूर्णाबाईस गर्भाधानाकरतां नानांनीं पुण्यास आणलें नाहीं तर तिला नहाण आल्याचा फायदा घेऊन आपल्या वैषयिक सुखाच्या अभिरुचीप्रमाणें नहाण न आलेल्या आपल्या बगाबाई स्त्रीस अन्नपूर्णाबाई ऐवजीं बोलावून घेतलें व तिजबरोबर नानांनीं गर्भाधान विधि उरकून घेतला. नानांना लहानपणींच कटिशूलाची व्यथा कशी अमर्यादित होती याचें वर्णन त्यांनींच आपल्या आत्मचरित्रांत सुवर्णाचे अक्षरांनीं लिहून ठेवल्याप्रमाणें नमूद करून ठेवलें आहे. नानांचें पहिलें लग्न त्यांच्या वयाच्या दहाव्या वर्षी झालें. सुमारें त्यांचें वय बारा वर्षांचें झाल्यानंतर नानांस कांहीं स्त्रीव्यसन लागलें. तें दिवसानुदिवस त्यांच्या वयाप्रमाणें वृद्धिंगत होत गेलें. त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांचा स्वस्त्रीशीं समागम झाला. मग कांहीं महिने झाल्यावर नाना परस्त्रीशीं गमन करूं लागले. सरतेशेवटीं नानांचे प्रकृतीस फार विकार झाल्यामुळें ते गोदावरी तीरीं (श्रीक्षेत्र कायगांव टोकें येथें)[१] अनुष्ठानादि कर्मे करण्याकरतां गेले. नानांना बालवयांतच परस्त्रीगमनाचें व्यसन लागलें व त्यामुळें त्यांना गरमी परमा वगैरे दुष्ट रोगांनीं पछाडिलें. नानांच्या या गुप्त दुष्ट रोगांवर औषधोपचाराची मात्रा पुण्यास न चालल्यामुळें शेवटचा दैविक उपचार करण्याकरतां ते श्रीक्षेत्र कायगांव टोकें मुक्कामीं गेले. नानांच्या कटिशूलाची व्यथा त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षींच एवढ्या अतिरेकाला जाऊन पोंचली होती. या वयांत ते बरेच अंशीं परस्वाधीन होते. परंतु त्यांच्या वयाच्या छपन्नाव्या वर्षी ते पूर्ण स्वतंत्र, सत्ताधारी व 'करीन ती पूर्व' या स्थितींत होते. अर्थात् वार्धक्याचा पगडा त्यांच्या शरीरावर बसलेल्या या वयांत कामवासनेच्या स्वैर अभिरुचीच्या आसक्तीमुळें त्यांच्या वैषयिक सुखाला निराळें वळण लागलें होतें असें दिसतें.

---

१. मॅक्डोनालकृत नाना फडनवीस यांची बखर पा. ५ व ६.

नानांना ज्ञातारपणीं रजोदर्शन प्राप्त न झालेल्या स्त्रीशीं संभोग करण्याचें दुष्ट व्यसन लागलें होतें, ह्मणून त्यांनीं त्या व्यसनाची शांति करण्याकरतां नहाण आलेल्या स्त्रीला पुण्यास न आणतां नहाण न आलेल्या बगाबाईस त्यांनीं पुण्यास आणलें व आपल्या राक्षसी कामवासनेचें सांत्वन करून घेतलें.

२६. नानांना त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षींच परस्त्रीगमनामुळें ज्या दुष्ट रोगांनीं पछाडिलें होतें ते रोग कांहीं दिवसांनीं निरनिराळ्या उपचारांनीं जरी वरपांगी बरे झालेले दिसले तरी त्यांचें विष त्यांच्या रक्तांत पूर्णपणें भिनून राहिलेलें होतें. ते त्यामुळें मूर्तिमंत 'विषपुत्र' बनून राहिले होते. पहिल्या पहिल्यानें नानांनीं एक बायको मेल्यानंतर दुसरी बायको केली. एका बायको बरोबर नानांचा समागम झाला म्हणजे ती दुष्ट रोगांनीं पछाडली जात होती व ती त्या आजारांत झिजत जाऊन एकदां मेली म्हणजे नानांना दुसरें लग्न करण्यास मोकळीक मिळत असे. नानांच्या पहिल्या चार बायका अशा प्रकारें एका मागून एक मेल्यानंतर नाना हे स्त्रीभक्षक आहेत म्हणून त्यांना आपली मुलगी समाधानानें देण्यास कोणी तयार झालें नाहीं. नानांना मुलगी देणें म्हणजे ती बळी दिल्याप्रमाणें वाटण्यासारखें होतें. पुढें नानांनीं ज्या आणखीं चार बायका केल्या त्या पेशवे सरकारांत कारकून असलेल्या लोकांच्या केल्या. अर्थात् नानांच्या मागणीप्रमाणें मुलगी दिली तर ठीकच नाहींतर ते आपल्या घरादारांवर नांगर फिरविल्याशिवाय राहणार नाहींत ही दहशत त्या कारकुनांना पडून त्यांनीं आपापल्या मुली आपापल्या घराण्याचा नाश टाळण्याकरतां 'बळी' ह्मणूनच नानांना अर्पण केल्या असल्या पाहिजेत. शवटची स्त्री तर भटाभिक्षुकाची असून नानांनीं ती खरेदीच घेतली असली पाहिजे यांत संशय नाहीं. पांचव्या बायकोपासून नानांनीं एक हातची ह्मणून बायको ठेवण्याची व्यवस्था केलेली दिसते. आपल्या स्त्री बरोबर समागम झाला ह्मणजे ती आजारी पडते व थोड्याच दिवसांत मरते याचा विश्वास नानांना उत्पन्न झाल्यामुळें ते बायको मरण्याची वाट न पहातां अगोदरच दुसरें लग्न करून ठेऊन एक हातची

म्हणून बायको आपल्या संग्रहीं ठेऊं लागले. नाना इ. स. १८०० मध्यें मेले. त्या वेळीं त्यांच्या दोन बायका जिवंत होत्या. बगाबाईचें वय त्यावेळीं चौदा वर्षांचें होतें व जिऊबाईचें वय नऊ वर्षांचें होतें. बगाबाईला न्हाण येण्यापूर्वीच गर्भाधानाचे सोहाळे नानांनी सुरू केल्यामुळें अर्थात् ती पूर्वपरंपरेनुसार आजारी पडली. बगाबाई व जिऊबाई या दोघीजणी नाना मेले त्या वेळीं सिद्धटेंकास देवसेवेकरितां राहिल्या होत्या[1] बगाबाई ही गुप्त अशा दुष्ट रोगाला त्रासून व वैतागून पूर्व वयांतील नानांप्रमाणें ती देवदेव करीत प्रारब्धावर हवाला देऊन देवसेवेला लागणें योग्य होतें. परंतु जिऊबाई ही केवळ नऊ वर्षांची अर्भक होती. ती त्या वयांत प्रपंचाला कंटाळून योगिणी बनणें शक्य नव्हतें. ती एका भटाची मुलगी होती. ती नानांच्या प्रत्यक्ष खरेदीची मिळकत होती. ती ' सुंदरखाशी सुबक ठेंगणी ' केवळ नऊ वर्षांची नानांची म्हातारपणची अगदीं आवडती स्त्री होती. असें असतां तीही ज्या अर्थीं सिद्धटेंकास देवसेवेकरतां राहिली होती त्याअर्थी नानांच्या म्हातारपणच्या प्रेमाभिरुचीचा मासला तिला मिळाला होता व त्यामुळें तिलाही रोग उत्पन्न होऊन ती देवसेवेला लागली होती असें स्पष्ट अनुमान निघतें. एकंदरींत नानांनीं केवळ आपल्या स्वतःच्या स्त्रियांविषयीं जर अशाप्रकारची खाटिकवृत्ति केवळ आपल्या कामवासनेच्या शांतीकरतां धारण केली होती तर आपल्या अधिकार लालसेच्या पूर्ततें करतां त्यांनीं धनी म्हटलें नाहीं किंवा मित्र ओळखले नाहींत; धर्माधर्माचा विचार केला नाहीं किंवा नीति-अनीति अथवा न्याय अन्यायही पाहिला नाहीं असें म्हणावयाचेंच कारण उरत नाहीं. नाना अंतःकरण शून्य होते हीच गोष्ट सत्य आहे.

२७. नानांनीं गर्भाधान विधि उरकून घेण्याकरतां मेणवलीहून न्हाण आलेल्या अन्नपूर्णाबाईस न आणतां तिच्या ऐवजीं न्हाण न आलेल्या बगाबाईस पुण्यास आणून तो सोहाळा साजरा करून घेतला. या गोष्टीवरून नानांच्या कपट कारस्थान बुद्धीचा ओघ कसा होता हेंही स्पष्ट होतें.

---

१. खरेकृत नाना फ. यांचें चरित्र पा. २६८.

नारायणराव पेशव्यांच्या वेळीं ध ऐवजीं मा करून त्यांनीं आपलें इच्छित कार्य साधून घेतलें. सदाशिवराव भाऊ यांच्या ऐवजीं तोतया बाजी गोविंद उभा करून त्यांनीं राजकारण साधून घेतलें तीच पुनरावृत्ति या वेळीं आपल्या खासगी बाबतींत अन्नपूर्णाबाई ऐवजीं बगाबाईस आणून केली. एकाद्या पैलवानाचा जसा एकादा डाव रामबाण असतो व तो त्याच डावावर आपल्या प्रतिस्पर्ध्यास जिंकतो, तसाच नानांच्या कपट कारस्थानांतील नानांचा रामबाण डाव एका ऐवजीं दुसरा उभा करून थोड्याशा फरकानें क्रांति घडवून आणण्याचा होता असें ठरतें. एकंदरींत दाखवावयाचें एक व असावयाचें भलतेंच अशा कपट कारस्थान कुशल नानास खरेशास्त्रयांनीं 'न वितथं परिहास कथास्वपि' या कोटींत ढकलून आपली मात्र केंविलवाणी स्थिति करून घेतली यांत संदेह नाहीं.

२८. नानांचा मेणवलीस जाण्याचा दुसरा हेतु ह्मणजे त्यांनीं लक्ष भोजन घालीन असा पूर्वीं नवस केला होता तो फेडण्याकरतां ते इतक्या त्वरेनें तिकडे जाणार होते. बाजीराव यांनीं या नानांच्या दुसऱ्या कारणाकडे बिलकूल लक्ष दिलें नाहीं. बाजीराव जर खरेशास्त्री ह्मणतात त्या प्रकारचे दांभिक कर्मठ असते, तर लक्ष भोजन घालण्याकरतां नानांस मेणवलीस जाण्याची त्यांनीं ताबडतोप परवानगी दिली असती व आपल्या कर्मठपणाचा डांगोरा पिटवून घेण्याची संधी त्यांनीं हातची दवडली नसती. नानांनीं लक्ष भोजनाचा बेत करणें व त्यास बाजीरावांनीं हरकत घेणें हें दांभिक कर्मठपणाच्या वृत्तीला पूर्ण विरुद्ध आहे. यावरून लक्ष भोजन घालून नवस फेडण्यापेक्षां त्या वेळचें राजकारण जास्त महत्वाचें होतें हें बाजीराव जाणत होते. ते पेशवे होते. आपल्या राज्यांत निरनिराळ्या कलहानें लागलेली आग त्यांना शांत करावयाची होती. परंतु या वेळीं पेशव्यांच्या राज्यांत महाडचें कारस्थान करून नानांनीं जी आग पेटवून दिली होती, ती शांत करण्याकडे नानांचें लक्ष नसून त्या वेळीं ते आपल्या कामवासनेची

शांति नहाण न आलेल्या स्त्रीशीं करून घेण्याकरतां व लक्ष भोजनाचे समारंभ पार पडण्याकरतां मेणवलीस जाण्याची परवानगी मागत होते. यावरून जग होरपळून मेलें तरी हरकत नाहीं आपली चैन चालली ह्मणजे झालें, एवढाच नानांचा हेतु होता हें स्पष्ट होतें. दुसरी गोष्ट ह्मणजे नाना लक्ष भोजन घालण्याचा नवस करतील व तो प्रामाणिकपणें फेडतील हें अगदींच अशक्य कोटींतलें होतें. श्रावणमासांतील ब्राम्हणांस दिलेल्या दक्षिणेवर डोळा ठेवून ती लुबाडण्याकरतां घाशीरामाकडून अनेक ब्रम्हहत्या करवून आपल्या खजिन्यांत मागील दरवाजानें भर घालणारे नाना लक्ष भोजनाचा नवस करतील हें अगदींच अशक्य होतें. हा नवस कशाकरतां होता व ते करावयाचा प्रसंग कोणता होता याचा कोठेंच उल्लेख नाहीं. या वेळीं नानांना बोलका मुलगा अगर मुका मुलगाही झाला नव्हता. असें असतां नवस कां केला व कशाकरतां केला हा प्रश्न राहतोच. तरी त्या बाबतींत पुढीलप्रमाणें अनुमान निघतें. नानांनीं महाडच्या कारस्थाना प्रीत्यर्थ झालेला व होणारा सर्व खर्च बाजीरावांची मखलाशी करून घेऊन मंजूर करून घेतलाच होता. या वेळीं नाना मेणवलीस नहाण न आलेल्या स्त्रीचे गर्भाधानाकरतां जाणार होते, ह्मणून धार्मिक विधींकरतां थोडा जास्त खर्च होणार होता. शिवाय पुण्याहून त्यांना आपल्या रक्षक फौजेसह बंदोबस्तानें मेणवलीस जाणें भाग होतें. कारण कोण कव्हां व कसा धोका उत्पन्न करील याची धास्ती नानांना वाटत होती. ह्मणून आत्मरक्षणाकरतांही या वेळीं नानांना पदरमोड करावी लागणार होती. गर्भाधानाकरतां नाना मेणवलीस जाणार असल्यामुळें त्या प्रीत्यर्थ होणारा खर्च उघड उघड नानांचा खासगी होता एवढें समजण्याइतके बाजीराव शहाणे होते. ह्मणून गर्भाधानाचा खर्च पेशव्यांच्या सरकारी तिजोरीवर नानांना उघडपणें टाकतां येण्यासारखा नव्हता. नाना हे पूर्ण काटकसरीनें वागणारे मूर्तिमंत कारकून बच्चे होते हें प्रसिद्धच होतें. अशा

स्थितींत नानांनीं एक बिनतोड युक्ति गर्भाधानाचा खर्च परभारां निघेल अशी काढली. महाडचें कारस्थान यशस्वी होऊन बाजीराव गादीवर बसले ह्मणजे लक्ष भोजन घालीन असा नवस केला होता असें भासवून त्याकरतां एक लक्ष रुपये खर्च दाखवून तो सरकारांत खर्च घालावयाचा व त्यांतून आपला गर्भाधानविधि पदरांत पाडून घ्यावयाचा असा उघड मनसुबा नानांचा दिसतो. या वेळीं नानांनीं पुण्यांत सावकारपट्टी, संतोषपट्टी वगैरे बऱ्याच पट्टयांची झोड उठवून मुबलक पैसा गोळा केलाच होता. तेव्हां अशा सुवर्ण संधीच्या वेळीं लक्ष भोजनाच्या नांवाखालीं आपल्याला सहज एक लक्ष रुपये तरी लाटतां यावे ह्मणून त्यांनीं लक्ष भोजनाचें कारण बाजीराव यांना सांगितलें होतें असेंच अनुमान निघतें.

प्रकरण ३५ वें.

जादूटोण्याचा प्रयोग नानांवरच उलटतो.

इ. स. १७९७.

१. पुण्याहून स्वदेशीं जाण्याकरतां दौलतराव शिंद्यांना जादूटोणा करण्याची युक्ति नानांनीं काढली. खंडोजी उर्फ विमणा बापू भोंसले यांचेवर जादू टोणा झाले बद्दलचा इतिहास. त्या वेळीं जादूटोणा वगैरेवर लोकांचा विश्वास कसा होता, त्या संबंधींची हकिकत.—२ दादा गद्रे यांच्या मुरलीधराची स्थापना व नानांच्या कालियामर्दनाच्या सुवर्णमूर्तीची स्थापना या संबंधींची माहिती.—३ दौलतराव शिंदे यांच्यावर नानांच्या वाड्यांतून होणारा जादू टोण्याचा प्रयोग.—४ नानांचा जादू टोण्याचा प्रयोग नानांवरच उलटला. नानांच्या आरब व कंपू लोकांच्या मध्यें मारामारी सुरू होते दादा गद्रे यांच्या मुरलीधराला सुन्या मुरलीधर हें नांव कां पडलें.—५ पेशव्यांच्या दरबारीं नाना एकटेच दीड शहाणे कसे झाले होते?—६ शिंद्याकडील मुख्य मुत्सदी, दिवाण जिवबादादा बक्षी व इतर शेणवी मंडळी यांचा थोडा पूर्वेतिहास. या शेणवीं मंडळीवर नानांनीं मात कशी केली?—७ नानांनीं दौलतराव शिंद्यांना बगलेंत मारून या सर्व शेणवी मुत्सद्यांना कैदेंत टाकलें. त्यामुळें नानानां कालियामर्दनाचा मान कसा मिळाला?—८ दौलतराव अल्पवयी असल्यामुळें व शेणवी मुत्सद्दी कैदेंत पडल्यामुळें त्यांची राजकारणांत नदींतून वाहणाऱ्या लांकडाच्या ठोकळ्या प्रमाणें अवस्था कशी बनली?—९ शेणवी मंडळीस बंधमुक्त करण्याकरतां शिंद्यांच्या फौजेंतील लोकांचा सत्याग्रह व त्यांचें बंध विमोचन.—१० शेणवी मंडळींचा नानांचें पारिपत्य करण्याविषयींचा मनसुबा. स्वतःचें स्थान अढळ ठेवण्याचा नानांचा संकल्प.

१. महाडच्या कारस्थानाची निरवानिरव नानांनीं बहुतेक सर्व केली, तरी शिंदे पुणें सोडून स्वदेशीं परत जात नाहींत असें पाहून, नाना मोठ्या पेंचांत पडले. शिंदे पुण्याहून निघून गेल्याशिवाय व बाजीराव आपल्या ताब्यांत पूर्णपणें आल्याशिवाय, आपला कारभार सुरळीत चालणार नाहीं, हें नाना पक्केपणीं जाणून होते; ह्मणून शिंद्यांनीं त्वरित स्वदेशीं निघून जावें असे प्रयत्न नाना करूं लागले. ताईत, मंत्र, जादुटोणा वगैरे गोष्टींवर त्या वेळीं सर्व साधारण लोकांचा फार विश्वास होता. निरनिराळ्या ठिकाणच्या राजवाड्यांतूनही हे जादुटोण्याचे–चेटुकताईत मंत्राचे प्रयोग होत असत. पेशव्यांच्या राजवाड्याप्रमाणें नागपूरकर भोंसल्यांच्या वाड्यांतही ताईतमंत्राचे व जादुटोण्याचे प्रयोग होत असल्याबद्दल उल्लेख सांपडतात. त्यावरून पाहतां समरांगणावर सिंहाप्रमाणें तळपणारे चिमणाबापू भोंसल्यासारखे वीर, ताईतमंत्राच्या जादूनें छाती फुटून मेलेलेही दिसून येतात. हे चिमणाबापू दुसरे रघोजी भोंसले नागपूरकर यांचे धाकटे बंधु. यांना सेनाबहादूर असा किताब होता. त्यांचें नांव खंडोजी ऊर्फ चिमणाबापू असें होतें. 'चिमणाबापू हे फार पराक्रमी व भीम शक्तीचे होते. त्यांनीं कर्नाटकांत व बंगाल्यांत फारच मोठें नांव मिळविलें. त्यांच्याप्रमाणें विशाल देही, भीमशक्तीचा, निधड्या छातीचा वीर नागपूरकर भोंसले घराण्यांत झाला नाहीं. त्यांचा अकल्पित मृत्यु इ. स. १७८९ मध्यें झाला. त्यांच्या मरणासंबंधानें निरनिराळे तर्क आहेत. कोणी विषप्रयोग ह्मणतात कोणी जादुटोणा ह्मणतात.'[१] या बाबतींत 'नागपुरके भोंसले' या हिंदी इतिहासांत पुढीलप्रमाणें माहिती दिली आहे. 'चिमनाबापू के एका एक मरने का कारण पुराने जमानेके लोग इस प्रकार बताते हैं:— रघोजीनें कटक की ओरसे मंत्र विद्यामें निपुण ४ ब्राह्मणों को बुलवाया और उन्हें लालच दे, चिमनाबापूपर मूठ (जादु) चलाने के लिये प्रोत्साहन दिया। प्रथम मूठमें चक्कर आया, दूसरी में बेहोश हुए, और

१. श्री. राजे लक्ष्मणराव भोंसले यांचें चरित्र. पान ८८.

तिसरी में वे स्वर्ग सिधार गये। ऐसा करने का कारण मत्सर भाव था।' [१] हा इतिहास सात आठ वर्षांपूर्वींचा ह्मणजे ताजा होता. सवाई माधवरावासंबंधींचाही इतिहास याहीपेक्षां अगदीं ताजाच होता. पेशवाईच्या काळांत जादू, चेटुक, मंत्र, तंत्र, यांवर लोकांचा जबरदस्त विश्वास होता. [२] त्यामुळें मोठमोठ्या लोकांना या जादुटोण्याची त्यावेळीं मोठी दहशत वाटत होती. या स्वाभाविक असलेल्या दहशतीचा फायदा शिंद्यांच्या बाबतींत नानांनीं करून घ्यावयाचें ठरविलें, व त्याप्रमाणें त्यांनीं शिंद्यांस पुण्यांतून घालवून लावण्यास जादुटोण्याची मसलत केली.

२. दादा गद्रे हे आबा शेलूकर यांच्याप्रमाणें नानांचे परममित्र होते. त्यांनीं महाडच्या कारस्थानांत आबा शेलूकराप्रमाणें नानांना सोबत करून त्यांची सेवा केली ह्मणून त्यांनाही सरंजाम वगैरे नानांनीं बाजीरावांकडून करून देवविला होता. [३] त्यामुळें नानांवरील त्यांची श्रद्धा विशेष वाढली होती. पुण्यांतील त्यांच्या बागेंतील देवालयांत त्यांना 'मुरलीधर' च्या मूर्तीची स्थापना करावयाची होती. या बाबतींत त्यांना नानांचें पूर्णपणें सहकार्य होतें. ज्या मुहुर्तावर मुरलीधराची स्थापना व्हावयाची होती त्याच वेळीं दौलतराव शिंद्यांवर जादुटोण्याच्या मंत्रास सुरवात व्हावयाची होती. या वेळीं नाना शनिवारवाड्याजवळील आपल्या वाड्यांत रहात नव्हते. ते महाडाहून पुण्यास आल्यानंतर आपल्या बागेंतच राहात असल्यामुळें त्यांचा वाडा रिकामाच होता. ह्मणून तेथें शिंद्यांवरील जादुटोण्याची प्रयोगशाळा उघडण्याचें नानांनीं ठरविलें. या वेळीं शनिवारवाड्यांत बाजीराव पेशवे राहावयास आले होते. दौलतराव शिंद्यांच्या सैन्यांतील पहारेकरी लोकांच्या चौक्या शनिवारवाड्या सभोंवतीं लागल्या होत्या. बाजीरावाच्या जीवितरक्षणाची जबाबदारी शिंद्यांनीं स्वतःचे शिरावर घेतली असल्यानें शिंद्यांना वरचेवर शनिवारवाड्यांत यावें लागे. या वेळीं शिंदे व बाजीराव यांचा खलबत-

---

१. शुक्लकृत नागपुर के भोंसले. पा. ३६. २. ऐ. ले. सं. भाग १० वा. पान ५०६५. ३. नानाचें चरित्र खरेकृत पा. १९४.

खाना शनिवारवाडाच झाला होता. याकरतां दौलतराव शिंद्यांवर मंत्र-प्रयोग करण्यास बंदोबस्ताचें व अगदीं जवळचें असें स्थान नानांचाच वाडा हें होतें. या मंत्रप्रयोगशाळेचा सुगावा लोकांना लागूं नये ह्मणून नानांनीं त्याला लोकदृष्टीकरतां निराळा मुलामा देण्याचें ठरविलें होतें. नाना बरेच दिवस त्या वाड्यांत राहत नसल्यामुळें त्यांचे देव-घरांत 'कालियमर्दनाची' सुवर्णाची मूर्ति स्थापन करण्याचें जाहीर करण्यांत आलें. 'मुरलीधर' व 'कालियमर्दन' हीं दोन्हींही स्वरूपें श्रीकृष्ण अवताराचींच होतीं. त्यांच्या स्थापना एकाच [1] दिवशीं ह्मणजे चैत्र वद्य प्रतिपदा शके १७१९ तारीख १२ एप्रिल सन १७९७ रोजीं बुधवारीं होणार होत्या. [2] 'मुरलीधर' हें श्रीकृष्णाचें स्वरूप रंजलेल्या व गांजलेल्या लोकांचें मनरंजन करणारें पूर्ण सत्व गुणाचें द्योतक होतें, तर कालियाप्रमाणें जालीम विषारी व प्रमत्त सर्पाचें मर्दन करण्याचे वेळीं श्रीकृष्णानीं 'कालियामर्दनाचें' धारण केलेलें भयंकर उग्र स्वरूप पूर्ण तमोगुणाचें द्योतक होतें. 'मुरलीधराची' स्थापना गद्रे यांच्या बागेंत सामुदायिक स्वरूपानें होणार होती तर 'कालिय-मर्दनाची' स्थापना नानांच्या वाड्यांत, त्यांच्या अगदीं खासगी देव-घरांत, पूर्ण खासगी स्वरूपानें होणार होती. 'मुरलीधराची' मूर्ति पाषाणाची होती तर नानांच्या 'कालियामर्दनाची' मूर्ति सुवर्णाची होती. या एकंदर प्रकारावरून व स्वरूपावरून गद्रे यांच्या 'मुरली-धराची स्थापना पारमार्थिक स्वरूपाची होती तर नानांच्या 'कालिय-मर्दनाची' स्थापना सहेतुक व एकाद्या विशिष्ट राजकारणाच्या धडपडीकरतां होती हें स्पष्ट होतें.

३. दादा गद्रे यांच्या बागेंतील 'मुरलीधराच्या' स्थापनेच्या वेळीं पूर्ण बंदोबस्त रहावा ह्मणून नानांनीं आपल्याकडील अरब लोक व मिस्टर [3]

---

१ ऐ. ले. सं. १० वा, पान ५१२८ पत्र नं. ३९५४. २ ऐ. ले. सं. भाग १० वा. पान ५१२६ पत्र नं. ३९५२. ३ ऐ. ले. सं, भाग १० वा, पान ५१२६ पत्र नं. ३९५२.

बैट याच्या कंपूतील लोक चौकी देण्याकरतां नेमले होते. नानांच्या वाड्यांतील ' कालियमर्दनाच्या ' स्थापनेकरतां निराळा बंदोबस्त करण्याचें नानांना कारण नव्हतें. कारण नानांच्या वाड्यापासून तों कोतवाल चावडीपर्यंत नानांचे पांच हजार अस्व चौक्या देऊन या पूर्वीच बसले होते. ठराविक दिवशीं नानांच्या वाड्यांतील देवघरांत ' कालियाच्या ' ह्मणजे अर्थात् दौलतराव शिंद्यांच्या मर्दनाकरतां नानांच्या ' कालियमर्दनाच्या ' सुवर्णमूर्तीची देवप्रतिष्ठा ब्राम्हणांकडून यथाविधि मंत्रप्रयोगानें होऊन त्याच्या जादुमंत्राच्या बलिदानाचा दिवा भातांत लावून तो दिवा शनिवारवाड्याच्या गणेश दरवाजाजवळ नेऊन ठेवण्याकरतां कामाठ्याकडे देण्यांत आला. कामाठ्यानें तो जादूचा दिवा नानांच्या वाड्याचे मोठ्या दरवाजानें बाहेर आणून गणेशदरवाजापुढें आणून ठेवला. त्या दरवाजावर शिंद्यांच्या मुकेरी साहेबाचे गारदी पहाऱ्यावर होते, त्यांनीं तो पाहिला. तेव्हां त्यांनीं त्या कामाठ्यास धरलें व ते त्यास ह्मणाले ' भातांत दिवा लावून टाकतां आणि आमचे धनी दौलतराव शिंदेबाबा यांजवर तुम्ही जादु केलीत. ' असें म्हणून त्यांनीं त्याच्या मुसक्या बांधल्या आणि त्या जादूच्या दिव्याची पाटी उचलून ती घेऊन नानांच्या वाड्याच्या मागील दरवाजानें ते गारदी नानांच्या वाड्यांत शिरले. त्यांनीं नानांचा कारकून भास्करपंत कोठवळे यास धरून बांधून पाडून त्याला बराच चोप दिला. वाड्यांतील इतर माणसांसही मार दिला; व ती जादूच्या दिव्याची पाटी नानांच्या वाड्यांत ' तुमची जादु तुमच्या घरांतच घातली[1] ' असें म्हणून फेंकून दिली. अशाप्रकारें दौलतराव शिंदे यांच्यावर केलेली जादु नानांवर कशी उलटली व त्याची प्रचीती नानांना त्याच वेळीं कशी आली हें पुढील माहितिवरून दिसून येईल.

४. याच वेळीं दादा गद्रे यांच्या बागेंतील देवालयांत ' मुरलीधराची ' स्थापना व्हावयाची होती. स्थापनेकरतां ब्राह्मण वगैरे येऊन कार्याला सुरवात झाली त्यावेळीं तेथें चौकीवर असलेल्या नानांकडील बैटसाहेबाच्या कंपूतील

---

१. ऐ. ले. सं. भाग १० वा पान ५१३२ पत्र नं. ३९५८.

लोकांच्या व नानांकडीलच तेथें चौकीवर असलेल्या आरबांच्या कलहाला एकाएकीं प्रारंभ झाला. त्या कलहाचें पर्यवसान कंपूचे लोक व आरब यांच्यामध्यें गोळागोळीला प्रारंभ होण्यांत झालें. यामुळें मुरलीधराच्या देवालयांतून दादा गद्रे व ब्राम्हण निघून गेले. गद्रे नानांच्याकडे गेले व त्यांनीं हा उभय पक्षांतील तंटा मिटविण्याबद्दल त्यांना सांगितलें. नानांनीं हा कलह तोडण्याकरतां ताबडतोब आपल्या चोपदारास पाठविलें. तो तेथें जातांच गोळी लागून जखमी झाला. ही बातमी नानांस लागतांच त्यांनीं आपल्या वाड्यावरील आरब लोक कंपूंतील लोकांचा मोड करण्याकरतां पाठविले. त्यांची व कंपूंतील लोकांची सुमारें चारपांच घटका लढाई झाली. तोफा, रेखले व बंदुका यांच्या भडीमारामुळें लोक जखमी व ठार होऊं लागले. रेखल्यांचे गोळे व बंदुकीच्या गोळ्या भिरडीकरांच्या वाड्यापर्यंत येऊन पडूं लागल्या. या लढाईची गंमत पहावयास गेलेले कांहीं लोक जायां जखमी[१] झाले. शेवटीं आरबांनीं कंपूच्या लोकांकडील तोफा काबीज केल्या तेव्हां लढाईचें स्वरूप आटोक्यांत येऊं लागलें. शिंदे, भोंसले व निजाम यांचें सैन्य तयार होऊन बसलें होतें; परंतु आरबांनीं कंपूवाल्यांचा मोड केल्यामुळें त्यांना या लढाईंत भाग घेण्याचें काम पडलें नाहीं. शिंदे, भोंसले व निजाम यांच्या सैन्यानें जर या लढाईंत, तंटा मिटविण्याकरतां म्हणून कां होईना, भाग घेतला असता तर आयत्या वेळीं त्याला कोणतें विपरीत स्वरूप आलें असतें, हें सांगणें कठीच होतें. आरब व कंपूंतीललोक यांची ही लढाई या दिवशीं तात्पुरती थांबली; परंतु परस्परांतील द्वेषभाव मात्र कमी झाला नव्हता. कंपूच्या लोकांचे मुडदे पडले होते ते नेण्याचा त्यांनीं प्रयत्न केला परंतु आरब त्यांना ते नेऊं देईनात त्यामुळें उभयपक्षांत पुन्हां तेढ वाढली. लाकडी नागमोडीच्या पुलाकडे एक आरब गेला असतां बैटसाहेबानें त्याला ठार मारलें. अशा प्रकारें आरबांची व टोपीवाल्या बैटसाहेबांच्या कंपूंतील लोकांची चुरस वाढत चालली. बैटसाहेबानें या लढाईचें वर्तमान मुंबईस गव्हर्नरास कळविलें. तेव्हां

१. ऐ. ले. सं. पा. ५१२७.

त्यांचेकडून असा जबाब आला कीं, 'आह्मी घांट चढून येतों, तुम्ही स्वस्थ रहाणें[१]' अशा प्रकारें बैटसाहेब या छोट्या लढाईला मोठ्या लढाईचें स्वरूप देणार हें पाहून नानांना आपली जादु आपल्यावरच उलटली असें वाटलें. ह्मणून या उलटलेल्या जादूचें मूळ काढून टाकण्याकरतां पहिल्यानें त्यांनीं आपल्या आश्रित जादुगारास ह्मणजे वेदमूर्ति राजश्री रामभट यांस बोलावून घेतलें; व आपल्या वाड्यांतील देवघरांत ज्या कालियमर्दनाच्या सुवर्णाच्या मूर्तीची प्रतिष्ठा केली होती ती उचलून नानांनीं त्यांना दान[१] देऊन टाकली. आणि आपल्या वाड्यांतील जादूचें खूळ रामभटजींच्या घराकडे घालवून लावलें. नंतर त्यांनीं बैट साहेबाकडे आपला कारकून समेट करण्याकरतां पाठविला.[२] नानांनीं बैट साहेबाला जवाहीरवस्त्रें देऊन त्याची त्यांनीं समजूत केली तेव्हां त्यांच्या मनाला समाधान वाटलें. तोंपर्यंत 'नानांची मर्जी दोन दिवस ठीक नव्हती.'[३] अशा प्रकारें दौलतराव शिंद्यांवर नानांनीं चालविलेला जादूटोण्याच्या विस्तवाचा खेळ त्याच दिवशीं नानांच्या अंगावर उलटून त्याची त्यांना वरीलप्रमाणें चांगलीच झळ बाधली. श्रावण महिन्याच्या दक्षिणेंतील पैशाचा अपहार करणाऱ्या नानांवर स्वतःच्या देवघरांत शत्रूचें मर्दन करण्याच्या उच्च हेतूनें पतिष्ठा केलेली 'कालियमर्दनाची' सुवर्णाची मूर्ति ब्राम्हणाला दान करण्याचा मरणप्राय प्रसंग ओढवल्यामुळें त्यांच्या मनाला किती दुःख झालें असेल याची कल्पना कल्पनेनेंच केलेली बरी ! नानांच्या या जादुटोण्याच्या प्रयोगाची झळ दादा गद्रे यांना मात्र जन्माची लागली. त्यांनीं पारमार्थिकदृष्टीनें स्वतःच्या व लोकांच्या मनाला शांति व समाधान लाभण्याकरतां स्थापन केलेल्या सात्विक मुरलीधराला' वरील खुनाखुनीच्या प्रकारामुळें 'खुन्या मुरलीधर' हें नांव कायमचें पडलें.

५. तारीख १२ एप्रिल सन १७९७ रोजीं कालियमर्दनाची सुवर्ण मूर्ति आपल्या वाड्यांतील देवघरांत स्थापन करण्याची नानांना जी स्फूर्ति उत्पन्न

---

१ ऐ. ले. सं. पान ५११३. २ ऐ. ले. सं. पान ५१२१. ३ ऐ. ले. सं. पान ५१२९.

झाली, त्यांतील मुख्य हेतु दौलतरावांवर जादुटोणा करण्याचा जरी असला, तरी त्याशिवायही दुसरे हेतु त्यांत समाविष्ट झालेले होते. नाना फडनविस हे साडेतीन शहाण्यांपैकीं एक होते. नानांच्या अकलेचा मासला लोकांना चाखावयास मिळण्यापूर्वीं 'सख्या देवा विठला' ही शहाण्यांची त्रयी मानण्यांत येत होती. सख्या म्हणजे सखारामबापू हे पेशव्यांच्या दरबारचे एक शहाणे, देवा म्हणजे दिवाकरपंत चोरघोडे हे भोंसल्यांच्या दरबारचे दुसरे शहाणे व विठला म्हणजे विठ्ठल सुंदर हे निजामाच्या दरबारचे तिसरे शहाणे. अशी शहाण्यांची पूर्वीची त्रयी असतां, यांत नानांनीं चंचुप्रवेश करून साडेतीन शहाण्यांची मालिका बनविली. नानांनीं आपल्याकडे फक्त अर्ध्या शहाण्याचा हक्क घेतला. त्यामुळें पेशवे दरबाराला दीड शहाण्यांचा मान मिळाला. बारभाईंच्या कारस्थानाच्या वेळीं सखारामबापूंची सर्व बुद्धिमत्ता नाना कोळून प्याल्यामुळें व शेवटीं नानांच्या कैदेंत पडून इ. स. १७८१ मध्यें ते कैलासवासी झाल्यामुळें, पेशवे दरबारीं नानांना एकट्यालाच दीड शहाण्याचा वारसाहक्क मिळाला. या शहाण्यांच्या शहाणपणाच्या कित्येक आख्यायिका आहेत. त्यांच्या लिखाणांतून द्वयर्थी हेतु निघत होते. त्यांच्या शब्दांतून निरनिराळे ध्वनि उत्पन्न होत होते. त्यांच्या खेळण्याच्या डावांतून, त्यांच्या दृष्टिक्षेपांतून अगर त्यांच्या प्रत्येक हालचालींतून निरनिराळ्या कारस्थानाचे सांकेतिक संदेश बाहेर पडत होते. दाखवावयाचें एक व असावयाचें भलतेंच हें रहस्य कारस्थानी शहाण्या मुत्सद्यांचें असतें. परंतु नाना हे दीडशहाणे बनल्यामुळें 'कालियामर्दनाच्या' सुवर्णाच्या मूर्तीची स्थापना याच वेळीं करण्यांत त्यांचे आणखी दुसरे कोणकोणते हेतु होते हेंही पहाणें येथें जरूर आहे.

६. पेशवाईच्या अमदानींत ब्राम्हणवर्गांत जसे अनेक सरदार नांवलौकिकाला आले तसे प्रभु व सारस्वत ज्ञातींतही आले. सखाराम हरी वगैरेसारखीं नररत्नें प्रभुज्ञातींत झळकलीं तर सारस्वतज्ञातींत जिवबादादा बक्षी वगैरेसारखीं प्रकाशमान झालीं. जिवबादादा बक्षी हे जसे राजकारणकुशल मुत्सद्दी होते, तसेच ते खंदे योद्धेही होते. त्यांच्याच पुरुषार्थावर महादजी शिंद्यांनीं

आपल्या दौलतीचा विस्तार, वैभव व नांवलौकिक वाढविला होता. हे सारस्वत लोक पूर्वीचे सावंतवाडी संस्थानांतील रहिवासी होते. यांना त्या वेळीं शेणवी असें म्हणत असत. रामचंद्रबाबा शेणवी हेही या सावंतवाडी संस्थानांतील पूर्वीचे रहिवासी होते. त्यांनीं स्वपराक्रमावर शिंद्यांची सरदारी उभी केली होती. शिंद्यांच्या अठराही कारखान्यावर शेणवीच अधिकारी होते. त्यामुळें शिंद्यांच्या राज्याला शेणवी लोकांची रयाशत असें त्या वेळीं सर्वत्र लौकिकांत होतें.[1] शिंद्यांच्या छत्राखालीं हे शेणवी सरदार प्रामुख्यानें नांवलौकिकाला आले. जिवबादादा हे शिंद्यांच्या सरदारींत पानिपतच्या संग्रामानंतर शिरले. त्यांनीं महादजी शिंद्यांच्या दिवाणगिरीचें व सेनापतीचें अशीं दोन्हींही कामें सारख्याच जबाबदारीनें पार पाडलीं. महादजी शिंदे कितीही दिवस मुलखगिरीवर गेले तरी शिंद्यांच्या कारभारांत जिवबादादांनीं कोठेंच न्यून पडूं दिलें नाहीं. स्वतःच्या हिंमतीवर महादजी शिंद्यांच्या गैरहजेरींत जिवबादादांनीं बऱ्याच मोठमोठ्या लढाया जिंकल्या होत्या. त्यामुळें शिंद्यांची फौजही त्यांच्या पूर्ण-पणें लगामीं होती. शिंद्यांच्या गादीविषयीं जिवबादादा आदिकरून सर्व शेणवी—सरदार मुत्सद्यांना आपुलकीचा जबरदस्त अभिमान वाटत होता. महादजी शिंद्यांच्या कारकीर्दीत या सर्व शेणवी मंडळींचें पूर्ण सहकार्य त्यांना लाभल्यामुळें नाना फडनविस यांना शिंद्यांच्या घरांत भेद पाडावयास संधि मिळाली नव्हती. जिवबादादांच्या हयातीपर्यंत शिंदे घराणें गृहकलहापासून अभेद्य राहिलें होतें. महादजी शिंदे इ. स. १७९४ मध्यें मृत्यु पावले व त्यांच्या गादीवर दौलतराव आले. त्या वेळीं त्यांचें वय अवघें पंधरा वर्षांचें होतें.[2] दौलतरावांना गादीवर बसविण्याचे कामीं महादजी शिंदे यांची वडील बायको लक्ष्मीबाई हिनें आडकाठी घातली. त्या कामीं तिला नाना फडनविसांचें सहाय्य[3] होतें. परंतु जिवबादादांनीं बाईंची समजूत केली आणि दौलतरावांकडून 'मी तुमचा मान पूर्वीप्रमाणेंच राखीन' असें तिज-

---

१ जि. दादा बक्षी यांचें चरित्र प. ४५ २. डफकृत मराठ्यांची बखर प. ३०५. ३. जि. दा. बक्षी यांचें चरित्र पान १७४.

पाशीं कबूल करविलें. तेव्हां तिची हरकत दूर होऊन दौलतरावांस गादीवर बसविण्याचें काम निर्विघ्नपणें पार पडलें. जिवबादादांचें वजन महादजींच्या बायकांवरही चांगलें होतें. पुढें इ. स. १७९६ मध्यें जिवबादादा कालवश झाले तेव्हां त्यांचे दिवाणीपदावर बाळोबातात्या आले. हेही मोठे मुत्सद्दी होते. त्यांचेंही वजन शिंद्यांच्या फौजेवर व शिंद्यांच्या राज्यांत फार मोठें होतें. दौलतराव अल्पवयी असल्यामुळें त्यांना आपल्या राज्याचा कारभार या शेणवी मुत्सद्यांच्या विचारानेंच करावा लागे. या शेणवी मुत्सद्यांमुळें इतके दिवस शिंद्यांविरुद्ध नानांची कोणतीही मसलत पार पडत नव्हती. नानांच्या मुत्सद्दी डावपेंचाला याही शेणवी मंडळीकडून बेमालुम तोड मिळत होती. म्हणून अल्पवयी व राज्यकारभाराचा कोणताच अनुभव नसलेल्या दौलतरावांचें मन शेणवी मुत्सद्यांबद्दल कलुषित करण्याचा नानांनीं प्रयत्न केला. महाडच्या कारस्थानांत महादजी शिंद्यांच्या वेळचे जुने मुत्सद्दी रामजी पाटील व रायाजी पाटील आणि सर्जेराव घाटगे या मराठे लोकांस नानांनीं वश करून घेऊन व त्यांचें वजन दौलतराव यांचेवर पाडून बाळोबातात्यांस कैद करून आपलें कारस्थान कसें यशस्वी केलें व शिंद्यांच्या दौलतीच्या कारभारांत कशी फूट पाडली हा इतिहास मागें आलाच आहे.

७. बाळोबातात्यांना कैद करून व दौलतरावाला आपल्या संगनमतांत घेऊन नानांनीं जरी आपलें महाडचें कारस्थान यशस्वी केलें होतें, तरी तेवढ्यानें त्यांचे मनास समाधान झालें नव्हतें. एकटे बाळोबातात्या जरी कैदेंत पडले, तरी शिंद्यांच्या अठरा कारखान्यांवरील अधिकारी सर्व शेणवीच होते. ही सर्व मंडळी एकजुटीनें वागणारी असून, त्यांच्या ताब्यांत प्रत्यक्ष दौलतीचा कारभार होता. त्यामुळें ते आपणांविरुद्ध केव्हां कसा प्रसंग आणून आपला सूड घेतील याची नानांना धास्ती वाटत होती. ह्मणून त्या सर्वांना कैद करण्याबद्दल नानांचे सारखे प्रयत्न सुरूं होते. एकदां सर्व शेणवी मंडळी कैदेंत पडली, ह्मणजे शिंद्यांच्या दौलतींतील शहाणपण नष्ट होईल व त्यामुळें

शिंद्यासारखा बडा फौजबंद सरदार आपल्या ताटाखालचें मांजर होऊन कायमचा बसेल व त्याच्या मदतीवर आपणाला वाटेल तो सांवळागोंधळ घालतां येईल, असा नानांच्या कारस्थानाचा डाव होता. दौलतराव अल्पवयी असल्यामुळें त्यांना नानांच्या डावाची बिलकुल कल्पना आली नाहीं. शिवाय नानांनीं दौलतराव शिंद्यांवर सर्जेराव घाटग्यांच्या लावण्यसंपन्न कन्येचें मोहिनी-अस्त्र सोडून ठेवलें असल्यामुळें व त्यावेळीं ते पैशाच्या तंगींत आले असल्यानें त्यांना कांचनाचाही [1] मोह दाखवून ह्मणजे कनक आणि कांता या दुहेरी पेंचांत नानांनीं दौलतराव यांस धरल्यामुळें ते आपल्या इष्टप्राप्तीकरतां नानांच्या कारस्थानी जाळ्यांत पूर्णपणें अडकले. दौलतरावांनीं जिवबादादांचे पुत्र नारायणराव, यशवंतराव मल्हार, देवजी गौळी, बाजीबा मोदी व त्याचा पुत्र वगैरे झाडून सर्व शेणवी अधिकाऱ्यांस कैद करून नगरच्या किल्ल्यांत नेऊन ठेविलें. जगोबा बापू व लखबादादा लाड यांसही कैद करण्याबद्दल हुकूम गेले. एकंदरींत शेणवी जातींतील सर्व प्रमुख मंडळींवर नानांनीं संकट आणून त्यांना कैद केलें. त्यांची मालमत्ता जप्त करवून बायकामुलांसुद्धां सर्वांस पहाऱ्यांत ठेवलें. जिवबादादा बक्षी यांच्या घरच्या मंडळीस कैद करून त्यांस लुटून टाकण्याविषयीं नानांनीं [2] सावंतवाडीकर सरकारास पत्रें पाठविलीं. अशा प्रकारें शूर, मुत्सद्दी व कर्तबगार अशा शेणवी मंडळींना नानांनीं दौलतराव यांच्याकडून कैद करवून त्यांच्याबद्दल मनांत बरेच दिवस वसत असलेली आपली सूडाची भावना यावेळीं त्यांनीं पुरी करून घेतली. हा प्रकार इ. स. १७९७ च्या मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत घडून आला. आतांपर्यंत नानांनीं होळकर, भोंसले, गायकवाड, यांच्या दौलतींत भेद पाडून गृहकलह उत्पन्न करून ठेवलाच होता. निरनिराळ्या सरदारांत निरनिराळ्या प्रसंगीं फूट पाडून ठेवलीच होती. तोतयाच्या बंडाच्या वेळीं ब्राह्मण जातीचें कंबरडें नानांनीं चांगलेंच मोडलें होतें. प्रभु जातींतील लोकांवर त्यांनीं

---

१. जि. दा. बक्षी यांचें चरित्र पा. ४९१. ले. नं. २३०. २. जि. दा. बक्षी यांचें चरित्र पान २३०.

आपला सूड मनमुराद उगवून घेतलाच होता. महाडच्या कारस्थानांत परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या चित्पावन लोकांच्या गटाला नानांनीं मूठमाती दिलीच होती. टिपूचा सर्वनाश केलाच होता. निजाम, साताऱ्याचे छत्रपती, करवीरकर यांना ते आपल्या करांगुलीवर खेळवीतच होते. इंग्रजांना नानांनीं महाडच्या कारस्थानापासून आपल्या संगनमतांत घेऊन मित्र बनविलेंच होतें. एकंदरींत आपणाला शत्रू वाटणाऱ्या बहुतेक सर्वांचें नानांनीं मर्दन केलेंच होतें. या वेळेपर्यंत शिंद्यांच्या छत्राखालीं शेणवी जातींतील लोक एकजुटीनें अभेद्य असे राहिले होते. त्यांना शिंद्यांच्या रोषाला व शत्रुत्वाला पात्र करून त्यांचेंही नानांनीं या वेळीं मर्दन केलें व त्यामुळें राजकारण आणि बुद्धिमत्ता यांच्यापासून शिंद्यांना अलग करून त्यांच्याही मर्दनाचा आपला मार्ग त्यांनीं मोकळा करून ठेवल्यामुळें त्यांचेंही मर्दन झाल्यासारखेंच होतें. एकंदरींत शेणवी जातीवरील हा विजय नानांच्या पराक्रमांतील शेवटचा आणि त्यांच्या राक्षसी महत्वाकांक्षेची पूर्तता करणारा होता यांत संशय नाहीं. नानांनीं या वेळेपर्यंत आपल्या अनंत शत्रूंचें मर्दन केलें पण त्यांच्या तावडींत ही शेणवी ज्ञाति इतके दिवस सांपडली नव्हती. ती सावंतवाडीकरांच्या कक्षेतून बरीच दूर अशा 'यमुना नदीच्या डोहांतील कालिया'प्रमाणें शिंद्यांच्या अभय छत्राखालीं दडून बसली होती, अशी नानांची समजूत होती. म्हणून त्यांच्यावरील या विजयामुळें नानांना ही 'कालियमर्दनाच्या' मूर्तीची स्थापना करण्याची मूळ कल्पना सुचली असें उघड दिसतें. हा नानांचा विजय पुण्यास नानांच्या वाड्यावर विजयस्तंभ उभा करून त्यावर सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखा होता, हें खुद्द नानांना व त्यांच्या पक्षांतील दादा गद्रे, आबा शेलुकर वगैरे आस्थेवाईक मंडळींना वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. अशा प्रकारचें स्मारक हें सामान्य व्यावहारिक स्वरूपाचें होईल, तें अद्वितीय स्वरूपाचें होणार नाहीं, यासाठीं त्या स्मारकाला देवकळेचें महत्व यावें व शेणवी जातीवरील नानांच्या या

अपूर्व विजयाचा इतिहास निरंतर जनसमूहापुढें जिवंत राहावा ह्मणून त्याला सदृश अशा पुराणप्रसिद्ध 'कालियमर्दनाच्या' इतिहासाची तुलनात्मक जोड देण्यांत आली होती. या 'कालियमर्दनाच्या सुवर्णमूर्तीच्या स्थापनेनें नाना हे श्रीभगवान् कृष्णाचे अवतार, व 'कालियाचे' जागीं शेणव्यांच्या प्रभावळीसह दौलतराव शिंदे, आणि सुवर्णाच्या अक्षरांनीं लिहून ठेवण्यासारख्या इतिहासाच्या ठिकाणीं सुवर्णाची मूर्ति अशी ही प्रतिभासंपन्न कल्पना 'कालियमर्दनाच्या' सुवर्णमूर्तीची स्थापना करण्यांत नानांच्या राजकारणी चतुर बुद्धिमत्तेची साक्ष देणारी अशी होती हें स्पष्ट होतें. नानांना श्रीकृष्ण भगवानाचा अवतार ठरविण्यांत नानांचा पराक्रम दिसावा हा जरी स्पष्ट व उघड हेतु होता, तरी श्रीकृष्णाचे इतर कांहीं गुण नानांत वसत होते तेही लोकांच्या नजरेला यावे असा गूढार्थ त्यांत होता असें ह्मटल्यास तें वावगें होणार नाहीं. श्रीकृष्ण कृष्णकारस्थानी होते तर नानांनींही त्यांच्या पावलांवर पावलें टाकलीं होतीं. श्रीकृष्णांनीं अनंत स्त्रिया केल्या तर नानांनीं लग्नाच्या नऊ व इतरही अनेक करून त्यांतही त्यांनीं कमीपणा दाखविलेला नव्हता. श्रीकृष्णांनीं कुंजवनांत नाना क्रीडा केल्या तर नानांनीं पुरंदर किल्ल्याचें कुंजवन बनविलें होतें. श्रीकृष्ण गोकुळ सोडून द्वारकेला गेले तर नाना पुरंदर सोडून पुण्याला आले. वगैरे, वगैरे श्रीकृष्ण अवताराशीं साम्य दिसणारी हकीकत नानांच्या चरित्रांतून ध्वनित होते असा गूढार्थही या स्थापनेच्या कल्पनेंत समाविष्ट होता यांत संशय नाहीं. श्रीकृष्णाचा पराक्रम व बुद्धिमत्ता दुष्टांचा नाश करून लोककल्याणाच्या कार्याला लागली ह्मणून त्यांच्या अंगचे लौकिकदृष्टया दिसणारे अवगुण पुढें लोकदृष्टीनें गुणच ठरले. पण नानांचा पराक्रम व बुद्धिमत्ता सज्जनांचा नाश करून स्वतःचें कल्याण करून घेण्यापुरतीच असल्यानें श्रीकृष्ण व नाना यांच्या चरित्रामधील अंतर उत्तर व दक्षिण या दिशांमधील अंतराइतकें सतत राहिलें यांत संशय नाहीं. नानांनीं पूर्वीं नारायणराव

पेशव्यांना धरण्याच्या कटांत जसा त्यांना मारण्याचा गुप्त कट निर्माण केला, तसाच या वेळीं त्यांनीं ‘ कालियमर्दनाच्या ’ सुवर्णमूर्तीच्या स्थापनेच्या कार्यांत दौलतराव शिंद्यांवर जादुटोणा करण्याचा निराळा कट निर्माण केला होता हें सिद्ध होतें. या जादुटोण्याच्या कटामुळें दौलतराव शिंदे एक तरी मेले असते अगर देशीं तरी पळून गेले असते. शिंदे निघून गेले असते ह्मणजे बाजीराव नानांच्या नक्रदाढेंत सांपडले असते व त्यामुळें नाना हे अजातशत्रु बनले असते हें उघड आहे. एका दगडानें अनंत फळें पाडण्याच्या नानांच्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणें हें देवस्थापनेचें कार्य त्यांनीं आरंभिलें होतें. परंतु परमेश्वराची इच्छा निराळीच असल्यामुळें त्यामध्यें त्यांना अपयश आलें व अपमानही सहन करावा लागला. श्रीकृष्ण अवताराशीं साम्य वाटत असलेला नानांचा व त्यांच्या पक्षांतील लोकांचा आनंद फक्त पंधरा दिवसच टिकला होता. शेणवी मंडळींना कैद केल्यानंतर अवघ्या पंधरा दिवसांच्या आंतच नानांच्या देवस्थापनेच्या व जादुटोण्याच्या कल्पनेचे बारा वाजले हें विशेष आहे.

८. दौलतराव शिंद्यांकडून नानांनीं शेणवी मंडळींस कैदेंत टाकविलें त्यामुळें नानांस जसा पराकोटीचा आनंद झाला तसाच रामजी पाटील, सर्जेराव घाटगे, बाळोजी कुंजर, फकीरजी गाढवे व बाणाजी शेट्या या नानांच्या लगामीं असलेल्या मराठा मंडळींसही आनंद झाला. पेशव्यांच्या राज्यकारभारांत नानांचा पक्ष व शिंद्यांचा पक्ष या दोन परस्परविरुद्ध बनत चाललेल्या पक्षांच्या निरनिराळ्या दोन पेशवाईच्या आधारस्तंभावर बाजीराव पेशवे यांनीं हात ठेवल्यामुळें ते जसे मध्यंतरीं लोंबकळत राहिले होते, तशीच दौलतराव शिंद्यांचीही त्यांच्या दौलतीच्या कारभारासंबंधीं परिस्थिति होती. ते अल्पवयी असल्यामुळें त्यांना राज्यकारभाराचें कांहीं ज्ञान नव्हतें. आपल्या कारभाऱ्यांच्या सल्याप्रमाणें ते त्याचा प्रतिध्वनि मात्र पेशव्यांच्या राज्यकारभारांत उमटवीत असत. इतके दिवस शेणवी मुत्सद्दी शिंद्यांकडे असल्यामुळें, कशाचीच जबाबदारी दौलतराव यांच्यावर पडली नव्हती. त्या शेणवी मंडळींना कैद केल्यामुळें त्यांचे जागीं रामजी पाटील वगैरे

नानांच्या तंत्रांतील मंडळी घुसली व त्यामुळें दौलतराव शिंद्यांना स्वतःच्या दौलतीच्या कारभारांत व पेशव्यांच्या कारभारांत नानांच्या ओंजळीनें पाणी पिण्याचा प्रसंग आला. यामुळें या पुढील राजकारणाचे डाव खेळतांना शेणवी मंडळींचा इतके दिवसांचा कारभार शिंद्यांच्या दौलतीचा फायदा करणारा होता किंवा त्यांच्या जागीं जे मराठे मुत्सद्दी आले, त्यांचा होणारा कारभार शिंद्यांच्या दौलतीचें कल्याण करणारा होणार होता, याची कल्पना दौलतरावांना मुळींच नव्हती. बाजीरावांप्रमाणें दौलतराव हेही कारभाऱ्यांच्या विचारसरणीच्या ओघांतून सरळ वाहत जाणारे लांकडाच्या ठोकळ्याप्रमाणें होते यांत संशय नाहीं.

९. नानांच्या नादीं लागून दौलतरावांनीं सर्व शेणवी मंडळींवर जो कहर उडविला तो शिंद्यांच्या दौलतींतील बहुतेक लोकांना आवडला नाहीं. जिवबादादांचे पुत्र नारायणराव यांच्यावर त्या सर्व लोकांची फारच भिस्त होती. शिंद्यांच्या फौजेंतील सर्व लोक त्यांच्याकरतां पाहिजे तें करावयाला तयार होते. नारायणरावांस निष्कारण कैद केल्यामुळें सर्वांनीं नेट धरून दौलतरावांचे चांगले डोळे उघडावे असा त्यांनीं निश्चय केला. शिंद्यांच्या फौजेंतील फिरंगी गोरे लोकांच्या कंपूतील लोकांनीं व घोडदळांतील मराठी सैन्याच्या लोकांनीं नारायणरावांस मुक्त करण्याबद्दल दौलतरावांस निकड लाविली. त्यांनीं दौलतरावांना निर्वाणीची एकच गोष्ट सांगितली: 'नारायणरावांना कैदेतून तावडतोब मोकळें करावें. तसें न झाल्यास आम्हीं सर्वजण नोकऱ्या सोडून निघून जाऊं. आम्हांस निरोप द्यावा.[1]' याप्रमाणें शिंद्यांच्या फौजेंतील लोकांनीं सत्याग्रह सुरू केल्यामुळें दौलतराव पेंचप्रसंगांत सांपडले. त्यांचीं सर्व राजकारणें पुण्यास याच फौजेच्या बळावर चालणार होतीं. तीच फौज जर या वेळीं बिथरून निघून गेली तर पुढें कसें हा एक प्रश्न दौलतरावांपुढें उभा राहिला. या परिस्थितींत नाना आपणाला प्रामाणिकपणानें मदत करतील असा विश्वास त्यांना

---

१ जि. दा. बक्षी यांचें चरित्र. पान ४९३. ले. नं. २३४.

वाटणें शक्य नव्हतें. दुसरें असें कीं, नारायणरावांना मोकळें करून पुन्हां कारभारांत घ्यावें तर नाना रुष्ट होऊन आपल्यावर कोणता तरी दुर्धर प्रसंग खात्रीनें आणतील याचीही भीति त्यांना वाटत होती. अशा परिस्थितींत दौलतरावांनीं आपल्या फौजेंतील लोकांची व नानांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण तो उभयपक्षीं निष्फळ झाला. या वाटाघाटींत सुमारें पावणेदोन महिने गेले. महादजी शिंद्यांच्या बायका व रक्षा यांच्यावर शेणवी मंडळींचें चांगलेंच वजन [1] होतें. नारायणरावादि मंडळींना दौलतरावानें कैद केलें ही बातमी त्यांना समजतांच त्यांच्या सुटकेकरतां त्या पुण्यास आल्या. त्या बायकांच्या आज्ञेंत शिंद्यांच्या सर्व कंपूतील लोक व सरदार असल्याचें दिसून आल्यामुळें नानांनीं त्या बायकांकडे संधान बांधलें व शेणवी मंडळींस मोकळें न करण्याबद्दल खटपट चालविली. परंतु शेणवी मंडळी त्या बायकांच्या पूर्वविश्वासांतील असल्यामुळें नानांच्या मध्यस्थीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्या बायका शेणवी मंडळींच्या वर्तीनें आल्यामुळें दौलतरावांसह नानांचा पक्ष कमजोर झाला. शेवटीं त्या बायका व शिंद्यांच्या फौजेंतील लोक अगदींच निकरावर आले असें पाहून दौलतरावांनीं नानांचा पक्ष सोडला व आ ण नारायणरावांची मुक्तता करतों असें त्यांनीं त्यांना सांगितलें. 'त्याजवर फौजेची समजूत करून नारायणराव यांस समजाविसी करून आणिलें.' त्यास छ. २४ जिल्काद भृगुवारीं (तारीख २२ मे इ. स. १७९७ रोजीं) प्रहर दिवसास त्रिवर्ग यांस लष्करांत घेऊन आले. सामोरे फौजसुद्धां घाटगे व बाणाजी सेटे व फकीरजी गाडवे एक कोशपर्यंत गेले होते. छत्रीपाकेतों राजश्री शिंदे (दौलतराव) आडवे जाऊन भेटी जाहल्या. नंतर तिसरेप्रहरीं बक्षीचीं वस्त्रें व शिरपेंच व मोत्यांची कंठी रावजीस (नारायणरावांस) दिल्ही. पेशजीप्रमाणें चोपदार व सरंजामसह जे वोडीं सुा समारंभें घरीं पोहोंचविले[2]' याप्रमाणें दौलतरावांनीं शेणवी मंडळीचे जे प्रमुख जिवबादादांचे

---

१ ऐ. ले. सं. पान ५१४७. नं. १९७७. २. जि. दा. बक्षी यांचें चरित्र पान ४९४. ले. नं. २३६.

पुत्र नारायणराव यांस कैदेंतून मुक्त करून त्यांचा मोठा सन्मान केला व त्यांना पुनः आपल्या बक्षीपदावर कायम केलें. या सर्व प्रकारामुळें नानांच्या अंगाचा तीळपापड उडाला व त्यामुळें नाना व शिंदे यांच्यामधील राजकारणाच्या स्पर्धेला निरनिराळ्या दिशेनें तोंड लागलें.

१०. नगरच्या किल्ल्यावरून या वेळीं नारायणराव बक्षी, सदाशिव मल्हार व देवजी गौळी यांस बंधमुक्त करून पुण्यास आणलें. त्यावेळीं 'ज्या गृहस्थांनीं (नाना फडनविसांनीं) ही गोष्ट (शेणवी मंडळींस कैदेंत टाकण्याची) केली; त्याचें पारपत्य जाहालें पाहिजे[1]' असा त्याचा संकल्प झाला होता. पेशव्यांच्या कारभारांतून नानांची हाकालपट्टी केल्याशिवाय पेशवाईचा कारभार सुरळीत चालणार नाहीं असा या शेणवी मंडळींचा ग्रह होऊन बसला व त्या मसलतीला अनुसरून त्यांच्या राजकारणाचें धोरण सुरू झालें. या शेणवी मंडळींच्या कारस्थानामुळें आपली प्रत्येक मसलत फसते, म्हणून त्यांना कैदेंत कायमचें डांबून टाकल्याशिवाय शिंदे आपल्या लगामीं पूर्णपणें येऊन आपला कारभार सुरळीत चालणार नाहीं, हें नानांनीं पक्कें हेरलें असल्यामुळें त्याप्रमाणें ते आपल्या कारस्थानाची पुढील रचना करूं लागले. नारायणरावांची मुक्तता झाल्यावर थोड्याच दिवसांनीं (प्रकरण ३३ च्या शेवटीं निर्दिष्ट केल्याप्रमाणें) नाना, पेशवे, भोंसले, निजाम व शिंदे यांचा जो समेट झाला तो वरील धोरणाला अनुसरूनच होता. 'चोराच्या मनांत चांदणें' या म्हणीप्रमाणें नानांना शेणवी मुत्सद्यांची एकच भीति वाटत होती. ती म्हणजे ही मंडळी नगरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवलेल्या मोरोबादादांना बंधमुक्त करून त्यांना आपले प्रतिस्पर्धी म्हणून उभे करतील व फडनविशीच्या कारभाराचा, सरंजामाचा व वेतनाचा इतके दिवस नाना एकटेच जो उपभोग घेत होते त्यांत भाऊबंदी तंट्याचा उगम करतील. नारायणराव नुकतेच नगरच्या किल्ल्यांतून सुटून आल्यामुळें व बाळोबातात्याही त्याच ठिकाणीं कैदेंत असल्यामुळें शेणवी मंडळींचें तेथें वरील नवीन कारस्थान उत्पन्न झालें असलें पाहिजे अशी नानांना

---

१. जि. दा. बक्षी यांचें चरित्र पान ४९४. ले. नं. २३५.

शंका आली व ल्गोंच बंदोबस्त करण्याचाही त्यांनीं प्रयत्न चालविला. ' राजश्री दादा गद्रे अहमदनगरांतील गृहस्थास (मोरोबादादांस) काढून त्रिंबकच्या किल्लयास आणावयाकरितां नगरास परभारांच मशीराचे लष्करांतून गेले.'[१] ही हकीकत तारीख ७ जून सन १७९७ ची ह्मणजे नारायणराव नगरच्या किल्लयांतून बंधमुक्त होऊन आल्यानंतर फक्त पंधरा दिवसांचीच आहे. यावरून नानांच्या धोरणाचा विचार करतां ते पेशव्यांच्या कारभारांतील आपलें स्थान अढळ ठेवण्याकरतां किती दक्ष होते हें दिसून येतें. महाडच्या कारस्थानाप्रीत्यर्थ निरवानिरव करण्याचा जो नाना, शिंदे, भोंसले व निजाम यांच्यामधील समेट तारीख २० जून सन १७९७ च्या दरम्यान झाला, त्या वेळीं निजाम व भोंसले यांनीं बाजीरावांकडून नानांचा कारभार सुरळीतपणें चालवूं अशा मजकुराचें तार्जे करारपत्र नानांकरतां लिहून घेतलें होतें. स्वतःचें स्थान अढळ राहण्याबद्दल नानांनीं बाजीरावांकडून पूर्वींही असाच एक लेख घेतला होता. त्या लेखासही भोंसले-निजामाची जामिनकी होती. एकंदरींत नानांच्या कारस्थानाचें सर्व धोरण पहातां पेशव्यांच्या राज्यांत काय वाटेल ती क्रांति जरी झाली तरी नानांना त्याचें शुभाशुभ नव्हतें. फक्त आपलें स्थान अढळ राहिलें ह्मणजे झालें एवढाच त्यांच्या कारस्थानाचा इत्यर्थ होता असें दिसून येतें. पेशवाईचा एकतंत्री कारभार हा नानांचा आत्माच होऊन बसला होता आणि ह्मणूनच ते त्या कारभाराला सारखे चिकटून राहण्याचा डोळ्यांत तेल घालून प्रयत्न करीत होते.

---

१ ऐ. ले. सं. पा. ५१५३, नं. ३९८६.

प्रकरण ३६ वें.

घाटग्यांमार्फतचा गुप्त करार.

इ. स. १७९७.

१. शिंद्यांनीं पुण्याहून निघून जावें याबद्दल नानांची खटपट. नानांच्या ताब्यांत जाण्याचा प्रसंग येऊं नये व शिंद्यांचें आपल्याला कायम संरक्षण मिळावें म्हणून बाजीरावांचा प्रयत्न.—२ नानांचें वर्म मोरोबादादा आहे हें शेणवी मुत्सद्दी जाणून होते म्हणून त्यांनीं नगरच्या किल्ल्यावरून मोरोबादादा रायगडास जाऊं नयेत यासाठीं बाजीरावांचेकडून खटपट चालविली. यांस नगरचा किल्लेदार अनुकूल होतो.—३ नाना व शिंदे एक झाल्यामुळें मोरोबादादांस नानांच्या मनुष्याच्या स्वाधीन करावें असें पत्र बाजीरावांस नाइलाजानें नानाकडे लिहून द्यावें लागलें. नगरचा किल्ला सोडावयास मोरोबादादा तयार नसल्यामुळें नानांच्या माणसांकडून त्यांचेवर बलात्कार सुरू होतो.—४ मोरोबादादांचा त्रागा. त्यांचें संन्यासग्रहण. नानांचे लोक मोरोबादादांची विटंबना करतात. या प्रकारामुळें बाजीराव उदास होतात. शेवटीं मोरोबादादांस रतनगड किल्ल्यावर नेऊन नाना कैदेंत ठेवतात.—५ नाना व मोरोबादादा हे पेशव्यांच्या फडनविशीचे सारखे हक्कदार कसे होते याबद्दलचा पूर्वेतिहास. नाना आपल्या स्वार्थाआड येणाऱ्या प्रत्येक मनुष्यास यमदंडाच्या वरवंट्याखालीं कसें एकजात चेंगरीत होते?—६ पेशव्यांचें राजकारण नाना व शिंदे हवलीत असतां बाजीरावांचें माहात्म्य कांहींही राहिलें नव्हतें.—७ फोडा व झोडा हें धोरण नानांनीं शेणवी मुत्सद्दीमंडळी आणि शिंदे व बाजीराव यांच्या बाबतींतही कसकसें अमलांत आणलें याची हकीकत.—८ बाजीरावांच्या विनंतीवरून दौलतराव शिंद्यांनीं स्वदेशी जाण्याचें कां रहित केलें यासंबंधींची हकीकत.—९ नानांचें पारिपत्य करण्याची बाजीरावांबरोबर शिंद्यांनीं कां अट घातली होती?—१० शिंद्यांनीं बाजीरावांबरोबर केलेल्या करारांतील मुख्य दोन अटी. घाटग्यांमार्फत शिंद्यांबरोबर बाजीरावानें केलेला गुप्त करार.—११ या गुप्त करारासंबंधीं शंका व अनुमानें. बाजीरावांना गादीवर बसवून ७।८ महिने झाले तरी घाटग्यांच्या मुलीबरोबर शिंद्यांचें कां लग्न झालें नाहीं व घाटग्यांना शिंद्यांचें दिवाणपद

कां मिळूं शकलें नाहीं, यासंबंधींची पहिली शंका व त्यावरील अनुमान.—१२ नानासारख्या पाताळयंत्री मुत्सद्यास शिंदे व बाजीराव यांच्या गुप्त कराराची शेवटपर्यंत बातमी कां लागली नाहीं यावरून निघणारी दुसरी शंका व अनुमान. बाजीरावांनीं शिंद्याबरोबर केलेला गुप्त करार जर पूर्वीच झाला असतां तर बाजीरावांना नानांच्या ताब्यांत देऊन शिंद्यांना स्वदेशी जातां आलें असतें काय, याबद्दलची तिसरी शंका व त्यावरील अनुमान.—१३ या गुप्त कराराची क्लृप्ति केव्हां निघाली असावी याबद्दलचें अनुमान.—१४ महाडच्या कारस्थानांत शिंद्यांना वश करून घेण्याकरतां नानांनीं योजलेला जालीम उपाय. त्याकरतां नानांनीं केलेले करार पुढें त्यांना कां मोडावे लागले.—१५ घाटग्यांची मुलगी करवीरच्या महाराजांकडून शिंद्यांस मिळूं नये, म्हणून नानांनीं तिला कशी दडवून ठेवली यासंबंधींचें पत्र.—१६ परशुरामभाऊ पटवर्धन यांस मुक्त करावें अशी नानांची इच्छा नसतां, शिंदे त्यांच्या मुक्ततेबद्दल बाजीरावांकडे कां खटपट करीत होते? बाजीराव, शिंदे, घाटगे व नाना यांना आपापलीं उद्दिष्टें साधण्याबद्दल लागलेली तळमळ व त्याचीं कारणें.—१७ घाटग्यांमार्फत ठरलेला करार केव्हां अस्तित्वांत आला याबद्दलचें अनुमान. बाजीरावांस शिंद्यांबरोबर कराव्या लागणाऱ्या नवीन करारांचीं कारणें.

१. शिंद्यांनीं पुणें सोडून हिंदुस्थानांत आपल्या जहागिरीवर जावें म्हणून नानांनीं त्यांच्यावर जादुटोण्याचे प्रयोग केले; परंतु ते निष्फळ झाले. तेव्हां त्यांनीं शिंद्यांस पुण्याहून घालविण्याचे निराळे उपाय चालविले. शिंदे निघून गेल्याशिवाय बाजीराव आपल्या कह्यांमध्ये पूर्णपणें येणार नाहीं असें नानांचें ठाम मत बनलें होतें. बाजीराव यांनींही आपण नानांच्या तावडींत सांपडावयाचें नाहीं असा पूर्वींपासून निर्धार केला होता. आपणास शिंद्यांचें नेहमीं संरक्षण मिळावें म्हणून दोन कोट रुपये देण्याचा गुप्त करार बाजीराव यांनीं सर्जेराव घाटगे यांचेमार्फत शिंद्यांबरोबर केला होता. त्याप्रमाणें शिंद्यांनीं या वेळेपर्यंत बाजीराव यांचें सर्व बाजूंनीं संरक्षण केलें होतें. तारीख

२० जून सन १७९७ च्या दरम्यान नाना, निजाम, भोंसले व शिंदे यांच्यामध्यें जो समेट घडून आला, त्यामुळें महाडच्या कारस्थानांत नानांना मदत केल्याबद्दल शिंद्यांना अहमदनगरचा किल्ला व दहा लाखांची जहागीर मिळाली. ही जहागीर व नगरचा किल्ला नानांकडून शिंद्यांना मिळाला असतां तर त्यांना पुण्यास राहण्याची दुसरी सबब नानांना सांगता येण्यासारखी नव्हती. शिंद्यांना नानांकडून ही जहागीर व नगरचा किल्ला आपल्या पदरांत पाडून घ्यावयाचा होता. शिवाय बाजीराव यांस वचन दिल्याप्रमाणें त्यांचें संरक्षण करून त्यांचेकडून दोन कोट रुपयेही मिळवावयाचे होते. यामुळें नाना आपला डाव साधण्याकरतां व शिंदे आपली मसलत पार पाडण्याकरतां आपापल्या बुद्धिमत्तेचे खेळ खेळत होते.

२. या वेळीं नानांच्या मसलतीस योग्य सामना देणारी नारायणराव बक्षी आदिकरून शेणवी मुत्सद्दी मंडळी नुकतीच कैदेंतून मुक्त होऊन शिंद्यांच्या कारभारांत आली होती. त्यांच्या मनांत नानांबद्दल वैमनस्य उत्पन्न झालें होतें. ते नगरच्या किल्ल्यावर कैदेंत असतांना तेथेंच कैदेंत असलेले मोरोबादादा फडनविस, बाळोबा तात्या वगैरेंच्या मतानें असा मनसुबा ठरला होता कीं, नानांना पेशव्यांच्या कारभारांतून काढून त्यांच्या जागीं मोरोबादादांची स्थापना करावयाची. या मनसुब्यास अनुसरून शेणवी मंडळी शिंद्यांच्या कारभारांत पुन्हां आल्यावर त्याप्रमाणें त्यांची खटपट सुरू झाली. शिंदे पुणें सोडून केव्हां जातील असें नानांना झालें होतें. नगरचा किल्ला रिकामा करून त्यांचे ताब्यांत दिला तर शिंद्यांना तक्रार करावयास मार्ग राहणार नाहीं, म्हणून त्यांनीं नगरचा किल्ला ताबडतोब रिकामा करविण्याचा निश्चय केला. या वेळीं तेथें मोठमोठे राजकैदी नानांच्या बंदिवासांत होते. त्यांना निरनिराळ्या किल्ल्यावर बंदोबस्तानें ठेवण्याची व्यवस्था नानांना करणें भाग होतें. नानांचे चुलत बंधु मोरोबादादा फडनविस हे त्याच किल्ल्यावर नानांच्या कैदेंत होते. नानांना हे एकटेच अव्वल दर्जाचे प्रतिस्पर्धी त्यांच्या घराण्यांत होते. मोरोबादादास त्या किल्ल्यांतून काढून रायगडास नेऊन ठेवण्याबद्दल नानांनीं दादा गद्रे यांस तिकडे पाठविलें.

ही बातमी शिंद्यांच्या कारभारी मंडळींस समजतांच मोरोबादादा हें नानांचें वर्म आहे, त्याला आपल्या हातचा जाऊं देतां कामा नये, ह्मणून त्यांनीं बाजीरावाकडे मसलत सुरू केली. त्या मसलतीचा सारांश एवढाच होता कीं, जोंपर्यंत मोरोबादादा नगरच्या किल्ल्यावर आहेत, तोंपर्यंत तो किल्ला नाना शिंद्यांच्या ताब्यांत देऊं शकणार नाहींत. मोरोबादादांना काढून नगरचा किल्ला नानांनीं रिकामा करून शिंद्यांच्या ताब्यांत एकदां दिला, ह्मणजे शिंद्यांना पुण्यास दुसऱ्या कोणत्याच सबबीवर राहतां येणार नाहीं. शिंदे एकदां पुणे सोडून स्वदेशीं निघाले ह्मणजे बाजीरावांचें शिंद्यांना संरक्षण करतां येणार नाहीं. त्यांना सर्वस्वी नानांच्याच संरक्षणाखालीं ह्मणजे पर्यायानें नानांच्याच बंदिवासांत रहावें लागेल. तेव्हां मोरोबादादा नगरचा किल्ला सोडणार नाहींत, अशी व्यवस्था करणें बाजीराव साहेबांच्या हिताचें आहे. हा शिंद्यांच्या कारभाऱ्यांचा मंत्र बाजीराव यांस आत्मसंरक्षणाचा वाटला व त्याप्रमाणें त्यांनीं नगरच्या किल्लेदारास गुप्त प्रकारें निरोप पाठविला कीं, 'नानांचा माणूस येईल त्याच्या हवालीं मोरोबांस करूं नये.' एवढें पाठबळ मोरोबांस मिळतांच त्यांनीं दादा गद्रे यांस साफ सांगितलें कीं मी या किल्ल्यावरून साफ हालणार नाहीं. नगरच्या किल्लेदारानेंही दादा गद्रे यांस सांगितलें कीं, मोरोबाची खुशी असेल तर त्यानें खुशाल जावें. तुह्मीं सक्तीनें नेऊं ह्मणाल तर मी तसें करूं देणार नाहीं. या प्रकारामुळें नाना शिंद्यांच्या कारभाऱ्यांच्या पेंचप्रसंगांत सांपडले.

३. पण अशा पेंचप्रसंगांतून नाना कित्येक वेळां पार पडले होते. त्यांनीं शिंद्यांच्या कारभारी शेणवी मुत्सद्यांवर व मोरोबादादांवर मात करणारा मनसुबा तयार केला. नानांनीं अमृतरावांचें मोहरें त्यांना शह देण्याकरतां पुढें आणलें. नानांचें पाठबळ मिळतांच अमृतराव यांना वाचा फुटूं लागली. ते ह्मणूं लागले कीं, पेशवाईचा कारभार करण्याचा हक्क नानांचा नसून तो माझा आहे. हा त्यांचा हक्क बाजीरावांसुद्धां सर्वांस अमान्य करतां येण्यासारखा नव्हता. "नाना जवळ द्रव्य आहे, ते सरकारी खजिन्यांतून त्यांनीं

नेलेलें आहे. तें त्यांनीं शिंद्यांच्या फौजेचें देणें फेडण्याकरतां कां देऊं नये? सवाईरावसाहेब लहान होते, तोंपर्यंत नानांनीं कारभार केला हें ठीकच झालें. पण आतां आम्हीं आमचा कारभार पहाणारे झालों, त्याअर्थीं कारभाराचीं सूत्रें आमच्या हवालीं करून आपली फडणिशी संभाळून त्यांनीं रहावें, व सरकारी पैसा दाबून ठेवला आहे तो सरकारच्या आज्ञेप्रमाणें शिंद्यांस देऊन, त्यांची हिंदुस्थानाकडे रवानगी होईल असें करावें [१]" याप्रमाणें नानांनीं अमृतराव यांस वाचा फोडतांच बाजीराव व शिंदे यांच्या तोंडास पाणी सुटलें. अमृतराव यांच्या तोंडास मधाच्या बोटाची गोडी आली. शिंद्यांचे शेणवी कारभारी व मोरोबादादा यांच्या तोंडचें पाणी पळालें. नगरचा किल्ला व पंधरा लक्षांची जहागीर तावडतोब शिंद्यांच्या पदरांत पडते ह्मणून ते नानांना सामील झाले. शिंदे व नाना एक झाल्यामुळें बाजीराव यांना त्यांच्या मनाप्रमाणेंच वागणें प्राप्त होतें. नानांनीं हा मनसुबा अशा प्रकारें तयार केल्यावर नानांनीं बाजीराव यांचेकडून नगरच्या किल्लेदारास पत्र लिहून घेतलें. त्यांत मोरोबांस नानांचा माणूस येईल त्याच्या हवालीं करावें असा मजकूर होता. तें पत्र घेऊन दादा गद्रे व बजाबा शिराळेकर हे चार हजार फौजेसह नगरास गेले. त्यांनीं बाजीरावांचें पत्र किल्लेदारास दिलें. त्यामुळें त्याचें तोंड बंद झालें. परंतु मोरोबादादा नगरचा किल्ला सोडण्यास तयार झाले नाहींत, ह्मणून त्यांच्यावर दादा गद्रे व बजाबा यांनीं सक्ति सुरू केली.

४. "रा. मोरोबादादांस बलात्कारें घेऊन जातात ऐसें समजलेवर त्यांनीं शिखा सूत्र वस्त्र तिन्हीं टाकलीं, आणि मग किल्ल्याखालीं आले! परमहंस दीक्षा घेतली. मोरोबादादा उपोषण करितात. पांच जाहलीं. येथें पुण्यांत त्यांची स्त्री अन्न घेत नाहीं. दोन रोज जाले." "मयूरपंत यांणीं सांगितलें कीं, जर मला जबरदस्ती करून महाडास नेऊं लागलां तर एक प्राणत्याग, अथवा चतुर्थाश्रम करीन! ऐसें ह्मणत असतांही गद्रे यांणीं आपल्या राहुटींस आणून ठेविले आहेत. दादाचें 'ह्मणणें आहे कीं, येथून 'मला महाडास न्यावयासाठीं उचललेंत तर प्रेषोच्चार स्वयमेव 'करितों. श्रीमंत

१. ऐ. ले. सं. पा. ५१८२.

(बाजीराव) बहुत दिलगीर आहेत. कांहीं चालत नाहीं. शिंदे यांजकडे जातात. ते म्हणतात कीं, आम्हीं नानांस वचन दिलें आहे. त्यापेक्षां मोरोबांस नाना कां नेईनात? ऐसें स्पष्ट विदुर बोलतात. मग यांचें (बाजीराव यांचें) काय महात्म्य आहे तें कळतच आहे ! श्रीमंत मध्यम यांचें कोणतेंही स्थिर ठीक नाहीं. येथील कारभाऱ्यांचा (नानांचा) कृतसंकल्प आहे कीं, संन्यास जरी घेतला तरी (मोरोबांस) सोडावयाचें नाहींत. तैसेंच संन्याशांनीं महाडास रहावें. ऐसा रंग दिसतो. ऐसा प्रकार घडला आहे. जर शिंदे यांचें अंग कांहीं मयूराकडे असतें तर ठीक पडतें. तें कांहीं नाहीं. ते लोभाविष्ट आहेत. तूर्त पंधरा लक्षांची जहागीर व नगरचा किल्ला प्राप्त होत आहे, मग त्यांनीं कां बोढावें?" शेवटीं मोरोबांस दुसरीकडे नेऊन ठेवण्याचा निश्चय पक्का ठरला. त्यांनीं संन्यास घेतला तो रागानें घेतला, सबब तो खरा नव्हे, असें ठरून संन्यास रद्द झाला. "महाडास म्हणजे रायगडास पूर्वीं सखारामबापू मृत्यु पावलेला आहे. सबब मी तेथें जाणार नाहीं" एवढा मात्र मोरोबांचा हेका चालला व त्यांस रायगडास नेण्याचें रहित होऊन रतनगडावर कैदेंत ठेवण्यांत आले.[१]

५. मोरोबादादांच्या या प्रकारावरून पुढील गोष्टी सहज सूर्यप्रकाशांत येतात. (१) मोरोबादादा हा नानांचा सख्खा चुलतभाऊ असून तो आपल्या अधिकाराच्या आड येत असल्यामुळें त्याची कोणत्याच प्रकारें दयामाया न करतां त्याला पूर्णपणें नामशेष करण्याचा नानांचा कृतसंकल्प झाला होता. मोरोबादादा हे पेशव्यांच्या फडनविशीचे वडील घराण्याचे मुख्य हक्कदार होते. यांचें भानु हें घराणें पूर्वीं रत्नागिरी जिल्ह्यांत वेळास या गांवीं रहात होतें. यांचा मूळपुरुष महादाजी कृष्ण भानु हा होता. त्याला नारायण, हरी, रामचंद्र व बळवंत असे चार मुलगे होते. महादाजीपंत निवर्तल्यावर नारायण हा आपल्या त्रिवर्ग सावत्र बंधूंपासून आपली वांटणी घेऊन विभक्त झाला. नंतर बाळाजी विश्वनाथ पेशवे यांनीं हरी, रामचंद्र व बळवंत या त्रिवर्ग

---

१. ऐ. ले. सं. पा. ५१७८.

बंधूस कोंकणांतून देशावर आणलें. इ. स. १७१४ मध्यें शाहुमहाराजांनीं बाळाजी विश्वनाथ यांस पेशवाईचीं वस्त्रें दिलीं; त्या प्रसंगीं हरी महादाजी भानु यांस बाळाजी विश्वनाथ यांनीं फडनविशीचीं वस्त्रें दिलीं. त्या वेळेपासून ज्याप्रमाणें बाळाजी विश्वनाथ यांचे वंशज मराठी राज्याचे पेशवे झाले त्याचप्रमाणें भानु घराण्याचे वंशज मराठी राज्याचे फडनविस झाले. हरी महादाजी हे पुढें थोड्याच दिवसांनीं मृत्यु पावले. त्यांना पुत्रसंतान नव्हतें, म्हणून त्यांची फडनविशी रामचंद्र महादाजी व बळवंत महादाजी यांचेकडे आली; परंतु बाळाजी विश्वनाथ यांचे स्वारीबरोबर बळवंत महादाजी हे जात असल्यामुळें तेच फडनविशीचें काम पाहूं लागले. बळवंत महादाजी निवर्तल्यावर पेशव्यांनीं रामचंद्र महादाजी यांस फडनविशीचीं वस्त्रें दिलीं. पुढें इ. स. १७२४ मध्यें रामचंद्र महादाजी हे मरण पावले त्यांस बाबूराव व बळवंत महादाजी यांस जनार्दन असे पुत्र होते. बाबूराव व जनार्दन हे पांच साडेपांच वर्षांचे असतांनाच रामचंद्र महादाजी हे मरण पावल्यामुळें त्यांच्या फडनविशीचें काम त्यांच्या एका आप्ताकडून पेशवे घेऊं लागले. पुढें हे दोघे मुलगे मोठे झाल्यावर आपल्या दरकाचें काम स्वतःच पाहूं लागले. नानासाहेब पेशवे, रघुनाथरावदादा, किंवा सदाशिवरावभाऊ यांनीं जितक्या म्हणून स्वाऱ्या केल्या त्यापैकीं प्रत्येक स्वारीबरोबर बाबूराव रामचंद्र किंवा जनार्दन बल्लाळ (बळवंत) या दोघांतून कोणास तरी नेहमीं जावें लागे. बाबूराव रामचंद्र व जनार्दन बल्लाळ हे एकत्रच रहात होते. बाबूराव यांचा मुलगा मोरोबा व जनार्दनपंत यांचा मुलगा नाना हेही एकत्रच होते. त्यांच्या वतनी, सरंजामी वगैरे मिळकतीची वांटणी झालेली नव्हती. पेशव्यांच्या फडनविशीवर दोघांचाही सारखा हक्क होता. मोरोबादादा व नाना हे वयानें जवळजवळ सारखेच होते. मोरोबा हे नानांना लहानपणापासून प्रतिस्पर्धी वाटत होते. सदाशिवरावभाऊंनीं आपले पुतणे विश्वासराव व माधवराव यांच्याजवळ मोरोबा व नाना या दोघांना ठेऊन त्यांचा मोठ्या आस्थेनें विद्याभ्यास करवून घेतला. मोरोबा

व नाना यांचे स्वभाव भिन्नभिन्न होते. मोरोबांचा स्वभाव द्रूड व धाडसी असून ते अंगानें चांगले धष्टपुष्ट होते. त्यामुळें घोड्यावर बसणें, दांडपट्टा, कुस्ती वगैरे शारीरिक व्यायामाची त्यांना हौस असें आणि ते त्या कलांत लवकर तयार झाले. नानांचा स्वभाव पहिल्यापासून एकलकोंडा व भिडस्त असे आणि त्यांची शरीरयष्टीही मजबूत नव्हती. त्यामुळें शारीरिक व्यायामाचा त्यांस कंटाळा येई. साळा वर्षांचें वय होण्यापूर्वीच त्यांचेवर विषयवासनेचा भयंकर पगडा बसला.[१] अशा प्रकारें मोरोबा व नाना यांच्या स्वभावांत जमीनअस्मानचें अंतर होतें. पुढें मोरोबा व नाना हे उभयतां पेशव्यांच्या कारभारांत शिरले. पुढें नानांनीं मोरोबादादांना आपल्या कपटकारस्थानानें कसें कारागृहांत अडकविलें हा इतिहास मागें आलाच आहे. फडनविशीच्या कारकुनीचें सालिना उत्पन्न लाखों रुपयांचें असून तें मोरोबादादांस कैदेंत ठेऊन आजपर्यंत नाना एकटेच खात होते. स. १७७८ पासून अखेरपर्यंत नानांनीं हाच क्रम चालविला. नानांनीं मोरोबादादांची सर्व बाजूंनीं अप्रतिष्ठा केली. त्यांची सर्व मालमत्ता लुबाडली. त्यांचा अधिकार हिसकावून घेतला व त्यांना शेवटपर्यंत भयंकर कारागृहवास भोगावयास लाविला. एकंदरींत नानांनीं मोरोबादादांच्या बाबतींत जें धोरण, जो मार्ग व जी क्रूर वृत्ति दाखविली त्यावरून पहातां नानांच्या स्वार्थाच्या आड येणाऱ्या प्रत्येक मनुष्याला मग तो भाऊ, धनी, स्नेही, कोणीही असो त्याची जात, त्याचा अधिकार, त्याचें आजपर्यंतचे संबंध वगैरे कांहीं एक न पहातां ते त्याला एकाच यमदंडाच्या वरवंट्याखालीं चेंगरून टाकीत असत.

६. (२) बाजीराव हे पेशव्यांच्या गादीवर जरी बसले तरी त्यांचें कांहींच महात्म्य नव्हतें. हें या मोरोबादादांच्या प्रकारावरून स्पष्टपणें सूर्यप्रकाशांत आलें आहे. पेशव्यांच्या राज्यांतील सर्व राजकारणें या वेळीं नाना व शिंदे कशीं ढवळीत होते व मागें तेहतीसाव्या प्रकरणांत दाख-

१. नाना फडनविस यांचें चरित्र पा. ९

विल्याप्रमाणें बाजीराव हे फक्त पेशवाईच्या शिक्क्यापुरतेच कसे अधिकारी होते हें जास्त स्पष्ट झालें आहे. मोरोबादादांच्या बाबतींत नाना भयंकर अन्याय करीत आहेत, नानांनीं मोरोबादादांची सर्व मालमत्ता, वतन, सरंजाम आणि अधिकार हीं लुबाडून घेऊन आपलें घर भरलें व त्यांना कडक कारागृह-वासांत कुजत ठेवलें हें बाजीरावांना दिसत होतें. हा उघडउघड अन्याय टळावा म्हणून ते आपला मानापमान बाजूला ठेवून मोरोबादादाबद्दल खटपट करीत होते. नानांच्या तर्फे दादा गद्रे यांनीं मोरोबादादांवर ज्या वेळीं बलात्कार सुरू केला त्या वेळीं बाजीराव यांचे अंतःकरणाला फारच दुःख झालें. पेशवाईचे अधिपती या दृष्टीनें बाजीराव यांना नाना व मोरोबादादा हे सारखेच होते. दोघेही फडनविशीचे सारखेच अधिकारी होते. असें असतां केवळ नानांच्या दंडेलीमुळें मोरोबादादांचा निःपात होत आहे हें बाजीराव यांना अगदींच खपण्यासारखें नव्हतें. बाजीराव यांचें मन जातीवंत पेशवे घराण्याचें होतें. त्यांचा देह मात्र नाना व शिंदे यांच्या राजकारणाला पेशव्यांच्या गादीवर बसल्यामुळें विकला गेला होता. "श्रीमंत (बाजीराव) बहुत दिलगीर आहेत. कांहीं चालत नाहीं. शिंदे यांजकडे जातात. ते म्हणतात कीं, आम्हीं नानांस वचन दिलें आहे. त्यापेक्षां मोरोबांस नाना कां नेईनात ? ऐसें स्पष्ट विदुर (शिंदे) बोलतात. मग यांचें (बाजीराव यांचें) काय महात्म्य आहे तें कळतच आहे." मोरोबादादांच्या बाबतींत भयंकर अन्याय होतो आहे, असें खुद्द बाजीराव पेशव्यांना वाटत होतें, म्हणून ते धनी व नोकर यांचें नातें गुंडाळून ठेवून शिंद्यांचेकडे हेलपाटे घालीत होते. पण शिंदे हे धन्याचा शब्द लाथाडून देऊन आणि धन्याच्या मर्जीविरुद्ध पेशवाईच्या दुसऱ्या एका नोकरास-नाना फडनविसांस-वचन दिल्याचें कारण दाखवून त्यांचा मानभंग करीत होते. नाना व शिंदे यांच्या सांपळ्यांत सांपडलेल्या बाजीराव पेशव्यांना मानभंग गिळूनच केवळ स्वस्थ बसावें लागलें नाहीं, तर आपल्या अब्रूचें गांठोडें खुंटीला टांगत ठेऊन या दोघांच्या बलात्कारामुळें नगरच्या किल्ले-

दाराच्या नांवें नानांच्या इसमाच्या ताब्यांत मोरोबांस द्यावें असें स्वदस्तुरचें पत्रही त्यांना द्यावें लागलें. यावरून पेशव्यांच्या राज्याचे धनी कोण व चाकर कोण याचा स्पष्ट उलगडा होतो. नानांनीं घडवून आणलेल्या या सर्व गोष्टी पहातां, लोकदृष्टीनें चांगल्या ज्या गोष्टी ठरल्या, त्या नानांनीं केल्या व ज्या वाईट ठरल्या त्या बाजीराव यांनीं केल्या असाच हिशोब बसतो. यावरून नाना कसे कपटकारस्थानी कलिपुरुष होते व त्यांच्या कलि-कारस्थानाला आजपर्यंतचे मोठमोठे इतिहासकारही कसे बळी पडले हें स्पष्ट दिसून येईल.

७. (३) दौलतराव शिंद्यांनीं नानांच्या चिथावणीमुळें नारायणराव बक्षी आदि करून शेणवी मंडळींना पहिल्यानें कैदेंत टाकलें होतें; परंतु शिंद्यांच्या लष्करांतील सैनिकांच्या सत्याग्रहामुळें व महादजी शिंद्यांच्या बायकांच्या वजनामुळें त्या शेणवी मंडळींस बंधमुक्त करून त्यांना पूर्ववत् आपल्या कारभारांत कसें घ्यावें लागलें हाही इतिहास मागें आलाच आहे. ही शेणवी मंडळी जरी कारभारांत आली, तरी दौलतराव शिंद्यांच्या मनाविरुद्ध ती गोष्ट त्यांना करावी लागली असल्यामुळें, त्यांच्यावर शिंद्यांचा पूर्वींप्रमाणें विश्वास राहिला नव्हता. दौलतराव हे मुत्सद्दी नव्हते. शिवाय ते अल्पवयी असल्यामुळें आपल्या सरदारीचें हिता न हित समजण्याइतका अनुभव त्यांना आलेला नव्हता. शिंद्यांच्या रयासतींतील शेणवी मंडळी ही दौलतरावांचें कल्याण चिंतणारी नाहींत. ती मंडळी केवळ स्वार्थी आहेत, त्या मुत्सद्दी मंडळीमुळें दौलतरावांचें राजकारणांत तेज पडत नाहीं, अशा गोष्टी सांगून नानांनीं दौलतरावांचे कान फुंकले होते. शिवाय त्यांचे जातभाई सर्जेराव घाटगे, बाळोबा कुंजर, फकीरजी गाढवे व बाणाजी शेट्या या इलक्या लोकांना नानांनीं निरनिराळीं आमिषें दाखवून व निरनिराळीं वचनें देऊन महादजीच्या कारस्थानांत त्यांचा उपयोग करून घेतला होता. तेव्हां पूर्वीं दिलेल्या वचनाप्रमाणें त्यांची सोय नानांना लावणें प्राप्त होतें. म्हणून नानांनीं शिंद्यांच्या कारभारांत त्यांचा प्रवेश करून दिला व

दौलतरावांचे हेच खरे कल्याणकर्ते आहेत अशी त्यांची या मोरोबादादांच्या प्रकारावरून खात्री पटवून दिली. नारायणराव बक्षी आदिकरून शेणवी मंडळी जशी मुत्सद्दी होती तशीच ती शूर व पराक्रमी होती. त्यामुळें दुटप्पी कृष्णकारस्थान त्यांना आवडत नव्हतें. त्यांच्या मुत्सद्दीपणाचा एकच सरळ मार्ग होता. शिंद्यांच्या आजपर्यंतच्या सरदारी इभ्रतीस धक्का न लावतां जें राजकारण साधतां येईल तें साधावयाचें एवढाच त्यांचा खरा-खुरा हेतु होता. त्याला अनुसरूनच मोरोबादादांच्या बाबतींत त्यांना मनसुबा करावयाचा होता. नानांच्या स्वच्छंद कारभाराला थोडातरी पायबंद बसावा एवढयाच करतां मोरोबादादा शिंद्यांच्या स्वाधीन असावे असें त्यांना वाटत होतें. याकरतांच त्यांनीं आपल्या मुत्सद्देगिरीचा पाया तसा रचला होता. बाजीराव व शेणवी मुत्सद्दी यांच्या विचाराप्रमाणें जर दौलत-रावांनीं नेट धरला असतां, तर खात्रीनें मोरोबादादा शिंद्यांच्या ताब्यांत आले असते, व नानांचा पक्ष कायमचा लंगडा होऊन बसला असता. नानांनीं हें शेणव्यांचे मुत्सद्दी धोरण ओळखलें व नगरचा किल्ला व पूर्वी दहा लाखांची जहागीर ठरली होती ती पंधरालक्षांपर्यंत वाढवून शिंद्यांची तात्कालिक फायद्याकडे दृष्टि लाविली. पंधरा लक्ष जहागिरीचें व नगरच्या किल्ल्याचें आमिष दाखवून सर्जेराव घाटगे वगैरे आपल्या सहकाऱ्यांकडून नानांनीं जो दौलतराव शिंद्यांवर गळ टाकला त्यांत ते सर्वस्वी अडकले व खुद्द बाजीराव आणि शेणवी मंडळी यांच्या दिलगिरीला कारणीभूत झाले. या प्रकारामुळें शिंद्यांना बाजीराव पेशवे व शेणवी मुत्सद्दी हे आपलें अकल्याण करणारे आहेत असें वाटलें. सर्जेराव घाटगे वगैरे नानांच्या हलक्या बगलबच्चांवर त्यांचा विश्वास बसला. नानांनीं दौलतरावांची या प्रकारामुळें पुन्हां मुत्सद्देगिरीशीं कायमची ताटातूट करून टाकली. बाजी-राव पेशवे यांच्यावरील त्यांचा विश्वास उडवून लावला. एकंदरींत नानांनीं मोरोबादादांच्या प्रकरणांत देखील कित्येक गोष्टी फोडा व झोडा या त्यांच्या तत्वास अनुसरून कशा साधून घेतल्या व आपलें आसन कसें मजबूत

करून घेतलें हें स्पष्ट सूर्यप्रकाशांत आलें. नानांचें वर्म जे मोरोबादादा त्यांस नानांनीं वरील हकीकतीप्रमाणें नगरच्या किल्ल्यांतून आपल्या स्वाधीन करून घेतलें व त्यांची रवानगी रतनगड किल्ल्यावर तारीख ३१ माहे जुलै सन १७९७ रोजीं केली. नानांनीं अशा प्रकारें बाजीराव व शेणवी मुत्सद्दी यांच्यावर डाव केला व याही प्रसंगीं ते विजयी झाले.

८. पंधरा लक्षांची जहागीर व नगरचा किल्ला दौलतरावांच्या पदरांत टाकल्यानंतर ते हिंदुस्थानांत निघून जातील असा नानांचा कयास होता याचें कारण दौलतरावांनीं नानासमक्ष बाजीराव यांस असें सांगितलें होतें कीं " तुम्हांस गादीवर बसविण्याचें नाना व मी मिळून कबूल केलें, त्याप्रमाणें आमच्या खटपटीनें आपण गादीवर बसलां. आतां आम्ही हिंदु-स्थानांत जातों. नानांच्या सल्ल्यानें आपण राज्यकारभार चालवावा. " या बोलण्यास श्रीमंतांनीं बाह्यात्कारें मान्यता दर्शविली. पण वाड्याभोंवतीं पहाऱ्यावर आमचीं पलटणें आहेत तीं उठवून नेण्याची परवानगी मिळावी असें जेव्हां शिंदे म्हणूं लागले, तेव्हां श्रीमंत बोलले कीं, याचें उत्तर आपण आठचार दिवसांत कळवूं! ही हकीकत इ. स. १७९७ च्या आगष्ट महिन्यांत घडली. त्या गोष्टीस पंधरा दिवस होऊन गेले, शिंद्यांकडून दोन चार निरोप आले, तेव्हां अखेरीस बाजीरावसाहेबांनीं त्यांना सांगून पाठविलें कीं, " तुम्ही पलटणें न्याल तर आम्हीच वाडा सोडून तुमच्या लष्करांत रहावयास येतों! कारण तुम्ही गेल्यावर नाना आमची काय दशा करील याचा भरंवसा आम्हांस मुळींच लागत नाहीं. " बाजीराव नानांस थरकांप भीत होते. राघोबादादा, सदाशिवरावभाऊ, नारायणराव पेशवे, गंगाबाई, सवाईमाधवराव, महादजी शिंदे, सखारामबापू, सखाराम हरी, परशुराम-भाऊ पटवर्धन, मोरोबादादा वगैरे वगैरे अनंत मोठमोठ्या लोकांचे पूर्वी नानांनीं कसे कसे हाल केले व अद्यापही कसे कसे करीत आहेत याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अनुभव बाजीराव यांना होता. नाना केव्हां

व कसा दगा देतील याचा भरंवसा त्यांना वाटेना, ह्मणून ते नानांना थरकांप भीत असत. आत्मरक्षण होत असेल तरच बाजीरावांना पेशवाईपद पाहिजे होतें. शिंद्यांकडून मागून घेतलेल्या आठपंधरा दिवसांच्या मुदतींत बाजीराव यांना शिंदे हिंदुस्थानांत निघून गेले तर आत्मरक्षणाची कोणतीच बळकट बाजू दिसून आली नाहीं, ह्मणून त्यांनीं आपणच वाडा सोडून लष्करांत निघून येतों असा निर्वाणीचा जबाब पाठविला. त्यावर शिंद्यांचें असें ह्मणणें होतें की, 'महाड मुक्कामीं नानांचा व आमचा जो करार झाला, त्यांत श्रीमंतांस गादीवर बसविल्यानंतर नानांनीं आम्हांस एक कोट रुपये रोख द्यावे. त्या कराराप्रमाणें आह्मीं जर कूच करून आज हिंदुस्थानांत जाऊं तर नानांकडून देणें राहिलेली रक्कम आमच्या पदरांत पडूं शकेल. आह्मीं जर श्रीमंतांच्या ह्मणण्याप्रमाणें येथें रहालों तर नानांकडून येणारी बाकी आमची बुडेल. तेव्हां नाना देतात ती रक्कम घेऊन त्यांच्या हवालीं तुह्मांस करून हिंदुस्थानांत जाऊं कीं, तुह्मीं घाटग्यांच्या मार्फत ठरविलेले दोन कोट रुपये आह्मांस देणार? तसें करणार असाल तर नानांचें पारिपत्य करून तुह्मांस निर्भय करितों.' त्यावर श्रीमंतांनीं उत्तर पाठविलें. त्याचा अभिप्राय असा होता कीं, 'मला नानांच्या ताब्यांत देऊन तुह्मी जाल तर माझी धडगत नाहीं. याकरितां नानांस अधिकारभ्रष्ट करून माझें भय दूर करावें, ह्मणजे मी तुह्मांस दोन कोट रुपये मिळवून देतों.' बाजीरावांच्या या ह्मणण्यास शिंद्यांनीं रुकार दिला व त्यांनीं हिंदुस्थानांत निघून जाण्याचें राहित करून पुण्यासच आपला तळ कायम केला.

९. बाजीरावांना या वेळीं आत्मरक्षणाकरतां शिंद्यांची कोणतीही गोष्ट मान्य करणें प्राप्त होतें. शिंद्यांनीं त्यांना नानांच्या स्वाधीन केलें असते तर ते मरेतोंपर्यंत नानांच्या कैदेंत राहिले असते. नानांच्या कैदेंत रहावयास ते बिलकुल तयार नव्हते. शिंद्यांबरोबर ते लष्करांत जाणार होते. पण तसें झालें असतें तर त्यांना नानांनीं पदच्युत करून दुस-

राच कोणी तरी पेशव्यांच्या गादीचा अधिकारी केला असता. अशा स्थितींत शिंदे व बाजीराव यांचा नानांच्या पुणें दरबाराशीं कायमचा तंटा उपस्थित होऊन तो निभावून नेणें शिंद्यांना अवघड झालें असतें. तसेंच शिंद्यांनीं इत:पर पुण्यास राहणें ह्मणजे नानांशीं उघड वैमनस्य उत्पन्न करण्यासारखेंच होणार होतें. हा नवीन मनसुबा नानांना अधिकारभ्रष्ट करूनच साधणार होता, हेंही शिंद्यांना उघड दिसत होतें. याकरतांच बाजीराव यांना निर्भय करण्यासाठीं नानांचें पारिपत्य करण्याची शिंद्यांनीं नवीन अट घातली होती.

१०. या वेळीं बाजीराव यांचें नानापासून संरक्षण करण्याकरतां शिंद्यांनीं ज्या मुख्य दोन अटी घातल्या त्या ह्मणजे (१) नानांना अधिकारभ्रष्ट करून त्यांचें पारिपत्य करणें व (२) घाटग्यांमार्फत जो बाजीराव व शिंदे याच्यामध्यें तह ठरला होता, त्याप्रमाणें बाजीराव यांनीं वर्तन करणें, या होत्या. यांतील पहिल्या अटीचें महत्व काय होतें हें वर आलेंच आहे. आतां दुसरी अट जी घाटग्यांमार्फत शिंद्यांचा बाजीरावांबरोबर तह ठरला होता त्यांतील कलमें काय होतीं हें येथें पहाणें जरूर आहे. तीं कलमें पुढीलप्रमाणें होतीं. ‘ नानांच्या कारस्थानामुळें आम्हांस गादी मिळाल्यावर तुम्हीं नानांच्या सांगण्याप्रमाणें हिंदुस्थानांत जाऊं नये. आम्हांस नानांचें अतिशय भय वाटतें, सबब आमच्या रक्षणाकरितां तुम्ही सर्व फौजेसह पुण्यासच रहावें. या तुमच्या कामगिरीबद्दल आम्हीं तुम्हांस दोन कोट रुपये बक्षीस देऊं. आणि आमच्या सांगण्यावरून जितके दिवस तुम्ही पुण्यास रहाल तितके दिवस तुमच्या फौजेचा खर्च आह्मीं चालवूं. नाना जिवंत असेपर्यंत तुम्ही आम्हांस सोडून दूर जाऊं नये. ’ अशा प्रकारचा करार घाटग्यांमार्फत बाजीरावांनीं शिंद्यांबरोबर केला होता. ह्या करारावरोबर घाटग्यांनींही आपलें स्थान बाजीराव यांचेकडून बळकट करून घेतलें होतें. घाटगे यांना बायजाबाई या नांवाची उपवर व सुंदर अशी मुलगी होती.

दौलतराव शिंदे तिच्या सौंदर्यानें मोहित झाले होते. हें लग्न घडून आल्यास आपला दर्जा वाढेल या बुद्धीनें त्यांची खटपट सुरू होती. शिंद्यांस मुलगी द्यावयाची व त्यांची दिवाणगिरी आपण घ्यावयाची अशी जोडगोळीची कल्पना घाटगे यांची होती. हा आपला स्वार्थ पहिल्यानें घाटगे यांनीं साधून घेतला व नंतर वरील अटीप्रमाणें बाजीरावांस शिंद्यांबरोबर गुप्त तह करूं दिला अशी ऐतिहासिक संगती आजपर्यंत रूढ होऊन बसली आहे. घाटग्यांच्यातर्फे इ. स. १७९६ च्या आक्टोबर महिन्यांत हा जो गुप्त करार बाजीरावांनीं शिंद्यांबरोबर केला होता[१] त्याची माहिती नानांना शेवटपर्यंत म्हणजे इ. स. १७९७ च्या डिसेंबर महिन्यापर्यंत लागली नव्हती.

११. आतांपर्यंतच्या ऐतिहासिक संगतीच्या दृष्टीनें विचार करतां घाटग्यां-मार्फत बाजीरावांनीं जो शिंद्यांबरोबर वरील गुप्त करार केला तो सुमारें वर्ष सव्वा वर्षपर्यंत नानासारख्या पाताळयंत्री मुत्सद्यास न समजतां गुप्त राहील, ही गोष्ट अगदीं अशक्य कोटींतली दिसून येते. म्हणून त्यासंबंधीं येथें विशेष चिकित्सक दृष्टीनें विचार करणें प्राप्त आहे. या बाबतींत खालीं दिल्या-प्रमाणें शंका व अनुमानें निघतात.

१. घाटगे यांच्यातर्फे शिंद्यांबरोबर बाजीराव यांनीं इ. स. १७९६ च्या आगष्ट महिन्यांत जर वरीलप्रमाणें करार केला असतां व त्यांत घाटगे यांचें स्थान बळकट व्हावें म्हणून घाटग्यांनीं आपली मुलगी दौलतराव यांस द्यावी व दौलतरावांनीं घाटग्यांस आपली दिवाणी द्यावी, अशीं कलमें असतीं, तर तीं इ. स. १७९७ च्या आगष्ट महिन्यापर्यंत म्हणजे बाजी-राव गादीवर बसून सात आठ महिने झाले तरी अंमलांत कां येऊं शकलीं नाहींत ? घाटगे हे नानांच्या विश्वासांतले होते. त्यांच्याचतर्फे त्यांनीं शिंद्यांस वश करून घेतलें होतें.[२] असें असतां वरील तहाच्या अटीप्रमाणें बाजी-राव जर घाटग्यांस सामील असते तर घाटग्यांच्या मुलीबरोबर दौलतरावांचें इतके दिवस कां लग्न झालें नाहीं व घाटगे त्यांचे दिवाण कां बनले नाहींत?

---

१. ना. फ. च. पा. १९९. २. मराठ्यांची बखर पान ३२४.

खरें पाहूं गेलें असतां इ. स. १७९७ च्या मार्च महिन्यांत ज्या वेळीं नारायणराव बक्षी आदिकरून शेणवी मंडळींना शिंद्यांनीं नानांच्या चिथावणीवरून तुरुंगांत घातलें, त्याच वेळीं घाटग्यांच्या मुलीबरोबर दौलतरावांचें लग्न व्हावयास पाहिजे होतें व घाटगे शिंद्यांचे दिवाणपदावर चढावयास पाहिजे होते. या वेळीं नाना, बाजीराव, शिंदे व घाटगे एक झाले होते. असें असतां ज्याअर्थी ही महत्वाची गोष्ट घडून आली नाहीं, त्याअर्थी इ. स. १७९६ च्या आगष्ट महिन्यांत वरीलप्रमाणें घाटग्यांतर्फे शिंदे यांच्याबरोबर बाजीरावांनीं कोणत्याच अटी ठरविल्या नसल्या पाहिजेत असेंच अनुमान निघतें.

१२. (२) महाडच्या कारस्थानांत शिंदे, नाना व घाटगे एकचित्त झाले होते. त्या एकोप्यामुळें शिंद्यांनीं आपल्या दिवाणास म्हणजे बाळोबातात्यांस कैद करण्याचा मनसुबा रचला. अशी शिंदे व नाना यांची एकदिलाची वर्तणूक असतां शिंद्यांबरोबर घाटग्यांतर्फे बाजीरावांनीं वरीलप्रमाणें जो करार केला त्याची गंधवार्तासुद्धां नानासारख्या पाताळयंत्री मुत्सद्दास शेवटपर्यंत नव्हती, असें म्हणणें म्हणजे नानांच्या आजपर्यंतच्या धूर्त व कारस्थानी बुद्धिमत्तेला काळिमा फांसण्याप्रमाणें होणार नाहीं काय? वरील करार खरोखर जर शिंद्यांबरोबर बाजीरावांनीं केला असतां, तर तो नानांना समजलाच पाहिजे होता. ज्याअर्थी शेवटपर्यंत नानांना या शिंदे–बाजीराव कराराची बातमी समजली नाहीं, त्याअर्थी हा करार त्या वेळीं झालेलाच नव्हता असें स्पष्ट अनुमान निघतें.

(३) नगरचा किल्ला व पंधरा लक्षांची जहागीर नानांकडून शिंद्यांच्या पदरांत पडल्यानंतर शिंदे ज्या वेळीं हिंदुस्थानांत जावयास निघाले व तसा आपला संकल्प त्यांनीं नानासमक्ष बाजीराव यांस सांगितला, आणि शनिवारवाड्यावरील पहाऱ्यास ठेवलेली आपली पल्टणेंही काढून नेण्याची त्यांनीं बाजीरावांकडे आज्ञा मागितली, त्या वेळीं घाटग्यांमार्फत शिंदे आणि बाजीराव यांच्यामध्यें जर मागें दर्शविल्याप्रमाणें खरोखर सन १७९६ च्या आगष्ट महिन्यांतील गुप्त करार झाला असतां, व नाना जिवंत असेपर्यंत

बाजीराव यांचें संरक्षण करण्याचें वचन जर शिंद्यांनीं त्यांना दिलें असतें, तर बाजीराव यांस नानांच्या स्वाधीन करून, आपण हिंदुस्थानांत निघून जातो असें नानासमक्ष बाजीराव यांस उघड सांगण्याचें धाडस शिंद्यांना झालें असतें काय ? ज्या ठिकाणीं प्रत्यक्ष पेशव्यांच्या जीविताच्या संरक्षणाचा प्रश्न होता व ज्याबद्दल शिंदे बाजीराव यांस वचन देऊन चुकले होते, अशा अत्यंत महत्वाच्या गोष्टीचें शिंदे व बाजीराव या उभयतांसही विस्मरण होणें शक्य नव्हतें. असें असतां शिंदे पुणें सोडून हिंदुस्थानांत जाण्याच्या तयारीला लागले; आपलीं शनिवारवाड्यावरील पलटणें उठवून नेतों असें शिंद्यांकडून बाजीराव यांस दोनचार निरोप आले; शनिवार-वाड्यावरील शिंद्यांचीं पलटणें शिंद्यास नेऊं द्यावीं कीं, नेऊं देऊं नये, याचा जबाब देण्यासाठीं बाजीराव शिंद्यांकडून आठ दिवसांची मुदत मागून घेतात व ती मुदत संपून देखील आठ पंधरा दिवस झाल्यानंतर 'तुम्हीं पलटणें न्याल तर आम्हींच वाडा सोडून लष्करांत रहावयास[१] येतों' असा निर्वाणीचा निरोप पाठवितात व त्या निरोपांत ज्याअर्थीं पूर्वीं घाटग्यां-मार्फत बाजीरावांनीं शिंद्यांबरोबर केलेल्या पूर्वीच्या गुप्त कराराची व शिंद्यांनीं बाजीरावांस त्यांच्या संरक्षणाच्या बाबतींत दिलेल्या वचनाची गंधवार्ताही देत नाहींत, त्याअर्थीं वरील निर्वाणीचा जबाब बाजीरावांनीं शिंद्यांस पाठ-विला त्यापूर्वीं शिंदे व बाजीराव यांच्या दरम्यान् घाटगे यांच्यातर्फे कोणताच करार झालेला नव्हता असें स्पष्ट अनुमान निघतें.

१३. वरील शंका व अनुमानें लक्षांत घेतां बाजीराव यांनीं शिंद्यांस शनिवार वाड्यावरील पलटणें उठवून नेण्याच्याबाबतींत निर्वाणीचा जबाब पाठविण्यापूर्वीं हा घाटग्यांमार्फत गुप्त करार बाजीरावांनीं शिंद्यांबरोबर केलाच नव्हता हें स्पष्ट होतें. आतां हा करार पूर्वीं जर झालेला नव्हता तर तो अस्तित्वांत कां व केव्हां आला हें पहाणें येथें अवश्य आहे. नगरचा किल्ला व पंधरा लक्षांची जहागीर नानांनीं शिंद्यांच्या पदरांत टाकली व एक कोट रुपयांपैकीं बाकी

---

१. ऐ. ले. सं. पान ५१८०

राहिलेली रक्कम पूर्वीच्या कराराप्रमाणें नानांनीं शिंद्यांस देण्याचें ठरविलें, त्या-वेळीं शिंद्यांनीं हिंदुस्थानांत निघून जाण्याचें बाजीरावांचा विचार घेण्यापूर्वीच ठरविलें होतें, हें पुढील पत्रांतील मजकुरावरून दिसून येईल. "श्रावण वद्य द्वितीया बुधवारीं (तारीख ९ आगष्ट सन १७९७) सरकारच्या वाड्यांत अलिजाबहादर शिंदे व श्रीमंत राजश्री नाना ऐसे एकत्र जाहले तेव्हां ते वेळेस अलिजाबहादर याणीं (श्रीमंतांस) सांगितले, आपण व कारभारी (नाना) याणीं एकरूप कारभार करावा. आह्मीं देशास जातों. तिकडे दंगा बहुत. त्याजपक्षीं जातों." तेव्हां नानांनीं सांगितलें कीं, "उत्तम." पलटणांसहि (शनिवारवाड्याभोंवतीं पहाऱ्यावर पलटणें होतीं त्यांस) उठोन येणेंविषयीं चिठी शिंदे यांची आली. नानांनीं (श्रीमंतांस) विनंती केली कीं, नूतन मंडळी (शिंदे यांची पहाऱ्यावरील पलटणें) आहे ही कामाची नाहीं. पूर्वीपासून मंडळी (पेशव्यांच्या हुजुरातींतील बाबूराव फडके यांच्या हाताखालील) तीन पिढ्यांची पदरची आहे. त्यांस जवळ बाळगावें ऐसीं बोलणीं जाहलीं. पलटणवाले याणीं श्रीमंतांस अर्ज केला, "आह्मांस अलिजाबहादर यांचा हुकूम आला, आह्मीं जातों" त्यास चार रोज दम धरणें ह्मणोन मात्र आज्ञा जाहली आहे." हें पत्र तारीख[1] १६ आगष्ट सन १७९७ चें आहे. या पत्रावरून नाना व शिंदे कसे एकचित्त होते व बाजीरावांची संमती न घेतां शनिवारवाड्यावरील आपल्या पलटणांस निघून येण्याबद्दल त्यांनीं कसा हुकूम पाठविला होता हें दिसून येईल. या वेळे-पासून ह्मणजे तारीख १६ आगष्टपासून बाजीराव यांच्यापुढें आत्मसंरक्षणाचा मुख्य प्रश्न उभा राहिला असें स्पष्ट दिसतें. या दिवसापासून शिंदे नानांचें पारिपत्य करीपर्यंत, ह्मणजे तारीख ३१ डिसेंबर सन १७९७ रोजीं नानांना पकडून त्यांना शिंदे कैदेंत टाकीतोंपर्यंतच्या मधील चार महिन्यांच्या काळांत, नानांचें पारिपत्य करण्याचा शिंदे व बाजीराव यांच्या दरम्यान् मनसुबा ठरला असावा व त्याला कांहीं तरी मागील राजकारणाची परंपरा दाखवितां यावी

---

१ ऐ. ले. सं. पान ५२११.

याकरतां घाटग्यांमार्फत मागें केलेल्या कराराची नवीन क्लृप्ति निघाली असावी असें स्पष्ट अनुमान निघतें.

१४. बाजीरावांनीं शिंद्यांबरोबर नानांपासून आपलें संरक्षण व्हावें याकरतां भाषा सुरू केल्यापासून नानांस कैद करीतोंपर्यंत शिंदे व नाना यांच्यामध्यें कोणकोणतीं राजकारणें घडून आलीं व परस्परांचे कारस्थानी डावपेंच कसे कसे लढविण्यांत आले हेंही येथें पहाणें अवश्य आहे. महाडचें कारस्थान यशस्वी करण्याकरतां नानांनीं जे प्रयत्न केले, त्यांत शिंद्यांना वश करून घेणें हा मुख्य प्रयत्न होता. कारण ज्यांना पेशव्यांच्या गादीवर बसवावयाचें ते नवरदेव बाजीराव त्यांच्याच ताब्यांत होते. अर्थात् शिंद्यांना वश करून घेण्यावरच आपल्या कारस्थानाचा मुख्य भर नानांना द्यावा लागला होता. शिंद्यांना वश करण्याचा जालीम उपाय नानांनीं घाटग्यांमार्फत काढला. अल्लड तरुण असलेले दौलतराव शिंदे, घाटग्यांच्या उपवर आणि सुंदर अशा मुलीच्या मोहपाशांत सांपडलेले होते. ह्मणून शिंद्यांना वश करण्याकरतां घाटग्यांच्या मुलीचें मोहिनी अस्त्र व घाटग्यांना वश करण्याकरतां शिंद्यांच्या दिवाणगिरीचें आमिष नानांनीं जेव्हां दाखविलें, त्याच वेळीं शिंदे व घाटगे हे दोघे नानांना वश झाले. महाडच्या कारस्थानाची नानांनीं सर्व निरवानिरव केली खरी. परंतु त्यांनीं शिंदे व घाटगे यांना प्रिय असलेल्या वरील दोन गोष्टी आजपर्यंत घडूं दिल्या नव्हत्या. तसेंच महादजी शिंद्यांच्या बायकाही नानांनीं अनुकूल करून घेतल्या होत्या. मोरोबादादा हे जसें नानांचें वर्म होते तसेंच दौलतराव शिंदे यांचें वर्म त्या तिघी बायका होत्या. या बायकांच्या आज्ञेंत नारायणराव बक्षी वगैरे सर्व शेणवी मुत्सदी होते. घाटग्यांच्या मुलीबरोबर दौलतरावांनीं लग्न करूं नये या मताच्या या बायका होत्या. नारायणराव बक्षी यांचें दिवाणपद घाटगे यांच्याकडे जाऊं नये असें शेणवी मुत्सद्यांस व त्याचप्रमाणें या शिंद्यांच्या बायकांस वाटत होतें. त्यामुळें नानांनीं शिंदे व घाटगे यांच्याबरोबर जरी करार केला होता, तरी त्या गोष्टी घडून येण्याच्या विरुद्ध त्यांना प्रयत्न करावे लागत होते. हे नानांचे

प्रयत्न जोंपर्यंत शिंदे व घाटगे यांना समजले नाहींत, तोंपर्यंत हे उभयतां नानांच्या तंत्रानेंच वागत होते. परंतु जेव्हां घाटग्यांची मुलगी शिंद्यांच्या हातीं सांपडूं नये असें नानांचें कारस्थान असल्याचें त्यांना समजलें, त्या वेळीं शिंदे व घाटगे हे दोघेही नानांच्या विरुद्ध झाले.

१५. या हकीकतीवर प्रकाश पाडणारें नारो हरी करंदीकर यांचें करवीराहून मिरजेस आलेलें तारीख १।९।१७९७ चें पत्र आहे. 'सेवेशीं विज्ञापना. शिंदे यांजकडील कारकून व लोक रा. सखाराम घाटगे याचीं मुलें माणसें न्यावयासीं आलेले चिखलीस काल निघोन करवीराहून गेले. परंतु राजश्री रत्नाकरपंत यांनीं श्रीमंत महाराजांस (करवीरकरांस) मसलत दिली कीं, मूल (घाटगे यांची मुलगी) देऊं नये. सामानगडाकडे मूल नेली असें वर्तमान आहे. खटला पडेलसें दिसतें. ही मसलत वरकडांच्या मनास आली नाहीं.'[1] या पत्रावरून घाटग्यांची मुलगी शिंद्यांच्या ताब्यांत न जाण्याबद्दल नानांचा कसा प्रयत्न चालला होता हें दिसून येईल. करवीरचे महाराज व नाना हे एक होते. नानांनीं त्यांना पैशाची मदत करून परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या विरुद्ध उठविलें होतें. महाडच्या कारस्थानापासून घाटग्यांचीं मुलें माणसें करवीरच्या महाराजांच्याच ताब्यांत होतीं. रत्नाकरपंत हा नानांचाच खास मनुष्य करवीरकरांच्या दरबारीं होता, ह्मणून नानांच्या आज्ञेप्रमाणेंच करवीरच्या महाराजांनीं घाटग्यांच्या मुलीला शिंद्यांच्या हातीं न लागूं देतां सामानगडाकडे पळविली होती. या प्रकारामुळें 'खटला पडेलसें दिसतें' या सदर पत्रांतील वाक्यानें नाना व करवीरचे महाराज यांच्याबरोबर शिंद्यांचें वितुष्ट उत्पन्न होणार याचें भविष्यही करून ठेवलें होतें.

१६. परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या मुक्ततेबद्दल दहा लक्ष रुपये भूदंड भरण्यास पटवर्धन सरदार तयार होते. या बाबतींत माधवराव रास्ते यांची नानांकडे सारखी खटपट चालू होती. त्यास बाजीराव यांचा भयंकर विरोध होता. परशुरामभाऊंची सुटका झाली तर ती आपणास पाहिजे

---

१ ऐ. ले. सं. नं. ४०६४, पान ५२५१.

आहे अशा गोडगोड थापा मारून नाना रास्त्यांच्या तोंडाला पानें पुशीत होते. नानांच्या मनांत परशुरामभाऊंची मुक्तता करण्याचें असतें तर त्यांनीं ती कधींच केली असती. नाना हे दीर्घद्वेषी होते. परशुरामभाऊं-बद्दल त्यांच्या मनांत भयंकर द्वेष उत्पन्न झालेला होता. ते कैदेंत होते ह्मणून करवीरचे महाराज यावेळीं निर्भय होते. त्यामुळेंच त्यांच्या पाठीशीं शिंद्यांविरुद्ध घाटग्यांचीं मुलें माणसें इतके दिवस नानांना दडवितां आलीं. करवीरच्या महाराजांस नानांनीं ज्या वेळीं परशुरामभाऊंविरुद्ध उठविलें होतें, त्या वेळीं परशुरामभाऊंपासून त्यांचें रक्षण करण्याची हमी नानांनीं आपल्या शिरावर घेतली होती. त्यामुळें करवीरच्या महाराजांच्या निर्भयतेला धोका उत्पन्न होईल अशी कोणतीच गोष्ट नानांना या वेळीं करतां येण्यासारखी नव्हती. ह्मणून परशुरामभाऊंच्या सुटकेच्या बाबतींत बाजीराव यांचे बुजगावणें पुढें करून रास्ते व पटवर्धन सरदार यांची समजूत नाना-इतके दिवस घालीत आले होते. परंतु घाटगे यांच्या मुलीला करवीरच्या महाराजांनीं इतके दिवस दडवून ठेवलें व ते तिला आपल्या ताब्यांत देण्यास तयार होत नाहींत असा रंग जेव्हां शिंद्यांना दिसून येऊं लागला, तेव्हां करवीरकरांना शह देण्याकरतां त्यांचा प्रतिस्पर्धी परशुरामभाऊ यांची मुक्तता करण्याचा मन-सुबा शिंद्यांनीं ठरविला. या बाबतींत बाळासाहेब मिरजकरांस पुण्याहून तारीख ३१ आगष्ट सन १७९७ चें पत्र गेलें आहे. त्यांतील मजकूर पुढें दिल्याप्रमाणें आहे. ‘आलिजाबहादर सरकारवाड्यांत आले. संपत शनिवारीं तैलभ्यंग होऊन भोजन जहालें तेव्हां (परशुरामभाऊंच्या) सुटकेविषयीं (शिंद्यांनीं) श्रीमंतांस विनंती केली. “ हरामखोर मी आहें. प्रथम मी संमत न देतों तर त्याचे हातून हें कृत्य होतें कीं काय ? मी हिंदुस्थानांत गेल्यानंतर पांच हजार फौज घेऊन शत्रूवर जाण्यास सरदार कोण आहे ? अंतर पडलें असतां क्षमेंत आणोन सरकार कामावर पाडावें.” ऐशीं बोलणीं पडली, तेव्हां आज्ञा जाहली कीं, राज्याचा दवणा (तंटा)

वारला (मिटला) म्हणजे त्यांची सुटका[1] होईल. ' या पत्रावरूनही शिंद्यांना परशुरामभाऊंची मुक्तता तावडतोब व्हावयास पाहिजे होती. परंतु पेशव्यांच्या राज्यासंबंधीं तंट्याच्या पेचांत बाजीराव असल्यामुळें त्यांस तो तंटा मिटल्याशिवाय कांहीं एक करतां येण्यासारखें नव्हतें. उलट नानांनीं परशुरामभाऊंच्या दौलतींतील सर्व चीजवस्तूवर जप्ती ठेवली होती व भाऊंचें सर्वस्व पुण्यास जप्त करून आणल्याशिवाय ती जप्ती त्यांना उठवावयाची नव्हती.[2] परशुरामभाऊंना बंधमुक्त करण्याचे शिंद्यांचे प्रयत्न चालू होते, तर भाऊंची दौलत जप्त करण्याचे नानांचे प्रयत्न चालले होते. घाटग्यांची मुलगी करवीरकरांच्या ताब्यांतून आपल्या ताब्यांत आणण्याचे शिंद्यांचे प्रयत्न चालू होते, तर ती शिंद्यांना मिळूं नये ह्मणून तिला गुप्त प्रकारें दडवून ठेवण्याचे नानांचे प्रयत्न चालले होते. त्याचप्रमाणें, बाजीराव हे शिंद्यांच्या संरक्षणाखालून नानांच्या संरक्षाणाखालीं येण्यास तयार होईनात म्हणून त्यांना गादीवरून काढून टाकून त्यांच्या जागीं अमृतराव यांची स्थापना करण्याचे नानांचे शकटभेद[3] चालले होते. अमृतराव व नाना यांचीं याच वेळीं खलबतें घाटूं लागल्यामुळें ' नानांशीं संधान जुळवून माझी मुंडी मुरगाळून हा अमृतराव स्वतःच पेशवाई कशावरून बळकावणार नाहीं, अशी त्यांस (बाजीरावांस) काळजी वाटत असे ![4] ' ही हकीकत शनिवारवाड्यावरील आपलीं पलटणें शिंद्यांनीं उठवावी असें नानांनीं त्यांना सांगितल्यापासून सुमारें पंधरा दिवसांच्या आंतली आहे. आपलें संरक्षण कोणत्या तऱ्हेनें होईल या काळजींत बाजीराव होते. शिंद्यांना घाटग्यांच्या मुलीबरोबर आपलें केव्हां एकदां लग्न होईल अशी काळजी लागली होती. शिंद्यांच्या दिवाणपदाचा लाभ आपणास केव्हां होईल ह्मणून घाटगे यांना तळमळ लागली होती. नानांना शिंदे पुणें सोडून केव्हां जातील असें झालें होतें. एकंदरींत बाजीराव यांनीं ह्मटल्याप्रमाणें ' राज्याचा ढवणा वारल्या-

१. ऐ. ले. सं. नं. ४०६३ पान ५२५०. २. ऐ. ले. सं. पान ५२५४.
३. ऐ. ले. सं. पा. ५२४६. ४. ऐ. ले. सं. पान ५१८३.

खेरीज ' कोणालाच चैन पडण्यासारखें नव्हतें. अशा स्थितींत कोणती तरी निर्णायक एक मसलत ठरावयास पाहिजे होती व त्याचा योग्य काल हाच होता.

१७. तारीख १२ सप्टेंबर सन १७९७ च्या एका पत्रांत पुढील मजकूर आहे. ' 'आज दोन महिने शिके कट्यार सुटली नाहीं. देणें करार होत नाहीं. खलबतें बहुत होत आहेत. मनसबा समजत नाहीं........ हल्लीं राजकारणही दुसरेंच चालीस लागलें आहे ह्मणोन ऐकतों.........पूर्वी जाहलें (राजक्रांति) ऐसें होणार अशी लोकवार्ता बहुत आहे........राजश्री नानांचा मनसबा वेगळाच दिसतो.' यावरून नाना राजक्रांति घडवून आणण्याच्या खटपटींत होते असें स्पष्ट दिसतें. ह्मणून बाजीराव यांना आपलें संरक्षण होऊन आपलें स्थान कायम राखण्याकरतां घाटगे यांचे तर्फे शिंद्यां-बरोबर याच वेळीं करार करावा लागला. शिंद्यांनाही आपलें इच्छित पार पडण्याकरतां व घाटग्यांना आपलें हित साधून घेण्याकरतां बाजीराव यांस कायमचें हातांशीं धरल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. या सर्व प्रकारामुळें नानांचें पारिपत्य करून स्वतःस निर्भय करण्याकरतां घाटग्यांच्यातर्फे शिंद्यां-बरोबर बाजीराव यांनीं दोन कोट रुपये देण्याचें ठरवून करार केला. व या करारास पूर्व कारणपरंपरा दिसून यावी ह्मणून महाडच्या कारस्थानाच्या वेळेचा मागील तारखेचा एक करार याच वेळीं करण्यांत आला. त्यांत नानांनीं पुरे करावयाच्या करारांचा नामनिर्देश करून घेतला होता. बाजीराव यांना या वेळीं शिंदे ह्मणतील ती गोष्ट आत्मरक्षणाकरतां व आपलें पेशवेपद कायम राखण्याकरतां कबूल करणें प्राप्त होतें. शिंद्यांनीं बाजीराव यांच्याबरोबर मागें दर्शविल्याप्रमाणें जो नवीन अटींचा करार केला, त्यामुळें शिंदे, बाजीराव व घाटगे हे परस्परांच्या हिताच्या दृष्टीनें एक झाले व नानांचें पारिपत्य कर-ण्याचा एकच विचार त्यांच्यांत दिसूं लागला. नानांनीं अमृतरावांना आपल्या बगलेंत मारून बाजीराव यांना हितशत्रू उत्पन्न केला व शिंद्यांच्या मनसु-ब्याला तोंड देण्याकरतां आपल्या शकटभेदाचा पवित्रा करून पुढील सामन्यास ते तयार झाले.

---

1 ऐ. ले. सं. पान ५२५८.

प्रकरण ३७ वें.

शठं प्रति शाठ्यं.

इ. स. १७९७.

१. तुकोजीराव होळकर मरण पावल्यानंतर त्यांची सरदारीचीं वस्त्रें काशीराव यांस मिळतात. या बाबतींत काशीरावांचा धाकटा भाऊ मल्हारराव यांस वस्त्रें मिळावीं असें नानांचे मनांत होतें. परंतु, शिंद्यांच्या खटपटीमुळें नानांचे प्रयत्न फसतात. त्यामुळें होळकर शिंद्यांच्या लगामीं येऊन नानांवर मात होते. नाना मल्हारराव होळकरांस मदत करून त्यांस काशीरावांचा प्रतिस्पर्धी म्हणून उभें करतात.—२ शिंदे मल्हारराव होळकरांच्या गोटावर हल्ला करून त्यांस ठार करतात. मल्हाररावांचे दुसरे दोघे भाऊ यशवंतराव व विठोजी अनुक्रमें नागपुरास व कोल्हापूरास पळून जातात. मल्हारराव ठार झाल्यामुळें नानांचा स्वार्थी पक्ष हलका होतो.—३ छत्रपती रामराजे व पेशवे बाजीराव यांच्या परिस्थितीची तुलना.—४ नानासाहेब पेशवे व नाना फडनविस यांचे स्वार्थी धोरण राजकारणाच्या एकाच चाकोरींतून कसें जात होतें ? बाजीराव पेशवे व नाना यांच्यामध्यें कोणत्या मुद्यावर कलह उत्पन्न होत होता ?-५ मल्हारराव होळकरांस काशीरावांविरुद्ध प्रतिस्पर्धी म्हणून नानांनीं उठविलें त्यामुळें नाना बंड व गुन्हेगार कसे ठरतात ? नाना बाजीराव पेशव्यांची उपासमार करवितात. संतोषपट्ट्या वगैरे बसवून जो मुबलक पैसा नाना गोळा करतात, त्याचा विनियोग पेशव्यांविरुद्ध ते कसा करतात.—६ नानांचा स्वार्थीपक्ष व शिंद्यांचा राजपक्ष. नाना अमृतरावांस पैशाच्या जोरावर आपल्या कटांत सामील करून घेतात. बाजीरावांस पेशवेपदावरून काढून त्या जागीं अमृतरावांची स्थापना करण्याचें व दौलतरावांस शिंद्यांच्या सरदारीपदावरून पदच्युत करून त्या जागीं नवीन दत्तकाची स्थापना करण्याचें नानांचें नवीन कारस्थान.—७ दौलतरावांस पदच्युत करण्याकरतां शिंदेबायांस पैशाच्या जोरावर नाना आपल्या कटांत सामील करून घेतात.—८ महादजी शिंद्यांची थोरली बायको लक्ष्मीबाई व दौलतराव शिंदे यांच्यामध्यें वैमनस्य येण्याचीं कारणें.—९ दौलतराव शिंद्यांवर लक्ष्मीबाईनें

केलेले निंद्य आरोप.—१० नानांच्याच चिथावणीनें शिंदेबाया दौलतरावांवर निंद्य आरोप कशा करीत होत्या याचें समर्थन.—११ नाना फडनविस व लक्ष्मीबाई यांचा हेतू दौलतराव व भागीरथीबाई यांचा सर्वस्वी नाश करण्याचा कसा होता ? वडिलकीच्या नात्यानें शिंदे घराण्याची अब्रू राखण्याची जबाबदारी लक्ष्मीबाईवर कशी होती ? लक्ष्मीबाईनें वडिलकीच्या नात्यानें आपलें कर्तव्य कसें बजावलें नाहीं ?—१२ लक्ष्मीबाई व भागीरथीबाई यांच्यामधील सवती-मत्सर. वड्याचें तेल वांग्यावर ओतण्याची शक्कल नानांच्याच अक्कलखान्यांतून कशी निघाली होती ? दौलतरावानें घाटग्यांच्या मुलीबरोबर लग्न करण्यांत लक्ष्मीबाई व भागीरथीबाई यांचे परस्पर विरुद्ध हितसंबंध कसे येत होते ?—१३ दौलतरावांवर केलेला आरोप वादांत खोटा होता. पेशवाई वांच-विण्याचा प्रयत्न न करतां ती उडवून लावण्याचाच प्रयत्न नाना कसा करीत होते ? याचें स्पष्टीकरण.—१४ बाजीराव व दौलतराव यांना पदच्युत करण्या-करतां नानांनीं तयार केलेला चक्रव्यूह. बाजीराव व दौलतराव यांचा, शठं प्रति शाठयं या न्यायानें नानांस कैद करण्याचा संकल्प.—१५ नानांना कैद करण्याकरतां दौलतरावांनीं कपटनाटकाची सुरूं केलेली रंगी तालीम.—१६ दौलतराव शिंदे नानांस कैद करतात.

१. नानापासून आपलें संरक्षण व्हावें ह्मणून नवीन करार करून, बाजी-रावांना शिंद्यांच्या अभय छत्राखालीं जावें लागलें, त्यामुळें व दुसऱ्या कांहीं कारणामुळें नाना व शिंदे यांच्यामध्यें वैमनस्य उत्पन्न होऊन ते आपापला डाव साधण्याकरतां पवित्रे टाकून उभे राहिले ही हकीकत मागील प्रकरणांत आलीच आहे. दौलतराव शिंद्यांनीं या नवीन सामन्याला नानाविरुद्ध पहिल्यानें कशी सुरवात केली, हें पुढील हकीकतीवरून दिसून येईल. तुकोजी होळ-कर यांना शिंद्यांच्या मैत्रींतून फोडून, आपल्या कटांत नानांनीं पूर्वी कसें घेतलें होतें, हा इतिहास मागें आलाच आहे. तारीख २६ आगष्ट सन १७९६ इसवी रोजीं तुकोजी होळकर हे मृत्यु पावले. त्यांना काशीराव व मल्हारराव असे औरस दोन पुत्र व विठोजीराव आणि यशवंतराव असे दोन दासीपुत्र होते. तुकोजीच्या मरणानंतर त्यांचा वडील मुलगा काशीराव हाच न्यायानें होळकरांच्या गादीचा खरा वारसदार होता; परंतु खऱ्या

वारसास सरदारीचीं वस्त्रें दिलीं, तर त्याच्यावर उपकारांचें ओझें लादतां येत नाहीं, व त्यामुळें तो कायमचा आपल्या लगामीं राहूं शकत नाहीं, हें नानांचें अनुभवानें यशस्वी ठरलेलें धोरण होतें. त्या धोरणाला अनुसरून त्यांनीं खरा वारस काशीराव यांच्या विरुद्ध मल्हारराव यास सरदारीचीं वस्त्रें देण्याचें ठरविलें. खरा वारसदार काशीराव नानांच्या या अन्यायी वर्तनामुळें लाचार झाला व त्यानें पेशव्यांच्या दरबारीं न्याय मिळावा म्हणून शिंद्यांची मदत घेतली. शिंद्यांचा या बाबतींत सत्पक्ष असल्यामुळें, बाजीराव यांनीं काशीराव यांस सरदारीचीं वस्त्रें दिलीं. त्यामुळें नानांचा स्वार्थी पक्ष कमजोर झाला व शिंद्यांच्या लगामीं होळकर घराणें गेलें. इतके दिवस पेशव्यांचा जो पक्ष तोच नानांचा राजपक्ष होता. परंतु बाजीराव गादीवर आल्यापासून नानांचा निराळाच स्वार्थी पक्ष उघड उघड निर्माण झाला होता. त्यामुळें शिंदे व बाजीराव पेशवे यांच्या सहकार्यानें जड झालेलें पेशवाईचें पारडें, नानांना मुळींच सहन होण्यासारखें नव्हतें. त्यांनीं मल्हारराव होळकर यांस हाताशीं धरून होळकर घराण्यांत भाऊबंदीचें विष पेरलें. तुकोजीचे दुसरे दोघे दासीपुत्रही मल्हाररावांना सामील झाले व त्या तिघांनीं होळकरांच्या राज्यांत धामधूम करावयाला सुरवात केली. या तिघांस नानांचें आंतून पाठबळ होतें.[१] 'मल्हारराव हा शूर आणि हिकमती सरदार असल्यामुळें त्याचें व त्याच्या नांवावर होळकरशाहींतल्या जुन्या सरदारांचें आपणाला मोठेंच पाठबळ मिळेल असा नानांस मोठाच भरंवसा वाटत होता. नानांच्या द्रव्याच्या जोरावर मल्हारराव होळकरानें थोड्याच दिवसांत पांच सहा हजार फौज जमविली आणि तो शिंद्यांच्या तोंडावर खुद्द पुण्यासच तळ देऊन राहिला.'[२] बाजीराव पेशव्यांनीं काशीराव याला होळकरशाहीची सरदारी दिली तर त्याच्याविरुद्ध नानांनीं मल्हाररावाला हाताशीं धरून आपल्या स्वतःच्या पैशाच्या जोरावर त्याला प्रतिस्पर्धी निर्माण करून शिंद्यांना शह देण्याकरतां पुण्यास त्यांच्या तोंडावर आणून ठेवलें. यामुळें शिंद्यांस राग आला व त्यांनीं मल्हाररावाचें पारिपत्य करण्याचें ठरविलें.

---

१ व २ ना. फ. यांचें चरित्र पा. १९८, २००.

२. तारीख १४ सप्टेंबर सन १७९७ इसवी रोज 'गुरुवारीं मल्हारजी होळकर यांचे गोटावर अलिजाबहादर यांणीं चालून घेतलें. आपण खासा चार घटका रात्रीस स्वारी तयार करून पर्वतीजवळ रमण्यांत फौज घेऊन उभे राहिले. कांहीं फौज व पल्टणें पंचवीस जरबा (तोफा) ऐसा सरंजाम होळकर यांचे मोहल्ल्यावर पाठविला. काशीबा होळकर यांणीं तिकडून लढाई सुरूं केली. तों फौज भारी. यांणीं गांठलें. तरवार चालली. चाळीस पन्नास मनुष्य होळकरांकडील व शिंघांकडील ठार व जखमी जाहले. खासा मल्हारराव होळकर यांस तरवारेच्या जखमा व तिराची जखम व गोळी ऐसी लागून ठार जाहले. मशारनिल्हेची स्त्रीही वारली. गोट शिंघांकडील लोकांनीं लुटला. होळकरांचा मुडदा दहनास काशीराव यांणीं नेला. पूर्वी चार रोज अलिजाबहादर यांणीं मल्हारराव यांस सूचना केली कीं फौज रुकसत करावी (फौजेस रजा द्यावी). आम्हीं सांगतों त्याजप्रमाणें ऐकावें. परंतु तें न ऐकलें. प्रातःकाळीं तोंड धूत डेऱ्यापुढें बसले ह्मणोन, बेहुषारीमुळें ऐसी गोष्ट गुदरली.[१]' याप्रमाणें काशीरावाला नानांनीं उत्पन्न केलेला जो भाऊबंद शत्रू मल्हारराव, त्याचा अशा प्रकारें अंत झाला. तुकोजीचे दोघे दासीपुत्र मल्हाररावाच्या या प्रकारामुळें पुणें सोडून पळून गेले. यशवंतराव नागपुरास गेला व विठोजी कोल्हापुरास गेला. अशा रीतीनें काशीराव यांना नानांनीं निर्माण केलेल्या भाऊबंद शत्रूपासून शिंघांचें सहाय्य घेऊन सरदारीचें आपलें न्याय्य स्थान व प्राण यांचें संरक्षण करावें लागलें. या वेळेपासून नानांच्या पक्षांत सामील असलेले होळकर सरदार शिंघांच्या लगामीं गेले आणि त्यामुळें नानांचा स्वार्थी पक्ष बराच हलका झाला.

३. पेशव्यांचें राज्य बुडविणारे 'कुलकलंक' ह्मणून बाजीराव यांच्यावर आजपर्यंतचे बहुतेक इतिहासकार आरोप करतात. शिवाजी महाराजांनीं स्थापन केलेल्या हिंदुपदपादशाहीचा नानासाहेब पेशव्यांना रामराजांनीं

---

१. ऐ. ले. सं. नं. ४०७३ पान ५२५८.

राजीनामा लिहून देऊन ते जसे कुलकलंक बनले, तसेंच बाजीराव पेशव्यांनीं इंग्रजांना पेशवाईचा राजीनामा देऊन ते लोकदृष्टीनें कुलकलंक ठरले. नानासाहेबांनीं तुळजापूरच्या भोप्यांच्या कळपांतून रामराजांना आणून त्यांना हिंदुपदपादशाहीचे कायदेशीर वारसदार बनविले व थोड्याच दिवसांत त्यांच्याकडून त्यांचा वारसा हक्क राजीनाम्याच्या रूपानें आपण स्वतः खरेदी घेतला. कोणत्याही अधिकाराचा राजीनामा किंवा कोणत्याही मिळकतीचें खरेदीपत्र घेणें असेल तर तें कायदेशीर असणाऱ्या मालकाकडूनच घ्यावें लागतें. गुलामांच्या बाजारांत एखाद्या मनुष्याला योग्य किंमत देऊन जरी विकत घेतलें असलें, तरी त्याच्या पोटाला गोळाभर अन्न व लाज राखण्यापुरतें वस्त्र देण्याची जबाबदारी खरेदी घेणाऱ्या सावकारावर असतेच. या अन्नवस्त्राच्या खर्चाचा बोजा तो गुलाम जिवंत असेपर्यंत मालकावर असतोच. नानासाहेब पेशव्यांनीं रामराजांकडून त्यांच्या हिंदुपदपादशाहीच्या अधिकाराचा जेव्हां राजीनामा घेतला, तेव्हां त्यांच्या अन्नवस्त्राचा व छत्रपतीची लाज राखण्याचा बोजा त्यांच्यावर पडला. ह्मणून छत्रपतींच्या अन्नवस्त्राकरतां कांहीं जहागीर व छत्रपती या नांवाला शोभण्याकरतां कुलाचाराप्रमाणें पेशव्याचीं वस्त्रें देण्याचा अधिकार, रामराजांना देऊन, पेशव्यांच्या संरक्षणाखालीं विकत घेतलेल्या गुलामाप्रमाणें बेमुदत नजर कैदेंत राहण्याचा मान छत्रपतींना नानासाहेब पेशव्यांकडून मिळाला. रामराजांनीं नानासाहेबांना स्वखुशीनें अगर बलात्कारानें, कोणत्याही मार्गानें, जो राजीनामा दिला, तो दिला नसता तर त्यांना जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा कोणत्या डोंगरी किल्ल्यावर भोगावयास मिळाली असती हें सांगतां येत नाहीं. शिवाय रामराजांची अशी अवस्था होऊन छत्रपतींच्या गादीवर नानासाहेबांनीं दुसराच एखादा नवीन वारसदार निर्माण केला असता व त्याच्याकडून छत्रपतीपदाचा त्यांनीं खात्रीनें राजीनामा घेतला असता. असें झालें असतें तर मात्र ताराबाईप्रमाणें छत्रपतीच्या गादीच्या खऱ्या हितचिंतकांना रामराजे कुलकलंक आहेत असें वाटलें नसतें. नाना-

साहेब पेशव्यांनीं केवळ स्वार्थाकडे लक्ष देऊन छत्रपतींची गादी गिळंकृत केली असें त्यांनीं उघड उघड ह्मटलें असतें.

४. नाना फडनविस यांनीं आपल्या गुरूचा तोच कित्ता गिरवला होता. नानासाहेब हे छत्रपतींचे पेशवे होते आणि नाना फडनविस हे पेशव्यांचे पेशवे होते. नानासाहेब पेशव्यांनीं छत्रपतींचें राज्य व त्यांचा नांवलौकिक कायम राखून जो स्वार्थ साधला, तो त्यांना पचून उलट त्यांच्या कीर्तीला कारणीभूत झाला. पण जेव्हां त्यांनीं छत्रपतींच्या गादीचा ग्रास गिळण्याचीं कारस्थानें सुरू केली, तेव्हां त्यांच्या स्वामीभक्तीचे किंवा छत्रपतीची गादी स्थापन होण्याच्या मूळ उद्देशाचे धिंडवडे निघून त्यांत त्यांची केवळ स्वार्थाची दृष्टि आहे असें उघड दिसूं लागलें. नानांच्या बाबतींत अगदीं तोच नमुना दिसून येतो. नानांनीं पेशव्यांच्या गादीवर असलेल्या इसमाचा पक्ष धरून आपण एक राजपक्षाचे पुढारी आहोंत अशा डौलानें जोंपर्यंत आपलीं कारस्थानें घडवून आणलीं, तोंपर्यंत नानांनीं पेशवाई दरबारांतून साधून घेतलेला हिमालय स्वार्थ नानांच्या पचनीं पडूं शकला. परंतु ज्या-वेळीं प्रत्यक्ष पेशव्यांविरुद्ध नानांनीं आपल्या कारस्थानांची मजल गांठली, त्या वेळीं, त्यांच्या खऱ्या मनोधर्माचें प्रदर्शन होऊं लागलें. बाजीरावांस गादी-वर बसविण्यापूर्वी पेशव्यांच्या कारभारीपणाची सनद नानांनीं त्यांच्याकडून लिहून घेतलीच होती. गादीवर बसल्यानंतरही कारभारीपणाच्या आपल्या सनदेला नानांनीं भोंसले व निजाम यांची जामीनकीही घेतली होती. बाजी-रावांकडून नानांना मिळालेल्या या सनदेमुळें पेशवाईचा सर्व कारभार नानांच्या पूर्णपणें हातीं आलाच होता. बाजीरावांची शिक्का-कट्यार व त्यांचे प्राण मात्र नानांच्या अद्याप स्वाधीन व्हावयाचे होते. ते झाले असते, तर छत्रपती रामराजांप्रमाणेंच हुबेहुब बाजीरावांची अवस्था झाली असती. परंतु बाजीराव हे केवळ भोप्यांच्या कळपांतले नसल्यामुळें व त्यांना राघोबादादा व आनंदी-बाई या तेजस्वी व जातिवंत पेशवे घराण्यांतल्या मातापितरांचा कांहीं दिवस कां होईना, पण प्रत्यक्ष सहवास घडला असल्यामुळें ते आपला प्राण व

शिक्का-कट्यार ह्मणजे पेशवेपदाच्या अधिकाराचें चिन्ह नानांस देण्यास तयार झाले नाहींत. बाजीराव शिंद्यांच्या रक्षणाखालून नानांच्या इच्छेप्रमाणें नानांच्या रक्षणाखालीं आले असते तर रामराजांप्रमाणें अगदीं हुबेहुब बाजीरावांचें छायाचित्र निघालें असतें. परंतु बाजीराव पेशवे यांना पेशवे घराण्याचा थोडा तरी अभिमान खात्रीनें होता. ह्मणूनच त्यांनीं नानांना आत्मविक्रय केला नाहीं. नानांचा व बाजीराव यांचा याच एका मुद्यावर तंटा उत्पन्न झाला.

५. बाजीराव व नाना यांच्यामधील या तंट्यांत खरा गुन्हेगार कोण हें येथें पहाणें अवश्य आहे. बाजीरावांनीं पेशवाई बुडविली असा जर त्यांच्यावर आरोप करावयाचा असेल तर बाजीराव हे पेशवेपदाचे खरेखुरे मालक होते असें कबूल करणें प्राप्त होतें. असें जर होतें तर बाजीराव हे पेशवाईचे धनी व नाना हे त्यांचे चाकर असेंच ह्मणणें न्याय्य ठरतें. असें ठरल्यानंतर पेशवेसरकारकडून एकदां एक गोष्ट ठरली ह्मणजे त्याच्याविरुद्ध चाकरांनीं वागणें हा उघड उघड राजद्रोह ठरतो. पेशव्यांच्या राज्यांतील सरकारी सनदेवर एकदा कां पेशव्यांचा शिक्कामोर्तब झाला, ह्मणजे त्याला मान देणें हें प्रत्येक चाकराचें कर्तव्य आहे. शिक्कामोर्तब होईपर्यंत वाटेल तो विरोध केला तरी तो क्षम्य असतो. परंतु शिक्कामोर्तबानें एकदां हुकमाला राजकळा आली, ह्मणजे त्याच्याविरुद्ध वर्तन करणें हें बंडाचें खास द्योतक ठरतें. काशीरावाला एकदां होळकरांच्या सरदारीचीं वस्त्रें पेशव्यांकडून मिळाली, ह्मणजे पेशव्यांच्या कोणत्याही चाकराला त्याविरुद्ध वागण्याचा अधिकार राहत नाहीं. कोणी तसें वागेल तर तो राजनीतिदृष्ट्या बंड व गुन्हेगार ठरेल. नानांनीं होळकरांच्या बाबतींत उघड उघड पेशव्यांविरुद्ध बंड करण्यास सुरवात केली. बाजीराव यांनीं काशीराव यांस सरदारीचीं वस्त्रें दिल्यानंतर नानांनीं मल्हाररावाला हाताशीं धरलें, त्याला वाटेल तेवढ्या पैशाची मदत देऊन होळकरांच्या राज्यांत बंडें करण्यास त्यांनीं सुरवात करविली. शेवटीं बाजीराव पेशव्यांच्या विचाराविरुद्ध काशीराव व शिंदे यांना सामना देण्याकरतां त्यांच्या तोंडावर मल्हाररावांना त्यांच्या फौजेसह आणून ठेवलें. नानांनीं पेशव्यांच्या प्रजाजनांवर

संतोषपट्टीसारख्या सात प्रकारच्या पट्टया बसवून मुबलक पैसा गोळा केला होता व तो आपल्या स्वतःच्या खजिन्यांत भरला होता. पेशव्यांचा सरकारी खजिना मात्र नानांनीं कोरडा ठणठणीत करून ठेवला होता, एवढेंच नव्हे तर खुद्द पेशव्यांच्या वाड्यांत, खुद्द बाजीराव पेशव्यांनासुद्धां नानांनीं अन्नाला महाग करून ठेवलें होतें. ' बाजीराव साहेबांची आतां खर्चाची जी हलाखी चालली होती ती पुसूंच नये ! त्यांच्या वाड्यांत दिव्यास तेल मिळेना, विड्याचीं पानें दुर्मिळ झालीं आणि खाशांच्या स्वयंपाकाचे बारीक तांदूळ बंद झाले ! [१] ' नाना पेशवाईचा कारभार करीत होते. पेशव्यांचा सर्व खजिना त्यांच्याच ताब्यांत होता. खजिन्यांत पैसा नाहीं असें नानांनीं म्हटलें म्हणजे झालें. निरनिराळ्या पट्टया बसवून जो पाण्यासारखा पैसा गोळा केला तो गेला कोठें हें नानांना विचारणार कोण ? व बाजीरावांनीं विचारलें तर महाडच्या कारस्थानाच्या खड्यांत तो सर्व पैसा गडप झाला, हें नानांना दाखवावयाला कारण होतेंच. खजिन्यांत पैसा नाहीं या सबबीवर नाना बाजीरावांची उपासमार करून त्यांना वठणीवर आणणार होते. इकडे खुद्द पेशवाईच्या धन्याची अशी अवस्था करून दुसरीकडे मल्हारराव होळकरासारख्या इसमास उठवून त्यांच्याकडे नाना आपल्या द्रव्याचा ओघ वाहूं देत होते. तसेंच बाजीराव व शिंदे यांच्याविरुद्ध निरनिराळे कट उत्पन्न करून त्याच्या खर्चाकरतांही नाना पैसा ओतीत होते. नानांचा हा कारभार लक्षांत घेतां, ते पेशव्यांचे चाकर होते अशी जाणीव त्यांना असावी असें बिलकुल दिसत नाहीं. त्यांच्या स्वतःच्या स्वार्थापलीकडे त्यांना दुसरें कांहींच दिसत नव्हतें. पेशवाईचे धनी नाना नसून बाजीराव असें धरून चालावयाचें असेल, तर पेशव्यांच्या विरुद्ध निरनिराळ्या कटांना नानांनीं उठावणी दिली म्हणून ते बंडखोर आहेत, ते गुन्हेगार आहेत असेंच उघड उघड म्हणावें लागतें. काशीरावांविरुद्ध नानांनीं मल्हारराव यांस जेव्हांपासून उठविलें, तेव्हांपासून नाना हे पेशवाईंतील अव्वल दर्जाचे बंडखोर म्हणून पेशव्यांच्या राजकारणाच्या आखाड्यांत उघडपणें उतरले असेंच म्हणावें लागतें.

---

१. ऐ. ले. सं. पा. ५१९०

६. या वेळीं नानांचा स्वार्थी पक्ष व शिंद्यांचा राजपक्ष या दृष्टीनें पेशवेसरकाराच्या राजकारणाचें वारें वाहूं लागलें होतें. मल्हारराव मारला गेल्यामुळें शिंद्यांचा राजपक्ष बळावला व नानांचा स्वार्थी पक्ष हलका झाला हें मागें आलेंच आहे. आपला हलका झालेला स्वार्थी पक्ष सांवरून धरण्याची आतां नानांवर जबाबदारी येऊन पडली व त्यांतून पार पडण्याकरतां नानांनीं बाजीराव व शिंदे यांच्यावर 'मूले कुठारः' या न्यायानें घाव घालण्याचें कारस्थान सुरू केलें. या कारस्थानाचें स्वरूप असें होतें कीं, बाजीरावांना गादीवरून काढून टाकून त्या जागीं अमृतरावांची स्थापना करावयाची व दौलतराव शिंद्यांचें सरदारीपद काढून घेऊन त्या जागीं महादजी शिंद्यांच्या बायकोच्या मांडीवर दुसरा दत्तक देऊन त्याला शिंद्यांची सरदारी द्यावयाची. अशा प्रकारें 'इंद्राय तक्षकाय स्वाहा' करणारें असें राज्यक्रांति करणारें कारस्थान नानांनीं आपल्या पैशाच्या जोरावर व बुद्धीच्या बळावर मांडलें. 'नानांच्या प्रेरणेवरून अमृतराव हा असें प्रतिपादूं लागला कीं, "मी पेशव्यांचा भाऊ असल्यामुळें पेशवाईचा कारभार करण्याचा माझाच अधिकार आहे. आजपर्यंतच्या पेशव्यांचे कारभारी जसे त्यांचे बंधूच असत त्याप्रमाणें मीही बाजीरावांचा कारभारी होणार. नाना माझ्या हाताखालीं दुय्यम कारभाऱ्याचें काम करतील. राजकारभारांत मी शिंद्यांची लुडबुड मात्र बिलकुल चालूं देणार नाहीं." अमृतराव इतकें बोलूनच थांबला नाहीं, तर त्यानें नानांचा पक्ष घेऊन शिंद्यांविरुद्ध उघडपणें भांडण्यास सुरवात केली, आणि नानांच्या पैशाच्या जोरावर सर्व हुजुरातीची फौज त्यांनीं आपल्या लगामीं लावून घेतली. अमृतरावाची ही उठावणी पाहून श्रीमंत भयभीत झाले, आणि त्यांच्या मनानें पक्कें घेतलें कीं, 'माझी मुंडी मुरगाळून अमृतरावालाच गादीवर बसवावें असा यांत नानांचा कावा दिसतो.'[१] या हकीकतीवरून नाना हे बाजीराव यांच्या पेशवेपदाच्या मुळावर कसे घाव घालणार होते हें दिसून येईल.

---

१. ना. फ. यांचें चरित्र पान २००.

७. वरीलप्रमाणें नानांनीं बाजीरावांवर पकड केली. दुसरी नानांची पकड दौलतरावांवर होती. महादजी शिंदे मेल्यानंतर दौलतरावांना सरदारीचीं वस्त्रें मिळवून द्यावयाला जिवबादादा बक्षी व बाळोबातात्या पागनीस यांचें सवाईमाधवरावांवरील वजन व त्यांची बुद्धिमत्ता कारणीभूत झाली होती. जिवबादादा यांचें चांगलेंच वजन लक्ष्मीबाई यांचेवरही होतें. त्यामुळें लक्ष्मीबाई यांचा विरोध चालूं शकला नाहीं. लक्ष्मीबाई यांनीं माघार घेतल्यामुळें नानांचा विरोध फिका पडला व दौलतराव यांस रीतसर सरदारीचीं वस्त्रें तारीख १५ फेब्रुवारी सन १७९५ रोजीं मिळालीं. पुढें जिवबादादा कालवश झाले व बाळोबातात्या कैदेंत पडले. त्यामुळें महादजी शिंद्यांच्या बायकांवरील वजन बरेंच कमी झालें. अशा स्थितींत त्यांच्याबरोबर लुडबुड करावयाला नानांना संधि मिळाली. नाना हे सुतानें स्वर्ग गांठणारे असल्यामुळें त्यांनीं शिंदेबायांस आपल्या लगामीं घेतलें व दौलतरावांना सरदारीपदावरून भ्रष्ट करण्याचा मनसुबा चालविला. संतोषपट्ट्यासारख्या सात पट्टयांनीं नानांचा खजिना भरून गेल्यामुळें द्रव्याची वाण नानांना नव्हतीच. मग शिंदेबाया नानांच्या मसलतींत यावयाला कशाचाच अडथळा नव्हता. नानांच्या द्रव्याचें व सहाय्याचें पाठबळ मिळतांच अमृतरावांच्या अंगांत वारें शिरून त्यांना जसा कंठ फुटला, तसाच नानांच्या पैशाच्या व सहाय्याच्या जादुमंत्रानें शिंदेबायांनाही कंठ फुटला. त्या मुक्तकंठानें नानांचे सूर आपल्या कंठांतून काढूं लागल्या.

८. महादजी वारले त्या वेळीं त्यांच्यामागें त्यांच्या तीन स्त्रिया जिवंत होत्या. वडील लक्ष्मीबाई, मधली यमुनाबाई व धाकटी भागीरथीबाई याप्रमाणें त्या होत्या. लक्ष्मीबाईनें दौलतरावांना मांडीवर दत्तक[१] घेतलें होतें. दौलतरावांच्या लष्करांत महादजी शिंद्यांच्या स्त्रिया रहात असत. या स्त्रियांपैकीं सर्वांत थोरली लक्ष्मीबाई ही महापराक्रमी आणि धोरणी स्त्री

---

१. जि. दा. बक्षी यांचें चरित्र पा. २३६.

होती आणि बाकीच्या स्त्रिया तिच्याच तंत्रानें वागत असत. या बाया ह्मणजे मोठींच प्रस्थें होतीं आणि त्यांचें व दौलतरावांचें वांकडें होतें. शिंद्यांच्या लष्करावर त्यांचें पराकाष्ठेचें वजन होतें. त्यामुळें खुद्द दौलतरावही त्यांस वचकून वागत असत. बाळोबातात्या वगैरे दोन चार शेणवी सरदार जरी कैदेंत पडले होते, तरी बाकीचे पुष्कळ शेणवी सरदार अजून शिंद्यांच्या नोकरींत होतेच आणि ते सर्व या बायांचे कट्टे पुरस्कर्ते होते. दौलतरावांच्या भयानें नाना फडनविस, शेणवी सरदार व शिंदेबाया या सर्वांचा आतां एक विचार झाला. आणि 'नानांच्या प्रोत्साहनावरून शिंदेबाया उघड बोलूं लागल्या कीं, आपला दत्तक मुलगा दौलतराव हा उल्लु आणि दुराचारी आहे. त्याचें व आमचें कधींच बनणार नाहीं. आपण आतां दुसराच दत्तक घेणार आहों, आणि त्याच्याच नांवें पेशवे सरकारांतून सरदारीचीं वस्त्रें मिळावीं. एका नाजुक ठिकाणीं दौलतरावानें बदकर्म केलें आहे, अशी शिंदेबायांची या पूर्वींच खात्री झाली होती, आणि त्यामुळें त्यांची आज बरेच दिवस आंतून धुसफूस चालली होतीच. आतां नाना व अमृतराव यांचें पाठबळ मिळाल्यामुळें त्या एकाएकीं दौलतरावांवर उघडपणें बिथरल्या.'[1]

९. वरील उताऱ्यांत एका महत्वाच्या ठिकाणीं संदिग्धपणा ठेवण्यांत आला आहे. 'एका नाजुक ठिकाणीं दौलतरावानें बदकर्म केलें आहे, अशी शिंदेबायांची यापूर्वींच खात्री झाली होती.' या वाक्यानें दौलतरावांच्या चारित्र्यावर मुख्य हल्ला करण्यांत आलेला आहे. तो येथें स्पष्ट करणें प्राप्त आहे. दौलतरावांच्या बदकर्माचें नाजुक ठिकाण ह्मणजे त्यांची दत्तक आई, महादजी शिंद्यांच्या मागें राहिलेल्या तीन स्त्रियांपैकीं धाकटी स्त्री, भागीरथीबाई, ही होय. 'ती तरुण व फार लावण्यवती होती. दौलतराव शिंदे खरे वारसदार असें ठरल्यावर त्यांनीं त्या तिघीजणींस मोठाल्या नेमणुका करून देण्याचें कबूल केलें; ह्मणून त्या त्याजवळ राहिल्या; परंतु त्यांच्या बारमाहींच्या नेमणुका न करून दिल्यामुळें, व थोड्या दिवसांत त्यांचे सुखापैकीं

---

१ ना. फ. यांचें चरित्र पा २०० व २०१.

कांहीं सुखें कमी झालीं; यामुळें त्यांनीं गाऱ्हाणी व फिर्यादी केल्या नाहींत; परंतु एकाएकीं दुसऱ्या दोघी वडील बायका पाळतीनें शोध लावून बोलूं लागल्या, कीं, दौलतराव शिंदे धाकट्या आईशीं अयोग्य रीतीनें रत झाले आहेत; आणि प्रख्यातपणें त्यांस दोष देऊन बोलूं लागल्या कीं, ज्याणें आपल्या बापाच्या बिछान्यास पाय लावून आपल्या आईशीं संग केला त्यास आह्मी आपला पुत्र असें ह्मणणार नाहीं. १ या उताऱ्यांत भागीरथीबाई ही सर्वांत धाकटी होती असें ह्मटलें आहे परंतु तें चुकीचें आहे. भागीरथीबाई ही शिंद्यांच्या तीन स्त्रियांपैकीं मधली स्त्री होती. २

१०. वरील उताऱ्यांत दौलतरावांनीं भागीरथीबाई या आपल्या आईशीं संग केला असा लक्ष्मीबाई व यमुनाबाई या दोन शिंदेबायांच्या ह्मणण्या-प्रमाणें दौलतरावांवर ठाम आरोप करण्यांत आलेला आहे. हा आरोप करण्यांत लक्ष्मीबाई ही पुढारी आहे व तिला मम म्हणणारी यमुनाबाई आहे. हा आरोप जरी एकट्या दौलतरावांवर केला असला, तरी त्या आरोपानें भागीरथीबाईचें चरित्रही कलंकित केलेलें आहे. नानांचा मुख्य मुद्दा दौलतरावाला शिंद्यांच्या सरदारीवरून काढून टाकण्याचा होता. राघोबादादांवर पुतण्याचा खून केला असा आरोप करून ब्रम्हहत्येचें पातक केलेल्या राघोबादादांचा पेशव्यांच्या गादीला स्पर्शही न करूं देण्याची जशी नानांनीं हृदयस्पर्शी कल्पना काढून आपलें कारस्थान यशस्वी केलें होतें, त्याची पुनरावृत्ति दौलतरावांवर वरील आरोप करण्यांत झालेली आहे. दौलतरावांना दत्तक घेण्यापासून लक्ष्मीबाईचा विरोध होता. लक्ष्मीबाईचें दौलतरावांशीं वांकडें होतें हें वर आलेंच आहे. त्यांचें वांकडें येण्याचें कारण वर स्पष्ट शब्दांत दिलेलें आहे. दौलतरावांनीं आपल्या तिघी आयांस ठरविल्याप्रमाणें नेमणुका करून दिल्या नाहींत व त्यांच्या सुखाच्या गोष्टींत कांहीं कमतरता पडूं दिली हेंच एक कारण दाखविण्यांत आलें आहे. परंतु या शिंदे-

---

१ नानाफडनविस यांची बखर पान १६३. २ जि. दा. बक्षी यांचें चरित्र पान ५२७ पत्र नं. २९१.

बायांच्या तक्रारी त्यापूर्वी झाल्याचा कोठेंच उल्लेख नाहीं. व त्या दौलत-रावांच्या कानावरही त्यांनीं घातल्या नव्हत्या हें वरील उताऱ्यावरून स्पष्ट होतें. असें असतां दोघींच शिंदेबाया एकाएकीं दौलतरावांवर बिथरतात व त्या बिथरण्यांत त्यांचा स्पष्ट हेतु दौलतरावांना शिंद्यांच्या सरदारीवरून काढून टाकून नवीन दत्तक घेऊन त्याची त्या जागीं स्थापना करण्याचा असा होता. दौलतरावांवर शिंदेबायांनीं केलेल्या आरोपांत जसा संदिग्ध-पणा ठेवलेला नाहीं, तसाच त्या आरोपामुळें त्या दोन शिंदेबायांनीं घड-वून आणावयाच्या त्यांच्या उद्देशामध्येंही संदिग्धपणा नाहीं. दोन्हीं गोष्टी अगदीं स्पष्ट आहेत. राघोबादादांवर पुतण्याच्या खुनाचा आरोप नानांनीं केला त्यावेळींही दोन गोष्टी अगदीं स्पष्ट करण्यांत आल्या होत्या. राघो-बादादांच्या वंशाला नमस्कार करावयाचा नाहीं, म्हणजे त्यांच्या वंशजानाही पेशव्यांच्या गादीचा स्पर्श होऊं द्यावयाचा नाहीं, एवढेंच नव्हे तर त्यांना नमस्कार करण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून त्यांना आमरण डोंगरी किल्ल्यांत ठेवावयाचें, हा उद्देश अगदीं स्पष्ट होता. त्याचप्रमाणें नाना-साहेबांचा वंश चालवावयाचा याचा अर्थ गंगाबाई गरोदर आहे, तेव्हां तिला मुलगा हा होणारच. तेव्हां त्याच्या नांवानें राज्य चालवावयाचें हा दुसराही हेतु स्पष्ट होता. एकंदरींत राघोबादादांना पदच्युत करण्याचे जसे स्पष्ट हेतु होते, तसेच दौलतरावांना पदच्युत करण्याचे हेतु होते. यावरून या कारस्थानाची उभारणी एकाच डोक्यांतून झालेली आहे ही गोष्ट स्पष्ट होते. तसेंच शिंदेबायांचा ‘ बोलविता धनी ’ नाना हेच होते यांत तिळप्राय संदेह दिसून येत नाहीं.

११. शिंदेबाया व नाना फडनविस या उभयतांच्या मनांत केवळ दौलतरावांना पदच्युत करावें एवढाच जर हेतु असता, तर त्याला शिंद्यांच्या सरदारीला नालायक ठरविण्याकरतां वरील जालीम आरोप त्यांनीं खात्रीनें त्यांच्या-वर केला नसता. ज्या अर्थीं प्रत्यक्ष महादजी शिंदे यांच्या दुसऱ्या दोन बाय-कांनीं आपल्या सवतीशीं—भागीरथीबाईशीं—रत झाल्याबद्दल उघडपणें दौलतरावांवर

आरोप केला आहे त्याअर्थी दौलतरावांना पदच्युत करण्याच्या पारिपत्या-बरोबर भागीरथीबाईचाही सर्वस्वी नाश करण्याचा सदर शिंदेबाया व नाना फडनविस यांचा उघड उघड हेतु होता हें स्पष्ट दिसतें. लक्ष्मीबाई ही महापराक्रमी व धोरणी स्त्री होती आणि बाकीच्या स्त्रिया तिच्याच तंत्रानें वागत असत हें मागें आलेंच आहे. यावरून लक्ष्मीबाई ही आपल्या सव-तींना आपल्या मुठींत ठेवण्याचा प्रयत्न करीत होती हें स्पष्ट दिसतें. या तिघी बाया शिंद्यांच्या लष्करांत राहत असून त्यांच्यांत बरेच दिवस आंतून धुसफूस चालली होती असाही मजकूर वर आलेलाच आहे. लक्ष्मीबाई व यमुनाबाई या दोघी जणी मिळून ज्याअर्थी भागीरथीबाईवर एक भयंकर स्वरूपाचा आरोप करतात त्या अर्थी लक्ष्मीबाई व भागीरथीबाई या दोन सवतीपक्षामध्यें धुसफूस सुरू होती असेंच ठरतें लक्ष्मीबाईकडे वडील-कीचा मान होता. दुसऱ्या दोघी तिच्याच तंत्रानें वागत होत्या. दौलत-रावांसही त्यांनींच दत्तक घेऊन शिंद्याच्या सरदारीला योग्य प्रकारें वारस केलें होतें. आपल्या पतीची ह्मणजे महादजी शिंद्यांची जी अब्रू व जो नांवलौकिक होता तो त्यांच्यामागें चालावा हें समजण्याइतकी लक्ष्मी-बाई धोरणी व शहाणी होती. असें असतां 'आपलेच दांत व आप-लेच ओंठ' असें समजून दौलतराव व भागीरथीबाई या अल्लड तरुण व मूर्ख अशा आपल्याच घराण्यांतल्या दोन व्यक्तींचा वडीलकीच्या नात्यानें आपल्या घराण्याची अब्रु न घालवितां दुसऱ्या उपायानीं यापूर्वींच लक्ष्मीबाईनीं त्याचा बंदोबस्त केला असतां. या वेळीं दौलतरावांचें वय अवघें अठरा वर्षांचें होतें. वडीलकीच्या नात्यानें लक्ष्मीबाईंना दौलत-रावांचा कान धरून त्यांचा अपराध त्यांच्या पदरांत घालून, त्यांना सहज समज देतां आली असती. त्याचप्रमाणें भागीरथीबाईलाही दोन शहाण-पणाच्या गोष्टी सांगून त्यांनाही दुराचारापासून सहज परावृत्त करतां आलें असतें. परंतु लक्ष्मीबाईनें आपलें हें वडीलकीचें मुख्य कर्तव्य इतके दिवस कोणत्याही प्रकारें बजावलें नाहीं, एवढेंच नव्हे तर दौलत-

रावांवर असा अमंगल आरोप उघडपणें करण्यांत आपल्या घराण्याची अब्रू जाते याचीही दिक्कत तिच्या मनाला वाटलेली दिसत नाहीं. यावरून दौलतराव व भागीरथीबाई यांच्यावर लक्ष्मीबाईनें केलेला निंद्य आरोप सत्याला धरून असावा असें मुळींच वाटत नाहीं. तसा आरोप करण्याचें दुसरेंच एकादें महत्वाचें कारण या वेळीं उपस्थित झालें असावें असें स्पष्ट दिसतें. तें कोणतें कारण असावें हें येथें पहाणें जरूर आहे.

१२. सवतीमत्सर हा स्त्रियांचे ठिकाणीं जन्मजात असतो. लक्ष्मीबाई ही तुळजापूरच्या भोप्यांची मुलगी. साधारण गरीब घराण्यांतून शिंद्यांच्या श्रीमंत व सत्ताधारी घराण्यांत तिचा प्रवेश झालेला असून तिच्या दैववशानें या वेळीं तिला वडिलकीचा मान मिळाला होता. ती मोठी मानी स्त्री होती असेंही तिच्या स्वभावावरून दिसून येतें. भागीरथीबाई ही करवीर संस्थानांतल्या खर्डेकरांची मुलगी होती. सर्जेराव घाटगे हेही करवीर संस्थानांतील कागलचे राहणारे होते. दौलतरावांच्या लग्नाचा प्रश्न महादजीच्या कारस्थानापासून निघाला होता. या लग्नाचा पुरस्कार पहिल्यानें नानांनीं करून या गोष्टीस प्राधान्य देऊन घाटगे यांस त्यांनींच आपल्या कारस्थानांत ओढलें होतें. लक्ष्मीबाई हिला दौलतरावांची भावी वधूही आपल्या सोयऱ्यांपैकीं व आपल्या तंत्रानें वागणारी असावी असें वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. कारण दौलतरावांची बायको ज्या स्वभावाची येईल त्याप्रमाणें लक्ष्मीबाई यांचा भावी दर्जा व मान राहणार होता. दौलतरावांचे मनांत घाटग्यांच्या मुलीशीं लग्न करण्याचें जेव्हां निश्चित झालें, तेव्हां त्याला लक्ष्मीबाईचा विरोध आला. घाटग्यांची मुलगी दौलतरावांनीं केली तर आपला मानमरातब राहणार नाहीं असें त्यांना स्पष्टपणें वाटलें होतें. याच कारणाकरतां त्या या लग्नाच्या विरुद्ध होत्या. भागीरथीबाई या करवीर संस्थानापैकीं असल्यानें घाटग्यांची मुलगी दौलतरावांनीं केली तर आपला मानमरातब चांगला राहील असें त्यांना वाटणें हेंही स्वाभाविक होतें. शिवाय

ही गोष्ट नानांच्याच विचारें ठरली असल्यामुळें, या लग्नाला संमती देणें त्यांना सुलभ होतें. पुढें नानांनीं लक्ष्मीबाईच्या पक्षाला मिळून जशी पलट खाल्ली, तशी पलट खाणें भागीरथीबाईस बरें न वाटल्यानें लक्ष्मीबाई व भागीरथीबाई या सवतींमध्यें कलह सुरू झाला. भागीरथीबाई आपल्या लग्नाला सहमत आहेत असें पाहून दौलतरावांनीं त्यांच्याबरोबर विचारविनिमय करणें, करवीरकरांच्या ताब्यांतून घाटग्यांच्या मुलीला व माणसांना आपल्या ताब्यांत घेणेबद्दल मनसुबे करणें, वगैरे अगदीं शक्य होतें. ह्या गोष्टी अर्थात् लक्ष्मीबाईला वावड्या असल्यामुळें व आपल्या इच्छेविरुद्ध भागीरथीबाई दौलतरावांना मदत करीत असल्यामुळें, एकाच मनसुब्यानें दौलतराव व भागीरथीबाई या उभयतांचें पारिपत्य होईल अशी शक्कल एकाएकीं योजण्यांत आली. ही शक्कल नाना व अमृतराव एकचित्त होऊन ते शिंदेबायांना मिळाल्यानंतर निघालेली असल्यामुळें ती नानांच्याच डोक्यांतून निघालेली होती यांत मुळींच संशय रहात नाहीं. दौलतरावांवर वरील आरोप करण्यांत किती धोरणें नानांनीं सांभाळलीं होतीं, हें निराळें सांगण्याची आतां जरूरी राहिलेली नाहीं. नवरा मरो किंवा नवरी मरो, नानांना दोन्ही गोष्टी सारख्याच होत्या. आचारभ्रष्ट किंवा शीलभ्रष्ट ह्मणून दौलतरावांची अपकीर्ति झाली तर ती गोष्ट या वेळीं नानांना प्रामुख्यानें पाहिजेच होती. शिवाय आपल्या इच्छेबाहेर जाणारी आपली सवत सर्वस्वनाशाला पात्र झाली तर ती गोष्ट लक्ष्मीबाईला प्रियच होती. दौलतराव व भागीरथीबाई यांच्यावर जो आरोप करण्यांत आला होता, तो अशाच स्वरूपाचा होता कीं, तो नाशाबित करावयाला पुरावाच दाखवितां येऊं नये. आनंदीबाईवर विषप्रयोगाचा व मारेकरी घातल्याचा आरोप करणें, राघोबादादांवर पुतण्याच्या खुनाचा आरोप करणें, सवाईमाधवरावांस ताईत मंत्रवून देऊन त्यांच्यावर जादूटोणा केल्याचा बाजीरावांवर आरोप करणें, वगैरे आरोपांची मालिका नानांच्या ज्या अक्कलखान्यांतून बाहेर पडली. त्यांती-

लच हा एक मामला दौलतराव व भागीरथीबाई यांच्या बाबतींत होता यांत संशय नाहीं.

१३. दौलतराव व भागीरथीबाई यांच्यावर लक्ष्मीबाईकडून नानांनीं करावयाला लावलेला गंभीर व निंद्य आरोप कसा धादांत खोटा आहे हें वर दाखविलेंच आहे. या बाबतींत डफसाहेबांचें ह्मणणें पुढें दिल्याप्रमाणें आहे. ' त्यांत वडील जी होती (लक्ष्मीबाई) तिनें लोकांत असें उठविलें कीं, ' हा दौलतराव शिंदा आम्हांपेक्षां जी धाकटीबाई (भागीरथीबाई) तिशीं बलात्कारें संग करूं इच्छितो; ' आणि दुसरें असें ह्मणूं लागली कीं, ' जो असा मात्रागमनी पुरुष तो उत्पन्न होण्यास शुद्ध बीज नसतें. '[1] यावरून स्पष्ट होतें कीं, दौलतरावांची इच्छा भागीरथीबाईशीं बलात्कारानें संग करण्याची होती. बलात्कार केला नाहीं हें स्पष्ट आहे. खरेशास्त्री व कॅप्टन मॅक्डोनॉल्ड यांनीं डफसाहेबांच्या माहितीच्या पराचा कावळा केलेला आहे. डफसाहेबांनीं फक्त दौलतरावांवर आरोप केलेला दाखविला आहे. त्यांत भागीरथीबाई निर्दोष दाखविली आहेत. दौलतरावानें भागीरथीबाईशीं रत व्हावयाला अगर दौलतरावांना बदकर्म करावयास संधि सांपडावयाला भागीरथीबाईची अनुमती लागते व त्यामुळें तिचें चारित्र्य कलंकित होतें याची जाणीव, डफसाहेबांना खरेशास्त्री व मॅक्डोनॉल्ड यांच्यापेक्षां जास्त होती, हें त्यांनीं ' दौलतराव बलात्कारें संग करूं इच्छितो ' या वाक्यावरून स्पष्ट दाखविलें आहे. एकंदरींत नानांच्या कारस्थानांचा कोळसा कितीही उगाळला तरी तो जास्तच काळाकुट्ट होत जाणार यांत संशय नाहीं. ' नानांनीं पेशव्यांचें राज्य राखलें. नाना होते ह्मणून पेशव्यांचें राज्य टिकलें. ' असें इतिहासकार नानांच्याबद्दल गोडवे गातात. पण या वेळीं पेशवाईवर कोणतें संकट आलें होतें ह्मणून नानांनीं हीं घरफोडीचीं कारस्थानें स्वतःच्या द्रव्यबळावर उभारलीं होतीं? या वेळीं इंग्रज शांत होते. निजाम शांत होता. कोणतेंच परचक्र पेशव्यांच्या वाटेला गेलेलें नव्हतें. असें असतां बाजीरावांनीं नानांच्या वतीनें पेशवाईचा कारभार

---

१. मराठ्यांची बखर पा. ३३४.

केला काय किंवा शिंद्यांच्या सल्ल्याप्रमाणें केला काय दोन्हीं गोष्टी सारख्याच होत्या. असें असतां आपलाच कारभार पेशवाईच्या कल्याणाचा आहे असें गृहित धरून बाजीरावांविरुद्ध अमृतरावाला आपल्या बगलेंत मारून, व भावां-भावांत दुफळी उत्पन्न करून पेशव्यांचें चंद्रमौळी झालेलें घर पुन्हां एकदां अशा प्रकारें नानांनीं फोडण्याचा प्रयत्न केला हें पेशवाई टिकवण्याकरतां कीं त्याची राखरांगोळी करण्याकरतां, हें विचारवंतांनींच आपल्या मनाशीं ठरवावें. नानांनीं या कारस्थानामुळें जसें पेशव्यांचें दुबळें झालेलें घर फोडलें, तसेंच शिंद्याचेंही घर फोडून त्याचीं शकलें शकलें केलीं. हें नानांचें कारस्थान ह्मणजे पेशवाई उडवून लावणारा सुरुंग होता. सुरुंग पेटविण्याचे वेळीं त्याचें स्वरूप सौम्य असतें, परंतु कालांतरानें तें एकदम रौद्र रूप धारण करतें. तोच सर्वस्वी त्याचा विनाशकाल असतो.

१४. नानांनीं दौलतराव व बाजीराव यांना पदच्युत करून आपलें सर्वा-धिकारी स्थान कसें बळकट करण्याचा प्रयत्न चालविला होता, हें वरील हकीकतीवरून स्पष्ट झालेंच आहे. या त्यांच्या मनसब्याला सहाय्य व्हावें ह्मणून नानांनीं आणखींही कांहीं सावधगिरीचीं धोरणें सांभाळिलीं होतीं. नानांनीं आपल्या मदतीकरतां निजामाची वीस हजार फौज व मुसारेमूचीं पलटणें बेदरच्या आसपास आणून ठेवलीं होतीं. या फौजेच्या खर्चाकरतां नानांकडून पैशाचा भरपूर पुरवठा होत होता.[१] एकंदरींत नानांनीं बाजीराव व दौलतराव यांना पदच्युत करण्याकरतां अमृतराव, शिंदेबाया, शेणवी सरदार, मोंगलाई फौज वगैरेचा कसा चक्रव्यूह रचला होता हें दिसून येईल. नानांच्या या कारस्थानाला 'शठं प्रति शाठ्यं' या न्यायानें तोंड दिल्याशिवाय शिंद्यांचा निभाव लागणें शक्य नव्हतें. बाजीरावांपासून अमृतरावांना नानांनीं फोडल्यामुळें बाजीराव नानांवर क्रुद्ध झालेच होते. दौलतराव यांच्यावर नानांनीं अमंगळ आरोप केल्यामुळें त्यांच्या पायाची आग मस्तकाला झोंबलीच होती. भागीरथी-बाईची लक्ष्मीबाईनें केलेली विटंबना व आपल्या मुलीच्या लग्नाविषयीं

१. ना. फ. यांचें चरित्र पा. २०१.

नानांनीं चालविलेला खेळखंडोबा यामुळें घाटग्यांचें मस्तकही भणाणून गेलेंच होतें. या सर्व गोष्टीमुळें नानांना कैद करण्याचा बाजीराव, दौलतराव, घाटगे, बाळोजी कुंजर, फकीरजी गाढवे व बाणाजी शेव्या या मंडळींचा एकमतानें विचार ठरला व त्याप्रमाणें त्यांचे प्रयत्न सुरू झाले.

१५. नाना हे प्रत्येक गोष्टींत अत्यंत सावधगिरीनें वागत असल्यामुळें त्यांना कैद करणें ही सामान्य गोष्ट नव्हती. तेव्हां त्यांना कैद करावयाला एकाद्या कपटनाटकाचाच प्रयोग रंगविणें भाग होतें. त्याला अनुसरून शिंद्यांनीं नानांशीं बोलणें लाविलें कीं, 'तुम्हांकडून आम्हांस आतांपर्यंत चव्वेचाळीस लक्ष रुपये पोंचले आहेत. बाकीचे छपन लक्ष अद्यापी यावयाचे आहेत. आह्मीं जातों जातों असें सांगून तुम्हांकडून रकमा मात्र उचलल्या, परंतु आम्हांला आमचे शब्द खरे करतां आले नाहींत. याबद्दल आह्मांविषयीं तुमचे मनांत अविश्वास उत्पन्न झाला आहे. परंतु या गोष्टीस आमचा तरी काय इलाज? फौजेचें देणें तुंबल्यामुळें फौज येथून कूच करीना. त्यामुळेंच आजपर्यंत आमचें जाणें घडलें नाहीं. अजूनही फौजेचें देणें साठ लक्ष रुपये शिल्लक आहेच. तुम्हांकडे येणें असलेले छप्पन्न लक्ष रुपये आमच्या पदरांत घाला ह्मणजे आह्मीं हिंदुस्थानांत निघून जातों. या वेळेस आह्मीं शब्दाप्रमाणें वागूं ही खात्री बाळगा आणि निःशंकपणें रुपये द्या!' यावर नानांचें असें उत्तर आलें कीं, 'तुमचा आमचा करार येथें ऐवज द्यावयाचा नसतां स्नेहानें ऐवज देत आलों. तत्राप आद्याप तुमचें कूच होत नाहीं. येथून कूच करून जावें. कोणाची पाहिजे त्याची निशा देतों. जांबगांवास गेल्यानंतर निम्मे व गंगापार जाहल्यावर निम्म्ये याप्रमाणें देऊं.' या उत्तरामुळें शिंदे व नाना यांची पुन्हां घासाघीस सुरू झाली. नाना आपला हेका सोडीत नाहींत, असें पाहून शिंद्यांनीं बाणाजी शेव्या, फकीरजी गाढवे, सर्जेराव घाटगे यांना मध्यस्थीस घातलें. त्यांच्यावरही नानांचा विश्वास बसेना, ह्मणून शिंद्यांनीं मुकीर साहेबास नाना-

कडे मध्यस्थीस पाठविलें. मुकीर साहेब (Michale Philose) हा फ्रेंच सरदार शिंद्यांच्या नोकरींत होता. त्याच्या हाताखालीं आठ पलटणें होतीं. नानांचा मुकीरसाहेबावर विश्वास बसला व ते त्यांच्याबरोबर वाटाघाट करूं लागले. नंतर एक एक प्रकरण निकालांत येऊं लागलें. जीं कलमें ते ठरवितील तीं शिंद्यांकडून अमलांत आणविण्याची हमी त्यांनीं स्वतःचे शिरावर घेतली होती. त्यामुळें नानांचा विश्वास त्यांच्यावर पूर्णपणें बसला व त्यांच्या मध्यस्थीनें पुन्हां दौलतराव व नाना यांचा समेट झाला. शिंद्यांनीं आपला तळ हालविण्याची जारीनें तयारी चालविली, एवढेंच नव्हे तर कांहीं सामानही जांबगांवास पुढें रवाना झालें. त्यामुळें शिंदे खरोखरीच हिंदुस्थानांत जावयास निघाले असा नानांना विश्वास उत्पन्न झाला. नंतर एकमेकांच्या भेटी परतभेटी होण्याच्या शिष्टाचाराला प्रारंभ झाला. पहिल्यानें नानांच्या भेटीकरतां शिंदे मुकीरसाहेबांना बरोबर घेऊन आले. नाना व शिंदे यांची भेट सुमारें चार घटकापर्यंत परस्परांशीं मोकळेपणानें बोलून चालून झाली. नंतर शिंद्यांस परतभेट देण्याकरतां नानांनीं तारीख ३१ डिसेंबर सन १७९७ हा दिवस ठरविला.

१६. ठरल्याप्रमाणें शिंद्यांच्या परतभेटीकरतां नाना त्यांच्या लष्करांत जाण्यास निघाले. त्यासंबंधीं पेशव्यांच्या बखरींत पुढीलप्रमाणें माहिती दिली आहे. ‘ त्या दिवशीं नाना फडनविस लष्करांत जाण्यास निघाले, तेव्हां अपशकूनही बहुत झाले. व शंकर जोशी यांणींही सांगितलें कीं, “ आपण जाऊं नये. ” इतकें होऊन जाण्यास निघाले. ते भवानी पेठेंत जात तोंपर्यंत पालखीभोंवतीं पांच हजार आरब चालला होता. माशी जाण्यास फिरीक नाहीं. मुकील व पेरू यांणीं वाटेंत दोन चार वेळां नानांस विनंती केली कीं, ‘ इतके आरब घेऊन लष्करांत यावयाचें कारण कांहीं नाहीं. ’ तेव्हां आरबांस नानांनीं सांगितलें कीं, “ तुह्मीं माघारें जावें. ” त्या वेळेस आरबांचा जमादार चाऊस याणें नानांस विनंती केली कीं, “ आह्मांस माघारें

फिरवूं नये. आजपर्यंत आम्हीं आपलें अन्न खाल्लें त्याचें सार्थक आज आहे." असें ते बोलले. तत्रापी गोष्ट नानांचे मर्जीस न येतां पेरू व मुकील यांचे विश्वासावर आरबांस शहरांत वाटेस लाविलें. आणि आपण लष्करांत गेले. जाऊन ज्या डेऱ्यांत बैठक केली होती तेथें जाऊन नाना बसले. नंतर दौलतराव शिंदे तेथें येऊन नानांस भेटून बोलणीं चालणीं होऊन शिंदे उठून गेले. पाठीमागें नाना बसले होते त्या डेऱ्याभोंवतीं पलटणांचें कडें बसलें. तेव्हां सर्वांस समजलें कीं, "नाना फडणीस यांस कैद [1] केलें." नानांचे बरोबर त्यांचे जे लोक आले होते त्यांच्यावर लोकांनीं हल्ला केला व त्यांची तोडातोड सुरू करून त्यांस उधळून लाविलें. अशा प्रकारें शिंद्यांनीं शेरास सव्वाशेर बनून नानांस कैद केलें.

---

१. पेशव्यांची बखर पान १९६.

प्रकरण ३८ वें.

महाडच्या कारस्थानांतून निघालेली नानांची भुतावळ.

इ. स. १७९७-१७९८.

१. शिंद्यांनीं नानांस कैद केल्यानंतर पुणें शहरांत दंगा होतो. नानांच्या अरबांचा अनर्थ टाळण्याकरितां बाजीरावांस भूर्दंड भरावा लागतो.—२ नानांबरोबर नानांच्या पक्षांतील लोकांस शिंदे कैद करतात. शिंदे कित्येकांकडून दंड वसूली घेऊन त्यांची मुक्तता करतात. केवळ दंडाचे पैसे भरून शिंद्यांकडून नानांची सुटका होणारी नव्हती.—३ महाडच्या कारस्थानाकरितां नानांनीं शिंदे व सर्जेराव यांच्याबरोबर जे गुप्त करार केले होते, ते अंमलांत आणण्याची जबाबदारी बाजीरावांवर पडते. त्याप्रमाणें शिंद्यांचे बायजाबाईबरोबर लग्न होतें. सर्जेराव घाटग्यांस शिंद्यांचें दिवाणपद मिळतें. शिंद्यांबरोबर आपल्या सुटकेविषयीं नाना वाटाघाट सुरू करतात. दीड कोट रुपये देण्यास नाना तयार होतात. पण नानांच्या अटी शिंद्यांस कबूल नसल्यामुळें ही वाटाघाट निष्फळ ठरते व शिंदे नानांस नगरच्या किल्ल्यावर पाठवून कैदेंत ठेवतात.—४ नानांनीं कबूल केल्याप्रमाणें शिंद्यांना दोन कोट रुपये देणें भाग होतें. पण ते कैदेंत पडल्यामुळें ती जबाबदारी बाजीरावांवर पडते. शिंद्यांची आर्थिक हलाखी. बाजीराव पैशाची जमवाजमव करण्याकरितां पेशव्यांच्या सावकारांशी वाटाघाटी करितात. पण त्यांचा तो प्रयत्न निष्फळ होतो. त्यामुळें शिंद्यांस पैसे वसूली करण्याकरितां नाईलाजानें बाजीराव संमति देतात.—५ पैसे वसूलीसाठीं शिंद्यांनीं सर्जेराव घाटगे व बाळोबा कुंजर यांची योजना केली. नाना व नानांचा पक्ष यांच्यावर सर्जेराव घाटग्यांचा रोष असण्याचीं कारणें.—६ पैसे वसूलीकरितां घाटग्यांचे निरनिराळे जालीम उपाय.—७ निरनिराळ्या इतिहासकारांनीं नानांना कैद करण्याच्या बाबतींत शिंद्यांनीं विश्वासघात केला अशीं विधानें आहेत. तीं खोटीं, कां व कशीं आहेत याचें विवेचन. शठं प्रति शाठ्यं हा व्यवहार नीतिधर्म कसा ठरतो.—८ दंडवसूलीच्या बाबतींत घाटग्यांनीं क्रूरपणाची व उद्दामपणाची कमाल केली हा इतिहासकारांचा आरोप कसा खोटा आहे याची मीमांसा व प्रतिक्रियेची कारणपरंपरा.—९ शिंद्यांकडून होणाऱ्या प्रतिक्रियेचीं कारणें.—१०

शिंदे व अमृतराव यांचा कल सांभाळून पेशव्यांच्या राज्यव्यवस्थेचा जम बसविणेचा बाजीराव प्रयत्न करतात. –११ महाडच्या कारस्थानामुळें पेशव्यांच्या राज्यांत माजलेली अनास्था सुधारून घेण्याची जबाबदारी बाजीरावांवर पडते. नानांनीं परशुरामभाऊ व त्यांचे चित्पावन अनुयायी यांच्यावर केलेले दंडवसूली-बाबतचे अमानुष जुलूम.—१२ नानांच्या लांडगेशाही न्यायनीतीचा एक मासला.—१३ नाना परशुरामभाऊंचा गळा केंसानें कसा कापीत होते याची हकीकत.—१४ बाजीरावांनीं सरदार धोंडोपंत यांचें घराणें उदयास केव्हां, कां व कसें आणलें ?—१५ सखारामबापूंनीं नगरच्या किल्ल्यांत कैदेंत असतांना नानांस देण्याकरितां तेथील किल्लेदारांकडे एक भविष्यसूचक चिठी दिली होती. सखारामबापू ज्योतिषी नसून खंदे मुत्सद्दी कां व कसे होते ?—१६ बाजीरावांचे नाना फडनविस यांस अधिकारभ्रष्ट केल्याचें फर्मान. बाजीरावांच्या अनुज्ञेप्रमाणें साताऱ्च्या महाराजांनीं नानांच्या कारकुनास कैद करून साताऱ्चा किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. —१७ पेशवाईचा कारभार सुव्यवस्थित करण्याचा बाजीरावांचा आटोकाट प्रयत्न. त्यांत महाडच्या कारस्थानामुळें उत्पन्न झालेले अडथळे. महाडच्या कारस्थानी खेळामुळें उत्पन्न झालेली नानांची भुतावळ. या भुतावळीनें केलेली बाजीरावांची पकड. इतिहासकारांनीं बाजीरावांस दिलेलीं दूषणें कशी मिथ्या आहेत याची मीमांसा.—१८ दौलतराव शिंदे व शिंदेबाया यांच्यामधील कलहास सुरवात. सर्जेराव घाटगे जबरदस्तीनें शिंदेबायांस मेण्यांत बसवून शिंद्यांच्या लष्करांतून बऱ्हाणपुराकडे बंदोबस्तानें रवानगी करतात. शिंदे-बायांच्या पक्षाचा मुझाफीरखां सरदार सर्जेरावांच्या फौजेवर हल्ला करून शिंदे-बायांची मुक्तता करतो. अमृतराव पेशवे शिंदेबायांस आश्रय देतात. मुझाफी-रखां सर्जेराव घाटग्यांच्या फौजेस उधळून लावितो व सर्जेराव पराभूत होऊन पुण्यास पळून येतो.—१९ शिंदेबायांची सर्जेरावानें केलेली अप्रतिष्ठा. ही अप्र-तिष्ठा, शिंदेबायांनीं दौलतराव शिंद्यांविरुद्ध केलेल्या कृत्यांची जरी प्रतिक्रिया होती तरी बाजीराव पेशव्यांच्या घराण्याच्या इभ्रतीला ती कमीपणा आणणारी होती, म्हणून बाजीराव व अमृतराव या उभयतांनीं शिंदेबायांचा पक्ष धरला, व आपणावर दौलतरावांचा रोष ओढवून घेतला.—२० बाजीराव पेशवे व साता-रचे महाराज यांच्यामधील कलहाचीं कारणें, व कलहास सुरवात.—२१ बाजी-राव सातारकरांचें बंड मोडण्याकरितां रास्त्यांची जामिनकी घेऊन परशुरामभाऊंची

मुक्तता करितात. रास्ते व परशुरामभाऊ हे साताऱ्च्या महाराजांचें बंड मोडतात. साताऱचे महाराज पूर्ववत् पेशव्यांचे बंदिवान होऊन राहतात. बाजीरावांस दहा लक्ष गुन्हेगारी देऊन परशुरामभाऊ मुक्त होतात.—२२ शिंदेबाया व शिंदे यांच्यांत बाजीराव समेट घडवून आणतात. शिंदे व शिंदेबाया यांच्यांत नवीन वितुष्ट उत्पन्न होईल अशी सर्जेराव यांची कारवाई. सर्जेरावांचा शिंदेबाया व अमृतराव यांच्या गोटावर हल्ला. सर्जेरावांचा पराभव. सर्जेरावांकरतां दौलतराव शिंद्यांची बाजीरावांकडे क्षमेची याचना.—२३ पेशवे घराण्याला शोभेल अशी बाजीराव पेशव्यांची मनोवृत्ति. बाजीराव मानभंग व अप्रतिष्ठा सहन करून सर्जेराव घाटगे व शिंदे यांना क्षमा करतात. याच्या उलट नानांची वृत्ति कशी होती.—२४ शिंदेबाया व शिंदे यांच्यामधील समेटाबद्दलची बाजीरावांची खटपट व्यर्थ होते. या उभयतांतील तंटा अव्याहत चालावा अशी नानांची प्रेरणा असल्यामुळें असहाय्य बाजीराव समेट घडवून आणूं शकले नाहींत.—२५ बाजीरावांविषयीं शिंद्यांच्या मनांत वितुष्ट उत्पन्न होतें. शिंदे नानांची सुटका करण्याचा विचार करतात. नानांच्या सुटकेमुळें शिंद्यांचे होणारे फायदे. शिंदे नानांची सुटका करतात व त्यांस नगरहून आणून पुण्यास आपल्या लष्करांत ठेवतात.—२६ शिंद्यांच्या लष्करांत नाना आल्यानंतर त्यांच्या नवीन कपट-कारस्थानास सुरवात. फकीरजी गाडवे व सर्जेराव घाटगे हे कैद होतात. शिंद्यांच्या कंपूपलटणींत नानामुळें बेबनाव होतो.—२७ नानांनीं शिंद्यांच्या लष्करांत कलहाचा कसा वणवा पेटविला याची हकीकत.—२८ शिंद्यांच्या घरगुती तंट्यामुळें व नानांच्या सुटकेमुळें पुणें शहरावर ओढवलेल्या आपत्तीची हकीकत.—२९ शिंद्यांनीं नानांची सुटका केल्यामुळें पेशवाईच्या रक्षणाकरितां बाजीरावांच्या मनस्थितीची कल्पना. बाजीराव नानाबरोबर समेट घडवून आणण्यास उद्युक्त होतात.—३० बाळोबातात्यांची सुटका होऊं नये म्हणून नानांनीं केलेलें कारस्थान. नानांच्या प्रेरणेनें परशुरामभाऊंना वध करण्याकरितां करवीरकरांनीं पाठविलेले मारेकरी. सर्व कारस्थानाच्या मुळाशीं नाना एकटेच सूत्रधार कसे होते याचें अनुमान.—३१ बाजीराव नानांच्या भेटीस गेले असतां नानांनीं दुर्जन साहेबांकडून त्यांची अप्रतिष्ठा व मानभंग करविला. त्यांतील नानांचे मुख्य हेतू. नानांनीं दौलतरावांस लष्करी सामर्थ्यांत हलकें कसें केलें ?—३२ यथापूर्व पेशव्यांच्या कारभारावर नानांची योजना करण्याची शिंद्यांची प्रतिज्ञा.

आपल्या अब्रूच्या व सरंजामाच्या रक्षणाकरितां इंग्रज व निजाम यांची हमी नाना बाजीरावांकडून मागतात. या बाबतींत नानांची चिमटेखानी मसलत.—३३ नगरच्या किल्ल्यांत नाना शिंद्यांच्या कैदेंत असतांना इंग्रज, निजाम, भोंसले, करवीरकर यांच्याशी, शिंदे, बाजीराव व परशुरामभाऊ यांच्याविरुद्ध नानांची कशीं कारस्थानें चाललीं होतीं याची हकीकत.—३४ राघोबादादा व नाना फडनविस यांच्या बाबतींत इतिहासकारांची झालेली दिशाभूल.—३५ नानांनीं बाजीराव पेशव्यांबरोबर जें वर्तन चालविलें होतें तें सेव्यसेवक धर्माचें अतिक्रमण करणारें कसें होतें. नाना हे आपल्या अधिकारलालसेला बळी पडल्यामुळें कसे आंधळे बनले होते याची मीमांसा.—३६ बाजीराव पेशव्यांवर नाना मारेकरी घालतात. "मी सांगतों तसें ऐक, नाहीं तर मरणास सिद्ध हो," असाच नानांच्या स्वभावाचा निष्कर्ष.—३७ बाजीराव गुप्तवेशानें नानांस शरण जातात. बाजीराव पेशवाईच्या रक्षणाकरितां अधिकारसंन्यास घेतात. नाना यथा-पूर्व पेशवाईचे कुलमुखत्यार होतात. नारोपंत चक्रदेव यांच्या नजरेखालीं शनिवारवाड्यांत बाजीराव नजरकैदेंत राहतात.

१. नाना फडनविस यांना शिंद्यांनीं कैद केलें ही बातमी पुण्यांत पसरतांच जिकडे तिकडे दंगे-धोपे व्हावयास सुरवात झाली. सर्जेराव घाटगे यांच्या फौजेच्या टोळ्या शहरांत शिरून त्यांनीं नानांच्या पक्षाच्या लोकांचीं घरें लुटलीं. त्या वेळीं कित्येक लोकांनीं घरांचे दरवाजे बंद करून खिडक्यांतून व गच्चयांवरून घाटग्यांच्या लोकांवर बंदुकांचा मारा केला. नानांच्या अरबांच्या टोळ्या व शिंद्यांच्या टोळ्या यांच्या रस्तो-रस्तीं गांठी पडून त्यांच्या लढाया सुरू झाल्या. जिकडे पहावें तिकडे लुटालूट, खून, मारामारी याचा देखावा दिसूं लागला. त्या दिवशीं रात्रीं व दुसऱ्या दिवशीं तोफा व बंदुका यांचे सारखे आवाज पुणें शहरांत येत होते. नानांनीं पांच सहा हजार आरब पठाण आपल्या चाकरीस ठेवले होते. त्यांच्या पगाराची बाकी नानांनीं द्यावयाची होती. नाना कैदेंत पडतांच त्यांनीं देणें राहिलेल्या पगाराच्या वसुलीकरतां पुणें शहरांत दंगा करण्यास सुरवात केली. त्यांनीं शहराची नाकेबंदी केली

व कित्येक बडे मुत्सद्दी धरून त्यांना पहाऱ्यांत बसविलें. त्यांनीं बाजीराव पेशव्यांना 'आम्हीं मरून जाऊं, पण आमची तलब (पगाराची बाकी) भागवल्याखेरीज शहर सोडून जाणार नाहीं' असा निरोप पाठविला. शिंद्यांच्या पलटणांची व आरब पठाणांची शनिवारवाड्याभोंवतीं लढाई सुरू होईल असाही रंग दिसूं लागला. बाजीरावांची द्रव्यहीन स्थिति नानांनीं कशी करून ठेवली होती, हें पूर्वीं आलेंच आहे. त्या स्थितींत नानांनीं द्यावयाच्या आरबांच्या पगाराच्या बाकीचा बोजा, भावी घातपात टाळण्याकरतां बाजीरावांना आपल्या शिरावर घेणें प्राप्त झालें. त्यांनीं पुणें शहरांत अरब पठाणांकडून होणारा अनर्थ टाळण्याकरतां, त्यांचा सर्व पैसा चुकता केला व त्यांस सुखासमाधानानें पुणें सोडून जाण्यास लाविलें. अशा प्रकारें बाजीरावांनीं नानांच्या आरब पठाणांपासून पुणें शहराचें रक्षण केलें. नानांकरतां बाजीराव यांना त्यांच्या द्रव्यहीन स्थितींत हा भूर्दंडच भरावा लागला यांत संशय नाहीं. आरब पठाण निघून गेल्यानंतर पुणें शहरांत बरीच शांतता नांदूं लागली.

२. नानांना कैद केलें त्या वेळीं त्यांच्याबरोबर बऱ्याच लोकांना शिंद्यांनीं कैद केलें होतें. ही सर्व मंडळी शिंद्यांच्या लष्करांतच कैदेंत होती. नानांना कैद केल्यापासून सुमारें तीन सव्वातीन महिने ते शिंद्यांच्या लष्करांतच कैदेंत होते. शिंद्यांनीं या मुदतींत नानांबरोबर समेट घडवून आणण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. या बाबतींत नानांशीं वाटाघाट करणारे सर्जेराव घाटगे व फकीरजी गाढवे हे होते. नानांबरोबर समेट घडवून आणण्याचा ज्याप्रमाणें शिंद्यांचा प्रयत्न चालू होता, त्याचप्रमाणें नानांबरोबर कैदेंत पडलेले आबा शेलूकर, दादा गद्रे, बजाबा शिराळेकर वगैरे जे नानांच्या पक्षांतील मोठमोठे लोक होते, त्यांच्याबरोबरही समेटाच्या वाटाघाटी सुरू होत्या. या लोकांबरोबर शिंद्यांनीं सामोपचारानें तडजोड करून घेतली. शेलूकरांकडून पंधरा लक्ष, दादा गद्रे यांचेकडून सात लक्ष व शिराळेकर यांचेकडून पन्नास हजार दंड आगाऊ भरून घेऊन त्यांची एका महिन्यांतच शिंद्यांनीं

सुटका केली. नानांच्या सुटकेबाबत फक्त पैशाचाच जर प्रश्न असता, तर तोही शिंद्यांना कमी जास्त प्रमाणांत तडजोड करून सोडवितां आला असता. परंतु नानांच्या बरोबर होणारी वाटाघाट ही या वेळीं केवळ पैशापुरती राहिलेली नव्हती. महाडच्या कारस्थानाच्या वेळीं नानांनीं शिंद्यांच्या बरोबर केलेले करार त्यांना पुरे करून द्यावयास भाग पाडणें हा शिंदे व घाटगे यांचा मुख्य हेतु होता. या कराराप्रमाणें शिंद्यांबरोबर घाटग्यांच्या मुलीचें लग्न व्हावयास पाहिजे होतें; व त्याचप्रमाणें शेणवी मुत्सद्यांच्या हातून दिवाणीपद काढून घेऊन तें सर्जेरावांना देणें प्राप्त होतें. नानांनीं पूर्वी ठरविलेल्या या दोन्ही गोष्टी शिंदेबाया व शेणवी मुत्सद्दी यांना वावड्या होत्या. त्यामुळें त्यांच्याविरुद्ध नानांना जाणें अशक्य झालें होतें. या वेळीं शिंदेबाया व शेणवी मुत्सद्दी यांचा नवीन पक्ष नानांनीं शिंद्यांविरुद्ध निर्माण केला होता व त्याच्या बळावर आपली मुक्तता होईल असा नानांना विश्वास वाटत होता. शिंदेबाया व शेणवी मुत्सद्दी ही मंडळीही शिंद्यांच्या लष्करांतच असल्यामुळें, शिंदे व घाटगे यांच्या हेतूस पहिल्या प्रतीचें महत्व आलें. या शिंदे—घाटग्यांच्या हेतूस नाना, शिंदेबाया व शेणवी मुत्सद्दी यांची अनुमती मिळण्याचा रंग जेव्हां शिंद्यांना दिसून येईना, तेव्हां ते बाजीरावांबरोबर नवीन केलेल्या कराराच्या पूर्ततेच्या मागें लागले व त्याप्रमाणें त्यांचे प्रयत्न सुरू झाले.

३. घाटग्यांतर्फे शिंद्यांनीं बाजीरावांबरोबर केलेल्या कराराप्रमाणें घाटग्यांची मुलगी बायजाबाई हिच्याबरोबर शिंद्यांचें लग्न तारीख २ मार्च सन १७९८ रोजीं मोठ्या थाटानें पार पडलें. ' रुपेचें बोहलें व सोनेरी चांदवा व मोत्यांची झालरी याप्रमाणें भारीच काम जाहलें.[१] ' यावरून लग्नाचा थाट कशा वैभवाच्या स्वरूपाचा असेल हें सहज लक्षांत येईल. या लग्नामुळें घाटग्यांस शिंद्यांच्या मुख्य कारभारीपदाचा लाभ झाला. फकीरजी गाढवे हा दुय्यम कारभारी बनला. या गोष्टी घडून आल्यामुळें शिंदेबाया व शेणवी मुत्सद्दी यांच्या पायाची आग मस्तकाला झोंबली व त्यांचे शिंद्यां-

---

१. ऐ. ले. सं. पा. ५३५९. पत्र नं. ४१७३.

विरुद्ध प्रयत्न सुरू झाले. शेणवी मुत्सद्दी मंडळी, आबा शेळूकर यांचे मतांत मिळून मोंगलांशीं संधान करीत होते हा फितवा अलिजाबहादर यांस समजला'[१] याकरिता नारायणराव बक्षी, जिवबादादा बक्षी यांचे बंधु बाळाभाऊ, बाजीबा मोदी, देवजी गौळी, आणखी दोन असामी अशा सहाजणांस शिंद्यांनीं कैद करून नगरच्या किल्ल्यावर नेऊन ठेवलें. ही हकीकत शिंद्यांचें लग्न झाल्यानंतर चार पांच दिवसांतच घडून आली. शेणवी मुत्सद्यांस कैद केल्यानंतर शिंदेबायांचा पक्ष हलका झाला असें पाहून नानांनीं शिंद्यांबरोबर समेटाची भाषा आबा चिटणीस यांचे मार्फत सुरू केली. त्या वेळीं अलिजाबहादर यांचे लष्करांत भोंसल्यांचा वकील व निजामाचा वकील असे आले[२] होते. नाना फडनविस यांच्या जिवास अथवा अब्रूस धक्का लावणार नाहीं अशी पूर्वी बाजीरावसाहेबांनीं निजामअलीस चिठी लिहून दिली होती व भोंसल्यांसही तसें आश्वासन दिलें होतें. त्यास अनुसरूनच या वेळीं भोंसले व निजाम यांचेकडून शिंद्यांच्या लष्करांत वकील आले होते. या समेटाच्या बाबतींत नानांचें असें ह्मणणें पडलें कीं, आपण शिंद्यांस फक्त दीड कोट[३] रुपये देतों. ते घेऊन शिंद्यांनीं आपली मुक्तता करावी. हे रुपये शिंद्यांचा कूच जांबगांवास गेल्यानंतर मिळतील. अगोदर मिळणार नाहींत. शिवाय शिंद्यांनीं पेशव्यांच्या राज्यकारभारांत बिल्कुल ढवळाढवळ करूं नये. त्यांनीं अलिजाबहादरांच्या दौलती पुरतेंच लक्ष द्यावें. नानांच्या या अटी शिंद्यांना मान्य होण्यासारख्या नव्हत्या. पूर्वीप्रमाणें पेशव्यांच्या दौलतीचा कारभार नानांच्या हातीं देणें ह्मणजे बाजीरावांना नानांच्या कैदेंत जाऊं देणें असा पेंच शिंद्यांवर येऊन पडत होता. बाजीराव हे नानांच्या कैदेंत राहण्यास बिल्कुल तयार नव्हते. त्यामुळें नानांबरोबर होणाऱ्या वाटाघाटी निष्फळ होऊं लागल्या. पेशव्यांच्या दौलतीचा एकमुखी कारभार नाना मागत होते. तो बाजीराव यांच्या सर्वस्वनाशाचा असल्यामुळें शिंद्यांना नानांची ही अट मान्य होण्यासारखी नव्हती. त्यामुळें

१. ऐ. ले. सं. पा. ५३५५ पत्र नं. ४१६८. २ व ३ ऐ. ले. सं. पान ५३५८.

वाटाघाटी व्यर्थ ठरून शेवटीं नानांस शिंद्यांनीं तारीख ६ एप्रिल सन १७९८ रोजीं आपल्या लष्करांतून नगरच्या किल्ल्यावर रवाना केलें. अशा प्रकारें शिंद्यांनीं नानांच्या कैदेचा पक्का बंदोबस्त केला.

४. नानांस शिंद्यांनीं कैद केलें त्या वेळीं बाबा फडके, नारोपंत चक्रदेव, लिंबकराव परचुरे, गोविंदराव काळे, गोविंदराव पिंगळे, वगैरे नानांच्या कारभारांतील व पक्षांतील मुत्सद्दी लोकांना बाजीराव यांनीं कैद केलें होतें. शनिवारवाड्यावर शिंद्यांच्या कंपूचा पहारा होता, तो त्यांनीं दूर केला व त्या ठिकाणीं आपले स्वतःचे नवीन लोक ठेऊन बंदोबस्त करून घेतला. शिंद्यांबरोबर बाजीराव यांचा जो नवीन करार झाला होता त्यापैकीं शिंद्यांचें लग्न व घाटग्यांचें कारभारीपद या गोष्टी घडून आल्याच होत्या. आतां फक्त दोन कोट रुपयांची तरतूद बाजीरावांना करणें प्राप्त होतें. शिंद्यांनीं आबा शेळूकर, दादा गद्रे वगैरे नानांच्या पक्षांतील लोकांकडून सुमारें पन्नास लक्ष रुपये आतां-पर्यंत वसूल केलेच होते. बाजीराव व शिंदे यांच्या इच्छेप्रमाणें नानां-बरोबर जर नवीन करार झाला असतां, तर शिंद्यांना त्यांच्या देणें राहिलेल्या बाकीबद्दल दीड कोट रुपये मिळाले असते, व त्यामुळें बाजीराव यांचेवर शिंद्यांना द्यावयाच्या पैशाचा बोजा पडला नसता. परंतु शेवटपर्यंत नानांनीं आपला हेका न सोडल्यामुळें, शिंद्यांना नानांचा नाद सोडून द्यावा लागला व त्यांची रवानगी नगरच्या किल्ल्यावर करावी लागली. या एकंदर परिस्थितीमुळें शिंद्यांना आपली पैशाच्या दृष्टीनें झालेली हलाखी भरून काढतां आली नाहीं. त्यांच्यामागें त्यांच्या फौजेच्या बाकीचा तगादा सारखा सुरू होता. नानांबरोबर समेट घडून आल्यास एकदम दीड कोट रुपये मिळतात या भरंवशावर शिंद्यांच्या लष्करांतील लोक धीर धरून होते. परंतु ती आशा नष्ट झाल्यामुळें आतां त्यांनीं आपल्या तलबीबद्दल शिंद्यांना निर्वाणीची तसदी लावली. शिंद्यांनीं बाजीराव यांस दोन कोट रुपये करारप्रमाणें देण्यास निकड लाविली. बाजीराव यांनीं

दोन कोट रुपये जमविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. नानांच्या आमदानींतील जुने मुत्सद्दी जे द्रव्यवान् होते त्यांचेजवळ त्यांनीं पैशाची मागणी केली. त्या लोकांनीं बाजीरावांना पैसा देण्याचें नाकबूल केलें. त्या सावकार लोकांना मारहाण करून निर्दयपणानें त्यांचें द्रव्य हरण करण्याचा नानाप्रमाणें बाजीराव यांचा स्वभावधर्म नव्हता, ह्मणून त्यांनीं तसे उपाय योजिले नाहींत. बाजीराव यांनीं जुन्या मुत्सद्यांस धाक दपटशा दाखवून पाहिला, परंतु त्यांनींही बाजीराव यांस कोणत्याही प्रकारें मदत केली नाहीं.[१] रामचंद्र नाईक परांजपे, वानवळे, बळवंतराव बांकडे वगैरे सावकारांसही बाजीरावांनीं पैसा देण्याबद्दल तगादा लाविला. परंतु या वेळीं कोणीही नानांच्या धाकामुळें, त्यांस पैसा देण्यास तयार झाला नाहीं. तेव्हां बाजीरावांचे सर्व प्रयत्न थकले व दोन कोट रुपयांच्या वसुलीबाबत शिंदे सांगतील व योजतील तो उपाय त्यांना मान्य करणें भाग पडलें.

५. पैशाच्या वसुलीकरतां शिंद्यांकडून सर्जेराव घाटगे यांची योजना करण्यांत आली. त्यांना मदतीस ह्मणून बाळोजी कुंजर यांनाही नेमण्यांत आलें. घाटग्यांच्या मनांत नानाबद्दल भयंकर द्वेष उत्पन्न झालेला होता. नानांनीं आपल्या वाड्यांतील देवघरांत सुवर्णमूर्तींची स्थापना करण्याचें निमित्त दाखवून शिंद्यांवर जादुटोणा करण्याचें कृत्य केलें होतें; शिंदे पैशाच्या पेचांत सांपडले असतां त्यांना त्यांनीं पैसा दिला नाहीं; आपल्या मुलीचें शिंद्यांबरोबर लग्न लावून देण्याची पहिल्यानें हमी घेऊन शेवटीं ते उलटले व त्या बाबतींत त्यांनीं केवढा व कसा विरोध केला; आपल्याला शिंद्यांचें कारभारीपद मिळूं नये ह्मणून त्यांनीं किती प्रयत्न केले; शिंदेबायांकडून दौलतरावांवर कसे कसे निंद्य आरोप करविले, वगैरे वगैरे गोष्टीमुळें नानांबद्दल घाटग्यांचें मन संतप्त झालेलें होतें. नानांना कैद केल्यानंतर या सर्व गोष्टींचा सूड नानांना गुप्त

---

१. ऐ. ले. सं. पा. ५३०९.

ठिकाणीं चाप लावून किंवा तापलेल्या तोफेवर त्यांना बसवून घाटग्यांनीं उगवला असता; परंतु त्यांच्या जीविताच्या व अब्रूच्या रक्षणाबद्दल निजाम व भोंसले यांनीं पूर्वीच हमी घेतलेली असल्यामुळें घाटग्यांना तसें करतां आलें नाहीं. या करतां नानांच्या पक्षांतील लोकांवर त्याचा वचपा काढून आपल्या संतापाचें अंशतः तरी शमन करण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला.

६. शिंद्यांच्या लष्करांतून उठून आतां सर्जेराव घाटगे पुण्यांत खुद्द नानांच्या वाड्यांत येऊन राहूं लागले. नानांची बैठक ज्या दिवाणखान्यांत होती त्याच ठिकाणीं घाटग्यांनीं आपली बैठक बसविली. कालियामर्दनाची मूर्ति नानांनीं आपल्या देवघरांत स्थापना केली होती. त्या ठिकाणीं घाटग्यांनीं अजापुत्रांच्या वधाचा आपला खाटिकखाना उघडला. याप्रमाणें घाटग्यांनीं शिंद्यावरील नानांच्या जादुटोण्याच्या गुन्ह्याच्या जागेची व्यवस्था पहिल्यानें लाविली व नंतर ते नानांच्या पक्षांतील लोकांच्या पारिपत्याला लागले. बाबा फडके, नारोपंत चक्रदेव, त्रिंबकराव परचुरे, गोविंदराव पिंगळे वगैरे नानांच्या कटांतील जे लोक बाजीरावांनीं पहिल्यानें आपल्या अटकेंत ठेविले होते, त्यांची यथामति घाटग्यांनीं बेअब्रू केली व हालहाल करून त्यांच्याकडून जेवढें द्रव्य मिळणें शक्य होतें तेवढें त्यांनीं वसूल केलें. गांवांतील धनिक लोकांना नानांच्या वाड्यांत घाटगे धरून आणीत होते. त्यांचा ज्यांच्यावर ज्या प्रमाणांत राग असेल, त्याप्रमाणें त्यांना शिवीगाळ करणें, धक्काबुक्कीचा प्रसाद देणें, व मनाला येईल तो दंड मागणें याप्रमाणें घाटग्यांचा दंड-वसुलीचा वरवंटा नानांच्या पक्षांतील लोकांवर फिरूं लागला. घाटग्यांच्या या शासनपद्धतीस जो भीक घालीत नव्हता, त्याला ते वानवडीस शिंद्यांच्या लष्करांत फकीरजी गाढवे यांच्याकडे पुढील पारिपत्याकरतां पाठवून देत होते. त्या ठिकाणीं या वरिष्ठ दर्जाच्या गुन्हेगारांना वरिष्ठ दर्जाची शिक्षा, त्यांच्याकडून दंडाचें द्रव्य वसूल होईपर्यंत, गाढवे देत होते. नारायणराव वैद्य, बाबूराव केशव, चिंतोपंत देशमूख यांस छड्यांनीं मारण्यांत आलें. बाबूराव केशव यांच्या पुत्रानें पांच लक्ष रुपये कबूल केले. देशमूख यांनीं पन्नास

हजार कबूल केले. नानांच्या पक्षांतील भाऊ कापशे व राघोपंत पेंडसे यांना घाटग्यांनीं लष्करांत पाठवून दिले. नानांकडील ऐवजाची त्यांनीं माहिती दिली. तेव्हां त्यांना गांवांत आणल्यानंतर त्यांनीं ऐवज दाखवून दिला. ज्यांच्या ज्यांच्या घरीं नानांचा ऐवज सांपडला, त्यांस कैद करण्यांत आलें. हा ऐवज सुमारें पासष्ट ते नव्वद लक्ष रुपये किंमतीचा मिळाला. राघोपंत गोडबोले, भाऊ कापशे व बळवंतराव बाबूराव यांच्यावर प्राणांतिक प्रसंग गुजरला होता. दररोज वस्त्रविरहित करून त्यांस तापलेल्या तोफेवर बसवीत होते. नानांच्या कटांतील त्यांचे चुलतबंधु, विजयदुर्गचे सुभेदार गंगाधरपंत भानु यांचेकडे पंधरा लक्ष रुपये सरकारी बाकी येणें होती. ती व आठ लक्ष रुपये खंडाचे अशी तेवीस लक्ष रुपयांची त्यांचेकडे मागणी होती. ती त्यांनीं न दिल्याबद्दल त्यांच्या हातापायांस दगड बांधण्यांत आले. त्यासही त्यांनीं दाद दिली नाहीं, म्हणून त्यांस वस्त्रविरहित करून दोन प्रहरच्या तप्त उन्हानें तापलेल्या तोफेवर त्यांस बसविण्यांत आलें होतें. त्याची झळ नाजुक जाग्यास लागली, शिवाय त्यांस मारही देण्यांत आला, त्यामुळें ते मरण पावले. याप्रमाणें घाटग्यांनीं पैशाच्या वसुलीकरतां जालिम उपायांचा अवलंब केला.

७. शिंद्यांनीं नानांना विश्वासघातानें कैद केलें व दंड वसूल करण्यांत घाटग्यांनीं क्रूरपणाची व उद्दामपणाची कमाल केली असा त्यांच्यावर बऱ्याच इतिहासकारांचा आरोप आहे. बाजीराव पेशवेही विश्वासघाताच्या आरोपांतून सुटलेले नाहींत. नानांचें पारिपत्य करण्याचा बाजीराव व शिंदे यांनीं संकल्प केला होता. त्याला अनुसरून नानांचें कशा प्रकारें पारिपत्य करावें याचाही त्यांनीं मनसुबा ठरविला. मुकीरसाहेबांच्या मध्यस्थीनें शिंद्यांनीं नानांच्या मनांत विश्वास उत्पन्न केला व शेवटीं त्यांना दगलबाजीनें कैद करून त्यांचा विश्वासघात केला. या शिंद्यांच्या व त्यांच्याबरोबर सहकार्य करणाऱ्या लोकांच्या कृतीला ‘ विश्वासघाताचेंच कृत्य ’ असें वर वर पहाणारा कोणीही इसम ह्मणेल. परंतु न्यायाच्या कसोटीला जर शिंद्यांची ही कृति लावावयाची असेल

तर मात्र शिंद्यांचें हें कृत्य विश्वासघाताचें मुळींच ठरत नाहीं. उलट तें नीतिधर्माचेंच ठरतें. घरांत धान्य वगैरे खाऊन उंदीर उपसर्ग देतात, उंदरांचा नाश केल्याशिवाय त्यांचा उपसर्ग टळत नाहीं. अशा स्थितींत सुंदर पदार्थांचें उंदरांना आमिष दाखवून त्यांना पिंजऱ्यांत पकडणें, हें उंदरांचा स्वभावधर्म लक्षांत घेतां, विश्वासघाताचें ठरूं शकत नाहीं. ज्याला धरावयाचें त्याच्या स्वभावधर्माला अनुसरूनच त्याला धरण्याचा मार्ग योजावा लागतो. नानांचा सर्व जन्म दुसऱ्यांचा विश्वासघात करण्यांतच गेला. त्यांच्या मुत्सद्देगिरीच्या धोरणाचा मुख्य पाया विश्वासघाताच्या तत्वावरच रचण्यांत आलेला होता, हें मागील इतिहासावरून दिसून येईल. महाडचें सर्व कारस्थान विश्वासघाताच्या तत्वावरच नानांनीं यशस्वी केलें. शिंद्यांना घाटग्यांच्या मुलीचें व एक कोट रुपयांचें त्यांनींच आमिष दाखविलें. घाटग्यांना शिंद्यांच्या कारभारीपदाचा मोह त्यांनीं दाखविला. दगलबाजी व विश्वासघात बेमालुमपणानें कसा करावा याचे पाठ नानांनीं शिंदे, घाटगे व मशीरउलमुलुख यांना देऊन शेवटीं परशुरामभाऊ पटवर्धन आणि बाळोबातात्या पागनीस यांचा त्यांनीं कसा विश्वासघात केला, हा ताजा इतिहास मागें आलेलाच आहे. महाडच्या कारस्थानांतील तत्वांची सर्व मुळें नानांच्या त्या मागील सर्व कारस्थानांत पसरलेलीं आहेत. एकंदरींत विश्वासघातकी स्वभाव धर्माच्या मनुष्याला कैद करावयास रामबाण ठरेल अशीच मसलत शिंद्यांना करणें प्राप्त होतें. 'विश्वासघाताशिवाय नानांस पकडण्याचें दुसरें साधन नव्हतें. तो विश्वासघात होऊं नये म्हणून नाना जपत असतां शेवटीं शिंद्यांनीं त्याच साधनाचा उपयोग करून त्यांचा नाश[1] केला.' या उताऱ्यावरून आपला शिंदे विश्वासघात करणार अशी नानांना पूर्वीपासून जाणीव होती, व त्याप्रमाणें ते सावधगिरी ठेऊन वागत होते. अशा स्थितींत शिंद्यांनीं शेराला सव्वाशेर बनून नानांवर ज्याअर्थीं मात केली, त्याअर्थीं विश्वासघाताच्या निंद्य गुन्ह्याला शिंदे पात्र ठरत नाहींत. नाना व शिंदे या गुरुशिष्यांचें या वेळीं विश्वासघाताचेंच समर चाललं होतें. त्यांत शिंदे विजयी झाले हें

---

१. ना. फ. च. पान २०४.

त्यांचें दूषण नसून खात्रीनें भूषणच आहे. 'शठं प्रति शाठ्यं' हा एक नीतिधर्मच निसर्ग शिकवीत असतो. या एकंदर परिस्थितीवरून निर्विकार मनानें विचार केला असतां जे इतिहासकार शिंद्यांवर विश्वासघाताचा निंद्य आरोप करतात, तो कसा खोटा व अव्यवहार्य आहे हें आतां निराळें सांगण्याचें कारण नाहीं. राघोबादादासारख्या भोळ्या सांबाला कपटाचरणानें फसवून त्यांचा विश्वासघात करणें, किंवा परशुरामभाऊ पटवर्धनासारख्या शुद्ध मनाच्या व सरळ बुद्धीच्या पुरुषाचा केवळ स्वार्थाकरतां विश्वासघात करणें, या नानांच्या कृति नीतिशास्त्राप्रमाणें खास निंद्य आहेत. वंद्य अथवा निंद्य कृति ठरविणें तें उभय पक्षांतील कृति पडोशाला ठेऊन नंतर ठरवावयाचें असतें. एकदेशीय विधानें न्यायाच्या कसोटीला उतरत नसतात.

८. दुसरा आरोप ह्मणजे दंड वसूल करण्यांत घाटग्यांनीं क्रूरपणाची कमाल केली हा होय. शिंदे काय अगर घाटगे काय, हे दोघेही महाडच्या कारस्थानापासून नानांचे चेले बनलेले होते. विश्वासघात, कपटनीति, क्रूर वृत्ति हे सारे गुण नानांच्या नीतिपाठांतूनच त्यांना मिळालेले होते. त्यामुळें दंडवसुलीकरतां नानांच्या उपाययोजनेपैकीं कोणते रामबाण उपाय यशस्वी होतील हेंही त्यांना अवगत होतें. तोतयाच्या बंडाला सामील झाल्याच्या आरोपावरून रत्नागिरीच्या किल्लेदाराला, पेशवे सरकाराच्या सावकाराला, माधवराव पेशव्यांच्या मरणकालीं त्यांच्या गळ्याला लागलेला कर्जाचा फांस आपल्या गळ्याला लावून घेणाऱ्या उपकारकर्त्या रामचंद्रपंत नाईकाला, त्यांच्या नाजुक स्थानीं चाप लावून दंडवसुलीकरतां त्यांचे नाना प्रकारें नानांनीं हालहाल करविले होते. त्यांची कशाच प्रकारची बाकी ठेवली नव्हती. पेशवे सरकारचे इभ्रतदार पालखीपदस्थ सरदार रामचंद्रपंत नाईक यांचे अमानुष हाल करून नानांच्या क्रूर मनोवृत्तीचें समाधान त्या वेळीं झालें नाहीं, ह्मणून रामचंद्रपंतांच्या मानधनसंपन्न पतिव्रता स्त्रीला कैद करून तिला एकाद्या सामान्य डोंबाऱ्याच्या अगर केकाड्याच्या स्त्रीप्रमाणें रत्नागिरीहून पुण्याला चालत, फरफटत, नानांनीं आणविलें होतें. नेहमीं मेण्यांतून जाणाऱ्या सुद्द

पेशव्यांच्या आप्त मंडळींतील एका थोर स्त्रीची विटंबना नानांनीं अशा प्रकारें करविली होती. व्यंकटराव घोरपडे वगैरे इतर सरदारांना उपोषणें घालून त्यांचे कसे कसे नानांनीं हाल करविले हाही इतिहास मागें आलाच आहे. 'बंडखोर ब्राम्हण असले तरी दया न धरितां त्यांस मारून टाकावें, त्यांची मालमत्ता सरकारांत घेऊन बायकापोरें कैदेंत टाकावीं.[१]' असा नाना परशुरामभाऊंस 'आमच्या सरदारांचीं सत्वेंच जात चाललीं,' असा टोमणा मारून हुकूम सोडतात. राघोबादादा, मोरोबादादा, सखारामबापू, परशुरामभाऊ पटवर्धन वगैरे मंडळींची व त्यांच्या पक्षांतील सरदारांचीही वेळोवेळीं नानांनीं काळभैरवी सोट्याखालीं तितक्याच क्रूरपणानें वासलाद लाविली होती. नानांच्या या अधमपणाच्या व क्रूरपणाच्या कृष्णकृत्यांवर नानांच्या पक्षपाती खरेशास्त्र्यांसारख्या इतिहासकारांनींही पारिपत्यें करण्याचे कामीं 'नानांनीं बराच कडकपणा धरला होता' असें न्यायनिष्ठुरतेचें मोहक आवरण घालून नानांच्या खऱ्या स्वभावधर्माला झांकून ठेवलें आहे. आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचें तें कारटें! ही म्हण नानांच्या बाबतींत इतिहासकारांनीं सार्थ करून दाखविली आहे. नानांच्या क्रूर कृत्यांचा इतिहास शिंदे व घाटगे यांना मात्र जुना झालेला नव्हता. नानांच्या नीति-नाल्याचीं सर्व वळणें महादजीच्या कारस्थानापासून शिंदे व घाटगे यांना प्रत्यक्ष अवगत झालेलीं होतीं. आजपर्यंतच्या नानांच्या क्रूर कृत्यांनीं त्यांच्या टोळींतील ज्या सरदारांचीं घरें भरलीं होतीं व दुसऱ्या सरदार मंडळींची खुद्द पेशव्यांसहित नानांनीं अनाथ दशा केलेली पाहून ज्यांना आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या, त्या नानांच्या सरदारांवर बाजीराव पेशव्यांचे दंडवघुर्डीचे सामोपचाराचे प्रयत्न निष्फळ झाल्यानंतर घाटग्यांनीं निरुपायानें निष्ठुर उपाय योजले यांत कोणतीच गोष्ट वावगी झालेली नाहीं. नानांच्या पूर्व क्रूर कृतींची अंशतः प्रतिक्रिया या वेळीं घाटगे यांनीं नानांच्या प्रिय सरदार मंडळीवर घडवून आणली होती, असेंच स्पष्ट दिसून येईल. नानांच्या

१. ना. फ. यांचें चरित्र पान ५२.

मागील सर्व दंड वसुलीच्या कृत्यांशीं घाटग्यांच्या या वेळेच्या कृत्यांचा तुलनात्मक दृष्टीनें विचार केला तर 'जशास तसें' या पलीकडे घाटग्यांना कोणतेंच दूषण देतां येणार नाहीं. प्रतिक्रिया ही नेहमीं अशाच स्वरूपाची असते हें निसर्गच शिकवितो.

९. नानांनीं महाडचें कारस्थान यशस्वी करण्याकरतां शिंदे व घाटगे यांना निरनिराळीं आमिषें दाखवून आपल्या संगनमतांत घेतलें. पण त्यांची पूर्तता शेवटीं नाना करूं न शकल्यामुळें शिंदे व घाटगे यांचेकडून प्रतिक्रियेला कशी सुरवात झाली हें दिसून आलेंच आहे. ही प्रतिक्रिया नाना व शिंदे-घाटगे यांच्या व्यक्तीपुरतीच असती तर त्या संबंधीं विचार करण्याचें विशेष प्रयोजन नव्हतें; पण शिंदे हे पेशव्यांच्या राज्यांतील एक बडे फौजबंद सरदार व नाना हे पेशव्यांच्या राज्याचे वड्ट मुखत्यार कारभारी, अशा संबंधाच्या स्थितींत शिंद्यांचा पक्ष व नानांचा पक्ष यांत प्रतिक्रियेला प्रारंभ झाल्यामुळें त्याची झळ पेशव्यांच्या राज्याला व खुद्द बाजीराव पेशव्यांना व त्याचप्रमाणें शिंद्यांनाही कशी लागली हें यथाक्रमानें पुढील इतिहासावरून दिसून येईल.

१०. शिंद्यांनीं नानांना कैद केल्यानंतर पूर्वपरंपरेला अनुसरून पेशव्यांच्या कारभारीपदाचा मान अमृतराव यांना मिळाला. अमृतराव यांसही नानांनीं निरनिराळीं आमिषें दाखवून पूर्वीच भारून ठेवलें होतें. त्यामुळें बाजीराव व अमृतराव यांची पेशवाईच्या राज्यकारभारांत दिलसफाई राहूं शकली नाहीं. अमृतराव आपल्याच मर्जीप्रमाणें राज्यकारभार करूं लागले. 'उभयतां श्रीमंत पंतप्रधान यांचें चित्त परस्पर शुद्ध नाहीं. सर्व कारभार श्रीमंत राजश्री अमृतरावसाहेब करितात.'[1] यावरून पहातां नाना जरी कारभारांतून गेले तरी बाजीराव पेशव्यांना आपल्या मनाप्रमाणें राज्यकारभार करतां येत नव्हता व ते अद्यापीही राज्यव्यवस्थेच्या बाबतींत परावलंबी होते हें स्पष्ट दिसून येतें. बाजीराव या वेळीं नानांच्या जाचांतून व दडपणाखालून जरी

---

1 ऐ. ले. सं. पत्र नं. ४१४९.

मोकळे झाले होते, तरी ते सर्व बाजूंनीं असहाय्य असल्यामुळें त्यांना शिंद्यांच्या दडपणाखालीं वागून व अमृतरावांच्या कारभाराचा कल संभाळून पेशव्यांच्या राज्यकारभाराचा तोल संभाळावयाचा होता. त्यांनीं पहिल्यानें मोरोबादादा फडनविस यांना बंधमुक्त करून नानांच्या फडनविशीच्या जागीं त्यांची स्थापना करण्याचा प्रयत्न चालविला. परंतु त्याला शिंद्यांचा विरोध झाला. शिंद्यांच्या संमतीनें मोरोबादादा जर पेशव्यांच्या कारभारांत आले असते, तर यथाक्रमानेंच नानांनीं जप्त केलेला फडनविशीचा सरंजाम व जहागीर त्यांना पुनः मिळाली असती व त्यामुळें मोरोबादादांचें स्थान स्थिरावून नाना निर्माल्यवत् झाले असते. शिंद्यांच्या मनांत नानांना निर्माल्यवत् करावयाचें नव्हतें. त्यांना फक्त नानांकडून दोन कोट रुपये वसूल करावयाचे होते व शिवाय नानांनीं नेहमीं आपल्या दडपणाखालीं व लगामीं असावें असें त्यांना वाटत होतें. ह्मणून त्यांचा बेत व दर्जा ते मोरोबादादांच्या मुक्ततेमुळें कमी करावयास तयार नव्हते. नानांनीं मोरोबादादांचें सर्वस्व हरण केल्यामुळें ते या वेळीं कवडीला महाग होते, हें शिंदे जाणून होते. ह्मणून शिंद्यांनीं आपला हेतु साध्य करण्याकरतां बाजीराव यांचेकडे बोलणें लावलें कीं, 'मोरोबाकडून मला तीस लाख रुपये मिळाल्याखेरीज मी त्यास फडनविसी मिळूं देणार नाहीं [1]' मोरोबादादांकडे विष खावयाला सुद्धां पैसा नसल्यामुळें व तीस लाख रुपये पदरांत पडल्याशिवाय त्यांची मुक्तता न करण्याचा शिंद्यांनीं आग्रह धरल्यामुळें, बाजीरावांना आपला बेत रहित करावा लागला. बाजीराव यांची स्थिति नानांनीं महाडच्या कारस्थानापासून पिंजऱ्यांतील सिंहाप्रमाणें जी करून ठेवली होती, ती या वेळींही तशीच चालू होती. सिंह ज्याप्रमाणें पिंजऱ्यांत सांपडलेल्या स्थितींतही आपला थोर मनोधर्म विसरत नाहीं, त्याप्रमाणें बाजीराव हेही विसरले नाहींत. त्या वेळेच्या त्यांच्या चालू अधिकार परिस्थितींत मोरोबादादांकरतां त्यांना जें जें करतां आलें, तें तें त्यांनीं

१ ऐ. ले. सं. पान ५३०५.

सर्व केलें. त्र्यंबकच्या किल्ल्यावर मोरोबादादा होते त्यांच्या कैदेची सक्ती बाजीरावांनीं ढिली करवून त्यांस त्र्यंबकेश्वर गांवांत येण्याची परवानगी देवविली. त्यांनीं नगरचा किल्ला सोडतांना त्रागा करून जो संन्यास घेतला होता, त्यापासून त्यांना परावृत्त करण्याकरतां बाजीराव यांनीं त्यांना प्रायश्चित्त घेण्यास परवानगी दिली व त्यांचेकडे द्रव्य पाठवून नानांनीं दिगंबर बनविलेल्या एका थोर व कर्तृत्ववान् पुरुषास माणसांत आणून बसविण्याचें पुण्य बाजीरावांनीं आपल्या पदरांत बांधून घेतलें. त्याचप्रमाणें मोरोबादादांची पत्नी व मुलगा हीं पुण्यास राहत होतीं. त्यांनाही नानांनीं अन्नाला महाग करून ठेवलें होतें. बाजीराव यांनीं मोरोबांच्या मुलाला द्रव्य देऊन त्याचे हाल दूर केले व कांहीं घोडीं व खास बारदार व तीन पागा असा सरंजाम त्याजकडे नेमून दिला. मोरोबांच्या मुलाला 'धाकटा नाना' असें ह्मणत असत. बाजीराव यांचे मनांत फडनविसीची तेरीख मोराबाचे मुलानें घालावी असें होतें. परंतु त्याचें ह्मणणें पडलें कीं, 'ही आज्ञा वडिलांस (मोरोबादादांस) व्हावी. वडिलांची आज्ञा मला होईल त्याप्रमाणें वर्तणुक करीन.'[१] यावरून नाना जरी कैदेंत पडले होते, तरी त्यांच्या घराण्यांतील मुलाबाळांनासुद्धां नाना सुटून आल्यानंतर आपलीं पाळेंमुळें ते खणून काढतील अशी दहशत बसली होती असें दिसून येतें. मोरोबांच्या मुलानें फडनविसीची तेरीख घालण्याचें असें पर्यायानें नाकारल्यामुळें तें काम अमृतराव यांना स्वतःच करावें लागलें.

११. नानांनीं महाडचें कारस्थान करून पेशव्यांच्या राज्यांत जी अनास्था उत्पन्न केली होती ती निस्तरण्याचें मरण ते शिंद्यांच्या कैदेंत पडल्यानंतर बाजीराव यांचे नशिबीं ओढवलें. महाडचें आपलें कारस्थान यशस्वी करण्याकरतां नानांनीं ज्या मसलती केल्या, त्यांत परशुरामभाऊ पटवर्धनांचा पूर्णपणें निःपात करून आपला सूड उगवून घेण्याचा नानांचा मुख्य उद्देश होता. परशुराम

---

१ ऐ. ले. सं. पा. ५२३८, पत्र नं. १४४७.

भाऊंना कैद केल्याशिवाय आपलें कारस्थान साधणार नाहीं व पेशव्यांच्या राज्याचा कुलअखत्यारीनें कारभार आपल्या हातीं येणार नाहीं हें नाना पूर्णपणें जाणून होते. परशुरामभाऊंनीं इतके दिवस नानांचा पक्ष धरून जशीं धाडसाची कामें बजावलीं होतीं तशींच नानांच्या पक्षांतून फुटून निघाल्या-नंतर नानांच्या विरुद्धही ते त्याच धडाडीनें बजावतील ही भीति नानांना होती; म्हणून असा पराक्रमी पुरुष कैद केल्यानंतर मृतवत् अगर निर्मा-ल्यवत् होऊन कायमचा रहावा व त्याला त्याच्या संबंध आयुष्यांत डोकें वर करण्याची कधींच संधि मिळूं नये एवढी खबरदारी नानांनीं पूर्वींच घेऊन ठेवली होती. महाडच्या कारस्थानाच्यावेळीं नानांनीं करवीरच्या महाराजांस खर्चाकरतां दोन लक्ष रुपये देऊन त्यांना 'परशुरामभाऊंच्या सरंजामी मुलखावर स्वारी करून तुम्हीं तो प्रांत खुशाल आपल्या ताब्यांत घ्यावा' अशी परवानगी देऊन ठेवली होती.[1] त्याचप्रमाणें शिंद्यांबरोबर जो नानांनीं करार केला त्यांतही परशुरामभाऊंची सर्व जहागीर शिंद्यांना नानांनीं द्यावी असें कबूल केलें[2] होतें. पुढें परशुरामभाऊ यांना कैद करून नाना कारभारी झाल्यानंतर त्यांच्या पक्षांतील लोकांचें कंबरडें कायमचें मोडून टाकण्याकरतां नानांनीं त्यांचेकडून जबर दंड वसूल केले. महादजीपंत काळे पन्नास हजार; भिकाजीपंत आठवले पंचेवीस हजार; शिवरामपंत मोडक पंधरा हजार; गणपतराव करमरकर दहा हजार; चिंतोपंत लिमये पंच्या-ऐशीं हजार; जयरामपंत जोशी पन्नास हजार; बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे पंचेवीस हजार; श्रीपतराव मोरेश्वर पटवर्धन एक लक्ष; वगैरे वगैरे परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या पक्षांतील चित्पावन कोंकणस्थ ब्राम्हणांच्या घरादारांवरून नांगर फिरवून नानांनीं क्रूरपणानें व द्वेषबुद्धीनें त्यांजकडून दंड वसूल करून घेतले. त्यामुळें कित्येक चित्पावन ब्राम्हण अगदीं रसातळाला जाऊन पोंचले.

---

१. ना. फ. च. पान १८१. २. परशुरामभाऊंचें चरित्र पान १०७. मराठ्यांची बखर पान. ३२४.

१२. या ठिकाणीं नानांच्या न्यायनीतीबद्दल एक महत्वाची गोष्ट नमूद करून ठेवणें प्राप्त आहे. सवाईमाधवरावांची पत्नी यशोदाबाई हिच्या मांडीवर चिमाजी-आपास दत्तक देऊन पेशव्यांची गादी चालवावयाचा मनसुबा पहिल्यानें नानांनींच केला. नानांनींच परशुरामभाऊंना आपल्या या मनसब्यांत घेतलें. शिंद्यांच्या गोटांतून चिमाजीआपास आणण्याकरतां परशुरामभाऊंची रवानगी नानांनींच केली. चिमाजीआपा यांच्या नांवचीं पेशवाईचीं वस्त्रें साताऱ्च्या छत्रपतीमहाराजांकडून घेऊन पुण्यास खुद्द नानांनींच परशुरामभाऊंकडे पाठविलीं. या सर्व गोष्टी नानांच्या मनसुब्याप्रमाणें व त्यांच्या आज्ञेप्रमाणें परशुरामभाऊंनीं घडवून आणल्या असतां व नानांच्याच आज्ञेनें पेशव्यांच्या कारभारांत परशुरामभाऊ पडले असतां नानांनीं आपल्या पूर्वीच्या मनसब्याला एकदम पलट दिली व महाडचें कारस्थान उभारून परशुरामभाऊंना कैद केलें व बाजीराव यांना गादीवर आणलें. नानांनीं आपल्या पूर्वीच्या मनसब्याला जशी पलट दिली, तशीच पलट त्यांनीं परशुरामभाऊंचें व त्यांच्या पक्षांतील लोकांचें पारिपत्य करण्यांत आपल्या न्यायनीतीला दिली. चिमाजी आपाचें दत्तविधान अशास्त्र ठरवून तें दत्तविधान ज्या ब्राम्हणांनीं केलें होतें, त्यांना नानांनीं गुन्हेगार ठरवून त्यांना हद्दपारीची शिक्षा नानांनीं जशी दिली, तशीच शिंद्यांच्या गोटांतून चिमाजीआपांना पालखींत घालून आणणाऱ्या मंडळींनाही दिली. हरी विष्णु सहस्त्रबुद्धे हे त्या वेळीं परशु-रामभाऊंचे सहाय्यकर्ते होते. ते परशुरामभाऊंच्या पक्षांतील ह्मणून त्यांचा नानांना सूड घ्यावयाचा होता. “ हरी विष्णु यास सरकारचे वाड्यांत नेऊन कोरड्यांचा मार दिला. पन्नास कोरडा मारला. मार फार मारिला. आणि पाठींतून रक्तें फार निघालीं. आणि कानास चाप लाविला. एक कान तुटला. दोनी हातांचे बोटांस चाप लाविले. बोटांचेहि तुकडे पडले ह्मणोन बाजार आवई आहे. मार दिल्यानंतर बाजारांतून गल्लोगल्लीं फिरविला; आणि मोठे हाल केले. ” [२] याप्रमाणें नानांनीं त्यांचे हाल हाल करविले. आरोपी हरी

---

१ व २ ऐ. ले. सं. पान ५०५८.

विष्णु यांचें ह्मणणें असें होतें कीं, श्रीपतराव मोरेश्वर पटवर्धन यांनीं चिमाजीआपा यांच्या अंगास प्रथम हात लाविला सबब ते गुन्हेगार. त्यांस मीं भाऊंच्या आज्ञेवरून मदत केली त्यांत माझा काय गुन्हा ! या प्रकरणांत हरी विष्णूचा अगर परशुरामभाऊ किंवा त्यांचे पक्षांतील इतर मंडळींचा कोणाचाच गुन्हा नव्हता. चिमाजीआपास दत्तक देऊन पेशव्यांच्या गादीवर बसविण्याचा नानांचाच खुद्द मनसबा होता. या कामीं खुद्द नाना हेच एकटे अव्वल दर्जाचे गुन्हेगार होते. असें असतां 'लांडगा व कोंकरूं' यांमधील न्यायाप्रमाणें नानांची न्यायनीति त्यांच्या मर्जीप्रमाणें त्यांच्या घरीं कशी पाणी भरीत होती हें दिसून येईल. गुन्हा आपण स्वतः करून आपला स्वार्थ साधून घ्यावयाचा व नंतर तो गुन्हा दुसऱ्याच्या माथीं मारून त्याचें शासन करावयाचें, ही लांडगेशाही न्यायनीति नानांनीं हातखंडा करून घेतली होती.

१३. वरीलप्रमाणें परशुरामभाऊ यांच्या पक्षांतील मंडळीकडून बेहद्द दंड वसूल करणें व शासन करण्यांत निर्दयतेची कमाल करणें या गोष्टी पाहिल्या ह्मणजे परशुरामभाऊ व त्यांच्या पक्षांतील मंडळीविषयीं नानांचे मनांत किती जालीम द्वेष व सूडाची तीव्र भावना उत्पन्न झालेली होती हें दिसून येईल. परशुरामभाऊंना कैदेंत ठेविल्यानंतर कांहीं दिवसांनीं त्यांना बंधमुक्त करण्याविषयीं पटवर्धन सरदारांच्या वतीनें सरदार रास्ते वगैरे मंडळी नानांकडे खटपट करूं लागली होती. भाऊंच्या मुक्ततेबद्दल दहा लक्ष रुपये भूर्दंड भरण्यास पटवर्धन सरदार तयार असतांही नानांनीं त्यांची मुक्तता केली नाहीं. उलट भाऊंच्या जहागिरीवर जप्ती घेऊन नानांचे कारकून गेले होते. "जप्तीवाला पैका खाऊन दिवस लोटितो.[१]" भाऊंची सर्व चीजवस्त जप्त करण्याकरतां नानांचे शागीर्द गेले होते. ते पटवर्धनांकडून पैसा खाऊन मुदत पुढें ढकलीत होते. भाऊंची जहागीर सध्यां नानांच्या जप्तीवाल्यांना चरण्याला मोकळें रान सांपडलें होतें. नाना गोड भाषणानें बाजीराव पेशवे यांचें नांव पुढें करून रास्त्यांच्या तोंडाला पानें पुशीत होते. नानांच्या मनांत भाऊंचा

१. ऐ. ले. सं. पा. ५२०६.

सर्वस्वी नाश करावयाचा होता, म्हणून त्यांनीं भाऊंची जहागीर करवीरचे महाराज व शिंदे यांना ' हलवायाच्या दुकानावर ब्रम्हार्पण ' या न्यायानें दिली होती. बाजीराव यांचे मनांत परशुरामभाऊ यांचा नाश करावयाचा नव्हता. नानांनीं शिंद्यांना परशुरामभाऊंची जहागीर करारमदार करून देण्याचें ठरविलें असतां,नगरचा किल्ला व त्या खालील प्रांताची दहा लक्षांची जहागीर शिंद्यांना निराळी देऊन बाजीराव यांना त्यांची समजूत काढण्याचें कारण पडलें नसतें. शिंद्यांना नानांच्या इच्छेप्रमाणें परशुरामभाऊंची जहागीर बाजीराव यांच्या विरोधामुळें मिळूं शकली नाहीं म्हणून नानांनीं खासगी रीतीनें शिंद्यांना ' सवड सांपडल्यास त्यांनीं (शिंद्यांनीं) परशुरामभाऊंची जाहागीर लढाई करून घ्यावी, अशी त्यांस मोकळीक दिल्ही. [1] ' अशा प्रकारें परशुरामभाऊंचा केंसानें गळा कांपण्याचा नाना आंतून प्रयत्न करीत होते.

१४. नाना शिंद्यांच्या कैदेंत पडल्यानंतर राज्यकारभार करण्यास लायक असे मोरोबादादा होते. परंतु त्यांची मुक्तता शिंद्यांकडून सहजासहजीं होईना म्हणून बाजीराव यांना अमृतरावांच्या कारभारावर अवलंबून रहावें लागलें. त्यामुळें पेशव्यांच्या राज्यांतील कारभारांत बरीच अनास्था उत्पन्न झाली. अमृतराव हे सर्व बाजूनें कारभाराला अनभिज्ञ असेच होते. त्यामुळें शिंद्यांना नानाबरोबर त्यांचे पूर्वी झालेले करार पुरे करून घेण्यास अनुकूल अशी संधि मिळाली. नानांनीं शिंद्यांबरोबर केलेल्या करारापैकीं परशुरामभाऊंची जहागीर त्यांच्या ताब्यांत येण्याचीच तेवढी बाकी राहिली होती. तेव्हां ती ताब्यांत घेण्याचा त्यांचा उपक्रम चालू झाला. सर्जेराव घाटगे हा शिंद्यांचा दिवाण झाल्यामुळें परशुराभाऊंच्या जहागिरीवर आपला अंमल बसविण्यास त्यानें पंढरपुरांत जबरदस्तीनें शिंद्यांचें ठाणें बसविलें. तासगांव तालुका आपल्या हवालीं करण्याविषयीं तेथील अमलदारांस शिंद्यांकडून सर्जेरावानें पत्रें लिहून घेतलीं. शिंद्यांनींही बाजीराव यांची संमती न विचारतां तीं लिहून दिलीं. या बाबतींत रा. नारायणराव घोरपडे कापशीकर यांनीं शिंद्याकडे मध्यस्थी करून भाऊंच्या

---

१. ना. फ. यांची बखर पा. १४७.

जहागिरीवर तावडतोब येणारें संकट पुढें ढकलण्याची कामगिरी केली. शिंद्यांचा अशा प्रकारें भाऊंच्या जहागिरीवर गहजब सुरू असतां, त्यांची मुक्तता करणें म्हणजे प्रत्यक्ष शिंद्यांबरोबर उघड वैमनस्य संपादन करून घेण्यासारखें होत होतें, म्हणून भाऊंची तावडतोब मुक्तता बाजीराव यांना करतां येण्यासारखी नव्हती. प्रसंगविशेषीं पेशव्यांच्या राज्यांत कोठें दंगा धोपा सुरू झाला तर आपल्या वतीचा पांच हजार फौज घेऊन जाणारा कोणी जबरदस्त सरदार पाहिजे असें बाजीराव यांना वाटत होतें. याकरितां त्यांनीं धोंडोपंत गोखले यांस पांच हजार फौज चाकरीस ठेवण्याची आज्ञा दिली, व धारवाडच्या किल्ल्यापैकीं दोन तोफा व खर्चाकरतां एक लाख रुपयांची वरात देवविली. याप्रमाणें धोंडोपंत गोखले यांचें घराणें बाजीराव पेशव्यांनीं उदयाला आणलें. धोंडोपंतांनीं बाजीराव यांच्या आज्ञेप्रमाणें फौज जमा करून आपली कामगिरी उत्कृष्ट बजाविली. याच धोंडोपंतांचा पुतण्या जवानमर्द बापू गोखले हे पुढें उदयाला आले व त्यांनीं प्रामाणिकपणानें पेशव्यांची कामगिरी बजावली.

१५. नानांनीं पेशवाईंतील अत्यंत शहाणे व प्रसिद्ध मुत्सद्दी सखारामबापू बोकील यांस कैद करवून त्यांचे पराकाष्ठेचे हाल केले. त्यांची खाण्या-पिण्याचीसुद्धां अत्यंत आबाळ केली. त्या वेळीं त्या चतुर मुत्सद्यानें नगर येथील किल्लेदाराजवळ तेथून थारेपालट होऊन जातांना नानांस एक चिठी देऊन ठेविली होती. तींत “ज्या लोकांस पुढें करून तुह्मीं मला कैदेंत टाकिलें, त्याच लोकांकडून तुह्मीं एकादे दिवशीं कैदेंत पडाल” अशा अर्थाचा मजकूर होता. शेवटीं नाना कैद होऊन नगरच्या किल्ल्यांत आल्यावर त्या किल्लेदारानें सवड मिळतांच ती सखारामबापूंची चिठी त्यांच्या हातीं दिली. त्या वेळीं त्या चतुर मुत्सद्याच्या दूरदृष्टीचें व शहाणपणाचें त्यांना आश्चर्य वाटून व त्यानें केलेलें भविष्य खरें ठरलेलें पाहून ती चिठी नानांनीं आपल्या आंसवांनीं भिजविली.[१] कपटाचे गुरुमंत्र देऊन तयार केलेले चेले प्रसंगविशेषीं आपल्या प्रत्यक्ष

---

१ भारतवर्ष.

गुरूबरही उलटून त्या कपटमंत्राचा प्रयोग करण्यास मागें पुढें पहात नसतात हें मनुष्य स्वभावधर्माचें ज्ञान सखारामबापूंना होतें. नाना स्वतःच पूर्ण कपटी व धूर्त कारस्थानी असल्यामुळें कपटकारस्थानांच्या अखेर परिणामांचा अप्रिय मासला त्यांना अद्यापपर्यंत चाखावयाला मिळालेला नव्हता. त्यामुळें त्या बाबतींत नानांची अदूरदृष्टि कायम राहिली होती. याकरतां नानांना ती दृष्टि फुटावी व त्यांनीं यापुढें आपले हे निंद्य कपटनाटकाचे खेळ सोडावे ही शिकवणुक देण्याकरतांच सखाराम-बापूंनीं ही कपटनाटकाच्या 'फलश्रुतीच्या भविष्याची' जाणीव या चिठीच्या द्वारें नानांना दिली होती. सखारामबापू हे ज्योतिषी नव्हते तर ते खरे अनुभविक व दूरदृष्टीचे खंदे मुत्सद्दी होते.

१६. नाना फडनविस शिंद्यांच्या कैदेंत पडून त्यांची रवानगी नगरच्या किल्यांत झाल्यानंतर पेशव्यांच्या राज्याच्या बंदोबस्ताची सर्व जबाबदारी बाजी-राव यांच्यावर पडली. त्यांनीं नाना फडनविस यांना अधिकारभ्रष्ट केल्याचें जाहीर केलें व त्याचप्रमाणें आपल्या राज्यांत त्यांनीं ताकीदपत्रेंही पाठ-विलीं. नानांच्या प्रत्यक्ष ताब्यांत प्रतापगड, रायगड, लोहगड वगैरे किल्ले होते. तेथील किल्लेदारांसही याउपर नानांची आज्ञा न मानण्याविषयीं बाजीराव यांनीं आज्ञापत्रें पाठविलीं. साताऱ्याच्या किल्ल्याचाही बंदोबस्त बरेच दिवसांपासून नानांकडे होता. साताऱ्याचे छत्रपती नानांच्याच बंदोबस्ताखालीं साताऱ्या किल्ल्यांत कैदेंत होते. त्यांस बाजीराव यांनीं असें कळविलें कीं, 'आजपर्यंत राज्याचा कारभार नाना फडनविस करीत होते, परंतु हल्लीं आम्हीं त्यांस कारभारांतून काढलें आहे. याकरितां इतःपर साताऱ्याच्या किल्ल्यावर नानांची हुकमत चालूं देऊं नये. इकडील कारकून नानांच्या नेमणुकीचे तेथें आहेत ते कैद करावे. मागून आमच्या विश्वासाचा कोणी कारकून तेथील बंदोबस्ताकरितां पाठवून देऊं. तों-पर्यंत महाराजांनीं किल्ला आपल्याच हातीं ठेवावा.' या प्रमाणें पेशव्यांचें पत्र जातांच महाराजांनीं आपली मंडळी गोळा केली व त्यांच्या मद-

तीनें गडकरी सामील करून घेऊन नानांच्या तर्फेचा कारकून बाबूराव आपटे यांस कैद केलें व क़िल्ल्यावर स्वतःचा अंमल बसविला.

१७. बाजीराव आपल्या प्राप्त परिस्थितीप्रमाणें या वेळीं पेशव्यांच्या राज्यांतील कारभाराची पुनर्घटना करण्याचा प्रयत्न करीत होते. राज्यकारभार सुरळीतपणें हांकावयाला व राज्यांत उत्पन्न होणारे दंगे-धोपे मोडून शांतता राखावयाला पैशाचें मुख्य साधन हातीं असावें लागतें. नानांनीं बरींच वर्षें पेशव्यांच्या राज्याचा एकमुखी कारभार केला. त्यांच्या कारभारांतील त्यांचें मुख्य धोरण हें होतें कीं, पेशव्यांच्या खजिन्यांत एकही कपर्दिका शिल्लक ठेवावयाची नाहीं. उलट पेशव्यांच्या डोक्यावर कर्जाच्या भाराचा डोंगर उत्पन्न करून ठेवावयाचा. या नानांच्या धोरणामुळें पेशवाईच्या कारभारांत दुसरा कोणीही इसम कारभारावर आला तरी तो पैशाच्या अभावीं दोन चार महिन्यांतच मेटाकुटीला येत असे. नानांच्या खजिन्याची गंगाजळी सदैव तुडुंब भरलेली असे. ती लोकांना पूर्ण अज्ञात अशा स्थळीं ठेवण्यांत नानांनीं आपल्या बुद्धिमत्तेची कमाल केली होती. जेथें नाना तेथें पैसा, व जेथें पैसा तेथें पेशव्यांच्या राज्याचा कारभार, अशी मजबूत सांखळी नानांनीं घडविल्यामुळें नाना कारभारांतून गेले कीं, पैशाच्या अभावीं सहजच राज्यांत अनास्था माजत असे. यावेळीं शिंद्यांनीं नानांना कैदेंत ठेवल्यामुळें निष्कांचन बाजीरावांवर कारभाराचा बोजा पडला. आपल्या न्याय्य हक्कानें पेशव्यांचे कारभारी बनलेले अमृतरावही बाजीरावाप्रमाणेंच निष्कांचन होते. नानांना कैद करणारे शिंदे पैशाकरतां पूर्ण बुभुक्षित झालेले होते. ‘ बुभुक्षितः किं न करोति पापम् ’ या उक्तिप्रमाणें पैसा वसूल करण्याकरतां शिंद्यांच्या तर्फेचा सर्जेराव घाटग्यांचा काळभैरवी सोटा लोकांच्या मागें लागलाच होता. आपल्या आत्मरक्षणाकरतां व स्वत्वपालनाकरतां बाजीरावांनीं शिंद्यांना कबूल केलेला पैसा देणें त्यांना प्राप्त होतें. या वेळीं शिंदे पैशाच्या बाबतींत बाजीरावांचे कोणतेंही उधार उसनवारीचें बोलणें ऐकून घेण्याच्या मनस्थितींत

नव्हते. म्हणूनच त्यांना नानांच्या पक्षांतील गुन्हेगार मंडळींकडून पैसा वसूल करण्यास बाजीराव यांनीं परवानगी दिली होती. या दंडवसुलीच्या आज्ञापालनाचें अतिक्रमण 'पडत्या फळाची आज्ञा' या न्यायानें सर्जेराव घाटगे करीत होते, हें बाजीराव यांनाही दिसत होतें. सर्जेराव घाटगे यांची नानांविरुद्ध जरी ही स्वाभाविक प्रतिक्रिया होती, तरी तिचा प्रत्यक्ष परिणाम बाजीराव यांच्या प्रजाजनांवर होत होता. नानांच्या पक्षांतील जरी मंडळी झाली तरी ती बाजीराव यांची प्रजाच होती. आपल्या प्रजाजनांचे झालेले हाल बाजीराव यांना कष्टप्रद वाटणें स्वाभाविक होतें. परंतु एकदां दगडाखालीं सांपडलेला हात मोकळा करून घेण्याकरतां बाजीराव यांना सर्जेरावाच्या क्रूर लीला डोळयांवर कांतडें ओढून सहन कराव्या लागत होत्या. परंतु आपल्या प्रजाजनांच्या हालामुळें व अप्रतिष्ठेमुळें बाजीरावांचें मन दुःखाकुल व संतप्त होत होतें यांत संशय नाहीं. त्यांना तोंड दाबून बुक्कयांचा मार सहन करावा लागत होता, व त्यामुळें त्यांना अतिशय उद्वेग आला होता. अशा मनःस्थितींत असतां बाजीराव यांनीं शिंद्यांना आपल्या वाड्यांत भेटीला बोलावून घेतलें आणि त्यांना सरळ सांगितलें कीं, 'तुमच्या[१] आचरणाचा शोध करण्याविषयीं तुह्मांस बोलाविलें. या राज्याचा धनी मी किंवा तूं तें सांग.' यावर शिंद्यांनीं उत्तर दिलें 'मी पेशव्यांचा चाकर; पेशवे आज्ञा करतील त्याप्रमाणें वागणुकेंत अंतर करणार नाहीं.' त्यावर बाजीराव ह्मणाले, 'तूं माझ्या रयतेस व माझ्या चाकर लोकांस केवढी पीडा केली आणि माझ्या शहरांत व माझ्या वाड्यांत माझा फार अनादर केला. यापुढें मला हें सहन होणार नाहीं. यास्तव तूं या वेळेस येथून निघून जांबगांवास जा.' या बाजीरावांच्या तेजस्वी भाषणानें शिंदे नरमले व नम्रतेनें ह्मणाले: 'मी तुमच्या आज्ञेप्रमाणेंच वागावयास इच्छितों. परंतु मला माझ्या फौजेचें देणें फार झालें आहे, त्यामुळें माझें एथून जाणें कसें होईल? मला तुह्मांस गादीवर बसवावयाकरतां बहुत खर्च लागून मी लोकांचा ऋणी झालों, तें द्रव्य

१. डफकृत मराठ्यांची बखर आवृत्ति सहावी. पान ३३०.

मला कृपा करून द्या. म्हणजे हे वेळेसच मी पुणें सोडून जातों.' या शिंद्यांच्या मागणीमुळें अर्थात् बाजीराव निरुत्तर झाले. बाजीराव यांचे खजिन्यांत जर नानांनीं पैसा ठेवला असतां, तर त्याच वेळीं त्यांनीं तो शिंद्यांना देऊन त्यांना मार्गस्थ केलें असतें आणि त्यांच्याकडून पेशव्यांच्या राज्यांत उत्पन्न होणाऱ्या आपत्तिपासून त्यांनीं आपला व आपल्या राज्याचा बचाव करून घेतला असता. उंदराची[1] शिकार करावयाची असली तरी-सुद्धां त्यांना नेहमीं वाघाच्या शिकारीची तयारी जय्यत ठेवावी लागे, असा नानांचा स्वभाव होता. महाडचें कारस्थानही नानांनीं त्याच धोरणा-वर यशस्वी करून घेतलें होतें. परंतु या कारस्थानीं सोंगट्यांच्या खेळांत नानांच्या अवाढव्य व विविध स्वरूपाच्या तयारीमुळें हिशेबापेक्षां नानांना मदतीचे जास्त दान पडलें व त्यामुळें महाडच्या कारस्थानांतून नानांची विविध भुतावळ बाहेर पडली. ती भुतावळ नानांच्या मागें लागली व त्यामुळें नाना कैदेंत पडले. परंतु ती उठलेली भुतावळ तेवढयावरच विराम न पावतां आतां ती बाजीराव यांच्या मानगुटीवर बसली व शेवटीं त्याच भुतावळीमुळें पेशव्यांचें राज्य व बाजीराव यांचा सर्वस्वी नाश झाला. बाजीराव यांनीं प्राप्त परिस्थित्यनुसार आपल्या राज्याचा बंदोबस्त करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पेशवे घराण्याचा नांवलौकिक व त्याची इभ्रत रक्षण करण्याविषयीं भयंकर स्वार्थत्याग करून त्यांनीं परिश्रम केले. परंतु नानांच्या स्वार्थमूलक धोरणानें व अधिकारलालसेनें आणि त्यांच्या कार-स्थानांतून उत्पन्न झालेल्या भुतावळीमुळें बाजीरावासारखा तेजस्वी पुरुषही लाचार झाला. बाजीरावांना निरनिराळें इतिहासकार मनमानेल तीं विशेषणें देऊन त्यांचें विडंबन करतात. पण तें अप्रबुद्धपणाचें व विपर्यस्त आहे असेंच मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. त्या वेळीं बाजीरावांच्या ऐवजीं चक्रवर्ती शिकंदर अगर चक्रवर्ती नेपोलियन यांच्यासारखे जगज्जेते जरी नानांच्या नक्र दाढेंत सांपडले असते, तरी त्यांचीही खात्रीनें बाजीरावांसारखीच अवस्था झाली

---

१. नाना फडनविसांचें चरित्र पान २४६.

असती. सूर्य कितीही प्रभावशाली असला तरी राहुसारख्या पापग्रहाच्या निकट सान्निध्यानें तो पूर्णपणें तेजोहीन होत असतो हा अनुभव सर्वांना आहेच.

१८. महादजी शिंदे यांच्या बायका या वेळेपर्यंत शिंद्यांच्याच लष्करांत होत्या. त्या दौलतरावाविरुद्ध नानांच्या पक्षाला मिळाल्यामुळें त्यांच्यावर शिंद्यांचा रोष झालेला होता. नानांची रवानगी नगरच्या किल्ल्यावर केल्यानंतर, या शिंदेबायांचें पाठबळ जरी हलकें झालें होतें, तरी शेणवी सरदार व शिंद्यांची फौज यांवरील त्यांचें वजन कमी झालेलें नव्हतें. त्यामुळें या बाया केव्हां व कसा दगा देतील याची भीति दौलतराव यांना सारखी वाटत होती; ह्मणून या बायांचें लचांड आपल्या लष्करांतून काढून टाकण्याचा दौलतरावांनीं मनसुबा चालविला. या बायांसही नगरच्याच किल्ल्यावर बंदोबस्तानें नेऊन ठेवण्याचें ठरलें व त्या कामगिरीवर सर्जेराव घाटगे यांची योजना झाली. सर्जेराव यांनीं बायांच्या रवानगीची सर्व सिद्धता केली. परंतु खुद्द बायानाच सर्जेराव यांचा बिलकुल विश्वास नसल्यामुळें, आपली सर्व चीजवस्त, जवाहीर वगैरे घेतल्याखेरीज व आपल्या सुरक्षितपणाबद्दल श्रीमंत बाजीराव पेशवे यांची हमी घेतल्याखेरीज, शिंद्यांच्या लष्करांतून त्या हालण्यास तयार होईनात. त्यामुळें दौलतराव शिंदे व सर्जेराव घाटगे यांच्या प्रतिक्रियेला उठावणी मिळाली. शिंदेबायांनीं दौलतरावांचें लग्न बायजाबाईबरोबर होऊं नये ह्मणून शक्य तेवढीं विघ्नें उत्पन्न केलीं होतीं. त्याचप्रमाणें दौलतरावांवर भागीरथीबाईसंबंधीं अमंगळ आरोपही केले होते. ह्मणून शिंदे व घाटगे यांचे मनांत शिंदेबायांबद्दल पराकाष्ठेचा द्वेष उत्पन्न झालेलाच होता. त्यांत नानांच्या पक्षाला त्या सामील झाल्यामुळें चांगलीच भर पडली होती. अशा स्थितींत दौलतरावांच्या हुकुमाप्रमाणें त्या शिंद्यांच्या लष्करांतून जाण्यास तयार होईनात, यामुळें त्यांना संताप चढला. त्याचें पर्यवसान असें झालें कीं, तारीख [१] १६ मे सन १७९८ रोजीं (ज्येष्ठ शु. १ शके १७२०) सर्जेराव घाट-

१. नाना फ. यांचें चरित्र पान २११.

ग्यांनीं लष्करांत जाऊन शिंदेबायांस जबरदस्तीनें पालख्यांत बसवून त्यांची रवानगी केली. या शिंदेबायांना नेण्याच्या कामगिरीवर कांहीं पलटणें व पागांचा जुजबी सरंजाम शिंद्यांनीं नेमिला होता. या बायांची रवानगी बऱ्हाणपुरास करण्याचा जरी शिंद्यांनीं गवगवा केला होता, तरी त्यांना अहमदनगरच्या किल्ल्यावर नेण्याविषयीं त्यांनीं आंतून पलटणवाल्यांना हुकूम दिले होते. दौलतराव शिंद्यांनीं घाटगे यांच्यातर्फे नारायणराव बक्षी आदिकरून शेणवी सरदारांकडे असें कबूल केलें होतें कीं, शिंदेबाया जर बऱ्हाणपुरास जाऊन राहतील, तर त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांच्या चरितार्थाकरतां शिंदे योग्य नेमणुका करून देतील. त्याला अनुसरूनच शिंदेबाया जबरदस्तीनें कां होईना पण तिकडे जाण्याकरतां निघाल्या होत्या. परंतु त्यांना बऱ्हाणपुरास न पाठवितां नगरच्या किल्ल्यावर पाठवून त्यांना तेथें कैदेंत ठेवण्याचा शिंद्यांचा दगलबाजीचा मनसुबा ज्या वेळीं नारायणराव आदिकरून शेणवी सरदारांना समजला, तेव्हां त्या बायांची मुक्तता करण्याचा संकल्प त्यांनीं केला. मुझाफीरखां पठाण या नांवाचा एक सरदार शिंद्यांच्या निवडक स्वारांवरील एक मुख्य होता. तो शेणवी सरदारांच्या पक्षांत सामील होता. नारायणराव बक्षी, यशवंतराव शिवाजी, देवजी गौळी व मुझाफीरखां पठाण यांनीं आपापली फौज जमविली आणि बायांच्या पाठोपाठ जाऊन त्यांनीं शिंद्यांच्या पलटणांवर हल्ला केला. त्या वेळीं हीं पलटणें बायांना घेऊन भीमा नदीचे कांठीं कोरेगांवनजीक येऊन पोंचलीं होतीं. मुझाफीरखां पठाणाच्या घोडदळानें पलटणांतील शिपायांना पळवून लाविलें व महादजी शिंद्यांच्या लक्ष्मीबाई व यमुनाबाई या दोन स्त्रियांना सोडवून आणिलें. भागीरथीबाई या दौलतरावांच्या विरुद्ध नसल्यामुळें आपल्या नशिबीं आलेला कारागृहवास भोगण्याकरतां त्या नगरच्या किल्ल्यावर गेल्या. [१] मुझाफीरखानानें दोघी शिंदेबायांना मुक्त केलें व तो त्यांना परत पुण्याकडे घेऊन येऊं लागला. त्या वेळीं अमृतराव पेशवे

---

१. या भागीरथीबाई नगरच्या किल्ल्यांत बंदिवासांत असतांनाच सन १७९९ च्या आगष्ट महिन्यांत मरण पावल्या. जिवबादादा बक्षी यांचें चरित्र पान ५१८.

हे जुन्नरास जात असतांना त्यांचा मुक्काम भीमातीरीं झाला होता. ही वार्ता मुझाफीरखां याला समजतांच तो या शिंदेबायांस घेऊन अमृतरावाच्या छावणींत गेला. अमृतरावांनीं शिंदेबायांची हकीकत ऐकून घेतली व त्यांना अभय देऊन त्यांच्या बचावाकरतां त्यांनीं आपल्या छावणींत त्यांना ठेऊन घेतलें. सर्जेराव घाटगे याला ही हकीकत समजतांच तो आपली फौज घेऊन मुझाफीरखांच्या पारिपत्याकरतां निघाला. या वेळीं शिंदेबायांना अमृतरावांच्या आश्रयाखालीं देऊन तो मोकळा झालाच होता. सर्जेराव आपला पाठलाग करीत येत आहे असें पाहून मुझाफीरखा परत फिरला व त्यानें मोठ्या त्वेषानें सर्जेराव याच्या फौजेवर हल्ला चढविला; आणि ती फौज मोठ्या शौर्यानें उधळून लाविली. सर्जेराव पराभूत होऊन पुण्यास परत गेला व मुझाफीरखां विजयी होऊन मोठ्या आनंदानें अमृतराव याच्या छावणींत परत आला.

१९. सर्जेराव यांनीं शिंदेबायांना जबरदस्तीनें पालख्यांत बसवून त्यांची रवानगी केली या त्यांच्या जबरदस्तीच्या कृत्याला बायांच्या पक्षातील लोकांकडून क्रमाक्रमानें तिखटमीठ लागून पराचा कावळ्याचें रूप आलें. त्या बायांनीं ' निघतांना मनस्वी आकांत केला तरी त्यास न जुमानतां त्या नरपशूनें (सर्जेराव घाटगे यानें) त्यांस मारझोड करून पालख्यांत नेऊन[1] कोंबलें ' अशी माहिती खरेशास्त्र्याच्या ऐतिहासिक लेखसंग्रहांत मिळते. खरेशास्त्र्यांच्या म्हणण्याप्रमाणें सर्जेराव घाटगे यांनीं केलेली ही मारझोड शिंदेबायांना ब्ऱ्हाणपुरास पाठविण्याचे वेळीं झाली. परंतु डफसाहेब यांचें म्हणणें तसें नाहीं.' हा दौलतराव शिंदा आम्हापेक्षां जी बांकटी बाई तिशीं बलात्कारें संग करूं इच्छितो;' आणि दुसरें बोलूं लागली कीं, ' जो असा मात्रागमनी पुरुष, तो उत्पन्न होण्यास शुद्ध बीज नसतें.' तेव्हां सर्जेराव घाटग्यानें दौलतराव शिंद्यांचा पक्ष स्वीकारून त्या बायांशीं बोलणें करावयास इच्छिलें, परंतु त्या बाया त्यास आपले जवळ येऊं देईनात. तेव्हां तो दुष्ट बळेंच त्यांच्या रावटींत शिरून त्या बायांस हातीं धरून बाहेर ओढून कोरड्यांचा मार देता झाला.

---

1. ऐ. ले. सं. पान ५१२२.

या प्रकारें त्या बायांचा त्यानें अपमान केला.[१] ' याप्रमाणें सर्जेराव यांनीं बायांचा अपमान केल्यानंतर शेणवी कारभाऱ्यांच्या मध्यस्थीनें बायांच्या खर्चाचा त्यांच्या मनाप्रमाणें बंदोबस्त होऊन नंतर त्यांची रवानगी करण्यांत आली. डफसाहेबांच्या माहितीप्रमाणें सर्जेराव यांनीं शिंदेबायांना ब्ऱ्हाणपुरीं रवाना करण्याच्या अगोदर कांहीं दिवस मारझोड केली होती. कॅप्टन ए. म्याक्डोनल्ड् साहेबांनीं नाना फडनविस यांची जी बखर लिहिली आहे, त्यांत त्यांनीं डफसाहेबांच्याच माहितीची जवळ जवळ री ओढिली आहे. ' परंतु त्या दांडग्यानें (सर्जेरावानें) त्यांचे तंबूभोंवतालच्या कनाथी सोडून आंत शिरून त्यांस (शिंदेबायांस) धरून छड्यांनीं मारिलें; व मोठ्या क्रूरत्वानें त्यांची अप्रतिष्ठा केली.[२] या माहितींत कोरड्यांच्या माराऐवजीं छड्यांच्या माराचा फरक करण्यांत आलेला आहे. कसेंही असो, अमृतरावांनीं शिंदेबायांना दौलतराव शिंद्यांच्या इच्छेविरुद्ध ज्याअर्थी आश्रय दिला, त्याअर्थी शिंदेबायांची सर्जेरावांकडून झालेली अप्रतिष्ठा त्यांना बिल्कुल सहन झाली नाहीं हें उघड दिसतें. यावेळीं अमृतराव काय किंवा बाजीराव काय, हे सर्वस्वीं दौलतराव शिंद्यांच्या आधीन होते. शिंद्यांच्या लष्करी सामर्थ्याची त्यांना कल्पना होती. नाना शिंद्यांच्या कैदेंत पडल्यानंतर पेशव्यांच्या राज्यकारभाराची घडी या उभय पेशव्यांना शिंद्यांच्याच मदतीनें बसवावयाची होती. बाजीरावांना भीतिप्रद वाटणारे नाना फडनविस शिंद्यांच्याच ताब्यांत होते. त्यांना शिंद्यांनीं मोकळें केलें तर आपली काय अवस्था होईल हें बाजीराव जाणत होते. या सर्व आत्मनाशाच्या गोष्टी अमृतराव व बाजीराव यांना उघड उघड दिसत असतां, ज्याअर्थी शिंदेबायांना अमृतराव यांनीं आश्रय दिला व त्याला बाजीराव यांनीं मान्यता दिली, त्याअर्थी हे उभय पेशवे आपल्या पेशवेघराण्याच्या इभ्रतीला व कर्तव्याला जागण्याकरतांच आपल्या आत्मनाशाला प्रवृत्त झाले असावे असें स्पष्ट दिसतें. न्यायान्यायाची

---

१. डफकृत मराठ्यांची बखर पान ३३४. २ कॅ. म्या. डा. कृत ना. फ. यांची बखर पान १६३.

चाड घरंदाज कुलवंतांनाच विशेष असते. शिंदेबायांच्या अप्रतिष्ठेच्या बाबतींत दौलतरावांची ती जरी प्रतिक्रिया होती, तरी ती बाजीराव पेशव्यांच्या दृष्टीनें त्यांच्या एका कालवश झालेल्या थोर सरदाराच्या बायकांची होती. ही त्यांची अप्रतिष्ठा पेशवेपदाच्या इभ्रतीला काळिमा आणणारी असल्यामुळें बाजीरावांना ती सहन झाली नाहीं. म्हणून त्यांना दौलतरावांविरुद्ध शिंदेबायांना आश्रय द्यावा लागला. त्यामुळें शिंदे बाजीरावांवर रुष्ट झाले व त्यांनीं त्यांना पेंचांत धरण्याचा उपक्रम चालू केला.

२०. बाजीरावांनीं साताऱ्याच्या महाराजांस कळविल्याप्रमाणें त्यांनीं नानांच्या कारकुनास कैद करून साताऱ्याच्या किल्ल्यावर आपला अंमल बसविला, ही हकीकत मागें आलीच आहे. त्याला अनुसरून बाजीरावांनीं शिवराम नारायण थत्ते यास साताऱ्यास रवाना केलें व साताऱ्याचा किल्ला थत्ते यांच्या हवालीं करण्याविषयीं महाराजांस विनंतिपत्र पाठविलें. परंतु या वेळीं महाराजांकडे शिंद्यांच्या वतीनें सर्जेराव यांचें राजकारण सुरू असल्यामुळें त्यांनीं थत्ते यांस किल्ल्यावर घेण्याचें साफ नाकारलें. त्यामुळें साताऱ्याच्या महाराजांवरील बाजीराव यांचा विश्वास उडाला व त्यांनीं त्यांना दहशत बसविण्याकरतां माधवराव रास्ते यांस त्यांच्या फौजेसह साताऱ्यास रवाना केलें. रास्ते साताऱ्यास गेले ते राजधानीची इभ्रत राखण्याकरतां वेण्णानदीपलीकडे आपली फौज ठेवून बाकी सरंजाम व कांहीं लोक बरोबर घेऊन शहरांत गेले. त्यांचा मुक्काम पेशव्यांच्या वाड्यांत होता व सरंजाम शहरांत जागोजागीं उतरला होता. साताऱ्याचा किल्ला आपल्या हवालीं करण्याबद्दल माधवराव रास्त्यांनीं महाराजांबरोबर बरेच वेळां बोलणीं केलीं. परंतु दर खेपेस महाराजांकडून त्यांना टाळाटाळीचींच उत्तरें मिळूं लागलीं. याच वेळीं महाराजांचा वकील पुण्यास शिंद्यांच्या छावणींत जाऊन बसला होता. बाजीराव पेशव्यांना संकटांत घालण्याकरतां सर्जेरावानें साताऱ्यास महाराजांकडे आपलीं माणसें पाठविलीं व त्यांस शिंद्यांच्या वतीनें आश्वासन दिलें कीं, ‘ तुह्मीं पेशव्यांचें वर्चस्व झुगारून द्यावें व स्वतंत्रपणानें

राहण्याचा हेतू तडीस न्यावा. पेशव्यांशीं लढण्याचा प्रसंग आल्यास शिंद्यांची पलटणें पाठवून मी तुह्मांस कुमक करितों, इतकेंच नव्हे, तर करवीरकरांचें व तुमचें सूत्र मिळवून[१] देतों.' दौलतराव शिंद्यांचें एक मर्मस्थान ज्याप्रमाणें शिंदेबाया या होत्या व त्यांना पेशव्यांनीं आश्रय दिला होता, त्याचप्रमाणें पेशव्यांचें एक मर्मस्थान साताऱ्याचे महाराज व कोल्हापुरचे महाराज हे असल्यामुळें, पेशव्यांना शह बसण्याकरतां शिंद्यांनीं त्या उभयतां महाराजांना हाताशीं धरलें होतें. सर्जेरावांनीं सातारच्या महाराजांना आश्वासन दिल्याप्रमाणें करवीरच्या शिवाजीमहाराजांनीं सातारच्या महाराजांस कळविलें कीं, साताऱ्याहून सूचना येतांच आपण स्वतः फौज घेऊन तेथें येतो. ही सर्व आंतून सिद्धता झाल्यावर सातारच्या महाराजांनीं आठ चार दिवसांत फौज एकत्रित करून शहर ताब्यांत घेतलें व रास्त्यांस सांगून पाठविलें कीं, 'तुह्मीं येथून बऱ्या बोलानें निघून जावें. न जाल तर बळजबरीनें घालवून देऊं.' शिंदे व करवीरकर यांच्या सहाय्याच्या बळावर सातारच्या महाराजांनीं रास्त्यांना घालवून देण्यापर्यंत मजल गांठली. त्यामुळें रास्ते व बाजीराव पेशवे पेंचप्रसंगांत सांपडले. यावर तोड काढण्याचा विचार बाजीराव यांनीं चालविला.

२१. साताऱ्याचे महाराज व करवीरचे महाराज यांना दहशत बसण्यासारखा पेशव्यांच्या सरदारांत परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या खेरीज दुसरा जबरदस्त सरदार त्या वेळीं नव्हता. परंतु या वेळीं ते कैदेंत होते. परशुरामभाऊंच्या सुटकेबद्दल पटवर्धन सरदारांनीं नानांकडे पुष्कळ खटपट केली, परंतु नानांनीं परशुरामभाऊंचा पूर्णपणें दावा धरल्यामुळें त्यांची मुक्तता होणें अगदीं अशक्य होतें. परशुरामभाऊंना तर सोडावयाचेंच नाहीं, व इतर पटवर्धन सरदारांना दुखवावयाचें नाहीं, अशा धोरणानें नाना इतके दिवस आपल्या मधुरवाणीचा व या बोटावरील थुंकी त्या बोटावर नाचविण्याच्या आपल्या बुद्धिचातुर्याचा उपयोग करीत आले होते. पुढें नाना कैदेंत पडल्यावर परशुराम-

---

१. ऐ. ले. सं. पा. ५४०८.

भाऊंची सुटका करावी तर त्याला शिंद्यांचा विरोध होता. नानांनीं शिंद्यांना परशुरामभाऊंची जहागीर जिंकून घेण्याची करवीरकरांप्रमाणें परवानगी दिली होती. त्यामुळें परशुरामभाऊंची सुटका होणें हें शिंद्यांना वावडें होतें. त्यामुळें त्यांची सुटका बाजीरावांना करतां आली नाहीं. नंतर शिंदे व बाजीराव यांचें शिंदेबायांच्या बाबतींत ज्या वेळीं वितुष्ट पडलें व पेशव्यांच्या अंतर्गत कारभारांत शिरून शिंदे ज्या वेळीं बाजीरावांना सातारच्या महाराजांना मदत करून विरोध करूं लागले, त्या वेळीं शिंद्यांच्या मर्जीविरुद्ध पेशव्यांच्या हितसंबंधांच्या दृष्टीनें बाजीरावांना वागणें प्राप्त झालें. परशुरामभाऊ कैदेंत पडल्यानंतर बाजीरावांची व त्यांची भेट होऊन परस्परांचें मन साफ होण्याचा प्रसंग आला नव्हता. परशुरामभाऊंस कैद करण्याच्या नानांच्या कारस्थानानें त्यांच्या मनांत आपल्याविषयीं किती द्वेष उत्पन्न झाला आहे याची कल्पनाही त्या वेळीं बाजीराव यांना नव्हती. म्हणून त्यांनीं माधवराव रास्ते यांच्या विश्वासावर परशुरामभाऊंची मुक्तता करण्याचें ठरविलें. या वेळीं बाजीराव यांची मनःस्थिति 'एका बाजूला आड तर दुसऱ्या बाजूला विहीर' अशी झाली होती. एकदां गरम दुधानें तोंड पोळल्यानंतर ताकही फुंकून पिण्याची संवय लागते. नाना व शिंदे यांच्या बाबतींत हा अनुभव बाजीराव यांना आल्यामुळें, परशुरामभाऊ यांच्या सुटकेबद्दल त्यांना सावधगिरी घेणें भाग पडलें. बाजीराव यांनीं माधवराव रास्ते यांना बजावलें कीं, साताऱ्याचे खूळ मोडण्याकरितां तुह्मीं परशुरामभाऊंस तिकडे घेऊन जाणार तर जा, त्यांच्या वजनाचा व फौजेचा उपयोग करून घ्या, पण आह्मी त्यांची कैदेंतून सुटका केली असें मात्र समजूं नका! गुन्हेगारीबद्दल त्यांनीं दहा लक्ष रुपये द्यावे असें तुह्मीं ह्मणतां, आम्ही पंधरा लक्ष ह्मणतों. यांतून जी रक्कम ठरेल तिचा भरणा सरकारांत होईपर्यंत ते कैदेंतच आहेत व कारण पडल्यास त्यांस आणून सरकारांत हजर करण्याची जबाबदारी तुह्मांवर आहे!' याप्रमाणें परशुरामभाऊकरतां रास्ते जामीन राहिले व त्यांनीं तारीख १६ जून सन १७९८ रोजीं मांडवगणाहून त्यांची कैदेंतून

१. ऐ. ले. सं. पा. ५४११.

मुक्तता केली; परशुरामभाऊंच्या मुक्ततेची वार्ता साताऱ्च्या महाराजांना लागतांच त्याच दिवशीं रात्रीं ते आपल्या फौजेसह किल्ल्यावरून खालीं उतरले व त्यांनीं रास्त्यांवर छापा घालून त्यांस लुटलें आणि त्यांना शहरांतून हुसकून लावलें. नंतर तेथून रास्त्यांनीं आपल्या फौजेचा तळ कृष्णेपलीकडे हालविला व तेथें परशुरामभाऊंच्या येण्याची मार्गप्रतीक्षा करीत ते बसले. तेथें रास्त्यांची व भाऊंची भेट झाली. परशुरामभाऊंची सुटका झाल्याचें वर्तमान हां हां म्हणतां महाराष्ट्रांत पसरलें व त्याबरोबर स्वार, शिपाई वगैरे फौज त्यांच्याभोंवतीं जमा होऊं लागली. जुलैच्या अखेरपर्यंत भाऊंनीं सात आठ हजार फौज गोळा केली. रास्ते, विंचुरकर व परशुरामभाऊ यांची सुमारें पंधरा हजार फौज जय्यत तयार झाल्यानंतर व पाऊस थोडा उघडल्यानंतर तारीख ९ आगष्ट सन १७९८ रोजीं भाऊंनीं सातारा शहरावर हल्ला चढविला व महाराजांच्या फौजेची दाणादाण करून टाकली. महाराज किल्ल्यावर पळून गेले. महाराजांचा भाऊ चतुरसिंग व भवानजी शिर्के करवीराकडे पळाले. एलोजी मोहिते ठार झाले. कुशाबा राजा महाडिक व दुर्गाजी राजा महाडिक हे फार जखमी झाले. सेनाजी मोहिते मोठ्या शौर्यानें लढले पण शेवटीं तेही ठार झाले. याप्रमाणें साताऱ्च्या महाराजांच्या फौजेची व त्यांच्या सरदारांची दुर्दशा झाली. महाराज साताऱ्च्या किल्ल्यांत अडकून पडल्यामुळें त्यांची अन्नान्न दशा झाली व शेवटीं ते परशुरामभाऊंच्या स्वाधीन झाले. अशा प्रकारें परशुरामभाऊंनीं साताऱ्च्या महाराजांचें बंड मोडलें. साताऱ्चे महाराज, करवीरचे महाराज व शिंदे हे एक झाले असतां थोड्याशा अवधींत परशुरामभाऊंनीं आपली फौज गोळा करून साताऱ्च्या महाराजांचें बंड मोडलें यावरून परशुराम भाऊंचें शौर्य, त्यांची कर्तबगारी, त्यांचा नांवलौकिक व त्यांची युद्धकलाविशारदता सहज दिसून येईल. परशुरामभाऊ हे पेशव्यांच्या सरदारांचें व पेशवाईचें एक सुंदर भूषण होतें असेंच कोणीही त्यांच्याबद्दल सहज उद्गार काढील यांत संशय नाहीं. याप्रमाणें हें काम

सिद्धीस गेल्यानंतर बाजीरावांनीं[1] भाऊंस आज्ञा केली कीं, 'आतां फौजेस निरोप द्यावा.' यावर भाऊंनीं उत्तर केलें कीं, 'ही गोष्ट सांप्रत होत नाहीं; कांकीं, या लोकांचें मला बहुत देणें झालें आहे, मजविषयीं स्वामींनीं शंका धरूं नये. मी सरकारचा विश्वासू चाकर आहे. त्यावरून बाजीरावांनीं त्यापासून दहा लक्ष रुपये गुन्हेगारी घेऊन त्यांच्या पहिल्या अन्यायाची क्षमा केली.

२२. परशुरामभाऊंची सुटका झाल्यापासून म्हणजे तारीख १६ जून पासून साताऱ्याचें बंड मोडीतोंपर्यंत म्हणजे तारीख ९ आगष्टपर्यंत म्हणजे सुमारें पावणेदोन महिनेपर्यंत, पुण्यांतही निरनिराळ्या राजकारणाला ऊत आला होता, तो येथें देणें प्राप्त आहे. भीमातीरीं अमृतराव यांच्या छावणींत शिंदे-बाया आश्रयास येऊन राहिल्या, ही हकीकत मागें आलीच आहे. या बाया तारीख ७ जूनपर्यंत[2] अमृतराव यांच्या छावणींत तेथेंच राहिल्या. त्यानंतर महादजी शिंद्यांच्या वेळेचे जुने मुत्सद्दी रामजी व रायाजी पाटील आणि आबा चिटणीस यांच्या मध्यस्थीनें दौलतराव शिंद्यांनीं शिंदेबायांशीं समेटाचें बोलणें लाविलें. त्या बोलण्यांत त्यांची वृत्ति आर्जवाची व नम्रपणाची दिसून येत होती. बाजीरावांचे मनांतही दौलतराव शिंदे व शिंदेबाया यांच्यामध्यें कलह नसावा असें होतें. याकरितां ते शिंद्यांकडे प्रयत्न करीत होते. शिंदेबायांबरोबर सलोखा करण्यास शिंदे तयार असल्याचें त्यांना दिसून आल्यामुळें, त्यांनीं बायांस सांगून पाठविलें कीं, 'दौलतरावांकडून तुमचे मुद्दे कबूल करवितों. तुम्हीं पुण्याजवळ[3] यावें.' याप्रमाणें शिंद्यांच्या व बाजीरावांच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन अमृतराव शिंदेबायांना बरोबर घेऊन आपल्या फौजेसह पुण्यास आले. त्यांनीं विठलवाडीवर शिंदेबायांना उतरविलें व त्यांस पिछाडीस ठेऊन त्यांच्या आघाडीस भांबुर्डे येथें त्यांनीं आपली छावणी केली. दौलतरावांनीं बायांबरोबर सलोखा घडून येण्याकरतां बाजीराव वगैरेच्या इच्छेप्रमाणें 'त्या बायांच्या

---

१. डफकृत मराठ्यांची बखर पा. ३३३. २. डफकृत मराठ्यांची बखर पा. ३३४. ३. ऐ. ले. सं. पा. ५४२१.

मर्जीस येईल तेथें त्यांनीं रहावें; मी त्यांच्या मानाप्रमाणें त्यांचा खर्च चालवितों ' याप्रमाणें कबूली दिली. अशा प्रकारें शिंदे व शिंदेबाया यांच्यामध्यें बाजीराव यांच्या मध्यस्थीनें सलोखा घडून आला; व त्याप्रमाणें आपल्या इच्छेनुरून शिंदेबाया विठ्ठलवाडीला राहूं लागल्या. त्यानंतर साताऱ्याच्या महाराजांचें बंड मोडण्याकरतां बाजीरावांनीं परशुरामभाऊंची मुक्तता तारीख १६ जून रोजीं केलेली सर्जेराव यांना ज्या वेळीं समजली, तेव्हां बाजीरावांवर मात करण्याकरतां सातारकरांचा आपण टाकलेला डाव हुकतो, म्हणून त्यांना शह बसविण्याकरतां सर्जेराव यांनीं नवीन उपक्रम केला. तारीख २५ जून रोजीं अमृतराव यांच्या लष्करांमधील मुसलमान लोक आपले ताबूत नदीकांठीं शांत करण्याकरतां गेले होते. या मोहरमच्या शेवटच्या दिवशीं फौजेंतील लोकांत तंटाबखेडा होऊं नये व चांगला बंदोबस्त रहावा असा बहाणा करून, सर्जेराव घाटगे आपल्याबरोबर तोफा व पलटणी लोकांच्या दोन तुकड्या घेऊन अमृतराव यांचे लष्कराजवळ नदीकांठीं आले. त्या वेळेपर्यंत अमृतराव, शिंदबाया व दौलतराव शिंदे यांच्यामध्यें सलोखा झाला असल्यामुळें तंट्याचें कारण नव्हतें म्हणून, अमृतरावांची फौज बेसावध होती. सर्जेरावानें नदीवर तोफा व पलटणें आणल्याबरोबर एकदम अमृतरावांचे छावणीवर तोफांचा भडिमार सुरूं केला. नंतर त्यानें पलटणींच्या लोकांना पुढें घालून अमृतरावांच्या तळावर हल्ला सुरूं केला. सर्जेरावांच्या या अकल्पित हल्ल्यानें अमृतरावांच्या फौजेची दाणादाण उडविली. स्वत: अमृतराव मात्र सडे फौजेनिशीं खडकीकडे गेले. "खासे डेरे, जामदारखाना देवपूजासह मुदबकाचें सामान भांडींसुद्धां सारें लुटलें गेलें. गोटांतून घोड्याशिवाय पुसी निघाली नाहीं. डेरे, राहुट्या कंपूच्या लोकांनीं जाळल्या. [1] " सायंकाळीं पठाण पलटणांवर चालून आले. परंतु कारागिरी झाली नाहीं. असें या पत्रांत आहे. परंतु दुसऱ्या एका पत्रांतील उल्लेखावरून अमृतरावांनीं हीं पलटणें आपल्या तळावरून हुसकून लावून त्यांच्या छावणीपर्यंत मागें रेटीत नेलीं असें दिसतें. [2] या

---

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ४२७८. २. ऐ. ले. सं. पान ५४२२.

पत्रांतील हा मजकूर विशेष खरा दिसतो. सर्जेरावांच्या अकल्पित हल्ल्यानें अमृतराव पहिल्यानें जरी आपल्या थोड्याशा लोकांसह खडकीकडे गेले असले, तरी त्यांनीं जी माघार घेतली ती पलटणवाल्यांना हुल दाखविण्याकरतां असून पुन्हां पलट खाऊन त्यांनीं त्यांच्यावर हल्ला चढविला असावा व त्यांना रेटीत रेटीत त्यांच्या गोटापर्यंत नेलें असावें. कारण हीं पलटणें आपल्या गोटांत परत येतात न येतात तोंच, शिंद्यांकडील रामजी पाटील व रायाजी पाटील उभयतां बाजीरावसाहेब यांच्याकडे आले. आणि म्हणाले कीं, 'शिंदे यांजकडे सेवकपणा असोन लढाई झाली हा सेवकपणाचा धर्म नव्हे. असो. जालें तें बरेंच जालें. आपण चित्तांत रोष धरूं नये. सरंजाम वगैरे लुटला गेला तो वगैरे झाडून देतों, आपण धनी. गुन्हा माफ करावा. आणि बायांची व अमृतरावसाहेब यांची येखलासी करून देवावी. शिंदे आपले आज्ञेशिवाय नाहींत. आपण आज्ञा करितील त्या अन्वयें वर्तणूक करितील.[1] ' याप्रमाणें शिंद्यांचे वकील बाजीरावांकडे टांकोटाक क्षमेची याचना करण्याकरतां ज्याअर्थी आले, त्याअर्थी या शिंद्यांच्या क्षमायाचनेच्या मुळाशीं दोन गोष्टी संभवतात. सर्जेरावांनीं अमृतरावांबरोबर जी कलागत काढून युद्धप्रसंग केला, तो दौलतरावांच्या संमतीनें केला नसावा. आपल्याच हिंमतीवर व आपल्याच मनानें त्यांनीं हें कृत्य केलें असावें असें दिसतें. आपण जर अमृतरावांसह शिंदेबायांना हस्तगत केलें, तर दौलतराव शिंदे आपणावर खूष होतील व आपल्या शौर्याचा बोलबाला होऊन आपणाला शिंद्यांकडून मोठी जहागीर मिळेल अशा कल्पनेच्या भरारीवर सर्जेराव हें साहस करण्याला प्रवृत्त झाले असावे असें स्पष्ट दिसतें. परंतु सर्जेरावांच्या दैवदुर्विपाकामुळें शिंदेबाया त्यांच्या हस्तगत झाल्या नाहींत; किंवा त्यांचे आश्रयदाते अमृतरावही त्यांना मिळूं शकले नाहींत. यामुळें सर्वच बाजू सर्जेरावांच्या अंगलट आली. तेव्हां या प्रसंगांतून आपल्या सासऱ्याला वांचविण्याकरतां शिंद्यांनीं आपल्या वकिलांना बाजीरावसाहेब यांचेकडे ताबडतोब पाठविलें व त्यांचे करवीं वर दर्शविल्याप्रमाणें क्षमेची याचना केली.

---

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ४२९१.

शिंद्यांच्या दिवाणीपदावर चढल्यानंतर सर्जेराव सर्वच गोष्टी शिंद्यांना व त्यांच्या इतर मुत्सद्यांना कळवून करीत होते असें कोठेंच दिसत नाहीं. ते आपल्या मनाच्या लहरीप्रमाणें वागून आपल्या अद्भुतलीला लोकांना दाखवीतच होते. त्याचैपैकीं त्यांची ही एक लीला होती असें दिसतें. नानांनी आपल्या महाडच्या कारस्थानी खेळांतून उठविलेलें हें घाटग्यांचें भूत दौलतराव शिंद्यांच्या मानेवर कायमचें बसविल्यामुळें त्यांच्या स्वच्छंद लीलांवर पांघरूण घालणें दौलतरावाचें कर्तव्य होऊन बसलें होतें व तें त्यांना व त्यांच्या मुत्सद्यांना दिवसेंदिवस डोईजड होत चाललेलें होतें असें दिसतें.

२३. सर्जेरावांच्या कोणत्याही कृत्याला शिंदे हे जबाबदार होते. त्यामुळें शिंद्यांच्याच प्रेरणेनें सर्जेराव यांनीं अमृतराव यांचेबरोबर युद्ध प्रसंग केला असें बाजीराव यांना वाटणें स्वाभाविक होतें. शिंद्यांनीं सर्जेराव यांच्याकडून आपल्या भावावर हल्ला करविणें ह्मणजे आपल्या स्वतःवरच हल्ला करविल्याप्रमाणें झालें, असें बाजीराव यांना वाटलें असल्यास नवल नाहीं. " त्यांच्या मनांत क्रोध व भय एकदम उत्पन्न झालीं व त्या विकारांच्या प्रेरणेवरून त्यांनीं निजामअल्ली आणि भोंसले यांशीं नवीन तह ठरविण्याचा घाट घातला. या तहाचा अभिप्राय हाच कीं, त्या दोघांनीं फौजा पाठवून शिंद्यांशीं सुरू झालेल्या लढाईंत आपणास मदत करावी! परंतु पुढें चार दोन दिवस गेल्यावर श्रीमंतांनीं विचार केला कीं, झालेली अप्रतिष्ठा गिळून शिंद्यांशीं सौरस्य ठेवण्यांतच सुरक्षितपणा[१] आहे. " बाजीरावांनीं असा विचार करण्यांत त्यांच्यावर पडलेल्या पेशवेपदाच्या जबाबदारीचें व त्यांच्या थोर मनोवृत्तीचें स्पष्ट प्रतिबिंब दिसून येतें. नानांनीं रचलेल्या महाडच्या कारस्थानापासून निजामअल्ली व भोंसले यांना नानांनीं चारलेल्या मलिद्याची चटक लागून राहिली होती. बाजीरावांनीं शिंद्याविरुद्ध निजाम व भोंसले यांचेकडे मदतीची केलेली मागणी त्यांनीं केव्हांही मान्य केली असती. परंतु त्या मदतीबद्दल त्यांना चारावा लागणारा मलिदा दिल्यानें पेशव्यांच्या राज्याचा जास्त नाश होतो हें बाजी-

१. ऐ. ले. सं. पान ५४२३.

राव यांना समजत होतें. आपल्या झालेल्या मानभंगाचा किंवा अप्रतिष्ठेचा सूड उगवण्याकरतां "हलवायाच्या दुकानावर ब्रह्मार्पण" करण्याचा नानाप्रमाणें बाजीरावांचा मनोधर्म नव्हता. शिवाय नानांपासून आत्मसंरक्षण व्हावें ह्मणून आपण शिंद्यांची मदत घेतली, पण शेवटीं तेच आपल्यावर जसे उलटले, तसेच निजाम व भोंसले आपल्या मदतीला येऊन शिंद्यांप्रमाणेंच तेही आपल्यावर पुढें कशावरून उलटणार नाहींत, हा विचार बाजीरावांपुढें उभा राहिला असेल यांत संशय नाहीं. शिंदे झाले तरी ते आपलेच चाकर आहेत. आजपर्यंत आपलाच मलिदा खाऊन ते पुष्ट झालेले आहेत. आज नाहीं उद्यां ते ताळयावर येतील; तेव्हां त्यांनीं आपली जी अप्रतिष्ठा केली त्याबद्दल त्यांना शासन न करतां क्षमाच करावी ऐवढें थोर मन करण्याचा बाजीरावांनीं विचार केला, हें त्यांना खात्रीनें भूषणावह आहे. नानांनीं बाजीरावांना किती बाजूंनीं दुर्बल करून गादीवर बसविलें होतें, ही हकीकत मागें आलीच आहे. अशा प्राप्त परिस्थितींत हलक्या लोकांकडून होणारा मानभंग किंवा अप्रतिष्ठा गिळूनच थोर माणसांना आपला मार्ग चोखाळावयाचा असतो. त्याला अनुसरूनच या वेळीं बाजीरावांनीं शिंद्यांना क्षमा करण्याचा निर्णय घेतला. "गरीब बिचारा बाजीराव! एका दुर्बळपणामुळें त्याचें पेशवाईचें पद हलक्या लोकांच्या कुचेष्टेस पात्र झालें होतें. सर्जेरावांसारख्यांनीं आधीं लाथ मारावी, आणि मागून लगेंच पायांवर डोकें ठेवावें, असें वर्तन बाजीराव रघुनाथ पेशवे यासीं आजपर्यंत अनेक वेळां केलें तरी त्यांची क्षमावृत्ति जी ढळली नाहीं, ती या वेळीं तरी कशी ढळणार? त्यांनीं शिंद्यांचा अपराध माफ करून बायांशीं समेट घडवून आणण्याचा पुनः यत्न केला.[1]" यावरून बाजीरावांची केवढी थोर क्षमाशील वृत्ति होती व ते आपसांतील तंटे विकोपास न जावे याकरितां आपल्याकडे कमीपणा घेऊनही कसा प्रयत्न करीत होते हें दिसून येईल. नानांचा स्वभाव मात्र याच्या अगदीं

---

१ ऐ. ले. सं. पान ५४२३.

उलट होता. आपसांतील तंटे मिटविण्याऐवजीं ते विकोपास कसे नेतां येतील व त्यामध्यें आपल्याच पोळीवर कसें तूप ओतून घेतां येईल हें ते पहात असत.

२४. सर्जेराव घाटगे यांनीं अमृतराव यांची जी अप्रतिष्ठा केली, त्याबद्दल त्यांना क्षमा करावी ह्मणून बाजीरावानीं अमृतरावांकडे व शिंदेबायांकडे मध्यस्थी चालविली. अमृतरावांची त्या बाबतींत कांहीं केल्या समजूत पडेना. दौलतरावांच्या वतीनें असें ह्मणणें होतें कीं ‘बायांस सरंजाम बेजमीचा निराळा तोडून देतों. त्यांनीं खटल्यास पडों नये.’ बाजीरावांनीं हें शिंद्यांचें ह्मणणें बायांस समजाविलें. परंतु त्यावर शिंदेबाया आपलें एकच ह्मणणें धरून बसल्या. “धनी आपण आज्ञा करितां, उत्तम आहे. यास आम्हीं मान्य करितों. परंतु आम्हीं विनंती करितों ती ऐकून घ्यावी. त्याप्रमाणें शिंद्यांस मान्यता पडते असें जाल्यास उत्तम आहे. सखाराम घाटगे व फकीरजी गाढवे वगैरे सहा असामी कारभारी आमचे स्वाधीन करावे. आम्हीं सांगूं ते जुन्या कारभाऱ्यांपैकीं कारभारी जवळ ठेवावे. कारभार करणें तो आमचे विचारें करावा. याप्रमाणें जाल्यास समजूत ठरेल.” त्यास हें बोलणें शिंद्यांस मान्य पडत नाहीं, तेव्हां समजूत राहिली. बायांनीं बाजीरावसाहेब यांस सांगितलें कीं, “याउपर तिकडील बोलण्याचा नाद सोडून द्यावा. आम्हीं त्यास मारूं किंवा तो आम्हांस मारील, हीच त्याची आमची समजूत ! पाटीलबावा देवाधीन जाले तेव्हांच आम्हीं बरोबर जावें तें न जालें. त्यास तोच दिवस कल्पून लढाईंतच मरून जाऊं ! चिंता नाहीं.[१]” याप्रमाणें बाजीराव व शिंदेबाया यांच्यामध्यें वाटाघाटी, उत्तरें प्रतिउत्तरें चालू होतीं. पूर्वीं ज्या वेळीं शिंद्यांनीं आपल्या लष्करांतून जबरदस्तीनें बायांची रवानगी केली त्या वेळीं आपलें जवाहीर देण्याविषयीं बायांनीं आक्रोश केला असतांही शिंद्यांनीं तें दिलें नाहीं. या वेळीं तेंच जवाहीर व पोषाखाचीं सनगें शिंद्यांनीं बायांस देण्याकरितां बाजीरावसाहेब यांच्याकडे पाठविलीं; परंतु “आम्हीं एका

---

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ४२८६.

वस्त्रानिशीं बाहेर निघालों तसेच चिरंजीव शिंदे लष्कर सोडून ज्या काळीं निघतील त्या काळीं जवाहीर व वस्त्रें जवळच आहेत. तूर्त घ्यावयाचीं नाहींत."[१] असें बोलून बायांनीं जवाहीर व सनगें घेण्याचें नाकारिलें. शिंदेबायांनीं बाजीराव यांची मध्यस्थी दौलतराव शिंदे इतके नरम आले असतांही धुडकावून लाविली. शिंदेबायांच्या मनांत एकतर आपण मरावें किंवा दौलतरावानें मरावें हा एकच विचार घोळत होता, याचें कारण शिंदेबायांनीं दौलतरावाला पदभ्रष्ट करून व नवीन दत्तक घेऊन महादजी शिंद्यांच्या सरदारीची गादी चालवावी असा जो गुरुमंत्र नानांनीं शिंदेबायांना एकदां दिला होता, त्या मंत्रानें त्या अद्याप भारलेल्याच होत्या. त्यामुळें बाजीराव यांची मध्यस्थी फिकी पडली, यांत नवल नाहीं. बाजीराव हे धनी खरे. पण त्यांच्या हातांत ना सत्ता व ना मत्ता ! अशा निर्माल्यवत् धन्याचा कोण शब्द मानणार ! बाजीराव मात्र आपुलकीच्या भावनेनें मध्यस्थी करून समेटाचा कसून प्रयत्न चालवीत होते. नानांचें पाठबळ शिंदेबायांना होतेंच. शिंदेबायांच्या मागें नानांचा खजिना हात जोडून उभा होताच. दौलतराव शिंदे व शिंदेबाया यांचा कलह अव्याहत चालावा हें नानांचें पक्कें धोरण होतें. अशा स्थितींत शिंदेबाया सहजासहजीं वठणीवर येण्यासारख्या नव्हत्या; म्हणून बाजीरावांच्या मध्यस्थीचा कांहीं एक उपयोग न होतां, शिंद्यांच्या मनांत बाजीरावांविषयीं नवीन किल्मिष उत्पन्न होण्यांत त्याचा दुरुपयोग झाला एवढें मात्र खरें !

२५. दौलतराव शिंद्यांच्या वतीनें शिंदेबायांबरोबर समेट घडवून आणण्याच्या प्रयत्नाला बाजीराव लागले. परंतु त्यापासून कांहीं निष्पन्न होत नाहीं असें शिंद्यांना दिसून येऊं लागल्यामुळें त्यांच्या मनाला संशयाची बाधा होऊं लागली. बाजीरावांची मध्यस्थी निव्वळ बाह्यात्कारी असावी; त्यांच्याच प्रेरणेनें हें बायांचें खूळ माजलें असावें; त्याचेंच पाठबळ असल्याशिवाय या बाया इतक्या शेफारून गेल्या नसाव्यात, अमृतरावांनीं

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ४२८८.

बायांना आश्रय दिला तो त्यांच्याच सल्ल्यानें दिला असावा; बायांचा व आपला द्वेष यापुढेंही कायम टिकावा म्हणून त्यांनीं निजाम व भोंसले यांच्याबरोबर मिलाफ करून घेण्याची खटपट चालविली असावी, असे तर्क-कुतर्क बाजीरावांबद्दल शिंद्याच्या मनांत घोळूं लागले. तेव्हां त्याला अनुसरून बाजीरावांचें वर्म नाना फडनविस आहेत असें समजून, शिंद्यांनीं नानांची कैदेंतून मुक्तता करण्याचा बेत योजिला. या योजनेनें शिंद्यांचे बरेच हेतु साधण्यासारखे होते, (१) बाजीरावांच्या मनांत भयंकर दहशत उत्पन्न होऊन ते आपल्याविरुद्ध कोणतेंही कारस्थान करण्यास धजणार नाहींत. (२) नानांच्या मध्यस्थीनें बायांचा तंटा मिटेल. (३) परशुरामभाऊंची बाजीरावांनीं सुटका केल्यामुळें सातारचे महाराज व करवीरचे महाराज यांच्यावर जें संकट येणार आहे तें टळेल. (४) निजाम व भोंसले आपल्याविरुद्ध बाजीराव यांस मदत करण्यास तयार होणार नाहींत. (५) नानांची कैदेंतून सुटका केल्याबद्दल त्यांच्याकडून द्रव्यप्राप्ति होईल, वगैरे वगैरे बरेच फायदे होतील असें शिंद्यांना वाटलें. त्याप्रमाणें शिंद्यांनीं फकीरजी गाढवे यांचेबरोबर सहा पलटणें व पांचशें स्वार देऊन नानांस आणण्याकरतां त्यांना नगरास रवाना केलें. इकडे शिंदेबायांनींही नानांस मिळवून घेण्याकरितां आपली फौज रवाना केली. नगरच्या किल्लेदारानें या दोघांच्याही फौजा किल्ल्याजवळ येऊं दिल्या नाहींत, शिंदेबायांच्या फौजेनें नाना आपणाला वश होऊन आपल्याबरोबर येतील असा प्रयत्न चालविले. परंतु नानांचा तसा रंग दिसून न आल्यामुळें ती फौज परत फिरली. त्यानंतर फकीरजी गाढवे यानीं नानांबरोबर भाषा सुरू केली. दोन कोट रुपये द्याल तर आपली सुटका होईल असें त्यांनीं नानाबरोबर बोलणें सुरू केलें. पुष्कळ प्रकारें अढेवेढे घेऊन, हो ना म्हणतां म्हणतां, शेवटीं दहा लक्ष रुपये देण्यास नाना तयार झाले. आणि तेवढ्यांतच शिंद्यांनीं आपली समजूत करून घेतली. या वेळीं शिंद्यांबरोबर नानांचा जो करार झाला तो असा होता कीं, 'शिंद्यांनीं नानांस मुक्त करावें

एवढेंच नव्हे, तर पूर्वीप्रमाणें त्यांची कारभाऱ्याच्या जागेवर पुनः स्थापना करावी; आणि नंतर नानांनी शिंद्यांस दहा लक्ष रुपये द्यावे, आणि बायांशीं त्यांचा समेट करून देण्याचा उद्योग करावा.[१]' हा करार ठरल्यावर तारीख १५ जुलै रोजीं नाना पुण्यास येण्याकरतां नगराहून निघाले. दुसरे दिवशीं मार्गांत बायांकडील चार हजार पठाण आडवे आल्याची हुल उठली, तेव्हां पलटणें नानांस घेऊन मारदौंडेच्या ठाण्यांत शिरलीं व उठलेली बातमी निराधार आहे अशी पक्की खात्री करून घेतल्यावर पुनः मार्ग चालूं लागली. नाना फडनविस जुलैच्या १७ व्या तारखेस वानवडीवर शिंद्यांच्या छावणींत दाखल झाले. दुसऱ्या दिवशीं दौलतराव शिंद्यांनीं मोठ्या समारंभानें त्यांची भेट घेतली व खुशालीच्या तोफा केल्या. छावणींत आल्यावरसुद्धां नाना शिंद्यांच्या प्रतिबंधांतच राहिले. परंतु तो त्यांचा प्रतिबंध त्यांच्या रक्षणार्थ त्यांच्याच इच्छेनुरूप राखिलेला होता. आबा शेलूकर व, बजाबा शिरवळेकर व पिंगळे ही नानांची मित्रमंडळी त्यांजकडे खुशाल येत जात होती. लोहगडास फौज, पायदळ वगैरे नानांचा जमाव होता, तो घेऊन धोंडोपंत निजसुरे त्यांजवळ रहावयास आले, तेव्हां त्यांनीं शिंद्यांच्या छावणींत आपला निराळा गोट केला.

२६. शिंद्यांनीं नानांची इतक्या तातडीनें जी मुक्तता केली त्यांतील त्यांचा मुख्य उद्देश शिंदेबायांचें खूळ नानांनीं तावडतोब मोडावें असा होता. नाना मनानें शिंदेबायांच्या पक्षाचे होते पण देहानें मात्र शिंद्यांच्या ताब्यांत होते; पण या नानांच्या खोल कपटी हृदयाचा ठाव शिंद्यांना लागला नाहीं. नाना आपल्याच कैदेंत आहेत याच भरंवशावर ते राहिले. नाना शिंद्यांच्या छावणींत आल्यावर व आबा शेलूकर वगैरे त्यांच्या प्रियदोस्तांच्या गांठी भेटी झाल्यावर, म्हणजे नानांना शिंद्यांनीं कैद केल्यानंतर सर्जेराव वगैरे लोकांकडून जीं कृत्यें घडलीं त्याची सर्व कच्ची हकीकत त्यांना समजल्यानंतर, पुढील कारस्थानाचे डाव कसे टाकावे हें त्यांनीं

१. ऐ. ले. सं. पान ५४२५.

ठरविलें असेल यांत संशय नाहीं. नगरच्या किल्ल्यावर राहून नानांच्या मुत्सद्दी डोक्यास विश्रांति मिळालेलीच होती. तेव्हां आपली सुटका झाल्यावर कारस्थानाचे कसे पवित्रे टाकावयाचे याचा गूढ विचार त्यांनीं करून ठेवला होता असें स्पष्ट दिसतें. नाना वानवडीस आल्यापासून फक्त आठ दिवसांचे आंतच नानांच्या नवीन कारस्थानाचा पहिला सुरुंग वानवडीस उडाला. त्याची माहिती पुढें दिलेल्या उताऱ्यावरून लक्षांत येईल. एके रात्रीं फकीरजी गाढवे "दिवटी[1] न लावितां बाहेर जात असतां मुकेरीच्या पहारेकऱ्यानें उभा केला. गाढवे ह्मणोन सांगितलें असतां जाऊं न देई. तेव्हां गाढव्यानें पहारेकऱ्यास धकावून गेला. जखमही लागली. पहारेकरी यानें कंपूवाल्यास जाऊन सांगितलें. तेव्हां रात्रीचे कांहीं बोलले नाहींत. दुसरे दिवशीं मुकेरीचा लेक व जानसाहेबाचा लेक दोन तीन पलटणें तयार करून घेऊन शिंद्यांकडे गेले. आणि सांगितले कीं, गाढवे यानें पहारेकऱ्यास कैद मोडून जखमी केलें त्यास पाहोन घेतों! ह्मणोन सांगोन चालोन गेले. गाढवा घाटग्याचे गोटांत गेला तेथें भोंवते उभे राहोन उभयतांस धरिलें. घाटगे यास जखम लागली. यादो भास्कर बंधूसह आले तेही तेथेंच कैद करून मुसक्या बांधून कंपूंत आणोन ठेविले. शिंदे यांनीं गडबड करून दुर्जनास पलटण तयार करविले तों रायाजी पाटील व रामजी पाटील याणीं थोपून राखिलें. गोष्ट नासेल ह्मणोन जिकडील तिकडे तयारी मोडविली. बाहेर हें कृत्य राजश्री नानांनीं केलें असें म्हणतात. गाढवे घाटगे वगैरेंना कैद करण्याचे आदले दिवशीं रात्रीं गुलटेंकडीवर मुकेरी व जानसाहेब दोन्ही कंपू व पठाण बक्षी यांचें चोरून बोलणें होऊन आणा शपथा झाल्या होत्या." गाढवे व घाटगे यांना ज्यावेळीं पकडलें त्याची माहिती देणारें दुसरें एक पत्र पुढीलप्रमाणें आहे. "वानवडी-कडील वर्तमान तर फकीरजी गाढवे व सर्जेराव घाटगे व यादव भास्कर व त्याचा बंधु यांसहि मुकेल फिरंगी याच्या मुद्यानें धरून कैद केले आहेत.

---

१. ऐ. ले. सं. पत्र नं ४३३७.

सर्जेराव घाटगे व फकीरजी गाढवे यांच्या मुसक्या बांधून उभ्या बाजारांतून बंदुकींच्या कुपणानें मारीत पलटणांत घेऊन गेले. आणि तेथें शेतखान्यांत कोंडून एक रोज ठेविलें होतें. दुसऱ्या दिवशीं बाहेर काढून पाऱ्यांत ठेविले आहेत. यादवराव भास्कर व त्याचा बंधु यासी पलटणींतून आणून सरकारच्या वाड्यापाशीं आणून भास्कर यास पाऱ्यांत ठेविलें आहे. राजश्री नाना फडनविस यासी नगराहून आणून छावणींतून फिरंगी याच्या गोटांत ठेविला होता. त्यास या उभयतांस कैद केल्यावर त्यास मोकळा केला आहे. तो निराळा शेंदोनशें स्वारानिशीं आहे. उभयतां फिरंगी यांत आपसांत कटकट लागली आहे ?"
त्याच वेळेच्या दुसऱ्या एका पत्रांत पुढीलप्रमाणें मजकूर आहे. "आपले[२] मंडळीचे द्वेषी होते. त्यांस मुकील याच्या मुलानें कैद करून अब्रू घेतली. आण कंपू सु॥ कैद करून ठेविले. (....)[३] फकीरजी गाढवे व यादो भास्कर उभयतां बंधु ऐशा चार आसाम्या धरल्या आहेत. मुकील व जानशा या दोन्हीं कंपूंचें संधान बायांकडेच आहे. त्याजमुळें असाम्या त्याणें कैद केल्या. पूर्णपणीं येऊन बायांस भेटतील तेव्हां खरें. दुर्जनाचा कल मात्र दवलतराव याजकडेस आहेत. परंत तूर्त मशारनिल्हे मुख्य याजसभोंवता कंपू मुकेलाचा आहे. तेव्हां गोष्ट आटोपेंत येईल. ऐसें दिसतें. परंतु नाना फडणीस (....)[४] म्हणोन वर्तमान आहे."

२७. नगरच्या किल्ल्यावरून नानांची सुटका करावी याकरतां शिंदेबायांच्या वतीनें मुकीरसाहेबाचीं पलटणें व शिंद्यांच्या वतीनें ड्रुजियनसाहेबाचीं पलटणें, गेलीं होतीं. ड्रुजियनसाहेब हा सर्जेराव घाटगे यांच्या विश्वासांतील सरदार होता म्हणून त्यास ड्रुजियनऐवजीं दुर्जनसाहेब या नांवानें लोक संबोधित होते. मुकीरसाहेब व जानसाहेब हे पलटणांतील सरदार शिंदेबायांच्या पक्षांत सामील झाले होते. नानांना उघडपणे शिंदेबायांच्या पक्षाला सामील असल्याचें दाखवावयाचें नव्हतें. त्यांना दौलतरावांचा पक्ष पोंखरून हलका करावयाचा

१ व २ जिवबादादाबक्षी यांचें चरित्र. ले. नं. २५८ व २५९.
३. सर्जेराव घाटगे. ४. मुख्य.

होता; व ही गोष्ट शिंद्यांच्या पक्षांत आपण सामील आहोंत असें शिंद्यांना दाखवूनच साध्य करून घ्यावयाची होती. याकरतांच ते फकीरजी गाढवे यांच्याबरोबर करारमदार ठरवून शिंद्यांच्या लष्करांत आले. नाना बानवडीस आल्याबरोबर शिंदेबायांच्या पक्षाला जोर चढला. सर्जेराव घाटगे, फकीरजी गाढवे वगैरे शिंद्यांच्या नवीन कारस्थानी कारभाऱ्यांवर सर्वांचाच रोष उत्पन्न झाला होता. नानांच्या पक्षांतील लोकांकडून त्यांनीं क्रूरपणानें व निर्दयवृत्तीनें मोठमोठे दंड वसूल करून घेतले होते, म्हणून त्यांच्यावर नानांचा पक्ष रुष्ट झालेला होता. शिंदेबायांची अप्रतिष्ठा त्यांनीं केली असल्यामुळें त्यांचा सूड घेण्याच्या पवित्र्यावर त्या बायांचा पक्ष एका पायावर उभा राहून वाट पहात होता. अमृतराव व बाजीराव हेही सर्जेरावांच्या अन्यायी व क्रूर कृतीनें त्रासून व संतापून गेले होते; त्यामुळें त्यांचाही पक्ष त्यांच्या शासनाची मार्गप्रतीक्षा करीत होता. शिंद्यांच्या नवीन कारभारांत घाटगे वगैरे मंडळी घुसल्यामुळें जुनी शेणवी कारभारी मंडळी त्यांच्यावर रुष्ट झालेलीच होती. तीही त्यांच्या पारिपत्याकरतां टपून बसलेलीच होती. त्याचप्रमाणें घाटग्यांनीं शिंद्यांच्या लष्करांतील चार सरदार धरून ते बायांचे पक्षपाती आहेत असा त्यांच्यावर गुन्हा लादून त्यांच्यापैकीं तिघांस त्यांनीं तोफेच्या तोंडीं देऊन व एकास मेखसूखालीं ठार मारलें होते.[१] त्यामुळें शिंद्यांच्या लष्करांतील बरीच फौज घाटग्यांचा सूड घेण्याची वाट पहात होती. एकंदरींत नानांच्या महाडच्या कारस्थानांतून घाटगेशाहीची उठलेली भुनावळ सर्वांना सारखीच असह्य, दुःखदायक, संकटकारक व हानिप्रद अशी झालेली होती. या सर्व गोष्टींचा फायदा घेऊन नानांनीं पहिल्यानें घाटगेशाहींतील घाटगे, गाढवे, यादो भास्कर वगैरे एकोणीस इसमांस कैद करविलें. या कैद करण्याच्या पद्धतीमुळें शिंद्यांच्या लष्करांत उघड उघड असे दोन तट पडले व त्यामुळें दौलतरावांची पांचावर धारण बसली. आपल्या सासऱ्याला कैद करून त्याची अप्रतिष्ठा केल्याबद्दल दौलतरावांना भयंकर राग आला व मुकीर आणि जानसाहेब

---

१. इफकत मराठ्यांची बखर पान १२६.

यांचें पारिपत्य करण्याकरतां त्यांनीं 'दुर्जन'साहेबाचीं पलटणें तयार केलीं. या वेळीं रायाजी व रामजी पाटील यांनीं जर दौलतरावांना थोपवून धरलें नसतें तर खार्वांनें यादवी माजून शिंद्यांच्या लष्करांत प्रलयच झाला असता. दौलतरावांनीं बायांचा आपसांतील कलह मिटविण्याकरतां नानांना कैदेंतून मुक्त करून लष्करांत आणलें, पण नाना हे मूर्तिमंत कलिपुरुष असल्यामुळें लष्करांत पाऊल ठेवतांच तेथील शिंद्यांच्या फौजेंत नवीन कलहाचा वणवा त्यांनीं पेटवून ठेविला.

२८. नानांनीं उत्पन्न केलेल्या या परिस्थितीमुळें पुणें शहरावर मात्र या वेळीं संकटांच्या परंपरेनें कहर उडवून सोडला शिंदेबायांच्या पक्षांतील शेणवी-सरदार, पठाणसरदार, मराठे सरदार आणि अमृतरावसाहेब यांच्या फौजा गणेशखिंडीपासून पर्वतीपर्यंत पसरलेल्या होत्या. बाजीरावसाहेबांचें घोडदळ व पायदळ अशी सुमारें पांच सहा हजार फौज पुणें शहरांत इतस्ततः पसरलेली होती. भवानीपेठ वगैरे नाक्यानाक्यांनीं तोफा व चौक्या ठेवून बंदोबस्त राखण्याकरतां बाजीरावांनीं मानाजी फाकडे व मालोजी घोरपडे यांच्यासारख्या शूर योद्ध्यांची योजना केली होती. वानवडीवर शिंद्यांचा तळ पसरलेला होता. बायांकडील पठाण व मराठे शिंद्यांच्या लष्कराभोंवतीं रात्रंदिवस घिरट्या घालीत होते व पलटणवाल्यांचीं माणसें लष्कराच्या हद्दीबाहेर गेलीं कीं तीं कापून काढीत, त्यांच्यावर बाण टाकीत व साधल्यास गोळ्याही मारीत होते. याप्रमाणें कडीकबाड वगैरे बाहेरून आणण्याची सोय शिंद्यांच्या लष्करास राहिली नव्हती. शिंदे व शिंदेबाया यांच्यामध्यें हें नवीन युद्ध सुरू झाल्यामुळें बाजीराव यांची मधल्यामध्यें विचित्र स्थिति होऊन बसली होती. त्यांना या दोन्ही पक्षांत शांतता नांदवावयाची असल्यामुळें कोणाचाच पक्ष त्यांना घेतां येण्यासारखा नव्हता. त्यांनीं पुणें शहराच्या लोकांना अशी ताकीद दिली कीं, बाया अगर शिंदे यांपैकीं कोणाच्याही लोकांना धान्य व वैरण देऊं नये. शिंद्यांच्या या घरगुती कलहांत बाजीरावांनीं तटस्थतेची जरी भूमिका घेतली होती, तरी त्यांच्या साम-

र्याची कल्पना उभय पक्षाला असल्यामुळें पलटणांतील लोक शहरच्या लोकांना शहरावर तोफांचा भडिमार करण्याचा धाक घालून धान्य व वैरण विकत नेतच होते. त्यामुळें पलटणवाल्या लोकांना मागतील त्या दरानें व वाटेल तेवढें धान्य मिळत होतें. शहरांत शिलेदार होते त्यांस बाहेर जाऊं देण्याची छाती बाजीरावसाहेबांस होत नव्हती. हे शिलेदार बेलाशक लोकांचे घरांत शिरून दाणावैरण नेत व आपला गुजारा चालवीत. या वेळीं पुण्यांत पावसाची सतत धार सुरू होती. पुण्याच्या धनवान व बड्या लोकांनीं स्थलांतर केल्यामुळें त्यांचे वाडे रिकामेच पडले होते. आरब व गारदी या लोकांनीं निवाऱ्याकरितां या वाड्यांचा आश्रय केला होता. या वाड्यांतून पुरलेलें द्रव्य सांपडेल या आशेनें आरब व गारदी यांनीं हे वाडे खणून काढले. त्यामुळें जिकडे तिकडे मातीचे ढिगारेच ढिगारे निर्माण झाले. या लोकांच्या इच्छेप्रमाणें कांहीं वाड्यांतून पुरलेलें द्रव्यही त्यांना सांपडलें. एकंदरींत शिंद्यांच्या घरगुती तंट्यामुळें व नानांच्या मुक्ततेमुळें पुणें शहरावर पुनः एकदा दुर्दैवाची दृष्टि फिरली.

२९. शिंदेबायांच्या बाबतींत दौलतरावांकडून अन्याय होत आहे असें बाजीराव यांना दिसून आल्यानें व ते पेशव्यांच्या राज्यकारभारांत साताऱ्याचें राजकारण उपस्थित करून ढवळाढवळ करूं लागल्यामुळें, त्यांचें पारिपत्य करण्याकरतां त्यांनीं निजाम व भोंसले यांच्याबरोबर आपलें राजकारण सुरू केलें होतें. परंतु शिंद्यांनीं त्यावर तोड ह्मणून नानांची मुक्तता करण्याचें ठरविलें. त्या वेळीं खरोखर नाना बंधमुक्त झाल्यास त्यांना शह देण्याकरतां मोरोबादादांची योजना करण्याचें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें बाजीरावांनीं त्र्यंबकच्या किल्लेदारास मोरोबादादांना मोकळें करण्याची आज्ञा पाठविली. "श्रीमंतांचे[1] चित्तांत (बाजीराव यांचे मनांत) सर्वांस एक करून राज्य चालावें असें आहे. परंतु कोणांत कोणी मिळत नाहीं." नाना, मोरोबादादा, परशुरामभाऊ,

---

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ४२१८.

बाळोबातात्या, शिंदे, शिंदेबाया, सातारकर, करवीकर, या सर्वांनीं एकचित्त व्हावें असा बाजीराव सारखा प्रयत्न करीत होते. परंतु नानांच्या मनांत ती गोष्ट घडवून आणण्याची इच्छा नसल्यामुळें बाजीरावांचा तो प्रयत्न निष्फळ ठरला. नाना मोकळे होऊन शिंद्यांच्या लष्करांत आल्यानंतर नानांबरोबर सख्य करावें असा त्यांनीं प्रयत्न चालविला. मोरोबादादा पुण्यास आल्यावर नाना कदाचित् तडजोडीस तयार होणार नाहींत म्हणून त्यांनीं मोरोबादादास पत्र लिहून कळविलें कीं, "तूर्त तुम्हीं पुढें येऊं नये. शिवनेरीच्या किल्ल्यावर तुमच्या राहण्याची तजवीज केली आहे तेथें जाऊन रहावें." याप्रमाणें मोरोबादादांची मुक्तता केली असतांही त्यांना शिवनेरी किल्ल्यांत जाऊन राहण्याची आज्ञा केली. यावरून नानांची मर्जी संपादण्याकरितां बाजीराव स्वतःचा अपमान सोसूनही कसा प्रयत्न करीत होते हें दिसून येतें. परंतु त्यांचे हे सारे प्रयत्न 'पालथ्या घागरीवर पाणी ओतल्याप्रमाणें' व्यर्थ होत होते. कारण नानांचा स्वभाव म्हणजे 'आधीं होता वाध्या। दैवयोगें झाला पाग्या। त्याचें येळकूट राहीना। मूळ स्वभाव जाईना,' या तुकोबाच्या उक्तीप्रमाणें होता. त्यांना स्वार्थापुढें व स्वतःच्या अधिकारापुढें जगांतलें दुसरें कांहींही दिसत नव्हतें. ते स्वतःचा स्वार्थ साधून घेण्याकरतां पेशवाईचे वाटेल तेवढे तुकडे तुकडे करावयास तयार होते. वाटेल त्या इसमाचे खून करावयास ते तत्पर होते. वाटेल त्याची वाटेल त्या बाबतींत मदत घ्यावयास त्यांच्या मनाला खंत वाटण्यासारखी नव्हती. वाटेल त्या इसमावर वाटतील ते आरोप करण्यास त्यांस दिक्कत वाटण्यासारखी नव्हती. स्वार्थाकरतां सदासर्वदा बुभुक्षित असलेला त्यांचा स्वभाव 'बुभुक्षितः किं न करोति पापम्' या न्यायाप्रमाणें कोणतेंही व कसलेंही पाप करावयास उद्युक्त होता. नाना शिंद्यांच्या कैदेंत गेले म्हणून पेशवाई कांहीं बुडाली नव्हती. ते त्यांच्या कैदेंत कांहीं दिवस राहिले असते तर बाजीरावांनीं खात्रीनें पेशव्यांच्या राज्याची पूर्ववत् घडी बसविली असती. बाजीरावांना

या वेळीं पेशव्यांचें राज्य सुरळीत चालविण्याकरतां नानांची जरूरी नव्हती; तर पेशव्यांच्या राज्यावर नानांनीं आणखी संकटांची परंपरा ओढवूं नये, व पेशव्यांच्या राज्याच्या गाड्याला नानांनीं वेळोंवेळीं घातलेली खीळ आणखीं ठोकून मजबूत करूं नये, एवढयाचकरतां बाजीरावांना नानांची जरूरी होती. 'दुर्जनं प्रथमं वंदे' या नीतिशास्त्राच्या नियमाप्रमाणें 'आणखीं संकटें उत्पन्न न करण्याकरतां मेहरबानगी करून काय मोबदला घ्याल?' एवढें विचारून व त्याप्रमाणें त्यांची व्यवस्था करून पेशवाईचें रक्षण करावें हाच बाजीरावांचा मुख्य उद्देश होता. त्याप्रमाणें नाना नगरच्या किल्ल्यावरून शिंद्यांच्या लष्करांत येऊन दाखल होतांच, बाजीरावांनीं त्यांच्याबरोबर 'सौरस्याचें' बोलणें लाविलें व तुमच्या भेटीस येतों असें सांगून पाठविलें.[1] त्याप्रमाणें बाजीराव व नाना यांच्या भेटीचा दिवस तारीख १ आगष्ट हा ठरविण्यांत आला.

३०. या वेळीं नानांना निरनिराळ्या राजकारणांच्या कोंड्या फोडून शिरसलामत बाहेर पडावयाचें होतें. परशुरामभाऊ पटवर्धन हे नानांना एक अव्वल दर्जाचे शत्रू वाटत होते. ते पुन्हां पूर्ववत् फौजबंद होऊन बसले होते. ते साताऱ्याच्या महाराजांचा बंदोबस्त करण्यांत गुंतले असल्यामुळें नानांचें मन जरी थोडें स्वस्थ होतें तरी शिंदे[2] बाळोबातात्यांना बंधमुक्त करून पुण्यास आणणार आहेत या बातमीनें त्यांचें मन हादरून गेलें होतें. बाळोबातात्या पुण्यास आले ह्मणजे परशुरामभाऊंना जास्त जोर चढेल व ते उभयतां मिळून पुन्हां आपली केव्हां गठडी वळतील याचा नेम नाहीं अशी त्यांना धास्ती वाटत होती. बाळोबातात्यांना सोडवून आणण्याच्या मनसुब्यांत सर्जेराव घाटगे व बक्षी हे होते. नानांना शह बसण्याकरतां बाजीराव यांनीं ज्याप्रमाणें मोरोबादादांना आणण्याचें ठरविलें होतें, त्याचप्रमाणें घाटगे व बक्षी यांनीं बाळोबातात्यांना आणण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें घाटगे यांनीं शिंद्यांचीं पत्रेंही घेतलीं व त्यांस आणण्यास फौजही पाठविली होती.

---

1. ऐ. ले. सं. पान ५४२६. 2. ऐ. ले. सं. पत्र नं. ४२०८ व ४३२६.

एकंदरींत नाना सुटून आल्यानंतर त्यांना कैचींत ठेवण्याकरतां शिंदे, शिंदेबाया, घाटगे, बक्षी व बाजीराव यांचा आपापल्या परीनें प्रयत्न चालला होता. यांचे हे सर्व प्रयत्न उघड उघड असेच होते. परंतु नानांचें कारस्थान मात्र विरुद्ध बाजूच्या सर्व प्रयत्नांना हाणून पाडण्यासारखें गुप्त प्रकारें चाललें होतें. महाडच्या कारस्थानाप्रमाणें सर्व कारस्थानांच्या मुळाशीं नाना हे एकटेच असत, परंतु वर मात्र ते कोणाला तशी शंकासुद्धां येऊं देत नसत. नानांच्या प्रत्येक कारस्थानांतील विशेष हाच होता. सर्वांबरोबर नाना वरून गोड गोड बोलत असत, परंतु मनांतून ज्याच्यावर सूड घ्यावयाचा असे त्याच्यावर एकदम ते फांस टाकीत असत. बाळोबातात्या या वेळीं सुटून पुण्याला येणें हें नानांना अगदीं वाईट होतें. तेव्हां त्याच्या मुक्ततेच्या मुळाशीं घाटगे आहेत हें नानांना समजतांच पहिल्या सलामीलाच त्यांनीं घाटगे व त्यांच्या शाहींतील लोकांना कैद करविलें. त्यामुळें बाळोबातात्यांच्या मुक्ततेचा प्रश्न सहजच थंडावला. नाना पुण्यास आल्यावर आठच दिवसांत ज्याप्रमाणें घाटग्यांना कैद करवून बाळोबातात्यांच्या मुक्ततेचा प्रश्न त्यांनीं हाणून पाडला, त्याप्रमाणें परशुरामभाऊंचाही निकाल लावण्याचा त्यांनीं मनसुबा ठरविला होता. करवीरचे महाराज व परशुरामभाऊ यांचें हाडवैर होतें. नाना व करवीरचे महाराज यांचे महाडच्या कारस्थानापासून पूर्ण रहस्य जमलें होतें. परशुरामभाऊ साताऱ्याच्या महाराजांचें बंड मोडण्याच्या कामगिरीवर होते. करवीरचे महाराज परशुरामभाऊंविरुद्ध साताऱ्याच्या महाराजांना मदत करण्याकरतां निघाले होते. बाजीरावांनीं साताऱ्याच्या किल्ल्यावरील नानांच्या कारकुनास कैद करविल्यामुळें व नानांच्या ताब्यांतील सातारा किल्ला आपल्या ताब्यांत घेण्याच्या प्रयत्नास ते लागल्यामुळें बाजीरावांवर व त्याचप्रमाणें परशुरामभाऊंवर नाना जास्त रुष्ट होणें स्वाभाविक होतें. साताऱ्याच्या महाराजांचा पराभव होऊं नये असें नानांना वाटत होतें व त्याचकरितां त्यांच्या प्रेरणेवरून करवीरचे महाराज साताऱ्याच्या महाराजांना मदत करण्याकरतां करवीर सोडून जातीनें समरांगणावर उतरले होते. शिंदेबायांस नानांची सूचना जातांच ज्याप्रमाणें एकदम घाटगे कैद

झाले त्याप्रमाणें परशुरामभाऊंचा वध करण्याकरतां नानांकडून करवीरच्या महाराजांना सूचना गेली असावी असें दिसतें. कारण या दोन्ही गोष्टी एकाच वेळीं घडून आलेल्या आहेत. पटवर्धनांच्या तारीख २४ जुलैच्या पत्रांत पुढीलप्रमाणें मजकूर आहे. "करवीरकर महाराजांनीं चार मारेकरी यांस चार गांव इनाम चौवांस देऊं करून आपल्यास (परशुरामभाऊंस) दगा करावयाकरितां पाठविले आहेत. म्हणोन वर्तमान सांगितलेवरून वडिलांस कळावयाकरितां लिहिलें आहे. सावधता असावी निगेवानीस शहाणा कोणी योजून ठेवून बंदोबस्त असावा[1]" जुलैच्या २५ तारखेस घाटगे यांना नानांच्या प्रेरणेनें अकल्पित कैद करण्यांत आलें, त्याचप्रमाणें त्याच वेळीं परशुरामभाऊंचा वध व्हावा अशी घटना करण्यांत आली होती. नाना कैदेंतून मोकळे होऊन पुण्यास येतांच एकाच वेळीं ज्याअर्थी या दोन गोष्टी घडून येतात, त्याअर्थी या दोन्हीं गोष्टींचे सूत्रचालक नाना एकटेच असले पाहिजेत यांत संशय नाहीं. अशा पाताळयंत्री कारस्थानांचा मक्ता एकट्या नानांनींच आपल्याकडे घेतला होता असें सर्वत्र दिसून येतें. या बाबतींत त्यांचा कोणीच हात धरूं शकला नाहीं.

३१. नानांनीं बाजीरावांची भेट घेण्याचें जरी ठरविलें होतें तरी तें सारें वरोपचारी होतें. नानांना बाजीरावांची बिलकुल जरूरी नव्हती. त्यांना फक्त पेशवाईचा एकतंत्री कारभार पाहिजे होता. नानांच्या डोळ्यांत परशुरामभाऊंप्रमाणें बाजीरावही सलत होते. त्यामुळें बाजीरावांची भेट घेण्याचा प्रसंग न येतां उलट त्यांचा अपमानच होईल असें कारस्थान नानांनीं निर्माण केलें. पूर्वी ठरल्याप्रमाणें तारीख १ आगष्ट रोजीं बाजीराव नानांच्या भेटीकरतां आले. तोंच शिंद्यांकडील डुजियन (दुर्जन) साहेबाच्या पलटणांनीं नानांच्या डेऱ्याभोंवतीं गराडा घातला. पलटणांच्या घेऱ्यांत शिरल्याखेरीज नानांची भेट होत नाहीं तेव्हां कांहीं तरी दगा होण्याचा रंग दिसतो असें पाहून ते तसेंच मागें फिरले. पलटणवा-

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ४२१४.

त्यांच्या या उद्धटपणाच्या वर्तनानें बाजीरावांची मानखंडना झाली यांत संशय नाहीं शिंद्यांना माल या प्रकाराबद्दल दुर्जनसाहेबाचा राग[1] आला. त्यांनीं पलटणांवरील दुर्जनसाहेबाचा अधिकार काढून घेतला व तो मुकेरीसाहेबाकडे सोंपविला. दुर्जनसाहेबाच्या या उद्धटपणाच्या वर्तनाबद्दल ज्याअर्थी शिंद्यांना राग आला त्याअर्थी त्यांच्या प्रेरणेने हें कृत्य दुर्जनसाहेबानें केलें नव्हतें हें सिद्ध होतें. दुर्जनसाहेब शिंदेबायांच्या विरुद्ध होते. दुर्जनसाहेब शिंदेबायांच्या विरुद्ध होता त्यामुळें शिंदेबायांच्या अगर त्यांच्या पक्षांतील लोकांच्या प्रेरणेनें हें कृत्य घडविलें गेलें असेंही म्हणतां येण्यासारखें नव्हतें. दुर्जनसाहेबाच्या वतीचें सर्जेराव घाटगे, गाढवे वगैरे मंडळी पांच सहा दिवस अगोदरच कैद करण्यांत आलेली होती. तेव्हां त्यांच्या प्रेरणेनें हें कृत्य घडलें असेल असेंही ह्मणतां येण्यासारखें नाहीं. आतां जबाबदार मंडळींपैकीं शिंद्यांच्या लष्करांत नाना तेवढेच शिल्लक राहिले होते. ह्मणून केवळ त्यांच्याच प्रेरणेनें बाजीरावांची अप्रतिष्ठा व मानभंग करण्याचें कृत्य नानांनीं घडवून आणलें असें ठरतें. नानांनीं ही घटना घडवून आणल्यामुळें त्यांनीं आपले दोन हेतु साध्य करून घेतले. (१) बाजीरावांची पहिल्याच सलामीला मानखंडना करवून त्यांनीं आपल्या बुद्धिप्रभावाची पुन्हां एकदां नवीन जाणीव त्यांना करून दिली. बुद्धिप्रधान कारस्थानी लोक कैदेंत पडले तरी त्यांच्या बुद्धीचा क्षय होत नाहीं, तर उलट कांत टाकलेल्या सर्पाप्रमाणें त्यांच्या बुद्धिचातुर्यांत नवजीवन उत्पन्न होत असतें याची चुणूक या घटनेमुळें नानांनीं बाजीराव यांना दाखविली. (२) दुर्जनसाहेब हा शिंद्यांच्या पक्षांतील एक मोठा फौजबंद सरदार असल्यामुळें त्याच्याकडून अनधिकाराचें कृत्य करवून त्याला शिंद्यांकडूनच अधिकारभ्रष्ट करविलें व त्याचा अधिकार मुकीरसाहेबाकडे देववून त्याचें सामर्थ्य वाढविलें. यामुळें शिंद्यांचा पक्ष

---

१. ऐ. ले. सं. पा. नं. ५४२७.

कमजोर करून बायांच्या पक्षाला नानांनीं जोर चढविला. अशा प्रकारें हा जोडगोळीचा खेळ नानांनी सहज जिंकला.

३२. जुलै महिन्यांत नाना फडनविस नगरच्या किल्ल्यांतून सुटून शिंद्यांच्या लष्करांत आले ते दोन अडीच महिने तेथेंच राहिले होते. आपली सुटका करण्याबद्दल दहा लक्ष रुपये रोख शिंद्यांना द्यावयाचा करार नानांनीं केला होता. त्याप्रमाणें त्यांनीं ती रक्कम शिंद्यांच्या पदरांत ओतली होती. सदर करारांत दुसरें एक कलम असें होतें कीं, शिंद्यांनीं पेशव्यांच्या कारभारीपदावर नानांची यथापूर्व स्थापना करून द्यावी व त्याबद्दल नानांनीं त्यांना पंधरा लक्ष रुपये रोख द्यावे. या कलमाप्रमाणें नाना फडनविसांस निर्वेधपणें यथापूर्व राज्यकारभार करूं द्यावयास बाजीरावांना भाग पाडणें याची जबाबदारी शिंद्यांवर होती. त्यामुळें त्यास कारभारी नेमण्याबद्दल शिंद्यांनीं बाजीरावसाहेबांना सक्त तगादा लाविला. शिंद्यांनीं नानांस सोडून दिलें, तेव्हां आतां त्यांच्या हातीं कारभार दिल्यावाचून सुटका नाहीं हें जाणून बाजीरावसाहेबांनीं निरुपायानें शिंद्यांच्या म्हणण्यास सक्तीचा रुकार दिला व कारभारी होण्याविषयीं नानांची प्रार्थना[1] केली. या बाजीरावसाहेबांच्या नम्र प्रार्थनेला नानांनीं साफ उत्तर दिलें कीं, "तुमच्या कारभारांत पडल्यानें माझ्या अब्रूस आणि जीवितास धक्का बसणार नाहीं याबद्दल इंग्रज व निजामअल्ली जर हमीदार होत असतील तरच आपण कारभार पतकरूं." या उत्तरानें नानांनीं बाजीरावसाहेबांच्या काळजाला आणि त्यांच्या पेशवेपदाला उघडपणें हात घातला. एका बाजूला पंधरा लक्ष रुपयांच्या मलिद्याकरतां शिंद्यांनीं नानांना यथापूर्व कारभारी करण्याची प्रतिज्ञा केली तर दुसऱ्या बाजूला इंग्रज व निजामअल्ली या परकीय दोन राजसत्तांची हमीदारी नानांनीं बाजीराव यांचेकडून मागितली म्हणजे पर्यायानें बाजीराव पेशव्यांनीं इंग्रज व निजामअल्ली यांच्या नेहमीं जरबेंत व त्यांच्या ताटाखालचें

१. ऐ. ले. सं. पान ५५५७.

कायमचें मांजर होऊन राहण्याची मागणी केली. याप्रमाणें बाजीरावांना शिंद्यांनीं व नानांनीं दोन दिव्यांच्या चिमट्यांत पकडलें. शनिवारवाड्यांत व सर्व पुणें शहरांत कडबा भरून ठेवल्यानंतर 'राखेच्या पुंजीवर राज्य करणार किंवा पेशव्यांच्या कारभारीपदावर पाणी सोडणार' असा सवाल मागें राघोबादादांना जसा नानांनीं टाकला होता, त्याचीच या वेळीं ही पुनरावृत्ति होती. त्या वेळीं राघोबादादांनीं जो निर्णय घेतला तोच निर्णय या वेळीं बाजीरावसाहेबांना घेणें प्राप्त होतें. नानांच्या या चिमटेखानी मसलतीनें बाजीरावांच्या काळजाला मरणप्राय चिमटा घेतला यांत संशय नाहीं.

३३. नाना नगरच्या किल्ल्यावर जरी कैदेंत होते तरी त्यांचें कपटकारस्थान मरडण्याचें पाताळयंत्र चालूच होतें. त्यांनीं नगरच्या किल्लेदाराला शिंदे व शिंदेबाया यांच्या कलहाचा फायदा घेऊन आपल्या लगामीं ठेविलें होतें. या बाबतींत करवीरकरांच्या लष्करांतून नारो हरी करंदीकर यांनीं मिरजेस तारीख ५ जुलै सन १७९८ चें लिहिलेलें पत्र पुढीलप्रमाणें आहे. "नाना फडनवीस नगरास आहेत. तेथील वर्तमान तर नानाकडील कागदपत्र मोंगलाकडे व भोंसले यांजकडे व इंग्रजांकडे व शिंद्यांकडे जाणेस परस्पर दिक्कत नाहीं. कागदपत्र जाणेची मोकळीक जाली आहे. शिंद्यांचें ह्मणणें कीं, पुण्यास (नानांनीं) यावें. त्यास नानांचा मानस 'किल्ला आपले स्वाधीन व्हावा. येथून आपण मसलत सांगूं त्याप्रमाणें तुह्मीं तेथें करीत असावें.' असें ह्मणणें; त्यासही शिंदे रुकार द्यावयास सिद्ध. परंतु किल्लेदार ह्मणतो कीं, घरकलह बायांचा व शिंदे यांचा तुटून धनीपणा ठरेल त्याचे आज्ञेनें वर्तणूक करूं. तोंपर्यंत उभयतांकडील आज्ञा वंदावयाची मानावयाची नाहीं. तूर्त नानांस स्वाधीन करीत नाहीं. दुसरें वर्तमान किल्लेदार नानांस शिंदे यांचे स्वाधीन करणार होते, परंतु किल्लेदाराकडून नानांनींच सदरहूप्रमाणें उत्तर करविलें. 'पुण्यास जावें तर बायांकडे जमाव व श्री॥ राजश्री अमृतरावसाहेब यांजवळ फौजेचा जय.

त्यापेक्षां जाऊन परिणाम कसा लागतो न कळे. भोंसले मोंगल यांजकडीलही फौज तूर्त (जवळ) नाहीं, त्याअर्थी किल्ला स्वाधीन जाल्यास इकडे राहून मसलत साधल्यास करून पाहूं.' याप्रमाणें वर्तमान आहे.[1] " हें पत्र करवीरकरांच्या लष्करांतून लिहिलें गेलें असल्यामुळें नगरच्या किल्ल्यांतून नानांचा करवीरकरांबरोबर पत्रव्यवहार चालू असून त्यांची राजकारणें नानांच्या मसलतीप्रमाणें चालत होतीं हें सिद्ध होतेंच. त्याप्रमाणें इंग्रज, निजामअल्ली, भोंसले व शिंदे यांच्याबरोबरही नानांचा पत्रव्यवहार सुरू होता. शिंदे व शिंदेबाया यांच्यामधील कलहाचा फायदा घेऊन नाना नगरचा किल्ला आपल्या स्वाधीन कसा करून घेणार होते हेंही या पत्रावरून स्पष्ट होतें. तसेंच नगरच्या किल्लेदाराला नानांनीं आपल्या कटांत कसें ओढून घेतलें होतें व नाना हे त्याचे 'बोलविते धनी' कसे बनले होते, हेंही उघड ठरतें. नानांचें हें जें कारस्थान इंग्रज व मोंगल यांचेबरोबर चाललें होतें, तें केवळ त्यांची मदत आपणाला मिळावी याच हेतूनें चाललें होतें ही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे. शिंद्यांनीं नानांना कारभारांतून काढून कैदेंत टाकलें म्हणून ते नानांचे दुष्मन बनले होते. बाजीराव या बाबतींत शिंद्यांना सामील झाले होते व त्यांनीं नानांच्या ताब्यांतील साताऱ्याचा किल्ला आपल्या ताब्यांत घेण्याकरतां परशुरामभाऊंची मुक्तता करून साताऱ्याच्या महाराजांबरोबर युद्धप्रसंग सुरू केला होता आणि नानांचें कारभारीपद काढून घेऊन तें अमृतराव यांना देऊन नानांच्या फडनविशीवरही ते मोरोबादादांना आणीत होते, म्हणून बाजीरावही नानांना विशेष दुष्मन असे झाले होते. शिंदे व बाजीराव या दोघांचें पारिपत्य करण्याकरतां इंग्रजांकडे व निजामअल्लीकडे मदतीचीही नानांची याचना होती. बाजीरावांनीं परशुरामभाऊंची मुक्तता करून त्यांना सातारकरांचें बंड-मोडण्याच्या कामगिरीवर पाठविल्यामुळें ते बाजीरावांच्या अधिकारमर्यादेंत आले होते. त्यामुळें बाजीरावांच्या पारिपत्याबरोबर नानांना परशुरामभाऊंचेंही पारिपत्य करणें प्राप्त होतें. शिवाय महाडच्या कारस्थानामुळें नानांचा व

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ४२९६.

भाऊंचा विशेष द्वेष माजला होता. त्यामुळें भाऊंचा सूड उगविण्याची नानांची बुद्धि जागृत होती. म्हणून नानांच्या पत्रव्यवहारावर परशुरामभाऊंची नजर होती. या बाबतींत नारो हरी करंदीकर यांचें करवीरकरांच्या लष्करांतून मिरजेस तारीख २२ जुलै सन १७९८ चें पत्र[१] आलें त्यांत ते लिहितात- "लेखकाचें (नाना फडनविस यांचें) वर्तमान व इंग्रजांकडील पत्रें (नानांस आलेलीं) सांपडल्याचें लिहिलें तें कळलें" या पत्रांतील मजकुरा-वरून नगरच्या किल्ल्यांतून इंग्रजांबरोबर खुद्द पेशवेपक्षाच्या विरुद्ध नानांच्या कशा कशा कारवाया चालल्या होत्या हें दिसून येईल.

२४. राघोबादादांनीं बारभाईचें बंड मोडण्याकरितां इंग्रजांची मदत पूर्वीं मागितली होती. ती मदत इंग्रजांनीं राघोबादादांना दिल्यामुळें व राघोबादादांनी ती घेतल्यामुळें त्यांच्यावर 'पेशवाईबुडवे' असा बऱ्याच इतिहासकारांनीं आपला शिक्कामोर्तब करून ठेवलेला आहे. उलटपक्षीं नाना फडनविस यांनीं मोठ्या शर्तीनें पेशव्यांचें राज्य राखिलें असें शिफारसपत्रही त्याच इतिहासकारांनीं नानांना दिलेलें आहे. राघोबादा-दांनीं बारभाईचें बंड मोडण्याकरतां जशी इंग्रजांची मदत घेतली तशीच नाना फडनविस यांनीं टिपूचें पारिपत्य करण्याकरतां घेतली होती. यावरून इंग्रजांची मदत घेणें हें खुद्द नानांच्या दृष्टीनें अयोग्य किंवा पाप नव्हतें. जसे प्रसंग येतील त्याला अनुसरून स्वकीय सरदारांची किंवा परकीय सरकारांची मदत घेणें हें व्यवहार्यच ठरतें. दुसऱ्याची मदत घेतल्यानंतर त्याच्या मदतीच्या प्रमाणावर त्याचा मोबदला त्याला देणें हेंही व्यवहार्यच आहे. यावरून राघोबादादांनीं इंग्रजांबरोबर सुरतेचा तह करून त्यांची मदत घेतली ही गोष्ट कोणत्याच प्रकारें अव्यवहार्य ठरूं शकत नाहीं. राघोबा-दादांनीं जशी परकीय इंग्रज सरकारची मदत घेतली तशीच नानांनींही त्यावेळीं परकीय निजाम सरकारची मदत, मागेल तो मुलुख त्याला देऊन घेतलेली होती. राघोबादादांनीं गृहकलह पेटवून पेशवाईचा नाश करण्याकरतां

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ४११४.

इंग्रजांची मदत घेतली ह्मणून ती अयोग्य होती, पण नानांनीं टिपूचा मोड करण्याकरतां इंग्रजांची जी मदत घेतली ती पेशवाईचें कल्याण करण्याकरतां असल्यामुळें ती योग्य होती असें कोणीही कबूल करील. परंतु नानांनीं महाडचें जें कारस्थान केलें तें टिपूप्रमाणें परकीय शत्रु—सरकारचा मोड करण्याकरतां नसून पेशवे सरकारच्या अंतर्गत कारभाराच्या घडामोडीकरतां होतें हें उघड आहे. राघोबादादांनीं पेशवे सरकारच्या अंतर्गत कारभाराच्या घडामोडीकरतां जशी इंग्रजांची मदत घेतली, तशीच नानांनीं त्याच कारणांकरितां आपल्या खुद्द महाडच्या कारस्थानाच्या बाबतींत इंग्रजांची मदत घेतली आहे. नानांनीं आपलें महाडचें कारस्थान यशस्वी करण्याकरतां "साम, दाम आणि दंड या त्रिविध उपायांची योजना एकाच वेळीं चालू केली. या उपायांपैकीं दंडाचें ह्मणजे शिंद्यांस भेडसावण्याचें कामच अत्यंत महत्वाचें होतें आणि तें काम इंग्रजांनीं नानांच्या तर्फेनें उत्कृष्टपणानें बजावून दाखविलें. नानांची सूचना जातांच त्यांना राहण्याकरतां इंग्रजांनीं साष्टीचा किल्ला आपला माल काढून मोकळा केला.'[1]" या हकीकतीवरून नाना फडनविस इंग्रजांबरोबर किती समरस होऊन मदत घेत होते हें दिसून येतें. ही इंग्रजांकडून नानांनीं घेतलेली मदत पेशवाईच्या प्रत्यक्ष गादीवर विराजमान असलेल्या चिमाजी माधवराव पेशवे यांच्या विरुद्ध होती. एकंदरींत राघोबादादांना दूषण देतांना अगर नानांची शिफारस करतांना इतिहासकारांनीं खरा इतिहास गुंडाळून बाजूस टाकिला होता असेंच मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें.

३५. या वेळीं पेशवाईच्या गादीवर बाजीराव होते. नानांनींच महाडचें कारस्थान रचून बाजीरावांना गादीवर बसविलें होतें. पेशवाईच्या धनीपणाची देवकळा नानांनींच बाजीरावांच्या ठिकाणीं उत्पन्न केली होती. दगडाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून त्याच्या ठिकाणीं देवत्व निर्माण केलेल्या पुजाऱ्यानें

---

१. नाना फडनविसांचें चरित्र पान १७९.

काहीं दिवसांनीं त्या मूर्तीची इतर दगडाप्रमाणें जर वासलात लावण्याचा प्रयत्न केला, तर त्या पुजाऱ्याचें तें कृत्य जसें धर्मबाह्य व निंद्यपणाचें ठरतें, तसेंच एकदां धनीपणा दिल्यानंतर सेवकानें जर आपल्या धन्याचा धनीपणा आपल्या पायांखालीं तुडविण्याचा प्रयत्न केला, तर तेंही सेवकाचें कृत्य धर्मबाह्य व निंद्यपणाचें ठरेल यांत संशय नाहीं. नाना हे पेशवाईचे सेवक होते. बाजीराव हे पेशवाईचे धनी झाले होते. बाजीराव व नाना यांच्यामध्यें सेव्यसेवक धर्माचे पवित्र संबंध हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें वडून आलेले होते. असें असतां सेवक नानांनीं आपल्या अधिकाराचें धर्मबाह्य अतिक्रमण करून आपल्या धन्याला चिमटेखानी कारस्थानांत पकडून आपली प्रार्थना करून घेण्याचा त्यांच्यावर प्रसंग आणला हें नानांचें कृत्य उघड उघड धर्मबाह्य व निंद्यपणाचें आहे यांत तिळमात्र शंका नाहीं. देवाकडून पायां पडून घेणारा पुजारी मानवधर्माचा नसतो, तो खात्रीनें दानवच असतो. नानांनीं या प्रसंगीं आपल्या धन्यावर स्वतःची प्रार्थना करून घेण्याचा प्रसंग आणला, एवढेंच नव्हे तर त्यापुढेंही त्यांनीं फार मोठी मजल मारली होती. पेशवाईच्या धन्यानें—बाजीरावानें इंग्रजांना व निजामाला शरण जाऊन व त्यांची हरप्रयत्नानें मर्जी संपादन करून घेऊन, ते उभयतां त्यांना नानांकरतां हमीदार—जामीनदार होतील, अशा कामगिरीची जबाबदारी नानांनीं बाजीरावांवर ढादली होती. नानांनीं पेशवाईचा कारभार स्वीकारण्याकरतां बाजीरावांना घातलेल्या या अटीवरून नानांच्या स्वभावांतील धर्म कसा होता हें दिसून येतें. पेशवाईच्या धन्यानें परकीय सरकारांना आपणाला हमीदार व्हा म्हणून शरण जाणें म्हणजे आपल्या स्वतः बरोबर आजपर्यंतचा पेशवाईचा नांवलौकिक व पेशवाईची इभ्रत वेशीवर उलटी टांगावयास लावण्यासारखें होतें, हें समजण्याइतके नाना शहाणे असतां त्यांनीं ज्याअर्थीं ही अट बाजीराव यांना घातली, त्याअर्थीं स्वतःच्या स्वार्थापुढें नानांना पेशवाईच्या इभ्रतीची किंवा बाजीरावांच्या दर्जाची पर्वा वाटत नव्हती हें सिद्ध होतें. यावरून नाना स्वतःच्या स्वार्थाकरतां व

स्वतःच्या एकमुखी सर्वाधिकाराकरतां कसे आंधळे बनले होते हें आतां निराळें सांगणेची जरूरी नाहीं.

३६. इंग्रज व निजाम यांची हमी देण्याची नानांनीं घातलेली अट बाजीराव यांच्या इभ्रतीस बट्टा आणणारी असल्यामुळें ती घडून येणें अगदीं अशक्य होतें. बाजीराव झाले तरी ते राघोबादादासारख्या सिंहाचे छावे होते. त्यांना नानांची ही मानभंगाची अट मान्य झाली नाहीं. नानांना आपला शब्द ह्मणजे ब्रम्हवाक्य वाटत होतें. बाजीराव आपल्या शब्दाला मान देत नाहींत असें पाहून त्यांच्यावर मारेकरी घालून त्यांना मारून टाकावें असा नानांनीं कट निर्माण केला. "श्रीमंत बाजीराव यांजवर मारेकरी येऊन दगा करावा तेव्हां त्या मारेकरी यास धरिला. तो नानांनीं पाठविला असें ह्मणतो." [१] "कोथरूडचे बागेंत (श्रीमंतांची) स्वारी जात असतां मारेकरी सांपडले असें वर्तमान दोहों चोहोंकडून आलें. तेथें आपल्याकडे आलें असेल तें ल्याहावें." [२] या पत्रांवरून आपला शब्द बाजीराव यांनीं न ऐकिल्यामुळें नाना त्यांचा वध करण्याच्या प्रयत्नांत होते, हें सिद्ध होतें. नानांना एकमुखी पेशवाईचा सर्वाधिकार पाहिजे होता व त्याच्या आड येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला ते देहांत शासनाची शिक्षा देण्याचा प्रयत्न करीत होते. 'मी सांगतों त्याप्रमाणें वाग नाहीं तर मरणाला सिद्ध हो" हाच नानांचा नीतिधर्म होता.

३७. पेशवाईच्या कारभारावर यथापूर्व नानांची स्थापना केल्यानंतर शिंद्यांना पंधरा लक्ष रुपये नानांकडून मिळणार होते. शिंदे पैशाच्या पेंचांत असल्यामुळें हे पंधरा लक्ष रुपये जितक्या लवकर त्यांच्या पदरांत पडतील तितकें त्यांना पाहिजे होतें. त्याकरितां बाजीरावांच्या मागें त्यांनीं नानांकडे यथापूर्व कारभार सोंपविण्याकरतां शिंद्यांचा सारखा तगादा सुरू होता. या वेळीं नाना व शिंदे एक झाल्यामुळें बाजीराव सर्वस्वी

---

१ शिवभादादा बक्षी यांचें चरित्र ले. नं. २६२. २ ऐ. ले. सं. पत्र नं. ४३९४.

निराधार झाले. शिंद्यांनीं आपल्या लष्करांतून नानांची मुक्तता केली व ते सप्टेंबर महिन्यांत आपल्या पेठेंतील वानवळयांच्या वाड्यांत येऊन राहिले. पेशव्यांच्या राज्याच्या बंदोबस्ताची जोखीम आपण नानांकडे सोंपवून हिंदुस्थानांत जाणार असा शिंद्यांनीं बाजीरावांकडे आग्रह धरिला तेव्हां आतां नानांना शरण गेल्याशिवाय आपला तरणोपाय नाहीं असें बाजीरावांना वाटलें. नाना बाजीरावांची भेटही घेत नव्हते व त्यांची कोणतीही विनंति ते झिडकारीत होते. असा प्रकार चालला असतां "नोव्हेंबर महिन्याच्या चौदाव्या तारखेस आवशीच्या अकरा घटका रात्रीस बरोबर फक्त एक शिपाई घेऊन बाजीरावसाहेब अकस्मात् वान-वळयाच्या वाड्यांत गुप्तपणें नानांच्या भेटीस गेले, आणि त्यांचे घट्ट पाय धरून व डोळयांत आंसवें आणून राज्य संभाळण्याविषयीं त्यांनीं त्यांची प्रार्थना केली." [१] बाजीरावांनीं आपल्या प्राणासहित पेशव्यांचें राज्य नानांच्या पायांवर अर्पण केल्यामुळें नानांनीं बाजीराव यांस जीवदान दिलें. या वेळेपासून नाना पुन्हां यथापूर्व ह्मणजे पेशवाईचे सर्वाधिकारी बनले. नानांच्या तडाक्यांतून पेशव्यांचें राज्य जिवंत राहण्याकरतां राघो-बादादांप्रमाणें बाजीरावांनींही अधिकारसंन्यास घेतला व नानांच्या कृपा-छत्राखालील कडक बंदिवासाचा मासला ते अनभवूं लागले. पेशव्यांचें राज्य रक्षण करण्याकरितां बाजीरावांनीं हें एक दिव्य केलें यांत शंका नाहीं. नानांनीं बाजीराव यांच्यावर मारेकरी घातले होते व ते आपला वध करण्याच्या प्रयत्नांत आहेत असें बाजीराव यांस माहीत असूनही रात्रीचे वेषांतर करून केवळ एक शिपाई बरोबर घेऊन नानांच्या राहत्या जागीं—त्यांच्या स्वज्ञातीय दुष्मनाच्या दाढेंत—प्रत्यक्ष मृत्यूच्या घरीं—जीवावर उदार होऊन ते गेले व त्यांच्या स्वाधीन पेशव्यांच्या राज्याचे सर्व अधिकार त्यांनीं दिले, यावरून त्यांच्या अलोट त्यागाची व स्वराज्य रक्ष-णाच्या अमर्याद कळकळीची पूर्ण कल्पना येईल. पेशव्यांच्या राज्य-

---

१ ऐ. ले. सं. पान ५५५९.

कारभारांतील कागदपत्रांवर बाजीरावांच्या सह्या घेण्याकरतां नानांनीं आपले प्रिय दोस्त नारोपंत चक्रदेव यांची योजना केली. त्यांनीं श्रीमंताजवळ राहून राज्यकारभाराचीं कामें सांभाळावीं, आणि त्यांत नेहमीं नानांचा सल्ला घेऊन त्याप्रमाणें वागत असावें असा करार करून घेतला. पुढें कांहीं दिवसांनीं फडणिशीची तेरीखसुद्धां आमच्या वतीनें तुह्मीच घालीत जा असें नानांनीं चक्रदेव यांस सांगितलें. या योजनेमुळें बंदिवान बाजीराव यांची भेट घेऊन त्यांना व्यावहारिक नमस्कारसुद्धां करण्याचा प्रसंग येऊं नये अशी नानांनीं खबरदारी घेतली होती. नानांनीं आपल्या फडणिशीची तेरीख घालण्याचा अधिकार चक्रदेव यांना देऊन आपण स्वतः पेशवाईचे कुलअखत्यार ह्मणजे धनीच बनले, हें आतां निराळें सांगणेची जरूरी राहिली नाहीं.

प्रकरण ३९ वें.

नानांनीं घेतलेला परशुरामभाऊंचा शेवटचा बळी.

इ. स. १७९७-१७९९.

१. नाना पेशवेसरकारचे कुलअखत्यार होतात. पेशव्यांच्या गादीवरील पुरुष आपल्या ताब्यांत व हुकमतींत ठेऊन पेशवाईचा कारभार चालविण्याची नानांच्या राज्यकारभाराची पद्धति, बाजीराव नानांच्या ताब्यांत आल्यामुळें यशस्वी होते. पेशवाईच्या कुलअखत्यारीचा सौदा नानांनीं शिंद्यांकडून स्वस्तांत आपल्या पदरांत पाडून घेतला.—२ बाजीरावांस नानांनीं शनिवारवाड्यात नजरकैदेंत ठेवल्यानंतर अमृतराव व चिमाजीआप्पा यांसही तेथेंच स्थानबद्ध करून ठेवलें. या संबंधींची नानांची नागमोडी कारस्थानपद्धति. बाजीरावांच्या पक्षांतील लोकांना गुन्हेगार ठरवून त्यांस डोंगरी किल्ल्यावर डांबून टाकण्याकरितां नानांनीं सुरूं केलेली नवीन चक्रवती—सर्वगामी—पद्धत व तिचे मासले.—३ नानांच्या चक्रवती पद्धतीची सहज कल्पना देणाऱ्या गोष्टी व त्यांतून त्यांनीं गारुड्याप्रमाणें करून घेतलेले आपले फायदे.—४ नानांच्या डोळयाला या वेळीं परशुरामभाऊ हे एकटेच शत्रू राहिल्याप्रमाणें दिसत होते. त्यांच्या नाशाकरितां नवीन बेगडी पिंजरा तयार करण्याची नानांची कल्पना.—५ परशुरामभाऊंच्या नाशाच्या मनसुब्यांत नानांनीं धारण केलेली द्विरंगी पद्धत. इतिहासाची संगत समजण्यासाठीं त्यावेळच्या परिस्थितीचें दिग्दर्शन—६ नाना परशुरामभाऊंबरोबर समेट करून घेण्याकरितां कशी साखर पेरीत होते याचा मासला.—७ परशुरामभाऊंचे हात कलम करून घेण्याकरितां नानांनीं तयार करून पाठविलेल्या मसुद्यांबरहुकूम भाऊंचीं दोन पत्रें.—८ नानांनीं मसुदा करून पाठविलेल्या सदर दोन पत्रांतील मजकुराचा स्पष्टार्थ व गूढार्थ.—९ परशुरामभाऊंबद्दलचा द्वेष मनांत कायम ठेऊन, व लौकिकांत त्यांचा स्नेह संपादन केल्याचा डांगोरा पिटवून आणि त्यांची पैशाची मागणी लाथाडून देऊन, त्यांच्या तोंडाला मधाचीं पानें पुसल्याचा मासला दाखविणाऱ्या पत्राचा गोषवारा व स्पष्टीकरण—१० "आई जेऊं घालीना व बाप भीक मागूं देईना" अशी परशुरामभाऊंची नानांनीं स्थिति चालविली.—११ भाऊंना वरून गोंजारल्याप्रमाणें करून आपल्याविषयीं भाऊंच्या मनांत

नाना विश्वास उत्पन्न करतात व त्यांच्या गळयाला फांस कसा लावतां येईल याची विवंचना नाना सुरूं करतात.—१२ भाऊंच्या दोडवाड मुक्कामापर्यंतच्या हालचाली.—१३ परशुरामभाऊंच्या वधाकरितां नानांनीं चातुर्द्वारी चक्रव्यूहाची नवीन योजना कशी केली.—१४ नानांनीं करवीरकरांना परशुरामभाऊंचे नवीन व जवळचे शत्रू महाडच्या कारस्थानापासून कसे उत्पन्न करून ठेविले होते, याची हकीगत. परशुरामभाऊंच्या वधाच्या कामगिरीवर नानांनीं केलेली करवीरकरांची योजना —१५ कांट्यानें कांटा काढावयाचा किंवा पाहुण्याकडून साप मारावयाचा नानांचा नीतिधर्म, पेशाच्या मूळ तत्वावर ते कसा खेळवीत होते याची मीमांसा.—१६ परशुरामभाऊ हे नानांच्या स्वार्थाआड कसे आले होते याची हकीकत. करवीरकरांना भाऊंविरुद्ध नाना कशी मदत करीत होते याचा एक मासला.—१७ परशुरामभाऊ पटवर्धन व करवीरकर यांचेमधील समेटाबद्दल बाजीरावांची खटपट. करवीरकर व पेशवे यांच्यांतील नवीन तह. त्या तहाच्या माहितीचें धोंडो बापूजी जोशी यांचें पत्र. सदर तह 'फोडा व झोडा' या आपल्या तत्वाला अनुसरून नाना हाणून पाडतात.—१८ करवीरकरांना नानांनीं दिलेल्या जालीम मात्रेचे वळसे.—१९ भाऊंच्या वधाकरतां महाडच्या कारस्थानाची पुनरावृत्ति नाना पुण्यास सुरूं करतात.—२० हिंदुस्थानचे गव्हर्नरजनरल मार्क्किस वेलस्ली हे इंग्रजांचे परकीय सत्तांच्या बाबतींत पूर्वी असलेले ढवळाढवळ न करण्याचें धोरण बदलतात. इंग्लंड व फ्रान्स यांच्यामधील युरोपांतील युद्धामुळें इंग्रज व टिपू यांचें युद्ध जुंपण्याची परिस्थिति प्राप्त होते. शिंद्यांच्या कैदेंतून मुक्त होण्याकरितां व पेशवाईचा कारभार वहिमुखत्यारीनें हातीं येण्याकरितां नानांनीं घेतलेली इंग्रजांची मदत, व त्यामुळें नानांचें व इंग्रजांचें सख्य.—२१ पेशवाईचें रक्षण करण्याकरितां इंग्रजांची मदत न घेतां नानांना शरण जाऊन त्यांच्या हातीं पेशवाईचीं सर्व सूत्रें बाजीरावांनीं दिलीं; यांतील बाजीरावांचा उदात्त हेतू कोणता होता.—२२ राज्यसत्ता उलथून पाडण्याचे प्रवर्तक नाना कसे होते, यासंबंधींचा इतिहास.—२३ नानांच्या राजशाहीविध्वंसक तत्वाचा प्रतिध्वनि फ्रान्समध्यें कसा उमटला याची हकीकत, पण फ्रान्समधील राजसत्तेचा विध्वंस लोकशाहीच्या तत्वासाठीं होता तर नानांचा राजसत्ताविध्वंस केवळ स्वार्थी नानाशाहीसाठींच होता.—२४ बाजीरावांस तोंडघशी पाडून आपण मात्र इंग्रजांबरोबर चांगले आहोंत असें दाखविणारा नानांचा मनसुबा—२५

फ्रेंचांचें पाठबळ असलेल्या टिपूचें पारिपत्य करण्याची मसलत इंग्रज करतात. त्या बाबतींत निजाम व पेशवे यांच्या मदतीची इंग्रजांना जरूरी वाटते. त्या करितां निजाम व पेशवे यांच्याबरोबर करावयाच्या नवीन तहनाम्याच्या इंग्रजांच्या राजकारणी अटी. शिंद्यांस देशीं परत जाण्यास भाग पाडणारी इंग्रजांची एक योजना —२६ टिपूवरील इंग्रजांच्या स्वारींत पेशवे समश्रमविभागी होत आहेत हे दाखविणारे नानांचे नाटकी प्रयोग.—२७ परशुरामभाऊंच्या नाशासाठीं आपल्या कपटकारस्थानाचें जाळें नाना कसें विणीत होते याची हकीकत. —२८ टिपूच्या स्वारीकरितां पेशवेसरकार इंग्रजांना जंगी मदत करणार आहेत असें दाखवून आंतून टिपूकडून नाना इंग्रजांना मदत न करण्याबद्दल लांच खातात व इंग्रज पूर्णपणें तोंडघशी पडतील अशी कारवाई सुरू करतात.—२९ इंग्रजांच्या टिपूवरील स्वारीचा निकाल लागेपर्यंत शिंद्यांनीं हिंदुस्थानांत जाऊं नये अशी नानांची मसलत.—३० परशुरामभाऊंना जास्त संकटांत घालण्यासाठीं नानांनीं मशीरउल्-मुल्क याचा काळभैरवी सोटा त्यांच्यामागें लाविला. मशीर नानांच्या वराती घेऊन भाऊंच्या मुलुखावर चालून जातो.—३१ नानांनीं परशुरामभाऊंचें वैर साधण्याकरितां कर्जवसुलीचा मशीराचा काळभैरवी सोटा त्यांच्या मागें कसा लाविला होता हें स्पष्ट करणारीं दोन पत्रें.—३२ नानांचे भुलभुलय्याचे राजकारणी खेळ.—३३ इंग्रजांना फसविण्याकरितां शिंद्यांच्या बाबतींतील नानांचे नाटकी प्रयोग.—३४ इंग्रज व टिपू यांचे बाबतींत नानांनी दुटप्पी वर्तन कसें ठेविलें होतें हें दाखविणाऱ्या नानांच्या कारवाया. या कारवायामुळें बाळोबातात्यांची नाना शिंद्यांकडून मुक्तता करवितात.—३५ शिंदेबायांच्या पठाण फौजेकडून नाशिक क्षेत्रस्थ लोकांवर ओढवलेला भयंकर प्रसंग. पेशवाईचे खरे अधिकारी नाना पण दोषाचे अधिकारी बाजीराव हें दाखविणारें एक पत्र. —३६ शिंदेबाया करवीरकरांस जाऊन मिळतात त्या संबंधींची हकीकत.—३७ परशुरामभाऊंचा विश्वासघातानें कसा नाश करावा या बाबतींत नानांनीं चालविलेली तयारी.—३८ भाऊंच्या नाशासाठीं नानांनीं योजलेले हुकमी डाव.—३९ परशुरामभाऊंचा नाश करण्याकरितां नानांनीं कसा चक्रव्यूह रचला होता याची कल्पना.—४० इंग्रज व निजाम यांचेकडून टिपूचा पराभव होतो व तो मारला जातो. नानांच्या आज्ञेनुसार धोंडोपंत गोखले टिपूच्या मुलखांत लूटमार करतात.

—४१ धोंडजी वाघाची टिपूच्या राज्यांत बंडाळी. इंग्रज त्याची बंडाळी मोडून त्यास मराठी मुलखांत हांकून लावितात. धोंडोपंत गोखले यांनीं त्याचा पराभव केल्यामुळें तो करवीरकरांच्या आश्रयास येतो. धोंडजी वाघ व चतुरसिंग हे करवीरकरांस येऊन मिळाल्यामुळें त्यांचा पक्ष परशुरामभाऊपेक्षां बळकट होतो. —४२ बाळोबातात्या शिंदेबायांची समजूत काढतात. शिंदेबाया करवीरकरांस सोडून जांबगांवाकडे जाण्यास निघतात-४३ बाळासाहेब व चिंतामणराव या मिरज-कर पटवर्धन घराण्यापैकीं चुलते-पुतण्यांचा वांटणीसंबंधीं तंटा. परशुरामभाऊंची त्या बाबतींतील मध्यस्थी.—४४ परशुरामभाऊंबद्दल मिरजकर पटवर्धनांमध्यें विकल्प उत्पन्न होतो.—४५ पटवर्धन घराण्यांत परशुरामभाऊ व बाळासाहेब मिरजकर यांच्यामध्यें विकल्प उत्पन्न करणारे नाना हेच कलिपुरुष होते. यासंबंधींच्या पत्राचा उतारा.—४६ बाळोबातात्यांस बगलेंत मारण्याची नानांची अजब युक्ति.—४७ शिंदे, शिंदेबाया, बाळोबातात्या शेणवी मंडळी वगैरे आणि पेशवे व नाना हे सर्व एकचित्त होतात. नानांच्या विचारें सर्वांनीं चालावें असें ठरतें. —४८ परशुरामभाऊंचा वध करण्याकरितां नानांच्या पाताळयंत्री कळसूत्री चक्रव्यूहाची कल्पना.-४९ पट्टणकुडीच्या लढाईचे नाना हे एकटेच कसे सूत्रधार होते याची हकीकत.—५० परशुरामभाऊ निर्धास्तपणें नानांवर विश्वास टाकून कां बसले होते याचीं कारणें.—५१ परशुरामभाऊंचा वध करण्याकरितां नानांचे विश्वासघाताचें शस्त्र.—५२ परशुरामभाऊंबरोबर संग्राम करण्याकरितां करवीरचे महाराज पट्टणकुडीवर चाल करून येतात.—५३ शत्रु छातीवर येऊन लढण्या-करितां उभा राहिला असतां परशुरामभाऊ निर्धास्त कां होते याचें कारण.—५४ पट्टणकुडीची लढाई. परशुरामभाऊंचा वध.—५५ परशुरामभाऊंचा वध हा नानांच्या बुद्धिकौशल्याचा शेवटचा विजय.—५६ करवीरचे महाराज परशुराम-भाऊंची समाधी हमीदवाडा येथें बांधतात.—५७ परशुरामभाऊंचा स्वभाव व पराक्रम.—५८ भाऊंची भूतदया.—५९ आपल्या परिजनांविषयीं भाऊंची आस्था व प्रेम.—६० भाऊंचें एकपत्नीव्रत.—६१ भाऊंचा निष्कपटी स्वभाव.—६२ भाऊंचें सेनानायकत्व.—६३ भाऊंचीं धर्मकृत्यें.—६४ महा-डच्या कारस्थानाशीं भाऊंच्या वधाच्या कारस्थानाचें तुलनात्मक विवेचन.

१. मागील प्रकरणीं दर्शविल्याप्रमाणें नाममात्र पेशवाईचे धनी बाजीराव बनले व नाना फडनविस पुन्हां पेशवाईच्या कुलअखत्यारीचे अधिकारी झाले. महाडचें कारस्थान करून व बाजीरावांकडून त्या वेळीं निरनिराळे करार-मदार करवून घेऊन नाना जरी पेशवाईच कुलअखत्यार बनले होते, तरी त्या वेळचा नानांचा अधिकार आणि या वेळीं त्यांनीं प्राप्त करून घेतलेला अधिकार यांत बराच फरक होता. सध्यांच्या नानांच्या अधिकाराची आवृत्ति विशेष कसोशीनें सुधारून घेतलेली होती. त्या वेळीं करार-मदारानें बाजीराव जरी नानांना बांधले गेले होते, तरी त्यांचा देह नानांच्या ताब्यांत आलेला नव्हता. त्या वेळीं बाजीरावांचा देह शिंद्यांच्या स्वाधीन असल्यामुळें शिंद्यांना नानांविरुद्ध बऱ्याच भानगडी उत्पन्न करतां आल्या व त्याची मजल नानांना प्रत्यक्ष कैद करण्यापर्यंत गेली. या वेळीं नानांनीं आपल्या पैशाच्या बळावर ही पूर्वींची चूक सुधारून घेतली व आपल्या यथापूर्व कारभाराबरोबर बाजीरावांचाही कबजा त्यांनीं मिळविला. यामुळें नानांनीं आपल्या पूर्व राज्यकारभाराच्या पद्धतीप्रमाणें या वेळीं हा आपला हुकमी डाव जिंकला. हा डाव जिंकण्याकरतां नानांना स्वतःच्या खजिन्यांतून लाख पंचेवीस लक्ष रुपये शिंद्यांना देऊन पेशवाईच्या कुलअधिकाराच्या व्यापारांत चालू भांडवल ह्मणून गुंतवावें लागलें ही मात्र गोष्ट खरी आहे. गादीवरील पेशव्यांना आपल्या कैदेंत ठेऊन, पेशवाईच्या कुलअखत्यारीचा व्यापार नानांनीं पूर्वी बरींच वर्षे केला असल्यामुळें, त्यांतलि भरमसाट नफेबाजीचा अनुभव त्यांना पूर्णपणें आलेला होता. या अनुभवानें प्राप्त झालेल्या विश्वासावरच नाना शिंद्यांना पहिल्यानें दीड कोट रुपये देण्यास तयार झाले होते. परंतु त्या वेळीं बाजीराव नानांच्या ताब्यांत जाण्यास व शिंदे त्यांस नानांच्या ताब्यांत देण्यास तयार नसल्यामुळें त्या वेळेचा नानांचा तो सौदा बिघडला होता. नानांना पक्कें माहीत होतें कीं, हा सौदा आपल्याशिवाय दुसरा कोणताही लक्ष्मीपुत्र करूं शकणार नाहीं व कोणी केला तर त्याला तो

फार दिवस निभावून नेतां येणार नाहीं. या वेळीं अंतस्थ गृह-कलहामुळें शिंद्यांची आर्थिक स्थिति जवळ जवळ दिवाळखोरीची बनली होती. शिवाय अमृतरावांनीं शिंदेबायांना आश्रय दिल्यामुळें बाजीराव आपल्याविरुद्ध त्यांच्या पक्षाला सामील झाले आहेत असा शिंद्यांना संशय येऊन त्यांच्या संरक्षणाची आपल्यावरील नैतिक जबाबदारीही कमी झाल्याप्रमाणें त्यांना वाटत होतें. या दोन कारणांकरतां पेशवाईच्या कुलअखत्यारीचा सौदा ताबडतोब घडवून आणणें शिंद्यांना प्राप्त झालें व तो सौदा दीड कोटीवरून उतरतां उतरतां पंचवीस लक्ष रुपयांवर पूर्ण मंदीच्या स्थितींत शिंद्यांना नानांच्या गळ्यांत बांधावा लागला. यावरून हा सौदा या वेळीं नानांना किती स्वस्तांत पडला हें दिसून येईल.

२. नानांनीं याप्रमाणें बाजीराव यांचा बंदोबस्त करून त्यांना आपल्या मगरमिठींत आवळून टाकल्यानंतर, त्यांना मागें कोणाचें पाठबळ राहूं नये असा प्रयत्न त्यांनीं सुरू केला. नाना शिंद्यांच्या कैदेंत पडल्यानंतर अमृतराव यांना बरेंच महत्व प्राप्त झालें होतें. नानांचा कारभारीपणाचा अधिकार त्यांच्याकडेच गेला होता. आतां तो अधिकार यथापूर्व आपल्याकडे आल्यानंतर अमृतराव कांहीं तरी गडबड करतील म्हणून त्यांचाही बंदोबस्त करणें नानांना प्राप्त झालें. या वेळीं शनिवारवाड्यांत गणेशचतुर्थीचा उत्सव सुरू होता. या उत्सवाकरतां अमृतराव आपल्या छावणींतून शनिवारवाड्यांत राहण्याकरतां आले होते. ही संधि साधून नानांनीं त्यांस तेथेंच अडकवून ठेवण्याचा घाट घातला. अमृतरावास शिंदेबायांच्या कटांतून फोडणें शिंद्यांना इष्ट होतें; म्हणून नानांनीं शिंद्यांकडून बाजीरावास अमृतरावांना शिंदेबायांकडे न जाऊं देण्याबद्दल निकड लाविली. या बाबतींत नाना व शिंदे एक झाल्यामुळें व बाजीराव हे त्यांच्या हातचें खेळणें झाले असल्यामुळें बाजीरावांकडून अमृतरावांवर सक्तीच्या खुषीचा अंमल करविण्यांत आला. बाजीरावांनीं अमृतराव यांची समजूत काढण्याकरतां नाना व शिंदे यांच्या प्रेरणेनुसार सात लक्षांची जहागीर निराळी त्यांना तोडून देण्याचें आश्वासन देऊन

त्यांस आपल्याजवळ शनिवार-वाड्यांत ठेऊन घेतलें. थोडें स्पष्ट शब्दांत लिहावयाचें ह्मणजे नानांनीं अमृतरावांसही बाजीरावांप्रमाणें बंदिवासाच्या चिमट्यांत अशा नागमोडी कारस्थानपद्धतीनें पकडून ठेविलें. चिमाजीही बाजीराव यांच्या जवळच असल्यामुळें तिन्ही पेशवे नानांच्या पिंजऱ्यांत या वेळीं अडकले गेले व त्यामुळें नाना एका बाजूनें पूर्ण निर्धास्त झाले. नानांनीं पेशव्यांची ही शिकार केल्यानंतर थोड्याच दिवसांनीं ह्मणजे तारीख १४ जानेवारी सन १७९९ रोजीं बाजीराव यांचे मुख्य दोन कारभारी गोविंदराव काळे व शिवराम नारायण थत्ते या संभावित गृहस्थांस विश्राम बागेंत कैद केलें.' नानांनीं आपल्या नागमोडी कपट-कारस्थानपद्धतीनें बाजीराव यांचेकडून या दोघांस कैद करविल्या-प्रमाणें लौकिकांत दाखविलें. त्यांच्यावर जो गुन्हा लादण्यांत आला त्या संबंधीं लौकिकांत निरनिराळे तर्क वितर्क फैलावले जातील अशी त्या गुन्ह्यांची सर्वगामी चक्रवती पद्धत नानांनीं अमलांत आणली होती. (१) "राजश्री दौलतराव शिंदे यांचें त्यांचे मातुश्रीसीं कटाक्ष वाढविलें, हरएक तऱ्हेनें त्यांचे मिळों दिलें नाहीं, त्यांत हे उभयतां होते" [२] असा एक त्यांच्यावर गुन्हा केल्याचा आरोप दाखविण्यांत आलेला आहे. (२) "अमृतराव यांच्या प्रेरणेवरून गोविंदराव काळे व शिवराम नारायण थत्ते हे एके दिवशीं दौलतराव शिंद्यांस एकांतीं गांठून बोलले कीं, नाना फडनविस व नारोपंत चक्रदेव यांस तुह्मी कैद करावें. त्या कामगिरी-बद्दल आह्मी तुम्हांस चाळीस लक्ष रुपये देऊं." [३] असा एक दुसऱ्या प्रकारचा गुन्हा केल्याचा आरोप दाखविण्यांत आला. असे परस्परांशीं संबंध नसलेले दोन आरोप काळे व थत्ते यांना कैद करण्याकरतां लौकिकांत प्रकट झाले. ज्यांना जो आरोप रुचेल व आवडेल त्यांनीं तो ग्राह्य मानावा, अशी जोडगोळी त्यांच्या गुन्ह्यांत निर्माण करण्यांत

---

१ ऐ. ले. सं. पान. ५७६०. २ ऐ. ले. सं पत्र नं. ४६३५.
३ ऐ. ले. सं. पान ५५८१.

आली होती. या वेळीं शिंदे व नाना एकचित्त झाले असल्यामुळें शिंद्यांच्या पक्षांतील लोकांना काळे व थत्ते गुन्हेगार दिसावे याकरितां पहिला गुन्हा प्रकट करण्यांत आला व नानांच्या पक्षांतील लोकांना ते गुन्हेगार दिसावे ह्मणून दुसरा आरोप दाखविण्यांत आला. सर्वसाधारण लोकांना ते गुन्हेगार दिसावे ह्मणून ज्याच्या त्याच्या अभिरुचीप्रमाणें पटतील असे हे दोन प्रकारचे गुन्हे लौकिकांत प्रकट करण्यांत आले. काळे व थत्ते यांस कैद करण्याच्या नाटकाची येवढ्यावरच परिसमाप्ति झालेली नाहीं. त्यांच्यावर लादल्या जाणाऱ्या गुन्ह्यांत प्रत्यक्ष बाजीराव यांनासुद्धां ओढण्यांत आलेलें आहे. नाना कारभार करूं लागल्यानंतर एके दिवशीं शिंद्यांकडून यशवंतराव घोरपडे नानांकडे आले व त्यांना त्यांनीं सांगितलें कीं, [१] "हल्लीं तुह्मांस बंदींत घालावयाविषयीं बाजीराव पुनः शिंद्यांकडे आग्रहाचे निरोप पाठवितो." नानांनीं याची चौकशी प्रत्यक्ष बाजीराव यांचेकडे केली. त्या वेळीं बाजीराव यांनीं नानांस सांगितलें कीं, "यांतील कांहीं एक मला ठाऊक नाहीं, आणि मजपासून कदापि असें घडावयाचें नाहीं. असें असतां ज्यानें तुह्मांस माझें नांव सांगितलें असेल तो मला दाखवा." हें वर्तमान शिंद्यांस कळतांच त्यांनीं बाजीरावांचे मुख्य कारभारी गोविंदराव काळे व शिवराम नारायण थत्ते या उभयतांस धरून कैद केलें. कां कीं, बाजीरावानें आपल्यावरला शब्द उडविला तो त्यांवर आला. त्यायोगें ते बंदींत पडून त्यांचें सर्वस्व गेलें. तथापि त्यांनीं बाजीरावाचें नांव सांगितलें नाहीं. हा एक मराठे लोकांचा जातिस्वभावच आहे कीं, कसेंही संकट प्राप्त झालें तरी तें सहन करून आपल्या स्वामीवर शब्द येऊं देऊं नये. तें बाजीरावाचें कृत्य त्या दोघां कारभाऱ्यांनीं आपणावर घेतलें. ही हकीकत डफसाहेबांनीं आपल्या इतिहासांत दिली आहे. काळे यांस कैद करून त्यांना सिंहगडावर व थत्ते यांस कोंकणांत कर्नाळ्याच्या किल्ल्यावर बंदींत ठेवण्यांत आलें.

---

१ डफकृत मराठ्यांची बखर पान ३२७.

३. काळे व थत्ते यांस कैद केल्याची वरीलप्रमाणें एकत्रित हकीकत वाचली म्हणजे नानांच्या चक्रवर्ती मनसुब्याची सहज कल्पना येते. नानांचें प्रसिद्धीखातें जसें लोकांना भ्रम-विभ्रमांत पाडणारें होतें, तसेंच तें नानांना अनिष्ट वाटणाऱ्या कोणत्याही लहान थोर व्यक्तीला चक्रांत आणणारेंही होतें. बाजीरावांचे शेप ख तोडण्याकरतां काळे व थत्ते यांना नानांचे मनांत कैद करावयाचें होतें व त्यांच्या त्या इष्ट हेतूबरोबर त्यांना इतर पुष्कळ गोष्टी साधावयाच्या होत्या. त्या साधण्याकरतां नानांनीं ही चक्रवर्ती पद्धत निर्माण केली. या पद्धतीमुळें नानांना पुढील गोष्टी सहज साधतां आल्या. (१) नानांना कैद करण्यांत अमृतरावांचें अंग आहे असें दाखवून त्यांच्यावर सक्तीची बंदी ठेवण्यास नानांना मुभा मिळाली. (२) अमृतरावांनीं प्रत्यक्ष नानांवरच शस्त्र धरण्याचा गुन्हा केल्यामुळें शिंदेबायांचा पक्ष सोडून शनिवारवाड्यांत स्वस्थ बसण्याबद्दल त्यांना सात लक्षांची जहागीर देण्याचा बाजीरावांकडून जो करार नानांनीं करविला होता तो पुरा करण्याची जबाबदारी आतां नानांवर राहिली नाहीं. (३) शिंदेबायांस आश्रय देऊन अमृतरावांनीं दौलतराव शिंद्यांना त्या डोईजड करून ठेवल्या होत्या. तेव्हां अमृतरावांनाच अशा प्रकारें शनिवारवाड्याच्या कोंडवाड्यांत अडकविल्यामुळें शिंदेबायांचा पक्ष हलका करवून शिंद्यांवर पर्वतप्राय उपकार केल्याचें श्रेय नानांना उघड दाखवितां आलें. त्यामुळें शिंदे नानांचे ऋणी झाले. (४) काळे व थत्ते यांची सर्व मालमत्ता नानांच्या घरांत उतरली. (५) काळे व थत्ते यांच्या नातेवाईकांना व हितचिंतकांना स्वामीभक्तीकरतां बाजीरावांचा गुन्हा त्यांनीं आपणावर घेतला अशी त्यांची थोरवी दाखवून त्यांना खूष केलें व त्याबरोबरच सर्व लोकांत बाजीरावांच्या नैतिक अधःपतनाचा डांगोरा पिटविला. (६) प्रत्यक्ष आपणास कैद करविण्याचा ताजा आरोप बाजीरावांवर लादण्याचा प्रयत्न करून नानांनीं त्यांच्या बंदिवासाच्या फांसाची दोरी जास्त ताणून घेतली. (७) शिंद्यांनीं बाजीराव यांना धमकी देऊन अमृतरावांना शिंदेबायांच्या पक्षांतून फोडलें असें दाखवून शिंद्यां-

बद्दल शिंदेबायांच्या मनांत जास्त तेढ व संताप उत्पन्न करून ठेवला. (८) या प्रकरणांत आपल्याबरोबर नारोपंत चक्रदेव यांसही कैद करविण्याचा बाजीराव यांचा कट होता असें त्यांना भासवून, चक्रदेव यांचे मनांत बाजीरावांविषयीं कायमचा द्वेष नानांनीं उत्पन्न करून ठेविला. हे चक्रदेव नानांच्यातर्फे बाजीराव यांचे सर्वाधिकारी कारभारी झाले होते. त्यामुळें नानांनी बाजीराव यांचेमागें चक्रदेव यांचें कायमचें सुदर्शन चक्र लावून ठेवलें. (९) आणि इतकें सर्व करूनही सर्वांपासून आपण अलिप्त आहोंत असें ढोंग करून, सर्वांबरोबर आपण गोड असल्याचें यश पदरीं पाडून घेतलें. याप्रमाणें कित्येक गोष्टी नानांनीं सहज साधून घेतल्या. नजरबंदीच्या साहित्याचें गारुड्याचें पोतडें व नानांच्या अकलेचें गांठोडें तत्वतः एकच स्वरूपाचें होतें हें वरील नानांच्या कारवाईवरून सहज लक्षांत येईल. या सर्व प्रकारावरून नानांनीं खुद्द पेशवाईच्या धन्याला केवळ आपल्या अधिकारलालसेच्या पूर्तीकरतां कसें जखडून टाकलें होतें हें दिसून येईल. नानांनीं घाळे व थत्ते यांना खरोखरीं कोणत्या कारणाकरतां कैद केलें हें पुढें योग्य ठिकाणीं येणार असल्यानें त्याचें कारण येथें दिलें नाहीं.

४. या वेळीं इंग्रज, निजाम, भोंसले व कावीरकर यांच्याबरोबर नाना हे अगदीं समरस झालेल्या स्थितींत असल्यामुळें त्यांचेकडून नवीन कोणतेंही संकट उत्पन्न होण्याची भीति नानांना राहिलेली नव्हती. अमृतरावांना नानांनीं आपल्या ताब्यांत घेऊन शिंदेबायांच्या व शिंद्यांच्या परस्परविरुद्ध सामर्थ्याचीं पारडीं समतोल करून आपल्या हातीं ठेवल्यामुळें त्यांच्याकडूनही इतःपर कोणतेंही संकट येण्याची त्यांना धास्ती राहिलेली नव्हती. एकंदरींत या वेळीं नानांवर परचक्र येण्याचा कोणताच संभव नव्हता. त्यांना फक्त घरचा असा एकच शत्रू दिसत होता. नानांचे व परशुरामभाऊंचें वैमनस्य पडलें असतां बाजीराव यांनीं त्यांना बंधमुक्त करून सातारच्या महाराजांचे बंड मोडण्याकरतां त्यांची रवानगी केली होती.

त्याप्रमाणें त्यांनीं मोठ्या शौर्यानें थोड्याच दिवसांत तें बंड मोडून टाकून सातारचा किल्ला हस्तगत केला होता. त्यामुळें परशुरामभाऊंवर बाजीराव यांची मर्जी प्रसन्न झाली होती. आपल्यास बाजीरावांनीं पूर्व वैभव प्राप्त करून दिल्यामुळें परशुरामभाऊंना आनंद झाला होता. त्यामुळें बाजीराव व परशुरामभाऊ यांच्यामध्यें धनी व चाकर हा पूर्वापार सेव्यसेवकधर्म पुनः जागृत झाला होता. या उभयतांमध्यें ही सलोख्याची उत्पन्न झालेली जागृति नानांना कल्पनातीत असह्य वाटत होती. परशुरामभाऊ हे धाडसी, साहसी, लष्करी बाण्याचे व पराक्रमी सरदार असून ते या वेळीं पूर्ववत् फौजबंदही होते. ते जर असेच राहिले तर ते आपल्याला केव्हां आणि कसा धोका देतील याची भीति नानांना वाटत होती. भाऊंनीं कांहीं दिवस कां होईना पेशव्यांच्या कारभारीपणाचा अधिकार गाजविलेला होता. तेव्हां त्यांच्याबरोबर कितीही मिळतें घेऊन चाललें, तरी ते पूर्ववत् आपल्या धाकांत वागणार नाहींत असें नाना समजत होते. शिवाय बाळोबातात्यांना बंधमुक्त करून त्यांना पुनः कारभारांत घेण्याची शिंद्यांना केव्हां लहर येईल याचाही विश्वास नानांना वाटत नव्हता. शिंद्यांनीं एकदां बाळोबातात्यांना मुक्त केलें व त्यांची आणि भाऊंची पुनः एकदां जोडी जमली ह्मणजे आपणावर कसा प्रळय ओढवेल याची कल्पना नानांना होतीच. नानांनीं एकदां एकाचा द्वेष धरला ह्मणजे त्याच्याशीं पुन्हां त्यांचें सख्य होऊन तें टिकलें आहे असें एकही उदाहरण इतिहासांत सापडणार नाहीं. त्या इसमाला नानांनीं एक मारून तरी टाकावें किंवा डोंगरी किल्ल्यांत मरेपर्यंत डांबून तरी ठेवावें. नानांच्या स्वभावांतील हा विशेष होता. त्याला अनुसरून शत्रूप्रमाणें वाटणाऱ्या परशुरामभाऊंचें पारिपत्य कसें करतां येईल याच्या विचारांत नाना गुंतले. सरळ स्वभावाच्या लष्करी बाण्याच्या इसमाला पकडावयाकरितां कशा प्रकारचा सांपळा करावयास पाहिजे याचें ज्ञान राघोबादादांच्या वेळेपासून नानांचे ठिकाणीं वृद्धिंगत होत चाललेंच होतें. नानांनीं परशुरामभाऊंकरतां सुंदर बेगडी पिंजरा तयार करावयास सुरवात केली.

५. साताऱ्याच्या महाराजांचें बंड मोडून व तो किल्ला रास्त्यांच्या हवालीं करून तेथून परशुरामभाऊ निघाले ते तारीख ११ सप्टेंबर सन १७९८ रोजीं तासगांवास श्रीगणपतीचे उत्सवाकरितां येऊन पोंचले. कैदेंतून सोडल्या-बद्दल गुन्हेगारीची रक्कम पेशवेसरकारास त्यांनीं किती द्यावयाची ह्याचा निकाल त्यांनीं साताऱ्यास असतांनाच रास्ते यांच्यामार्फत करून घेतला होता. "भाऊंनीं पेशव्यांस देण्याच्या रकमेचा आंकडा दहा लक्ष रुपये नक्की ठरवून घेतला व त्या रकमेचा सरकारांत भरणा अमुक मुदतींत करूं असें कबूल करून माधवराव रास्त्यांस व स्वतःस सरकारी पेंचांतून मुक्त[1] केलें." अशा प्रकारें भाऊंनीं बाजीरावांकडून आपली गुन्हेगारींतून मुक्तता करवून घेतल्यानंतर, सप्टेंबर महिन्यांतच शिंद्यांच्या लष्करांतून नाना पुण्यांत राहण्यास आले व त्यांनीं पेशवाईचा कारभार आपल्या हातीं घेतला; त्यामुळें नानांच्या अधिकाराच्या सीमामर्यादेंत परशुरामभाऊ आले. या वेळीं भाऊंच्या जवळ पंचवीस हजार फौज होती. जोंपर्यंत भाऊ फौजबंद आहेत तोंपर्यंत त्यांच्यापुढें आपलें कांहीं चालणार नाहीं हें नाना जाणून होते. याकरतां त्यांच्याबरोबर सलोखा करून घेण्याचें नानांनीं पहिल्यानें ठर-विलें. हा सलोखा घडवून आणण्यांत नाना आपली नेहमींची दुरंगी पद्धत अंमलांत आणीत असत. भाऊंचें मन पेशव्यांच्याबद्दल शक्य तेवढें कलु-षित व्हावें व नानाबद्दल शक्य तेवढा आदर त्यांच्या मनांत वाढावा अशी या दुरंगी पद्धतीची मांडणी होती. नाना यथापूर्व कारभारांत येऊन बाजीराव त्यांच्या ताब्यांत आल्यामुळें ते केवळ नामधारी पेशवे होऊन सहीशिक्याचे तेवढे अधिकारी राहिले होते. नानांनीं सर्व राजकारणें घोटावीं व तीं बाजीरावांना अमान्य असतांही त्यांनीं तीं मान्य करावीं, असा त्याचा सरळ अर्थ होता. यामुळें नानांच्या राजकारणापासून ज्या गोष्टी लोकदृष्टीनें अनिष्ट घडल्या जाणार होत्या त्याचे अधिकारी बाजीराव व ज्या चांगल्या घडल्या जाणार होत्या त्याचे अधिकारी नाना सहजच ठरणार

---

१. ऐ. ले. सं. पा. ५४३६.

होते. याकरतां यापुढील ऐतिहासिक सत्याची निवड करतांना बाजीराव यांच्या नामनिर्देशाच्या जागीं नानांचेंच नांव घ्यावें लागेल. ज्या ठिकाणीं नानांच्या नांवाचा नामनिर्देश असेल तेथें खुद्द नानांचें नांव असणारच यांत कोणाचेंच दुमत होण्याचें कारण नाहीं. या दृष्टीनें पुढील ऐतिहासिक संगतीची जोडणी करणें प्राप्त आहे.

६. नानांची राज्यकारभार चालविण्याची पद्धत कशी होती यासंबंधीं पटवर्धनांचा पुण्यांतील वकील आपल्या धन्यास एका पत्रांत लिहितो कीं, "मुख्य गोष्ट श्री॥ रा ॥ नानांचें बोलणें कोणते समयीं कसें होईल याचा भरंवसा धरावयाचा नाहीं. सारा दिवस बोलत असतां दस्तऐवज बोलण्यांत सांपडावयाचा नाहीं, या चालीं बोलावयाच्या आहेत! **काम लागलें असतां साखरेपेक्षां गोड बोलावयास उशीर नाहीं. काम जाहलेनंतर त्या गांवचे देखील[1] नव्हत.**" या नानांच्या स्वभावाप्रमाणें ह्मणजे 'मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम्' या उक्तीप्रमाणें नानांनीं पहिल्यानें परशुरामभाऊंबरोबर सख्य जोडण्यास प्रारंभ केला. नानांचें व मिरजकर पटवर्धनांचें सख्य होतें. तेव्हां त्यांच्या मध्यस्थीनें त्यांनीं हें समेटाचें कार्य चालविलें. 'अर्थात भाऊंशीं कसेंही करून पुनः जमवून घ्यावा असें त्यांस (नानांस) वाटूं[2] लागलें.' गंगाधरराव पटवर्धनांनीं भाऊ व नाना यांच्यामध्यें मध्यस्थी करून व नानाविषयीं भाऊंचें कलुषित झालेलें मन पूर्ववत् साफ करून त्याच्या खातरजमेबद्दल भाऊंकडून त्यांच्या हातचें पत्र व श्रीगजाननावरील दुर्वा नानांकडे पाठविल्या. महादजी शिंद्याप्रमाणें भाऊंचे मन निष्कपटी असल्यामुळें ते आजपर्यंत नानांनीं केलेलीं सर्व कृत्यें विसरून गेले व त्यांनीं नानाविषयीं आपलें मन साफ करून घेतलें. भाऊंच्या बाबतींत नाना गंगाधरराव पटवर्धनांबरोबर जीं बोलणीं पत्रद्वारें करीत होते तीं नानांचा विश्वासू कारकून बाळकृष्णपंत बाळ ह्मणून पुण्यास होता, त्याच्या मार्फत करीत होते. हे बाळकृष्णपंत बाळ गंगाधररावांना पाठविलेल्या एका पत्रांत

---

१. ऐ. ले. सं. पा. ५५७९.   २. ऐ. ले. सं. पा. ५५५७.

लिहितातः ' तिकडील (भाऊंकडील) खातरजमा करून घ्यावी. **थोरलें यश स्वामींनीं** (गंगाधररावांनीं) **घ्यावें हेंच सेवकाचें मानस !'** यावरून भाऊंच्या बरोबर समेट करण्याकरतां नाना किती आतुर झाले होते व ते आपल्या गोड शब्दांची साखर कशी पेरीत होते हें दिसून येईल.

७. आपल्या दोस्तांकरवीं वरीलप्रमाणें साखर पेरून भाऊंना आपल्या जाळ्यांत अडकविण्याचा नानांचा डाव होता. त्याप्रमाणें भाऊंकडून लेखी दस्तऐवज (करार पत्राच्या स्वरूपांत) नाना करून घेऊं इच्छित होते. ह्मणून भाऊंनीं लिहून द्यावयाच्या कराराचा मसुदा नानांनीं स्वतः तयार करून तो आपले कारकून रा. लक्ष्मणपंत पेंडसे यांच्याबरोबर देऊन त्यांस भाऊंकडे पाठविलें. त्या मसुद्याप्रमाणें भाऊंनीं नानांना दोन पत्रें पाठवून त्यांच्या इच्छेप्रमाणें स्वतःचे हात कलम करून घेतले. तीं पत्रें पुढीलप्रमाणें होतीं:—

पहिलें पत्र.[2]

श्री. (आश्विन शु. ११ तारीख २० आक्टोबर सन १७९८)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नाना स्वामींचे सेवेशीं.

पौष्य परशुराम रामचंद्र. कृतानेक सा।।नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० १० जमादिलावल मु।। केंपवाड वर्तमान यथास्थित असे. विशेष. आम्हीं मांडवगणास होतों तेथून साताऱ्यास रास्ते याचे योगें आलों. फौज दहा बारा हजार ठेविली. साताऱ्याचा बंदोबस्त जाल्यानंतर फौजसुद्धां इकडे आलों. आपलें येणें पुण्यास जालें तें ऐकोन संतोष जाला. श्री।। राजश्री पंतप्रधान यांचा रोष मजवर आहे, त्यास आम्हीं श्रीमंतांचे सेवक बहुता दिवसांचे. सेवकापासून अंतर पडलें असतां श्रीमंतांनीं कृपा करून सांभाळ करावा. चित्तांत अंतर पडलें तें आणूं नये. श्रीमंतांचें पायांखेरीज आश्रय आम्हांस कोणाचा नाहीं. येविशीं श्रीमंतांस आपण विनंति करून आम्हांविशीं खातरजमा होईल तो अर्थ

---

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ४४०२.   २. ऐ. ले. सं. पत्र नं. ४४११.

केला पाहिजे. येथून राजश्री मोरो आपाजी कारकून पाठविले आहेत. विस्तारें करून विदित करितील. बहुत काय लिहिणें. कृपा करावी हे विनंती.

पत्र दुसरें[१]

श्री. (आश्विन शु. १३ तारीख २२ सप्टेंबर सन १७९८)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नाना स्वामीचे सेवेशीं. पोष्य परशुराम रामचंद्र. कृतानेक सा॥ नमस्कार विनंती येथील कुशल तागायत १२ जमादिलावल इंदुवार पावेतों आपले कृपें करून आम्हां कडील वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपला आमचा स्नेह पूर्वी चालत होता. मध्यें विपर्यास कित्येक गोष्टींवरून चित्तांत आला तो आम्हीं सोडला. पूर्वी आपला आमचा स्नेह श्री॥ कैलासवासी माधवराव नारायण पंतप्रधान यांचे समाप्तीपर्यंत चालत आला त्याप्रमाणें चालऊं. यांत अंतर होणार नाहीं. येविशीं श्रीगणपतीच्या दूर्वा दिल्या आहेत. या उपर कांहीं किंतु मनांत नसावा. मजकडूनही नाहीं. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

८. हीं दोन पत्रें नानांनीं मसुदा तयार करून पाठविल्याप्रमाणें एक दिवसाच्या फरकानें भाऊंनीं नानांस लिहून दिलीं आहेत. हीं दोन्हीं पत्रें वाचल्यानंतर नाना भाऊंचे वरिष्ठ अधिकारी आहेत असें मानून व ते त्यांचे हितकर्ते आहेत असें समजून आजपर्यंतचे सर्व अपराध भाऊंनीं केले व ते नानांनीं पोटीं घालावे अशी त्यांनीं नानांकडे दयेची याचना केली होती असा सहज समज होतो. हा सहज विपर्यस्त होणारा समज नानांच्या कारकुनी वळणाच्या मसुद्यामुळें आहे यांत संशय नाहीं. भाऊंची कैदेंतून खुद्द बाजीरावांनीं मुक्तता केली. त्यांना कैदेंतून मुक्त करण्यापूर्वी गुन्हेगारीचे रुपये आगाऊ देण्याबद्दल त्यांच्या-जवळ त्यांनीं मागणी केली नाहीं. सातारच्या महाराजांचें बंड मोड-ण्याकरतां त्यांची योजना बाजीराव यांनीं केली. अशी सर्व खरी हकी-

१ ऐ. ले. सं. पत्र नं. ४४१५.

कत असतां वरील पहिल्या पत्रांत बाजीराव यांचा कोठेंच नामनिर्देश न करतां भाऊंच्या मुक्ततेचें सर्व श्रेय रास्त्यांना दिल्याचें दाखविण्यांत आलें असून बाजीराव यांचा रोष भाऊंवर आहे व तो घालविण्याचा प्रयत्न नानांनीं करावा अशी उलटी चाल दाखविलेली आहे. या नानांच्या चालींमुळें बाजीराव व भाऊ यांचें सख्य नष्ट होऊन त्यांच्यामध्यें कायमचें वैमनस्य उत्पन्न व्हावें व त्या उभयतांत सलोखा उत्पन्न करून देण्याचा अधिकार नानांनीं आपणाकडे ठेऊन घेतल्यामुळें त्या उभयतांत आपल्या मध्यस्थीचा हिमालय पर्वत कायमचा आडवा पडलेला रहावा, ही नानांच्या पहिल्या पत्राच्या मसुद्यांतील खरी मख्खी होती. दुसऱ्या पत्रांत सवाईमाधवरावांच्या अंतकाळापर्यंत नाना व भाऊ यांचा स्नेह ह्मणजे नानांनीं आज्ञा करावी, व भाऊंनीं त्यांच्या न्याय्यान्याय्य--आज्ञेचा विचार न करतां ती पाळावी, या स्वरूपाचा स्नेह भाऊंनीं पुढें चालविण्याचें कबूल केलें हें दाखविण्याची नानांची योजना होती. शिवाय ही कबुली दिल्याच्या खातरजमेकरितां श्रीगणपतीवरील दुर्वा नानांनीं भाऊंकडून मागितल्या-होत्या त्या भाऊंनीं दिल्या यावरून भाऊंच्या सलोख्याकरतां नानांनीं आपल्या गोड भाषणाची साखर पेरून भाऊंकडून आपणास वाटेल त्या वेळीं वाटेल तसा अर्थ करतां येण्यासारखा लेखी करार व श्रीगणपतीवरील म्हणजे त्यांच्या कुलदैवता-वरील दुर्वांच्या द्वारें नैतिक करारही करून घेऊन भाऊंना आपल्या कपट जाळ्यांत अडकवून टाकलें.

९. या वेळीं भाऊंनीं नानांबरोबर नमतें घेऊन त्यांची मर्जी संपादन करण्याची जी तयारी दाखविली, त्यांत भाऊंनाही नानांकडून कांहीं गोष्टी साधावयाच्या होत्या. या वेळीं भाऊ पैशाच्या भयंकर पेंचांत सांपडलेले होते. सातारच्या महाराजांचें बंड मोडण्याकरतां त्यांना नवीन फौज उभारण्यांत बराच खर्च करावा लागला होता. गेलीं दोनतीन वर्षें ते कारागृहांत पडल्यामुळें त्यांच्या जहागिरीला करवीरकरांचा मुंगा लागून त्यांनीं ती पोंखरून ठेविली होती. नानांची जशी त्यांच्या जहागिरीवर बसली होती, त्यामुळें

त्यांच्या जहागिरीची जास्तच दुर्दशा झाली होती. अशा स्थितींत भाऊंच्या कुटुंबाच्या पोषणाकरतां त्यांच्या रामचंद्रपंत नांवाच्या मुलानें सोन्यारुप्याचे दागिने गहाण ठेऊन, सावकारांकडून अठ्ठेचाळीस हजार रुपये कर्ज काढून त्यावर भाऊंच्या प्रपंचाचा चरितार्थ भागविला. भाऊ सुटून आल्यानंतर हे कर्जाचे पैसे भाऊंनाही उभे करतां आले नाहींत, म्हणून त्यांनीं ते सोन्यारुप्याचे दागिने विकून सावकारांचें कर्ज भागविलें. अशा पैशाच्या पेंचप्रसंगांत भाऊ असतांना त्यांना नवीन ठेवलेल्या पंचवीस हजार फौजेचा खर्च संभाळून शिवाय दहा लक्ष रुपये आपल्यावर लादलेल्या गुन्हेगारी-बद्दल पेशवेसरकारांत भरावयाचे होते. नाना हे नवकोट नारायण होते. तेव्हां त्यांच्याबरोबर नमतें घेऊन त्यांच्या मनाप्रमाणें वागल्यास ते आपणाला मदत करतील व त्यामुळें आपण पैशाच्या भयंकर पेंचप्रसंगांतून मुक्त होऊं, असें भाऊंना वाटलें. म्हणून त्यांनीं नानांनीं पाठविलेल्या मसुद्याप्रमाणें नानांना दोन पत्रें लिहून दिलीं व त्याच्या खातरजमेबद्दल श्रीगणपतीवरील दुर्वाही पाठविल्या. त्या त्यांच्या हातीं पडतांच भाऊंच्या नाकांतील वेसण आपल्या हातीं सांपडल्या-प्रमाणें त्यांना वाटून ते लगेच भाऊंबरोबर ‘ आपण त्या गांवचेच नाहीं ’ या पद्धतीप्रमाणें वागूं लागले. या संबंधीं नारो आपाजी परांजपे यांच्या तारीख ५ नोव्हेंबरच्या पत्रांत[१] सविस्तर मजकूर आहे. परांजपे पटवर्धनांचे वकील होते. नानांच्या मसुद्याप्रमाणें परशुरामभाऊंकडून लिहून घेतलेलें पत्र ते नानांना देण्याकरतां गेले होते. त्यांनीं भाऊंचें पत्र नानांना दिल्यानंतर त्यांनीं भाऊंची सर्व परिस्थिति नानांना निवेदन केली व त्यांना अशी विनंती केली कीं, कसेंही करून भाऊंच्या खर्चाची तजवीज करावी. यावर नाना बोलले कीं, “ मज-पाशीं कांहीं एक राहिलें नाहीं. रिकामे होऊन बसलों आहों. ” यावर परांजपे म्हणाले “ आपण हरकसें कोणास सांगून सावकाराकडून देवावें. कराराप्रमाणें त्यास पावेल. आपण खातरजमा मात्र करावी. ” यावर नानांनीं असें उत्तर दिलें कीं, “ शिंद्यांकडे पांच हजार रुपये हुंडणावळीचे भरावयाचे होते.

---

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ४४१९.

त्याजकरितां सावकारांकडून आज आठ दिवस पटवितों ते पटत नाहींत. आतां सावकारांत जीव राहिला नाहीं हें तुम्ही पहातच आहां. आणखीं पुण्यामध्यें कोणी पैकेकरी आहे नाहीं हे विचार कळतच आहेत. प्रसंग कोण आहे ! याप्रमाणें (भाऊंना) लिहावें." अशा प्रकारें भाऊंच्या पहिल्याच मागणीस नानांनीं हातोहातीं वाटाण्याच्या अक्षता लाविल्या. नानांच्या मनांत भाऊंच्या बद्दल या नवीन करारानें जर थोडीतरी सहानुभूति उत्पन्न झाली असती, तर त्यांनीं भाऊंकरतां लाख रुपयांची मदत पांच मिनिटांत करविली असती. परंतु भाऊ जितके जास्त पेंचांत येतील तितके नानांना पाहिजे होते. नानांच्या मनांत भाऊंचा सर्वस्वी नाश करूनच द्वेष साधावयाचा होता. नाना दीर्घ-द्वेषी होते व ते गोडगोड बोलून भाऊंचा केसानें गळा कापणार होते. या करतां भाऊंना कोणत्याही तऱ्हेनें मदत तर करावयाची नाहीं, उलट त्यांस जास्त संकटांत पाडण्याचा प्रयत्न करावयाचा, पण तोंडानें गोड गोड बोलून त्यांच्या तोंडाला मधाचें बोट लावून ठेवावयाचें, अशी बोलण्याची चाल नानांनीं पटवर्धनांचे वकिलांजवळ ठेवली होती. या मुलाखतींत नाना परांजपे वकिला-जवळ दुसऱ्या पुष्कळ गोष्टी बोलले. "श्रीमंतांचा (बाजीरावांचा) प्रकार बोलावें एक आणि करावें एक असें होतें. विश्वास बोलण्याचा धरून परिणाम नाहीं. (अमृत)रावसाहेब यांचा विचार लोभी. शंभर रुपये दिले असतां सरकार दौलतीमध्यें लाख रुपयांची खामी जाली असतां चिंता नाहीं, हे समज तेथें आहेत. वाड्यांत स्वस्थ बसले आहेत. आमचे जागां स्नेहही नाहीं आणि रागही नाहीं. कारभार प्रकरणीं कांहीं एक बोलत नाहींत. परंतु उभयतांचें (बाजी-राव व अमृतराव यांचें) अंतर्याम कोणे रीतीनें आहे हें समजत नाहीं. लौकिकांत चित्त शुद्ध नाहीं असें आहे. परंतु खातरजमा होत नाहीं." या प्रमाणें बाजीराव व अमृतराव यांचे बाबतींत बोलून सहज जातां जातां ते उभयतां विश्वासघातकी, लोभी आहेत असें सांगून परशुरामभाऊंच्या पायांत संशयाचा साप सोडण्याचा नानांनीं प्रयत्न केला. "तूर्त शिंद्यांची (व बायांची) एकी करून त्यांणीं कूच करून जावें या बेतामध्यें आहों. ते गेल्यानंतर

भाऊंचें आमचें एकचित्त जालें आहे, ते श्रीमंतांपाशीं आहेत, आम्ही सर्व सोडून हरएक उत्तम स्थळीं स्नानसंध्या करून राहणार. तेथें राहिलें असतां भाऊ दौलतीमध्यें सरदार आहेत आम्हास कांहीं एक चिंता नाहीं. माझे चित्तांत या उपर कारभार करावा हा विचार राहिला नाहीं. बहुत दिवस कामकाज सरकारचें केलें. उमेद राहिली नाहीं." याप्रमाणें तोंडचोपडे-पणाच्या गोष्टी करून भाऊंच्या तोंडाला आपल्या पश्चात् पेशवाईच्या कारभाराचें मधाचें बोट नानांनीं लावून ठेविलें. महाडच्या कारस्थानानंतर एकाच महिन्याच्या आंत आपण काशीस जातो म्हणून नानांनीं बाजीरावांस फसविण्याकरतां निरवानिरवीची यादी केली होती. परंतु ते त्या वेळीं काशीला गेले नाहींत तशाच भुलथापीचें भाऊंना फसविण्याकरतां या वेळेचें नानांचें बोलणें होतें. एकंदरींत परशुरामभाऊंबद्दल द्वेष मनांत कायम ठेऊन व लौकिकांत स्नेह संपादन केल्याचा डांगोरा पिटवून आणि त्यांची पैशाची मागणी लयाडून देऊन त्यांच्या तोंडाला मधाचीं पानें पुसण्याची विद्या एकट्या नानांनाच लाभली होती व ती त्यांना शोभतही पण होती. अशा प्रकारें पटवर्धनांच्या वकिलाची नानांनीं मिष्ट भाषणानें बोळवण केली.

१०. अशा प्रकारें नानाबरोबर मिळतें घेऊन सुद्धां नानांनीं भाऊंना पैशाची मदत केली नाहीं, तेव्हां स्वतःच्या पायावर उभें राहिल्याशिवाय तरणोपाय नाहीं असें भाऊंना वाटून ते खंडण्या वसूल करण्याकरतां मोहिमेवर निघाले. अक्टोबर महिन्याच्या अखेरीस मिरजनजीक असलेल्या कैंपवाड मुक्कामाहून ते सुरापुरच्या रोखानें निघाले. या पूर्वीच त्यांनी आपला पुत्र रामचंद्रपंतआपा यांच्याबरोबर आठ हजार फौज देऊन त्यांना सुरापुर-कडे रवाना केलें होतें. भाऊही आपल्या फौजेसह तिकडेच येत आहेत असें सुरापुरच्या संस्थानिकास समजतांच त्यानें 'रामचंद्रपंतआपा यांच्याबरोबर समेटाचें बोलणें लावून खंडणीची बाकी चुकती केली व कारण पडेल तेव्हां पांचशें स्वार व हजार पायदळ यानिशीं पेशवेसरकारच्या चाकरीस हजर होईन अशी कबुली दिली. याप्रमाणें सुरापुरचें काम आटोपून आर्थिक पेंच

थोडा सुटल्यामुळें परशुरामभाऊ नोव्हेंबर महिन्याच्या २८ व्या तारखेस आपल्या फौजेसह गलगल्याजवळ कृष्णा नदी उतरून पलीकडे गेले व दुसरे दिवशीं घटप्रभा पार होऊन त्यांनीं कनकगिरी व अनागोंदाचा रोंख धरून कूच करण्यास सुरवात केली. ही बातमी नानांस समजतांच कर्नाटकांत भाऊ इतके दूरवर गेले ही गोष्ट त्यांस पसंत पडली नाहीं. 'नानांच्या मतें भाऊंनीं कार्यकारण पांचसात हजार फौज ठेवून भीमेच्या पाण्यावर पंढरपुराच्या सुमारें असावें अथवा मिरजेनजीक कोठें तरी रहावें. तें सोडून ते इतक्या लांब पल्ल्यावर कशा करिता गेले?' इतकी मोठी फौज बाळगून कर्जाखालीं येण्याचें त्यांस कांहींच नव्हतें. कारण **करवीरकरांच्या दहशतीमुळें त्यांनीं फौज ठेविली म्हणावें तर करवीरकरांचें सूत्र आमच्या हातांत आहे हें त्यांस माहीत आहे.** करवीरकरांचें भांडण लढाईच्या पल्लयावर न नेतां सामोपचारानेंच मिटवून घेण्याबद्दल आम्हीं भाऊंस सांगतच आहों. आम्हांस जर येथें त्यांच्या फौजेची गरज लागली तर इतक्या लांबून येऊन वेळेवर आमच्या उपयोगीं पडणें त्यांच्यानें कसें घडेल[1]?' असे नानांचे विचार असल्यामुळें त्याला अनुसरून भाऊविरुद्ध कारवाई करण्यास त्यांनीं सुरवात केली. ही त्यांची कारवाई 'आई जेऊं घालीना आणि बाप भीक मागूं देईना' या म्हणीप्रमाणें होती.

११ मागें दर्शविल्याप्रमाणें बाजीराव नानांना शरण गेल्यानंतर त्यांचे जागीं नानांचे विश्वासू दोस्त नारोपंत चक्रदेव हे वड्ड मुखत्यार म्हणून स्थानापन्न झाल्यामुळें बाजीरावांचे नांवावर नानांना वाटेल तें कपटकारस्थान बिनबोभाट घडवून आणण्यास पूर्ण सवलत मिळाली. नानांनीं भाऊंकडून मागील 'पहिलें पत्र' लिहून घेतल्यामुळें बाजीराव यांना पंतप्रधान मानण्यास व ते पेशवाईचे खरे धनी आहेत असें संबोधण्यास नानांनीं भाऊंस भाग पाडलें. ही भाऊंची कबुली नानांनीं घेतल्यामुळें त्यांनीं पूर्वी चिमाजीस गादीवर बसवून त्यास धनी केलें होतें तो इतःपर संबंध राहिला

---

१. ऐ. ले. सं. पान ५५६६.

नाहीं व त्यांचे नांवावर भाऊंना नानाविरुद्ध कोणतेंच कारस्थान करतां येणार नाहीं ही मजबुती पहिल्या पत्रानें नानांनीं भाऊंकडून करून घेतली होती. त्यामुळें भाऊंवर शस्त्र धरण्याचे बाबतींत बाजीरावांचें बुजगावणें आतां उघड तऱ्हेनें पुढें करावयास नानांना मुभा झाली. अशा स्थितींत परशुरामभाऊंस जरबेंत आणण्याचा जेवढा उपाय आपल्या हातीं आहे तेवढा करून पाहण्याचें नानांनीं मनांत योजिलें. बाजीरावांनीं आनंदराव रास्त्यांस भेटीस बोलावून घेऊन भाऊंच्या बाबतींत त्यांस चांगली तंबी द्यावी असें नानांनीं बाजीरावांस सांगितलें. त्याप्रमाणें रास्त्यांस बोलावून आणून बाजीरावांनीं जबाब विचारला कीं, " परशुरामभाऊंनीं आमच्या हुकमाखेरीज पंचवीस हजार फौज चाकरीस ठेवून मुलखाची नासाडी केली याचें कारण काय? फौज चाकरीस ठेऊन तुंगभद्रेपर्यंत मुलूख मारीत सुटण्याविषयींची आज्ञा आह्मीं त्यांस दिलेली नाहीं व स्वच्छंदानें वाटेल तें करण्यास ते मुखत्यार नाहींत. त्यांची आम्ही मुक्तता केली असली तरी ते अजून सरकारचे कैदीच आहेत. तुह्मीं त्यांस हजर जामीन झालेले आहां. त्यांच्या फौजेस रजा देववून तुह्मीं त्यांस आणून हजर करा. तसें न कराल तर परिणाम ठीक होणार नाहीं. " याप्रमाणें बाजीरावांनीं धनीपणाच्या नात्यानें रास्त्यांस तंबी दिली. तेव्हां परशुरामभाऊ कोणत्या योग्यतेचा माणूस आहे, त्यांनीं आजपर्यंत सरकारचीं केवढालीं कामें केलीं, साताऱ्याच्या अरिष्टांतून श्रीमंतांस कसें सोडविलें वगैरे गोष्टी रास्त्यांनीं श्रीमंतांपुढें लीनतेनें मांडल्या व असा मोहरा पुन्हां कैदेंत घालून धुळीस मिळविण्याची वासना धरूं नये ह्मणून वारंवार प्रार्थना केली. परंतु श्रीमंतांस कांहीं केल्या द्रव येईना. शेवटीं अगदींच निरुपाय झाला तेव्हां आनंदराव रास्त्यांनीं साफ सांगितलें कीं, " परशुरामभाऊंस आम्हीं परत आणूं शकत नाहीं. मग हवालीं करण्याची गोष्ट दूरच राहिली! श्रीमंतांनीं इच्छेस येईल तें आमचें अगर भाऊंचें पारिपत्य खुशाल करावें. "[१] या रास्त्यांच्या निर्वाणीच्या उत्तरानें नाना गडबडले. रास्त्यांचा सरंजाम जप्त करून त्यांस कैदेंत घालावें ही मगदूर यावेळीं

---

१ ऐ. ले. सं. पान ५५६८.

नानांमध्यें आलेली नव्हती. शिवाय रास्त्यांस हरप्रयत्नानें कैद केलेलें भाऊंना समजलें तर ते कोणतें दिव्य करतील याचीही कल्पना नानांना होती. भाऊ या वेळीं फौजबंद होते, त्यामुळें त्यांचें अगर रास्त्यांचें या वेळीं उघड रीतीनें पारिपत्य करणें नानांना अशक्य होतें; म्हणूनच त्या धीरावर आनंदराव रास्त्यांनीं बाजीरावांना तसें सडेतोड उत्तर दिलें होतें. अर्थात् यामुळें भाऊंना सहजासहजीं आणून पुन्हां कैदेंत डांबून टाकण्याचा नानांचा बेत फसला. अशा स्थितींत भाऊंना पुण्यास आणवून हजर करण्याविषयीं रास्त्यांना जास्त निकड लाविली तर हें प्रकरण चिडून विकोपाला जाणार हें नानांना समजतांच, त्यांनीं बाजीराव व रास्ते यांच्यामध्यें मध्यस्थी करण्याचा आव आणला. आपल्यावर बाजू उलटते असें दिसतांच नाना मेणाहून मऊ बनत असत व आपली बाजू बळकट होतांच वज्रापेक्षां कठीण होत असत. या आपल्या विश्वासघातकी स्वभावाला अनुसरून नानांनीं या वेळीं अगदीं पडतें घेतलें व आपली मध्यस्थाची कुशलता दाखवून बाजीराव, रास्ते व भाऊ यांच्यामध्यें समेट घडवून आणल्याचें प्रदर्शन दाखविलें. भाऊ सातार्‍यास असतांना गुन्हेगारीबद्दल फक्त दहा लक्ष रुपये घेण्याचें बाजीरावांनीं कबूल केलें होतें. परंतु या वेळीं नानांच्या प्रेरणेनुसार त्यांच्या मागणीची रक्कम तीस चाळीस लाखांवर गेली. ही मागणी केवळ नानांच्या मध्यस्थीनें कमी होऊन नानांचे भाऊंवर हिमालयन उपकार झालेले दिसावे एवढ्या करतांच होती. पुढें नानांनीं बाजीराव व भाऊ यांच्यामधील तंटा चौदा लक्षांवर तोडलेला दाखविला. त्यांत भाऊंनीं दहा लक्ष रुपये रोख द्यावे व आणखी चार लक्ष द्यावयाचें त्याबद्दल सरकारांतून भाऊंस दोन वर्षांत कांहीं मोहिमेची कामगिरी सांगावी व तिच्या खर्चाकरितां जो पैका द्यावयाचा त्यांत हे चार लक्ष रुपये वजा घालावे अशी नानांनीं तडजोड काढिली. याप्रमाणें बाजीराव व भाऊ यांच्यामध्यें कलह पेटविल्याप्रमाणें दाखवून भाऊंच्या मनांत बाजीरावांबद्दल अविश्वास व द्वेष कायमचा उत्पन्न करून ठेवला आणि आपले पर्वतप्राय उपकार भाऊंच्या डोक्यावर लादून त्यांना जन्माचे ऋणी करून ठेवल्याप्रमाणें दाखविलें. नंतर रास्त्यांची जामीनगत

रद्द करण्यांत आली. तारीख १८ फेब्रुवारी सन १७९९ रोजीं भाऊंचा मुक्काम दोडवाडानजीक असतांना नानांचा कारकून कृष्णाजीपंत ढेकणे हा तेथें गेला व त्यानें बाजीरावांतर्फे परशुरामभाऊंस मोठ्या समारंभानें सरंजामाचीं वस्त्रें व मोत्याची कंठी व तुरा अर्पण केला. याच वेळीं भाऊंच्या चौघां पुत्रांस सरकारांतून वस्त्रें व शिरपेंच देण्यांत आले. अशा प्रकारें भाऊंना वरून गोंजारल्याप्रमाणें करून त्यांच्या मनांत आपल्याविषयीं नानांनीं विश्वास उत्पन्न केला व आंतून त्यांच्या गळ्याला गळफांस कसा घालतां येईल याची विवंचना सुरू केली.

१२. वर दर्शविल्याप्रमाणें पुण्यास भाऊंविषयीं रास्त्यांची रदबदली, बाजीरावांकडून दाखविलेला विरोध व त्या बाबतींत नानांनीं करून घेतलेली सारवासारव याचें नाटक सुमारें तीन महिने चाललें होतें. या अवधींत भाऊ-मात्र पैशाच्या अडचणींत सांपडल्यामुळें मुलुखगिरी करीत निर्धास्तपणें चालले होते. त्यांच्याजवळ तोफांचा सरंजाम विशेष नसल्यामुळें नवीन ठाणीं घेण्याच्या विशेष भानगडींत न पडतां केवळ दहशत उत्पन्न करून खंडणी वसूल करण्याचें काम त्यांनीं चालविलें होतें. गजेंद्रगडच्या दक्षिणेस येलबर्गे म्हणून गढी आहे. तेथील अमलदारानें खंडणी देण्याचें नाकारल्यावरून त्या ठाण्यास वेढा घालून बसणें भाऊंस भाग पडलें व तेथें मात्र त्यांचे पंधरावीस दिवस मोडले. बाकीच्या ठिकाणीं दोनचार दिवसांपेक्षां त्यांचा जास्त खोळंबा झाला नाहीं. येलबर्ग्याची खंडणी घेतल्यानंतर भाऊंनीं रामचंद्रपंतआपा व महादेवराव दाजी यांस दहा बारा हजार फौज बरोबर देऊन सावनुराकडे पाठविलें. त्या प्रांतीं करवीरकरांचीं ठाणीं बसलीं होतीं. तीं उठवून तेथें आपला अंमल बसविण्याचें काम या फौजेकडे सोंपविलें होतें. तें काम चालू असतां भाऊ हळुहळु मजली करीत गदगच्या मार्गानें दोडवाडापर्यंत येऊन तेथें मुक्काम करून राहिले. तेथेंच भाऊंना पेशवे सरकारांतून सरंजामाचीं वस्त्रें मिळालीं हें वर आलेंच आहे.

१३. परशुरामभाऊ पेशव्यांच्या कैदेंतून मोकळे होऊन त्यांनीं पंचेवीस हजार फौज आपल्याजवळ जमवून ते मुलुखगिरीवर असतां त्यांना पुण्यास

बोलावून पुन्हां कैदेंत ठेवण्याचा नानांचा पहिला डाव जेव्हां चुकला, तेव्हां त्यांनीं भाऊंच्या पारिपत्याचा दुसरा डाव खेळण्यास सुरवात केली. हा दुसरा डाव ह्मणजे नानांच्या स्वभावधर्माप्रमाणें भाऊंना देहांतशासन देण्याचा होता. त्याकरतां नानांनीं जो चक्रव्यूह रचला त्यांत अडकण्याचे कळसूत्री दरवाजे पुढीलप्रमाणें बसविण्यांत आले. परशुरामभाऊ मुलखगिरी करूं लागल्यामुळें ठिकठिकाणच्या खंडण्या ह्यांना मिळूं लागल्या. त्यामुळें त्यांची आर्थिक स्थिति सुधारूं लागली. ती बंद पडावी व उलट ते आपली फौज बाळगण्याच्या जास्त खर्चांत यावे व त्यांनीं मुलुखगिरी बंद ठेवून मिरज प्रांतीं परत यावें याकरितां त्यांच्या जहागिरींत त्यांच्याच शत्रूंकडून दंगेधोपे, लूट, मारामाऱ्या, जाळपोळ इत्यादि कृत्यें सुरूं करविण्याचा नंबर एकचा कळसूत्री दरवाजा नानांनी तयार केला. तसाच परशुरामभाऊंना आपण चाकरीस ठेवलेली सर्व फौज कमी करतां येऊं नये व तिचा खर्च दिवसेंदिवस त्यांच्या अंगावर वाढत जावा आणि त्यांच्या उत्पन्नाची बाजू मात्र बंद पडून त्यांच्या मागें त्यांनीं देणें असलेल्या रकमेच्या तगाद्याचा शशिमिरा लावून त्यांना ‘ त्राहि भगवन् ’ करून सोडण्याचा नानांनीं दुसरा दरवाजा निर्माण केला. आपल्याला प्रसंगाच्या वेळीं प्रामाणिकपणानें मदत करणारा खरा मित्र कोण याची भाऊंना दिशाभूल पडावी ह्मणून त्यांच्या खऱ्या मित्रांबद्दल त्यांच्या मनांत संशय उत्पन्न करवून आपणच त्यांचे खरे मित्र, खरे हितकर्ते असें दाखविणारा भुलभुलय्याचा तिसरा दरवाजा नानांनीं उभारला. परशुरामभाऊ हे पेशवेसरकाराचे चाकर ह्मणून त्यांना मोहिमेची फार मोठी कामगिरी देण्याचें अवडंबर माजवून व त्यांच्या मदतीकरतां पेशवेदरबारांतून मोठमोठ्या फौजबंद असाम्यांच्या योजना करवून व त्या बाबतींत दशदिशा डांगोरा पिटावा ह्मणून पेशवेसरकारतर्फे शक्य तेवढे कागदी घोडे नाचवून आंतून एकही खरा घोडा भाऊंच्या मदतीकरतां जागा सोडून प्रसंगीं जाऊं नये, अशा गुप्त कारस्थानाच्या कारवाईचा चौथा मुख्य दरवाजा भाऊंच्या खास प्राणहरणाकरतां नानांनीं वडविला होता. अशा प्रकारें चार कळसूत्री दरवाजे निर्माण करून भाऊंच्या शासनाकरतां नानांनीं

चातुर्द्वारी चक्रव्यूहाची नवीन कल्पना तयार केली व त्याप्रमाणें महाडचें कारस्थानही फिकें पाडणाऱ्या त्यांच्या गुप्त हालचाली होऊं लागल्या.

१४ परशुरामभाऊंचे कट्टे शत्रू करवीरचे महाराज हे होते. परस्परांच्या जहागिरीचा मुलुख परस्परांच्या सीमेला बरेच ठिकाणीं भिडला असल्यामुळें परशुरामभाऊ व करवीरचे महाराज हे परस्परांचे शेजारचे शत्रू होऊन बसले होते. इ. स. १७९३ मध्यें भाऊंनीं करवीरकरांचा मोड केल्यामुळें पुढें कांहीं दिवस परस्परांत कलह उत्पन्न झालेला नव्हता व होण्याचें कारणही नव्हतें. परंतु इ. स. १७९६ मध्यें नानांनीं आपल्या महाडच्या कारस्थानाकरतां महाराष्ट्रांत भावी कलहाग्नीच्या बीजाचें जें यज्ञकुंड बांधलें त्यांतच परशुरामभाऊ व करवीरचे महाराज यांच्या नवीन कलहाला तोंड फोडून दिलें होतें. 'परशुरामभाऊंस शह देण्याकरितां नानांनीं करवीरच्या महाराजांशीं राजकारण करून त्यास सांगितलें कीं, भाऊंच्या सरंजामी मुलखावर स्वारी करून तुह्मीं तो प्रांत खुशाल ताब्यांत घ्यावा. पेशवाई मुलखास मात्र तुह्मी काडीमात्र उपद्रव देऊं नये.यावर महाराज ह्मणाले कीं, आज भाऊंत व तुह्मांत वांकडें आहे ह्मणून तुह्मीं आम्हास असें करावयास सांगतां. पण उद्यां तुह्मीं व भाऊ एक झालात आणि भाऊंनीं आम्हांवर स्वारी केली तर आमची काय वाट ? यावर नानांनीं त्यांस आश्वासन दिलें कीं, भाऊंची तुम्हांवर स्वारी होईल तर आम्हीं तुमचा बचाव करूं. फौज ठेवण्याकरितां महाराजांनीं या वेळीं नानांजवळ दोन लाख रुपये उसनवार मागितले तेही नानांनीं त्यांस तत्काळ दिले.[1]' नानांनीं भाऊ व करवीरकर यांच्यामध्यें पिढयानुपिढी वाढत जाणारा हा नवीन कलह उत्पन्न केला होता ही हकीकत मागें आलीच आहे. नानांच्या या चिथावणीनें व त्यांच्या पैशाच्या प्रवाहानें करवीरच्या महाराजांना नवजीवन प्राप्त झालें व ते भाऊंचा नाश करून आपला फायदा साधून घ्यावयास तयार झाले. त्यांनीं नानांच्या पैशावर आपल्या सैन्याची उभा-

१ नाना फडनविसांचें चरित्र पान १८२.

रणी केली व पटवर्धनांच्या मुलखावर हल्ले करण्यास प्रारंभ केला. भूदरगडचा किल्ला पुष्कळ दिवस पटवर्धनांच्या हवालीं होता, तो त्यांनीं घेतला; चिकोडी व मनोळी हे दोन प्रांत त्यांनीं काबीज केले, हुबळी आदिकरून संपन्न शहरें लुटून फस्त केलीं; आणि वल्लभगडाच्या किल्ल्यावरही आपलें निशाण नेऊन रोविलें. भाऊंचें आवडतें राहण्याचें ठिकाण जें तासगांव त्यावर हल्ला करून त्यांनीं तें लुटलें. भाऊंचा राहण्याचा वाडा त्यांनीं जाळून टाकला. संवदलग्याचा किल्ला हस्तगत केला आणि भाऊंच्या गोकाक महालावर स्वारी करून एक लक्ष वीस हजार रुपये खंडणी घेतली. बाजीरावांनीं कर्नाटकांत धोंडोपंत गोखले यांना नवीन सरदार निर्माण केलें होतें. त्यांनीं करवीरकरांना पायबंद बसण्याकरतां त्यांच्याबरोबर एक दोन संग्राम केले. पण त्यांनाही शेवटीं हात टेंकावे लागले. अशा प्रकारें परशुरामभाऊंशीं वैरत्व निर्माण करून प्रबल झालेल्या करवीरच्या महाराजांना भाऊंचें पारिपत्य करण्याच्या कामीं नानांनीं प्रवृत्त केलें.

१५. नानांच्या कारस्थानांतील विशेष असा होता कीं, '**उंदराची शिकार करावयाची ठरल्यास वाघाच्या शिकारीची तयारी करावयाची.**' त्याला अनुसरून करवीरकरांचा पक्ष प्रबळ होण्याकरितां व भाऊंचा पक्ष सर्व बाजूंनीं आयत्या वेळीं दुर्बल होण्याकरितां नानांनीं गुप्त प्रयत्न चालविले. **महाडच्या कारस्थानाच्या बनावांत[1] नानांनीं प्रत्यक्ष असा भाग कोणताच घेतलेला असा दिसला नाहीं व येऊन जाऊन अकलेवर आणि जवळच्या द्रव्यावर त्यांची जशी सर्व मदार[2] होती** त्याचप्रमाणें परशुरामभाऊंच्या नाशाकरतां नानांनीं उभारलेलें हें नवीन कारस्थानही महाडच्या कारस्थानाची सुधारून निर्माण केलेली ताजी आवृत्ति होती. म्हणून या कारस्थानाचीं पाळेंमुळें कशीं होतीं हें महाडच्या कारस्थानाच्या चष्म्यांतूनच निरीक्षण केल्यास तें स्पष्ट दिसणारें आहे.

---

१ व २ नाना फडनविसांचें चरित्र पान १८८ व १९०.

आतांपर्यंत नानांनीं जीं राजकारणें लढविलीं त्यांतून त्यांना यशस्वी मार्गाचे दोन स्पष्ट अनुभव आले. महाराष्ट्रांतील सरदारांत त्या वेळीं शौर्य, पराक्रम, युद्धकला वगैरे गुण सर्वसाधारण मानानें सर्वांत सारखे होते. परस्परांच्या सैन्याच्या कमीजास्त प्रमाणावर व सैन्यांतील फितुरीच्या कमीजास्त मानावर उभयपक्षांमधील जयापजयाचें पारडें फिरत असे. सातान्याचे छत्रपती, करवीरचे महाराज, यांचें सैन्य; अगर पटवर्धन, गोखले, रास्ते, विंचुरकर, प्रतिनिधि, चतुरसिंग वगैरे सरदार यांचें सैन्य एकाच महाराष्ट्रांतून जमविलेलें होतें. कोणत्याही मराठागड्यानें वरील कोणत्याही राजाची अगर सरदाराची नोकरी केली तरी त्याला धर्मबाह्य अगर राष्ट्रतत्वबाह्य म्हणून निंद्य मानतां येण्यासारखी नव्हती. एका घरांत भावाभावांत यादवी माजल्या प्रमाणें यांच्यांतील कलहाचें स्वरूप होतें. म्हणून ज्याच्याकडे फौजेचें जास्त बळ होत असे व ज्याच्या फौजेंत फितुरी होत नसे त्याचा पक्ष बळकट होऊन त्याला विजय मिळत असे. जास्त प्रमाणांत फौजेची जमवाजमव करावयाला फक्त पैशाचें पाठबळ असणें ही मुख्य गोष्ट होती. त्याच एका तत्वावर फौजेचें बळ वाढणें अगर फौजेंतील सैनिकांचें वेतन योग्य वेळीं न मिळाल्यास त्यांत फितुरी होऊन फौजेचें बळ कमी होणें या गोष्टी अवलंबून होत्या. वरील राजांची अगर सरदारांची पैशाच्या अभावीं एकच स्थिति झालेली होती. त्यामुळें ज्याला पैशाचें मुख्य पाठबळ मिळेल, त्याचेंच कारस्थान बिनबोभाट यशस्वी होत असे. हें विजयाचें मुख्य मूळ नानांच्या हातीं असल्यामुळें जिकडे नाना तिकडे विजय अशी स्थिति त्या वेळीं झालेली होती. महाराष्ट्रांत त्या वेळीं नानाशिवाय दुसरा नवकोट नारायण शिल्लक राहिलेला नव्हता व कोणी शिल्लक राहिला असल्यास त्याला नानाविरुद्ध पुढें येण्याचें धैर्य राहिलेलें नव्हतें. महाडचें कारस्थान याच एका मुख्य तत्वावर नानांनीं गुप्तपणें पार पाडलें. 'काट्यानें कांटा काढावयाचा' अगर 'पाहुण्याकडून साप मारावयाचा' हा नानांचा नीतिधर्म असल्यामुळें करवीरकरांस सर्व बाजूंनीं मदत करून भाऊंचा सत्यानाश परभारें नानांनीं कसा करविला हें पुढील हकीकतीवरून दिसून येईल.

१६. नाना शिंद्यांच्या कैदेंत पडण्यापूर्वी साताऱ्याचा किल्ला व साताऱ्याचे छत्रपती नानांच्याच ताब्यांत होते. नाना कैदेंत पडल्यानंतर साताऱ्याच्या महाराजांचें बंड मोडून तो किल्ला हस्तगत करण्याची कामगिरी बाजीरावांनीं सरदार रास्ते व परशुरामभाऊ यांच्याकडे दिली. यामुळें साताऱ्याच्या महाराजांचें बंड मोडणें हें नानांच्या स्वार्थाविरुद्ध व इच्छेविरुद्ध स्पष्ट होतें. महाडच्या कारस्थानापासून करवीरचे महाराज नानांचे पूर्णपणें हस्तक बनले होते. त्याकरितां ते पूर्वीचें वैमनस्य बाजूला ठेऊन रास्ते व पटवर्धन या सरदारांविरुद्ध साताऱ्याच्या महाराजांच्या मदतीला धांवून गेले. परंतु परशुरामभाऊ यांच्या प्रभावशाली पराक्रमापुढें त्यांची डाळ शिजली नाहीं. ते परत करवीरास गेले व साताऱ्याचे महाराज पूर्ववत् किल्ल्यांत बंदिवान होऊन राहिले. महाराजांचा भाऊ चतुरसिंग हा त्या वेळीं साताऱ्याहून पळून गेला व तो करवीरकरांच्या आश्रयास राहिला, हा इतिहास मागील प्रकरणांत आलाच आहे. साताऱ्याचें बंड मोडून भाऊ कर्नाटकांत गेले त्या वेळीं साताऱ्याच्या बंदोबस्ताची जबाबदारी रास्त्यांवर पडली होती. पुढें नाना कैदेंतून सुटून पेशवाईच्या कारभारांत पुन्हां शिरल्याबरोबर करवीरकरांच्या मदतीनें व नानांच्या प्रोत्साहनानें चतुरसिंगाला जोर आला व त्यानें शिराळ्यास मुक्काम करून प्रतिनिधींच्या कऱ्हाड प्रांतांत लूट, जाळपोळ वगैरे बंडाळीस सुरवात केली. चतुरसिंगाचें हें बंड मोडण्याकरतां रास्त्यांनीं पुष्कळ प्रयत्न केला. परंतु त्यांच्या साताऱ्याजवळ असलेल्या सैन्यावर शिराळ्याहून येऊन छापा घालून चतुरसिंगानें त्यांची दाणादाण उडविली. तेव्हां रास्त्यांनीं प्रतिनिधि व परशुरामभाऊ यांचे चिरंजीव हरीपंत यांची कुमक घेऊन चतुरसिंगाचें पारिपत्य करण्याकरतां करवीरकरांच्या मुलुखावर स्वारी केली; आणि बत्तीसशिराळ्याची पेठ लुटून जाळून त्या ठाण्यास शह बसविला; व आणखीही गांवोगांव पुष्कळ लुटालूट केली. परंतु करवीरकरांनीं पुणें दरबारांत कारवाई चालवून पेशव्यांकडून रास्ते व प्रतिनिधि यांस ताकीद आणली कीं, आमचा हुकूम

नसतां तुम्हीं करवीर राज्यावर स्वारी करण्याचें कारण काय? तुम्हीं आपापल्या ठिकाणीं परत निघून यावें. ती ताकीद येतांच त्या फौजा परत निघून सातारा व कऱ्हाड येथें येऊन राहिल्या.[1]

१७. महाडच्या कारस्थानामुळें करवीरचे महाराज व परशुरामभाऊ यांच्यामध्यें नानांनीं जें शत्रुत्व उत्पन्न करून दिलें होतें व त्यामुळें इतके दिवस करवीरकरांनीं परशुरामभाऊंच्या जहागिरीची जी खराबी केली होती ती इतःपर होऊं नये व त्यांचे संबंध पूर्ववत् सलोख्याचे रहावे अशी बाजीराव यांची इच्छा होती व त्याप्रमाणें नाना कैदेंत पडल्यापासून त्यांचे तसे प्रयत्न चालू होते. भाऊंनीं साताऱ्याचें बंड मोडल्यानंतर करवीरकर स्वस्थानीं गेले. परंतु चतुरसिंगानें त्यांचा आश्रय घेऊन त्यांच्याच मुलुखातून रास्ते व प्रतिनिधि यांच्यावर हल्ले करून त्यांस सतावून सोडण्यास सुरवात केली. तेव्हां रास्ते, प्रतिनिधि व पटवर्धन एकत्र होऊन ते ज्या वेळीं करवीरकरांच्या मुलुखांत चाल करून गेले त्या वेळीं करवीरकर घाबरून गेले व त्यांनीं पेशवे दरबारांत तहाची वाटाघाट सुरू केली. या वाटाघाटींत बाजीरावांचे जुने, विश्वासू व संभावित कारभारी शिवरामपंत थत्ते हे होते. त्यांनीं पेशवे, करवीरकर महाराज व पटवर्धन सरदार यांमधील कलह मिटावे ह्मणून तह घडवून आणला. त्याबद्दलची हकीकत तारीख १५ जानेवारी सन १७९९ रोजीं धोंडो बापूजी जोशी यांनीं पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस पाठविलेल्या पत्रांत पुढीलप्रमाणें आहे. "करवीरकर यांजकडील आत्माराम बुवा ह्मणोन शेणवी वकिलीस हुजूर आले आहेत. ते शिवरामपंत थत्ते यांचे विद्यमानें सरकारांत बोलणें बोलोन कराराच्या यादी ठरल्या. त्यांतील भाव चिकोडी मनोळी दोनी ठाणीं त्यांस देऊन खेरीज तीन लक्षांचा सरंजाम दिला. त्यांनीं सरंजामांत चाकरी हुजूर करावी. याप्रमाणें बोलणें ठरलें. सरकारचा निरोप थत्ते यांचे विद्यमानें जाइला.

---

1. ऐ. ले. सं. पान ५६४८.

लेखकाकडे (नानांकडे) जावयाचें, त्यास तें बोलणें शंकर जोशी यांचे विद्यमानें आहे. तेथें वकील गेले होते. सरकारचा करारमदार ठरला तो त्यांस सांगितला. शंकर जोशी यांसीं नाना बोलिले जे, " तुम्हां-कडे यानीं चाकरी करावी तें राहिलें, आणि तुम्ही हुजूरची चाकरी करावी हें काय कबूल केलें ? असो. जें जालें तें बरेंच आहे. महाडचे मुक्कामीं दोन लक्ष रुपये तुम्हांस देविले ते वेळचें बोलणें असें नव्हतें.[१] " याप्रमाणें पेशवेसरकार व करवीरचे महाराज यांच्या दरम्यान थत्ते यांच्या विद्यमानें घडून आलेला तह नानांनीं उधळून लाविला एवढेंच नव्हे तर बाजीरावांचे जुने कारभारी गोविंदराव काळे व शिवरामपंत थत्ते यांनीं, आपल्या जिव्हाळ्याच्या ' फोडा व झोडा ' या तत्वाचें उल्लं-घन करून पेशवे, करवीरकर व पटवर्धन यांच्यामध्यें सलोखा घडून येऊन शांतता नांदावी व वैरभाव नष्ट व्हावा म्हणून प्रयत्न केल्याच्या घोर अपराधाबद्दल नानांनीं त्यांस कैद करून डोंगरी किल्ल्यावर पाठविलें. काळे व थत्ते यांस कैद करण्याचें नानांचें खरें राजकारण हें होतें. काळे व थत्ते हे नानांना पुन्हां कैद करण्याच्या कटांत आहेत व ते शिंदेबाया व शिंदे यांचें समेट करूं देत नाहींत असें जें लौकिकांत नानांनीं प्रकट केलें तें ' चोराच्या उलट्या बोंबा ' याला अनुसरूनच होतें. शिंदे व शिंदे-बाया यांच्यांत समेट न होतां ते दोन्ही पक्ष नेहमीं नाना या व्यक्ती-च्याच ओंजळीनें पाणी पीत रहावे, असें जसें नानांचें कारस्थान चालू होतें त्याच नमुन्यावर पेशवे, करवीरकर व पटवर्धन यांच्यामध्यें शत्रुत्व कायम राहून ते तिघेही नाना या व्यक्तीचे कायमचे गुलाम बनून राहतील असें त्यांचें दुसरें कारस्थान चालू होतें. ' महाडचे मुक्कामीं दोन लक्ष रुपये तुम्हांस देविले ते वेळचें बोलणें असें नव्हतें. ' या नानांच्या वरील बोलण्याचा अर्थ हाच होता कीं, महाडच्या कारस्थानापासून करवीरकर हे नाना या व्यक्तीच्या पक्षांत सामील होऊन त्यांच्या आधिपत्याखालीं वागण्याचें

---

१. ए. ले. सं. पत्र नं. ४६३२.

ठरलें असतां या वेळीं पेशवे सरकारचें म्हणजे बाजीरावाचें आधिपत्य मानून ते त्यांच्याबरोबर तहाचे करारमदार ठरवितात हें अयोग्य आहे. बाजीराव यांनीं थत्ते यांचे विद्यमानें करवीरकरांबरोबर जो तह ठरविला होता त्यांत पेशव्यांच्या राज्यास बळकटी आणणारें एक महत्वाचें सरंजामाचें कलम होतें. त्या कलमाप्रमाणें करवीरचे महाराज हे पटवर्धन, रास्ते, विंचुरकर, प्रतिनिधि, गोखले वगैरे सरंजामी सरदारांच्या मालिकेंत येऊन त्यांच्या प्रत्यक्ष आधिपत्याखालीं आपला स्वतंत्रपणा सोडून ते वागणार होते. त्यामुळें त्यांना पेशव्यांच्या आज्ञेविरुद्ध दुसऱ्या सरदारांच्या मुलुखावर आक्रमण करतां येणार नव्हतें या एकाच मुद्यावर पटवर्धन व करवीरकर यांचा कलह शांत होणार होता. परंतु ही गोष्ट नानांना बावडी असल्यामुळें नानांनीं तो तह हाणून पाडला व करवीरकर आणि परशुरामभाऊ यांच्यामधील कलहाग्नींत जास्त तेल ओतून तो भडकवून दिला.

१८. 'तुह्मांकडे याणीं (पेशव्यांनीं) चाकरी करावीत तें राहिलें, आणि तुह्मीं हुजूराची (पेशव्यांची) चाकरी करावी हें काय कबूल केलें?' या वाक्यप्रयोगानें नानांनीं करवीरकरांच्या मर्मस्थानावर 'पायाची कळ मस्तकाला जाऊन झोंबेल' असा तडाका दिला व यापुढें त्यांनीं पेशव्यांबरोबर कसें वागावें याचाही गुरुमंत्र त्यांनीं त्यांना शिकविला. नानांच्या वरील वाक्यांतील स्पष्टार्थ पुढीलप्रमाणें आहे. करवीरकर हे छत्रपती आहेत. श्री शिवाजी महाराजांनीं स्थापन केलेल्या हिंदुपदपादशाहीचे ते मालक आहेत. पेशवे हे त्यांचे चाकर आहेत. असें असतां चाकर पेशव्यांनीं मालक छत्रपतीला आपला चाकर बनवून घेण्याचें निंद्य कृत्य त्यांनीं केलें आहे. नाना जरी पेशव्यांचे चाकर असले तरी बाजीरावांनीं आरंभिलेलें हें छत्रपतींचें विडंबन त्यांना सहन होणारें नाहीं. नाना हे पेशव्याचे चाकर ह्मणजे ते छत्रपतींचेच प्रामाणिक सेवक आहेत. छत्रपतींना नानाचें पूर्ण पाठबळ आहे. तरी छत्रपतींनीं आपला मालकी हक्क गाजवून व आपल्या पेशवे चाकराचें बंड मोडून,

त्यांना पुन्हां करवीरकरांची चाकरी करण्यास भाग पाडावें हें धनी छत्रपतींचें कर्तव्य आहे. नानांचा हा पेशव्यांविरुद्ध असलेला गुरुमंत्र करवीरकरांना सोळा आणे पटला यांत संशय नाहीं. पेशव्यांच्या गुलामगिरींतून मुक्तता होण्यास ही सुवर्ण संधि आहे असें त्यांना वाटलें व ते आपलें सर्वस्व पणाला लावून पेशव्यांच्या वर्चस्वाच्या नाशाला प्रवृत्त झाले. या बाबतींत नानांची अक्कल व पैसा करवीरकरांकडे पाणी भरणार असल्यामुळें त्यांचें खरें हृदय काय आहे याचें सिंहावलोकन करण्याची करवीरकरांना त्या वेळीं विस्मृति झाली यांत संशय नाहीं. माधवराव पेशव्यांकरतां साताऱ्याच्या छत्रपतींकडून पेशवाईचीं वस्त्रें आणण्याचें राघोबादादांनीं ठरविलें असतां 'आपण पेशव्यांचे नोकर. साताऱ्याच्या महाराजांशीं आपला अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं. [१]' असें म्हणणारे नाना होते हा इतिहास करवीर दरबाराला माहीत नव्हता असें नाहीं. सातारच्या प्रत्यक्ष छत्रपतींना नानांनीं किल्ल्यावर कसें बंदोबस्तानें कैदेंत ठेवलें होतें व त्यांना किल्ल्याबाहेर फिरण्याकरतां निघण्याचीसुद्धां कशी चोरी होती हेंही करवीरच्या दरबाराला अवगत होतें. श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची नात सून जिजाबाई या स्वतंत्रपणें करवीरचा राज्यकारभार करीत असतां त्यांना संतती नसल्यामुळें त्यांनीं पेशवे सरकारकडे दत्तकाची परवानगी मागितली. त्या वेळीं नाना वगैरे मंडळींनीं करवीर संस्थान अपहार करण्याच्या दुष्ट हेतूनें कशी कोल्हेकुई केली, पण राघोबादादांच्या न्यायप्रियतेमुळें जिजाबाईंना दत्तक घेण्याची कशी परवानगी मिळाली, हाही इतिहास करवीर दरबारला जुना झालेला नव्हता. महादजी शिंद्यांनीं दिल्लीच्या पादशहाकडून सवाईमाधवरावांना जीं पदव्यांचीं फर्मानें आणलीं. त्यांत सवाईमाधवराव यांस 'राजाधिराज' असें संबोधिलें असतां त्याला साताऱ्या छत्रपतींचा विरोध येईल म्हणून नानांनीं हरकत घेतली. पण त्या वेळीं सातारच्या महाराजांबरोबर करवीरच्या महा-

---

१. देवकृत नाना फडनविस यांचें चरित्र पान १७.

राजांचाही विरोध येईल अशी हरकत नानांनीं घेतलेली नव्हती. महादजी शिंद्यांनीं सातारच्या महाराजांची त्या वेळीं परवानगी आणली पण करवीरच्या महाराजांची आणली नव्हती. असें असतां करवीरच्या महाराजांबद्दल त्या वेळीं नानांनीं आपली राजनिष्ठा दाखविली नाहीं हाही इतिहास करवीर दरबाराला ताजाच होता. असें असतां राजनिष्ठेचा उमाळा या वेळीं नानांना कसा व कां आला एवढी जरी शंका करवीरकरांना आली असती तरी भावी कालांत होणारे दुष्परिणाम टळले असते. परंतु नानांच्या मात्रेचे वळसे इतके जालीम असत कीं ते दिल्याबरोबर रोग्याची विवेकबुद्धीच भ्रष्ट होऊन जात असे. नानांनीं पेशव्यांविरुद्ध याप्रमाणें करवीरकरांचा पक्ष घेतला व परशुरामभाऊंचा सर्वस्वी नाश करण्याची त्यांच्याकडून कारवाई सुरू करविली.

१९. नानांनीं परशुरामभाऊंचा नाश करण्याकरतां ज्या चतुर्द्वारी चक्रव्यूहाची रचना केली, त्याचें रक्षण करणारे नानांच्या पक्षांतील कोण कोण वीर होते व त्यांनीं नानांच्या केवळ एकसूत्री आज्ञेप्रमाणें आपापली कामगिरी कशी कशी बेमालुम बजाविली हें येथें पहाणें जरूर आहे. नानांच्या या कारस्थानांतील एक अत्यंत महत्वाची गोष्ट अशी होती कीं, या बाबतींत ज्यांनीं ज्यांनीं नानांना मदत केली, त्यांना त्यांना ती आपण केलेली मदत कशाकरतां होती याचा नानांनीं कोणालाच व कसलाही सुगावा लागूं दिला नव्हता. नानांच्या आज्ञेप्रमाणें त्यांनीं सोंपविलेल्या कामगिरीची अंमलबजावणी करणें एवढेंच त्यांच्या मदतनिसांचें कर्तव्य होतें. नानांच्या या मदतनिसांनीं आपापलें कर्तव्य कसें कसें बजावलें हा इतिहास पुढें ओघानें येणारच आहे. इंग्रज, निजाम भोंसले हे महाडच्या कारस्थानापासून विशेष प्राणप्रिय बनलेले दोस्त नानांच्या मुठींत होतेच. शिंदे व शिंदेशाही हीं शिंदेशाहीचीं दोन शकलें करून त्यामध्यें समेट घडवून देण्याच्या मुद्यावर दोन्हीही शकलांना नानांनीं आपल्या लगामीं जखडून ठेवलेंच होतें. महाडच्या कारस्थानापासून करवीरच्या महाराजांना नानांनीं आपल्या नक्रदाढेंत पकडलेंच होतें. बाजीराव, अमृतराव व चिमाजी या तीनही पेशव्यांना आश्रित बनवून त्यांच्या गळ्यांतील शृंखला व नाकांतील

वेंसणी आपला परमप्रिय दोस्त नारोपंत चक्रदेव या दरवेश्याच्या हातीं दिल्याच होत्या. तारीख २७ डिसेंबर सन १७९८ च्या पत्रांतील मजकूर 'श्री॥ राजश्री[1] पंतप्रधान (बाजीराव पेशवे) ह्यांजपाशीं मुखत्यार चक्रदेव आहेत. आणखीं कोणाचें कांहींएक विकावयाचें नाहीं. हे सांगतील ते पूर्व दिशा' याप्रमाणें आहे. अशा प्रकारें बाजीराव यांचे मानेवर नानांनीं चक्रदेवांचा काळभैरव बसविला होता. त्यामुळें नानांच्या कारस्थानांतील कोणत्याही कागदपत्रावर 'बाजीराव महाराज ! तुम्हांला सही केली पाहिजे' असें चक्रदेवांनीं सांगतांच डोळे मिटून बाजीरावांना तसें करावें लागत होतें. या वेळीं नारोपंत चक्रदेव यांना बाजीरावांचे मुखत्यार बनवून त्यांच्या पेशवेखात्याचा संबंध लौकिकांत आपल्यापासून अगदीं अलग आहे असें दाखविण्यांत नानांचा पाताळयंत्री कोणता मनसुबा होता तो पुढें योग्य ठिकाणीं येईलच. एकंदरींत नानांच्या चालू कारस्थानांत बाजीरावांकडून नाना जें जें करवीत होतें, तें तें त्यांना बिनबोभाट करणें प्राप्त होतें. रास्ते, विंचुरकर प्रतिनिधि, सर्व पटवर्धन सरदार यांना नानांच्या आज्ञेप्रमाणें वागणें प्राप्तच होतें. सातारच्या महाराजांचा भाऊ चतुरसिंग हा नानांच्या अर्ध्या वचनांत होताच. एकंदरींत भाऊंचा नाश करण्याकरतां नानांनीं पूर्वी जी महाड मुक्कामीं (खरेशास्त्र्यांच्या भाषेंत) सर्कशीवजा कारस्थानाची स्थापना केली तीच ही सर्कस नवीन सजावटींत भाऊंच्या पूर्ण नाशाकरतां नानांनीं पुण्यास आणली व सर्कशीच्या रिंगमास्तराचें काम त्यांनीं फक्त स्वतःआपल्याकडे घेऊन प्रयोग करावयास पुढीलप्रमाणें सुरवात केली.

२०. या वेळीं कलकत्त्याचे गव्हर्नरजनरल सर जॉन शोअर हे सेवानिवृत्त होऊन त्यांचे जागीं लॉर्ड मॉर्निंगटन ऊर्फ मार्किस वेलेस्ली हे आले. इतके दिवस हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या राज्यपद्धतीची मांडणी अशी होती कीं, तादृश अडचण पडल्याशिवाय परकीय राजसत्तेच्या राज्यकारभारांत ढवळाढवळ करावयाची नाहीं. परंतु या वेळेच्या हिंदुस्थानांतील इतर राजसत्तांच्या

---

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ४४५४.

कारभारांतील चालू असलेल्या अंदाधुंदीमुळें आपल्या राज्यसंवर्धनाला व राज्यकारभाराला पदोपदीं अडचणी उत्पन्न होतील ह्मणून मार्क्विस वेलस्ली यांना पूर्वीच्या राज्यकारभारपद्धतींत बदल करून घेण्याचा निर्णय घ्यावा लागला. याचें मुख्य कारण असें होतें कीं, इंग्रजांना टिपूचें भय वाटत होतें. या वेळीं युरोपखंडांत इंग्रज व फ्रेंच यांचें युद्ध सुरू होतें. नेपोलियन बोनापार्ट हा इंग्रजांना महाशत्रू उत्पन्न झाला होता. त्यानें या वेळीं आफ्रिका खंडांत पदार्पण करून इजिप्तमध्यें यशस्वी मोहीम चालविली होती. टिपूला फ्रेंचांचें सहाय्य होतें. फ्रेंच पलटणें टिपूच्या नोकरींत होतीं. हिंदुस्थानांतही इंग्रजाबरोबर लढाई सुरू व्हावी असें नेपोलियनला वाटत होतें. त्यानें टिपूला पत्र[1] पाठवून उत्तेजनही दिलें होतें. याकरतां टिपूबरोबर नवीन तह करून त्याला फ्रेंचांविरुद्ध आपला मित्र बनवून घेणें अगर तो मित्र होत नसल्यास त्याचें पारिपत्य करणें हें इंग्रजांचें आद्य कर्तव्य होऊन बसलें होतें. ह्मणून इंग्रजांनीं त्याच्याबरोबर तहाची वाटाघाट सुरू केली. परंतु नेपोलियनच्या पाठबळाच्या विश्वासानें टिपूनें इंग्रजांची मागणी फेटाळून लाविली. त्यामुळें इंग्रजांना असें वाटलें कीं, जर टिपूनें शिंदे व निजाम यांचें सहाय्य घेतलें, तर त्यापासून आपलें रक्षण होणें अशक्य आहे. पेशवे सरकार मात्र टिपूला मदत करणार नाहीं, याचा विश्वास इंग्रजांना होता. याचें कारण नाना व इंग्रज हे महादजीच्या कारस्थानापासून एकचित्त झालेले होते. परंतु ते या प्रसंगीं शिंद्यांच्या कैदेंत होते. अशा स्थितींत टिपूचें पारिपत्य करण्याकरतां नानांना शिंद्यांच्या कैदेंतून मुक्त

---

1 History of India, by C. F. DeLa Fosse page 239, (Tipu, relying on the promises of French assistance and encouraged by a friendly letter he had received from the great Nepoleon himself, who was conducting at the time his famous campaign in Egypt, treated the British envoy with contempt.)

करवून व शिंदे आणि निजाम यांचा मिलाफ होऊं न देतां शिंद्यांना पुण्याहून हिंदुस्थानांत घालवून लावण्याची मसलत करणें इंग्रजांना प्राप्त होतें. ह्मणून इंग्रजांच्या वाकिलानें शिंद्यांस कळविलें कीं, काबूलचा राजा जामन शाहाशिंग[1] हा शिंद्यांशीं लढाई करून त्यांचें हिंदुस्थानांतील राज्य घेण्याचा बेत करीत आहे तरी त्यांनीं आपल्या राज्याच्या बचावा-करतां पुणें सोडून हिंदुस्थानांत निघून जावें. काबूलच्या राजानें त्याप्रमाणें पंजाबवर स्वारी केली व तेथील शीख संस्थानिकांचा पराभव केल्या-नंतर त्याचा दिल्लीवर चाल करून येण्याचा इरादा स्पष्ट दिसूं लागला. त्यावरून शिंद्यांचा तिकडील सरसेनापती मुसापिरू यानें युद्धाची तयारी केली व दिल्लीस जलदीनें निघून येण्याविषयीं शिंद्यांस पत्रें पाठविलीं.[2] इंग्रजांच्या या मसलतीमुळें शिंद्यांना हिंदुस्थानांत जाणें इष्ट वाटलें. पण पुणें सोडावयाचें ह्मणजे त्यांना पैशाची जरूरी होती. नानांना बंधमुक्त करून त्यांची पेशव्यांच्या राज्यकारभारावर स्थापना केल्यास पंचवीस लक्ष रुपये मिळतात व आपल्या राज्याच्या बचावाकरतां आपलें हिंदु-स्थानांत जाणें होतें. शिवाय नानांना बंधमुक्त करण्याच्या इंग्रजांच्या विनंती-लाही मान दिल्यासारखा होतो असें पाहून शिंद्यांनीं त्याप्रमाणें नानांची मुक्तता केली. ' नानांच्या बंधमुक्ततेस इंग्रजांची मदत[3] झाली. ' त्यामुळें बाजीरावाबरोबर नवीन करारमदार करून घेण्यास इंग्रजांस जोर आला. इंग्रजांचें ह्मणणें असें होतें कीं, ' १ इंग्लिश लोकांनीं बाजी-रावांचे सहाय्यास फौज द्यावी, २ त्या फौजेस बाजीरावानें पगार द्यावा, ३ नाना फडनविसांस पुन:राज्यकारभारावर नेमावें, व ४ शिंद्यांस पुण्यांतून घालवून द्यावें.[4]

२१. नाना पूर्वी कैदेंत असतांना शिंदे व बाजीराव यांच्यामध्यें शिंदे-बायांच्या बाबतींत ज्या वेळीं मतभेद उत्पन्न झाला त्या वेळीं नानांना बंध-

---

१. नाना फडनवीस यांची बखर पान १७१. २. नाना फडनविसांचें चरित्र पान २४९. ३. मराठे व इंग्रज पान ९२.

४. नाना फडनविस यांची बखर पान १७२.

मुक्त करून बाजीराव यांस शह द्यावा अशी वाटाघाट सुरू झाली होती. आपले रक्षणकर्ते शिंदे आपल्या विरुद्ध झाले आणि नाना कैदेंतून सुटले ह्मणजे आपल्या रक्षणाची काय वाट असा बाजीराव यांना पेंच पडला होता. व त्याला तोड ह्मणून बाजीरावांनीं इंग्रजांबरोबर बोलणें सुरू केलें होतें. त्याचा भावार्थ असा होता कीं, " सध्यां पेशव्यांच्या राज्यांत अंतःकलहानें अंदाधुंदी माजून पेशव्यांचा अंमल ढिला झाला आहे. तो पूर्ववत् सबळ करण्याकरतां इंग्रजांनीं आपली कांहीं पलटणें बाजीराव यांचे दिमतीस द्यावीं. " परंतु त्या वेळीं बाजीराव यांची ही मागणी इंग्रजांनीं नानांच्या मैत्रीखातर पण पार्लमेंटाच्या कायद्याचें बुजगावणें पुढें करून अमान्य केली होती. असें असतां पुढें थोड्याच दिवसांनीं टिपूचें प्रकरण उपस्थित होतांच बाजीरावां-बरोबर सलोख्याचा तह घडवून आणण्याच्या अटी इंग्रज स्वेच्छेनें मांडतात ही अघटित घटना कांहीं तरी गूढ कारस्थानाची असावी असा संशय बाजीरावांना येणें अगदीं स्वाभाविक होतें. बाजीरावांना इंग्रजांच्या वकीलानें घातलेल्या प्रस्तुतच्या वरील चार अटी पाहतां, इंग्रज व नाना हे उभयतां एक होऊन पेशव्यांचें राज्य गिळंकृत करणार अशी बाजीराव यांची प्रामाणिक समजूत झाली व त्याच्या निवारणार्थ परकीय इंग्रजांच्या घरांत पेशव्यांचें राज्य जाण्यापेक्षां, स्वजातीय नानांच्या घरांत तें गेलेलें बरें असा आपल्या मनाशीं निर्णय ठरवून बाजीराव नानांना शरण गेले. बाजीरावांनीं नानांचे घट्ट पाय धरले व डोळ्यांत आंसवें आणून राज्य संभाळण्याविषयीं त्यांनीं त्यांची प्रार्थना केली. हा इतिहास पूर्वी आलाच असल्यामुळें त्याची संगती सहज लक्षांत येईल.

२२. बाजीरावांनीं तत्वतः अधिकारसंन्यास केल्यामुळें पेशवाईच्या कारभारांत नानांचा प्रताप—रवी उदय पावला. त्याबरोबर इतर सरकारांची, सरदारांची वगैरे ग्रहोपग्रहमालिका त्यांच्या भोंवतीं फिरूं लागली. नानांच्या बुद्धि व कनक या अद्भुत सामर्थ्यांच्या आकर्षणानें त्यांच्या ग्रहोपग्रह-मालिकेला चालन मिळालें व त्याप्रमाणें राजकारणाचीं सूत्रें एका सरळ

रेषेंत हाळूं लागली. इंग्रजांनीं बाजीरावांस सादर केलेल्या प्रस्तुतच्या चार अटींचा विचार करणें आतां नानांना क्रमप्राप्त झालें. इंग्रजांच्या चार अटींपैकीं 'इंग्लिश लोकांनीं बाजीरावांचे सहाय्यास फौज द्यावी,' ही पहिलीच अट नानांच्या राजकारणतत्वाला आमूलाग्र विरुद्ध होती. या अटीमुळें इंग्रज हे बाजीरावांना पेशवाईचे धनी व नानांना कारभारी ह्मणजे त्यांचे चाकर मानून बाजीरावांच्या रक्षणाची हमी घेणार होते. या अटीनें बाजीरावांच्या मताविरुद्ध प्रत्यक्ष नाना जरी गेले असते, तरी तेही राजद्रोही ह्मणून शासनाला इंग्रजांकडून पात्र झाले असते. नानांचें पूर्वीपासूनचें राजकारण राजसत्ता उलथून पाडण्याचें होतें. माधवराव पेशव्यांच्या अंतकाळीं नारायणरावांचा सांभाळ करून पेशवाईचा कारभार करण्याची छातीला हात लावून नानांनीं आपली जी उत्सुकता व दक्षता दाखविली त्यांतील गर्भित हेतु हाच होता. पुढें त्यांच्या इच्छेप्रमाणें तसें माधवरावांनां घडवून न आगल्यामुळें नारायणरावांचा वध करवून व राघोबादादांना वनवास घडवून बारभाईंच्या कारभाराची जी मांडणी नानांनीं केली ती याच तत्वावर होती. श्री छत्रपती शिवाजी महाराजांनीं हिंदुपदपादशाहीच्या घटनेंत छत्रपती व अष्टप्रधान यांच्या पृथक् पृथक् अधिकाराच्या ज्या सीमामर्यादा घातल्या, त्यांत वरिष्ठ अधिकाराचें स्थान छत्रपतीला ठेवण्यांत आलें होतें. नानासाहेब पेशव्यांनीं या तत्वाचें उल्लंघन करून वरिष्ठ अधिकाराचें स्थान अष्ट प्रधानांपैकीं एकट्याच पंत प्रधानाकडे घतलें. नानासाहेब पेशव्यांच्या या कृतींत नानांनीं पहिल्यानें बारभाई मंडळ स्थापन करून फरक केला. या फरकामुळें बारभाई मंडळाच्या अधिकारमर्यादेंत पंतप्रधान येऊन ते नामधारी बनले. सवाईमाधवराव जोंपर्यंत नामधारी होते व जोंपर्यंत नानांच्या ह्मणजे बारभाई मंडळाकडून बनवून घेतलेल्या वह्र मुखत्याराच्या अधिकारमर्यादेंत ते वागत होते तोंपर्यंत सर्व ठीक होतें. परंतु घाशीरामाच्या वधापासून सवाईमाधवरावांनीं नानांची अधिकारसीमामर्यादा उल्लंघण्यास सुरवात केली त्या वेळे-

पासून नानांच्या तत्वाप्रमाणें सवाईमाधवराव हे गुन्हेगार ठरूं लागले. गुन्हेगाराला मदत करणारे शिंद्यांप्रमाणें इसमही अर्थात् नानांचे गुन्हेगार झाले व त्या तत्वाला अनुसरून नानांनीं त्या दोघांनाही शासनें दिलीं. नानांच्या या कृतीवरून व बाजीराव पेशव्यांना नामधारी करून बसवीतोंपर्यंतची नानांचीं कारस्थानें पहातां नाना हे राजसत्ता उलथून पाडण्याच्या तत्वाचे प्रवर्तक होते हें स्पष्ट दिसून येईल. नाना हे मोठे मुत्सद्दी आहेत अशी त्यांची कीर्ति हिंदुस्थानाबाहेर इंग्लंड व फ्रान्स या देशांत पसरलेली होती. नारायणरावांचा वध होऊन राघोबादादा इंग्रजांच्या आश्रयास जाऊन राहिल्या-नंतर ह्मणजे इ. स. १७७७ मध्यें फ्रेंचांचा वकील बुलीन ह्यास नानांनीं आपल्या दरबारीं मोठ्या डामडौलानें पुण्यास ठेवलें होतें. हे युरोपखंडांतून इतक्या दूरवर आलेले वकील परकीय राजदरबारांतील राजकारणपद्धतीचा चांगला अभ्यास करीत असत व त्यांतील बऱ्या वाईट गोष्टींचें पृथःकरण करून तें आपल्या देशास कळवीत असत. त्यामुळें इंग्रजांच्या वकिलाकडून इंग्लंडला व फ्रेंचांच्या वकीलाकडून फ्रान्सला हिंदुस्थानांतील प्रमुख राजसत्तांच्या कारभारांची माहिती होत असे. नाना कारभारांत असतां पेशव्यांवर म्हणजे प्रत्यक्ष राजावर 'त्यांचें आचरण नीट नाहीं; ते बहुत द्रव्य व्यर्थ खर्च करतात.' त्यामुळें कर्जाचा बोजा वाढून सरकारी खजिना कोरडा पडतो. तो भरण्याकरतां अमानुष अशा पट्या प्रजाजनांवर लादतात[२] वगैरे' नाना आरोप करीत होते. हे प्रत्यक्ष कारभाऱ्यांनीं आपल्या राजाच्या विरुद्ध केलेले उघड उघड आरोप व त्यामुळें प्रत्यक्ष राजांना मिळालेलीं शासनें परराष्ट्रीय चाणाक्ष वकीलांच्या दृष्टिपथांतून बाजूला जाण्यासारखीं नव्हतीं.

२३. नानांच्या या राजशाहीविध्वंसक तत्वाचा प्रतिध्वनि फ्रान्स-मध्यें इ. स. १७९३ मध्यें उमटला. फ्रान्स देशाचा राजा १६ वा लुई हा राज्य करीत असतां त्याच्या उत्पन्नापेक्षां त्याचा खर्च वाढल्यामुळें

१. डफकृत मराठ्यांची बखर पान २५८. २. नाना फडनविसांचें चरित्र पान १९९.

तो कर्जबाजारी झाला होता. त्या वेळीं त्याच्या गरीब प्रजाजनावर निर-निराळ्या डोईजड करपट्टया बसविण्यांत आल्या होत्या. श्रीमंत बडे लोक मात्र करपट्टयांतून निसटून जात होते व ते मजेंत नांदत होते. त्यानें आपल्या राज्यव्यवस्थेकरतां आपल्या प्रजाजनांतील लोकांचें एक मंत्रिमंडळ स्थापन केलें. या मंत्रिमंडळाच्या नियमाप्रमाणें तो वागेना म्हणून त्यास कैदेंत ठेवण्याचा त्या मंडळानें विचार केला. त्यामुळें तो भयभीत होऊन पळून गेला. पुढें कांहीं दिवसांनीं त्याला लोकांनीं धरून आणून पॅरीस शहरांत प्रतिबंधांत ठेवलें. लोक त्याला जरी राजा म्हणत होते, तरी तो राजापेक्षां खरोखर कैद्यासारखाच होता. (Though he was called King still, he was really more like a prisoner than a King [1].) राजाची ही हीन स्थिति पाहून ऑस्ट्रियन व रशियन लोक त्याच्या मदतीस धावून येऊं लागले, तेव्हां फ्रान्सच्या प्रजाजनांनीं आपल्या शत्रूला आपला राजा सामील झाला असा त्याच्यावर आरोप करून त्याचा शिरच्छेद केला व फ्रान्समध्यें लोकशाही सुरू केली. हा फ्रान्सचा इतिहास लक्षांत घेतला असतां नानांच्या राजशाहीविध्वंसक विचारांची व आचा-रांची ती पुनरावृत्तीच होती असें दिसून येईल. त्यांत फरक एवढाच होता कीं, नानांची ‘ नानाशाही ’ केवळ स्वार्थी होती तर फ्रान्समधील ‘ लोकशाही ’ लोककल्याणाची होती.

२४. इंग्रजांनीं मागील चार अटी बाजीरावांना ज्या वेळीं घातल्या, त्या वेळीं इंग्रज व फ्रेंच यांच्यामध्यें युद्ध सुरू होतें. इंग्रज हे राजशाहीचे पुरस्कर्ते होते व फ्रेंच हे लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. नाना आपल्या कारस्थानी तत्वाप्रमाणें फ्रेंचांच्या पक्षाचे होते, पण पेशवाईच्या राज्यकार-भारांतील मदतीच्या जरूरीमुळें व त्याकरितां उत्पन्न झालेल्या मैत्रीमुळें आपण इंग्रजांच्या पक्षाचे आहोंत असें नानांना उघडपणें दाखविणें प्राप्त होतें. नानांचा मनांतून फ्रेंचांकडे ओढा होता परंतु बाह्योपचारी

---

1. Outline of English History by S. R. Gardiner page 348.

त्यांना इंग्रजांच्या मताप्रमाणें वागणें प्राप्त होतें. अशा परिस्थितींत नानांना इंग्रजांनीं घातलेल्या अटींची वासलाद लावावयाची होती; म्हणून नारोपंत चक्रदेव यांना बाजीरावांच्या वहुमुखत्यारीचा अधिकार देऊन त्यांचा निराळा पक्ष नानांनीं लौकिकांत निर्माण केला व आपला निराळा केला. हे याच वेळीं लौकिकांत फक्त दाखवावयाचे दोन पक्ष नानांनीं निर्माण केल्यामुळें इंग्रजांशीं असलेले त्यांचे मित्रत्वाचे संबंध पूर्ववत् कायम राहून आणि त्यांच्या तत्वांत बाध न येतां उलट बाजीरावाबद्दल इंग्रजांचें मन विशेष कलुषित होईल अशी रचना नानांना करतां आली. त्यांनीं बाजीरावांकडून इंग्रजांच्या वकिलास असें वचन द्यावयास लावलें कीं, 'आपण म्हणतां त्याप्रमाणें आम्हीं फौज ठेऊं व आपणांस टिपूशीं लढाई करण्याचा प्रसंग आल्यास आम्हीं मदत[1] देऊं.' अशा प्रकारें इंग्रजांच्या वकीलास बाजीरावानीं वचन दिलें. त्या वेळीं नाना तेथें हजर होते. त्या वकीलास आपण पूर्णपणें इंग्रजांचे पक्षाचे व स्नेहसंबंधाचे आहोंत हें भासविण्याकरितां नानानीं त्या वेळेस बाजीरावांस सांगितलें कीं, 'इंग्लिशांशीं[2] प्रामाणिकपणेंच वागावें, तें न केल्यास नाशच होईल.' याप्रमाणें बाजीरावांकडून इंग्रजांच्या वकीलास वचन देववून व इंग्रजांस टिपूवरील स्वारींत यश मिळावें म्हणून आपणास लागलेल्या तळमळीचें प्रदर्शन करून नानांनीं त्या वकीलाची बोळवण केली.

२५. विलायतेंत इंग्रज व फ्रेंच यांचें युद्ध सुरू झाल्यामुळें, हिंदुस्थानांतील फ्रेंचाचें प्राबल्य नष्ट करावें ह्मणून इंग्रजांचा प्रयत्न सुरू झाला. फ्रेंचांना टिपूचें पाठबळ होतें, ह्मणून त्याच्यासह फ्रेंचांचें पारिपत्य करण्याचा निर्णय इंग्रजांना घ्यावा लागला. टिपूच्या नाशाकरतां दुसऱ्या सरकारांची मदत घ्यावयाची ह्मणजे इंग्रजांच्या डोळ्यांपुढें पेशवे, शिंदे व निजाम हीं तीन सरकारें प्रामुख्यानें येत होतीं. तेव्हां या तीन सरकारांपैकीं एकएक सर-

---

१. नाना फडनविस यांची बखर पान १७६. २ डफकृत मराठ्यांची बखर पान ३३८.

काराशीं अलग अलग तह घडवून आणण्याचें इंग्रजांनीं ठरविलें. त्याप्रमाणें त्यांनीं प्रथमतः निजामाबरोबर इ. स. १७९८ च्या सप्टेंबर महिन्यांत टिपूशीं युद्ध करण्याच्या उद्देशानें तह केला. त्या तहांतील अटी अशा होत्या कीं, 'निजामानें आपल्या जवळचीं फ्रेंच लोकांनीं शिकविलेलीं पलटणें दूर करावीं, आणि फ्रेंच लोक चाकरीस न ठेवावे. याबद्दल एकएका पलटणास हजार हजार लोक अशीं इंग्लिशांकडचीं सहा पलटणें चाकरीस ठेवावीं. पेशव्यांशीं व तुम्हांशीं कांहीं एक संबंधें वाद पडला असतां आम्हीं तो कलह तोडावयाचा उद्योग[1] करूं.' याप्रमाणें निजामाबरोबर तह करून इंग्रजांनीं एक प्रकरण पहिल्यानें निकालांत काढलें. आतां राहिले पेशवे व शिंदे. या दोघांपैकीं नाना हे इंग्रजांचे परममित्र बनलेले असल्यामुळें त्यांच्याबरोबर वरीलप्रमाणें तहाची भाषा केली. या वेळीं नाना व शिंदे एकदिलच होते; या उभयतांबरोबर इंग्रजांच्या येणाऱ्या अटी एकच स्वरूपाच्या असणार यांत शंका नव्हतीच. कारण शिंद्यांच्या कंपू पलटणी जशा फ्रेंच अंमलदारांच्या हाताखालीं होत्या, तशाच नानांच्याही होत्या. एकादे प्रसंगीं नाना आपल्याजवळील तुटपुंजीं कंपू पलटणें दूर करूं शकले असते, परंतु शिंद्यांचें खरें लष्करी सामर्थ्य या कंपू पलटणींवर अवलंबून असल्यामुळें त्यांना तीं दूर करणें अशक्य होतें. म्हणून पुण्यांतून शिंद्यांना हिंदुस्थानांत परत जाणें भाग पाडावें व नानांच्या मैत्रीमुळें पेशव्यांशीं निजामाप्रमाणें तह घडवून आणावा असा डाव इंग्रजांचा होता. त्यावर वरील प्रमाणें नानांची तोड सुरू झाली होती.

२६. इंग्रजांच्या टिपूवरील मोहिमेंत समश्रमविभागी होण्याचें पेशव्यांनीं अभिवचन दिल्यामुळें त्याचें नाटक इंग्रजांना दाखविणें नानांचें आद्य कर्तव्य होतें. इ. स. १७९२ मध्यें पेशवे, निजाम व इंग्रज या त्रिवर्गांनीं सख्य करून एकसमयावच्छेदें टिपूच्या राज्यावर स्वारी केली, त्या वेळीं पेशव्यांच्या फौजेचें आधिपत्य परशुरामभाऊंकडे होतें. भाऊंच्या दिव्य पराक्रमाची पूर्ण जाणीव इंग्रजांना होती. त्याकरितां इंग्रजांच्या मदतीस पाठ-

---

१. डफकृत मराठ्यांची बखर पान ३३८.

विण्याची नानांची खटपट सुरू झालेली दिसली म्हणजे त्यांना आनंद वाटेल म्हणून नानांनीं आपल्या नाटकाच्या तालिमी घेण्यास सुरवात केली. ' इंग्लिशांनीं टिपूशीं युद्ध आरंभिलें असतां नानानें इंग्लिशांच्या कुमकेस मराठी लष्कर पाठविण्याची योजना[१] केली.' नानांनीं टिपूवरील मोहिमेकरतां परशुरामभाऊंची योजना केली व त्यांनीं करवीरची मसलत सोडून द्यावी म्हणून त्यांची समजूत घातली. ' या करवीरच्या भिकारड्या मसलतींत तुम्हीं मन घालावें हें योग्य नाहीं. यापेक्षां फार मोठी मसलत टिपूवर मोहिम करण्याची आहे, ती तुम्हीं पतकरावी. चवदा लक्ष रुपये तुम्हांस सरकारांत दंड भरावयाचा आहे तो पैका तुम्ही टिपूवर होणाऱ्या या मोहिमेच्या खर्चास लाविला असें धरून तो सरकारांतून तुम्हांस माफ करवितों व आणखी तुमचे दुसरे पुष्कळ फायदे करून[२] देतों.' ' धारवाडचा किल्ला व कर्नाटक प्रांतांत आणखी जहागीर तुम्हांस मिळेल असें नानांचें वचन घेऊन भाऊंनीं हें कार्य (टिपूवरील मोहिमेचें) स्वीकारिलें.[३] ' पूर्वी श्रीरंगपट्टणाच्या मोहिमेंत जो लिटल्साहेब भाऊंबरोबर होता त्याच्या हाताखालीं पूर्वी जितकी फौज होती तेवढीच इंग्लिश फौज नानांनीं देऊन परशुरामभाऊंस जाऊन मिळण्याकरतां तयार[४] केली. याप्रमाणें इंग्रजांना दिसतील व त्यांना ऐकू जातील अशा रंगी तालिमी चालू ठेवल्या.

२७. नानांनीं परशुरामभाऊंच्या वधाच्या पूर्वतयारीकरतां वरीलप्रमाणें नाटकाची जी रचना केली त्यांत करवीरच्या महाराजांचाही एक प्रवेश घालण्यांत आलेला होता. ' करवीरच्या महाराजांचें सामर्थ्य बेतावातांचेंच होतें तरी. आपलें महत्व वाढविण्याची संधि आली असतां ते ती केव्हांही व्यर्थ घालवीत नसत. सन १७९९ च्या प्रारंभीं इंग्रजांचे वकील पुण्यास येऊन पेशव्यांजवळ वाटाघाट करूं लागले कीं, पूर्वीच्या तहांत ठरल्याप्रमाणें

---

१. डफकृत मराठयांची बखर पान ३३८. २. ऐ. ले. सं. पान ५५७९. ३. परशुरामभाऊंचें चरित्र पान ११७.
४. नाना फडनवीस यांची बखर पान १७७.

तुम्ही, आम्हीं व मोंगल मिळून टिपूवर स्वारी करावी. या संधींत महाराजांनीं पेशवे व इंग्रज यांसीं बोलणें लाविलें कीं, आम्हीं या मसलतींत सामील होतों व तुमच्या कुमकेस फौज देतों. टिपूकडून मुलुख व खंडणी मिळेल तिचे वांटणीदार जसे तुह्मीं तिघे तसे आम्हीं[१] चौथे!' करवीरच्या महाराजांचें सामर्थ्य बेताबाताचेंच होतें. परशुरामभाऊंचें व त्यांचें हाडवैर होतें. त्यांनीं त्यांच्या जहागिरींत लूटमार, जाळपोळ वगैरे अनन्वित कृत्यें नवीन करून पूर्वीच्या हाडवैरांत भरपूर भर घातली होती. यावेळीं परशुरामभाऊ कैदेंत नसून ते खुले झाले होते. त्यांच्या हाताखालीं पंचेवीस हजार फौज जय्यत तयार होती. करवीरच्या महाराजांवर मोहीम करण्याची भाऊंची उघड उघड मसलत चालू होती. अशा स्थितींत भाऊंसारखा कृतांतकाळ आपल्या छातीवर बसवून ठेऊन करवीरचे महाराज पेशवे व इंग्रज यांच्या-बरोबर टिपूच्या मोहिमेंत 'आह्मीं तुह्मांस सर्वांच्या बरोबरीनें मदत देतों' अशी भाषा बोलतात व सर्वांच्या बरोबरीनें मुलखाची व खंडणीची मागणी करतात आणि पेशवे व इंग्रज ती मुकाट्यानें ऐकून घेतात, या अद्भुत घटणेनें कित्येक लोक विस्मयचकित झाले असतील ता कित्येक लोकांनीं महाराजांच्या महत्वाकांक्षेचें कौतुकही केलें असेल यांत संशय नाहीं. परंतु नानांच्या कपटकारस्थानांचा प्रवाह लक्षांत घेतां असें दिसून येईल कीं, नानांना आपल्या वचनाप्रमाणें परशुरामभाऊंपासून करवीरच्या महा-राजांचें रक्षण करावयाचें होतें. भाऊंच्या जवळ या वेळीं पंचेवीस हजार फौज होती व त्यांच्या त्या प्रबळ स्थितीपासून करवीरकरांचें रक्षण करावयाचें ह्मणजे नानांच्या संरक्षणपद्धतीला अनुसरून 'उंदराची शिकार करावयाची झाल्यास वाघाच्या शिकारीची तयारी करावयाची' अशी करवीरकरांकडून तयारी करवून घेणें नानांना प्राप्त झालें होतें. ही करवीरकरांची तयारी इ. सन १७९९ च्या जानेवारी महिन्यांत नव्हती हें परांजपे[२] यांच्या तारीख २४ जानेवारी सन १७९९ च्या पत्रावरून दिसून येईल. "कर-वीरवासी महाराजांचा मुक्काम संवदत्तीवर आहे. श्री॥ राजश्री भाऊसाहेब

---

१. ऐ. ले. सं. पान ५६५२. २ ऐ. ले. सं. पत्र नं. ४७३१.

यांचे सैन्यास सहा गांवांचें अंतर आहे. महाराज यांची कस्त भाऊसाहेब यांचे सैन्यावर चालोन जावें अशी आहे. ह्मणून स्वामींनीं लिहिलें त्यावरून श्री।। राजश्री नानांस श्रुत केलें. त्यावरून (नानांनीं) उत्तर केलें कीं, त्याचा मृत्यु आला असेल ह्मणोन अशी बुद्ध धरिली ! राजश्री भाऊंजवळ सामान भारी. गांठ पडली असतां पारिपत्य होईल. " पत्रांतील या मजकुरावरून करवीरचे महाराज परशुरामभाऊंच्या नाशाकरतां किती उतावीळ झाले होते हें दिसून येईल. आणि या वेळीं नाना हे परशुरामभाऊंचें सामर्थ्य किती आहे व करवीरकरांचें किती आहे हें कांटेतोल पद्धतीनें ठरवीत होते हेंही स्पष्ट होतें. नानांना परशुरामभाऊ व करवीरकर या उभयतांच्या हालचालींची खरी माहिती समजत होती व त्याप्रमाणें ते उभय पक्षांच्या फौजेच्या हालचालींचीं सूत्रें बुद्धिबळाचे दोन्ही बाजूचे डाव एकट्यानेंच खेळल्याप्रमाणें चालवीत होते. या वेळीं भाऊंचें सामर्थ्य कमी करण्याची व त्यामुळें करवीरकरांचें वाढविण्याची नानांची आटोकाट खटपट चालू होती. यासंबंधीं वरील नानांच्या पत्रांतच पुढीलप्रमाणें मजकूर आहे. " फौजेचा पेंच भारी ह्मणोन तुह्मीं (भाऊंचे पुण्याचे वकील परांजपे) ह्मणतां, गोष्ट खरी. परंतु इतकी फौज यांचें काम नूतें नसतां ठेविली ! मागेंपासून आह्मीं सांगतच आलों. राजश्री बाबा काळे यांजपाशीं एकदोन वेळां (बोललों कीं) फौज फार ठेऊं नये. आपले बचावापुरती फौज ठेऊन स्वस्थ असावयाचें होतें. तुह्मांजवळही मागें सांगितलेंच होतें. हल्लीं तुह्मीं ह्मणतां फौजेचा पेंच थोर ! उगेच खर्चाखालीं यावें हें काय ? " परशुरामभाऊंच्या फौजेच्या बाबतींत त्यांचें सामर्थ्य कमी करण्याकरतां नानाचे प्रत्यक्ष प्रयत्न कसे चालले होते हें दिसून येईल. एका बाजूनें टिपूच्या मोहिमेकरतां तयारी करावयास पेशवे सरकारकडून भाऊंना आज्ञा पाठवावयाची व दुसऱ्या बाजूनें खर्चास पैसे न देतां फौज कमी करण्याबदल तोंडीं आज्ञा सोडावयाची हे भाऊंचा सर्वस्वी नाश करणारे नानांचे कपटी खेळ चालू होते. भाऊंचें सामर्थ्य कमी झाल्याशिवाय करवीरकरांनीं त्यांच्याबरोबर लढाई देऊं नये अशी नानांची मसलत असल्यामुळें त्यांच्या

प्रेरणेप्रमाणें पुढें भाऊंवर चालून गेलेले करवीरकर फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यांतच मुधोळ, बागलकोट, तेरदाळ, जमखंडी वगैरे प्रांताकडे माघारे [१] फिरले. यावरून भाऊंबरोबर सामना देऊन त्यांचें पारिपत्य करण्याइतकी करवीरकरांची तयारी झाली नव्हती हें नाना पूर्णपणें जाणून होते व त्यांच्या योग्य तयारीची ते खटपट करीत होते. करवीरच्या महाराजांकडून पेशवे व इंग्रज यांच्याकडे टिपूवरील मोहिमेंत आपण मदत करतों अशी जी भाषा सुरू करविली त्यांतील नानांचा अंतस्थ हेतु असा होता कीं, टिपूवरील मोहिमेंत करवीरचे महाराज मदत करणार असल्यामुळें ते आपली फौज वाढवीत आहेत व त्यांना नाना अगर पेशवे सरकार पैशाची मदत करीत आहेत असें लौकिकांत दिसावें, व हें करवीरकरांचें वाढलें जाणारें सामर्थ्य परशुरामभाऊंच्या नाशाकरतां आहे अशी शंका कोणाला येऊं नये हा त्याचा इत्यर्थ होता.

२८. इंग्रजांना टिपूच्या पारिपत्याकरतां पेशव्यांची मदत खात्रीनें मिळणार असा नानांच्या हालचालीवरून त्यांना विश्वास उत्पन्न झाला. परशुरामभाऊंची टिपूच्या मोहिमेवर योजना झाली त्यामुळें त्यांनाही नानांचा विश्वास फिरून उत्पन्न झाला. इंग्रज व परशुरामभाऊ हे या आनंदाच्या विचारांत निमग्न असतां नानांचें आंतून निराळें कारस्थान चालू होतें. इंग्रजांच्या टिपूशीं होणाऱ्या लढाईला प्रारंभ झाल्यानंतर टिपूचा वकील पेशव्यांच्या दरबारीं आला. नाना हे इंग्रजांच्या पक्षाचे आहेत असें लौकिकांत असल्यामुळें पेशवे दरबारतर्फे ह्मणजे बाजीराव यांच्यातर्फे टिपूच्या वकिलांबरोबर वाटाघाट सुरू झाली. ही वाटाघाट ह्मणजे पेशव्यांनीं इंग्रजांस मदत देण्याचें कबूल केलें होतें, ती मदत त्यांनीं देऊं नये व ती न देण्याच्या कामगिरीबद्दल पेशवे टिपूकडून किती नजराणा मागतात व टिपू किती देऊं शकतो यापुरतीच होती हें उघड आहे. टिपूचे वकील पेशवे दरबारांत उघड येतात व जातात व त्यांच्याबरोबर दरबारतर्फे वाटाघाटी होतात हें बरें नव्हे अशी इंग्रजांनीं

१ ऐ. ले. सं. पत्र नं. ४७०८.

पेशवे दरबारची कानउघाडणी[1] बरेच वेळां करीपर्यंत प्रसंग आले होते. यावरून ही वाटाघाट नानांना सोडून नव्हती उलट नानांच्याच सूत्रानें ती चालली होती हें सिद्ध होतें. टिपू व पेशवे यांच्या वाटाघाटींतील मुद्दा टिपूनें पेशव्यांस तेरा लक्ष[2] रुपये देऊन निकालांत काढला. त्याप्रमाणेंच टिपूनें शिंद्यांनाही नजराणा देऊन त्यांची मर्जी संपादन केली.[3] या बाबतींत इंग्रजांचा वकील कर्नल पारमर यानें जेव्हां चौकशी केली, तेव्हां नानांनीं आपल्याला कांहीं माहीत नाहीं म्हणून कानावर हात ठेऊन बाजीरावांकडे बोट दाखविलें व बाजीराव यांना विचारतां त्यांनीं आपल्या कानावर हात ठेऊन 'त्यास हा सर्व दोष नाना फडनविसांकडे आहे' असें सांगून त्यांच्याकडे बोट दाखविलें. एकंदरींत इंग्रजांना नानांनीं 'या बोटावरील थुंकी त्या बोटावर नाचवून' बाजीराव खोटे किंवा नाना खोटे या विचाराच्या बुचकळ्यांत पाडून ठेवलें. पुढें इंग्रजांनीं त्याचा सोक्षमोक्ष लावण्याकरतां पेशवे दरबारशीं ज्या वेळीं पत्रव्यवहार सुरू केला, त्या वेळीं नानांना लेखी उत्तर देणें प्राप्त झालें. 'टिपूचे वकील आमच्या दरबारीं होते एवढ्यावरून आम्ही टिपूस सामील होतों हें सिद्ध होत नाहीं. याचें कारण, या देशाचा रिवाजच असा आहे कीं, दोन राजांत लढाई जुंपली असतांही परस्परांचे वकील परस्परांच्या दरबारीं[4] असतात.' या नानांनीं दिलेल्या उत्तरावरून बाजीरावांनीं इंग्रजास मदतीचें वचन दिल्यापासून टिपूकडून तेरालक्ष रुपयांचा नजराणा घेईतोंपर्यंत व पुढेंही नाना एकटेच सर्व कारस्थानाचे कसे चालक होते हें स्पष्ट होतें.

२९. इंग्रजांनीं टिपूच्या पारिपत्याची जी योजना आंखली होती त्यांत शिंद्यांनीं पुणें सोडून हिंदुस्थानांत निघून जावें हा एक त्यांचा हेतु होता. त्याला अनुसरूनच त्यांनीं पेशव्यांशीं बोलणें केलें होतें. त्या बोलण्यांतील एक पक्ष पेशव्यांनीं इंग्रजांस फौज पाठवून मदत करावी हा होता. त्याप्रमाणें नानांनीं तिकडे पाठविण्याच्या फौजेची कशी नाटकी तयारी चाल-

---

१. नाना फडनविस यांची बखर पान १७७. २. डफकृत मराठ्यांची बखर पान ११९. ३. ऐ. ले. सं. पान ५५७४. ४. नाना फडनविसांचें चरित्र पान २५४.

विली होती हें वर आलेंच आहे. दुसरा प्रश्न शिंद्यांस हिंदुस्थानांत घालवून देणें हा असल्यामुळें त्याचाही एक प्रयोग चालू नाटकांत नानांस दाखविणें प्राप्त होतें. बाजीराव जोंपर्यंत शिंद्यांच्या रक्षणाखालीं होते, तोंपर्यंत नानांना शिंदे आपल्या ताब्यांत बाजीरावांना देऊन केव्हां जातील असें झालें होतें. परंतु या वेळीं नानांच्या ताब्यांत बाजीराव पूर्णपणें आल्यामुळें शिंद्यांनीं हिंदुस्थानांत गेलेंच पाहिजे असें नानांना वाटण्याचें कारण नव्हतें. उलटपक्षीं शिंद्यांनीं या वेळीं निघून जाणें म्हणजे नानांचा पक्ष दुर्बल होण्यासारखें होत होतें. या वेळीं परशुरामभाऊंचा नाश करावयाचा हा एकच मनसुबा नानांनीं ठाम ठरविला होता. बाकीचे सर्व मनसुबे व राजकीय संबंध केवळ लौकिकांत दाखविण्यापुरतेच नानांना साधावयाचे होते. करवीरचे महाराज व परशुरामभाऊ यांचें युद्ध सुरू करून दिल्यानंतर पेशव्यांकडून आपल्याला मदत मिळत नाहीं व ते टिपूस सामील झाले आहेत असें समजून इंग्रज व निजाम या उभयतांनीं पेशव्यांविरुद्ध जर आगळीक सुरू केली तर त्याला तोंड देण्याकरतां नानांना शिंद्यांची फारच जरूरी होती. दौलतराव शिंदे व शिंदेबाया यांचे दोन्हीही पक्ष फौजबंद होते व ते परस्परांशीं जरी शत्रुभावानें वागत होते, तरी ते नानांबरोबर मैत्रीनेंच रहात होते. शिंदे व शिंदेबाया असे निर्माण झालेले दोन पक्ष कायम ठेऊनच नानांना आपल्या कारस्थानांत त्यांचा उपयोग करून घ्यावयाचा होता. इंग्रज व टिपू यांचें राजकारण निकालांत येईपर्यंत शिंदे व शिंदेबाया यांच्यामध्यें लढाई जुंपूं नये व ते दोन्ही पक्ष त्यांच्यामधील भावी समरास तुल्यबल सामर्थ्यवान् व्हावे व प्रसंगविशेषीं त्यांच्या सामर्थ्याचा उपयोग आपल्या कामीं पडावा म्हणून नानांनीं शिंदेबायांस पुण्यांतून बाहेर जाण्याची आज्ञा केली. तुम्हीं लढाई बंद करून जांबगांवास जावें मी तुमचे मुद्दे यथास्थित विचारांत घेऊन तुमचा व शिंद्यांचा तंटा पडला आहे त्याचा खचित निकाल[१] करतों.' ही नानांची आज्ञा होतांच शिंदेबाया आपल्या फौजेसह जांबगांवास निघून गेल्या. त्यामुळें

---

१. ऐ. ले सं. पान ५५५३.

दौलतराव शिंद्यांवरील मानसिक व लष्करी दडपण कांहीं काल तरी नानांनीं कमी करविलें.

३० परशुरामभाऊंना जास्त संकटांत घालण्याकरतां याच वेळीं त्यांच्या-मागें नानांनीं काळभैरवाचा सोटा लाविला. मागें खर्ड्याच्या लढाईचें आधिपत्य परशुरामभाऊ यांना नानांनीं दिलें होतें. त्यांनीं त्या वेळीं निजामाचा पराभव करून त्यास शरण येण्यास भाग पाडलें. त्यामुळें त्याचा दिवाण मशीरउल्मुल्ख यास अपमान सोसून पुण्यास पेशव्यांच्या कैदेंत रहावें लागलें. पुढें महाडच्या कारस्थानाच्या वेळीं नानांनीं मशीरास आपल्या पक्षांत ओढून घेऊन त्यास भाऊंच्या बरोबर विश्वासघाताचें कृत्य करावयास लाविलें. त्यामुळें मशीर व भाऊ हे परस्पर शत्रू बनले होते. आतां भाऊ हे बंधमुक्त झाल्यामुळें करवीरकरांप्रमाणेंच तेही भयभीत झाले होते. मशीरा-सही भाऊंचा नाश व्हावा असें वाटणें स्वाभाविक होतें. भाऊंचा व कर-वीरकरांचा रणसंग्राम चालू असतां जर करवीरकरांचा पराभव होतो असें नानांना दिसून आलें तर आयत्या वेळीं मशीराची मदत करवीरकरांना व्हावी म्हणून त्यांच्याजवळपास मशिराची फौज येऊन रहावी पण ती कोणत्या हेतूकरितां आली हें लौकिकांत प्रकट होऊं नये असा नानांनीं नजरबंदीचा मनसुबा केला. मशीरची फौज करवीरकरांच्या टापूंत बिनबोभाट यावी व त्यांच्या येण्यानें परशुरामभाऊ व पटवर्धन सरदार जास्त जेरीस यावे अशा जोडगोळीचा तो मनसुबा होता. पटवर्धन सरदारांस एकसाली पेशवे सर-कारास भरावी लागत असे. इतके दिवस ती परस्परांच्या सोईप्रमाणें भरली जात असे. परंतु याच वेळीं नानांनीं ती पटवर्धनांकडील एकसाली वसूल कर-ण्याची नवीनच क्लृप्ति काढली. नानांनीं पटवर्धनांकडून एकसालीच्या वसुला-करतां त्यांचा शत्रू जो मशीरउल्मुल्ख यास पावणे दोन लक्षांची वरात देऊन त्यास फौजेसह पटवर्धनांचे मुलुखावर स्वारीस जाण्यास सांगितलें. या वेळीं पटवर्धनांची आर्थिक स्थिति कशी होती व त्यांतच त्यांच्या शत्रूकडून त्यांना पिळून काढण्याकरितां नानांनीं कसे आसुरी उपाय योजिले हें पुढील पत्रावरून

दिसून येईल. हें पत्र पटवर्धनांचा पुण्याचा वकील मोरो आपाजी परांजपे यानें इ. स. १७९९ च्या जानेवारी महिन्याच्या अखेरीस पुण्याहून मिरजेस लिहिलें आहे. तें पुढें दिल्याप्रमाणें आहे.:—

३१. सेवेशीं[1] विज्ञापना ऐसीजे, "सालगु॥ एकसालीबद्दल वरात पाऊण लाख रुपयांची रा॥ बजाबा शिराळेकर यांची जाहली होती. त्यांपैकीं सतरा हजार रुपये पावले आहेत. हल्लीं वरातेचा मजकूर बजाबांनीं मिरजेस लिहिला, त्यास हल्लीं श्री॥ रा॥ बाळासाहेब यांणीं आपणास (नानांस) पत्र लिहिलें आहे. करवीरवासी महाराजांनीं प्रांत उध्वस्त केला. पैशास मांग नाहीं. एकसारखी फौज तीन चार वर्षें (बाळगलेली) आहे. (मिरज हा) सरकारचा नामी किल्ला. गडबडीमुळें शिबंदीही जाजती ठेवणें प्राप्त जाहली आहे. आजपावेतों कर्ज सावकारांचें काढून चाललें. आठ दहा महिने फौजेस अथवा लोकांस रोजमुरे नाहींत. याप्रमाणें प्रसंग जाहला आहे. त्यास सालगु॥ सतरा हजार रुपये सावकाराचे घेऊन दिले ते फिटले नाहींत. त्यास वरात गैरआदा व्हावी. जेणें करून आब राही असा विचार करावा. बजाबांनीं पत्र श्री॥ रा॥ बाळासाहेब यांस लिहिलें त्याची नक्कलही आणली आहे. पहावी." ह्मणोन (नानांस) पत्राची नक्कल दाखविली. त्यावरून त्यांनीं उत्तर केलें कीं, "नक्कल काय पहावी! मींच पत्र याप्रमाणें लिहविलें आहे. ऐवज द्यावा लागतो. एकसाली कोणास सुटली नाहीं. तिकडे पायमल्ली करवीर महाराजांची जाहली म्हणतां, तरी इकडे चाळीस पन्नास कोशामध्यें जो विचार जाहला आहे तो तुम्हीं पहातच आहां! असें असतां ऐवज कोणास सुटला आहे? ऐवज द्यावा लागतो. गैरआदा वरात होत नाहीं." याप्रमाणें राजश्री बाळकृष्णपंतभाऊ असतां उत्तर जाहलें. मजपरोक्ष भाऊ यांणींहि पुसिलें. तत्रापि त्याप्रमाणें उत्तर होतें. रा. बजाबाची गांठ नानाचे वाड्यांत पडली. जवळ राजश्री भाऊ होते. त्यासीं बोललों कीं, हा उगाच वरातेचा खटला आहे. वरातेचा ऐवज यावयाचा नाहीं. म० निल्हेनीं सांगितलें कीं, **परभारे**

---

1 ऐ. ले. सं. पत्र नं. ४६८८.

वरात नबाबाकडे दिली आहे. वरातेच्या वसुलास फौज निघाली आहे. आज तागाईत मंगळवेढें येथें आली असेल. याप्रमाणें बजाबा बोल्ले." या पत्राखेरीज दुसऱ्या तारीख १ फेब्रुवारी सन १७९९ च्या पत्रांत पुढील मजकूर[1] आहे. "नबाबाकडील फौज करकंबें मंगळवेढें या समीप आली आहे. स्वामीकडील (पटवर्धनांचे) सरंजामाचे महालास उपद्रव करून वसूल घेतील व गांव घेतले आहेत तेही घेतील व मशीरमुल्क यांस पावणे दोन लक्षांची वरात दिली होती त्यापैकीं सव्वा लक्ष रुपये मशार निल्हे यांस स्वामींकडून (पटवर्धनांकडून) पावले. बाकीचे पन्नास हजार रुपये, व्याज व मनोती व बट्टा येणें राहिला. त्याजविषयीं नबाबाकडील फौज उपद्रव करतील. याजकरितां त्याचा फडशा पडावा व राजश्री बजाबा याचे वरातीपैकीं सत्वा हजार रुपये पावले आहेत. बाकीचे येणे रुपये राहिले आहेत. देवावयाची आज्ञा व्हावी" याप्रमाणें पटवर्धन सरदारांच्या मागें त्यांचा दुसरा शत्रू निजाम याच्या हातीं नानांनीं काळभैरवाचा कर्जवसूलीचा सोटा देऊन पाठविलें. यावरून परशुरामभाऊंशीं मित्रत्वाचा सलोखा घडवून आणणारे नाना मनांतून त्यांचें वैर साधण्याकरतां कसे प्रयत्न करीत होते हें या दोन पत्रांतील मजकुरावरून सहज लक्षांत येईल.

३२. शिंद्यांनीं या प्रसंगीं हिंदुस्थानांत निघून जाणें नानांच्या योजनेप्रमाणें अयोग्य होतें; परंतु त्यांनीं पुणें सोडून जाऊं नये या मसलतीच्या मुळाशीं आपण आहों हें इंग्रजांना समजूं नये, उलट शिंद्यांना पुण्याहून घालवून लावण्याचा आपण सारखा प्रयत्न करीत आहोंत असें त्यांना दिसावें असा नानांचा दुहेरी प्रयत्न चालू झाला. शिंद्यांना ठेऊन घेण्याच्या व टिपूला मदत करण्याच्या मुळाशीं बाजीराव आहेत व त्यांना घालवून लावण्याच्या व इंग्रजांना मदत करण्याच्या मुळाशीं नाना आहेत अशी साधक बाधक योजना लौकिकांत दाखविण्यास सुरवात झाली. नानांच्या या भ्रमाविभ्रम उत्पन्न करणाऱ्या मसलतीच्या योज-

---

१. ऐ. ले सं. पत्र नं. ४६९१.

नेमुळें लौकिकांत भुलभुलय्याचें प्रदर्शन दिसूं लागलें. "बाजीरावांस वाटलें कीं, परशुरामभाऊंनीं मागितल्याप्रमाणें त्यांस देऊन टिपूस उत्तेजन दिल्यानें या दोघांस फसवून कांहीं कमजास्ती दिसल्यानें अमका पक्ष स्वीकारिला असतां ठीक होईल असें आपल्यास समजून येईतोंपर्यंत पक्ष स्वीकारण्याचें लांबवितां येईल. असा बाजीरावांनीं निश्चय केला, तरी टिपूचा पक्ष स्वीकारावा, असा त्यांचे बुद्धीचा निश्चय झाला. शिंद्यांनीं व बाजीरावांनीं मिळून निजाम अल्लीवर घाला घालावयाचा बेत करून यांत रघूजी भोंसल्यास घ्यावें असें इच्छिलें. व इंग्लिश लोकांनीं निजाम अल्लीशीं नवा तहनामा केला आहे त्याप्रमाणें ते त्याचा पक्ष स्वीकारून त्यास मदत देतीलच. ती दिल्ही ह्मणजे मराठे लोक टिपूचा पक्ष स्वीकारून त्यांस मदत देणार असें प्रसिद्ध करावें असें योजिलें. मार्कीस वेलसली यांस पेशव्यांचे हे संकेत समजल्यावरून त्यांनीं रघोजी भोंसले यांस निजाम अल्लीशीं तह केला त्यांत भागीदाराप्रमाणें घ्यावें ह्मणून यत्न[1] केला." या माहितीप्रमाणें इंग्रज व निजाम यांच्या पायांत साप सोडण्याकरतां व टिपूस उत्तेजन येण्याकरतां बाजीराव, शिंदे व भोंसले यांच्या कटाची माहिती प्रसिद्ध करून सर्वांत भुलभुलय्याचे खेळ चालू होतील व त्यामुळें आपलीच तवढी प्रतिष्ठा वाढून आपल्याच सूत्रानें सर्व नाचूं लागतील अशी ही नानांची कळसूत्री मसलत होती.

३३. शिंदेबाया निघून गेल्यानंतर दौलतराव शिंद्यांना हिंदुस्थानांत घालवून लावल्याचें नाटक नानांना करून दाखविणें प्राप्त होतें. त्याप्रमाणें नानांनीं शिंद्यांबरोबर बोलणें लावून त्यांनीं निघून जावें अशी त्यांना निकड लाविली. शिंद्यांना नानांकडून आतांपर्यंत पंचेवीस लक्ष रुपये रोख मिळाले होते. नानांना कैदेंत टाकल्यानंतर सुमारें एक कोट रुपये त्यांनीं पुण्यास निरनिराळ्या नानांच्या पक्षांतील लोकांकडून वसूल केलेच होते. टिपूच्या वकिलाकडून पांच दहा लक्ष रुपये गुप्तदान ह्मणून शिंद्यांनीं घेतलेच

१ नाना फडनवीस यांची बखर पान १७८.

होते. असें असूनही शिंदे जर हिंदुस्थानांत जात असतील व त्यांना जाण्याच्या खर्चाबद्दल जर पैशाची जरूरी असेल, तर त्यांस पस्तीस लक्ष रुपये आम्ही देण्यास तयार आहों असें नानांनीं जाहीर केलें. परशुरामभाऊंबरोबर नाना पुनः स्नेह जोडल्याचें लौकिकांत दाखवितात, पण त्यांची पैशाकरतां दीन स्थिति झाली असतां व त्यांनीं पैशाच्या मदतीकरतां अनेक वेळां नानांची प्रार्थना करून दातांच्या कण्या करून घेतल्या तरी, त्यांनीं भाऊंना एकाही कपर्दिकेची मदत दिली नाहीं. उलट त्यांच्यावर निरनिराळ्या वराती देऊन त्यांच्या मागें त्यांच्या शत्रूचे भुंगे लाविले आहेत. असें नानांनीं रंगविलेलें भाऊंचें चित्र एका बाजूला दिसतें तर नानांना कैदेंत घालणारे त्यांचे शत्रू शिंदे यांची पंचवीस लक्ष रुपये देऊन बोळवण केल्यानंतरही त्यांस पस्तीस लक्ष रुपयांची कर्णासही लाजविणारी मदत देण्याचे ते ठरवितात. हे शिंद्यांचे नाना रंगवीत असलेलें दुसरें चित्र दुसऱ्या बाजूला दिसतें. ही परस्परविरुद्ध दोन चित्रें एकाच कागदावर नाना ज्याअर्थीं रंगवीत होते, त्याअर्थीं परशुरामभाऊंच्या वधाच्या नाटकांत संविधानकाची जोडणी नाना कशी करीत होते हें दिसून येईल. काबूलच्या राजाच्या स्वारीपासून आपल्या राज्याचें रक्षण करण्याकरतां शिंद्यांना हिंदुस्थानांत जावयाचें होतें. हें त्यांचें जाणें नानांकरतां नसून स्वतःकरतां होतें. असें असतांही 'शिंद्यांनीं डिसेंबरपासून सरकारांत बोलणें लाविलें होतें कीं, आपणास दिल्लीकडे जाणें जरूर. आमच्या रवानगीस द्रव्य पाहिजे. त्याची तजवीज करावी. शिंद्यांच्या शब्दावर नानांचा विश्वास नव्हताच. तथापि निमित्त टाळण्याकरितां त्यांनीं त्यांस सांगितलें कीं, तुम्ही कूच करून जावें. आम्ही तुम्हांस पसतीस लक्ष रुपये देऊं. पण ते एकदम देणार नाहीं. येथून कूच करून जातांना सात लक्ष, जांबगांवास गेल्यावर चार लक्ष, तेथून बऱ्हाणपुरापर्यंत गेल्यावर बारा लक्ष, या प्रमाणें तेवीस लक्षांचा भरणा करूं. बाकी बारा लक्ष राहतात त्यांची वरात बुंदेले व झांशीवाले यांजवर देऊं. पुष्कळ दिवस भवति न भवति केल्यावर शिंद्यांनीं तेवीस लक्षांच्या भरण्याबद्दल जामीन मागितले. तेव्हां नानांनीं हरिभक्ति

सावकार याचा भाचा दुल्लभदास व अन्याबा अभ्यंकर यांस शिंद्यांच्या हवालीं केलें. मग शिंदे जानेवारी अखेरीस सात लक्षांच्या जागीं दहा लक्ष रुपये घेऊन हिंदुस्थानांत जाण्याकरितां वानवडीहून निघून तीन कोसांवर मांजरीस गेले. अर्धेमुर्धे लष्कर त्यांबरोबर गेलें व बाकी राहिलें तेंही निघण्याची तयारी जारीनें करीत होतें. पण हें सारें अवडंबर फुकट आहे. शिंदे कोठें जात नाहींत, येत नाहींत, हें पुण्यांतलि लोकांनीं कधींच ताडलें होतें. (नाना मात्र शिंदे निघून जाणार असें खात्रीनें सांगत होते. ऐ. ले. सं. पत्र नं. ४६७१). अखेरीस तेंच खरें ठरलें. मांजरीपुढें शिंद्यांचा मुक्काम गेलाच नाहीं. पंधरा वीस दिवस तेथें राहिल्यावर ते म्हणूं लागले कीं, देणेदारांनीं फौजेंतल्या लोकांस अडविल्यामुळें माझें जाणें तटलें आहे. तेवीस लक्षांपैकीं राहिलेले रुपये पुढें देणार ते येथेंच द्या, म्हणजे निघून जातों ! नानांनीं ती मागणी नाकारल्यामुळें शिंद्यांचें जाणें अर्थातच रहित झालें.' ही हकीकत मननपूर्वक वाचली म्हणजे स्पष्ट दिसून येईल कीं, शिंदे व नाना हे आंतून एकच होते पण इंग्रजांना फसविण्याकरतांच हें सारें त्यांचें नाटक चाललें होतें.

२४. शिंदे हिंदुस्थानांत न जातां पुन्हां ते मांजरीहून परत पुण्यास आले तेव्हां त्याच्या मुळाशीं नाना असले पाहिजेत असा संशय इंग्रजांस खात्रीनें येणार हें नाना जाणून होते. म्हणून त्यांनीं आपल्यावरचा शब्द काढून टाकण्याकरतां व शिंदे हे आपणापासून अगदीं अलग आहेत व त्यांच्या मसलतीचा ओघ निराळ्या दिशेनेंच वाहूं लागला आहे असें लौकिकांत दिसून यावें आणि शिंदे यांना प्रत्यक्ष हिंदुस्थानांत जाण्याचें कारण न पडतां काबूलचा पादशहा दिल्लीवर चालून आला तर त्याचें पारिपत्य करण्याचें धैर्य व सामर्थ्य शिंद्यांच्या हिंदुस्थानांतील सरदारांच्या अंगीं यावें म्हणून नानांनीं एक नवीन मसलत अंमलांत आणण्याचें ठरविलें. ती मसलत म्हणजे बाळोबातात्यांची कैदेंतून मुक्तता करणें ही होय. बाळोबातात्यांची मुक्तता करून शिंद्यांनीं त्यांना

१. ऐ. ले. सं. पान ५५७५.

पूर्ववत् कारभारांत घेतल्यास खालीं दिल्याप्रमाणें आपोआप गोष्टी घडून येणार होत्या:-१ शिंदे बाळोबातात्यांच्या मसलतीनें वागूं लागल्यास नाना शिंद्यांपासून अलग झाल्याप्रमाणें होऊन शिंद्यांच्या नवीन राजकारणाच्या ओघाला तेच कारणीभूत दिसतील. २ शिंदे व शिंदेबाया या दोन्ही पक्षांवर त्यांचें वजन राहून त्यामुळें परस्परांत लढाईचे प्रसंग येणार नाहींत. ३ हिंदुस्थानांत जे शेणवी सरदार आहेत, त्यांना बाळोबातात्यांच्या मुक्ततेमुळें समाधान होऊन शिंदेशाहीवर परचक्र आल्यास त्याच्या रक्षणाकरतां ते पूर्ववत् कार्यक्षम होतील. ४. इंग्रजाविरुद्ध कांहीं मसलतीचा सुगावा पेशवाईतील कारभारांत चालू असल्याचें इंग्रजांच्या नजेरस आलें व त्याविषयीं त्यांनीं नानांकडे चौकशी केली तर नानांना आपल्या कानांवर हात ठेवण्यास मोकळीक होईल. वगैरे नानांचे फायदे बाळोबातात्यांच्या बंधविमोचनामुळें होणार होते. म्हणून त्यांनीं शिंद्यांकडून त्यांची मुक्तता करविली. तारीख ७ एप्रिल सन १७९९ रोजीं नगरच्या किल्ल्यांतून त्यांना आणण्याकरतां शिंद्यांनीं दोन पलटणें पाठविलीं. तारीख २२ एप्रिल रोजीं बाळोबातात्या व त्यांचे बंधु धोंडीबादादा आणि मोदी असे तिघेजण शिंद्यांच्या लष्करांत वानवडीस येऊन दाखल झाले. शिंद्यांनीं ही अघटित घटना नाना व बाजीराव यांच्या मर्जीविरुद्ध घडवून आणली व त्यामुळें आपण उभयतां घाबरून गेलों असें लौकिकांत दिसावें म्हणून नानांनीं पेशव्यांच्या फौजेकडून एका रंगी तालमेचा प्रवेश[१] साजरा केला. 'शिंद्यांच्या छावणींत बाळोबातात्या आल्याची वर्दी येतांच त्यांनीं शहरची नाकेबंदी केली आणि गुलटेकडीपासून नदीपावेतों गारद्यांच्या रांगा उभ्या केल्या! जणुं काय शिंद्यांची फौज शहरांत शिरून त्यांस पकडून नेणार होती! पुढें कसें करावें, आतां आपली गत कशी होईल, या चिंतेपुढें त्यांस कांहीं एक सुचत नव्हतें. नानांस विश्रामबागेंत बोलावून न्यावें, आणि खलबतें करून नाना प्रकारच्या मसलती घाटाव्या यांतच त्यांचा (बाजीरावांचा) काळ जाऊं' लागला.' या माहितीवरून बाळोबातात्यांच्या मुक्ततेमुळें बाजीराव किती घाबरले होते हें लौकिकांत केवळ

१. ऐ. ले. सं. पान ५८४६.

दिसावें एवढाच नानांचा हेतु होता. हें घाबरण्याचें नाटक बाजीरावांकडून नानांनीं कसें करविलें पण नाना व बाजीराव एकचित्त असल्याशिवाय तें दाखविणें कसें अशक्य होतें हें पुढील पत्रांतील मजकुरावरून दिसून येईल. हीं पत्रें तारीख २५ व २६ एप्रिल रोजीं नानांचे विश्वासू कारकून बाळ यांनीं पटवर्धनांस लिहिलीं आहेत. ' राजश्री बाळोबा पागनीस छ. १६ जिल्कादीं राजश्री धोंडीबा व बाजीबा मोदी सुद्धां शिंदे यांचे लष्करांत आले. शिंदे यांची भेट जाहली. **आतां विचार होईल तो लिहून पाठवीन.** श्रीमंत पंतप्रधान स्वामींची व श्रीमंत अमृतरावसाहेब व श्रीमंत नानांची गोडी राजश्री नारोपंत चक्रदेव याणी केली आहे. शहर पुणें येथील नाकेबंदी गारदी गुलटेकडीपासून नदीपावेतों होत[1] आहे ' ' राजश्री बाळोबा[2] पागनीस शिंदे यांचे येथें आले. हिंदुस्थानांत पत्रें शिंदे यांचीं व बाळोबाचीं सरदारांस रवाना जाहलीं. सर्वांनीं एकविचारें राहून सर्व प्रांताचा बंदोबस्त करून पूर्ववत्प्रमाणें एक होऊन पत्रें यावीं म्हणून गेलीं. बायकांकडेही व बक्षीकडे व सरदारांस पत्रें समेटीविशीं गेलीं. मागाहून राजश्री धोंडीबास रवाना करावा याप्रमाणें ठरत आहे. ' या दोन्हीं पत्रांतील मजकूर लक्षांत घेतां सर्व मसलतींचे प्रेरक नाना एकटेच होते हें दिसून येईल. शिवाय आपण नामानिराळे राहून इंग्रज व टिपू यांच्या युद्धांत इंग्रजांचा जय झाला तर त्यांच्या पक्षाचे आपण आहोंत असें दाखवितां यावें, व टिपूचा जय झाला तर आपण त्याचे पक्षाचे आहोंत असें दाखवितां यावें या नानांच्या दुटप्पी मसलतीकरतां या वेळीं शिंद्यांनीं पुण्यांत राहणें नानांस इष्ट होतें. वरील पत्रांतच टिपू व इंग्रज यांच्या लढाईसंबंधीं पुढीलप्रमाणें मजकुर आहे. ' टिपूची व इंग्रजांची लढाई पिरापट्टणावर मातबर होऊन इंग्रजांकडील व नबाबाकडील मीरअलम गेले होते त्यांसुद्धां दहा हजार माणूस ठार जाहलें. इंग्रजांस टिपूनें बहुत पेंचांत आणलें आहे. ' या माहितीप्रमाणें टिपूचा जय होतो असें नानांस दिसून येत होतें म्हणून शिंदे व बाजीराव यांना पुढें करून निजामाच्या मुलखांत शिरून त्याचें पारिपत्य केल्यास पर्यायानें टिपूस मदत केली असें दाखवितां येईल हें नानांचें धोरण

---

१. व २ ऐ. ले. सं. पत्र नं. ४८९७ व ४८९९.

शिंद्यांस पुण्यास ठेऊन घेण्यांत व बाळोबांची मुक्तता करण्यांत होतें हें निःसंशय खरें ठरतें.

३५. जांबगांवास निघून जाण्याबद्दल शिंदेबायांना नानांची आज्ञा झाली, त्याप्रमाणें त्या निघून गेल्या हें मागें आलेंच आहे. त्यांना आपला पक्ष दुर्बळ होऊं न देतां कांहीं दिवस काढावयाचे होते. त्यांच्या शिरावर त्यांच्या फौजेचा खर्च चालविण्याची जबाबदारी होतीच. तेव्हां त्यांनीं आपल्या फौजेच्या बळावर लुटमार करून अगर खंडण्या वसूल करून आपला व आपल्या फौजेचा निर्वाह करणें प्राप्त होतें. महाराष्ट्राच्या दक्षिणेस परशुरामभाऊ व मध्यभागीं करवीरकर जसे आत्मबलसंवर्धना-करतां जो मार्ग चोखाळीत होते त्याच पाऊलांवर पाऊलें टाकीत शिंदेबाया उत्तरेस चालल्या होत्या. त्यांनीं श्रीगोंदें व जांबगांव वगैरे शिंद्यांचीं जेवढीं ठाणीं हातीं लागलीं तेवढीं घेऊन वऱ्हाडांत फौज पाठविली. यशवंतराव शिवाजी व देवजी गवळी व सतारखान पठाण हे त्या फौजेंत मुख्य सरदार होते. त्या फौजेनें तो प्रांत लुटण्यास सुरवात केली तोंच शिंद्यांचीं पलटणें त्यांच्या पाठीवर येऊन पोंचलीं. तेव्हां शिंदेबायांनीं वऱ्हाडांत घुसण्याचा विचार सोडून दिला व त्यांची फौज खानदेशांत घुसली, आणि पेशवे सरकारचा मुलुख लुटून फस्त करूं लागली. त्या फौजेपैकीं एक हजार पठाण नाशिकास आले व तेथील लोकांजवळ सहा लक्ष रुपये खंडणी मागूं लागले. क्षेत्रस्थ भिक्षुकांकडून एवढी रक्कम कशी निघणार ! तेव्हां लोकांकडून पैसा काढण्यासाठीं त्या क्षेत्रांत पठाणांनीं प्रळय आरंभिला. " पठाण बायकांचे आब घेतात. शेंदोनशें बायकांनीं प्राणत्याग केले. आणखीहि प्रळय मांडिला आहे. श्रीमंतांचे दौलतीपासून या प्रकारचा अनर्थ जाला नव्हता. नाशकास वेढा घातला आहे. ब्राह्मणांच्या बायांची अब्रु घेतात. कांहीं घरें लुटलीं व खणलीं. पांच सात ब्राह्मण मेले. दहा बारा जखमी झाले. कांहीं बायांनीं जीव दिले. शेंदोनशें ब्राह्मण हत्यारें धरून गंगातीरीं बसले आहेत. लुटितात मारितात त्याअर्थें मरोन जावें,

असा कट करून बसले आहेत. श्रीमंतांचे पुण्यप्रताप थोर त्यायोगें असें अनर्थ[1] होतात." नानांची आज्ञा घेऊन निघालेल्या शिंदेबायांच्या फौजेनें असा प्रळय करण्यास सुरवात केली. नानांनीं बाजीरावांना अधिकार-संन्यास देऊन असे प्रळय करण्यास जरी सुरवात केली तरी बाजीराव हे वरील पत्रांतील मजकुराप्रमाणें 'श्रीमंतांचे पुण्यप्रताप थोर, त्यायोगें असे अनर्थ होतात,' या आरोपास पात्र ठरले. सर्व वाईट अनर्थांस जबाबदार बाजीराव व सर्व चांगल्या गोष्टींचे अधिकारी नाना अशीच नानांनीं वांटणी करून घेतली होती हें वरील पत्रांतील मजकुरावरून लक्षांत येईल.

३६. शिंदेबायांनीं नाशिक प्रांतांत धुमाकूळ घातल्यानंतर त्यांचा मोर्चा दक्षिणमहाराष्ट्राकडे वळला. त्यांनीं ही दक्षिणची दिशा नानांच्याच प्रेरणेनें धरली होती. त्यांत नानांचे मुख्य दोन हेतु होते. १ मशीरउल्मुल्ख आपली फौज घेऊन मंगळवेढ्यास पटवर्धनांचे मुलुखांत आला होता. शिंदे-बाया त्या मुलखांत गेल्यानें त्या फौजेवर दाब राहील. २ परशुरामभाऊंची व करवीरकरांची लढाई जुंपविल्यानंतर करवीरकरांना हार खावी लागली तर ऐनप्रसंगीं त्यांना मदत देतां येईल. या मुख्य दोन गोष्टींवर नानांची मदार होती. परंतु शिंदेबायांकडून मात्र नानांनीं असा पुकारा करविला होता कीं, 'परशुरामभाऊंनीं मध्यस्थी पतकरून आमचा व शिंद्यांचा तंटा तोडून देण्याचें आश्वासन दिलें आहे. व त्यामुळें त्यांच्या भेटीकरितां आम्हीं तिकडे जात आहोंत.' याप्रमाणें पुकारा करीत व आपल्या फौजेच्या खर्चाकरतां गांवोगांव लुटमार व खंडण्या वसूल करीत करीत इंदापूर, शंभुमहादेव, औंध, खटाव मार्गानें फेब्रुवारी महिन्यांत मिरजेच्या आसपास येऊन शिंदेबाया थडकल्या. या वेळीं मागें दर्शविल्याप्रमाणें करवीरकरांच्याही फौजा शिंदेबायांच्या समीप आल्या होत्या. नानांच्या प्रेरणेनुसार कर-वीरच्या महाराजांनीं शिंदेबायांबरोबर समेटाची भाषा सुरू केली. मिरजेच्या बाळासाहेब पटवर्धनांनींही या पूर्वींच आपले वकील शिंदेबायांकडे पाठवून

---

१ ऐ. ले. सं. पान ५५८०.

त्यांस करवीरच्या महाराजांकडे न जाण्याविषयीं विनंति करविली होती. शिंदेबायांना कांहींतरी निमित्त काढून करवीरच्या महाराजांकडे जावयाचेंच होतें. महाराजांचा लेकवळा मुरारराव शिंदे व महादजी शिंद्यांच्या राखेची मुलगी यांचें लग्न या पूर्वी एक दोन वर्षें ठरून गेलें होतें. बाया अनायासानें इतक्या जवळ आल्या, त्याअर्थी तें लग्न आतांच व्हावें असें महाराजांचें म्हणणें होतें. तें निमित्त पटवर्धनांच्या विनंतीकडे दुर्लक्ष करण्यास योग्य आहे असें दाखवून शिंदेबाया आपल्या फौजेसह करवीर महाराजांकडे निघून गेल्या. शिंदेबाया व पटवर्धन यांच्यांत सलोखा घडून आला नाहीं याचें मुख्य कारण एकच होतें. बाया म्हणत होत्या कीं, 'महाराज आम्हांस फौजेच्या खर्चाकरतां तीन लक्ष रुपये देतों म्हणतात, तीच रक्कम तुम्हीं देत असाल तर त्यांच्या भेटीचा संदर्भ तोडून टाकतों.'[1] एकंदरींत शिंदेबायांना पैसा पाहिजे होता. त्याही पैशाकरितां बुभुक्षित झाल्या असल्यामुळें व पटवर्धनांची त्यावेळीं पूर्ण हलाखीची स्थिति झाली असल्यामुळें त्यांना शिंदेबायांचा नाद सोडून द्यावा लागला. करवीरचे महाराज व शिंदेबाया यांच्या भेटी तारीख १३ मार्च सन १७९९ रोजीं झाल्या. महाराजांनीं त्यांचा मोठा गौरव केला व त्यांस फौजेच्या खर्चाकरतां ठराविक रक्कम पोंचती केली व त्यांस आपल्या पक्षांत मिळवून घेतलें.

३७. यानंतर करवीरचे महाराज व शिंदेबाया यांची एकत्रित झालेली फौज दिवसेंदिवस मिरजेच्या जवळ जवळ येऊं लागली. उभयतांची मिळून वीस बावीस हजार बुभुक्षित फौज मिरज प्रांतांत विरव्या घालूं लागली. त्यामुळें मिरजकर बाळासाहेब यांस केव्हां काय होईल याची भीति उत्पन्न झाली. 'बायांच्या[2] लष्करचे पठाण मिरज प्रांतांतून गांवोगांव खंडणी वसूल करीत सुटले होते. ते बायांचासुद्धां हुकूम मानीनात! प्रांत वचावण्याची फारशी आशा बाळासाहेबांनीं धरली नव्हती. किल्ला व शहर एवढ्यांचें तरी रक्षण व्हावें एवढी त्यांची इच्छा होती. त्यांनीं कुरुंदवाडाहून रघुनाथ नीळकंठ यांस कुमकेस बोलावून आणिलें होतें. दोघांची मिळून चार पांच हजार फौज शहराजवळ तळ देऊन राहिली होती. तथापि एवढ्यावर न विसंबतां

---

१. ऐ. ले. सं. पान ५८३६. २ ऐ. ले. सं. पान ५८३९.

बाळासाहेबांनीं परशुरामभाऊंस फौजेसह लवकर मिरजेच्या आसपास येण्याविषयीं वारंवार पत्रें लिहिलीं. आणि सरकारांतून या संकटाचें निवारण व्हावें म्हणून नाना फडनविस यांची वारंवार प्रार्थना केली. त्यावरून महाराज व बाया यांचें पारिपत्य करण्याविषयीं नानांनीं सरकारांतून परशुरामभाऊंस आज्ञापत्रें लिहविलीं आणि मंगळवेढयाकडे शिंद्यांचीं पलटणें होतीं तीं आणि निजामअल्लीची फौज पंढरपुरावर होती ती, अशा दोन्ही फौजा भाऊंच्या कुमकेस नेमिल्या. पटवर्धनांच्या महालांवर नानांनीं मोंगलांस वरात दिली होती तिच्या वसुलाकरितां त्या प्रांतीं मोंगलांची फौज आली होती. बायांकडील पठाण नाशिकाप्रमाणें पंढरपुरचा विध्वंस करतील यासाठीं क्षेत्राच्या बचावाकरतां म्हणून नानांनीं ती मोंगल फौज पंढरपुरास कांहीं महिने ठेविली होती. शिंद्यांची फौज व पलटणें अशाच एका वरातीच्या वसुलीकरतां मंगळवेढयाकडे फिरत होतीं. या दोन फौजांस भाऊंच्या मदतीस जाण्याविषयीं पत्रें लिहूनच नाना स्वस्थ बसले नाहींत. विंचुरकर, रास्ते व प्रतिनिधि व धोंडोपंत गोखले यांसही परशुरामभाऊंची कुमक करण्याविषयीं त्यांनीं सक्तीचीं आज्ञापत्रें सरकारांतून लिहविलीं. हा सारा कागदोपत्रीं व्यवहार नानांनीं केला. याप्रमाणें अंमलबजावणी होती तर परशुरामभाऊंजवळ पन्नास हजार फौज जमा झाली असती. मग कुठच्या बाया आणि कुठचे बाबा ! सर्व दंगेखोरांचा 'चुराडा झाला असता. **पण १७९५ मधले नाना निराळे आणि १७९९ मधले निराळे.** इतके कागदी घोडे त्यांनीं नाचविले तरी खरोखरीचा एक सुद्धां घोडा जाग्यावरून हालेल तर शपथ !'

३८ वर दर्शविल्याप्रमाणें करवीरकरांचें शासन करण्याकरतां पेशवे सरकारकडून परशुरामभाऊंची नेमणूक झाली. त्यांना पेशवेसरकारकडून अवाढव्य मदत देण्याचीही नानांनीं तयारी केली. पण ही सर्व तयारी कशी बेगडी होती हें वरील हकीकतीवरून लक्षांत येईल. नानांच्या मनांत परशुरामभाऊंना इंग्रजांच्या मदतीला टिपूवर पाठवावयाचें नव्हतें. मागें

दर्शविल्याप्रमाणें तोही एक त्यांनीं फार्स केला होता. मिरजेला करवीरकरांचा शह देऊन त्याच्या रक्षणाच्या निमित्तानें परशुरामभाऊंना परत सांपळयांत पकडण्याचा नानांचा मुख्य डाव होता. एवढयाचकरतां त्यांनीं विश्वासानें परत फिरावें म्हणून त्यांच्या कुमकेची एवढी मोठी तयारी नानांनीं दाखविली होती. एका बाजूस परशुरामभाऊंच्या मदतीची वरीलप्रमाणें तयारी नानांनीं दाखविली व दुसऱ्या बाजूस परशुरामभाऊंच्या सामर्थ्याची खची करण्याचा प्रयत्न त्यांनीं चालविला. भाऊंना कोणत्याही प्रकारें पैशाची मदत न देतां उलट त्यांच्या मानेवर पैशाच्या वसुलीकरतां शिंदे निजाम यांच्या फौजा समंधाप्रमाणें बसविल्या होत्या. त्यामुळें भाऊंना आपल्या फौजेचा पगार देतां येईना. शिलेदार व शिपाई पगाराची बाकी चुकती करण्याकरतां भाऊंच्या दारांत धरणीं धरून बसत व त्यांस उपोषणें[1] पाडीत आणि लष्कराची हालचाल दोन दोन तीनतीन दिवस तटवून पाडीत. या भाऊंच्या पैशाच्या हलाखीच्या स्थितीमुळें नानांना करवीरांमार्फत भाऊंच्या सैन्यांत फितुर करण्यास चांगलीच संधि मिळाली. 'कोल्हापूरकरांनीं पांढरे वगैरे भाऊंकडील शिलेदारांत कांहीं फितुरही[2] केला होता.' याप्रमाणें भाऊंच्या फौजेची नानांनीं एका बाजूनें दैना उडविली व दुसऱ्या बाजूनें त्यांच्या फौजेचे दोन तुकडे करण्याचा त्यांनीं घाट घातला. मिरजेच्या रक्षणाकरतां भाऊंनीं परत फिरावें व टिपूवरील स्वारीवर त्यांनीं आपला मुलगा रामचंद्रपंत यास पाठवावें. या मसलतीस नानांनीं बाजीरावांचीही संमती घेतली.[3] यावरून भाऊंच्या फौजेचे दोन तुकडे करून ते उत्तर आणि दक्षिण दिशेला अलग अलग करण्याचा नानांनीं प्रयत्न केला. यावरून स्पष्ट दिसून येईल कीं सर्व बाजूंनीं भाऊंच्या फौजेचें सामर्थ्य नष्ट करून त्यांना बळी देण्याकरतांच मिरजेस परत बोलावण्याचा नानांचा मनसुबा होता. शिंदे, निजाम, विंचुरकर, रास्ते, प्रति-

---

१. ऐ. ले. सं. पान ५८४२. २. परशुरामभाऊंचें चरित्र पान १२०.
३. ऐ. ले. सं. पान. ५८४५.

निधि यांची बेफाट मदत मिळणार आहे या भरंवशावर भाऊंनीं आपल्या बरोबर केवळ जुजबी फौज आणावी व बाकीची सर्व फौज आपल्या मुलाबरोबर देऊन टिपूवर त्यांस त्यांनीं रवाना करावें हा त्यांतील मुख्य डाव होता.

३९. नानांच्या कारस्थानाची कल्पना यावयाला मागें दर्शविल्याप्रमाणें त्याला चक्रव्यूहाची उपमा दिली आहे. चक्रव्यूहाच्या बांधणींत ज्याप्रमाणें एका तटबंदीच्या आंत दुसरी तटबंदी, त्याच्या आंत तिसरी तटबंदी अशी जशी तटबंदीच्या मालिकेची रचना असते, तशीच नानांच्या कारस्थानाची होती. त्यांच्या एका कारस्थानाच्या आंत अनंत निरनिराळीं कारस्थानें दडून बसलेलीं असत. म्हणून त्यांच्या कारस्थानी डावपेंचांची कोणाला सहसा कल्पना येत नव्हती. मागें दर्शविल्याप्रमाणें परशुरामभाऊंचा नाश करणें हें नानांचें मुख्य उद्दिष्ट कारस्थान होतें. लोकदृष्टीनें तें तसें न दिसावें म्हणून नानांनीं परशुरामभाऊंविरुद्ध उघड उघड करवीरकरांस सामन्यास तयार केलें. ही चक्रव्यूहाची पहिली तटबंदी झाली. त्याच्या आंतील दुसरी तटबंदी इंग्रज व टिपू यांच्या युद्धाच्या कामीं पेशव्यांची मदत दाखविण्याची होती. या मदतीच्या कामीं परशुरामभाऊंची योजना होतांच त्याला नवीन प्रतिस्पर्धी आहे असें दाखविण्याकरतां इंग्रजांकडे करवीरकरांनीं मदत करतों म्हणून तयारी दाखविली. त्याच्या आंतील तिसऱ्या तटबंदीच्या कामीं परशुरामभाऊंनीं जास्त फायद्याची मसलत जी टिपूच्या स्वारीची होती ती त्यांनीं जहागिरीच्या रक्षणाकरतां स्वयंस्फूर्तीनें सोडून परत यावें व त्यांच्या शत्रूस म्हणजे करवीरकरांना त्यांच्या येण्याचा मार्ग, त्यांच्या फौजेची कल्पना, त्यांच्या येण्याच्या मार्गावरील अडथळे उत्पन्न करण्याच्या जागा, त्यांची रसद बंद करण्याचीं साधनें, त्यांच्या फौजेंत अगर त्यांच्या मित्रपक्षांत फितुर करण्याची पूर्वतयारी वगैरे वगैरे शत्रूचा नाश करण्यास लागणारी सर्व साधन सामुग्री तयार करून ठेवण्यास व त्याप्रमाणें योग्य तजवीज करण्यास मुबलक फुरसत मिळवून ठेविली. त्याच्या आंतील चवथी तटबंदी पेशवे, शिंदे, इंग्रज व निजाम यांच्यामधील कारस्थानाच्या उभारणीची होती. इंग्रजांस न समजतां

आपण टिपूच्या पक्षाचे आहोंत व टिपूलाच आपण मदत करणार हें नानांना दाखवावयाचें होतें. त्याकरतां शिंदे व पेशवे यांचा एक निराळा पक्ष नानांनीं बनविला व त्याचें आधिपत्य बाळोबातात्यांची मुक्तता करून त्यांना नानांनीं देवविलें, हें मागें आलेंच आहे. त्याप्रमाणें त्या कारस्थानाला गति मिळावी व शिंद्यांचें रहाणें दक्षिणेंतच व्हावें म्हणून नानांनीं कांहीं वरातीच्या चिठ्या शिंद्यांना देऊन त्यांची रवानगी पटवर्धनांच्या मुलखावर केली. ते मंगळवेढ्या-जवळ येऊन तळ देऊन बसले. पंढरपुराला निजामाची फौज येऊन बसली होती. परशुरामभाऊंच्या मदतीस जाण्याकरतां नानांनीं निजामाच्या या फौजेस तयार केलेंच होतें. अशा स्थितींत टिपूचा जय होतो असें दिसून आल्यास त्याच्या पक्षाचे आपण आहोंत व त्याला आपण पर्यायानें मदत केली असें दिसावें म्हणून शिंद्यांची फौज जी मंगळवेढ्यास ठेवली होती तिनें निजा-माच्या पंढरपूर येथील फौजेवर तुटून पडावें व तिची दाणादाण उडवून निजामाचा पराभव करावा. या फौजेच्या पराभवानें दोन गोष्टी साधणार होत्या. पर्यायानें टिपूला मदत दिल्याप्रमाणें होणार होतें व खुद्द निजा-माच्या फौजेवरच संकट आल्यानें ज्या फौजेची मदत परशुरामभाऊंना होण्याचा विश्वास वाटत होता तीच ऐन वेळेला होणार नव्हती. त्यामुळें त्यांना पूर्णपणें संकटांत आणण्याचें कार्य साधणार होतें. इतकें होऊनही परशुरामभाऊंचा पक्ष बळकट आहे असें दिसल्यास करवीरकरांना मदत करण्यास शिंदेबायांचें सामर्थ्य उपयोगीं पडणार होतेंच. एकंदरींत परशुराम-भाऊंचा नाश करण्याकरतां कोळ्याच्या जाळ्याप्रमाणें कारस्थानाच्या तंतूंची गुंतागुंत नानांनीं कशी केली होती व उंदराच्या शिकारीकरतां वाघाच्या शिकारीची कशी बेमालूम तयारी चालविली होती आणि परशुरामभाऊंची शिकार करण्याकरतां कोणत्या बिकट ठिकाणीं करवीरकरांकडून शिका-रीचे मचान बांधण्याची कशी योजना चालू होती हें दिसून येईल.

४०. म्हैसूरास टिपूच्या स्वारीवर परशुरामभाऊंनीं जातीनें न जातां आपला मुलगा रामचंद्रआपा यास पाठवावें असें इ. स. १७९९ च्या

एप्रिल महिन्यांत पुणें दरबारांत नानांनीं ठरवून घेतलें, व परशुरामभाऊंनीं परत आपल्या प्रांतीं यावें अशी त्यांना आज्ञा देण्यांत आली. पूर्वी परशुरामभाऊंना टिपूच्या स्वारीवर पाठविण्याचें ठरलें असतां पुणें दरबारकडून त्यांना परत बोलावून त्या कामगिरीवर रामचंद्रआपांची ज्या अर्थी योजना होत आहे त्या अर्थी पुणें दरबारकडून आपणास पूर्वीप्रमाणें मनःपूर्वक मदत होईल, अशी आशा इंग्रजांना वाटली नाहीं. पुणे दरबार कांहीं तरी आपल्याविरुद्ध गुप्त कारस्थानांत असावा अशी त्यांना शंका आली. त्यामुळें त्यांनीं त्यांच्या मदतीची आशा सोडून दिली, एवढेंच नव्हे तर त्यांना शत्रुपक्षाला जाऊन मिळण्याचा अवसर न देतां त्यांनीं टिपूबरोबर एप्रिलच्या १५ व्या तारखेपासून लढाई देण्यास प्रारंभ केला. शेवटीं तारीख[1] ४ मे रोजीं इंग्रजांनीं श्रीरंगपट्टणावर जोराचा हल्ला करून तें घेतलें. या लढाईंत टिपूचा पूर्णपणें पराभव होऊन तो मारला गेला. त्यामुळें त्याचीं मुलें माणसें व सर्व दौलत इंग्रजांच्या हस्तगत झाली. " नेहमींच्या पद्धतीप्रमाणें ही स्वारी निदान वर्ष दोन वर्षें तरी चालेल असा मराठी मुत्सद्यांचाच काय पण सर्व लोकांचा अजमास होता, तो खोटा ठरला. इंग्रजांनीं आपल्या फौजेची तयारी उत्तम प्रकारें केली होती, व निजामअल्लीकडून त्यांस कुमकही चांगली मिळाली होती. यामुळें मराठ्यांच्या कुमकेची आशा न बाळगतां ते आपल्याच पराक्रमावर टिपूचें राज्य भराभर आक्रमीत[२] सुटले. ' व शेवटीं त्यांनीं टिपूचें राज्य घेतलें. ही वार्ता पुण्यास येतांच नानासह पेशवे दरबार आश्चर्यानें व भीतीनें थंडगार पडला. पुणें दरबारांतील इंग्रजांच्या वकिलाची मनधरणी करून त्याचें मन सुप्रसन्न करणें आतां पेशवे दरबाराला प्राप्त झालें. या कामीं तोंडघशीं देण्यास नानांजवळ बाजीराव हें साधन होतेंच. त्याप्रमाणें बाजीरावांनीं त्या वकिलाजवळ मोठा आनंद प्रदर्शित केला व टिपूच्या लढाईंत इंग्रजांना विजय मिळाल्याबद्दल खुशालीच्या तोफाही करविल्या. त्या इंग्रज वकिलाच्या

---

1. Pope's History of Maharattas page 468.

२. ऐ. के. नं. पान ५८५५.

सांगण्यावरून ' वरातीमागून घोडा नको ' म्हणून म्हैसूरच्या स्वारीवर रामचंद्र-आपांनीं जाऊं नये असें आज्ञापत्रही परशुरामभाऊंस ताबडतोब लिहिण्यांत आलें. त्याबरोबरच नानांनीं आंतून अशी कारवाई केली कीं, म्हैसूरच्या सरहद्दीस मराठे सरदार होते त्यांस ' इंग्रजांचा अंमल बसला नाहीं तों तुम्ही सोंदें व बिदनूर प्रांतांत घुसून जितका मुलुख हाताखालीं घालतां येईल तितका घालावा ' अशीं गुप्त पत्रें पाठवून कळविलें. त्याप्रमाणें धोंडोपंत गोखले, धारवाडचा किल्लेदार बापू शिंदे व लक्ष्मेश्वरचा मामलेदार बाळकृष्णपंत लागू यांनीं स्वाऱ्या करून सोंधाच्या व बिदनूरच्या हद्दींतील खेडीं दररोज ' लुटून आणण्याचा सपाटा चालविला. सुमारें दोन महिनेपर्यंत याप्रमाणें त्यांची चंगल चालली, पण पुढें इंग्रजांनीं पुण्यास त्या बाबतींत फारच गिल्ला केला व त्यांची फौजही त्या प्रांतांत येऊं लागली. तेव्हां मराठा सरदारांस हळुहळु काढता पाय घेणें भाग पडलें.

४१. बिदनूरच्या मुलखांतून मराठा सरदारांचा पाय निघतो न निघतो तोंच तेथील रयतेवर धोंडजी वाघाचें अरिष्ट येऊन गुदरलें. या धोंडजीस दंगखोरपणाबद्दल टिपूनें श्रीरंगपट्टणच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें होतें. इंग्रजांनीं तें शहर घेतलें तेव्हां सर्व बंदिवान मुक्त केले. त्याबरोबरच धोंडजीही सुटला. सुटका होतांच तो बिदनूराकडे आला व आपले जुने सोबती गोळा करून दंगा करूं लागला. हां हां म्हणतां त्याच्याजवळ सात आठ हजार लुटारू शिपाई गोळा झाले. त्यानें होळेहोन्नूर, शिमोगा, शिकारपूर, उडगणी, चंद्रगुत्ती वगैरे ठाणीं भराभर ताब्यांत घेतलीं व आणखीं फौज चाकरीस ठेऊन तो इतका बलाढ्य होऊन बसला कीं, त्याच्या पारिपत्याकरतां इंग्रजांस जनरल वेलस्ली याजबरोबर आठ दहा हजार फौज रवाना करावी लागली. त्या फौजेनें येऊन दोन तीन लढायांत वाघाचा धुव्वा उडविला व त्याचीं सर्व ठाणीं घेऊन त्यास तुंगभद्रेच्या पलीकडे मराठी मुलखांत हुसकून लाविलें. आणि त्यानें पुन्हां बिदनूराकडे येऊं नये म्हणून इंग्रजांनीं जागोजाग पलटणें ठेऊन बंदोबस्त केला. मराठी मुलखांत धोंडजी वाघ आल्यानंतर त्यावर धोंडोपंत गोखले यांनीं हल्ला

करून त्याची दाणादाण उडविली. तेव्हां तो करवीरकरांचे चाकरीस जाऊन[1] राहिला. त्याचप्रमाणें सातारच्या महाराजांचाही भाऊ चतुरसिंग हा करवीरकरांच्या आश्रयास जाऊन राहिला होता. यामुळें करवीरकर महाराजांचें सामर्थ्य दिवसेंदिवस वाढत चाललें होतें.

४२. इंग्रजांनीं टिपूचा पराभव नाना फडनविसांच्या कल्पनेबाहेर अल्प अवधींत केल्यामुळें त्यांच्या बाबतींत शिंदे व पेशवे यांचें चालू केलेलें गुप्त कारस्थान नानांना एकदम बंद करावें लागलें. बाळोबातात्यांची याच गुप्त कारस्थानाकरतां नानांनीं मुक्तता करविली होती. पण तो नानांचा डाव चुकला, एवढेंच नव्हे तर बाळोबांचें अवजड लोढणें नानांच्या गळ्यांत पडलें. बाळोबातात्या व परशुरामभाऊ हे नानांना अस्तनींतील निखाऱ्याप्रमाणें वाटत होते. या दोघांचें पुन्हां रहस्य जमलें तर आपली काय अवस्था होईल हें नाना पूर्णपणें जाणून होते. ह्मणून बाळोबा व भाऊ यांचा मिलाफ होण्यास अवसर न देतां बाळोबाकडे शिंदेबाया व शिंदे यांचा तंटा तोडण्याची दुसरी जबाबदारीची कामगिरी सोंपविली तर बराच अवधी जाईल व त्या अवधींत भाऊंचा समाचार घेतां येईल अशी नानांनीं युक्ति योजली. शिंदे व शिंदेबाया यांच्यामधील तंटा अगदीं सामान्य स्वरूपाचा होता. त्या उभयतांमध्यें कधींच सलोखा होऊं शकला असता, पण त्यांत नाना वरचेवर खील घालीत असल्यामुळें तो मिटूं शकला नाहीं. या वेळीं ती खीळ नानांनीं थोडी सैल केली व बाळोबांस त्या कामगिरीचें क्षेत्र मोकळें करून दिलें. शिंदे व शिंदेबाया या उभय पक्षांस परस्परांत सलोखा घडून येण्याची उत्कट इच्छा बरेच दिवसांपासून होतीच. बाळोबांनीं टिपूकडील मसलत फसल्यानंतर लगेच बायांचें प्रकरण हातीं घेतलें. या कामांत शिंद्यांकडून त्यांना कुलमुखत्यारी मिळाली होती. आबा चिटणीस, आंग्रेमामा व बाळोबातात्या या त्रिवर्गांवर शिंदेबायांचा विश्वास होता. या तिघांही कारभाऱ्यांनीं बायांस पत्रें लिहिलीं कीं, यापुढें तुह्मीं कोणताही विकल्प मनांत न धरतां परत यावें. ज्या ज्या

1. डफकृत मराठ्यांची बखर पान ११९.

वाजवी गोष्टी आहेत त्या सर्व तुमचे मनप्रमाणेंच घडून घेतों. त्या बाबतींत आम्ही तुमच्या आज्ञेबाहेर नाहीं. तीं पत्रें जातांच बायांस भरंवसा उत्पन्न झाला व त्यांनीं पुण्याकडे जाण्याचा विचार ठरविला. बाळोबातात्या हे भाऊंचे स्नेही व नानांच्या महाडच्या कारस्थानामुळें उभयतांनाही कारागृहवास भोगावा लागला असल्यामुळें भाऊंबद्दल बाळोबांचे मनांत आदर व प्रेमबुद्धि होती. शिंदेबायांस पुण्यास बोलावण्याचा मुख्य हेतु त्यांचा तोच होता. करवीरचे महाराज भाऊंच्या विरुद्ध शिंदेबायांची मदत घेत आहेत ती त्यांना मिळूं नये असें बाळोबांना वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. परंतु बाळोबांच्या पत्राप्रमाणें ताबडतोब शिंदेबाया पुण्यास जाऊं शकल्या नाहींत. महादजी शिंद्यांना दासीपासून एक कन्या झाली होती. तिचें करवीरकरांच्या दासीपुत्राबरोबर लग्न ठरलें होतें; तें तारीख १४ मे रोजीं झाल्यानंतर पुढें थोड्याच दिवसांनीं त्या बाया पुण्याकडे जाण्याकरतां निघाल्या. त्या हरिपुर, ब्रह्मनाळावरून मायणीपर्यंत गेल्या. त्यांच्या फौजेपैकीं यशवंतराव शिवाजी व सतारखान वगैरे पठाण यांच्या टोळ्या ठिकठिकाणच्या खंडण्या वसूल करीत व लूटमार करीत चालल्या होत्या. बाळोबातात्या व आबा चिटणीस हे आपल्या बरोबर दोन हजार स्वार, दोन पलटणें व पांच तोफा एवढा लवाजमा घेऊन बायांच्या भेटीकरतां पुण्याहून निघाले. त्यांची व बायांची भेट सापच्या मुक्कामीं तारीख[1] २१ जून रोजीं पडून समेटाचीं बोलणीं सुरू झाली. हा समेट शिंदे व शिंदेबाया या दोन पक्षांत व्हावयाचा असल्यामुळें शिंदेबायांचा पक्ष अर्धवट होत होता तो पुरा करण्याकरतां त्यांनीं पहिल्यानें ' नगरच्या किल्ल्यांत आमची वस्त आहे ती आमच्या हवालीं करावी ' असा सवाल बाळोबातात्यांस टाकला. ही नगरच्या किल्ल्यांतील वस्त म्हणजे महादजी शिंद्यांची सर्वांत धाकटी बायको भागीरथीबाई ही होय. ही शिंदेबायांची सवत त्यांच्या ताब्यांत आल्याशिवाय त्यांचा पक्ष पुरा होत नव्हता. त्या बाईबद्दल

१ जिवबादादा बक्षी यांचें चरित्र ले. नं. २८९.

दौलतराव शिंद्यांशीं ह्मणजे तिच्या दत्तक पुत्राशीं तिनें अश्लाघ्य संबंध ठेवल्याबद्दल याच दोन शिंदेबायांनीं पुकारा केला होता. भागीरथीबाईचें व या दोन शिंदेबायांचें वैमनस्य असलेलें बाळोबातात्यांस माहीत असल्यामुळें त्या बाईस शिंदेबायांच्या स्वाधीन करण्यास बाळोबांनीं हरकत घेतली. त्यामुळें शिंदे व शिंदेबाया यांच्यामधील समेटांत बरेच दिवस घोंटाळा उत्पन्न झाला होता. तरी पण बाळोबातात्यांच्या प्रयत्नानें शिंदेबायांची समजूत निघाली व शिंदे आणि शिंदेबाया यांच्यामधील समेटाच्या अटी ठरल्या व त्या उभयपक्षांस मान्य होऊन त्याप्रमाणें आगष्ट महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत शिंदेबाया जांबगांवास येऊन दाखल झाल्या. त्याच सुमारास नगरच्या किल्ल्यावरील भागीरथीबाई या मरण पावल्या. त्यामुळें तंट्याचें एक मूळ आपोआप तुटलें. अशा प्रकारें शिंदे घराण्यांत नानांनीं जो कलहाग्नि पेटविला होता तो कांहीं काळापुरता कां होईना बाळोबातात्यांनीं शांत केला.

४३. महाडच्या कारस्थानामुळें पुढें शिंदे घराण्यांत नानांनीं जसा कलहाग्नि पेटवून शिंद्यांच्या दौलतीची व शिंदें घराण्याच्या अब्रूची राखरांगोळी करण्याचा उपक्रम चालविला, त्या प्रमाणें पटवर्धन सरदारांच्या घरांतही नानांनीं महाडच्या कारस्थानापासून कलहाग्नींच्या ज्वाळा भडकविल्या होत्या. महाडच्या कारस्थानाचे वेळीं नानांनीं परशुरामभाऊविरुद्ध गंगाधरराव ऊर्फ बाळासाहेब यांस आपल्या कटांत सामील करून घेतलें व परशुरामभाऊंचा सूड घेतला. पुढें परशुरामभाऊंना बाजीरावांनीं मुक्त केल्यानंतर याच बाळासाहेबांच्या करवीं नानांनीं भाऊंबरोबर सलोखा घडवून आणण्याचा फार्स केला. महाडच्या कारस्थानापासून पटवर्धन सरदारांच्या घराण्यांत नानांचे पक्षपाती हेच बाळासाहेब झाले. मिरजकर पटवर्धन यांच्या घराण्यांत गंगाधरराव व चिंतामणराव यांचें भांडण आजपर्यंत आपसांत धुमसत होतें. त्याचा यावेळीं ह्मणजे सन १७९९ च्या जून महिन्यांत चांगलाच स्फोट झाला. गंगाधरराव ऊर्फ बाळासाहेब हे चुलते व चिंतामणराव हे पुतणे. ह्मणजे गंगाधरराव यांचे

वडील बंधु पांडुरंगराव यांचे चिरंजीव चिंतामणराव हे होते. त्यामुळें मिरजकर घराण्यांत वडीलकीचा मान चिंतामणराव यांचा होता व सरदारीचेही धनी तेच होते. त्यामुळें त्यांच्याच नांवानें सरदारी चालत होती. चिंतामणराव हे सरंजामाचे धनी व गंगाधरराव हे पोटगीदाखल कांहीं उत्पन्नाचे धनी हीच न्यायाची बाजू होती. परंतु नानांच्या राज्यव्यवस्थेंत न्याय अन्याय याचा कांहीं हिशेब नव्हता. नानांच्या मर्जीप्रमाणें जो वागेल त्याच्याच बाजूनें नानांच्या न्यायाचा कांटा झुकत असे. बाळासाहेबांनीं गेलीं बावीस वर्षें नानांची पूर्णपणें मर्जी संपादून सरदारी गाजविल्यामुळें त्यांना नानांचें पूर्ण पाठबळ होतें. एकटे बाळासाहेब मिरजकरांच्या सरंजामाचा कारभार आटोपून घेऊं लागल्यामुळें चिंतामणरावांच्या कुटुंबाच्या खर्चाची आबाळ होऊं लागली. त्यामुळें त्यांनीं आपला सरंजाम तोडून निराळा देण्याबद्दल बाळासाहेब व परशुरामभाऊ यांच्याकडे कित्येक वेळां तक्रारी केल्या. परंतु भाऊंना बाळासाहेबांविरुद्ध कांहींच सांगतां येण्यासारखें नसल्यामुळें व बाळासाहेबांना आपल्याला मिळालेला अधिकार व जहागीर हातावेगळी करण्याची इच्छा नसल्यामुळें चिंतामणरावांना बरबेंत ठेऊन बाळासाहेब यथापूर्व सरंजामाचा उपभोग घेत होते. परशुरामभाऊ व मिरजकर पटवर्धन यांच्या जरी वांटण्या होऊन ते पृथक् पृथक् झाले होते तरी परशुरामभाऊ हे पटवर्धन सरदारांमध्यें सर्वांत वडील होते. ते बाळासाहेबांचे चुलते व चिंतामणरावांचे चुलत आजोबा होते. त्यामुळें पटवर्धन घराण्यांतील आपसांतील तंटे वडील ह्मणून त्यांच्याकडे जात असत. बाळासाहेब आपल्या कोणत्याच विनंतीला दाद देत नाहींत असें पाहून हा आपसांतील तंटा भाऊंच्या मार्फतीनें मिटवून घेण्याकरतां चिंतामणराव गेल्या दहा महिन्यांपासून त्यांच्या लष्करांत येऊन राहिले होते. या वेळीं भाऊ अगदीं पैशाच्या पेंचांत आल्यामुळें बाळासाहेबांचें व नानांचें रहस्य आहे, सबब त्यांच्या वर्तानें नानांकडून पैसा मिळेल या विश्वासावर भाऊ अवलंबून बसले होते. त्याकरतां बाळासाहेबांविरुद्ध कोणतीही गोष्ट भाऊंना करतां येण्यासारखी नव्हती. ह्मणून निरनिराळ्या प्रकारानें ते चिंतामणरावांची समजूत काढीत होते.

४४. असें चालढकलीचें काम चालू असतां एके दिवशीं निकराला गोष्ट येऊन चिंतामणरावांनीं भाऊंना विनंति केली कीं ‘ आज दहा महिने मी तुह्मां-बरोबर लष्करांत हिंडत आहे. व माझ्या तकरारींची दाद ध्या असा वारंवार अर्ज करीत आहे; आणि तुह्मी सर्वांस वडील असतां ही गोष्ट कांहीं मनावर घेत नाहीं. याचा परिणाम काय? चुलत्यास पोटगी देऊन दौलतीं-तून बाहेर काढावें असेंही मी ह्मणत नाहीं. मी वडील भावाचा मुलगा व सरदारीचा मालक हें लक्षांत धरून सरंजामाची काय वांटणी चुलत्यास द्याव-याची ती त्याला द्या. आणि बाकीचा सरंजाम माझ्या हवालीं करा. **चुलत्याच्या भिडेनें आजपर्यंत तुह्मी मला थोपवून धरिलेंत** परंतु आतां आपल्या हातून दम धरवत नाहीं. माझ्या तंट्याचा निकाल आजच्या आज झाला[१] पाहिजे.’ याप्रमाणें चिंतामणराव भाऊंजवळ हट्ट धरून बसले. व शेवटीं भाऊंना त्यांनीं अखेरचा एकच जाबसाल सांगितला कीं, ‘ मिरजकरांचें पथक चार हजार स्वारांचें असून त्याच्या खर्चाकरतां बारा लक्ष रुपयांचा सरंजाम सरकारांतून चालत आहे. त्यापैकीं तीन हजारांचा सरंजाम ह्मणजे नऊ लक्षांचा मुलुख मजकडे चालावा. त्यांत मिरज प्रांतीं सांगली आदिकरून चार लक्षांचा मुलुख माझ्या वांटणींत असावा. बाळासाहेबांनीं मिरजेचा किल्ला मला द्यावा अगर मोबदला नवीन किल्ला बांधण्यास एक लक्ष रुपये द्यावे. या गोष्टी बाळासाहेब अमुक मुदतींत मान्य करीत असतील तर ठीकच आहे. तसें न होईल तर मग मी कोणाचा कोणी नव्हे! जिकडे वाट फुटेल तिकडे निघून जाईन.’ चिंतामणराव इतके निकरावर आलेसे पहातांच त्यांची तूर्त कांहीं तरी समजूत काढा असें बाळासाहेबांस भाऊंनीं वारंवार लिहून सुचविलें. परंतु नानांच्या तालमींत तयार झालेले व त्यांच्या कृपाछत्राचा आसरा घेतलेले बाळा-साहेब चिंतामणरावांची सर्व दृष्टीनें न्याय्य बाजू असूनही तिकडे नेहमींच्या पद्धतीप्रमाणें डोळेझांक करून कालहरणाच्या गोष्टी बोलूं लागले. त्यामुळें दिलेली मुदत संपतांच चिंतामणरावांनीं भाऊंच्या लष्कराशेजारीं जुलैच्या अक-

१. ऐ. ले. सं. पान ५८६०.

राव्या तारखेस निराळा गोट स्थापिला; आणि पांचशें स्वार व तीनशें साडेतीनशें पायदळ गोळा केलें. इतकें झालें तरी भाऊंच्या आग्रहावरून त्यांनीं आणखीं पंधरा दिवसांची वाट पाहिली. शेवटीं बाळासाहेबांकडून कांहींच तडजोड होईना, तेव्हां ते कूच करून प्रथम तेरदाळास गेले. तेथील देसाई यांस अनुकूल झाला होता. त्याच्या द्वारानें त्यांनीं तेरदाळचें ठाणें काबीज केलें. आणि लेंच सड्या स्वारीनें जाऊन मंगळवेढें जबरदस्तीनें घेतलें. तेव्हांपासून मिरजकरांच्या घराण्यांत हा भाऊबंदीचा वणवा दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चालला. या बाबतींत परशुरामभाऊंनीं आपली उपेक्षा केली अशी बाळासाहेबांची समजूत झाली. व त्यामुळें त्यांचें मन भाऊंविषयीं खट्टू झालें. आणि भाऊंचे पुत्र रामचंद्रआपा, हरीपंत व महादेवराव यांनीं आपल्या पुतण्यास आंतून भर देऊन कलहास प्रवृत्त केलें असावें असा त्यांस जबर संशय आला. वास्तविक हे आरोप अन्यायाचे असून त्यांत भाऊंची अथवा त्यांच्या मुलांची कांहीं एक चूक नव्हती.[१] असें असतां बाळासाहेबांच्या मनांत जो विकल्प झाला त्याच्या मुळाशीं कांहीं तरी निराळें राजकारण असावें असा संशय आल्याशिवाय राहत नाहीं.

४५. नानांनीं परशुरामभाऊंस सर्व बाजूनें पेंचांत आणलें होतें. त्यांस करवीरकरांच्या पारिपत्याकरितां द्यावयाची कुमक आयत्या वेळीं कोणीही देऊं नये अशी सर्व गुप्त व्यवस्था नानांनीं केली होती. परंतु पटवर्धन सरदार हे एक रक्ताचे असल्यामुळें प्रसंगीं ते भाऊकरतां धावून जातील अशी खात्री नानांना होती. म्हणून कोणत्या ना कोणत्या रीतीनें त्यांच्यामध्यें फूट पाडून भाऊंचा पक्ष पूर्णपणें खिळखिळा करावा हा नानांचा हेतु होता. भाऊंबद्दल बाळासाहेबांच्या मनांत विकल्प उत्पन्न झाल्यास भाऊंना इतर पटवर्धन सरदारांची मदत होणार नाहीं हें नाना जाणून होते. म्हणून त्यांनीं पहिल्यानें बाळासाहेबांच्या मनांत भाऊंबद्दल अकल्पित विकल्प उत्पन्न केला. या बाबतींत बाळासाहेबांचे पुण्याचे वकील परांजपे त्यांस लिहितात कीं, श्रीमंत रा. नानांस

---

१. ऐ. ले. सं. पान ५८६१.

विनंती करून उत्तर होईल तें लिहोन पाठविणें. त्यावरून (नानांनीं) उत्तर सांगितलें कीं, ' तुम्हांविशीं (बाळासाहेबा विषयीं) तूर्त प्रसंगीं भाऊंचा चांगलेपणा नाहीं हें ऐकितों. मागें भाऊ येथें होते तेव्हां रा. गंगाधरराव (बाळासाहेब) यांजविशीं घरोब्याचें बोलणें बोलत होते. चिंतामणराव यांजकडे त्यांचें अंग नव्हतें हल्लीं चलबिचल[१] दिसतें. ' हें पत्र तारीख २६ जुलैचें आहे. यावरील नानांच्या प्रत्यक्ष तोंडच्या शब्दावरून त्यांनीं भाऊंबद्दल बाळासाहेबांच्या मनांत याच वेळीं कसें विष ओतलें व त्यामुळें बाळासाहेब हे नानांचें बळकट अधिष्ठान घेऊन परशुरामभाऊंचे कसे हितशत्रू बनले हें दिसून येईल. नाना हे कलिपुरुष असल्यामुळें त्यांनीं हातोहात पटवर्धन सरदारांत कशी दुफळी उत्पन्न केली व त्यामुळें परशुरामभाऊंच्या निर्याणाची त्यांनीं कशी तयारी केली हें स्पष्ट दिसून येईल.

४६. पटवर्धन सरदारांत गृहकलह विकोपाला नेऊन भाऊविरुद्ध नानांनीं वरीलप्रमाणें विष ओतून ठेविलें व त्यांच्याकडून त्यांना हटकून मिळणाऱ्या मदतीची विल्हेवाट लावून टाकली. आतां परशुरामभाऊंना फक्त एकाच व्यक्तीकडून मदत मिळण्याची आशा राहिली होती. बाळोबातात्या व भाऊ यांचें सख्य होतें. उभयतां नानांच्या प्रीतीस अपात्र ठरलेले होते. शिवाय यावेळीं ते शिंदे व शिंदेशाया यामध्यें समेट घडवून आणून मोकळे झाले होते. तेव्हां बाळोबातात्यांनीं मनांत आणलें तर ते मनापासून भाऊंना मदत करतील अशी नानांना भीति वाटत होती. ह्मणून बाळोबांस आपल्या लगामीं घेऊन भाऊंना त्यांनीं मदत देऊं नये असा मनसुबा रचणें नानांना प्राप्त होतें. बाळोबातात्या व परशुरामभाऊ हे नानासाहेब पेशव्यांचा वंश चालविण्याच्या मनसुब्यांत नानांना मिळाले होते. त्याप्रमाणें चिमाजीस यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन त्यांनीं कारभार चालविला होता. परंतु नानांनीं महाडचें कारस्थान करून चिमाजीस पदच्युत केलें व बाजीरावांस गादीवर बसविलें. त्यामुळें बाळोबातात्यांची मान-

---

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ५०४१.

खंडना झाली होती व त्याबद्दल इतके दिवस त्यांना कारागृहवास भोगावा लागला होता. या वेळीं बाळोबातात्यांची शिंदे व शिंदेबाया या उभयतांना जरूरी लागली व त्यांनीं उभयतांत समेट घडवून आणल्यामुळें त्यांचें महत्वही वाढलें. तेव्हां बाळोबातात्यांस आपल्या मसलतींत ओढून घेण्यासारखें नवीन राजकारण नानांना उपस्थित करणें प्राप्त होतें. तें राजकारण पुढील उताऱ्यावरून स्पष्ट दिसून येईल. ‘ पुण्याकडील वर्तमान श्रीमंत राजश्री नाना व बाळोबा पागनीस यांची चित्तशुद्ध जाहली व राजश्री आबा चिटणीस यांची व पागनीस यांचीही निखालसता झाली. **नानांच्या विचारें सर्वत्रांनीं चालावें असा तह ठरला.** श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब व चिमाजीआपा व अमृतरावसाहेब यांचाहि रुकार पडला. सर्वत्रांचा एक विचार जाला. नानांच्या चित्तांत कैलासवासी नानासाहेबांचा वंश बुडवावयाचा नाहीं. अमृतराव यांचा पुत्र दत्तक करावा असा बेत[१] आहे. ’ नारोपंत करंदीकर वकील यांचें तारीख १५ जूनचें हें पत्र करवीरकर महाराजांच्या लष्करांतून पाठविलेलें आहे. करवीरकरांना नानांचें पाठबळ होतें. बाजीराव व परशुरामभाऊ यांचे मनांत करवीरकरांचें पारिपत्य व्हावें असें होतें. त्यामुळें पुणें दरबारांतील हालचालींवर करवीरकरांचें डोळ्यांत तेल घालून लक्ष होतें. बाळोबातात्या, आबा चिटणीस व बाजीराव या तिघांसही खांकोटींत मारून नेण्याचा हा नानांचा डाव होता. बाळोबातात्यांचा बाजीरावांवर राग होता. ते पदच्युत होणें हें बाळोबांस प्रिय होतें. नानांनाही बाजीरावांचें प्रेम वाटण्याचें कारण नव्हतें. बाजीराव हे केवळ नानांना आपला अधिकार यथापूर्व संपादन करून घेण्याकरतां पाहिजे होते. आतां तो त्यांना लाभला असल्यामुळें त्यांची नानांना बिलकुल जरूरी नव्हती. याकरतां बाळोबातात्या व नाना ताबडतोब एक झाले. बाजीराव हे नानांचे कैदीच झाले असल्यामुळें नानांच्या मताबाहेर जाण्याची त्यांची प्राज्ञाच नव्हती.

---

१. ऐ. ले. सं पत्र नं. ४९९२.

शिवाय अमृतरावाचा मुलगा विनायक यास यशोदाबाईचे मांडीवर दत्तक देऊन पेशव्यांच्या गादीवर बसवावें असा नानांचा विचार असल्यानें त्याविरुद्ध आपण वागावें, तर घरांतल्या घरांत नानांच्या तुरुंगवासांतही भावाभावांत नवीन वितुष्ट उत्पन्न होऊन पुन्हां भाऊबंदी तंट्याला मुत्सद्यांना तोंड फोडतां येईल या प्रोक्त व दूरदर्शी विचारानें बाजीरावांनीं त्याला संमती दिली. त्यामुळें नाना व बाळोबातात्या यांचा जून महिन्यांत सलोखा घडून आला आणि पुनः नाना हे सर्वांचे मुख्य गुरुमंत्री बनले.

४७. नानांच्या नेहमींच्या राजकारस्थानपद्धतीप्रमाणें भाऊंचा नाश करण्याकरतां त्यांच्या मित्रांस प्रसंगविशेषीं आपलें ध्येय सोडल्याप्रमाणें दाखवूनही नाना कसे जवळ करीत होते हें दिसून येते. बाळोबातात्यांचा व नानांचा बाजीरावांना पदच्युत करण्याचे मनसुब्यानें समेट झाला. परंतु त्या गोष्टीस शिंद्यांची अनुमती मिळणें इष्ट होतें. शिंद्यांनींच बाजीरावांना गादीवर बसविण्याकरतां नानांना मदत केली असल्यामुळें पुनः ही क्रान्ति घडवून आणण्यास ते तयार होणें शक्य नव्हतें. नानांप्रमाणें जसा वारा येईल तशी पाठ फिरविणारे अगर आपल्या अब्रूचे नेसतें वस्त्र सर्वच डोक्याला गुंडाळणारे शिंदे नव्हते; ह्मणून शिंद्यांना वश करून घेण्याच्या अगोदर बाळोबातात्या व नाना यांच्या मध्यें झालेल्या वरील गुप्त तहाला भाऊंची संमती मिळविण्याचा नानांनीं उपक्रम केला. 'राजश्री बाळोबा-तात्या यांचा आमचा एक विचार असावा हा भाव लेखक (नाना) यांणीं राजश्री बाबा काळे यांजपाशीं श्रीमंत राजश्री भाऊंजवळ बोलावयास सांगितला[१] होता.' या तारीख ३ आगष्टच्या पत्रांतील मजकुरावरून नानांनीं आपला प्रयत्न यशस्वी केला. 'तात्यांचा व नानांचा स्नेह जोडून देणें परशुरामभाऊंस आवश्यकच होतें. त्यांनीं तात्यांविषयीं नानांस खात्री दिल्यावरून तात्या, नाना व भाऊ या तिघांची एकजूट[२] झाली.' तारीख १८ आगष्टच्या पत्रांत 'श्रीमंत पंतप्रधान व अमृतरावसाहेब

---

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ५०५७. २. ऐ. ले. सं. पान नं. ५८५७.

व श्रीमंत नाना व शिंदे, बाळोबासुद्धां एकचित्त होऊन बंदोबस्त' होईल तो सुदिन' असा मजकूर आहे. तेव्हां या पत्रावरून शिंद्यांचें व नानांचें एकचित्त या वेळीं झालें नव्हतें हें उघड आहे. पुढें परस्परांत निरनिराळ्या वाटाघाटी झाल्या व त्याचा असा निष्कर्ष निघाला कीं, अमृतरावांच्या मुलास यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन नानासाहेबांचा वंश न चालवितां बाजीरावांनाच कायम ठेऊन राज्यकारभार एकविचारानें करावा. अर्थात् बाळोबांच्या व नानांच्या गुप्त तहांत ठरल्याप्रमाणें **'नानांच्या विचारें सर्वत्रांनीं चालावें'** ही गुरुकिल्ली नानांनीं आपल्या हातांत मजबूत धरून ठेविली होती हें निराळें सांगावयास नकोच. पुढें सप्टेंबर महिन्याच्या सुरवातीस श्रीगणपतीच्या उत्सवास सुरवात झाली तेव्हां 'श्री. राजश्री[2] पंतप्रधान याणीं श्री. राजश्री अमृतराव यांस दौलतराव शिंदे यांजकडे श्रीगणपतीचे उत्साहाकरितां बोलवावयास पाठविले होते. या अर्थाचा करार केला त्यास नवमीचे दिवशीं येतों म्हणून सांगितलें, परंतु ते दिवशीं आले नाहींत. दशमीस आले. बारा घटिका दिवसास आले. वाड्यांत दोन घटका श्रीचे दिवाणखान्यांत बैठक जाली. राजश्री बाळोबातात्या, धोंडीबादादा, आबा चिटणीस, गोपाळरावभाऊ, बाबूराव आंगरेमामा, बाणाजी शेट्याकडील विठ्ठलपंत व बाजीबा मोदी याप्रमाणें सर्व मंडळी आली होती. श्रीं. राजश्री पंतप्रधान आलिजाबहादर यांस वस्त्रें[3] देत होते परंतु घेतलीं नाहींत. राजश्री बाळोबातात्यास वस्त्र कंठी शिरपेंच दिला. व मोदी यास वस्त्रें, येणेप्रमाणें आणखी दोन तीन आसामी दौलतराव याणीं पेशजी अटकेंत ठेविले होते त्यांस दिलीं. अलिजाबहादर यांची स्वारी निघून गेली. नंतर राजश्री बाळोबातात्या व वरकड मंडळी राजश्री नाना यांजकडे आली. नानांचे दिवाणखान्यांत बैठक जाली. दोन घटका सर्व मंडळी सुद्धां एक जागा होते. नानांनीं बाळोबातात्या यांस

---

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ५०६९. २. ऐ. ले. सं. पत्र नं. ५०८७.

३. याचें कारण दौलतरावांची दत्तक आई महादजी शिंद्याची बायको भागीरथीबाई या नुकत्याच नगरच्या किल्ल्यावर स्वर्गवासी झाल्या असल्यामुळें त्यांनीं वस्त्रें घेतलीं नसावीं असें दिसतें.

कंठी शिरपेंच दिला. परस्परें शरीरप्रकृति पुसिल्या. नंतर आणखीं मोदी वगैरे तीन असामींस नानांनीं वस्त्रें दिलीं. नंतर निरोप घेऊन निघोन गेले.' या हकीकतीवरून नाना, शिंदे, बाजीराव, बाळोबातात्या वगैरे शेणवी मुत्सद्दी मंडळी सप्टेंबर महिन्याच्या दहाव्या तारखेच्या सुमारास एकचित्त झाली हें दिसून येईल.

४८. नानांनीं बाळोबातात्यांबरोबर सलोखा घडवून आणण्याकरतां परशुरामभाऊंची खातरजमा घेतली व तो सलोखा पूर्णत्वानें ज्या दिवशीं घडून आला त्याच दिवशीं बाळोबातात्यांनीं भाऊंस मदत करावी कीं न करावी याचाही निकाल लागला. त्यासंबंधीं वरील पत्रांतच पुढीलप्रमाणें मजकूर दिला आहे. 'श्री. राजश्री भाऊसाहेब याणीं राजश्री बाळोबातात्यांस एक दोन पत्रें पाठविलीं होतीं (कीं) दोन पल्टणें करवीरवासी यांचे पारिपत्याबद्दल द्यावीं. रोजमुरा नेमणूक करून पाठवावा. त्याप्रमाणें देऊं म्हणून लिहिलें होतें. राजश्री बाळाजीपंत सहस्रबुद्धे याणीं पत्रें राजश्री बाळोबातात्यास दिलीं. त्याणीं उत्तर केलें कीं, आमचे घरचा कलह मिटेतोंपावेतों इकडून एक माणूस देखील येत नाहीं. आणखीं एक प्रकार हा—बायांच्या करार यादी ठरल्या त्यांत कलम लिहिलें आहे कीं, करवीरवासी महाराज यांचा तह सरकारांत आलिजाबहादर याणीं शहाणा माणूस पाठवून तह करावा. त्याप्रमाणें बायांनीं यादींत मुद्दा लिहिला आहे. त्यास आह्मांस पल्टणें देतां येत नाहींत. याप्रमाणें उत्तर जालें. पल्टणांचा विचार राहिला.' याप्रमाणें भाऊंना मदत देण्यांत बाळोबातात्यांनींही खाका वर केल्या. अर्थात् या सर्व गोष्टी नानांच्या प्रेरणेनुसारच झाल्या यांत कोणतीच शंका घेण्याचें कारण राहिलें नाहीं. बाळोबातात्यांशीं समेट घडवून आणण्यांत नानांनीं परशुरामभाऊंची खातरजमा घेतली. भाऊंनीं ती शुद्ध मनानें दिली. त्यांत विश्वासघाताचें नानांचें कारस्थान असेल असें भाऊंना वाटणें शक्य नव्हतें. त्यामुळें ते नानांच्या सूचनेप्रमाणें वागत होते. नानांनीं परशुरामभाऊंच्या वधाकरतां जो कळसूत्री चक्रव्यूह बांधण्यास सुरवात केली होती त्याची पूर्तता वर दर्शविल्याप्रमाणें सप्टेंबर महिन्याच्या दहाव्या

तारखेच्या सुमारास झाली. नानांच्या या चक्रव्यूहाच्या बांधणीमुळें बाजीराव, शिंदे, शिंदेबाया बाळोबातात्या व नारायणराव बक्षी आदिकरून शेणवी मंडळी परशुरामभाऊंपासून अगदीं अलग झाली. त्यामुळें ती करवीरच्या महाराजांच्या पक्षांत सहजच सामील झाली. कारण करवीरच्या महाराजांचें अधिष्ठान नाना हे बनले असल्यामुळें नानांच्या बरोबर समेट घडवून आणलेली सर्वच मंडळी त्या पक्षाकडे गेली. भाऊंच्या मदतीकरतां नानांनीं निजाम, रास्ते, प्रतिनिधि, विंचुरकर, यांच्याकडे पूर्वी जे कागदी घोडे नाचविले होते, तेही आतां नानांच्या अनुज्ञेप्रमाणें कागदोपत्रींच थंड झाले. आतां राहून राहिले पटवर्धन सरदार. तेही नानांच्या दडपणामुळें करवीरच्या महाराजांना आंतून सामील झाले होते. 'कुरुंदवाडकर व मिरजकर यांचा आंतून महाराजांशीं मिलाफ होता. आणि भाऊंची कुमक केल्यास महाराजांचा नाश होईल आणि त्यायोगें पेशवे व नाना यांची मर्जी आपणावर नाखूष होईल हें त्यांस भय[१] होतें.' त्यामुळें कुरुंदवाडकर व मिरजकर यांच्याकडून भाऊंना एकाही घोड्याची मदत झाली नाहीं. या वेळीं नानांच्या प्रेरणेनुसार भाऊंच्या फौजेंतही फितुर झाला होता. करवीरकरांबरोबर लढाई देण्यासारखी आपल्या फौजेची तयारी नाहीं हें भाऊ पूर्णपणें जाणून होते. म्हणून त्यांचे मनांत लढाईचा प्रसंग न आणतां तासगांवास यावयाचें होतें. त्याकरितां 'जून अखेरीपासून (मिरजकर) बाळासाहेबास भाऊ वारंवार लिहित गेले कीं, **फौज ताजीतवानी करून तिची तयारी करण्याकरितां आम्हांस मिरज तासगांवाकडे छावणीस येणें आवश्यक आहे.** तसें करूं जावें तर मार्गांत करवीरकरांची फौज आहे ती दूर सरली पाहिजे. तुम्हीं व कुरुंदवाडकर इचलकरंजीकडे स्वारी कराल तर शत्रूस मागून पायबंद बसल्याप्रमाणें होऊन हटावें लागेल. आणि त्या योगें मिरजेकडे येण्याचा आमचा हेतु सिद्ध होईल. परंतु या लिहिण्याकडे दुर्लक्ष करून कुरुंदवाडकर व मिरजकर भाऊंच्या इच्छेप्रमाणें कांहीं एक यत्न न करितां तिऱ्हाइताप्रमाणें लढाईची मौज[२]

---

१. ऐ. ले. सं. पान ५८६२.   २ ऐ. ले. सं. पान ५८६२.

पहात आपल्या जागीं स्वस्थ राहिले.' याप्रमाणें नानांच्या प्रेरणेनुसार कुरुंदवाडकर व मिरजकर हे वागल्यामुळें परशुरामभाऊ हे करवीरकरांस आंतून फितुर झालेल्या आपल्या फौजेच्या गराड्यांत सांपडले. त्यामुळें त्यांना तासगांवासही येतां येईना व करवीरकरांची कोंडीही फोडतां येईना. अशा चिमट्यांत ते सांपडले. नानांच्या या वेळेच्या या नवीन पाताळयंत्री कळसूत्री चक्रव्यूहामुळें परशुरामभाऊसारखा बलिष्ठ सिंह क्षुद्र उंदीर बनून नानांच्या भक्ष्यस्थानीं कसा सहज पडला, हें पुढील पट्टणकुडीच्या लढाईच्या हकीकतीवरून दिसून येईल.

४९. पट्टणकुडीची लढाई तारीख १७ सप्टेंबर सन १७९९ रोज मंगळवार भाद्रपद वद्य तृतीयायुक्त चतुर्थीच्या दिवशीं बुद्धिबळाच्या खेळाप्रमाणें झाली. ही लढाई परशुरामभाऊ पटवर्धन व करवीरचे महाराज यांच्यामध्यें जरी झाली असली, तरी याचे डाव दोन्हीं पक्षांतर्फे नाना एकटेच पुण्यास बसून टाकीत होते. भाऊंची फौजेच्या दृष्टीनें जशी विपरीत स्थिति झाली होती, तशीच त्यांची मानसिक व शारीरिक स्थितिही दुबळी बनली होती. प्रसंगाचे वेळीं त्यांना सर्वच मंडळीनें दगा देण्याचें ठरविल्यामुळें काळजीनें त्यांचें रक्त जळून गेलें व त्यामुळें मे महिन्यापासून त्यांना भ्रमाचा विकार झाला. 'भ्रांत पडली आहे. प्रयोग अगर पित्तप्रकोप वायु असेल असें[1] दिसतें.' 'वडिलांची (भाऊंची) प्रकृति तर रोगाची भावना अगदीं नाहीं; परंतु परकृतेंकरून व्यापून गेली.' 'चिदंबर दीक्षितबावा यांस लष्करांत आणण्याचा प्रकार बावा आज सूर्योदयाचे पूर्वी घटका रात्रीस येऊन वडिलांस दर्शन दिलें.' 'वडिलांची प्रकृत दिवसेंदिवस बरी आहे. 'मुंचामि त्वां' चा जप करावयाचें लिहिलें त्याप्रमाणें करितों.' या उताऱ्यावरून भाऊ हे रोगानें आजारी नव्हते. त्यांच्यावर प्रयोग करण्यांत आला होता. मूठमारी, जादु

---

१ ऐ. ले. सं. पत्र नं. ५८४८

मंत्र तंत्र या पैकीं तो प्रयोग असल्यामुळें त्याचा परिहार होण्याकरतां दीक्षितबावांना लष्करांत आणण्यांत आलें होतें व अनुष्ठानें, जपजाप्य करून त्यांना गुण येऊं लागला होता. त्यांच्या प्रकृतींत सारखा चढ उतार होतां होतां जून १५ च्या सुमारास त्यांची प्रकृति साधारणपणें ताळ्यावर आली. एकंदरींत सप्टेंबर महिन्यांत पट्टणकुडीच्या लढाईच्या वेळीं त्यांची प्रकृति पूर्वींप्रमाणें आरोग्यसंपन्न नव्हती. अशाही स्थितींत त्यांना नानांच्या आज्ञेप्रमाणेंच आपल्या फौजेसह कूच करावें लागत होतें. 'वडिलांचें (भाऊंचें) चतुर्थीस उत्साहास जाणें होतें कशावरून ? वडील मोहीमशीर सरकार[1] आज्ञेनुसार' या पत्राप्रमाणें परशुरामभाऊंच्या फौजेच्या हालचाली नानांच्या आज्ञेनुसार होत होत्या व करवीरकरमहाराजांच्या तर नानांच्या आज्ञेनेंच होत होत्या. एकंदरींत एकट्या नानांच्या डाव टाकण्यावर पट्टणकुडीच्या लढाईची परिसमाप्ति होणार होती हें अगदीं स्पष्ट दिसून येईल.

५०. सप्टेंबर महिन्याचे पूर्वीं करवीरकरमहाराजांची फौज वेदगंगेच्या अलीकडे होती ती तारीख २ सप्टेंबर रोजीं वेदगंगा उतरून पलीकडे गेली आणि हमीदवाडा येथें डोंगरांच्या आसऱ्यानें येऊन उतरली. हमीदवाड्यापासून दोन कोसांवर पट्टणकुडी येथें परशुरामभाऊंच्या लष्कराचा मुक्काम होता. मे महिन्याच्या सुरवातीस भाऊंच्या जवळ पंचेवीस हजार फौज होती ती नानांच्या प्रेरणेनुसार घटतां घटतां पांच हजार स्वार, दीडदोन हजार पायदळ व दोन तोफा एवढीच जेमतेम राहिली. तीही बहुतेक सर्व फितुर झाली होती. करवीरकरमहाराजांच्या विरुद्ध मनापासून लढण्याची कोणालाच आस्था उरलेली नव्हती. करवीरकरांची फौज जरी यावेळीं भाऊंच्या फौजेएवढीच होती, तरी ती विनफितुराची व सर्व बाजूंनीं एकदिलाची अशी होती. भाऊंच्या फौजेच्या सर्व हालचाली करवीरकरांना मिरजकरांकडून गुप्तपणें समजत होत्या. भाऊंना मात्र

---

1 ऐ. ले. सं. पत्र नं. ५०५६.

त्यांचे आंतील मनसुबे समजत नव्हते. नाना, शिंदे आणि बाळोबातात्या हे सर्व मिळून भाऊ व करवीरकर यांच्यामध्यें तह घडवून आणण्याच्या खटपटींत आहेत व त्याप्रमाणें शिंद्यांकडून एक शहाणा माणूस येणार आहे व तोंपर्यंत नानांच्या लगामीं करवीरकर असल्यामुळें ते लढाईस प्रवृत्त होणार नाहींत अशी भाऊंची नानांच्या प्रेरणेनुसार समजूत झाली होती. त्यामुळें नानांची आज्ञा होईल त्याप्रमाणें ते आपल्या फौजेची हालचाल, कूच अगर मुक्काम करणार होते, ह्मणून ते पुण्याहून येणाऱ्या सरकारी आज्ञेची वाट पहात बसले. पुण्याहून येणाऱ्या आज्ञेवर भाऊंच्या हालचाली अवलंबून असल्यामुळें व पुणेंदरबारच्या पूर्ण लगामीं करवीरकर वागत असल्यामुळें त्यांच्याकडून अकल्पित कोणतेंही संकट येण्याची भाऊंना शंका वाटण्यासारखीही नव्हती. याकरतां ते निर्धास्तपणें आपला वेळ बुद्धिबळाच्या खेळांत घालवीत होते. करवीरकर मात्र भाऊंच्या बेसावधपणाची व त्यांच्या फौजेंतील फितुराची वरचेवर चांचणी करीत होते.

५१. करवीरकरांची फौज हर्मादवाड्यास व भाऊंची तेथून दोन कोसांवर पट्टणकुडी येथें, इतका नजीक परस्परांच्या लष्कराचा गोट सुमारें दहा बारा दिवस पडला होता. या अवधींत करवीरकरांनीं भाऊंवर हल्ला करण्याकरितां आपला तळ सोडून निघण्याचें ठरविलें. भाऊंना ही वार्ता समजतांच तेही युद्धास सिद्ध झाले. 'इतक्यांत कांहीं अपशकुन झाला. त्यामुळें तो बेत त्या दिवशीं रहित झाला. असेंच आणखीं एकवार घडलें. दोन वेळां असें झालें. तेव्हां भाऊंना कोल्हापूरकरांचा कांहीं अंत लागेना. आपणास हूल दाखविण्याकरितां हे त्यांचे उपाय चालले असावेत असें ते समजले. आणि अंमळसे बेसावधपणें[1] राहिले.' याचें कारण असें होतें कीं, नानांकडून करवीरकरांबरोबर युद्ध प्रसंग सुरू करण्याची सूचना आल्याशिवाय भाऊंना युद्ध सुरू करावयाचें नव्हतें. महाडच्या कारस्थानाच्या वेळीं नानांनीं करवीरकरांना असें आश्वासन दिलें होतें कीं, 'भाऊंची तुह्मांवर स्वारी होईल तर आह्मी तुमचा बचाव[2] करूं.' याकरितां नानांच्या आज्ञे-

१ परशुरामभाऊ पटवर्धन यांचें चरित्र पान १२०. २ नाना फडनविसांचें चरित्र पान १८२.

शिवाय भाऊ करवीरकरांची कुरापत काढणार नव्हते. भाऊंनी जर कुरापतच काढली नाहीं तर करवीरकरांना युद्धप्रसंग करण्याचें कारणच उरलेलें नव्हतें. ह्मणूनच भाऊ बेसावध होते. भाऊंना पूर्णपणें बेसावध ठेऊनच नानांना आपला कार्यभाग साधून घ्यावयाचा होता. नानांच्या इच्छेप्रमाणें पहिल्यानें भाऊंनीं कुरापत काढावी असें होतें. तशी कुरापत त्यांनीं काढली असती तर पेशवेदरबारचे अर्थात् नानांचे परशुरामभाऊ गुन्हेगार ठरले असते. परंतु नानांबरोबर, श्रीगजाननावरील दूर्वा पाठवून देऊन सलोख्याविषयीं वचनबद्ध झाल्यानंतर भाऊंनीं आपलें वचन पाळलें व करवीरकरांबरोबर पहिल्यानें कुरापत काढावयाची नाहीं, असें त्यांनीं निश्चयपूर्वक ठरविलें. करवीरकर हेही नानांचे अंकित असल्यामुळें ते केवळ हूल दाखवून आपली परीक्षा पहात आहेत, यापलीकडे त्यांचा कोणताच दुष्ट हेतु नाहीं, अशी भाऊंना खात्री वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. शूर पुरुषाचा नाश करणारें हें विश्वासघाताचें शस्त्र नानांनीं पाजळून तयार करविलें व त्याच्या अधिष्ठानावर करवीरकरांना परशुरामभाऊंचा वध करण्याकरतां सोडलें.

५२. परशुरामभाऊ लढाईची कुरापत काढीत नाहींत अशी करवीरकरांची खात्री झाल्यामुळें त्यांनीं अखेरीस असा सिद्धांत ठरविला कीं, 'आपण निपाणीस तोफा लावून गांव घेणार. तेथेंच त्या लष्कराची परीक्षा पहावी. निपाणीस तोफा लाविल्या असतां तिकडील कुमक न झाली तर त्या लष्कराचा दम समजला. मग बेजरब लढाई[1] द्यावी.' करवीरकरांच्या या सिद्धांतांत बराच अर्थ होता. नानांनीं परशुरामभाऊंच्या बाबतींत जें विश्वासघाताचें बिनतोड शस्त्र पाजळलें होतें, तें किती प्रमाणांत लागू झालें आहे याचा कस लावून घेण्यास वरील सिद्धांत उत्तम होता. या बेतास अनुसरून भाद्रपद वद्य तृतीयायुक्त चतुर्थी, मंगळवार ता. १७ सप्टेंबर सन १७९९ इ. या दिवशीं सकाळच्या प्रहर दिवसास

---

१. ऐ. ले. सं. पान ५८६५.

महाराज लढाईच्या तयारीनें फौज सुद्धां गोट सोडून निघाले. ते पहिल्यानें आपला सिद्धांत खरा कीं, खोटा हें ठरवून घेण्याकरतां निपाणीनजीक आले. तेथें आल्यानंतर त्यांचा सिद्धांत खरा ठरल्याचें त्यांना दिसून आलें म्हणून ते 'निपाणीस क्षणभर विश्रांति घेऊन, पुढें अर्धकोशावर येऊन, पट्टणकुडीजवळ लढाईच्या बेतानें' उभे राहिले.'[1]

५३. 'या वेळीं भाऊ बुद्धिबळें खेळत बसले होते. शिलेदार लोक पगाराच्या मागील बाकीकरितां जिकीर करीत होते; आणि तोफखान्याचे बैल चरावयास गेले[2] होते.' या माहितीवरून पहातां पुष्कळ गोष्टींचा सहज उलगडा होईल. मनुष्याच्या मनाला स्वस्थता प्राप्त झाल्याशिवाय खेळ अगर जेवण सुचत नाहीं. नारायणराव पेशव्यांनीं हरीपंत फडक्यांना गारद्यांच्या दंग्याची माहिती देऊन त्याचा बंदोबस्त करण्याचा हुकूम दिला असतां तो मोडून ते पंचपक्वान्नांचें भोजन करण्याकरतां निर्धास्त जसे निघून गेले, तसाच प्रकार करवीरकरमहाराज छातीवर उभे असतां परशुरामभाऊ बुद्धिबळें खेळत बसले होते व त्यांच्या तोफांचे बैल मजेंत चरण्याकरतां रानांत निघून गेले होते, या हकीकतीवरून दिसून येतो. ज्या गोष्टीमुळें हरीपंतांची वृत्ति बेडर व निर्धास्त होती तीच वृत्ति या वेळीं भाऊंची होती. हरीपंतांच्या मागें त्या वेळीं जें अधिष्ठान होतें तेंच अधिष्ठान या वेळीं आपल्या मागें आहे असें भाऊंना वाटत होतें. त्यामुळेंच शिलेदार लोक पगाराच्या बाकीची जिकीर करीत बसले असतां व शत्रू उरावर येऊन धडक मारूं लागला असतां भाऊ निर्भयपणें बुद्धिबळाचा खेळ खेळत होते. नानांनींच भाऊंची सर्व बाजूनें खात्री व हमी घेतली असल्याखेरीज भाऊ अशा स्थितींत बेडर व निर्धास्त बनणें शक्य नव्हतें. नानांनीं भाऊंची अशी जर हमी घेतली नसती, तर अशी अक्षम्य चूक पेशव्यांच्या सैन्याचें सरसेनापतीपद पूर्वी एकदां लाभलेल्या भाऊंच्या हातून कालत्रयीं झाली

---

[1] व [2]. परशुरामपंतभाऊ पटवर्धन यांचें चरित्र पान १२१.

नसती. करवीरकर नानांच्या हुकमतींत आहेत व आपणही त्यांच्याच हुकमतींत आहोंत हा भाऊंना नानांनीं पूर्णपणें विश्वास उत्पन्न करून दिला होता. नानांच्या आज्ञेवांचून कोणतीही नवीन कलागत उत्पन्न होणार नाहीं अशी नानांनीं भाऊंची खातरजमा केल्याशिवाय ते इतके बेडर व निर्धास्त नव्हते हें उघड आहे.

५४. करवीरचे महाराज भाऊंवर चाल करून आले तेव्हां त्यांना नानांच्या विश्वासघाताचें विश्वरूप दिसलें असेल यांत संशय नाहीं. त्यांनीं तेवढ्याच अवकाशांत आपल्या फौजेची व्यवस्था कशीबशी लावली. सुमारें एक हजार स्वार जवळ ठेऊन ते गोट संभाळण्याकरितां जाग्यावर राहिले; आणि बाकी फौजेच्या दोन टोळ्या करून त्यांनीं त्या करवीरकरांच्या मुकाबल्यास पाठविल्या. एका टोळींत रामचंद्रपंत व दुसऱ्या टोळींत महादेवराव दाजी हे मुख्य सरदार होते. शिलेदारांची समजूत काढण्यास, तोफेचे बैल वगैरे रानांतून परत आणण्यास व फौजेची व्यवस्था लावण्यास दोन प्रहरचा सुमार झाला. सायंकाळच्या प्रहर दिवसास करवीरकरांची फौज एकवटून रामचंद्रपंतांच्या टोळीवर तुटून पडली. रामचंद्रपंतांनीं त्यांचा हल्ला मोठ्या शौर्यानें परतविला. नंतर करवीरकरांनीं महादेवराव दाजी यांच्या टोळीवर हल्ला केला. तेव्हां ती टोळी कच खाऊन पळूं लागली. त्यामुळें लढाईची शिस्त बिघडून रामचंद्रपंतांसही मागें हटावें लागलें. या सामन्यांत रामचंद्रपंत जखमी झाले. त्यांच्या डाव्या दंडावर गोळी लागली होती. तरी त्याच स्थितींत ते पद्धतशीर पीछेहाट करीत असतां त्यांनीं भाऊंना निरोप पाठविला कीं, गोट हालवून कूच करावें. त्याप्रमाणें भाऊ गोट हालविण्याच्या तयारीस लागले. गोटाची लादालाद करून व आपण पालखींत बसून निघण्याच्या तयारींत ते होते. इतक्यांत करवीरच्या महाराजांची सर्व फौज येऊन गोटावर आदळली. त्याबरोबर भाऊ पालखींतून उतरून घोड्यावर स्वार झाले व जेवढे लोक त्यांच्याजवळ होते तितक्यानिशींच ते लढाईस उभे राहिले. करवीरकरांच्या पहिल्या धडकीसरसे भाऊंच्या जवळचे

सर्व लोक पळून गेले व भाऊंस तीन जखमा लागून ते विश्वासराव घाटगे (सर्जेराव घाटगे यांचा भाऊ) यांच्या हातीं पाडाव[1] सांपडले व मृत्यु पावले. याप्रमाणें पट्टणकुडीच्या नानांच्या चक्रव्यूह कारस्थानी लढाईचा भाऊंच्या वधामुळें अखेर झाला.

५५. ' भाऊंच्या अन्नावर वाढलेले व त्यांनीं नांवलौकिकाला चढविलेले इतके शिपाई हजर असतां एकानेंही त्यांचा जीव वांचविण्यासाठीं हत्यार चालविलें नाहीं ! एवढा मोहरा जेथें पाडाव झाला तेथें त्याच्या बचावासाठीं झगडणाऱ्या हजार पांचशें राहो, पण शेंपन्नास तरी योद्ध्यांचे मुर्दे नजरेस पडावे ! पण मरणाच्या वेळचा सोबती भाऊंस एकही भेटला[2] नाहीं ! ' भाऊसारख्या विख्यात व पराक्रमी सरदाराच्या अंगाला धक्का लागण्यापूर्वी निदान हजार पांचशें मुर्दे तरी पडले असते असें आजपर्यंतच्या त्यांच्या कर्तबगारीवरून सहज लक्षांत येतें. आणि या अखेरच्या पट्टणकुडीच्या लढाईंत त्याच्या अगदीं विपरीत गोष्ट कां घडून आली याचें सर्वांना आश्चर्य वाटतें. ' उंदराची शिकार करावयाची झाल्यास वाघाच्या शिकारीची तयारी करावयाची ' हा नानांचा स्वभाव लक्षांत घेतल्यास वरीलप्रमाणें आश्चर्य वाटण्याचें कारणच शिल्लक राहत नाहीं. भाऊंच्या फौजेंत नानांनीं अनंत मार्गांनीं किती फितुर करून ठेविला होता याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे पट्टणकुडीची लढाई ही होय. परशुरामभाऊसारखा वयोवृद्ध, तपोवृद्ध व युद्धविषयक अनुभववृद्ध सेनापती एक हजार फौज घेऊन करवीरकरांना तोंड देण्याकरतां उभा असतां ते तेवढेच एकटे त्या लढाईंत जखमी होऊन मृत्युमुखीं पडावे हा दोष भाऊंच्या युद्धकलेचा नसून नानांच्या अफाट कपटकारस्थानाच्या प्रभावाचा आहे. परशुरामभाऊंचा वध हा नानांच्या बुद्धिकौशल्याचा शेवटचा विजय या दृष्टीनें तो महाराष्ट्राच्या इतिहासांत विशेष महत्वाचा आहे यांत संशय नाहीं.

---

१. ऐ. ले. सं. पान ५८६६. २. ऐ. ले. सं. पान ५८६७.

५६. भाऊंचा अंत समरांगणीं झाला. त्या प्रसंगीं त्यांचे चार पुत्र व अनेक भाऊबंद यापैकीं कोणीही जवळ नव्हतें. बाकीची मंडळी गैरसमजानें व भयानें पूर्वीच निघून गेली होती. अशा स्थितींत भाऊंच्या शवाचें दहन करावयास कोणीही जवळ राहिलें नाहीं. त्या वेळीं नारो हरी करंदीकर हे मिरजकरांचे करवीर दरबारांतील वकील या कार्याकरतां पुढें आले. त्यांनीं करवीरच्या महाराजांची रीतसर परवानगी मिळवून हमीदवाडा येथें भाऊंचें प्रेत नेऊन त्यास अग्निसंस्कार[१] केला. नारो हरींनीं यावेळीं फारच मोठी पुण्याई आपल्या पदरीं बांधून घेतल्याचें दाखविलें. या दहनस्थळीं मागून करवीरच्या महाराजांनीं भाऊंची समाधी बांधविली व तेथें पूजा अर्चा नित्य चालावी अशी तजवीज[२] केली.

५७. ' महाराष्ट्र देशांत आजपावेतों जे कोणी महापराक्रमी पुरुष होऊन गेले त्यांतील श्रेष्ठांमध्यें भाऊंची गणना केली पाहिजे. शौर्य आणि साहस हे त्यांचे उपजत गुण होते. भीतीनें त्यांच्या मनास कधींही स्पर्श केला नाहीं. केवढाही प्रबळ शत्रु असो; त्याच्याबरोबर दंड थोपटून समर करण्यास भाऊ सिद्ध असत. शत्रूस पाठ दाखविणें म्हणजे प्रत्यक्ष मरणापेक्षांही अधिक ते मानीत. चौदा वर्षांचे असतां त्यांनीं युद्धक्रम आरंभिला आणि तोच क्रम आमरण अखंड चालविला. कोल्हापूरकर, हैदर, टिपु, निजाम व इंग्लिश अशा मोठमोठ्या रणशूर व बलाढ्य शत्रूंशीं त्यांनीं समर केलें, पण त्यापैकीं एकासही ते हार गेले नाहींत. कर्नाटकांतील राजे त्यांच्या नांवाला थरथर कांपत. त्या प्रांतांत पेशवे सरकारचें वर्चस्व राखण्यास याच पुरुषाचे पराक्रम सर्वांशीं कारण[३] होते. '

५८. ' भूतदया हा ईश्वरी गुण मानिला आहे, तो भाऊंच्या आंगीं फार वसत होता. कोणीही याचना करण्यास त्यांजकडे आला आणि विमुख गेला,

---

१. नारो हरी करंदीकर हे या भाऊंच्या अंतकालच्या सेवेवरून आपणांस भाऊंचा पांचवा पुत्र असें म्हणवीत असत.   २ ऐ. ले. सं. पान ५८६८.

३. परशुरामपंतभाऊ यांचें चरित्र पान १३५.

असें कधीं होत नसे. अनेक ठिकाणीं, अतीत अभ्यागतांच्या सोईकरतां त्यांनीं मोठ्या खर्चानें अन्नसत्रें ठेविलीं होतीं. पुष्कळ गरीब व कुटुंबवत्सल लोकांस त्यांनीं तासगांव येथें घरें करून दिलीं. आणि त्यांच्या कुटुंबांच्या चरितार्थाची सोई केली. स्वारी चालली असतां वाटेनें कोणी अनाथ, पंगु किंवा क्षुधित भेटला असतां, त्याचा समाचार घेतल्याशिवाय पुढें जाऊं नये असा त्यांचा परिपाठ होता. गरीब लोकांच्या उपयोगार्थ कोठें कोठें विहिरी व तलाव त्यांनीं बांधिलेले अद्यापि¹ लोक दाखवितात.'

५९. 'पदरचे मानकरी, आश्रित आदिकरून परिजनांवर भाऊंचा फारच लोभ असे. परिजन आदिकरून हे आपल्या कुटुंबांतीलच आहेत, असें ते मानीत, आणि आपल्या पुत्राप्रमाणें त्यांचा प्रतिपाळ करीत. स्वारींत असोत, देशांतरीं असोत, किंवा कोठेंही असोत, त्यांच्या हिताविषयीं ते निरंतर काळजी वाहात. **ज्याला एकदां आपला असें त्यांनीं ह्मटलें, त्याला त्यांनीं कधींही अंतर दिलें नाहीं.** पेशवे सरकारची इतराजी झाल्यामुळें कित्येक थोरथोर गृहस्थ त्यांच्या आश्रयास आले, त्यांस त्यांनीं त्यांच्या इतमामाप्रमाणें ठेऊन घेतलें; व त्यांस नेमणुका करून दिल्या. त्यांचा अद्यापि त्यांचे वंशज उपभोग घेत आहेत. आपल्या मंडळींचा त्यांना मोठा अभिमान असे. आणि त्यांचा उत्कर्ष त्यांस फार प्रिय असे. त्यांपैकीं पुष्कळांस त्यांनीं योग्यतेस चढविलें. कित्येकांस गांव इनाम दिले; कित्येकांस जमिनी इनाम दिल्या; आणि कित्येकांस पेशवे-सरकारांतून मामलती देवविल्या. अशा पुरुषाच्या ठायीं पदरच्या परिजनांचें अढळ व अप्रतिम प्रेम जडलें यांत नवल नाहीं. ते सर्व त्यांना पितृतुल्य मानीत, आणि त्यांजकरितां आपलें सर्वस्व खर्चण्यास सिद्ध असत. मांडवगण येथें भाऊ प्रतिबंधांत पडले, तेव्हां त्यांच्या सेवकांनीं व आश्रितांनीं त्यांच्या मुक्ततेकरितां नाना प्रकारचे परिश्रम केले. **भाऊंना दूरदेशीं नेऊन पोंचवावें असे नानांचे बेत चालले होते.** ते दीर्घ प्रयत्न करून त्यांनीं

---

१ परशुरामपंत भाऊ यांचें चरित्र पान १३५

रहित केले. भाऊंच्या जवळ सक्त पहारा होता, तरी त्यांतून भेदून जाऊन कित्येकांनीं वैरागी, गोसावी अशा प्रकारचे नाना वेश धारण करून त्यांची भेट घेतली; कित्येकांनीं शिद्यांकडे, त्यांची प्रियपात्र नाटकशाळा (केसरा) इच्या द्वारें त्यांच्या मुक्ततेचें धोरण बांधिलें; कित्येकांनीं रास्त्यांस मारिलें; आणि कित्येक शूर तर जिवाची पर्वा न करितां जवळच्या पहारेकऱ्यांस कापून काढण्यास उद्युक्त झाले. अशा निष्ठेचे भाऊचे सेवक[1] होते. **सेवक उत्तम होणें हें बहुतांशीं धन्याच्या हातीं आहे असें ह्मणतात, तें यथार्थ आहे.'**

६०. 'भाऊंच्या उत्तम गुणांमध्यें त्यांच्या **एकपत्नीव्रताची योग्यता फारच मोठी मानली पाहिजे.** अल्पवयांत ऐश्वर्य प्राप्त झालें असतां, व विषयोपभोगाच्या सर्व अनुकूलता असतां, आजन्म त्यांनीं कडकडीत एकपत्नीव्रत चालविलें, या गुणाबद्दल, त्यांची कितीही प्रशंसा केली तरी ती थोडीच आहे. महाराष्ट्र देशाच्या इतिहासांत या गुणांत भाऊंच्या जोडीस बसविण्याजोगे फारच थोडे पुरुष[2] सांपडतील.'

६१. '**भाऊ मनाचे फार मोकळे व निष्कपटी होते.** आंत एक आणि बाहेर एक हें त्यांच्या स्वप्नींही नव्हतें. पण जग हें कपटानें भरलेलें आहे. त्यांत नुसत्या सरळ वर्तनाचा परिणाम लागत नाहीं. या गोष्टींचा अनुभव भाऊंना उत्कृष्ट आला; आणि चांगली अद्दल घडली. नाना फडनविस व बाळोबातात्या यांमध्यें पेशवाईंतील कारभाराविषयीं प्रतिस्पर्धा सुरू झाली; तेव्हां त्यांनीं भाऊंना मध्यें घेऊन, त्यांचें नांव पुढें केलें, आणि स्वार्थ साधिले; व त्याला तोंडघशीं दिलें. यावरून पाहतां व्यवहारांत (कपटानें भरलेल्या जगांत) सरळ वर्तन सर्वदां हितकर होतेंच असा नियम नाहीं. **निदान कपटपटु पुरुषाबरोबर तरी, तशा वर्तनाचा उपयोग होत नाहीं हें सत्य[3] आहे.'**

६२. 'सेनानायक या संबंधानें पाहतां, भाऊंची गणना अर्वाचीन वीरांत अग्रस्थानीं केली पाहिजे. **सेनानायकाचे सर्व गुण त्यांच्या**

१, २, ३. परशुरामपंतभाऊ यांचें चरित्र पान १३६, १३७, १३८,

मध्यें पूर्ण बसत होते. अंगीकारिलेल्या कार्याची दृढनिश्चयपूर्वक पाठ पुरविणें हा एक भाऊंच्या अंगीं विशेष गुण[1] होता.'

६३. 'भाऊंची स्वधर्मावर फार श्रद्धा असे. नेहमीं स्वाऱ्यांची गडबड चाललीच असे, तरी स्नानसंध्या, जपजाप्य इत्यादि ईश्वरसेवेच्या कर्मांत ते कांहींना कांहीं तरी काळ नियमानें घालवीत असत. अतीत, अभ्यागत वैदिक, पुराणिक यांची ते योग्यतेनुरूप संभावना करीत. विद्वान् व पूज्य अशा शास्त्रीपंडितांस व वैदिकांस त्यांनीं आपल्या संस्थानांत इनामें व वर्षासनें करून दिलीं. त्यांचा अद्यापि त्यांचे वंशज उपभोग घेत आहेत. भाऊंनीं धर्मबुद्धीनें परोपकाराचीं व लोकोपयोगीं कृत्यें अनेक स्थळीं अनेक केलीं. बहुत काळ लोटल्यामुळें त्या सर्वांबद्दल आतां माहिती मिळणें अशक्य आहे. तथापि त्यांतून जीं फारच प्रसिद्ध आहेत व ज्यांची माहिती लोक सांगतात त्यांची माहिती पुढीलप्रमाणें आहे. (१) श्री काशीक्षेत्रीं भाऊंनीं एक शिवालय बांधिलें, व लक्ष ब्राह्मणांस इच्छाभोजन घातलें. या लक्ष भोजनाची काशी क्षेत्रीं फार ख्याति झाली. या कृत्यास खर्च फार लागला. काशींत असें लक्ष भोजन कोणींही घातलें नव्हतें. हें काम भाऊंनीं धोंडो विश्वनाथ जोग यांजकडे सांगितलें होतें. भाऊंनीं श्री काशी क्षेत्रीं एक वाडा बांधून अतीत, संन्याशी यांचा तेथें परामर्श व्हावा, अशी व्यवस्था केली. ती अद्यापि चालू आहे. (२) श्री क्षेत्र पंढरी येथें श्री पांडुरंगाचा सभामंडप, श्री मारुतीचें देवालय, व नगारखान्याकरितां कमान बांधिली. आणि श्री अमृतेश्वराच्या देवालयाचा जीर्णोद्धार केला. या क्षेत्रींही भाऊंनीं श्री विठ्ठलमंदिरासंनिध एक वाडा घेऊन, तेथें विठ्ठलाच्या नैवेद्याची व कोणी अतीत संन्याशी आले असतां त्यांच्या भोजनाची सोई होण्याकरितां अन्नसत्र ठेविलें. तेंही अद्यापि चालू आहे. (३) श्री क्षेत्र पुणतांबे येथें श्री गोदावरीच्या कांठीं शिवालय, घांट

---

१ परशुरामपंतभाऊ यांचें चरित्र पान १३९.

व वाडा बांधिला; आणि गांवास गांवकुसूं केलें. (४) तासगांव येथें श्री गणपतीचें देवालय बांधिलें. गणपती हें भाऊंचें आराध्य दैवत असे. हें देवालय फार शोभिवंत, सुंदर व भव्य व्हावें ह्मणून भाऊंनीं दूरदूरचे कारागीर आणविले होते. तासगांव येथें हाटकेश्वर ह्मणून एक अनादिस्थान होतें, त्याचा भाऊंनीं जीर्णोद्धार केला. (५) चिंचणी येथें श्री परशुरामेश्वराचें देवालय बांधिलें, व भिलवडी येथें श्री कृष्णेस मोठा घांट बांधिला. (६) पुणें येथील तुळशी बागेंतील श्री रामास भाऊंनीं मोकारी हा गांव इनाम दिला. कायगांवकर दीक्षित यांस जळकें परगणे नेवासें हा गांव त्यांच्या अन्नवस्त्राकरितां दिला. जमखंडीजवळ श्री क्षेत्र असंगी येथील श्री वेणुमाधवाचे देवाळयास, त्याच्या पूजार्चेचा सतत खर्च चालण्याकरतां भाऊंचे चुलत बंधु विष्णु दीक्षित यांस असंगी हा गांव त्यांनीं इनाम दिला. (७) प्रतिवर्षी शिवरात्रीस श्री वाळकेश्वर (गणेशवाडी); श्री रामेश्वर (रामतीर्थ;) श्री कुसुमेश्वर (कोंतवडें); श्री हाटकेश्वर (तासगांव); इत्यादि अकरा मोठमोठ्या शिवालयामध्यें महारुद्राभिषेक करण्याची भाऊंनीं व्यवस्था ठेविली होती. (८) कोंकणांतून हजारों गरीब ब्राह्मण प्रतिवर्षी देशावर येत. त्यांच्या सोईकरितां आंबेघांट व अणुस्कुरेंघांट यांवर भाऊंनीं मोठ्या खर्चानें अन्नसत्रें ठेविलीं होतीं. या शिवाय चिंचणी गावाजवळ मोठें धरण, व जमखंडी येथें मोठा किल्ला भाऊंनीं बांधला होता. चिंचणीच्या धरणावर बागाईताचा फार उपयोग होत[१] असे.'

६४. महाडच्या कारस्थानांतील नानांच्या अंगचा विशेष गुण खरेशास्त्र्यांनीं पुढीलप्रमाणें प्रकाशांत आणलेला आहे. 'या (महाडच्या) कारस्थानाचा दुसराही एक विशेष आहे. तो असा कीं, या कारस्थानाच्या बनावांत नानांनीं प्रत्यक्ष असा भाग कोणताच घेतला नाहीं. 'तटस्थः स्वानर्थान् घटयति च मौनं च भजते' या उत्कृष्ट मुत्सद्याच्या कसोटीस नाना पूर्णपणें उतरतात. कारण ते महाडास तटस्थपणें स्वस्थ बसले होते आणि त्यांच्या प्रेरणेवरून

१ परशुरामपंतभाऊ यांचें चरित्र पान १३३-३४.

सर्व कामें परभारेंच बजावलीं जात होतीं ! इंग्रजांनीं शिंद्यांस भेडसावलें, मशीरानें भाऊ व बाळोबा यांस फसविलें, फडक्यांनीं फितुर उत्पन्न केले, फांकड्यांनीं फौज जमा केली, निजाम व भोंसले यांनीं पुण्यावर चालून घेतलें, आणि शेवटीं शिंद्यांनीं भाऊ व बाळोबा यांचें पारिपत्य केलें. या सर्व गोष्टी जो तो आपल्याच इच्छेनें व सत्तेनें करीत आहे असाच सार्वत्रिक देखावा दिसत होता. या सर्वांचे प्रेरक नाना फडनविस आहेत ही गोष्ट सामान्य लोकांसच काय, पण खुद्द परशुरामभाऊ व बाळोबातात्या यांस शेवटपर्यंत[1] कळलीच नाहीं.' नानांचा हा पाताळयंत्री गुप्त कारस्थानें बनविण्याचा विशेष गुण दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चालला होता. इ. स. १७९६ मध्यें नानांनीं महाडचें कारस्थान घडवून आणलें. पुढें दोन तीन वर्षांचे आंतच त्यांनीं हें परशुरामभाऊंच्या वधाचें कारस्थान केलें. नानांनीं हें कारस्थान महाडच्या कारस्थानाच्या पाऊलांवर पाऊलें टाकांतच केलें आहे. या कारस्थानाकरतां नाना तटस्थवृत्ति —बकध्यानवृत्ति धारण करून पुण्यासच राहिले. नानांच्या गुप्त कारस्थानाच्या तालावर, इंग्रज, शिंदे, शिंदेबाया, बाळोबातात्या, बाजीराव पेशवे, अमृतराव, निजाम, प्रतिनिधि, करवीरचे महाराज, भोंसले, पटवर्धन सरदार, रास्ते, गोखले सरदार वगैरे पात्रें आपापल्या भूमिका उत्कृष्ट बजावण्याकरतां नाचत होतीं. नानांचें हें गुप्त कारस्थानी नाटक कोणाकरतां आहे किंवा हें आनंदपर्यवसायी अगर शोकपर्यवसायी होणारें आहे, याचा कोणालाच थांग लागलेला नव्हता. महाडच्या कारस्थानाप्रमाणें कोणत्यातरी एका बाजूनें आनंदाचें, समाधानाचें किंवा कीर्तीचें हें परशुरामभाऊंच्या वधाचें नानांचें कारस्थान झालें असतें तर त्याच्या पूर्ततेनंतर याही कारस्थानाचा 'मीच प्रेरक होतों' असें सांगून त्याला लागलेल्या खर्चाची व देऊं केलेल्या बक्षिसाची यादी लक्ष ब्राह्मण भोजनाच्या नवसाच्या खर्चासहित बाजीरावांच्या मखलाशीकरितां पुढें आली असती. परंतु भाऊंच्या वधाचें कारस्थान हें लौकिकांत अपकीर्ति उत्पन्न करणारें व शोकरसपर्यवसायी असल्यामुळें त्याप्रीत्यर्थ करावा लागलेला सर्व खर्च संतोषपट्ट्यासारख्या प्रजाज-

1. नाना फडनविसांचें चरित्र पान १८९.

नांवर काळ भैरवी पट्टयांची झोड उठवून मिळविलेल्या पैशांतूनच नानांना गुपचूप भागवावा लागला; आणि **या भाऊंच्या वधाच्या कारस्थानाचे प्रवर्तक एकटे करवीरचे महाराजच होते असें प्रसिद्धीस आणून लोकनिंदेचें खापर नानांनीं परभारें त्यांच्या डोक्यावर कसें फोडलें व आपण अगदीं नामानिराळे कसे राहिले** हें पुढील प्रकरणावरून दिसून येईल. एकंदरींत परशुरामभाऊंच्या वधाचें नानांचें हें पाताळयंत्री गुप्त कारस्थान त्यांच्या अंगच्या वरील **विशेष गुणाला** विशेष लोकप्रसिद्धी देणारें आहे यांत संशय नाहीं. भाऊंचा वध हा नानांच्या कपटकारस्थानाचा जरी विजय असला तरी तो पेशव्यांच्या राज्याचा अस्तच होता, असें कोणी म्हटल्यास तें वावगें ठरणार नाहीं !

प्रकरण ४० वें.

नानांचीं शेवटचीं विषारी कारस्थानें व नानांचा अंत.

इ. स. १७९९ ते १८००.

१. नानांनीं करवीरमहाराजांच्या करवीं परशुरामभाऊंना वध करविल्यानंतर त्यांना करवीरकरांची जरूरी राहिली नाहीं. म्हणून त्यांना दुर्बल करून सोडण्याची नानांची नवीन योजना. करवीरकरांचें राघोबादादांप्रमाणें नैतिक अधःपतन होईल अशी कंडी नाना पसरवितात.—२ करवीरच्या महाराजांनीं परशुरामभाऊंच्या शरीराचे तुकडे तुकडे करविले असा त्यांच्यावर गंभीर आरोप. या बाबतींत नारो हरी करंदीकर हे मुख्य साक्षीदार.—३ परशुरामभाऊंच्या मृत्युसंबंधींचीं दहा पत्रें.—४ नारो हरी यांची थोडी माहिती त्यांनीं बाळासाहेबांस जें पहिलें पत्र पाठविलें त्याचा निष्कर्ष.—५ नारो हरीनें पहिलें पत्र लिहिल्यानंतर परशुरामभाऊंचा अंत्यविधि होईपर्यंतची साद्यंत हकीकत देणारें त्यांचें 'पत्र दुसरें' यांतील आशय.—६ नारो हरींच्या "पत्र ३ रें" यांतील हकीकतीचा मथितार्थ.—७ नारो हरींचें "पत्र ४ थें" याचा निष्कर्ष व त्या पत्रांतील नारो हरींचा तात्पर्यार्थ.—८ भाऊंचे ज्येष्ठ पुत्र रामचंद्रआपा यास भाऊंच्या मृत्युबद्दल काय माहिती होती हें दाखविणारें "पत्र पाचवें" व त्यांतील भावार्थ.—९ बाळासाहेबांचे पुणे दरबारचे वकील मोरो आपाजी, नानांचे विश्वासू कारकून बाळ व सहस्रबुद्धे, यांनीं बाळासाहेबांबरोबर केलेल्या पत्रव्यवहाराची माहिती देणारें मोरो आपाजींचें "पत्र ७ वें." हें पत्र व त्याचा मथितार्थ.—१० बाळासाहेब यांस पुण्याहून बाळ यांनीं जें उत्तर पाठविलें त्यांतूनच करवीरकरांचा सूड घेण्याबद्दलच्या नानांच्या नवीन कारस्थानाचा उगम आहे.—११ आधीं शिक्षा आणि नंतर पुरावा या नानाशाहीच्या न्यायाप्रमाणें करवीरकरांवर आरोप करणारे व नानांच्या नवीन कपटकारस्थानाचें स्वरूप दाखविणारें 'पत्र ८ वें' व त्याचा भावार्थ.—१२ 'पत्र ९ वें' हें नारो हरींनीं लिहिलेलें पत्र, त्या पत्रावरील तारखेच्या दिवशीं त्यांनीं तें लिहिलेलें नाहीं. पुढें केव्हां तरी मागील तारीख घालून लिहिलें असलें पाहिजे अशी शंका व याच्या अनुमानाच्या पुष्ठ्यर्थ पहिला मुद्दा—१३ सदरसंबंधीं मुद्दा दुसरा—१४ सदरसंबंधी मुद्दा

तिसरा.—१५ सदरसंबंधीं मुद्दा चवथा.—१६ सदरसंबंधीं मुद्दा पांचवा.—१७ सदरसंबंधीं मुद्दा सहावा.—१८ सदरसंबंधीं मुद्दा सातवा.—१९ करवीरकरांच्या पारिपत्यासाठीं नानांनीं केलेली आंखणी.—२० नानांच्या कपटकारस्थानाचा प्रभाव.—२१ पत्र नववें व पत्र दहावें, हीं दोन पत्रें नानांनीं पुरावा म्हणून कशीं व कां निर्माण केलीं ?—२२ नानांच्या कारस्थानाचा प्रभाव दाखविणारें एक पत्र.—२३ करवीरकरांवर नानांनीं जे आरोप करविले व त्यासंबंधीं जे पुरावे निर्माण केले ते कसे धादांत खोटे होते याचीं अनुमानें.—२४ करवीरचे महाराज धर्मशील आचरणाचे व शुद्ध मनाचे कसे होते यासंबंधींची हकीकत.—२५ करवीरच्या महाराजांनीं भाऊंच्या दहनस्थानीं त्यांची छत्री बांधली व नित्य पूजा अर्चेची व्यवस्था करविली.—२६ जेथें पैसा तेथें न्याय, शहाणपण, विजय आणि कीर्ति हा नानांनीं घालून दिलेला धडा कशाकरितां होता ?—२७ बाळोबातात्या पागनीस यांचा नाश करण्याचा नानांचा नवीन मनसुबा. तात्यांना नानांनीं हातोहात कसें फसविलें.—२८ आपलें व बाजीराव यांचें पटत नाहीं या नानांच्या तक्रारीचें गौडबंगाल काय होतें ?—२९ नानांनीं बाळोबातात्यांच्या विरुद्ध बाजीरावांना कसें उद्युक्त केलें ?—३० बाळोबातात्यांचें वर्म जे सर्जेराव घाटगे त्यांना बंधमुक्त करण्याचे नानांचे नागमोडी कारस्थान.—३१ शिंदे व शिंदेबाया यांच्यांतील समेटामुळें बाळोबातात्यांस महत्व चढलें होतें. हा समेट उधळून लावण्यासाठीं नानांच्या प्रयत्नास सुरवात.—३२ शिंदेबायांचा वध करण्यासाठीं नानांनीं केलेला गुप्त कट. त्या कटाचा आरोप सर्जेराव घाटग्यांवर कसा लादण्यांत आला. शिंदे व शिंदेबाया यांमधील समेट नानांनीं कसा उधळून लाविला. दौलतराव शिंदे व बाळोबातात्या या उभयतांचा निरनिराळ्या प्रकारांनीं नाश करण्याचा नानांचा मनसुबा.—३३ नानांचें आजारीपण.—३४ नानांचा मृत्यु व त्या वेळची थोडीशी हकीकत.—३५ नानांच्या मृत्युनंतर तिसऱ्या दिवशीं नानांच्या दोन बायका पुण्यास येतात. त्यापैकीं एक मृत्यु पावते. नानांच्या मृत्युनंतर बाजीराव शिंद्यांच्या आहारीं जातात. नानांच्या पक्षांतील लोकांची शिंद्यांकडून धरपकड. नानांचे कारकून नानांचें सर्व दप्तर जाळून फरारी होतात.—३६ नानांच्या जहागिरीचा तपशील.—३७ नाना नवकोट नारायण होते. त्यांच्या गुप्त ठेवी.—३८ नानांची स्वार्थ व परमार्थ साधनाचीं कृत्यें.—३९ नानांच्या फडणिशीच्या दरकाच्या उत्पन्नाचा आढावा.—४० नानांच्या द्रव्यार्जनाची पद्धत "पेशव्यांस धत्तुरा आणि फडनविसास मलिदा" या न्यायाची होती.

१. 'गरज सरो आणि वैद्य मरो' या म्हणीप्रमाणें नानांचे हितशत्रु परशुरामभाऊ यांचा वध झाल्यावर करवीरच्या महाराजांची नानांना वाटत असलेली जरूरी संपली. आतां जरूरी संपलेल्या महाराजांना इतःपर बलवान् स्थितींत ठेवणें हें नानांना अप्रिय होतें. परशुरामभाऊंबरोबर सामना देण्यांकरतां महाराजांनीं जी फौज व जे सरदार गोळा करून आपले बळ वाढविलें होतें, तें खची करून यथापूर्व मृतवत् स्थितींत त्यांना आणून सोडण्याचा नानांनीं मनसुबा केला व त्याप्रमाणें त्यांचे प्रयोग सुरूं झाले. करवीरच्या महाराजांबरोबर नवीन संग्राम उत्पन्न करण्याची रामबाण युक्ति योजून पटवर्धन सरदार व करवीरचे महाराज यांच्यामध्ये नानांनीं हातोहात कलागत उत्पन्न केली. ही कलागत म्हणजे भाऊंच्या वधासंबंधीं नानांच्या प्रेरणेनें करवीरच्या महाराजांविरुद्ध उठविलेली कंडी होय. ही कंडी पुढीलप्रमाणें होती. 'परशुरामभाऊ[१] जखमा लागल्यामुळें घोड्यावरून पडतांच विश्वासरावांच्या स्वारांनीं त्यांस आपल्या घोड्यावर उचलून घेऊन महाराजांपुढें नेलें तेव्हां ते आसन्नमृत्यु होते. त्यांस पहातांच महाराजांनीं त्वेषानें 'मारा' म्हणून सांगितलें. त्या क्षणीं विश्वासरावानें भाऊंस घोड्यावरून ढकलून दिलें आणि महाराजांजवळ शिलेदार मंडळी होती त्यांनीं तरवारीचे वार करून भाऊंचें शरीर छिन्नविछिन्न केलें!' या कंडीमुळें करवीरच्या महाराजांविषयीं पटवर्धन सरदारांचें रक्त सूडाच्या आवेशानें तापून गेलें. महाराजांच्या अमानुष सूडबुद्धीच्या मनोधर्माबद्दल सर्व महाराष्ट्राचें मन खवळून गेलें. राघोबादादांनीं पुतण्याचा अमानुष खून करविला, या कंडीनें नानांनीं त्यांचे नैतिक अधःपतन करून त्यांना महाराष्ट्राचा कायमचा गुन्हेगार बनविण्याचा जसा प्रयत्न केला होता तसाच या वेळीं या नवीन कंडीमुळें करवीरच्या महाराजांविषयीं त्यांनीं केला.

२. राघोबादादांप्रमाणेंच 'करवीरचे हे शिवाजीमहाराज[२] मोठे शूर, धोरणी व धार्मिक वृत्तीचें होते व त्यांचें खासगी वर्तन अत्यंत निर्मळ

१ व २ ऐ. ले. सं. पान ५८६७.

होतें.' असें असतां त्यांच्या चारित्र्याला वरील कंडीप्रमाणें कलंक लागणारें कृत्य त्यांच्याकडून परशुरामभाऊंच्या बाबतींत झालें किंवा काय हें येथें पहाणें जरूरीचें आहे. नाना फडनविस यांच्या बखरींत पुढीलप्रमाणें हकीकत आहे. 'शरजेराव घाडगे यांचा भाऊ विश्वासराव यानें परशुरामभाऊंस मरतां मरतां उचलून घोड्यावर आडवें घातलें, आणि त्यास कोल्हापुरचे राजापुढें जमीनिवर टाकून दिलें. तेव्हां राजानें परशुरामभाऊ अशा अवस्थेंत असतां त्यांच्या शरीराचे तुकडे तुकडे करावयास सांगितलें ....परशुरामभाऊंचे शरीराचे तुकडे तुकडे[1] केले.' याप्रमाणें करवीरच्या शिवाजीमहाराजांवर परशुरामभाऊ आसन्नमृत्यु असतां त्यांच्यावर हत्यार चाऊविण्यास सांगून त्यांच्या शरीराचे तुकडे तुकडे करविल्याचा आरोप लादण्यांत आलेला आहे. महाराजांवरील आरोप अगदीं स्पष्ट आहे. राघोबादादांनीं नारायणरावांचा खून करविला या आरोपाइतकाच तो स्पष्ट व गंभीर आहे. तेव्हां या आरोपाची छाननी येथें करणें अगदीं आवश्यक आहे. या बाबतींत पटवर्धनांकडील मुख्य साक्षीदार म्हणजे नारो हरी करंदीकर हे आहेत. हे नारो हरी, बाळासाहेब मिरजकर पटवर्धनांचे करवीरच्या दरबारचे वकील होते. हे पट्टणकुडीच्या लढाईंत जातीनें होते, एवढेंच नव्हे तर त्यांनीं परशुरामभाऊंच्या शवाला अंत्य संस्कार केला. यावरून नारो हरी यांची साक्ष या बाबतींत विशेष महत्त्वाची आहे यांत संशय नाहीं.

३. परशुरामभाऊ हे शके १७२१ भाद्रपद वद्य २ रोज मंगळवार ता. १७ सप्टेंबर सन १७९९ रोजीं सायंकाळीं दोन घटका दिवसास देवाधीन झाले. त्यासंबंधींचीं नारो हरी करंदीकर यांचीं कांहीं पत्रें खरेशास्त्र्यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहांत प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांतील महत्त्वाचा मजकूर पुढें दिल्याप्रमाणें आहे.

---

1 नाना फडनविस यांची बखर पान १८९.

पत्र[1] पहिलें.

हें पत्र नारो हरीनें करवीरच्या महाराजांच्या लष्करांतून मिरजेस बाळासाहेब पटवर्धन यांस लिहिलेलें. आहे.

श्री. (भाद्रपद व. ३–१७ सप्टेंबर)

पै॥ छ. १७ रबिलाखर सन मय्या तन व अल्लफ. भाद्रपद वद्य ४ बुधवार नऊ तास रात्र. सेवेशीं विज्ञापना. भौमवारीं प्रातःकाळच्या प्रहर दिवसास महाराजांची स्वारी फौजसुद्धां तोफा वगैरे सरंजाम घेऊन निपाणी नजिक गेले. तिकडील लष्कर तयार होऊन आलें. वोढेंत पायदळ घातलें होतें. परस्परें तोफांची मारगिरी थोडीबहुत झाली. इकडील पायदळ व फौज वोढयानजिक जातांना वोढेंतील पायदळ निघून गेलें. तिकडील रोखें फौज होती, तीही पळों लागली........त्या फौजेंत होते तेथून नेट........च जाहला ते समयीं इकडील.....लोन घेतलें. मालोजी पांढरे........व घोडीं दहा पांच पडलीं. महाराजांबरोबरचे लोक यांनीं फिरून नेट केला. ते समयीं तिकडील लोकांनीं कादतें घेऊन निघाले.........भाऊसाहेबांस दोन तीन जखमा लागल्या. नंतर पाडाव आले. विश्वासराव घाटगे यांनीं आणिलें. नंतर देवाज्ञा झाले. लष्कर चिकोडीकडे गेलें. गोट दरोबस्त लुटले. झाडून सरंजाम गोटांतच होते. गोपाळकाका यांचे चिरंजीव चिंतोपंत पाडाव आले. एक दोन जखमा आहेत. खेर आहेत. येसाजीपंत मजमदार तेही पाडाव आले. याप्रमाणें वर्तमान जाहलें. तोफा व हत्ती वगैरे झाडून सलतनत आणिली. पट्टणकुडी व लाट व निपाणी येथें ठाणीं घालावयास लोक गेले. बहुत करून ठाणीं पडलीं असतील. ....हमीदवाड्यावरून लष्कर ऊदईक बुधवारीं कूच होऊन पट्टणकुडीच्या मुक्कामास जाणार कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पत्र[2] दुसरें.

हें पत्र नारो हरीनें करवीरकरांच्या लष्करांतून मिरजेस बाळासाहेबांस लिहिलेलें आहे.

---

१ ऐ. ले. सं. पत्र नं. ५०९०. २. ऐ. ले. सं. पत्र नं. ५१००.

श्री. (भाद्रपद व. ६–२० सप्टेंबर)

सेवेशीं विज्ञापना. भाऊसाहेबांचें प्रेत होतें त्यास अग्नी द्यावयाचा, त्यास येथील विचार पहातां त्या गांवींच नाहीं ! अग्निसंस्कार व्हावा हा मानस (महाराजांचा) नव्हता. परंतु युक्तिप्रयुक्तीनें खटपट करून परवानगी घेतली. ते समयीं रात्र तीन तास मुक्कामींच निपाणीनजीक जाहली. माझीं देखील माणसें बरोबरचीं चुकामुक जाली. एक दोन माणसें मात्र जवळ होतीं. पाऊस थोडा थोडा पडत होता. यामुळें अंधार निबिड. मार्ग समजावयाचा नाहीं. खांचखळगे बहुत. तेव्हां प्रेत घोडीवर पुढें घेऊन हमदाचे वाड्यास चार कोस आलों. रात्र तीन प्रहर जाली. नंतर काष्टांचा वगैरे उद्योग करून बुधवारीं प्रहर दहा घटका दिवसास अग्नी जाहला. मंत्राग्नीकरितां बहुत प्रयत्न केला, परंतु तसा ब्राम्हण मिळाला नाहीं. सुमारास एक होता. त्यास प्रेतास स्पर्शास्पर्श जाहलाच, तो प्रायश्चित्त वगैरे विधि यथास्थित होणार नाहीं यामुळें मग भडाग्न केला. दोन दिवस हमदाचे वाड्यास राहून अस्थि काल गुरुवारीं घेऊन कोगनोळीस मुक्काम आलों. राख एक बैलावर लादून कृष्णेंत टाकावयास आणिली होती. परंतु दुधगंगेस पाणी बहुत आणि साडणी व टोकरा नदीस नाहीं. निरुपाय होऊन दुधगंगेंत राख टाकली. आज अस्थि इचलकरंजीवरून मिरजेस रवाना करितों. मजकडोन जालें तितकें केलें. सारांश इतका संस्कार व्हावा असा भरंवसा नव्हता. परंतु भाऊसाहेबांचें पुण्य अगाध यामुळें माझे सेवकवृत्तीस यश आलें. काल गुरुवारीं महाराजांकडील लष्कराचा मुक्काम जतरटावर आला. तूर्त मसलत इचलकरंजकिर व शिरगांवकर यांजवर आहे. काय घडतें पहावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. चिकोडी वगैरे गांवांनीं ठाणीं (करवीरकरांचीं) पडलीं. कळावें हे विज्ञापना.

पत्र[1] तिसरें.

हें पत्र नारो हरीनें मिरजेस बाळासाहेबास करवीरकरांच्या लष्करांतून लिहिलेलें आहे.

---

[1] ऐ. ले. सं. पत्र नं. ५०५९.

श्री. (भाद्रपद व. ६–२० सप्टेंबर)

पै॥ छ०-२० चार घटका पूर्वरात्र. सन मय्या तैन व अल्लफ.

सेवेशीं विज्ञापना. लष्करांतून दुकित्ते पत्रें भौमवारीं व बुधवारीं इचलकरंजीस पाठविलीं. तेथून स्वामीकडे जावीं असें लिहिलें होतें. तीं पत्रें सेवेशीं पावोन मजकूर समजणेंत आला असेल. भौमवारच्या पत्रांत लढाईस जाणार इतका मजकूर होता. कळावें. मी हमदाच्या वाड्यांत दोन रोज राहून बुधवारीं प्रहर दहा घटका दिवसास प्रातःकालच्या अग्निसंस्कार झाला. मंत्राग्नीकारितां ब्राम्हणाचा शोध बहुत केला. परंतु समयास मिळाला नाहीं. सामान्य एक ब्राम्हण होता. प्रेतास शूद्रस्पर्श वगैरे झाला होता. प्रायश्चित वगैरे विधि यथास्थित होणार नाहीं, यामुळें भडाग्नि दिला. हमदाचे वाड्यावर तलावानजीक स्थलशुद्धि जागा चांगली सारवून तेथें अग्नीचा विधि केला. चंदन व तुलसी काष्टें व बेलाचें एक दोन ढापे ओलेच मिळवून घातले. अग्निसंस्कार व्हावा असें नव्हतें, परंतु भाऊसाहेबांचें पुण्य अगाध आणि स्वामींच्या पुण्येंकरून सेवकाचें हातून खटपट जाहली तितकी केली. कमतरता केली नाहीं. आपाजी गायकवाड जबानी सांगतां कळेल. महाराजांकडील ठाणीं चिकोडी वगैरे गांवांनीं पडलीं. लष्करचा मुकाम मौजे जतरटावर काल गुरुवारीं आला. तूर्त इचलकरंजीकर व शिरगांवकर उभयतांवर मसलत दिसते. त्यांचीं साधनें कारणही जाहलीं. काय घडतें पहावें. श्रीमंत राजश्री आपासाहेब यांस गोळीची जखम हातावर आहे व राजश्री विनोबा आबा यांस दोनतीन जखमा आहेत. व विठ्ठलराव यादवाडकर यांस एक जखम पायास गोळीची आहे असें वर्तमान आहे. सर्व मंडळीचें वगैरे वर्तमान कळवावयाची आज्ञा व्हावी. मी आज भृगुवारचा दिवस कोगनोळीस आहें. आज लष्करचा शोध आणवून उदईक लष्करास जातों. महादेव ब्राम्हण याजबरोबर अस्थि पाठविल्या आहेत. येऊन पावतील. उत्तराची आज्ञा व्हावी. राख कृष्णेंत टाकावयाकारितां एका बैलावर लादून आणिली. परंतु दुधगंगेस पाणी बहुत आहे. नदीस टोकरा नाहीं व नांव नाहीं. चिखलीसही गेलों, परंतु तेथें....

पडली नाहीं. सडे उतरावयाचें संकट पडलें याजमुळें राख दुधगंगेंतच टाकिली. उपाय नाहीं. याजमुळें कृष्णेचा योग साधला नाहीं. भाऊसाहेब भौमवारीं सायंकाळच्या दोन घटका दिवसास देवाधीन झालें. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पत्र[1] चवथें.

हें पत्र नारो हरीनें मिरजेस बाळासाहेबांस पाठविलेलें आहे.

श्री. (भाद्रपद व. ७-२१ सप्टेंबर)

पै॥ छ० २० रबिलाखर शनवार चार घटका रात्र आवशीची सन मय्या तैन व अल्फ. सेवेशीं विज्ञापना........भाऊसाहेब जेथें पाडाव झाले तेथें एकही कोणी जायां जखमी झाले नाहींत! खिजमतगारही कोणी बरोबर आले नाहींत. असा समय बनला. एवढा मोहोरा पाडाव जाहला तेथें शेंपन्नास किमान पक्ष तरी लोक कामास यावे! असें झालें त्यास उपाय नाहीं. दोन तोफांचें मात्र (रक्षण) झालें. असा प्रकार घडला. ईश्वर इच्छा प्रमाण. गोष्ट बहुतच विलग घडली. वाईटांत बरें एक मानावें. देवाधीन झाले तें उत्तम झालें! जर जिवंत राहते तरी तें चांगलें नव्हतें. त्यांचा तो काल लढाईंतच झाला येणें करून लौकिक चांगलाच राहिला. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

वरीलप्रमाणें नारो हरीचीं पांच पत्रें परशुरामभाऊंच्या वधासंबंधींच्या माहितीचीं आहेत. या शिवाय त्या वेळेचीं आणखीं कांहीं पत्रें आहेत तीं पुढें दिलीं आहेत.

पत्र[2] पांचवें

हें पत्र परशुरामभाऊंचे पुत्र रामचंद्रपंत यांनीं गणपतराव पटवर्धन भिलवडीकर यांस लिहिलेलें आहे.

श्रीगणपति (भाद्रपद व. ६-२० सप्टेंबर)

तीं॥ गणपतराव काका वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रामचंद्र परशुराम. विनंती विशेष. वडील पाडाव गेले असें तुह्मांस लिहून पाठविलें आहे, त्यास वडिलांचे डोईवर समोरच्या दोन तीन

---

१ ऐ. ले. सं. पत्र नं. ५११०. २. ऐ. ले. सं. पत्र नं. ५१०२.

जखमा लागोन वडिलीं कैलासवास लढाईंत तेच दिवशीं केला. होणारास इलाज काय ! ईश्वर इच्छा प्रमाण ! आह्मीं मिरजेस आलों. सार्थक जाल्या नंतर पुढील विचार. तुह्मीं तेथें न राहतां राजश्री धोंडोपंत गोखले यांजकडे जाऊन त्यांचे विचारें तेथेंच असावें. रवाना छ० १९ रबिलाखर बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विज्ञापना.

ऐ. ले. सं. पत्र नं० ५१०३ हें पत्रही रामचंद्रपंतांनीं त्याच दिवशीं बाळकृष्णपंत लागू यांस लिहिलें आहे. त्यांतही भाऊंच्या मृत्यूसंबंधीं मागील पत्र पांचवें यांत लिहिल्याप्रमाणेंच मजकूर आहे ह्मणून तें येथें दिलें नाहीं.

पत्र[1] सहावें.

हें पत्र रघुनाथराव कुरुंदवाडकर यांनीं बाळासाहेबांना लिहिलेलें आहे.

श्रीगणराज (भाद्रपद व० ७-२१ सप्टेंबर)

पै॥ छ० २१ रबिलाखर. पांच तास. सन मैय्या तैन व अल्लफ.

विज्ञापना. प्रातःकाळीं सविस्तर लिहिलेंच आहे. राजश्री नारोपंतांनीं अस्थि रवाना केल्या त्या आज दोन प्रहरीं आल्या. श्रीतीरीं फराळास ब्राह्मणास घालोन पार करून दिल्या. येऊन पावतील. करवीरकरांची बातमी काय ल्याहावयाची ! इचलकरंजीस येतात. गुंता नाहीं. गाडदी (व) खर्चाची रवानगी (तेथें) व्हावी. उगेच आठ चार दिवस गुंतावयास जागा तीच. तिचें रक्षण जालें पाहिजे. नाहींतर ती जागा दगावली असतां मिरजेशिवाय जागा नाहीं. राजश्री माधवराव रास्ते यांस पत्रें जावीं. (कीं,) सप्तऋषीची बंदोबस्ती पक्की असावी. नाहींतर ते हे एक होऊं पावतील ! गुंता नाहीं. त्यांजकडून कांहीं फौजही ठेवावी. पुण्याचा लगता जवळ आहे. जम तिकडे पडेल. बोरगांवचे बातमीचें पत्र आतांच आलेलें पाठविलें आहे. बाकी राहत नाहीं. रवाना छ० २० रबिलाखर विदित होय हे विज्ञापना.

---

1 ऐ. ले. सं. पत्र नं० ५१०९.

पत्र[1] सातवें

हें पत्र पुण्याहून मोरो आप्पाजी परांजपे यानें बाळासाहेबास मिरजेस पाठविलेलें आहे.

श्री (भाद्रपद व. ८-२२ सप्टेंबर)

छ. २५ रबिलाखर गुरुवार भाद्रपदमास सन मैय्या तैन व अल्लफ.

सेवेशी मोरो आपाजी दोनी कर जोडून शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ. २१ रबिलाखर रविवार सेवकाचे वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल सायंकाळपासून शहरांत श्री॥ राजश्री भाऊसाहेब यांची व करवीरकर महाराज यांची लढाई झाली, इकडील तसनस जाली, ह्मणोन वगैरे मनस्वी वर्तमान आलें. त्यावरून आज प्रातःकाळीं श्री॥ राजश्री नानाकडे गेलों. नानानींहीं स्वमुखें सांगितलें. लौकर अजुरदार मिरजेस रवाना करून जाब आणविणें येविशीं (नानांची) आज्ञा जाली आहे. व विलक्षण गोष्ट ईश्वर इच्छेनें घडली असल्यास श्री॥ राजश्री रघुनाथरावदादा याणीं कुरुंदवाडाहून कुटुंबसुद्धां लौकर मिरजेस यावें, जमेंत चांगली लौकर धरावी, सावध असावें, येविशीं राजश्री बाळकृष्णपंत भाऊ याणीं सेवेशीं लिहिलें आहे. तिकडून वर्तमान आलेवर सरकारांत विचार होऊन स्वामीस व दादासाहेब यांस पत्रें येतील. त्याअन्वयें एकादा विचार करावा लागेल. झाडून फौजांचा जमाव मिरजे जवळ तिकडील देखील व्हावा. इकडे वर्तमानमध्यें लढाई मातबर जाली, फौज मोडिली, वडील पाडाव सांपडले, ऐसे दोन चार जागां वर्तमान आलें आहे. ह्मणोन श्री॥ राजश्री नानानीं सांगितलें. लौकर मिरजेस लेहून जाब आणवावा ह्मणोन आज्ञा जाली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. अजुरदारानें बुधवारीं प्रातःकाळीं चार घटका दिवसास पोहोंचावें ह्मणोन करार आहे. जाब लौकर यावा हे विज्ञप्ति.

पत्र[2] आठवें

हें पत्र बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे, (नानांचे अंतस्थ कारकून) यांनीं पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस लिहिलेलें आहे.

---

१ ऐ. ले. सं. पत्र नं. ५११६   २ ऐ. ले. सं. पत्र नं. ५११९.

(११७९)

श्री. (भाद्रपद व. ११-२५ सप्टेंबर)

सेवेशीं बाळाजी विष्णु. कृतानेक विज्ञापना. छ० २४ रबिलाखर बुधवार प्रातःकाळपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं पत्र छ० २८ रबिलाखरचें पाठविलें तें छ० २१ मिनहूस आवशीचे प्रहर रातीस पावलें. पत्रीं आज्ञा जे, "भाद्रपद वद्य चतुर्थी भौमवार तृतीय प्रहरीं करवीरकरांची व वडिलांची लढाई होऊन वडिलांस तीन जखमा लागोन घोड्याखालीं आले. मोठीच गर्दी जाली. वडिलांस (विश्वासराव) सर्जेराव घाटगे यांनीं घोड्यावर घालून करवीरकर राजापुढें नेलें. राजानीं केवळ पाजी कर्म केलें." त्यास छत्रपति ह्मणवितात आणि हिंदु, त्यास हें नीच कर्म योग्य नसतां त्याणीं केलें. तेव्हां त्या वेळेसच त्यांची श्री गेली असें समजावें. वडिलांनीं तो इहलोक परलोक साधन केलें. परंतु राजानें नीच कर्म नरकसाधनाचें केलें. शास्त्र प्रमाणच. तें कसें चुकेल? होणार जालें. वडिलांचे पाठीमागें सर्वांस वडील छत्र आपण आहां. त्यापेक्षां सर्वांनीं एकदिल होऊन राजास हात दाखवावयाचा योग दृष्टीस दिवसगत न लागतां आणिला पाहिजे. फौजेचा एकदिल करून पत्राचें उत्तर सरकारांत दाखवावयाजोगें जरबेचें आलें असतां इकडूनही सरंजाम जावयास दिवसगत लागणार नाहीं. कितेक घरांतील लहानमोठे खटले आहेत ते या समयीं मनांत वागवावयाचे नाहीं, आणि स्वामी वागविणारही नाहींत. वडिलांचे पाठीमागें श्री. राजश्री रामचंद्रपंतआपा यांचा लौकिक करून दाखविणें हा एक पक्ष, आणि वडिलांपाठीमागें पटवर्धनांचा नक्ष, सरकारचा दाव, शत्रूवर जरब देणें, हें करणें स्वामीशिवाय नाहीं. स्वामी दुरदेशीं जाणून सेवकानें सक्तीचें लिहिणें लिहिलें आहे. परंतु सेवकानें समय पाहून विनंती करीतच असावी, अशा मागेपासोन चाली ऐकितों. ज्या गोष्टींत स्वामींचें कल्याण आणि दौलतेस श्रेयस्कर ह्मणोन विनंती (लिहिली आहे.) ये विशीं श्री. राजश्री नाना व माझें बोलणें बहुत जालें. आणि नानांचीही आज्ञा एकदिल होण्याविशीं जाली. सर्वांस नाना हाच मनसबा लिहितील असें वाटतें. काल देश वर्तमान पहातां सर्वांनीं एकदिल राहिलें असतां सर्वांवर दाब,

यांत सर्व आहे. राजश्री धोंडोपंत गोखले यांस फौजेसुद्धां सामील स्वामीजवळ होण्याविशीं सरकारचीं पत्रें हुजऱ्याबरोबर गेलीं आहेत. घरची सामग्री बळकट असावी हेंच चित्तांत वागावें. दुसऱ्याचे भरंवशावर जावयाचे हे दिवस नाहींत. सांडणीस्वाराबरोबर पत्र द्यावें, परंतु जलदीनें गेलें. श्री. राजश्री नानाजवळ व बाळोबातात्याजवळ बोलणें जाल्याशिवाय काय ल्याहावें; ह्मणोन पत्र दिलें नाहीं. हल्ली श्री. राजश्री नानांचें बोलणें होऊन विनंती लिहिली आहे. तात्यांचेंही पत्र मागाहून पाठवून देतों. नानांच्या पत्राचें उत्तर स्वामीस गेलेंच आहे. लढाईत जायांजखमी कोण जाले याचें तपशीलवार लिहिणें यावें. शत्रू-कडील बातमी चांगली राखावी. महालीं शत्रूकडील हंगामा होईल त्याचाही बंदोबस्त असावा. तों इतक्यांत इकडूनही श्री. राजश्री नाना पुरावा करीतच आहेत. इकडील वर्तमान स्वामीस वरचेवर समजावें लागतें व स्वामीकडीलही दिनचर्येचे वर्तमान श्रीमंतास (नानांस) कळवावें लागतें. यास्तव डांक बसवाव-याची आज्ञा व्हावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पत्र[१] नववें

हें पत्र नारो हरीनें लढाईच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं मिरजेस बाळासाहेबांस लिहिलें आहे.

श्री. (भाद्रपद व. ४-१८ सप्टेंबर)

सेवेशीं विज्ञापना. भाऊसाहेब पाडाव आले. घाटगे यांनीं घोड्यावर पुढें घेतलें होतें. त्यास महाराजांच्या समक्ष आलेवर घोड्यावरून ढकलून दिलेवर 'मारा' ह्मणोन मुख्यांनीं सांगितलें. मग दहा पांच असामींनीं वार टाकिले. तोंडावर तो बाकी तिळमात्र जागा राहिली नव्हती. सर्वांस दिक्क नाहीं. अग्निसंस्काराविषयीं खटपट बहुत केली. त्याचा विस्तार पत्रीं कोठवर लिहावें! परवानगी घेतली. मुक्कामास प्रेत आणण्याचा प्रयास पडला. प्रहर रात्र जाहली. उपाय नाहीं. तेव्हां प्रेत घोडीवर पुढें घेऊन आणिलें. तों तीन प्रहर रात्र झाली. नंतर दहनाचें साहित्य मिळवून भडाग्नि दिली. मी हमदाच्या

१ ए. ले. सं. पत्र नं. ५०९४.

वाड्यांत एक रोज राहून अस्थि काढून मिरजेस रवाना करितों. आपाजी गाईकवाड लढाईचें वगैरे जबानी सांगतां कळों येईल. सेवेशीं श्रुत होय. येथील चढाचा विचार बोलण्याची वल्गना होतात. त्या कर्णेकडूनही ऐकवत नाहींत. ईश्वर इच्छा प्रमाण! भवितव्यास उपाय नाहीं. सार्थकाची वगैरे याद मागाहून पाठवितों. हे विज्ञापना. अग्निसंस्कार व्हावा असें नव्हतें, परंतु स्वामींचे पुण्यप्रतापें करून सेवकाचे हातून सार्थक जाहलें. कळावें. हे विज्ञापना. रवाना प्रातःकाळ बुधवार.

पत्र[1] दहावें.

हें पत्र मिरजेहून बाळासाहेबांनीं रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस लिहिलेलें आहे.

श्रीगणराज (भाद्रपद व. ६-२० सप्टेंबर)

चि॥ राजश्री दादा यांसी. उपरी. वडील तीन जखमांनीं जेर जाहलेच होते. घोडेवर स्वारांनीं पुढें घेऊन मुल्याजवळ नेलेवर 'मारा' म्हणून सांगितलेवर घोड्यावरून ढकलून दिलें आणि दहा पांचांनीं तरवारीनें छिन्न केलें. छत्रपति म्हणवितात, कर्मे अंत्यजाचीं केलीं! त्यांचा प्राचीन जन्मार्जित संस्कार तसें घडलें. छ. १९ रबिलाखर लोभ करावा हे.

४. वरील दहा पत्रांतील हकीकतींतून नानांच्या नवीन कपटकारस्थानाचा उगम झालेला आहे. नानांचें कपटकारस्थान तिजोरीप्रमाणें बळकट असल्यामुळें व त्याची रहस्यमय गुरुकिल्ली वरील दहा पत्रांत दडून बसली असमुळें ती चिकित्सापूर्वक शोधून काढणें या ठिकाणीं अवश्य आहे. परशुरामभाऊंच्या वधासंबंधीं पटवर्धनांच्या पक्षातर्फे नारो हरी करंदीकर नांवाचे बाळासाहेब मिरजकर यांचे करवीर दरबारचे वकील **प्रत्यक्ष पुरावा** देणारे म्हणून साक्षीदार आहेत. वरील दहा पत्रांत या नारो हरीचीं पहिलीं चार पत्रें आहेत. नारो हरी हे करवीरकरांच्या लष्कराबरोबर मिरजकरांचे वकील म्हणून आलेले होते व ते करवीरकरांचा मुक्काम निपाणीनजीक पडला असतां त्यांच्या लष्करांतच राहत होते. या लष्कराच्या मुक्कामापासून हमीदवाडा चार कोस व हमीदवाड्यापासून पट्टणकुडी दोन कोस असें अंतर होतें. नारो हरीनें जीं

---

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ५१०१

पहिलीं चार पत्रें लिहिलीं त्यांतून कोणती व कशी कशी माहिती निघते हें पाहूं. नारो हरीनें जें 'पहिलें पत्र' लिहिलें आहे तें पट्टणकुडीच्या लढाईच्या दिवशीं म्हणजे मंगळवार तारीख १७ सप्टेंबर रोजीं भाऊसाहेबांचा मृत्यु झाल्यानंतर रात्रीच्या सुमारें आठ नऊ वाजण्याच्या सुमारास लिहिलें आहे. तें मिरजेस बुधवारीं रात्रीं नऊ वाजतां जाऊन पोंचलें हें त्यावरील पैवस्तीच्या वेळेवरून दिसून येईल. सदर पत्रांत परशुरामभाऊंच्या वधासंबंधीं ' भाऊसाहेबांस दोन तीन जखमा लागल्या; नंतर पाडाव आले; विश्वासराव घाटगे यांनीं आणलें; नंतर देवाज्ञा झाले. ' एवढीच बातमी नारो हरींना त्या दिवशीं रात्रीं नऊ वाजण्याचे सुमारापर्यंत लागली होती व ती त्यांनीं तशीच तावडतोब आपल्या धन्यांना सदर पत्रानें कळविली होती असें स्पष्ट दिसतें.

५. ' पत्र दुसरें ' हें शुक्रवार तारीख २० रोजीं लिहिलें आहे. तें वाचून पहातां भाऊंच्या मृत्यूसंबंधीं व त्यांच्या अंत्यविधिसंबंधीं पुढीलप्रमाणें हकीकतीच्या संगतीचा बोध आहे. वरील प्रमाणें नारो हरींनीं ' पत्र पहिलें ' लिहून पाठविल्यानंतर म्हणजे मंगळवारीं रात्रीं ९ वाजल्यानंतर ते करवीरच्या महाराजांच्या भेटीकरतां त्यांचेकडे गेले. त्यावेळीं त्यांस परशुरामभाऊ मंगळवारीं सायंकाळच्या दोन घटका दिवसास देवाधीन झाल्याचें समजलें. (' पत्र तिसरें ' यांमधील शेवटचें वाक्य) भाऊ देवाधीन होऊन तीन चार तास लोटले तरी त्यांच्या शवास अग्निसंस्कार देण्याची कांहींच तयारी नाहीं असें पाहून नारो हरीनें महाराजांना विनंती केली. त्यांनीं युक्तीप्रयुक्तीनें खटपट करून भाऊंच्या शवास अग्निसंस्कार आपले हस्तें व्हावा अशी परवानगी मिळविली. ही महाराजांकडून परवानगी त्यांना तीन तास रात्रीं मिळाली. त्या वेळीं त्यांच्या नोकरींतील माणसें लढाईच्या धामधुमीनें चुकामुक झाल्यामुळें जाग्यावर एक दोन माणसेंच त्यांच्या जवळ राहिलीं. त्या वेळीं ' पाऊस थोडा थोडा पडत होता. त्यामुळें अंधार निबिड. मार्ग समजावयाचा नाहीं. खांच खळगे बहुत. ' अशी सर्व भीतिजनक परिस्थिति असतां निधड्या छातीचे

शूर-वीर नारो हरी असल्यामुळें त्यांनीं भाऊंचें प्रेत घोडीवर पुढें घेऊन ते चार कोसाची मजल मारून रातोरात हमीदवाड्याला आले. त्या वेळीं तीन प्रहर रात्र झाली होती. नंतर काष्ठांचा वगैरे उद्योग करून बुधवारीं सकाळीं दहा घटका दिवसास त्यांनीं भाऊंच्या शवास अग्निसंस्कार दिला. नारोहरींच्या मनांत भाऊंच्या प्रेतास मंत्राग्नि द्यावयाचें होतें. परंतु प्रेतास स्पर्शास्पर्श झाल्यामुळें व प्रायश्चित्त वगैरे विधि यथास्थित करणारा ब्राह्मण त्यांना न मिळाल्यामुळें, त्यांनीं भडाग्नि दिला. नंतर ते हमीदवाडा येथेंच वस्तीला राहून गुरुवारीं त्यांनीं अस्थि व राख गोळा केली व तेथून ते त्याच दिवशीं बैलावर राख लादून व भाऊंच्या अस्थि बरोबर घेऊन कोगनोळीस मुक्कामास आले. त्यांचे मनांत राख श्रीकृष्णेंत विसर्जन करावयाची होती. परंतु वाटेंत दुधगंगेस पाणी फार असल्यामुळें व त्या नदीपलीकडे जाण्यास सांडणी अगर टोकरा नसल्यानें त्यांनीं ती राख दुधगंगेंतच विसर्जन केली. शुक्रवारीं त्यांनीं इचलकरंजीवरून आज मिरजेस भाऊंच्या अस्थि रवाना करतों असें कळविलें. याप्रमाणें नारो हरींनीं मंगळवारीं रात्रीं ९ वाजतां जें 'पत्र पहिलें' लिहिलें त्यानंतरची साद्यंत हकीकत 'पत्र तिसरें' यांत शुक्रवारपर्यंतची संगतवार लिहिलेली आहे.

६. 'पत्र तिसरें' तारीख २० सप्टेंबर रोजीं शुक्रवारींच पूर्व रात्रीच्या चार घटकेस लिहिलेलें आहे. वरील 'पत्र दुसरें' यांत भाऊंच्या अस्थि आज रवाना करतों असें लिहिलें होतें. त्याप्रमाणें नारो हरींनीं कोगनोळीच्या मुक्कामाहून महादेव ब्राम्हण याजबरोबर भाऊंच्या अस्थि मिरजेस रवाना केल्या-नंतर हें पत्र लिहिलें आहे. 'आपाजी गायकवाड जबानी सांगतां कळेल.' या त्यांतील वाक्यावरून हें पत्र नारो हरींनें आपाजी गायकवाड याच्या बरोबर देऊन त्यास कोगनोळीहून मिरजेस पाठविलें होतें. 'पत्र दुसरें' हें जरी शुक्रवारीं दुपारीं रवाना केलें होतें तरी तें इचलकरंजीवरून मिरजेस जाणारें असल्यामुळें लांबच्यापल्ल्याचें होणार व हें पत्र आपाजी गायकवाड परभारें मिरजेस जवळच्या रस्त्यानें नेणारा असल्यामुळें तें कदाचित् लवकर

पोंचेल या कल्पनेनें नारो हरींनीं 'पत्र दुसरें' यांत भाऊंच्या मृत्युसंबंधीं व अंत्यविधीसंबंधीं जी हकीकत दिली आहे तीच सर्व साधारणपणें या पत्रांत दिली आहे. भावार्थ एवढाच दिसतो कीं, या दोन्ही पत्रांतील कोणतेंही एक पत्र अगोदर पोंचलें, तरी आपल्या धन्यास सर्वसाधारणपणें भाऊंच्या मृत्युसंबंधीं व त्यांच्या अंत्यविधीसंबंधीं सर्व हकीकत समजावी. या पत्रांत 'हमदाचे वाड्यावर तलावानजिक स्थलशुद्धि जागा चांगली सारवून तेथें अग्नीचा विधि केला, चंदन व तुळशीकाष्ठें व बेलाचे एक दोन ढापे ओलेच मिळवून घातले.' वगैरे भाऊंच्या सार्थकाच्या लहान सहान गोष्टीही दिलेल्या आहेत. याशिवाय करवीरच्या महाराजांचा मुकाम जतरटावर आहे, इचलकरंजीकर व शिरगांवकर या उभयतांवर महाराजांची तूर्त मसलत दिसते अशीही माहिती दिली आहे. त्याचप्रमाणें आपासाहेब, विनोबा आबा व विठ्ठलराव यादवाडकर यांच्या जखमांसंबंधीं त्यांना जी माहिती मिळाली तीही त्यांनीं या पत्रांत दिलेली आहे. परशुरामभाऊ मंगळवारीं सायंकाळच्या दोन घटका दिवसास देवाधीन झाले, हीही महत्वाची हकीकत या पत्रांत त्यांनीं दिली आहे. याशिवाय या पत्राच्या आरंभीं नारो हरींनीं दोन पत्रें मिरजेस पाठविल्याचा उल्लेख केलेला आहे. तीं दोन पत्रें म्हणजे मंगळवारीं व बुधवारीं इचलकरंजीवरून मिरजेस पाठविलेलीं होतीं. 'भोमवारच्या पत्रांत **लढाईस जाणार इतका मजकूर होता**' यावरून 'पत्र पहिलें' हें नारो हरीनें जें मंगळवारीं रात्रीं नऊ वाजतां लिहिलें, तें तें नव्हे असें स्पष्ट ठरतें. कारण 'पत्र पहिलें' यांत पट्टणकुडीच्या लढाईची परशुरामभाऊंच्या पाडावाची व त्यांच्या मृत्युची हकीकत आहे. नारो हरीनें बुधवारीं वर उल्लेख केलेलें जें दुसरें पत्र लिहिलें, तेंच 'पत्र पहिलें' हें निःसंशय आहे. यावरून नारो हरींनीं मिरजेस भाऊंच्या मृत्यू-संबंधीं जीं पत्रें पाठविलीं त्यांतील पहिलें पत्र 'पत्र पहिलें' हें आहे. व त्यानंतर शुक्रवारीं दुपारीं 'पत्र दुसरें' हें पाठविलें व त्यानंतर शुक्रवारीं पूर्व रात्रीं 'पत्र तिसरें' हें आपाजी गायकवाड यांचेबरोबर पाठविलेलें आहे. मंगळवारच्या रात्रीनंतर शुक्रवार दुपारपर्यंत नारोहरींनीं मिरजेस दुसरें

कोणतेंही पत्र पाठविलें नव्हतें. याचें कारण ते भाऊंच्या अंत्यविधींत गुंतले होते. शिवाय त्यांना तीन दिवस अशौच पाळावें लागलें असल्यामुळें मंगळवार रात्रींपासून शुक्रवार सकाळपर्यंत ह्मणजे अशौच फिटेपर्यंत त्यांनीं पत्र लिहिलें नसावें असें दिसतें. या माहितीचा संबंध नानांच्या कपट-कारस्थानांतील 'पत्र नववें' व 'पत्र दहावें' या दोन पत्रांशीं यावयाचा असल्यामुळें येथें त्याचें थोडें स्पष्टीकरण करून ठेवलें आहे.

७. 'पत्र चवथें' हें तारीख २१ शनिवार चार घटका रात्रीस नारो हरींनीं लिहिलेलें आहे. या पत्रांत नारो हरींनीं एक आश्चर्य उत्पन्न करण्यासारखी हकीकत लिहिली आहे. 'भाऊसाहेब जेथें पाडाव झाले तेथें एकही कोणी जायां जखमी झाले नाहींत! खिजमतगारही कोणी बरोबर आले नाहींत. एवढा मोहोरा पाडाव जाहला तेथें शेंपन्नास किमान पक्ष तरी लोक कामास यावे!' साताऱ्याच्या महाराजांचें बंड मोडण्याकरतां भाऊंची मुक्तता झाली असें समजतांच त्यांच्या जरीपटक्याखालीं हां हां ह्मणतां हजारों लोक गोळा झाले आणि त्यांच्या मागें करवीरच्या महाराजांचा शह असतांही त्यांनीं साताऱचें बंड चुटकीसरशीं मोडलें. एवढे नांवलौकिकाचे परशुरामभाऊ असतांना त्यांच्या प्रत्यक्ष मरणाच्या वेळेच्या लढाईत त्यांच्या फौजेंतील एकही वीर सैनिक अगर त्यांच्या खासगी नोकरींतील एकही खिजमतगार त्यांच्या सहाय्याकरितां धावून येऊन त्यानें आपले प्राण वेंचले नाहींत हें केवढें आश्चर्य! अशी एकही गोष्ट आजपर्यंतच्या इतिहासांत नमूद नाहीं. ज्या सेनापतीच्या बळावर हजारों सैनिक आपल्या प्राणांची खैरात आजपर्यंत करीत आले, त्याच सेनापतीच्या अखेरच्या एका भिकारड्या लढाईंत एकाही सैनिकानें त्यांना साथ देण्याचें नाकारवें या प्रकारावरून सेनापतीची एक तर पूर्ण नालायकी प्रकट होते अथवा दुसरें तरी एकादें तसेंच महत्वाचें कारण घडून यावें लागतें. 'नालायक सेनापती' असें परशुरामभाऊंच्या बाबतींत ह्मणणारा एकही जीव महाराष्ट्रांतच नव्हे तर अखिल भारतांत मिळणार नाहीं. असें असतां ही अद्भुत जादु कशी झाली याचें आश्चर्य नारो हरींस वाटणें स्वाभाविक होतें. खुद्द पेशव्यांच्या

राजधानींतील शनिवारवाड्यांत खुद्द सवाईमाधवरावांभोंवतीं माशीलाही शिरकाव मिळावयाचा नाहीं अशी नोकरांची व परिजनांची गर्दी असे. परंतु प्रत्यक्ष त्यांच्या मृत्यूच्या वेळीं त्याच शनिवारवाड्यांत भर दिवसा त्यांच्याजवळ ज्याप्रमाणें एकही माणूस हजर नव्हतें, त्याचप्रमाणें परशुरामभाऊंच्या मृत्यूच्या वेळीं गोष्ट घडून आली व या दोन्ही गोष्टींचे प्रेरक-गारुडी एकच आहेत ही कल्पना नारो हरींना नसल्यामुळें त्यांना सखेद आश्चर्य वाटलें असेल यांत संशय नाहीं. या विचारांच्या भरांत त्यांनीं आपलें व आपल्या धन्याचें समाधान होण्याचा एक मार्ग शोधून काढला. 'वाईटांत बरें एक मानावें. देवाधीन झाले तें उत्तम झालें. जर जिवंत राहते तरी तें चांगलें नव्हतें. त्यांचा तो काल लढाईंतच झाला येणेंकरून लौकिक चांगलाच राहिला.' या मजकुरावरून भाऊ पाडाव होऊन अपमानानें जगण्यापेक्षां लढाईंत मेले हे उत्तम झालें हा नारो हरींचा अखेरचा तात्पर्यार्थ आहे. यावरून नारो हरीचें शनिवार ता. २१ सप्टेंबरपर्यंतचें ह्मणणें परशुरामभाऊ हे लढाईंत तीन जखमा लागून मेले असें स्पष्ट होतें.

८. 'पत्र पांचवें' हें परशुरामभाऊंचे जेष्ठ पुत्र रामचंद्रपंतआपा यांनीं आपल्या चुलत्यांस, गणपतराव पटवर्धन मिलवडीकर यांस, मिरजेस आल्यानंतर ह्मणजे बाळासाहेबांच्या भेटीगांठी होऊन पुढील विचार ठरल्यानंतर तारीख २० सप्टेंबर शुक्रवारीं लिहिलेलें आहे. त्यांत ते लिहितात. 'वडिलांचे डोईवर समोरच्या दोन-तीन जखमा लागोन वडिलीं कैलासवास लढाईंत तेच दिवशीं केला.' या प्रमाणेंच हकीकतीचें दुसरें पत्र रामचंद्रआपांनीं त्याच दिवशीं लक्ष्मेश्वरचे मामलेदार बाळकृष्णपंत लागू यांस लिहिलें आहे. यावरून तारीख २० सप्टेंबरपर्यंत परशुरामभाऊंच्या खुद्द पुत्रांना भाऊ हे लढाईंत तीन जखमा डोक्यावर समोरच्या भागीं लागून मृत्यु पावले एवढीच माहिती होती असें ठरतें.

९. मोरो आपाजी परांजपे हे बाळासाहेब मिरजकर यांचे पटवर्धन सरदारांतर्फे पुण्याचे दरबारीं वकील होते. पटवर्धन सरदारांतर्फे जीं बोलणीं

नाना अगर पेशवे यांचेकडे व्हावयाचीं असत, तीं या मोरो आपाजीतर्फे होत होतीं. 'पत्र सातवें' हें तारीख २२ सप्टेंबर रविवार रोजीं 'मोरो आपाजीनें बाळासाहेबांस मिरजेस पाठविलेलें पत्र आहे. त्या पत्रांत भाऊसाहेबांच्या मृत्यूची वार्ता पुण्यास 'काल सायंकाळीं' म्हणजे शनिवार तारीख २१ रोजीं सायंकाळीं आली' असें लिहिलें आहे. ही बातमी मोरो आपाजीना बाळासाहेबांकडून पत्रद्वारें समजली नव्हती तर पुणें गांवांत जी बातमी पसरली होती, ती त्यांच्या कानावर आल्यामुळें ती खरी कीं खोटी, हें समजून घेण्याकरतां खरी माहिती लागण्याचें जें मुख्य स्थान नाना त्यांच्याकडे ते रविवारीं प्रातःकाळीं गेले. त्यांना नानांनीं स्वमुखें 'लढाई मातबर जाली, फौज मोडली, पाडाव सांपडले, ऐसे दोन चार जागां वर्तमान आलें आहे' असें सांगितलें. यावरून रविवार तारीख २२ सकाळपर्यंत नानांनाही भाऊ पाडाव सांपडले याच्यापलीकडे जास्त बातमी नव्हती असें स्पष्ट होतें. या पत्रांत बाळकृष्णपंतभाऊ यांनीं मिरजेस बाळासाहेबांस स्वतंत्रपणें याविषयीं यापूर्वी पत्र लिहिलेलें आहे असा उल्लेख मोरो आपाजीनें केलेला आहे. बाळकृष्णपंतभाऊ हे पूर्वी लोहोगडचे नानांचे किल्लेदार होते, हल्लीं ते नानांचे घरगुती कारकून म्हणून काम करीत होते. त्याचप्रमाणें बाळकृष्ण महादेव बाळ या नांवाचे नानांचे दुसरे एक विश्वासू कारकून होते. बाळासाहेब मिरजकर हे परशुरामभाऊविरुद्ध महाडच्या कारस्थानापासून नानांच्या कटांत सामील होतेच. तेव्हां बाळासाहेबांनी स्वतंत्रपणें बाळकृष्ण महादेव बाळ व बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे या नानांच्या विश्वासू कारकुनांस पृथक् पृथक् तारीख १९ गुरुवार रोजीं पत्रें लिहिलीं. बाळकृष्ण महादेव बाळ यांनीं आपल्यास लिहिलेल्या पत्राचें उत्तर बाळासाहेबांस तारीख २४ चें पाठविलें. त्यांत ते लिहितात 'स्वामीनीं छ. १८ रबिलाखरचें (तारीख १९ सप्टेंबर) पत्र पाठविलें तें पावलें. "श्री॥ भाऊसाहेबांची व श्री॥ महाराज करवीरवासी यांची लढाई भाद्रपद वद्य चतुर्थीस भौमवारीं होऊन भाऊसाहेबांस तीन जखमा लागोन सरकार-कामास आले.

सविस्तर राजश्री बाळाजीपंतास व मोरोपंतास लिहिलें आहे त्यावरून कळेल. सविस्तर विनंती श्री॥ राजश्री नानांस करावी. श्री. पंतप्रधान व श्री॥ राजश्री नानांस पत्रें पाठविलीं आहेत. प्रविष्ट करून उत्तर घेऊन पाठविणें." [१] या पत्रांतील मजकुरावरूनही भाऊ तीन जखमा लागून सरकार-कामास आले एवढेंच विधान कायम असल्याचें स्पष्ट दिसतें. या पत्रांतील भाऊच्या मृत्यूची हकीकत बाळ यांनीं जेव्हां नानांना सांगितली, त्या वेळीं त्यांना फार दुःख झालें. 'रामचंद्रपंतआपा, बाबा व दाजीस आपणच वडील आहांत. तेव्हां सर्वांचें समाधान करून रात्रंदिवस हुशार असावें. रामचंद्रपंतआपा यांचें लक्ष आपल्या ठायीं कसें आहे? चिंतामणरावआपा प्रस्तुत कोठें आहेत? वर्तणूक कशी आहे? वगैरे तपशीलवार लिहून येईल 'त्या अन्वयें श्री॥ नानांस विनंती करून पक्केपणें बंदोबस्त करावयासी येईल. भाऊसाहेबांचा या लोकीं व परलोकीं विजय जाला. त्यांचें चांगलें जालें. मागें आहेत त्याणीं सूड घेतल्यास उत्तम. नाहींतर लौकिक रहाणार नाहीं. येविशींचा विचार सर्वांनीं मिळोन करावा. हेंच चांगलें. श्री॥ राजश्री दादासाहेबांनीं (कुरुंदवाडकर) कुटुंबसह मिरजेस यावें आणि फौज चांगली निवड जवळ असावी. रात्रंदिवस बहुत बहुत सावधता असावी' वगैरे उपदेशाच्या व पटवर्धन सरदारांच्या लौकिकाच्या गोष्टी लिहून त्यावर तोडगा ह्मणजे करवीरकरांचा सूड घेणें हा होय अशी सूचना बाळ यांनीं बाळासाहेबांस केलेली आहे.

१०. बाळासाहेबांनीं नानांचा विश्वासू कारकून बाळ [२] यांना वरील पत्र तारीख १९ चें जें लिहिलें तें त्यांना तारीख २२ रोजीं मिळालें. वरील पत्र तारीख २४ ला लिहिलेलें आहे. पत्र मिळाल्यापासून दोन दिवसांनीं त्या पत्राचें उत्तर बाळ यांनीं पाठविलेलें आहे. तेव्हां त्या पत्राचा बाळ यांनीं नानांबरोबर विचारविनिमय करूनच वरील उत्तर पाठविलें आहे हें स्पष्ट आहे. या पत्रांत मुख्य मुद्याचा विषय ह्मणजे पटवर्धन सरदारांनीं करवीरकर महाराजांचा सूड घेणें हा आहे. हा सूचक विषय

१ ऐ. लें. सं. पत्र नं. ५११८. २ ऐ. ले. सं. पान नं. ६१०१ यांतील टीप नं. २.

नानांच्या तर्फे बाळ यांनीं बाळासाहेबांपुढें मांडलेला आहे. परशुरामभाऊं-सारख्या पराक्रमी सरदाराचा मोड करून त्याचा वध करण्याइतके करवीरचे महाराज प्रबल झाले असतां त्यांच्यापासून केवळ आपलें व आपल्या जहागिरीचें संरक्षण कसें होईल एवढाच विचार पटवर्धन सरदारांपुढें असतां याहीपुढें नाना जाऊन करवीरकरांच्या सूडाची सूचना ते बाळासाहेबांना करवितात, ही गोष्ट विशेष महत्वाची आहे. महाडच्या कारस्थानाच्या वेळीं परशुरामभाऊं-पासून करवीरकरांचें संरक्षण करण्याची हमी नानांनीं घेऊन त्यांना त्यांनीं आपल्या पक्षांत सामील करून घेतलें. परशुरामभाऊ कैदेंत असतांना त्यांच्या जहागिरींवर हल्ले करून लूट-मार, जाळ-पोळ करण्याची पूर्ण मुभा नानांनींच त्यांना दिल्यामुळें त्यांनीं ते सर्व प्रकार घडवून आणलेले होते. भाऊ कैदेंतून मोकळे झाल्यानंतर त्यांच्यापासून करवीरकरांचें संरक्षण करण्याचें कंकण नानांनीं बांधलें होतें, त्याला भाऊ मरेपर्यंत नाना पूर्णपणें जागले असतां व भाऊंच्या परिपत्याकरितां त्यांच्याविरुद्ध पटवर्धन सरदारांत सर्व बाजूंनीं फूट पाडली असतां आणि पटवर्धन सरदारांच्या लौकिकाची अगर जहागिरीची नानांनीं भाऊ मरेतोंपर्यंत कोणत्याच प्रकारची फिकीर केली नसतां, त्याविरुद्ध नाना आपल्या राजकारस्थानाचा पवित्रा लगेच बदलून आणि पटवर्धन सरदारांचा पक्ष घेऊन करवीरच्या महाराजांचा सूड घेण्याचा सूर काढतात यांतच नानांच्या नवीन कारस्थानाचा उगम आहे. या उगमाचें तत्व 'कांट्या-नेंच कांटा काढणें' हें होय!

११. 'पत्र आठवें' हें बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे यांनीं बाळासाहेबांस तारीख २५ रोजीं लिहिलेलें पत्र आहे. हें पत्र बाळासाहेबांनीं त्यांना लिहिलेल्या तारीख १९ च्या पत्राचें उत्तर आहे. बाळ व सहस्रबुद्धे या नानांच्या दोन विश्वासू कारकुनांना एकाच दिवशीं हीं पत्रें बाळासाहेबांनीं लिहिलेलीं आहेत. बाळ यांनीं आपल्यास आलेल्या पत्राचें उत्तर तारीख २४ रोजीं पाठविलें व सहस्रबुद्धे यांनीं एक दिवसाच्या फरकानें तारीख २५ ला पाठविलें. नानांच्या राजकारस्थानांतील या चौवीस तासांच्या अंतराचें पूर्ण

प्रतिबिंब या पत्रांत आहे. बाळ यांचे पत्रांत भाऊसाहेबांना तीन जखमा होऊन ते मरण पावले एवढाच मजकूर त्यांच्या मरणाच्या हकीकतीविषयीं आहे. पटवर्धन सरदारांनीं एक होऊन करवीरकरांचा सूड घेतला पाहिजे एवढीच नवीन उठावणी त्यांत घेतलेली आहे. परंतु केवळ चोवीस तासांच्या फरकानें भाऊंच्या मृत्यूसंबंधींच्या हकीकतीस कसें तिखटमीठ लावून वरील सूडाच्या नवीन उठावणीस कसा जास्त रंग दिला आहे हें दिसून येतें. "भाद्रपद वद्य चतुर्थी भौमवार तृतीय प्रहरीं करवीरकरांची व वडिलांची लढाई होऊन वडिलांस तीन जखमा लागोन घोड्याखालीं आले. मोठीच गर्दी जाली. वडिलांस (विश्वासराव) सर्जेराव घाटगे याणीं घोड्यावर घालून करवीरकर राजा पुढें नेलें. राजांनीं केवळ पाजी कर्म केलें." 'त्यास छत्रपति ह्मणवितात आणि हिंदु, त्यास हें नीच कर्म योग्य नसतां त्यांणीं केलें तेव्हां त्या वेळेसच त्यांची श्री गेली असें समजावें. वडिलांनीं तो इहलोक परलोक साधन केलें. परंतु राजानें नीच कर्म नरकसाधनाचें केलें. शास्त्र प्रमाणच. तें कसें चुकेल! होणार जालें. वडिलांचे पाठींमागें सर्वांस वडील छत्र आपण आहां, त्यापेक्षां सर्वांनीं एकदिल होऊन राजास हात दाखवावयाचा योग दृष्टीस दिवसगत न लागतां आणिला पाहिजे.' पत्रांतील हा मजकूर पाहिला असतां नाना करवीरकरांशीं आपलें पुढील राजकारस्थान कसें घडवून आणणार होते याची कल्पना येते. 'पत्र पहिलें' यांत भाऊंच्या मृत्यूसंबंधीं जेवढी माहिती दिलेली आहे, तेवढीच माहिती वरील पत्रांत आहे. असें असतां **राजांनीं केवळ पाजी कर्म केलें; छत्रपति म्हणवितात आणि हिंदु. त्यास हें नीच कर्म योग्य नसतां त्याणीं केलें; राजानें नीचकर्म नरकसाधनाचें केलें.**' अशीं जीं पटवर्धन सरदारांचें रक्त तापवून सोडणारीं व त्यांच्या सूडवृत्तीच्या मर्मस्थानांवर प्रहार करणारीं निंद्य दूषणें नानांचे अंतस्थ कारकून नानांच्या अभय छत्राखालील करवीरच्या महाराजांना परशुरामभाऊंच्या मृत्यूची वार्ता येतांक्षणींच दोनतीन दिवसांच्या खलबतानंतर उघड देतात यांतच त्यांच्या पारिपत्याच्या नवीन कारस्थानाचा इतिहास दडून बसलेला आहे. परशुरामभाऊ

बरोबर करवीरच्या महाराजांनीं लढाई दिली हें काय त्यांनीं पाजी कर्म केलें? उघड लढाईंत परशुरामभाऊ जखमी झाले व ते पाडाव झाले हें हिंदु छत्रपतीला दूषण देण्यासारखें कसें नीच कर्म झालें? घाटग्यांनीं परशुरामभाऊंना जखमी झालेल्या स्थितींत घोड्यावरून महाराजांपुढें आणलें यांत त्यांनीं नरकसाधनाचें कोणतें नीचकर्म केलें? परंतु महाराजांच्या अपराधाचा अगर त्यांच्या पापकर्माचा पुरावा न दाखवितां, पहिल्यानें त्यांना अपराधी ठरवून निंद्य दूषणाची शिक्षा द्यावयाची व नंतर त्याला अनुसरून पुरावा तयार करावयाचा या नानाशाही कपटकारस्थानाचा उगम वरील पत्रापासून झालेला स्पष्ट दिसतो. राघोबा-दादांच्या बाबतींत 'आधीं शिक्षा आणि नंतर पुरावा' हें रामशास्त्र्यांचें वळण नानांनीं गिरवून त्याचा कित्ता करवीरकरांच्या बाबतींत या वेळीं लोकदृष्टीला आणलेला आहे. 'पत्र आठवें' याचा संबंध 'पत्र नववें' व 'पत्र दहावें' याच्याशीं कसा निगडित आहे हें पुढें सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां दिसून येईल.

१२. 'पत्र नववें' हें तारीख १८ रोजीं हमीदवाड्याहून बुधवार प्रातःकाळीं मिरजेस बाळासाहेबांस नारो हरीनें लिहिलें आहे असें या पत्रावरून दिसतें. त्यांतील मजकुरावरून पहातां हें पत्र परशुरामभाऊंच्या शवाचा दहन-विधि आटोपल्यानंतर लिहिलेलें आहे. यांत 'भाऊसाहेब पाडाव आले. घाटगे यांनीं घोड्यावर पुढें घेतलें होतें. त्यास महाराजांच्या समक्ष आलेवर घोड्या-वरून ढकलून दिलेवर 'मारा' म्हणोन मुख्यांनीं (करवीरच्या महाराजांनीं) सांगितलें. मग दहा पांच असामींनीं वार टाकिले. तोंडावर तो बाकी तिळ-मात्र जागा राहिली नव्हती. सर्वांस दिक्क नाहीं.' अशी हकीकत आहे. ही हकीकत वाचली असतां अगर ऐकिली असतां परशुरामभाऊंच्या आप्तवर्गाचेंच नव्हे तर त्यांच्याबद्दल सहानुभूति असलेल्या अगर नसलेल्या कोणत्याही मानवी अंतःकरणाच्या मनुष्याचें रक्त सूडाच्या विचारांनीं तापून जाईल यांत सं य नाहीं. भाऊ डोक्यावर तीन जखमा लागून आसन्नमरणावस्थेंत अस-त:ना त्यांना विश्वासराव घाटगे यांनीं एकादें कोळशाचें पोतें फेंकून द्यावें त्या

प्रमाणें त्यांना घोड्यावरून महाराजांसमक्ष जमिनीवर ढकलून दिलें व या अधम कृत्याची महाराजांना तिळमात्र दिक्क न वाटतां उलट त्यांनीं 'मारा' म्हणून आज्ञा केली व दहापांच लोकांनीं भाऊंच्या शवावर तरवारीचे वार करून त्यांच्या तोंडावर तीळही ठेवण्याइतकी जागा राहूं दिली नाहीं हें हिंस्र पशूचें कृत्य, आसुरी वृत्तीची कमाल करणारें कर्म ऐकून कोणत्या मानवी जीवाचें अंतःकरण संतापातिरेकानें भडकून जाणार नाहीं! असें असतां नारो हरीसारखा स्वामी-भक्त वकील, झिम झिम पाऊस पडत असतां, रस्ता खांचखळग्यांनीं व्यापिला असतां व निबिड अंधकार पडला असतां—जो महावीर पुरुष जिवाची पर्वा न करतां भाऊंचें प्रेत आपल्यापुढें घोड्यावर घेऊन हमीदवाड्याला जातो व जो भाऊंच्या प्रेताला अग्निसंस्कार करण्याचा लाभ आपल्याला लाभला म्हणून समाधान मानतो, त्याच नारो हरीच्या हातचें हें पत्र असावें अशी शंका सुद्धां तें सर्व पत्र वाचलें असतां येत नाहीं. हें पत्र श्रीकारापासून अखेरपर्यंत कोणीही वाचावें. त्याची दहावीस वेळा आवृत्ति करावी. आणि त्यांत संता-पानें उसळून गेलेल्या रक्ताच्या मनस्थितींत एक तरी अक्षर लिहिलें गेलें असेल तर तें निवडून काढावें. हें पत्र नारो हरीनें आपलें मन पूर्ण शांत व समाधान स्थितींत असलेल्या वेळीं लिहिलें आहे, हें पत्रांतील मजकुरावरून स्पष्ट होतें. यावरून हें तारीख १८ चें पत्र नारो हरीनें त्या दिवशीं खास लिहिलेलें नाहीं हें स्पष्ट आहे.

१३. दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे 'पत्र नववें' हें तारीख १८ रोजीं नारो हरीनें लिहिलें असें गृहित धरून चालल्यास दुसरी एक गोष्ट त्याच्या विरुद्ध असलेली स्पष्ट दिसून येते. याच नारो हरीनें बाळासाहेबांना जें तारीख २१ रोजीं पत्र लिहिलें आहे ('पत्र चवथें') त्यांत त्यांनीं **परशुराम-भाऊंचा काल लढाईतच झाला** असें स्पष्ट लिहिलें आहे. जर खरोखर परशु-रामभाऊंना 'पत्र नववें' यांत लिहिल्याप्रमाणें घाटग्यांनीं घोड्यावरून भाऊंना ढकलून दिल्यावर व महाराजांनीं त्यांना 'मारा' म्हणून सांगित-ल्यावर आणि दहापांच जणांनीं त्यांच्या शरीरावर वार टाकून त्यांच्या तोंडावर

तीळ ठेवण्यास जागाही ठेवली नव्हती इतकें छिन्नविछिन्न शरीर होण्यासारखी जर खरोखर त्यांची स्थिति झाली असती, तर भाऊ 'जर जिवंत राहते तर तें चांगलें नव्हतें' असें लिहिण्याचें नारो हरीला कारणच पडलें नसतें. 'पत्र चवथें' यांतील नारो हरीच्या मजकुराचा अखेरचा तात्पर्यार्थ मागें दर्शविल्याप्रमाणें अगदीं स्पष्ट आहे. म्हणून तारीख २१ सप्टेंबरला नारो हरीनें जें पत्र पाठविलें त्याच्या अगोदर तारीख १८ चें पत्र त्यांनीं लिहिलेलें नव्हतें हें स्पष्ट आहे.

१४. तिसरा मुद्दा असा आहे कीं, जर नारो हरीनें 'पत्र नववें' हें तारीख १८ लाच खरोखर लिहिलें असतें तर तें मिरजेस त्याच दिवशीं रात्रीं अगर तारीख १९ ला सकाळीं पोंचावयाला पाहिजे होतें. हें पत्र पोंचल्यानंतरच बाळासाहेबांनीं 'पत्र आठवें' हें पुण्यास बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे यांना १० रबिलाखरचें ह्मणजे तारीख १९ चें पत्र लिहिलें आहे असें होतें. बाळासाहेबांनीं आपल्या तारीख १९ च्या पत्रांत बाळाजी विष्णु यांस काय मजकूर लिहिला होता हें त्यांनीं आपल्या तारीख २५ च्या पत्रांत ('पत्र आठवें') अवतीर्ण चिन्हें घालून दिलेला आहे. पत्रीं आज्ञा जे, "भाद्रपद वद्य चतुर्थी भौमवार तृतीय प्रहरीं करवीरकरांची व वडिलांची लढाई होऊन वडिलांस तीन जखमा लागोन घोड्याखालीं आले. मोठीच गर्दी जाली. वडिलांस (विश्वासराव) सर्जेराव घाटगे याणीं घोड्यावर घालून करवीरकर राजापुढें नेलें. राजानीं केवळ पाजी कर्म केलें." हा मजकूर आहे. जर त्यांच्या पत्रांत भाऊंना घाटगे यांनीं घोड्यावरून ढकलून दिलें, महाराज 'मारा' ह्मणून ह्मणाले, दहापांच लोकांनीं त्यांच्यावर वार केले, भाऊंच्या तोंडावर तीळ ठेवण्यास जागा नाहीं इतक्या जखमा केल्या, हा जर मजकूर असता तर तो अत्यंत महत्वाचा व सूड उगवण्यास अत्यंत रामबाण ह्मणून तो अवतीर्ण चिन्हांत देण्यास बाळाजी विष्णु कधींच विसरले नसते. यावरून हा मजकूर बाळासाहेबांच्या १९ तारखेच्या पत्रांत नव्हता हें स्पष्ट आहे. खरोखर नारो हरीचें तारीख १८ चें पत्र जर

बाळासाहेबांना त्या वेळीं आलें असतें तर तो मजकूर त्यांनीं खात्रीनें बाळाजी विष्णूस लिहिला असता. सदर पत्रांत ज्या अर्थी तो मजकूर नाहीं त्या अर्थी 'पत्र नववें' हें त्या वेळीं अस्तित्वांत नव्हतें हेंच अनुमान स्पष्ट व खरें आहे.

१५. चवथा मुद्दा असा आहे कीं, 'पत्र नववें' हें नारो हरीनें खरोखर तारीख १८ ला जर बाळासाहेबांना लिहिलें असतें तर त्याच पत्रांतील करवीरच्या महाराजांचा निंद्य आणि हिंस्र प्रकार त्यांनीं भाऊंचा पुत्र रामचंद्रपंतआपा यांना लगेच कळविला असता. परंतु ही हकीकत रामचंद्रपंतांच्या स्वप्नांतही तारीख २० पर्यंत नव्हती. करवीरच्या महाराजांनीं भाऊंचा वध खरोखरीच जर अशा अधमपणानें केला असता, तर रामचंद्रपंतआपा मिरजेस येण्याबरोबरच बाळासाहेबांनीं त्यांना ही हकीकत कळविली असती. परंतु तसा कोणताच प्रकार बाळासाहेबांकडून अगर अन्य कोणाकडूनही रामचंद्रपंतास कळलेला नाहीं हें त्यांच्या तारीख २० च्या गणपतरावकाकांना मिरजेहून लिहिलेल्या ('पत्र पांचवें') पत्रावरून व बाळकृष्णपंत लागू यांना लिहिलेल्या पत्रावरून स्पष्ट होतें. यावरून नारो हरीनें जें १८ तारखेचें बाळासाहेबांस पत्र लिहिलें तें तारीख २० पर्यंत अस्तित्वांत नव्हतें हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे.

१६. पांचवा मुद्दा असा आहे कीं, 'पत्र नववें' यांत 'आपाजी गाईकवाड लढाईचें वगैरे जबानी सांगतां कळों येईल.' असें वाक्य आहे. यावरून पहातां नारो हरीनें हें पत्र आपाजी गाईकवाड याचेबरोबर देऊन त्यास मिरजेस तारीख १८ रोजीं रवाना केलें होतें असें ठरतें. असें असतां नारो हरीनें जें तारीख २० रोजीं बाळासाहेबांस पत्र ('पत्र तिसरें') लिहिलें आहे त्यांतही आपाजी गाईकवाड याचा उल्लेख 'आपाजी गाईकवाड जबानी सांगतां कळेल.' असा केला आहे. नारो हरीनें तारीख १८ चें पत्र देऊन जर आपाजी गाईकवाडास मिरजेस रवाना केलें असतें तर त्यांनीं आपल्या २० तारखेच्या पत्रांत 'आपाजी गाईकवाड जबानी सांगतां

कळेल' असा वाक्यप्रयोग खात्रीनें केला नसता. नारो हरी हे वकील होते. 'कळणें' या क्रियापदाचें भूतकाळाचें रूप कसें होतें व भविष्यकाळाचें रूप कसें होतें हें व्याकरणाचें ज्ञान त्यांना निःसंशय होतें. असें असतां जर नारो हरीनें आपाजी गाईकवाडाला तारीख १८ रोजीं मिरजेस पाठविलें असतें तर त्यांनीं आपल्या तारीख २० च्या पत्रांत 'आपाजी गाईकवाड जबानी सांगतां कळोन आलें असेल' असाच वाक्यप्रयोग केला असता. परंतु तो ज्याअर्थी तारीख २० च्या पत्रांत नाहीं, त्याअर्थीं आपाजी गाईकवाड यास नारो हरीनें तारीख २० चें पत्र देऊन पाठविलें होतें, असेंच ठरतें. तारीख १८ चें पत्र त्या वेळीं अस्तित्वांत नव्हतें, तें पुढें केव्हां तरी अस्तित्वांत आणावें लागलें असें स्पष्ट दिसतें.

१७. मुद्दा सहावा असा आहे कीं, 'पत्र नववें' या पत्रावर पैवस्तीची मिति नाहीं. अर्थात मिरज दरबारच्या कचेरींत अनुक्रम नंबरानें तें दाखल झालेलें नाहीं हें स्पष्ट होतें. 'पत्र पहिलें' हें जसें पैवस्तीची मिति, दिवस व वेळ घातलेलें पत्र आहे तसेंच 'पत्र नववें' असावयास पाहिजे होतें. पण ज्याअर्थी यावर पैवस्तीची मिति नाहीं त्या अर्थी हें पत्र पुढें केव्हां तरी लिहून त्या दप्तरांत घुसडून दिलेलें आहे असें स्पष्ट होतें.

१८. मुद्दा सातवा. 'पत्र दहावें' हें बाळासाहेबांनीं रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस तारीख २० रोजीं लिहिलेलें पत्र आहे. हें पत्र 'पत्र नववें' यांतील मजकुराचें आहे. हें पत्र खरोखर बाळासाहेबांनीं तारीख २० रोजीं जर रघुनाथरावांना लिहिलें असतें तर रघुनाथरावांचें मस्तक करवीरच्या महाराजांच्या सूडाच्या कल्पनेनें भणाणून गेलेलें स्पष्ट दिसलें असतें. परंतु बाळासाहेबांनीं भाऊंविषयीं रोमांचकारी भयंकर बातमी रघुनाथराव यांना दिली असतां त्यांच्या तारीख २१ च्या पत्रांत ('पत्र सहावें') त्याविषयीं ज्याअर्थी एकही शब्द नाहीं त्याअर्थी तारीख २० ला बाळासाहेबांनीं तें पत्र रघुनाथरावांना लिहिलेंच नाहीं हें स्पष्ट ठरतें. या पत्रावरही 'पत्र नववें' प्रमाणें पैवस्तीची मिति नाहीं. यावरून मागील अनुसंधान

दाखविणारा कोणता तरी पुरावा तयार करून ठेवलेला असावा म्हणून पुढें केव्हां तरी मागील तारखेचा लेख तयार करण्यांत आला हें स्पष्ट होतें.

१९. ‘पत्र आठवें’ हें करवीरच्या महाराजांच्या पारिपत्याकरतां नानांनीं उभारलेल्या नवीन कपटकारस्थानाचें सूचक असें चित्र आहे. करवीरच्या महाराजांची ‘श्री गेली असें समजावें.’ ‘सर्वांनीं एकदिल होऊन राजास हात दाखवावयाचा योग दृष्टीस दिवसगत न लागतां आणिला पाहिजे.’ ‘श्री॥ राजश्री रामचंद्रपंतआपा यांचा लौकिक करून दाखविणें हा एक पक्ष, आणि वडिलांपाठीमागें पटवर्धनांचा नक्ष, सरकारचा दाब, शत्रुवर जरब देणें, हें करणें स्वामीशिवाय नाहीं.’ ‘स्वामी दुरदेशीं (दूर दृष्टीचे) जाणून सेवकानें सक्तीचें लिहिणें लिहिलें आहे.’ ‘येविशीं श्री॥ नाना व माझें बोलणें बहुत जालें.’ ‘नानांचीही आज्ञा एकदिल होण्याविशीं जाली.’ सर्वांस नाना हाच मनसबा लिहितील’ ‘राजश्री नानांचें बोलणें होऊन विनंती केली आहे.’ ‘तात्यांचेंहि (बाळोबातात्यांचें) पत्र मागाहून पाठवून देतों.’ ‘पगाचें उत्तर सरकारांत दाखवावयाजोगें जरबेचें आलें असतां इकडूनहि सरंजाम जावयास दिवसगत लागणार नाहीं.’ ‘तो इतक्यांत इकडूनहि श्री॥ नाना पुरावा करीतच आहेत.’ ‘इकडील वर्तमान स्वामीस वरचेवर समजावें लागतें व स्वामीकडीलही दिनचर्येचें वर्तमान श्रीमंतांस (नानांस) कळवावें लागतें. यास्तव डांक बसवावयाची आज्ञा व्हावी.’ वरील वाक्यांत करवीरच्या महाराजांच्या कुंडलीचें सर्व भविष्य नानांनीं वर्तविलेलें स्पष्ट दिसून येतें.

२०. ‘पत्र आठवें’ हें बाळासाहेबांचें जें पत्र पुण्यास तारीख २२ रोजीं पोंचलें त्याचें उत्तर २५ तारखेस लिहिलेलें आहे. म्हणजे तारीख २२ ते २५ च्या दरम्यान नानांचा नवीन मनसुबा ठरला हें उघड आहे. या मनसुब्यांतील साध्य गोष्ट म्हणजे रामचंद्रपंत आपा यांस सर्वांनीं एकदिल होऊन मदत करावयाची व करवीरच्या महाराजांचें पारिपत्य कराव-

याचें ही आहे. ही गोष्ट साधावयाला ज्या साधनांची जरूरी आहे त्याही साधनांची जाणीव त्यांत दर्शविली आहे. 'रामचंद्रपंतआपा याचा लौकिक करून दाखविणें हा एक पक्ष.' यावरून परशुरामभाऊंच्या सरदारीचा लौकिक करणें अगर त्यांचा दुर्लौकिक करणें हें नानांच्या हातीं सर्वस्वी होतें. भाऊ चढेल झाले असें नानांना वाटल्याबरोबर त्यांनीं त्यांचा नाश केला. आतां करवीरकर चढले म्हणून पटवर्धनांना मदत देऊन त्यांचा नाश करावयाचा हा नानांचा मनसुबा होता हें यामुळें स्पष्ट होतें. तसेंच 'नानांचीही आज्ञा एक-दिल होणेंविशी जाली.' यावरून नाना वाटेल त्या वेळीं वाटेल त्याला आपल्या आज्ञेनें बेदिल व्हावयाला भाग पाडीत होते व एकदिलही व्हावयाला आज्ञा देत होते. यावरून भाऊंचा नाश करण्याकरता पटवर्धन सरदारांत व इतर भाऊंच्या मित्रांत जी बेदिली झाली ती नानामुळेंच होती हें स्पष्ट होतें. भाऊंना करवीरकरांविरुद्ध मदत करण्याविषयी नानांनीं वरेच कागदी घोडे नाचविले. परंतु प्रत्यक्ष एकही घोडा त्यांच्या मदतीस कां जाऊं शकला नाहीं याचें उत्तर वरील वाक्यांत आहे. नानांची त्या लोकांना भाऊंबरोबर एकदिल होण्याची आज्ञा गेली नव्हती. नाना हे भाऊंच्या वधाच्या कारस्थानाचे कसे सूत्रचालक होते हें वरील वाक्यावरून स्पष्ट होईल. 'नाना बोले आणि दळ हाले' अशी शक्ति या वेळीं नानांजवळ होती. त्यामुळें नानांची एकदिल होण्याची आज्ञा जातांच बाळोबानाना वगैरे सर्वजण करवीरच्या महाराजांविरुद्ध एकदिल झाले आणि त्यामुळें करवीरच्या महाराजांची 'श्री गेली' असा छातीला हात लावून नानांच्या कारकुनानें बाळासाहेबांना विश्वास दिला. हें सहस्रबुद्धे नानांचे अंतस्थ कारकून असल्यामुळें नानांच्या कपटकारस्थानाचा प्रभाव त्यांना पूर्णपणें माहीत होता. म्हणूनच त्यांनीं बाळासाहेबांना 'सक्तीचें लिहिणें' लिहून सक्ती केली होती.

२१. नानांनीं सर्व बाजूनें करवीरकरांच्या शासनाकरतां रामचंद्रपंत आपांचा पाठपुरावा करण्याचें ठरविलें. परंतु करवीरकरांचें शासन करण्याकरतां व आपल्या अनुयायांना त्यांचा सूड घेण्याची स्फूर्ति उत्पन्न होण्याकरतां कोणतें

तरी भडक कारण पुढें करावयास पाहिजे होतें. तें कारण अर्थात् मिरजेस उत्पन्न व्हावयास पाहिजे होतें. त्याकरतां सदर पत्रांत '**सरकारांत दाखवावयाजोगें जरबेचें** (धाकाचें) उत्तर आलें असतां इकडून सरंजाम जावयास दिवसगत लागणार नाहीं.' असा खुलासा केला आहे. यावरून सरकारांत (बाजीराव पेशवे यांस) जरब बसेल असें पत्र बाळासाहेबांनीं पाठवावें अशी स्पष्ट सूचना केल्यामुळें 'जरबेचें पत्र' लिहिण्याची जबाबदारी बाळासाहेबांवर नानांनीं टाकली होती. ही पेशवेसरकारास देण्याची 'जरब' 'तुम्हीं आम्हांस ताबडतोब मदत द्यावी, नाहीं तर आम्हीं पेशव्यांचें राज्य उलथून पाडूं' अशा स्वरूपाची असणें शक्यच नव्हतें. तर ती 'जरब' अशा स्वरूपाची पाहिजे कीं, ज्या 'जरबे'मुळें मानवी प्राण्याचें अंतःकरण थरारून जाईल व तो कोणतेंही साहस करावयाला ताबडतोब तयार होईल. अशीच 'जरब' नानांनीं बाळासाहेबांस सुचविली असली पाहिजे हें स्पष्ट दिसतें. या जरबेच्या पत्रावरच नानांचें नवीन कारस्थान यशस्वी होणार होतें व पटवर्धन सरदारांचा गेलेला लौकिक पुन्हां प्राप्त व्हावयाचा होता. या प्राप्त परिस्थितींतून नाना व पटवर्धन सरदार यांना परस्परांचे हेतु साध्य करून घ्यावयाचे असल्यामुळें करवीरकरांच्या शासनाकरतां 'जरबेच्या' भडक कारणांचें कारस्थान' उत्पन्न करावें लागलें. तें कारस्थान म्हणजे 'पत्र नववें' हें होय. भाऊंच्या शवाचा पुरावा नष्ट झाल्यामुळें नारो हरी सांगतील तोच पुरावा हें ठरल्याप्रमाणेंच होतें. नारो हरी हे एकटेच ब्राह्मण साक्षीदार होतात तेव्हां त्यांना दुसऱ्या एकाद्या मराठ्याची सांथ पाहिजे ह्मणून आपाजी गायकवाड याची पुस्ती जोडलेली आहे. एकंदरींत 'पत्र नववें' हें नानांना आपला पक्ष बळकट करून घेण्याकरतां नंतर नारो हरीकडून लिहवून घ्यावें लागलें. या नारो हरींच्या मदतीबद्दल पटवर्धनांकडून पुढें त्यांना जमिनी इनाम मिळालेल्या आहेत, यावरूनही स्पष्ट दिसतें. 'पत्र दहावें' ही नवीन पुराव्याची नुसती पुस्ती आहे हें आतां निराळें सांगण्याची जरूरी नाहीं.

२२. तारीख २५ सप्टेंबरचें याप्रमाणें नानांचा अंतस्थ कारकून सहस्रबुद्धे याचें सूचक पत्र बाळासाहेबांना गेल्यानंतर त्यांतील नानांच्या आज्ञेनुसार

व प्रेरणेनुसार बाळासाहेबांनीं तजवीज केली व त्याप्रमाणें जरब्रेचीं पत्रें श्रीमंत बाजीराव पेशवे यांस व बाळोबातात्या यांस सरकारी शिरस्त्याप्रमाणें मोरो आपाजी परांजपे यांचेमार्फत पाठविलीं. त्यासंबंधीं मोरो आपाजीनें बाळासाहेबांस तारीख २ आक्टोबरचें पत्र लिहिलें आहे. त्यांतील मजकुर पुढीलप्रमाणें आहे. 'सेवेशीं विज्ञापना[1] ऐसीजे, मदार सांडणीस्वार याजबरोबर पत्रें स्वामींचीं आलीं. भाऊसाहेब लढाईंत सरकारकामास आले. पुढें त्याची पैरवी सरकारांकडून व्हावी. तेणेंकरून सरकारचा नक्ष होईल ह्मणोन श्री॥ राजश्री पंतप्रधान यांस व नानांस पत्रें आलीं. तीं पत्रें प्रविष्ट जाहलेवर श्री॥ राजश्री नानांनीं परम खेद केला. बहुत श्रमी जाहले........श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांचेंही पत्र (नानांस) दाखविलें. प्रविष्ट करणें ह्मणोन (नानांनीं) सांगितलें. राजश्री बाळोबातात्या यास स्वामींनीं पत्र लिहिलें होतें तेंहि दाखविलें. 'चांगलें आहे. प्रविष्ट करणें' म्हणून सांगितलें. आणखीं एक पुरवणी खास दस्तुरची (बाळासाहेबांची) होती ती दाखविली. त्यावरून (नाना) फार खिन्न जाहले. हीं कर्में केवळ नीच असतील त्यांचीं! अशी गोष्ट केली. असो. काय चिंता आहे?' म्हणोन बोलले. तें पत्र माघारें दिलें. दुसरे दिवशीं सरकारचें पत्र राजश्री बाळाजीपंत यांनीं प्रविष्ट केलें. लौकिकार्थ वाईट गोष्ट जाहली म्हणोन श्री॥ राजश्री पंतप्रधान (बाजीराव) व रावसाहेब (अमृतराव) याणीं उत्तर केलें! पुढें सरकारांतून लौकर पैरवी व्हावी म्हणोन बाळाजीपंत बोलोन आले. राजश्री बाळोबातात्यांचें पत्र प्रविष्ट जाहलेवर ते बहुत श्रमी जाहले. दुसरे दिवशीं श्रीमंतांकडे आले. त्यांणीं "भाऊ सरकारकामास आले. याप्रमाणें मातबर सरदार सरकरदौलतीमध्यें नाहीं. एक बाजू दक्षिणेकडील होती. याउपर याचा विचार काय केला आहे? भाऊ तो सरकारकामास आले. पुढील तिकडील बंदोबस्त लौकर केला नाहीं तरीं विचार कळतच आहे." ऐसें बोलिले. त्यावरून फौज पाठवावी म्हणोन रावसाहेब बोलिले. नंतर बाळोबातात्या नानांकडे

---

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ५१३०.

आले. नानांचें बोलणें जाहलें. फौज पाठवावी यांप्रमाणें निश्चयांत आलें. ' वगैरे वगैरे याप्रमाणें नानांच्या सूचनेस अनुसरून बाळासाहेबांचीं पत्रें बाजीराव व बाळोबातात्या यांस आलीं. तीं पटवर्धनांचे वकिलांनीं नानांस दाखविलीं नानांनीं तीं पसंत केल्यावर नानांचे कारकुनानें बाजीरावांस व मोरो आपाजी वकिलानें बाळोबातात्यांस याप्रमाणें पोंचती केलीं. सरकारांतून पटवर्धन सरदारांस मदत देण्याचें ठरलें. बाळोबातात्यांनींही मदत देण्याचें ठरविलें. या सर्व गोष्टी गारुड्याच्या खेळाप्रमाणें या बोटावरील थुंकी त्या बोटावर नेऊन दाखविण्याच्या अवधींत घडून आल्या. हा सारा प्रभाव नानांच्या कारस्थानाचा होता हें वरील पत्रांतील मजकुरावरून दिसून येईल.

२३. मागील तारीख २ आक्टोबरच्या पत्रांत दर्शविल्याप्रमाणें मोरोआपाजीनें जें बाळासाहेबांच्या स्वदस्तुरचें पुरवणी पत्र नानांस दाखविलें व तें वाचून नाना जे फार खिन्न झाले तेंच ' पत्र नववें ' यांतील मजकुराचें होतें असें स्पष्ट दिसतें. ' लौकिकार्थ वाईट गोष्ट झाली ' असें रावसाहेब ह्मणाले. बाळोबातात्यांस पत्र दिल्यानंतर ते ' फार श्रमी झाले' यावरून भाऊंच्या मृत्यूची हकीकत या सर्वांना पूर्वीं समजून त्यांच्या दुःखाचा वेग ओसरून गेल्यानंतर व बाळासाहेबांचीं हीं पत्रें आल्यानंतर नाना, बाजीराव, अमृतराव, बाळोबातात्या यांना पुन्हां दुःखी कष्टी होण्याचें कारण राहिलें नसतां, ज्याअर्थीं या वेळीं ते सर्व खिन्न व श्रमी झाले, त्याअर्थी नानांच्या विचाराप्रमाणें सुधारून व तिखटमीठ लावून तयार केलेलें नव्या मजकुराचें नवें पत्र येतांच त्यांना पुन्हां दुःखाच्या नव्या वेदना झाल्या हें स्पष्ट दिसतें. ' पत्र नववें ' व ' पत्र दहावें ' हीं पत्रें नानांच्या प्रेरणेप्रमाणें तारीख २७ ते २९ सप्टेंबर या तीन दिवसांच्या अवधींत मिरजेस लिहून घेऊन तयार केली असावीं असें स्पष्ट अनुमान निघतें. या पत्रामुळें करवीरच्या पवित्र व धर्मशील महाराजांवर अमंगळ आरोप करण्यांत आले. राज्यतृष्णेकरतां राघोबांनीं पुतण्याचा खून करविल्याचा आरोप किंवा दौलतराव शिंद्यांवर केलेला निंद्य आरोप जसा

पुराव्यानें खोटा ठरविण्यासारखा नव्हता तशाच प्रकारचा हाही आरोप होता. त्यामुळें करवीरचे छत्रपती व पटवर्धन सरदार या उभयतांच्या पिढ्यान्‌पिढ्यांच्या रक्तांत त्याचें विष भिनून राहिलें. नानांच्या कारस्थानांतील हा विशेष होता हें आतां निराळें स्पष्ट करण्याचें कारण नाहीं. आसन्न-मरण स्थितींत समरांगणीं परशुरामभाऊ पडले असतां विश्वासराव घाटगे यांनीं आपल्या निपाणीजवळील गोटांतून अगर तेथें नसल्यास करवीराहून पालखी अगर मेणा मागवून घेऊन त्यांतून त्यांना न आणतां त्यांनीं परशुरामभाऊंना आपल्या घोड्यांवर पुढें घालून गोटास आणलें. या त्यांच्या थोर व लष्करी मनोवृत्तीच्या कामगिरीचा विचार न करतां किंवा जखमी झालेल्या भाऊंना तावडतोब गोटास नेऊन त्यांच्या जखमांना औषधोपचार तावडतोब केल्यास यांतूनही ते वांचतील अशा शुद्ध मनानें त्यांनीं भाऊंना आपल्या घोड्यावर घातलें व त्यांस गोटास आणलें तोंच त्यांचें प्राणोत्क्रमण झालें, ही वस्तुस्थिति लक्षांत न घेतां, केवळ घोड्यावरून आणलें या गोष्टीचा फायदा घेऊन आपला मतलब साधून घेण्याकरतां नानाकडून 'पराचा कावळा' केला गेला हें स्पष्ट आहे. या बाबतींत पुढें पुढें वस्तुस्थितीचा एवढा विपर्यास झाला की "भाऊंचें शव महाराजांनीं छिन्नविच्छिन्न केलें. त्याचे तुकडे तुकडे करविले" येथपर्यंत मजल आली. या पट्टणकुडीच्या लढाईचें रसभरित बाड दाजीबा लिमये यांनीं नंतर लिहिलेलें आहे. हे परशुरामभाऊंचे विश्वासू कारभारी होते. ते त्या लढाईंत होते. नाना पुणें दरबारचा कारभार करीत असतां या दाजीबा लिमयांनीं मोठमोठीं कामें केलेलीं होतीं म्हणून नानांना ते प्रिय झाले होते. एवढयाच त्यांच्या गुणावरून त्यांनीं लिहून ठेवलेलें बाड सत्यकथा कथन करणारें ठरत नाहीं. ते पट्टणकुडीच्या लढाईंत प्रत्यक्ष नव्हते. ते आपल्या गोटांतील तंबूंत होते. लढाई झाली त्या वेळीं भाऊंजवळ कोणी नव्हते. सर्व परागंदा झाले होते. भाऊंचा अंत्यविधीही दाजीबा लिमये यांनीं केला नव्हता अगर त्या वेळीं ते त्या ठिकाणीं हजरही नव्हते. अशा स्थितींत ते पट्टणकुडीच्या लढाईंत होते या सबबी-वर त्यांच्या बाडांतील माहितीला कवडीचीही किंमत येऊ शकत नाहीं. त्याच

प्रमाणें इ. स. १८१२ मध्यें पंढरपूर मुक्कामीं एलफिनस्टन साहेबांना बाजीरावांनीं 'भाऊंच्या शरीराचे तुकडे तुकडे केले,' अशी जी माहिती दिली होती तीही सांगासांगीची व 'पराचा कावळा' करून बनावट अशीच त्यांच्या हातीं व कानीं आलेली होती हें वरील सर्व हकीकतींवरून दिसून येईल. दाजीबा लिमये यांचें बाड हें केवळ नानांच्या प्रेरणेनुसार 'आधी शिक्षा व नंतर पुरावा' या कपटकारस्थानाला अनुसरून पुरावा ह्मणून निर्माण करून ठेवलेल्यांपैकींच एक होतें, यांत तिळमात्र संशय नाहीं. अशा बनावट पुराव्यावर नानांनीं आपलीं पूर्वीचीं कांहीं कारस्थानें पार पाडलेलीं आहेत हें मागें आलेलेंच आहे.

२४. परशुरामभाऊंसारख्या थोर, शूर, उदार व धर्मनिष्ठ पुरुषाचा करवीरच्या छत्रपती शिवाजीमहाराजांनीं अधमपणानें वध केला, असा जो आरोप त्यांच्यावर करण्यांत आला व त्यांचा नैतिक अधःपात व्हावा ह्मणून जी कंडी उठविण्यांत आली, ती कशी खोटी आहे हें त्या वेळेच्या कागदपत्रांच्या पुराव्यावरून सिद्ध झालेंच आहे. त्या बाबतींत खरेशास्त्री यांचेंही ठाम मत पुढीलप्रमाणें आहे. 'महाराज[1] गोटास परत आल्यावर त्यांनीं परशुरामभाऊंचा वध करविल्याची गोष्ट दाजीबा लिमयांनीं ग्रांट डफ्साहेबांस सांगितली, **ती खरी नसून** भाऊंस महाराजांनीं भर लढाईच्या गर्दींत मारविलें हें या प्रकरणांतल्या कागदांवरून स्पष्ट होत आहे.' या खरेशास्त्र्यांच्या विधानावरूनही 'पत्र नववें' व 'पत्र दहावें' हीं दोन पत्रें बनावट पुराव्याकरतां निर्माण केलीं गेलीं असलीं पाहिजेत असेंच पर्यायानें खरेशास्त्र्यांनींही कबूल केल्यासारखें होतें. 'करवीरचे शिवाजीमहाराज मोठे शूर, धोरणी व धार्मिक वृत्तीचे होते व त्यांचें खासगी वर्तन अत्यंत[2] निर्मळ होतें.' ते कपटी नव्हते. त्यांची देव ब्राह्मणांवर पराकाष्ठेची भक्ति होती. त्यांना वरचेवर मोठमोठ्या सत्पुरुषांचा समागम घडत असे. ते ललितापंचमीच्या[3] व्रताप्रमाणें व्रतेंही आचरीत होते. परशुरामभाऊंची व त्यांची

---

१ व २ ऐ. ले. सं. पान ५८६७. ३. ऐ. ले. सं. पत्र नं. ५१३७.

कोणाच्या कां प्रेरणेनें होईना एकदां लढाई जुंपल्यानंतर त्यांत कोण व कसा धारातीर्थी पतन पावेल याचा भरंवसा असणें शक्य नाहीं. रणांगणावर दोन योद्धे, भाऊ व महाराज असे आले. त्यां पैकीं भाऊ पडले. यांत महाराजांकडे कोणताच दोष येऊं शकत नाहीं. जर याच लढाईंत भाऊंऐवजीं महाराज मृत्यु पावले असते तर परशुरामभाऊंवर कोणतातरी आरोप आला असता काय? केव्हांही आला नसता! अशा स्थितींत करवीरकरांना दोष देणें हें निव्वळ पाप आहे. शिवाजीमहाराज हे शूराला शोभा देणाऱ्या खेळाडु स्वभावाचे होते. परशुरामभाऊंचें दिवसकार्य आटोपल्यानंतर दुखवट्याचीं वस्त्रें रामचंद्रपंतआपा यांस करवीरदरबारच्या वहीवाटीप्रमाणें महाराजांनीं पाठविण्याचें ठरविलें. महाराजांचें ह्मणणें असें होतें कीं, "स्वामींचें (बाळासाहेबांचें) व श्रीमंत राजश्री दादासाहेबांचें (कुरुंदवाडकर) लक्ष हुजूरच्या ठायीं (करवीरच्या महाराजांचे ठायीं) आहे. त्यापेक्षां जी गोष्ट जाहली, ते बरीच जाहली. पुढें तरी विवेक व्हावा यांत उत्तम आहे. दुखवट्याचीं वस्त्रें इकडील येणार आहेत. व पत्रें स्वामींचे नांवें एक व दादासाहेबांचे नांवें व श्रीमंत राजश्री रामचंद्रपंत[1] आपा यांचे नांवें अशीं तीन पत्रें येणार." पुढें रामचंद्रपंतआपा यांनीं दुखवट्याचीं वस्त्रें घेण्याचें नाकारल्यामुळें महाराजांनीं तो बेत रहित केला. एकंदरींत महाराजांचे पोटांत भाऊ अगर त्यांचे पुत्र यांचेविषयीं कोणताही द्वेषभाव नव्हता हें या प्रकारावरून स्पष्ट होतें.

२५. दुसरी एक अत्यंत महत्वाची गोष्ट ह्मणजे हमीदवाडा येथें भाऊंचें ज्या ठिकाणीं दहन झालें त्या ठिकाणीं करवीरच्या महाराजांनीं त्यांची समाधी बांधून तेथें पूजाअर्चा नित्य चालावी अशी तजवीज केली ही होय. भाऊंच्या ठिकाणीं करवीरच्या महाराजांची श्रद्धा व भक्ति असल्याखेरीज ही समाधीची उभारणी खास झालेली नाहीं. निंदकांना कांहींही ह्मणतां येत असतें, परंतु उभयपक्षीं विचार केला असतां करवीरच्या महाराजांनीं भाऊंच्या समाधीवर पूजाअर्चा व्हावी अशी ज्याअर्थी व्यवस्था केली त्याअर्थी महाराजांच्या ठिकाणीं

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ५१३८.

कोणताच कृत्रिम भाव नव्हता हें स्पष्ट दिसतें. छत्रपती शाहुमहाराज इ. स. १७४९ मध्यें मृत्यु पावले. नानासाहेब पेशव्यांनीं त्यांच्याकडून दोन सनदा घेऊन तात्विक दृष्टीनें छत्रपतीची गादी बळकावली होती. असें असतांही शाहु महाराजांचें दहन कृष्णातटाकीं माहुली गांवीं ज्या ठिकाणीं झालें त्या ठिकाणीं नानासाहेब पेशवे यांनीं त्यांची समाधीही बांधली नाहीं. अगदीं सामान्य मनुष्याप्रमाणें त्यांच्या दहनस्थानीं एक शाळुंका स्थापन केलेली मात्र आजमितीस दिसते. यावरून नानासाहेब पेशवे व करवीरचे शिवाजी-महाराज यांच्या मनोधर्माचा विचार करतां शिवाजीमहाराज केवढे शील-संपन्न होते हें स्पष्ट दिसून येईल. अशा थोर छत्रपतीवर आपल्या आकांक्षा फलद्रूप करून घेण्याकरतां व आपण परशुरामभाऊंचा वध करवून तो गुन्हा करवीरच्या महाराजांवर लादण्याकरतां नानांनीं त्या बाबतींत धादांत खोट्या हकीकतीचीं कंडी उठविली होती हें सहज लक्षांत येईल.

२६. नानांनीं करवीरच्या महाराजांचें पारिपत्य करण्याचें ठरविल्या-बरोबर सर्व पटवर्धन सरदार एक झाले. बाजीराव, अमृतराव हेही नानांच्या मनसुब्यांत सामील झाले. बाळोबातात्या, शिंदे हेही नानांशीं चुटकीसरशीं एकमत झाले. या सर्व गोष्टी पहातां नाना हे एकटेच सूत्रचालक होते हें स्पष्ट दिसून येईल. करवीरकराचें पारिपत्य करण्याचें ठरल्याबरोबर पूर्वीचे तहनामे वचनें वगैरे जशीं नाना विसरून गेले तसेच बाळोबातात्याही विस-रले. त्या भरांत परशुरामभाऊंच्या वधासंबंधीं करवीरकरांच्या पक्षाचें काय म्हणणें आहे हेंही विचारून घेण्याचें कोणाला भान राहिलें नाहीं. भाऊंच्या शवाचे तुकडे तुकडे महाराजांनीं खरोखर करविले किंवा नाहीं याचीही चौकशी कोणी केली नाहीं. नाना म्हणतील व ठरवितील तेंच खरें हा त्या वेळेचा नानांचा न्याय होता. पटवर्धन सरदारांच्या मदतीकरतां जें सैन्य व जो तोफखाना पुण्याहून जाणार होता, त्याच्या खर्चाकरतां पैशाची जरूरी होती. पेशवे सरकारची तिजोरी रिकामीच असल्यामुळें नानांनीं आपल्या कडोसरीचे पांच लक्ष रुपये चुटकीसरशी काढले. बाळोबातात्या शिंद्यांच्या

कैदेंतून मुक्त झाल्यानंतर नानांच्या अधिकारमर्यादेंत ते सांपडल्यामुळें नानांनीं त्यांच्याकडून चार लक्ष रुपये करवीरकरांवरील या मोहिमेच्या आगाऊ खर्चाकरतां काढले. याप्रमाणें या वेळीं नानांना एका क्षणांत नऊ लक्ष रुपये बाहेर काढतां आले. करवीरकरांच्या पारिपत्याकरतां परशुरामभाऊ नानांकडे अनेक वेळां तोंड वेंगाडून व दातांच्या कण्या करून घेऊन इतके दिवस मदत मागीत असतां, नानांनीं त्यांना एका कवडीचीही मदत दिली नाहीं. उलट 'सावकारांत त्राण राहिला नाहीं. आपल्याजवळ पांच हजार रुपये शिपांचें देणें ते द्यावयास नाहींत' अशा प्रकारें थापा देऊन काळजीनें वाळून गेलेल्या भाऊंच्या तोंडाला नानांनीं मधाचीं पानें पुसलीं. हीच पांच लक्ष रुपयांची मदत त्या वेळीं भाऊंना नानांकडून मिळाली असती तर भाऊंनीं सातारच्या महाराजांप्रमाणें करवीरच्या महाराजांची अवस्था अवघ्या पंधरा दिवसांत केली असती. परंतु त्या वेळीं नानांच्या मनांत करवीरकरांचा नाश करावयाचा नव्हता. त्या वेळीं नानांना भाऊंचा नाश करावयाचा होता. ह्मणून नानांकडून भाऊंना मदत मिळाली नाहीं हें स्पष्ट आहे. नाना महाडच्या कारस्थानाप्रमाणें केवळ आपल्या कामाकरतां आपला पैसा बाहेर काढीत होते. या वेळीं करवीरकरांचें पारिपत्य करणें हें केवळ नानांचें स्वतांचें काम होऊन बसल्यामुळें त्यांच्या कडोसरीचे पांच लक्ष रुपये एकदम बाहेर निघाले हें आतां निराळें सांगणेची गरज नाहीं. जेथें पैसा तेथें न्याय, शहाणपण, विजय व कीर्ति हा नानांनीं त्या वेळीं स्वानुभवानें घालून दिलेला धडा होता.

२७. करवीरच्या मोहिमेकरतां पटवर्धन सरदारांची तयारी व्हावयाला व पुण्याहून फौज व पलटणें निघून तीं पटवर्धनांना येऊन मिळावयाला भाऊंच्या मृत्यूनंतर तीन महिने निघून गेले. तों सन १८०० इसवीचा जानेवारी महिना सुरू झाला. या तीन महिन्यांत पुणें दरबारीं कोणत्या नवीन उलाढाली झाल्या हें येथें पहाणें जरूर आहे. महाडच्या कारस्थानापासून नानांना परशुरामभाऊ व बाळोबातात्या हे दोघे शत्रु वाटत होते.

त्यापैकीं नानांनीं आपण अगदीं अलिप्त आहोंत असें दाखवून भाऊंचा कांटा कसा काढून टाकला ही हकीकत मागें आली आहे. आतां बाळोबातात्या शिल्लक राहिले. तेव्हां त्यांच्या शासनाकरतां नानांच्या कपटकारस्थानाचें वादळी वारें त्या दिशेनें वाहूं लागलें. आपण प्रत्येक गोष्टीपासून अलिप्त आहोंत असें भासविण्याकरितां नानांच्या हातीं बाजीरावांचें बुजगावणें होतेंच. नानांचें कारस्थान कोणाच्यातरी आड दडल्याखेरीज साध्य होत नसे. एवढ्याचकरतां बाजीरावांना नामधारी बनवून व त्यांच्या आड आपण लपून आपल्या कारस्थानाचे नेमके बाण नाना सोडीत होते! तसेंच नेमके बाण आतां नानांना बाळोबातात्यांवर सोडावयाचे होते. याकरितां नानांनीं बाळोबातात्यांकडे बाजीरावांविषयीं तक्रारी सुरू केल्या. त्याचा भावार्थ एवढाच होता कीं, नानांनीं आपलें व बाजीराव यांचें पटत नाहीं असें भासविलें. या 'पटत नाहीं' या सबबीवर नानांनीं बाळोबातात्यांवर सहज लीलेनें एक मात केली होती. करवीरकरांचे पारिपत्यास पुण्याहून जी फौज जावयाची होती ती जर पेशवे सरकारचे खर्चानें गेली असती तर शिंद्यांच्या पलटणांचाही खर्च पेशव्यांना आगाऊ द्यावा लागला असता. बाजीराव कफल्लक होते हें जगजाहीर झालेंच होतें. तेव्हां पेशव्यांच्या फौजेच्या खर्चाकरतां नानांनीं कडोसरीचे पांच लाख रुपये काढल्याबरोबर बाळोबातात्यांनाही शिंद्यांच्या फौजेच्या आगाऊ खर्चाकरतां चार लक्ष रुपये स्वतःच्या कडोसरीला खार लावून काढावे लागले. पैशाचा खर्च आपल्या अंगावर न पडतां करवीरकरांच्या पारिपत्याला बाळोबांना उद्युक्त करण्याचा नानांचा तोडगा म्हणजे 'बाजीरावांचें व आपलें पटत नाहीं,' हा होता. बाळोबातात्या हे नानांच्या या तोडग्यानें सहज फसले. नानांचें बाजीराव खरोखर ऐकत नाहींत असें त्यांना वाटलें; म्हणून त्यांनीं नाना व बाजीराव यांच्यामध्यें मध्यस्थी करण्याचें ठरविलें.

२८. बाळोबातात्या, आबा चिटणीस व मामा आंग्रे असे तिघेजण बाजीराव यांचेकडे विजया दशमीच्या पांच सात दिवसापूर्वी भेटीकरतां गेले.

त्यांनीं श्रीमंतांकडे बोलणें लाविलें कीं, 'सरकारच्या दौलतीमध्यें बखेडा जाला. हरएकविशीं बंदोबस्त होत नाहीं. आमचे घरांत कलह उत्पन्न जाला होता तो मिटत आला आहे. पुढें इंग्रज प्रबळ जाले आहेत यांचा रेंच मोडिला पाहिजे. त्यास याचा विचार काय? राजश्री नानांचें तुमचें मिळत नाहीं. सर्वांचें छत्र सरकारची दौलत. त्यास येथें विचार या प्रकारचा! पुढें याप्रमाणेंच असल्यास विचार कळतच आहे!' यावर बाजीरावांनीं उत्तर दिलें कीं, 'राजश्री नानांस कारभार निखालसपणें करावा म्हणोन सांगितलें. एक दोन वेळां जालें; परंतु ते यथास्थित चित्त घालीत नाहींत.' यावर बाळोबा म्हणाले, 'त्याणीं चित्त घातलें असतां बंदोबस्त होईल. नाहीं तरी आम्हांस विचार पहावा लागेल!' यावर बाजीराव विचार करून सांगतो असें म्हणाले. नंतर एक दोन वेळां बाजीरावांबरोबर बाळोबातात्यांचें हेंच बोलणें झालें. राजश्री नानाबरोबरही बाळोबातात्या व चिटणीस यांचें हेंच बोलणें झालें. त्यावर नाना म्हणाले 'आम्हांस कारभार कांहीं एक न लगे. तुम्ही कारभार दौलतीचा करावा म्हणतां, त्यास माझे शरीराची प्रकृत कळतच आहे. बहुत दिवस श्रीमंतांचे दौलतीमध्यें काम केलें. याचा शेवट श्रीभागीरथीस जावें हाच आहे. श्रीमंतांनीं कृपा करून आम्हांस निरोप द्यावा हें उत्तम. राजश्री आलिजाबहादर यांचें आमचें गारपीरचे मुक्कामीं आम्हीं (सुटून) आलों ते समयीं हेंच बोलणें आहे. या उपरी कारभार माझ्याचेनें व्हावयाचा नाहीं.'[1]' याप्रमाणें नानांनीं उत्तर दिलें. ही हकीकत वाचली असतां नाना कसे खेळ करीत होते हें दिसून येते. बाजीरावांचें व आपलें पटत नाहीं या मुद्यावर नानांच्या नवीन कपटकारस्थानाला सुरवात झाली. बाळोबांना तें खरें वाटलें. त्यांनीं बाजीरावांची भेट घेऊन त्यांना तंबी दिली. बाजीरावांनीं त्यांना सरळ खरें काय होतें तें सांगितलें. 'राजश्री नानांस कारभार निखालसपणें करावा म्हणोन सांगितलें. एकदोन वेळां जालें.' याप्रमाणें बाजीरावांनीं नानांना कुलअखत्यारी सर्व देऊन टाकली असतां

---

१. ऐ. ले. सं. पान ६१२१.

नानांच्या मताप्रमाणें ते चालत नाहींत. हें गौडबंगाल त्यांना समजलें नाहीं. बाळोबातात्यांनाही या कोड्याचा उलगडा झाला नाहीं. नाना आपल्या हातीं कुलअखत्यारी नाहीं ह्मणतात. बाजीराव नानांना कुलअखत्यारी दिली म्हणतात. तेव्हां यांतील खरें कोणतें हें काढण्याकरतां बाळोबांनीं नानांची भेट घेतली. त्या वेळीं नानांनीं कुलअखत्यारीच्या कारभाराचा प्रश्नच बाजूला टाकला व आपण सेवानिवृत्त होऊन काशीस जातों असा लागा सुरू केला. तेव्हां बाळोबा थंड झाले व त्यांनीं नानांच्या समजुतीचा विचार सोडला व बाजीरावांच्या मागें नानांस कुलअखत्यारीचा अधिकार द्या म्हणून शशिमीरा लावला. बाजीरावांनीं ती गोष्ट कबूल केली व विजयादशमीच्या मुहुर्तावर समारंभानें कुलअखत्यारीच्या कारभारदानाचें उदक नानांच्या हातावर सोडण्याचें त्यांनीं ठरविलें. परंतु हा समारंभ ज्याअर्थीं नानांनीं करवून घेतला नाहीं त्याअर्थीं हें उदक बाजीरावांनीं सांगितल्याप्रमाणें अगोदरच नानांच्या हातावर सोडलें गेलें होतें हें स्पष्ट आहे. 'बाजीरावांचें व आपलें पटत नाहीं' या नानांच्या सूत्रांत नवीन कारस्थानाचा उगम होता. त्याची कल्पना बाळोबातात्यांना अगर बाजीरावांना त्या वेळीं बिलकुल आली नाहीं.

२९ 'नानांनीं कारभार पतकरिला नाहीं तर याचा विचार आम्हांस करावा लागेल,' या बाळोबांनीं बाजीरावांस दिलेल्या धमकीचा बाजीरावांचे मनावर निराळाच परिणाम झाला. याचा अर्थ नानांकडून बाजीरावांना असा सांगण्यांत आला असावा कीं, बाळोबांचे मनांत बाजीरावांना गादीवरून काढून टाकून त्यांचे जागीं अमृतरावांचा मुलगा विनायक यास यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन कारभार करावयाचा आहे. त्या वेळच्या सांकेतिक लेखांतून 'अंगठीवर हिरा आहे तो काढून नवीन हिरा बसवावयाचा आहे,' असा ज्याचा निर्देश केला जात होता तीच ही घटना घडवून आणण्याची बाळोबांची धमकी आहे. या विचारामुळें अर्थात बाजीरावांचें मन बाळोबाविषयीं कलुषित झालें व त्याच्या प्रतिकारार्थ नाना जें सांगतील तें करण्यास ते उद्युक्त झाले. याप्रमाणें बाळोबांच्या विरुद्ध नानांनीं

बाजीरावांना उभें केलें व त्यांच्या करवीं बाळोबांचा नाश करण्याचें नानांनीं आपलें पुढील कारस्थान सुरूं केलें.

३०. बाळोबातात्यांच्या नाशाचे वर्म नानांना पूर्णपणें अवगत होतें. परशुरामभाऊचें वर्म ज्याप्रमाणें करवीरचे महाराज होते त्याप्रमाणें बाळोबांचें वर्म सर्जेराव घाटगे हे होते. सर्जेराव या वेळीं कैदेंत असल्यामुळें बाळोबातात्यांचें प्रस्थ शिंद्यांच्या दरबारीं वाढलें होतें. सर्जेरावास मुक्त केलें तर बाळोबातात्यांचें प्रस्थ हल्कें होतें हें रहस्य नाना एकटेच जाणून होते. परंतु बाळोबांविरुद्ध सर्जेरावांना मुक्त करण्याची खटपट नाना उघडपणें करूं शकत नव्हते. कारण त्यामुळें नानांना बाळोबाबरोबर उघड सामना द्यावा लागला असता. ह्मणून नानांनीं बाळोबाविरुद्ध बाजीरावांस उठविलें व त्यांच्यातर्फे सर्जेरावांची मुक्तता करण्याचा घाट घातला. नानांच्या अक्कलखान्यांत अद्भुत युक्त्यांचा विपुल सांठा होता. त्याच्या जोरावर नानांनीं एका नाटकी प्रसंगाचें संविधानक रचलें. त्याचा सारांश असा होता कीं, बाजीरावांनीं दौलतराव शिंद्यांस सर्जेराव घाटगे यांस सोडण्याबद्दल गळ घालावी. दौलतरावांच्या अंतःकरणाला घाटग्यांना सोडण्याबद्दल प्रेमाचा पीळ पडावा ह्मणून दौलतरावांची प्रिय पत्नी बायजाबाई हिनें आपल्या पित्याच्या मुक्ततेकरतां अन्नत्याग करून सत्याग्रह करावा. प्रिय पत्नीच्या अन्नत्यागामुळें दौलतरावांचें अंतःकरण करपून जावें व त्यांनींही केवळ पत्नीप्रेमाकरतां अन्नत्याग करावा. दौलतराव शिंदे हे बाळोबातात्यांचे प्रत्यक्ष मालक असल्यामुळें त्यांच्या जीवरक्षणाकरतां बाळोबातात्यांनीं आपलें राजकारण, आपली मानहानि अगर आपला स्वार्थ, सर्व कांहीं गुंडाळून ठेऊन त्यांनीं सर्जेरावांच्या मुक्ततेला मुक्तकंठानें संमति देऊन आपल्या श्रेष्ठ स्वामीभक्तीस जागण्यास त्यांना भाग पाडावें. याप्रमाणें नाटकी प्रसंगाचा यशस्वी प्रयोग होऊन सर्जेराव घाटगे यांस बाळोबातात्याच्या अनुमतीनें तारीख ४ जानेवारी सन १८०० इसवी रोजीं दौलतरावांनीं बंधमुक्त केलें. त्याच दिवशीं शिंद्यांनीं सर्जेराव यांस आपल्या डेऱ्यास नेलें आणि त्यांस कंठी, शिरपेच, वस्त्रें वगैरे देऊन शिवाय रोख पन्नास हजार रुपये खर्चाकरितां दिले.'

३१. बाळोबातात्या शिंद्यांच्या कैदेंतून सुटून आल्यानंतर शिंदेबाया व दौलतराव यांच्यामध्यें त्यांनीं समेट घडवून आणला होता, हें पूर्वी आलेंच आहे. या समेटामुळें शिंद्यांकडे त्यांचें चांगलें वजन बसलें होतें. परशुरामभाऊंचें पारिपत्य करण्याच्या मनसुब्यांत नाना गुंतले असल्यामुळें व त्याकरतांच त्यांनीं बाळोबांना आपल्याजवळ केलें असल्यामुळें त्यांनीं घडवून आणलेल्या समेटांत नानांना हस्तक्षेप करून तो उधळून लावण्याचें कारण पडलें नाहीं. आतां परशुरामभाऊंचा कांटा नानांनीं काढून टाकल्यामुळें ते मोकळे झाले व त्यांनीं आपली संक्रांत बाळोबातात्यांवर फिरविली. परशुरामभाऊंचा नाश होईतोंपर्यंत नानांनीं बाळोबातात्यांचें एवढें प्रस्थ माजवून ठेवलें होतें कीं, 'बाळोबातात्या म्हणतील ती पूर्व दिशा[१]' होती. तेव्हां ज्या समेटामुळें बाळोबांचें प्रस्थ वाढलें तो समेटच उधळून लाविला म्हणजे आपोआप त्यांचें वजन कमी होईल हें नाना जाणून होते. याकरितांच नानांनीं सर्जेरावांची मुक्तता करविली होती. ही मुक्तता करण्याकरतां वरीलप्रमाणें जसा एक नाट्य प्रवेश नानांनीं करविला होता तसाच एक दुसरा प्रवेश त्यांनीं शिंदे व शिंदेबाया यांच्यामधील समेट उधळून लावण्याकरतां रचून ठेवला होता. मागील प्रकरणीं, समेट झाल्यामुळें शिंदेबाया जांबगांवास जाणेकरतां निघाल्या अशी हकीकत आली आहे; परंतु त्या बाया जाण्याकरतां निघाल्या असतां दौलतरावांनीं त्यांस तिकडे न जाण्याची विनंति केली व दौलतरावांच्या मनांत आतां कोणतीच पापबुद्धि राहिली नाहीं अशी बाळोबातात्या, आबा चिटणीस व कंपूवाल्यांचे मुख्य गोरे अंमलदार यांनीं खात्री दिल्यामुळें त्या पुण्याजवळ भीमेच्या कांठीं तुळापुरास येऊन राहिल्या. आपल्या रक्षणाकरितां फक्त दोन हजार फौज त्यांनीं ठेऊन घेतली व बाकीच्या फौजेस रजा दिली. त्यांनीं छावणीच्या बंदोबस्ताकरतां शिंद्यांची दोन पल्टणें मागवून घेऊन तीं आपल्याजवळ कायम ठेऊन घेतलीं होतीं. तुळापुरास या बाया अशा प्रकारें येऊन राहिल्यानंतर झालेल्या समेटाविषयीं दिवसेंदिवस त्यांचा भरंवसा वाढत गेला.

---

१. ऐ. ले. सं. पान ६१२९.

३२. शिंदेबायांची छावणी पुण्यापासून जवळच तुळापुरास पडल्यामुळें त्यांच्या छावणींत अकल्पित प्रकार घडवून आणणें नानांना सुलभ होतें. शिवाय आपण स्वत: आगळीक करून ती दुसऱ्यावर बेमालुमपणें लादण्यांत नाना प्रवीण होतेच. शिंदे व शिंदेबाया यांच्यामधील समेट पुन्हां कसा मोडेल याची रामबाण मात्रा नानांनीं तयार करून ठेवलीच होती. फक्त तो आरोप कोणत्या योग्य इसमाच्या माथीं मारावयाचा याचीच फक्त ते वाट पहात होते. सर्जेराव घाटगे यांची मुक्तता होतांच नानांच्या कारस्थानाला सुरवात झाली. शिंदे व शिंदेबाया यांच्यामधील समेट नानांनीं कोणतें गुप्त कारस्थान करवून कसा उधळून लाविला हें पुढील पत्रांतील हकीकतीवरून दिसून येईल. हें पत्र धोंडो बापूजी जोशी यांनीं पुण्याहून मिरजेस श्रीमंत रा. बाळासाहेब यांस तारीख २० जानेवारी सन १८०० इ. रोजीं लिहिलें आहे.[१] "सर्जेराव बापू कैदेमध्यें होते ते शिंदे याणीं सोडून वस्त्रें व जवाहीर दिलें त्यास दहा-बारा रोज झाले. बायांचा मुक्काम भीमेवर होता. जवळ कंपूचीं दोन पलटणें व दोन हजार फौज शिवाय शागीर्दपेशा व आंतील चौकीस हिंदुस्थानी मेवाती लोक होते. त्यांजपैकीं चौघेजण मेवाती यानीं दुसरेची गोष्ट शिंद्यांकडील मुत्सद्यांची ऐकून बायांस जिवें मारावें याजप्रमाणें होऊन चौघांनीं मिळोन सायंकाळचे समयीं सहा घटका दिवसास चौघी बाया आहेत त्यांजमधून एकीस तीनवार लागले. एक खांद्यावर भारी आहे. हातावर व पाठीवर एकून तीन वार लागले. दुसऱ्या बायांस दगा करावा तों गुल जाली. बाया पळोन कनातेच्या आंत गेल्या. व निकडून कंपूच्या चौकीकडे आल्या. पाठीस मारेकरी लागले. इतक्यांत बायांचे खिजमतगारानें एकास जिवें मारिलें. तिघे मेवाती मारेकरी सांपडले. त्यावरून मग तेथें चौकशी केली. तेव्हां चौदा असामींचीं नांवें त्याणीं लिहून दिलीं. सर्जेराव, बाणाजी शेट्ये, विठ्ठलपंत, कृष्णराव-बक्षी व मोदी वगैरे येथील आणि बायांजवळ लोक आहेत त्यांतील चौकीदार व कांहीं दफेदार व जमादार असे आहेत. ऐसी याद लिहून तेथील पलटण-

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ५२५३.

वाल्यांनीं कंपूकडे पाठविली. त्यावरून कंपू अडून बसला आहे. आम्हीं व राजश्री बाळोबा व आबामध्यें दरम्यान राहून बायांस येथें आणून समजी करून ठेविल्या. मध्यें जामीन आम्हीं असतां मारेकरी घालून नाश करावयाचा माकुल ! मारेकरी याणी याद लिहून दिली उत्तम आहे. आपला पैका टाकून देणें. तुम्हांपाशीं रहात नाहीं. शेर मिळेल तेथें जाईन. बाया याउपर गेल्यास आपला जिमा नाहीं. याजप्रमाणें कंपूवाला अडोन बसला आहे. राजश्री बाळोबातात्या यांचेही याच अन्वयें बोलणें, " कारभार करीत नाहीं. (वाटेल तर) मला बिडी घालून किल्ल्यावर ठेवणें. मनस्वी गोष्टी होऊं नयेत त्या होऊं लागल्या ! मला कारभार नको. " काशीयात्रेस जाण्यास निरोप मागतो. कंपूवाला बाळोबास म्हणतो कीं तुम्ही आम्हीं जामीन त्यास मी आपला पैका घेतो. तुम्हीं आह्मी येथून जाऊं. तुजला एकट्यास मीं जाऊं देणार नाहीं. असें कंपूचें व तात्याचें बोलणें आहे. नाहींतर यादीप्रमाणें असामी आमचे हवालीं करावे. आम्ही पारिपत्य करूं. याप्रमाणें आज पांच चार रोज जाले. **राजश्री नानांकडेही पत्र तात्यांचें व कंपूचें आलें कीं,** येथें प्रकार असा घडला, यास उपाय काय तो सांगावा. असें जालें आहे. " हा सर्व प्रकार सर्जेराव बंधमुक्त झाल्यापासून आठ नऊ दिवसांतच घडून आला. शिकवून ठेवल्याप्रमाणें मारेकऱ्यांनी सर्जेराव व त्यांचे पक्षांतील लोकांचीं नांवें लिहून दिल्यामुळें दुसऱ्या कोणाचीच शंका येण्याचें कारण उरलें नव्हतें. सर्जेरावांची व शिंद्यांची अशी कल्पना झाली कीं, बाळोबातात्या व त्यांचे पक्षपाती शेणवी सरदार यांनींच आपला सूड घेण्याकरतां हें सारें कुभांड रचलें असावें. एकंदरींत नारायणराव पेशव्यांच्या बाबतींत नानांनी जसा नारायणरावांना धरण्याच्या कटांत मारण्याचा गुप्त कट आपण स्वतः करविला व त्याचा गुन्हा राघोबादादा व आनंदीबाई यांचेवर घातला तसाच हा शिंदेबायांवर मारेकरी घालण्याचा गुप्त कट नानांनीं करवून व तो सर्जेराव घाटग्यांवर घालून, बाळोबासह सर्व शेणवी मुत्सद्दी, कंपूवरील अधिकारी व शिंदेबाया यांना समेटांतून फोडलें. त्यामुळें नानांनी पुन्हां सर्जेरावासह शिंद्यांना आणि शेणवी मुत्सद्यांसह शिंदेबायांना पूर्वीपेक्षां जास्त चेतवून व त्यांच्यामध्यें कलह

माजवून त्यांना आपल्या लगामीं आणलें. यावरून नानांनीं मंत्र फेंकला म्हणजे त्यांची मुतावळ ठिकठिकाणीं तें तें कार्य घडवून आणण्यांत कशी तत्पर होती हें दिसून येईल. बाळोबातात्यासह शेणवी मुत्सद्दी व शेणवी सरदार यांचे अमानुष वध पुढें लवकरच जे झाले ते होण्याला नानांच्या मंत्राचे हेच फूत्कार कारणीभूत झाले. नानांनीं शिंदे व शिंदेबाया यांचेमधील समेट उधळून लाव-ल्यामुळें शिंदे हल्के पडले. तेव्हां त्यांचा सूड उगवण्याकरतां नानांनीं यश-वंतराव होळकरास तयार करून ठेवलेंच होतें. आतां नानांनीं त्यास पुण्यास येण्याबद्दल इषारा दिला होता. त्याप्रमाणें ते दीडशें दोनशें तोफा व पायदळ व स्वार मिळून पन्नास हजार फौज बरोबर घेऊन पुण्यास येण्याकरतां निघाले होते. भोंसल्यांचीहि फौज त्यांच्याबरोबर होती. यावरून नानांच्या मनांत शिंद्यांचाही नाश करावयाचा मनसुबा होता हें उघड[१] होतें. यावरून नानांच्या फूत्कारांत जालीम विष होतें व तें पिढयानुपिढयांना जाळून होरपळून टाकणारें होतें हें स्पष्ट आहे.

२३. पटवर्धन सरदार व करवीरचे महाराज यांमध्यें नानांनीं नवीन रणकुंड पेटवून दिलें व शिंद्यांच्या दौलतींत पुन्हां कलहाग्नि चेतवून दिला. त्यामुळें नानांचे स्थान पुन्हां मजबूत झालें. त्यांनीं आपल्या बुद्धिप्रभावानें आपलें इहलोकचें पेशव्यांच्या वहुमुखत्यारीच्या कारभाराचें स्थान बळकट केलें, परंतु तें टिकवण्याकरितां आपल्या परलोकगमनाच्या मार्गांत त्यांना निरनिराळे अवघड अडथळे उत्पन्न करतां आले नाहींत. त्यामुळें शके १७२१ च्या माघ वद्यांत म्हणजे फेब्रुवारीच्या दुसऱ्या पंधरवड्यांत त्यांना ज्वर येऊं लागून ते आजारी पडले. पुढें तो ज्वर वाढत जाऊन त्यांची प्रकृति अधिकाधिक बिघडत चालली. तारीख २३ फेब्रुवारी रोजीं नानांचे विश्वासू कारकून बाळासाहेबांस मिरजेस पत्र पाठवून कळवितात कीं, ' श्रीमंत नानाची प्रकृति चांगली नाहीं. शक्त कमी आहे. याजकरितां दिवसगत उतारास[२] लागते." धोंडो बापूजी जोशी यांचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांना तारीख ७ मार्चचें पत्र. त्यांत ते

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ५३४४. २. ऐ. ले. सं. पत्र नं. ५२९८.

नानांच्या प्रकृतीसंबंधानें लिहितातः— "नानांची प्रकृत वृद्धापकाळ. त्यांत दुखणें. दिवसेदिवस वृद्धदशेमुळें ठीक[१] नाहीं." सदर जोशी यांनीं दुसऱ्या एका त्याच दिवसाच्या पत्रांत पुढील मजकूर लिहिला आहे. "श्री. राजश्री बाजीरावसाहेब यांचे पत्नीस रजोदर्शन प्राप्त जुन्नरास जालें. (बाईची) स्वारी येथें आली. फाल्गुन शु॥ ९ बुधवारीं (तारीख ५ मार्च) गर्भाधान जालें. सायंकाळीं श्री. राजश्री अमृतराव नानांकडे आमंत्रणास आले. परंतु शरीरीं सावकाश नाहीं, (सबब नाना) वाड्यांत गेले नाहींत. शिंदे, होळकर वगैरे मंडळी झाडून वाड्यांत आले. समारंभ जाला. सायंकाळीं अर्धघटका दिवसास नानांकडे नमस्कारास (बाजीराव) बाबासाहेब आले होते. कालपासून नानांचा ज्वर कांहीं कमी आहे. आज दानें होत आहेत.[२]"

३४. याप्रमाणें नानांच्या प्रकृतींत चढउतार होत असतां "त्यांचा काळ (फाल्गुन) वद्य ३ रोज गुरुवारीं (तारीख १३ मार्च सन १८०० इ. रोजीं) मध्यरात्रीस झाला. समस्त मुत्सद्दी आले होते. प्राणोत्क्रमणसमयीं श्रीमंत राजश्री (अमृत) रावसाहेब हेही आले, परंतु भाषण नाहीं. तसेच वाड्यांत गेले. शव माजघरांतून जाळींपुढें आणिलें. गंगेवर न्यावयाची सिद्धता झाली. तों आरबांनीं आपले फडशाकरितां अडथळा घातला. नंतर राजश्री दुलभदास यांनीं हवाला घेतला तेव्हां शव बाहेर जाऊं दिलें. या खटपटीस सूर्योदय जाला. नदीवर दहा सहस्र माणूस मिळाले होते. नानांकरितां शहरांत ते दिवशीं हाहाकार झाला तो काय वर्णावा! मातोश्री बाया (नानांच्या दोघी स्त्रिया) सिद्धटेकास होत्या. त्यांस भृगुवारीं प्रहररात्रीस वर्तमान समजलें. नंतर निघाल्या. रविवारीं प्रातःकाळीं आपल्या वाड्यात आल्या. सायंकाळचे श्रीमंत राजश्री रावसाहेब व बाबा फडके, चक्रदेव वगैरे झाडून समाचारास्तव आले[३] होते." याप्रमाणें नानांचा अंत झाला. नानांची क्रिया गंगाधरपंताचा भाऊ प्रभाकरपंत भानु आंबेगांवकर यांनीं केली.

---

१. ऐ. ले. सं. पत्र नं. ५११७. २. ऐ. ले. सं. पत्र नं. ५३१९.
३. ऐ. ले. सं. पत्र नं. ५३२८.

३५. नानांचा अंत झाल्यामुळें निष्कांचन व असहाय्य बाजीरावांना अर्थात् शिंद्यांच्या आहारीं पडावें लागलें. नाना मरण पावल्यानंतर त्यांच्या दोन स्त्रिया बगाबाई व जिऊबाई या पुण्यास आल्या हें वर आलेंच आहे. बगाबाई ही नानांच्या मृत्यूनंतर पंधराच दिवसांनीं मरण पावली. राहतां राहिली जिऊबाई. या बिचाऱ्या मुलीचें वय अवघें नऊ वर्षांचें होतें. ' हिला बगलेंत मारून आणि तिच्या मांडीवर दत्तक बसवून नानांच्या वेळेचे जुने बिलंदर मुत्सद्दी आपणावर एकादें किचाट आणतील, असें श्रीमंतांस भय[१] पडलें.' त्यांनीं जिऊबाईस आपल्याजवळ शनिवारवाड्यांतच ठेऊन घेतलें. नानांच्या कटांतील बाबा फडके, नारोपंत चक्रदेव वगैरे मंडळीस शिंद्यांनीं कैद करविलें. ' हें वर्तमान नानांचे वाड्यांत समजतांच **राघोपंत पेंडसे व भाऊ रूपशे असे उभयतां कागदांचे रुमाल नानांचे जाळून पळाले,** ते मात्र कैदेंत सांपडले नाहींत. बाकी झाडून मंडळी कैदेंत सांपडली.[२] '

३६. नाना जिवंत होते तोंपर्यंत पुढील जहागिरी त्यांच्याकडे चालत होत्या. त्या जहागिरी नानांना कोणाकडून मिळाल्या होत्या व त्यांचें सालीना किती किती उत्पन्न होतें तें पुढें दिल्याप्रमाणें आहे. १ पेशवे....६०००. २ आंग्रे....२०००. ३ गाइकवाड....१००००. ४ नागपूरकर १००००. ५ हैदरअल्ली....८०००. ६ हपशी....२०००. ७ होळकर ....१००००. ८ शिंदे....६५०००. ९ सचीव....२०००. १० परशुरामभाऊ पटवर्धन...५०००. ११ कोल्हापूरचे प्रतिनिधी....१०००. १२ सातारचे प्रतिनिधी....१००००. १३ कारकुनींचे कामाबद्दल.... ४००००. १४ सातारचे मंत्री....२०००. १५ दुसरे जहागीरदारांकडून ....५००००. एकूण[३] २२३०००.

३७. ' आपल्या अंगांत कितीही अक्कल असली तरी आयत्या वेळीं संकटांत हात देणारा पैशाशिवाय दुसरा मित्र नाहीं हें नाना फडनविस

---

१. नाना फडणविसांचें चरित्र पान २६८. २. पेशव्यांची बखर पान १९८.
३. नाना फडणविस यांची बखर पान १९५.

पूर्णपणें जाणत होते. त्यांनीं मोठ्या आस्थेनें पैशाचा संचय केला होता. त्यांच्या श्रीमंतीवरून लोक त्यांस 'नवकोट नारायण' असें ह्मणत. त्यांनीं हिंदुस्थानच्या बहुतेक भागांत विश्वासू सावकारांच्या हातीं गुप्तपणें ठेवी ठेवल्या होत्या. त्या अशाकरितां कीं, कोणत्याही वेळीं पाहिजे तेथें आपणास जरूर लागल्यास तो पैसा आपणास मिळावा. इतक्या पैशाची ते व्यवस्था केव्हां करीत, त्यांच्या ठेवी कोठें कोठें होत्या, या गोष्टीबद्दल लोकांस अजूनही आश्चर्य[1] वाटत आहे.'

३८. नानांनीं खासगी उपयोगाकरितां व परोपकारार्थ ज्या इमारती वगैरे बांधल्या त्याची माहिती पुढें दिल्याप्रमाणें आहे. १ मौजे नऱ्हे—आंबेगांव येथून पक्का चुनेगच्ची पाण्याचा नळ बांधून आणिला, त्याचें पाणी पुण्यांत सदाशिव पेठेच्या व पुष्करणीच्या हौदास मिळत असून त्यापासून शहरच्या लोकांस फार उपयोग होत असे. २ बेलबागेंतील विष्णुमंदिर त्यांनीं बांधविलें. या देवालयाच्या उत्पन्नाकरतां नानांनीं पेशव्यांकडून चार-गांव इनाम मिळविले. ३ शनिवारवाड्याजवळ नानांनीं एक विस्तीर्ण व सुशोभित वाडा बांधला. ४ काळेवावरांत नानांनीं एक बाग केला, त्याचा विस्तार अजमासें तीस बिघे आहे. ५ इ. स. १७९० मध्यें नानांनीं गणेश-पेठ वसविली; तींत एक धर्मशाळा व अडल्ये लोकांस बसण्याकरतां चावडी अशा दोन इमारती बांधल्या. ६ नानांचें मूळ गांव वेळास येथें काळभैरवाचें देवालय त्यांनींच बांधविलें. ७ खोपवली मुक्कामीं पाण्याचा तलाव पक्का चिरेबंदी एक व शंकराचें देवालय व लोकांस उतरण्याकरितां एक धर्मशाळा हीं नानांनीं बांधविलीं. व तेथें एक अन्नसत्रही ठेविलें. ८ भीमाशंकरचें देवालय बांधण्यास त्यांनीं सुरवात केली होती. परंतु तें काम त्यांचे हातून पार पडलें नाहीं. नंतर त्यांची पत्नी जिऊबाई[2] यांनीं

---

१. नाना फडणवीस यांचें चरित्र पान २२४. २. असें सांगतात कीं, जिऊबाईजवळ नानांच्या वेळेचा एक पुष्कराजाचा खडा होता. तो साठ हजार रुपयांस विकून त्या द्रव्यानें तिनें हें काम करविलें.

तें साठ हजार रुपये खर्च करून बांधविलें. ९ कायगांवटोकें येथें एक घाट व एक चिरेबंदीवाडा; वेळूळ येथें एक भक्कम चिरेबंदी वाडा, कोपरगांव तालुक्यांत वारी येथें गोदावरीस एक घाट व एक लहानसा वाडा हीं नानांनीं बांधलीं. १० मेणवली हा गांव नानांस इनाम होता. तेथें त्यांनीं कृष्णेच्या तीरास घाट, अमृतेश्वर व लक्ष्मीवासुदेव अशीं दोन देवालयें व राहण्याकरतां तटबंदीचा एक वाडा बांधिला. ११ श्रीकाशी क्षेत्रीं त्यांनीं दुर्गाघाटावर एक दक्षिणी पद्धतीचा वाडा बांधिला. १२ श्रीकाशी क्षेत्रीं कर्मनाशा नदीच्या पाण्याचा यात्रेकरूंस स्पर्श होऊं नये म्हणून त्या नदीवरील एक पूल व पंचक्रोशीच्या वाटेवर आणखी एक पूल नानांनीं बांधविला. या सर्व कामास नानांना एक कोट रुपये तरी लागले असावे असा खरेशास्त्र्यांचा अंदाज आहे. या एक कोट रुपयांपैकीं नानांच्या खासगी मिळकतीला किती लाख रुपये लागले व केवळ परोपकारार्थ किती लाख खर्च झाले याचा आढावा खरेशास्त्री देण्यास विसरले आहेत. तेव्हां तो अंदाज जिज्ञासूंनींच आपल्या मनाशीं ठरवावा हें उत्तम.

३९. नाना फडनविस हे अव्वल दर्जाचे कारकून बचे होते. त्यामुळें ते सरकारी नोकरांना, सरदार वगैरे मंडळींना व दरबार खर्चाखालीं तह घडवून आणणाऱ्या इतर राजसत्तांना एकजात कसे कसे भरडून काढीत होते हें पुढील माहितीवरून दिसून येईल. फडणिशीच्या दरकाचा बेहिशोबी वरवंटा ज्या वेळीं नाना लोकांवर फिरवूं लागले, त्या वेळीं नानांनीं फक्त एक लाख रुपये तैनात घेऊन बाकीचें उत्पन्न त्यांनीं सरकारांत जमा करावें असें त्या वेळीं राघोबादादाचें म्हणणें होतें. यावरून नानांनीं आपल्या कारकुनी बाण्याप्रमाणें पुढें दरकाचें उत्पन्न खुद्द पेशव्यांस थांग लागूं न देतां किती वाढविलें असेल तें फक्त नानांनाच माहित होतें. नानांच्या पश्चात् त्यांच्या अंतस्थ कारकुनांनीं त्यांचे कागदपत्रांचे सर्व रुमाल जाळून टाकल्यामुळें त्याचा आतां शोध लागणें अशक्य आहे. या दरकाच्या उत्पन्नाखेरीज पेशव्यांच्या पदरचे शिंदे, होळकर, पटवर्धन वगैरे सरदारांचे सरं-

आम व पेशवाई राज्यांतले शेंकडों किल्ले येथील फडणिशीच्या कामावर कारकून नेमण्याचा हक्क नानांकडेच होता, व त्या त्या जागांवर ते आपले हस्तक नेमीत असत. या हस्तकांकडून नानांस स्वामित्वाबद्दल अजमासें दीड लाख रुपये सालीना येत. एकंदरींत नानांस फडणिशीच्या दरकाबद्दल सालीना चारपांच लाख रुपये मिळत असावे.

४०. नानांना पेशवे सरकारांतून दीड हजार स्वारांचा म्हणजे जवळ जवळ पांच लाखांचा सरंजाम होता. त्या सरंजामांत नाशिक व खानदेश या प्रांतीं त्यांना सरकारांतून गांव लावून दिलेले होते. त्या शिवाय लोहगड पुरंदर, प्रतापगड, रायगड व केळंजा हे पांच किल्ले नानांनीं आपल्या स्वाधीन करून ठेविले होते. सरंजामाच्या बेरजेपुरते स्वार बाळगून त्यांस पेशवे सरकारची चाकरी केलेली दाखवावी लागे. 'नानांचें पथक बहुतेक परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या दिमतीस[1] दिलेलें असे.' पेशवे सरकारांतून स्वारांचा बारमाही पगार मंजूर होत असे, परंतु सरदार व शिलेदारांना दसमाही किंवा फार झालें तर अकरमाही पगार देण्यांत येई, त्यामुळें नानांना त्यांच्या कारकुनी कौशल्याबद्दल सरंजामी स्वार व शिबंदी यांच्या पगारापैकीं दोन महिन्याचा पगार वर बसल्या मिळत असे. याचें सालीना उत्पन्न लाख पन्नास हजार रुपये तरी असावें. दरबार खर्चाच्या नांवाखालीं नानांनीं लाखों रुपये मिळविले होते. एकादा सरदार किंवा इनामदार मरण पावल्यावर त्याची जहागीर किंवा इनाम त्याच्या वारसास द्यावयाचें असलें, किंवा एकाद्या सरदाराचा गुन्हा माफ करावयाचा असला, किंवा एकाद्या राजास कुमक द्यावयाची असली, किंवा तह करावयाचा असला तर अशा वेळीं पेशव्यांस व त्यांच्या दरबारी लोकांस दरबारखर्च, गुन्हेगारी, नजराणा अशा रूपानें लाखों रुपये मिळत. अन्यायानें वारसदार ठरवून देण्यांत याहीपेक्षां कित्येक पटीनें जास्त फायदा होत असे हें निराळें सांगणेंची जरूरी नाहीं. हैदरानें पेशव्यांशीं एकदां तह केला त्या प्रसंगीं त्यानें

१. नाना फडणविस यांचें चरित्र पान २२५.

शिंदे, हरिपंत फडके, नाना फडणविस व दुसरे एक दोघे मुत्सद्दी या सर्वांस साडेतीन लक्ष होन दिले; त्यांपैकीं फक्त नानांच्या वांटणीस एक लक्ष होन आले होते. खर्ड्याचा तह ठरवितांना निजामाकडून नानांस दरबार खर्चाऐवजीं पन्नास हजार रुपयांची जहागीर मिळाली' होती. या ढोबळ दोन उदाहरणांवरून 'पेशव्यांस धत्तुरा व फडनविसास मलिदा' अशी नानांच्या द्रव्यार्जनाची पद्धत होती हें स्पष्ट ठरतें. फडणविशीचें जर इतकें उत्पन्न होतें तर नानांच्या कुलअखत्यारीला सुरवात झाल्यापासून तों अखेरपर्यंत त्यांनीं आपल्या प्राप्तीची वाढ कशी व किती केली असेल हें सांगणेंच अशक्य आहे. कारकून बचाला कारकुनी घेण्याची संवय झाली म्हणजे तो कशाकशांत कारकुनी काढील याचा नेम नाहीं. या नानांच्या कारकुनी वळणावरूनच मालक पेशव्यांचा खजिना ओस पडून कारकून नानाच नवकोट नारायण कसे बनले हें निराळें सिद्ध करून दाखविण्याचें कारणच उरलें नाहीं.

---

१. नाना फडणविस यांचें चरित्र पान २२६.

प्रकरण ४१ वें.

" आप मरे और दुनिया डुबे " हें नानांचें ब्रीदवाक्य.

इ. स. १८००.

१. नानांनीं पेशवाइचा कारभार छत्तीस वर्षें केला पण तो त्यांनीं शेवटीं छत्तीसाच्या आंकड्याप्रमाणें उलटा करून ठेविला. माधवराव पेशव्यांच्या वेळीं नानांनीं पेशवाईच्या कशा स्वरूपाच्या कारभारांत प्रवेश केला, त्याची हकीगत.—२ नानांनीं पेशव्यांच्या राज्यांत फोडा आणि झोडा हें तत्व लागू केल्यामुळें छत्तीसाच्या आंकड्याप्रमाणें नानांनीं सर्व राज्यव्यवस्था कशी उलटी करून ठेविली याची मीमांसा—३ ' खुप शर्तिनें राज्य राखिलें फडणिस नानानें ' ही नानांची तरफदारी सत्यकथन करणारी आहे कीं काय ?—४ पेशवाइचा कारभार करण्यास नाना नालायख होते कीं ते पेशवाईचे शत्रु होते ?—५ पेशवाईचा कारभार करावयाला नानांची जरूरी नव्हती. नानांनाच आपला स्वार्थ व आपली आसुरी महत्वाकांक्षा पुरी करून घेण्याकरितां पेशवाइच्या कारभाराचें मोकळें रान चरावयास पाहिजे होतें.—६ ' आप मरे और दुनिया डुबे ' हा नानांचा मंत्र.—७ आपल्या पश्चात् पेशवाइ यथापूर्व चालावी अशी नानांची इच्छा नव्हती.—८ आपल्या पश्चात् पेशवाई जिवंत राहूं नये अशी नानांची इच्छा होती हें दाखविणारें दुसरें विधान.—९ सदर बाबतींतील तिसरें विधान.—१० नानांनीं आपली शेवटची जी निरवानिरव म्हणून केली ती पेशवाईचें सरण रचून त्याला अग्निसंस्कार केला ही होय.—११ आपल्या बिंदुमात्र फायद्याकरितां पेशवाईचें हिमालयी नुकसान करण्याचें बाळकडूं नानांनीं आपल्या अनुयायांना कसें पाजलें होतें ?—१२ नानांचें अन्तःकरण मानवी नसून तें आसुरी होतें याचा दाखला देणारी हकीगत.—१३ नानांची इच्छा आपल्या पश्चात् आपला वंश व आपला सरंजाम चालावा अशी नव्हती.—१४ माधवराव पेशव्यांनीं शेवटीं राघोबादादांची मुक्तता करून त्यांच्या हातीं पेशवाईचा कारभार जसा दिला तसाच नानांना मोरोबादादांना मुक्त करून आपला फडणिशीचा कारभार आपली शुभदायी अखेरी साधण्यासाठीं देतां आला असता, परंतु त्यांनीं तसें कां केलें नाहीं या संबंधींचें विधान.—१५ नानांनीं आरबांच्या तलफेचा फडशा कां केला नाहीं ?—१६ नाना कलिपुरुषांच्या सदरांत निःसंशय कसे येतात याची मीमांसा.—१७ **नानांची पत्रिका व त्यांच्या कुंडलीचें वर्णन.**

१. नाना फडनविस इ. स. १७६४ मध्यें पेशव्यांच्या प्रत्यक्ष राजकारभारांत शिरले, तेव्हांपासून त्यांच्या मृत्यूपर्यंत सुमारें तीन तपें त्यांनीं पेशवाईच्या फडणिशीपासून कुलअखत्यारीपर्यंतचा सर्व कारभार केला. फडणिशीच्या टप्यावरून कुलअखत्यारीचा पल्ला गांठण्याकरितां त्यांना कशीं व किती विविध कारस्थानें करावीं लागलीं हें मागें आलेंच आहे. सखारामबापूंना कैद करून कुलअखत्यारीचें स्थान नानांनीं पटकावल्यानंतर तें स्थिर ठेवण्याकरतांही त्यांना अनंत कारस्थानें करावीं लागलीं. पेशवाईंतील सुमारें छत्तीस वर्षांच्या म्हणजे बऱ्याच दीर्घकालाच्या नानांच्या कारकीर्दीचें सिंहावलोकन केल्यास नानांनीं शेवटीं पेशवाईचें स्वरूप छत्तीसाच्या आंकड्याप्रमाणें हुबेहुब बनवून ठेविलें असें स्पष्ट दिसतें. माधवराव पेशव्यांच्या वेळीं पेशवाईंतील शिंदे, होळकर, भोंसले, गायकवाड, रास्ते, विंचूरकर, पटवर्धन वगैरे वगैरे लहान मोठे सरदार खुद्द पेशव्यांच्या आज्ञेंत वागत होते. त्याचप्रमाणें साताऱ्याचे छत्रपती, करवीरचे महाराज हेही पेशव्यांच्या अनुसंधानानें चालत होते. इंग्रज, निजाम, हैदर वगैरे परकीय राजसत्ताही पेशव्यांचें आधिपत्य मान्य करून त्यांच्याच तंत्रानें चालत होत्या. पेशव्यांचे कारभारी सखारामबापू, नाना फडनविस, व इतर मुत्सद्दीही पेशव्यांच्या आज्ञेंत व त्यांच्या चरणीं नम्र होऊनच काम करीत होते. यामुळें पेशव्यांच्या एका हातांत तरवारीचें पूर्ण सामर्थ्य व दुसऱ्या हातांत बुद्धिमत्तेची अफाट शक्ति नांदत होती. एकंदरींत पेशव्यांच्या गादीवरील माधवराव पेशवे हे पेशवाईचे मालक व त्यांचे कारभारी, मुत्सद्दी, सरदार वगैरे वगैरे हे सर्व त्यांचे चाकर या भावनेप्रमाणें सेव्यसेवक धर्मानुसार एकोप्याचा, जिव्हाळ्याचा आणि संघशक्तीचा राज्यकारभार चालत होता. या पेशवाईच्या राजकारभाराच्या पूर्व प्रवेशद्वारांतून नानांनीं राज्यकारभारांत प्रवेश केला.

२. वर दर्शविल्याप्रमाणें नानांनीं फडणिशीच्या आपल्या पायरीवरून उच्चासन गांठतां गांठतां पेशवाईच्या कारभाराच्या कुलअखत्यारीच्या स्थानापर्यंत मजल गांठली. साताऱ्याहून पेशवाईचीं वस्त्रें आणवून आपल्या मस्तकीं

'पेशव्यांचा टिळा' मात्र झळकवून घेण्याचा मान मात्र नानांना संपादन करून घेतां आला नाहीं. बाकी सर्व बाजूंनीं नानांनीं पेशवाईचा पूर्णपणें उपभोग घेतला. या नानांच्या छत्तीस वर्षांच्या कारकीर्दीनंतर ते ज्या वेळीं पेशवाईच्या कारभाराच्या पश्चिमद्वारांतून मृत्यूमुळेंच सेवानिवृत्त झाले, त्या वेळीं त्यांनीं पेशवाई कोणत्या स्वरूपांत आणून सोडली हें पुढील हकीकतीवरून दिसून येईल. शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले हे पेशव्यांचे मुख्य फौजबंद सरदार पेशव्यांच्या अंमलांतून तोडून स्वतंत्र केले गेले. त्यामुळें पेशवाईचे शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले व पेशवे असे पृथक् पृथक् पांच तुकडे झाले. या पृथक् झालेल्या पांच तुकड्यांपैकीं कोणत्याही तुकड्यानें स्वतंत्रपणें दुसऱ्या तुकड्याशीं सहकार्य, स्वामीनिष्ठा, किंवा बंधुभाव, अगर मित्रप्रेम ठेऊं नये, उलट या पेशवाईच्या पंचतत्वांनीं परस्परांशीं सदोदित शत्रुभावानेंच वागत राहिलें पाहिजे अशी नानांनीं निरनिराळीं कारस्थानें करून करामत केली. या पंचतत्वांपैकीं एका तत्वानें अगर एका तुकड्यानें अभंग राहूं नये म्हणून त्याचींही शकलें पाडण्याकरतां आपल्या अफाट बुद्धिप्रभावानें भाऊबंदीकलहाच्या ज्वाळा त्यांच्यामध्यें नानांनीं भडकवून दिल्या. यामुळें नानांनीं पेशवाईंत नांदणारी संघशक्ति फोडून टाकली. 'फोडा आणि झोडा' ही आसुरी नीति नानांनीं पेशव्यांच्या राज्यकारभारांत चालू केल्यामुळें कुटिल कारस्थानाला प्राधान्य मिळालें. या नानांच्या कुटिल कारस्थानानें वीरवृत्तीच्या पुरुषांचे बळी घेतले व त्यामुळें पेशवाईची शस्त्रशक्ति बोथट आणि निकामी झाली. वीरवृत्तीच्या उदार, थोर व उमद्या लोकांचा अस्त होऊन स्वार्थी, कपटी, दुराचारी आणि विश्वासघातकी लोकांची त्यामुळें पोळी पिकली. त्यामुळें धनी व चाकर हा सेव्यसेवक भाव नष्ट झाला. चाकरच धन्याचा पैसा व अधिकार लुटूं लागले. त्यामुळें नोकरांनीं धन्याचे पाय धरण्याऐवजीं धन्यांनाच नोकरांच्या पाया पडतां पडतां त्यांच्या नाकीं नऊ आले. धन्याची भेट घेण्याकरतां नोकरांना पूर्वीं जो त्रास पडत होता, तितकाच, किंबहुना जास्तच त्रास नोकरांच्या भेटी घेण्याकरतां धन्यांना पडूं लागला. बाजीराव पेशवे हे पेशवाईचे

धनी, पण नाना या चाकराची भेट घेण्याकरतां रात्रीं वेशांतर करून व आपल्या जिवाची आशा सोडून बाजीरावांना एकदा नानांची भेट घ्यावी लागली हा इतिहास मागें आलाच आहे. त्या वेळीं धनी बाजीरावांचे पाय नानांनीं धरण्या-ऐवजीं चाकर नानांचे पाय बाजीरावांना धरावे लागले. धन्यानें चाकरांना नजरकैदेंत ठेवण्याऐवजीं चाकरच धन्यांना नजरकैदी बनवूं लागले. चाकरांनीं धन्याचीं आर्जवें करण्याचें सोडून देऊन धन्यांनीं चाकरांचीं आर्जवें करूनही कामें होईनाशीं झालीं. धनी कर्जबाजारी व नादार झाले आणि त्यांचे नोकर नवकोट नारायण बनले. धन्यांच्या घरीं दिव्याला तेल नाहीं व खाण्याला तांदूळ नाहीं अशी अवस्था झाली. पण नोकरांच्या घरीं लक्ष भोजनाच्या आणि गर्भाधान समारंभाच्या वाटाघाटी होऊं लागल्या. घरोघरीं धन्यांचीं स्तुतिस्तोत्रें गाण्याऐवजीं त्यांच्या निंदेचे पाठ सुरू झाले व चाकरांच्या गुणगौरवाचे पोवाडे कानीं पडूं लागले. एकंदरींत नाना पेशव्यांच्या राज्यकारभारांत शिरल्यापासून आपल्या छत्तीस वर्षांच्या कारकीर्दींत छत्तीसाच्या आंकड्या इतकी पूर्ण विरुद्ध स्थिति त्यांनीं शेवटीं निर्माण करून ठेवली ही गोष्ट स्पष्ट आहे. नानांनीं पेशवाईचा हा उत्कर्ष केला, कीं अपकर्ष केला, हें विचारवंतांना निराळें सांगण्याची जरूरी नाहीं.

३. ' खूप शर्तीनें राज्य राखिलें फडनिस नानानें ' हा नानांच्या गुणगौरवाचा पोवाडा कितपत सत्य कथन करणारा आहे हेंही येथें पहाणें इष्ट आहे. नानांच्या मरणकालीं त्यांनीं जीं भावी कालांत घडून येणाऱ्या राजकीय परिस्थितीविषयीं कारस्थानें उभारलीं, तीं पहातां व त्यांचे झालेले परिणाम लक्षांत घेतां, नानांचा गुणगौरव करणारा शाहीर, नानांच्या प्रसिद्धीकरण खात्यांतील भरमसाट वेतन घेणारा त्यांचा सेवक असावा अशी शंका आल्याशिवाय रहात नाहीं. सर्वसाधारण मानवीधर्म असा आहे कीं, मनुष्य आपल्या पूर्व वयांत आपल्या स्वभावानुसार व इच्छेनुसार काय वाटतील त्या भल्या अगर बुऱ्या गोष्टी घडवून आणतो. परंतु त्याच्यावर वार्धक्याची छाया पडूं लागली म्हणजे तो आपल्या हातून बुऱ्या गोष्टी घडल्या

जाऊं नयेत अशी दक्षता घेत असतो. कित्येक वेळा असेंही दिसून येतें कीं, पूर्ववयांत ज्या बुऱ्या गोष्टी आपल्या हातून घडून आल्या असतील त्यांचें परिमार्जन करण्याकडेच त्याचें विशेष लक्ष असतें. माधवराव पेशवे हे यांपैकींच एक होते. असें असतां नानांचा वृद्धापकाळ झाला, त्यांच्यावर रोगांनीं पगडा बसविला; मृत्यूचा पाश त्यांच्या गळ्याभोंवतीं हलके हलके विळखा घालूं लागला. अशा स्थितींत नानांनीं कोणतीं कारस्थानें रचलीं हें पाहिलें म्हणजे नानांच्या हाडींमासीं कोणता धर्म खिळला होता हें दिसून येईल. नानांच्या पश्चात् पेशवाईचें संरक्षण करण्यास लायक असा मोहरा म्हणजे परशुरामभाऊ हे होते. या मोहऱ्याचा बळी नानांनीं आपल्या मृत्यूपूर्वीं अवघे चार पांच महिनेच घेतला होता. करवीरचे महाराज नानांच्या लगामीं होते ही वस्तुस्थिति नानाच स्वमुखें सांगतात. असें असतां त्याच करवीरच्या महाराजांच्या पारिपत्याकरतां पेशवे, शिंदे, पटवर्धन आणि गोखले यांना ईर्षेला पेटवून करवीरचें रणकुंड नाना भडकवून ठेवितात. शिंदे व शिंदेबाया यांच्यामध्यें पुन्हां कलह पेटवितात. शिंदे नामशेष व्हावे व त्यांच्यामधील मुत्सद्दीपणाचें बुद्धिचातुर्य नष्ट व्हावें म्हणून सर्जेराव घाटग्यांचें पुन्हां भूत उठवितात; आणि अशा परिस्थितीनें गांगरून गेलेल्या स्थितींत शिंद्यांचा संपूर्णपणें नाश करण्याकरतां नानांनीं आपल्या पैशाच्या जोरावर प्रबळ केलेल्या यशवंतराव होळकरांस भोंसल्यांच्या मदतीसह अवाढव्य युद्ध साहित्य व फौज घेऊन येण्यास पुण्यास बोलावितात. ही नानांची शेवटची करामत पाहिली म्हणजे ती पेशवाईच्या रक्षणाची होती किंवा नाशाची होती असा प्रश्न सहज पुढें उभा राहतो. वरील यादवी पेशव्यांच्या खुद्द राज्यांत माजली होती. करवीरकर हे जसे पेशव्यांचे मांडलिक होते तसेंच शिंदे हे पेशव्यांचे सरदार होते. या यादवीशीं परचक्राचा कोणताच संबंध नव्हता. नाना हे पेशवाईचे कुलअखत्यार होते. पेशवाईंतील कोणत्याही दंग्याधोप्याबद्दल अगर कोणत्याही राज्यकारभाराबद्दल नाना हे एकटेच जबाबदार होते. असें असतां नानांच्या अधिकारसीमेंत

भाऊंचा वध, करवीरचा रणसंग्राम, शिंद्यांची घरफोड, व यशवंतराव होळकरांचें आक्रमण या पेशव्यांच्या राज्यनाशाच्या भयसूचक गोष्टी नानांच्या प्रेरणेनुसार घडत होत्या यांत शंका येण्याचें कोणतेंच कारण नाहीं. स्वराज्यांत शांतता राखण्याकरतां प्रसंगविशेषीं राज्यकर्त्यांना जाणून-बुजून शांतताभंग करावा लागतो ही गोष्ट खरी आहे. परंतु या शांतता-भंगाच्या साधनानें शांतता प्रस्थापित झालीच पाहिजे इतकें तें रामबाण साधन राज्यकर्त्यांनीं योजिलें पाहिजे. तें साधन उलट बेबंदशाही व अशां-तता जास्त फैलावण्यास कारणीभूत होऊं नये. पेशव्यांच्या राज्यांत शांतता नांदविण्याची कुलमुखत्यार या नात्यानें सर्व जबाबदारी नानांवर होती. असें असतां वरील घडामोडी नानांनीं घडवून आणण्याचें ज्या अर्थी ठरविलें त्या अर्थी त्या अंतिम परिणामीं पेशवाईच्या कल्याणाच्या, त्यांतील प्रजाज-नांच्या हिताच्या, सुराज्यव्यवस्थेच्या व शांततेच्या असावयास पाहिजे होत्या; परंतु त्याचा लवलेशही वरील नानांच्या घडामोडींत दिसून येत नाहीं. करवीरचें रणकुंड नानांनीं पेटवून दिलें. त्यांत कोणाचाही पुढें जय झाला तरी त्यामुळें पटवर्धन व करवीरकर हे पुढें केव्हांही एकचित्त होऊन सलोख्यानें वागतील अशी तिळमात्र आशा नव्हती. कारण या कलहाची उभारणीच मुळीं तशा विषारी स्वरूपाची होती. अर्थात् त्या दृष्टीनें करवीरचा नानांनीं करविलेला शांतताभंग पेशवाईच्या अखेर कल्या-णाचा व स्थिरशांततेचा ठरूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें शिंद्यांच्या वरां-तीलही यादवी पेशव्यांच्या राज्याला बाधक व शांतता कायमची हिरावून घेणारी होती. यशवंतराव होळकराला भोंसल्यांच्या मदतीनें पुण्यास नानांनीं बोलाविलें व त्याप्रमाणें ते लढाईच्या तयारीनें येऊं लागले होते. याही नानांच्या कारस्थानानें होळकरांच्या गृहकलहाला नवीन तोंड फुटून त्यांच्यामध्येंही संग्राम चालू होणार होता. कारण होळकरांच्या गादीचा खरा वारस शिंद्यांच्या लगामीं व त्यांच्या छत्राखालीं होता. अर्थात् पुढील भावी संग्रामाची योजना शिंदे, होळकर यांच्या पक्षाविरुद्ध यशवंतराव होळकर, भोंसले व शिंदेबाया यांच्या पक्षाची होती.

४. एकंदरींत पहातां नानांची शेवटचीं कारस्थानें पेशवाईमध्यें अंतस्थ कलह माजविणारीं होतीं हें स्पष्ट होतें. याच वेळीं बाळोबातात्यांनीं बाजीरावांना स्पष्ट सूचना दिली होती कीं, 'इंग्रज प्रबळ झाले आहेत त्यांचा रेंच मोडला पाहिजे.' इंग्रज या वेळीं टिपूचा पराभव करून व निजामाशीं सख्य जोडून प्रबळ झाले होते. बाजीरावांकडून नानांनीं इंग्रजांची टिपूच्या मोहिमेच्या बाबतींत फसगत करविल्यामुळें व टिपूचा मुलगा नानांनीं आपल्या आरबांच्या फौजेंत लपवून ठेवल्यामुळें इंग्रजांचा रोष पेशवाईवर झाला होता. त्यामुळें पेशवाईवर परचक्र केव्हां येईल याचा भरंवसा नव्हता. अशा स्थितींत बाळोबातात्या नानांची समजूत काढण्याच्या खटपटींत असतां 'मला कारभार नको, मीं काशीला जातों' असें नाना म्हणतात व परचक्राची पर्वा न बाळगतां आणि त्याबद्दल कोणतीच तरतूद न करतां पेशवाईतील अंतस्थ कलहांना प्रोत्साहन देतात यावरून पेशवाईच्या कल्याणाच्या व सुराज्यव्यवस्थेच्या घडामोडी नानांकडून झाल्या नाहींत हें स्पष्ट आहे. हीं नानांची कारस्थानें पहातां पेशवाईचा कारभार करावयास नाना एक तर नालायक असले पाहिजेत किंवा ते पेशवाईचे पूर्ण शत्रू तरी असले पाहिजेत अशी शंका आल्याशिवाय राहत नाहीं. यांपैकीं पहिली गोष्ट म्हणजे पेशवाईचा कारभार करावयास नाना नालायक होते असें म्हणणें ही गोष्ट अशक्यापलीकडील होती. आतां दुसरी गोष्ट राहिली. तेव्हां नाना पेशवाईचे शत्रू होते कीं काय, हें येथें पहाणें जरूर आहे.

५. मागील सर्व इतिहास अवलोकन केला असतां असें दिसून येईल कीं, नाना जर जन्मालाच आले नसते तरीसुद्धां पेशव्यांचें राज्य रक्षण करणारी एकापेक्षां एक अशी मोठमोठी मंडळी होती व त्यांनीं खात्रीनें पेशव्यांच्या राज्याचा सांभाळ केला असता यांत संशय नाही. महादजी शिंदे पेशवाईचा कारभार करण्याकरतां उमेदवार म्हणून पुढें आले होते. त्यांनीं पेशवाईचा कारभार केला असता तर नानांच्या अभावामुळें खालीनें पेशव्यांचें राज्य बुडालें नसतें. सवाईमाधवराव वयांत आल्यावर बाजीराव पेशवाईचा कारभार पूर्वपरंपरेनें पहा-

ण्यास लायक झाल्यावर त्यांनीं पेशवाईच्या कारभाराची मागणी नानांजवळ केली. त्या वेळीं त्यांच्यावर कारभार सोंपवून नाना जरी काशीस गेले असते तरी त्यांच्या गैरहजेरीमुळें पेशवाई खात्रीनें बुडाली नसती मोरोबादादा व सखारामबापू यांनीं पेशवाईचा कारभार केला म्हणून पेशवाई नामशेष झालीं नव्हती. परशुरामभाऊंनीं पेशवाईचा कारभार केला म्हणून पेशवाई समुद्राच्या तळाशीं गेली नाहीं. नाना शिंद्यांच्या कैदेंत पडले म्हणून पेशवाई होरपळून निघाली नाहीं. एकंदरींत पेशवाईच्या कारभाराला नानांची जरूरीच होती, त्यांच्याशिवाय पेशव्यांचा राज्यकारभार चाललाच नसता असें म्हणणें अज्ञानाचें ठरेल. **पेशवाईच्या कारभाराला नानांची मुळींच जरूरी नव्हती, तर नानांनाच आपल्या स्वार्थाकरतां व आपली आसुरी महत्वाकांक्षा पुरी करून घेण्याकरतां पेशवाई पाहिजे होती.** त्यांच्या स्वार्थी वृत्तीला सर्व बाजूंनीं पोषक असें पेशवाईचें अवाढव्य मोकळें रान चरण्याकरतां मिळालें होतें म्हणून तें हातावेगळें न होऊं देण्याविषयीं नानांनीं आपल्या बुद्धिचातुर्याचे कसे शिकस्तप्रयत्न केले हें मागें आलेंच आहे. तो सर्व इतिहास डोळ्यांपुढें ठेविला असतां वरील विधान किती सत्य आहे याची खात्री होईल.

६. आपल्या पश्चात् पेशवाई यथापूर्व नांदावी अशी जर नानांची इच्छा असती तर माधवराव पेशव्यांप्रमाणें नानांनीं आपल्या मृत्यूपूर्वी पेशव्यांच्या राज्यकारभाराची निरवानिरव केली असती. महाडच्या कारस्थानानंतर नानांनीं काशीयात्रेस जाण्याचें जें खूळ माजविलें होतें त्या वेळीं सुद्धां आपल्या कारभाराची निरवानिरव करण्याकरतां त्यांनीं तेरा कलमाची यादी करून त्यावर बाजीरावांची मखलाशी करून घेतली होती. नाना माघ वद्यांत आजारी पडले व ते सुमारें एक महिन्यानंतर म्हणजे फाल्गुन वद्यांत मृत्यु पावले. मरणापूर्वी सहा दिवस त्यांनीं दानें वांटलीं. त्यांची स्मृति शेवटपर्यंत चांगली होती. शनिवारवाड्यांत बाजीरावांच्या गर्भाधान समारंभाला नानांना बोलावणें होतें परंतु ते आपल्या प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें जाऊं शकले नाहींत. यावरून त्यांची

प्रकृति मरणापूर्वी पांच सहा दिवस समारंभाला हजर रहाण्याकरतां बोलावण्या-इतकी बाजीराव वगैरे मंडळींना चांगली वाटत होती असें दिसून येतें. मनाच्या व शरीराच्या अशा योग्य स्थितींत असतांना व दानें वगैरे देऊन आपला परलोकचा मार्ग सुगम करण्याच्या खटपटीला ते लागले असतांना जर नानांच्या मनांत आपल्या पश्चात् पेशवाई टिकावी असें असतें, तर त्याबद्दल खात्रीनें त्यांनीं ताबडतोब आपल्या कारभाराच्या निरवानिरवीची एक कमींत कमी शंभर कलमाची यादी तयार करविली असती. काशीयात्रेच्या निरवा-निरवीची यादी जर ते ं कल्मी होती तर त्यांच्या या महायात्रेची यादी अर्थात् 'महायादीच 'बनली असती; परंतु नानांनीं तसें ज्याअर्थी केलें नाहीं, त्याअर्थी आपल्या पश्चात् पेशवाई नांदावी असें नानांच्या मनांत नव्हतें हेंच खरें ठरतें. 'आप मेरे और दुनिया डूबे' असल्या कोत्या विचाराचे नाना कसे होते हें पुढील स्पष्टीकरणावरून दिसून येईल.

७. इंग्रजांनीं टिपूचा सर्वनाश करून त्याचें राज्य बुडविलें होतें व निजामाशीं मित्रत्वाचा स्वतंत्रपणें नवीन तह करून व त्याला आपल्या पक्षांत घेऊन त्यांनीं आपलें सामर्थ्य वाढविलें होतें. इंग्रजांचें मन कलुषित होईल असें नानांनी बाजीरावांस वर्तन करावयाला लाविलें होतें. त्यामुळें बाजीरावांविरुद्ध इंग्रज मनांतून रुष्ट झालेले होते. परराज्यांत अकारण हस्तक्षेप करावयाचा नाहीं या पूर्वीच्या इंग्रजांच्या राजकारणपद्धतींत टिपूच्या मोहिमेपासून बदल झालेला होता हीही गोष्ट नानांना पूर्णपणें अवगत होती. इंग्रजांचा रंग मोडला पाहिजे असें बाळोबातात्यासारखे मुत्सद्दी म्हणत होते. नानांचा व इंग्रजांचा सलोखा होता. आपल्या पश्चात् पेशवाईला प्रामुख्यानें कोणापासून भय आहे हें नाना पूर्णपणें जाणत होते. नाना हे सर्वांची 'गुरुकिल्ली' होते. असें असतां आपल्या पश्चात् पेशवाई यथापूर्व चालावी असें जर नानांच्या मनांत असतें तर त्यांनीं माधवराव पेशव्यांप्रमाणें पेशवाईच्या राज्यकारभाची निरवानिरव करण्याच्या दृष्टीनें इंग्रजांतर्फेच्या अधिकाऱ्यास बोलावून

त्यांच्या हातीं मित्रत्वाच्या नात्यानें बाजीरावाचा हात देऊन व पुढें हें मित्रत्वाचें नातें कायम चालविण्याविषयीं उभयतांकडून हमी घेऊन त्यांनीं आपलें कर्तव्य केलें असतें. त्याचप्रमाणें निजाम, शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले, सातारकर, करवीरकर, रास्ते, पटवर्धन, विंचूरकर वगैरे वगैरे स्वकीय अगर परकीय अशा जरूर त्या अधिकारी मंडळींना पाचारण करून व त्यांच्याकडून बाजीराव व पेशवाई यांचें संरक्षण होण्याच्या दृष्टीनें सर्वांचा एकोपा व परस्परांकडून तसे नवीन करारमदार करून घेतले असते. परंतु तशा प्रकारचा प्रयत्न ज्याअर्थी नानांकडून झाला नाहीं, त्याअर्थी आपल्या पश्चात् पेशवाई यथापूर्व चालावी अशी नानांची इच्छा नव्हती हेंच विधान खरें ठरतें.

८. पेशव्यांच्या राज्यांत या वेळीं लायक असे जे मुत्सद्दी शिल्लक राहिले होते त्यांत बाळोबातात्या हे सर्व बाजूंनीं श्रेष्ठ असे होते. या वेळीं ते पुण्यास होते. त्यांच्या पाठीशीं शिंद्यांची फौजबंद शक्ति रक्षणाकरतां उभी होती. शिंदेही पुण्यासच राहिलेले होते. या वेळीं नानांनीं मनांत आणलें असतें तर त्यांना आपला कारभार बाळोबातात्यांवर सोंपवून देऊन पेशवाईचें कल्याण साधतां आलें असतें. सर्जेरावांचें दिवाणीपद कायम ठेऊनही ही तडजोड नानांना घडवून आणतां आली असती. अमृतराव यांनींही बाळोबातात्यांना दुय्यम कारभारी म्हणून मान्य केलें असतें. परंतु अशा तडजोडीचाही नानांनीं प्रयत्न केला नाहीं. उलट शिंद्यांविरुद्ध यशवंतराव होळकरांना पुण्यास बोलावून पेशव्यांच्या राज्याला सर्वविघातक अशा भानगडी उत्पन्न केल्या. यावरूनही आपल्या पश्चात् पेशवाई जिवंत राहूं नये अशीच नानांची इच्छा होती हें स्पष्ट दिसतें.

९. त्या वेळीं राज्याचा कारभार चालविण्यास व राज्यांतील कलह शांत करण्यास पैशाची फार जरूरी होती हें मागें आलेंच आहे. नानाही पैशाच्या सामर्थ्यावरच आपलीं सर्व कारस्थानें पार पाडीत होते. संकटांतील खरा सोबती म्हणजे 'पैसा' हा सिद्धांत नानांचा अनुभवसिद्ध होता.

आपल्या पश्चात् पेशवाईचा मालक बाजीराव हा संकटांत पडेल तेव्हां तीं संकटें निवारण करण्याचें सामर्थ्य आपल्या धन्याच्या अंगीं यावें म्हणून जिवापलीकडे नानांनीं जतन करून ठेवलेली नऊ कोटींची गंगाजळी जर त्यांनीं बाजीरावांच्या स्वाधीन केली असती तर त्यांना पेशवाईची कदर किंवा पेशव्यांच्या राज्याचा अभिमान होता असें म्हणतां आलें असतें. ही नऊ कोटींची गंगाजळी नानांनीं जी कमाविली होती ती पेशव्यांच्या राज्यांतून व पेशवाईच्या कारभारीपणाच्या अधिकारामुळेंच कमावलेली होती. असें असतां नानांचें गुप्त धन ठिकठिकाणीं पेरून ठेवलें होतें व त्यांच्या पश्चात् चोरांपोरीं जें नष्ट होऊन गेलें त्याची जर नानांनीं पेशवाईच्या कार्याला उपयोगी पडेल अशी निरवानिरव केली असती तर त्यांना आपल्या पश्चात् पेशवाई जिवंत रहावी असें वाटत होतें असें म्हणतां आलें असतें. परंतु त्यांनीं ज्या अर्थी या बाबतींतही कोणतीच निरवानिरव केली नाहीं, त्या अर्थी आपल्यामागें पेशवाई जिवंत राहूं नये अशीच नानांची इच्छा होती हें वरील विधान खरें ठरतें.

१०. वरील कारणांचा विचार करतां नानांनीं पेशवाईच्या रक्षणाकरतां ज्या गोष्टी प्रामुख्यानें आपल्या महायात्रेच्या वेळीं करावयास पाहिजे होत्या त्या त्यांनीं केल्या नाहींत एवढेंच नव्हे तर त्याच्याविरुद्ध सर्व गोष्टी त्यांनीं घडवून आणल्या. करवीरचें रणकुंड, शिंदे व शिंदेबाया यांच्यामधील कलहाचा नवीन भडका, बाळोबातात्यांचा नाश करण्याकरतां सर्जेरावाची मुक्तता व शिंद्यांसह सर्व पेशवाईच्या नाशाकरतां यशवंतराव होळकरांना पुण्यावर चाल करून येण्याची आज्ञा, या सर्व गोष्टी ज्याअर्थी नानांनीं आपल्या महायात्रेच्या अगोदर घडवून आणल्या, त्याअर्थी त्यांनीं आपल्या हस्ते पेशवाईचें सरण रचून त्याला त्यांनीं अग्नि दिला व नंतर आपल्या महायात्रेला ते तयार झाले असें म्हटल्यास तें खात्रीनें वावगें होणार नाहीं. मागें राघोबादादा पुणें सर करण्याकरतां तळेगांवपर्यंत आले त्यावेळीं, पेशव्यांच्या गादीला त्यांचा स्पर्श होऊं द्यावयाचा नाहीं असा नानांचा संकल्प होता.

त्या वेळचे त्यांचे शब्द होते कीं, " इंग्रजांच्या जोरावर श्रीमंत पुण्यास येणार तर येवोत; पण नांदती राजधानी मी त्यांच्या हातास लागूं देणार नाहीं. पुण्याची राखरांगोळी करीन, **मग राखेच्या पुंजीवर बसून श्रीमंतांनीं खुशाल राज्य करावें.**[1] " राघोबादादांविषयीं नानांचा अशा प्रकारचा द्वेष होता हें मागें २१ व्या प्रकरणांत आलेंच आहे. बाजीरावांबद्दलही नानांचा केवढा द्वेष होता हेंही मागें ठिकठिकाणीं आलेंच आहे. असें असतां बाजीरावांना गादीवर बसविण्याचें नाटक नानांनीं महाडचें कारस्थान रचून जें केलें तें केवळ आपल्याला पेशवाईचें मोकळें रान चरावयाला पाहिजे होतें ह्मणून केलें. बाजीरावांबद्दल त्यांच्या मनांत अल्पही सहानुभूति वसत नव्हती. अशा स्थितींत आपल्या पश्चात् पेशवाईचे खरे धनी बाजीराव होणार ही कल्पनाही नानांना असह्य वाटणारी होती. ह्मणून आपल्या पश्चात् नांदती पेशवाई बाजीरावांच्या हातीं जाऊं नये ह्मणून पूर्व संकल्पानुसार **पेशव्यांच्या राज्याच्या राखेच्या पुंजीवर बाजीरावांनीं खुशाल राज्य करावें** अशी खबरदारी नानांनीं शेवटीं घेतली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पुणें शहर जाळण्याकरतां पूर्वीं नानांनीं पुण्यांतील सर्व वाड्यांत व घरांत जसा कडबा भरून ठेवला होता तसाच या वेळीं त्यांनीं पेशव्यांच्या सर्व राज्यांत कलहाचा कडबा भरून ठेवला होता व आपण मरतों अशी ज्या वेळीं नानांची खात्री झाली त्या वेळीं त्यांनीं तो कलह चेतविला व पेशवाईच्या राखेवर बाजीरावांना आपल्या संकल्पानुसार राज्य करण्याची मोकळीक देऊन ते दिवंगत झाले. ' नानाबरोबर पेशवाई बुडाली ' या ह्मणण्याचा खरा भावार्थ वरीलप्रमाणेंच जास्त संभवतो.

११. मनुष्याच्या पश्चात् त्यानें केलेल्या व्यवहाराची अगर त्याच्या कारभाराची माहिती मिळण्याचें साधन ह्मणजे त्याचें दप्तर हें होय. नानांनीं पेशवाईचा कारभार दीर्घकालपर्यंत केल्यामुळें पेशवाईचा पुढें कारभार चालविणाऱ्या इसमाला त्यांचें दप्तर बहुमोलाचें झालें असतें. असें असतां तें दप्तर नाश

---

1. अधिकारयोग पान १२५.

होणें ह्मणजे पेशवाईचा पुढील सर्व कारभार आंधळेपणाचा करून टाकण्यासारखें होतें. राघोपंत पेंडसे व भाऊ कापशे या नानांच्या दोन कारकुनांनीं नानांच्या मृत्यूनंतर त्यांचें सर्व दप्तर जाळून टाकलें व ते फरारी झाले हा इतिहास मागील प्रकरणांत आलाच आहे. नानांच्या कागद-पत्राचे रुमाल जाळून टाकण्यांत नानांच्या कारकुनांचे व त्यांच्या पक्षांतील लोकांचे स्वभावधर्म पुढें दिल्याप्रमाणें दिसून येतात. (१) नानांच्या बिलंदर मुत्सद्यांनीं नानांच्या बायकोच्या मांडीवर त्यांच्या पक्षांतील त्यांचा एक गोत्रज मुलगा दत्तक देऊन नानांचा अधिकार यथापूर्व चालविण्याचा ज्या वेळीं मनसुबा केला व तो हाणून पाडण्याकरतां शिंद्यांनीं नानांच्या पक्षांतील लोकांची ज्या वेळीं धरपकड सुरू केली त्या वेळीं हे नानांच्या कागदपत्रांचे रुमाल जाळण्यांत आले. जर नानांच्या पक्षांतील लोकांचा वरील मनसुबा साधला असता तर नानांचे हे गुप्त धनाचे, गुप्त कारभाराचे व गुप्त रहस्याचे कागदपत्रांचे रुमाल खात्रीनें जाळले गेले नसते. अर्थात् नानांच्या या कागदपत्रांचें अस्तित्व नानांचा पक्ष अधिकारारूढ असेपर्यंतच रहावयाचें होतें. बाजीरावांच्या हातीं ते कागदपत्र जाण्यांत नानांच्या पक्षाचा सर्वनाश होणार होता, इतके ते गुप्त स्वरूपाचे व नानांचीं कपट कारस्थानें चव्हाट्यावर आणणारे होते. त्यामुळें नानांच्या पक्षांतील मुत्सद्दी मंडळींचे प्राण वांचविण्याकरतां त्यांचे कागदपत्रांचे रुमाल जाळण्यांत आले हें स्पष्ट ठरतें. (२) नानांच्या पक्षांतील लोकांचा त्या कागदपत्रांत स्वार्थ दडून बसला होता ह्मणून त्यांनीं ते कागदपत्र जपून ठेविले होते. तो आपला स्वार्थ साधत नाहीं असें ज्या वेळीं त्यांना दिसलें त्या वेळीं ते त्यांजकडून जाळण्यांत आले. अर्थात् ते कागदपत्र ज्याच्या हातीं पडतील त्याचा फायदा होणार होता हें निश्चित होतें. (३) बाजीराव हे पेशवाईचे धनी असतां व त्यांच्या हातीं ते कागदपत्र पडणें योग्य असतां आपला स्वार्थ ज्या अर्थीं साधत नाहीं त्या अर्थीं त्याचा फायदा बाजीरावांस मिळूं द्यावयाचा नाहीं हें पक्के धोरण नानांच्या पक्षांतील लोकांचें होतें. यावरून नानांप्रमाणेंच त्यांच्या

पक्षांतील लोकांचीही पूर्ण स्वार्थाची दृष्टि होती. बाजीराव अगर पेशवाई यांचेबद्दल त्यांच्या मनांत तिळमात्रही सहानुभूति नव्हती हें स्पष्ट होतें. आपल्या बिंदुमात्र फायद्याकरतां पेशवाईचें हिमालयी नुकसान करण्याचें बाळकडू नानांनीं आपल्या पक्षांतील लोकांना कसें पाजलें होतें हें यावरून दिसून येतें.

१२. पेशव्यांच्या राज्यकारभाराची निरवानिरव कुलमुखत्यार म्हणून नानांनीं जी करावयाला पाहिजे होती ती त्यांनीं केली नाहीं. उलट आपल्या-मागें पेशवाई टिकूंच नये एवढी सर्व बाजूंनीं खबरदारी घेतली होती, हें वरील गोष्टीवरून दिसून येईल. नानांच्या राज्यकारभाराचा प्रश्न बाजूला ठेऊन त्यांनीं आपल्या स्वतःच्या घराकडे आपल्या मरणकाळीं किती दृष्टि पोंचविली होती हेंही येथें पहाणें जरूरीचें आहे. नानांच्या आप्तवर्गापैकीं अगदीं निकट संबंधाचे दोन जीव त्यांच्या मागें राहणारे होते. ते दोन जीव म्हणजे त्यांच्या लग्नाच्या नऊ बायकांपैकीं शिल्लक राहिलेल्या दोन बायका होत. एकीचें वय सुमारें १४।१५ वर्षांचें व धाकटीचें वय अवघें नऊ वर्षांचें होतें. या नानांच्या दोन स्त्रिया त्यांनीं म्हातारपणीं आपणाला सुख—समाधान लाभेल म्हणून हौसेनें केल्या होत्या. अर्थात् नानांचा त्या जीव कीं प्राण असणें स्वाभाविक होतें. परंतु नानांच्या स्वभावाचें कौतुक करण्यासारखी गोष्ट म्हणजे ते सुमारें एक महिना मृत्यूच्या दारांत पडले असतां त्यांनीं आपल्या या दोन स्त्रियांस शेवटपर्यंत भेटीकरतां बोलावून घेतलें नाहीं. नाना वृद्धापकाळामुळें व आजारा-मुळें अशक्त झाले होते व ते मृत्यूच्या दाढेंत सांपडले असल्यामुळें त्यांना स्त्रीसौख्याची त्या वेळीं जरूरी नव्हती ही गोष्ट जरी खरी होती, तरी ज्या नानांनीं आपलें शरीर अस्थिपंजर झालेल्या वार्धक्याच्या स्थितींत असतांही आठ आठ वर्षांच्या अर्भकावस्थेंतील पोरींचे गळे मुरगळून त्यांच्या भावी सुखाची राखरांगोळी केली, त्यांना आपल्या भेटीची जरूरी असली पाहिजे असें वाटण्याइतके नाना शहाणे होते खास. नानांना जर मानवी अंतःकरण असतें तर त्यांनीं आपल्या दोन्ही स्त्रियांस सिद्धटेंकाहून बोलावून घेतलें

असतें व त्यांच्या जीविताचें व शीलाचें रक्षण व्हावें म्हणून कांहीं तरी खास व्यवस्था केली असती. तशी व्यवस्था करण्याचें त्यांचे मनांत असतें तर त्यांनीं बाजीराव, अमृतराव, शिंदे वगैरे मंडळीकडून आपल्या जहागिरीच्या रक्षणाबद्दल व आपल्या स्त्रियांची अब्रू, मानमान्यता आणि दर्जा यांच्या परिपालनाबद्दल खात्रीनें हमी घेतली असती. माधवराव पेशव्यांच्या पत्नीला-खुद्द रमाबाईंना--माधवराव पेशवे कर्नाटकाच्या मोहिमेवर गेले असतां 'पति गांवीं गेले असतां स्त्रियांनीं मंचकावर निद्रा करूं नये, त्यांनीं तांबुल भक्षण करूं नये' असा पतिव्रताधर्माचा पाठ नानांनीं दिला होता. या वेळीं नाना आपल्या दोन स्त्रियांस आपल्याजवळ बोलावून घेऊन, आपल्या पश्चात् त्यांनीं कसें वागावें, सती जावें कीं जाऊं नये, विधवांचा आचार धर्म कसा असावा, पतिव्रता स्त्रियांचा पति हा देव कसा असतो, त्याच्याच मूर्तीची पूजाअर्चा करण्यानें जन्मोजन्मीं तोच पति कसा लाभतो व अंतीं मोक्षप्राप्ति कशी होते याचे पाठ नानांनीं आपल्या दोन्हीं स्त्रियांना खात्रीनें दिले असते. परंतु ज्याअर्थी नानांनीं तशी कोणतीच गोष्ट घडवून आणली नाहीं, त्याअर्थी 'आप मरे और दुनिया डूबे' याच ठाम विचाराचे नाना होते हें स्पष्ट ठरतें. नानांच्या या दोन बायकांपैकीं मोठी बायको ही नानांच्या मृत्यूनंतर पंधराच दिवसांनीं मरण पावली. याचें कारण नानांचें अंतःकरण मानवी नव्हतें, तें आसुरी होतें, या अनुभवसिद्ध गोष्टीच्या विचार-धक्क्यानें तिचें अंतःकरण दुभंगून जाऊन ती मरण पावली असावी, असें अनुमान काढल्यास तें खात्रीनें खोटें ठरणार नाहीं.

१३. नानांचें घराणें पेशव्यांच्या फडणिशीचें होतें. त्यांच्या घराण्यांत वाडवडिलांपासून फडणिशीचा सरंजाम व फडणिशीचा दरक चालत आला होता. असें असतां तो यथापूर्व आपल्या घराण्यांत चालून आपल्या घराण्याचा लौकिक आपल्या पश्चात् चालावा असें नानांनाही वाटावयास पाहिजे होतें. राघोबादादांचें ठळक उदाहरण त्यांच्या डोळ्यापुढें होतेंच. त्यांच्या वयाला पस्तीस वर्षें ओलांडून गेली. दुर्गाबाईनंतर आनंदीबाईला बरींच वर्षें संतती झाली नाहीं असें पहातांच त्यांनीं अमृतरावांना दत्तक घेतलें पुढें त्यांच्या

नशिबानें व अमृतरावांच्या पायगुणानें त्यांना औरससंतती झाली हा प्रश्न निराळा. परंतु त्यांनीं आपला वंशविस्तार व्हावा व पेशव्यांची परंपरा चालावी याचा योग्य वेळीं विचार केला होता ही महत्वाची गोष्ट आहे. नानांनीं नऊ लग्नें करून त्यांना हयात राहिलेली संतती नव्हती. यापुढेंही ती होण्याची आशा नव्हती. असें असतां त्यांनीं ज्याअर्थी दत्तक घेतला नाहीं त्याअर्थी आपला वंश आपल्या पश्चात् चालावा अशी नानांची इच्छा नव्हती असेंच अनुमान निघतें. नानांचा वंश पुढें चालविण्याची जबाबदारी नानांच्या स्त्रियांपेक्षां नानांवरच जास्त होती. नवऱ्याच्या अकल्पित मृत्यूमुळें, किंवा त्याला दत्तक घेण्यासारखा मुलगा त्या वेळीं न मिळाल्यामुळें अगर इतर कोणत्याही अपरिहार्य कारणामुळें नवऱ्याला दत्तक घेतां आला नाहीं व त्याची दत्तक घेण्याची इच्छा अतृप्तच राहून तो मेला तर त्याच्या विधवा स्त्रीला नवऱ्याची अतृप्त इच्छा तृप्त करण्याकरतां दत्तक घेण्याची आज्ञा धर्मशास्त्रानें दिली आहे. विधवा स्त्री ही मयत पतीची प्रतिनिधि असते; म्हणून तिला पतीच्या आज्ञेबाहेर कोणतेंच कृत्य करतां येत नाहीं. नानांनीं आपण स्वतः दत्तक घेतला नाहीं व दत्तक घेण्याबद्दल आपल्या स्त्रियांनाही ज्याअर्थी आज्ञा दिली नाहीं त्याअर्थी आपलें और्ध्वदैहिक सार्थक किंवा आपला वंशविस्तार व्हावा अशीही नानांची मनीषा नव्हती असें ठरतें.

१४. नानांच्या आजपर्यंतच्या कारस्थानकुशलतेच्या गोष्टी लक्षांत घेतां एका दगडानें अनंत फळें पाडण्याची त्यांची हातोटी होती असें दिसून येतें. त्यांच्या मनांत दत्तक घेऊन आपलें व आपल्या घराण्याचें नांव चालविण्याची अंशतः जरी इच्छा असती, तरी ती त्यांनीं एका क्षणांत अनंत चांगल्या गोष्टी साधून पार पाडली असती. नानांनीं आपला चुलतभाऊ मोरोबादादा यांचा सर्वनाश करून त्यांना कैदेंत ठेविलें होतें व त्यांच्या सरंजामाचा व दरकाचाही उपभोग ते ऐकटेच घेत आले होते. तेव्हां नानांच्या मिळकतींत मोरोबादादांच्याही मिळकतीचा हिस्सा नैतिक दृष्टीनें होताच. अशा स्थितींत मोरोबादादांशी आजपर्यंत केलेल्या अन्यायाच्या वागणुकीबद्दलचें अंशतः तरी परिमार्जन व्हावें म्हणून माधवराव पेशव्यांनीं राघोबादादांची मुक्तता केल्याप्रमाणें नानांनीं मोरोबादादांची मुक्तता करवून त्यांच्या हातीं आपला कारभार सोंपवून दिला

असता, व त्यांचा मुलगा, ज्याला सवाईनाना म्हणत, त्याला आपला पुत्र मानून त्यांनीं आपली व आपल्या घराण्याची कीर्ति कायम राखिली असती. परंतु ही शुभदायी अखेरीही ज्याअर्थी नानांनीं मरणकालीं साधली नाहीं त्याअर्थी ' आप मरे और दुनिया डुबे ' याच ठाम विचाराचे नाना होते हें स्पष्ट होतें.

१५. नानांनीं आपल्या शरीरसंरक्षणाकरितां आरबांची फौज ठेविली होती. त्यांच्याच संरक्षणछत्राखालीं बरेच दिवस नानांनीं काढले होते. हिंदु फौजेपेक्षां आरब फौजेचाच नानांना जास्त विश्वास वाटत होता. अशा रीतीनें नाना व आरब एकदिल असतां, नाना मरण पावल्याबरोबर आरबांनीं आपली तलफ फडशा केल्याशिवाय त्यांचें शव वाड्याबाहेर ज्याअर्थी जाऊं दिलें नाहीं त्याअर्थी नानांच्या पक्षांतील बिलंदर लोकांवर आरबांचाही विश्वास नव्हता असें ठरतें. दुसरी गोष्ट म्हणजे आरब हे वेतनी नोकर. जोंपर्यंत पैसा तोंपर्यंत नोकरी, ही त्यांची चाल नाना जाणून होते. असें असतां नानांनीं त्यांची तलफ वाढवून ठेवावयाची नव्हती. त्यांच्या घेतलेल्या नोकरीच्या वेतनाचा फडशा तरी करण्यापुरतीही निरवानिरव नानांनीं ज्याअर्थी केलेली नव्हती त्या अर्थी ' आप मरे और दुनिया डुबे ' हेंच नानांचें ब्रीदवाक्य होतें असें ठरतें.

१६. मरणकाल हा प्रत्येकाचा अखेरचा सिद्धिकाल असतो. त्या वेळीं अखेरची सिद्धि साधतां येण्यासारखी सर्व परिस्थिति असतां जो ती साधून घेणार नाहीं त्याचा पिंड व त्याचें अंतःकरण तशाच धर्माचें व तशाच स्वरूपाचें असतें हें निःसंशय ठरतें. नानांच्या ठिकाणीं असामान्य बुद्धिमत्ता होती ही गोष्ट त्रिवार सत्य आहे. त्यांची ती बुद्धिमत्ता लोककल्याण व राष्ट्रकार्य याला खर्ची पडली नाहीं हीही गोष्ट तितकीच सत्य आहे. तशी जर ती पडली असती तर आज भारतवर्षाच्या नकाशाचा जो रंग आपणाला दिसतो तसा तो खात्रीनें दिसला नसता. नानांच्या अंत्यविधीकरतां दशसहस्र लोक गोळा झाले होते एवढयाचवरून त्यांची लोकप्रियता सिद्ध होत नाहीं. हें महत्व त्यांच्या पेशवाईंतील कुलअखत्यारीच्या स्थानाचें तरी असलें पाहिजे किंवा घाशीरामासारख्या क्रूर व अत्याचारी लोकांचे नाना नायक होते म्हणून तरी असलें पाहिजे. घाशीरामाच्या अंत्यविधीच्या वेळीं एवढेच, किंबहुना याहीपेक्षां

जास्त लोक हजर होते. राष्ट्रपुरुषांची थोरवी लोककल्याणाच्या व राष्ट्रहिताच्या मापानें मोजावी लागते. तें माप नानांच्या चारित्र्यास लावलें असतां मापांत कांहींच भरत नाहीं. राष्ट्रपुरुषाचे अंगीं सदाचार, निर्व्यसनता, देशभक्ति, धर्माचरण, लोककल्याणेच्छा, निर्लोभता दूर दृष्टि, धैर्य, गांभीर्य, औदार्य, समाधान, सत्यान्वेषण वगैरे गुणधर्म असावे लागतात. त्याचप्रमाणें त्याच्या उलट दुराचार, आसुरी महत्वाकांक्षा, अमर्यादित लोभ, कलहप्रियता, अदूर दृष्टि, द्वेष, कपट, क्रूर वृत्ति, न्यायान्यायाची अगर सत्यासत्याची किंवा धर्माधर्माची चाड नसणें, भित्रेपणा, अनुदारत्व, चंचलत्व, असमाधान, पाताळयंत्रीपणा, विश्वासघातकीपणा, दांभिकत्व वगैरे वगैरे दुर्गुण कलिपुरुषाच्या अंगीं असतात. राष्ट्रपुरुष व कलिपुरुष या उभयतांचेही अंगीं कार्यक्षमता, बुद्धिप्रभाव, निरालसत्व, लोकाकर्षण वगैरे गुण स्वाभाविक असावे लागतात, किंबहुना कलिपुरुषाचे अंगीं विशेष प्रमाणांत असावे लागतात. एकंदरींत नाना फडनविसांच्या कारकीर्दीचें व स्वभावाचें सिंहालोकन केल्यास ते कलिपुरुषाच्याच सदराखालीं येतात हें निश्चित आहे. इतिहासप्रसिद्ध नाना फडनविस यांचें जीवन चरित्र पाहतां 'भरत खंडाचें दुर्दैव' ही एकच गोष्ट त्यांच्या बाबतींत समाधान मानावयास शिल्लक राहते, असें शेवटीं म्हटल्याशिवाय रहावत नाहीं.

नाना फडनविस यांची पत्रिका.

स्वस्तिश्री नृपशालिवाहन शके १६६३ दुर्मति नाम संवत्सरे उत्तरायणे शिशिरर्तौ माघे मासि कृष्णपक्षे चतुर्थ्यां जन्मतिथौ भृगुवासरे घ. ४३ प. ३० चित्रा नक्षत्रे घ. ६० प. ० तृतीयचरणे राक्षसगणे शूद्रवर्णे त्वष्टादैवत्य व्याघ्रयोनौ गंडयोग घ. १९ प. १४ वर्तमानवृद्धियोगे बालवकरणे शततारकामहानक्षत्रे कुंभस्थिते सूर्ये तूलास्थिते चंद्रे कुंभस्थिते भौमे कुंभस्थे बुधे कर्कस्थे गुरौ कुंभस्थिते शुक्रे वृषभास्थिते राहौ सिंहस्थिते शनौ वृश्चिकस्थिते केतौ एवं नवग्रहशुद्धौ सूर्यास्तात्द्गतौ गत घ.११ प. १० एवं समये तूलालग्ने शुक्रे गृहे चंद्रहोरायां शनिद्रेष्काणे गुरूनवमभागे शुक्र द्वादशांशे बुध त्रिंशांशे एवं षड्वर्गशुद्धौ षडंशे परषट्के सौजन्यान्वितौदार्यादिगुणसंपन्न राजश्री भानू इत्युपनाम्नां जनार्दनपंतेति व्यवहारिक नाम्नां

भार्योभयकुलानंददायिनी रखुमाबाईति व्यवहारिक नाम्नी प्रथमं सगुणं सुपुत्रमजीजनात्. तस्यावकहडा वक्रापदिष्ट नाम रामचंद्रेति व्यवहारिक नाम ....(तारीख १२ फेब्रुवारी सन १७४२ इसवी)

नानांच्या जन्मकालाचीं यवन जातक ग्रंथानुसार संवत्सरादिकांचीं फळें.

नाना फडनविस ज्या दुर्मति संवत्सरीं, रात्रीं, वद्य पक्षांत, चतुर्थी तिथीस, शुक्रवारीं, चित्रानक्षत्रीं, गंडयोगीं, तूळ लग्नीं, व्याघ्रयोनींत व राक्षसगणीं जन्म पावले त्याचीं खालीलप्रमाणें यवनाचार्य मतानुसार फळें दिलीं आहेत. त्यावरून सर्व साधारण स्थूल मानानें नानांच्या स्वभावाची रूपरेषा लक्षांत येईल.

१ दुर्मति संवत्सर—मूर्खः क्रूरमतिः कामी स्वकीयवचनप्रियः ।
अदाता धनलुब्धश्च दुर्मतिवत्सरोद्भवः ॥

अर्थ—मूर्ख, क्रूरबुद्धि, कामी, स्वकीयांचें बोलणें आवडणारा, दान न करणारा आणि लोभी असा दुर्मति संवत्सरीं जन्मणारा होतो.

२ रात्रीचा जन्म—मन्ददृग्बहुकामार्तः क्षयरोगी मलीमसः ।
क्रूरात्मा छिन्नपापश्च निशिजातो नरो भवेत् ॥

अर्थ—मंददृष्टि, अतिविषयी, क्षयरोगी, मळकट, क्रूरबुद्धि आणि गुप्तपणानें पाप करणारा असा रात्रीं जन्मणारा होतो.

३ वद्यपक्ष—अलसो मलिनो द्वेषी निन्दको बहुभाषकः ।
कृष्णपक्षे भवेन्मर्त्यः सर्वधर्मबहिष्कृतः ॥

अर्थ—आळशी, मळकट, द्वेषी, निंदा करणारा, बहुभाषणी आणि सर्व धर्माच्या लोकांकडून बहिष्कृत असा कृष्णपक्षीं जन्मणारा होतो.

४ तिथि—चतुर्थ्यांतु नरो जातो लुब्धः पिशुनवान् भवेत् ।
चण्डः साहसिकः शूरो बलवित्तः शठान्वितः ॥

अर्थ—लोभी, नीच (फसव्या), प्रचंड, साहसी, शूर, बलिष्ठ आणि अप्रामाणिक असा चतुर्थी तिथीस जन्मणारा होतो.

५ **वार**—प्रच्छिन्नकार्यः सुमतिर्जातः शुक्रस्य वासरे ।
सुधीः सदेशकालज्ञः कलाशास्त्रविशारदः ॥

अर्थ—दुसऱ्यास न समजतां कामें करणारा, बुद्धिवान् , देशकाल जाण-णारा, कलाशास्त्र यांत निष्णात असा शुक्रवारीं जन्मणारा होतो.

६ **नक्षत्र**—चित्रमाल्याम्बरधरः कामशास्त्रविशारदः ।
द्युतिमान् धनवान् भोगी पण्डितस्त्वाष्ट्रधिष्ण्यजः ॥

अर्थ—नाना प्रकारच्या पुष्पमाला व वस्त्रें धारण करणारा, काम-शास्त्र जाणणारा, तेजस्वी, धनवान, उपभोग घेणारा आणि पंडित असा चित्रा नक्षत्रीं जन्मणारा होतो.

७ **योग**—वाचालः सत्यहीनश्च क्लेशभाक्कलहप्रियः ।
सुस्थिरः सुभगो गण्डे नरो जातः समाहितः ॥

अर्थ—बहुभाषणी, खरें नसणारा, दुःखी, कलहप्रिय, स्थिरस्वभावी, आणि दैवशाली असा गंडयोगीं जन्मणारा होतो.

८ **लग्न**—तुलालग्नोदयेजातः शुद्धधीधर्मनायकः ।
प्रजावान् युक्तधर्मस्तु धनाढ्यो धनवर्जितः ॥

अर्थ—प्रामाणिक, धर्माध्यक्ष, प्रजावान, धर्मिष्ठ आणि कांहीं वेळ श्रीमंत व कांहीं वेळ दरिद्री असा तूळ लग्नीं जन्मणार होतो.

९ **योनी**—कृतान्तः सर्वभक्षी च विद्यावान्कुशलो भवेत् ।
व्याघ्रयोनौ नरो जातो दर्शनाद्भयदो महान् ॥

अर्थ—कृतांत, पाहिजे तें खाणारा, विद्यावंत, चतुर आणि दिस-ण्यांत भयंकर असा वाघयोनीस जन्मणार होतो.


१० **गण**—तामसः पापकृद्द्वेषी धर्मिष्ठः कलहप्रियः ।
निष्ठुरच्छिन्न पापश्च गणेस्याद्राक्षसे नरः ॥

अर्थ—तामसी, पापी, द्वेषी, धर्मिष्ठ, भांडण आवडणारा, निष्ठुर, आणि गुप्तपणानें पापें करणारा असा राक्षसगणावर जन्म-णारा होतो.


नानांच्या कुंडलीचें वर्णन.

[पुण्याचे सुप्रसिद्ध ज्योतिषी होराभूषण गणेश प्रभाकर दीक्षित यांनीं नाना फडनविसाच्या कुंडलीचें हें पुढीलप्रमाणें वर्णन सायन कुंडलीस अनुसरून केलें आहे.]


सायन भावचालित कुंडली.



नानांची इतिहासप्रसिद्ध निरयन कुंडली




नानांची सायन पद्धतीची नवमांश कुंडली.



ग्रंथोक्त नानांच्या कुंडलींत—तुला लग्न, चंद्र होरा, शनिद्रेष्काण, गुरु नवमांश, शुक्र द्वादशांश, बुध त्रिंशांश असे षड्वर्ग दिलेले आहेत. त्यावरून निरयन लग्न तुला राशींत १७ अंश ३० कला ते २० अंश ह्या अडीच अंशाचे आंत असलें पाहिजे. आज सूक्ष्म अयनांश २३–२.४७ केतकी पंचांगांतील आहेत. त्यांतून दर वर्षास ५०.२६ विकला अयनगति

नाना फडनवीस.



होराभूषण गणेश प्रभाकर दीक्षित-पुणे.



१९४३–१७४२=२०१ वर्षांची वजा जातां नानांच्या जन्मकालीं अयनांश २० कला १५ सुमारें येतात. निरयन लग्न तुला १७-३०+२०= वृश्चिक ७ अं. ३० कला सायन लग्न येतें. वरील कुंडलींत नानांच्या चरित्रावरून (रेक्टिफाय) शुद्ध करून ६ अं. ४८ कला धरिलें आहे व जीवनराव चिटणिसांचे ग्रहसाधन व सेफेरायलचे परिभ्रमण काल ह्यावरून सायन स्पष्ट ग्रह दिले आहेत. सूक्ष्म गणितानें सदर ग्रहांत एखाद्या अंशाचा फरक असूं शकेल परंतु त्यामुळें स्थानफल व दृष्टिफल, राशीफल ह्यांत अंतर पडणार नाहीं. पुढील वर्णन सायन कुंडलीस अनुसरून आहे.

नानांचा जन्म सायन वृश्चिक राशीचा ६ वा अंश क्षितिजावर उगवत असतांना झाला. विभागात्मक अनुराधा नक्षत्र होतें. ह्याचे गुणधर्मः—समृद्धि, विषयलंपटता, धनवान, सज्जन, लोकप्रसिद्ध, ईश्वरभक्त, प्रेमळ असे आहेत· **नाक्षत्रफल** पुस्तकांत हे पृष्ठ ४४ वर दिले आहेत. **सारावलींत** वृश्चिक लग्नाचें फलः— पूज्यो गणप्रधानो गणितज्ञः परयुवतिरतो धूर्तः ॥ गुरुसुहृदां द्रोहरतः परांगनाकर्षणानुरतः ॥ अर्थ—पूज्य, श्रेष्ठ, गणिती, परस्त्रीरत, धूर्त, गुरु व मित्र यांचा द्रोह करण्यांत गुंग झालेला व विवाहित परस्त्रीच्या आकर्षणानें तिच्याशीं रत होणारा असा असतो, असें म्हटलें आहे. ह्या लग्नाचा तिसरा कन्या नवमांश असतांना जन्म झाला त्याचें फलः—प्राज्ञो दृढांसबाहुः प्रयत्नवादी विशुद्धवाक्यस्यात् ॥ कानीनको वपुष्मान् गौरोरुचिराधरस्तुतीयेशे ॥ असें म्हटलें आहे. **अलनलिओ**— 'की टू युवर ओन नेटिव्हिटींत'—वृश्चिक लग्न असतां—You have much strength of will and although feelings, emotions and passions, you should have considerable executive ability. You are ambitious and masterful. असें वर्णन केलें आहे. **सेफेरायल** आपल्या मॅन्युअलमध्यें वृश्चिक राशीच्या पहिल्या द्रेष्काणींत जन्मास येणाऱ्याचें फल असें देतो—The nature is strong, forceful, energetic one. In strife the native is implacable and dauntless, scorning defeat and danger of reversal. The ambitions are

high. The spirit of conquest is strong. The native has faithful servants and is born in most cases to command. ६ व्या अंशाचें फलः–द्विधा वृत्ति, भावनाप्रधान, कधीं अध्यात्मप्रवण तर कधीं विषयोपभोगांकडे प्रवृत्ति असें अलनलिओ देतो. स्वसामर्थ्यानें प्रसिद्धीस येणारा असें वर्णन राफेल देतो. सारांश नानांच्या जन्मवेळीं क्षितिजावर उगवणाऱ्या वृश्चिक राशीचें फल त्यांच्यांत उतरलें आहे. हल्लींच्या वर्तमानकालीन महापुरुषांत महात्मा गांधी, चर्चिल, स्टॅलिन, गोअरिंग यांच्याही लग्नीं वृश्चिक राशीच उदित आहे. तेव्हां सायन पद्धतीनें पूर्व क्षितिजावर उगवणाऱ्या वृश्चिक राशीचा, अनुराधाविभागात्मक नक्षत्राचा, कन्या नवमांशाचा व ६ व्या अंशाचा परिणाम नानांच्या स्वभावांत होता असें ठरतें.

१. नानांची विषयासक्त वृत्ति व विलासी वृत्ति असण्याचें कारण लग्नेश मंगळ व सप्तमेश शुक्र यांची युति चतुर्थस्थानीं–सुखस्थानीं केंद्रीं झाली हे होय. त्याचाच हा परिणाम आहे. २ नानांचे ठिकाणीं मुत्सद्देगिरी व राजकारण-धुरंधरता असण्याचें कारण पंचमेश गुरु हा दशमस्थानी अगदीं स्व स्वस्तिकीं डोक्यावर विराजमान होता, हें आहे. आणि नानांचे ठिकाणीं कापट्यपूर्ण राजकारण व पाताळयंत्रीपणा असण्याचें कारण दशमस्थ म्हणजे राजस्थानस्थ शनी सिंह राशींत म्हणजे त्याच्या शत्रु राशींत असणें हें होय. ३ बुध नेपच्यून त्रिकोणांत असल्यामुळें नानांचा मंत्रतंत्र, जादुटोणा, जारणमारण वगैरेवर भरंवसा बसला. या प्रमाणें तीन मुख्य ग्रहयोग नानांच्या पत्रिकेंत सारभूत आहेत.

(१) नानांची विषयासक्तवृत्ति व विलासी वृत्ति असण्याचें कारण वर दर्शविल्याप्रमाणें शुक्र मंगळ युति हें होय. त्याचें फल पूर्वाचार्यांनीं पुढीलप्रमाणें दिलें आहे. ॥ पूज्यो गणप्रधानो गणितज्ञः परयुवतिभिरतो धूर्तः ॥ द्यूतान्द्दत-शाठ्यरतो विटश्च सितरुधिरसंयोगे ॥ ६२ ॥ अर्थः–पूज्य, वरिष्ठ, गणिती, परस्त्रीरत, धूर्त, जुगारी–खोटे व कपटी लोकांशीं समरस होणारा व जार (विवाहित परस्त्रीचा यार) असा शुक्र मंगळ युतीनें होतो. हीं सारीं लक्षणें नानांच्या सर्व आयुर्मर्यादेपर्यंत स्पष्ट दिसून येतात. नानांनीं नऊ लग्नें केली याला

कारण या शुक्र मंगळ युतींतील शुक्र हाच आहे. कुंडलींतील सातवें स्थान म्हणजे जायास्थान याचा स्वामी शुक्र हा नानांच्या जन्मकाळीं मंगळ या पापग्रहानें युक्त असून वक्रीस्थितींत मिथून या द्विस्वभाव नवमांशीं होता. त्याचें बृहत्पाराशरींत पुढीलप्रमाणें फल दिलें आहेः– ॥ कलत्रेशे बहुगुणे तुंगवक्रादि हेतुभिः । बहुभार्यांतरं विंद्यात् शत्रुनीचास्तगे पुमान् ॥ १५५ ॥ भौमयुक्ते च दृष्टे च भगचुंबनभाग् भवेत् ॥ १६३ ॥ नानांचा विवाह बालवयांत होण्याचें कारण बृहत्पाराशरींत पुढीलप्रमाणें दिलें आहेः– लग्नकेंद्रगते शुक्रे लग्नेशे मंदराशिगे ॥ वत्सरेकादशे प्राप्ते विवाहं लभते नरः ॥ १६४ ॥ सारांश नानांची नऊ लग्नें होणें, लवकर विवाह होणें, विषयासक्त वृत्ति असणें, सुखलोलुपतेचा धर्म अंगीं वास करणें हे सर्व खेळ सुखस्थानांत झालेल्या मंगळ शुक्र युतीचेच आहेत.

२. नानांच्या चतुर्थस्थानीं ह्मणजे सुखस्थानीं जशी शुक्रमंगळ युती आहे तशीच त्याच्या समोरील दशमस्थानीं ह्मणजे कर्तृत्वस्थानीं गुरुशनीची युती आहे. दशमस्थान हें पराक्रम, मानमान्यता, राजकारण वगैरे लक्षणांचें स्थान आहे. गुरुसारखा शक्तिमान ग्रह सिंह राशींत दशमस्थानीं पडला असून शनी हा सुखेश पराक्रमेश असा अधिकार घेऊन गुरुच्याच सान्निध्यांत पण सिंह या शत्रुराशींत पडला आहे. ही शनी गुरूची जोडी पालखीपदस्थमान, मुत्सद्देगिरी, पाताळयंत्रीपणा वगैरेस कारणीभूत झाली आहे. नवग्रहांतील महान शुभग्रह दोन आहेत. पैकीं दैत्यांचा गुरु रजोवृत्तिप्रधान जो शुक्र तो सुखकेंद्रीं पडला आहे, तर देवांचा गुरु सत्ववृत्तिप्रधान जो गुरु तो दशमस्थानीं पडला आहे. लग्नेश मंगळ सुखस्थानांत व सुखेश शनी राजस्थानांत आहेत. स्वभाव आणि प्राप्त परिस्थिति यांचे दर्शक मंगळ—शनी हे निसर्गतः शत्रु आहेत. ते नानांच्या जन्मकाळीं समोरासमोर प्रतियोगांत पडले असल्यामुळें आयुष्याचे शेवटीं शेवटीं अपमान, अपकीर्ति, कारागृहवास असें नानांना त्यांचें फल मिळालें. दशमस्थानांतील शनी हा प्रारंभीं भरभराट करतो, परंतु शेवटीं उच्च स्थानावरून

खालीं पाडतो. नेपोलियन, केसर यांच्या दशमस्थानीं शनीच होता. सुदैवानें नानांच्या जन्मकालीं शनीच्या जोडीला गुरु होता म्हणून ते शनीनें उत्पन्न केलेल्या अनिष्ट परिस्थितींतून सुटले. नानांचे तारक ग्रह सुखस्थानांतील शुक्र व कर्मस्थानांतील गुरु हे होत. दशमस्थानीं शनी असला तर त्याचें फल सेफेरायल पुढीलप्रमाणें देतो:- Rise in life followed by a down fall. Patience and firmness of purpose mark the life Dishonour and failure. In government defeat. दशमस्थानीं गुरु असेल तर हाच ग्रंथकार त्याचें फल पुढीलप्रमाणें देतो High honour, wealth and success, the native rise in his sphere of life and gains credit and emoluments. It is one of the best auguries of prosperous and happy life. याप्रमाणें गुरु व शनी या दोन ग्रहांचा खेळ किंवा परिणाम नानांच्या आयुष्यक्रमांत स्पष्ट दिसून येतो. प्रारंभीं गुरु–शनी या युतींत दशमस्थानीं मध्यबिंदूवर गुरु असल्यामुळें शनीच्या दुष्कर्मांचा अगर शुक्रमंगळ युतीच्या दोषांचा प्रभाव दिसूं शकला नाहीं. त्यामुळें अब्रू बचावली.

३. नाना नवकोट नारायण होते. त्याला त्यांची कोणती ग्रहस्थिति कारणीभूत झाली हें पुढील स्पष्टीकरणावरून दिसून येईल. लग्न वृश्चिक. धनस्थानीं धनुराशी. या धनुराशीचा स्वामी गुरु हा दशमस्थानीं केंद्रांत. धनेश जसा गुरु तसा पंचमेशही गुरुच. पंचमस्थान आकस्मिक लाभाचें असतें. पंचमस्थान दर्शक सिंहराशींत दशमस्थानीं सुरगुरूचें वास्तव्य असणें हेंच नवकोट नारायण होण्याचें कारण आहे. बृहत् पाराशरींत द्वादशभाव निरीक्षणांत पुढीलप्रमाणें फल दिलें आहे. ॥ धनेशो दशमे यस्य कामी मानीच पंडितः । बहुदारधनैर्युक्तः सुतहीनोऽपि जायते ॥ २९ ॥ अर्थ:–ज्याचा धनस्थानाधिपती दशमांत असतो, तो कामी, मानी, पंडीत, मोठा उदार, धनिक आणि निपुत्रिक असतो. पंचमेश गुरु दशमस्थानीं, दशमेश रवि पंचमस्थानीं, लाभेश बुध पंचमस्थानीं, चंद्राच्या एका दशांत

शनिगुरु (Part of fortune) धनसहम मिथुन २१ चंद्रापासून बरोबर भाग्यस्थानीं, शनीस बरोबर ११ वें, शुक्रमंगळास ५ असें धनसहम उत्तम पडल्यानें नानांकडे आपल्या पायानें लक्ष्मी चालून येत होती. धनप्राप्तीचा मुख्य कारकग्रह गुरु हा शनि या पापग्रहानें युक्त असल्यामुळें नानांकडे लक्ष्मीनें चालून येण्याचा मार्ग मात्र गूढ व कारस्थानाचा होता. नाना निपुत्रिक होते हेंही धनेश दशमांत असलेल्या गुरूचें फळ आहे.

४. नानांना पितृसुख १४ वर्षें व मातृसुख १९ वर्षें म्हणजे पानिपतच्या लढाईपर्यंत मिळालें. हें मातृपितृसुख जितकें मिळालें तद्दर्शक ग्रहस्थिति नानांच्या कुंडलींत स्पष्ट आहे. मातृस्थानेश शनि हा दशमस्थानीं, मंगळासमोर असून चंद्र व्ययस्थानीं आहे. चंद्राचा चतुर्थेश शनिच होतो व तो चंद्रावर ६० अंश पूर्ण अशुभदृष्टि (नवीन शोध व अनुभव व जुन्या पद्धतीप्रमाणें) करितो. शनि संबंधामुळें नानांची आई पानिपतच्या रणसंग्रामांत गिलच्यांच्या हातीं सांपडली. पितृस्थानेश रवि हा पितृस्थानाच्या अष्टमांत आहे. शनि—रवि, गुरु—रवि यांचें षडाष्टक आहे. त्यामुळें दोन्ही सुखें नानांना अल्प मिळालीं. चतुर्थस्थ मंगळ शुक्र व दशमस्थ शनि हेही त्याचा बोध बरोबर करतात. दिनवर्ष पद्धतीनें दशम भावारंभ सिंह ६ हा १९।२० वर्षांनीं सिंह २४।२५ मूळच्या मंगळासमोर येतो व चतुर्थ बिंदु मंगळावर येतो. वय १२।१३ ला पितृबिंदु मूळचा सिंह ६ हा शनीजवळ येतो. म्हणून मातृपितृ वियोगाला दशम—चतुर्थ (Progressive) वर्धमानक प्रतिक्रिया एक वर्ष अगोदर होते. सारांश गृहित चतुर्थ—दशम—भावारंभ व लग्नाचे उदित अंश मातृपितृसुखदर्शक कालमर्यादेवरून बरोबर ठरतात. नानांचें पहिलें लग्न दहाव्या वर्षीं झालें. याचें कारण वर्धमानक चंद्र हा मंगळ शुक्र जे अनुक्रमें लग्नेश व सप्तमेश त्यांच्याशीं युति करीत होते हें होय.

५. घोड्यावरून [1] पडण्याचा पहिला अपघात नानांना त्यांच्या वयाच्या १४ व्या वर्षीं झाला. चतुर्थस्थान अपघात उंचावरून पडणें वगैरे दर्श-

---

[1] नाना फडनविस यांची बखर पान ६.

विते. षष्ठस्थान जनावरांचें द्योतक आहे. तेथें मेष राशी आहे. त्याचा स्वामी मंगळ हा चतुर्थकेंद्रीं चतुर्थेस शनी समोर आहे. दरवर्षी एक एक अंश चतुर्थबिंदु सरकत सरकत शनीसमोर मंगळाजवळ आला त्या वेळीं हा अपघात झाला. घोडा हें युद्धाचें साधन, राशी धनु, स्वामी गुरु सिंह राशींतच वक्री, मंगळ युद्धकारक ग्रह तो शत्रुक्षेत्रीं याप्रमाणें कुयोग असल्यानें पानिपतच्या लढाईतून पलायन करण्याचा नानांवर प्रसंग आला. युद्धकारक ग्रह (war planet) मंगळ हा शत्रुक्षेत्रीं व सिंह राशी शनीनें युक्त असल्यामुळें नाना हे भित्रे व धूर्त असण्याचें लक्षण उत्पन्न झालें.

६. वयाच्या १५।१६[1] च्या सुमारास नानांस विषय सुखाची--स्त्री सुखाची प्रवृत्ति झाली. यास सबळ कारण ह्मणजे सुखस्थानीं शुक्र मंगळ युति हें होय. परिभ्रमण पद्धतीनें शुक्र हा दर आठ वर्षांनीं पूर्वस्थळीं येतो. नानांचा शुक्र जन्मकाळीं मंगळाजवळ होता. तो आठ वर्षांनी एकदां मंगळावर आला. त्या वेळीं नाना अगदींच लहान होते. पुन्हा सोळाव्या वर्षी हा शुक्र मंगळावर आला त्यामुळें विषयप्रवृत्तीस जोरानें चालना मिळाली. शुक्र हा स्वाभाविक वीर्याचा कारक असून तो नानांच्या कुंडलींत सप्तमेश आहे. ह्यामुळें व शुक्र मंगळ युति कोठेंही कमी अधिक प्रमाणांत विलासी वृत्ति उत्पन्न करते. नानांच्या कुंडलींत तर मंगळ लग्नेश आहे. शुक्र भार्येश—स्त्रीस्थानेश आहे. यांची युति जन्मकाळीं होती व पुन्हां १६ व्या वर्षी झाली. ह्मणून १६ व्या वर्षी प्रारंभ झाला. या मंगळ-शुक्रापैकीं मंगळ हा षष्ठेश—रोगस्थानेश असून लग्नेश आहे व तो शुक्र-क्षेत्रीं आहे. त्यामुळें वीर्यदोष, कुसंगतीनें दुष्ट रोग होणें व त्या रोगांचें विष शरीरांत टिकून राहणें हें शास्त्रदृष्ट्या उत्पत्तिसिद्ध आहे. (शुक्रं नेत्रं च वीर्यंच ' असें बृहत्पाराशरींत ह्मटलें आहे. शुक्र मंगळ युतीचा सारावली-कारांनीं दिलेला श्लोक वरील कलम (१) मध्यें उध्दृत केला आहे. तो

---

१ खरेकृत नाना फडनविसांचें चरित्र पान ९.

विचारांत घेतला असतां व्यभिचारयोग शुक्रमंगळ युतीनें होतो हें स्पष्ट दिसून येईल. हा व्यभिचारयोग नानांच्या कुंडलींत असूनही त्यांचीं नऊ लग्नें झालीं यासही कारण हाच शुक्रमंगळ योग आहे. शुक्र भार्येश आहे व तो मित्रक्षेत्रीं असून वक्री आहे. ।। कलत्रेशे बहुगुणे तुंगवक्रादिहेतुभिः ।। बहु भार्यांतरं विद्यात् ।। असें सारावलीकार म्हणतो. याकरितां नानांना विवाहित नऊ स्त्रियांचीं थोडीं फार सुखें व बाह्य परस्त्री सुख अशा दोन्हीं प्रकारचीं सुखें सुखस्थानांतील शुक्र मंगळ युतीमुळें लाभलीं. परंतु मंगळ शत्रुक्षेत्रीं—शनीसमोर असल्यानें त्यांना तृप्ति लाभली नाहीं. त्यामुळें अपमान व क्लेश त्यांना लाभले.

७. सप्तमस्थान भार्या-जाया-विवाहित पत्नी यांचें दर्शक असतें. त्या स्थानाचा स्वामी शुक्र हा जन्मकालीं वक्री होता. व रोगस्थानेश मंगळानें युक्त असल्यानें या विषय सेवनानें खुद्द नानांसही दुष्ट रोग झाले होते. शुक्राच्या वक्रित्वामुळें व मंगळाच्या सान्निध्यामुळें नानांच्या सहवासापासून त्यांच्या विवाहित स्त्रिया दुष्ट रोगानें पीडिल्या जाऊन मरत होत्या. ऋतुप्राप्ती [१] पूर्वींची संभोगेच्छा किंवा कुमारिकासहवास करण्याची आवड नानांना होती यासही शास्त्राचा आधार सांपडतो.।। प्राज्ञो दृढांसवाहुः प्रयत्नावादी विशुद्ध वाक्यस्यात् ।। **कानीनको** वपुष्मान् गौरोरुचिराधरस्तृतीयेशे ।।६५।। कन्या राशीशीं संबंध असणें; कन्या राशीचा स्वामी बुध हा पंचम या प्रेमसंबंधस्थानीं नीच राशींत असणें; नेपच्यूनच्या त्रिकोणांत असणें; आणि दशमस्थ शनि सिंह २१ आहे तो २० असल्यास कन्या नवमांशीं येतो व शुक्र हा मिथून या बुधाच्या कन्या स्वामीच्या नवमांशात असणें हे सर्व योग कुमारिका सहवासेच्छेस अनुकूल असेच आहेत. हे दूरान्वयानें जरी दिग्दर्शित होत असले तरी नानांच्या स्पष्ट ग्रहमानावरून कामी—विलासीवृत्तिदर्शकयोग पुष्कळ आहेत.

८. स्नेही—मित्र यांच्यासंबंधीचीं फलें पाश्चिमात्य पद्धतीनें एकादशस्थानावर पहातात. पौर्वात्य पंडीत चतुर्थस्थानावर पहातात. परंतु या दोन्ही स्थानांचे

---

१ ऐ. ले. सं. पत्र नं. ४०६५.

स्वामी दूषित आहेत. लाभेश बुध तर नीच स्थितींत पंचमस्थानीं--जादु-टोणा, मंत्रतंत्रदर्शक स्थानीं आहे, आणि चतुर्थेश शनि हा सिंह राशींत कर्मस्थानीं आहे; त्यामुळें स्वार्थी, ढोंगी अशा मित्रांचा राजकारणांत भरणा नानांच्या जवळ होता. बुधामुळें दुष्ट सल्लागारही होते व तेच मित्र नानांच्या बंदिवासास कारण झाले. नानांच्या मित्र वर्गांत दुष्टांचा जो भरणा झाला त्याला बुध-शनी या पापग्रहांचा संबंध हें कारण आहे.

९. नानांच्या पंचमस्थानांतील बुध व धर्मस्थानांतील नेपच्यून ह्यांच्या त्रिकोणामुळें त्यांचा ज्योतिषादि व मंत्रतंत्र, जादुटोणा, जपजाप्य ह्यावर भरंवसा होता. बुध नीच, नेपच्यून शत्रु क्षेत्रीं हा त्रिकोण जारण-मारण तंत्रमंत्रादि शकुनास कारण झाला. सूड घेण्याची बुद्धि लग्नेश मंगळ शत्रुक्षेत्रीं, कर्मस्थानी शनि सिंहराशींत व वृश्चिक या खुनशी राशीचें लग्न ह्या तीन योगांच्या एकीकरणामुळें नानांच्या मताविरुद्ध कोणी गेल्यास त्याचा ते नायनाट करीत असत किंवा तसा तो करण्याचे प्रयत्नांत नेहमीं रहात असत.

१०. दशमस्थान हें वर्ष १० वें, २२ वें, ३४ वें, ४६ वें, ५८ वें या वर्षांचा बोध करितें. नानांचा जन्म इ. स. १७४२ चा आहे. १७६४ मध्यें पेशवाईच्या राज्यकारभारांत नाना लक्ष घालूं लागले. दशमस्थ शनि गुरु व केंद्रत्रिकोणस्थ रवि यामुळें नाना २२ व्या वर्षी उदयाला आले. त्याच वेळीं चलित लग्न धनु झाले व गुरु लग्न स्वामी झाला. तो बंधनयोगापर्यंत होता. बंधनयोगाचे वेळीं चलित लग्न मकर, त्याचा स्वामी शनि हा अष्टमस्थानीं होता. म्हणून मित्रत्वांतून शत्रूंत जमा झालेल्या स्नेह्यामुळें नानांना बंदिवासाचा अल्पकाळ कां होईना अनुभव घ्यावा लागला. द्वादशस्थ चंद्रामुळें हा अल्पकाळ योग आला. या बंधनयोगाला प्रायः स्त्रियाही कारणीभूत झाल्या. द्वादशांतील चंद्र जसा स्त्रीसुखास तसाच तो स्त्रियांमुळें दुःखासही कारक असतो.

११. नानांच्या चरित्रांतील वैशिष्ट्य अलिकडील उपलब्ध कागदपत्रांच्या ऐतिहासिक संगतीवरून जें दिसून येतें तें त्यांच्या चरित्रांत ग्रहदृष्ट्याही स्पष्ट दिसतें. दशमस्थानीं असणारी सिंहराशी ही नानांचे धनी पेशवे यांचा स्पष्ट

बोध करते; आणि या राशीचा स्वामी रवि आणि नानांच्या दशमस्थानीं असलेला गुरु व शनि यांच्यामध्यें दिसून येणारा षडाष्टक योग हा जरी रविगुरु संबंधामुळें वरून मित्रस्वरूपाचा असला तरी व्यक्तीवर्चस्व (Dominating) दाखविणारा होता. याचा अर्थ पेशव्यांना केवळ नाममात्र ह्मणजे कुंकवाचे धनी करून सर्व सत्ता आपल्या हातीं ठेवण्याची प्रवृत्ति असणें असा आहे. वरिष्ठांना बाहुलें बनवून आपल्या हातीं सत्ता ठेवण्याची राक्षसी महत्वाकांक्षा दशमस्थ सिंह राशीला गुरु आणि त्याला गालबोट लावणारा शनि स्पष्ट दर्शवितो. नानांच्या दशमस्थ गुरूनें पेशवाईची अब्रू राखिली असें जरी गृहित धरिलें तरी ती स्वार्थमूलक होती हें लगेच दशमांतील शनि दर्शवितो. नानांचीं कारस्थानें प्रारंभीं जीं गोड आणि सुपरिणामीं होतील अशीं दिसलीं तीं शेवटीं अपयशकारक व राष्ट्रविघातक अशीं झालीं याला कारण गुरूशीं सहकार्य करणारा शनि हा आहे. दशमस्थ शनीचें फळ कांहीं संस्कृत ग्रंथांत मित्रा असें वर्णिलें आहे. आणि मंगळ हा क्षात्रियग्रह नानांच्या कुंडलींत याच शनीच्या क्षेत्रांत सुखस्थानीं शुक्रासहवर्तमान पडला आहे. याचा परिणाम क्षत्रिय वृत्तीचा अभाव आणि गुप्त कारस्थानांचा सुळसुळाट असा आहे. हें दृश्य नानांच्या चरित्रांत स्पष्ट दिसतें. कुंडलींतील द्वादशस्थान हें गुप्त कारस्थान दर्शवितें. गुप्त शत्रू, गुप्त कृत्यें, तुरुंगवास, औषधोपचार यांचा विचार याच स्थानावरून होतो. या स्थानीं तुला राशी आहे. तिचा स्वामी शुक्र तो लग्नेश मंगळासह सुखस्थानीं पडलेला आहे. आतां शिल्लक राहिलेला ग्रह चंद्र हाही द्वादश स्थानीं—व्ययस्थानीं—पडलेला आहे. सर्व ग्रहांत स्त्रीग्रह शुक्र व चंद्र हे दोनच आहेत. एक व्ययेश झाला आणि दुसरा व्ययांत पडला. चंद्र हा शनिदृष्ट झाला व शुक्र हा मंगळयुक्त झाला. यामुळें दोनीही स्त्रीग्रह क्रूरग्रहसंबंधित झाले. या कारणांमुळें नारायणराव पेशव्यांचा वध, राघोबादादांच्या मान, कीर्ति, सत्ता-मत्ता यांचा संहार, बारभाईचें कारस्थान, सदाशिवरावभाऊंस तोतया ठरविण्याचें कारस्थान, महादजी शिंदे व परशुरामभाऊ यांच्या वधाचीं कारस्थानें, महाडचें कारस्थान घाशीराम, कोतवाल

व बाजी मोरेश्वर यांच्या क्रूर कर्माशीं निगडित असलेला नानांचा संबंध वगैरे वगैरे विविध कारस्थानांत निरनिराळ्या दृष्टीनें स्त्रियांशीं नानांचा संबंध आलेला आहे. व्ययेश शुक्र आणि व्ययांतील चंद्र या दोन नाजुक आणि कोमल ग्रहांचा शनिमंगळासारख्या क्रूर–पापग्रहांशीं संबंध आल्यामुळें नानांच्या बहुतेक कारस्थानांच्या मुळाशीं स्त्रियांचा संबंध होता हें त्यांच्या चरित्रावरून स्पष्ट दिसून येतें, इतका तो शास्त्रशुद्ध आहे. 'गुरुसुहृदां द्रोहरतः' असें पूर्वींच वर्णन केल्याप्रमाणें गुरु आणि स्नेही यांच्याशींही आपल्या इष्ट महत्वाकांक्षेच्या पूर्ततेसाठीं वेळप्रसंगीं शत्रुत्व करून सूड उगवून घेण्याची बुद्धि, आपल्या इच्छेच्या व अधिकाराच्या आड येणाऱ्याला कापून काढण्याची तयारी, हे गुणधर्म चतुर्थेश–सुहृदेश शनि कर्मस्थानीं शत्रुक्षेत्रीं, गुरु धर्मेश, चंद्र व्ययस्थानीं, स्वामी दशमेश रवि गुरूशीं षडाष्टकांत या नानांच्या ग्रहयोगानें उत्पन्न झालेले आहेत. नाना ज्यांच्या पदरीं चाकर होते त्यांच्याशीं ह्मणजे, नारायणराव, राघोबादादा, सवाई-माधवराव, बाजीराव या त्यांच्या स्वामींशीं, सदाशिवरावभाऊ या त्यांच्या गुरूशीं व महादजी शिंदे, परशुरामभाऊ, सखारामबापू, मोरोबादादा, रामचंद्र नाईक परांजपे वगैरे वगैरे मित्रवत् थोर पुरुषांशीं घडून आलेले कटु प्रसंग नानांच्या चरित्रांत जे दिसून येतात त्याची साधार व स्पष्ट उपपत्ति वरीलप्रमाणें नानांच्या जन्मकालीन ग्रहस्थितींतून दिसून येते.

१२. पंचमस्थान संतति दाखवितें. त्याचा अधिपती गुरु आहे. तो सिंह या वंध्या राशींत आहे. रवि हा आत्मत्वाचा कारक ग्रह गुरूच्या षडाष्टकांत आहे. खुद्द पंचमस्थानीं बुध नीच राशींत वक्री आहे. चंद्राच्या पंचमांत कुंभ राशी आहे. ही वांझ राशी आहे. कारण ती शनीची रास आहे. या राशीचा स्वामी शनि हा सिंह या वंध्या राशींतच पडला आहे; आणि चंद्राचें पंचमस्थान मंगळशुक्रांनीं व्याप्त आहे. गुरूच्या पंचमांत केतु आहे. रवीच्या पंचमांत राहु आहे. पंचमस्थानाच्या पंचमांत नेपच्यून आहे. ह्मणजे खुद्द जन्मलग्नाचें पंचमस्थान तर शुद्ध नाहींच, परंतु चंद्र, रवि, गुरु यांचींही पंचमस्थानें अशुभ ग्रहांनीं व्याप्त आहेत. खुद्द लग्नेश

मंगळ हा तरी बलवान असावयास पाहिजे होता. पण तो कुंभ राशींत शत्रुक्षेत्रीं आणि त्याच्या पंचमांत राहु असा आहे. यावरून संततिद्योतक स्थान जें पांचवें, तें लग्न, चंद्र, गुरु, रवि व लग्नेश यांच्यापासून प्रत्येकांत कांहींना कांहीं अशुभ स्थिति आहे. यामुळें नानांच्या मागें त्यांची संतति राहूं शकली नाहीं; आणि त्यांच्या पंचमांत बुध आणि शनि सिंह राशींत यामुळें दत्तक घेऊन पिंड, पितृ, यज्ञ, तर्पण आणि और्ध्वदेहिक कार्यें करण्यास दत्तक घ्यावा अशी बुद्धि त्यांना अखेरपर्यंत शिवली देखील नाहीं. सामान्यतः ज्याच्या कुंडलींत शनिगुरूची युति किंवा एकराशी वास्तव्य, सान्निध्य असते तेथें तेथें संततीचा अभाव दिसून येतो; कारण गुरु या पुत्रकारक ग्रहास शनीच्या सान्निध्यामुळें साडेसातीच असते. या ग्रहयोगाचे लोक कारस्थानानें व कर्तृत्वानें कीर्तिरूप संतति आपल्यामागें ठेवितात. औरस संतति ठेवीत नाहींत. हीच स्थिति नानांच्या ग्रहयोगावरून स्पष्ट दिसतें. नानांची औरस संतति अगर खुद्द त्यांनीं घेतलेली दत्तक संतति असती तर तिनें नानांची इतिहासप्रसिद्ध बरी वाईट जी कीर्ति आहे ती ठेविली नसती. याचें कारण पंचमांत बुध हा नीच राशींत आहे. नानांना दत्तक घेण्याची इच्छा झाली नाहीं याचें कारण हेंच आहे. शनि गुरुसान्निध्य किंवा युति हीं मान, प्रतिष्ठा, संपत्ति भरपूर देतात, पण ज्या क्वचित् ठिकाणीं शनिगुरु एकत्रित असून इतर ग्रहांच्या शुभ दृष्टीमुळें संतति झाली असेल व ती टिकली असेल त्या ठिकाणीं संपत्ति नसते. पूर्ण दारिद्र्य असतें. नानांच्या कुंडलींत प्रारंभीं वर्णन केल्याप्रमाणें स्वतः शनि-गुरु तर सिंह या वांझ (अल्पप्रसव) राशींत आहेतच, शिवाय खुद्द पंचमस्थान आणि इतर कोणत्याही ग्रहांचा शुभदृष्टियोग बलवत्तर नाहीं. त्यामुळें नानांची कीर्तिकन्याच मागें राहिली हें शास्त्रदृष्ट्याच स्पष्ट होतें.

१३. नानांच्या पश्चात् त्यांच्या संपत्तीचीही जी वाताहात झाली त्याचें कारण, चतुर्थस्थान हें आयुष्याचा शेवट कसा होईल हें दर्शवितें म्हणून त्याच्या फलावरून दिसून येईल. या स्थानीं लग्नेश मंगळ शत्रुक्षेत्रीं,

शनीच्या पूर्ण अशुभदृष्टींत आहे. त्यामुळें नानांचा शेवट मोठा वाईट झाला. आणि मिळविलेली गजांत लक्ष्मी जशा पायानें व मार्गानें आली होती तशाच मार्गानें ती निघूनही गेली. अष्टम—मृत्युस्थानेश बुध हा पंचमस्थानीं नीच असल्यामुळें व मंगळ चतुर्थस्थानीं असल्यामुळें शनिमंगळ प्रतियोग झाला आणि शनिबुध षडाष्टक या सर्व योगामुळें नानांचा रात्रीं मृत्यु झाला. सकाळपर्यंत या महापुरुषाच्या शवास अंत्यसंस्कार घडूं शकला नाहीं. शरीररक्षक ह्मणून शेवटपर्यंत पोसलेल्या आरबांच्या फौजेचा पगार चुकता केल्याशिवाय नानांच्या शवाला अंत्यविधि करतां आला नाहीं, आणि याच चतुर्थस्थ मंगळामुळें मृत्यूच्या वेळींही त्यांच्या स्त्रिया अगर आप्तइष्ट जवळ राहूं शकले नाहींत. नानांच्या मृत्यूसमयां जे शनि मंगळ समोरासमोर होते, ते एकमेकांना कडकडून भेटले. याचा अर्थ असा कीं, दशमस्थानांतील शनि आपल्या गतीनें पुनः पूर्ववत् आपल्या स्थानीं येऊन बसला. आणि शेवटीं त्यानें आपल्या स्वभावधर्माप्रमाणें जो सूड उगवून घ्यावयाचा तो त्यानें उगवून घेतला. नानांच्या चारित्र्यांतील त्यांचीं कारस्थानें आज इतिहाससंशोधनकार जे उजेडांत आणूं पहातात त्याच्या बुडाशीं नानांच्या जन्मकालीं शनिमंगळ प्रतियोगाचेंच अधिष्ठान आहे हें होय. प्रारंभीं महत्वाला नेऊन अखेरीस कटु फळें चाखावयास लावणारे हेच शनिमंगळ होत. शनीनें निर्माण केलेलें कोणतेंही कारस्थान सामान्यतः उशीरानेंच बाहेर येत असतें. नानांच्या बाबतींत ऐतिहासिक सत्य पुढें येण्यास जो कालावधि गेला त्याचें कारण हाच शनि आहे.

१४. नानांचा धर्मेश, भाग्येश चंद्र हा जन्मकाळीं व्ययस्थानीं आहे व कारस्थानी ग्रह जो शनि तो चंद्रास अकरावा आहे. यामुळें नानांनीं केलेला व्यय, देवदेवतार्चन, घाट, धर्मशाळा, तलाव, देवालयें वगैरे जो धार्मिक स्वरूपाचा दिसतो तो शनीच्या अशुभ दृष्टींत असल्यामुळें वरचें स्वरूप जरी धार्मिक असलें तरी त्याच्या बुडाशीं हल्लींच्या मिशनरी सांप्रदायाप्रमाणें राजकीय कारस्थानच होतें. चंद्र हा लोकपक्षीय ग्रह व्ययांत

शनीच्या अशुभ दृष्टींत असल्यामुळें खरी लोकप्रीति किंवा निष्कलंक लोकसेवा नानांना कमावितां आली नाहीं. महाराष्ट्राच्या धनु राशीस चंद्र अकरावा, शनिगुरु पांचवे, मंगळशुक्र तिसरे, इतकी शुभ स्थिति असूनही व्ययांतील शनिदृष्ट चंद्रामुळें ती सार्थकीं लागली नाहीं. उलट नाशास कारण झाली. धनेश गुरू सिंह राशींत आणि लाभेश बुध नीच यामुळें द्रव्यसंपादनाचीं साधनें कशीं होतीं व द्रव्याचा विनियोग कशांत झाला हें दर्शवितात. स्वतःची मानप्रतिष्ठा, स्वसंरक्षण, प्रसंग आल्यास बरोबरीच्या मुत्सद्यांशीं किंवा वरिष्ठांशीं सामना देण्याच्या वगैरे कामीं ठिकठिकाणच्या पेढ्यांवर गुप्तपणें राखून ठेवलेला पैसा उपयोगांत आणावा लागला व त्याचप्रमाणें स्वतःच्या रक्षणाकरतां आरबांची खासगी फौज ठेवावी लागली. हा नानांच्या द्रव्याचा व्यय धनेश गुरु सिंहराशींत मानस्थानीं पडला याचा द्योतक आहे. धनाचा विनियोग धर्मेश चंद्र व्ययस्थानीं पडल्यानें जरी वरवर धार्मिक स्वरूपाचा दिसत असला, तरी धनेश गुरूचें सिंह राशींतील दशमस्थानामधील वास्तव्य या दानधर्माच्या बुडाशीं मान प्रतिष्ठादि गुणांचेंच व मुत्सद्देगिरीचेंच अधिष्ठान दर्शवितें. बृहत् पाराशरींत द्वादशभावनिरीक्षणांत असें म्हटलें आहे कीं, ॥ पुत्रराज्यापभ्रंशादि पुत्र स्थानान्निरीक्षयेत ॥ लाभेश बुध या वरील पंचमस्थान—गोष्टीदर्शक स्थानीं पडला आहे; व दशमस्थ शनिगुरूचा या बुधाशीं षडाष्टक योग झाल्यानें बुध म्हणजे बुद्धि, मृत्यु (अष्टमेश) कमाई (लाभेश) या तीनही दृष्टीनें नानांना अनुकूल फल मिळालें नाहीं. सारांश नानांचा पैसा व बुद्धि हीं दोन्हीं मुख्य साधनें राष्ट्रकार्य किंवा परोपकार यापैकीं कोणत्याही पुण्य कार्याला उपयोगीं पडलीं नाहींत व त्यांचा मृत्यूही शोचनीय स्थितींत झाला.

एकंदरींत नानांच्या कुंडलीचें सार (१) सुखस्थानांतील मंगळशुक्रयुति (२) दशमस्थ शनिगुरु यांची जोडगोळी आणि (३) बुध नेपथ्यून त्रिकोणांत यांत आहे.

प्रकरण ४२ वें.

खून कीं आत्महत्या ?

१ मागील १ ते ४१ प्रकरणांपर्यंत दिलेला इतिहास कां व कशाकरितां आहे. —२ नारायणराव पेशवे यांच्या आत्महत्येसंबंधींचे पांच मुद्दे —३ मुद्दा नं १ यावरील विवेचनास सुरवात. " डोळ्यांस जें दिसतें तसेंच तें नेहमीं असलें पाहिजे " असा सिद्धांत नाहीं. याविषयींचें स्पष्टीकरण. श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं रेड्याकडून वेद बोलविले याचा शास्त्रीय दृष्टीनें उलगडा. —४ नारायणरावांचा कोथळा बाहेर आला होता तो कोणत्या शस्त्राच्या वारानें येणें शक्य होतें. तेगा हें शस्त्र कसें असतें यासंबंधींची माहिती —५ तेग्याचे वीस प्रकारचे वार असतात. ते कोठें व कसे करतां येतात याची माहिती.—६ सुमेरसिंगानें नारायणरावांवर जे वार केले ते सर्व त्यांच्या पाठीवर केले होते. तेग्याचे वार किती जबरदस्त असतात व त्याचा परिणाम काय होतो याचें स्पष्टीकरण. —७ नारायणरावांच्या कोथळ्यांतून साखरभात बाहेर पडला अशी जी माहिती आहे ती तेग्याच्या वारानें खरी ठरूं शकते कीं काय यासंबंधींची चर्चा. —८ शरीरांतील कोथळ्याची रचना. कोथळा बाहेर पडण्याचे संभाव्य प्रकार.—९ कोथळ्याच्या रचनेस सायकलच्या टायर व ट्यूबची उपमा. कोथळा बाहेर येण्याची क्रिया कशी होते ? तेग्याच्या वारानें कोथळा कसा बाहेर येऊं शकत नाहीं याचें स्पष्टीकरण.—१० नारायणरावांचा कोथळा व त्यांतील साखरभात बाहेर आला होता यासंबंधींची संभाव्य घटना कशी असली पाहिजे. राघोबादादा बिनोट विद्येनें सशस्त्र नारायणरावांचा वार चुकवून त्यांच्या पाठीवर कसे आले व त्यांनीं नारायणरावांना आपल्या मगरमिठींत कसें पकडलें या संबंधींची संभाव्य झटापट कशी होती — ११ बिनोटविद्या म्हणजे काय ? शस्त्रविद्या, मल्लविद्या व मर्मविद्या यासंबंधींची माहिती. मर्में किती व त्यांचीं स्थानें व लक्षणें कोणतीं. राघोबादादा अव्वल दर्जाचे बिनोटी कां होते —१२ नारायणरावांच्या हातांतील शस्त्र गळून पडण्याकरितां कूर्चशिरस नामक मर्म-

स्थानावर आघात करणें राघोबादादांना कां प्राप्त होतें? —१३ नारायण-रावांपुढें जगावें कीं मरावें, हा प्रश्न उभा राहतो. 'हातचा निमचा' हें शस्त्र कसें असतें. नारायणरावांनीं हातच्या निमचानें आपल्या शरीरावर जो वार करून घेतला तो कोठें व कसा झाला व त्याची चीर कोठपर्यंत लांब जाऊं शकली यासंबंधींचें स्पष्टीकरण. १४. हातच्या निमचाच्या वारानें नारायण-रावांचा कोथळा व साखरभात बाहेर आला याला मूलभूत परिस्थिति कशी घडून आली असली पाहिजे याचें दिग्दर्शन. मुद्दा नं १ वरील निर्णय.—१५ राघोबादादांना डोक्यावर एक व डावे हातावर एक असे जे दोन वार निसटते झाले त्यासंबंधींची उपपत्ति कशी असली पाहिजे याचें स्पष्टीकरण.—१६ मागील तेराव्या प्रकरणांतील पत्र नंबर तीन यांतील थोडीशीच असलेली खरी माहिती पुष्कळ गोष्टीवर प्रकाश पाडणारी आहे.—१७ राघोबादादांच्या गोंधळून गेलेल्या मनस्थितीचें विवेचन. —१८ राघोबादादांना जे दोन वार लागले ते सुमेर-सिंगाच्या हत्यारानें झालेले नाहींत याचें स्पष्टीकरण. —१९ दुसऱ्या संभाव्य शंकांचें निराकरण.—२० राघोबादादांना जे दोन निसटते वार लागले व जे प्राप्त परिस्थितीस व शस्त्रशास्त्रसंमत होतील अशी एकच संभाव्य घटना कोणती होती याचें स्पष्टीकरण. मुद्दा नं. २ वरील निर्णय. —२१ नारायणरावांच्या मूर्ख स्वभावाचीं लक्षणें व तीं तशीं बनण्याचीं कारणें. —२२ नारायणराव अधि-कारमदानें बेफाम कां बनले होते व त्याला नानांची शिकवणूक कशी कारणीभूत होती याचें विवेचन. —२३. नारायणराव राघोबादादांचा वध करण्याकरतां कां प्रवृत्त झाले व तशी त्यांची बेफाम मनोवृत्ति होण्याची कोणतीं कारणें होतीं याचें दिग्दर्शन. —२४ नारायणरावांनीं आत्महत्या करून घेण्याचा निर्णय कां घेतला? —२५ आनुवंशिक संबंधाच्या दृष्टीनें नारायणराव आत्महत्येलाच कां प्रवृत्त झाले याचें स्पष्टीकरण.—२६ नारायणरावांच्या आत्महत्येच्या प्रेरणेला संधि व साधन कसें मिळालें. मुद्दा नं. ३ वरील निर्णय. —२७ नारा-यणरावांच्या आत्महत्येसंबंधीं राघोबादादादि मंडळी अज्ञानांत कां राहिली अशी शंका —२८ राघोबादादादि मंडळींना नारायणरावांचा आत्महत्येचा प्रयत्न

कसा अज्ञानांत ठेवणारा होता याचीं कारणें. मुद्दा नं. ४ वरील निर्णय. —२९. नारायणराव पेशवे यांचा खून की आत्महत्या या मुद्याचें स्पष्टीकरण. —३०. मनुष्याच्या स्तनमंडळापासून नाभीपर्यंत शरीराची कशी रचना असतें याचें शास्त्रीय विवेचन. —३१ स्तनमंडळापासून खाली नाभीपर्यंत जी शरीराची रचना आहे त्यांत तावडतोब प्राणहरण करणारी आमाशयमर्म व नाभीमर्म अशीं दोन मर्में आहेत. तीं मर्में दुखावल्यामुळें नारायणरावांनीं आत्महत्या करून घेतली असें शास्त्रदृष्ट्या ठरतें. मुद्दा नं. ५ वरील निर्णय. —३२ उपसंहाराची आवश्यकता.

१. मागील एकेचाळीस प्रकरणांत इ. स. १७४० पासून इ. स. १८०० पर्यंतचा पेशवाईशीं संबंध असलेला बहुतेक इतिहास आलेला आहे. या इतिहासांत नारायणराव पेशवे यांच्या मृत्यूच्या वेळीं जी जी थोर मंडळी हयात होती व त्यांच्या मृत्यूच्या कारणांशीं ज्या थोर व्यक्तींचा संबंध येत होता त्या सर्वांची हकीकत आलेली आहे. आजपर्यंतच्या इतिहासकारांनीं नारायणराव पेशव्यांच्या मृत्यूच्या कारणांशीं राघोबादादा, आनंदीबाई, सखाराम-बापू, हरिपंत फडके, सुमेरसिंग, खरगसिंग, महमद इसफ, तुळ्या पवार, परभु मंडळी, नागपूरकर भोंसल्यांची मुत्सद्दी मंडळी, हैदराकडील मंडळी, नाना फडनविस वगैरे वगैरे मंडळींचा कमीजास्त प्रमाणांत संबंध जोडलेला आहे. तेव्हां ही सर्व मंडळी नारायणरावांच्या मृत्यूनंतर व नाना फडनविसांच्या मृत्यूच्या अगोदर स्वर्गवासी झाली असल्यामुळें चुकूनही कोणाचा इतिहास बाहेर येण्याचा शिल्लक राहिलेला नाहीं. त्या इतिहासावरून पहातां नारायण-रावांना धरण्याचा जो कट करण्यांत आला, तो पेशव्यांच्या राज्याच्या सुव्यवस्थेकरतां होता यांत संशय नाहीं. नारायणरावांना धरण्याचें 'राजकारण फार दिवस घाटत होतें. त्यांत मोठमोठे लोक होते असे आतां उद्गार निघतात. ज्यांनीं राजकारणें केलीं होतीं त्यांचे मानस (नारायणरावांस) कैद करावें असें होतें. परंतु करावयास गेले एक आणि झालें एक. ईश्वराच्या चित्तास आलें तसें झालें.' हा मजकूर नारायणराव मरण पावल्यानंतर चवथ्याच दिवशीं नानांच्या सांगण्याप्रमाणें लिहिलेल्या पत्रांत आहे. यावरून

पहातां नारायणरावांना धरण्याचा मनसुबा बरेच दिवस चालला होता व त्यांत जे मुत्सद्दी व जे सरदार होते त्यांना नारायणरावांना धरल्याखेरीज पेशव्यांच्या राज्याची बरोबर घडी बसत नाही असें वाटल्यामुळें त्यांनीं तो निर्णय घेतलेला होता. नारायणरावांना मारण्याचा त्या मनसुब्यांतील कोणत्याही थोर व्यक्तीचा हेतु नव्हता हें स्पष्ट आहे. असें असतां धरण्याच्या कटांत सामील असलेल्या थोर व्यक्तींखेरीज दुसऱ्या थोर व्यक्तीकडून नारायणरावांना मारण्याचा जो कट आयत्यावेळीं करण्यांत आला व जो त्याप्रमाणें पार पडला गेला तो कट नानांनींच केला होता आणि असे पाताळयंत्री अद्भुत कट निर्माण करून ते यशस्वी रीतीनें पार पाडून नेण्याला नाना हे एकटेच पुरुष त्या वेळीं कसे समर्थ होते हें त्यांच्या मरणकालपर्यंतच्या कारस्थानांवरून उघड होतें. नानांच्या मरणकालपर्यंतचा इतिहास मागील प्रकरणांतून देणें याचकरतां भाग पडलें. तो इतिहास डोळ्यांपुढें ठेविल्यानंतर नारायणरावांना मारण्याचा कट नानांनीं गुप्त प्रकारें केला किंवा नाहीं याची शंकाही येण्याचें कारण राहणार नाहीं. केलेले खून पचविण्याकरतां जे बनावट पुरावे तयार करावे लागतात ते वेळोंवेळीं नानांनीं कसे तयार केले हा मागील त्यांचा इतिहास चिकित्सक बुद्धीनें अभ्यासिल्यानंतर '**ध**' चा '**मा**' कोणी केला याचीहि शंका राहण्याचें कारण उरत नाहीं. आजपर्यंतच्या इतिहासांतून नारायणरावांचा खून झाला व तो राघोबादादा व आनंदीबाई यांनीं करविला असा जो आरोप त्यांच्यावर लादण्यांत येत होता तो किती अन्यायाचा होता हें मागील सर्व इतिहासावरून स्पष्ट झालेलें आहे. नारायणरावांच्या वधाला नाना हे एकटेच कारणीभूत आहेत व त्यांनीं स्वतःच्या हिंमतीवर गुप्त कट करून नारायणरावांच्या वधासंबंधींचीं सर्व कारस्थानें घडवून आणल्यामुळें ते एकटेच कसे दोषी व गुन्हेगार आहेत हेंही मागील इतिहासावरून स्पष्ट झालेलें आहे.

२. या ग्रंथांतील प्रतिपाद्य विषय 'नारायणराव पेशवे यांचा खून कीं आत्महत्या' हा असून त्याचा विचार या प्रकरणांत व्हावयाचा आहे. त्याकरतां खालील मुद्दे विचारांत घेणें प्राप्त आहे. मुद्दा नं. १: नारायणरावांचा कोथळा जो

बाहेर आला होता तो कोणत्या परिस्थितीमुळें व कोणत्या शस्त्राच्या वारामुळें बाहेर येणें शक्य होतें? मुद्दा नं. २: राघोबादादांना डोक्यावर एक व डाव्या हातावर एक असे दोन वार जे निसटते झाले ते कोणत्या परिस्थितींत व कोणकोणत्या हत्यारांनींच होणें शक्य होतें? मुद्दा नं. ३: आत्महत्या करून घेऊनच मरावें अशी त्या प्रसंगीं नारायणरावांना प्रेरणा होणें व तसें करण्यास त्यांस संधि आणि साधन मिळणें शक्य होतें काय? मुद्दा नं. ४: नारायणरावांच्या आत्महत्येसंबंधीं ऐतिहासिक उघड पुरावा कां नाहीं? मुद्दा नं. ५: नारायणराव पेशव्यांच्या मरणाचें खरें कारण कोणतें? 'खून कीं आत्महत्या? याप्रमाणें पांच मुद्दे 'नारायणराव पेशवे यांचा खून कीं आत्महत्या' हें ठरविण्यास पुरेसे आहेत. वरील पांच मुद्दे पहातां ते सर्वच आत्महत्येविषयीं असलेले दिसून येतात. त्यांत नारायणरावांच्या खुनासंबंधींचा एकही मुद्दा काढण्यांत आलेला नाहीं. याचें कारण असें आहे कीं, आजपर्यंतच्या इतिहासांत नारायणराव यांचा खून झाला असेंच प्रतिपादिलेलें आहे. तेव्हां वरील पांच मुद्यांचा सांगोपांग विचार होऊन आत्महत्या ठरल्यास ठीकच आहे, नाहीं तर उलटपक्षीं तो खूनच निश्चयपूर्वक ठरला जातो. याकरतां खुनासंबंधीं याशिवाय निराळे मुद्दे विचारांत घेण्याचें कारण उरत नाहीं.

३. पहिला मुद्दा 'नारायणरावांचा कोथळा जो बाहेर आला होता तो कोणत्या परिस्थितीमुळें व कोणत्या शस्त्राच्या वारामुळें बाहेर येणें शक्य होतें?' असा आहे. मागील तेराव्या प्रकरणांत नारायणरावांच्या वधासंबंधीं निरनिराळ्या बखरींचे जे उतारे देण्यांत आले आहेत त्यावरून पहातां 'नारायणरावांचा कोथळा फुटून बाहेर आला होता व त्यांतून साखरभातही निघाला होता' ही एक महत्वाच्या मुद्याची हकीकत दिसून येते. बखरी, पत्रें वगैरेमधून जी माहिती देण्यांत आली आहे त्याची गोळाबेरीज केली असतां पुढील कांहीं मुद्यांच्या गोष्टींमध्यें सर्वांची एकवाक्यता आहे. नारायणरावांनीं राघोबादादांच्या राहण्याच्या जागीं येऊन त्यांच्या

गळ्याला मिठी मारली; राघोबादादांना डोक्यावर व डाव्या हातावर निसटते वार झाले; राघोबादादांच्या गळ्याला नारायणरावांनीं मिठी मारली असतां तुळ्या पवारानें त्यांचे पाय ओढून त्यांना खालीं पाडलें व नंतर सुमेरसिंगानें त्यांच्यावर हत्यार चालविलें, नारायणरावांचा कोथळा बाहेर पडला, वगैरे, वगैरे, गोष्टी एकवाक्यतेच्या आहेत. त्यांच्या तपशिलांत जरी थोडे फरक असले, तरी मुख्य गोष्टींतील भावार्थ एकच आहे. तपशिलांत जो फरक दिसून येतो तो त्या वेळेच्या वृत्तनिवेदकाच्या बुद्धीच्या कल्पनेप्रमाणें झालेला असून त्या वेळीं पत्रव्यवहार करणारे लेखक किंवा त्या अनुरोधानें प्रत्यक्ष घडलेली म्हणून हकीकत देणारे पुढील बखरीकार व इतिहासकार यांच्याही निरनिराळ्या कल्पनेप्रमाणें असूं शकेल. मुख्य गोष्टींत एकवाक्यता पण तपशिलांत मात्र कसा कसा फरक पडत जातो याची कल्पना द्यावयाची झाल्यास श्रीज्ञानेश्वरांच्या वेळेचीच सर्वश्रुत अशी गोष्ट नजरेपुढें आणावी लागेल. ज्ञानेश्वरांनीं रेड्याकडून वेद बोलविले हें आमच्या पूर्वजांनीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलें व कानांनीं ऐकिलें असा इतिहास आहे. या बाबतींत वाडवडिलांवर अंधःश्रद्धेनें जे विश्वास ठेवणारे आहेत ते ज्ञानेश्वरांनीं एक दैविक चमत्कार दाखविला एवढ्यावरच समाधान मानून राहिलेले आहेत. जे लोक गतानुगतिकतेला अंधःश्रद्धेनें कवटाळून बसलेले नाहींत व जे सृष्टिनिर्मितशास्त्र पूर्णपणें जाणतात त्यांच्या मनाला 'ज्ञानेश्वरांनीं रेड्याकडून वेद बोलविले' ही गोष्ट पटत नाहीं. रेड्याला विशिष्ट ज्ञानसंग्रह करण्याचें किंवा बोलण्याचें अशीं दोन्हींही इंद्रियें नाहींत असें सृष्टिनिर्मितीशास्त्र सांगतें. शास्त्र हें त्रिकालाबाधित आहे. असें असतांही आपल्या पौर्वात्य शास्त्रज्ञांचा विश्वास शास्त्राएवढाच पूर्वीच्या आपल्या वाडवडिलांच्या शब्दावर आहे. अशा स्थितींत 'ज्ञानेश्वरांनीं रेड्याकडून वेद बोलविले' याचा अर्थ पौर्वात्य शास्त्रज्ञ शास्त्र व सत्यभाषणी वाडवडील या उभयतांनाही कमीपणा न देतां असा करतात कीं, 'रेड्याकडून वेद बोलविले' म्हणजे 'रेड्याप्रमाणें मठ्ठ बुद्धीच्या मनुष्याकडून वेद बोलविले' किंवा 'रेडे या उपनांवाच्या मनुष्याकडून' वेद बोलविले.

परंतु पौर्वात्य शास्त्रयांचीही पळवाट पाश्चिमात्य शास्त्रयांना पटत नाहीं. ज्या चमत्कृतीमुळें, हिंदुस्थानांतील सर्व श्रेष्ठ पंडित व शास्त्री यांचा तीव्रतर असा धार्मिक विरोधी लढा एकदम थंड पडला, ती चमत्कृति 'रेड्याप्रमाणें मठ्ठ बुद्धीच्या मनुष्याकडून वेद बोलविले किंवा रेडे या उपनांवाच्या मनुष्याकडून वेद बोलविले, अशा काल्पनिक विधानांनीं खरी वाटूं शकत नाहीं. त्यामुळें पाश्चिमात्य पंडित 'ज्ञानेश्वरांनीं रेड्याकडून वेद बोलविले' हा इतिहास खोटा असून हास्यास्पद आहे असें मानतात. अशा स्थितींत खरें कोणतें व खोटें कोणतें, याची निवड करणें फार अवघड असतें. ह्मणून ऐतिहासिक सत्य घ्यावयाचें असल्यास तें एकाच शास्त्राच्या कसोटीवर घांसून त्याचा निर्णय देणें धोक्याचें व अज्ञानाचें ठरतें. त्याकरतां अन्य शास्त्रांचाही पडताळा घ्यावा लागतो. आपल्या डोळ्यांना जें दिसतें तें नेहमींच तसें असलें पाहिजे असा सिद्धांत नाहीं. एकाद्याच्या डोळ्याला पिशाच्च,सर्प, नदी अगर तलाव दिसला तर तीं दृश्यें तशींच असलीं पाहिजेत असा सिद्धांत नाहीं. अनुभवांतीं तीं कदाचित् खोटींही ठरूं शकतील. पिशाच्चाच्या ऐवजीं कशाची तरी पडलेली छायाकृति असूं शकेल. सर्पाऐवजीं दोरी असूं शकेल किंवा नदी आणि तलाव यांच्याऐवजीं मृगजळही असूं शकेल. भावर्थ एवढाच कीं, डोळ्याला जसें दिसतें तसेंच तें नेहमीं असलें पाहिजे असा सिद्धांत नाहीं. त्याचप्रमाणें कानांना जें ऐकूं येतें तसेंच तें नेहमीं असलें पाहिजे असाही सिद्धांत नाहीं. कर्णदोषामुळें एक सांगितलें असतां भलतेंच ऐकूं येतें. कांहीं प्रसंगीं कांहीं विवक्षित लोकांच्या विशिष्ट मानसिक स्थितींत त्यांच्या कानाला कांहीं शब्द अगर वाक्यें ऐकूं येतात. खरें पाहूं गेलें तर तेथें कोणीच असत नाहीं. अशा स्थितींत भ्रम झाला असें मानण्यात येतें. यावरून कानाला शब्द ऐकूं आले ह्मणून ते खरोखरीच मनुष्यानें उच्चारलेले शब्द असले पाहिजेत असा सिद्धांत होऊं शकत नाहीं. सिद्धांताच्या मागें कांहीं अपवादही असूं शकतात. रेडा वेद ह्मणूं शकत नाहीं असा जरी सिद्धांत असला तरी तो

एकाद्या विशिष्ट प्रसंगीं लोकांना रेडा वेद ह्मणत असलेला दिसणें अगर ऐकूं येणें या क्रियेला तो सिद्धांत बाधक होऊं शकत नाहीं. रेड्यानें वेद ह्मणणें या विषयींचा सिद्धांत निराळा व लोकांना तसें दिसणें अगर ऐकूं येणें या विषयींचा सिद्धांत निराळा. प्रत्यक्ष क्रिया होत नसतांना लोकांच्या नजरेला ती दिसणें अगर त्यांना ती ऐकूं जाणें ही एक स्वतंत्र विद्या आहे. त्याला भानुमती विद्या अथवा नजरबंदीची विद्या असें ह्मणतात. ही विद्या सर्वांनाच साध्य होत नाहीं. क्वचित् माणसांना ही विद्या साध्य होते. या विद्येच्या चमत्कारावर जे पैसे मिळवितात, त्यांना गारुडी ह्मणतात. या विद्येचा उपयोग जे केवळ परोपकारार्थ करतात त्यांना साधु, संत किंवा महंत ह्मणतात. श्रीज्ञानेश्वर महाराज हे साधु, संत किंवा महंत या कोटींतले होते. त्यांना भानुमती विद्या अवगत होती व त्या विद्येच्या बळावर त्यांनीं पैठणच्या विद्वान ब्रह्मवृंदांना वरील चमत्कृति दाखवून आपलेसे करून घेतलें. रेडा वेद ह्मणूं शकत नाहीं या सिद्धांतावरून रेड्यानें वेद ह्मटलेलें आपण प्रत्यक्ष पाहिलें व ऐकलें असें ह्मणणारे लोक लबाड व असत्य भाषणी ठरूं शकत नाहींत. ते दुसऱ्या सिद्धांताप्रमाणें सत्यभाषणीच ठरतात. त्याचप्रमाणें लोकांच्या डोळ्याला नारायणरावांचा खून झाला असें जरी दिसलें असलें तरी ती गोष्ट खरीच असली पाहिजे असें धरून चालण्यापूर्वीं त्यामध्यें कांहीं शास्त्रीय अडचणी आहेत किंवा काय व त्यामुळें खुनाच्या ऐवजीं आत्महत्या ठरते कीं काय, हें या प्रकरणांत पहाणें आहे. वरील गोष्टीचा भावार्थ येथें एवढाच घ्यावयाचा आहे कीं, डोळ्याला जेवढें दिसतें तेवढें सर्वच सदासर्वदा सत्य असतें असें धरून चालतां येत नाहीं. ह्मणून त्याला अनुसरूनच वरील मुद्दे काढण्यांत आलेले आहेत.

४. नारायणरावांचा कोथळा बाहेर आला होता. तो कोणत्या तरी शस्त्राचा वार पोटाला लागून बाहेर आला होता यांत संशय नाहीं. त्या शस्त्रानें पोटाचें फक्त कातडें फाटल्यामुळें तो कोथळा बाहेर येणें शक्य होतें. नारायणरावांवर पहिल्यानें सुमेरसिंगानें तरवार चालविली. राघोबादादांनीं

अगर दुसऱ्या कोणत्याही इसमानें त्यांच्यावर हत्यार चालविलेलें नाहीं असें इतिहास सांगतो. सुमेरसिंगानें नारायणरावांवर जें हत्यार चालविलें, त्याचा नामनिर्देश इतिहासांत आहे. तें हत्यार ह्मणजे 'तेगा'[१] हें होय. तेगा ही एक वांकडी व रुंद पात्याची तरवार आहे. याचें पातें तीन ते चार इंच सर्व साधारणपणें रुंद असतें. याची लांबी सामान्यतः तीन फूट असते. या तेग्याच्या टोंकाला सुमारें दहा इंचपर्यंत दोन्ही बाजूंनीं धार असते. हा तेगा मुठीपासून सुमारें दीड फूट लांबीपर्यंत सरळ असून पुढें तो टोंका-पर्यंत चंद्राच्या कोरेप्रमाणें वर्तुळाकार होत जातो. त्यामुळें याच्या खऱ्या माराचा बिंदु टोंकापासून अलिकडे सुमारें दहा इंचावर असतो. याचा उपयोग काट अगर चीर या दोन्हीं प्रकारच्या वारांना होतो. भोंसकण्यासही हा तेगा जबरदस्त काम देतो. हें शस्त्र वजनदार असल्यामुळें याचा वार पक्का होतो. 'काट' चा वार केला तर तुकडा पडतो व 'चीर' चा वार केला तर शरीर कापलें जातें. 'काट' चा वार केला असतां तेग्याच्या ठराविक भागानें वार होतो, परंतु 'चीर' चा वार तेग्याचें दहा इंच टोंक पुढें ठेऊन होत असल्यामुळें व तो ओढून घ्यावयाचा वार असल्यामुळें त्या वारानें कित्येक प्रसंगीं शरीराचीं उभीं दोन शकलेंही होऊं शकतात. 'काट' चे वार आडवे असतात व 'चीर' चे उभे असतात.

५. आपल्या समोर सामनेवाला असतांना तेग्याचे खालीलप्रमाणें वार करतां येतात. (१) **चीर** हा वार डोक्याचे मध्यभागीं उभा होतो. (२) **बाहेरा** हा सामनेवाल्याच्या उजव्या कानांच्या वरील सुमारें तीन चार इंच डोक्याच्या उंचीपासून गालाच्या टोंकापर्यंत सुमारें आठ दहा इंचाच्या जागे-मध्यें आडवा वार होतो. (३) **तमाचा** हा बाहेराप्रमाणेंच सामनेवाल्याच्या डाव्या कानाच्या आसमंतांत होतो. (४) **मुंडकाट उजवा** हा सामने-वाल्याच्या उजव्या मानेवर होतो. (५) **मुंडकाट डावा** हा डावे बाजूनें होतो. हे दोन्ही वार आडवेच आहेत. (६) **मोंढा** हा वार आडवा असून तो सामनेवाल्याचे उजवे खांद्यावर होतो. (७) **जनोई** हा वार

---


१ प्रकरण १३ वें पान २७१ व २७३.

मोढ्याप्रमाणेंच डावे खांद्यावर होतो. (८) **मोढाचीर** हा वार तिरपा असून तो सामनेवाल्याच्या उजव्या खांद्यावरून तिरपा डाव्या बाजूच्या कंमरेपर्यंत जानव्याप्रमाणें येतो. (९) **जनोईचीर** हा मोढाचीरप्रमाणें डाव्या खांद्यावरून उजव्या बाजूच्या कंमरेपर्यंत येतो. (१०) **उलट मोढाचीर** हा वार खाल्रून डाव्या कंमरेपासून वर उजव्या खांद्यापर्यंत तिरपा जातो. (११) **उलट जनोईचीर** हा वार खाल्रून उजव्या कंमरेपासून व डाव्या खांद्यापर्यंत तिरपा जातो. (१२) **पोखर** हा आडवा वार उजव्या बरगडीवर होतो. (१३) **भंडारा** हा पोखरप्रमाणेंच डाव्या बरगडीवर होतो. (१४) **कंमर उजवी** हा आडवा वार उजव्या बाजूच्या कंमरेवर होतो. (१५) **कंमर डावी** हा आडवा वार डाव्या बाजूच्या कंमरेवर होतो. (१६) **कडक उजवी** हा आडवा अगर तिरपा वार कंमरेपासून खालीं गुडघ्यापर्यंत उजव्या बाजूस मांडीवर होतो. (१७) **कडक डावी** हा आडवा अगर तिरपा वार उजव्या कडक प्रमाणें डाव्या बाजूस मांडीवर होतो. (१८) **पालट उजवी** हा तिरपा वार गुडघ्यापासून पायाच्या घोट्यापर्यंत उजव्या बाजूस उलट सुलट होतो. (१९) **पालट डावी** हा तिरपा वार वरीलप्रमाणें उलट सुलट डाव्या बाजूस होतो. (२०) **आणी** किंवा **खोंच** हा वार भोंसकण्याकरतां आहे. याप्रमाणें वीस प्रकारचे वार तेग्यानें करतां येतात.

६. वरीलप्रमाणें तेग्याचे जे वार दाखविले आहेत ते चढाई करणाऱ्या इसमानें बचाव करणाऱ्या सामनेवाल्यावर करावयाचे आहेत. नारायणरावांच्या मृत्यूच्या बाबतींत वरील वारांचा विचार करण्याचें कारण नाहीं. नारायणरावांवर सुमेरसिंगानें कोणत्या स्थितींत वार केले याचा उल्लेख पूर्णपणें आहे. नागपूरकर भोंसले यांच्या बखरींत नारायणरावांनीं राघोबादादांच्या गळ्यास मिठी मारिली असतां तुळाजी खिसमतगार यानें नारायणरावांचे पाय धरून ओढले असा उल्लेख आहे. हरीवंशाच्या बखरींत तुळ्या पवार यानें नारायणराव दादासाहेबांच्या कंमरेला मिठी घालून उभे असतां त्यांचे पाय धरून

त्यांना दादासाहेबांच्या कंमरेपासून ओढलें असा मजकूर आहे. मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरींत नारायणराव दादासाहेबांच्या गळ्यांत पडले असतां तुळाजी पवार यानें रायाचा पाय धरून ओढिला अशी हकीकत आहे. प्रकरण १३ मधील पत्र ३ रें यांत दादासाहेबानीं नारायणरावांना पोटाशीं घेतलें परंतु गाडर्दी कहेत न राहतां पाय धरून ओढून कचाकच वार केले अशी माहिती आहे. या माहितीवरून पहातां चित्र नंबर ५ मध्यें दाखविल्याप्रमाणें जमिनीवर नारायणराव पालथे पडले असतां त्यांच्यावर सुमेरसिंगानें पहिल्यानें हत्यार चालविलें. राघोबादादांना मिठी मारून नारायणराव उभे असतां तुळाजीनें त्यांचे मागून पाय ओढल्यामुळें (चित्र नं. ४ मध्यें दाखविल्याप्रमाणें) ते जमिनीवर पालथे पडले. तेव्हां सुमेरसिंगाचे नारायणराव यांच्यावर तेग्याचे जे वार झाले ते सर्व नारायणरावांच्या पाठीवर झालेले होते हें स्पष्ट आहे. नारायणराव जमिनीवर पालथे पडले असतां सुमेरसिंगानें तेग्याचे हात चालविले अशी परिस्थिति होती. त्या स्थितींत तेग्याचा जो वार होऊं शकेल तो वार पक्काच होईल यांत संशय नाहीं. पाठीवर आडवा वार ह्मणजे ‘ काट ’ केला असतां पाठ तुटून जाईल. मानेवर केला तर मान तुटून पडेल. हातावर अगर पायावर केला तर तेही तुटून पडतील. सुमेरसिंग हा शक्तिवान् व बलवान् असून तेगा हें आपले नेहमींचें शस्त्र चालविण्यांत तो निढावलेला होता. नारायणरावांच्या विषयीं त्याच्या मनांत दया राहिलेली नव्हती. नारायणरावांना मारून टाकण्याच्या उद्देशानें त्या वेळीं त्यानें आपलें हत्यार चालविलें होतें. अशा त्याच्या मनःस्थितींत त्यानें जे वार केले ते निसटते अगर अर्धवट करणें शक्य नव्हतें. ते पक्के वारच होते यांत संशय नाहीं. या बाबतींत ‘ मराठी साम्राज्याची छोटी बखर ’ ह्मणते कीं सुमेरसिंगानें पहिला वार केला आणि ‘ पोटांतून केशरी भात कोंथळा बाहेर पडला. दुसरा हात (वार) मारिला तों शीर तुटून गेलें. तिसरा हात मारिला तों हात तुटून चौकांत पडला ’ या माहितीप्रमाणें तेग्याच्या माराची केवढी जबरदस्त शक्ति असते हें स्पष्ट दिसून येतें. शिवाय तुळ्या पवारानें

चित्र नं. १



चित्र नं. २



चित्र नं. ३



चित्र नं. ४




चित्र नं. ५




चित्र नं. ६

छाती व पोट या पोंकळींतील इंद्रियें.



तेगा



१ काळीज. २ यकृत्. ३ जठर अथवा आमाशय. ४ प्लीहा. ५ मोठें आंतडें. ६ लहान आंतडें.



हातचानिमचा.

नारायणरावांचे पाय धरून त्यांना पालथें पाडल्यानंतर ते उताणे झाले व त्यांच्या पोटावर सुमेरसिंगानें वार केले असा कोठेंच ऐतिहासिक पुरावा नाहीं. नारायणराव प्रतिकारशून्य झालेल्या स्थितींतच तुळया पवारानें त्यांचे पाय धरून त्यांना पाडलें असल्यामुळें ते उताणे झाले असतील अशी शंकाच मुळांत उद्भवूं शकत नाहीं. तेव्हां नारायणरावांच्या पाठीवरच सुमेरसिंगानें वार केले हें स्पष्ट आहे.

७. सुमेरसिंगानें नारायणराव पालथे पडले असतां त्यांच्यावर तेग्याचे वार केले व त्यामुळें कोथळा बाहेर आला अशी आजपर्यंतच्या बखरीकारांची व इतिहासकारांची समजूत आहे, म्हणून तशा प्रकारचा उल्लेख ठिकठिकाणीं सांपडतो. तेग्याच्या वारामुळें केशरीभात व कोथळा बाहेर आला असें जें म्हणणें आहे तें शास्त्रीय दृष्टीनें कोणत्या परिस्थितीमुळें येणें शक्य आहे याचा विचार येथें होणें जरूर आहे. साखरभात बाहेर आला असें म्हटल्यानें त्याचा संबंध जठराशीं येतो व कोथळा बाहेर आला असें म्हटल्यानें त्याचा संबंध आंतड्यांशीं येतो. म्हणून उदरामध्यें यांचे संबंध कसे असतात हें पहाणें जरूर आहे. जठर म्हणजे पोटांत गेलेल्या अन्नाचा संचय ज्या ठिकाणीं होतो त्या भागास जठर किंवा आमाशय अशी संज्ञा आहे. मनुष्याच्या पोटाचा भाग ज्या ठिकाणीं सुरू होतो त्यापासून सुमारें एक इंच अंतरापासून जठराच्या पिशवीला सुरवात होते. ही पिशवी पोटाच्या डाव्या बाजूस असते व उजव्या बाजूस यकृत असतें. ही जठराची पिशवी रुईच्या बोंडाच्या आकारासारखी असते. तिच्या गोलाईचा रुंदट भाग डावीकडे असून निरुंद भाग उजवीकडे असतो. अन्ननलिकेंतून जें अन्न पोटांत जातें तें सर्व या जठराच्या पिशवींत संचयित होतें. तेथें तें तीन ते चार तासपर्यंत राहतें. या अवधींत त्या ठिकाणीं अन्नाचा अर्धवट दाट व आम्ल असा द्रव तयार होतो. त्याला आम[1] असें म्हणतात. नारायणरावांच्या जठरांतून साखरभात बाहेर पडला असें जें म्हणणें आहे, तें तेग्याचे वारानें

१. भाटकृत शारीर व आरोग्यविज्ञान पान १६८.

जठर तोडलें गेल्याशिवाय झालेलें नाहीं हें सिद्ध होतें. अर्थात् सुमेरसिंगानें नारायणरावांच्या पाठींत जो आडवा वार केला, तो कमींतकमी नारायणरावांची पाठ तोडून जठराची पिशवी कापली जाईपर्यंत केला असला पाहिजे असें स्पष्ट होतें.

८. आतां कोथळ्यासंबंधीं कशी वस्तुस्थिति आहे हेंही पहाणें अवश्य आहे. शस्त्राच्या मारानें कोथळा बाहेर पडला ह्मणजे कशी स्थिति होते हें पाहिलें पाहिजे. पूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांची व अफझुलखानाची जी झटापट झाली त्यांत अफझुलखानाचा कोथळा बाहेर आला होता असा इतिहास आहे. पुराणकालीं नृसिंह व हिरण्यकश्यपू यांच्या द्वंद्वांत नृसिंहानें हिरण्यकश्यपूचा कोथळा बाहेर काढला होता. या दोन्हीं गोष्टींत नखांनीं पोटाची त्वचा फाडल्यामुळें कोथळा बाहेर आला होता. यावरून पोटाची त्वचा फाटली असतां कोथळा बाहेर येतो हें ठरतें. हा कोथळा ह्मणजे केवळ जठर अथवा आमाशय नव्हे. तर आमाशयासह पोटांत पित्ताशय, लहान व मोठें आंतडें (Intestines) मूत्राशय, मलाशय हे जे कोथळ्याचे निरनिराळे भाग परस्पराशीं संलग्न आहेत व जे आहारसंचयापासून उत्सर्गापर्यंत क्रिया करतात त्यालाच कोथळा मानण्यांत येतें. वाघ—नखांनीं पोटाची त्वचा फाटूं शकते व त्यामुळे वरील प्रकारचा आंतड्यांसह कोथळा बाहेर पडूं शकतो. भाल्याच्या पात्याला मागील बाजूला माश्याच्या गळाप्रमाणें जर उलट्या कोरा ठेवल्या असतील तर भाला भोंसकून परत तो ओढून घेतांना त्याच्या उलट्या कोरा आंतड्यात घुसून कोथळा बाहेर येऊं शकतो भाल्याप्रमाणें तरवारीच्या टोंकाला जर अशी घडण असेल तर त्यामुळेंसुद्धां कोथळा बाहेर येईल. परंतु तेग्याची अशी घडण नाहीं. त्याच्या टोंकाला दोन्हीं बाजूनें तीक्ष्ण धार असते व त्याच्या भोंसकण्याच्या वारानें आंतडीं अगर जठर फाटूं शकतें. त्यामुळें कोथळा बाहेर येऊं शकत नाहीं. तेग्याच्या भोंसकण्याच्या वारानें जठरांतील अन्न बाहेर पडतें पण कोथळा बाहेर येऊं शकत नाहीं.

९. कोथळा केव्हां बाहेर पडूं शकतो यासंबंधीं स्पष्ट कल्पना द्यावयाची ह्मणजे सायकलच्या टायर व ट्यूबची द्यावी लागेल. टायरमधील ट्यूबमध्यें जोंपर्यंत हवा असेल तोंपर्यंत जर टायर तेवढीच चरून फाटली तर ट्यूबमधील हवेच्या दाबामुळें ती ट्यूब फाटलेल्या टायरच्या द्वारामधून बाहेर येईल. तीच स्थिति कोथळ्याची होते. कोथळा कापला न जातां त्यांतील अन्न, अन्नरस आणि त्यांत संचार करणाऱ्या हवेचा दाब हीं कायम राहिल्यास पोटाची कोथळ्यापर्यंतची केवळ त्वचाच फाटल्यानें कोथळा बाहेर येऊं शकतो. अन्य कोणत्याही कारणानें कोथळा आपोआप बाहेर येऊं शकत नाहीं. तो मुद्दाम ओढूनच बाहेर काढावा लागेल. नारायणरावांच्या बाबतींत मुद्दाम कोथळा बाहेर काढावा असा कोणताच प्रयत्न झालेला नाहीं. तेग्याच्या वारामुळेंच कोथळा बाहेर आला अशी समजूत आहे. तेग्याच्या आडव्या वारामुळें कोथळा तुटूं शकतो. त्यांतील अन्न व अन्नरस बाहेर पडूं शकतात; परंतु कोथळा व आंतडीं सायकलच्या हवा गेलेल्या ट्यूबप्रमाणें बाहेर पडूं शकत नाहींत; आणि पाठीवर तेग्याचे वार झाल्यामुळें तर बिलकुलच येऊं शकत नाहींत. कोथळा व आंतडीं, हीं आडवीं जरी मधोमध कापलीं गेलीं, तरी पोटांत कांहीं ठराविक ठिकाणीं तीं जखडलेलीं असतात. अर्थात् अन्न, अन्नरस व हवेचा दाब हीं त्यांतून त्यांच्या छेदनामुळें निघून गेल्यानंतर रिकामा कोथळा बाहेर येऊं शकत नाहीं. या निसर्गसिद्ध कारणामुळें व जी हकीकत इतिहासांतून सांगण्यांत येते त्या कारणाप्रमाणें तेग्याच्या वारानें नारायणरावांचा कोथळा बाहेर आला असें ह्मणणें त्रिवार खोटें ठरेल.

१०. परंतु ज्या अर्थी कोथळा बाहेर आला होता; व साखरभातही बाहेर पडला होता असें इतिहास एकमुखानें सांगतो, त्याअर्थी दुसऱ्या कोणत्या-तरी परिस्थितीमुळें अगर त्या वेळीं मनांत न येणाऱ्या अघटित घटनेमुळें ही गोष्ट घडून आली असली पाहिजे असें निर्विवाद ठरतें. तरी ती कोणती घटना त्या वेळीं संभाव्य होती हें येथें पहाणें अवश्य आहे. मागील तेराव्या

प्रकरणांत निर्दिष्ट केलेल्या हकीकतीचा सारांश पुढीलप्रमाणें आहे:— नारायणराव राघोबादादांचा वध करण्याकरतां त्यांच्या दिवाणखान्याकडे हातचा निमचा[1] घेऊन निघाले. राघोबादादांसमोर ते येऊन उभे राहिल्यानंतर गारद्यांचा फितुर तुह्मींच केला असा गुन्हा त्यांच्यावर लादून त्यांनीं त्यांना पुढील प्रसंगाला तोंड देण्यास बजावलें. नारायणरावांनीं राघोबादादांना मारून टाकण्याकरतां तरवार उपसली.[2] त्या वेळीं आत्मसंरक्षणाचा राघोबादादांनीं आपण निःशस्त्र असलेल्या स्थितींत प्रयत्न केला. तो प्रयत्न ह्मणजे बिनोट पद्धतीचा होय. चित्र नं. २ मध्यें दाखविल्याप्रमाणें नारायणरावांनीं राघोबादादांच्या डोक्यावर वार केला असतां मोठ्या चलाखीनें आपलें अंग उजव्या बाजूस झुकवून घेऊन आपल्या उजव्या हातानें नारायणरावांची तरवार मुठीजवळ धरून त्याच्या वाराला विरोध केला आणि उजव्या हातानें तरवारीच्या मुठीला वर रेंटून आपल्या डोक्यावरील तरवारीचें पातें अंतराळें झालें असें पाहून डाव्या हातानें तरवारीच्या उभ्या पात्यावर आडवी थप्पड मारली. त्यामुळें राघोबादादांच्या डोक्यावरून उजव्या बाजूस तरवार ढकलली गेली व नारायणरावांचा पुढें असलेला तोल तरवारीबरोबर राघोबादादांच्या उजव्या बाजूस गेला. त्यामुळें नारायणरावांचा उजवा हात राघोबादादांच्या उजव्याच हातांत सांपडला व तो ओढतांच नारायणराव पुढें येऊन त्यांच्या पाठीवर राघोबादादा गेले. चित्र नं. ३ ही त्या वेळेची स्थिति आहे. या चित्रांत दाखविल्याप्रमाणें राघोबादादांनीं आपल्या उजव्या हातानें नारायणराव यांचा तरवार असलेला उजवा हात धरला व आपला डावा हात नारायणरावांच्या डाव्या खाकेंतून घालून त्यांच्या छातीला मिठी[3] घालून घट्ट आवळून धरलें. त्यामुळें सशस्त्र नारायणराव निःशस्त्र राघोबादादांच्या मगरमिठींत पक्केपणें अडकले. नारायणरावांची ही पेंचप्रसंगांतील स्थिति त्यांना निःशस्त्र करून आपला बचाव करून घेण्याला राघोबादादांना फायदेशीर झाली. ही एक संभाव्य परिस्थितीची कल्पना आहे.

---

१ व २ प्रकरण १३ पान २८५.   ३ प्रकरण १३ पान २८५

११. सशस्त्र सामनेवाल्याशीं निःशस्त्र इसमानें प्रतिकार करून आपला बचाव करून घेणें व त्याला बंदिवान करणें या विद्येला बिनोट असें ह्मणतात. उत्तम बिनोटी इसम लाखांतून एकादाच होऊं शकतो. याचें कारण बिनोट विद्या ही त्रिवेणी संगमाची आहे. शस्त्रविद्या, मल्लविद्या व मर्मविद्या या तीनही विद्यांत बिनोटी इसमाला पारंगत असावें लागतें. आपल्या बचावाची पूर्ण तरतूद ठेऊन सामनेवाल्यावर सफाईदारपणें चढाई करणारा व सामनेवाल्याच्या चढाईच्या वेळीं आपली चढाईची पूर्ण तयारी ठेऊन सफाईदारपणें बचाव करणारा आणि या उभय स्थितींत हूल दाखविण्याची क्रिया सफाईदारपणें करणारा इसम शस्त्रविद्येंत पारंगत गणला जातो. त्याचप्रमाणें मल्लविद्येचें ह्मणजे कुस्तीचें आहे. यांतील चढाई व बचाव या स्थितींना **डाव** व **तोड** अशा अनुक्रमें संज्ञा आहेत. तोड करण्याची तरतूद ठेऊन डाव करणें व डाव करण्याची तरतूद ठेऊन तोड करणें आणि या उभय स्थितींत योग्य प्रसंगीं हूल दाखविण्याची क्रिया करणारा इसम मल्लविद्येंत निष्णात समजला जातो. मर्मविद्येचें ज्ञान होण्याला शारीरशास्त्राची पूर्णपणें माहिती असावी लागते. मनुष्याच्या शरीरांत जीं अनेक मर्मस्थानें आहेत त्याचे मुख्य पांच भेद आहेत. १ मांसमर्म २ शिरामर्म ३ स्नायुमर्म ४ अस्थिमर्म आणि ५ संधिमर्म, असे ते भेद आहेत. मांसमर्माचीं स्थानें ११, शिरामर्माचीं स्थानें ४१, स्नायुमर्माचीं स्थानें २७, अस्थिमर्माचीं स्थानें ८ व संधिमर्माचीं स्थानें २० एकूण १०७[१] मर्मस्थानें आहेत. यापैकीं प्रत्येक हातांत अकरा अकरा ह्मणजे दोन्ही हात मिळून २२ मर्में; प्रत्येक पायांत अकरा अकरा ह्मणजे दोन्हीं पायांत मिळून २२ मर्में; पोट व छाती या दोहोंमध्यें मिळून १२ मर्में; पाठीमध्यें १४ मर्में; आणि छातीस लागलेल्या गळ्याच्या भागापासून डोक्यापर्यंत ३७ मर्में अशीं १०७ मर्मस्थानें आहेत. यांपैकीं **सद्यःप्राणहारक** नांवाचीं तात्काळ किंवा आठ दिवसांत मारणारीं मर्में १९ आहेत. **कालांतरप्राणहारक** नांवाचीं महिना पंधरा दिवसांत

---

१ निघंटरत्नाकर शारीर अध्याय ५ वा.

मारणारीं मर्में ३३ आहेत. **विशल्यघ्न** नांवाचीं मर्में ३ असून तीं उपटून काढलीं असतां मनुष्य मरतो. **वैकल्यकर** नांवाचीं मर्में बरीं झालीं असें वाटलें तरी त्यांत कायमचा दोष राहिलेला असतो. तीं आंखडलेलीं व विकृतच असतात. हीं ४४ प्रकारचीं आहेत. आणि **रुजाकर** म्हणजे ज्या मर्मांना विकार झाला असतां पीडा फार होते अशीं मर्में ८ आहेत. अशा मर्मस्थानांची माहिती असणारा व त्या त्या स्थानीं प्रसंगविशेषीं आघात करून सामनेवाल्याला पराजित करणारा जो, तोच मर्मविद्यापारंगत समजला जातो. या प्रकाराला नस्ती अशीही संज्ञा आहे. बिनोटी होण्यास या तीनही विद्या याव्या लागतात, तरच तो सशस्त्र सामनेवाल्यापासून आपण असलेल्या निःशस्त्र स्थितींतही आपलें रक्षण करून घेऊन सामनेवाल्याला पराजित करूं शकेल. राघोबादादा हे शस्त्रविद्येंत, मल्लविद्येंत आणि मर्मविद्येंत पारंगत असल्यामुळें ते खरे बिनोटी होते व त्यामुळें नारायणरावांच्या सशस्त्र चढाईपासून आपला बचाव करून घेऊन ते त्यांच्या पाठीवर आले व त्यांनीं नारायणरावांना आपल्या मगरमिठींत आवळून धरलें.

१२. राघोबादादांनीं नारायणरावांना वरीलप्रमाणें बंदिस्त केलें तरी त्यामुळें त्यांचें निःशस्त्रीकरण होऊं शकलें नाहीं. त्यांच्या उजव्या हातांत तरवार होती. राघोबादादांनीं नारायणरावांचा तरवारीचा हात धरून त्यांची फक्त चढाई थांबविली होती. आपल्यावरील सशस्त्र चढाई मूलतः नष्ट करून टाकण्याकरतां राघोबादादांना नारायणरावांस निःशस्त्र करणें प्राप्त होतें. अशा स्थितींत मर्मस्थानीं आघात करून अगर मर्मस्थानीं दाब देऊन शरीराचे भाग निःशक्त करून टाकावयाला मर्मविद्येचें ज्ञान लागतें. त्या विद्येमुळें शरीराचा कोणताही भाग निःशक्त, लुला किंवा बधिर करतां येतो. नारायणरावांच्या हातांतील तरवार आपोआप गळून पडण्याकरतां राघोबादादांनीं त्यांच्या मनगटास ज्या ठिकाणीं धरलें होतें त्या जागेच्या मर्मावर दाब देऊन सहज काम होणार होतें. हाताच्या मनगटाचे ठिकाणीं खालीं व वर अशा दोन्हीं बाजूला **कूर्चशिरस** नामक मर्म आहे. तें मर्म जोरानें

दाबलें असतां ठणका लागतो व हातांतील सर्व शक्ति निघून जाते. हातांतील शस्त्र गळून पडावयाला या मर्माचाच सामान्यतः जास्त उपयोग होतो. कुस्तीमध्यें देखील जे नस्तीकार पहेलवान आहेत तेही याच मनगटाचे ठिकाणीं जोराचा आघात करून सामनेवाल्याचा हात निकामी करून टाकीत असतात.

१३. वरील मर्मवेध पद्धतीनें नारायणरावांना निःशस्त्र करणें राघोबादादांना क्रमप्राप्त झालें असेल यांत शंका नाहीं. अशा प्रकारें नारायणरावांच्या हातांतील तरवार खालीं पाडण्याचा प्रयत्न चालू असतां नारायणरावांपुढें दोन प्रश्न स्वाभाविक उभे राहिले असतील. 'जगावें कीं मरावें?' जगणें झाल्यास स्वकीयांकडून व परकीयांकडून होणारी निर्भत्सना, अपमान, मानखंडना आणि बंदिवास हीं सहन करावीं लागणार होतीं. परंतु तीं सहन करण्यासारखा त्यांचा स्वभावधर्म नव्हता. म्हणून त्यांना दुसरा मार्ग पतकरणें भाग पडलें. नारायणराव या वेळेपर्यंत पूर्णपणें निःशस्त्र झालेले नव्हते. त्यांच्या डाव्या हातांतही 'हातचा निमचा[1]' होता. हें शस्त्र कृपाणासारखें लहान असतें. हें खंजिराप्रमाणें कुडत्याच्या आंत लपवून ठेवण्यासारखें असतें. निमचाचें पातें वांकडें व टोंकाला चपटें असतें. हें हत्यार दुसऱ्याच्या घरीं जेवावयास गेलें असतां व पितांबर नेसून सोंवळयानें जेवावयास बसलें असतांनाही कोणास न दिसेल असें पितांबराच्या निऱ्याशेजारीं खोंचून ठेवतां येतें. एवढें तें लहान म्हणजे सुमारें दहा इंच लांबीचें असतें. हें शस्त्र नारायणरावांच्या डाव्या हातांत असल्यामुळें त्यांनीं आपल्या मनाचा मरण्याविषयींचा निर्णय घेतल्याबरोबर चित्र नं. ३ मध्यें दाखविल्याप्रमाणें केवळ मरणाच्या हेतूनें त्यांनीं तो हातचा निमचा जोरानें आपल्या पोटावर मारून घेतला. निमचाचें पातें वांकडें असल्यामुळें त्याची धार खालच्या दिशेनें असतांना पक्का वार होऊं शकतो, व त्याचें टोंक चपटें असल्यामुळें केलेला वार खंजिराच्या तीक्ष्ण टोंकाप्रमाणें खोल जात नाहीं.

---

१. प्रकरण १३ वें पान २८५.

निमचाचा वार इंच दीड इंच खोल जातो, परंतु त्याचें पातें वांकडें असल्यामुळें त्याची चीर मात्र वार करण्याच्या दिशेप्रमाणें चार इंचापासून सुमारें दहा इंच लांबीपर्यंत होऊं शकते. राघोबादादांनीं आपल्या डाव्या हातानें नारायणरावांना छातीचे ठिकाणीं आवळून धरल्यामुळें त्यांचा तोल मागील बाजूस राघोबादादांच्या अंगावर पडला होता. म्हणजे ते मागील बाजूस सुमारें ८० डिग्रींच्या कोणांत उभे होते. त्या कोणांतील दिशेनें पोटावर होणाऱ्या वाराची दिशा पाहिल्यास सुमारें ४५ डिग्रींच्या कोणाचा वार होतो व तो त्याच दिशेनें खालीं गेल्यास सुमारें आठ दहा इंचाची चीर पाडूनच पुरा होतो. नारायणरावांच्या छातीचा भाग मागें तोलला गेल्यामुळें नारायणरावांच्या हातांतील निमचाच्या वाराची सुरवात आमाशयाचे द्वारावर होऊन त्याच्या चिरेचा अखेर बेंबीजवळ होईल. या वारामुळें सुरवातीच्या ठिकाणीं आमाशयाचें द्वार कापलें जाईल व पुढें पोटाचीच केवळ त्वचा तेवढी कापली जाऊं शकेल.

१४. या वेळीं राघोबादादा नारायणरावांच्या पाठीमागें उभे असून त्यांचें सर्व लक्ष नारायणरावांना आटोपून धरून त्यांची तरवार गळून पाडण्याच्या खटपटींत वेधलें गेल्यामुळें नारायणरावांच्या अनपेक्षित हालचालीकडे त्यांचें लक्ष असणें शक्य नव्हतें. आपण मरून जावें या बुद्धीनें नारायणरावांनीं जो निमचाचा वार मारून घेतला, तो राघोबादादांना जरी समजला नाहीं, तरी त्या वारानें नारायणरावांच्या देहाची स्थिति त्यांच्या लक्षांत आल्याशिवाय राहिली नाहीं. नारायणरावांच्या हातांतून तरवार गळून पडणें, त्यांच्या देहांतील प्रतिकारक जोर नष्ट होऊन शरीर बेतोल होणें, देहावरील भान जाणें वगैरे-प्रतिकार नष्ट झालेली स्थिति ज्या वेळीं राघोबादादांना समजली, त्या वेळीं त्यांची आत्मसंरक्षणाची जबाबदारी संपली व त्यांच्या अपत्यप्रेमाच्या उमाळ्याला सुरवात झाली. नारायणराव काकुळतीस आलेले पाहून राघोबादादांनीं त्यांना आपल्या पोटाशीं घेतलें.[1] म्हणजे चित्र

१. प्रकरण १२ वें पान २८५.

नं० ४ मध्यें दाखविल्याप्रमाणें राघोबादादा जे नारायणरावांच्या पाठीवर आले होते व त्यांनीं त्यांना जी मिठी मारली होती, ती सोडून देऊन त्यांनीं नारायणरावांना त्यांचें तोंड आपल्याकडे फिरवून घेऊन पोटाशीं आलिंगून धरलें होतें. या स्थितींत राघोबादादा व नारायणराव उभे असतां सुमेरसिंग वगैरे मंडळी दिवाणखान्यांत घुसली व त्यांनीं राघोबादादांना त्यांच्या डोक्यावर व हातावर जखम होऊन रक्तबंबाळ झालेल्या स्थितींत पाहिल्यामुळें हें कृत्य नारायणरावांचेंच असावें अशी खात्री त्यांना वाटली. तुळ्या पवारानें नारायणरावांचे पाय धरून राघोबादादांच्या मिठींतून त्यांना जोरानें ओढून खालीं जमिनीवर पाडलें. त्यामुळें नारायणराव देहभान गेलेल्या स्थितींत आपल्या पोटावर उपडे आदळले गेले. नारायणरावांचें पोट श्रीमंतीला व 'बाळ' ह्मणून लडिवाळपणानें लहानपणापासून वाढविलेल्या त्यांच्या बाळसेदार शरीराला शोभण्यासारखें होतें. त्यांतून ते साखरभात, जिलबी, वगैरे पंच पक्वान्नाचें जेवण यथास्थित करून नुकतेच आलेले होते. त्यामुळें त्यांचें पोट ताणलें गेलें होतें. अशा स्थितींत नारायणरावांनीं आपण मरावें ह्मणून जोरानें मारून घेतलेला निमचाचा पोटावरील वार व तुळ्या पवारानें त्यांचे पाय धरून जोरानें पाडल्यामुळें त्यांच्या ताणलेल्या पोटावर पडलेला त्यांच्या शरीराचा भार या महत्वाच्या दोन अनुकूल घटनेमुळें नारायणरावांचा कोथळा एकदम बाहेर पडला. नारायणरावांचा कोथळा बाहेर येण्यास वरील दोन मुख्य कारणें आहेत. त्यांच्या आमाशयाच्या द्वारावर निमचाची चीर झाल्यामुळें पोटावर पडलेल्या आघाताच्या दाबानें ती चीर रुंदावून त्यांतून साखरभात बाहेर पडला असला पाहिजे हें निश्चित ठरतें. आमाशयांत खाल्लेला साखरभात गेल्यानंतर त्याचें स्वरूप किती वेळानें कसें बनत असतें हा विषय जरी स्वतंत्र असला तरी साखरभात खाऊन आमाशयांत झालेलें मिश्रण बाहेर पडलें एवढें ढोबळ मानानें समजण्यास कांहीं हरकत नाहीं. एकंदरींत कोथळा बाहेर येणें व साखरभात बाहेर येणें या दोनही

गोष्टी वरील परिस्थितीमुळें व निमचा या एकाच शस्त्राच्या वारामुळें होणें संभाव्य आहे. तेग्याच्या कोणत्याही वारानें घडून आलेला प्रसंग तुलनात्मक दृष्टीनें पाहिला असतां व शास्त्रीय दृष्टीनें त्याचा अनुभव घेण्याकरतां तो पडताळून पहाण्याचा प्रयोग केला असतां वरील गोष्टच जास्त खरी असल्याचें दिसून येईल. याकरतां 'नारायणरावांचा कोथळा जो बाहेर आला होता तो कोणत्या परिस्थितमुळें व कोणत्या शस्त्राच्या वारामुळें बाहेर येणें शक्य होतें?' या पहिल्या मुद्यावरील निर्णय नारायणरावांच्या आत्महत्येस पूर्ण पोषक आहे असें ठरतें.

१५. दुसरा मुद्दा असा आहे कीं, 'राघोबादादांना डोक्यावर एक व डाव्या हातावर एक असे दोन वार जे निसटते झाले, ते कोणत्या परिस्थितींत व कोणकोणत्या हत्यारांनींच होणें शक्य होतें?' राघोबादादांना जे दोन वार लागले त्यासंबंधीं बखरीकार काय ह्मणतात हें पहिल्यानें पहाणें जरूर आहे. या राघोबादादांच्या वाराच्या बाबतींत 'पेशव्यांची बखर' व 'मराठी साम्राज्याची बखर' या दोन्ही बखरींनीं अगदीं मुग्धपणा स्वीकारला आहे. नागपूरकर भोंसले यांच्या बखरींत 'दादासाहेबांच्या हातावर वार आला. डोईसही लागले.' एवढाच मजकूर आहे. हे वार कोणाच्या हत्यारानें व केव्हां आणि कसे झाले या बाबतींत कांहींच हकीकत दिलेली नाहीं. 'हरीवंशाच्या बखरींत' राघोबादादांना लागलेल्या एकाच वारासंबंधीं मात्र पुढीलप्रमाणें तपशीलवार माहिती दिलेली आहे. "दादासाहेब ह्मणाले कीं, 'असे बाळास मारूं नका.' असें ह्मणून हात पुढें केला. तों आंत खोलींत तेथेंच आनंदीबाई होती. तेथून दादासाहेब यांस ह्मणाली कीं, 'आतां कांकणें हातात घाल' असें ह्मणून गाड्यांस सांगितलें कीं, 'उभयतांस मारून टाका.' तों गाड्यांनीं एक वार टाकिला. तो दादासाहेब यांच्या हातास लागला.' ही बखर दादासाहेबांना हातावर एकच वार झाला असें ह्मणते. ही हरीवंशाची बखर पुरुषोत्तम दाजींनीं स्वमुखानें आपल्या वंशजांना सांगितलेल्या

गोष्टींच्या आधारानें लिहिलेली आहे. पुरुषोत्तम दाजी यांचें मन राघोबादादा व आनंदीबाई यांच्याविषयीं कसें कलुषित झालेलें होतें व ते नाना फडनविस यांचीं कारस्थानें पार पाडण्याकरतां त्यांच्याविषयीं कसकशा विषप्रयोगाच्या वगैरे खोट्या कंड्या पिकवीत होते हें मागें १४ व्या प्रकरणांतून वेळोंवेळीं आलेंच आहे. तशा प्रकारचाच तपशील राघोबादादांच्या या एका वारासंबंधींचा हा आहे. तो वार तेग्याचा होता. आनंदीबाईच्या हुकुमावरून सुमेरसिंगानें तो केलेला होता. हा वार करण्याचे वेळीं हरीवंशाच्या बखरीच्या माहितीप्रमाणेंच राघोबादादांच्या गळ्याला मिठी मारून नारायणराव उभे असतां 'उभयतांस मारून टाका' या आनंदीबाईच्या हुकमाची तामिली करण्याकरतां सुमेरसिंगानें तो वार तेगा या शस्त्रानें केलेला होता. हा तेग्याचा वार आपलें डोकें व नारायणरावाचें डोकें वांचविण्याकरतां राघोबादादांनीं जरी आपल्या डाव्या मनगटावर घेतला असता, तरी त्या वारानें त्यांचें तें मनगट सहज तुटून खालीं पडलें असतें. परंतु तें न तुटतां हातावर जो वार झाला तो निसटता होता, यावरून राघोबादादांच्या हातावर जो वार झाला तो तेग्याचा नव्हता हें स्पष्ट आहे. राघोबादादांसह नारायणरावांना मारून टाकण्याचा आनंदीबाईनें हुकूम केला असें जें हरीवंशाच्या बखरीचें ह्मणणें आहे तेंच अगोदर धादांत खोटें आहे. या बाबतींत प्रत्यक्ष आनंदीबाईचें काय ह्मणणें होतें हें पूर्वीं आलेंच आहे. या गर्दीच्या वेळीं त्या ठिकाणीं आनंदीबाई नव्हत्या, एवढेंच नव्हे तर या गर्दीची माहितीही राघोबादादांनीं त्यांना सांगितलेली नव्हती. 'माझी ममता विशेष ह्मणून नारायणरायाचा गर्दीचा मजकूर मला सांगत नव्हते.[1]' या आनंदीबाईच्या उद्गारावरून ही गोष्ट स्पष्ट होते. पुरुषोत्तमदाजींनीं राघोबादादांना झालेल्या या वाराच्या तपशिलानें दोन गोष्टी साधल्या. एक त्यांच्या वाराचा तपशील दिल्याप्रमाणें केलें व दुसरें आनंदीबाईसंबंधीं पूर्वीं त्यांच्या विषप्रयोगाच्या गोष्टी सांगून लोकांच्या

---

१. आनंदीबाईची दिनचर्या पत्र नं. ७१.

मनांत जो भीतीचा अग्नि पेटविला होता त्यांत 'उभयतांसही मारून टाका' या माहितीच्या बनावाचें तेल ओतून दिलें. शिवाय 'आतां कांकणें हातांत घाल,' असे राघोबादादांना उपमर्दकारक शब्द बोलून आपल्या पतीसह पुतण्यास मारण्याचा हुकूम तिनें दिला अशी कंडी उठवून, पुरुषोत्तम दाजींनीं आनंदीबाईचें चित्र या वेळीं एखाद्या भयंकर राक्षसिणीप्रमाणें रंगवून दिलें. राघोबादादांच्या तेजस्वी स्वभावाकडे लक्ष देऊन पाहिलें असतां जर खरोखर आनंदीबाईनें वरीलप्रमाणें शब्द उच्चारिले असते, तर त्यांनीं तेथेंच व त्याच क्षणाला आनंदीबाईला परलोकचा मार्ग दाखविला असता. उलटपक्षीं आनंदीबाईची दिनचर्या व इतरत्र पत्रव्यवहार यावरून पहातां, आनंदीबाई या धर्मशील, पवित्र, नारायणरावांवर निस्सीम अपत्यप्रेम असलेल्या आणि राघोबादादांविषयीं अभिमान, भक्ति व निर्मळ प्रेम बाळगणाऱ्या अशाच होत्या हें स्पष्ट दिसतें. राघोबादादा दिवंगत होईपर्यंत त्या उभयतांमध्यें सारखेच सलोख्याचे व्यवहार राहिले. राघोबादादांच्या मरणानंतर आनंदीबाईचें जीवमान असेपर्यंत त्यांच्या हृदयांत पतिभक्तीची जिवंत ज्योत तेवत असलेली त्यांच्या दिनचर्येवरून स्पष्ट दिसेल. यामुळें त्यांच्या विषयीं हरीवंशाच्या बखरींत केलेलीं विधानें निवळ खोटीं आहेत हें आतां नव्यानें सांगण्याची जरूरी राहिलेली नाहीं. त्याचप्रमाणें राघोबादादांच्या हातावर झालेल्या वाराची जी उपपत्ति सांगण्यांत आलेली आहे तीही अर्थात् स्वकपोलकल्पित आहे यांत संशय नाहीं. ती शस्त्रशास्त्राशीं जुळत नाहीं, एवढेंच नव्हे तर, ती त्या वेळेच्या वस्तुस्थितीला मेळ घालतां येण्यासारखीही नाहीं.

१६. वरीलप्रमाणें बखरींतील हकीकतीची वासलात लागल्यानंतर त्या वेळेच्या पत्रव्यवहारांतून नवीन कांहीं निष्पन्न होतें कीं काय, हें पहाणें जरूर आहे. तेराव्या प्रकरणांतील पत्र नं. १ व पत्र नं. २ हीं दोन पत्रें नाना फडनविसांच्या माहितीप्रमाणें लिहिलेलीं आहेत. त्यांत राघोबादादांना झालेल्या दोन वारांचा कोठेंच नामनिर्देश नाहीं. तो नानांच्या धोरणास

अनुसरून मुद्दाम केलेला नसावा असें उघड दिसतें. पत्र नं. ३ मध्यें मात्र या दोन वारासंबंधीं माहिती आहे. पण ती अगदींच अपुरी आहे. '**त्या गडबडींत** दादासाहेबांस **कपाळावर** व **डाव्या हातावर** दोन जखमा लागल्या.' एवढीच माहिती आहे. याशिवाय '**जखम फार दुखत आहे. शेकावी लागते.**' एवढी माहिती जखमेच्या उपचाराबाबत आहे. वरील पत्र नं. ३ यांतील ही माहिती जरी त्रोटक असली तरी ती वस्तुस्थितिनिदर्शक असल्यानें त्यांतून पुष्कळच सत्याचा भाग बाहेर येऊं शकतो. या माहितींत पत्रलेखकानें राघोबा-दादांच्या तोंडून जशी हकीकत ऐकिली तशीच ती लिहिली असल्यामुळें त्या माहितींत लेखकाचें अनुमान अगर त्याची कल्पना यांची भर पड-लेली नाहीं. ह्मणून त्या खऱ्या तेवढ्याच गोष्टीवरून पुष्कळ बोध होण्यासारखा आहे.

१७. राघोबादादांना ज्या वेळीं जखमा झाल्या ती वेळ व तो प्रसंग फारच मोठ्या मानसिक गोंधळाचा होता. राघोबादादा जरी शूर लढवय्ये होते तरी त्यांना अंतःकरण होतें. अपत्यप्रेम, व्यवहार, लौकिक, पेशवे घराण्यां-तील वडीलकीची जबाबदारी वगैरे संबंधींच्या त्यांच्या भावना जागृत होत्या. अशी मानसिक स्थिति असतांना या सर्वांवर विरजण पडण्यासारखी अन-पेक्षित गोष्ट घडून आल्यामुळें त्या प्रसंगीं राघोबादादा गोंधळून अगर गडबडून गेले असल्यास नवल नाहीं. नारायणरावांनीं राघोबादादांना जरी कैदेंत टाकलें होतें व त्या ठिकाणीं त्यांचा व आनंदीबाईचा जरी अन-न्वित छळ होत होता, तरी तो प्रत्यक्ष नारायणरावाच्या इच्छेनें त्यांच्या-कडून न होतां दुसऱ्याच्याच प्रेरणेनें होत होता हें समजण्याइतकीं राघो-बादादा व आनंदीबाई हीं शहाणीं होतीं. अर्थात् अशी त्यांची प्रामाणिक समजूत असतां ज्या वेळीं प्रत्यक्ष नारायणराव हातांत तरवार घेऊन राघो-बादादांच्या दिवाणखान्यांत शिरले व त्यांना फितुर केल्याच्या गुन्ह्यांत धरून त्यांचा वध करण्याकरतां नारायणरावांनीं तरवार उगारली, त्यावेळीं

राघोबादादांच्या मनाची कशी गोंधळल्याप्रमाणें स्थिति झाली असेल हें त्या प्रसंगाची जाणीव लक्षांत घेणाऱ्यांना निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. एखादा इसम निर्धास्तपणें झोंप घेत पडला असतां 'आग लागली' अगर 'चोर शिरला' असें कोणी ओरडून त्याला जागें केलें तर वस्तुस्थितीची पूर्ण कल्पना येईपर्यंत त्याच्या मनाची जशी गोंधळलेली स्थिति होते; अथवा शहरांतील एखाद्या ऐन वहातुकीच्या डांबरी रस्त्यानें एखादा झकपक पोशाख करून व पायांत बूट घालून त्याच्या तालावर आपल्या मनांत एखाद्या विषयाचे मांडे खात चालला असतां आंब्याच्या कोईवर किंवा केळ्याच्या सालीवर पाय पडल्यानें घसरून जाऊन सपशेल तोंडघशीं पडावा म्हणजे त्याची जशी अकल्पितरीतीनें गोंधळलेली स्थिति होते, तशीच जवळजवळ राघोबादादांची आपला वध करण्याकरतां सुसज्ज झालेल्या नारायणरावांना पाहून झाली असेल यांत शंका नाहीं. अनपेक्षित घटना घडून आल्यानें मनुष्य स्वाभाविकपणें भांबावून गोंधळून जातो! अशा गोंधळून गेलेल्या परिस्थितींत आपण कसें पडलों; गुढग्यावर, हातावर किंवा तोंडावर; मार कोठें व कसा लागला; कपडे कोठें व कशानें घाण झाले; पडल्या वेळीं बाजूनें कोणकोणतीं वाहनें गेलीं; कोणीं कोणीं आपणाला पडलेलें पाहिलें; कोणीं हात धरून उठविलें; कोणीं आपले कपडे झाडून साफ केले; आपण पडलेलें पाहून कोणकोण मजेंत हंसले व कोणाकोणास वाईट वाटून त्यांनीं निःश्वास सोडले; आणि शेवटीं आपण कसे लंगडत व रस्त्यांतील आपल्या ओळखीच्या माणसांना चुकवीत घरापर्यंत शीरसलामत कसे येऊन पोंचलों याचें संपूर्ण स्मरण त्या गोंधळून गेलेल्या मनःस्थितींत राहूं शकत नाहीं. घरीं आल्यावर शरीराला कोठें कोठें मार लागला व कोठें कोठें दुःख झालें हें पाहूनच आपण कसे पडलों याची केवळ कल्पना तो करतो. ती कल्पना वस्तुस्थितिनिदर्शकच असूं शकेल असें नेहमींच म्हणतां येणार नाहीं. कल्पना ही संभाव्य स्थितीची द्योतक असते. संभाव्य स्थिति अनेक प्रकारची असूं शकते.

१८. अनपेक्षित घटना घडून आल्यामुळें राघोबादादा भांबावून व गडबडून गेले होते यांत संशय नाहीं. भांबावून व गोंधळून गेलेल्या स्थितींत

फक्त मन अक्रिय स्थितींत असतें, परंतु शरीराच्या हालचाली नेहमींच्या संवयीप्रमाणें स्वाभाविक होत असतात. डावाला तोड, चढाईला बचाव, वगैरे गोष्टी शरीराला मिळालेल्या संवयीप्रमाणें आपोआप होतात. त्याला अनुसरून राघोबादादांच्या हालचाली झाल्या व त्या झटापटीच्या हालचालींत ते नारायणरावांच्या पाठीवर येऊन त्यांनीं त्यांना आपल्या मगरमिठींत धरलें. राघोबादादांच्या व नारायणरावांच्या झटापटीला सुरवात झाल्यापासून त्या ठिकाणीं सुमेरसिंग, तुळ्या पवार वगैरे मंडळी येऊन आणि तुळ्या पवारानें नारायणरावांचे पाय ओढून त्यांना खालीं पाडून त्यांचेवर सुमेरसिंगानें वार करीतोंपर्यंतचा काल सुमारें पांच मिनिटांपेक्षां जास्त नसावा असें त्या वेळेच्या सर्व हकीकतीवरून दिसून येतें. एकंदरींत या अल्पशा अवधींत घडून आलेल्या लहानसहान गोष्टींचें स्मरण राघोबादादांना असणें अगदीं अशक्य होतें. म्हणून त्यांनीं आपणाला जे दोन वार लागले त्यासंबंधीं '**त्या गडबडींत** डोक्यावर व डाव्या हातावर असे दोनवार लागले' एवढीच माहिती दिली आहे. व ती यथार्थ व सत्य आहे. त्या गडबडींत कोणाच्या शस्त्रानें कसा वार झाला हें सांगणेंच अशक्य होतें. अशा स्थितींत राघोबादादांच्या डोक्यावर जो निसटता वार झाला व डाव्या हातावरही जो निसटता वार झाला तो केव्हां व कोणत्या शस्त्रानें झाला असला पाहिजे हें शस्त्रशास्त्र—पद्धतीनें ठरवितां येण्यासारखें आहे. 'जखम फार दुखत आहे. शेकावी लागते.' या माहितीवरून तिसऱ्या दिवशीं त्या जखमांची स्थिति फक्त वारंवार शेकण्यापुरतीच होती हें उघड होतें. यावरून पहातां राघोबादादांना ज्या दोन जखमा झाल्या त्या शरीराची त्वचा फाटून मांसलभागापर्यंतच खोल गेल्या असल्या पाहिजेत, त्यामुळें हाड कापलें अगर दुखावलें गेलेलें नव्हतें हेंही स्पष्ट होतें. वारंवार शेकून जखम लवकर भरून येण्यापुरतेच तिसऱ्या दिवशीं उपचार चालू होते, यावरून, त्या जखमा निसटल्या होत्या, तेग्याच्या वाराच्या जबर जखमा नव्हत्या, हें स्पष्ट आहे. राघोबादादांनीं नारायणरावांना पोटाशीं आलिंगून धरलेल्या स्थितींत जर सुमेरसिंगानें तेग्याचा वार केला असता, तर त्या वारानें राघोबादादांच्या

फक्त डोक्यावरचाच एक वार होणें शक्य होतें. डोक्यावरील वार चीरचा असतो, तो डोकें चिरूनच खालीं उतरूं शकतो. तेगा हें लवचिक शस्त्र नाहीं. तें शरीराच्या भागावर पहिल्यानें ज्या कोणांत स्पर्श करतें त्या कोणांतच तें आपलें चीरचें काम संपवून परत येतें. तेग्याच्या वाराचें हें लक्षण असल्यामुळें व डोकें आणि नारायणरावांना मिठी मारून धरलेला हात यांच्या कोणांत भलताच फरक असल्यानें एकाच वारानें डोक्यास व हातास जखमा होणें अशक्य आहे. या बाबतींत एका वारानें डोकें व हात या दोन ठिकाणीं जखमा होण्याची शक्यता एका विशिष्ट स्थितींत संभवते. राघोबादादांच्या डोक्यावर सुमेरसिंगानें चीरचा वार तेग्यानें केला व तो चुकविण्याकरतां राघोबादादांचा डावा हात ढालीप्रमाणें वर त्यांच्या डोक्याकडे गेला व त्यामुळें डोकें व हात अशा उभय ठिकाणीं वार झाला असेल अशी शंका येण्याचा संभव आहे. परंतु ती चुकीची आहे. डोक्याचें रक्षण करण्याकरतां हात पुढें आल्यावर पहिल्यानें हातावर तेग्याचा वार होईल व तो तुटून खालीं पडल्याशिवाय डोक्याला शस्त्राचा स्पर्श होणार नाहीं. राघोबादादांचा ज्याअर्थीं हात तुटलेला नाहीं व हातावरील जखम ज्याअर्थीं निसटत्या स्वरूपाची होती, त्याअर्थीं वरील विशिष्ट रीतीनें ती जखम झालेली नाहीं हें उघड आहे. या शिवाय आणखीही एक शंका या बाबतींत संभवते. ऐतिहासिक पुराव्यांतून राघोबादादांवर सुमेरसिंगानें एक वार केला असें जरी निघत असलें तरी डोक्यावर एक व हातावर एक असे दोन निरनिराळे वार केले नसतील कशावरून अशी शंका काढण्यास पळवाट आहे. ही शंकाही टिकाव धरूं शकत नाहीं. राघोबादादांनीं नारायणरावांना पोटाशीं कवटाळून धरलें होतें. अशा स्थितींत सुमेरसिंगानें समोर उभें राहून तेग्याचा कसाही वार केला असता तरी तो नारायणरावांच्या पाठीला न लागतां राघोबादादांच्या फक्त हातावरच होऊं शकला नसता. शिवाय नारायणरावांना बचावूनच केवळ राघोबादादांना जखमी करण्याचाही सुमेरसिंगाचा हेतु नव्हता. अर्थात् तो वार सफाईदार रीतीनेंच होणें शक्य होतें. व तसा तो झाला असता तर राघोबादादांच्या

हाताबरोबर नारायणरावांचीही पाठ चिरली गेली असती. परंतु तसा कोठेंच उल्लेख नसल्यामुळें सुमेरसिंगाच्या तेग्याच्याच वारामुळें राघोबादादांना डोक्यावर व हातावर अशा दोन जखमा झाल्या होत्या असें ह्मणणें चुकीचें आहे. याला शस्त्रशास्त्राची बिल्कुल संमति नाहीं. नारायणरावांना राघोबादादांच्या मिठींतून सोडविण्याकरतां निमचाप्रमाणें दुसऱ्याच एखाद्या लहान शस्त्रानें सुमेरसिंगानें प्रयत्न केला असेल, असें ह्मणावें तर, तसा प्रयत्न केला असल्याचा इतिहासांत कोठेंच उल्लेख नाहीं. सुमेरसिंग जो राघोबादादांच्या दिवाणखान्यांत शिरला तो कापाकापी करीतच आलेला होता. अर्थात् आपल्या हातांत आपला नग्न तेगा असलेल्या स्थितींतच तो राघोबादादांकडे आलेला होता हें निश्चित आहे. तेव्हां दुसऱ्या शस्त्रानें ते वार झाले असतील अशी शंकाच मुळांत उपस्थित होऊं शकत नाहीं. ह्मणून वरील सर्व परिस्थिति लक्षांत घेतां, राघोबादादांना जे दोन वार लागले, ते सुमेरसिंगाच्या हत्यारानें लागलेले नाहींत हें विधान स्पष्ट व खरें आहे हें सिद्ध होतें.

१९. आतां सुमेरसिंगाला वगळून दुसऱ्या कोणाच्या तरी हत्यारानें राघोबादादांना जखमा झाल्या होत्या हें उघड आहे. तुळया पवार, खरकसिंग महमद इसफ यांच्यापैकीं कोणाचें हत्यार राघोबादादांवर चाललें असल्याची इतिहासांत कोठेंच माहिती नाहीं. शिवाय तसें गृहित धरून चाललें तरी सुमेरसिंगाच्या हत्यारानें ज्या गोष्टी घडून आल्या असत्या त्याच यांच्यापैकीं कोणाच्याही हत्यारानें घडल्या असत्या व त्यामुळें राघोबादादांना जे वार ज्या ठिकाणीं व ज्या पद्धतीनें झालेले होते तसे ते होणें अशक्य होतें. म्हणून सुमेरसिंगाच्या हत्यारानें राघोबादादांना वार झाले नाहींत हें विधान जितकें स्पष्ट आहे तितकेंच इतर मंडळीकडून त्यांच्यावर वार झालेले नाहींत हेंही स्पष्ट आहे. त्याचप्रमाणें गडबडींत राघोबादादांचें स्वतःचें हत्यार स्वतःला लागलें म्हणावें तर राघोबादादा हे नारायणरावांच्या सक्त कैदेंत होते व ते त्या वेळीं निःशस्त्र स्थितींत होते. त्यांच्याजवळ कोणतें तरी शस्त्र होतें याचा इतिहासांत कोठेंही व कसलाही दाखला नाहीं. त्यामुळें तशा प्रकारचीही शंका येण्याचें कारण राहत नाहीं.

२०. आतां त्या वेळेची सर्व परिस्थिति लक्षांत आणतां जी एकच गोष्ट संभाव्य दिसते, ती म्हणजे नारायणरावांची व राघोबादादांची जी

झटापट झाली त्याच झटापटींत राघोबादादांना दोन्ही जखमा झाल्या. राघोबादादांना जी डोक्यावर जखम झाली ती कशी झाली हें पूर्वी चित्र नं. २ प्रमाणें दाखविलें गेलेंच आहे. तेव्हां येथें त्याची द्विरुक्ति करण्याचें कारण राहिलेलें नाहीं. आतां फक्त डाव्या हातावर जी जखम झाली ती कशी होणें शक्य होतें हें येथें पहाणें आहे. चित्र नं. ३ मध्यें दाखविल्याप्रमाणें राघोबादादा नारायणराव यांच्या पाठीवर येऊन त्यांनीं त्यांना मिठी मारून धरलें. आपल्या उजव्या हातानें नारायणरावांचा तरवार असलेला उजवा हात त्यांनीं धरला व आपला डावा हात नारायणरावांच्या डाव्या बगलेतून त्यांच्या छातीवर घेऊन त्या स्थितींत राघोबादादांनीं त्यांना दाबून धरलें. त्यामुळें राघोबादादांचा डावा हात चित्र नं. ३ मध्यें दाखविल्याप्रमाणें नारायणरावांच्या डाव्या स्तनमंडल प्रदेशावरून ऊर्ध्व गतीनें त्यांच्या उजव्या बगलेकडे गेला; म्हणून राघोबा-दादांना आपल्या छातीचा दाब नारायणरावांच्या पाठीला देऊन व नारायण-रावांचें प्रतिकारसामर्थ्य लुलें करून त्यांना पकडींत धरतां आलें. अशा स्थितींत राघोबादादांच्या वधाची नारायणरावांची कल्पना नष्ट झाली व त्यांनीं अखेर आपला निर्णय आत्महत्येचा ठरविला. त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या डाव्या हातांतील निमचाचा वार निश्चयानें मरण यावेंच या बुद्धीनें जो मारून घेतला तो प्राप्त परिस्थितीमुळें नारायणरावांच्या डाव्या स्तनमंड-ळावरून राघोबादादांचा जो डावा हात गेला होता, त्याला चाटून, हृदय-स्थानावरून आमाशयद्वार कापून, खालीं नाभीपर्यंत उतरला. त्या वेळीं निमचाची धार अधोमुखी असल्यामुळें व त्याचें टोंक चपटें असल्यामुळें त्याची वरील बाजूची कोर राघोबादादांच्या डाव्या हाताला चाटून गेली. त्यामुळें त्यांच्या कोंपराजवळील मनगटाच्या मांसल भागांत जखम झाली. नारायणराव राघोबादादांच्या दिवाणखान्यांत आले त्या वेळीं त्यांच्या उजव्या हातांत तरवार होती. त्या वेळीं त्यांच्या डाव्या हातांत निमचा होताच असें म्हणतां येत नाहीं. निमचा त्यांच्याजवळ होता ही गोष्ट मात्र स्पष्ट आहे. तो कदाचित् चित्र नं. ३ मध्यें दाखविल्याप्रमाणें कमरपट्ट्यांतही खोंचून ठेवलेला असूं शकेल. आत्महत्या करून घेण्याचा निर्णय नारायणरावांनीं

घेतल्याबरोबर एका निमिषांत डाव्या हातानें कमरेला खोंचून ठेवलेला निमचा काढून घेणें त्यांना शक्य होतें. त्या स्थितींत जरी तो काढून घेतला व स्वतःवर वरीलप्रमाणें वार करून घेतला, तरी निमचाच्या धारेची दिशा अधोमुखीच राहूं शकते. व त्यामुळेंच राघोबादादांच्या डाव्या हाताला निसटता वार लागून नारायणरावांचा आमाशय फाटून ती चीर खालीं नाभी-पर्यंत जाऊं शकते. एकंदरींत राघोबादादांना जो डोक्यावर वार झाला तो नारायणरावांच्या हातांतील तरवारीमुळें झाला व डाव्या हातावर जो वार झाला तो निमचामुळें झाला हें अगदीं स्पष्ट आहे. याखेरीज या बाबतींत त्या वेळेच्या परिस्थितीशीं व शस्त्रशास्त्राची जुळती होणारी दुसरी कोणतीच कृति असू शकत नाहीं. यावरून मुद्दा नं. २ वरील विवरण आत्महत्येच्या मुद्याला पूर्णपणें अनुकूल आहे असा निर्णय ओघानेंच येतो.

२१. तिसरा मुद्दा 'आत्महत्या करून घेऊनच मरावें अशी त्या प्रसंगीं नारायणरावांना प्रेरणा होणें व तसें करण्यास त्यांस संधि आणि साधन मिळणें शक्य होतें काय?' असा आहे. या मुद्याचीं स्वतंत्र तीन प्रकारचीं लक्षणें आहेत. (१) नारायणरावांना आत्महत्या करून घेण्याची प्रेरणा होणें, (२) त्या प्रेरणेनुसार त्यांना आत्महत्या करून घेण्याला संधि मिळणें व तशी ती मिळाल्यानंतर (३) आत्महत्या करून घेण्याला जें साधन लागतें तें त्या वेळीं त्यांच्याजवळ असणें अशीं तीं तीन लक्षणें आहेत. आत्महत्या करून घेण्याच्या पहिल्या 'प्रेरणेच्या' लक्षणांत त्या व्यक्तीच्या स्वभाव-धर्माचा अंतर्भाव होतो. नारायणरावांचा स्वभाव संशयी, भित्रा, अविचारी, स्वच्छंदी, क्रूर, निष्ठुर, निर्भयी, द्वेषी साहसी वगैरे स्वरूपाच्या मिश्रणाचा होता. ते संशयी, भित्रे किंवा भ्याड (Coward) व अविचारी कसे होते याचें वर्णन प्रकरण ९ वें कलम ३७ व ३८ यामध्यें आलेलें आहे. तसेंच ते स्वच्छंदी, क्रूर, निष्ठुर, निर्भयी व द्वेषी कसे होते याचें वर्णनही प्रकरण ११ वें कलम ७ यांत आलेलें आहे. लोकांचीं नाकें, कान, हात तोडून आपल्या बाललीलांची हौस ते पुरवून घेत असत. त्यांना अधिका-राचा मद चढला होता. राघोबादादांना सुद्धां ते चार चार, आठ आठ दिवस उपोषणें घालीत असत. आपल्या प्रत्यक्ष काकीला म्हणजे आनंदीबाईंना

विरुद्ध करून त्यांचा ते छळ करीत होते ही हकीकत वाचली म्हणजे ते अधिकारमदानें किती उद्दाम, स्वच्छंदी, क्रूर, निष्ठुर निर्भयी आणि द्वेषी बनलेले होते हें निराळें सांगण्याची जरूरी रहात नाहीं. आपल्या प्रत्यक्ष काकाचा–राघोबादादांचा वध करण्याकरतां नारायणरावांनीं यावें आणि तेंही ते बंदिवासाच्या हालअपेष्टा सोशीत असलेल्या व निःशस्त्र असलेल्या स्थितींत असतां, मागचा पुढचा विचार न करतां, नारायणरावांनीं त्यांच्यावर एकदम हत्यार चालवावें हें सामान्य साहस खात्रीनें नाहीं. एकंदरींत नारायणरावांचा स्वभाव वर दर्शविल्याप्रमाणें बनलेला होता. त्यांचा तसा स्वभाव कां बनला होता याचीं कारणें निरनिराळीं असूं शकतील. भलत्याच लाडानें त्यांना 'बाळ, बाळ' म्हणून सर्वांनीं वाढविल्यामुळें ते तसे बनले असतील; किंवा हलक्या लोकाच्या सहवासानें त्यांचा तसा स्वभाव झाला असेल. अथवा असेंही असूं शकेल कीं, त्यांच्यावर शिक्षणाचा संस्कार न झाल्यानें व योग्य वळण लावणाऱ्या इसमाच्या सहवासांत व धाकांत त्यांना राहण्याची फारशी संधि न मिळाल्यामुळें ते तसे बनले असतील. दुर्मंत्रानेंही अशा प्रकारचा स्वभाव बनूं शकतो. राजवाड्यांत अनंत प्रकारच्या स्वभावाचीं माणसें वावरत असतात. राजपुत्रांच्या बाललीला कशाही भल्या अगर बुऱ्या असल्या तरी त्या सर्वांचें कोडकौतुक करणारीं माणसें त्यांना सहज मिळतात. त्यामुळें चांगल्यावाईटाची निवड स्वतःच्या मनाशीं त्यांना करतां येत नाहीं. आपण जें करतों तें सर्वच चांगलें असतें अशी त्यामुळें त्यांची कल्पना होऊन बसते. अशा स्थितींत दुर्मंत्र देणारीं स्वार्थी माणसें सान्निध्यांत असलीं म्हणजे पहावयालाच नको. माकडाच्या हातीं कोलीत दिल्याप्रमाणें तो एक प्रकारचा प्रळयच होऊन बसतो. नारायणरावांचें वय सहा वर्षांचें असतांनाच त्यांचे वडील नानासाहेब हे परलोकवासी झाले. त्यांच्या मातोश्री गोपिकाबाई या त्यांना त्यांच्या नवव्या वर्षींच माधवराव पेशव्यांच्या जवळ ठेऊन नाशकाला निघून गेल्या. त्यामुळें मातापितरांच्या प्रत्यक्ष सहवासाला ते अगदीं अर्भकावस्थेंत असतांनाच पारखे झाले. पुढें माधवराव पेशव्यांच्या देखरेखीखालीं ते वाढूं लागले. परंतु माधवराव यांची पुढील सात आठ वर्षें पेशव्यांच्या

राज्याच्या सुव्यवस्थेच्या उलाढालींत व मोहिमेच्या दगदगींत गेल्यामुळें नारायणरावांना त्यांचा प्रत्यक्ष असा सहवास फारच थोडा घडला. त्या अवधींत राघोबादादा हे माधवरावांच्या नजर कैदेंत असल्यामुळें त्यांचाही सहवास त्यांना घडूं शकला नाहीं. त्यामुळें वयाच्या नवव्या वर्षापासून तों वयाच्या सत्राव्या वर्षापर्यंत, ह्मणजे ऐन शिक्षणाचें वळण लागण्याच्या कालांतच, त्यांच्याकडे सर्व बाजूनें दुर्लक्ष झालें. त्या अवधींत त्यांच्यावर फक्त नानांचीच देखरेख राहिली. नारायणराव वयांत आल्यावर पेशव्यांच्या कारभारीपणाचा अधिकार त्यांच्याकडे सहज जाणार हें नाना जाणून होते. तेव्हां आपलें कारभारीपणाचें पद त्यांच्याकडे न जावें एवढी धूर्तता नानांनीं खात्रीनें घेतलीच असली पाहिजे. अर्थात् नारायणराव शहाणे न होतां ते सतत ‘ बाळच ’ रहावे अशी शिकवणूक त्यांना नानांनीं दिली असेल यांत संशय नाहीं. या नानांच्या दुर्मंत्र व स्वार्थी शिक्षणामुळें नारायणरावांच्या स्वभावांत वरील दुर्गुण शिरले असें ह्मटल्यास तें अयोग्य ठरणार नाहीं. नारायणरावांचा ‘ च्छांदिष्टपणा ’ पाहून माधवराव ज्या वेळीं त्यांना चांगलें वळण लागण्याकरतां बोलत असत, त्या वेळीं नानांचे हस्तक पुरुषोत्तम दाजी हे नारायणरावांचा पक्ष घेऊन माधवरावांना ‘ सांभाळून ’ घ्यावें ’ असें ह्मणत. यामुळें नारायणराव यांस वळण लावण्याचे बाबतींत माधवराव यांचे पाय नानांच्या पक्षांतील लोकांकडून ओढले जात होते व व तशा वातावरणांत नारायणराव वाढल्यामुळें त्यांच्या स्वभावाला च्छांदिष्ट, लहरी व निर्भयतेचें वळण लागून ते दिवसेंदिवस मूर्ख बनत चालले होते.

२२. माधवरावांच्या मृत्यूच्या वेळीं ‘ नारायणरावांचा प्रतिपाळ करण्याविषयीं नानांनीं छातीला हात लावून जें त्यांना सांगितलें होतें[1] त्याचें कारण असें होतें कीं जोंपर्यंत राजा मूर्ख, दुराचारी व दुर्गुणी असतो, तोंपर्यंतच त्याच्या कारभाऱ्याचें महत्व राहत असतें, हें नानांना पूर्णपणें अवगत होतें. राजा शहाणा, कर्तृत्ववान झाला ह्मणजे कारभाऱ्याचें महत्व कमी होतें. याकरितांच सर्वसाधारणपणें अधिकारलालसेला सोकावलेले

---

१. प्रकरण ९ वें कलम ३७.

कारभारी राजांना शहाणे होऊं देत नाहींत. अशा प्रकारच्या सहवासाच्या कोंडींत सांपडलेल्या नारायणरावांना पाहून माधवराव ह्मणत होते कीं 'याच्या कपाळीं राज्य नाहीं.' नारायणरावांचा च्छांदस स्वभाव पाहून माधवरावांनीं त्यांना नानांच्या हवालीं न करतां शेवटीं राघोबादादांच्या स्वाधीन केलें. त्यांच्या जरबेंत ते सुमारें चार महिने सुतासारखे सरळ वागतात न वागतात तोंच, राघोबादादांना नानांच्या पक्षानें कैद केलें व तेव्हांपासून नारायणराव पुन्हां नानांच्या शिक्षणांत गेले. त्या अवधींत नारायणरावांच्या बाळलीलांना ऊत आला व त्यांच्या कानांत अधिकाराचें वारें शिरून ते बेफाम स्थितींत वागूं लागले. त्या त्यांच्या स्थितीची झळ इतरांप्रमाणें शेवटीं प्रत्यक्ष नानांनाही लागली. एकंदरींत अधिकाराच्या मदानें नारायणराव स्वाभाविकपणें अविवेकी बनले होते यांत संशय नाहीं.

२३. राघोबादादा कैदेंत असतां त्यांचा जो छळ झाला त्याला नानांची शिकवणूकच कारणीभूत झाली होती. त्यांच्याच शिकवणुकीमुळें नारायणरावांच्या मनांत राघोबादादा व आनंदीबाई यांच्याविषयीं जालीम विष कालवलें गेलें होतें असेंच नारायणरावांच्या बेडर बनलेल्या मनोवृत्तीवरून स्पष्ट होतें. अशा तुफान मनाच्या बनलेल्या स्थितींत असतांना राघोबादादांनीं फितुर केला अशी समजूत झाल्यामुळें ते त्यांचा सूड घेण्याच्या इराद्यानें आपल्या जागेवरून निघाले. त्या वेळीं त्यांच्या मनांत स्वतःच्या रक्षणाची तिळमात्र भीति नव्हती; केवळ राघोबादादांच्या नाशाचे विचार त्यांच्या मनांत थैमान घालीत असावेत असें दिसतें. राघोबादादांच्या वधाला प्रवृत्त होऊन ज्या वेळीं ते आपला दिवाणखाना सोडून निघाले, त्या वेळीं नारोजी नाईक यास असें वाटलें कीं नारायणराव आत्मरक्षणाकरतां राघोबादादा यांचेकडे जात असावे ह्मणून तो त्यांना ह्मणाला 'नहराची (नळाची) वाट मजला ठाऊक आहे. तिकडून तुह्मांस घेऊन जातों.' याचें उत्तर नारायणरावांनीं केलें कीं 'या सालीं पाण्यांतील सर्पभय जोतिषानीं सांगितलें आहे.' हें उडवा उडवीचें उत्तर देऊन नारोजी नाईकाचें सांगणें त्यांनीं ऐकिलें नाहीं. ते जिना उतरून खालीं आले व पार्वतीबाईच्या दिवाणखान्यांत शिरले. तेथें त्यांची व पार्वतीबाईची भेट झाली. त्यांनीं नारायणरावांना सांगितलें कीं, 'मी

तुला लपविते. तूं कांहीं भिऊं नको आणि तुला मी पारखी करतें.' परंतु नारायणरावांनीं पार्वतीबाईंचें हें सांगणें ऐकिलें नाहीं व ते तेथून 'मी दादासाहेब यांचेकडे जातों.' असें ह्मणून निघून गेले. ही हकीकत नागपूरकर भोंसले यांची बखर व हरिवंशाची बखर एकत्र वाचिली असतां लक्षांत येते. यावरून पहातां नारायणरावांना राघोबादादांकडे जाण्याची जी आतुरता उत्पन्न झाली होती ती केवळ त्यांचा वध करण्याकरतां ठाम होती यांत संशय नाहीं. यानंतर प्रकरण १३ वें कलम ९ चें पत्र वाचलें असतां त्या वेळीं नारायणरावांची मनोवृत्ति कशी झाली होती हें दिसून येईल. 'नारायणरावांनीं दादासाहेबांस नाटकशाळेंत **गांठलें. "रुबरु** बोलिले जे. **तुमचे गाडदी** वाड्यांत शिरले. तुह्मीं आपला जीव सांभाळणें." ह्मणून **तरवार उपसली.**' यावरून राघोबादादांचा वध करण्याच्या निंद्य हेतूनेंच नारायणराव त्यांच्या दिवाणखान्यांत शिरलेले होते हें स्पष्ट आहे. राघोबादादांविषयीं जें विष नारायणरावांच्या मनांत कालविलें गेलें होतें त्याची फलश्रुती त्यांचा वध करण्यामुळें साध्य होईल असें नारायणरावांना वाटत होतें, हेंही निर्विवाद ठरतें. राघोबादादांना मारणें ह्मणजे स्वतःचें स्थान अढळ करणें ही नारायणरावांच्या विचारांची संगती होती. अर्थात् राघोबादादा जर जिवंत राहतील तर आपणाला जगतांच येणें अशक्य आहे असाच निर्धार उलटपक्षीं नारायणरावांच्या विचारसंगतीचा असला पाहिजे यांत तिळमात्र शंका नाहीं. एकंदरींत वरील सर्व अविचारी व बेफाम मनोधर्माच्या स्थितींत नारायणराव हे निःशस्त्र अशा राघोबादादांचा वध करण्यास काय वेळ लागणार आहे अशा घमेंडींत व अधिकाराच्या धुंदींत त्यांच्या दिवाणखान्यांत गेले व त्यांना त्यांनीं मरणाला सिद्ध होण्याचें आव्हान दिलें.

२४. राघोबादादा निःशस्त्र असल्यामुळें एका तरवारीच्या फटकाऱ्याबरोबर आपण त्यांना यमसदनाला पाठवूं, अशी जी नारायणरावांची कल्पना होती ती, राघोबादादा त्यांचा वार चुकवून त्यांच्या पाठीवर येऊन त्यांना आपल्या मगरमिठींत आवळून धरीपर्यंत होती. परंतु राघोबादादांच्या प्रभावशाली बचावाची व चढाईची नारायणरावांना कल्पना येतांच ते गलित-

धैर्य झालें व त्यांच्यापुढें त्या वेळीं '**जगावें कीं मरावें**' हा स्वाभाविक प्रश्न उत्पन्न झाला. या प्रश्नास वर निर्दिष्ट केलेल्या त्यांच्या स्वभावाला अनुसरून 'मरावें' असेंच उत्तर मिळालें असलें पाहिजे असें स्पष्ट ठरतें. नारायणरावांनीं मरण्याचा निर्णय घेतल्यानंतर तें मरण अर्थात् दुसऱ्याकडून येणें त्यांना त्या वेळीं शक्य न वाटल्यामुळें आत्महत्या करून मरण्याचा एकच मार्ग त्यांना मोकळा राहिला होता आणि त्याचाच अवलंब करणें त्यांना त्या वेळीं प्राप्त होतें.

२५. मनुष्याचा खरा स्वभावधर्म अगदीं आणीबाणीच्या प्रसंगीं सहज प्रकट होत असतो. कांहीं माणसें रागानें तर कांहीं माणसें दुःख, संकट भीति वगैरेंनीं विवेकशून्य होऊन बुद्धीच्या स्थानीं बेतोल होत असतात. तीच स्थिति त्यांच्या आणीबाणीच्या प्रसंगाची असते. प्रत्येक प्राणीवाचकाचा हा स्वभावधर्मच असतो. कांहीं प्राणी प्रसंगाचे वेळीं प्रतिपक्षावर तुटून पडतात; कांहीं प्राणी पळून जातात; कांहीं प्राणी आपल्या माना वर करून देऊन भक्षकाच्या आहारीं जातात आणि कांहीं प्राणी कडे, दऱ्या, खड्डे, विहिरी वगैरे जें दिसेल त्यांत उड्या घेतात. भावार्थ एवढाच कीं, प्राण्यांच्या जातिविशिष्ट स्वभावधर्मानुसार त्यांच्या त्या त्या पद्धतीच्या क्रिया घडत असतात. मनुष्यस्वभावाचें असेंच आहे. मनुष्याच्या व्यक्तिविषयक काळजाच्या धर्मावर त्याची आणीबाणीच्या प्रसंगीं क्रिया घडत असते. काळजाचा धर्म पिढयानुपिढया सर्वसाधारणपणें मनुष्यजातींत वसत असतो. पानिपतच्या लढाईंत पराभव झाला आणि विश्वासराव मृत्युमुखीं पडून सदाशिवरावभाऊ बेपत्ता झाले या बातमीनें नानासाहेबांची कंबर खचली व ते त्या दुःखानें लवकरच कैलासवासी झाले. यावरून नानासाहेबांचा काळिजा सिंहाच्या गुणधर्माचा नसून तो खात्रीनें नरम व भित्रा होता. त्यांचे पुत्र माधवराव हे जरी शूर लढवय्ये होते तरी त्यांच्याही काळजाचा धर्म नरमच होता. ते शेवटीं आजारी पडले त्या वेळीं शारीरिक व मानसिक वेदना त्यांना सहन झाल्या नाहींत. त्यांनीं त्यांतून मुक्त व्हावें म्हणून एक दोन वेळां खंजीर खुपसून घेऊन आत्महत्या[1] करून घेण्याचाही प्रयत्न केला होता. नारायणराव पेशव्यांचे पुत्र सवाईमाधवराव

---

1. प्रकरण ९ वें कलम २०

यांनी नानांच्या जाचाला कंटाळून आत्महत्या करून घेतली. या नानासाहेबांच्या शाखेच्या पुरुषांच्या कलिजांचा स्वभावधर्म आत्महत्येच्या प्रवृत्तीचा असलेला दिसतो. नारायणराव हे याच शाखेच्या मालिकेंत असल्यामुळें त्यांच्याही कलिजाचा धर्म ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं आत्महत्येकडेच वळला जाण्याचा विशेष संभव होता असें समजण्यास हरकत नाहीं. याप्रमाणें आनुवंशिक संबंधाचे दृष्टीनेंही पहातां ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं नारायणराव आत्महत्येलाच प्रवृत्त होणें जास्त संभवनीय होतें असें ठरतें.

२६. वरील सर्व विवेचनावरून नारायणरावांची प्रवृत्ति आत्महत्येकडे स्वाभाविकपणें होती हें स्पष्ट दिसून येतें. परंतु केवळ प्रवृत्ति असण्यानेंच आत्महत्या करून घेण्याचें कार्य घडूं शकत नाहीं. आत्महत्या घडून येण्याला तशी संधि व साधन यांची जरूरी लागते. म्हणून त्यांच्या मानसिक प्रवृत्तीला तशा संधीची व तशा साधनाची जोड मिळाली किंवा नाहीं हें येथें पहाणें जरूर आहे. चित्र नं. ३ मध्यें दाखविल्याप्रमाणें राघोबादादा नारायणरावांच्या पाठीवर ज्या वेळीं आले व त्यांनीं नारायणरावांना आपल्या बिनोटी विद्येच्या कौशल्यानें ज्या वेळीं आपल्या मगरमिठींत पकडलें, त्या वेळेपासून तों नारायणराव काकुळतीस येईपर्यंत म्हणजे त्यांची प्रतिकाराची धडपड बंद पडेपर्यंतचा काल, नारायणरावांना आत्महत्या करून घेण्यास योग्य संधीचा असाच तो होता. राघोबादादा नारायणरावांच्या पाठीवर असल्यामुळें नारायणरावांच्या पोटावर घडून येणारी क्रिया त्यांच्या दृष्टिपथाच्या आड होती व ती त्यांना अनपेक्षित असल्यामुळें त्या घटनेकडे राघोबादादांचें लक्षच असणें अशक्य होतें. त्यामुळें नारायणरावांच्या आत्महत्येच्या प्रयत्नाला राघोबादादांकडून विरोध होण्याचा अगदीं संभव नव्हता. शिवाय राघोबादादांची क्रिया नारायणरावांना छातीच्या ठिकाणीं डाव्या हातानें दाबून धरून त्यांचा प्रतिकार बंद पाडण्याकरतां मागील बाजूला ताणून व ओढून धरण्याची व उजव्या हातानें नारायणरावांच्या उजव्या हातांतील तरवार गळून खालीं पाडविण्याची सुरूं होती. त्यामुळें नारायणरावांना आत्महत्या करून घेण्याला सुसंधि मिळाली. नारायणरावांच्या त्या वेळेच्या बेफाम स्थितींत आत्महत्येच्या विचाराची ठिणगी पडण्याचाच फक्त अवकाश होता. त्यांचा डावा हात मोकळा होता. त्यांच्याजवळ

'**हातचा**[1] **निमचा**' होता. एकंदरींत मुद्दा नं. ३ वर विचार करतां आत्महत्या करून घेऊनच मरावें अशी त्या प्रसंगीं नारायणरावांना प्रेरणा होणें व तसें करण्यास त्यांस संधि आणि साधन मिळणें शक्य होतें असेंच पूर्ण विचारांतीं ठरतें.

२७. चवथा मुद्दा 'नारायणरावांच्या आत्महत्येसंबंधीं ऐतिहासिक उघड पुरावा अंशतः सुद्धां कां नाहीं?' असा आहे. त्या वेळेचीं पत्रें, बखरी, इतिहास वगैरे सर्व कांहीं चाळून पाल्थें केलें तरी त्यांत नारायणरावांनीं आत्महत्या करून घेतली; निदान त्यांनीं तसा प्रयत्न तरी केला, असा एकही लेख अगर केवळ शंका सुद्धां कोणी प्रकट केलेली दिसून येत नाहीं. याचें कारण काय असावें हेंही येथें पहाणें आवश्यक आहे. नानांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे 'हे करूं गेले एक व झालें भल्तेंच' असें नारायणरावांच्या मृत्यूसंबंधीं लोकमत होतें. नारायणरावांच्या मृत्यूविषयीं अघटित घटना होती व कोणाच्या मनाला शंका सुद्धां येणार नाहीं इतकी ती अनपेक्षित आणि अकल्पित होती याबद्दल कोणाचेंच दुमत नाहीं. नारायणरावांच्या केवळ मृत्यूमुळें लोकांची विचारशक्ति ज्या ठिकाणीं दिङ्मूढ होऊन गेली होती व प्रत्यक्ष डोळ्याला ज्या ठिकाणीं नारायणरावांच्या देहावर सुमेरसिंगाचें शस्त्र चाललेलें दिसत होतें त्या ठिकाणीं त्यांच्या मृत्यूच्या बाबतींत एकादी पडद्याआड लपलेली अघटित घटना असावी अशी शंका सुद्धां त्या वेळीं कोणाच्या मनाला स्पर्श करून जाण्यासारखी नव्हती; इतकें त्यांच्या मृत्यूचें कारण दृष्टीला स्पष्ट दिसणारें होतें. नारायणरावांच्या मृत्यूच्या प्रसंगीं राघोबादादा, सुमेरसिंग, खरगसिंग, महंमद इसब आणि तुळ्या पवार एवढीतरी कार्यकर्ती मंडळी प्रत्यक्ष हजर होती यांत संशय नाहीं. दुसरी कांहीं मंडळी असल्यास ती नारायणरावांप्रमाणें मृत्यूमुखीं पडली व कांहीं भीतीनें गर्भगळित झाली असें गृहित धरून चालल्यास त्या दृष्टीनें कांहीं नवीन बातमी त्यांच्याकडून मिळणें शक्य नव्हतें, हेंही खरें आहे. परंतु वरील पांच मंडळी तेथें हजर असतांना त्यांच्याकडून नारायणरावांच्या आत्महत्येला पोषक अशी अंशतः तरी कल्पना येण्यासारखी माहिती सहज बाहेर निघावयास पाहिजे होती; परंतु तसाही

१. प्रकरण १३ वें कलम १९ वें व चित्र नं. ६.

प्रकार पुढें कोठें झालेला आढळून येत नाहीं. नारायणरावांच्या वधाच्या बाबतींत खरा गुन्हेगार कोण याची ज्या वेळीं चौकशी सुरू झाली त्या वेळीं प्रत्येकानें आपापल्या कानावर हात ठेवले होते. शिवाय वरील राघोबादादादि पांच इसमांवर या गुन्ह्याचा प्रत्यक्ष आरोप येत असतांना आपल्या बचावाकरतां सुद्धां ज्याअर्थी त्यांच्याकडून नारायणरावांच्या आत्महत्येचा प्रश्न उत्पन्न झाला नाहीं, त्याअर्थी ही पाचही मंडळी याविषयीं पूर्ण अज्ञान स्थितींत होती हें स्पष्ट आहे. आतां ती या महत्वाच्या मुद्यासंबंधीं इतकी कशी अज्ञानांत राहूं शकली हें पहाणें अत्यंत महत्वाचें आहे.

२८. मागें दर्शविल्याप्रमाणें राघोबादादा नारायणरावांच्या पाठीवर असतांना व त्यांची क्रिया नारायणरावांच्या चढाईचा प्रतिकार करण्याची व त्यांना निःशस्त्र करण्याची चालू असल्यामुळें नारायणराव हे आत्महत्या करून घेण्याचा प्रयत्न करतील ही कल्पनाच त्या धांदलींत त्यांना येऊं शकली नाहीं. शिवाय नारायणरावांनीं **हातच्या निमचाचा वार** आपल्या देहावर चालवून घेतला ही स्थिति राघोबादादांच्या दृष्टिपथाच्या पूर्णपणें आड होती. त्यामुळें एका निमिषांत घडून येणारी क्रिया त्यांना समजणें अगर दिसणें त्या वेळीं अगदीं अशक्य होतें. त्या गडबडींत नारायणरावांची प्रतिक्रिया ज्या वेळीं एकदम बंद पडली व त्यांच्याजवळील हत्यारेंही खालीं गळून पडलीं त्या वेळीं राघोबादादा स्वसंरक्षणाच्या जबाबदारींतून मुक्त झाले व नंतर त्यांचें अपत्यप्रेम जागृत झालें. त्या स्थितींत त्यांनीं नारायणरावांना फिरवून आपल्या छातीशीं कवटाळून धरलें. राघोबादादांच्या मनःस्थितीची ही वेळ फार गोंधळाची झालेली असली पाहिजे यांत तिळमात्र शंका नाहीं. एकीकडे अपत्यप्रेमाचा कळवळा, दुसरीकडे वडीलपणाच्या नात्याची जबाबदारीची व लौकिकाची टोंचणी आणि तिसरीकडे स्वतःला लागलेल्या जखमांच्या वेदनामुळें व रक्तस्रावामुळें सहज येणारी ग्लानि अशी त्यांची बेभानाची स्थिति झालेली होती. त्यामुळें नारायणरावांनीं अनपेक्षितपणें आत्महत्येचा केलेला प्रयत्न व त्याचे झालेले परिणाम राघोबादादांच्या मेंदूला जाऊन भिडूं शकले नाहींत यांत मुळींच नवल नाहीं. ही स्थिति होणें अगदीं स्वाभाविक होतें. तसेंच सुमेरसिंग वगैरे मंडळी त्या ठिकाणीं आल्यावर त्यांना राघो-

बादादांनीं नारायणरावांना पोटाशीं आलिंगून धरलेलें केवळ दिसलें. नारायणरावांच्या पोटाचा भाग पूर्णपणें त्या वेळीं झांकलेला होता व त्यामुळें त्यांच्या पोटावर झालेला शस्त्रप्रयोग राघोबादादांना दिसूं शकला नाहीं. नारायणरावाची पाठच तेवढी त्यांच्या दृष्टिपथांत आली होती. त्यामुळें नारायणरावांच्या आत्महत्येच्या प्रयत्नाच्या कल्पनेसंबंधीं ते पूर्णपणें अज्ञानस्थितींत राहिले. तुळ्या पवारानें नारायणरावांचे पाय धरून त्यांना जमिनीवर जेव्हां पाडलें त्या वेळीं ते जर उताणे पडले असते तर त्यांच्या पोटावरील शस्त्राचा वार व रक्ताच्या प्रवाहानें ओले झालेले कपडे त्यांना दिसून आले असते व कांहीं तरी विपरीत घटना घडून आल्याची शंका त्यांना आली असती. परंतु तुळ्यानें नारायणरावांचे पाय राघोबादादांनीं त्यांना आपल्या मिठींत आलिंगून धरलेल्या स्थितींत ओढल्यामुळें ते स्वभावतः तोंडघशीं जमिनीवर पडले. त्यामुळें नारायणरावांचा पोटाचा भाग त्या वेळीं सुमेरसिंग, तुळ्या पवार वगैरे सर्वच लोकांना दिसूं शकला नाहीं. अशा रीतीनें तोंडघशीं पडलेल्या स्थितींतच सुमेरसिंग यानें त्यांच्यावर हत्यार चालविलें. ही त्या वेळेची सर्व हकीकत लक्षांत घेतां ती किती गोंधळाची होती याची कल्पना सहज येईल. 'नारायणरावसाहेब यांची शुद्धि गेली; कांहीं सुचेनासें झालें. मग गारद्यांनीं वारावर वार केले' अशी जी माहिती पेशव्यांच्या[१] बखरींत दिलेली आहे त्याचा भावार्थ लक्षांत घेतां त्या वेळेच्या गडबडीची व त्या ठिकाणीं असलेल्या मंडळीच्या मनस्थितीची कल्पना सहज होईल. एकंदरींत पहातां देहभान गेलेल्या स्थितींत नारायणरावांवर गारद्यांनीं वार केले हें नक्की ठरतें. त्यांचें देहभान कशानें गेलें होतें यासंबंधीं वरील हकीकतीवरून नक्की अनुमान निघतेंच. मागें तेराव्या प्रकरणांत पत्रें, बखरी वगैरेंचे जे उतारे देण्यांत आले आहेत, त्यांतील माहितीची गोळाबेरीज केली असतां व त्या वेळेच्या धांदलीची आणि त्या प्रसंगांतील प्रत्येक व्यक्तीच्या मनोधर्माची शक्याशक्यतेच्या दृष्टीनें छाननी केली असतां असें दिसून येईल कीं, नारायणरावांनीं आत्महत्या करून घेतली असली पाहिजे असा संशयही कोणास येण्यासारखा नव्हता. नारायणरावांची क्रिया सर्वांना अज्ञानांत ठेवणारी अशी

१. प्रकरण १३ कलम ७ वें.

घडून आल्यामुळें त्या बाबतींत उघड ऐतिहासिक पुरावा मिळणें कसें शक्य नाहीं हें स्पष्ट दिसून येईल. एकंदरींत सर्व बाजूंनीं प्रत्यक्ष घडून आलेल्या हकीकतीचा विचार करतां मुद्दा नं. ४ वरील निर्णय नारायणरावांच्या आत्महत्येलाच पोषक आहे असें निर्विवाद ठरतें.

२९. पांचवा मुद्दा "नारायणराव पेशवे यांच्या मरणाचें खरें कारण कोणतें, 'खून कीं आत्महत्या?" असा आहे. मागील विवेचनावरून नारायणरावांनीं आपल्या 'हातच्या निमचानें' आत्महत्या करून घेण्याचा प्रयत्न केला येथपर्यंतची मांडणी व त्यासंबंधींची शक्यता पूर्णपणें दाखविण्यांत आली; परंतु त्या त्यांच्या आत्महत्येच्या प्रयत्नानें ते मेले कीं, सुमेरसिंगाच्या तेग्याच्या शस्त्राच्या वारानें त्यांना मृत्यु आला हें ठरविणें महत्वाचें आहे. आत्महत्येचा प्रयत्न केल्यानें ती खरी आत्महत्या ठरूं शकत नाहीं. आत्महत्येच्या प्रयत्न होऊन त्या प्रयत्नानें जर मृत्यु येईल तरच ती आत्महत्या होऊं शकेल. तुळ्या पवारानें नारायणरावांचे पाय धरून त्यांना ओढून जमिनिवर पाडलें नसतें व त्यांच्या शरीरावर सुमेरसिंगानें शस्त्र चालविलें नसतें तर नारायणरावांनीं जो आत्महत्येचा प्रयत्न केला त्या प्रयत्नानें ते मरूं शकले असते किंवा काय हा मुख्य मुद्याचा प्रश्न आहे. यांतच 'नारायणरावांचा खून कीं, आत्महत्या?' या विधानाचें सर्व रहस्य दडून बसलेलें आहे. म्हणून त्या दृष्टीनें येथें चिकित्सा करणें प्राप्त आहे.

३०. मागें चित्र नं. ३ मध्यें दाखविल्याप्रमाणें नारायणरावांच्या पाठीवर राघोबादादा आले व त्यांनीं नारायणरावांना आपल्या मिठींत ज्या वेळीं पकडलें त्या वेळीं राघोबादादांनीं आपल्या उजव्या हातानें नारायणरावांचा उजवा हात धरला होता व आपला डावा हात नारायणरावांच्या डाव्या बगलेंतून घालून त्यांच्या स्तनमंडळावरून ऊर्ध्वगामी नेऊन त्यांच्या उजव्या खांद्याकडे नेला व तेथें त्या हाताच्या दाबानें व मागून आपल्या छातीच्या

रेघ्यानें राघोबादादांनीं नारायणरावांना धरलें होतें अशी स्थिति होती. राघोबादादांच्या डाव्या हाताला पूर्वीं दर्शविल्याप्रमाणें जी निमचाची जखम झाली ती याच स्थितींतली होती. नारायणरावांच्या डाव्या स्तनमंडलावर राघोबादादांचा हात असतांना ज्याअर्थीं त्यांच्या हाताला निसटती जखम झाली, त्याअर्थीं नारायणरावांनीं आत्महत्या करून घेण्याकरतां आपल्या शरीरावर जो निमचाचा वार करून घेतला त्याची सुरवात त्यांच्या डाव्या स्तनमंडळापासून झाली असेंच सिद्ध होतें. या वाराची सुरवात मागें दर्शविल्याप्रमाणें पंचेचाळीस डिग्रीच्या रोखानें झाल्यामुळें तो वार स्तनमंडळावरून आमाशयाचें द्वार भेदून खालीं जवळ जवळ नाभीपर्यंत उतरला होता यांत संशय नाहीं. म्हणून स्तनमंडळापासून खालीं नाभीपर्यंत जी शरीराची रचना आहे त्या रचनेंत निमचासारख्या शस्त्रानें जखम झाली असतां मृत्यु येण्याचा संभव आहे कीं नाहीं हें पहाणें अवश्य आहे.

उरो रक्ताशयस्तस्मादधः श्लेष्माशयःस्मृतः। आमाशयस्तु तदधस्तल्लिङ्गं चरकोऽवदत्॥

अर्थ—उरस्थान (छाती) ही रक्तशय आहे. त्याच्याखालीं कफाशय आहे. व त्याच्याखालीं आमाशय आहे. आमाशयाचें स्थान चरकामध्यें पुढीलप्रमाणें दिलें आहे:-नाभिस्तनान्तरं जन्तोराहुरामाशयं बुधाः॥ मनुष्याच्या नाभीपासून वर स्तनापर्यंतच्या अंतराला विद्वान लोक आमाशय असें ह्मणतात. आमाशयादधः पक्काशयादूर्ध्वं तु या कला। ग्रहणीनामिका सैव कथितः पाचकाशयः॥ ऊर्ध्वमग्न्याशयो नाभेर्मध्यभागे व्यवस्थितः। तस्योपरि तिलं ज्ञेयं तदधः पवनाशयः॥ पक्काशयस्तु तदधः स एव तु मलाशयः। तदधः कथितो बस्तिः स हि मूत्राशयो मतः॥ आमाशयाचे खालीं व पक्काशयाचे वर जो ग्रहणी नांवाचा लहानसा भाग आहे त्याला पाचकाशय असें ह्मणतात. नाभीच्या वर मध्यभागीं अग्न्याशय आहे. त्याच्यावर तीळ आहे. त्या तिळाचे खालीं पवनाशय आहे. त्याचे खालीं पक्काशय आहे. त्यालाच मलाशय ह्मणतात. त्याचे खालीं बस्ति आहे त्यालाच मूत्राशय म्हणतात.

३१. वर दर्शविल्याप्रमाणें स्तनापासून नाभीपर्यंत जें अंतर आहे त्या भागांत रक्ताशय, कफाशय, आमाशय, पाचकाशय, अग्न्याशय, पवनाशय मलाशय आणि मूत्राशय अशा पिशव्या आहेत. या पिशव्यांच्या ठिकाणीं जीं मर्मे आहेत त्यांतील कोणत्या मर्मांना पीडा झाली असतां तात्रडतोब मृत्यु येतो हें येथें पहाणें आवश्यक आहे. ॥ शृङ्गाटकान्यधिपतिः[1] शङ्खौ कण्ठशिरागुदम् । हृदयं बस्ति नाभी च सद्यो घ्नन्ति हतानि चेत् ॥ शृंगाटक, अधिपति, शंख, कंठशिरा, गुद, हृदय, बस्ति, नाभी यामध्यें कदाचित् मार लागला तर मनुष्याला तात्काळ मृत्यु येतो. स्तनयोर्मध्यमाधीष्ठायोरसि आमाशयद्वारं[2] सत्वरजस्तमसामधिष्ठानं हृदयं तत्रापि सद्य एव मरणं शिरामर्मेदं कमलमुकुलाकारं अधोमुखं चतुरंगुलं च ॥ दोन्ही स्तनांचा मध्यभाग व्यापून उराचे आंत, आमाशयाचें द्वार आणि सत्व-रजस्तमोगुणांचें अधिष्ठान असें हृदयसंज्ञक शिरामर्म आहे. हें कमळाचे कळ्याप्रमाणें व अधोमुख, चार अंगुलप्रमाण असून त्याला पीडा झाली असतां तें तात्काळ मरण देणारें आहे. याला **आमाशयमर्म** असेंही म्हणतात. पक्वामाशययोर्मध्ये[3] शिराप्रभवानाभिस्तत्रापि सद्यो मरणं शिरामर्मेदं चतुरंगुलम् ॥ पक्वाशय आणि आमाशय यांचेमध्यें शिरासमुदायांनीं झालेली अशी नाभी आहे. या मर्माला (नाभीमर्माला) इजा झाली असतां तात्रडतोब मरण येतें. हें शिरामर्म चार अंगुलें प्रमाण आहे. नारायणरावांनीं आत्महत्या करून घेण्याकरतां निमचाचा जो वार करून घेतला, त्या वाराची चीर त्यांच्या स्तनभागावरून खालीं उतरून नाभींपर्यंत गेली होती हें मागें आलेंच आहे. त्या भागांत वर दर्शविल्याप्रमाणें तात्काळ मृत्यु आणणारीं आमाशयमर्म व नाभीमर्म अशीं दोन मर्में होतीं. तीं दोन्हींही मर्में निमचाच्या वारानें छेदलीं जाण्याचा पूर्णपणें संभव होता. आमाशयाचें द्वार ज्याअर्थी निमचाच्या वारानें मागें दर्शविल्या-प्रमाणें छेदून गेलें होतें, त्याअर्थी आमाशयमर्म दुखावलें असलें पाहिजे हें

---

१. भावप्रकाश पान ५१.   २ व ३ सुश्रुत शारीर अध्याय ५ वा.

निश्चित होतें. त्याचप्रमाणें कोथळा ज्याअर्थी बाहेर आला होता त्याअर्थी तो बाहेर येण्यासारखी पोटाला चीर पडली होती हें निश्चित होतें. तेव्हां ती चीर नाभीपर्यंत खास उतरली होती असें गृहीत धरण्यास कोणतीच शंका असण्याचें कारण नाहीं. पेशव्यांच्या बखरींत म्हटल्याप्रमाणें 'नारायणराव-साहेब यांची शुद्धि गेली' याचें मुख्य कारण हें होतें. मर्मस्थानी वार लाग-ल्यामुळें ताबडतोब शुद्धि जाऊन त्या वेळीं नारायणरावांचा मृत्यूही जवळ आलेला होता. एकंदरींत पहातां तुळ्या पवार यानें जरी नारायणरावांचे पाय ओढून त्यांना खालीं पाडलें नसतें व सुमेरसिंगानें जरी त्यांच्यावर तेग्याचे वार केले नसते तरी नारायणरावांनीं निमचाचा जो वार आपल्या शरीरावर करून घेतला, त्या वारानें ते निःसंशय मरण पावले असते. वरील एकंदर मुद्दे लक्षांत घेतां व शास्त्रीय दृष्टीनें त्याची पूर्णपणें चिकित्सा करतां 'नारायणराव पेशवे यांचा खून कीं आत्महत्या' या मुद्यावर नारायणराव पेशव्यांनीं आत्महत्या करून घेतली असाच निर्णय ओघानें देणें प्राप्त होतें.

३२. नारायणराव पेशवे यांनीं वरील निर्णयाप्रमाणें आत्महत्या करून घेतली, परंतु या आत्महत्येमुळें तुळ्या पवारानें त्यांचे पाय धरून त्यांना जमि-नीवर पाडलें आणि सुमेरसिंगानें त्यांच्यावर तेग्याचे वार करून त्यांचा देह छिन्नविछिन्न करून टाकला या गुन्ह्यांतून ते व त्यांना सहाय्यक असणारी मंडळी निर्दोषी ठरूं शकत नाहींत. तेव्हां त्या दृष्टीनें त्यांचा परामर्ष घेणें येथें युक्त आहे; परंतु या पुस्तकाचा प्रतिपाद्य विषय 'नारायणराव पेशवे यांचा खून कीं आत्महत्या' एवढाच असल्यामुळें या पुस्तकाच्या मांडणींत या संबंधींच्या गुन्हेगारीच्या परामर्षाचा विषय येऊं शकत नाहीं. तरीपण, तोही विषय या प्रतिपाद्य विषयाशीं इतका निगडित आहे कीं, तो वाचल्याखेरीज वाचकांचें समाधान खात्रीनें होणार नाहीं, म्हणून त्याचा परामर्ष 'उपसंहारांत' घेतल्यास तें अयोग्य ठरणार नाहीं.

उपसंहार.

१. ऐतिहासिक सत्य निवडून काढण्यांत येणाऱ्या अडचणी कशा व कोणत्या असतात याचें विवेचन. परस्परविरुद्ध दिसून येणाऱ्या गोष्टींतून सत्यान्वेषणाचे मार्ग कोणते व कसे शोधावे लागतात याचें सोपपत्तिक विवेचन. खून कीं आत्महत्या या प्रश्नाला न्यायाच्या कांट्यावर चढविण्याचें कारण.—२ नाना फडनविस पेशवाईच्या कारभारांत केव्हां व कसे आले. माधवराव पेशव्यांच्या वेळीं नानांनीं बुद्धिचातुर्य, कपटकारस्थान व पाताळयंत्रीपणा यांच्या साधनानें आपलें स्थान कसें मजबूत केलें व आपलें लष्करी दृष्टीनेंही अलोट सामर्थ्य कसें वाढविलें होतें याचें विवेचन. माधवराव पेशव्यांच्या मृत्युनंतर केवळ वारसाहक्क नसल्या-मुळेंच नानांचे बेत फसले.—३ नारायणराव गादीवर आल्यानंतर नानांनीं राघोबादादांना कैद करून पेशव्यांची एक शाखा कलम केली. नारायणरावांना मारण्याचा गुप्त कट करून पेशव्यांच्या दुसऱ्या शाखेचा त्यांनीं नाश केला. नानांचें तत्व "पेशव्यांच्या मुठींत आपण न राहतां पेशव्यांना आपल्या मुठींत ठेवण्याचें" होतें. नानांनीं "नानाशाही" कशी निर्माण केली. "नाना-शाही"ची व्याख्या कशी होती.—४ नानांच्या संग्रहीं बुभुक्षित व क्रूरकर्मी कोण कोण लोक होते ? नानांनीं त्यांच्याकडून कसकशी कामगिरी करून घेतली यासंबंधींची हकीकत. परशुरामभाऊंचा वध करण्याच्या कारस्थानाचें स्वरूप व नारायणरावांचा वध करण्याच्या कारस्थानाचें स्वरूप एकच कसें होतें याचें विवेचन.—५ परशुरामभाऊ व तुळ्या पवार यांना नाना फडनविसांकडून मिळालेल्या शासनाचें तुलनात्मक विवेचन. नानांच्या कारस्थानाचे पवित्रे कोण कोणत्या प्रसंगीं कसकसे बदलत होते यासंबंधींची हकीकत.—६ नारा-यणरावांचा खून केल्याचा आरोप नानांवर कसा शाबीत होतो. नाना हे एकटेच अव्वल दर्जाचे आरोपी कसे होते. नानांनीं घाशीरामाप्रमाणें हरीपंत फडक्यांना पाठीशीं कसें घातलें व त्यामुळें नाना हे गुन्हेगार

कसे याचें विवेचन. न्यायप्रियतेचा दांभिकपणा नानांनीं कसा दाखविला. रामशास्त्री प्रभुणे हे नानांच्या मालिकेंतील एक मणीच होते —७ इतके दिवस नाना फडनविस हे निर्दोषी म्हणून कसे व कां ठरले गेले. नानांची जमिनींत गाडलेलीं पापें कबरींतून बाहेर कशीं निघालीं. नानांच्या गुन्हेगारीबद्दल त्यांना शिक्षा देण्यापूर्वीं त्यांच्या वर्तणुकीचाही विचार कां केला पाहिजे. त्यासंबंधींचे चार मुद्दे.—८ नानांनीं केलेले गुन्हे पेशवाईच्या कल्याणाचे व तिची इभ्रत वाढविणारे होते कीं काय या मुद्दा नं. १ वरील विवेचन व त्यावरील निर्णय.—९ " नानांच्या गुन्ह्यामुळें पेशवाईचें अगर पेशवाईतील प्रजेचें कल्याण झालें कीं काय ?" या मुद्दा नं. २ वरील विवेचन व त्यावरील निर्णय.—१० " नानांनीं केलेले गुन्हे कशाकरितां होते ?" व " नानांची वर्तणूक काय दर्शविते " या मुद्दा नं ३ व मुद्दा नं. ४ वरील विवेचन व त्यावरील निर्णय.—११ नानांची सर्व वर्तणूक कशी सर्वगुणद्रोही ठरते याचें विवेचन. नानांना देण्यांत येणाऱ्या शिक्षेचें स्वरूप. नानांना दिलेली पांच कलमी शिक्षा.

१. नारायणराव पेशवे यांनीं आत्महत्या करून घेतली हें मागील प्रकरणावरून सूर्यप्रकाशांत आलेंच आहे. आतां त्यांचा खून करण्याचा जो शेवटीं प्रयत्न झाला, त्यासंबंधींची कारणपरंपरा मागील प्रकरणांतून वेळोंवेळीं थोडी बहुत जरी देण्यांत आली असली, तरी ती समाधानकारक वाटण्याजोगी नाहीं. म्हणून या ठिकाणीं ती देणें जरूरीचें आहे. कोणतेंही राजकारण अथवा कोणतीही घटना कोणत्यातरी एका तत्वावर घडून येत असली म्हणजे त्यासंबंधीं आडाखे सर्वसाधारणपणें अगोदर बांधतां येतात. परंतु ज्या वेळीं परस्परविरुद्ध अशीं राजकारणें किंवा इतर घटना घडून येतात, त्या वेळीं शहाणे शहाणे म्हणविणाऱ्या लोकांचीही मति गुंग होऊन

जाते. बारभाईंचें कारस्थान, तोतयाचें बंड, महाडचें कारस्थान, परशुरामभाऊंचा वध वगैरे संबंधींचा इतिहास वाचला, म्हणजे त्याची पूर्णपणें साक्ष पटते. महादजी शिंदे, गंगाबाई व सवाईमाधवराव यांच्या मरणासंबंधींही परस्परविरुद्ध अशी ऐतिहासिक माहिती असल्यामुळें सत्य कोणतें व असत्य कोणतें हें निवडून काढण्यांत मनाचा गोंधळ उडतो. नारायणराव पेशवे यांच्या खून कीं आत्महत्या या बाबतींत असाच प्रकार होता. एक खून किंवा एक आत्महत्या अशी एकच अलग घटना असती, तर त्यासंबंधीं एका सरळ मार्गानें विचार करून सत्य बाहेर काढतां आलें असतें. परंतु या दोन्हीही कृतींचा अंतर्भाव असलेली घटना घडून आली असली म्हणजे खरी कृति कोणती हें शोधून काढणें दुरापास्त होतें. नारायणराव पेशवे यांच्या बाबतींत आत्महत्या ठरविण्याला शास्त्रांची मदत जशी प्रामुख्यानें कारणीभूत झाली, तशी इतर प्रत्येक बाबतींत ती तितकी साध्य होण्याचा संभव नसतो. अशा स्थितींत ठाम अनुमानानेंच सत्य बाहेर काढावें लागतें. एकाद्या चोरानें शंभर निरनिराळ्या चोऱ्या केलेल्या असतां त्यापैकीं पंचेवीस चोऱ्या मालमुद्देनिशीं शाबीत झाल्या म्हणजे बाकीच्या पंचाहात्तर चोऱ्यांबद्दल प्रत्यक्ष पुरावा त्याच दर्जाचा मिळाला पाहिजे अशी न्यायाधिशाच्या मनाची ओढ त्याला त्याही बाबतींत गुन्हेगार ठरवितांना राहत नाहीं. पुराव्यानें सिद्ध झालेल्या चोऱ्यांच्या लक्षणांप्रमाणें इतर चोऱ्यांचीं लक्षणें आहेत किंवा नाहींत हें पाहून त्यावरील आपल्या अनुमानाप्रमाणें तो न्यायाधीश त्या चोराला थोडासा पुरावा असलेल्या चोऱ्यांतही गुन्हेगार ठरवितो व त्याप्रमाणें शासनही करतो. या बाबतींतील अनुमान अपवाद म्हणून एकाद्या प्रसंगीं असत्य असूं शकेल, परंतु तें केवळ अपवादापुरतेंच मात्र राहील यांत शंका नाहीं. चोरी करणाऱ्याचा मनोधर्म व त्याच्यावरील आरोपाच्या चोऱ्यांचीं लक्षणें एवढ्याच गोष्टी न्यायाधीश ठाम अनुमान काढतांना विचारांत घेत असतो. याच संगतीला अनुसरून नारायणरावांना धरण्याचा जो कट झाला त्यांत मारण्याचा निराळा कट नानांनीं उत्पन्न केला

हें ठाम अनुमान आहे. तें न्यायाच्या कांट्यावर कसें सत्य ठरतें हेंच येथें प्रामुख्यानें दाखवावयाचें आहे.

२. नाना फडनविस हे माधवराव पेशवे यांच्या कारकीर्दींत इ. स. १७६४ मध्यें पेशव्यांच्या कारभारांत घुसले. त्यांच्या कारभारीपदाचा ओघ पेशवाईंतून छत्तीस वर्षें गेला. या लांब पल्ल्याच्या प्रवासाच्या प्रवाहांत नानांनीं अनंत कारस्थानें केलीं; अनंत राजकारणें ढवळलीं; अनंत लोकांना देहदंड दिले; अनंतांना जवळ केलें व अनंतांना जवळ केलेलें दूर लोटलें. नानांच्या या सर्व कृतींवरून नानांचा स्वभाव कसा होता, त्यांचा मनो-धर्म कशा स्वरूपाचा होता आणि त्यांची राजकारणपद्धति, त्यांचा पाताळ-यंत्रीपणा, त्यांचें धोरण व त्यांचीं तत्वें, त्यांची कपटकारस्थानी चाल वगैरे कशीं होतीं हें स्पष्ट दिसून येतें. नाना हे राजकारणाच्या आखाड्यांत इ. स. १७६४ मध्यें प्रथमतः उतरले. नानांनीं आपल्या बुद्धिप्रभावानें माधवराव पेशव्यांना आपल्या बगलेंत पूर्णपणें मारलें होतें. त्यांनीं आठ वर्षांच्या अवधींत म्हणजे इ.स.१७७२ पर्यंत (माधवराव पेशव्यांचा अंतकाळ होईपर्यंत) विविध कारस्थानें करून राघोबादादांचा पक्ष नेस्तनाबूत करून टाकला व पेशव्यांच्या राज्याचीं सर्व सूत्रें आपल्या लगामीं आणून ठेवलीं थोडक्यांत कल्पना द्यावयाची म्हणजे माधवराव पेशव्यांच्या मागून जो पेशवा गादीवर येईल तो केवळ पेशवाईच्या कुंकवाचा धनी म्हणून यावा एवढी सिद्धता नानांनीं करून ठेविली. माधवरावांच्या मरणकालीं त्यांच्या अतृप्त तीन इच्छा राहिल्या होत्या. या त्यांच्या इच्छा पेशवाईच्या इभ्रतीच्या व राज्यकारभारासंबंधींच्या होत्या. त्या खुद्द माधवराव पेशव्यांना पार पाडतां आल्या नाहींत म्हणून त्या त्यांच्या अतृप्त राहिल्या होत्या. अशा स्थितींत माधवरावांनीं आपल्या सर्व सरदारांना जवळ बोलावून भरदरबारांत आपल्या अतृप्त इच्छा तृप्त करण्याचें सामर्थ्य कोणांत आहे असें आव्हान दिलें. त्या वेळीं माधवराव पेशव्यांच्या दरबारांतील सर्व सरदार मंडळी

गप्प बसली. कोणाची हिंमत झाली नाहीं. शेवटीं 'त्या समयीं[1] नाना फडणवीस यांणीं छातीला हात लावून श्रीमंतांची खातरजमा केली, "या तिहीं गोष्टींची काळजी सरकारनीं ठेवूं नये, तिन्ही गोष्टी आम्ही पार करितों." तें ऐकून श्रीमंत रावसाहेब संतोष पावले.' वरील तीन गोष्टी कोणत्या होत्या हें मागें प्रकरण ९ कलम २१ मध्यें आलेंच आहे. त्या गोष्टी सामान्य नव्हत्या. पेशव्यांचें राज्यरक्षण करून शिवाय गिलचे व हैदर यांसारख्या बलिष्ठ शत्रूंचें पारिपत्य करणें ही गोष्ट सामान्य नव्हती. गिलचांनीं पानिपतच्या लढाईंत भाऊसाहेबांना सुद्धां पाणी पाजलें होतें, एवढा तो प्रबल शत्रू होता. तो शत्रू उत्तरेला तर हैदर दक्षिणेला होता. प्रत्यक्ष माधवरावांना सुद्धां हैदरचें मनाजोगें पारिपत्य करतां आलें नाहीं. त्या बाबतींत त्यांनीं अवाढव्य पैसा खर्च केला होता व भयंकर श्रमही केले होते. पण त्यांना मनाजोगें यश मिळालें नव्हतें. अशा जबरदस्त शत्रूंचें पारिपत्य करण्याची हमी ज्याअर्थीं नाना छातीला हात लावून घेतात त्या अर्थीं नानांच्या पाठीमागें हात जोडून पेशव्यांच्या राज्यांतील पूर्ण विश्वासांतलें असें लष्करी सामर्थ्य होतें हें निर्विवाद ठरतें. त्याचप्रमाणें एका चुटकीसरशी नानांच्या शब्दाबरोबर पंचवीस लाखांचे माधवराव पेशव्यांचे कर्जरोखे फेड झालेले म्हणून ज्या अर्थी परत आले त्या अर्थीं द्रव्याच्या दृष्टीनेंही नानांचें सामर्थ्य केवढें विशाल स्वरूपाचें बनलेलें होतें याची कल्पना सहज येते. माधवराव पेशवे ज्या वेळीं कालवश झाले त्या वेळीं नानांचें लष्करी सामर्थ्य व आर्थिक सामर्थ्य पेशव्यांचें राज्यरक्षण करण्याला पूर्णपणें समर्थ होतें असें स्पष्ट दिसतें. नानांच्या या सामर्थ्यानें माधवरावांनाही संतोष होऊन त्यांची काळजी दूर झाली होती. एकंदरींत पेशवाईचा कुलअखत्यारीनें कारभार चालवावयाला जीं साधनें व जें सामर्थ्य लागतें तें त्या वेळीं नानांच्या जवळ होतें. नानांना त्या वेळीं पेशव्यांच्या गादीचा वारसाहक्क वंशपरंपरेच्या नात्यानें जर दाखवितां आला असतां तर ते खात्रीनें

---

१ पेशव्यांची बखर पान ८६.

माधवराव पेशव्यांच्या मरणानंतर पेशव्यांच्या गादीचे लायक वारसदार म्हणून पुढें आले असते. परंतु नारायणराव हे त्या वेळीं जिवंत असल्यामुळें व राघोबादादा हेही जवळचेच असल्यामुळें पेशवाईच्या गादीचा वारसाहक्क नानांना मिळवितां येण्यासारखा नव्हता. नाना फडनविसांना तेवढीच न्यूनता भासत होती व ती त्या काळीं महत्वाची वाटत असल्यामुळें नानांच्या मताविरुद्ध माधवरावांना आपल्या राज्याची निरवानिरव करावी लागली. माधवरावांनंतर नारायणराव गादीवर आले व राघोबादादा पेशवाईच्या कारभारांत शिरले. या संबंधींचा इतिहास मागें प्रकरण ९ मध्यें आलेलाच आहे.

३. पुढें नारायणराव गादीवर आल्यानंतर व राघोबादादा कारभार पाहूं लागल्यानंतर अवघ्या चार महिन्यांच्या अवधींत नानांनीं आपला प्रमुख शत्रू राघोबादादा यांना कैद केलें. त्यामुळें पेशव्यांच्या गादीवर वारसा हक्क सांगणारी एक शाखा नष्टप्राय झाली. नानांनीं नारायणरावांना हाताशी धरून कारभार करावयाला सुरवात केली, पण तें बाळ नानांच्या मुठींत व धाकांत राहूं शकलें नाहीं. नारायणरावांच्या उद्दामपणाच्या वर्तनानें सरदार, मानकरी, मुत्सद्दी वगैरे मंडळी रुष्ट झाली व शेवटीं नानांचीही अब्रू जाऊन ते त्या बाबतींत मेटाकुटीला आले. इतर मंत्रीमंडळाचा सल्ला नारायणरावांना धरून कैद करावें व राघोबादादांना कारभारांत घ्यावें असें पडल्यामुळें नाना धरण्याच्या कटांतून बाहेर राहिले. त्यांना राघोबादादांचें अगदीं वावडें होतें. म्हणून धरण्याच्या कटांत मारण्याचा स्वतंत्र कट नानांना उभारावा लागला. नानांचें वाढलेलें सामर्थ्य, त्यांची महत्वाकांक्षा, त्यांचे कारस्थानी डावपेंच व त्यांचा पाताळयंत्रीपणा पाहतां ते धरण्याच्या कटापासून तों मारण्याच्या कटापर्यंत अलिप्त होते असें म्हणतांच येत नाहीं. त्यांच्या प्रत्येक कारस्थानाचें स्वरूप पूर्ण गंभीर व अगदीं गुप्त स्वरूपाचें असे. त्यामुळें त्यांच्या सत्य स्वरूपाची कल्पना कोणालाच येत नव्हती. प्रकरण १० वें, प्रकरण ११ वें व प्रकरण १२ वें हीं मननपूर्वक वाचलीं म्हणजे नानांच्या कारस्थानांचा धर्म व

त्यांचा मनोधर्म पूर्णपणें लक्षांत येण्यासारखा आहे. नानांना राजशाही नको होती. त्यांना नानाशाही निर्माण करावयाची होती. नाना पेशव्यांच्या मुठींत राहूं इच्छित नव्हते. त्यांना पेशवे मुठीं ठेवावयाचे होते. राघोबादादा नानांच्या मुठींत सांपडण्यासारखे नव्हते, म्हणून ते नानांचे शत्रू होते. त्यांची अवस्था नानांनीं कशी केली हें मागें विस्तारानें आलेलेंच आहे. त्यांचा सर्वनाश नानांनीं केला. सदाशिवरावभाऊ नानांच्या मुठींत मावण्यासारखे नव्हते म्हणून तेही नानांचे शत्रू बनले. नानांनीं या शत्रूचें त्याचा वध करवून कसें पारिपत्य केलें हें प्रकरण १८ मध्यें आलेंच आहे. सवाईमाधवराव जोंपर्यंत अर्भकावस्थेंत होते तोंपर्यंत ते नानांचे जीव कीं प्राण होते. पुढें ते मोठे होऊन त्यांची बुद्धि स्वतंत्रपणें ज्या वेळीं काम करूं लागली त्या वेळीं ते नानांचे शत्रू बनले. नानांनीं आपल्या या शत्रूचा प्राणच घेऊन सोडला. प्रकरण ३० वें वाचलें म्हणजे त्याबाबतची सर्व हकीकत लक्षांत येते. शेवटीं दुसरे बाजीराव गादीवर आले. ते जोंपर्यंत नानांच्या मुठींत पक्केपणें आले नव्हते तोंपर्यंत ते नानांचे शत्रूच होते. शेवटीं ज्या वेळीं नानांना शरण जाऊन नानांच्या बंदिवासाची शिक्षा त्यांनीं सक्तीच्या खुशीनें पतकरिली तेव्हां ते नानांचे मित्र बनले. एकंदरींत नानाशाहीचा पवित्रा पेशव्यांना गुलाम बनविण्याचा होता हें निर्विवाद ठरतें. उलटपक्षीं नानाशाहीच्या राजकारणी पवित्र्याबाहेर वागणाऱ्या पेशव्याला नानाकडून एकच दंड मिळत होता. तो म्हणजे मृत्यु हा होय. सवाईमाधवरावांप्रमाणें नारायणरावांना हाच दंड देणें नानाशाहीच्या न्यायदेवतेचें कर्तव्य होतें. नानाशाहीविरुद्ध प्रत्यक्ष पेशवे गेले तेव्हां त्यांची काय अवस्था झाली हें पाहिलें म्हणजे इतरांचा विचार करण्याचें कारणच उरत नाहीं. मोरोबादादा, सखारामबापू, महादजी शिंदे, सखाराम हरी, बाळोबातात्या, परशुरामभाऊ, रामचंद्रपंत परांजपे, व्यंकटराव घोरपडे वगैरे वगैरे थोर मंडळी नानांच्या मुठींत जोंपर्यंत होती तोंपर्यंत ते नानांचे मित्र राहिले. नानाविरुद्ध ते गेल्याबरोबर ते सर्वच नानाशाहीच्या न्यायदेवतेच्या वरवंट्याखालीं एकजात चिरडले गेले. थोडक्यांत नाना म्हणजे पेशवाई व पेशवाई म्हणजे नाना

अशी नानाशाहीची व्याख्या होती व त्या नानाशाहीविरुद्ध जाणाऱ्या कोणालाही मरणाची एकच शिक्षा नानांकडून मिळत असे.

४. नानांच्या कारस्थानांच्या पद्धतींतील जे निरनिराळे डावपेंच दिसतात त्यांत हलक्या लोकांना हाताशीं धरून आपलीं कारस्थानें पार पाडून घेतल्याचींही उदाहरणें आहेत. हीं हलकीं माणसें म्हणजे बुभुक्षित असलेल्या व्यक्ती होत. त्या पराक्रमानें हलक्या दर्जाच्या नव्हत्या किंवा कुलशीलानेंही कमी प्रतीच्या नव्हत्या. त्यांच्या आकांक्षेप्रमाणें त्यांना जें पाहिजे होतें तें मिळत नव्हतें एवढयाकरतां ते लोक बुभुक्षित राहिलेले होते. कोणाला अधिकाराची भूक होती तर कोणाला द्रव्याची लालसा होती. कोणाचे ठिकाणीं सूडाची पिपासा होती तर कोणी विषयासक्तीच्या तळमळींत होता. एकंदरींत तीं समाजांतील कर्तृत्ववान माणसें असून कोणत्या ना कोणत्या तरी वरील कारणाकरतां बुभुक्षित होती. अशा बुभुक्षित माणसांचा संग्रहही नानांजवळ होता. नानांच्या या संग्रहांत घाशीराम हें एक पात्र असेंच होतें. तो क्रूरकर्मी, द्रव्यलोभी विषयासक्त आणि व्यसनीही होता. तसाच तो पराक्रमीही होता. आपल्या कारस्थानाला त्याच्याकडून जो उपयोग करून घ्यावयाचा तो नानांनीं घेतला. नानांचा दुसरा हस्तक सचीवांचा कारभारी बाजीराव मोरेश्वर हा होय. हा नानांच्या संग्रहांतील प्राणी कसा क्रूरकर्मी, विषयासक्त आणि लोभी होता हें प्रकरण २७ कलम १७ वाचलें असतां लक्षांत येईल. त्याचप्रमाणें सर्जेराव घाटगे यांना नानांनीं कसें हाताशीं धरलें व आपलें महाडचें कारस्थान कसें यशस्वी करून घेतलें हेंही मागें आलेंच आहे. तोच प्रकार तुळ्या पवाराच्या बाबतींत होता. तो पेशव्यांचा खिदमदगार म्हणून नोकरींत होता. तो नानांच्या पूर्ण सहवासांत होता. तोही हलक्या मनोवृत्तीचा होता. बुभुक्षित होता. त्याचा फायदा नानांनीं नारायणरावांना मारण्याच्या कटांत कसा करून घेतला हें प्रकरण १२ वें यांत दिलेंच आहे. नारायणरावांना धरण्याच्या कटांत नानांनीं जो मारण्याचा कट केला त्यांत नानांच्या नेहमींच्या

स्वभावधर्माचा विचार करतां राघोबादादा व नारायणराव या उभयतांस मारून टाकण्याचा तो कट असला पाहिजे असें स्पष्ट अनुमान निघतें. या नानांच्या इष्ट हेतुप्रमाणें जर उभयतां पेशवे मृत्युमुखीं पडले असते तर आपली कुलअखत्यारी कायम राखण्याकरतां नानांना जे भगीरथ प्रयत्न करावे लागले ते लागले नसते. राघोबादादा व नारायणराव अशा उभयतांना एकाच ठिकाणीं मारून टाकण्याची भाषा नारायणरावांच्या मृत्यूच्या वेळीं निघाली होती. ही भाषा हरिवंशाच्या बखरींत दिलेली आहे. त्यांत ती भाषा तुळया पवाराच्या तोंडून निघालेली नसून आनंदीबाईच्या तोंडीं दाखविलेली आहे. त्या वेळीं तेथें आनंदीबाई नव्हती हे आतां सप्रमाण सिद्ध झालेलें आहे. राघोबादादांवर हत्यार चालविण्यास सुमेरसिंग तयार होणें शक्य नव्हतें. कारण राघोबादादा जिवंत राहिले असते तरच सुमेरसिंगाचें ठरलेलें बक्षिस त्याला मिळणार होतें. एवढयाचकरतां तुळ्या पवाराच्या कामगिरीपैकीं पन्नास टक्के काम पार पडावें म्हणून त्यानें नारायणरावांचे पाय धरून त्यांना राघोबादादांपासून अलग केलें. तुळ्या पवाराला आपली कामगिरी पार पाडण्यांत नारायणरावांच्या वधापुरतीच सुमेरसिंगाची मदत आयत्या वेळीं मिळूं शकली, म्हणूनच ती कामगिरी त्यानें त्यांच्या अंगावर शस्त्र चालवून बजावली. यावरून नानांच्या कारस्थानाचा ओघ कसा होता व प्रत्यक्ष कृतींत ती कामगिरी कशी कशी वठून येऊं शकली हें लक्षांत येईल.

५. नानांनीं महाडचें कारस्थान जें रचिलें त्या कारस्थानाचें मूळ स्वरूप व बारभाईंच्या कारस्थानाचें मूळ स्वरूप अगदीं एकाच स्वरूपाचें आहे. बाजीरावाला गादीवर न बसवितां चिमाजीला यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन पेशव्यांची गादी चालवावी या कटाचे उत्पादक नाना होते. परशुरामभाऊ पटवर्धन व शिंदे याला तयार झाले. त्याप्रमाणें नानांनीं परशुरामभाऊंना आज्ञा दिली. त्यांच्या आज्ञेप्रमाणें परशुरामभाऊंच्या हातून पन्नास टक्के काम पार पडलें. भाऊंना नानांच्या दोन आज्ञा होत्या. चिमा-

जीला गादीवर बसविणें व दुसरी बाजीरावाला कैद करणें. पैकीं भाऊंनीं चिमाजीला गादीवर बसविलें परंतु त्यांना बाजीरावाला कैद करून आपल्या-स्वाधीन ठेवतां आलें नाहीं. भाऊंनीं या फक्त पन्नास टक्केच बजावलेल्या कामगिरीमुळें नाना रुष्ट झाले व त्यांना महाडचें कारस्थान करावें लागलें. तीच तंतोतंत स्थिति नारायणरावांच्या वधाच्या वेळीं घडून आली असली पाहिजे. नानांचा कट फक्त नारायणरावांना मारण्यापुरताच असता तर तुळ्या पवारावर पुढें नानांचा जो रोष झाला तो झाला नसता. नानांचा रोष भाऊंवर ज्या प्रमाणांत झाला त्याच प्रमाणांत तुळ्या पवारावरही झालेला आहे. त्यावरून पहातां तुळ्या पवारावर जी कामगिरी नानांनीं सोंपविली होती ती राघोबादादा व नारायणराव या उभयतांस मारून टाकण्याबद्दलची होती हें नानांच्या इतर कारस्थानपद्धतीवरून अगदीं स्पष्ट होतें. तुळ्या पवाराकडून राघोबादादांना मारण्याचें कृत्य झालें नाहीं म्हणून पुढें नानांना बारभाईचें कारस्थान आपले सर्व कारस्थानी पवित्रे बदलून व गुन्हेगारीचे उलटे आरोप दुसऱ्यावर लादून करावें लागलें. दुसऱ्यावर आरोप लादण्यांत व चोराला सोडून संन्याशाला सुळीं देण्यांत नाना इतके तरबेज व पटाईत होते कीं, त्या बाबतींत त्यांना बिनतोड उपमा देणें झाल्यास ती नानांची म्हणजे त्यांची स्वतःचीच द्यावी लागेल. याचीं उदाहरणें मागें वेळोवेळीं आलीं असल्यानें येथें आणखीं निराळीं देण्याचें कारण नाहीं.

६. एकंदरींत पहातां नानांनीं नारायणरावांना व राघोबादादांना मारण्याचा जो गुप्त कट केला व ज्या कटामुळें प्रत्यक्ष नारायणरावांच्या देहावर तेग्याचे वार होऊन त्यांचें शरीर छिन्नविछिन्न झालें, त्या गुप्त कटाचा आरोप नानांवर ठेवण्यांत येऊन त्यांत नाना हे पूर्ण गुन्हेगार आहेत असें मुक्त कंठानें जाहीर करण्यास कोणत्याच प्रकारची शंका राहत नाहीं. नारायणरावांचें रक्षण करण्याची सर्व जबाबदारी नानांवर होती. नाना पुण्यांत असून आपल्या स्वतःच्या वाड्यांत त्या वेळीं हजर होते. पेशवाईचा सर्व कारभार नानांच्या हातीं त्या वेळीं पूर्णपणें होता. असें असतां नाराय-

णरावांच्या खुनाच्या जबाबदारींतून त्यांना निसटून जाणें अगदीं अशक्य आहे. सवाईमाधवरावांच्या रक्षणाच्या जबाबदारीचीही अशीच स्थिति आहे. त्यांच्या मृत्यूच्या बाबतींतही ते नारायणरावांच्या खुनाच्या आरोपाइतकेच गुन्हेगार आहेत. नारायणरावांच्या रक्षणाची जबाबदारी हरीपंत फडके यांचेवर प्रत्यक्ष होती. घाशीराम कोतवाल अपराधी असतांना नानांनीं त्याला जसें पाठीशीं घातलें होतें तसेंच हरीपंतांना नानांनीं पाठीशीं घालून त्यांना पळवून लाविलें होतें. यावरून नाना हे अव्वल गुन्हेगार होते हें स्पष्टच होतें. नानांनीं आपला आरोप राघोबादादा व आनंदीबाई यांच्यावर लादला, परंतु तो त्यांना सिद्ध करतां आला नाहीं. 'ध' चा 'मा' केलेला बनावट पुरावा आपल्या आरोपाच्या समर्थनाकरतां नानांनीं पुढें आणला. परंतु त्याची न्यायाच्या कांट्यावर रेवडी उडाली. नानांच्या पक्षांतील रामशास्त्री प्रभुणे हे नानांची पाठराखणी करण्याकरतां पुढें आले. हेच प्रभुणे तोतयाच्या बंडांतही नानांना सामील होतेच. नानांबरोबर त्यांच्याही न्यायप्रियतेचे कसे धिडवडे निघाले हें पूर्वीं आलेंच आहे. एकंदरींत न्यायप्रियतेचा दांभिकपणा लोकदृष्टीला दाखवून आंतून केवळ स्वार्थाकरतां दुसऱ्याचे केंसानें गळे कापण्याचीं कृत्यें नाना कशीं कशीं घडवून आणीत होते हें वेळोंवेळीं दिसून आलेंलेंच आहे. म्हणून नारायणराव पेशव्यांच्या खुनाच्या बाबतींत नाना हे एकटेच अव्वल दर्जाचे गुन्हेगार आहेत हें त्रिवार सत्य आहे.

७. नारायणराव पेशवे यांच्या खुनाच्या बाबतींत नाना हे अव्वल दर्जाचे गुन्हेगार—दोषी जरी असले तरी त्यांच्या हातून प्रत्यक्ष खून घडलेला नाहीं. तेव्हां प्रत्यक्ष खून करणारे इसमही नानांप्रमाणेंच दोषी आहेत. त्या त्यांच्या दोषाबद्दल त्यांना नानांकडूनच कडक शिक्षा मिळालेली आहे. त्यांना ती शिक्षा मिळाली असल्यामुळे येथें त्यांच्या शिक्षेबद्दल प्रश्न शिल्लक राहत नाहीं. आतां फक्त राहून राहिले नाना. ते आपल्या मरणापर्यंत निर्दोषी म्हणून वावरले.व पुढेंही आजतागाईत त्यांना निर्दोषी म्हणून मानण्यांत आलें; पापें जमिनींत अखंड गाडलेलीं राहत नाहींत. तीं केव्हांना केव्हां

पुन्हां जिवंत होऊन कबरींतून बाहेर पडत असतात. नानांचीं बरी-चशीं पापें सांप्रत बाहेर पडलीं असल्यामुळें नारायणराव पेशव्यांच्या खुनाच्या प्रकरणांत ते अव्वल दर्जाचे दोषी ठरलेले आहेत. तेव्हां त्यांनीं आजपर्यंत चुकवून घेतलेली शिक्षा त्यांना मिळणें हें न्यायाचें होणार आहे. गुन्हेगा-राला शिक्षा सुनावण्याचे पूर्वीं त्याची वर्तणूकही लक्षांत घ्यावी लागते. म्हणून नानांच्या बाबतींत शिक्षा ठरविण्याचे पूर्वीं त्यांची वर्तणूकही लक्षांत घेणें प्राप्त आहे. नाना कारभार करीत असतां त्यांनीं ज्या ज्या गोष्टी घडवून आणल्या त्यावरून त्यांची वर्तणूक लक्षांत येण्यासारखी आहे. पेशवाईच्या कारभारांत शिरल्यापासून मरेतोंपर्यंत नानांनीं जे निरनिराळे गुन्हे केले, त्यावरून नानांची वर्तणूक तपासून पहाणें झाल्यास खालील मुद्दे लक्षांत घ्यावे लागतील. १ नानांनीं केलेले गुन्हे पेशवे घराण्याच्या कल्याणाचे अगर त्याची इभ्रत वाढविणारे होते कीं काय ? २ नानांच्या गुन्ह्यामुळें पेशवाईचें अगर पेशवाईंतील प्रजेचें कल्याण झालें कीं काय ? ३ नानांनीं केलेले गुन्हे कशाकरतां होते ? ४ नानांची वर्तणूक काय दर्शविते ? या चार मुद्यांचा विचार केला म्हणजे नानांची खरी वर्तणूक कशा प्रकारची होती हें सहज सिद्ध होईल.

८. ' नानांनीं केलेले गुन्हे पेशवे घराण्याच्या कल्याणाचे अगर त्याची इभ्रत वाढविणारे होते कीं, काय ? ' असा पहिला मुद्दा आहे. नाना कारभारांत शिरल्यापासून थोरले माधवराव, नारायणराव, सदाशिवरावभाऊ, राघोबादादा, सवाईमाधवराव, दुसरे बाजीराव, चिमाजीआप्पा व अमृत-राव, इतके पेशवे घराण्यांतील पुरुष झाले. त्याचप्रमाणें गोपिकाबाई, रमाबाई, आनंदीबाई, पार्वतीबाई, सगुणाबाई, गंगाबाई, यशोदाबाई, इतक्या पेशवे घराण्यांत स्त्रिया झाल्या. माधवराव पेशव्यांच्या वेळीं नानांनीं राघोबा-

दादा व सदाशिवरावभाऊ यांच्याविरुद्ध राजपक्ष म्हणून निर्माण करून दाखविला व माधवरावांची फसवणूक करून शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले, पटवर्धन वगैरे फौजबंद सरदारांना आपल्या स्वतःच्या लगामीं आणून पेशव्यांच्या घराण्यांतील पुढील पुरुषांच्या राजहक्कावर गदा आणिली. नानांनीं आपण वाढविलेल्या लष्करी सामर्थ्यावर नारायणरावांचा खून करवून त्याचा गुन्हा राघोबादादांवर लादला व त्यांना माणसांतून उठवून त्यांचा सर्व बाजूंनीं नाश केला. त्यांनीं सदाशिवरावभाऊंना तोतया ठरवून त्यांचा वध केला. त्यांनीं सवाईमाधवरावांवर भलभलते आरोप लादून त्यांना आत्महत्या करून घेण्यास भाग पाडलें. राघोबादादांचे पुत्र अमृतराव, बाजीराव व चिमाजीआपा यांना तर नानांनीं दरवेशाचीं आस्वलें बनविलें. एकंदरींत नानांच्या कारस्थानामुळें पेशवे घराण्यांतील सर्व पुरुषांचा नाश झाला. गोपिकाबाईला जोगवा मागून पोट भरण्याची पाळी आली. सती रमाबाई यांची नानांनीं मानखंडना केली. गंगाबाईचें शील व जीवित नानांनीं हिरावून घेतलें. साध्वी पार्वतीबाई यांचे त्यांनीं धिंडवडे काढले. अपमान, मानखंडना, निरनिराळ्या कंड्या उठवून केलेली बदनामी, बंदिवासाच्या हालअपेष्टा इत्यादि निंद्य साधनांनीं आनंदीबाईचा नानांनीं नाश केला. सगुणाबाई व यशोदाबाई यांना नानांनीं खेळणें बनविलें. हा सर्व इतिहास मागें आलेलाच आहे. एकंदरींत नानांनीं पेशवे घराण्यांतील कोणत्याही स्त्रीचें अगर पुरुषाचें कल्याण तर केलें नाहींच, उलट सर्वांचा निरनिराळ्या पद्धतीनें नाश करून पेशव्यांबद्दल प्रजाजनांतील आदरही नष्ट करून टाकला. पेशवे घराण्यांतील स्त्रीपुरुषांच्या दृष्टीनें नानांनीं केलेले वरील गुन्हे अक्षम्य स्वरूपाचे ठरतात.

९. ‘ नानांच्या गुन्ह्यांमुळें पेशवाईचें अगर पेशवाईतील प्रजेचें कल्याण झालें कीं काय ? ’ हा दुसरा मुद्दा आहे. नाना पेशवाईच्या कारभारांत

आल्यापासून तों आपल्या मरणकाळापर्यंत त्यांनीं पेशवाई फोडून तिचे तुकडे तुकडे करण्याचा सतत प्रयत्न केला. शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले या मुख्य पेशवाईच्या आधारस्तंभांना त्यांनीं फोडून अलग केलें. त्यांच्या त्यांच्या मध्यें भाऊबंदीचें वीष ओतलें. यामुळें ते सरदार स्वतः दुबळे झाले व पेशवाईही त्यांच्या दुबळेपणामुळें क्षयरोगी बनली. त्याचप्रमाणें पेशव्यांचे फौजबंद सरदार जे पटवर्धन त्यांच्याही घरांत दुफळी उत्पन्न करून व करवीरकरांचा व त्यांचा कायमचा द्वेषभाव वाढवून त्यांचें सामर्थ्य कायमचें खच्ची केलें. महाराष्ट्रांतील सेनाधुरंधर राघोबादादा, सदाशिवरावभाऊ, महादजी शिंदे, परशुरामभाऊ, सखाराम हरी, नारो शंकर, शेणवी सरदार वगैरे थोर थोर लोकांचे बळी घेऊन पौरुषापासून महाराष्ट्राला अलग केलें. सखारामबापू, मोरोबादादा, गंगोबातात्या वगैरे पेशवाईच्या हितकर्त्या थोर थोर मुत्सद्यांचा नाश करून महाराष्ट्राच्या बुद्धिवैभवाला त्यांनीं खग्रास ग्रहण लाविलें. तोतयाच्या व मोरोबादादाच्या बंडाच्या नांवाखालीं व इतर फितुरीच्या गुन्ह्याखालीं नानांनीं कित्येक कोंकणस्थ सरदारांचीं घराणीं नामशेष करून टाकलीं. कित्येकांना कायमचे डोंगरी किल्ले दाखविले तर कित्येकांना अन्नपाण्यावांचून कोंडून मारलें. कित्येकांना प्रायश्चित्ताच्या वरवंट्याखालीं चिरडलें तर कित्येकांना त्यांच्यावर निरनिराळ्या करांच्या पट्या बसवून रगडून काढलें. कित्येक सावकारांचें कर्ज बुडवून त्यांचे खिसे हलके केले तर कित्येकांच्या माथीं गुन्हेगारी लादून त्यांचें द्रव्य हरण केलें. कित्येकांचे सरंजाम स्वतः जप्त केले तर कित्येकांना दुसऱ्यांच्या जहागिरी अपहार करण्यास सनदा दिल्या. एकंदरींत नानांनीं पेशवाईचे तुकडे तुकडे करून सर्व बाजूंनीं पेशवाईचा नाश केला. एवढेंच नव्हे तर पेशवाईला स्वराज्यांतील व परकीय राज्यांतील कायमचे हितशत्रू निर्माण करून ठेवले. त्याचप्रमाणें पेशव्यांच्या

राज्यांतील रावापासून रंकापर्यंत सर्व प्रजाजनांना केव्हांच सुखानें नांदू न देतां त्यांना त्यांनीं तरवारीच्या धारेवर कायम धरल्याप्रमाणें ठेवलें होतें, हें मागील सर्व इतिहास पहातां लक्षांत येईल. नानांनीं पेशव्यांच्या राज्यांतील लहान मोठे किंवा जातगोत याचा कांहींही विचार न करतां सर्वांना सारखें भरडून काढलें आहे. यावरून पेशवाईच्या दृष्टीनें व पेशवाईतील प्रजाजनांच्या दृष्टीनें नानांचे गुन्हे अक्षम्य आहेत यांत तिळमात्र शंका नाहीं.

१०. नानांनीं केलेले सर्व गुन्हे केवळ त्यांच्या स्वतःच्या व्यक्तीकरतांच होते. त्यांनीं आपली आसुरी महत्वाकांक्षा पुरी करून घेण्याकरतांच केवळ हे सारे गुन्हे केले आहेत, हें मागील इतिहासावरून स्पष्ट झालेलें आहे. नानांची राजकारभारांतील व खासगी वर्तणूकही पूर्णपणें अन्यायाची, व्यवहार सोडून व गुन्हेगारीची आहे. त्यामुळें मुद्दा नं. ३ व ४ या दृष्टीनेंही नानांचे अपराध अक्षम्य आहेत.

११. नाना हे राजद्रोही, स्वराज्यद्रोही, मित्रद्रोही, गुरुद्रोही, आप्तद्रोही, पत्नीद्रोही, धर्मद्रोही, आचारद्रोही, जातिद्रोही, न्यायद्रोही, प्रजाद्रोही, कुलद्रोही वगैरे वगैरे सर्वगुणद्रोही असल्यामुळें व 'नारायणराव पेशवे यांचा खून कीं, आत्म-हत्या' या प्रकरणीं ते खुनी म्हणून दोषी ठरल्यामुळें त्यांना खालीलप्रमाणें शिक्षा देणें अपरिहार्य झालें आहे. नाना या वेळीं जिवंत असते तर पुण्याच्या ब्राम्हण समाजानेंच त्यांच्या घाशीरामासारख्या प्रियपात्राप्रमाणेंच त्यांना अखेरची शिक्षा दिली असती; परंतु सध्यां दुर्दैवानें ते प्रत्यक्ष हयात नाहींत म्हणून त्यांच्या शिक्षेची पद्धत बदलणें प्राप्त झालें आहे.

नानांना दिलेल्या शिक्षेंतील कलमें.

१. यापुढें राष्ट्रपुरुषाच्या यादींतून नानांचें नांव काढून टाकून त्या जागीं राघोबादादांचें नांव लिहावें व कलिपुरुषांच्या यादींत अग्रस्थानीं नानांचें नांव कायमचें नोंद करावें.

२. नानांची श्राद्धतिथि प्रत्येकानें दिवाळीच्या पहिल्या दिवसाप्रमाणें अभ्यंग-स्नान करून आनंदांत पार पाडावी.

३. स्त्रियांनीं नानांच्या फोटोचें दर्शन घेऊं नये. दर्शन घडल्यास स्नान करून शुद्ध व्हावें.

४. यापुढें 'नाना फडनविस' हा शब्दप्रयोग दूषणावह म्हणून मानण्यांत यावा.

५. वरील चार कलमाखेरीज आणखीं कोणतीही कडक शिक्षा नानांना कोणत्याही वेळीं कोणासही देण्याचा पूर्ण अधिकार आहे.

वरीलप्रमाणें नानांना दिलेल्या पांच कलमी शिक्षेची अंमलबजावणी बृहन्महाराष्ट्रीयांना स्वतःवरच करून घ्यावयाची असल्यामुळें त्यांनीं ती आपापल्या इच्छेप्रमाणें व आपापल्या सोईप्रमाणें केव्हांही करून घ्यावी. त्याला मुदतीचें बंधन ठेवलेलें नाहीं.

समाप्त.